टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.

ग्रंथसंशोधनप्रकाशनमंडळ–प्रकाशन : ७ वें

[ महाराष्ट्र-राज्य साहित्य-संस्कृति मंडळाचे अनुदान मिळालेला ]

# आदिशक्तीचे विश्वस्वरूप

अर्थात्

# देवीकोश

खंड २ रा

*

लेखक

प्रल्हाद कृष्ण प्रभुदेसाई

शके १८९० ] चंपाषष्ठी २५ नोव्हेंबर [ सन १९६८

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे २.

# प्रकाशकाचे निवेदन

टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या ग्रंथसंशोधन प्रकाशन मंडळाचे सातवे प्रकाशन–देवीकोश, तिसरा भाग–मराठी जनतेच्या हाती देताना आम्हांस आनंद होत आहे. पहिला भाग दि २१ ऑगस्ट १९६७ रोजी डॉ. जाकीर हुसेन, भारताचे राष्ट्रपति यांचे शुभहस्ते प्रकाशित झाला व दुसरा भाग नभोवाणीमंत्री श्री. के. के. शहा यांचे शुभहस्ते दि. ८ एप्रिल १९६८ रोजी प्रकाशित झाला. ह्या ग्रंथाचे संपादक—श्री प्र कृ. प्रभुदेसाई यांनी या ग्रंथाच्या स्वरूपासंबंधीची माहिती पहिल्या भागाच्या विस्तृत प्रस्तावनेमध्ये दिलेली आहे यावरून देवीभक्तां-प्रमाणेच देवी उपासना-परंपरेसंबंधी संशोधनात्मक अभ्यास करणाऱ्यानाही हा ग्रंथ फार उपयोगी पडेल असा विश्वास वाटतो

महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळाने पाच हजार रुपये अनुदान देवीकोशाच्या तीन भागाच्या प्रकाशनासाठी मंजूर केले आहे मंडळाच्या या साहाय्याबद्दल प्रकाशक ऋणी आहे.

ग्रंथ-संपादक श्री प्र. कृ. प्रभुदेसाई यांनी ग्रंथ संपादनासाठी फार परिश्रम घेतले आहेत. ग्रंथामध्ये संकलित केलेल्या विविध माहितीवरून वाचकाना या विधानाची सत्यता पटून येईल. देवीसंबंधी इतकी विविध माहिती कोणत्याही ग्रंथात एकत्र केलेली नाही ह्या परिश्रमपूर्वक संपादनाबद्दल त्याना संसतोष धन्यवाद देत आहो

ह्या ग्रंथामध्ये मांडलेली मते व इतर ग्रंथांतून घेतलेली अवतरणे इत्यादी बाबतची सर्व जबाबदारी ग्रंथ-संपादकांची आहे. प्रकाशकावर त्यासंबंधी कसलीही जबाबदारी नाही.

प्रतिभा मुद्रणालयाने ग्रंथ मुद्रणाची जबाबदारी योग्य रीतीने पार पाडली, त्याबद्दल त्या मुद्रणालयाच्या व्यवस्थापकाचे आभार मानून हे निवेदन पूर्ण करीत आहे.

प्रकाशक
मंत्री
ग्रंथ संशोधन प्रकाशन मंडळ,
टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे २

चंपाषष्ठी १८९०
२५ नोव्हेंबर १९६८

# ऋणनिर्देश

'आदिशक्तीचे विश्वस्वरूप (देवीकोश)' या ग्रंथाचा हा तिसरा भाग आज वाचकाच्या हाती येत आहे पहिल्या भागाचे प्रकाशन दि २३ ऑगस्ट १९६७ ला राष्ट्रपति डॉ जाकीर हुसेन यानी केले दुसरा भाग दि ८ एप्रिल १९६८ रोजी भारताचे माहिती व आकाशवाणी मत्री नामदार के के शहा याच्या हस्ते प्रकाशित झाला

प्रथमत हा ग्रथ तीन भागात पूर्ण होईल अशी अपेक्षा होती

भारताच्या प्राचीन अस्मितेचे सर्वांगीण दर्शन आदिशक्तीच्या विश्वस्वरूपातून घडविणे हाही ग्रथाचा एक भाग होता ग्रथाचे प्रकाशन झाल्यावर शाक्ति तत्त्वज्ञान, देऊळवाडे, देवघर देवता, बौद्ध-जैन देवता इत्यादि प्रकरणाची मूळच्या हस्तलिखितामध्ये भर पडल्याने, पूर्व सकल्पाप्रमाणे तीन भागात ग्रथ पूर्ण करणे अशक्य झाले म्हणून चवथा भाग अपरिहार्य आहे

'देवताच्या इतिहासाबरोबर तत्कालीन समाज, आचार विचाराचे दर्शनही या ग्रथात होते राष्ट्रीय उत्कर्षाचा सबध देवताबरोबर दाखविल्याने देवताचा इतिहास स्फूर्तिदायक होऊन पुढील पिढीला मार्गदर्शक झाला आहे हा सपादक 'सकाळ' पुणे याचा अभिप्राय अगदी यथोचित असाच आहे

याच विचारधाराप्रवाहातून रेखाटलेले चित्र या शेवटच्या भागात अधिक दृग्गोचर होणार आहे 'कृण्वन्तो विश्वमार्यम्' या आर्यांच्या प्राचीन विजिगीषू वृत्तीचे हे चित्र बृहत्तर भारताचा विस्तार

(अ) सूर्यवशीय आक्रमक वीरानी पूर्वेकडे जावा सुमात्रा-बाली पेरु-मॅक्सिको, तर पश्चिमेकडे सिरिया अरबस्तान रोम ग्रीसपर्यंत वसाहती स्थापन करून किती दीर्घ प्रयत्नानी केला

(आ) सनातन धर्माच्या ध्वजेची घोडदौड कशी चौफेर झाली

(इ) भारतीयाचे प्राचीन कर्मकाडाचे दीप, बाली द्वीपस्थ बाधवानी अद्यावत काळापर्यंत कसे तेवत ठेवले आहेत

(ई) शिल्पशास्त्रातील नयनरम्य अद्भुत कलाकृतीचे दृश्य किती परिश्रमाने जगापुढे चिरस्थाई स्वरूपात उभे केले

(उ) सुवर्णानी मढविलेली मदिरे आणि अनेक प्रकारच्या रत्नानी अलकृत असलेल्या देवमूर्तींनी राजैश्वर्य कसे अमाप उपभोगिले इत्यादिकाचे मनाला आल्हाददायक व तरुणांना स्फूर्तिदायक वैभवशाली वर्णन आपणाला चवथ्या

खंडात वाचावयास मिळणार आहे. आदिशक्तीच्या विश्वस्वरूपाचा साक्षात्कार या खंडाचे वाचनानेच होणार आहे. ७५ चे वर श्लोक असलेल्या देवी केकावलीने ग्रंथ पूर्ण होईल.

मंदिराचे वैभव जसे कळस-शिखराने प्रकर्षाने झळकते, तद्वतच या ग्रंथ-मालेतील चवथा खंड शिखररूपाने सदैव झळकत राहणार आहे. संदर्भानुसारी चारही खंडांची सूची यात समाविष्ट होणार आहे. कदाचित याच खंडात देवताच्या मूळ स्वरूपातील छायाचित्रांचाही समावेश झालेला असेल. त्यासाठीच देवीकोशाचे सर्व खंड घरोघर असणे हे भारतीय संस्कृतीचे आचरण करणाऱ्या भारतीयांना भूषणभूत होणार आहे.

याही भागाची अनुक्रमणिका सूचीवजाच आहे. या तिसऱ्या खंडाचे प्रकाशनाने आगावू ग्राहक नोंदणीदारांना लेखकाने दिलेले वचन आणि त्यांनी भरलेले मूल्य यांची पूर्ण भरपाई होत आहे, याबद्दल मी समाधानी आहे. चवथ्या खंडाची पृष्ठसंख्या व छायाचित्रे याबाबत आज निश्चितपणा नसल्याने किंमतीचे आश्वासन देणे अशक्य आहे. याकरिता नम्र विनंती अशी की, चवथ्या खंडासाठी जुन्या ग्राहकांनी आपल्या प्रतीसाठी लेखक-प्रकाशकाकडे आगावू नोंदणी आजच करून ठेवावी, म्हणजे तीही प्रत त्याना कमी किंमतीत देण्यात येईल.

या ग्रंथाच्या तीनही भागांचे काम पूर्ण होताना, अनेक सहकाऱ्यांची मला जी आपुलकीची मदत लाभली, त्याबद्दल त्यांचे ऋण कृतज्ञतापूर्वक मान्य करतो. पहिल्या भागात नामोच्चार झालाच आहे. ते सर्व याही भागाच्या प्रसिद्धीच्या वेदनांचे भागिदार आहेतच ! त्या सर्वांचे पुन्हा एकवार साफल्याने मनःपूर्वक आभार मानतो. तसेच टिळक महाराष्ट्र विद्यापीठ आणि महाराष्ट्र राज्य साहित्य-संस्कृति मंडळ यांचेही कृतज्ञतापूर्वक स्मरण करून त्यांच्या सहकार्याची नोंदही घेतलीच पाहिजे. आजवर जसे सक्रिय प्रोत्साहन मला सर्वांकडून मिळाले; तसेच ते अखेरपर्यंत मला मिळेलच, अशी माझी खात्री आहे.

चंपाषष्ठी १८९०
दि. २५-११-१९६८
९ लोकमान्य नगर, गोरेगाव,
मुंबई ६२.

प्र. कृ. प्रभुदेसाई

## अनुक्रमणिका


प्रकाशकाचे निवेदन ... ... ... पृ. १

ऋणनिर्देश ... ... ... पृ. १–२

श्री. के. के. शहा यांचे भाषण ... ... ... पृ. १–१०

१. देऊळ, देवघर आणि देवता ... ... पृ. १–६९

देवालये, बांधणी आणि मूर्ति १; देवताची कल्पना १; देवतांचे मूर्तिकरण २; देवाचे मानवीकरण ४; मानवाचे देवताकरण ५; देव ७; दैत्य ८; दानव ८, देवता मर्त्य की अमर्त्य ८; देवताची वंशशुद्धि नाही ११; ऋग्वेदातील देवता ११; यजुर्वेदातील देवता १२; अथर्ववेदातील देवता १३; ब्राह्मण ग्रंथातील देवता १३; उपनिषदातील देवता १३; पौराणिक देवता १३; ग्रामदेवता १४; कुलदेवता १४; क्षुद्रदेवता, १४; पितृदेवता १५; अतिमानवी देवता १९; अंतरिक्ष देवता २०; अमूर्त देवता २०; दिव्य देवता २०; परिवार देवता; २०; पार्थिव देवता २१; स्त्री देवता २१; युग्म देवता २१; संघदेवता २१; स्वयंभू देवता २२; शकुनवंती देवता २४; देवमूर्ति सरकणे २५, संस्कृत आणि प्राकृत देव २७; देवपत्न्या २८; ग्रामविस्तार आणि देवालये २९; देवस्थाने २९; मंदिराची आवश्यकता का? २९, देवताचा उत्कर्ष-अपकर्ष ३१; मंदिरवाढीची कारणे ३२; देवालय शिल्पातील प्रगति ३४; नागशैली ३५; काश्मिरशैली ३५; गुप्तशैली ३६, ओरिसासंप्रदाय ३६; बुंदेलखंडीशैली ३७; गुजरात-राजस्तानशैली ३७; द्रविडशैली ३८; वेसरशैली ३९; होयसलशैली ४०, विजयनगरशैली ४१; होयसळवळण द्रविडवळण ४१; नायक-शैली ४२; हेमाडपंतीशैली ४२; द्वारपाल ४३; मंदिर-शिखरे का? ४३; देवमूर्तीची बैठक ४४, देवप्रतिमा ४४; देवमूर्तीचे प्रमाण ४४; देवमूर्ति प्रतिष्ठापना ४५; देवपूजेचा इतिहास ४५; प्रतिकोपासना ४६; देवताचे भोग ४७, देवताचे भिन्न रंग ४७; देवताची प्रदक्षिणा ४८; देवताची भुज संख्या ४८; देवपूजन ४९; व आदर्श जीवन ५०, देवपूजेची व्याप्ति ५१; घंटा व शंखनाद ५१; देवतांचे तीर्थ ५३; देवतांचे पूजक ५३;

देवालयातील दर्शक ५४; आदर्श देवदर्शन ५५; त्रिवार नमस्कार ५६; देव दिसत नाही, म्हणून तो नाही का ! ५७; देवाची भेट केव्हाही घडेल काय? ५७; देव दर्शनाचा हेतु–स्वार्थी ५८; हिंदुपूजक, पुजारीपण विकतात ५८; सर्वत्र देवळेच देवळे ५९; देवी ६०; देवीव्रत ६१; देवी-ग्रंथ ६१; देवी-उपनिषद ६१; देवी-पुराण ६१; ६१; देवी-भागवत ६२; देवी महात्म्य ६२; देवालयांची श्रीमंती ६३; देवालयांची शिक्षण केंद्रे ६४; देवालयाच्या भंजनाचा इतिहास ६५; बौद्ध-संस्कृति ६५; इस्लाम-संस्कृति ६५; इसाई संस्कृति ६६; देवालय-विध्वस्त ६७.

२. निग्रही देवता... ... ... ... पृ. ७०–९७

तेरा देवताची यादी ७१; श्रीचांदला परमेश्वरी ७१; अजुबाई ७६; कमलादेवी ७८; कोंडणपूरदेवी ७९; छेला सोमनाथ ८२; दंतेश्वरी ८४; नाथद्वारा ८७; भैरवनाथ ८८; साखरगडवासिनी ८९; गोकर्ण महाबळेश्वर ९२; ज्ञानेश्वर समाधी ९३; छोडेश्वरी ९४; रमालक्ष्मी ९५.

३. ग्रामदेवता ... ... ... ... पृ. ९८–१३०

ग्रामदेवता मातृशक्तिरूपच ९८; ग्रामदेवतांचे प्रकार ९९; ग्रामदेवता का स्थापन झाल्या ! १००; रत्नागिरी जिल्हा ग्रामदेवतांची यादी १०२; ग्रामदेवतांचे कार्य १०३; ग्रामदेवता व पर्जन्यवृष्टि १०५; संसर्गजन्य रोगप्रतिबंधक ग्रामदेवता १०७; मरिआई ११२; पोलेरम्मा ११४; म्हसोबा ११७; हर दौदलाला ११९; भिलात १२०; राजबा १२१; ठाकुरदेव १२१, वीरगळ अथवा वीर १२२; कादळाचे पाषाण १२४, दुर्गम्मा आणि घावम्मा १२५; देवताच्या उत्सवापासून बोध. १३०.

४. वृक्षदेवता ... .. ... ... पृ. १३१–१७०

वृक्षमहिमा १३१; वृक्षारोपण महत्त्व १३२; वृक्षाची शिकवण १३३; वृक्षात परमेश्वराचे स्वरूप १३४, वृक्षाचा उपयोग व पूजन—अधिदैविक, अधिभौतिक अध्यात्मिक १३५; देव ओषधिषु च वनस्पतिषु १३६; वृक्ष व रोग निवारण १३७; वृक्षांचा वनस्पतिशास्त्रदृष्ट्या विचार १३८; वृक्ष व आयुर्वेद १४०, वनस्पतींना जीव व भावना असतात १४१; वनस्पतींच्या वाढीवर संगीताचा परिणाम १४१; वृक्ष देवत मानून पूजन १४२; वानगी-

दाखल काही वृक्षांचे वर्णन : अश्वत्थवृक्ष १४३; आम्रवृक्ष, उंबरवृक्ष १५५; तुळस १५७; तुळस व शाळिग्राम १५८; स्त्रियांनी शाळिग्राम पूजन का करू नये? १५९; तुलसीकथा १६१, तुलसीची नामावळी १६१; तुलसी-रासायनिक गुणधर्म १६४; वटवृक्ष १६७, वटवृक्ष–रासायनिक गुणधर्म १६९.

५. जलदेवता . ... ... ... पृ. १७१–२२१

जलदेवता व पर्जन्य १७२; आर्यांची प्रमुख जलदेवता–वरुण १७२; जलदेवता व पर्जन्यासाठी निरनिराळ्या समाजातील विधि व उत्सव १७६; गंगादेवी १७८; गंगानदी उत्पत्ति १८३; गंगाजल औषधी १८५; गंगामाता व जगन्नाथ पंडित १८८; गंगावर्णन ग्रंथ १९२; राजापूर गंगा १९२; गंगामंदिरे १९५; नर्मदादेवी १९८; नर्मदाकथा १९९; नर्मदा उत्पत्ति २००; नर्मदा परिक्रमा २०५; कावेरी देवी २०६; गोदावरी २०८; जलदेवतांचे प्रकार : आसरा २०९; सात आसरांची नावे २११; डाकिणी २११; हडळ २१३; लाव २१३; इतर देशांतील जलदेवता: इसीस २१६; ऍफ्रोडाइटी २१६; दमकिना २१७; ड्रॅगन २१८; जलचिकित्सा २१९.

६. नाणक–मुद्रा देवता ... ... ... पृ. २२१–२३४

नाणी व मुद्राशास्त्र २२२; नाण्याची उत्पत्ति २२३; नाण्याचे प्रकार व त्यावरील आकृति २२४; भारतीय नाणी–इतिहास २२५; इतर देशातील नाणी–इतिहास २२९; इफेसस २२९; क्रीट २२९; चीन २२९; जपान, जर्मनी, थेसली, पॅलेस्टाइन, फोनेशिया, बाक्ट्रस, बायझंटाईन २३०; मासलिया, रोमन, लिसिया, स्पेन, पार्थिआ, इराण २३१; काही उद्बोधक ठसे अथवा शिक्के २३२; प्रकरण आधारभूत ग्रंथ २३४.

७. शिल्पदेवता ... ... ... पृ. २३५–२५०

कलेत अगम्य ईश्वरशक्तीचा आविष्कार २३५; नाट्यशास्त्रात कला म्हणजे शिल्प हा अर्थ २३५; कलेचे प्रयोजन २३५; भारतात देवतांची मंदिरे म्हणजे कलेच्या खाणी २३६; शिल्पकलेचा आविष्कार–पीठिका २३६; शिल्पकला इतिहास २३८; शिल्पकलेच्या वाढीचे चार वर्ग : स्तंभ, स्तूप, चैत्य गृहे, विहार २३९; स्तूप २३९; गीझ–पिरॅमिड २४१; अबु सिंबेल

देवालय २४२; गुहेतील शिल्प २४३; वेरूळ लेणी संख्या २०–२४८; कैलास लेणे २५६, वेरूळ येथेच अनेक देवमूर्ति का ? २६२; महाराष्ट्रातील इतर लेणी २६३; कोणार्क २६५; भारतातील मुसलमानी शिल्प २६६; दक्षिण भारतातील कलापूर्ण गोपुरे २६७; प्रकरण आधारभूत ग्रंथ २७०.

८. व्रतदेवता . ... ... ... पृ. २७१–३४५

व्रताचे प्रयोजन २७०; देवी भागवतातील देवीव्रते २७२, व्रताचे प्रकार २७३; प्रमुख व्रते व त्यांतील देवताव्रते : उपांग ललिता २७८; एकादशी २८०; कोजागरव्रत २८३; कात्यायनीव्रत २८६; गजगौरी २९१; चंपागौरी २९४; धृतमारा २९७, देवदासी चाल व इतर संस्कृति २९८; जेष्ठागौरी ३०२; भराडी गौर ३०६, तुळादेवी ३०८; पिठोरीदेवी ३१०; ६४ योगिनी यादी ३११; बलातीचल्या देवींच्या आसपास चौसष्ट योगिनी व त्यांची नावे ३१२; बृहद्गौरी ३१२; महालक्ष्मीव्रत ३१४, मंगळागौरी ३१७; ललितागौरी ३१९; वरलक्ष्मी ३२२; षष्ठीदेवी ३२३; जरादेवी ३२३; जरादेवी, जिवती अथवा जीवंतिका ३२७; जातृमातृ देवता ३२८; द्वारमातृका ३२९; सटवाई ( षष्ठीदेवीचा अपभ्रंश ) ३२९; सभांतीदेवी ३३१; मकरसंक्रांत व कर्कसंक्रांत व्रत ३३५; हरतालिका ३३७; हरिकाळी अथवा हस्तगौरी अगर कोटीश्वरी देवीचे व्रत ३३८; स्वर्णगौरी ३३९; वटसावित्री ३४०; शीतला सप्तमी ३४१; अहोईजेठव्रत ३४२, इतुपूजाव्रत ३४२; अमावास्याव्रत ३४३; तुपुलक्ष्मी ३४४.

९. उत्खनित देवता ... . . पृ. ३४६–३५८

भारतातील उत्खनित संस्कृति इतिहास ३४६, तज्ज्ञांनी पाडलेले युगांचे इतिहास ३४७, अश्मयुगातील तीन संस्कृति ३४७, सिंधु संस्कृति ३४९, हरप्पा व मोहेंजोदारो येथील मातृदेवतांचा ऊहापोह ३५२, पाश्चिमात्य देशांतील उत्खनन नमुने, तौलनिक दृष्ट्या विचार ३५६.

१०. ब्राह्मण व अन्य जमातींच्या देवता . पृ. ३५९–३८६

समाजपरत्वे, देशपरत्वे देवतांचे पूजन ३५९; कुलदेवता विचार ३६०; काही ब्राह्मण पोटजाती व त्यांच्या देवता ३६१; अथर्ववेदी, आपस्तंब

३६१, कण्व, जबूकण्व, जबूकण्व ( नेमाडप्रांत ) ३६२, कऱ्हाडे ३६२; क्रमवंत ३६३ कात्यायन, गोवर्धन, गोसावी, परिव्राजक, श्रीगौरमालवीय, चरकयजुर्वेदी ३६४ चित्तपावन, जवळ अथवा खोत ब्राह्मण, तिरगूळ ब्राह्मण ३६५, देशस्थ ऋग्वेदी स्मार्त, देशस्थ वैष्णव, देशस्थ सह्वासी, देवरुखे अथवा देवर्षी, नर्मदीय ब्राह्मण, ३६६ जाबाल-नार्मद, पल्लेवाल, पुराड, भट्टप्रभू, मैत्रायणी, यजुर्वेदी, ब्राह्मण शुक्ल यजुर्वेदी, ख्रिस्ती अगर रानवट ब्राह्मण, ३६७, शुक्ल यजुर्वेदी माध्यंदिन, वाजमाध्यंदिन ३६८, सामवेदी ब्राह्मण, सारस्वत ३६८ काही जाती–जमाती देवता . अतारी, आगरी, ३६९, ओरायन, इरूर, इल्गिर, उल्लादन ३७०, उप्पर, कमार, कलाल, कदर, कल्वलिगर, कळवार कामलिया ३७१, कथोडिया, कम्मालर, कान्ची, काल्न, कामद, कासार, किशोरी, कुंभार ३७२; कुडवक्कळ, कुरुविकारन, केवट, कोंढार, कोल्टा, कैकाडी, ३७३, कोंकणी, कुरवा, कोमटी, कोयी, कोल, कोष्टी, कोळी, कोल्हाटी, कोरवा कसार, कजार ३७४, खत्री, खाम्वा, ग्रासीया, खंडेलवाल, गदब ३७५; गवळी, गवडी, जिरे गवडी, सागर गवडी, गदारिया, गासिया, गावीत, गुडीगार, गुजर ३७६, गुरवा, गुरव, गोल्लम, गोंधळी, गौला, घिसाडी, चाम, चारडा, चारण, चित्रकथी ३७७, चेंचू, चांभार, चढमुड, छामता, ( काठेवाड ), छुतिया, जाट ३७८, जालरिया जमातीच्या देवता, सामलम्मा, राजन्या, येरनम्मा, भागिरथम्मा, नकुलम्मा, भागदेवी, ओरोसोंडी ३७९, जोगी, जोशी ( कुडबुडे ), जॉग, टकारी, ठाकूर, डोम, डोंबारी, ढागी, ढोर, तोडा, ३८०, तेली, तांबट, दुबळी, देवार, देवांग, धनगर, धोडिया, धोरी, धेड, ३८१, भात, निराळी ( रंगारी ) निहाल पटवेगार, परीट, पद्मसाळी, पांचाळ, पाथरवट, पिंगळा, फासे-पारधी, लगाटी, निता, शिलाजीत, वाघी, पथ्रवाल, वाघ्री ( काठेवाड ), बुरुड, बेरड, ३८२, भडभुजा, भावसार, भिल्ल, भूमिया, भोई, भडारी-हलर ( वाजत्री ), महार, मांडिग, माळी, मुसाहर, ३८३, मांग, रजपुत ( काठेवाडी ) जेठवा, जाडेजा, झाला, गोहेल, परमार, राऊळ, रामोशी, रायकरी, रंगारी, ल्माण, लोणारी, लोधी ३८४; लोहार, ल्होहाण, वडर, वाघरी, वाध्या, वाडा, वाणी, वारली, वासुदेव ३८५, वेद, वजार, सनगर, सरानिआ, सुतार, सथाल, हाटकर, होलार ३८६.

११. देवतांची नामोत्पत्ति ... ... पृ. ३८७–३९५

श्रीकरणीदेवी, अन्नपूर्णा, अष्टभुजा, अभयंबा, अंबिका, अलक्ष्मी, आनद-नायकी, आरासुरी अंबा, ओसाममाता ३८७; जेष्ठागौरी, ज्वालादेवी, जोगेश्वरी, तुकाई, तुळजाभवानी. तूळादेवी, त्रिपुरा, दशाशुभहरी, दाक्षायणी, दुर्गा, दतेश्वरी, नागनकी, ३९०; पटेश्वरी, पद्मावती, पिठोरी, प्रत्यंगिरा, प्रमादेवी, पंपावती, पर्वती, बगळामुखी, बनशंकरी, बहुचरा, ब्राह्मी, भगवती, भवानी, भमरंबा, भारतमाता ३९१; भुवनेश्वरी, भैरवी, महाकाली, मल्लिकावती, महामयी, महालक्ष्मी, म्हाळसा, महिषासुरमर्दिनी, माहेश्वरी, मीनाक्षी, मंगळागौरी ३९२, मुंबादेवी, मनसा, यल्लमा, यमाई, रामवरदायिनी, रुद्राणी, राजराजेश्वरी, राष्ट्रसेना, रेणुका, लुंबिना, वत्सला, वरदायिनी ३९३, वरलक्ष्मी, वज्रेश्वरी, वामा, विषहारी, विदर्भचंडिका, विंध्यवासिनी, वैष्णवी, वैकुंठमाता, शातादुर्गा, शाकंभरी, शताक्षी, शिवदूती, सप्तशृंगी, सामुद्रीमाता, सावरगडवासिनी, षष्ठी ३९४; षोडषी, हरितालिका, हरसिद्धी, हर्षदमाता, हुकारेश्वरी, हिंगुळा, क्षीरभवानी ३९५.

१२. बौद्धपंथीय देवता ... ... ... पृ. ३९६–४२४

ध्यानी बुद्धाची उत्पत्ति व वर्णन ३९६; ध्यानी बोधिसत्व ३९७; मानवी बुद्धाचे स्वरूप ३९७; बौद्धपंथीय स्त्री-देवता ३९७–३९८; बौद्धदेवता व त्यांची आयुधे ३९९; हिंदुदेवतांची बौद्धपंथियाकडून विटंबना ४००–४०१; हरिहरीहरीवाहनोद्भव ४००; चंद्ररोशन ४००; मृत्युवंचना-तारा, मारिचीदेवी, कुरुकुल्ला, वज्रज्वालननार्क, भूतडामर, उच्छुस्मजंभल, हयग्रीव ४०१; अपराजित ४०३; उष्णीषविजया, एकजटा ४०४; कल्याण-सुंदर, कुरुकुल्ला ४०५; तारोद्भवकुरुकुल्ला, ओरियान-कुरुकुल्ला, अष्टभुजा-कुरुकुल्ला ४०६; खादीरवनी-तारा, चदादेवी, जांगुली ४०७; तारा ४०८; पाच रंगाच्या तारेचे प्रकार, ४०८; हरित-गौर-पीत-रक्त-नीलतारा प्रकार ४०८; तारायोगिनी तांत्रिक देवताचा समूह ४०९; तीक्ष्णतारा, त्वरिता ४१०; त्रैलोक्यमोहना, त्रैलोक्यस्तंभिनी, त्रिपुरसुंदरी ४११; त्रिपुरभैरवी, दिक्पालिका ४१२; वज्रांकुशी, वज्रपाशी, वज्रस्फोटा, वज्रघंटा, उष्णीष-विजया, सुंभा, द्वारदेवता, पद्मा, भारती, दुर्गा, द्वारश्री, विश्वसंकल्प, कुल्पक, काम, तालिका, कुंची, कपाटा ४१३; पटधारिणी,

धनदतारा, धनमाणिक ४१८, धारणी देवतासमूह : महाप्रतिसरा, महा-सहस्रप्रमर्दिनी, महामयूरी, महाशीतवती, महामंत्रानुसारिणी ४१४–४१५; धूमावती ४१५ ध्वजाग्रकेयुरा, नरदत्ता, नैरात्मा ४१६, पर्णशबरी ४१७, प्रज्ञापारमिता, भृकुटीतारा ४१८, मनसादेवी ४१८–४२१, मारिची ४२१–४२२, महत्तरीतारा, महासरस्वती, महाश्रीतारा, महाचीनतारा ४२२–४२४, महाप्रतिसरा, महामंत्रानुसारिणी, महाप्रत्यंगिरा, यामरी ४२४–४२५, लक्ष्मी नारायण, वज्रतारा, वज्रवाराही, आर्यवज्रवाराही ४२६–४२७ वज्रयोगिनी, वर्गभीमा, ४२८–४२९; विद्युज्ज्वाला कराली, श्यामतारा, सीतातपत्रा, सर्वांगी ४३०–४३२; हारिती ४३२–३३, संदर्भग्रंथ ४३४.

१३. जैनपंथीय देवता ... .. पृ. ४३५–४४७

जैनधर्म हा आर्यधर्मांचा एक उपपंथ ४३५, श्वेतांबर, दिगंबर ४३५–३६, तीर्थंकर ४३६, दिक्पाल ४३७, अष्टदेवता, जया, विजया, अजिता, अपराजिता, जंभादेवी, स्तंभिनी ४३८; सप्तमाता ४३८; तीर्थंकर-माता-देवता ४३९; ब्राह्मणधर्मातील अष्टमातृका ४३९; यक्ष यक्षिणी ४३९–४४०; चक्रेश्वरी ४४०, अजिता, दुरितारी, वज्रशृंखला, महाकाली, अच्युता, शांता ४४१; भृकुटी, सुतारा‌महाकाली, अशोका, गौरी, चंडा-प्रचंडा, विदिता-विजया वैरोटी, अंकुशा अनंतमती ४४२, कंदर्पा पन्नग-देवी मानसी, निर्वाणी, बाला विजया, धारणी तारा, वैरोटी अपराजिता, नरदत्ता-बहुरूपिणी, गांधारी-चामुंडा, अंबिका-अम्रा ४४३, पद्मावती, सिद्धायिका ४४४, श्रुतिदेवी आणि विद्यादेवता ४४४–४५; श्रुतिदेवी, रोहिणी, प्रज्ञप्ति, वज्रशृंखला, वज्रांकुशा ४४५, अप्रतिचक्रा, पुरुषदत्ता, काली, महाकाली, गौरी, गांधारी, महाज्वाला ज्वालामालिनी, मानवी ४४६; वैरोटी, अच्युता, मानसी, महामानसी, ४४७, संदर्भ ग्रंथ ४४७.

१४. संकीर्ण देवता ... ... ... ... पृ. ४४८–५१६

अकार विल्हेवारी संख्या १ ते १९९, अंदेवी, अंबाभवानी, अंबादेवी ४४८, अनकाईदेवी, अनलादेवी, अदिति, अनुसूया, अनसिंग ४४९, अरिष्टा, अष्टादशा, अंधेरिया देवी, आईजी ४५०; अगरतारा,

आनंदीभवानी, आराही, औघानविवि, ४५१-५२; आशापुरी, अखिलंदेश्वरी, अनंतलक्ष्मी-सत्यवती ४५४; अचलागौरी, आसमाई, एकानंशा ४५४; इंद्रायणीदेवी, एकाक्षी, एयनार, कटेरी, कनकदुर्गा ४५५; कल्पकवलीदेवी, कमळजादेवी, कर्णपिशाची ४५६; कल्याणदेवी, कांचकुंडली, काक्तीदेवी, कल्याणेश्वरी ४५७; कमलाक्षी, काकिनी, कामेश्वरी ४५८; कालिजाई, कुलगोळम्मा, कोटची ४५९; कातीमतीदेवी, किरीटेश्वरी, कुलेश्वरी ४६०; कोलेरम्मा, कोल्हाविका, कन्यका-परमेश्वरी ४६१; कटिअंकम्म, कोटमची शक्तिदेवी ४६२; कोटी माहेश्वरी, कृष्णाबाई, गणदेवी, गौरा, गंगम्मा ४६३; गार्गी, गायत्रीमाता, गिरजामाता, गुढीदेवता ४६४; गुप्ताबाई ४६५; गोमती, गोटीदेवी ४६६; चर्चिकादेवी, चावंदबाई, चितहरी ४६७; चायनामंदिरे, चोकानायकी, चंडा, चंडिका ४६८; चंडिनायिका, चंडनायिका, चंडमातंगिनी, जयदुर्गा, जयविजया, जरादेवी ४६९; छानिपिट्टा, जगन्मातली, जनाबाई, जयवागेश्वरी, जमवायमाता ४७०; जातवेदसी, जीणमाता, जगुली, जानकीमंदिर ४७१; डाकिनी, डोंगा, डाकेश्वरकाली ४७२; तय्यलनायकी, तरंग, ताम्रगौरी ४७३; तेलफळादेवी ४७४; त्रिपुरसुंदरी, त्रिपुरेश्वरी, तुंबेश्वरी, तेलजु, दशमुख (लक्ष्मी-गणेश) ४७५; दधिमथीमाता, ददरियादेवी, द्रुपतिअम्मा, दुल्हादेवी ४७६; देवनायकी, देवयानी ४७७; देशदेवी, देवीकुमारी, धरतीमाता ४७८; धर्मराज ४७९; धर्मसंवर्धिनी देवी, नकुलेश्वरी, नमकबंधा, नगरकोटवारी ४८०; नडिविढी, नलतेश्वरी, नवलाई ४८१; नारायणीदेवी ४८२-८३; नागम्मा ४८३; नीलायताक्षी, नंदादेवी, नौखंडी ४८४; पटेनीदेवी, पत्तिनीदेवी, पिंगळाई, पिठोरादेवी, पाटणादेवी, पेरियानगी ४८५; पंचगंगा मंदिर ४८६; अचलादेवी, बल्लाळाई, बहिरीदेवी, बालाताई ४८७; बालादेवी, बासरदेवी ४८८-८९; बावची, बालासुंदरी, बिरोहा-देवी, बेलाभवानी, बोमलाई, चोलाई ४९०; बृहन्नायकी ४९१; भराडी, भवानीमंदिर, भच्छोदरी ४९२; मरिअम्मन, महाबलिपुरम दुर्गा ४९३; महालक्ष्मी (केळशी-रत्नागिरी) ४९४; महेश्वरी, मामादेवी ४९५; मायादेवी, माहुली, मुंडेश्वरी, मुक्ताबिका, मंगलनायकी, मंगलगिरी ४९६; मेंगाई, यमादेवी, राणादेवी ४९७; रांगणाई, राजवल्लभीठाकुराणी,

राज्यलक्ष्मी, लक्षणादेवी ४९८, लज्जागौरी, लक्ष्मीनरसिंह ४९९; लक्ष्मीनारायण, लाजकी, लोहासुरी, वानमुखी ५००, वनदुर्गा, वर्यीकचलु आम्मावरू, विठलाई, वेदनायकी, शाओदमाता, शीलादेवी ५०१, श्यामवर्णादेवी, शिन्मोकि, समादेवी, सत्ययतक्षी ५०२; सावित्री, सौंदर्यनायकी, सर्वमंगलादेवी ५०३; सातेरी, समुद्रीमाता ५०४, साउपाहू, इटलादेवी, हरिकाळी, हसेश्वरी ५०५, हेमाम्जनायकी, हाकामारी, ज्ञानप्रसन्नाबा ५०६, आर्यादुर्गा, अदळदेवी ५०७, अभिराम सुंदरी ५०८, अरण्यदेवी ५०९, कैरकळदेवी ५१०, गिरजामंदीर ५११, ताम्रेश्वरी ५१२, पाटणदेवी ५१३, मापोडी ५१४, मुडेश्वरी ५१६

अभिप्राय . पृ. १–१०

देवीकोश खंड ४ ( आगामी खंडातील विषय ) .. पृ. ११

# ना. के. के. शहा यांचा पुरस्कार

## दुसऱ्या भागाच्या प्रकाशन-प्रसंगी दि. ८ एप्रिल १९६८ राजा माननीय के. के. शहा (केंद्रीय माहिती व नभोवाणी मंत्री) यांनी केलेले भाषण.

महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार, कुलगुरु हरिभाऊ पाटसकर साहेब, आचार्य भागवत आणि बंधुभगिनींनो,-

मला कोणी विचारले की, पुण्याला मी का धावत येतो, तर माझे त्याना एवढेच उत्तर आहे की, जो पुण्याला आला नाही त्याला काहीच समजावयाचे नाही, की पुण्याला मनुष्य का धावत येतो. नेहमी आला तरी त्याला काही नवीन मिळावयाचेच. मी जेव्हा इथे येतो तेव्हा काहीतरी घेऊन जातो, इथे काही देऊन जात नाही अशी माझी श्रद्धा आहे. आता माझ्यापूर्वीचे वक्ते म्हणाले की, हे राजकीय क्षेत्रात काम करणारे लोक जे ज्ञानी नाहीत, त्यांच्या हातात का सत्ता असली पाहिजे? कारण इतकेच की, ज्ञानी माणसाला प्रपंच करता यावयाचा नाही आणि प्रपच केला नाही, तोपर्यंत राजकारण चालवता येणार नाही. आता एवढे सांगितल्यावर ह्या प्रश्नावर मी पण काही अभ्यास केलेला आहे. म्हणून मी इंग्रजीमध्ये बोललो तर आपण मला माफ करावे. कारण मराठीतून एवढे स्वच्छ व स्पष्ट बोलणे मला शक्य नाही.

### मंत्र–यंत्र–तंत्र

I must congratulate Shree Desai for explaining to the country and to the world that this country believed in religion which was not devoid of knowledge. Sometimes, people feel that religion is श्रद्धा. It is not only श्रद्धा. It is a fine mixture of knowledge ज्ञान and श्रद्धा, and that has been very adequately proved by this volume. But before I take you to that, I would request those who read this book—what is मंत्र, what is यंत्र and what is तंत्र. And unless you understand what is मंत्र, what is यंत्र and what is तंत्र, I don't think you will be able to understand the implications of what important roll this aspect of our life played, in not only in the development of this country but in achieving the very rare heights that we have attained.

Now what is मंत्र ?

मननात् त्रायते इति मंत्रः। शब्दांना महत्त्व नसून, मननालाच महत्त्व आहे. ज्या अर्थाचे आपण मनन करू, त्या अर्थाला शब्दस्वरूप दिले म्हणजे तो मंत्र झाला. अर्थाचे आवर्तन मनाची एकाग्रता झाल्याशिवाय कदापि होत नाही. शब्दाचे आवर्तन मात्र मनाच्या एकाग्रतेवाचून होऊ शकते. आणि या आवर्तनात मनाची एकाग्रता नाही असा शब्द उच्चारतानाच अभावात मनाची शक्तीही व्यक्त होणार नाही. पुढे महत्त्वाची गोष्ट ही की, शब्दोच्चार अनेक प्रकारे होतो, तर एकाग्र विचारे अर्थाचे चिंतन घडते. शब्दातून जे विचार ते सूक्ष्म विचार होत. विचार शब्दाच्या भरात आले म्हणजे ते स्थूल झाले.

This is what is known as Mantra Mantra is nothing else but concentration Therefore, when you want to gain knowledge, the first thing that is necessary is to develop the habit of concentration *Then what happens ? After you start concentration what happens ?* Then the author says.

मंत्रातून निर्माण होणाऱ्या शक्तीचे यंत्र हे आधार आहे. यंत्र हे त्या त्या शक्तीचे अधिष्ठान होय म्हणजे त्या त्या शक्तीला अधिष्ठित करणारे असे आश्रय स्थान हे ओघानेच आले. यंत्राच्या माध्यमाने ज्या वेळी आपण एखाद्या शक्तीला वश करू पाहतो, त्या वेळी त्या शक्तीला अनुरूप असे यंत्रही अगोदर निर्माण करावे लागते.

Now, therefore, the power that is generated by concentration needs a vehicle, and Yantra is a vehicle for canalizing the power generated by concentration. This is Mantra, that is Yantra. Now what is Tantra ? Very very well described in the book—

ज्या विशिष्ट पारंपारिक पद्धतीने उपासना केली जाते, त्या पद्धतीला तंत्र असे म्हणतात. याचे उदाहरण दिले ते असे— नुसत्या काडतुसांनी शत्रुवध होत नसतो, यासाठी बंदुकीची जरूर आहे. आता आपणाला तंत्र म्हणजे काय हे समजले असावे. शेवटी लेखकाने लिहिले आहे की, अणुबॉम्ब आणि अस्त्र यामध्ये महत्त्वाचा फरक आहे. काय फरक आहे ? केवळ मन सामर्थ्याच्या जोरावर विशिष्ट अशा अक्षरांच्या उच्चारमात्रेकरून शस्त्राचे कार्य करणारी तंत्रविद्या ही प्राचीन भारतीयांची फार मोठी देणगी आहे अशा अपूर्व तंत्रविद्येचा अभ्यास आपण केला नाही, तरी पाश्चात्य राष्ट्रातील विद्वानांचे लक्ष या उपेक्षित तंत्राकडे वळले असून, त्याचा सखोल अभ्यासही त्यांनी चालू केला आहे

मन्त्र म्हणजे सूत्रमय विचाराचे शब्द-प्रतिनिधी होत. शब्दांचा परिणाम शरीरावर होतो, हे रोजच्या व्यवहारात नेहमीच दिसते. पण ज्या वेळी श्रद्धा असेल त्या वेळी हा परिणाम खोलवर होतो. श्रद्धेने याप्रमाणे मेंदूची स्थिति ग्रहण-शील होऊ शकते. मोहनिद्रा असो वा नसो, मेंदूच्या विशिष्ट स्थितीतील शब्दोच्चार शरीरावर परिणाम घडवितात असे शास्त्रज्ञ मानतात. मन हे शरीरा-पेक्षा भिन्न आहे, असे आईनस्टाईन, प्रिस्टनसारखे शास्त्रज्ञ मानतात.

मनावर मन्त्राचा परिणाम होतो हे आता शास्त्रज्ञांनी पिटस्कोपवर हृदयाच्या ठोक्याचा आलेख काढून सिद्ध केले आहे. मूल जन्माला येण्यापूर्वी 'हरि ॐ' या मन्त्राची प्रेरणा दिली तर मुलाच्या हृदयाचे ठोक्यात बदल घडून आलेला दिसतो याचा अर्थ मुलाचे मनाचे स्वतंत्र अस्तित्व, त्याची शिकण्याची, ग्रहण करण्याची शक्ति, मन्त्राचा त्यावर परिणाम स्पष्टपणे दिसतो. यासाठीच भारतीय ऋषींनी गर्भावस्थेत असलेल्या जीवावर उत्तम संस्कार व्हावेत म्हणून अनेक विधि सांगितलेले आहेत.

शब्दाचा परिणाम जसा मनावर होतो, तसा तो शरीरावरही होतो एरवी एखादी टाचणी शरीरात टोचली तर मानवाला दुःख होते, पण तोच मानव जर मन्त्राने भारलेला असेल, तर दुःख होत नाही. श्रद्धेने अथवा मोहनिद्रेने भारल्यावर दुःख होत नाही. रशियन शास्त्रज्ञ नारनट आणि नेक्टेरेव यानी हे प्रयोगाने सिद्ध केले आहे याचाच अर्थ शब्दाचे, मन्त्राचे सामर्थ्य विज्ञान आता मनावर आणि शरीरावर दाखवीत आहे.

### बृहत्तर भारतीय संस्कृति

Now, I will explain as I have understood I want to give you an example that first of all I was one of those who did not believe when I started my life I thought, unless you know English and unless you accept that English language and English culture stands for, you are not civilized I also started with an assumption that my forefathers knew nothing They were blind followers—it's only when I started gathering experience in life—the first one was when I went to Japan and I was greeted by the words आदा घाटो गुजारमस Then I started asking questions, I am a little curious type of man who is anxious to know about every thing and wastes his time So when the Sanskrit Professor met me and when I came across words उर्वशी, उत्सुकुसा, धनसत, धनासान्,

when I looked at the grammar it is संस्कृत terminology Then I started asking him questions because I had time to find out the solution to the question How this बुद्ध भगवान् made himself so popular in Japan without knowing Japanese language? How could it be possible? And then I came to know आदी घाटो = आय आगतो उत्सुकुशी = उर्वशा I go to Yugoslovia, what do I find? I have forgotten दश द्वादश त्रयोदश पचदश all that we have forgotten What they call 34, = त्रयोदशी चतरी You go to Finland and what do they call hundred – शतक

Here our Doctors are all called M B B S You go to England—Dr Narevane is present here—there he is given the Degree of the Master of Chirology When I asked the professor he said we borrowed this word from Germany When I went to Germany and asked a Sanskrit Professor there he said that the spelling is Chirology it is चिराल्जी and not शिरॉलॉजी They don't know how to pronounce SH and CH Therefore, they say SH We Gujaratis also try to speak CH of Marathi and we are unable to do that sometimes, I was afraid of speaking in Marathi because I don t know how to pronounce SH and CH Then he says this is चिरॉलॉजी— Science of cutting and we have borrowed this word from चरकसंहिता, 'चर' is to cut You open the Calcutta Gazetteer of 1827 and you will find that the Plastic Surgery was performed in Poona in 1827 by two Ayurved Vaidyaraj All right if this was not sufficient to establish that we were far advanced in Science mind you, Science and Technology, I want to lay foundations from this book and I am going to request the author, though he has put in hard work at this age, and now to ask him to undertake any work is a sacrilage but even then I am going to commit the sacrilage When the child is born the child is born with a chord on Nabhi The doctors will give a certificate to what I say The child gets sustenance for 9 months through that chord and the machine in the Nabhi [illegible] al that it draws sustenance without r[illegible] o the

child would die and the mother would die. Every day we come across this phenominon but we never care to think about this. viz. why Nabhi has been given so much importance in our scriptures.

प्राणायाम

What is Pranayam? Pranayam is an art of opening that mechine from inside. People used to say, you can't pass air because of a diaphragm. I have demonstrated and I can demonstrate even to-day that the diaphragm goes aside and the air passes. Now those who have been practising Pranayam, please go and ask him, what happens? How does the concentration takes place in Pranayam? That is Mantra. The concentration takes place to such an extent that the circulation of blood can be concentrated on any part of the body. This is a very simple demonstration which can be given by anybody who knows Asanas. And if any doctor wants demonstration, I don't want to do as a Minister, but as a man who knows something about Asanas, I am prepared to give that demonstration

## Vibrations

Those who believe in electronics know what is electronics Electronics create vibrations. Who gives power to vibrations? Don't you throw out vibrations every minute of your life? Have you tried to find out what type of vibrations are you throwing out? Remote control is now very well established. What is voice? What is शब्दब्रह्म? When SPUTANIC WENT UP, and what was spoken in the Sputanic was heard on the ground and what was spoken on the ground was heard in the Sputanic, the the Russia says, आवाज, अविनाशी आणि सर्वव्यापी आहे.

And if आवाज is अविनाशी and सर्वव्यापी, how can this mortal body give birth *to something which is immortal and all pervading?* What is there in this body? It is not the box—voice box—which gives the content to the voice; and then look at the deductions

that have been drawn Wherever the God might be, if आवाज is अविनाशी and सर्वव्यापी, my prayers are bound to reach Him, wherever He might be

## आवाज भावनावादी

आवाज is also भावनावादी This is demonstrated by Lata Mangeshkar. It is an outstanding example of Avaz being भावना वादी Therefore, your prayers with whatever emotions they are said, those emotions are also carried to wherever that God might be And your voice does not destroy my voice Now if this is remembered, then it is the material appreciation of Science, whether this was known to this country or it was not known to this country And now, Franco is about to prove that this country knew the art of weaving human forms into काव्यरचना This country has dissected voice, सा रे ग म प ध नि सा starts with सा and terminates with सा Fold it up and the permutations and combinations, is your Shastriya Sangeet What else is it? Many forms it assembles in the permutations and combinations What is Karnataki Sangeet? It is very well same सा रे ग म प ध नि सा

## Electronic Power

I am now before this Radio What happens? I speak, my voice is converted into electricity Again the receiver is there, the Receiver converts the electric power into voice How can it convert the electrical power into voice unless the identity of the voice is maintained, even when it is converted into the power? What does it prove? Voice is electric power. How can it assume a form which it has not? And how can it maintain the identity that if it was not itself identified, it would be lost? If this is realized that a powerful electrical current is thrown out every minute of our life without knowing what repercussions it has, without knowing what effects it creates, without knowing how this power could be utilized And once you capture the art of knowing what you are throwing out once you know the art of

creating an impact of the power that you are generating; what remains to be controlled? That is how मंत्र, यंत्र and तंत्र remained only the blind imagination of an unsuspecting mind for a number of years.

## Atomic Engergy

Now, a further demonstrtion will be supplied by Russia in a short time. They are about nearing; they have taken to आसन, much more than this country has done. To-day, you go to Russia, you see their documentaries and you will find that Russia is trying to master the Art of Asanas. Because Russia has now a feeling, verging on proof that **this country knew the art of creating atomic energy and controlling atomic energy.** The समिधा in the यज्ञ created the atomic energy. यज्ञ were not performed unnecessarily. वेद represent the art of weaving human forms into verses. And if you want to unfold that form you have to say it in a particular way. That is why the Vedas are sung in the particular way. In the same way Russia is now about to come to the conclusion regarding समिधा; and therefore they are dissecting यज्ञसमिधा and that the radiation was prevented because the cow's ghee was used; that was why cow was held sacred. It was not unnecessarily that the cow-dung was used, because in case a mistake is made and radiation took place then the cow dung used in the hut would prevent the effect of radiation. It is not blind method of saying गायमाता. Nobody unnecessarily calls anybody Mata unless the person really becomes a Mata and Mata is a protector.

## प्राचीन संस्कृत वाङ्मय

Now, when I went to Germany, the largest number of Sanskrit manuscripts are to be found in Russia, Germany and Washington; fourth will be England; and they will forgive me if I want to say this, that the entire knowledge of copying Plastic Surgery has been perfected by England after borrowing it from

this country over hundred years ago Then that Sanskrit Professor tells me that they have been trying to find out methods of eating कस्तुरी and they have not yet succeeded and आयुर्वेद knows in thousand ways how to eat कस्तुरी ' And do you know how कस्तुरी is obtained ?" he asked me I did not know, even though this is the country which supplies कस्तुरी But an Indian never cares to know about his mother country, he tries to collect the information about other countries and not his own country

कस्तुरीमृग

The कस्तुरीमृग is to be found at a height of 18 000 feet of the Himalayas On the नाभी there is a small bag which contains कस्तुरी Now you have got to cut off that bag before the कस्तुरीमृग gets shy or sheen If the Kasturi मृग is sheen then the bag goes inside and you then cannot get it Now when did they find out कस्तुरीमृग ? When they found out that the कस्तुरीमृग is able to live at the height of 18,000 feet, on account of the warmth supplied by that bag When did they find that if Kasturi Mriga feels shy the bag goes inside ? How did they find out the art of cutting that bag without the Kasturi Mriga is allowed to feel shy ? And when you cut it, even at a distance of 10 feet you begin to bleed How did they get the idea of eating Kasturi and finding out the ways and means of eating Kasturi ? Was this all without making any experiment ? Did they make no experiments ? And still before our mind's eye every day we have a demonstrative effect of what treasure house is to be unloaded in this country But I don't know how I must congratulate the author that he has excited our curiosity that he has shown the way in this book

पुणे नालंदा आहे

Here is a place where a continuous यज्ञ—ज्ञानयज्ञ is going on and it is because why I sometimes say that Poona is a Nalanda of those days Those who have any doubts of what this country was, please go to Nalanda, that I have gone there, 7 sq miles

University, Hostel for 10,000 students and the buildings have come out. Everything is there. Now why would the Chinese come to Nalanda, if this country has nothing to offer?

Friends, I can go on multiplying because now I have become a student, who at one time knew, vista of knowledge is opened up before you. Then you don't like to leave it; and that is what has happened. Therefore, I can go on multiplying these things *ad ifinitum* and the more you think about what this country was, you get convinced.

## ध्रुव-अध्रुव जगत्

Do you remember the lines—जगत् ध्रुवशात् जगत् अध्रुवशात् कीडांगणा यत्र गिरो गिरन्ति। द्वारस्तनीता तन् संनिरुद्धम् जानीयात् तत् मंडनपंडितो कः।

When शंकराचार्य went to Mandan Mishra's village, because he was told that so long as he does not won a battle of Dnyan (ज्ञान) with Mandan Mishra, till then he can't say that he was the last authority. Therefore he went to Mandan Mishra's village and when he asked a lady, who was drawing a well water, where can I find मंडनमिश्र house? Then the above answer is given. Look at the beauty of the language क्रिडांगणा यत्र गिरो गिरन्ति। She says go to a place where you will find two parrots on both sides one on side of the door, the other on the other side of the door, carrying on continuously जगत् controversy, whether जगत् is ध्रुव or अध्रुव. Now this is an example what this book represents, giving you a glimpse of what we were.

## ग्रंथकारांचे अभिनंदन

I take this opportunity of congratulating the author. I have great pleasure in releasing this book.

## ज्योतिषविषयक संशोधन


I hope and pray that maximum use will be made and continuous research will be carried on and if I request you, please continuously carry on the research also in proving Astrology is

the science If you prove that Astrology is the Science, which it is What is नवमांश ? Those who know Trigonometry and its aspects at the 9th degree what is त्रिंशांश aspecting at 30th degree? And that ब्राह्मण boy is able to tell you what is नवमांश, what is त्रिंशांश and what is षष्ट्यंश and even to day 27 नक्षत्रे Ask anybody, *any Scientist in the world* whether the form that your नक्षत्रे have given are the same forms to-day or not Scorpio, वृश्चिक, is still वृश्चिक How did they learn the form of वृश्चिक ? Will anybody tell me? If they did not know the method of scanning the sky, there has been no difference whatsoever in the form of Scarpio वृश्चिक, and in those days, पंचपञ्चाशके काले पूजेराहो पुनस्तदा । राजदण्डाधिकारीश बहुमानी सुखी भवेत् । Owner of the 9th house in the 8th house मालेव रक्षति and then you read सत्यसंहिता and they tell you, if the waters in the position of the moon affect the waters of the sea to the extent that there is water in your body, will you be affected or not? Are there not flowers which only bloom when the Sun shines, and if Sun gives light to some elements to the extent to those elements which are in your body, will you not be affected by gravitation of the Earth? Now astrology is the art of finding out the effects of Planetary bodies on human beings

## टिळक विद्यापीठाचे आभार

With these words, I have taken a lot of your time, but when I get an opportunity, I loose myself and I have lost myself, you will please forgive me Once more I must congratulate the टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, they have called it आदिशक्तीचे विश्वस्वरूप–देवीकोश, from my point of view, this is the elementary knowledge of the basic concept of the world and the store house of knowledge which will unleaf many other aspects of the scientific and technological advances that we have made I have great pleasure again in releasing this book Thank you very much

# श्रीरेणुकादेवी – माहूर (यवतमाळ)



माहुरामधि मुख्य मांदिरी तुम्ही पहा घरी ।
भव्य मुख रेणुका सान्वरी शुभाकरी ॥
नाक-कान-नेत्र-ओठ जाण आदिशक्ति ती ।
परशुराम जन्मदात्री नित्य भक्त वंदिती ॥

लेखक

**माननीय मधुकरराव चौधरी, शिक्षणमंत्री, महाराष्ट्र शासन यांनी दिनांक २५ जानेवारी १९६९ रोजी अखिल भारतीय कीर्तन संस्था दादर, मुंबई २८, येथे भाग ३ चे प्रकाशनाचे वेळी व्यक्त केलेले काही विचार——**

आदिशक्तीचे विश्वस्वरूप (देवीकोश), भाग ३ चे प्रकाशन करण्यास मलाच निवड करण्यात आली, हे मी येथे आल्यावर अनेकांच्या भाषणावरून समजले. सेवानिवृत्त पोलिस अधिकारी रा. सा. एस्. के. ढेरे यांनी सांगितले की ते आणि माझे पूज्य पिताजी धनाजी नाना चौधरी हे नाशिक येथील पोलिस शाळेत समकालीन होते, तर या ग्रंथाचे लेखक प्रभुदेसाई ह्यांच्या हाताखाली दुय्यम म्हणून काम करीत असत तेव्हा एका पोलिस अधिकाऱ्याच्या मुलाने पोलिस अधिकाऱ्याने लिहिलेल्या महान ग्रंथाचे प्रकाशन करावे हे औचित्यपूर्ण होय. सौ. उमाबाई घाटे यांनी सांगितले आहे की, सरकारने हा ग्रंथ 'स्वस्त आवृत्ती' म्हणून जनतेला उपलब्ध करून द्यावा आणि मुंबई, पुणे इ० इ० विद्यापीठांनी यांची दखल घेऊन लेखकांचा गौरव करावा या बाबतीत मी तूर्त एवढे आश्वासन देतो की, जेवढे करता येईल, तेवढे करण्याचा मी जरूर प्रयत्न करीन.

वैदिक आणि पौराणिक काळातील भारतीय श्रद्धांना भ्रामक ठरविले जात आहेत अशा वेळी सांप्रतचे विज्ञान आणि पूर्वाश्रमाच्या श्रद्धा यांची सांगड घालण्याचा उत्तम प्रयोग ग्रंथकर्त्यांने केलेला असून, त्याला विशेष महत्त्व आहे. असे जरी असले तरी या विषयाचे अधिक संशोधन व्हावयास पाहिजे व अनुभवशीर मार्गदर्शन झाले पाहिजे. सुखोपभोगलिप्त आयुष्याला कंटाळलेली इतर देशीय जनता भारताकडे यात अशा सुखाने मार्गदर्शनासाठी पहात आहे. तेव्हा या दृष्टिकोनातून विचार केल्यास, आजचे प्रमुख वक्ते वि. स. पागे यांनी केलेली सूचना की, या ग्रंथाचे हिंदी, इंग्रजी इत्यादी भाषांतून भाषांतर व्हावे हे योग्यच वाटते

*अशा या थोर आदि शक्ति तत्त्वाचे संशोधन करून* व तीन खंडांची प्रचंड निर्मिती करून अखिल मानवजातीवर ग्रंथकर्त्यांने फार मोठे उपकार केले आहेत. महाराष्ट्र शासनाचा एक शिक्षणमंत्री, अखिल महाराष्ट्र जनतेच्या वतीने मी ग्रंथकर्त्याला मानाचा मुजरा करतो, तो त्यांनी स्वीकारावा.

# आदिशक्तीचे विश्वस्वरूप

अर्थात्

# देवीकोश

## खंड ३ रा

*

## देऊळवाडे, देवघर आणि देवता

### देवालये, बांधणी आणि मूर्ति

ज्याच्या ठायी दिव्य तेज अथवा सामर्थ्य आहे, जी दिव्यशक्ति अदृश्यरूपाने सर्वत्र संचार करते, भक्ताची श्रद्धा उत्कट झाल्यास, जी दृश्यरूपाने व्यक्त होऊन साक्षात दर्शन देते, पूजा अथवा बली यांचे ग्रहण करून, भक्ताच्या अगर उपासकाच्या मनःकामना पूर्ण करते, साधकानी संपूर्ण भरवसा टाकल्यावर जी त्याच्या मार्गातील अडथळे दूर करून, त्याचे जीवन निर्भय व निराबाध करते, भक्ताजवळ सदैव अदृश्यरूपाने उभी राहून त्याचा सांभाळ करते, पूजा-बलिदान न केल्याने जी क्रुद्ध होते, पण जे सदैव पूजन बलीदान करतात त्याना प्रसन्न असते, इतकेच नव्हे तर जी भूमितलावरील पंचमहाभूते भक्ताला अनुकूल बनविते, अशी भक्तासाठी मातेप्रमाणे राबणारी ती देवता होय. मग ती पार्वती, काली, दुर्गा या स्त्रीरूपात असो वा शिव, विष्णु, गणपति, वरुण इ० पुरुषरूपात असो.

### देवतांची कल्पना

चराचर भौतिक सृष्टीच्या पलीकडे अदृश्य, अव्यक्त आणि कल्पनारम्य अशी दुसरी एक सृष्टि आहे, तिला दैवतसृष्टि असे म्हणतात. दैवतसृष्टि म्हणजे विविध देवतांचा पसारा. विविध शक्तींची आणि विविध नामांची दैवते या सृष्टीमध्ये राहतात. मानवाला त्याच्या मूळ प्राथमिक अवस्थामध्येच या देवतांचा साक्षात्कार झाला अगर प्रतीती आली. एकसमयावच्छेदेकरून भूतलावरील सर्व

भागाच्या लोकाना आली. हा साक्षात्कार त्याना पचमहाभूताच्या स्वरूपातून झाला. भयकपित करणाऱ्या तत्कालीन निसर्ग घटनाच त्याना दैवतरूप भासल्या. वादळी वारे, मेघगर्जना, भूकप, महापूर, नैसर्गिक उत्पात हे सर्व पाहताना आणि अनुभवताना मानवाना वाटले की, या कोणी तरी प्रचड शक्तीच्या देवता आहेत आणि आपण अल्पशक्तीची माणसे त्याजबरोबर सामना देऊ शकणार नाही. अशा या अद्भुत सामर्थ्यशाली देवतांनी आपले अहित, अशुभ करू नये, यासाठी मानवाने त्याच्यापुढे माथा नमविला आणि नम्रभावाने प्रार्थना केली स्तोत्ररूपाने, मत्ररूपाने प्रार्थना केली. नतर त्याच्या रूपाची कल्पना स्वभावगुणावरून बसविली, त्याना मूर्तिरूपात साकार केले. ज्या देवता निर्गुण स्वरूपात होत्या त्याना सगुण-साकार करून, मानवाच्या अतिनिकट आणून बसविल्या.

## देवतांचे मूर्तिकरण

अशोक राजाच्या वेळेपर्यंत बहुधा सुबक मूर्ति अस्तित्वात नसाव्यात पण त्यानतर ग्रीक, सेमेटिक सस्कृतींचा सपर्क झाल्याने त्याची छाया भारतीय सस्कृतीवर पडून मूर्तिकला अस्तित्वात आली. वेदकाल व ब्राह्मणकालात मूर्तिपूजन नव्हते. पण अलेक्झँडरने बॅक्टेरिया प्रात सनपूर्व ३२९ साली जिंकल्यावर व बौद्ध-सस्कृतीबरोबर त्याचा सपर्क आल्यावर ही कला चालू झाली. पतजली व पाणिनीचे टीकाकारही ही गोष्ट मान्य करतात. या बाबतीत चार्ल्स इलियट लिहितात,

Gods in India were not derived from Greece, but they were stereotyped under the influence under western art to this extent that familiarity with such figures as Apollo and Palles encouraged the Hindus to represent their Gods and heroes in human or quasi human shapes Buddhism when passed into hands of men accustomed to Greek statuary, the inclination to venerate definite personalities having definite shapes was strengthend

वरील उताऱ्यावरून स्पष्टपणे असे दिसते की, ग्रीक सस्कृतीचा बौद्धांबरोबर सबध आल्यावर मूर्तिकला अस्तित्वात आली, यामुळेच भारतामधील अनेक देवींच्या केवी प्राचीन मूर्ति तादळा स्वरूपात आढळत असाव्यात. देवताची स्थापना झालेली होती, पण मूर्ति नव्हत्या.

हाच लेखक पुढे असे प्रतिपादन करतो की,

In early Indian sculpture deities were mostly portrayed in human form, but in about first century of our era, there is

a tendency to depict them with many heads and limbs.' This tendency grows stronger until the mediaeval times it is predominant. It has its origin in symbolism. The deity is thought of as carrying many insignia, as performing more actions than two hands can indicate, the worshipper is taught to think of him as appearing in this shape and the artist does not hesitate to represent it in paint and stone ( Hindusim & Buddhism, part 2, Page XXXIV ).

या उताऱ्यावरून स्पष्ट आणि पूर्ण कल्पना येते की, ' मूर्तींचे ' मानवीकरण झाल्यावर इसवी सनाच्या पहिल्या शतकात ही कला वाढीला लागली. मूर्तिकरण घडत असताना कारणपरत्वे मस्तके, हात, आयुधे याचे स्थापन झाले आणि कलाकार त्याप्रमाणे मूर्ति घडवू लागले. गांधारशिल्प हे भारतातील प्रथम शिल्प मानले जाते आणि त्या ठिकाणीच याचा अनुभव येतो.

ग्रीक रोमन कलेपासून परिणत झालेली ही पाश्चिमात्य कला वास्तवाशी ( रिॲलिस्टिक ) अतिशय जवळची, तर भारतीय चित्रशिल्पात वास्तवाला थोडा अधिक फाटा असून तेवढी जागा कल्पकतेसाठी मोकळी सोडलेली आहे. पाश्चात्य शैलीमधील रेषारंगाचा दृश्यप्रत्यय, शरीररचना व प्रमाण यावर जास्त कटाक्ष असतो; उलट भारतीय शैलीत तेवढा सांभाळला जात नाही. यामधील मुख्य भेद सांगावयाचा झाला तर पाश्चिमात्य ' कसे असते ' दाखवितात तर भारतीय ' कसे असावे ' दर्शवितात. या भारतीय शैलीत कलाकाराला मूर्ति घडविण्यात स्वातंत्र्य त्यामुळे अधिक आहे.

इलियटच्या वरील उताऱ्यावरून असा समज होईल की, देवतांचे मूर्तिकरण हे इसवी सनाच्या सुमारास झाले. पण वैदिक आर्यांच्या पूर्वी मोहेंजदारो येथे जी सिंधु संस्कृति होती, त्यामध्ये मातीच्या अनेक बाहुल्या व मूर्ति आढळून आलेल्या आहेत. तीन मुखे, तीन नेत्र आणि दोन शिंगे असलेली शिवसदृश मूर्ति तेथे आढळली आहे. कालांतराने वैदिक आर्यही मूर्तिपूजेकडे वळले. याचा उल्लेख यजुर्वेद, ब्राह्मण-ग्रंथ व धर्मसूत्रे यामध्ये आढळतो. देवमंदिर समोर आले तर त्याला उजवी घालून जावे, देवघरातील मूर्ति फुटली, तुटली तर प्रायश्चित करावे इ० विधि त्यामध्ये आढळतात. फार तर असे म्हणता येईल की, इसवीसनापासून मूर्तिकरण झाले, ते मृत्तिकेचे नसून पाषाण मूर्तीचे झाले, व कालांतराने धातुमूर्ति अस्तित्वात आल्या.

मूर्तिपूजेच्या संबंधात लो. टिळक एके ठिकाणी म्हणतात, ' मूर्तिपूजा विवेकास जरी हीन वाटत असली, तरी ज्या कल्पना बाह्येंद्रियास अगोचरच

असतात, त्या सामान्य जनास विशद करून दाखविण्यास प्रतिमेशिवाय साधनच नाही ' स्वामी विवेकानंद म्हणतात, ' मूर्तिपूजेत सहस्र दोष असले तरी जिने मला रामकृष्ण परमहंस दिले ती मी उराशी सदैव बाळगीन '

## देवाचे मानवीकरण

वैदिक कालापूर्वी निर्गुण निराकार असणारे देव मंत्रस्वरूपात आले, नंतर यंत्रस्वरूपात आले आणि शेवटी मूर्तिस्वरूपात भक्ताच्या कल्पनेनुसार आले पण एवढ्यावरच त्याची देवगति थांबली नाही ब्राह्मणकालात देवतांचे मानवीकरण करण्याकडे समाजाचा कल जास्त झुकलेला दिसतो त्या काळी मानवात असणारे स्वभावगुण, वर्णव्यवस्था, जीवनक्रम यांचाही देवावर परिणाम झाला माणसा सारखीच त्यांना माता पिता, पुत्र कन्या, बंधु भगिनी अशी नाती निर्माण झाली शंकर, पार्वती, गणेश, स्कंद, सरस्वती, स्वाहा, नदी अशी मालिका यांच संबंधांतून उत्पन्न झाली असावी त्यांच्यामध्ये परस्पर कलह सुरू झाले श्रेयुक निश्चत्वाबद्दल भांडणे सुरू झाली—दक्षप्रजापति व शंकर यांचे कलह पहा—शत्रूबरोबर लढून लूट वाटून घेत अशाप्रकारे मानवसदृश अनेक व्यवहारांचा देवतांवर प्रत्यारोप करण्यात येऊ लागला ब्राह्मण कालातील देवतांचे हे स्वरूप पाहिले म्हणजे तत्कालीन मानवाच्या जीवनक्रमाची कल्पना येते स्वत च्या जीवनक्रमावरून भक्तांनी देवतांचे जीवनक्रम ठरविले असले पाहिजेत, असं निश्चितपणे म्हणता येते सांप्रतच्या कालीही देवतांची स्वरूपे अगर त्यांचे आहार, पूजक समाजाच्या धारणेप्रमाणे होत असतात, हे आपण गणेशोत्सवातील मूर्ति, नवरात्रोत्सवातील दुर्गामूर्ति अगर पशुबळी या आचारावरून अनुभवू शकतो

भारतामध्ये हे घडले असे नव्हे, तर इस्राएल पुराण, ग्रीक पुराणातही असे मानव समाजाचे आचार विचार देवतांवर लादले गेलेले आहेत असा अनुभव येतो अन्य धर्मीयांचे दैवत कथांत हाच अनुभव येतो

वर्णभेद पाहिला तर *अग्नि-बृहस्पति* हे ब्राह्मण, इंद्र वरुण हे क्षत्रीय, मरुत विश्वदेव हे वैश्य या प्रमाणे मानलेले आहेत देव हे सत्यवादी असतात असं मानले जाते, पण इंद्राने अहिल्येची फसवणूक करणे अगर अभान सतंत्रभाच्या क्रियांची अभिलाषा धरणे, यासारखे नैतिक दुर्गुणही आढळून येतात ईर्षा, मद, मत्सर, मोह, स्वार्थ इ० दोषापासूनही देव अलिप्त नाहीत. यासाठीच ' न देवचरितं चरेत् ' म्हणजे देवचरित्राचे अनुकरण करू नये असा दंडक घातला गेला असताना आपल्या सुखसमृद्धीसाठी त्यांची फक्त उपासना करावी अनुकरण करू नये, हेच साधकाने ध्यानी धरले पाहिजे श्रीकृष्णाने अनेक क्रिया केल्या, तरी त्यांचे अनुकरण माणसांना सांप्रत क्षेपणारे नाही

देवताचे मानवीकरण नेहमीच्या सृष्टीत किती आले याचे उत्तम उदाहरण म्हणजे देवताचे जन्मोत्सवाचे देता येईल. मानवाचा जन्मदिवस निरनिराळ्या प्रकारानी साप्रत सर्व संस्कृतीमध्ये साजरा केला जातो. तद्वत् परशुराम, राम, कृष्ण, ज्ञानेश्वरादि संत याचे जन्मदिवस साजरे केले जातात. भारतामध्ये अनेक देवस्थाने आहेत व त्याची स्थापना निरनिराळ्या दिवशी झालेली असल्याने त्याच्या स्थापनेच्या दिवशीचा सोहळा करण्यात येतो. देवताची आणि स्थापनेच्या दिवसाची स्मृति साजरी करण्यात, त्या त्या देवताचे जीवनकार्य साप्रतच्या पिढीला समजून यावे, हाच त्यामध्ये प्रामुख्याने हेतु असतो. या निमित्ताने जनसमुदाय मंदिरातून एकत्र जमतो आणि समारंभाने जनतेचे आकर्षण कायम राखले जाते. देवताविषयी आणि देवस्थानाविषयी श्रद्धा वाढती रहाते. भक्तीचा अखंड मार्ग चालू रहातो. यासाठी देवस्थानातून अगर इतर सार्वजनिक स्थलातून असे उत्सव-समारंभ होणे हे हितकारक ठरते. पूर्वकालीन संस्कृतीप्रमाणे त्या वेळी उत्सव-समारंभ साजरे होत असत. साप्रत कालमानाप्रमाणे, अगर परिस्थितीप्रमाणे थोडा फेरफार झालेला दिसतो आणि साप्रतच्या संस्कृतीचे प्रतिबिंब उत्सवामध्ये पाहता येते. मानवाची संस्कृति बदलते तद्वत् देवताच्या स्वरूपावर त्याचे प्रतिबिंब उठते. देवताचा पोषाख, खाणेपिणे या सर्वांवर मानवी जीवनाचे प्रतिबिंब उमटलेले दिसते, इतके त्याचे मानवीकरण झालेले दिसून येते.

## मानवाचे देवताकरण

Divinity the Source of life and divinity the end

—*Madhavanath Maharaj*

नर करे तों नरका नारायण हो जाय ॥

देवता या शब्दाचा विचार करीत असताना वरील उद्बोधक वाक्ये पाहण्यात आली आणि मनन सुरू झाल्यावर खालीलप्रमाणे निष्कर्ष निघाला.

भारतीय सनातन संस्कृतीमध्ये वामन, परशुराम, राम, कृष्ण, बौद्ध यांना देवता मानतात. याचे कारण वर सांगितल्याप्रमाणे त्याची उत्पत्ति परमेश्वरी तत्त्वातून झाली आणि जीवनातील कार्य संपल्यावर पुन्हा परमेश्वर-स्वरूपात विलीन झाले. जीवनात त्यानी अलौकिक चिरस्मरणीय कार्ये केले, त्यामुळे ते नारायण झाले.

साप्रतच्या कलीयुगात आपण तेच पाहतो. राणाप्रताप, छत्रपति शिवाजी, तुळशीदास, ज्ञानेश्वरादि अनेक संत, यानी त्याच्या जीवनात अलौकिक कार्ये केले आणि अमरत्व पावले, नारायणस्वरूपी झाले. आज त्याचे पूजन सर्वत्र

होत आहे साम्प्रतच्या सिसाव्या ातरात तेच अनुभवाला येते लो टिळक, म गाधी, डॉ भीमराव आंबेडकर, प जवाहरलाल नेहरू यानी जीवनात असामान्य कार्य केल्याने त्याचे उत्सव व पूजन होत आहे

मग द्वापार–त्रेतायुगातील ही विचारसरणी जर कृतयुगापर्यंत मागे खेचली तर आपणास कोणते दृश्य दिसेल ? भगवान शकराच उदाहरण घ्या शकर हे अनार्यांचे दैवत, आर्यांनी आत्मसात केले असे अनेकाचे मत आहे पाश्चात्य सशोधक सर चार्लस इलियट म्हणतो की, दक्षयज्ञात ने शकराना निमत्रण केले नाही याच कारण तेच असावे आर्यांच्या यज्ञसमारभप्रसगी अनार्य कशाला बोलवावा ? ( साम्प्रतही यज्ञयागाचे वेळी दलिताना पाचारण करीत नाहीत, याची उपेक्षाच होत ) शकर भगवानाचे स्वरूप स्वच्छ गौरवर्ण आणि पोषाखही अनार्यांला शोभेल असाच असतो आर्यांचा रुद्र म्हणजे वेदामध्ये वर्णन केल्याप्रमाण ते अग्नीचे स्वरूप होत ते शिवशकर खासच नव्हत पौराणिक काळातील शिव हा निराळा त्याला नीलकठ, पशुपति, वृषभवाहन अशी अनेक नावे आहेत अनार्य हे शैव धर्मी असून शक्तिपूजक होते शिवाला ' मखमथन ' म्हणज यज्ञाचा विध्वस करणारा असे एक नाव होते तत्र ग्रथकार सर जॉन वुड्रॉफ म्हणतात की, सर्व तत्रे शिवाच्या मुखातून बाहेर पडलेली आहेत नाथपथीय लोकामध्ये, मच्छिंद्रनाथ हा दुसऱ्या क्रमाकाचा गुरु, पण आद्यगुरु म्हणजे शिवशकरच मानतात तसेच लिंगायत पथामध्ये आद्यगुरु शकर भगवानाना मानतात व त्याच्या मुखातून पहिल्या पाच शिष्याना उपदेश मिळालेला आहे यावरून असे म्हणावेसे वाटते की, प्रत्यक्षात उपदेश करणारी शकर ही कोणी अलौकिक व्यक्ति अथवा स्वरूप आहे

हिमवान पर्वताची कन्या पार्वती हिच्याबरोबर त्याचा विवाह झाला पर्वत हे उपनाव असून पूर्वकाळी दुर्वास ऋषींचे ते नाव होते आणि साम्प्रतही त्याचाच अपभ्रश पर्वते असा आपण ऐकतो तेव्हा अशा हिमालय पर्वतराजीतील पर्वत उपनावाच्या राजाची ती कन्या नसावी, असे निश्चितपणे सागता येणार नाही भगवान शकर हा कैलासपर्वत व आसपासचा प्रदेश याचा प्रमुख असल्याने, हा विवाह झालेला असावा शकराच्या सैन्याला भूतगण म्हणतात आणि या नावाची एक जमात हिमालय परिसरात आजही आहे असे सशोधक सागतात हिमालयाचा प्रवास करून आलेल्या यात्रिकाने लेखकाला सागितले की, मानस सरोवराला जो बाध अथवा धरण आहे, त्यावरून एकदोन वाहने एका वेळी सहज जाऊ शकतील हे जर सत्य मानले, तर हे धरण ज्या कैलास पर्वताजवळ आहे, तेथील राजा मोठा विश्वकर्मा ( इंजिनीअर ) असला पाहिजे कदाचित् ते शकर भगवानही असतील

दुसरे उदाहरण घ्यावयाचे, तर इंद्राचे घेता येईल. इंद्राला आपण देव मानतो. पण याच इंद्राच्या राज्यावर जेव्हा संकट ओढवले, तेव्हा राजा दशरथ त्याच्या मदतीला गेला असेही आपण ऐकतो. भूमीवरील अर्जुन इंद्राकडे जाऊन अस्त्र-विद्या शिकून येतो. गजगौरी व्रतासाठी भीम इंद्राचा पांढराशुभ्र ऐरावत आणून कुंती मातेला देतो व काम झाल्यावर परत करतो. सारांश, इंद्रही मानवांबरोबर संपर्क ठेवणारा राजा आहे, नव्हे तो देवांचाही राजा आहे.

वरील सर्व उदाहरणांवरून एकच निष्कर्ष निघू शकतो की, त्या त्या काळी जन्म पावलेल्या व असामान्य कर्तृत्व असलेल्या व्यक्तींचे देवतांकरण झालेले आहे.

याला दुजोरा इतर संस्कृतींमधूनही देता येईल. ग्रीक संस्कृतीमधील देवतांचा इतिहास म्हणजे रामायण—महाभारतातील संघर्षाप्रमाणेच आहे आणि त्या ऐतिहासिक व्यक्तींना देवपण दिलेले आहे. इस्रायल संस्कृतीमध्ये योहाना ह्या परमेश्वर स्वरूप परात्पर देवाने साहाय्य केल्याने, अब्राहाम, याकोबा, योसेफ, सारखे ऐतिहासिक पुरुष देवत्व पावले. ख्रिश्चन पंथात येशू, इस्लामी पंथात महंमद, शीख पंथात गुरू नानक, अथवा बौद्ध धर्मीयात भगवान बुद्ध यांची उदाहरणे वरील विधानालाच दुजोरा देणारी आहेत.

प्रत्येक मानवप्राण्याची उत्पत्ति परमेश्वरी अंशापासून आहे आणि मरणोत्तर जड देह जरी नाहीसा झाला, तरी मूळरूप परमेश्वरामध्ये विलीन होते. असे जरी आहे, तरी काही नामवंत व्यक्तींनाच देवत्व प्राप्त होते, सर्वांना नाही आणि याचे कारण उघड आहे. पूर्व सुकृतानुसार अगर समर्थ रामदासांप्रमाणे तपस्येच्या आत्मिक बळावर काही व्यक्ति चिरस्थायी कार्य करतात आणि अमरत्व पावतात, देवपण पावतात. प्रत्येक व्यक्तीला ते शक्य नाही

## देव

ऊर्ध्वं गच्छन्ति सत्त्वस्था मध्ये तिष्ठन्ति राजसा ।
जघन्यगुणवृत्तिस्था अधो गच्छन्ति तामसा ॥ गीता १४–१८ ॥

गीतेचा वरील श्लोक देव, दैत्य व दानव या शब्दांवर प्रकाश टाकणारा आहे. सत्त्वस्थ मानव हा दुसऱ्याने कितीही त्रास दिला तरी तो सहन करून, त्याचे दुःख निवारण करण्यासाठी झटतो. सात्त्विकवृत्तीने व स्वतःच्या खडतर तपस्येने विविध जगाचे ज्ञान संपादन करून द्युलोकात—स्वर्गात वास्तव्य करतो. द्यु या धातूचा अर्थ प्रकाशणे हा असल्याने, तो द्युलोकात वास्तव्य करतो याचा अर्थ असा घ्यावयास पाहिजे की, तो मानवाच्या उच्च मनोभूमिकेवर आरूढ होऊन दिव्य ज्ञानी पुरुष बनतो, म्हणजेच शामक वृत्तीचा देव बनतो. मानवच आपल्या उच्च क्रियेनुसार देव बनतो, इतरांना प्रकाश देतो, मार्गदर्शन करतो.

दैत्य

हा मानव राजस वृत्तीचा होय. तो सहसा स्वतः होऊन कोणाला त्रास देणार नाही. परन्तु कोणी त्याला त्रास दिला, तर पूर्णपणे सूड उगाविल्यानिना राहणार नाही. शक्य तितक्या इतराच्या श्रमाचा फायदा घेऊन विलासात राहून घृतकल्या मधुकल्या करून मानवामध्ये राजस वृत्तीने राहणारा हाच दैत्य होय. ही मध्यम स्थिति होय.

दानव

हा मानव तामसी वृत्तीचा असल्याने, तो मांसाहारी, व्यसनी, दुराचारी स्वतः नेहमी संतापाने जळत राहणारा आणि जेथे जाईल तेथे सात्त्विक माणसाला-सुद्धा नेहमी त्रास देत राहील. या भूमीवरील हा स्वयस्फोट तामसी वृत्तीचा राक्षसत्व होय. वास्तव या मानवाचे समाजातील स्थान पाताळ म्हणजे अगदी खालच्या पायरीचे असते.

यावरून असे म्हणावयास हरकत नाही की, भारतीय पुराणातून स्वर्ग, मृत्यु, पाताळ या त्रैलोक्यदर्शक शब्दाचा जो वापर केलेला आहे, तो भौगोलिक प्रदेशाचा नसून, मानवाच्या सात्त्विक, राजस व तामसी मनोभूमिकेच्या वृत्तीचा निदर्शक आहे. भारतीय पुराणातील देवदैत्यांची युद्धे, अगर संबंध याच भूमिकेवरून पाहिल्यास, मानवाचे देवताकरण कसे झाले, अगर होते हे लक्षात येईल. (समाज-शासन-शास्त्र, ले. डॉ. आ. कृ. भागवत, पृ. ५।१२)

यासाठीच सर्व संस्कृति आग्रहाने प्रतिपादितात, ‘मानवा, तू परमेश्वरी अंश आहेस, जीवनाला अमरत्व येण्यासाठी तपस्या कर. सदासर्वदा विषय-सुखात निमग्न न राहता चिरस्थायी स्वरूपाची मानवाची आणि परमेश्वराची सेवा कर आणि अंती माझ्या स्वरूपात विलीन होऊन जा!’ शेवटी नराने कार्य केल्यास तो नारायणस्वरूप होईल, हेच सत्य मानावे लागते.

देवता मर्त्य की अमर्त्य.

ज्या अर्थी देवतांना जन्म आहे, त्या अर्थी त्यांना मरणही आहे, असे मानावयास हरकत नाही. पण ज्याप्रमाणे अश्वत्थामा, व्यास, हनुमान हे मानवयोनीतील जीव अमर झाले आहेत, असे आपण भारतीय लोक मानतो, तद्वत् काही देवता, विशेषतः ज्या तेजापासून महिषासुरमर्दिनी, मनसा, कात्यायनी इ० उत्पन्न झाल्या, ज्या अयोनी संभवा आहेत त्यांना मरण असणे जरूर आहे असे नाही. पण प्राचीन देव, मधल्या काळचे देव आणि आजकालचे देव यांच्या

पिढ्या आपण पाहतो, त्यावरून त्यांना मरण आहे, हे म्हणणे क्रमप्राप्त आहे (ऋ. ७-२१-७). शतपथ ब्राह्मण व ऐतरेय ब्राह्मण यातही इंद्र, अग्नि, प्रजापति या मोठ्या देवांसह सर्व देवाना मर्त्यच मानले आहे (श. ब्रा. १०-४-३३; ऐ. ब्रा. ८-१४-३४). सवित्याने, अग्नीने व सोमाने देवांना अमरत्व दिले असे ऋग्वेदात म्हटले आहे (ऋ. ४-५४-२). ब्रह्मचर्य आणि तप यांच्या योगाने देवांनी अमरत्व मिळविले असे अथर्ववेदात सांगितले आहे (अथर्व. ११-५-१९). *सोमयाग केल्याने देवानी मृत्यूवर विजय मिळविला* असे तैत्तिरीय संहितेत म्हटले आहे (७-४-२१). पुराणकारांनी देवता अमर मानल्या गन्या, परंतु अमरत्वही सापेक्ष आहे, म्हणजे कल्पान्ती सर्व देवदेवता नष्ट होतात *अशी त्यांची धारणा आहे. यज्ञयागाने देवांनी अमरत्व मिळविले.*

देवतांचे अस्तित्व मान्य केल्यावर साहजिकच या देवता कोठे राहतात असा प्रश्न मानवापुढे उभा राहिला. नेत्रांना त्या साक्षात दिसत नाहीत. पृथ्वीवर जिवंत स्वरूपात आढळत नाहीत, त्याअर्थी त्या आकाशात राहात असाव्यात *अशी कल्पना पुढे आली. मग त्यांचे रहाणे* उच्चस्थानी, सुस्थितीत असल्याने त्याला स्वर्ग हे नाव प्राप्त झाले. पण तेथेही देवतांचे कमीअधिक महत्त्वाप्रमाणे निवासस्थानाची नांवे रुढ झाली आणि भूलोक, स्वाहालोक, गोलोक अशी निरनिराळी नावे आली. मानवाच्या वसाहतीमध्ये ज्याप्रमाणे कमीअधिक सोयीने वसतीस्थाने निर्माण केलेली असतात, तोच आरोप येथे देवतांच्या बाबतीत केलेला आढळून येतो. याच ग्रंथात 'देवतांचे मरण' याविषयी उल्लेख इतरत्र आलेला आहे. त्याचा मतितार्थ असा की, देवतांचा उच्चकाळ संपला आणि त्यांची पूजाअर्चा थांबली म्हणजे तेच त्यांचे मरण होय, असे मानले जाते. समुद्र-मंथनातून जे अमृत निघाले, ते फक्त देवानीच घेतले आणि त्यामुळे त्यांना अमरत्व प्राप्त झाले आहे, असेही पुराणकार सांगतात.

*देव हे मूलतः मर्त्यच होते आणि त्यांना मृत्यूचे भयही वाटत असे. त्या* भयातून मुक्त होण्यासाठी ते प्रजापतीकडे गेले व प्रजापतीने त्यांना नवरात्र विधानाने अमरत्व दिले, अशी कथा तांड्य ब्राह्मणांत आहे (२१-१२-१). देव हे कधीही झोपत नाहीत (श. ब्रा. ३-२-२२). देवांची सर्व पापे झडून गेलेली असतात (श. ब्रा. २-१-३-४). मानवानी अतिशय पुण्य संपादन केले तर त्याला इंद्रपदही प्राप्त करून घेता येते, स्वर्गपद प्राप्त होते. पण तो पुण्यसाठा संपल्यावर पुन्हा भूतलावर जन्म घ्यावा लागत असे गीता ग्रंथात प्रति-पादिले आहे. देवतांची मूर्ति तयार करून बसविली म्हणजे तिच्यात देवत्व आपोआप येत नाही. प्राण-प्रतिष्ठा करून मंत्राने तिजमध्ये जिवंतपणा आणावा लागतो.

या सर्व विवेचनाचे सार हेच म्हणता येईल की, देवता या जर मूळ परमतत्त्वाचा अंश आहेत असे मानल्या, तर ज्याप्रमाणे मूलतत्त्व अमर आहे, त्याला मृत्यु नाही, त्याप्रमाणे देवतानाही प्रत्यक्ष मृत्यु येण्याचा त्याला मृत्युरूप होण्याचा योग्य नसावा असे वाटते मानव अमराच्या मागे जेवढा धावतो, तेवढा मर्त्यांच्या मागे धावणार नाही

Does the dying God die by compulsion or by choice ? With generosity or with bitterness? Out of love or dispair? In what spirit does the dying God go to his death ? ( Arnold Toyenbee Study of History, Vol I Page 621 )

भारतीय शास्त्राप्रमाणे पाश्चात्य सशोधकाने या विषयाचा ऊहापोह केलेला आहे, हे वरील उताऱ्यावरून ध्यानी येईल याचा आशय असा की, देवाचे मरण त्याच्या स्वाधीन आहे का ? भीष्माचार्याप्रमाणे ते इच्छामरणी आहेत ? का मरण त्याच्यावर लादले जाते ? आशा निराशेच्या द्वंद्वात सापडून ते मरण पावतात का भूमीवरील आपले कार्य सपले आहे म्हणून प्रेमाने पृथ्वीचा निरोप घेतात ? मानवाचा भूलोकावरील अवतार सपल्यावर पाप पुण्याच्या सचिताप्रमाणे तो जसा स्वर्ग अथवा पाताळ येथे जातो, तद्वत देव कोणत्या योनींत प्रवेश करतात ? इत्यादि प्रश्न लेखकाने पुढे करून असा प्रश्न केला आहे की, देवयोनीतील महाभागाना जर मरण चुकवता येत नाही तर भूलोकावरील मानवांनी आपल्या प्रिय पुत्रासाठी अगर इतर प्रिय जनासाठी, ते मृत्यु पावल्यावर का शोक करावा ? परमेश्वराने तुम्हाला पुत्र दिला, काही काळ तुमच्या सगतीत ठेवला नतर त्याने परत नेला मग वाईट का वाटावे ? ज्या मूल तत्त्वातून पुत्राची उत्पत्ति झाली त्यामध्ये विलीन झाला, तो अमर झाला यासबधात दुसरा एक लेखक 'ऍंटीपाटर ' याचे सारसर्वस्व काढता की, 'The One remains The many changeth and pass ' ब्रुक नावाचे आग्ल कवितेत ओढयाचे वर्णन करताना हेच तत्त्व माडलेले आहे तो म्हणतो, Men may come and men may go But I go on for-ever माणसे येवोत अगर जावोत, जन्म पावोत अगर मरोत, शककर्ते पुरुषज्याची देवयोनीतील देवाप्रमाणे पूजन होते, ते उपजोत अथवा पुन्हा पचतत्त्वात विलीन होवोत परमेश्वर हा एकच आहे व तो अनत काळ राहणारा आहे जो मानव त्या एकावर म्हणजे सर्वसाक्षी अनतकोटीब्रह्माडनायकावर विश्वास ठेवतो त्याचे अस्तित्व मानतो, त्याची निश्चयाने सेवा करतो, तोच अमर होतो पाश्चात्यांचे हे विचार मुद्दाम देण्याचे कारण इतकेच की भारतीय तत्त्वज्ञानापेक्षा त्यामध्ये काहीचाही फरक नाही हे दर्शविणे होय मूल तत्त्व सर्वत्र एकच मग तो भारतीयांचा राम-कृष्ण बुद्ध असो, मिनॉन सस्कृतीचा झामिउ असो, सुमेरिअनचा तामुज असो,

हिटाईटचा ॲटीस असो, सिरियाचा ॲडोनिस असो, इस्लामचा महंमद असो अगर ख्रिस्ताचा येशू असो.

## देवतांची वंशवृद्धि नाही

देवतांचे तात्त्विक स्वरूप या प्रकरणात देवांना मुले का होणार नाहीत, याबद्दल शाप असल्याचा उल्लेख आलेला आहे. ब्रह्मा, विष्णु, महेश अथवा इतर देव–देवतांकडे आपण पाहिले तर त्यांची वंशवाढ आपणाला दिसून येत नाही. वंशपरंपरेने एकादे देवाचे क्षेत्र चालू आहे असे आपणास दिसत नाही. यासंबंधीचा दुसरा उल्लेख पुराणात आहे तो असा. वृत्रासुर दैत्याचा वध करण्यासाठी दधीची ऋषींकडे सर्व देव गेले आणि त्यांनी त्यांच्या अस्थींची मागणी केली. सत्कार्यासाठी आपल्या अस्थींचा उपयोग होत आहे, हे पाहून ऋषीने योगबळाने आपला अवतार संपविला आणि देवांची इच्छा पुरी केली. त्या अस्थींपासून पटकोनी वज्र बनवून, इंद्राने वृत्रासुराचा नाश केला. पण हे सर्व घडले तेव्हा ऋषीपत्नी आश्रमात नव्हती. परत आल्यावर तिला सर्व प्रकार समजला आणि त्या परम दुःखद स्थितीत तिने देवांना शाप दिला, ' तुमचा वंश वाढणार नाही. ' सहगमन करण्यापूर्वी आपले पोट स्वहस्ते चिरून गर्भ बाहेर काढून पिंपळाच्या वृक्षाखाली ठेवला आणि नंतर ती सती गेली. या ऋषींचा आश्रम सरस्वती अथवा गंगा तीरावर होता असे पुराणात सांगितले आहे. या शापामुळे त्यांची वंशवृद्धि नाही असेही मानले जाते.

## ऋग्वेदातील देवता

वैदिक आर्यांनी या पंचमहाभूतात्मक देवतांना आपल्या सूक्तांमध्ये जागा दिली. त्यांचे कर्तृत्व गाऊन प्रार्थना केली. झंझावातरूपी वायूला मरुत देवता म्हणून सूक्ते रचली. हे मरुतांनो तुमचे, सामर्थ्य अफाट आहे. तुम्ही सर्व लोकांना हलवून सोडता, कंपीत करता, आमचे रक्षण सदैव करा ( ऋ. ५-५४–५१ ). अनेक महिने अंधारात वावरल्यावर जेव्हा उषादेवीचे दर्शन झाले तेव्हा त्यांनी प्रार्थना केली, ' हे उषादेवी, *जेव्हा तू आपला दिव्य प्रकाश पसरतेस,* ' तेव्हा विश्वाला आपले प्राणचैतन्य मिळाले असे वाटते. तू आपल्या विशाल रथात बसून जाताना आमची हाक ऐक. ' ( ऋ. १–४८–१० ). ज्या भूतलावर मानव वस्ती करून आहे आणि अनेक परीने ज्यांचे पालनपोषण करते, म्हणून पृथ्वीला देवता मानून स्तुति केली, ' हे पृथ्वीदेवते, आम्हांवर तू प्रसन्न हो. तुझ्यापासून कोणालाही उपसर्ग होणार नाही. आपल्या पाठीवर तू सर्व प्राणिमात्रांना धारण करतेस. आम्हाला सर्व सौख्य प्राप्त करून दे '. ( ऋ. १–२२–१५ ). याप्रमाणे अनेक देवता मानल्या गेल्या.

नासदीय सूक्ताचे म्हणणे असे की, देवता या सृष्टीनिर्मितीनंतर उत्पन्न झाल्या ( ऋ. १०–१२९ ). एका अर्थाने हे खरेही आहे. कारण सृष्टीवरील प्राणी निर्माण झाल्यावरच त्यांनी देवताकल्पना प्रत्यक्षात आणली. याशिवाय कश्यप ऋषींची भार्या अदितीपासून जे पुत्र जन्माला आले ते देव व दितीपासून जन्म पावले ते दैत्य होत, ही कल्पना आपण मान्य केलेलीच आहे.

देवताच्या स्वभावाविषयी यास्क सांगतात की, देवतांचे जे चरित्र मानवा-पुढे उभे आहे त्यामध्ये मानवी गुणधर्म दिसत नाहीत ( निरुक्त ७–४ ). पण सर्वसाधारणपणे पाहिले तर काही अलौकिक गुणांमुळेच देवतांना श्रेष्ठत्व आलेले आहे यात संशय नाही. देवतांचे स्तुतिपाठक अथवा ऋषि, पुरोहित आपल्या इष्ट देवतेचे महात्म्य वर्णन करताना अतिशयोक्तीने व इतरांना गौणत्व देऊनच वर्णन करीत असतो, हे प्रत्यही दिसून येते. ग्रीक पुराणकथांत तर मानवाचे अनेक गुण व समाजरीतींचा देवताच्या ठायी आरोप केल्याचे दिसून येते. तेव्हा नाही म्हटले तरी मानवस्वभावाचा बराचसा भाग देवताच्या स्वभाववर्णनात आढळून येतो असा अनुभव आहे.

पण देवांचे आध्यात्मिक दृष्ट्या महत्त्व कमी होण्यास थोडेसे वेगळेच कारण घडले आहे. प्राथमिक अवस्थेतून मानवाची प्रगती झाली आणि तो बऱ्यावाईट घटनांचा जेव्हा आपल्या बुद्धीच्या आधारे शोध घेऊ लागला, त्या त्या देवतांचे सामर्थ्य व कारकत्व यांचा साधकबाधक विचार करू लागला, तेव्हा त्याला समजून चुकले की, देव हे स्वयंप्रकाशी नसून, त्यांचे अस्तित्व एका परमात्म्य तत्त्वावर अधिष्ठित आहे आणि त्याच्या प्रकाशाने ते प्रकाशित झाले आहेत. मानवाला हे समजून आल्यावर देवांच्या अनिर्बंध सत्तेची कुंडले आपोआप गळून पडली. श्रीकृष्णानी यासाठीच गीतेमध्ये अर्जुनमुखाने सांगितले की, ' हे विश्वरूप भगवंता, देवांचे हे संघ तुझे ठायी प्रवेश करीत आहेत. काही देव भय पावल्याने हात जोडून तुला प्रार्थना करीत आहेत. ' सारांश तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात ज्यांनी पदार्पण केले, त्याला देवांचे सत्यस्वरूप समजल्याने, तो या देवांच्या दास्यातून मुक्त झाला आणि मूळ निर्गुण स्वरूपाचा पूजक झाला.

( भा. सं. कोश, भाग ३ ).

### यजुर्वेदातील देवता

प्रजापति ही देवता या ठिकाणी प्रामुख्याने दिसते. अस्तित्वात असलेल्या सर्व प्राणिमात्रांना तो व्यापून उरला आहे आणि त्याच्याहून अधिक सामर्थ्याचा दुसरा देव नाही अशी या वेदाची धारणा आहे. ऋग्वेदातील ब्रह्मा, विष्णु, महेश यांना या ठिकाणी दुय्यम स्थान दिले आहे. प्रजापतीपेक्षा दुसरा कोणताही श्रेष्ठ देव नाही, तो पृथ्वीतील चराचर वस्तूंच्या ठिकाणी अंतर्यामी रूपाने प्रविष्ट

आहे. षोडशकलात्मक लिंगशरीर धारण करणारा, प्रजेच्या रूपाने स्वतःच सृष्टीमध्ये रममाण होणारा, असा हा प्रजापति, अग्नि, वायु व सूर्य या तीन ज्योतींना प्रकाशित करतो. कल्पान्ताच्या प्रलय जलात प्रजापति हा प्रथम जन्माला आला ( वाज. स. २३-६३; ८-३६ ).

## अथर्ववेदातील देवता

ऋग्वेदातील बहुतेक देवता या वेदाला मान्य आहेत. त्याव्यतिरिक्त असुर, पिशाच, गधर्व, अलीक, किमीदिन, तक्षक इ० देवता मानलेल्या आहेत.

## ब्राह्मणग्रंथांतील देवता

देव आणि असुर हे कश्यप प्रजापति यांचे दोन पुत्र होत. देव हे कनिष्ठ तर असुर हे जेष्ठ होत ( श. ब्रा. १४-४. १-१ ) प्रजापतीने आपल्या मुखाने देवांना उत्पन्न केले तर प्राणाने दैत्यांना उत्पन्न केले. वसु, रुद्र आणि आदित्य या सर्वांची मिळून ३३ संख्या सांगितली आहे. ( ता. ब्रा. ४-४-११ ).

## उपनिषदांतील देवता

चैतन्ययुक्त अशी शक्तिकेंद्रे किंवा शक्तीची उगमस्थाने पिंड-ब्रह्मांडात आहेत, ती सर्व देवतारूप होत. सृष्टिचक्राचे नियमन करणाऱ्या अनेक शक्ति आहेत पण संघटक, प्रकाशक आणि कार्यकारी असे तीन प्रकार उपनिषदकारांनी केलेले आहेत आणि ऋग्वेदापेक्षा हे वर्गीकरण वेगळे आहे. प्रश्नोपनिषदाच्या दुसऱ्या प्रश्नात भार्गव ऋषीने पिप्पलाद ऋषीला प्रश्न केला की, ' किती देवता प्रजेचे धारण करतात, कोणत्या देवता प्रजेला प्रकाशित करतात, या सर्व देवतात कोणती देवता श्रेष्ठ आहे ?' त्यांनी सांगितले की, ' पृथ्वीचे धारणपोषण करणारी पंचमहाभूते या संघटणा देवता, चंद्र, सूर्य, इंद्र या देवतांच्या रूपाने शरीरातील प्राणशक्तीचे व्यावहारिक कार्य चालते म्हणून या प्रकाशक देवता होय. शरीर, इंद्रिये, मन, बुद्धि, जीव या सर्व समुच्चयाला आत्मा असे म्हटले आहे. या आत्मशक्तीवरच विश्वातील सर्व कार्ये आधारित असतात, म्हणून ती कार्यशक्ति होय.'

## पौराणिक देवता

या काळामध्ये मूळच्या वैदिक देवता आपले श्रेष्ठत्व टिकवू शकल्या नाहीत. वरुण ही असामान्य वैदिक देवता पुराणकाळात साधी जलदेवता झाली. पौराणिक काळी वैष्णव अगर शैव धर्म प्रबल होताच, इंद्राचे महत्त्व कमी होऊन गौण स्वरूपात कधी-काळी त्याचे पूजन होऊ लागले. अनेक देव नुसते दिक्पाल स्वरूपात वावरू लागले. या कालात देवतांचे स्वभाव आणि

उभे करून, त्यावर मेणबत्ती असलेले कंदील टांगण्यात येऊन पितरांना आवाहन करण्यात येते दुसरे दिवशी गावात सवाद्य मिरवणुकीने थडग्यापर्यंत जाऊन पितरांना घरोघर येण्याचे निमंत्रण दिले जाते त्या समयी प्रार्थना होते, ' गतमृत पितरांनो, या मंगलप्रसंगी आमच्या घरी येऊन, आमच्या आतिथ्याचा स्वीकार करून, आम्हाला आशीर्वाद द्यावेत ' ( हिंदुस्थानातही घराघरी पितरांसाठी आकाश दीप आश्विन १५ पासून कार्तिक १५ पर्यंत लावले जातात अलीकडे ही प्रथा कमी होत आहे )

मिरवणुकीतील मंडळी घरोघर परतल्यावर, मिष्टान्न भोजन तयार करून टेबलावर व्यवस्थित रीतीने पात्रे मांडून, आसने मांडून खोली बंद करण्यात येते हेतु असा की, मृतात्म्यांनी आतमध्ये बसून शांतचित्ताने भोजन करावे शेजारी पाजारी एकमेकांच्या घरी भेटी देऊन तेथील पितरांना श्रद्धांजली अर्पण करतात तिसऱ्या दिवशी घरोघर लहानशी होळी पेटवून पुन्हा मिरवणुकीने घरी आलेल्या पितरांना सीमेबाहेर पोहचवून देतात एखादा मृतात्मा चुकून भोजनात गर्क होऊन अथवा मोहामुळे मागे राहिला असेल, तर त्याने तसे राहू नये, म्हणून परत आल्यावर घराचे छपरावर पाषाण अगर विटांचा मारा करतात * हेतु असा की, त्या आत्म्याने निघून जावे

तिसरे दिवशी भोजन खोलीचा दरवाजा उघडून, तेथील उच्छिष्ट अन्न जमा करून, नावेमधून समुद्रात सोडून देतात यातील हेतु असा की, मार्गावर पितरांना काही दिवस तरी अन्नपुरवठा व्हावा

कॅलिफोर्नियामधील रेडइंडियन हा समारंभ फेब्रुवारीमध्ये साजरा करतात, व तो अनेक दिवस चालतो उत्सवाच्या दिवसात मांसान्न वर्ज्य असते, इतकेच नव्हे तर काही धार्मिक माणसे कडकडीत उपवास पाळतात या दिवशी वैशिष्टय असे की, एका मोहल्यातील मंडळी दुसऱ्या मोहल्यात सवाद्य मिरवणुकीने व हाती देवदारू लाकडाची पेटती मशाल घेऊन जातात शरीरे रंगीबेरंगी रंगवलेली, पण चितारलेली आणि नव्या कपड्यांनी सुशोभित केलेली असतात दुसऱ्या वस्तीत गेल्यावर एक एक माणूस निरनिराळ्या घरातून प्रवेश करतो आणि स्वर्गस्थ पितर म्हणून त्याचे स्वागत होते काही ठिकाणी रडारडही होते, भोजन होते, नृत्य होते आणि नंतर पुन्हा मिरवणुकीने घरी परत येतात

---

* टीप—महाराष्ट्रात विशेषतः कोकणप्रांती गणपति मूर्तीचे विसर्जन केल्यावर नदी नाल्यातून आणलेले खडे अथवा वाळू, घरावर फेकण्याची रूढी आहे त्याचा या पितरांच्या रूढीशी संबंध आहे काय, याचा विचार झाला पाहिजे

जर्मन देशात बहुधा नोव्हेम्बर महिन्यात हा उत्सव पाळतात. त्या वेळी थडग्याना रंगसफेती करून, वर कोळशाची पूड पसरून, लाल रंगाच्या चित्र-विचित्र आकृति काढतात व नारिंगी रंगाच्या फुलांनी आणि कलाबतूनी सुशोभित करतात. घरामध्ये सकाळपासून दोन प्रहरपर्यंत पूजापाठ होतो आणि घरातील देवालयाचे वेदीवर मिष्टान्न भोजन ताटे ठेवून, त्यामध्ये मद्य आणि वस्त्रही ठेवले जाते. त्यांच्या या कृतीने मृतात्म्याला अन्न आणि वस्त्र मिळेल, अशी त्यांची धारणा असते. काही श्रद्धावान माणसे, त्या रात्री पितराचे नावाने रुदनही करतात, अगर त्यांच्या आठवणींची गाणी गातात.

युरोप खंडातील इतर देशही ' सोल्स डे '—मृताचा दिवस पाळतात. घरात आगमन करणाऱ्या पितराना त्रास होऊ नये व ती केव्हा कोणत्या स्वरूपात येतील याची शाश्वती नसल्याने त्या दिवशी घरातील केरकचराही काढीत नाहीत. घरामध्ये ' सोल्स केक ' बनवितात आणि टेबलावर मांडून ठेवून नतर सर्वजण त्यातील प्रसाद घेतात ( सदानंद चेंदवणकर, मराठा, २४–९–६७ )

भारत हा अनेक परपरेचा गाभा समजला जातो. भाद्रपद महिन्यात पितृपक्ष शास्त्राने ठरवून दिलेला आहे. त्या त्या तिथीला पितराना आवाहन करून, परिस्थितीप्रमाणे त्यांचे स्मरण करावे. ज्याची तिथि माहीत नसेल अशासाठी 'सर्वपितृ अमावास्या' हा दिवसही नेमून दिलेला आहे वैशाख शु ३ ( अक्षय्य तृतीया ) ही तिथि पितृतिथि म्हणून पाळली जाते. कुंभोदकाचे महत्त्व यात आहे. पण दिवसेदिवस ही रूढीही नष्ट होत आहे आप्तेष्टांनी एकत्र जमून हा सोहळा साजरा करावा ही परपरा लुप्त झाली आहे. पितराबद्दल अभिमान अगर आदर कमी होत असून, वारस म्हणून त्यांची शेष संपत्ति मात्र उपभोगावयास पाहिजे, पण त्यांचे स्मरण नको, ही वृत्ति बळावत आहे. अशा वेळी भूगोलावरील आपले इतर बांधव काय करतात, हे पाहणे उपयुक्त ठरावे, म्हणून वरील भाग घेतला आहे. आपल्या पूर्व परपरा राखणे, अथवा नव्या बदलत्या परिस्थितीप्रमाणे सुधारणा करून राखणे, ही भारतीय वृत्ति सेवत राहिली पाहिजे.

भारतीयांची ही पूर्वपरपरा काही निश्चित सिद्धान्तावर आधारीत आहे, हे स्वामी विज्ञानानद ( लोणावळा ) यांनी एका लेखात मांडले आहे.

त्यांचे म्हणणे असे की, सूर्यासारख्या जड पदार्थांच्या प्रकाशाच्या गति एका सेकंदाला १,८६,००० मैल आहे. दुसऱ्या एखाद्या प्रभावी गोलाची गति यापेक्षाही खूपच अधिक असली तरी तिला मर्यादा आहेच. परतु गीतेमध्ये

सांगितल्याप्रमाणे 'चचल हि मनः कृष्ण' मन आणि आत्मा यांच्या चलन-वलनाला मर्यादा नाही. या अ-जड वस्तूचे सामर्थ्य मात्र जाणवते. माणसाचा मृत्यु झाल्यावर त्याचा आत्मा घराभोवती घुटमळत असतो, आणि वाटीतील दूध नाहीसे होणे, पीठावर पाऊले उमटणे, क्वचित् प्रसंगी त्याच्या अस्तित्वाचा दृष्टिभ्रम उत्पन्न होणे आणि दहाव्या दिवशी पिंडाला काकस्पर्शाचे वेळेची निरनिराळी दृश्ये अनुभवास येणे, यावरून त्याचे अस्तित्व सिद्ध करता येते. (लेखकाने हे अनुभव घेतलेले आहेत). पण या आत्म्यांची छायाचित्रे मिळणे अशक्य आहे.

आधुनिक संशोधक डॉ. जे. सी व्हार्डन, गार्डनर, प्लाटेनाव हे मान्य करतात की, ज्याप्रमाणे जिवतपणी आत्मा मनाच्या सामर्थ्याने बाह्य वस्तूशी संपर्क साधू शकतो, वस्तूला स्पर्श न करता मनाच्या सामर्थ्याने हलवू शकतो, तोच आत्मा अमर असल्याने शरीर नष्ट झाल्यावरही वरीलप्रमाणे कृति करून दाखवू शकेल, हे तर्कदृष्ट्या सुसंगत आहे. तेव्हा जड शरीराबरोबर आत्मा नष्ट होतो असे म्हणता येणार नाही. भारतीय तत्त्वज्ञानाप्रमाणे अणुरेणूही नष्ट होत नाहीत, फक्त रूपांतरीत होतात, तर सूक्ष्मतम आत्मा नष्ट होणारच नाही. मृत्यूनंतर तो शिल्लक राहतो, हालचाल करु शकतो, वस्तु प्रेरित करू शकतो, पण तो आपला शक्तिव्यय मात्र करीत नाही. (विज्ञानानंद, लोकसत्ता, मुंबई १-१०-६७)

योगसामर्थ्याने मानव आपली इच्छाशक्ति प्रबळ करू शकतो आणि त्यायोगे अचेतन वस्तूमध्ये चैतन्य निर्माण करून त्याची हालचाल करु शकतो. याबाबतीत नुकतेच एक उदाहरण वाचण्यात आले. सौ. नेली मिखाई लोवा नावाची ४० वर्षे वयाची रशियन स्त्री वरीलप्रमाणे प्रयोग सांप्रत करीत असते आणि तिच्या कृतींच्या डॉक्युमेंटरी फिल्मही घेण्यात आलेल्या आहेत या तिच्या प्रयोगाचे वर्णन करताना 'टॉस' वृत्तसंस्था म्हणते की, ज्या वस्तूमध्ये चैतन्य निर्माण करावयाचे असते, त्या वस्तूकडे ती स्त्री काही वेळ टक लावून पहाते आणि नंतरच ती वस्तु हालचाल करू लागते टेबलावर पावाचा तुकडा आहे. त्याकडे पाहिले म्हणजे तो आपोआप हालचाल करून तिच्या मुखात येऊन पडतो. पदार्थाला जशी ती गती देऊ शकते, तशी गतिमान पदार्थ थांबवूही शकते. जमिनीवरील वजने आपोआप तागडीत जाऊन पडू शकतात. पण या प्रयोगा-नंतर तिचा शक्तिपात होतो, ती थकून जाते, थोडेसे वजनही कमी होते, एवढेच नव्हे तर हृदयाच्या स्पंदनाची गतीही वाढते. ही विद्या ती आपल्या मातेपासून शिकली

(नवशक्ती, मुंबई, दि ८-४-१९६८)

योगसामर्थ्याने होत असलेला हा प्रयोग मात्र नवीन नाही. इंदूर येथील नाथमहाराज याप्रमाणे एखाद्या श्रीफळाकडे पाहाताच ते पुढे जाऊ लागे

आणि काही वेळाने परतही आणीत असत. या विद्येतील अभ्यासकाने लेखकाला असेही सांगितले आहे की, सन १९२७ चे सुमारास असे प्रयोग परदेशात प्रथम झालेले आहेत. मनुष्य खुर्चीवर बसलेला आहे आणि त्याला विजेचे बटन दाबून दिवा लावावयाचा आहे, तर यांप्रमाणे बटनाकडे पाहिल्यावर ते आपोआप दाबून दिवा लागला जाई. याचा खुलासा त्याने असा केला की, योगसामर्थ्याने जड देहातील चैतन्य आत्मा या वेळी बाहेर अलग होतो आणि वस्तूची हालचाल करून परत जडदेहात येतो. अशा प्रकारचे सामर्थ्य असणारे योगी भारतामध्ये पूर्वी अनेक होते. आजही क्वचित् ठिकाणी आहेत, पण प्रयोगात जो शक्तीचा ऱ्हास होतो तो पुन्हा भरून येण्यास तपश्चर्या करावी लागत असल्याने हे प्रयोग करणे श्रेयस्कर नाही. सारांश इतकाच की, सौ. नेल्ली मिखाई बाईंचा प्रयोग काही नवीन नाही. भारतीयाना तो पूर्वीच ज्ञात आहे.

## अतिमानवी देवता

देवता आणि मानव यांचेमध्ये एका देवसदृश्य योनी कल्पना केलेली आहे. या योनीमध्ये अनेक संघ आहेत. विद्याधर, अप्सरा, यक्ष, राक्षस, गंधर्व, किन्नर, पिशाच, गुह्यक, सिद्ध, आणि भूत अशी ह्या संघाची नावे आहेत. देवतापेक्षा यांचे शक्तिसामर्थ्य कमी पण मानवापेक्षा मोठे आणि अद्भुत आहे, म्हणून याना अतिमानवी देवता म्हणतात. या संघाचा विशेषगुण असा की, देव आणि मानव या दोघातही आपले संबंध ठेवून त्याचे हिताहित पाहतात. याचे विशेष गुणधर्म वर्णन केलेले आढळतात, ते असे—

(१) याना दैविक आणि मायिक असे उभयविध सामर्थ्य असते.
(२) संघदेव लोकांचे आसपास वावरतात.
(३) विनापंख आकाशात भराऱ्या मारू शकतात.
(४) काही संघ नृत्य, गीत, वाद्य या कलांत प्रवीण असतात.
(५) रूपे पालटून पृथ्वीवर संचार करू शकतात.
(६) रात्रीचा संचार विशेष प्रिय असतो.
(७) औषधी वनस्पतींचे सूक्ष्म ज्ञान असते.
(८) सामान्यतः हे शिवाचे उपासक असतात.
(९) मनात येईल त्या ठिकाणी प्रकट होतात वा अंतर्धान पावतात.
(१०) काही वेळा यातील स्त्री-पुरुषांचा मानवी स्त्रीपुरुषांशी संबंध होऊ शकतो.

## अंतरिक्ष देवता

अंतरिक्ष म्हणजे आकाशाची पोकळी. तेथे राहणारे देव. इंद्र, मित्र, अपानपात, अहिर्बुध्न्य, रुद्र, मरुद्गण, वायु पात, पर्जन्य इ० देवता या वर्गात मोडतात. इंद्र हा देवांचा सेनापति असून शिवाय मेघगर्जनेची देवता आहे. अपानपात् हा जलदेवतेचा पुत्र असून चहूबाजूने पाण्याने घेरलेला आहे. तीन दिव्य स्त्रिया त्याच्यासाठी अन्न धारण करीत असतात मातरिश्वा ही अग्नि उत्पन्न करणारी देवता म्हणून त्याजबरोबर नेहमी संबंधित असते. अहिर्बुध्न्य याचा संबंध गार्हपत्य अग्नीबरोबर दाखविला जातो त्याचा स्वभाव हानिकारक दाखविला असल्याने तो बहुधा अहिवृत्रच असावा. अज एकपाद ही एक वायवीय देवता आहे रुद्रदेवता हा मरुतांचा पिता मानला असल्याने, नेहमी त्याच्या बरोबर संबंध येतो रुद्र म्हणजे रडविणारा अशी शब्दाची व्युत्पत्ति देतात. पर्जन्य ही एक वृष्टिदेवता व वनस्पतींची फलोत्पादक देवता आहे.

## अमूर्त देवता

ज्यांना मूर्तीप्रमाणे कोणतेही दृश्यरूप नाही अशी देवता. ऋग्वेदामध्ये ज्या देवतांची प्रकृति अमूर्त धारणा किंवा अमूर्त भाव याच्यावर आधारित आहे, अशा देवतांचे दोन वर्ग आहेत काम, मन्यु, श्रद्धा, अदिति, दिति या पहिल्या वर्गात मोडतात, तर धातृ, त्वष्ट्र या दुसऱ्या वर्गात मोडतात

## दिव्य देवता

सूर्यमंडळाच्या परिसरात प्रकाशात ज्या देवता आहेत त्यामध्ये द्यौ , वरुण, मित्र, सूर्य, सविता, पूषा, विवस्वान, आदित्यगण, उषा व अश्वी यांचा समावेश होतो शेवटची दोन नावे वगळली, तर बाकीची नावे सूर्यदर्शकच आहेत हे कळून येईल मित्र हे जरी सूर्याचे नाव असले तरी मित्रा-वरुण हे जोडनाव उच्चारले जाते आणि त्यावरून या दोघांचा घनिष्ट संबंध दाखविला जातो सविता हे सूर्याचे नाव, उदय होण्याच्या पूर्वीचे मानले जाते. पूषा ही स्थावर–जंगमाची अधिपति देवता मानली जाते आणि यासाठी संरक्षण व संपत्ति पाहिजे असल्यास या पूषा देवतेची प्रार्थना केली जाते विवस्वान हा यमी, मनू व अश्विन् देवांचा पिता आहे. प्रातःकाळी पूर्वेकडे आकाशाची जी स्थिति दिसते, त्याला उषा म्हणतात.

## परिवार देवता

प्रमुख देवांच्या अनुषंगाने असणाऱ्या आणि त्यांची परिचर्या करणाऱ्या काही लहान देवता असतात, त्यांना परिवार देवता असे म्हणतात. या मुख्य देवतांवर अवलंबून असतात. विष्णु प्रमुख देवता असेल तर आनुषंगाने लक्ष्मी,

भूदेवी, गरुड, विष्वक्सेन आणि विष्णूच्या हातातील आयुधे शंख, चक्र, गदा, पद्म ह्या सर्व परिवार देवता होत. शिव प्रमुख असेल तेथे पार्वती, स्कंद, गणेश, नंदी, चंडेश, वीरभद्र, भैरव, क्षेत्रपाल इ० इ० परिवार देवता होत. देवी प्रमुख असेल तर सप्तमातृका, नवगौरी, योगिनी इ० परिवार देवता होत. सारांश, त्या त्या प्रमुख देवताबरोबर त्याचा जो परिवार असतो त्यांना परिवार देवता म्हणतात.

## पार्थिव देवता

पार्थिव या शब्दाचा अर्थ भूपृष्ठावरील अथवा भूपृष्ठाशी संबंधित असा आहे. यामुळेच शंकराची स्वयंभूलिंगे मातीची बनवून, अथवा गणेशाची मातीची मूर्ति बनवून पूजन केले जाते. पूजन झाल्याबरोबर त्याचे विसर्जन होते. नवीन पूजनास प्रत्येक वेळी नवीन मूर्ति करावी लागते. या प्रकारच्या पूजनाला पार्थिव पूजन म्हणतात.

नद्या, अग्नि, बृहस्पति व सोम यांना पार्थिव देवता म्हटले आहे. परंतु सिंधु, सरस्वती, गंगा, यमुना इ० नद्या पार्थिव असूनही 'पावन' म्हटल्या आहेत. त्यांच्या स्नानाने मानव पावन होतो, म्हणून हे नाव मिळालेले आहे.

## स्त्री देवता

वैदिक वाङ्मयात विशेषत. ऋग्वेदामध्ये स्त्री देवतांची संख्या फारच थोडी आहे. उषा, सरस्वती, रात्री, वाक्, पृश्नी, इला, राका, सिनीवाली, कुहु, सरण्यु, इंद्राणी, सूर्या, वरुणानी, रुद्राणी या देवता होत. काही देवतांवर स्वतंत्र सूक्ते आहेत. आदिशक्तीची स्वरूपे दुर्गा व काली इत्यादींचा येथे समावेश नाही

## युग्म देवता

वैदिक उपासनेतील एक विशेष प्रकार म्हणजे मूळच्या दोन स्वतंत्र देवतांची एक जोडदेवता कल्पून, तिची स्तुती करणे. या प्रकारच्या सुमारे वीस तरी जोड्या वाङ्मयात आहेत आणि त्यासाठी साठ सूक्ते खर्ची पडलेली आहेत जसे मित्रा-वरुण, द्यावा पृथिवी, इंद्रा-मरुत्, इंद्रा नासित्या, सूर्या चंद्रमसा इ० इ० वैदिक कालातील या जोड देवतांमुळे, पुढे पौराणिक कालातही ही प्रथा चालू राहिली आणि नर नारायण, लक्ष्मी नारायण, नंद-यशोदा, वसुदेव देवकी, संकर्षण-वासुदेव इ० नावे रूढ झाली.

## संघदेवता

वैदिक देवतांच्या पसाऱ्यात काही कमी-अधिक प्रमाणात देवतासंघ विशिष्ट देवतांशी संबंधित आहेत. जसे मरुतदेव संघ. यांची संख्या २१ अथवा

१८० देतात. रुद्रगणाची संख्या ११ तर आदित्यसंघ १२ चा आहे. अष्ट वसु, अष्ट दिक्पाळ यांचेही संघ आहेत.

## स्वयंभू देवता

स्वयं म्हणजे आपण होऊन, कोणाच्या साहाय्याशिवाय तयार झालेली भूमीवरील स्थाने अगर मूर्ति असा सर्वसाधारण अर्थ होऊ शकतो. अनेक वेळा बोलणारा म्हणतो की, 'ते स्वयंभू स्थान आहे. स्वयंभू मूर्ति आहे.' याचा नेमका अर्थ कोणता? लेखक लहानपणी पुणेजवळील येरवडा गावी रहात असता टेकाडावर शंकराचे स्वयंभू स्थान पाहिलेले आहे. त्याला पांडवलेणीही म्हणतात. कारण डोंगर पोखरून त्यामध्ये सुमारे ३०×३० असा सभामंडप तयार करून शंकराचे लिंग कोरलेले आहे. याचा अर्थ इतकाच घ्यावयास पाहिजे की, सातव्या-आठव्या शतकात, जेव्हा डोंगरभाग पोखरून शिल्प तयार करण्याचा छंद होता; त्यावेळी हे शिल्प तयार झाले, आणि ध्यान-धारणेसाठी शिवलिंग कोरले गेले, बाहेरून बसविलेले नाही. वणी येथील सप्तशृंगी देवीची भव्य मूर्ति स्वयंभू म्हटली जाते. पण ती काय आपोआप त्या स्वरूपात खडकातून निघालेली नाही. लहानसा गाभारा कोरून, खडकात मूर्तिशिल्प तयार केलेले आहे. अशी कथा सांगितली जाते की, एक धनगर जनावरे चारीत असताना त्याला मोठे मधाचे पोळे दिसले. त्याने काठी खुपसताच आरपार गेली आणि ते अवाढव्य पोळे काढल्यानंर मागे मूर्ति आढळली, म्हणून स्वयंभू झाली. याचा अर्थ इतकाच घ्यावयास पाहिजे की, पूर्वी तेथे मूर्ति कोणी कलाकाराने तयार करून ठेवलेली होती, पण प्रचारात नसल्याने त्यावर पोळे तयार झाले आणि ते काढल्यावर मूर्ति दिसली, तिचे महत्त्व वाढले आणि ती स्वयंभू झाली.

दुसरा प्रकार असा की, पूर्वी देवता या मन्त्रामध्ये होत्या, त्याचे मूर्तिकरण झाले. तेव्हा अनेक क्षेत्री त्या त्या देवतेच्या नावाने पाषाणाचे तांदळे उभारण्यात आले आणि त्यांना देवता मानण्यात आले. महाराष्ट्रात अनेक गावी म्हसोबाच्या मूर्ति याच उंच पाषाणस्वरूपात—कोठे शेंदूरचर्चित असतात—पहाण्यात येतात वास्तविक हे म्हसोबाचे पाषाण म्हणजे भैरवाचे प्रतीक होत. इसवी सनाच्या सुरवातीस अथवा आगेमागे जेव्हा मूर्तिकला अस्तित्वात आली, त्या वेळी कलाकाराच्या कल्पनेप्रमाणे त्यांना नेत्र, तोंड, कान इत्यादि अवयव आकारण्यात आले आणि ती कला वाढीस लागली तशी सुंदर मूर्तींची निर्मिती होऊ लागली. उदाहरणच घ्यावयाचे तर माहूरची रेणुका, अंबेजोगाईची जोगेश्वरी, अमरावती येथील अंबादेवी या तांदळा स्वरूपातच स्वयंभू स्थाने म्हणून ओळखली जातात. पण तेही तांदळे पूर्वी कोणीतरी बसविलेले आहेत, हे निश्चितपणे म्हणावयास पाहिजे.

तिसरा प्रकार असा की, औदुंबर वृक्ष, मांदार, रुई अगर अन्य वृक्ष तोडला, मोडला तर त्याच्या मूळात एखादा भाग भक्ताच्या कल्पनेप्रमाणे मूर्तीचा दिसतो आणि तेच ओबडधोबड स्वरूप स्वयंभू म्हणून पूजनात येते. पुणे शहरी रहात असताना लेखकाने हाही प्रकार पाहिलेला आहे. कसबा पेठेतील गणपतीच्या देवालयासमोर रा. ढेरे हे गणेशभक्त असून त्यांचा स्वत:चा वाडा होता. घरातील औदुंबर वृक्षाचे झाड पडले आणि त्यांना गणेशाची मूर्ति बुंध्यात दिसून आली. त्याचा इतका गवगवा झाला की, प्रत्यही हजारो भक्त हा चमत्कार म्हणून पाहण्यास जात असत. लेखकानेही दर्शन घेतले आहे. कालांतराने हे स्थान नष्ट झाले आहे.

रुईच्या वृक्षमुळातून गणेशाची मूर्ति अनेकांना दृष्टोत्पत्तीस येते. एका वनस्पतिशास्त्रज्ञांना विचारता त्यांनी असा खुलासा केला की, या वृक्षाची मुळे जमिनीमध्ये पसरत नाहीत. अतिशय दाटीत एकाच क्षेत्री गुंडाळून राहतात. यामुळे साहजिकच या वृक्षमुळात गणेशमूर्ति अधिक आढळते. मांदार वृक्षाच्या मुळातून तयार झालेली सुमारे दोन इंच उंचीची गणेशाची मूर्ति लेखकाने एका गणेशभक्ताच्या पूजनात अवलोकन केलेली आहे.

चवथा प्रकार असा की, मूर्ति अस्तित्वात असणे, नंतर तिचे पुनर्दर्शन होणे, अगर स्थापना होणे, यालाही स्वयंभू स्थान म्हणतात. आसाममधील कामाख्या देवीचे स्थान वशिष्ठ ऋषींच्या शापाने गुप्त झाले. पधराव्या-सोळाव्या शतकात विश्वसिंहाने ते पुन्हा नावारूपास आणले म्हणून स्वयंभू झाले. पण विश्वसिंहाच्या पूर्वीही नरकासुराच्या वेळी तेथे देवीचे स्थान होतेच सातारा शहराजवळ चाफळ क्षेत्रीची श्रीरामाची मूर्ति कोणी स्वयंभू म्हणतात, पण समर्थ रामदासांना ती अंगणापूरच्या डोहात दृष्टांताने मिळाली, असेही इतिहास सांगतो. याचा अर्थ इतकाच की परकीय आक्रमणकाली, मूर्तीचे रक्षण व्हावे म्हणून ती डोहात ठेवली होती, तीच समर्थांनी काढली, आणली आणि स्थापन केली

महामहोपाध्याय गोपीनाथजी कविराज, स्वयंभू शब्दाचा अर्थ असा देतात की, ' अव्यक्त सत्तासे जो तेजोमय और ज्योतिर्मय तत्त्व आविर्भूत होता है, वह स्वयं आविर्भूत होता है, इसलिये उसे स्वयंभू कहा जाता है । ' पुरुष आणि प्रकृति ही एक असूनही भिन्नपणा दाखविते, आणि भिन्नता असूनही एक-पणा दिसतो. सांसरिक दृष्टिकोनातून यालाच अव्यक्त म्हणतात. शास्त्राच्या मता-नुसार ही अलिंग अवस्था आहे. यासाठी अव्यक्तामधून तेजोमय तत्त्व आपण होऊन बाहेर पडत असल्याने स्वयंभू शब्दप्रयोग करतात. तनशास्त्रातील मूळ

त्रिकोणालाही स्वयंभू ज्योतिर्लिंग म्हणतात. बायबल अथवा अन्य धर्मग्रंथामध्ये जे अग्नी स्तंभाचे ( Pillar of fire ) वर्णन मिळते, तो या ज्योतिर्लिंगा-प्रमाणेच होय. ( कल्याण, उपासना अंक १९६८, पृ. १८२ )

हनुमानाच्या मूर्ति अनेक खेड्यातून तादळास्वरूपात आढळून येतात. ग्रामरक्षक देवता म्हणून जेव्हा त्याची स्थापना झाली, तेव्हा मूर्तिला अस्तित्वात नसल्याने आणि भक्ताना उपासनेसाठी दैवत पाहिजे असल्याने त्याची स्थापना झालेली आहे. कारण हनुमानचा तादळा, देवीचा तादळा, म्हसोबाचाही तादळा इ० प्रकार पाहिल्यावर या विधानाची सत्यता वाचकाना पटावी असे वाटते. स्वयंभूमूर्ति भक्ताच्या मन.कामना लवकर पुऱ्या करतात अशी त्याची श्रद्धा आहे.

## शकुनवंती देवता

मराठी व जैन वाङ्मयात काव्याचा असा एक प्रकार आहे की, ज्यामध्ये देवीचा सेवक अथवा मुल्या दारोदार नगर गावोगाव हिंडून देवीच्या नावाने शकुनवाणी गात फिरतो. महाराष्ट्रात याला काही वेळा "वासुदेव" असेही नाव आहे. डोक्यावर मोर-पिसाची उंच टोपी, हातात घंटा, लांब झगा असा त्याचा पोषाक असतो. दिवसभरात अथवा नजीकच्या काळात घडणाऱ्या गोष्टी तो कथन करीत असतो. असे मानले जाते की, देवता त्याच्या मुखाने ते भविष्यकथन करीत असते. काही ठिकाणी याना जोगती–जोगतीणी असेही म्हणतात. रेणुका देवीची भक्त असेल, तर रेणुकेची जोगतीण, तुळजाभवानीची असेल, तर आरादीण ( आराधी ) अशी नामाभिधाने आहेत

तुळजाभवानी देवी । बया आरादीण झाली ॥
तुझे दारी जोगतीण आली । जोगवा बाई घाली ॥

जैन वाङ्मयातही हा प्रकार आढळतो जिनसागर याचे कैकी नावाचे काव्य प्रसिद्ध आहे, त्यामध्ये हा प्रकार आढळतो. देवतांना लोक-गायिकेचे स्वरूप घ्यावयास लावलेले आहे. जसे कर्नाटक प्रांती हुंबच गावी पद्मिनी देवीचे स्थान असून, ती पार्श्वनाथावर कृपावंत होती. कैकोचे स्वरूपात ती कलीचे भविष्य कथन करते.

पार्श्वनाथ देव आम्हा । हुंबच माझा गांव ॥
दुरिला माझा देश । पद्मावती माझे नांव ॥
शकुन सांगाया आली दादा । ऐके एक भाव ॥
जुगुलाची सृष्टि दादा । नव्हते गांव ठाव ॥ इ० इ०

स्त्री-पुरुषांच्या अंगात देवताचा संचार होतो आणि भविष्यकथन अथवा संकटकालीच्या प्रश्नाची उत्तरे दिली जातात, यामध्येही देवता मार्गदर्शन करतात. तो प्रकार वरीलपेक्षा निराळा आहे.

( रा. चिं. ढेरे, केसरी, दिपवाळी-अंक १९६७, आधारे. )

कोकण भागात ग्रामदेवताना कौल लावून, अगर प्रसाद म्हणून काही प्रश्नाची उत्तरे देवताकडून घेतात, पण याना शकुनवंती देवता म्हणता येणार नाही. कारण येथे देवता आपण होऊन उत्तर देत नसून प्रश्न विचारल्यानंतर उत्तर येते, तसा प्रकार शकुनवंती देवताच्या बाबतीत घडत नाही. तो शकून स्वयंस्फूर्त असतो.

## देवमूर्ति सरकणे

पेण ( जि. कुलाबा ) या शहरी एका गृहस्थास आलेला स्वानुभव दिनाक १२ डिसेंबर १८८२ साली लो. टिळकानी केसरी पत्रात प्रसिद्ध केला. मजकूर पाठविणाऱ्या गृहस्थाबद्दल त्याना पूर्ण विश्वास होता. पेणपासून १२ मैलावर वरसई गाव असून तेथे मोकाशी नावाचे गृहस्थ रहात होते. त्यांच्या देव्हाऱ्यात भली मोठी जड धातूची बनविलेली बाळकृष्णाची मूर्ति होती. दि. २०-११-८२ चे सुमारास नित्याप्रमाणे पूजेसाठी मूर्ति इतर देवतासह खाली घेतली. स्नान घातल्यानंर वस्त्राने पुसून ठेवल्यावर ती मूर्ति आपोआप पुढे दरवाज्याकडे सरकू लागली. याप्रमाणे दोनतीन वेळा झाले. हा वृत्तांत त्वरित गावात पसरला आणि दुसरे दिवशी अनेक गावकरी उपस्थित राहिले. त्या दिवशीही तोच प्रकार घडला. मूर्ति सरकून पुढे गेली म्हणजे उचलून पुन्हा मागे आणावी, वस्त्राने पुसून जाग्यावर ठेवावी आणि तिने चालू लागावे असे अनेक वेळा घडले. अनेकानी ही सरकण्याची क्रिया पाहिली. याप्रमाणे एकूण तीन दिवस झाले. फलज्योतिर्षांचे म्हणणे असे की, काही अनिष्ट गोष्टी भावी कालात घडणार असल्याची ही पूर्व सूचना होती. ( तसा काही अनिष्ट प्रकार घडल्याची नोंद मात्र उपलब्ध नाही. )

भावी संकटाची चाहूल काही मार्गाने परमेश्वर देत असतो, हे मात्र सत्य आहे. दि. ११-१२-६७. कोयना येथे भयंकर भूकंप होऊन प्राणहानी आणि वित्तहानी झाली. तेथील एक अनुभव प्रसिद्ध झाला आहे. कोयनानगर येथील शासकीय प्रशालेच्या परिसरात एक जातिवंत नागराज दिनांक २७-११-१९६७ पासून डोंगरकड्यावरील एका झुडुपावर मुलाना दर्शन देत असे.[1]

---

१, टीप— भू-गर्भातील हालचालीवरून तो याप्रमाणे अस्वस्थ झालेला असावा.

कधी बिळाच्या बाहेर, तर कधी बिळाच्या मुखाशी अगर झुडुपावर याप्रमाणे अनेकांनी त्याचे दर्शन घेतले आणि तो सर्वांचा कुतुहलाचा विषय बनला. श्री. गाजरे (रेक्टर) यांना वाटले सुद्धा की, हे नागराज एखाद्या भावी संकटाची सूचना तर देत नाहीत ना! आणि शेवटी तेच खरे झाले. भूकंप झाला आणि नागराज दिसावयाचे बंद झाले. (केसरी, दि. २८-१२-१९६७)

भूकंपाच्या काही दिवस आधी वज्रेश्वरी येथील गरम पाण्याचे झरे उफाळून वर आलेले होते. तसेच प्रत्यक्ष कोयनाक्षेत्रां भूकंपाचे धक्के आधी कित्येक दिवस बसत होते. 'साध्याही विषयांत आशय कधी मोठा किती आढळे!' ही कविवर्य केशवसुतांची उक्ति लोक सोयीस्करपणे विसरतात, त्याला कोण काय करणार?

ओघाने आलेच आहे, तर एक स्वानुभवही देतो. २७-७-१९६७ रोजी लेखकाचा वडील मुलगा नेफा आघाडीवर सैन्याच्या तुकड्यांना विमानातून रसद टाकीत असताना, दहा-बारा वर्षांचा अनुभव, स्कॉड्रन लीडरचा हुद्दा असूनही विमानाला अपघात झाला आणि त्याचा इहलोकीचा अवतार संपला. इतरही आठ जण त्याबरोबर गेले.

मुलाचे नाव श्रीनिवास, वय सुमारे ३३ वर्षे; त्याची मंडळी व दोन मुले संदीप आणि जयदीप गोरेगावीच रहात होती. त्या दिवशी सकाळी आठ वाजता त्याचा मोठा मुलगा संदीप, वय अडीच वर्षे, अंथरुणातून ओरडतच उठला, 'पपा, तुम्ही विमान घेऊन कोठे चालला! एकटे जाऊ नका. मला बरोबर न्या. मी तुमच्या बरोबर येतो. एकटे जाऊ नका इ० इ०" सुमारे अर्धा तासपर्यंत त्याचा हा धोशा सारखा चालला होता. आणि...आणि काय, सुमारे ८-४५ च्या सुमारास विमान खाली कोसळले.

'प्राणी मात्राच्या अंगी काही वेळेला भविष्यकाळी घडणाऱ्या घटनांची आधीच जाणीव होण्याची विलक्षण शक्ति असते' असे अनेक संशोधनानंतर लंडन येथील इव्हिनिंग स्टँडर्ड या पत्राचे विज्ञानभागाचे संपादक श्री. पीटर फेअरले यांनी मत दिले आहे. इंग्लंडमध्ये स्टॉकपोर्ट आणि सायप्रस बेटांत झालेल्या भयंकर विमानअपघातांची आगाऊ इतिवृत्ते दोन दिवस उपलब्ध होती असे त्यांना आढळून आले आहे. तसेच वेल्समध्ये आबरफॅन या स्थळी प्रचंड स्फोट होऊन अपघातामध्ये ११६ मुले आणि १८ मोठी माणसे भूमीमध्ये गाडली गेली. तेव्हा प्रसिद्ध मानसशास्त्रज्ञ डॉ. जे. सी. बार्कर यांनी पूर्ण चौकशीअंती असे प्रसिद्ध केले की, (मेडिकल न्यूज) 'असल्या प्रचंड अपघाताचा काहींना काही प्रतिसाद, त्यानंतरच्या काळावर जसा उमटला, तसा तो अपघाताच्या पूर्वकाळी

एक मुलगी आणि दोन मित्र, त्यामध्ये जे मरण पावले, त्याच्या वागणुकीवर तो उमटला होता, हे कबूल करावे लागते.' (लंडन वृत्त, केसरी १०-७-१९६७)

प्रथम खंडात बगलामुखी देवीचा वृत्तांत देताना अशा अथर्वशक्तीचा थोडाफार ऊहापोह केलेला आहे. सारांश, देवतांच्या हालचाली, नागराजाच्या हालचाली, वरीलप्रमाणे लहान मुलाची वर्तणूक आणि पाश्चात्य लेखकाचे अनुभव या सर्वांचा साकल्याने विचार केला तर परमेश्वर भावी संकटाचा शकून मानवाला देतो. पण सर्वसाधारणपणे या हालचाली क्षुल्लक समजून अगर आपल्या ज्ञानाच्या अहंकाराने तिकडे दुर्लक्ष केल्याने परिणाम टाळता येत नाहीत. अगर असेही म्हणता येईल की, या हालचाली गूढ असल्याने मानव त्याकडे दुर्लक्ष करतो आणि त्याला जबर किंमत परमेश्वराजवळ मोजावी लागते. ज्या वेळी मानव परमेश्वरशक्तीच्या या हालचालीकडे श्रद्धापूर्वक पाहील तो सुदिन समजला पाहिजे.

## संस्कृत आणि प्राकृत देव

मानव समाजामध्ये जे उच्च-नीच थर आहेत, त्यामध्ये सामान्यतः निरनिराळ्या देवतांचे पूजन होते व त्यावरूनही देवतांची वर्गवारी अस्तित्वात आली असावी. विष्णु, ब्रह्मा, वरुण, यम, राम, कृष्ण, गणेश इ० देवतांचे पूजन साधारणतः वरच्या थरातील समाजात होते. आपण असेही म्हणू शकतो की, हा समाज बहुधा संस्कृत जाणणारा होता. यास्तव या देवतांना 'संस्कृत देव' असे नामाभिधान प्राप्त झाले असावे. बहिरोबा, वेताळ, म्हसोबा, खंडोबा, सटवाई, मरीआई, भावकाई नवलाई इ० ग्रामदेवतांचे पूजन समाजातील असंस्कृत थर करीत असतो. तो समाज फक्त प्राकृत भाषाच जाणतो. यास्तव त्याच्या देवांना 'प्राकृत देव' हे नामाभिधान आले असावे. बहिरोबा, म्हसोबासारखे प्राकृत देव हे गावरासारख्या संस्कृत देवांचेच अवतार मानले जातात. संस्कृत देवतांचे स्वरूप जरा नीटस व रेखीव असते, तर दुसऱ्या प्रकारात ते ओबडधोबड असते. या दुसऱ्या स्वरूपासंबंधी इतिहाससंशोधक राजवाडे असे कारण देतात की, 'पुरातन काळी प्राकृत देव ज्या समाजात अस्तित्वात आले, त्यांना त्याहून जास्त कौशल्याची मूर्तिकला अवगत नसावी. समजा, ती असली तरी स्वयंभू ओबड-धोबड मूर्तीपुढे कृत्रिम सुंदर रेखीव मूर्तींची किंमत त्यांना वाटत नसावी. अनेक ठिकाणी स्वयंभू मूर्तीचा मान आजही जास्त आढळतो.'

(राजवाडे, लेखसंग्रह, पृ. २२)

भौतिक सृष्टीच्या पलीकडे अधिदैविकांचा भर असून, त्यामध्ये ज्योतिर्मय व ज्ञानमय प्रचंड शक्ति आहेत आणि त्यांनाच देव मानलेले आहेत. त्याच दिव्यशक्ति, अतींद्रिय, अधिदैविक व स्थूल चराचर विश्वाचे नियमन करतात.

ही स्थिति आधुनिक विज्ञान संशोधक डॉ. जयंत नारळीकरसारखेही मान्य करतात. यासंबंधी समर्थ रामदास लिहितात.

देवदेवता दैवते भूते । मिथ्या म्हणो नये त्याते ।
आपापल्या सामर्थे । सृष्टिमध्ये विहरती ॥
जगज्जोतिच्या अनंत मूर्ती । उदकाचे तुषारा परी वाढती ।
सदा विचरती वायो स्वरूपे । स्वइच्छा पालटिती रूपें ॥१९-१०॥
(दासबोध, दशक १०, समास ३)

वायूरूपाने विहार करणे अगर स्वरूपे पालटणे, हा राक्षसांचाही स्वभावधर्म होता. अभिमन्यु विवाहाच्या वेळी, घटोत्कचाने वत्सलेचे रूप घेतले, अगर श्रीकृष्णवधासाठी राक्षसानी कायापालट केला, असे आपण पाहतो. तरी त्याना देवता मानलेले नाही हे ध्यानात ठेवले पाहिजे.

## देवपत्न्या

देवाप्रमाणे काही देवपत्न्याही प्रसिद्ध आहेत. यज्ञकर्मांत त्यानाही पतीबरोबर हविर्भाग मिळतो. काही वेळा स्वतंत्रपणेही त्याची उपासना केली जाते. इंद्राणी, अग्नायी, सूर्या, स्वाहा, संज्ञा इ० इ० देवपत्न्याना उद्देशून वैदिक ऋषींनी प्रार्थना केली आहे.

'देवांच्या उत्कंठित पत्न्या आमचा धावा ऐकोत, आमच्या संततीच्या हितार्थ आणि आम्हाला सात्विक सामर्थ्य प्राप्त व्हावे म्हणून त्या आमचा सांभाळ करोत. भूमीवर अथवा जलामध्ये ज्या आहेत, त्यानी आमची हाक ऐकून आम्हाला सुख देवोत.' (ऋ. ५-४६-७).

सरस्वती, लक्ष्मी आणि पार्वती या अनुक्रमे ब्रह्मा, विष्णु व शिव यांच्या पत्न्या असून पौराणिक युगातही त्यांना स्वतंत्र अशी प्रतिष्ठा प्राप्त झालेली आहे. तत्त्वज्ञानी पुरुषांच्या विचारमंथनाने अनेक देवाचे देवपण हरपले आहे. सांप्रत ज्याना आपण क्षुद्र देवता मानतो त्या एके वेळी विलक्षण अधिकार गाजवीत होत्या. अशिक्षित वन्य जमातींवर आजही त्यांचे प्रभुत्व आहे. माणसाच्या गरजा वाढल्या म्हणजे देवतांची शर्तीही वाढीला लागते, हे वैदिक आर्यांनी विरोधक शक्तींचा मोड करताना आणि आपल्या वसाहती वाढविताना अनेक देवता उत्पन्न केल्या यावरून दिसून येते. समाजात सांस्कृतिक बदल होऊन मानवाची कर्तव्ये बदलली म्हणजे देवतांची कर्तव्येही बदलतात. छत्रपति शिवाजीप्रमाणे एखाद्या व्यक्तीला राजकीय ऊर्जिता-ऊर्जितावस्था आली म्हणजे प्रतापगड भवानीची श्रेष्ठता वाढते, पण त्याची गरज संपली म्हणजे पुन्हा अज्ञातवास पदरी येतो.

## ग्रामविस्तार आणि देवालये

विष्णुपुराणावरील टीकेत श्रीधरस्वामींनी नगर कशाला म्हणावे यावर भृगु ऋषींचा एक श्लोक दिला आहे, त्याचा भावार्थ असा—

'व्यापार-उदीमात निपुण अशा चारही वर्णांच्या लोकांनी युक्त, अनेक प्रकारचे प्रासाद व मंदिरे इ० शिल्पांनी युक्त आणि जेथे अनेक देवस्थाने आहेत त्याला नगर म्हणावे.'

ग्रामाचा विस्तार होऊन बनलेली नगरे हा एक प्रकार होय. प्रत्येक गावात एखादे लहानमोठे मंदिर असतेच. त्यातील काही देवालयाचे अगर देवतेचे महत्त्व पुराणात वर्णन केलेले असते. यामुळे हजारो भक्तगण देवाच्या दर्शनाला जात असतात आणि वाढत्या राबत्यामुळे ते पुण्यक्षेत्र बनते. त्याचा परिणाम तेथील व्यापारवृद्धीवर होतो. उद्योग वाढतात आणि वस्ती वाढते. एखाद्या शिक्षणकेंद्रामुळे गावाचा विस्तार होऊन त्याचे नगरात रुपांतर होते. चंदीगडसारखी चांगली राजधानी पाहिजे म्हणून नगर वसाहत होते. खडकवासला सैनिक शिक्षणकेंद्रामुळे नगराचा विस्तार होतो. अशा ठिकाणीही मंदिराची वाढ होत असते.

## देवस्थाने

रामायणाच्या अरण्यकांडात अगस्ती ऋषींच्या आश्रमाचे वर्णन करताना तेथे ब्रह्मा, विष्णु, रुद्र यांची स्थाने होती असे वर्णिले आहे (१२–१७–२१). ह्यावरून असे दिसते की, त्या काळी गावाच्या बाहेर देवतांच्या नावाने काही जागा राखून ठेवीत. हर्षचरित्रात चंडिकाकुंज, चामुंडामंडप अशी काही नावे आढळतात, त्यावरून वरील विधानांना पुष्टीच मिळते. आजही अनेक खेडेगावांतून झाडांच्या राईमध्ये देवस्थाने आढळतात, अगर अशा वृक्षसमूहात निशाणरोपणी आढळते. शेंडे हे देवतांचेच प्रतीक होत.

देव जेथे स्वयंभू असतो अथवा मूर्ति बसविलेली असते ते देवस्थान होय. देवस्थान आणि देवमंदिर यांमध्ये फरक आहे. देवस्थान हे प्राचीन असून मंदिर हे नंतरचे आहे. प्राथमिक अवस्थेत ज्या ठिकाणी मानवांनी वसाहत केली, त्या गावी संरक्षक देवतांची स्थापना गावाबाहेर सीमेवर केली. प्राचीन मानवाचे हे देव एखाद्या वृक्षातळी अगर गावाबाहेर मोकळ्या जागी असत. सांप्रतही एखाद्या खेडेगावी गावाबाहेर चहूबाजूंनी पाषाणांनी वेष्टिलेले एखादे देवस्थान दिसते. या पाषाणरचनेला कोकणभागी गडगा म्हणतात. उदाहरणच घ्यावयाचे झाले तर पुणे शहराची आजची रचना आणि विस्तार भव्य आहे.

शहराची ग्रामदेवता ही गावाच्या मध्यभागी आहे पण पुणे शहराचा जो इतिहास उपलब्ध आहे, त्यावरून असे निश्चितपणे म्हणता येते की, सहाव्या शतकात पुणे हे दहा बारा झोपड्यांचे गाव होते आणि त्या झोपड्या नदीकाठी वसलेल्या होत्या झोपड्यांच्या दक्षिणभागी सुमारे एक मैलावर त्या वेळी जोगेश्वरी ही ग्रामदेवता उघड्यावर होती सागूनही ही परिस्थिति खरी वाटण्यासारखी नाही, पण वरील देवस्थान या विधानाला ही गोष्ट पोषक आहे

## मंदिराची आवश्यकता का ?

परमेश्वर जर अणुरेणूमध्ये सर्वत्र भरलेला आहे असे आपले शास्त्र सांगते, तर मग मंदिराची, प्रार्थनास्थळाची अथवा मशिदीची आवश्यकताच का भासावी ? त्याची उभारणी करण्याची जरूरी काय ? असा प्रश्न मनात येण्याची शक्यता आहे यासंबधी स्वामी विवेकानंद यांचे उत्तर असे देतात की, ज्या ठिकाणी अनेक मानव ईश्वरासंबंधीच्या आपल्या सद्भावना व शुद्ध विचार व्यक्त करीत असतात, ती जागा शुभ तन्मात्रांनी भरून गेलेली असते पूर्वकाली ज्या वेळी राहण्याचे वाडे भव्य असत, त्या वेळी एक खास खोली देवघर म्हणून वापरली जात असे शुचिर्भूत होऊन त्या ठिकाणी पूजन भजन व सर्वांनी आरती केल्यावर, घरातील माणसाच्या मनातील भावना एका उच्च थरावर जात असत यास्तव अशा उच्च वातावरणानी भरून गेलेली विशेष प्रकारची जागा इतराहून निराळी असावी, एक विचाराच्या माणसांनी एकत्र येऊन सुविचार ऐकावे, चर्चा करावी, प्रभूचे दर्शन घेऊन, मनातील बरे वाईट विचार प्रभुचरणी अर्पण करून रिकाम्या मनाने घरी परतता यावे, अशी कल्पना मानवाच्या मनात उत्पन्न झाली असावी आणि हेच मंदिर निर्मितीचे कारण असावे असंख्य माणसे एका मूर्ती पुढे बसून मन एकाग्र करू लागली, की सैरावैरा पळणारे मन त्या ठिकाणी स्थिर होते सामुदायिक, शांततेने होत असलेल्या प्रार्थनेच्या वेळी, प्रत्येकाला हा अनुभव आल्याविना रहात नाही इस्लामी समाज ईदच्या सणाच्या दिवशी मशीद अथवा मोठमोठया मैदानावर जमून जेव्हा एकत्र व अत्यंत शांततेने प्रार्थना करतो, तेव्हा ते दृश्य खरोखर विलोभनीय असते ईसाई प्रार्थना मंदिरातील प्रत्येक रविवारची प्रार्थना हेच दर्शविते यावरून हे समजून यावे की, सामुदायिक प्रार्थना, अगर परमेश्वरविषयक कथांचे श्रवण करण्यासाठी व शुभ तन्मात्रांनी ही जागा भरून टाकण्यासाठी मंदिराची उभारणी झालेली आहे

अशा पवित्र ठिकाणी शांत चित्ताने जर मूर्तीचे ध्यान केले, तर भक्ताचे अंतःकरण आनंदाने बेहोष झाल्याविना राहणार नाही, असे पातंजल योगदर्शन, अध्याय २६ मध्ये सांगितले आहे ज्ञानेश्वर महाराज लिहितात,

> आणि दीपें कां सूर्यें प्रकटे । अथवा निमुटलिया देखावेचि खुंटे ।
> तैसे दिठी नव्हे जे वैकुंठे । दिधली आहे ॥ २३४ ॥

इंग्रज ग्रंथकार पॉल ब्रंटन, "ए सर्च इन् सिक्रेट इंडिया" (पृ. १५) यात अनुभवाचे वर्णन करताना म्हणतो, 'I doze my eyes tightly in an effort to rest the matter. There is no difference and I still see him quite plainly.' रात्रीच्या वेळी एका अंधेऱ्या खोलीत चिंतन करीत असता, कुंभकोणम् पीठाचे शंकराचार्य हे तेजःपुंज सगुणसाकार त्याच्यापुढे प्रकट झाले. त्याने डोळे मिटून घेतले, तरी मूर्ति समोर दिसतच होती, त्याला उद्देशून वरील उद्गार काढलेले आहेत. ( मंदिराची कथा व व्यथा, ले. पालकर, पृ. १२ )

## देवतांचा उत्कर्ष-अपकर्ष

एक जर्मन इतिहास-संशोधक आपल्या पुस्तकात (A Study of History, Vol. I ) म्हणतो, की बॅबीलोन व हिटाईट या संस्कृति जरी सुमेरिअन संस्कृतीतून उगम पावल्या असल्या तरी देवताच्या आविष्कारात फरक पडलेला दिसून येतो. सुमेरिअन देवतांना जरी दीर्घकाल उत्कर्ष लाभलेला असला, तरी वरील दोन संस्कृतींच्या उगमानंतर त्यामध्ये बरीच तफावत पडलेली दिसून येते. तामुज व इष्टर ही सुमेरिअन संस्कृतींची प्रधान जोडी, परंतु हिटाईट संस्कृतींमध्ये इस्टरचा वरचष्मा होतो आणि तामुज हा एक आश्रित व प्रियकर बनतो. परंतु ही जोडी जेव्हा खाली इजिप्त व सीरिया या भागात येते, तेव्हा तामुजचा वरचष्मा होतो आणि इस्टरचा मान कमी होतो. ( पृ. ४४९ ).

यावरून असे अनुमान काढाता येते की, देवतानाही उत्कर्ष-अपकर्ष आहे. देवता म्हटली, की सर्वच दिवस त्याना दिवाळीचे असतात असे समजण्याचे कारण नाही. संस्कृतीपरत्वे, देशपरत्वे अथवा पूजकपरत्वे देवतांच्या जीवनकालात चढउतार होत असतो. या ग्रंथात अशा तऱ्हेची अनेक उदाहरणे पाहण्यात येतील. चितोडची कालिका अथवा एकलिंगजी यांचे महत्त्व रजपूत राजवटीत जेवढे होते, तेवढे सांप्रत राहिलेच नाही. झाशी येथे राणी लक्ष्मीच्या काळी जे भाग्य तेथील महालक्ष्मीला लाभले ते इंग्रजानी झाशी घेतल्यावर नष्ट झाले. अशोक, कनिष्क, राजवटीत जे भाग्य नानादेवी अगर इतराना लाभले, त्याचे आज नावही ऐकू येत नाही. फार कशाला, छत्रपति शिवाजीने प्रतापगडावर अष्टभुजादेवीची स्थापना केल्यावर तिला जे वैभव लाभले त्याचा आज मागमूसही नाही भक्तानी बांधलेली हजारो मंदिरे, आज दैन्यावस्थेत आहेत. जीर्णोद्धाराची वाट पाहात आहेत, अगर अंतकाळची वाट पहात आहेत. दूरवर विचार केला तर मानवी जीवन व देवता जीवन यांमध्ये बरेच साधर्म्य आढळते ते असे.

## मंदिरवाढीची कारणे

भारतामध्ये आणि अन्य देशी मंदिराची सतत वाढ होत गेलेली आहे. देवतांचे दर्शन सुलभ व्हावे असा जरी सर्वसाधारण हेतु मंदिर उभारण्यात असला, तरी त्यामध्ये उभारणारांचा कोणताही स्वार्थ नसतो असे म्हणता येणार नाही. (१) दानशूरत्व प्रकट करण्यासाठी, (२) नवस फेडण्यासाठी, (३) शत्रूला पराभूत केल्यावर विजयोत्सव साजरा करण्यासाठी, (४) जीर्णोद्धार करण्यासाठी, (५) शैव, बौद्ध, जैन याच्यामधील चढाओढ दर्शविण्यासाठी, (६) योगी पुरुष व इतरांना झालेला दृष्टान्त कृतीत उतरण्यासाठी, (७) हातून घडलेल्या पापक्षालनासाठी, (८) स्मारके उभारण्यासाठी, (९) ग्रामरक्षणासाठी इ० इ० अनेक प्रकारांनी मंदिराची वाढ झालेली आहे आणि होत आहे.

या प्रकारातील काही उदाहरणे वरील अनुक्रमाने पहा.

(१) अहिल्याबाई होळकर आणि सांप्रत बिर्ला शेटजींची मंदिरे.

(२) पेशवाईमध्ये राघोबाचा काटा काढण्यासाठी, बारभाईंनी नवस केल्याप्रमाणे १ लक्ष ३४ हजार रुपये खर्च करून बांधलेले मंदिर.

(३) विजयनगरच्या कृष्णदेवरायाने विजयानंतर अनेक मंदिरे उभारली. मारवाडचे राजे जसवंतसिंग यांनी मुसलमानांचा पराभव केल्यावर, त्या क्षेत्री ह्या संस्कृतीने मंदिरे पाडून मशिदी उभारल्या होत्या. त्या भुईसपाट करून पुन्हा मंदिरे उभारली. ब्रह्मी सरकारने स्वातंत्र्यप्राप्तीनंतर कोट्यावधी रुपये खर्च करून, कबा-ए-पॅगोडा, हे भगवान् बुद्धाचे मंदिर उभारले. भारतामध्ये सरदार वल्लभभाई पटेल यांनीही सोमनाथाचे मंदिर बनविले.

(४) जुन्या मंदिरांचा जीर्णोद्धार करून, त्या ठिकाणी नावाच्या पाट्या लावून, अनेकजण आपले औदार्य प्रकट करीत असतात.

(५) वेरूळ, अहिहोळ, बदामी या ठिकाणी चढाओढीमुळे अनेक शिल्पाकृति व मंदिरे तयार झालेली पाहण्यात येतात.

(६) झांशी राज्याचा प्रधान श्री. ज्योतिबुवा महाभागवत याने पांडुरंगाने दिलेल्या दृष्टान्ताप्रमाणे, एकूण १५०० क्षेत्री पांडुरंगाच्या मूर्तींची स्थापना केली. ब्रह्मानंद स्वामींनीसुद्धा अनेक देवालये उभारली.

(७) दक्षिण प्रांती जखनाचार्य यांच्या हातून एका ब्रह्महत्येचे पातक घडले, त्याच्या निवारणार्थ त्याने अनेक मंदिरे उभारली.

( ८ ) शंकराची अनेक मंदिरे म्हणजे त्या त्या पुरुषाची स्मारकेच होत. रामेश्वर, लक्ष्मणेश्वर, प्रणनेश्वर ही नावे तेच सुचवितात.

( ९ ) ग्रामाचे रक्षण करण्यासाठी अनेक देवताची स्थापना केली जाते.

अखिल विश्वात आजपर्यंत अनेक सस्कृति निर्माण झाल्या आणि बहुतेकाचा लय झालेला आहे अर्नोल्ड टॉयन्बी हा जर्मन इतिहाससंशोधक म्हणतो की, आजवर सुमारे २८ ते ३० सस्कृति निर्माण झाल्या आणि चार दोनच त्यापैकी शिल्लक आहेत भारतीय सनातन सस्कृति सर्वात जुनी असून ती आजही प्रगतिपथावर आहे याचे कारणही उघड आहे जैन, बौद्ध, सुफी इ० अनेक पथाचे तत्त्वज्ञान सनातन धर्माने आपल्यामध्ये सामावून टाकले व त्याचा प्रचार निष्प्रभ करून टाकला. या सामावण्यामुळे सनातनधर्मवृक्ष फोफावतच राहिलेला आहे.

या सूत्राचे आपण एक उदाहरण पाहू. तुकाराम महाराजाच्या आधी महाराष्ट्रात सुफी पथीय साधूचे सचलन फार मोठ्या प्रमाणात होते. इतके कशाला, तुकाराम महाराजाचे जे गुरु राघवचैतन्य-केशवचैतन्य होते, ते स्वत एका सुफी पथीय साधूचे शिष्य होते, असे म्हणतात यासाठी तुकाराम महाराजानी दूरदर्शीने हेरले की, त्या पंथाचे तत्त्वज्ञानच सनातन धर्मात सामावल्याविना त्याचे महत्त्व कमी होणार नाही.

सुफी पथाची अनेक तत्त्वे शरीअत, तरीक्त, मारिकत और हकीकत या चार पद्धतीमध्ये सागितलेली आहेत सलात ( प्रार्थना ), जकात ( दान ), सौम ( उपवास ), हज ( तीर्थयात्रा ), तौबा ( अनुताप ) सब्र ( सतोष ), रिजाअ ( दमन ), तवक्कुल ( परमेश्वरी कृपेवर पूर्ण निष्ठा ), रजा ( परमेश्वरी सकेत पाळणे ) इ० इ० अनेक निदानानी सागितलेली आहेत. जहद–स्वेच्छा–साधना शीघ्र फलदायी व्हावी असे वाटत असल्यास सदा दारिद्र्य असावे, गरिबाबरोबर तादात्म्य पावणे व गरजा कमी करणे

सब्र–सतोष—जे मिळेल, जेव्हा मिळेल, जैसे मिळेल त्याचा प्रसन्न चित्ताने परमेश्वराचा प्रसाद म्हणून स्वीकार करण, कुरकुर न करणे.

शुक्र—परमेश्वराच्या चरणी नेहमी कृतज्ञता व्यक्त करणे.

रिजा—सुख–दु ख, हर्ष–शोकामध्ये समानता पाळणे. ज्या स्थितीत परमेश्वर ठेवील त्यामध्ये सुख मानणे.

इश्क—प्रेम तत्त्वावर फारच भर दिलेला आहे. 'इश्क बनाता है। इश्क जलाता है। दुनियामे जो कुछ है। इश्कका जल्वा है। आग इश्ककी है। हवा इश्ककी बेचैनी है। मौत इश्ककी बेहोशी है। रात इश्ककी नीद है। दिन इश्कका जागना है।' इ० इ०

वरील आचारविचारानी मन शुद्ध झाले म्हणजे काय होते—

दिलके आईनेमे है तस्वीरे यारे।
जब जरा गर्दन झुकायी देख ली॥

हीच विचारधारा तुकाराम महाराजानी प्रत्यक्ष आपल्या आचरणात आणून गाथेच्या सदेशातून जनताजनार्दनाला दिली भारतीय उपासनेमध्ये हीच तत्त्वे निरनिराळ्या वेळी, निरनिराळ्या प्रकारानी सांगितलेली आहेत तुकाराम महाराजाच्या प्रत्यक्ष आचरणाने सुफी पथाकडील ओढा विठ्ठलाकडे वळला, त्या पथाचे महत्त्व कमी झाले, सनातन धर्म फोफावला.

रशियन प्रदेशात सांप्रतच्या नव्या संस्कृतीचा उगम होण्यापूर्वी ४६००० प्रार्थनामंदिरे आणि ५०००० धर्मोपदेशक होते पण नवीन राजवटीत सन १९३५ च्या सुमारास त्यामध्ये भयकर घट होऊन ती सख्या अनुक्रमे ४ व ५ हजारांपर्यंत खाली आली. कालाची गती 'चक्रनेमिक्रमेण' नेहमी चालूच असते त्यामध्ये कोठेही कायमपणा नाही लोकाच्या धार्मिक भावना पुन्हा उफाळून वर आल्या आणि सन १९५६ च्या सुमारास प्रार्थनामंदिरे २०००० आणि धर्मोपदेशक सख्या ३५००० पर्यंत वाढली. यासबधी माजी मुख्य प्रधान क्रुश्चेव्ह म्हणतात, 'कितीतरी चांगले आणि कट्टर धार्मिक प्रवृत्तीचे लोक, हे उत्तम व कट्टर असे रशियन देशभक्त आहेत '

(Inside Russia Today, by John Gunther, P 267)

## देवालय शिल्पातील प्रगति

देवस्थान हे भगवताचे केवळ निवासस्थान नसून, त्याचे शरीर आहे. अग्नि पुराणात वर्णन आहे—

एवमेष हरि साक्षात् प्रासादत्वेन संस्थित ।

साक्षात् हरीच प्रासादरूपाने अवस्थित आहे असे समजावे. हीच कल्पना पुढे वाढवून अग्निपुराण वर्णन करते की, 'देवालयाचे शिखर हे शिर, गर्भगृह हा गळा, मडप ही कूस, प्राकार हा मांड्या, गोपूर हा पाय आणि ध्वज हे शरीरातील जीवन होय.'

मंदिर शिल्पशास्त्रात देवालयाच्या सामान्यतः तीन पद्धति सांगितल्या आहेत. नागर, द्रविड आणि वेसर ह्या पद्धति होत. सुप्रभेदागम ग्रंथात या तीन प्रकाराचे वर्णन आहे. ते असे.

नागरं चतुरस्रं च अष्टास्रं द्रविडं तथा । वृत्तं च वेसरम्...... ।

याचे स्पष्टीकरण थोडक्यात सारांशरूपाने पाहणे योग्य होईल.

### नागरशैली

कौटिल्याने आपल्या अर्थशास्त्रात, नगरनिर्मितीसाठी देवालयाचा विचार मांडला असून, कोणत्या देवाचे मंदिर, गावाचे कोणत्या दिशेला असावे तेही सांगितले आहे. देवालयाची रचना नगरनिर्मितीच्या दृष्टीने झाली असल्याने, नागर-शैली हे नाव प्राप्त झाले असावे. कालिकागमात या शैलीचे आठ विभाग सांगितलेले आहेत. ( १ ) मूल–पाया; ( २ ) मसुरक–चौथरा; ( ३ ) जंघा–भिंत; ( ४ ) कपोत–सरळ चार भाग; ( ५ ) गल–छप्पर आणि भिंत यांच्यामधील भाग; ( ६ ) शिखर; ( ७ ) आमलक–राय आवळ्याच्या आकाराचा भाग; ( ८ ) कुंभ–कळस अगर शूल. सनपूर्व सहावे शतक अथवा त्याच्याही पूर्वी नागर मंदिराची निर्मिती झालेली होती. या शैलीचा विस्तार हिमालयापासून दक्षिणेकडे विंध्यपर्वतापर्यंत झालेला दिसून येतो. पण केंद्रस्थान म्हणून मध्यप्रदेशाकडे बोट दाखविता येईल. पूर्व बाजूला बंगाल, ओरिसापर्यंत याचा विस्तार होता. अर्थात केंद्रापासून जसजशी रचना दूर दूर गेली, तसतसे पर्वतीय, लाट, कलिंग असे पोटभेद निर्माण झाले. याची बांधणी साधारणपणे पुढील प्रकारची आढळते.

नेहमीप्रमाणे गर्भगृहात मुख्य देवता. आणि त्यापुढे एक प्रमुख लंब-चौकोनी सभामंडप असतो. गर्भगृह आणि मंडप एका चिंचोळ्या पट्टीने जोडलेला असतो, त्याला अंतराळ म्हणतात मंडपाच्या पुढील भागी अर्धमंडप, यामध्ये बाहेरून प्रथम प्रवेश करून नंतर सभामंडपातून गर्भगृहात जायचे असते. गर्भगृह वरच्या भागी निमुळते होत जाऊन त्यावर उंच शिखर असते देवळाच्या सभोवार उत्तम प्रशस्त प्रांगण असून, मुख्य मंदिराव्यतिरिक्त चार कोपऱ्यांवर छोटी मंदिरे परिवारदेवतेची असतात. मुख्य शिखराशिवाय अन्य भागावरही लहान लहान शिखरे असतात पण ती कमी उंचीची असतात.

काश्मिरी शैली—दिसण्यात ही गॉथिक शैलीप्रमाणे आहे. गॉथिक शैली म्हणजे उत्तर युरोप देशातून आलेली स्थापत्य शास्त्रातील शैली होय. दगडी भिंती, दगडी खांब, दगडी अर्धवतुळाकृति किंवा त्रिकोणी कमानी. दगडी छप्पर व

दगडाचाच घुमट हे या शैलीचे वैशिष्ट्य सांगता येईल मध्ययुगात काश्मीरमध्ये जी मंदिरे निर्माण झाली, त्यांचे स्तंभ हेलेनिक व छप्पर पिरॅमिडप्रमाणे असत. तेथील प्रख्यात मार्तंड मंदिर याचे हे उदाहरण होय हे मंदिर आठव्या शतकात बांधले गेले असे म्हणतात

गुप्त शैली— गुप्तकालापासून ( ५ वे ६ वे शतक ) या नगरशैलीत थोडी प्रगति करण्यात येऊन, मंदिराच्या सांवावर नक्षीकाम, स्तंभशीर्षावर प्राण्यांचे मुखवटे, प्रवेशद्वारावर पुराणातील काही महत्त्वाच्या प्रसंगाचे चित्रण, सपाट छप्परे असे याचे वैशिष्ट्य सांगता येईल. झाशीजवळ देवगड नावाचे गाव आहे त्या ठिकाणी ६ वे शतकातील एक देवालय ( वैद्यनाथ ) आहे हे अतिशय कलापूर्ण असून मंदिरशिल्पातील प्रगति दर्शविणारे आहे. वैशिष्ट्य असे की, वीटकाम भक्कम राहण्यासाठी त्यामध्ये लोखंडी शिगा वापरलेल्या आहेत गर्भगृहावर कलापूर्ण कळस असून, मंदिराभोवती आच्छादित असा प्रदक्षिणामार्ग आहे उत्तर भारतातील या शैलीची मंदिरे काशीविश्वनाथाच्या मंदिरासह भुईसपाट केली गेली असून सांप्रतची उभारणी नवीन पद्धतीची आहे. फक्त गया येथील बुद्ध मंदिर या सर्व अपघातातून वाचले असून ६ व्या शतकातील तेवढीच कलाकृति शाबूत आहे. त्यावरील कळस मात्र मागाहून दाक्षिणात्य शैलीचा तयार झालेला असावा.

ओडिसा संप्रदाय

कलिंग नामक शैलीची भरभराट सन १० ते १३ व्या शतकात झाली. या संप्रदायाची महत्त्वाची मंदिरे म्हणजे भुवनेश्वर शहराच्या परिसरातील लिंगराज मंदिर, जगन्नाथ मंदिर, कोणार्क येथील सूर्य मंदिर इ० होत लिंगराज मंदिर हे कलापूर्ण असून भोवती जाड व उंच दीर्घवर्तुळाकृति तट आहे याचे प्राकारात सुमारे ७० लहान लहान मंदिरे दाटीवाटीने बांधलेली आहेत या संप्रदायातील मंदिराना एकापुढे एक अशी चार दालने असून पहिले अर्पणगृह, दुसरे नृत्यशाळा, तिसरे प्रार्थनागृह आणि चौथे गर्भगृह होय याना अनुक्रमाने भोगमंदिर, नाट्यमंदिर, जगमोहन व देऊळ म्हणतात देऊळ अगर गाभारा यावर उंच शिखर असते बाकीच्या तीन दालनावरही लहान लहान शिखरे असतात, पण त्यांची बांधणी व उंची मुख्य शिखरापेक्षा कमी कमी असते या संप्रदायात मंदिराच्या बाह्यांगावर कोरीव नक्षीची विपुलता असते, पण अंतर्भाग साधा असतो मोठमोठ्या मंदिरातही खांब नसून, छत सांधेल्यावर, लोखंडी तुळयांच्या आधारे असते जगन्नाथ पुरी व कोणार्क येथील बाह्यांगावर स्त्री पुरुष संभोगाच्या मूर्ति कोरलेल्या आहेत आणि त्यासाठी ती स्थाने प्रसिद्ध आहेत

## बुंदेलखंडी शैली

१० व्या व ११ व्या शतकातील चंदेल राजवंशाच्या वेळी बुंदेलखंडात या शैलीचा उदय झाला. खजुरहो येथे जी अनेक मंदिरे त्यावेळी बांधण्यात आली आणि आजही जी यात्रिकाची मने आकर्षून घेतात, ती याच प्रकारची आहेत. ओडिसापेक्षाही ही शैली निराळी भासते. या सर्व समूहात कंदरिया महादेवाचे मंदिर उत्कृष्ट मानले जाते. त्याला अर्धमंडप, मंडप व महामंडप अशी सलग तीन दालने आहेत. या ठिकाणी आतील बाजूस छतावर चारी बाजूच्या भितीवर, खांबावर आणि गाभाऱ्याच्या दरवाज्यावर सुंदर मूर्ति कोरलेल्या आहेत. प्रवेशद्वार तोरणालंकृत आहे. शिखराची बांधणी उत्तर भारतीय पद्धतीची आहे, म्हणजे मंदिराच्या मंडपाना व सभोवारच्या ओवऱ्यानाही शिखरे आहेत. ती एकाहून एक उंच अशा चढत्या श्रेणीची आहेत. शिकार, नृत्ये, उत्सव, पूजा, युद्धे, रतिक्रीडा इ० अनेकविध दृश्ये येथे साकार केलेली दिसतात, यावरून मूर्तिकारानी सामान्य माणसाचे जीवन व त्याला पूज्य असलेल्या देवता यांचेच दर्शन घडविले आहे. नाजूकपणा व सजीवपणा यामध्ये येथील मूर्ति ओडिसापेक्षा सरस वाटतात. येथील बरीच मंदिरे पंचायतन शैलीची म्हणजे मुख्य मंदिराभोवती चार कोपऱ्यात चार उपमंदिरे बांधणीची होती. पण उपमंदिरे आता नष्ट झालेली दिसतात.

## गुजराथ–राजस्तान शैली

या प्रदेशात चालुक्य व सोळंकी शासनाच्या वेळी अनेक मंदिरे उभारली गेली. बांधणीत मुख्य गाभारा व सभागृह अशी दोनच दालने असतात, तर शिखर-रचना खजुरहो पद्धतीची होती. दालनावरील छताना घुमटाचा आकार दिलेला दिसतो, कदाचित मुसलमान वर्चस्वाचा तो परिणाम असावा. या मंदिराचा पाया कोनाकृति असून थोडासा खांबाच्या बाहेर आलेला दिसतो. सभामंडपाचे खांब ठेंगणे, त्यावर छप्पर असून मुख्य मंदिर व खांब यावर सुंदर चित्रकार असते. ती चित्रे जीवनातील सर्व क्षेत्रातील व नवरसपूर्ण असतात. अलंकृत व विविध प्रकारची तोरणे हे या शैलीचे वैशिष्ट्य होय. ही तोरणे सभामंडपाच्या पुढील भागी असतात. मोढेरा येथील सूर्यमंदिर आणि सिद्धपूर येथील रुद्रमहालय ही त्याची उदाहरणे दाखविता येतील. सिद्धपूर येथे अकरा रुद्राची मंदिरे ओळीने बांधलेली होती. ती तीन माळ्याची असून पुढे भव्य सभामंडप होते. पण मुसलमानी आक्रमणात तीन वेळा त्याची नासधूस झाल्याने सांप्रत काही भागच उभा आहे आणि तो भव्यतेची कल्पना देण्यास पुरेसा आहे. अबु पहाडावरील दिलवारा मंदिरे याच सांप्रदायाची संगमरवरी पाषाणाची असून कलाकुसरीच्या

दृष्टीने उत्कृष्ट आहेत. मंदिरातील-तोरणे, खांबावरील शिल्पाची परमावधी झाली असून ह्या नाजुक मूर्तीवर दृष्टि खिळून राहते. ओडिसाप्रमाणे येथे बाह्यांग नक्षीदार नसून अंतरंग नक्षीदार आहे आणि बाह्यांग साधे आहे. यात हा मोठा फरक आहे.

## द्रविड शैली

द्रविड देशात विकसित झालेल्या मंदिर-शैलीला हे नाव प्राप्त झालेले आहे. या मंदिराचा खालचा भाग चौकोनी असून, शिखराजवळ अष्टकोनी अथवा बहुकोनी असतो. या पद्धतीत चार प्रमुख अंगे आहेत —

( १ ) गोपूर—प्रवेशद्वारावर उभारलेले उत्तुंग अनेक मजली शिल्प. याचे शिखर हे कळसाप्रमाणे नसून, बैलाच्या डोक्याप्रमाणे रुंद व शृंगयुक्त असते. काही गोपुरे शिखराकारही आहेत.

( २ ) मंडप—प्रवेशद्वारातून आत गेल्यावर देवाकडे जाण्याच्या मार्गात उभारलेले स्तंभयुक्त शिल्प. यामध्ये पुष्कळ स्तंभ असून, ते कोरीव कामाने अलंकृत असतात.

( ३ ) विमान—ज्यामध्ये मुख्यदेवमूर्ति असते तो गाभारा व शिखर मिळून मुख्य देवालय होते. त्याला विमान म्हणतात.

( ४ ) छत्र्या अगर घुमटया असलेल्या स्तंभयुक्त वेदिका— गाभाऱ्यावरील शिखराची बांधणी अशी असते की, मूळची लांबी, रुंदी व उंची क्रमाक्रमाने कमी होत जाऊन ते निमुळते बनते. गाभारा व शिखराचे मजले यांच्यामधील चारही बाजूचा भाग थोडाथोडा बाहेर आणून त्याला गोल आकार दिलेला असतो. त्यावर चैत्य–गवाक्ष धर्तीचे खोदकाम असते. प्राकाराला विशिष्ट अंतराने घातलेले व भिंतीच्या थोडेसे बाहेर आलेले असे खांब असतात. याशिवाय देवालयाच्या प्राकारात तळी, विहिरी व यात्रेकरूंसाठी धर्मशाळा असतात. या सर्व गोष्टी द्रविड शैलीत ठळकपणे नजरेत भरतात. सातव्या शतकामध्ये दक्षिणेत पल्लवाचे शासन सुरू झाले. त्या वेळेपासून १६ वे शतकापर्यंत या शैलीत सारखी प्रगतीच होत गेली. नरसिंह वर्मा याने एकसंध खडकातून मंदिरे खोदून काढण्याची कृति अस्तित्वात आणली. या मंदिराना रथ असे म्हणतात. मद्रासपासून ३२ मैलावरील ममाल्लपुरण येथे या प्रकारची देवालये पहावयास मिळतात. या रथाच्या गाभाऱ्याचा आकार चौरस व वरती गोलाकृति घुमट असतो. मराठवाड्यात वेरुळ येथील जगविख्यात कैलास लेणेही द्रविड शैलीचे आहे. तंजाऊर येथील बृहदीश्वर हे मंदिर भव्यपणात सर्वांत श्रेष्ठ आहे त्याचा विस्तार ७५० × २५० चौ. फूट असून, गोपुराची उंची ३१० फूट आहे.

## वेसर शैली

विंध्य पर्वतापासून दक्षिणेकडे कृष्णा नदीपर्यंत ही शैली प्रचलित असल्याचे म्हटलेले आहे. या शैलीतील देवालये वर्तुळाकृति किंवा लंबवर्तुळाकृति असतात. अती प्राचीन काळी तामिळनाड व केरळ भागात या पद्धतीची मंदिरे होती, असे म्हणतात. आजही केरळात या प्रकारची काही देवालये आढळतात. या शैलीचा विकास नागर आणि द्रविड यांच्या नंतर झाल्याने, दोहोंच्या मिश्रणातून ही निर्मित झाली असल्याने काही वेळा याला मिश्रक असेही नाव आहे. ही शैली आणि चालुक्य शैली एकच होत, असे काहींचे मत आहे. बाराव्या शतकापासून कर्नाटक भागात ही शैली जास्त प्रगत झाली. असे म्हणतात की, ८ व्या शतकात ऐहिहोळ व पट्टदकल या ठिकाणी नागर आणि द्रविड शैलीची मंदिरे जवळजवळ असल्याने, दोन्ही शैलींची देवाण-घेवाण होऊन ही शैली निर्माण झाली. या शैलींत विमान आणि मंडप असे दोनच भाग असतात. विमानाचे शिखर चौरस असून क्रमाने निमुळते होत जाणाऱ्या एकावर एक मजल्यांनी चढत गेलेले असते. शेवटी त्यावर कळस असतो. मंडप अनेक स्तंभावर आधारित असून त्यावर सपाट छप्पर असते. या शैलींत द्रविड शैलीपेक्षा खालील गोष्टी भिन्न आहेत.

( १ ) मंडपाच्या पुढे दुसरा एक मोकळा मंडप असणे.

( २ ) प्रदक्षिणा-मार्गाच्या भिंतींत आतल्या बाजूने ओवऱ्या नसणे.

( ३ ) मंडपाची लांबी रुंदी गाभाऱ्याच्या लांबी-रुंदीपेक्षा मोठी असणे.

( ४ ) भिंतीची रचना नागरशैलीप्रमाणे रथाकार करून द्रविड शैलीप्रमाणे मधून मधून त्यात स्तंभ उभे करणे.

( ५ ) मंदिराची रचना बहुकोनी अथवा ताराकृति जोत्यावर असणे.

दंभोळ येथे जे दोड्डबसप्पाचे मंदिर आहे, त्याचा पाया व वरचे सर्व बांधकाम ताराकृति आहे. गाभारा २४ पाकळ्यांचा तर मंडप ३२ पाकळ्यांचा आहे. मंदिरातील स्तंभही ताराकृति बैठकीवरच उभे केलेले आहेत. याचा आणखी एक विशेष म्हणजे मध्यभागी मंडप व त्याला लागून दोन किंवा चार मंदिरे बांधणे हा होय. या आकृतीला मंदिर-संकुल म्हणतात. या संकुलावरही शिखराचे चित्ताकर्षक दृश्य असते. मंदिराचे खांब जणू चाकावर घासून काढलेत असे अत्यंत गुळगुळीत व झिलाईदार असल्याने, मंदिरात कमी प्रकाश असला, तरी त्याच्या चकाकीमुळे जास्त प्रकाशित दिसतो. या शैलींत भारतीय शिल्पकलेतील नानाविध अलंकृति व मानवी शोभनाकृति यांचा मनोहर संगम झालेला आढळून येतो. आंध्रप्रांतातील कुक्कनूर येथील मंदिर, धारवाड-

जवळील लक्कुंडी येथील जैन मंदिर, कर्नाटकातील इट्टगी येथील महादेवाचे मंदिर इ० इ० या शैलीची उदाहरणे म्हणून दाखविता येतील.

होयसळ शैली

द्वारसमुद्र येथे राज्य करणाऱ्या होयसळवंशीय शासनाच्या वेळी ही पद्धत अमलात आली, म्हणून होयसळ नावे ही प्रसिद्ध झाली आहे. या शैलीतील मंदिरे ताराकृति असून २४ पा.न ३२ पर्यंत कोन आढळून येतात. या शैलीत मंडपाभोवती त्याला जोडून अनेक लहान लहान मंदिरे उभारलेली असतात. याचा आणखी विशेष म्हणजे मंदिराची पायापासून शिखरापर्यंतची उभारणी एकसारखी असते. पायाची उची ९–१० फूट असून पायाशी समांतर अशा अनेक पट्ट्यात केलेली असते. या पट्ट्यावर हत्ती, घोडे, पक्षी, कीर्तिमुखे व पानफुलांची चित्र-विचित्र गुंफण यांची मालिका असते. हे कोरीव काम फारच अप्रतिम असते. गाभाऱ्याच्या भिंतींना मध्याजवळ मोठमोठ्या रुंद पागोळ्या ठेवलेल्या असतात. मंदिरातील सर्वच भिंती पुराणातील निरनिराळ्या प्रसंगाच्या देखाव्यांनी भरून टाकलेल्या असतात. या चित्रातून मधूनमधून स्त्रीच्या सौंदर्यमूर्ति बसविलेल्या असतात, त्यांना मदनिका म्हणतात. बेलूर येथील चेन्नकेशवाच्या मंदिरातील मदनिका अधिक सुरेख व ठळक आहेत. मंदिराची शिखरे द्रविड पद्धतीची असून कळस घुमटाप्रमाणे असतो. या मंदिरातून शिल्पकलेपेक्षा मूर्तिकाराचे कौशल्य अधिक उठून दिसते.

बाराव्या शतकात हळेबीड या ठिकाणी होयसळेश्वराचे मंदिर बांधले गेले. ती या शैलीची परमोत्कृष्ट निर्मिती मानली जाते. मंदिराचे जोते भव्य व उंच असून, त्याच्यावर एकावर एक असे नऊ पट्टे आहेत. प्रत्येक पट्ट्याची एकूण लांबी ७०० फूट आहे. सर्वांत खाली हत्तींची रांग कोरलेली असून, त्यांची शरीरे आणि भाव यामध्ये कमालीची विविधता आहे. उत्तर द्वारापासून बाह्य भिंतीवरील चित्रांची सुरुवात भैरवगण, पिशाच्चनायक, समुद्रमंथन, शुक्राचार्य, उमा-महेश्वर इ० व्यक्तींनी व प्रसंगांनी झालेली असून, कृष्णचरित्र, महाभारत कथा, रामायणातील प्रसंग रेखाटलेले आहेत. यातील प्रत्येक आकृति तासून, कोरून, घोटून तयार केली असल्याने, असे काम इतरत्र पाहण्यास मिळणे दुर्लभ आहे. या राजवटीत म्हैसूर प्रांतीही या शैलीची अनेक मंदिरे बांधली गेलेली आहेत. त्यापैकी चेन्नकेशव आणि सोमनाथपूर ही महत्त्वाची आहेत.

विजयनगर शैली

होयसळ शैलीचे वळण कायम ठेवून पुनश्च द्रविड शैलीबरोबर संयोग साधण्याची ही पद्धत विजयनगर शासनाच्या वेळी निर्माण झाली, वास्तव ती त्या

नावाने प्रसिद्ध आहे. हंपी येथील विठ्ठल मंदिर आणि हजाराराम मंदिर ही त्याची उत्कृष्ट उदाहरणे दाखविता येतात. विठ्ठलस्वामींच्या मंदिराची प्रदक्षिणा चौकोनी असून, गाभाऱ्यापेक्षा खोल आहे. प्रदक्षिणामार्ग धरून गाभाऱ्याचे शिखर बांधले आहे. शिखराच्या मुळात वेलपत्तीचे अलंकरण खोदले आहे. शिल्पशास्त्रात याला उपायन असे म्हणतात. शिखरमध्याला कुमुदम म्हणतात, तर वरच्या भागाला कंठम म्हणतात. शिखरावर नृत्य करणाऱ्या गणिका व अन्य काही सामाजिक चित्रे कोरलेली आहेत. शिखराच्या वरच्या भागी पालथी कमळाकृति आहे. या मंदिराला सभामंडप आणि अर्धमंडप दोन्हीही आहेत. अर्धमंडपाच्या दोन्ही बाजूंना प्रवेशद्वारे आहेत. महामंडपाच्या खांबाची रचना विचित्र आहे. खांबावरचे शिल्प म्हणजे राक्षसाच्या पाठीवर स्वार झालेली मनुष्याकृति खोदलेली आहे. महामंडपाच्या समोर एक विशाल रथ दगडातून कोरून काढलेला आहे. त्याची दगडी चाके अशा प्रकारे बनविलेली आहेत की, अल्पशा प्रयत्नाने ती फिरविता येतात. हजाराराम मंदिराची बांधणी वरीलप्रमाणेच बहुधा आहे. पण त्याचे खांब गोलाकार असून कोरीवकाम आहे. या मंदिराचे वैशिष्ट्य म्हणजे त्याच्या दगडाच्या भिंतींत रामचरित्र कोरलेले आहे. या शैलीची मंदिरे कुंभकोणम्, कांची, ताडपत्री, श्रीरंगम इ० शहरी पाहावयास सापडतात. श्रीरंगम येथील शिल्प सर्वांत आश्चर्यकारक आहे. म्हणजे तेथे गाभाऱ्यापर्यंत पोहोचण्यास एकाच दिशेने सहा द्वारातून जावे लागते. प्रत्येक द्वारावर गोपूर असून त्यांचे स्तंभ लढणाऱ्या घोड्याच्या आकृतींचे आहेत. ताडपत्री येथील मंदिर हिरव्या गडद पाषाणांनी बनविलेले आहे.

या शैलीतील होयसळ वळण आणि द्रविडी वळण कोणते, याचा नेटका सारांश असा की,

(१) होयसळ वळण—मंदिराच्या बाजूला अर्धगोलाकृति कमानी, कपोताच्या रांगा, मुखमंडपाचा अभाव, मंदिराबाहेरचा चौथरा, चौकोनी खांबाच्या पायथ्याशी व कोनाड्यात जडविलेले सालंकृत हत्ती, घोडे, सिंह इ० पशु; दुहेरी छप्पर, पायऱ्यापायऱ्यांनी निमुळते होत गेलेले शिखर व त्याचा उठावदार दर्शनी भाग इ० इ०.

(२) द्रविडी वळण—वाटोळी प्रदक्षिणा, तिमजली शिखर, धातूचा कळस, नवरंग, मंडपाचे भव्य खांब आणि कुरुंदी दगडाचा वापर इ० इ०. या शैलीतील मंदिरे बाहेरील भागी होयसळ आणि आतील भागी द्रविडी शैलीने अलंकृत असतात.

## नायक शैली

विजयनगर शैलीतून थोडे निराळे वळण घेऊन निर्माण झालेली ही शैली होय. मदुरा शहरावर नायक घराण्याचे शासन असताना त्यांनी पुरस्कारित शैली म्हणून हे नाव आले. मीनाक्षी मंदिर हे त्याचे उदाहरण होय. होयसळ शैली-प्रमाणे हे जोड-मंदिर आहे. एक मीनाक्षी व दुसरे सुंदरेश्वराचे. ८५० X ७२५ चौ. फूट असा याचा विस्तार असून प्राकाराला चार दरवाजे आहेत. त्यावर चार उत्तुंग गोपुरे आहेत. पुदुमंडप नावाचा भव्य मंडप आहे. याशिवाय अर्धमंडप, नृत्यमंडप आहेत. या सर्व मंडपाचे खांब आपादमस्तक कोरीव शिल्पाने भरलेले आहेत. एका खांबावर नायक राजकुलातील पुरुषाच्या पूर्णाकृति आहेत. भारतीय शिल्पी कारागिरांनी, आपले सारे चातुर्य या ठिकाणी एकत्रित केलेले आहे, असे म्हटले पाहिजे.

## हेमाडपंती शैली

विंध्य पर्वताच्या दक्षिणेस मंदिरबांधणीचा आणखी एक प्रकार आढळतो, त्याला हेमाडपंती बांधणी म्हणतात. या बांधणीचा विशेष असा की, देवालयाचे पाषाणाचे चिरे त्रिकोण, चौकोन, षट्कोन, वर्तुळ, अर्धवर्तुळ इ० आकारात घडवून ते एकमेकात इतक्या कुशलतेने बसविलेले असतात की, त्यामुळे इमारतीच्या प्रत्येक अवयवाला दुसऱ्या अवयवाचा आधार मिळून वरचे छतही निर्धोक राहू शकते. हे अवयव एकमेकास चिकटून राहण्यासाठी माती, चुना किंवा सिमेंट-सारखा पदार्थ वापरावा लागत नाही. या प्रकारची मंदिरे १३–१४ व्या शतकात बांधली गेली. हेमाद्रि अथवा हेमाडपंत याने या पद्धतीचा पुरस्कार केल्यावरून ही शैली प्रचारात आली. देवगिरीच्या महादेवरायाच्या पदरी हा पुरुष अधिकारी होता.

या पद्धतीत चौकोनी गाभारा, सभामंडपाला अनेक अलंकृत खांब, खांबावर आणि छतावर पौराणिक प्रसंगाची कोरीव चित्रे, दर्शन-भागी भोगमंडप, कोनयुक्त भिंती, सर्व बांधकाम काळ्या पाषाणाचे, पूर्वाभिमुख देवालय आणि काही ठिकाणी कमानी काढून सभामंडपाला आधार दिलेला दिसतो. गाभाऱ्याच्या प्रवेशदरवाज्यावर वरच्या बाजूला देवीची मूर्ति तर खालच्या भागी कपालधारी शिवमूर्ति कोरलेली असते. नाशिक जिल्ह्यातील सिन्नर गावी गोंडेश्वर, चितळेश्वर, नागेश्वर, विठ्ठलेश्वर अशी हेमाडपंती शिल्पे आहेत. विदर्भात शिरपूर, अमदापूर, मेहेकर, सातगाव, लोणार या गावी ही मंदिरे उभी आहेत.

## द्वारपाल

देवालयाच्या द्वारात उभे राहून त्या वास्तूचे रक्षण करणारे ते द्वारपाल होत. ते देवसादृश्य योनीतील आहेत मोठ्या देवस्थानात आणि लेण्यातील मुख्य प्रवेशद्वारी दोन्ही बाजूंना यांच्या मूर्ति उभ्या असतात. यांना जय–विजय, चंड–प्रचंड, हरभद्र–सुभद्र, चंड–महाचंड, पद्मपाणी वज्रपाणी अशी नावे आहेत त्यांच्या मूर्ति निरनिराळ्या प्रकारच्या असतात. हिंगुळादेवीचे द्वारपाल म्हणून दोन उंच डोंगरशिखरेच आहेत

( १ ) उजवा पाय स्वस्तिकावर ताठ, डावा पाय कुंचित म्हणजे वाकलेला आणि हात कमरेच्या खालच्या भागी किंचित् वाकून विसावलेले. काही ठिकाणी आपल्या हातांनी गोपुराला आधार देत असलेले दिसतात

( २ ) शिल्प संग्रहात द्वारपालाचे मूर्तिध्यान दिले आहे, ते असे द्विभुज, गदाधारी, चेहरा कुरूप, दात पुढे आलेले, क्वचित चतुर्भुजही असतात. शिव अथवा विष्णु–ज्या देवतेचे ते द्वारपाल असतात, त्या देवताची आयुधे ते धारण करतात. देवीचे मंदिरात द्वारपालाऐवजी द्वारपालिका असतात. शिव–देवस्थानचे द्वारपाल व्याघ्रचर्म पांघरून आणि हाती त्रिशूल घेऊन उभे केलेले असावेत असे ब्रह्मांडपुराण म्हणते ( ३–३२–१२ ).

( ३ ) हळेबीड व बेलूर येथील द्वारपाल सर्वांगसुंदर आहेत ते नखशिखांत अलंकृत आहेत नवरत्नांच्या हारांची जाळी नेसून व मस्तकी किरीट घालून ते द्वाररक्षणासाठी उभे आहेत. कमानदार किरीटाची सुटी टोके खाली कर्णकुंडलांना भिडली आहेत. हे सर्व कोरीव काम अतिबारीक, सूक्ष्म आणि नाजूक आहे ते चतुर्भुज असून त्रित्येकाचे भाली तृतीय नेत्र आहे म्हणून ते शिवगणापैकी मानतात त्यांची उंची मानवप्रमाणे आहे. या सर्व वैभवामुळे प्रत्यक्ष ते देवच भासतात

( ४ ) श्रीविद्यार्णवतंत्रात पद्मा, भारती, दुर्गा, द्वारश्री, विश्वकल्प आणि वाम या द्वारदेवता सांगितल्या आहेत. तंत्रशास्त्राचे निष्पन्न योगावलीत तालिका, कुंची, कपाटा व पटधारिणी या चार द्वारदेवता दिलेल्या आहेत.

## मंदिर–शिखरे का ?

मंदिरावर शिखर, कळस, गोपूर यांची आवश्यकता काय ? असा प्रश्न मनात उत्पन्न होणे साहजिक आहे. याबाबत विद्वान् संशोधकामध्ये मतभेद आहेत काहींच्या मते प्राचीन गुहा मंदिरे ( हिमालयात वैष्णवी देवी, महाराष्ट्रात सप्तशृंगी ) ही पर्वताच्या कुशीमध्ये निर्माण झाली असल्याने, पर्वताचे शिखर

आपोआपच शोभून दिसत असे आणि या शिखरावरून मंदिरक्षेत्राची कल्पना लोकांना फार अंतरावरूनही येत होती काहींच्या मते विष्णु अगर इतर देवता यांच्या मस्तकावर किरीट ज्याप्रमाणे शोभून दिसतो, अगर रथाचा छायेसाठी उभारलेला गोलाकार भाग शोभा देतो, तद्वत् देवस्थानचे माथ्यावर शिखर शोभून दिसेल वरील प्रकारच्या कल्पनांतून शिखर बांधण्याची कल्पना दृढमूळ झाली असावी असे म्हणतात श्री, जयपूरजवळच्या वैराट गावी अशा प्रकारच्या मंदिराचे अवशेष आढळून आले आहेत त्या बांधकामात लाकूड व विटा वापरलेल्या आहेत गोलाकार मंडपाचे अवशेष दिसतात पण पुढील काळात या प्रकारची बांधणी बंद पडली बौद्ध इसाइ मंदिरानाही शिखरे असतात

## देवमूर्तीची पिठिका ( बैठक )

गाभाऱ्यात ज्या बैठकीवर देवतामूर्तीची स्थापना करतात, त्याला पिठिका असे म्हणतात आसन अगर बैठक असेही म्हणतात शास्त्रार्थ असा की, या पिठिकेचे एकूण सोळा भाग करावेत एक भाग जमिनीत पुरावा, चार भागांची जगती करावी, त्यावरील एक भाग वर्तुळाकार करावा त्यानंतरच्या तीन भागांनी गळा बनवावा आणि तीन भागांनी गळपट्टी करावी, दोन भागांनी त्यावरची रुंद पट्टी आणि दोन भागांनी सर्वांत वरची पट्टी करावी अभिषेक व स्नानाचे पाणी वाहून जाण्यासाठी लहानशी पन्हळी ठेवावी पिठिका फार उंच अथवा फार ठेंगणी असू नये याचे प्रमाण साधारणतः असे की, गाभाऱ्याच्या दरवाज्याची जेवढी उंची असेल त्याच्या तीनअष्टमांश उंचीची पिठिका असावी पिठिकेचे हे सामान्य लक्षण समजावे ( मत्स्य पुराण, अ २६१ )

## देव प्रतिमा

देवालयात स्थापन करण्याची देवप्रतिमा सुवर्ण, रूपे, तांबे, पंचरस धातु, पाषाण अगर लाकूड यांची असावी गाभाऱ्याच्या दरवाज्याची जेवढी उंची असेल त्याच्या एकचतुर्थांश मूर्तीची उंची असावी मुख्य प्रतिमेच्या मागेपुढे तिच्या परिवारदेवतांच्या मूर्ति असाव्यात प्रतिमेची सर्व आयुधे तिच्या हाती असावीत त्याशिवाय आणखी काही खास लक्षणे असल्यास तीही तिच्या अंगी असावी मूर्ति अति पुष्ट अथवा अति कृश ही असू नये शास्त्रात वर्णन केल्याप्रमाणे संपूर्ण अवयवांची, सुबुद्ध अशी प्रतिमा बसविल्याने, यजमानाचे आयुष्य व वैभव वाढते ( मत्स्य पुराण, अ २५७ )

## देव मूर्तीचे प्रमाण

क्रियेच्या गतीचे नियमित प्रमाण ज्याच्या योगाने दाखविले जाते, त्याला ताल असे म्हणतात ( अमरकोश ) कोणत्या मूर्ति किती ताल असाव्यात याचे

प्रमाण वैखानसागमम्, शिल्परत्न इ० ग्रंथामध्ये उत्तमदशताल, मध्यमदशताल, अधमदशताल, नवताल, अष्टताल, समताल या प्रकारांतील मूर्तींचे वर्णन ह्या ग्रंथात दिलेले आहे. कोणत्या मूर्ति किती ताल उंचीच्या असाव्यात याचेही नियम बांधून दिले आहेत. ब्रह्मा, विष्णु व महेश यांच्या मूर्ति उत्तमदशताल, इंद्र-सूर्य-चंद्र व लोकपाल यांच्या मूर्ति अधमदशताल, उमा, सरस्वती, श्री यांच्या मध्यमदशताल, कुबेर नवग्रह, व इतर देवता यांच्या नवार्धताल; राक्षस, असुर यांच्या नवताल व मानवांच्या अष्टताल असाव्यात, असे सांगितले आहे. मत्स्य पुराणात यासंबंधीचा श्लोक आहे. त्याचा भावार्थ असा की, 'मूर्तींची अंगुली हेच प्रमाण धरून तिचे मुख १२ अंगुले ( = १ ताल ) असावे. मुखाची उंची हे प्रमाण धरून मूर्तीचे इतर अवयव घडवावेत.' ( २६८-१९ ). मूर्तीची उंची जेव्हा मुखाच्या उंचीच्या दसपट असते, तेव्हा तिला दशताल मूर्ति म्हणतात. हाताचा अंगुठा आणि मधले बोट ताणून धरले असता जे अंतर होते, त्यालाही ताल असे म्हणतात. मापाचे हेच प्रमाण मानणे अधिक संयुक्तिक दिसते. ( हिंदु शिल्पशास्त्रकोश )

बारा अंगुले म्हणजे एक ताल होतो आणि मूर्तींची उंची मोजण्यासाठी हे प्रमाण वापरतात. प्रतिमालक्षण नामक ग्रंथात याचा उल्लेख नाही. पण नंतरच्या ग्रंथात आहे.

## देवमूर्ति प्रतिष्ठापना

देवालयात, मठात अथवा अन्य जागी देवमूर्तीची अथवा लिंगाची कायम स्थापना करावयाच्या विधीला देवमूर्ति प्रतिष्ठापना असे म्हणतात. या प्रतिष्ठेचे संपूर्ण विधान निर्णयसिंधूमध्ये सांगितलेले आहे. मंडप, कुंड, वेदी कशी तयार करावी, पूर्वरात्री प्राथमिक पूजेनंतर मूर्तीला जलाधिवास कसा द्यावा, दुसरे दिवशी मूर्तीचा मंगलस्नानविधि, अभिषेक, अलंकार, नैवेद्य, आवाहन, आसन, पूर्णाहुति झाल्यावर मंचकावर आसन देतात. दुसरे दिवशी स्नान घालून पिंडिकेश्वर स्थापना, पूजा, पक्वान्नाचा नैवेद्य, हवन, बलिदान, प्रदक्षिणा, आचार्य दक्षिणा आणि ब्राह्मणभोजन, भक्तमंडळींना प्रसाद इ० विधि शास्त्रामध्ये दिलेला आहे. विधिपूर्वक स्थापनेमुळे मूर्तीमध्ये देवत्व प्राप्त होते.

## देवपूजेचा इतिहास

पूजा या अर्थी शब्द वैदिक आर्यांना माहीत नसावा, म्हणून तो त्यांनी द्रविडी संस्कृतीमधून घेतला. वैदिक आर्य देवता प्रसन्न करून घेण्यासाठी अग्नीमध्ये समिधा, घृत, यव, पुरोडाश यांचे हवन करीत व पशुयागही करीत. पूजा ही द्रविडांची देवार्चन पद्धति आर्यांनी स्वीकारली आणि पुराणकारांनी पूजेचे महात्म्य व तपशील खूप वाढविला. बौद्धांच्या उत्कर्षकालात यज्ञयागाचे महत्त्व

कमी कमी झाले आणि त्यांची जागा देवपूजने घेतली ती यज्ञयागापेक्षा सुलभ आणि कलापूर्ण असल्याने त्याकडे जनता लवकर आकृष्ट झाली त्रैवर्णिकानाच नव्हे, तर स्त्री शुद्रादि सर्वांना पूजेचा हक्क मिळाल्याने तिचा प्रसार लवकर झाला. स्मृतिकाळात तर देवपूजा हे प्रत्येक गृहस्थाचे निहित कर्मच मानले गेले मनु व याज्ञवल्क्य यांनी देवपूजेला आश्रमधर्मात स्थान दिले मरीची स्मृतिकाराने असा नियम घालून दिला की सकाळचा होम झाल्यावर गृहस्थाने देवपूजा करावी, देवपूजेसाठी दैवताचे मूर्तिकरण झाल्यावर पूजनाचे दोन भाग झाले, वैयक्तिक व सामुदायिक वैयक्तिक पूजेसाठी घरात मूर्तिस्थापना झाली आणि सामुदायिक पूजनासाठी देवकुले, देवगृहे अथवा देवालये निर्माण झाली देवालयातील मूर्ति घरातील मूर्तीपेक्षा आकाराने मोठया होऊन कायमची प्रतिष्ठा मिळू लागली पारशी समाजात फक्त अग्नीचा पूजा करतात त्या ठिकाणी हा अग्नि ठेवतात, त्यास 'अग्यारी' म्हणतात हेच पारशी लोकांचे मंदिर होय इस्लामी समाज 'निराग' म्हणजे ज्योतिरूप अग्नीचे पूजन मशिदीसारख्या प्रार्थना मंदिरात करतात

प्रतिकोपासना

प्रतिमाचे लक्षण देताना 'सदृश शिल्पम्' म्हणजे कोणत्याही वस्तूचे प्रतिरूप तयार करणे होय गजाच्या सदृश्य प्रतिमा म्हणजे हत्तीची प्रतिमा होय पण निराकार स्वरूपाची प्रतिमा बनविताना ती 'गुण क्रियानुसारेण क्रियते रूपकल्पना' याप्रमाणे बनविली जाते विष्णु नेहमी शांत स्वभावाचा म्हणून त्याचे ध्यान शांतरूप असते [६०]

प्रतिकाची उपासना हे मंदिर संस्थेचे एक वैशिष्ट्य मानावे लागेल पण येथे लक्षात ठेवले पाहिजे की, प्रतिकाची पूजा म्हणजे काष्ठ, धातू, पाषाणाची पूजा नसून त्या जगत्चालक अनंतकोटीब्रह्मांडनायकाची, त्या सामर्थ्यवान शक्तीची पूजा होय निर्गुण स्वरूपाचे पूजन करता येत नाही, म्हणून सर्वसाधारण समाजासाठी प्रतिकाचे पूजन सांगितलेले आहे

यासंबंधी स्वामी रामतीर्थ म्हणतात, 'बाह्य पदार्थाकडे पदार्थ या दृष्टीने न पाहता ब्रह्म-मायेच्या दृष्टीने पाहणे, त्याच्या सर्वैश्वर्य सामर्थ्याला वंदन करणे हे खरे पूजन होय पण या उलट प्रतिकालाच सत्य मानून तोच ईश्वर होय, अशा भावनेने पूजन केल्यास ती ईश्वरपूजा नसून शुद्ध पाषाणपूजा ठरेल '

ईसाई पंथामध्ये येशू अथवा मेरीच्या प्रतिकाची पूजा होते, त्याच्या मिरवणुकी काढल्या जातात इस्लाम पंथामध्ये काबा, कबरी यांचे पूजन होते दर्गे, मशिदी या ठिकाणी 'रोशनी' म्हणून पेटत्या दिव्याचे पूजन होते दर्ग्यांच्या

ठिकाणी फुलांच्या चादरी पसरल्या जातात. ही सर्व प्रतिकोपासनाच होय. यासाठीच संत एकनाथ महाराज म्हणतात.

आम्हांसी म्हणता पूजिता फत्तरे ।
तुम्ही कां मुडद्यावरी ठेविता चिरे ॥
जतन करितां मेलियावरी हाडे ।
दगडाचे पूजिता हाजी-पीर रे ॥

## देवतांचे भोग

या ठिकाणी भोग याचा अर्थ सुखोपभोग असा घ्यावयास पाहिजे. हे भोग दोन प्रकारचे आढळून येतात. अंगभोग म्हणजे देवतांना चंदनाची उटी लावणे, दहीभाताने पूजा बांधणे, नवीन वस्त्रालंकार चढविणे इ० होत. रंगभोग म्हणजे कीर्तन, भजन, प्रवचन, नृत्य, गायन, बाहेरील मिरवणूक इ० होत. गुजराथ, राजस्थान, उत्तर प्रदेश, मद्रासकडील काही मंदिरे येथे मणां-मणांचे नैवेद्य भोग म्हणून चढविले जातात आणि नंतर त्याचा लिलाव करण्यात येतो. ( वास्तविक हा प्रसाद गोरगरिबांना मोफत वाटायला पाहिजे ). मिरवणुकीत जी देवाची मूर्ति बाहेर नेण्यात येते, तिला भोगमूर्ति असेच म्हटले जाते. मूळमूर्ती-पेक्षा ही निराळी असते.

## देवतांचे भिन्न रंग

भौमाकाराः पीतवर्णाः सर्वाः स्तम्भनकारिकाः ।
आप्याः सत्वगुणाः सर्वाः सिताकाराः समीरिताः ॥
ताः सर्वा ज्ञानशान्तिश्रीकीर्तिसौभाग्यमुक्तिदाः ।
आग्नेया राजसाः सर्वा लोहिताकारसंयुताः ॥
वायुरूपा धूम्रवर्णाः सर्वा द्वेषादिकारिकाः ।
नाभसा नीलवर्णास्ता मारणोत्सादयोः स्मृताः॥ (तंत्रराजतंत्र)

वरील उताऱ्यात देवतांचे रंग लाल, पिवळा, पांढरा, नील इ० प्रकारचे का असतात अथवा करावेत, याचे वर्णन आहे. पृथ्वी-प्रधान ज्या देवता आहेत ( भूदेवी ) त्यांचा रंग पिवळा; जलशक्ति-प्रधान देवता ( गंगा, नर्मदा ) आहेत, त्यांचा रंग पांढरा; तेज म्हणजे अग्निरूप ज्या देवता आहेत ( दुर्गा ) त्यांचा रंग लाल; वायु-प्रधान ज्या देवता आहेत ( वरुण ) त्यांचा वर्ण धूसर आणि आकाश-प्रधान ज्या देवता आहेत ( विष्णु ) त्यांचा वर्ण नील असावा.

याशिवाय देवताचे उग्र व शांतस्वरूप जे प्रसंगानुरोधाने दिसते, त्याचाही परिणाम देवताच्या मूर्तीच्या रंगावर होत असतो. यासंबंधी थोडेसे विवरण प्रथम खंडात येऊन गेलेले आहे. पृ. २४२ पहा.

## देवतांची प्रदक्षिणा

देवता अगर देवताचा गाभारा याला उजव्या बाजूने (देवताच्या) प्रदक्षिणा अथवा परिक्रमा घालतात. डाव्या बाजूने घालीत नाहीत याला कारण असे समजते की, दैवीशक्तीचे तेजोवलय हे दक्षिणगामिनी आहे. यामुळेच त्या तेजाची प्रभा दक्षिण दिशेकडे वाहते. सूर्य–चंद्राच्या तेजाचे जसे किरणांनी वलय तयार होते, तद्वत मूर्तीच्या तेजाचे वलयही आजूबाजूला पसरलेले असते. मूर्तीपासून जितके लांब जावे, तितका त्याचा प्रभाव कमी कमी होत जातो. या दिव्य तेजाचे कण वलयातून प्रदक्षिणा घालणाऱ्याच्या शरीराला चिटकावेत म्हणून प्रदक्षिणा घातली जाते. जितक्या अधिक प्रदक्षिणा घालाव्यात, तेवढे देवतेज भक्ताच्या शरीरात अधिक शिरून, मन निर्मळ बनल्याने तो साधक बनतो. याला फक्त शंकराची प्रदक्षिणा अपवाद आहे. शंकराला सोमसूत्री प्रदक्षिणा घालतात. तत्त्व एकच. तेजस्वी व्यक्तीपुढे सर्वसाधारण माणूस जर मान वाकवितो आणि त्याला नमस्कार करतो तर सकलऐश्वर्यसंपन्न भगवानाचे मूर्तीस नमस्कार करून प्रदक्षिणा घालणे खासच श्रेयस्कर होय.

## देवतांची भुजसंख्या

भूतांशानां गुणांशानां समसंख्या गुणनात्।
एकद्व्यादिदशदशांसगुणनाच संजाता नामासां, भुजभुजादि-
भेदः सम्भवति ॥

आपण भगवान महादेवाच्या उदाहरणाने हे अधिक स्पष्ट करू. महादेवांना पाच मुखे आणि दहा भुजा असे वर्णन काही ठिकाणी मिळते. विष्णुधर्मोत्तर पुराणाप्रमाणे ( १ ) पूर्वेकडील मुख म्हणजे भूमि, आणि या शक्तीचा रंग पिवळा आहे, ( २ ) दक्षिणेकडील मुख म्हणजे अग्नि व त्याचा रंग लाल. यास्तव त्याला भैरव म्हणतात; ( ३ ) पश्चिमेकडील मुख म्हणजे वायु, याचा वर्ण धूम्र असून नाव नंदी आहे; ( ४ ) उत्तरेकडील मुख म्हणजे जल, रंग पांढरा असून नाव औपेय आहे; ( ५ ) ऊर्ध्व दिशेकडील मुख म्हणजे आकाश–शक्ति त्याचा रंग नील असून नाव सदाशिव आहे. आता 'प्रतिवक्त्र भुजद्वयम्' या न्यायाने पाच मुखे म्हणजे दहा भुजा झाल्या. हातातील आयुधे टंक, शूल, पाश, खड्ग इ० त्या त्या दिशांची निदर्शक निशाने आहेत. बल, ज्ञान, ऐश्वर्य आणि शक्ति हे विष्णूच्या चार मुखांचे निदान होय. चार वेद हे ब्रह्मदेवाचे चार मुखाचे निदान होय.

वरीलप्रमाणे विवरण देवी, गणेश इ० मूर्तिबाबतीतही करता येईल. देवतांना अनेक मुखे व अनेक भुजा का याचे हे सारांश विवरण आहे.

## देवपूजन

एखाद्या देवतेला श्रद्धायुक्त अंतःकरणाने विधियुक्त उपचार समर्पण करणे याला देवपूजा म्हणतात. साधकाचे स्नान झाल्यावर व सकाळची आह्निक कर्मे उरकल्यावर घरातील देवतांचे पूजन करावे. हे पूजन देवाला सोळा उपचार समर्पण करून करावयाचे असते; पौराणिक मंत्रांनी पूजन करावे. हे सोळा उपचार म्हणजे आवाहन, आसन, पाद्य, अर्घ्य, आचमनीय, स्नान, वस्त्र, यज्ञोपवित, अनुलेपन, पुष्प, धूप, दीप, नैवेद्य, नमस्कार, प्रदक्षिणा आणि मंत्रपुष्प होत. पुरुषसूक्त अथवा इतर मंत्रांनी अभिषेक करताना संततधार देवतेवर धरावी. ती त्रुटित होणार नाही याची खबरदारी घ्यावी. शक्य असेल तेथे पूजेचे वेळी गीत, वाद्य, नृत्य हे उपचार समर्पण करावेत. आरती करावी आणि ती उपस्थितांपैकी सर्वांनी म्हणावी. शेवटी सर्वांनी प्रार्थना म्हणावी.

आवाहनं न जानामि न जानामि तवार्चनम् ।
पूजां चैव न जानामि क्षम्यतां परमेश्वर ॥
मंत्रहीनं क्रियाहीनं भक्तिहीनं सुरेश्वर ।
यत्पूजितं मया देव परिपूर्णं तदस्तु मे ॥
अपराधसहस्राणि क्रियंतेऽहर्निशं मया ।
दासोऽहमिति मां मत्वा क्षमस्व परमेश्वर ।
क्षमस्व परमेश्वर, क्षमस्व परमेश्वर ॥

ज्याला षोडशोपचारांनी पूजा करणे शक्य नसेल, त्याला अन्य कमी उपचाराचे प्रकारही सांगितले आहेत. फुले अगर अन्य साहित्य न मिळाल्यास काय करावे याचे दिग्दर्शन 'पूजा प्रकाश' ग्रंथात पहावयास मिळेल, पण तो गौणमार्ग होय, उत्तम नव्हे. सर्व वर्णांच्या स्त्री-पुरुषांना व अस्पृश्यानाही पूजेचा अधिकार आहे. कुटुंबातील कोणी एकाने पूजा करावयाची असते. जे कोणी पूजन करतात ते अनेक कोटी जन्मातून संचय झालेल्या दुःखाचा नाश झाल्याने मुक्त होतात, असे नृसिंह पुराणात वर्णन आहे. देवाचे पूजन कसे करावे याचे अगदी संक्षिप्त वर्णन येथे दिलेले आहे. संपूर्ण विधीसाठी अनेक ग्रंथ प्रकाशित झालेले आहेत. त्यांचे मार्गदर्शन पूजकाने घ्यावे. संपूर्ण विधान देणे हा उद्देश नसल्याने, केवळ देवालयातील हा विधि लक्षात यावा, यासाठी हा भाग दिलेला आहे.

## देवपूजन व आदर्श जीवन

> आधी राखावा आचार । मग पहावा विचार ।
> आचारविचारे पैलपार । पाविजे तो ।
> इहलोक आणि परलोक । जेथे नाही साकल्य विवेक ।
> तेथ अवघेचि निरर्थक । सकळ काही ॥ दासबोध १७।१०।२५

मानवी जीवनात अनेक इच्छा असतात. पण त्यामध्ये देवत्व मिळावे ही इच्छा सर्वश्रेष्ठ होय. आपले मन सुसंस्कृत झाल्याविना विवेकाने सत्याचरण करूनही तो लाभ घेता येणे शक्य नाही. यासाठी आचारविचाराचे बाबतीत मानवाने नेहमी दक्ष राहिले पाहिजे.

देवपूजनाने मानवाना हे सुख लाभू शकते. निर्दोष जीवन व सदाचार या पूजनाने प्राप्त होऊ शकते. देवताचे एकाग्रचित्ताने व निष्ठेने पूजन केल्यास शारीरिक, मानसिक व बौद्धिक पातळी वाढल्याविना राहणार नाही. निरपेक्ष बुद्धीने व प्रेमभावाने हे पूजन झाल्यास मानसिक समाधान अधिकच मिळेल. ईश्वरचिंतनात आयुष्य व्यतीत झाले म्हणजे इतर अनावश्यक उपाधी आपोआप सुटतात. सामाजिक व कौटुंबिक ऋण फेडले असल्याने वृद्धावस्थेत या मार्गाने गेल्यास पूर्ण शांति मिळते व जीवनाचा शेवटही गोड होतो.

हे विचार सुचण्याची गरज भासली ती अशी की, सांप्रत अमेरिकेसारख्या सुधारलेल्या देशातही वृद्धांची अवस्था चिंतनीय आहे. आई-बाप कोठेतरी हॉटेल-मध्ये जीवनाचे अंतीम क्षण मोजीत असतात आणि मुले-मुली, त्यांच्यापासून खूप दूर वैवाहिक जीवनात दंग असतात. एका भारतीय प्राध्यापकाने त्यांची स्थिति

अत्यंत शोचनीय जगण्याचे वर्णन केले आहे. पण याउलट स्थिति भारतीय संस्कृतीत आढळते. वृद्ध माता पिता मुलाच्या अथवा मुलीच्या संसारात राहून त्यांना आवश्यक तेवढी मदत करून, उरलेला वेळ पूजन, भजन, कथा-कीर्तन, श्रवण यामध्ये व्यतीत करीत असतात. त्यामुळे त्यांना जीवन कंटाळवाणे होत नाही, अवजड़ही होत नाही. देवाचे पूजन, जप-जाप्य यांत मजेशीरपणे काळ निघून जातो. संस्कृति टिकून राहण्यास मदत होते. रामदासांनी म्हटल्याप्रमाणे शुद्ध आचार-विचाराने इहलोक आणि परलोक पार करून जाता येतात. देव-पूजनाने आदर्श जीवन जगण्याचा आनंद उपभोगता येतो आणि निरर्थकपणा पार लपून जातो. त्याची आठवणही होत नाही.

## देवपूजेची व्याप्ति

देव, गुरु, आचार्य, अतिथि, संत, मातापिता इ० विभूतींना जो सत्कार किंवा सन्मान त्याला पूजा म्हणता येईल. देवपूजा आणि मानवपूजा यामध्ये थोडासा फरक आहे पण दोहोंतही कृपाप्रसाद मिळविणे हाच मुख्य उद्देश असतो. काही वेळा देवतांची अवकृपा न व्हावी यासाठी त्यांचे आगाऊन पूजन केले जाते. वंशपरंपरा चालावी म्हणून पितरांचे पूजन, श्राद्ध, तर्पण केले जाते. मानवाच्या निरनिराळ्या पातळींमध्ये संस्कृतीला धरून निसर्गपूजा, वृक्षपूजा, राक्षसपूजा, नागपूजा, यक्षपूजा इ० पूजा होत असतात. सुधारलेला समजूतदार समाज, सुखसंपत्तीसाठी देवपूजा करतो. तर आदिवासी वन्य जमाती जीवनातील संकटे दूर व्हावी यासाठी करतात. प्राथमिक अवस्थेत हे पूजन घडते पण आध्यात्मिक क्षेत्रात प्रगति झाली, की मूर्तिपूजा बंद पडून मानसपूजा आणि शेवटी निर्गुण उपासक बनतो सर्वव्यापक परमेश्वराचे ज्ञान झाले म्हणजे प्राप्त कर्तव्ये निष्काम बुद्धीने करीत राहणे हीच खरी पूजा बनते.

## घंटा व शंखनाद

प्रत्येक प्रार्थना मंदिरात मोठमोठ्या घंटा एक वा अनेक बांधलेल्या आपण पाहतो. मंदिरप्रवेशाच्या वेळी प्रत्येक भक्त घंटानाद केल्याविना आत दर्शनाला जात नाही. मंदिरातील पूजनाच्या अनेक उपचारांपैकी हाही एक उपचार मानला जातो. तेव्हा या उपचारामागील शास्त्रीय बैठक कोणती याचा विचार केला असता असे दिसून येते की, घंटानादामध्ये ज्या लहरी उत्पन्न होतात त्यामध्ये भरपूर अश्वशक्ति असते आणि त्या निनादात माणसाचा शीण कमी होतो. मन उल्हसित होते व त्या स्थितीत परमेश्वरीय भावना जास्त विकसित होतात. न्यूयॉर्क शहरी प्रा. पी. डब्ल्यू. रॅले यांनी याबाबतीत संशोधन करून असे सिद्ध

केले आहे की, साधारण घंटानादामध्ये १३ ते १६ इतकी अश्वशक्ति त्याच्या लहरींमध्ये असते.

घंटा जितकी मोठी तितका त्याचा परिणाम जास्त, हे सहज समजण्यासारखे आहे. हिंदु मंदिराप्रमाणे ख्रिश्चन प्रार्थना मंदिरातही मोठमोठ्या घंटा असतात हे आपण पाहतो. रशियामधील मास्को शहरी एक प्रचंड घंटा सन १७३५ मध्ये ओतण्यात येऊन सन १७७३ मध्ये ती प्रार्थना मंदिरात टांगण्यात आली. या घंटेची उंची १९ फूट, वजन २०० टन आणि तळाचा परिघ ६० फूट आहे पण कालगति येथे आडवी येऊन त्या प्रार्थना मंदिराला सन १८३६ मध्ये आग लागून घंटा तुटून खाली पडली, भंगली आणि एका बाजूला एक मोठे भगदाड पडले. भातीच्या ढिगाऱ्याखाली रुतून पडलेली ही घंटा, कालांतराने एका सम्राटाने बाहेर काढून, भक्कम अशा सिमेंटच्या चौथऱ्यावर तिची स्थापना केली. जनता आता या स्थानालाच 'घंटा मंदिर' म्हणून ओळखते. अनेकजण भेट देतात, परदेशी प्रवासीही हौसेने पाहातात, पडलेल्या भगदाडामधून घंटाघरात प्रवेश करतात, आतून निरीक्षण करतात आणि बाहेर पडतात. अभंग असताना या घंटेच्या लहरींची अश्वशक्ति किती भयंकर असेल याची कल्पना वाचकांनीच करावी. भारतामध्ये सोमनाथाच्या मंदिरात प्रचंड घंटेचा लोलक वाजविणाऱ्या सुवर्ण साखळीचे वजन २०० मण होते, असे इतिहास सांगतो.

भारतातील कित्येक मंदिरांतून पूजा-आरतीसमयी शंखनाद करण्याची रूढि आहे. भारतीय युद्धभूमीवर शंख आणि भेरी यांचे निनाद, योद्धयांना स्फुरण येण्यासाठी करीत असत. पांचजन्य, देवदत्त, महाशंख, अनंतविजय, सुघोष इ० पाच पांडवांजवळ उत्तमोत्तम शंख होते, असे वर्णन गीतेमध्ये मिळते. या शंखनादाने जसे वीरांना स्फुरण मिळे, तसे वातावरण शुद्ध करण्यासही त्याचा उपयोग होतो. असा निष्कर्ष सन १९२८ मध्ये बर्लीन विद्यापीठाने सम्मत केलेल्या एका प्रबंधात मांडलेला आहे.[1] त्या संशोधकाचे म्हणणे असे की, एका सेकंदाला २७ घनफूट वायुशक्तीच्या जोराने शंखध्वनि झाल्यास, १२०० फूट परिसरातील हवेतील रोगजंतु मरण पावतात, अगर मूर्च्छित होतात.

घंटा आणि शंखनादाने वातावरणातील रोगजंतूंचे निर्मूलन होते, असे जे पाश्चात्य संशोधकाचे मत आहे, याचे सांप्रतचे युगात अधिक संशोधन

१ टीप—जर्मन वाद्यवृंद न्यूवेंदनेस शहरी शंखाचे सहाय्याने लोक-गीते वाजवीत असल्याचे छायाचित्र दि. ३०-१२-६७ चे केसरीत (पुणे) प्रसिद्ध झाले आहे.

व्हावयास पाहिजे. किंबहुना सर्वत्र घंटा व शंखनाद करूनच रोगराईचे निर्मूलन करावे असे कोणी प्रतिपादील तर ते हास्यास्पद ठरेल. या रूढीचे महत्त्व वर्णन करण्यासाठीच वरील विधाने दिली आहेत.

## देवतांचे चरणामृत अथवा तीर्थ

देवतांचे पूजन मग ते घरातील असो अथवा सार्वजनिक मंदिरातील असो, पूजन झाल्यावर तीर्थ घेण्याची रूढि सर्वत्र प्रचारात आहे. यामागेही काही शास्त्रीय बैठक असली पाहिजे. केवळ तीर्थप्राशनाने अनेक रोगी बरे होतात असाही काहींचा अनुभव आहे. संत तुकारामाच्या मुलाला ताप आला असता पांडुरंगाचे चरणतीर्थ हेच औषध ते देत असत. कोकणात सांतेरी देवीचे न्हावण दिल्याने कुष्ठरोगी बरा होतो, सर्पविष उतरते असा भक्तांचा अनुभव आहे. यासंबंधीचे थोडेसे विवरण एकाने केले, ते असे की, देवताच्या उपचारामध्ये तुळशी, बेल, केशर, सुगंधी द्रव्ये, दूध यांचा वापर असतो. तसेच दही, तूप, मध, साखर यांचाही उपयोग केला जातो. देवपूजेच्या वेळी बहुधा तांब्याची भांडी वापरावी असा संकेत असतो. वरील सर्व मिश्रणाचा संपर्क तांबे या धातू-बरोबर आल्याने, काही नैसर्गिक प्रक्रिया होत असली पाहिजे आणि त्याचा परिणाम मकरध्वज गुटिकेपेक्षाही अधिक होत असल्याने, देवतांचे तीर्थ अवश्य घ्यावे अशी रूढि आचरणात आली. केवळ पंचामृत-सेवनाने पचनक्रिया वाढते असा एकाने आपला अनुभव सांगितला आहे. ह्याबाबत अधिक संशोधन झाले तर या रूढीचे महत्त्व लोकांना कळून येईल.

## देवतांचे पूजक

देवस्थान हे व्यक्तिगत असो, संस्थेच्या मालकीचे असो, संप्रदायाचे असो, त्यातील पूजाअर्चा नित्यनियमाने, विधीयुक्त अखंड चालावी यासाठी पूजकांची नेमणूक करावी लागते. अनेक मूर्ति देवस्थानात असतील तर एकापेक्षा अधिक पूजक नेमावे लागतील. या पूजकवर्गाला पुजारी, अभिषेकी, पंड्ये, बडवे, गुरव इ० नावे असतात. पुष्कळ ठिकाणी हे पुजारीपण वंशपरंपरेने— पंढरपूर येथील बडवेप्रमाणे—चालत आलेले असते. याचा एक तोटा असा दिसून येतो की, देवाच्या पूजेविषयी त्यांना आस्था कमीच असते. भक्ताकडून भरपूर दक्षिणा मिळण्याकडे सारे लक्ष केंद्रित होते आणि यासाठी पूजेच्या बाह्योपचाराचा भपका मात्र कायम ठेवतात. यामुळे पूजकाच्या ठिकाणी देवाच्या सेवाभावापेक्षा तो एक धंदा म्हणूनच त्याकडे पाहात असतो. कोणत्याही गोष्टीला धंद्याचे स्वरूप आले म्हणजे तेथे श्रद्धा, भक्ति, नीति याला अवश्य फाटा बसतो. जसे ब्राह्मण पुजारी आहेत त्याप्रमाणे शिवमंदिरात गुरव, गोसावी, जंगम; वैष्णव-

मंदिरात पंड्ये वैरागी देवी या मंदिरात भुत्ये, गोंधळी, आराधी रहिरोबाच्या मंदिरात भराडी, कुणबी व माळी इ० आढळून येतात कोठे महानुभव आहेत तर कोठे अस्पृश्यापैकी महारही आहेत आणि आश्चर्याची गोष्ट अशी की, काही क्षेत्रात हे अधिकार मुसलमानांनीही हस्तगत केलेले आहेत (हाजी मलंग ठाण्याजवळील क्षेत्रात ब्राह्मण पूजक आहेत)

वतनी, धंदेवाईक पूजक आणि वाढलेल्या वंशवृक्षाच्या वंशजांनी येणाऱ्या अनेक वर्षांच्या पाळीच्या वेळी कोणी तरी उभा केलेला सोमागाम्या हे बहुधा वेदाध्ययन न केलेले, पूजेचा शास्त्रशुद्ध विधि न येणारे असे असल्याने, यजमानाची धार्मिक कृत्ये यथाविधि पार पडत नाहीत (लेखक वाराणसी क्षेत्री गेला असता तेथे मणिकर्णिका कुंडात स्नानविधीच्या वेळी जो क्षेत्रोपाध्याय, वय सुमारे ५०, वाट्णीस आला होता, त्याला संध्येची २४ नावेही क्रमाने म्हणता येत नव्हती, असा पडा होता ठरलेली दक्षिणा मात्र द्यावीच लागते) यावरून असे ध्यानात येईल की, वतनीपण हे समाजाला घातूक ठरत आहे आणि त्यामुळे भक्ताच्या भावना चा ेस लागणे कठीण आहे अनेक याज्ञिकाचा या वर्गाविषयी चा अनुभव वाईटच आहे गोकर्ण महाबळेश्वर, गोवा येथील काही मंदिरे याला अपवाद आहेत, असा लेखकाचा अनुभव आहे वरील काही गोष्टी आर्थिक ओढाईमुळे होत असल्यास, पूजकाला सन्मानपूर्वक जीवन चालविता येईल अशी दक्षता चालकांनी आणि समाजाने घेतल्यास नीरनेरकेपणा, स्वच्छता व कार्यक्षमता निश्चितच वाढीस लागेल

देवद्रव्य गुरुद्रव्य विप्रद्रव्य तथैव च ।
अपेक्षी नरकं याति भक्षियत्वा कुलक्षयम् ॥

याचा भावार्थ असा की, देव गुरु ब्राह्मण याच्या द्रव्याचा अपहार करणे म्हणजे नरकाचे साधन आणि कुलक्षय ओढवून घेण्यासारखे आहे यावरून पूजक आणि संस्था संचालक याचे वर्तन कसे असावयास पाहिजे हे उत्तमपणे समजून येते

## देवालयातील दर्शक

देवालयाच्या चालकावर नियंत्रण, पूजकावर नियंत्रण तसेच दर्शकाने काही नियंत्रण आपल्यावर घालून घेतले पाहिजे, किंबहुना व्यवस्थापक बेजार होऊन जातो इसाई धर्मातील प्रार्थनेसाठी चर्चमध्ये जाणारे भक्त, अथवा प्रार्थनेसाठी मसजिदमध्ये जाणारे भक्त ज्याप्रमाणे बंधने घालून घेतात, तद्वत हिंदु साधकानीही बंधने घालून घेणे आवश्यक आहे

( १ ) मंदिराच्या नियमाप्रमाणे मंदिर उघडे असेल तेव्हा दर्शनाला जाणे.

( २ ) स्नान करून दर्शन घेणे, पण निदान हात, पाय, तोंड स्वच्छ करून जाणे.

( ३ ) दर्शनासाठी जाताना केव्हाही रिक्त हस्ताने न जाणे.

( ४ ) जे काही अर्पण करावयाचे ते अत्यंत विनम्र होऊन करणे.

( ५ ) देवतेला आवाहन करताना अगर स्तोत्र, मंत्र म्हणताना, मंदिरात इतरही भक्त दर्शन घेत आहेत, त्यांना त्रास होणार नाही असे वर्तणे.

( ६ ) साष्टांग नमन करताना अगर दर्शन घेताना इतरांना बाधक वर्तन नसणे.

( ७ ) देवालयात घरातील सांसारिक गप्पा न मारता, काम झाले म्हणजे निघणे.

( ८ ) नवीन पिढीला शिक्षणूक म्हणून मुलांना अवश्य बरोबर न्यावे, पण मंदिरातील नियमांचे कडक पालन करावयास लावणे.

( ९ ) मंदिरामध्ये कथा-प्रवचने चालू असतात, त्यांना बाधक असे वर्तन दर्शकांनी न करणे व पूर्णपणे शांतता पाळणे.

(१०) पादत्राणे मंदिर गाभाऱ्यापासून अगर सभामंडपापासून दूर ठेवणे. कथा-प्रवचनाच्या वेळी पिशव्यात घालून बसण्याचे आचरण काही भक्तगण काही गावी करतात (विशेषत शहरातून), पण हे योग्य नव्हे. तसेच लहान मुलांचे बूट अगर चपलांच्या बाबतीतही हा नियम काटेकोरपणे पाळणे, पावित्र्याच्या दृष्टीने इष्ट ठरते.

(११) सदा सर्वदा चालकाबरोबर अथवा पूजकाबरोबर सहकार्याची वृत्ति असावी. इ० इ०.

## आदर्श देवदर्शन

सांजसकाळ देवस्थानामध्ये भक्तांची गर्दी दर्शनासाठी उसळलेली असते, असे आपण पाहतो. निवांत दर्शन घेणारे, प्रदक्षणा घालणारे, मंदिरात मोठ-मोठ्याने गर्जना करून देवताजवळ आपली गाऱ्हाणी सांगून, संकट निवारणाची याचना करणारे इ० अनेक प्रकारचे भक्त आपण पाहतो. पण देवतांचे दर्शन कोणत्या प्रकाराने घ्यावे याची आदर्शवत एकदोन उदाहरणे नमूद करण्याचा मोह होतो.

नियमितपणे दर्शन घेणे, निष्ठेने घेणे, व्रत म्हणून घेतल्यास, त्याचा परिणाम मनावर होऊन, नियत्रणाने मनाचे सामर्थ्य वाढते. पुणे येथील महर्षि अण्णासाहेब पटवर्धन हे नियमितपणे देवदर्शन घेत. याबद्दल अप्रबुद्ध एके ठिकाणी लिहितात, 'देवाचे दर्शनास जावयाचे म्हणजे मुद्दाम दर्शनासाठीच जावयाचे असा त्यांचा नियम होता. दर्शन घेतल्यावर वेळ असल्यास इतर कामे ते करीत, पण इतर कामासाठी बाहेर गेले असता मंदिर जरी जवळ असले तरी दर्शनास जात नसत घरी येऊन पुन्हा दर्शनासाठी जात असत. काही अपरिहार्य कारणाने दोन दिवस दर्शन घेता आले नाही, तर ही शिल्लकबाकी तिसऱ्या दिवशी भरून काढीत, म्हणजे जितके दिवसाचे दर्शन बाकी असेल तितके वेळा घरातून निघावयाचे, दर्शन घ्यावयाचे आणि परत घरी यावयाचे. देवाचे दर्शन रिक्त हस्ताने घेऊ नये, म्हणून खिशामध्ये पुरेचसे तादूळ ते ठेवीत असत.' या कृतीमध्ये देवदर्शनाची तळमळ वाखाणण्यासारखी आहे.

दुसरे उदाहरण केसरी पत्राचे माजी संपादक कै तात्यासाहेब करंदीकर यांचे देता येईल. घरातून देवदर्शनाला निघाल्यानंतर रस्त्याने सतत नामस्मरण चालत असे, ते पुन्हा घरी परत येईपर्यंत. रस्त्यामध्ये कोणी भेटल्यास त्याजबरोबर बोली भाषादी होत नसे. दर्शन घेताना मनाने देवताची स्तुति करून एक शब्दही मोठ्याने न उच्चारता ते बाहेर पडत. (मंदिराची कथा व व्यथा, ले. ना. ह. पाल्कर, पृ. ११८–१२२).

भक्ताच्या अशा आदर्शवत दर्शनाने मंदिराचे पावित्र्य कायम रहावे, संपूर्ण शांतता लाभते, संचालकाना भक्ताना शिस्त लावण्याची पाळी येत नाही आणि लोहमार्गावरील स्थानक अथवा तिसऱ्या वर्गाचे प्रतिक्षालयाचे अशांततेचे स्वरूप मंदिराला येत नाही. वरील पार्श्वभूमीवर प्रत्येक भक्ताने आपले देवदर्शन पारखून घ्यावे इतकेच मी म्हणेन.

त्रिवार नमस्कार

सर्वसाधारणपणे हा शब्द उच्चारला गेल्यावर, तीन वेळा नमस्कार, असाच अर्थ घेतला जातो, पण ते सर्वस्वी बरोबर नव्हे. याचा शास्त्रीय अर्थ असा दिला जातो की, कायिक, वाचिक व मानसिक, या तिन्ही अनुपगाने जो नमस्कार केला जातो तो त्रिवार होय. कायेने नमस्कार घातला, पण मुखाने अन्य विषयाची बडबड चालू असेल, अगर मन कोणाचे चिंतन करीत असेल, तर तो शास्त्रीय दृष्टीतून त्रिवार नमस्कार होणार नाही. सारांश इतकाच की, देवाला नमस्कार करताना त्याचेच मनन–चिंतन असावे, चित्त अन्यत्र जाऊ नये.

## देव दिसत नाही, म्हणून तो नाही का?

याचे उत्तर असे देता येईल की, वस्तु अस्तित्वात आहे, पण ती सदासर्वदा दिसते का? अशी वस्तु दिसली नाही तरी आपण ती सत्य मानतो. एका पठारावर मला उच्च पहाड उभा आहे. आपण जोपर्यंत त्याच्याजवळ आहोत, तोपावेतो तो उत्तमपणे दिसतो. पण जसजसे दूर जावे, तसतसा तो लहान होत शेवटी दिसेनासा होतो. डोळ्यात आपण अनेकवेळा काजळ घालतो, पण डोळ्यात घातल्यावर ते इतके जवळ असूनही पाहता येत नाही. सर्व देशामध्ये पितराचे पूजन आजही केले जाते, त्याचे स्मरण केले जाते, पण ती आपणास दिसतात का? घुबडाला सूर्यदर्शन कधीही होत नाही, म्हणून सूर्य नाही का? इतकेच कशाला, पाहण्याच्या वेळी इंद्रिय जर कार्यक्षम नसेल तर समोरची वस्तूही दिसत नाही. मन काही कारणाने भावावलेले आहे, चित्त कोठल्या उपाधीत व्यग्र आहे, अशा वेळी समोर असलेला परिचित मनुष्यही दिसत नाही. सारांश, या सर्व ठिकाणी वस्तु आहेत पण माणसाला दिसत नाहीत. तसेच मानवी मन हे योगमायेच्या पटलाने जोपर्यंत समावृत्त आहे, तोपावेतो देव असूनही दिसणार नाही. ते पटल दूर करा, देव निश्चितपणे दिसेल

## देवाची भेट केव्हाही घडेल का?

प्रथमदर्शनी नाही हेच उत्तर आहे. रोजच्या व्यवहारातील उदाहरण असे की, ' एखाद्या उच्च पदस्थ व्यक्तीची—समजा राष्ट्रपतींची—आपणास भेट घेणे आहे, तर त्यासाठी वशिला लावून आगाऊ वेळ ठरवावी लागते. भेटीला येणारा कोण आहे, कोठच्या दर्जाचा आहे, त्याची काय तपस्या आहे, कोणते काम आहे, हेतु प्रामाणिक आहे किंवा नाही, याची खातरजमा राष्ट्रपतींच्या निश्वास् सेवकानी केल्याविना भेट दिली जात नाही, किंबहुना नाकारलीही जाते. मग मानवाच्या राज्यात भेट होण्यासाठी जर इतके प्रयास पडतात, तर त्या अनतकोटीब्रह्मांडनायकाची भेट इतकी सहजासहजी कशी घडेल? देव वाटेल तेव्हा वाटेल तेथे आणि वाटेल त्याला कसा भेटेल? भक्ताने आपल्या सोयीने मदिरात जावे, ती वेळ देवाच्या विश्रांतीची असावी, मंदिर बद असावे, आणि देवदर्शन झाले नाही म्हणून तक्रार करण्यात कोणता अर्थ आहे? अधिकाऱ्याच्या भेटीच्या वेळा जर ठराविक असतात, तर वाटेल तेव्हा देवदर्शनाला जाऊन देव भेटला नाही, हे बोलणे व्यर्थ होय. सारांश, मूर्तीचे दर्शन व्हावे असे वाटले तर मदिराच्या ठराविक वेळीच तेथे गेले पाहिजे. साक्षात् देवतेचे दर्शन व्हावे तर तेवढी तपस्या केली पाहिजे, आपली पातळी मायापटल दूर सारून वाढविली पाहिजे, हेच उत्तर होय.

## देवदर्शनाचा हेतु–स्वार्थी

नास्तिक मनुष्य म्हणतो आम्ही देवाचे दर्शन घेतो, कारण जर आम्ही दर्शन घेतले नाही, तर मंदिरे ओस पडतील. देवाजवळ आम्हाला काही मागायचे नसते, कारण तो काहीही देत नाही, पण मंदिरे ओस पडू नयेत म्हणून आम्ही दर्शन घेतो. या ठिकाणी असा प्रश्न उद्‌भवतो की, जे कोणी देवाचे दर्शन घेतात, अगर सेवा करतात, ती देवासाठीच असते का ? साधारणतः नाही हेच त्याचे उत्तर आहे. स्वतःचे इच्छित पुरे व्हावे, मनकामना पूर्ण व्हाव्यात, शेवटी जन्माचे सार्थक होऊन निदान मोक्ष तरी मिळावा, याचसाठी सेवा घडत असते. मी हा देवीग्रंथ लिहीत आहे, यामध्ये देवताविषयक ज्ञान सर्वांना व्हावे हा जरी प्रधान हेतु असला, द्रव्यार्जन झाले नाही तरी चालेल असे जरी वाटत असले, तरी अंतः-करणात खोल सुप्त हेतु जरूर आहे, की आपले पश्चात काही काळ तरी लेखकाचे नाव अजरामर रहावे आणि जनतेने या श्रमाचे कौतुक करावे. साराश, ही लेखन-सेवा निःसंशय देवतेसाठी झालेली नाही. ती ज्या वेळी घडेल तेव्हाच मला देवता-दर्शन होईल.

## हिंदुपूजक, पुजारीपण विकतात

सर रामस्वामी अय्यर आपल्या इतिवृत्तामध्ये नमूद करतात की, वाराणशी येथील दरबारघाट, राजमहालघाट, विंध्याचल येथील काही देवालये, यांचे पूजकाचे हक्क तेथील पंड्यांनी इस्लाम समाजाला विकलेले आहेत. हिंदुहस्तका-करवी हा समाज तेथील व्यवस्था राखतो आणि सर्वचेच जाता राहणाऱ्या मलईचा खुराक ते स्वतः खातात. नगर जिल्ह्यात राशीन येथे ग्रामदेवतेच्या मंदिरात इस्लाम पूजक थेट मूर्तीपर्यंत जातो, स्वहस्ते अंगारा-प्रसाद घेऊन भक्तांना देतो. हिंदु मंदिरातील वंशपरंपरा पूजकांनी इतकी नादानी दाखविली, तरी समाज त्या ठिकाणी दर्शनाला जातो आणि इतर धर्मीयांचे पोषण करतो, याला कोणती उपमा योग्य, ते वाचकांनीच ठरवावे.

अशा काही उद्विग्न कारणांमुळेच, प्रबोधनकार ठाकरे, ' देवळाचा धर्म आणि धर्माची देवळे ' या ग्रंथात म्हणतात, ' पूजकवर्गाची वर्तणूक इतकी चीड आणणारी असते की, ' भटामुळे देवळे की, देवामुळे भट ' अशी विवचना उत्पन्न झाली म्हणजे असे वाटते की, देवाचीच उचलबांगडी केली, तरच भटाच्या एकमुखी वसेल्या कायमची गति मिळेल. ' ( मंदिराची कथा व व्यथा, ले. पालकर, पृ. ४८ ).

प्रबोधनकारांचे वरील उद्गार कोणाला झोंबतील, जळजळीत वाटतील, पण

वर वर्णन केलेल्या हिंदूंच्या दयनीय अवस्थेत ते सर्वस्वी यथायोग्यच आहेत असेच प्रत्येकाला वाटले पाहिजे.

## सर्वत्र देवळेच देवळे

अखिल भारतामध्ये सुमारे साडेपाच लक्ष खेडी आणि तीन हजार तरी शहरे आहेत. तेथील सर्व मंदिरांची मोजदाद केली तर सुमारे चाळीस लक्ष तरी भरतील. वाराणशी क्षेत्र पंधराशे, भुवनेश्वर येथे पाचशे, नेपाळातील काटमांडू-पाटण-भाटगाव येथे दोन हजार अशी मंदिरनिर्मिति पूर्वी झालेली आहे. दक्षिणेत पैठण येथे अनेक मंदिरे होती. पडझड झालेली, उध्वस्त झालेली वगळली तरी अद्याप ६०–७० मंदिरे आहेत. एका मंदिरात अनेक मूर्ति असतात, त्या सर्वांची मोजदाद केली तर अनेक कोटी भरेल. काशी येथील घाटावर तर शिवशंकराच्या अनेक पिंड्या उघड्यावरच पडलेल्या आहेत. नाही त्याना पूजा किंवा आसरा. या देवमूर्तींचे पसाऱ्यामुळेच श्रीरामदास समर्थांनी बारा वर्षांची यात्रा केल्यावर उद्गार काढले, ' देव झाले उदंड । देवाचे माजले बंड ॥ '

मंदिरे बांधताना पूर्वकालीन लोक काही प्रथा पाळीत असत. गावात शिरताना सर्वप्रथम दर्शन देवाचे शिखराचे व्हावे इतके ते उंच असे. शिखरा-पेक्षा कोणाचे घर उंच असू नये असा दंडक होता. प्रत्यक्ष राजाही हा दंडक पाळीत असे. आपला राजवाडा उंच वाढवावयाचा असेल. तर प्रथम मंदिराचे शिखर वाढविले जाई आणि नंतर त्याच्या कमी प्रमाणात राजगृह बांधीत असत. राजाच्या आराध्य देवतेचे मंदिर राजवाड्यापेक्षा उंच आणि शिल्पयुक्त असे.

भारतामध्ये वैदिक, बौद्ध आणि जैन संप्रदायांची देवालये आणि गुहा शिल्पे आढळतात. मंदिरसंस्थेचा हा जो प्रचंड व्याप वाढलेला दिसतो, तो बहुधा या तीन पंथियांच्या स्पर्धांमधून वाढीस लागलेला आहे. वेरुळ येथे एकूण ३२ लेणी आहेत आणि वरील तिन्ही पंथियांची आहेत. पण त्यांमध्ये वैदिक पंथियांची शैव लेणीच उत्कृष्ट ठरलेली आहेत. याचे कारण असेही संभवते की इतर दोन पंथाना राजसत्तेचा तेवढा भरघोस पाठिंबा त्या काली लाभत नव्हता. मात्र ही चढाओढ सात्त्विक असल्याने, कोठे बौद्ध तर जैन शिल्प आणि मांडणी यात वरचढ झालेले आहे. मंदिरशिल्पाचे चढाओढीत अगस्त्य, कश्यप, मय, अभिजित असे शिल्पशास्त्रज्ञ पुढे आले आणि त्यांनी अप्रतिम ग्रंथ-रचनाही करून ठेवली आहे.

या मंदिर-शिल्पाचे वैशिष्ट्य म्हणून त्यांची भव्यता, स्थिरता, प्रमाणबद्धता, सौंदर्य व मजबुती ही पंचसूत्री सांगता येईल. दिखाऊपणाबरोबर टिकाऊपणा, कलाकारांची चिकाटी आणि दगड, विटा, खडक यामधून लोकांच्या धार्मिक भावनेला दिलेले मूर्तस्वरूप हे निश्चितपणे आदरणीय व वंदनीय आहे. वेरूळ येथील गुहाशिल्प, मदुरा, तिरूपती, कुंभकोणम, रामेश्वर इ० क्षेत्रांची अतिभव्य मंदिरे पाहून इंग्रज लेखक आल्डस हक्सले याने उद्गार काढले, 'या भव्य मंदिरांचे पुढे जगातील महदाश्चर्य म्हणून गाजलेला ताजमहालही कलेच्या दृष्टीने सामान्यच ठरेल.'

## देवी

सामान्यतः देवी शब्दाचा अर्थ स्त्री देवता किंवा देवपत्नी असा समजला जातो. पण शिवपत्नी पार्वती अगर उमा हिलाच हे नामाभिधान लावण्याची रुढि आहे. सर्व देवांच्या ठिकाणी असलेल्या एकत्र झालेल्या शक्तीला-जसे अष्टभुजा, दशभुजा देवी-देवी नाव मिळाले आहे. शाक्तसंप्रदायी लोकांनी देवीला सर्वश्रेष्ठ देवता, आदिमाया किंवा जगदंबा म्हणून गौरविले आहे.

देवी हे बहुमानार्थी उपपद अविवाहित कुमारीला लावण्याची रूढि होती. अद्यापही उत्तर भारतात हा रिवाज पाळला जातो. यज्ञयागाच्या वेळी याच कुमारिकांचे देवतास्वरूप म्हणून पूजन करण्यात येते. सांप्रत कोणत्याही स्त्रीच्या नावापुढे देवी उपपद लावतात, ते मूळ रूढीला धरून नाही.

महाभारत ग्रंथामध्ये देवीची अनेक नाम-रूपे उल्लेखिली आहेत. (भीष्म, २३-४-१६). पुराणकाळात देवीची प्रतिष्ठा पुष्कळच वाढलेली दिसते आणि कलियुगात तर 'कलौ चण्डीविनायकौ' म्हणजे देवीचेच पूजन फलदायी आहे असे वर्णन आढळते. देवीची सौम्य रुपे उमा, गौरी, पार्वती, जगदंबा, भवानी असून दुर्गा, काली, चंडी, भैरवी, चामुंडा ही उग्र स्वरूपे होत. शाक्त लोक देवीची पूजा तांत्रिक पद्धतीने करतात. भद्रकाली, चामुंडा, महामारी, रक्तदंतिका ही रुपे अत्युग्र व महारौद्र आहेत.

दुर्गादेवीच्या स्वरुपात ती महिषासुरमर्दिनी आहे, कालीच्या स्वरूपात भयानक, रक्तरंजित, मुंडमाला धारण करणारी आहे, महामाया स्वरूपात ती मानवांना मोहजालात गुंतवणारी आहे, विंध्यवासिनी या स्वरूपात ती पशुबली व नरबली ही मागणारी आहे, जगदंबा या स्वरुपात पुष्टस्तनी असून काही वेळा स्तनाशी बालक घेतलेले असते. देवी ही दोन हातापासून १०८ हातापर्यंत चितारतात. हातामध्ये निरनिराळी शस्त्रे असतात. चराचर सृष्टि तिच्यापासून

उत्पन्न झाली. सर्व विश्वाची ती माता आहे आणि शास्तीही आहे. आधिदैविक स्वरूपात ती असुराचा नाश करणारी असून वेदही तिचे स्तवन करतात. दक्षकन्या या नात्याने तिने अनेक देवतांना जन्म दिलेला आहे. ब्रह्मा–विष्णु–शिव यांच्या मागील प्रेरक शक्ति म्हणजे ही देवीच होय.

## देवीव्रत

कार्तिक महिन्यात हे व्रत आचरतात. व्रतकाळात व्रतकर्त्याने दिवसा दूध आणि रात्रौ भाजीपाला खाऊन रहावयाचे असते. दुर्गादेवीचे पूजन आणि तिळाचा होम, हे व्रताचे विधि आहेत. व्रतकाळी पुढील मंत्राचा जप करावा.

जयन्ती मंगलाकाली भद्रकाली कपालिनी ।
दुर्गा क्षमा शिवा धात्री स्वधा स्वाहा नमोऽस्तु ते ॥

महिनाभर हे व्रत आचरण केले तर पाप, रोग, भय यांची निवृत्ति होऊन सुख लाभते. या व्रताचे आणखीही काही पर्याय आहेत. ते 'हिंदुधर्माची समीक्षा' या किंवा व्रताचे ग्रंथात पहावेत.

## देवी-ग्रंथ

देवीच्या माहितीसंबंधी अनेक ग्रंथ आहेत, पण नामसादृश्यामुळे वाचकांच्या मनात किंचित घोटाळा होण्याचा संभव खालील ग्रंथांसंबंधी आहे.

### (१) देवी–उपनिषद

हे उपनिषद अथर्ववेदाशी संलग्न आहे. देवी स्वतः आपले स्वरूप देवतांना सांगत आहे, अशी सुरुवात असून, सर्व सृष्टि तिने निर्माण केली. देवीचे आणि दैवीवाणीचे ऐक्य आहे. स्वरूपात शैव आणि वैष्णव यांचा समन्वय आहे असे वर्णन आहे. शिवाय देवीगायत्री मंत्र दिला आहे, तो असा—

महालक्ष्मीश्च विद्महे सर्वसिद्धिश्च धीमहि ।
तन्नो देवी प्रचोदयात् इ० इ०

### (२) देवी–पुराण

शाक्तिपंथी लोकांत प्रसिद्ध असलेले १२८ अध्यायांचे हे पुराण आहे. यामध्ये मुख्यत्वेकरून देवीचेच महात्म्य वर्णन केलेले आहे. याशिवाय यामध्ये शाक्त मूर्तिकला, शाक्त मते, पूजाविधि, शैव–वैष्णवपंथ, ब्राह्मणधर्म, नगरे, दुर्गरचना, वेद, उपवेद, शास्त्र, ग्रंथलेखन, तीर्थक्षेत्रे, दाने इ० अनेक विषयांचे वर्णन आहे.

## ( ३ ) देवी–भागवत

पुराण ग्रंथांपैकी एक उपपुराण, पण देवीभक्तांच्या मते अठरा महापुराणांपैकी, भागवत नावाचे महापुराण ते हेच होय, पण ते खरे नसावे. कारण काहींचे मते श्रीमत् भागवतानंतर देवी भागवत ग्रंथ निर्माण झाला असे आहे. दोन्ही पुराणांत १२ स्कंद आणि १८००० श्लोक हे मात्र साम्य आहे. भागवताच्या पंचम स्कंदाचा देवी-भागवताचा अष्टम स्कंद हा केवळ अनुकरण आहे असे दिसते. आद्यशक्ति दुर्गादेवीचे महात्म्य वर्णन करणे आणि तिच्या उपासनेच्या विविध मार्गांचे सांगोपांग निरूपण करणे हा या पुराणाचा मुख्य प्रतिपाद्य विषय आहे. दुर्गादेवी हेच विश्वातील परमतत्त्व होय, हेच सार आहे

## ( ४ ) देवी–महात्म्य

देवी उपासकांचा एक प्रमुख ग्रंथ. हा ग्रंथ मार्कंडेयपुराणांतर्गत (अ. ८१–९३ ) आहे. यामध्ये ५६७ श्लोक असून ते १३ अध्यायांमध्ये विभागलेले आहेत. या ५६७ श्लोकांचे ७०० मंत्रांत विभाजन केलेले असल्याने हा ग्रंथ सप्तशती अथवा दुर्गासप्तशती या नावाने ओळखला जातो. या ग्रंथामध्ये महाकाली, महासरस्वती आणि महालक्ष्मी या देवींच्या त्रिविध स्वरूपांची चरित्रे वर्णिलेली आहेत. प्रथम अध्यायात महाकालीचे चरित्र, दुसरा व तिसरा आणि चवथा यांमध्ये महालक्ष्मीचे चरित्र असून प्रामुख्याने यामध्येच महिषासुरवधाची कथा आहे. चवथ्या अध्यायात पहिले २७ मंत्र म्हणजे देवांनी केलेली जगदंबेची स्तुति आहे. पाच ते तेरा अध्यायांत महासरस्वतीचे चरित्र असून प्रामुख्याने शुंभ निशुंभवधाची हकीगत यांत आलेली आहे. देवीसूक्त या नावाने विख्यात असलेला मंत्रसमूह (५, ८–२२) या मध्येच आहे. तसेच अकराव्या अध्यायातील पहिल्या ३५ मंत्रांना नारायणी देवीची स्तुति असे म्हणतात.

शत्रूंकडून पराभूत झालेला सुरथ राजा आणि धनलोभासाठी बायकापोरांनी मारपीट करून घराबाहेर घालविलेला समाधी नावाचा वैश्य, हे दोघे एका अरण्यात भेटल्यावर सुमेधा ऋषीला शरण जातात. आदिशक्तीच्या उपासनेचा मार्ग ऋषि त्यांना दाखवितो. ते दोघे मनोभावे देवीची उपासना करतात. देवी प्रसन्न होते आणि दोघांनाही गेलेले वैभव प्राप्त होते असा थोडक्यात कथाभाग आहे.

प. महादेवशास्त्री जोशी, ' भारतीय संस्कृति कोशात ' म्हणतात की, या ग्रंथातील कथा म्हणजे रचलेले एक रूपक आहे. चित्ताची एकाग्रता, आणि कार्यशीलता या दोन गुणांवर अनुक्रमे समाधी वैश्य व सुरथ राजा यांची व्यक्तिचित्रे उभारून त्यांच्या मार्गात आलेल्या अडचणी सद्बुद्धि व विचारशक्ति यांनी

प्रतीक असलेल्या सुमेधा ऋषीने निवारण केल्या असे दाखविले आहे. महाकाली, महालक्ष्मी व महासरस्वती ही त्रिविध रूपे अनुक्रमे शरीरबल, संपत्तिबल व ज्ञानबल यांची प्रतीके आहेत. या तिन्हींच्या उपासनेनेच व्यष्टि व समष्टि यांचे जीवन सर्वांगी समृद्ध होऊ शकेल असा सप्तशती ग्रंथाचा संदेश आहे.

ज्ञानेश्वरांनी सप्तशतीचे जे रूपक केले आहे, त्यात या ग्रंथाला मंत्र-भगवती असे संबोधले आहे. गीतेतील श्रीकृष्णाच्या आश्वासनाप्रमाणे याही ग्रंथात देवीने आश्वासन दिले आहे की, 'ज्या वेळी दैत्यापासून पीडा उत्पन्न होईल त्या वेळी मी अवतार धारण करून शत्रूचा संहार करीन.'

## देवालयांची श्रीमंती

भारतामध्ये जी लक्षावधी देवालये आहेत, त्यांचा योगक्षेम भक्तमंडळींनी समर्पण केलेल्या दानधर्मातून होतो. मग ते दैनंदिन समर्पण असो अथवा पूर्वकाली झालेल्या स्थावर जंगम दानपत्रातून असो. नवसपोर्डीच्या स्वरूपातही विविध वस्तु आणि सुवर्ण, रुपे जमा होत असते. काही दानशूर लोक विविध हेतूंसाठी, मंदिरात दुरुस्ती खर्च, सुवर्णकोथीसाठी खर्च, बांधणी खर्च, शोभेसाठी खर्च इ० करीत असतात. असा खर्च केल्याने पुण्यसंपादन होते अशी त्यांची भावना असते. या प्रकारे पुण्यसंपादन करण्यासाठी पुराणांनी चालना दिलेली आढळते. नरसिंहपुराण सांगते की, मंदिर बांधणीचा विचार झाला म्हणजे पंचमहापातके नष्ट होतात. विष्णुपुराण म्हणते की, देवालयासाठी जो भूमिदान करतो त्याला स्वर्ग मिळतो. शिवधर्मात सांगितले आहे की, शिवमंदिराला शेत-जमीन देणारा अनेक वर्षे रुद्र लोकात रहातो, अशी अनेक वर्णने आहेत. याच्या उलट बाजूने म्हणजे पापक्षालनार्थसुद्धा देवाला दानधर्म केला जातो.

बाराव्या शतकात अजमेर येथील अरुण देवरायाने मुसलमान शत्रूला पराजित करून, भूमीच्या शुद्धीसाठी मोठा यज्ञ केला व नंतर तेथे एक प्रचंड मंदिर बांधले. या प्रकारांनी अन्य मंदिरेही उभी राहिलेली आहेत. मुसलमानांनी मंदिरे भ्रष्ट करून मशिदी बनविल्या. शेवटी जसवंतसिंह व वस्तसिंह या मारवाडच्या राजांनी पुनश्च तेथे भव्य मंदिरे उभारली. विजयनगरचा सम्राट कृष्णदेव याने अशा भ्रष्ट झालेल्या अनेक मंदिरांचा जीर्णोद्धार केला. याचे अगदी ताजे उदाहरण म्हणजे स्वराज्य संपादनानंतर सरदार पटेल व न. वि. गाडगीळ यांच्या प्रेरणेने सौराष्ट्रातील सोमनाथाचे कलापूर्ण मंदिर उभारले गेले. अशी अनेक उदाहरणे सांगता येतील. आक्रमक संस्कृतीने बळकावलेली देवालये, धर्मप्रमाणे परत हिंदुधर्मात आणणे, हे राजसत्तेचे कर्तव्यच आहे, हेच वरील उदाहरणावरून सिद्ध होते. पूर्वीच्या राजसत्तांनी हा धडा घालून दिलेला आहे.

वरीलप्रमाणे द्रव्याचा सचय होऊन श्रीमत झालेली अनेक मंदिरे भारतात आहेत बद्रीनारायण, काशीविश्वेश्वर, डाकोर, पलिताणा, गिरनार, नाथद्वार, तिरुपती, मदुरा, रामेश्वर इ० इ० नाथद्वाराचे वार्षिक उत्पन्न सुमारे वीस लक्षाच्या घरात आहे बद्रीनारायणाच्या स्वामित्वाची गावे ३५० आहेत शिवाय देवापुढे दरवर्षी दीड ते दोन लक्ष रुपये जमा होतात तिरुपतीची एकूण मालमत्ता साडे नऊ कोटींची आहे शिखांची गुरुद्वारे अशीच श्रीमत आहेत

यापेक्षा प्राचीन मदिरांची श्रीमती निश्चित अधिक होती सोमनाथ अनेक वेळा केवळ सपत्तीसाठी लुटले गेले पजाबात ज्वालामुखी, कोटवती आणि अनेक मदिरे लुटली तेव्हा ५० हडे सुवर्ण पायातून काढून घेऊन गेले[1] या प्रकारची काही उदाहरणे या ग्रथात इतरत्र आढळतील

## देवालयाची शिक्षणकेंद्रे

गतकाली दक्षिण भारतामधील देवालयाना सामाजिक जीवनातही फार मोठे मानाचे स्थान होते मदिराच्या निर्मितीमध्ये विविध कलांची जोपासना होत असे सगीत, नृत्य या कलांची वाढ देवालयाच्या आश्रयाने होत असे तसेच या देवस्थानांकडून सस्कृत पाठशाळा चालविल्या जात आणि हजारो विद्यार्थी वेदाध्ययन, धर्मशास्त्र, पुराणे, महाकाव्ये, दर्शने इ० सस्कृत ग्रथांचे अध्ययन करीत असत या सर्वांचा योगक्षेम सस्थानकडून केला जाई यासाठी धनिकांकडून विपुल द्रव्य दानाच्या रूपाने येत असे एन्नासिरम्, तिरुमुक्कुडल, वाहूर, तिरुवोरियुर इ० नगरातील पाठशाळा प्रख्यात होत्या देवालयाबरोबर सलग्न असलेल्या मठातही उच्च शिक्षणाची सोय असे याच सदर्भात ग्रथालये या ठिकाणी असत

पूर्वकाली हे होते आणि सांप्रतही सपन्न देवालयाकडून हे विद्यादानाचे काम होत आहे तिरुपती हे सांप्रत अत्यत श्रीमत देवस्थान गणले जाते या ठिकाणच्या व्यवस्थापकवर्गाने स्थापत्य व इतर महाविद्यालये देवस्थानच्या उत्पन्नातून चालविली आहेत द्वारका येथील श्रीमद् शकराचार्यांच्या मठाकडून याप्रमाणे उच्च शिक्षणाची सोय केली जात आहे अशी अनेक उदाहरणे दाखविता येतील

प्राचीन काळातील हे लोण जे भारतीय परदेशी गेले त्यांनी तेथेही नेऊन पोहोचविले होते जावा-सुमात्राकडील एका मदिरात याप्रमाणे शिक्षण दिले जात असे, दवाखाने चालविले जात, धर्मशाळा व अन्नछत्रही चालविले जात होते, असा इतिहास सागतो पेरु मेक्सिकोकडेही मदिराचे मठ होते आणि शिक्षण

---

१ द्वितीय खडातील पजाबमधील कोटवती-वज्रेश्वरी इतिहास पहा पृ १७३ ते १७५

दिले जात असे. समाजाकडून मिळालेल्या द्रव्याचा उपयोग देवस्थानकार्याकडे करून अधिक असल्याचा उपयोग समाजकार्यासाठी करणे हे अत्यंत उचित असे कार्य सांप्रतच्या मंदिराच्या चालकानी केल्यास आपण केलेल्या दानाचा योग्य उपयोग केला जातो असे समाज मानील, यात शंका नाही.

## देवालय भंजनाचा इतिहास

भारतात ज्या प्रमाणात देवालयांची वाढ झालेली आहे, त्याच प्रमाणात त्यांचा विध्वंसही झालेला आहे. या ग्रंथात निरनिराळ्या क्षेत्रांची माहिती वाचताना, त्या त्या ठिकाणी त्याचा उल्लेख आलेला असून, या प्रकरणात असणे तो उचित वाटल्याने सारांशरूपाने देण्यात येत आहे.

भारतातील देवालयांचे विध्वंसन तीन संस्कृतींनी केलेले आहे.

## बौद्ध संस्कृति

या संस्कृतीच्या वेळी कदाचित् कमी देवालये असावीत. म्हणून विध्वंसन कमी झाले, पण इतक्या शांत दिसणाऱ्या संस्कृतीने तेही केलेले आहे, याचे आश्चर्य वाटते. कारण या संस्कृतीचा उदय आर्यधर्मातून झालेला आहे. बद्रिनारायणाच्या प्राचीन मूर्ति बौद्ध भिक्षूंनी तेथील नारदकुंडात फेकून दिल्या होत्या, त्या पुढे आद्यशंकराचार्यांनी वर काढून पुन्हा स्थापना केली. कुशाण राजवटीत उभारलेली आर्यधर्माची मंदिरे बौद्धांनी नष्ट केली. तात्पर्य असे की, जेथे जेथे त्या धर्माचा वरचष्मा होता, तेथे त्यांनी विध्वंसन केलेले आहे, असे इतिहास सांगतो.

## इस्लाम संस्कृति

महंमद कासीम हा खैबर खिंडीतून भारतात येणारा पहिला आक्रमक होय. त्याने सिंध प्रांतातील दावळगावीचे मंदिर मोडले आणि तेथील ब्राह्मणांची सरसहा कत्तल केली ( मु. रियासत, भाग १, पृ. ५९ ). पुढे ११ व्या शतकात गझनीच्या महंमुदाने संपत्तीसाठी सोमनाथाचे मंदिर अनेक वेळा फोडले आणि प्रतिकार करणाऱ्यांची कत्तल केली. मुलतान येथील देवालय फोडून, तेथील सुवर्णमूर्ति उचलून तो घेऊन गेला. १४ व्या शतकात महंमुद बेगडा याने द्वारकेतील मंदिराचा फडशा पाडला. तसेच अल्लाउद्दीन खिलजीने दक्षिणेतील रामेश्वरासह अनेक देवालये मोडली आणि संपत्तीची लूट करून, त्यावर मशिदी उभारल्या. १५ व्या शतकाच्या अखेरीस महंमदशहाने विजयनगर येथे भव्योत्तुंग अनेक मंदिरांचा विध्वंस केला आणि संपत्तीची लूट केली. १७ व्या शतकात औरंगजेबाने काशी येथील विश्वनाथाचे मंदिर जमीनदोस्त करून त्यावर

मशीद उभारली. मथुरा येथील केशवाचे मंदिर तोडून, तेथील मूर्ति आग्रा येथील मशिदीला पायऱ्या म्हणून लावल्या. १८ व्या शतकात अहमद अबदालीने मथुरा येथील अनेक देवालये फोडली आणि संपत्तीची लूट केली. जावा-सुमात्रा भागात या संस्कृतीने हिंदूंची अनेक देवालये उध्वस्त केलेली आहेत. सर्वांत जास्त नुकसान याच संस्कृतीने केलेले आहे.

इसाई संस्कृति

पश्चिम किनाऱ्यावर या संस्कृतीचे प्रथम पाऊल पडले आणि कोकणपट्टी, गोवा, केरळ येथील मंदिरांना ती भोवली. १६ व १७ व्या शतकांत पोर्तुगीजांनी गोवा प्रांतात कहर केला. गोवा, साष्टी व बारदेश या तीनही टापूंतील देवालये नष्ट केली. जेसुइट पंथाचे लोक या कामात अतिशय निर्दयपणे वागले आणि धर्मांतरासाठी त्यांनी अनन्वीत छळ केले. रायतुर येथील किल्लेदार रुद्रीगिश याने एका रात्रीत २८० देवालये नष्ट केली असा इतिहास सांगतो.

या विध्वंसनाच्या खुणा सर्वत्र आजही दिसतात. अनेक संग्रहालयांत मोडक्या-तोडक्या मूर्ति दिसतात, त्या याच कालातील होत. तेथील या तुटक्या मूर्तींवर विधर्मियांचे घण बसलेले आहेत, यात तिळमात्र संशय नाही. जावामध्येही संग्रहालयात हेच दृश्य दिसते. आपण वेरूळ, अजिंठा, घारापुरी इ० अनेक ठिकाणी मोठ्या हौसेने ते अद्वितीय शिल्प पाहण्यासाठी जातो, तेव्हा कोणा मूर्तीचे नाक गेलेले, कोणाचे कान, तर कोणाचे हात गेलेले पाहिले म्हणजे मन विषण्ण न झाल्यास नवल. पण हे आपण पाहतो, सहन करतो !

या मूर्तींना वाचविण्याचा त्या वेळी एकच मार्ग होता, तो म्हणजे त्यांना उचलून सुरक्षित स्थळी ठेवणे होय आणि तोच अनेकांनी अनुसरला. काशी विश्वेश्वराचे शिवलिंग तेथील ज्ञानवापीत, सोमनाथाचे लिंग महाराष्ट्रात शिखर शिंगणापूर येथे, तुळजापूरची मूर्ति तेथील कल्लोळ तीर्थात, मुंबई येथील महालक्ष्मी तेथील खाडीत, चाफळची आदिशक्ति व रामपंचायतनाची मूर्ति अंगणापूरच्या डोहात इ० इ० अनेक उदाहरणे देता येतील. उज्जनीचा महांकाळ, मांधाता येथील ओंकार, औंढ्याचा नागनाथ या शिवलिंगांनाही या दाहक दिव्यांतून जावे लागले. शेवटी ऐतिहासिक घटना इतकीच साक्ष देतात की, दक्षिणेत विजयनगर येथील साम्राज्य आणि हिंदवी स्वराज्याची स्थापना करणारे छत्रपति शिवाजी महाराज उदय पावले नसते, तर आज दक्षिणेत जी अनेक हिंदु मंदिरे मोठ्या डौलाने मिरवत आहेत, तीही नामशेष झाली असती. यासंबंधी भूषण कवीचे म्हणणे यथार्थ आहे—

काशी की कला जाती, मथुरा मसीत होती।
सिवाजी न होते, तो सुनति होत सबकी ॥

यासाठीच भारतीयांनी या राष्ट्रपुरुषाचे सदैव ऋणी राहिले पाहिजे. केवळ वाचेने आणि देखाव्यांनी नव्हे, तर त्यांच्या प्रत्येक चांगल्या कृतीचे मनोभावे आचरण करून आणि वेळप्रसंगी मातृभूमीसाठी प्राणार्पण करूनही.

या संबंधात ज्यूधर्मीयांचे उदाहरण ( इतरापेक्षा उद्बोधक असून ) घेण्यासारखे आहे. बॅबीलोन-हिटाइट संस्कृतीचे कालात २५०० ज्यू लोकांना युद्धकैदी म्हणून नेबुचोनझर या गावी ठेवले असताना, आपले राष्ट्रप्रेम व्यक्त करताना त्यांनी खालील उद्गार काढलेले आहेत—

(1) If I do not remember Thee, let my tongue cleave to the root of my mouth;

If I forget Thee, O Jerusalem, let my right hand forget her cunning ( Toyenbee : History, Vol I, P. 443 )

जर माझे राष्ट्रमातेला मी विसरणार असेन, तर माझी जीभ टाळ्याला जखडून जावो ( वाचा बंद होवो ) अगर हाताचा कुशलपणा नाहीसा होवो म्हणजे हात इतर कोणतेही काम न करोत. दोन हजार वर्षांपूर्वी त्या संस्कृतीमध्ये जे राष्ट्रप्रेम होते ते सांप्रतही तितकेच जाज्वल्य आहे याचा अनुभव नुकताच इजिप्त-पॅलेस्टाईन संघर्षात सर्वांना आलाच आहे.

इसराईल देशाचे अध्यक्ष बेन गुरियान यांनी फ्रान्स देशाचे अध्यक्ष जनरल द गॉल यांना जे पत्र लिहिलेले आहे, त्यामध्ये त्यांनी वरील ध्येय-वाक्यावरच भर दिलेला आहे. ते पुढे असे वर्णन करतात की, बॅबीलोन, हिटाइट, रोमन राजांनी सततच्या प्रयत्नाने इसराइल राष्ट्र नष्ट केले आणि ज्यू जमात आश्रयार्थ इतर देशांत गेली. दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी तर सहा लक्ष ज्यू जमातीची हिटलरने क्रूर कत्तल केली. तरी वरील ध्येय-वाक्यानुसार १८०० वर्षांच्या प्रदीर्घ कालखंडानंतर, जागतिक राष्ट्रसंघाला सन १९४७ च्या करारानुसार इसराइल राष्ट्र निर्माण करावे लागले आणि १४ मे १९४८ रोजी ते प्रत्यक्षात अस्तित्वात आले. जगाच्या नकाशावर ते आता कायम राहणार आहे

भारताने सांप्रत स्वातंत्र्य प्राप्त करून घेतले आहे. लोकशाही शासन आहे, अशा वेळी व्यक्तिस्वार्थ अगर पक्षस्वार्थ यापेक्षा राष्ट्र-ऐक्य संरक्षिण्याकडे अधिक लक्ष केंद्रित करणे नितांत आवश्यक आहे. याचा बोध वरील उदाहरणावरून प्रत्येकाने घेणे, त्याचे कर्तव्य आहे.

### विश्वस्त

पूजकवर्गावर देवता मंदिरे व्यवस्थित व नीटनेटकी ठेवण्याची जेवढी जबाबदारी आहे, त्यापेक्षा सरस ती विश्वस्त आणि चालक-मंडळींवर आहे. अनेक

ठिकाणी असे घडते की, चालक वर्ग मंदिर ही आपली खाजगी मालमत्ता समजून भक्तमंडळींच्या इच्छेविरुद्ध अगर देवस्थानची सोय, गैरसोय न पहाता आपले अगर आप्तसंबंधीयांच्या हितासाठी वास्तूची विल्हेवाट लावतो. देवस्थानमध्ये जी धार्मिक कृत्ये, कथा पुराणे व्हावयास पाहिजेत त्याला अडथळे आणतो. केवळ द्रव्यार्जनावर दृष्टि ठेवून मंदिराचा वापर विवाह समारंभ अगर बाजारी दुकानांसाठी करतो. याचा परिणाम देवस्थानची शांतता भंग, नित्यनेमात व्यत्यय आणि पावित्र्यभंग यामध्ये होतो. समाजातील धार्मिक भावना जागृत करणे आणि ती वाढीस लावणे हे प्रमुख कार्य, चालकवर्ग मूलतःच विसरतो. त्यामुळे मंदिर-संस्थेचे उद्दिष्टच संपुष्टात येते. 'शिवस्व' म्हणून प्रसादाव्यतिरिक्त इतर कोणत्याही वस्तूचा स्वीकार अगर देवस्थानच्या वस्तूचा वापर चालकवर्गाकडून होता कामा नये, म्हणजेच तो उत्तम संचालक ठरेल.

विश्वस्त अगर चालक किती प्रामाणिक असावयास पाहिजे याचे हे उदाहरण पहा. लोकमान्य टिळक, पुणे येथील श्रीमान भाऊमहाराज पंडित घराण्याचे विश्वस्त म्हणून काम पहात असत. एके वेळी बागेतील माळ्याने काही भाजी लो. टिळकांच्या घरी आणली असता ते म्हणाले, 'ही भाजी येथे ठेवू नको व आपल्याही घरी तू नेऊ नकोस, महाराजांच्या घरी नेऊन पोहोचीव. पुन्हा केव्हाही अशा वस्तु आणू नकोस, कारण बागेचे मालक अज्ञान जगन्नाथ महाराज आहेत.' इतकेच नव्हे तर स्वतःचा समृद्ध भाजीचा मळा दाखविण्यासाठी, त्या माळ्याला त्यांनी पुण्याच्या मंडईत नेले व भाजीपाला दाखविला.

मनुस्मृतीमध्ये असा उल्लेख आहे की,

> देवस्वं ब्राह्मणस्वं वा लोभेनोपहिनस्ति यः ।
> स पापात्मा परे लोके गृध्रोच्छिष्टेन जीवति ॥ (मनुस्मृति)

भावार्थ असा की देव ब्राह्मणासंबंधीचे धन जो पापी पुरुष लोभाने हरण करतो, तो मरणोत्तर अन्य लोकात गिधाडाच्या उष्टया अन्नाने पोसला जातो.

वरील विवेचनावरून मंदिर चालकाची भूमिका किती उदार आणि प्रामाणिक असावयास पाहिजे याची कल्पना येईल. खाजगी आणि सार्वजनिक या दोन प्रकारच्या मंदिरसंस्था. अर्थात, वरील विवेचन विशेषतः सार्वजनिक संस्थांना लागू आहे. खाजगी संस्थाबद्दल काहीही न लिहिणेच बरे, कारण चालकाचा निर्वाहच मंदिरावर अवलंबून असतो.

(मंदिराची कथा व व्यथा, ले. ना. ह. पालकर, पृ. ६२)

## देवालय सुधारणा

पं. महादेवशास्त्री जोशी यानी 'भारतीय संस्कृति कोशा'मध्ये काही सुधारणा एकदर चालू परिस्थितीचे निरीक्षण करून सुचविल्या आहेत व त्या योग्यच आहेत. त्याचा सारांश असा —

( १ ) देवालयामध्ये अंतर्बाह्य स्वच्छता असावी, कारण पावित्र्याच उगम या स्वच्छतेपोटी होत असतो.

( २ ) निष्ठावंत आणि कर्तव्यदक्ष नियनक असावेत.

( ३ ) एका मंदिरात अनेक मूर्तींची स्थापना टाळली पाहिजे आणि ती आवश्यक वाटली तर त्याच सांप्रदायातील देवतांची असावी. रामाच्या देवालयात दुर्गादेवीची मूर्ति नसावी.

( ४ ) मंदिर परिसरात नेहमी गांभीर्य, पावित्र्य व सौंदर्य या गोष्टींचा अनुभव दर्शनाला येणाऱ्या भक्ताना झाला पाहिजे.

(५) वरील परिस्थिति निर्माण करण्यासाठी जागा असेल तर सुंदर पुष्पवटिका छायावृक्ष, त्या त्या देवतेच्या गुणवर्णनपर चित्रे अगर कलापूर्ण चित्रण सर्वत्र दिसावे. यामुळे दर्शकाचा भक्तिभाव वाढीस लागेल उदाहरणच द्यावयाचे तर दिल्ली येथे बिर्ला शेटजींनी जे लक्ष्मी-नारायणाचे सुंदर मंदिर उभारले आहे, त्यामधील चित्रसंग्रहाचा आणि गीता-श्लोकाचा देता येईल.

( ६ ) आजकाल आर्थिक परिस्थिति कमालीची अस्थिर झाल्यामुळे मंदिराबाहेर जी दीन-दुबळी माणसे दानासाठी बसतात त्याचा योग्य बंदोबस्त केला पाहिजे. द्रव्यदान हे कितीही पुण्यकारक असले तरी ते योग्य ठिकाणी द्यावयास पाहिजे असा शास्त्राचा व संताचा दंडक आहे, पण त्यासाठी मंदिर परिसर ही जागा नसावी ते अत्यंत हिडीस प्रदर्शन पवित्र ठिकाणी प्रवेश करताना आणि बाहेर निघताना होते. त्यामुळे उच्च वातावरणातून बाहेर निघालेला दर्शक त्या फेऱ्यात पुन्हा घेरला जातो

( ७ ) मंदिराच्या परिसरात जसे दीन-दुबळे नसावेत, तसे दुकानदारही नसावेत. मंदिरात अनेक देवमूर्तींचा बाजार, बाहेर दीन-दुबळ्याचा बाजार आणि हा दुकानदाराचा बाजार याने भक्त भांबावून जातो. त्याला शांतता लाभत नाही. मग एकाग्र चित्ताने कसे दर्शन घेणार ?

---

टीप— या प्रकरणातील काही परिच्छेद भारतीय संस्कृति कोश, भाग ४ यातून घेतलेले आहेत.

# निग्रही देवता

(१) श्रीचादला परमेश्वरी
(२) अजुबाई
(३) कमलादेवी
(४) कौंडणपूर देवी
(५) छेला सोमनाथ
(६) दंतेश्वरी
(७) नाथद्वारा
(८) भैरवनाथ
(९) सालरगड-वासिनी
(१०) गोकर्ण महाबळेश्वर
(११) ज्ञानेश्वर समाधी
(१२) छोडेश्वरी
(१३) रमा-लक्ष्मी

स्त्रीहट्ट, बालहट्ट व राजहट्ट यापैकी कोणताही हट्ट, प्रत्यक्ष ब्रह्मदेवच काय पण त्याचा पितामह देखील आला तरी त्याला पुरविता येणे अशक्यच, ही गोष्ट अगदी काळ्या दगडावरची रेघ आहे! आपण आता पाहाणार असलेल्या प्रकरणाचे नाव थोडे विचित्रच वाटते नाही! पशुपक्षी, सजीव प्राण्याप्रमाणे देवदेवतादेखील हट्ट करतात की काय! पण वाचकहो, काहीतरीच नव्हे, तर अगदी तंतोतंत खरे आहे ते! म्हणूनच तर हे प्रकरण मी तुमच्यापुढे ठेवत आहे. पशुपक्ष्यांचा हट्ट आपल्याला सर्कशीत हमखास पाहावयास सापडतो. सर्कशीमधील कुत्रा, घोडा, सिंह यांना शिकवून तयार केलेले कार्यक्रम आपण नेहमी पाहातो. परंतु एखादे वेळी एखादी गोष्ट एखाद्या प्राण्याच्या मनाविरुद्ध झाली अथवा त्या वेळी त्याची लहर नसली तर तो प्राणी अडून बसतो आणि ठराविक संकेता-बरहुकूम तो प्रत्येक गोष्ट करत नाही. पण त्याचा हा हट्टीपणा त्याचा मालक चाबकाच्या फटकाऱ्याने घालविण्याचा प्रयत्न करतो आणि बहुशः हा प्रयोग शभर टक्के यशस्वी होतो. परंतु काही काही वेळा हा प्रयत्न अजिबात यशस्वी होत नाही आणि त्या जनावराला नाईलाजाने पिंजऱ्यात कोंडून परत आत पाठवूनच द्यावे लागते. स्त्रीहट्ट आणि बालहट्ट याबद्दल तर काही विचारूच नका! त्याचा अनुभव प्रत्यही प्रत्येकाला येतोच. तेव्हा त्याबद्दल मी येथे अधिक काही न लिहिणेच बरे!

देवताचे कार्य आपल्या लाडक्या भक्ताचा हट्ट पुरविणे हे आहे. बालध्रुवाने हट्ट धरला, श्रीविष्णूंनी त्याला अढळपद बहाल केले. रावणाने तपःसाधना करून श्रीशंकरांजवळ हट्ट धरला, त्याला शंकरांच्या आत्मलिंगाची प्राप्ति झाली. इतकेच नव्हे, तर एकदा श्रीशंकरांनी आपली लाडकी पत्नी पार्वती ही देखील भक्ताच्या हट्टाखातर देऊन टाकली होती. ही सर्व उदाहरणे पाहिली म्हणजे भक्ताची

कोडकौतुके पुरविणारा देव भक्ताजवळच हट्ट करील ही गोष्ट मनाला पटत नाही. संदीपला सांठे बंधूंचे चॉकोलेट किंवा जयदीपला वरखाली डोळे करणारी बाहुली आणून देणाऱ्या दादासाहेबांनी, संदीप–जयदीप यांच्याजवळच एक दिवस दादासाहेबांनी खाऊसाठी हट्ट धरावा तशातलीच गोष्ट आहे ही! परंतु प्रत्यक्षात अशी गोष्ट देवतांच्या बाबतीतही कधी कधी घडते आणि त्याचीच काही उदाहरणे या प्रकरणातच नमूद करण्याचे योजिले आहे.

शृंगेरी येथे आद्य श्रीशंकराचार्यांनी शारदेची मूर्ति स्थापन केलेली आहे. क्षेत्रोपाध्याय अशी कथा सांगतात की, शंकराचार्यांनी ही मूर्ति काश्मीर येथून आणली. परंतु त्यांनी मागे वळून पाहाण्याचे वचन मोडले म्हणून देवी या ठिकाणी स्थिर झाली. या व इतर पुढे दिलेल्या उदाहरणावरून असे एक तत्त्व रूढ दिसते की, देवता भक्ताबरोबर त्याने सांगितलेल्या ठिकाणी जाण्यापूर्वी 'आपण दोघे जात असता तू इच्छित ठिकाण येईपर्यंत मजकडे मागे वळून मुळीच पाहावयाचे नाही. जर का पाहिलेस तर मी तेथेच तत्क्षणीच थांबेन आणि स्थिर होईन.' अशी त्याला अट घालीत. अनवधानाने किंवा अज्ञानाने त्या भक्ताने ही अट मोडली तर दयाळू दृष्टीने आणि उदार अंतःकरणाने त्याची ही चूक पोटात न घालता निग्रहीपणाने किंवा आग्रहीपणाने तेथेच स्थिर रहात. ही अट घालण्यात भक्ताचा अढळ विश्वास आणि त्याच्या मनाचे स्थैर्य याचे परीक्षण करण्याचा देवतेचा हेतु असेलही कदाचित्! परंतु बहुतेक वेळी बहुतेक देवतांनी हीच अट आपल्या भक्तांना घातलेली दिसून येते.

अशा या पार्श्वभूमीवर काही देवतांचा इतिहास खाली नमूद करीत आहे. त्यावरून वाचकांना या वर्गातील देवतांची थोडीफार माहिती कळून येईल.

## (१) श्रीचांदला परमेश्वरी

दक्षिण रेल्वेमार्गावर शहाबादवाडी जंक्शनपासून पुढे नलवार स्थानक असून, तेथून १२ मैल अंतरावर, सन्नती ऊर्फ संती नावाचे क्षेत्र आहे. या क्षेत्री गावापासून दीड मैलावर अरण्यात देवीचे मंदिर आहे. देवालयाचा आकार श्रीचक्राकार असून, महाद्वार पूर्वाभिमुख आहे. या पुरातन मंदिराच्या दक्षिणभागी भीमा नदी वाहत असून, सुमारे दोन सहस्र भक्तमंडळी बसतील एवढा विस्तीर्ण सभामंडप आहे. रेल्वेस्थानकापासून मंदिरापर्यंत जाण्यास चांगली सडक आता तयार केलेली आहे. सेतुराजाची ही राजधानी होती आणि त्याचे अवशेष आसमंतात आढळतात. गावाच्या पश्चिमेस सोमेश्वराचे मंदिर असून त्यामागे भीमानदीचा डोह आहे.

या क्षेत्री देवीची वाळुकामय सुमारे तीन फूट उंचीची मूर्ति, खाली तळ घरात आहे गर्भगृहात जाण्यास वाट एक माणूस जाण्याइतकीच आहे. देवीची मूर्ति तुळजाभवानीची प्रतिकृति वाटते, म्हणजे अष्टभुजा महिषासुरमर्दिनी होय या मूर्तीपुढे एक फूट लांबीच्या शहाबादी दगडाच्या दोन पादुका असून एकाला दोन तर दुसऱ्याला तीन मोठी छिद्रे आहेत या छिद्रांचा संबंध भीमानदीच्या डोहाबरोबर लावतात म्हणजे या छिद्रात वाहिलेली फुले, फळे, नारळ आदी वस्तु, तेथून दोन मैलावर असलेल्या डोहात बाहेर पडतात. दक्षिणेत बाहुबली क्षेत्री हीच अंतररचना आहे तेथे टेकडीमाथ्यावर असलेल्या पुतळ्याच्या मस्तकी ओतलेले शेकडो मण दूध, दीड मैलावर खाली गायमुखातून बाहेर पडते आणि ते प्रसाद म्हणून वाटले जाते

मुख्य मंदिराभोवती १२ ज्योतिर्लिंगे स्थापिलेली असून महाकाली, महालक्ष्मी आणि महासरस्वती यांच्याही मूर्ति आहेत येथील उत्सवाचा मुख्य कार्यक्रम चैत्र व १ ते ७ पर्यंत असतो येथील वैशिष्ट्य असे की, दररोज सकाळी मूर्तीचे स्नान झाल्यावर, उत्सवमूर्ति निरनिराळ्या वाहनावरून वाद्यांच्या गजरात भीमा काठी असलेल्या सोमेश्वराच्या मंदिरात आणली जाते आरती झाल्यावर परत स्वस्थानी जाते पंचमीच्या दिवशी रथोत्सव असतो नवरात्रातही उत्सव करतात मंदिराची व्यवस्था ' चादला परमेश्वरी सेवा समिति ' पाहते

या देवीचे दुसरे एक स्थान शहाबाद स्टेशनपासून तीनचार मैलांवर व्हनगुंटी गावी अरण्यात आहे. या ठिकाणी भीमा नदी आणि कागिणा या दोन नद्यांचा संगम असून, तेथेही सोमेश्वराचे मंदिर आहे. देवीचे मंदिर उंचावर असून, तेथील मूर्तीही वालुकामय चार फुटांची, महिषासुरमर्दिनीची आहे. या दोन्ही क्षेत्रांचा कथानकामध्ये अन्योन्य संबंध आहे

या देवतेच्या अवताराची कथा अतिशय रम्य असून, देवीमहात्म्य, स्कंद पुराण, मार्कंडेय पुराण यातून उल्लेख आढळतो कथाभाग असा की, रावणाचा संहार करून श्रीप्रभुरामचंद्र अयोध्याला परत आल्यावर राज्याभिषेकसमारंभ चालू झाला सर्व राजेरजवाड्यांना निमंत्रणपत्रिका गेल्या, पण समुद्रनाथ नावाचे दक्षिणेतील एका राजाला हेतुतः पत्रिका धाडली गेली नाही त्याचे कारण असे होते हनुमंताला सेतु उभारण्यास त्यानेच सहाय्य केले, म्हणूनच तो पुरा झाला, असा त्याला अहंकार झालेला होता निमंत्रण न आल्याने समुद्रनाथ कोपायमान झाला आणि अयोध्येला जाऊन श्रीरामप्रभूंना याचा जाब विचारला शब्दाला शब्द वाढत गेले आणि श्रीरामाचा अपमान होण्यात त्याचे पर्यवसान झाले. सीतादेवींनी हा सर्व प्रकार पाहिला पतीचा अपमान करणाऱ्याबद्दल घृणा

उत्पन्न झाली आणि त्यानी उत्स्फूर्तपणे त्याला शाप दिला की, 'भ्रमराकरवीच तुझा वध केला जाईल.'

द्वापारयुग संपले आणि कलियुग चालू झाल्यावर विंध्याचल पर्वताच्या पायथ्याशी देवदत्त नावाच्या राजाला नारायण नावाचा पुत्र होता. हाच रामचंद्राचा तिसरा अवतार असे मानीत असल्याने तो नारायणमुनि नावाने प्रसिद्ध झाला. याच सुमारास राजसेन नावाच्या राजाला चंद्रवदनी नावाची कन्या झाली. आणि ती सीतादेवीचा अवतार असे मानले गेले. तिच्या विवाहाच्या वेळी 'पण' होता की, जो कोणी लोहस्तंभाची छाया पाण्यात पाहून, बाणाने स्तंभ खाली पाडील, त्याला मुलगी मिळेल.[1] कर्मधर्मसंयोगाने नारायणमुनींनी तो स्तंभ पाडल्यामुळे त्याचा विवाह चंद्रवदनीबरोबर झाला होता.

आपले वैवाहिक आयुष्य नारायणमुनि भीमा नदीकिनारी पर्णकुटीत व्यतीत करीत असताना सेतुराजाचे लक्ष चंद्रवदनीकडे वेधले. हा सेतुराजा म्हणजे अप्सरेच्या पोटी जन्म घेतलेला पूर्वाश्रमीचा समुद्रनाथच होय. सेतुराजा त्या स्वरूपाला मोहित झाला आणि क्षुधा तृषा शांत करण्याच्या मिषाने तो पर्णकुटीत गेला. आतमध्ये चंद्रवदनीला एकटीच पाहून, त्याच्या आसुरीवृत्ति जाग्या झाल्या आणि तो बलात्कार करण्यास उद्युक्त झाला. स्त्रियाना संकटाच्या वेळी वेळ कशी निभावून न्यावी आणि आजचे मरण उद्यावर कसे ढकलावे याचे उपजतच ज्ञान असते. चाणाक्ष स्त्रिया योग्य वेळी ते उपयोगात आणतातही. चंद्रवदनीने तेच केले. अतिशय नम्रभावाने तिने सेतुराजाची प्रार्थना केली की, '४० दिवसाचे उपोषण तिने कालच सुरू केले असल्याने व्रतभंग करणे बरे नव्हे. व्रत पूर्ण झाल्यावर ती त्याच्या मनाप्रमाणे वर्तन करील.' आपला हेतु साध्य होणार, या खुषीतच त्याने तिला आपल्याबरोबर घेतले आणि निघून गेला.

नारायणमुनि पर्णकुटीत आल्यावर आपली पत्नी स्वागतास उपस्थित नाही, असे पाहताच, अंतरज्ञानाने त्यानी सर्व प्रकार समजून घेतला आणि अंतर्मन सूचनेनुसार ते काश्मीरप्रांती हिंगुळा देवीच्या अनुष्ठानास निघून गेले. देवीची भक्तिभावाने सेवा केल्यानंतर देवता प्रसन्न झाली आणि सेतुराजाला ठार करण्याचे तिने मान्य केले. नारायणमुनींना तिने आज्ञा केली की, इच्छित स्थळापर्यंत त्यानी पुढे चलावे, मागे वळून पाहू नये. देवता त्याच्या मागे येऊन आपले कार्य पुरे करील. देवीच्या पायातील नुपुराच्या निनादात याप्रमाणे त्याचे मार्ग-आक्रमण

---

१ टीप— द्रौपदी स्वयंवराच्या वेळी अर्जुनाने याचरीतीने मत्स्यभेद केलेला आहे. ग्रीक पुराणातही या सारखे प्रसंग वर्णिलेले आढळतात.

चालले असता भीमा कागिणा संगमाच्या ठिकाणी रेतीमधून जात असता नुपुराचा आवाज मुनींना ऐकू येईनासा झाला तेव्हा त्याच्या मनात संशय उत्पन्न झाला आणि मागे वळून पाहताच, देवीने पुढे जाण्याचे नाकारले इच्छित कार्य पुरे होण्यापूर्वीच देवतेचे सहाय्य नष्ट झाले आणि शत्रूचा नि पात तर झाला नाही, यामुळे तो बेचैन झाला तेव्हा देवीने स्वत त्याला श्रीफल प्रसाद म्हणून दिले आणि सेतुराजाच्या राजवाड्यात ते फोडावे अशी आज्ञा केली त्याप्रमाणे नारायणमुनींनी श्रीफल घेऊन राजवाड्यात जाऊन ते फोडले तोच आश्चर्य झाले की, त्यामधून पाच भ्रमर प्रथमत निघून त्याचे रूपातर सहस्रावधी भ्रमरात झाले सीतादेवीच्या पूर्वीच्या शापाप्रमाणे त्या भ्रमरानी सेतुराजाचा वध करून चद्रवदनीची सुटका झाली असे सागतात की, भ्रमराचा सभोवार इतका त्रास झाला की, राजाला एक क्षण विश्राती मिळेना शेवटी भीमा नदीच्या डोहात त्याने देहार्पण केले पुढे असे सागतात की, आपला देह यापुढे पतीचे नित्य कर्माला योग्य नाही, असे समजून नदीवरील ग्रामदेवता सोमेश्वराच्या चरणी प्रार्थना करीत असतानाच चद्रवदनीचे प्राणोत्क्रमण झाले लिंग दुभगले आणि तिचा आत्मदेह त्यामध्ये विलीन झाला याची खूण म्हणून लिंगामध्ये पडलेली चीर आजही दिसते

नारायणमुनींची पत्नी चद्रवदना सेतुनाथाने पळवून आणल्यावर येथील सोमेश्वराच्या मदिरात ती व्रताच्या समाप्तीसाठी बसलेली होती शिवलिंगात देह विलीन झाल्यावर, तेथेच शहाबाद फरशीवर दोन पादुका तयार झाल्या आणि पाच भ्रमर, छिद्रे करून अतर्धान पावले नारायणमुनि विजयी मुद्रेने पत्नीची भेट घेण्यास आले असता त्याना हे दृश्य दिसले त्यानी आज्ञा केल्यावरून त्या पादुका तेथून हलविल्या आणि दीड मैलावर असलेल्या देवीच्या मदिरात मूर्तीच्या समोर स्थापन केल्या साप्रतही त्या त्याच ठिकाणी आहेत नरसिंह सरस्वतींनी याच अरण्यात अनुष्ठान केले आहे शृगेरीपीठाच्या शकराचार्यांनी या देवीचे अष्टोत्तर शतस्तोत्र तयार केलेले आहे तसेच जगन्नाथ पडित, मुद्दुरग, लिंग सुरू, विठ्ठल वगैरे कवींनी या देवीचा महिमा गायिला आहे. बावन्न शक्तिपीठापैकी, कर्नाटकातील अज्ञात देवीक्षेत्र ते हेच असावे असे काहींचे मत आहे असे सागतात की, विख्यात गणिती भास्कराचार्य, यानी बारा वर्षाच्या पार्थिव पूजेनतर दृष्टातप्रमाणे, ही मूर्ति भीमानदीच्या डोहातून वर काढली आणि या क्षेत्री स्थापन केली

कल्याण येथील चालुक्य राजवशाची हा कुलस्वामिनी तसेच गाणगापूर येथील पुरोहितवर्ग व काही यजु शाखीय ब्राह्मणाची ही कुलदेवता आहे या देवीला कोणी चद्रालबा असे म्हणतात, ती अष्टभुजास्वरूप तीस असून चांदला

परमेश्वरी अथवा चंद्रालंबा नाव का आले यासंबंधी एक दंतकथा अशी प्रचलित आहे की, एकदा आदिलशाहीच्या राजांनी त्यांचे राजज्योतिषी दीक्षित यांना असा प्रश्न केला की, 'आज कोणती तिथि आहे?' वास्तविक तो दिवस अमावस्येचा होता, पण ब्राह्मणाच्या मुखातून अनावधपणे 'पौर्णिमा' असा शब्द बाहेर पडला. 'जर आज पौर्णिमा आहे तर रात्री मला चंद्राचे दर्शन घडावे' अशी राजाने विनंती केली. ब्राह्मणाला आपली चूक समजून आली असता वचन पुरे कसे करावे यासंबंधी विचार करीत तो खिन्नवदन घरी बसला होता. त्याच्या पत्नीने तो प्रकार जाणल्यावर 'कार्येषु मंत्री' या नात्याने तिने आपली भूमिका पार पाडली. पत्नीने देवीजवळ धरणे धरले आणि पतीची चिंता निवारण करण्यास विनविले. देवीच्या दृष्टांतानुसार नंतर ब्राह्मणाने रात्रौ राजवाड्यात गेल्यावर, आपल्या स्त्रीचे रत्नकंकण आकाशात फेकले आणि आश्चर्यकारक गोष्ट म्हणजे राजाला व इतराना चंद्राचे दर्शन झाले.

ब्राह्मणाच्या कृत्यात काही जादू असेल आणि त्याला एकट्यालाच दर्शन मिळाले किंवा कसे हे पाहण्यासाठी राजाने चारी दिशाना घोडेस्वार पाठविले. बारा कोसापर्यंत सर्वांना चंद्रदर्शन झाले अशी राजाने खात्री करून घेतली. त्या ब्राह्मणाला वंशपरंपरागत वार्षिक नक्त नेमणूक व इनाम जमीन दिली. ती आजतागायत त्या जोशी घराण्यात चालू आहे.

ब्राह्मणाच्या या सामर्थ्याप्रमाणे, कुलाबा जिल्ह्यातील जंजीरा संस्थानचे नबाबालाही, एका ब्राह्मणाने अमावास्यारात्री चंद्रदर्शन घडविले, असा कथाभाग अन्यत्र वाचावयास मिळेल.

सुरवातीला वर व्हन्नगुंटी या ठिकाणी देवीचे स्थान आहे, असे म्हटले आहे. नारायणमुनीबरोबर हिंगुलादेवी येथपर्यंत मागोमाग आली आणि नंतर पुढे जाण्याचे नाकारले, म्हणून या क्षेत्री मूर्तीची स्थापना झाली. नारळाचा कृपा-प्रसाद नारायणमुनींना तिने याच ठिकाणी दिला. नंतर ते सन्नती येथे सेतुराजाचे वाड्यात गेले आणि श्रीफल फेकल्यावर पाच भ्रमर बाहेर आले. नरहरी नावाच्या भक्ताने या देवीची आरतीरचना केली आहे. इतरांच्या माहितीसाठी ती मुद्दाम खाली देत आहे.

भीमातीरी अंबे धरिला अवतार। वामांगी महाबळी विश्वआधार।
मिरवितो दक्षिणे भैरव सुंदर। सन्मुख मार्कंडेय मुनिवर थोर ॥ १ ॥
चतुर्भुज दिससी नयनी सुंदर। शंख, चक्र, गदा त्रिशूळाधर।
श्वेतांबर वरधर तू योगेश्वरी। रत्नखचित मुकुट शोभतो शीरीं ॥ २ ॥

कर्णी कनकपात्र वर्तुळाकार । कमलनयनीं अंजन मिरवे सुंदर ।
ललाटी कस्तुरीं भाळीं शेंदूर । प्रसन्न वदनी अंबे भक्ता साकार ॥ ३ ॥
आरुढ सिंहासनी होऊनी चंद्रेला । सेतुराया पद्पद सुपात्रशीला ।
सुरवरी पुष्पांचा वर्षाव केला । उदो उदोकार नाद घुमला ॥ ४ ॥
सुरवर इंद्रादिक तव चरण ध्याती । चतुर्वेद तेही महिमा वर्णिती ।
भक्तजनीं वांच्छा हेतु पुरताती । बालक नरहरी ओवाळी आरती ॥ ५ ॥

वरील आरती व माहिती प्र. रा. नेलेंकर, वकील, खेड, जि. पुणे यांनी पत्राने कळविली. पण देवताचे वर्णन त्याना सांगता येईना. स्वरूपवर्णन करताना देवी चतुर्भुज आहे असे म्हटले असले तरी ती सिंहवाहनी आहे. सेतुराजाच्या वधासाठी अवतार घेतला, त्या वेळी देवानी पुष्पवृष्टी केली, याचा संबंध देवीच्या उत्पत्तीच्या वरील कथानकाबरोबर मिळताजुळता आहे. शिवाय नावही एकच आहे. तेव्हा या क्षेत्रीची चंद्रालंबा आणि प्रथम वर वर्णिलेली चादला परमेश्वरी ही एकरूपच समजावीत. दोन्ही भिन्न स्वरूपाच्या देवता नव्हेत. या देवतेच्या स्वरूपावरून बलुचिस्थानामधील हिंगुला स्वरूपाची कल्पना येते की, तेही अष्टभुजा महिषासुरमर्दिनीस्वरूपच असावे.

गुरुचरित्र अध्याय ४४ व ४५ मध्ये या देवीच्या नावाचा उल्लेख आलेला असून दत्तभक्त हे क्षेत्रही पूज्य मानतात. असे म्हणतात की, आसपास उत्खनन चालू असून, त्यासंबंधी अवशेष उपलब्ध होत आहेत.

## ( २ ) अजुबाई

औरंगाबाद-अजिंठा मार्गावर गोळेगावपासून चार मैलावर अनवा ( अनंतपूर ) गावी या देवीचे स्थान आहे. देवीचे स्वरूप म्हणजे सुमारे ३ फूट उंचीचा तादळा आहे.

या देवतेच्या स्थापनेचा इतिहास असा समजतो की, १४ व्या शतकात तुकारामपंत नावाचे एक देशस्थ ब्राह्मण या गावी रहात असत. घरात जरी इतर सर्व सुखे होती तरी मूलबाळ नसल्याने ते दुःखीकष्टी होते. त्या गावी ते कोटेश्वर शिवलिंगाची नित्य पूजा करून पुण्यसंचय करीत असत. एके समयी त्या गावी काही वैरागी लोक आले आणि त्या शिवालयात वस्तीला उतरले असता, तुकारामपंतानी त्यांना आपल्या घरी भोजनाला बोलविले. ती सर्व मंडळी पाटावर बसली असता घरातील मुलाना त्याच्याबरोबर पंक्तीला बसविण्यास त्यानी सांगितले. तुकारामपंतांनी मूलबाळ नाही असे उत्तर देताच ती मंडळी भोजन न घेताच

उठली, कारण निपुत्रिकाचे घरी भोजन करणे त्या पेशाला उचित नव्हते. तुकारामपंताना ही गोष्ट मनापासून टोचणी देऊ लागली व ते बैचेन झाले.

शेवटी त्यानी घराचा त्याग केला आणि तुळजापुरी मातेच्या सेवेसाठी राहू लागले. मनोभावे १२ वर्षे सेवा केली नित्य फलाहार घेऊन राहिले तरी मातेची कृपा होईना. असले जीवन जगण्यापेक्षा मातेच्या चरणी प्राणत्याग करण्याचे ठरवून शारदीय नवरात्राच्या होमाच्या वेळी बलिदान करण्याचे निश्चित केले. आदल्या दिवशी देवीने दृष्टान्ताने सांगितले की, ' नरबलीने होमकुंड अपवित्र करू नये.' सात जन्म त्याचे दैवात पुत्रलाभ नसल्याने काही करता येण्यासारखे नाही ' या दृष्टान्तामुळे त्याच्या मन अधिकच निराशामय झाले आणि इतके जन्म निपुत्रिक राहावयाचे तर बलिदान करणेच योग्य होय. म्हणून त्याचा निश्चय दृढ झाला शेवटी भक्ताच्या निग्रहासाठी देवीने त्याच्या घरी स्वत मुलगी म्हणून जन्म घेऊन फक्त पाच वर्षे राहावयाचे मान्य केल्यावर, त्याने आपला निश्चय बदलला.

कालांतराने त्याला कन्यारत्न होऊन दिवसामाशी घरी वाढू लागले. बालपणीच तिने काही चमत्कार केले आणि आपला जन्म अजरामर केला. एके वेळी राजरस्त्याने राजाचा खजिना चालला असता, त्या मुलीने पृच्छा केली की, ' पेटयामध्ये काय भरून चालले आहे ? ' खजिनदारानी चेष्टेच्या स्वरात उत्तर दिले की, ' त्यामध्ये दगड भरले आहेत ' खजिना इष्टस्थळी पोहोचल्यावर, खरोखरच पेटयामध्ये दगड निघाले.

हे वृत्त राजाला समजल्यावर त्या मुलीला बोलावून घेण्यात आले व तिची सर्व चौकशी झाली तो राजा कुष्ठ विकाराने त्रस्त झाला असल्याने आणि ही मुलगी कदाचित आपणाला मुक्त करील, या श्रद्धाभावनेने, आपला रोग नष्ट करण्यास सांगितले सांप्रत ज्या ठिकाणी मंदिर आहे, त्याच्या जवळच तिने एक जागा दाखवून तेथे विवर खोदण्यास सांगून त्या पाण्याने स्नान केल्यास तो रोगमुक्त होईल असे वरदान दिले. आश्चर्य असे की खरोखरच त्या प्रमाणे विहिरीतील पाण्याने तो रोगमुक्त झाला. या उपकाराची स्मृति म्हणून राजाने एक मोठा मळा देवाच्या दैनंदिन खर्चासाठी इनाम दिला आणि अद्यापि तो त्याच मंदिराकडे आहे

देवीने तुकारामपंताच्या घरी राहण्याची मुदत भरली आणि आपले अवतार कार्य संपवून ती निघून गेली स्मशानातून परत येताना तुकारामपंताना पुन्हा

१. हीच विचारसरणी दक्षयज्ञामध्ये सतीने अनुसरली आहे.

अतिशय दुःख झाले आणि देवीची प्रार्थना केली. त्या वेळी त्याच्या कानी शब्द आले 'मी घरी येत आहे. पण मार्गामध्ये मागे वळून पाहू नये.' तुकारामपंताना आनंद झाला आणि घरी येण्यास निघाले, पण कानी ऐकलेल्या शब्दावर विश्वास बसेना आणि काही अंतरावर मागे वळून पाहताच मुलीने दर्शन दिले आणि ती अदृश्य झाली. ती ज्या ठिकाणी विहिरीजवळ अदृश्य झाली, त्याच ठिकाणी मंदिर बांधून तादळा उभा करण्यात आला आहे. चैत्र शुद्ध ८ रोजी येथे मोठी जत्रा भरते सांप्रत तेथील मठात एक स्वामी आहेत. त्यांच्या अंगात देवीचा संचारही होतो आणि यावरून ते एक जागृत स्थान मानले जाते.

(निवेदक, कमलाकरबुवा औरंगाबादकर)

दासगणू महाराजांनी गोदावरी महात्म्य नावाची पोथी लिहिलेली असून, त्यामध्ये मोगरे घाटावर हे मंदिर आहे असा उल्लेख केला आहे. याच देवीला भिल्ली, भद्रा, कालिका, मुक्तकेशी, या नावाने संबोधतात. शंबासुराच्या युद्धामध्ये अजैका देवीला त्याने गिळून टाकल्यावर, त्याचे पोट फोडून ती बाहेर आली व गोड गावी वस्ती केली असा उल्लेख आहे. यज्ञकुंडातून अजैका देवीचा जन्म झाला म्हणून ती त्या नावाने प्रसिद्ध झाली. या अजैका नावाचे रूपांतर अंजुबाई नावामध्ये झालेले असावे असे दिसते (गोदावरी महात्म्य, पृ. ९५)

## (३) कमलादेवी

करमाळे हे सोलापूर जिल्ह्यातील एक तालुका ठिकाण. त्या गावी शहराच्या पूर्वदिशेला अर्ध्या मैलावर हे देवालय आहे. हे स्थान उंच टेकाडावर आहे. रावराजे निंबाळकर यांच्या जहागिरीचा हा गाव असून गत वैभवाची साक्ष देण्यासाठीच जणू एक भुईकोट किल्ला तेथे उभा आहे. रावराजे स्वतः अत्यंत धार्मिक भावनेचे असल्याने प्रति मंगळवारी तुळजापुरी जाऊन मातेचे दर्शन घेत असत. त्यांच्या एकनिष्ठेवर देवी प्रसन्न होऊन वर मागण्यास सांगितले असता राजे म्हणाले, 'आईसाहेबांनी मजबरोबर गावी चलावे म्हणजे जास्त सेवा करता येईल.' देवीने ते मागणे दिले. 'गावी जाईपर्यंत व इच्छित स्थळ येईपर्यंत मागे वळून पाहू नये.' अशी आज्ञा केली. झाले, याप्रमाणे राव राजे पुढे आणि देवता मागे याप्रमाणे चालत असता करमाळा गावच्या शिवारांत आल्यावर राजाने साशंक होऊन मागे पाहताच देवीने दर्शन देऊन त्वरेने गुप्त झाली.

रावराजे यांना फार वाईट वाटले. देवी जेथपर्यंत आली त्याच ठिकाणी त्यांनी मंदिर बांधून देवीच्या मूर्तीची स्थापना केली. रावराचे दर्शन घेण्यापूर्वी ज्याप्रमाणे नदीचे दर्शन घ्यावे लागते, त्याप्रमाणे या देवीच्या ठाण्याचे दर्शन होते आणि नंतरच टेकाडावर मंदिरात मूर्तीचे दर्शन घडते. तुळजापुराहून

भवानी देवी येथे आली असल्याने तिचेच स्वरूप या ठिकाणी स्थापन झालेले आहे, पण तिला तुकाई, अंबाभवानी, जगदंबाभवानी, आदिशक्ति व कमळादेवी या नावाने संबोधिले जाते. विशेषतः कमळादेवी हे नाव जास्त प्रचारात आहे. कमळाचे आलय = कमळालय = करमाळालय = करमाळा हे नाव प्रचारात आले असून गावाच्या नावावरून देवीला हे नाव आले असावे.

मंदिराचे सर्व बांधकाम पाषाणाचे असून एकूण ९६ खांबावर त्याची उभारणी आहे. पूर्व-पश्चिम बाजूस दोन प्रवेशदरवाज्यावर मोठी गोपुरे आहेत. मंदिराच्या आतील भागी ६० ओवऱ्या आहेत. मंदिराचे सर्वच काम आणि शिखर अतिशय कलाकुसरीचे असून तीन गगनचुंबी दीपमाळा मन आकर्षून घेतात. असे म्हणतात की, सुमारे २० मैल परिसरातून या दीपमाळांचे दर्शन घडते. दर पौर्णिमेला त्या जेव्हा रात्री पाजळल्या जातात, तेव्हा 'आईचा छबिना' निघाल्याची ती निशाणी समजून सर्वांची मने तिकडे ओढली जातात. या मंदिराला लागूनच महादेव, विष्णु, सूर्यनारायण, गणपति आणि उत्सवमूर्ति भवानी यांची मंदिरे आहेत.

देवीचा मुख्य उत्सव कार्तिक पौर्णिमेपासून वद्य ४ पर्यंत चार दिवस चालतो. या काळात दररोज दुपारी व सायंकाळी, देवीच्या उत्सवमूर्तींची मिरवणूक सिंह, घोडा, हत्ती, नंदी, शाळुंका, मोर, गरुड इ० इ० तुळजा-भवानीच्या वाहनाप्रमाणेच असणाऱ्या वाहनावरून निघते. ५० सहस्त्राच्या वर यात्रिक त्या दिवशी उपस्थित असतात. २८ सेवेकरी वंशपरंपरा या ठिकाणी सेवेला आहेत. यात्रेच्या दिवशी कुस्त्यांचा फड होऊन बक्षिसे वाटली जातात. मंदिराची व्यवस्था सांप्रत पंचसमिति पाहते. सरकारी तिजोरीतून सालीना २७१४ रु. देवीच्या खर्चाप्रीत्यर्थ मिळतात.

सोलापूर भाग पाणीटंचाईचा असल्याने, मंदिराबरोबरच या ठिकाणी एक अष्टकोनी विहीर, सुमारे १०० फूट खोलीची बांधलेली आहे. ९६ पायऱ्या उतरून आत उतरता येते. पूर्वी विहिरीतून पाणी बाहेर खेचण्यास, मोटेला एक हत्ती बांधला जात असे. यासाठी, त्याला हत्ती-विहीर असे नाव प्राप्त झाले.

मंदिरातील भवानीची मूर्ति, शिल्प व पाण्याची उत्तम सोय यामुळे या भागात हे एक प्रख्यात ठिकाण मानले आहे.

(पुरुषार्थ, जून १९६३, पृ. ३६०)

### (४) कोंडणपूर देवी

पुणेसातारा मोटारमार्गावर खेड–शिवापूर या नावाचे एक गाव असून तेथून पश्चिमेला पाचसहा मैलवार कोंडणपूर नावाचे खेडेगाव आहे. या देवीचे

स्थान या भागात प्रसिद्ध आहे. इतिहासप्रसिद्ध सिंहगड किल्ल्याचे पूर्वीचे नाव कोंडाणाकिल्ला असेच होते आणि या गावावरूनच ते नाव आले होते. पण पुढे शिवाजी राजाच्या वेळी तानाजी मालुसरे याजकडे मोंगलाकडून गड सर करण्याची कामगिरी सोपविण्यात आली. ती त्याने प्राणपणाने पार पाडली व त्याच्या स्मृतीसाठी गडाचे नाव सिंहगड असे ठेवण्यात आले. हा सर्व इतिहास महाराष्ट्रीयसमोर आहेच. या मंदिराची बांधणी हेमाडपती आहे. याचाच अर्थ ते निदान बाराव्या शतकातील असावे. गाभाऱ्यासमोर सभामंडप, नगारखाना व कळसयुक्त शिखर आहे गाभाऱ्यामध्ये देवीची मूर्ति सुमारे साडे तीन फूट उंचीची काळ्या पाषाणाची आहे. ही मूर्ति चतुर्भुज असून हातात तरवार, ढाल, आणि खालच्या उजव्या हाती त्रिशूळ असून तो महिषासुराचे पाठीत खुपसलेला आहे. खालच्या डाव्या हाताने महिषासुराच्या मुख धरलेले आहे. उजवा पाय महिषाचे पाठीवर असून तिचे वाहन सिंह जवळच उभा आहे. या वर्णनावरून ही देवता म्हणजे महिषासुर-मर्दिनीचेच स्वरूप होय. सातव्या शतकात महिषासुरमर्दिनीच्या मूर्ति चतुर्भुज व वरील वर्णनाप्रमाणे करण्याची शिल्पकला होती, हे वेरूळ येथील सहस्य शिल्पावरून ध्यानात येते. तेव्हा काही भक्तमंडळी या देवतेला तुकाई अथवा अंबादेवी म्हणत असले तरी स्वरूप महिषासुर-मर्दिनीचेच होय.

या क्षेत्री देवतेची स्थापना कशी झाली, याचा इतिहास मनोवेधक आहे. सुमारे दहाव्या शतकात या भागात एक नामवंत देशमुखाचे घराणे वसती करून होते. त्याच्या मुलाचा विवाह झाल्यावर जी सूनबाई घरात आली, तिची अलौकिक वर्तणूक या देवतेच्या स्थापनेला कारणीभूत झाली. रात्रौ घरामध्ये सर्वत्र सामसूम झाली म्हणजे ती घरातून बाहेर पडे आणि अंधारातून, काट्याकुट्यातून, डोंगर कपारीतून वाट काढीत एकटीच, तिच्या घरापासून सुमारे आठ-दहा मैल अंतरावर असणाऱ्या रामकडा या डोंगरमाथ्यावर जाई. तेथे असलेल्या गुहेमध्ये प्रवेश करून देवतेचे पूजन करी आणि पुन्हा परत घरी येऊन झोपत असे.

या देवतेच्या स्थानाची मांडणी विशेष लक्षात ठेवण्यासारखी आहे; आणि संरक्षणाचे दृष्टीने किती कल्पकता वापरली ती उद्बोधक आहे. डोंगर-माथ्यावर गुहा पोखरताना लहानशा प्रवेशद्वारातून आत जावयाचे. नंतर २० फूट लांबीरुंदीच्या आणि गुडघाभर पाण्याच्या टाकीतून पुढे सरकावयाचे पुन्हा एका लहानशा प्रवेशद्वारातून आत गेल्यावर तशाच लांबीरुंदीच्या पण कमरे-इतक्या खोल पाण्यातून दुसऱ्या बाजूला गेल्यावर देवीचे दर्शन घडावयाचे. येथे देवीची मूर्ति अर्थातच डोंगरकडा खोदून तयार केलेली आहे. इतक्या कडेकोटात देवीचे स्थान तयार करण्याचे कारण म्हणजे एक तर परधर्मीयांपासून, त्रास न

व्हावा, अथवा साधकाला शांत स्थान प्राप्त व्हावे साधासुधा मनुष्य इतक्या संकटातून देवीप्रत पोहोचणारच नाही.

सूनवाईचा याप्रमाणे नित्य कार्यक्रम चालू असता दुष्ट वृत्तीच्या शेजाऱ्यांना ही वर्तणूक आवडली नाही. भलत्याच संशयखोर वृत्तीने पछाडलेल्या या माणसांनी तिचे सासू-सासऱ्यांचे कान फुंकले, दर्शन घेण्यावर नदी येणार अशी कुणकुण फुलवाईच्या कानावर आली तेव्हा शेवटच्या दर्शनाचे वेळी तिने मातेचे मनोभावे

तिने आर्तस्वराने देवीला
तिने तावडतोब दर्शन
केले, अट नेहमीप्रमाणे
ी याप्रमाणे देवी आणि
णपूरजवळ आली, तेव्हा
ी हे पाण्यासाठी तिने
नवाईनी कराराना भग
मंदिर बांधण्याना सुयोग

॥ श्री ॥

देविभक्त प्रिय वाचकहो,
आदिशक्ति जगदंबा कृपावंत होऊन तिने मजकडे सेवानिवृत्तिचे काळांत, तिचे सत्य स्वरुप विश्वजनतेला दाखविण्याची कामगिरी सोपविली. ती यथाशक्ती--यथामती, ४ भागात आपणाला सादर केली. आपणही सकीय सहानुभूतीने ती गोड मानून घेतली, त्याबद्दल आपणाला धन्यवाद.
सपादकाला आपले अखंड आशीर्वाद लाभावेत.

१२-१२-१९७३ प्र. कृ. प्रभुदेसाई

मुंबई-६२.

। अनेक शुभस्या आहेत
जाई, हिराबाई यांचा
ळ स्वरूप म्हणून एका
. त्यालाच हिराबाई असे
. मार्गशीर्ष वद्य पक्षात या
णे या ठिकाणी नवरानही
य असे की, होमहवनाचे
साद, अगारा पुडी परत
ातून सवकाळ पाणी असते
क होतो

डोंगरावरील रामकडा हे ठिकाणही फार रमणीय आहे. वरचा रामकडा आणि खालचा रामकडा असे दोन भाग आहेत. वर जे देवीचे वर्णन आले आहे ते वरचा रामकडा येथील होय. खालच्या रामकडयातही देवीचे स्थान असून, त्या ठिकाणीही गणपति व राम लक्ष्मणाच्या मूर्ति आहेत. वाट अतिशय कठीण असल्याने खालच्या ठिकाणापर्यंत सहसा कोणी जात नाही असे सांगितले जाते की, वरच्या रामकुंडात जर लिंबे टाकली तर ती कौंडणपुरी गोमुखातून

बाहेर पडतात. दोन्ही स्थाने जरी अलग असली तरी शिल्पकारांनी, भूमिगत चलाकृतींनी ती एकजीव केलेली असावीत. शत्रूपासून बचाव म्हणून किल्ल्यामध्ये जसे भुयारीमार्ग असत, तद्वतच पाणी शुद्ध राखण्यासाठी ही व्यवस्था असावी. त्र्यंबकेश्वरी डोंगरावर असलेल्या गंगेच्या उगमकुंडातील पाणी याप्रमाणे तेथे गुप्त होऊन खाली गावात कुशावर्ततीर्थी येते असे भाविक मानतात.

या क्षेत्राची महती ऐकून दक्षिण हैद्राबाद येथील सरदार घराण्यातील एक मुसलमान सरदार, महारोगाने व्याधीग्रस्त झाल्यावर, कोणा सत्पुरुषाच्या आदेशाप्रमाणे या ठिकाणी सेवा करण्यासाठी एकटा येऊन राहिला. मजल दरमजल करीत तो एकटाच आलेला होता. रामकुंडावर पाण्यात त्रिकाळ स्नान करावयाचे आणि निवातपणे देवीची सेवा करावयाची हा नित्याचा क्रम होऊन बसला. सेवेचे फळ त्याला मिळाले आणि तो व्याधीमुक्त झाला.

या क्षेत्रीच्या देवीला तुकाई नाव येण्याचे जे कारण लेखकाने दिले आहे, ते सर्वसाधारण भौगोलिक वस्तुस्थितीला धरून नाही, याचे विवरण तुकाई देवीच्या प्रकरणी पहावे. (देवीकोश, खंड १, पृ. ३२३–३२४ व खंड २, पृ. १७८–१८४ पहा.)

(अंबा-तुकाई महात्म्य, ले. बापू गोखले याच्या आधारे)

## (५) छेला सोमनाथ

प्रभासपट्टण येथे सोळाव्या शतकामध्ये एक हिंदु-नरेश राजा राज्य करीत होता. त्याला एक अतिशय सुस्वरूप कन्यका होती. ती विवाहयोग्य झाली असता, एकदा अनपेक्षितपणे शेजारच्याच राज्याच्या अधिपतीने—एका मुसलमान शहाजाद्याने–त्या हिंदु-नरेशाजवळ मुलीच्या लग्नाचा विषय काढला आणि आपण स्वतःच राजाजवळ तिला मागणी घातली. हिंदु-नरेशाने प्रारंभी प्रारंभी ह्या गोष्टीस कट्टर विरोध दर्शविला आणि त्याला मुलगी देण्यास साफ इन्कार केला. परंतु पुढे अधिक विचार करता आपल्या दुर्बलतेच्या जाणीवेमुळे, प्रतिकूल परिस्थितीमुळे आणि या सुस्वरूप मुलीपायी नसते वैर उत्पन्न होऊन युद्धाचा प्रसंग उद्भवून सर्व राज्य बेचिराख होईल, या भीतीमुळे त्याला आपला निर्णय बदलावा लागला आणि त्यामुळे हा हिंदु-मुसलमान विवाह घडून आला. (हीच भेदरटवृत्ति त्या काळी रजपूत राजामध्ये प्रचलित होती.)

हिंदु-नरेशाची ती सुस्वरूप सुकन्या अतिशयच शिवभक्त होती. मनातून तिला हा विवाह अजिबात मंजूर नव्हता. सासरी जाण्याची वेळ जवळ येऊन ठेपली, तेव्हा ती नवपरिणीता सोमनाथाच्या मंदिरात गेली, भक्तिभावाने तिने

महादेवाची पूजा केली आणि देवाद्वारी धरणे धरून बसली. आपल्यावर आलेला हा विपरित प्रसंग टळावा म्हणून विनम्रचित्ताने तिने शंभूरायाची विनवणी केली. आता तेथून गेल्यावर पुनरपि कधीही आपल्याला महादेवाचे दर्शन घडणार नाही, या विचाराने तर ती कल्पनातीत शोकाकुल झाली.

अखेर तिने आर्तस्वराने मारलेली हाक ऐकून शंकराना तिची दया आली. ते प्रसन्न झाले आणि पित्याच्या प्रेमळपणाने म्हणाले, 'वरम् ब्रूहि, वत्से, वरम् ब्रूहि।' तेव्हा राजकुमारी त्यांना म्हणाली, 'देवा, आपण जर मजवर पूर्णांशाने प्रसन्न झाला असाल, तर माझ्या हातून होणाऱ्या आपल्या सेवेत खंड पडू नये म्हणून आपण माझ्या सासरी, एका परधर्मीयाच्या घरी यावे आणि अशा प्रकारे आपली नित्य सेवा करण्याचे सुभाग्य मला प्राप्त व्हावे.' शिवशंभूनी 'तथास्तु' म्हणण्यापूर्वी तिला एक अट घातली. ते तिला म्हणाले, 'तू जेव्हा सासरी जाण्यास निघशील, तेव्हा तू दुसरा एक रथ घेऊन त्यावर ज्योतिर्लिंगाची प्रतिकृती ठेव, म्हणजे मी त्यात सूक्ष्मरूपाने प्रवेश करीन. नंतर माझा रथ तुझ्या रथामागोमाग जाईल. परंतु तुझे घर येईपर्यंत तू एक गोष्ट कटाक्षाने पाळावयाची ती ही की, आपले रथ घरी पोहोचेपर्यंत तू चुकूनदेखील मागे वळून माझ्या रथाकडे पाहावयाचे नाही कबूल आहे तुला ही अट?' 'हो, हो, अगदी शंभर टक्के कबूल!' राजकुमारीने कबुलीजबाब देऊन शंकरांची ती अट मान्य केली.

राजाने मुलीच्या पाठवणीची सर्व तयारी केली त्याचप्रमाणे महादेवाचा रथही त्याने तयार केला त्याने एका रथावर सोमेश्वराची लिंगमूर्ति ठेवून दिली. राजकुमारीचा रथ चालू लागताच हा रथही तिच्या रथामागोमाग चालू लागला परंतु काही अंतर गेल्यावर अनवधानाने सहज म्हणून राजकुमारीने मागे वळून पाहिले, तोच काय चमत्कार! तो रथ भग्न झाला आणि सोमेश्वराचे लिंग भूमीवर स्थिर झाले. राजकुमारीने ते लिंग पुन्हा उचलून रथावर ठेवण्याचा पुष्कळ यत्न केला, पण व्यर्थ! राजकुमारीला अतिशय वाईट वाटले ती हमसाहमशी रडू लागली परंतु त्याचा आता काय उपयोग होता? 'अब पछताये क्या होत, जब चिडियाँ चुग गयी खेत!' ती त्या लिंगाजवळ बसून शोक करू लागली. कारण आता तिला त्या शिवलिंगाविना सासरी जाणे भागच होते आपल्या प्राणप्रिय देवतेच्या पूजेला ती सर्वस्वी अंतरणार होती.

सासरी निघालेली नववधू तिथेच बसून शोक करू लागली, पुढे जाण्यास निघेना तेव्हा तिला नेण्यासाठी आलेले मुसलमान शिपाई व इतर नोकरवर्ग यांनी तिला बळजबरीने उचलून रथात ठेवण्याचा यत्न चालू केला महादेवाची पूजा

आता कायमची असणार. आपल्या शरीराला परपुरुषाचा स्पर्श झाला आपल्याला हिंदु म्हणून यापुढे वागता यावयाचे नाही, या विचाराने तिचे चित्त भांबावून गेले. एक क्षणभरच मन ताळ्यावर ठेवून तिने कसला तरी विचार केला, दृढ निश्चय केला आणि अंगातले सारे बळ एकवटून तिने त्या यवनाच्या बाहुरूपी यमपाशातून आपली सुटका करून घेतली. मागेपुढे कोठेही न पाहता ती सुसाट धावत सुटली दगडाधोंड्याची-काटयाकुटयाची पर्वा न करता ती एखाद्या पिसाटासारखी धावतच होती. तहानभूक विसरून रानावनातून ती पळतच होती आपल्या अस्ताव्यस्त अवताराकडे आणि शारीरिक जखमाकडे ढुंकूनदेखील न पाहता तिचे पाय जमिनीला मागे रेटीतच होते. अखेर ती एका उच्च पर्वतावर गेली. संकटाने व्याकुळ झालेल्या एखाद्या मुलीने आपल्या मातेच्या किंवा पित्याच्या कुशीत तोंड खुपसून आपल्या अश्रूंना वाट मोकळी करून द्यावी, त्याप्रमाणे या राजकुमारीने पर्वतरूपी पित्याच्या बाहुपाशात शिरून नि त्याच्या विशाल वक्षावर मान ठेऊन आपले दुःख त्याला निवेदन केले. अखेर ती त्या पर्वताच्या माथ्यावर गेली आणि खाली असलेल्या खोल दरीत 'शंकर, शंकर, जय शिवशंकर' असा नामोच्चार करीत खुशाल तिने आपला देह झोकून दिला. आत्मसमर्पण करून ती राजकुमारी, पतिव्रता साध्वी झाली. कैलासाप्रत पोहोचून ती खरोखरीच 'कैलासवासी' झाली

शंकराचे लिंग जेथे भूमीवर पडले तेथेच नतर कालातराने मंदिर उभारले गेले आणि त्याला हेला सोमनाथ हे नाव मिळाले.

(कल्याण क्षेत्रअंक, वर्ष १९५७, पृष्ठ ४२०)

## (६) दंतेश्वरी

बस्तर वनसें बन नहिं, चक्रकोट प्राचीन।
काकतीय नृप वंश जहां, राजत बहु कालीन॥

या लोकगीताचा अर्थ असा की, सांप्रतचे जगदाळपूरचे प्राचीन नाव चक्रकोट असून या ठिकाणी काकतीय वंश राज्य करीत होता. रामायणातील उल्लेखावरून असे दिसते की, हा भूप्रदेश रामपदस्पर्शाने पावन झालेला आहे. कारण बस्तरचा भाग दंडकारण्यातच मोडतो शंखिणी डाकिनी संगमावरच दंतेवाडा हे शहर आणि त्याला लागून असलेल्या एका उच्च डोंगराला आदिवासी जनता 'भगवानची गुढी' म्हणतात. तेथून काही अंतरावर जगदाळपूर आहे. बस्तर नाव येण्याचे कारण असे दिले जाते की, पूर्वी या क्षेत्री बांबूचे मोठे जंगल होते आणि त्याला बांस तरी म्हणत. त्याचाच अपभ्रंश पुढे बस्तर असा झालेला असावा.

वऱ्हाड प्रांताच्या दक्षिणेस बस्तर नावाचे एक संस्थान आहे. तेथे आदिवासी जमातींची वस्ती असून तो भाग जंगलसंपत्तीसाठी अतिशय प्रसिद्ध आहे. जगदाळपूर हे त्या संस्थानाचे राजधानीचे ठिकाण होय. दंतेवाडा हे देवीचे स्थान आहे. या देवीला कोणी '**दांतवाली देवी**' अथवा '**माणकेश्वरी**' असेही म्हणतात. या देवीचा इतिहास अतिशयच मनोरंजक आहे. शंखिणी आणि डाकिनी या दोन नद्यांच्या संगमावर हे गाव वसलेले आहे.

सध्याचे बस्तराधिपति भंजदेव हे आपला संबंध हस्तिनापूर येथील पंडु घराण्यापर्यंत नेतात. पांडवांचा एक वंशज वीरभद्र ह्याला **दिल्लीश्वरी** देवीने एक अमोघ बाण प्रसाद म्हणून दिलेला होता. काही काळानंतर वीरभद्राने मथुरा ह्या गावी स्थानांतर केले. तेथे जाऊन देवीची आराधना केल्यावर भुवनेश्वरी देवीने त्याला एक त्रिशूळ प्रसाद म्हणून अर्पण केला. पुढे त्या धामधुमीच्या काळात वीरभद्राचा सर्वच वंश आपले नशीब काढण्याच्या उद्देशाने जयपूर ( मद्रास ) येथे गेला. त्या वेळी तेथे वीरकेसरी नावाचा राजा राज्याधिपति होता. वरंगळ येथे असलेले काकतीय वंशाचे राजे या काळी अतिशय प्रबळ समजले जात होते. परंतु वीरकेसरी हा त्यांचाच मांडलिक आहे, असे समजताच वीरभद्राचे वंशज वरंगळ येथे गेले. त्या ठिकाणी दंतेश्वरी या नावाची एक देवी त्या समयी पुष्कळच प्रख्यात होती. तिची सेवा त्या वंशाने केली असता देवी त्यांना प्रसन्न झाली आणि तिने एक तलवार प्रसाद म्हणून दिली. कोणी कोणी असे म्हणतात की, तो काकतीय वंश हाच वीरभद्राचा वंश होय. तो अमोघ बाण, तलवार आणि त्रिशूळ ही देवीने प्रसाद म्हणून दिलेली तीन हत्यारे आजही अस्तित्वात असून ती देवळात आपल्याला पाहावयास सापडतात.

इ. स. १४२४ मध्ये काकतीय राजा प्रतापरुद्र, याचा अहमदशाहा बहामनी याने पराभव केल्यावर, प्रतापरुद्राचा भाऊ अनामदेव हा तिथून पळून जाऊन त्याने जगदाळपूर येथे आपले स्वतंत्र राज्य स्थापन केले. अनामदेवानेच बहुधा आपली कुलस्वामिनी दंतेश्वरी हिला बस्तर येथे आणले असावे. येथील राजघराण्याचा इतिहास अकराव्या शतकापासून उपलब्ध आहे. अनेक शिलालेखांचा आधार घेता उपरिर्निदिष्ट माहिती मिळते.

अनामदेवाच्या विनंतीला मान देऊन दंतेश्वरी देवीने जगदाळपूर येथे जाण्याचे मान्य केले. परंतु तत्पूर्वी त्याला अशी अट घातली की, गावी पोहोचेपर्यंत त्याने चुकूनदेखील मागे वळून पाहावयाचे नाही. राजा पुढे नि देवता त्याच्या मागोमाग ह्याप्रमाणे ही जोडगोळी वरंगळ येथून निघाली. जाता जाता शंखिणी नदीपर्यंत राजिम गावाजवळ हे दोघेजण आले असता नदीकाठच्या

वाळूमधून मार्ग आक्रमण करताना देवीच्या पायातील आवाज राजाला ऐकू न आल्यामुळे, त्याने सहजगत्या मागे वळून पाहताच, भक्ताने आपली अट मोडली म्हणून देवीने पुढे जाण्याचे नाकारले ती तेथेच ठाण मांडून बसली ह्याचसाठी राजाने नदीकाठी मंदिर बांधून देवीची त्याच ठिकाणी स्थापना केली अदृश्य होण्यापूर्वी देवीने राजाला वर दिला की, ' २२ पिढ्यापर्यंत मी राजवंशाचे रक्षण करीन '

दंतेश्वरी ही देवता संपूर्णत काळ्या पाषाणाची असून मुख्यत तिचे दात बाहेर आलेले असल्यामुळे तिला दंतेश्वरी हे नामाभिधान प्राप्त झालेले आहे. एरव्ही ही देवी अष्टभुजा महिषासुरमर्दिनी स्वरूपाची आहे कोणी असेही मानतात की, या शहरी अनामदेव येण्यापूर्वी नागवंशीय राजे राज्य करीत होते त्यांची कुलस्वामिनी मनसादेवी ऊर्फ माणकेश्वरी जी होती ती ही होय अनामदेव ह्याने नागवंशाचा पराभव करून आपले स्वराज्य त्या ठिकाणी स्थापन केले, असेही कोणी मानतात दंतेश्वरी देवीच्या मंदिरामध्ये वारंगूर येथून आणलेल्या अनेक ल्हान ल्हान देवता आहेत मनसादेवीचे स्वरूप हे अष्टभुजादेवीपेक्षा फारच निराळे असल्याने, नागवंशाची हीच देवता होती असे मानता येत नाही [१] मंदिरातील इतर देवतामध्ये मनसादेवीची एखादी मूर्ति असावी आणि त्यामुळे नागवंशाभिमानी लोकांनी तिला माणकेश्वरी समजले असावे दंतेश्वरी देवीचे स्वरूप अतिशय उग्र आणि भयानक असून ते पाहाताच आपल्या मनात विलक्षण भीति उत्पन्न होते देवीच्या तोंडातून बाहेर आलेले दात हेच तिच्या मूर्तीच्या भयानकतेचे कारण असावे देवीच्या वार्षिक खर्चासाठी बस्तराधिपतींनी १४४ गावांचे उत्पन्न लावून दिलेले आहे. येथील राजा हाच देवीचा महापुजारी होय

ह्या देवीचा जोडीदार अथवा भैरव ह्याचे नाव बुरापेन ऊर्फ ठाकूर हे असून ह्याला कोणी शंकर असेही म्हणतात वंशपरंपरेनुसार ह्या देवीच्या पूजा अर्चेची व्यवस्था जिआ या घराण्याकडे आलेली आहे

या देवीला पूर्वी नरबली देण्याची चाल होती असे म्हणतात की, सन १८३० पर्यंत दरवर्षी सुमारे पंचवीस माणसांचा नरबळी या देवीला राजघराण्याकडून देण्यात येत असे परंतु पुढे सन १८५८ पासून ब्रिटिश सरकारने ही चाल बंद केली देवीच्या साथीच्या निवारणार्थ अथवा ल्हान मुलांना दात येताना त्रास न व्हावा म्हणून या भागातील आदिवासी गोंड जमात या देवीला नवस

[१] टीप—'भारतीय संस्कृति कोशकार' मात्र असे म्हणतात की, नागवंशीय राजांनीच हे मंदिर बांधले आणि ती त्यांची आराध्य देवता होती.

करीत असत. आजही त्या जातींची ह्या देवीवर गाढ श्रद्धा आहे. ह्या शहरी मामाभांजाचे मंदिर, नारायणपाल, क्षुरिआराणी यांची मंदिरे आहेत.

(छत्तीसगड जिल्हा गॅझेट, पृ. ३३७ व जेम्स् धार्मिक कोश ६–८५०)

सन १९६१ साली येथील राजावर जेव्हा संकट आले आणि भारत सरकारकडून त्याचे राज्याधिकार काढून घेण्यात आले, तेव्हा आदिवासी जमातीने या देवीची उपासना करून राजाच्या बाजूने खूपच चळवळ केली होती, हे सर्वश्रुतच असावे. राजा व प्रजा ह्याच देवतेच्या सांप्रदायिक भक्तीमुळे एकत्र आलेली होती.

वसंततिलका

दंतेश्वरी प्रथित बस्तर प्रांत भागीं ।
देवी स्वरूप परि अष्टभुजा पहावी ॥
अर्पीतसे नरबळी तुज पूर्वी राया ।
आदीजनासह तुझ्या नमितो पदां या ॥ १ ॥

## (७) नाथद्वारा

मारवाडप्रांती लोहमार्गावर नाथद्वारा या नावाचे एक स्थानक आहे. येथील केशव देवतेची मूर्ति मथुरेजवळ गोवर्धन पर्वतावर होती. परंतु मोंगल अमदानीत जेव्हा मूर्तिभंजन सुरू झाले, तेव्हा मूर्तींच्या संरक्षणासाठी तिला तेथून हलविण्याचे भक्तगणांनी ठरविले. सन १७७१ साली अश्विन पौर्णिमा शुक्रवार या दिवशी मंदिराचे वडे दाऊजी पुजारी यांनी ती मूर्ति एका रथामध्ये घालून दक्षिणेकडे निघाले. मार्गामध्ये कोटा, बुंदी, जोधपूर, पुष्कर, कृष्णगड या शहरावरून पुढे जात असताना सिंहाड गावी चाक रुतून बसले व पुढील मार्ग कुंठित झाला. वल्लभपंथीय लोक या देवतेचे भक्त असल्याने मूर्ति गुजराथकडे न्यावयाची होती. परंतु मूर्तींच्या मनातून कदाचित् या भागाकडे यावयाचे नसल्याने ते चाक त्या प्रांती रुतून बसले असावे. वाहकांना खूप प्रयत्न करूनही चाक वरती निघेना, त्याचा नाईलाज झाला.

कर्मधर्मसंयोगाने ही वार्ता मेवाडच्या महाराणा राजसिंह याच्या कानी गेली. तो जातीने त्या ठिकाणापर्यंत आला आणि त्याने तेथेच मूर्तीची स्थापना करण्याचे ठरविले. सन १६७३ फाल्गुन वद्य ७ शनिवार या दिवशी मूर्तीची स्थापना झाली. आज ते स्थान नाथद्वारा म्हणून प्रसिद्ध आहे. अनेक कोटींची संपत्ति मंदिराच्या मालकीची आहे.

कालांतराने औरंगजेब बादशहाने या स्थानावर हल्ला करण्याचा प्रयत्न केला, पण असे मानतात की, मोंगल सैन्याचा हल्ला झाल्यावर मंदिराचे पायामधून असंख्य भ्रमर बाहेर पडले, आणि मोंगल सैन्याला त्यांनी सीमेपार पळवून लावले.' याप्रमाणे बादशहाने केलेला प्रयत्न फसल्यावर त्याला मूर्तीमधील देवत्वाची प्रचिति आली. पुढे अशी दंतकथा प्रचलित आहे की, बादशहाला आपल्या कृत्याचा पश्चात्ताप झाला आणि प्रायश्चित म्हणून त्याने आपल्या पांढऱ्या शुभ्र दाढीने मंदिराच्या पायऱ्या झाडून साफ केल्या व अनुताप व्यक्त केला. अशा आशयाचा शिलालेख मंदिरामध्ये सांप्रत आहे. त्याच्या हयातीत पुन्हा असा प्रकार होऊ नये म्हणून मंदिराचे रक्षण करण्याची आज्ञा सैन्याला केली.

याप्रमाणे मूर्तीने धरलेला आग्रहच या ठिकाणी क्षेत्र निर्माण होण्यास कारणीभूत झालेला आहे. (कल्याण क्षेत्र अंक १९५७, पृ. २९६; धर्मयुग, आक्टो. १९५४)

एकदा देखील मागे वळून पाहावयाचे नाही. बाईने ही अट मान्य केल्यावर बाई आपल्या गावी जाण्यास निघाली आणि त्रिशूळ तिच्या मागून निघाला.

याप्रमाणे मार्ग आक्रमण करीत असता एकदा मार्गात चुकून बाईने मागे वळून पाहिले. त्याबरोबर तावडतोब त्रिशूळाची गति कुंठीत झाली. बाईने आपली चूक कबूल केली आणि पुन्हा एकवार चलण्याची विनंती केली. तिला एकवार क्षमा करून त्रिशूळ तिच्यामागोमाग चालू लागला. याप्रमाणे दोघेजण सिन्नर येथील सरस्वती नदीच्या काठी आल्यावर अनवधानाने बाईने पुन्हा एकदा मागे वळून पाहिले आणि मग मात्र त्रिशूळाने पुढे जाण्यास अजिबात नकार दिला. नंतर गावातील गावकऱ्यांना हा वृत्तांत समजल्यावर त्यांनी त्याच ठिकाणी मंदिर उभारले. यालाच भैरवनाथाचे मंदिर म्हणतात. येथील यात्रा मात्र चैत्र पौर्णिमेला भरते. ( लोकसत्ता, मुंबई, दिनांक २०–४–१९६२ ).

याच संदर्भात पुणतांबे येथील देवीच्या मंदिराचा इतिहास पाहणे योग्य होईल. पुणतांबे गावातील दत्त मंदिरात एक पुजारी होता. परंतु स्वतः मात्र तो अतिशय देवीभक्त होता यामुळे आठदहा मैलावर असलेल्या देवीच्या मंदिराला तो नेहमी भेट देऊन तिची आराधना करीत असे. एके दिवशी देवी त्याच्यावर प्रसन्न झाली आणि पुणतांबे येथे येण्याचे तिने मान्य केले. अट नेहमीचीच होती. इच्छित ठिकाण येईपर्यंत मागे वळून पाहावयाचे नाही. पुजारी पुढे आणि देवी त्याच्या मागून याप्रमाणे गावच्या नदीपर्यंत ती दोघे आली असता, पुजाऱ्याने मागे वळून पाहिले आणि देवता त्याच ठिकाणी स्थिर झाली. गावकऱ्यांनी नंतर त्या ठिकाणी देवीचे मंदिर उभारले. ( जोशी, प्रवचनकार )

## ( ९ ) सावरगडवासिनी

पीठदेवता प्रकरणामध्ये आपण यमाई देवीचा इतिहास वाचलाच आहे. त्याचाच उत्तरार्ध म्हणजे या देवतेचा इतिहास होय. त्र्यंबकराव कुलकर्णी नावाच्या देवीभक्त सद्गृहस्थाच्या पत्नीच्या बाळंतपणाच्या वेळी, ती असहाय झाली म्हणून तिच्या मदतीला समक्ष देवता घरी अवतरली आणि स्वतःच सुईण बनून तिने त्या अडलेल्या अबलेची प्रसूतिवेदनांतून सुटका केली. त्र्यंबकराव घरी परत येताच देवी अदृश्य झाली. पुन्हा त्र्यंबकराव औंध येथे गेले आणि त्यांना दर्शन देण्याचा हट्ट धरताच साक्षात् देवी प्रकट झाली, त्यांना दर्शनलाभ घडवून तिने त्यांचा हट्ट पुरविला हा सर्व पूर्वार्ध आपण पाहिलाच आहे.

देवतेचे प्रत्यक्ष दर्शन घडताच त्र्यंबकरावांनी देवीजवळ मागणे मागितले की, तिने त्यांच्या किन्हई गावी यावे म्हणजे तिचे मंदिर बांधून त्या मंदिरात

तिच्या वास्तव्याची सोय केली जाईल. मनापासून भक्ति करणाऱ्या भक्तांच्या इच्छा परिपूर्ण करणे हे दैवताचे आद्य कर्तव्यच असते. देवाच्या कसोटीला भक्त उतरल्यावर तर देव त्याचा अक्षरशः दासच बनतो. भक्त जे जे सांगेल ते ते सर्व काही तो करतो. देवीने किनईला येण्याचे मान्य केले, परंतु त्यापूर्वी त्यांना अशी अट घातली की, किनईला जाईपर्यंत त्यांनी अजिबात मागे वळून पाहावयाचे नाही.

याप्रमाणे त्र्यंबकराव पुढे आणि देवता त्यांच्या मागे अशी ही जोडगोळी निघाली. पंधरावीस मैलाचा जवळजवळ सर्व मार्गच संपत आला व सुमारे एक मैलाचे अंतर शिल्लक राहिले असता एक चमत्कारिक प्रकार घडला. देवी आणि त्र्यंबकराव ज्या रस्त्याने चालले होते, त्या मार्गावरून मिठाच्या गोणी भरून एक बैलगाडी किनईकडे चालली होती. बैलगाडी दिसताच देवीने सहज म्हणून गाडीवानला विचारले, 'का गाडीवानदादा, गाडीमंदी कसल्या गोणी भरल्यात जी?' गाडीवान मोठा मिस्किल होता. त्याला काय माहिती की, स्वतःहून आपल्याला विचारणारी ही बाई म्हणजे साक्षात् देवताच आहे म्हणून! त्याला या बाईची थट्टा करण्याची लहर आली नि तो म्हणाला, 'गाडीमंदी साखऱ्या भरल्यात् नव्ह का! पायज्याल का तुमास्नी?' देवीने त्याच्याजवळ खरोखरच साखरेचा नमुना मागितला. गाडीवानाने पोत्यामध्ये हात घालून मीठ म्हणून जे बाहेर काढले ती खरोखरच साखर निघाली. अर्थातच भयंकर आश्चर्याने गाडीवानाचा जबडा फाटायची वेळ आली!

मूळपीठ अधिष्ठान। वैराटदेशीं किनई ग्राम।
सासरगडवासिनी नाम घेवोन। अंबा येवोनि राहिली॥
देवींची ही रम्य कथा। भक्तिभावें एकचित्तें ऐकतां।
नमन करोनिया माथां। भक्तजना रक्षील॥

भक्ताची सङ्कटे याप्रमाणे देव निवारण करतात, याची एकदोन उदाहरणे पाहता येतील. महाराष्ट्रीय संत चोखामेळा याची पत्नी सोयराबाईला मूलबाळ नव्हते. विठ्ठलरूपी ब्राह्मणाला तिने दहीभात भिक्षा घातल्यावर तिला पुत्र-संतानाचा आशीर्वाद मिळाला. प्रसूतीचा समय झाला तेव्हा चोखामेळा आपली बहीण निर्मला हिला आणण्यासाठी शेजारच्या गावी गेला असता, प्रसूतिवेदना असह्य झाल्या आणि बाईने विठ्ठलाची प्रार्थना केली. बहीण निर्मलारूपाने विठ्ठल तेथे अवतरले, बाईची सोडवणूक झाली आणि नंतर बऱ्याच वेळाने चोखामेळा आणि खरी निर्मला आली. तेव्हा झालेला प्रकार चोखोबाच्या ध्यानी आल्यावर त्यांनी पांडुरंगाचे आभार मानले.

(डॉ. कमलाबाई देशपांडे, नभोवाणी भाषण, २८-१-५८.)

चांगदेववटेश्वराच्या कृपेने, नगरजवळील नारायणडोह येथील सुधोपंत कुलकर्णीला पुत्रप्राप्ति झाली, म्हणून बाळाचे नाव चांगदेवच ठेवले. पुणतांबे येथे याने पुढे केशवाची मूर्ति स्थापन केली. म्हणून त्याला केशवदास चांगया हे नाव पडले. हे महान् योगीपुरुष होते. कल्याण कल्बुर्गे येथील एका सावकाराच्या विधवा मुलीस दिलेला पुत्रसंतानाचा आशीर्वाद खरा करण्यासाठी, त्याने पतीच्या अस्थी उगाळून त्याचे पाणी बाईला प्यावयास दिले आणि नंतर त्यामुळे तिला पुत्रप्राप्ति झाली.

एकदा बेदरच्या राजाने पंढरपूरचे विठ्ठलमंदिर पाडण्याची आज्ञा दिली. बडव्यांनी मूर्ति लपविली, पण चांगदेव दर्शनास आला असता मूर्ति न दिसल्याने कासावीस झाला. तानडतोब तो बादशहाला खुलासा विचारण्यास निघाला असता, तिकडे बादशहाची बेगमसाहेबा सर्पदंशाने मृत झाली. कोणी बादशहाला सांगितले की, मंदिर पाडण्याची आज्ञा दिल्याने, चांगदेवानेच हा प्रकार घडवून आणला असावा. इतक्यात चांगदेवच तेथे प्रकट झाले व बादशहाला म्हणाले, 'पाडलेले मंदिर पुन्हा उभारून देशील तर बेगमला जिवंत करू शकेन.' राजाने ही गोष्ट मान्य केल्यावर, मृत राणीला त्याने जिवंत केले. असे अनेक चमत्कार योग-सामर्थ्याने त्याने केले आहेत.

चांगदेवाची स्वारी द्वारकेला श्रीकृष्णाचे दर्शन घेण्यास निघाली असता त्याजबरोबर धारूर येथील यादवराव देशपांडे सहकुटुंब निघाले. मंडळी गरोदर

असल्याने, विरोध केला असताही बरोबर गेली मजल दरमजल करीत महीनदीच्या काठी चांगदेव व देदापाडे पलिकडच्या तीरावर गेले आणि पत्नी वेदना होत असल्याने मागेच राहिली तोच प्रसूतीचा समय होता आणि बरोबरची मंडळी तर पुढे निघून गेली होती या असहाय्य स्थितीत शेवटी तिने द्वारकेच्या कृष्णाचा धावा केला आणि आश्चर्य असे की, कृष्णाबाईच्या स्वरूपात देव लगबगीने तेथे आले व तिची सुखरूप सोडवणूक केली चांगदेव आणि देदापाडे द्वारकेला मंदिरात पाहतात, तर देव जाग्यावर दिसेनात त्याना कळून आले की, स्वारी महीनदीच्या किनारी आहे काय प्रकार आहे हे समजून घेण्यासाठी दोघेही परत आले, तेव्हा कृष्णाबाईने प्रसूतीस मदत दिल्याचे समजले. पुन्हा तिघेही द्वारकेला गेले. देवानी भक्ताच्या हृयासाठी कृष्णाबाई स्वरूपात त्याना दर्शन देताच, बाईनी ओळखले की, याच बाईने सोडवणूक केली श्रीकृष्णाची ही लीला पाहून भक्ताचे हृदय भरून आले आणि त्यानी नेत्राश्रूनी त्याचे चरणकमल धुवून काढले या चांगदेवांनी पुणतांबे येथेच शके १४२७ मध्ये समाधी घेतली.

( महिपतीकृत भक्तिलीलामृत, अध्याय ६ ते १० )

## ( १० ) गोकर्ण महाबळेश्वर

रावणाची आइ दररोज मातीचे शिवलिंग बनवून श्रीशिवशंकराची पार्थिव पूजा करीत असे ही गोष्ट एके दिवशी रावणाच्या कानावर गेली. आपल्या आईला शिवलिंगाची पूजा करण्यासाठी दररोज मातीचे शिवलिंग बनवायला लागते ही गोष्ट त्या मातृभक्त, शंकरभक्त आणि पराक्रमी पुरुषोत्तमास रुचली नाही तत्क्षणी तो कैलास पर्वतावर गेला आणि त्याने शंकराकडून आत्मलिंग मागून घेतले परंतु ते आत्मलिंग त्याला देताना शंकरानी स्पष्टच बजावून सांगितले की, ' लंकेला पोहोचेपर्यंत हे लिंग कोठेही खाली भूमीवर ठेवू नकोस ' रावणाने ही अट मान्य केली आणि तो लंकेच्या मार्गाला लागला

इतर देवाना शंकराची ही कृति आवडली नाही कारण ते लिंग लंकाधिपतीकडे गेल्यास व त्याची नित्यनियमाने पूजा होऊ लागल्यास रावण अजिंक्य बनेल व त्यामुळे कोणीही त्याचा नाश करू शकणार नाही तेव्हा युक्तिप्रयुक्तीने रावण लंकेला पोहोचेपर्यंत त्याच्या मार्गात विघ्न उत्पन्न करण्याचे त्यांनी ठरविले परंतु हे काम करणार कोण ? जो तो एकमेकाची तोंडे पाहू लागला. जेव्हा कोणीच तयार होत नाही हे पाहिल्यावर शिवशंकरांचेच सुपुत्र लंबोदर गणपतीबाप्पा हे पुढे झाले स्वतःच्या व इतर देवांच्या हितास्तव त्यांनी ही कामगिरी आपल्या शिरावर घेतली.

गणपतीने एका ब्राह्मण मुलाचा वेश धारण केला आणि तो रावणाच्या मार्गावर उभा राहिला. त्याने दैवीशक्तीने रावणाच्या मूत्राशयातील मूत्राचा दाब वाढविला त्यामुळे अर्थातच त्याला मार्गात लघुशंकेसाठी थांबणे भाग पडले. परतु हातातील लिंग ठेवायचे कोठे, असा रावणाला पेच पडला. कारण शिवलिंग हातात ठेवून ती अवैधक्रिया उरकणे ही गोष्ट धर्मग्राह्य होती. इतक्यात रावणाला तो मुलगा दिसला. तेव्हा त्याने त्या मुलाला थांबवून ते आत्मलिंग त्याच्या हाती सुपूर्त केले आणि 'मी परत येईपर्यंत हे लिंग जमिनीवर ठेवू नकोस, असेच हातात धरून उभा रहा' असे त्याला पुनः पुन्हा बजावून सांगितले. परतु बराच वेळ झाला तरी रावण परत आला नाही. तेव्हा कंटाळून (का मुद्दामच?) लिंग त्या मुलाने खाली जमिनीवर ठेवले. रावण परत आला तेव्हा त्याला हा प्रकार दिसला. त्याने त्या मुलाला शोध शोध शोधले. पण व्यर्थ! आपली होतीनव्हती तेवढी शक्ति वापरून त्याने ते उचलण्याचा आटोकाट प्रयत्न केला पण छे! ते लिंग मुळी जागचे हलेचना उलट जमिनीतच आणखी खोल रुतून बसले. नंतर त्या जागेवर मंदिर बांधण्यात आले.

सन १९४० साली लेखकाने स्वत: ज्या वेळी या क्षेत्राला भेट दिली, तेव्हा प्रत्यक्ष हे लिंग पाहिले आहे. योनीच्या आकाराच्या पिंडीमध्ये एक तीनचार इंच खोलीचा खळगा आहे. त्याच्या मध्यभागी सुमारे अर्धा इंचाचे, माणसाच्या कानाच्या आकाराचे लिंग आपल्या दृष्टोत्पत्तीस येते. लिंगाची पूजा झाल्यानंतर मग मात्र कोणत्याही भक्ताला या लिंगाचे दर्शन घेता येत नाही. तेथील पुजारी असे सांगतात की, या शिवलिंगाचा उरलेला भाग खाली जमिनीत गाडला गेलेला असल्यामुळे तो आपल्याला दिसू शकत नाही व त्याचे कारण म्हणून हीच कथा ते आपल्याला निवेदन करतात. शिवलिंगाचा हट्टच हे क्षेत्र निर्माण होण्यास कारणीभूत झालेला आहे.

शक्तिपीठाचा इतिहास पाहताना चाफळ येथील आदिशक्ति व राममूर्ति अशाच जड झाल्या होत्या आणि गावकऱ्यांना त्या उचलता न आल्यामुळे त्यांची स्थापना त्या ठिकाणी होऊ शकली नाही हा कथाभाग संदर्भात मुद्दाम नमूद करीत आहे. त्या मूर्तींना चाफळ येथे रामदासाकडेच जायचे होते. वास्तव रामदासस्वामी–शिष्य उद्धव गोसावी आल्यावर, मूर्तींना स्पर्श करताच त्या हलक्या झाल्या आणि झोळीतून चाफळ येथे आणण्यात आल्या.

## (११) ज्ञानेश्वर समाधी

सन १७६५ च्या सुमारास सोलापूर शहराजवळ वडापूर नावाच्या गावी हरिपंत वडापूरकर नावाचे एक सत्पुरुष होऊन गेले. हे गाव भीमानदीच्या काठी

बसलेले आहे. हरिपंत हे आळंदी-पंढरीची वारी पूर्ण निष्ठेने करित असत. वृद्धापकाळ झाला तरी त्यानी वारी सोडली नाही. कण्हत कुथत त्या जीर्ण शरीराने ते एकदा आळंदी येथे गेले असता समाधीचे दर्शन घेण्यासाठी वारीमध्ये उभे असताना त्याना भोवळ आली, खाली पडून कपाळाला भले मोठे टेंगूळ आले. मूर्च्छावस्थेत ते पडून असतानाच माऊलीला त्याची दया आली, आता याना अधिक त्रास देणे बरे नव्हे असे समजून, त्याना दृष्टांत देऊन सांगितले की, ' आता वारीस येऊ नकोस, मीच तुझ्या गावी येत आहे. गावी गेल्यावर ज्या ठिकाणी माझी स्थापना व्हावी असे तुला वाटेल,तेथे मागे वळून पहा म्हणजे माझे दर्शन घडेल.' असा कृपाप्रसाद होताच हरिपंताना अत्यानंद झाला व घरी परत निघाले. मुखाने ज्ञानेश्वर माऊलीचा घोष चालू असून हळूहळू मार्गक्रमण चालू आहे. अशा अवस्थेत मीरी गावचा ओढा ओलांडून वडापूरच्या शिवेत प्रवेश केल्यावर महादेवाच्या मंदिराच्या जवळ आले असता त्याना दृष्टांताची आठवण झाली. माऊली आपल्यामागे आहेना हे पाहण्यासाठी मागे वळून पाहताच, ज्ञानेश्वराची मूर्ति त्याना मूर्त स्वरूपात दिसली आणि नंतर गुप्त झाली, त्याचे वर्णन हरिपंत स्वतः असे करतात की—

> जे ज्ञानगंगे नाहले । पूर्णता येऊनी धाले ।
> जे शांतीशी आले । पालव नवे ॥

ज्या स्थळी ज्ञानेश्वरानी दर्शन दिले, आणि गुप्त झाले त्याच ठिकाणी त्याची समाधी उभारण्यात आली व आजतागायत ती उभी आहे. यात्रिकांचे हे स्थान विसावा आहे. कथाकीर्तनकाराची ती पुण्यभूमि मानली जाते. ( मनोहर कुलकर्णी, प्रसाद, डिसेंबर १९६४ ).

इतर हट्टी देवतापेक्षा या ठिकाणी एक निराळीच दृष्टी मिळते. इतर देवता भक्तांच्या मागोमाग येत आहेत असा आदेश असतो, तर या ठिकाणी भक्ताला आदेश असा की, तुझे गावी पोहोचल्यावर ज्या ठिकाणी स्थापना व्हावी अशी इच्छा असेल. त्या ठिकाणी मागे वळून पाहल्यास माझे दर्शन घडेल. भक्ताची मानसिक कसोटी येथे एका निराळ्या दृष्टिकोनातून घेण्यात आलेली आहे. काही वेळा देवतापेक्षा भक्त श्रेष्ठ असतो, त्याचेच तर प्रत्यंतर हे नसेल ! कसेही असो, सर्वसाधारण प्रकारापेक्षा, हा कथाभाग वेगळा आहे खास.

## ( १२ ) छोडेश्वरी

या देवतेचे मंदिर वाराणसी क्षेत्री आहे. या देवतेचा एक रम्य इतिहास आहे. एके वेळी एक राजा काशीयात्रेस निघाला असता मार्गामध्ये एक

अनाचार घडला. क्षेत्रात गेल्यावर त्या अपराधाचा परिहार होण्यासाठी क्षेत्रोपाध्यायांना आपले अर्धे राज्यही देण्यास तो तयार झाला. या देवीच्या मंदिरात जाऊन दानाचा संकल्प केला, तेव्हाच त्याना शुद्धिसमारंभ ब्राह्मणांनी पार पाडला. राजा नंतर आपल्या शहरी दक्षिणेत परत आला. काशीचे ब्राह्मण शोध घेत राजगृही आले असता, विस्मृतीमुळे, राजाने आपण तशी शपथ घेतलीच नव्हती, असे अतिथी ब्राह्मणांना निक्षून सांगितले.

निराश झालेले ब्राह्मण परत काशीला जाऊन त्यानी छोडेश्वरी देवीला साक्षीसाठी दक्षिणेत येण्याची विनंती केली. त्यांचा शुद्धभाव व राजाची लबाडी पाहून देवीने येण्याचे मान्य केले. ते एका अटीवर की, मार्गात ब्राह्मणांनी पुढे चलावे. ती मागाहून येईल, पण त्यानी केव्हाही मागे वळून पाहू नये.

याप्रमाणे मार्गक्रमण चालले असता नंदवरम् गावाजवळ ब्राह्मणांनी शंका येऊन परतून पाहिले आणि देवी तेथेच थांबली. पुढे जाण्याचे ब्राह्मणाच्या वचनभंगास्तव नाकारले. ब्राह्मणांचा नाईलाज झाला. देवीचे मंदिर तेथे स्थापन करून सर्व ब्राह्मणही तिच्या सेवेसाठी त्या गावीच राहिले. या ब्राह्मणांचे वंशज पुढे 'तोगत' नावाने ओळखले जातात. ही तेलंगणातील कोष्टी जमात बनली आणि जाडेभरडे कापड विणण्याचा ती धंदा करते.

या जमातीची अशी भावना आहे की, छोडेश्वरी देवीचे वास्तव्य कडुलिंबाच्या वृक्षात असते. यास्तव त्या वृक्षाची अथवा त्याच्या बुंध्याशी स्थापन केलेल्या पाषाणमूर्तींची ही जमात पूजन करते. हे पूजन वर्षप्रतिपदेला होते. पूजेच्या वेळी पशुबळीही देतात. याशिवाय ही जमात पोलेरम्मा, एलम्मा, कोटम्मा व इतर देवतांनाही मानतात. मूर्तींच्या स्वरूपाचे वर्णन माहितीविना देता येत नाही. (भा. सं. को. ४।२०१)

## (१३) रमा–लक्ष्मी

दक्षिणेत व्यंकोबाची गिरी हे प्रसिद्ध क्षेत्र आहे. त्या क्षेत्री पूर्वी अशी रूढि होती की, तेथील मठाधिपति महंतानी हत्तीवरून भारतभर दौरा करावा आणि संस्थानच्या खर्चासाठी निधी जमवावा. रमा–लक्ष्मी–व्यंकटेशाच्या पंचरसी धातूच्या सुबक मूर्तीही ते बरोबर नेत असत.

एके वेळी फिरता फिरता महंतांचा मुक्काम महिकावती (ठाणे) नगरीत झाला. तेथील कार्यक्रम आटोपल्यावर महंतांनी देवाचा कौल पुढील प्रयाणासाठी मागितला, पण तो लौकर मिळेना. बरेच दिवस याप्रमाणे गेल्यावर महंतांचा त्या ठिकाणी अंतही झाला. गिरीपीठावरून दुसऱ्या महंताची नेमणूक झाली. त्यानेही

कौल घेण्याचा खूपच यत्न केला कौल नसल्याने सर्व लवाजमा अडकून पडला आणि कर्नाटकात परत जाता येईना शिष्यवर्गाने महताच्या मागे नेटाचा लकडा लागल्यावर एके दिवशी त्याने निश्चयपूर्वक देवाजवळ कौल प्रसादाची मागणी केली

हे महत देवाचे नि स्सीम भक्त होते नेहमीप्रमाणे पूजनानतर त्यानी दुधाचा नैवेद्य देवाला अर्पण केला व ते धरणे धरून बसले आश्चर्य असे की, काही वेळातच देवाच्या पचरसी धातूच्या मूर्ति काळवडल्या या आमज्ञानी महताला याचा अर्थ खरोखर समजला की दूध प्रसादाचे ग्रहण झाले म्हणजे महतही असेच काळे निळे होतील, इहलोकीचे जीवन समाप्त होईल महतानी त्वरित एक चिठ्ठी लिहिली, बद केली आणि गिरीला व्यकोबाच्या विश्वस्ताकडे पाठवून दिली त्या मध्ये लिहिले होते—

'या व्यकटेश–रमा–लक्ष्मी याच्या मूर्ति फिरत्या असून आता त्याना या मल्लिकावतीचे भूमीवर स्थायिक होण्याची इच्छा दिसून येते यापुढे त्याना येथेच राहू द्यावे मात्र यापुढे मूर्तीचा पूजाविधि सन्याशामार्फत न करविता त्याना राजसोपचाराची जरूरी असल्याने त्याना गृहस्थाश्रमी व्यक्तीच्या स्वाधीन करण्याची अवश्य व्यवस्था व्हावी '

नैवेद्य प्रसाद वाटपाची शास्त्रोक्त पद्धत अशी की, पुजाऱ्याने प्रथम प्रसाद घेऊन नतर इतर भक्तमडळींना वाटावयाचा परतु त्या दिवशी प्रसाद स्वत न ग्रहण करण्याचे स्वामींनी ठरविले मूर्तींना आपल्या शय्येजवळ आणून ठेवले, सर्व दूध आपण स्वत प्याले आणि मूर्तीकडे नेत्र एकवटून पाहत पाहत, आपली जीवनज्योती अनतामध्ये विलीन केली ज्या दिवशी ही अलौकिक घटना घडली तो दिवस शारदीय नवरात्रातील ललिता पचमीचा असल्याने, सांप्रतही त्याचे प्रत्यतर अनुभवास येते

महताच्या प्रयाणानतर त्या मूर्तीची स्थापना मल्लिकावती नगरीत करण्यात आली मध्यभागी व्यकटेश, उजवीकडे लक्ष्मी आणि डाव्याबाजूस रमा याप्रमाणे मांडणी तेथे आहे वास्तव याला व्यकटेशाचेही मदिर म्हणतात कुशल कारागिरांनी तयार केलेल्या स्फटिकाच्या सुदर सिंहासनावर त्या आरूढ झालेल्या आहेत मूळ सिंहासन कालौघात भग पावल्यावर, पालघर येथील सावकार बाबासाहेब दांडेकर यांनी त्याचा जीर्णोद्धार केला आहे मूळ मूर्तीची स्थापना फार पुरातन आहे असे समजते, पण काळ वेळ उपलब्ध नाही ठाणे जिल्ह्यात कळवा माहीम येथे हे क्षेत्र आहे

येथील उत्सव आश्विन शु. १ पासून चालू होतो आणि कोजागिरी पौर्णिमेपर्यंत चालतो. याला नवरात्रौत्सव असेच म्हणतात. पंचमीच्या दिवशी पंचरशी धातूच्या मूर्ति निळ्या पडणे ही घटना आजही घडते आणि त्यामुळे बरेच भाविक हा सोहळा पाहण्यास येतात दर दिवशी पालखीची मिरवणूक ठरलेल्या मार्गांवरून नऊ दिवसपर्यंत निघते व शेवटच्या दिवशी समुद्रावर जाऊन अवभृत स्नानाने समाप्त होते. मंदिराची इमारत जीर्ण झाली असून जीर्णोद्धाराची नितांत आवश्यकता आहे.

सुरतेच्या नबाबाने या देवस्थानखर्चासाठी वार्षिक देणगी रु. ५० ।– दिलेली आहे. तसेच पेशवे सरकारने चालू केलेले वर्षासन इंग्रजांचे व आजचे स्वातंत्र्याचेही काळात चालू आहे. पण बडोदे सरकारने दिलेले वर्षासन मात्र बंद झालेले आहे.

मूर्तीच्या निग्रही वर्तनामुळेच या क्षेत्री मूर्ति स्थापना झाली, असे दिसून येते. (नवशक्ति ७–१०–१९६७).

या प्रकरणात अंतर्भूत करण्यासारखी जेवढी माहिती हाती आली तेवढी नमूद केली आहे, पण यापेक्षा अधिक देवता असण्याची शक्यता दूर करता येत नाही.

# ग्रामदेवता

वैदिक दैवतशास्त्र हे इंद्रप्रधान आहे. अनेक विद्वानांनी असे मानले आहे की, वैदिक देवतांच्या स्वरूपात निसर्गशक्तींचा समावेश झालेला आहे. निरनिराळ्या देवता या मूलत निसर्गशक्तींच्याच निदर्शक आहेत. वेदकालीन सांस्कृतिक इतिहासामध्ये ज्याप्रमाणे स्थित्यंतरे घडून आली, त्याचप्रमाणे या दैवतशास्त्रातही ती घडून आली असली पाहिजेत. वेदोत्तर काळात इंद्रप्रधान निसर्गशक्ति देवतांचे वर्चस्व पुष्कळच कमी होऊन त्या देवता मागे पडल्या आणि दुय्यम किंबहुना त्याहूनही कमी दर्जाच्या समजल्या जाणाऱ्या देवता पुढे पूजनात आल्या.

कोणत्याही दृष्टिकोनातून विचार केल्यास आपणास असे दिसून येते की, मानवाला जेव्हा प्रथमत. देवतापूजनाची कल्पना त्याच्या अंत.प्रेरणेने किंवा स्वयंप्रेरणेने स्फुरली, तेव्हा त्याने मातृशक्तीलाच प्राधान्य देऊन तिला दृश्य स्वरूपात बनविली. कारण जगातील प्राचीन शिल्पशास्त्रात याबद्दलचे भरपूर पुरावे सापडतात. मोहेंजोदरो, आशियामायनर येथील उत्खननांमध्ये मिळालेल्या शिल्पाकृति हेच दर्शवितात. प्राध्यापक जेम्स आपल्या एका ग्रंथात म्हणतात, 'कालांतराने मातृशक्तीचे तत्त्व ऋतुबदलाने होणाऱ्या देवतामध्ये आणि वनस्पतिवृद्धीच्या देवतामध्ये आणले गेले आणि हीच मातृशक्ति, वस्तूंची वाढ सर्जन करते ही भावना जागृत झाल्यामुळे प्रत्येक गोष्टीत तिला दृश्य स्वरूप येऊ लागले.'

काही संशोधकांचे असे मत आहे की, ग्रामदेवता या मानवाला वाटणाऱ्या भीतीमधून निर्माण झाल्या. जसे, मरीआई ही रोगांचा प्रादुर्भाव करणारी देवता आहे. तिचे पूजन करून, वेळप्रसंगी तिला बलिदान करून शांत ठेवली नाही, तर रोगांचा सर्वत्र फैलाव होईल व मानवाची अतोनात हानि होईल यास्तव तिचे पूजन चालू झाले. या देवतेसंबंधीचे वर्णन खालील काव्यस्वरूपात पहा.

गांवोगांवी किती देवता वर्णूं न शके कोणी ।
प्रत्येकाचे क्षेत्रमाहात्म्य, दंतकथा त्यांनाही ॥ १ ॥
कालकर्मे आणि बुद्धीने कल्पित जन तें त्यांना ।
ऊर्जितवस्था येतां वदति ग्रामदेवता त्यांना ॥ २ ॥
बहुत अरिष्टें-रोग समजती त्यांच्या क्रोधे येती ।
विघ्न टळाया की शमवाया पूजाअर्चा करिती ॥ ३ ॥

जत्रा उत्सव घडति तयांचे रक्ताला अर्पुनी ।
त्यांच्या ठायीं प्रेमभाव का ? पूजित जन भीतिनी ॥ ४ ॥
कालांतरिने प्रवेश मिळतो तांत्रिक सांप्रदायी ।
कुलदैवतही कोठे बनती, श्रेष्ठ परी त्या गांवीं ॥ ५ ॥

वरील काव्यकल्पना देवियामल तंत्रातील ज्या श्लोकावरून स्फुरली त्याना आरंभीचा श्लोक असा —

कालकर्मावशात् जाता कल्पिता बुद्धियोगतः ।
स्वदेशभाषानामाघोच्यन्ते ग्रामदेवता ॥ इ० इ०

ग्रामदेवता एकाच प्रकारच्या नाहीत पृथ्वी अथवा भूदेवता, धान्य अथवा वनस्पतिवर्धन करणाऱ्या देवता, संसर्गजन्य रोग उत्पन्न करणाऱ्या व निवारण करणाऱ्या देवता, ग्रामरक्षक देवता, शिवलक्ष्मी आणि विष्णुलक्ष्मी यांच्या प्रतिकात्मक देवता, जल व सर्प यांच्यासंबंधीच्या देवता, ऐयनार, हनुमान इ० इ० ग्रामदेवतांचे प्रकार आहेत. देशपरत्वे ते निरनिराळे आहेत. प्रत्येक गावी एक अगर अनेक ग्रामदेवतांची मंदिरे असून प्रत्यही त्यांची यथासांग पूजाअर्चा होत असते. देवयामल तंत्रात वर म्हटल्याप्रमाणे ग्रामदेवतांचा जन्म मानवांना वाटणाऱ्या भीतीमुळे झाला, हे म्हणणे तितकेसे खरे नाही, कारण सर्वच देवता काही हिंसात्मक नाहीत. लक्ष्मी, पार्वती, हनुमान इत्यादि अनेक अहिंसात्मक देवतांचाही या ग्रामदेवतामध्ये समावेश केला जातो.

'स्मृतिपुराण समुच्चय' ग्रंथामध्ये असे सांगितले आहे की, ग्रामदेवतांना हीन जातींच्या वस्तीमध्ये रहाणे अधिक आवडते. आजही आपण पाहतो की, ग्रामदेवतांच्या उत्सव प्रसंगी सवर्ण हिंदु त्यामध्ये हिरिरीने भाग घेत नाहीत, तर खालच्या थरांचे वर्गच जास्त भाग घेतात. इतकेच नव्हे तर काही उत्सवातून त्यांना मानपानही असतात. या सर्वांचा अर्थ असा घेता येईल की, ग्रामदेवता या मूळच्या अनार्यांच्या असून संस्कृतिवर्धनाच्या वेळी, आर्यांनी त्यांना आपल्या संस्कृतीत सामावून घेतल्या असाव्यात. जेजुरीचा खंडोबा हा मूळचा द्रविडांचा मानला जातो, पण आज उच्चवर्णीय ब्राह्मण कुटुंबातही त्याचे पूजन होते. तसेच मदुरा येथील मीनाक्षी ही प्राचीन ग्रामदेवता मानली जाते, पण सांप्रत ती अनेक घराण्यांची कुलदेवता होऊन बसलेली आहे. काही ग्रामदेवतांच्या बाबतीत असा चमत्कार दिसून येतो की, त्यांचे पूजन करीत असताना अथवा मिरवणुकीच्या वेळी तिच्या पूजकाला लुगडे अथवा इतर स्त्रीवस्त्र निदर्शक काहीतरी नेसावे लागते. जसे मरीआई देवीचा पोतुराजा लेहगा नेसतो त्याप्रमाणे, यावरून असेही अनुमान

काढता येईल की, काही ग्रामदैवते स्त्री वर्गाच्या ताब्यात असावीत आणि त्यांची पूजा अर्चा तोच वर्ग करीत असावा

दक्षिण भारतामध्ये अकम्मा, अकलम्मा, कालेमम्मा, मारियम्मा, यल्लम्मा, गगम्मा, दुर्गम्मा, पोलेरम्मा या स्त्री देवतांचे प्राबल्य, तर उत्तर भारतामध्ये, राजा लखन, द्वार गुसाई, भूमिया, जेठरा, गनसाम, दातनदेव, काशीबाबा, गगनाथ इ० पुरुषवर्ग देवतांचे प्राबल्य आढळून येते महाराष्ट्र कर्नाटकमध्ये वेताळ हा पुरुष देव, तर उत्तर भारतामध्ये त्याची जागा विजयसेन भरून काढतो तामीळनाडमध्ये ऐयनार हे त्याचे स्वरूप होय.

हिंसक प्रकारात जरी कोंबडी बकरी बळी देऊन साजरी करण्याचा प्रघात असला, तरी राम-मारुति जन्माचे उत्सव अहिंसात्मक पद्धतीने साजरे होतात ऐयनार, वहिरोबा, हनुमान, शंकर इत्यादि अनेक देवता पुरुषप्रकृतीच्या आढेत जाखाई, जोखाई, मरिआई, मरीअम्मा, गगम्मा इत्यादि स्त्रीप्रकृतीच्या देवतानाच काही गावाचा वारसा दिलेला नाही अणूरेणूमध्ये परमात्म्याचे स्वरूप आहे, ही भागवत धर्माची शिकवण असल्यामुळे अगर सर्व वयावाईट घटना केवळ काळच घडवून आणत असतो हा शिकवण आचरणात भिनली असल्यामुळे काही मूर्तीच्या ठायी जसा उत्तम गुणाचा समुच्चय लादला जातो, तसा वाईट गुणाचाही काही मूर्तीच्या ठिकाणी मानला जातो यावरून एकच आढळून येईल की, वरील तत्रातील ग्रामदेवताच्या उत्पत्तीबद्दलचा लेखकाचा सकेत तितकासा बरोबर नाही

ग्रामदेवता का स्थापन झाल्या ? असा कोणी प्रश्न केल्यास त्याला निश्चित उत्तर देणे कठीण आहे परतु स्कदपुराणातरी अशी एक कथा आहे की, प्राचीन काळी आयलोक जेव्हा जगले तोडून वसतीस्थाने निर्माण करू लागले, त्या वेळी अशाच एका धर्मारण्य या स्थळी त्यानी ब्राह्मणाची वस्ती वसविली परतु पुढे अनार्यांच्या त्रासामुळे ब्राह्मण तेथून पळून गेले तेव्हा आर्यांनी पुनश्च त्याना तेथे आणून प्रत्येक गोत्राच्या ब्राह्मणाची सरक्षक म्हणून एक एक देवता त्या ठिकाणी स्थापना केली यासबधीचा श्लोक असा,

रक्षणार्थं हि विप्राणा लोकाना हितकाम्यया ।
गोत्रान्प्रति तथैकैका स्थापिता योगिनी तदा ॥ १ ॥
यस्य गोत्रस्य या शक्ती रक्षणे पालने क्षमा ।
सा तस्य कुलदेवीति साक्षात्तत्र बभूव ह ॥ २ ॥

अनार्यलोक हे मूळचे शक्ति-उपासक आहेत, असे संशोधकांचे मत आहे. तेव्हा त्या ठिकाणी शक्ति देवतांची स्थापना झाल्यावर त्या देवतांचा अनादर करणे अनार्यांना दुर्घट होऊन त्यामुळे ब्राह्मणांना होणारा त्रास वाचला.

मानवाची संस्कृति जसजशी सुधारू लागली, तसतसे प्रत्येक कार्यात त्याला मानृशक्तीचे स्वरूप दृग्गोचर होऊ लागले. मानवाला पंचमहाभूते जीवनविषयक साहाय्य देतात, ही भावना झाल्याबरोबर मानवाने त्यांना समूर्त स्वरूपात आणून बसविले. भू पृष्ठावरील जीवनविषयक वस्तु पृथ्वीच देते, ह्याचे परिणत स्वरूप भू देवीचे पूजन होण्यात दिसून आले. धान्य पिकविताना शेतकऱ्यांना अनेक छोट्यामोठ्या आपत्तींना तोंड द्यावे लागते. रोगराई, किडामुंगी यापासून त्या धान्याचे संरक्षण करावे लागते. तेव्हा हे संरक्षण होण्यासाठी काही देवतांची स्थापना होऊन त्यांचे पूजन होऊ लागले. रोगराईचा फैलाव होणे ही वास्तविक पाहाता नैसर्गिक क्रिया, परंतु ती घडवून आणणारी कोणीतरी अदृष्टशक्ति आहे, हे मानल्यावर तिला मूर्त स्वरूप येऊन तिची पूजाअर्चा सुरू झाली.

दिनांक ११-१२-६७ रोजी अभेद्य समजल्या जाणाऱ्या महाराष्ट्राच्या पठारावर, कोयना धरणाजवळ जबरदस्त भूकंप होऊन आसमंतातील सुमारे ४०० मैलापर्यंत तो तीव्रपणे जाणवला अनेक माणसे मृत्युमुखी पडली. शेकडो जखमी झाली वास्तविक हा नैसर्गिक प्रलय असला, तरी गुजराथ प्रांतीचे शंभुमहाराज सांगतात की, भूरूपी गोमातेची कत्तल भारतात चालू असल्याने, तिच्या शापामुळे हा भूकंप झाला यास्तव गोमातेचे दुःख राजकर्त्यांनी निवारावे म्हणजे पुन्हा अशी आपत्ती राष्ट्रावर येणार नाही. महाराष्ट्राचे दैवत पंढरपूरचा विठ्ठल याला अनेक ब्राह्मणांनी पुरुषसूक्ताचा अभिषेक करून, भूकंपानंतर प्रत्यही बसत असलेले धक्के निवारण करण्याची प्रार्थना केली.

गावावर काही अरिष्ट कोसळू नये, सर्वत्र सुखशांति व समाधान नांदावे, यास्तव महिरोबा, शंकर, मारुती, म्हसोबा यांची स्थापना झाली. ज्याला जो मार्ग सुचला, रुचला त्याप्रमाणे त्याने हृदयपरडीतील भक्तिभावसुमने वाहून ग्राम देवतांची पूजा बांधली आणि यासाठीच ग्रामदेवतांची मोजदाद करणे, त्यांचा पूर्वेतिहास शोधणे, नावांची व्युत्पत्ति पाहाणे, हे अतिशय अवघड काम आहे

बरे, सर्वच देवतांच्या मूर्ति आहेत असेही नाही. ज्यांची संस्कृति उच्च, त्यांच्या इष्टदेवतेचे स्वरूप त्या त्या देवतेला दिले. कालांतराने त्यांच्या आकारात सुधारणा करून सुंदर स्वरूपे निर्माण केली. भक्तांची आर्थिक परिस्थिति चांगली असल्याने काही देवतांना बसावयास उत्तम आसन व रहावयास चांगले मंदिरही मिळाले पण ज्या समाजाला पूर्ण संस्कृतीच नव्हती, त्यांनी साध्यासुध्या ओबड-

धोंगड पाषाणाला देव मानले, त्याच्या माथ्यावर शेंदूर थापला आणि उघड्या जागेवरच त्यांना नांदावयास जागा दिली या समाजामध्ये शक्तिपूजा असल्याने, देवतांना बळी देण्याची प्रथा होती तेव्हा शक्तिदेवतांना रक्त प्रिय आहे या समजुतीने, रक्ताचे प्रतीक म्हणून त्यांना शेंदूर लावण्यात आला गावाच्या आस पास राहणाऱ्या या समाजाच्या देवतांना शेंदूर तरी मिळतो आणि त्यामुळे त्या देवता आहेत हे पाहणाऱ्याला कळते तरी परंतु या देवतांपेक्षा काही कमनशिबी देवता ज्या रानावनात पूजिल्या जातात, त्यांना साधा शेंदूरदेखील मिळत नाही गावाबाहेर कोठेतरी दगडाच्या राशीत त्या राहतात आणि सवडीप्रमाणे भक्ताकडून त्यांचे पूजन होते.

उच्चसंस्कृतीच्या ग्रामदेवतांना दररोज पूजाअर्चा, नैवेद्य मिळतो, वारंवार त्यांच्या मिरवणुका निघतात अनेक वैभवाचे प्रकार त्या उपभोगतात पण शेंदूर चर्चित व इतर देवतांचे पूजन वर्षातून काही प्रसंगानीच होते, इतर सौख्य एखाददुसरे वेळीच मिळते याप्रमाणे मानवाच्या उच्चनीच संस्कृतीचा परिणाम त्या त्या देवतांना भोगावा लागतो, असेच म्हणावे लागते ते जरी देव असले तरी सर्वांना सारखी वागणूक अथवा ऐश्वर्य लाभत नाही

ग्रामदेवतांची मोजदाद करणे आणि त्यांचे स्पष्टीकरण करणे कसे अवघड काम आहे, याचे थोडक्यात विवरण करता कै ना गो चापेकर यांनी आपल्या ' चित्तपावन ' या ग्रंथामध्ये दक्षिण रत्नागिरी जिल्ह्यातील ग्रामदेवतांची काही माहिती जमा करून प्रसिद्ध केली आहे त्यातील देवतांच्या नावांची यादी मुद्दामच उद्धृत करीत आहे, कारण हे काम कसे अवघड आहे याची वाचकांना थोडीशी कल्पना यावी ती नावे येणेप्रमाणे—

आकारी, आकारादेवी, आकाशी, इगळाई, उसलाई, एकवीरा, कमळजा, करजेश्वरी, कळंबादेवी, काईई, कामादेवी, कालेश्री, काळकाई, काळूनाई, कुसुम नाई, केडजाई, केळमाई, केळाई, कोळीदेवी, खामदा, खेन्जाई, गिरवीरा, घोन्सुरी, चडकाई, चाचवलकरीण, चुरडी, चेचलाई, चौकणी, जासाई, जासमाता, जागादेवी, जखुनाई, जागेदारी, जानाई, जाभई, जुगादेवी, झोलाई, डोंगरादेवी, तोरणेश्वरी, त्रिसुली, दाग्वटकरीण, दीधकरीण, देवसती, धरणकरीन, धर्णिका, धानया, धावजी, नलो, नवदुर्गा, नवलाई, नवसरी, नाटी, नाटीश्वरी, नाठाई, नादगावकरीण, नित्यादेवी, निधडादेवी, निनावी, नरकारी निलो, न्हावणकरीण, पटुबाई, पद्मावती, पाग्करीण, पानबुडी, पाढरी, पायणाई, पावनाथ, पावलाई, पाहुणजाई, पूर्वादेवी, पेठकरीण, पोनई, फराजिणी, बकी, बहिरी, बादेजाई, भरदुर्गा, भराडीण, भाऊकादेवी, भावकाई, भावयी, भासी, भूमकरी, भराडी,

मराडी, महामाई, महामाया, मागाई, मागुनाई, मानमोडी, मानाई, मानुबाई, मामई, मालाई, मुसळादेवी, मुहुर्तादेवी, येगी, रारळाई, रेडजाई, उमादेवी, वनदेवी, वरदनिका, वानदेवी वागजाय, वागजाई, विठाई, विठलादेवी, विंध्यवासिनी, वीरचंडी, वेगळीदेवी, व्याघ्रांबरी, सत्ताराई, सातेरी, साय करीण, सायनाय, सालबारीण, सावणेकरीण, साळशी, सीमादेवी, सुकाई, सोनराया, सोनसासळी, सोमजाई, सालेजाई, शेवडेई, श्रावणेकरीण, हुसलादेवी, जाभदेवी, बारची, याप्रमाणे ही १३० नावाची यादी आहे

वरील यादीवर दृष्टिक्षेप टाकल्यास असे दिसून येईल की, ज्या प्रसिद्ध पीठस्थ देवता आहेत, त्यांच्या नावाचे अपभ्रंश अनेक आहेत जसे कळंबा-काली, कामदा-कामाख्या, चडकाई-चंडिका, पदुबाई-पद्मावती, भानकई-भवानी, महामाई-महामयी, इ० इ० तेव्हा काही पीठस्थ देवता असल्या तरी अनेक स्थानिक महत्त्वावरून त्या पूजनात आलेल्या आहेत त्यांना फक्त स्थानिक महत्त्व असल्याने आणि उज्ज्वल पूर्व इतिहास नसल्याने त्यांचे संशोधन करणे उपयुक्त ठरणार नाही कारण त्या त्या स्थानिक माणसांशिवाय इतरांना त्यांचे आकर्षण नाही असे संकलन करण्याचा कोणी प्रयत्न केलाच तरी त्याची उपयुक्तता सर्वांना पटेलच असे नाही एकाच जिल्ह्याच्या अर्ध्या प्रदेशात जर एवढी लांबलचक कंटाळवाणी यादी निघू शकते, तर भारतातील सर्व प्रदेशातील देवतांची यादी किती लांबेल याची कल्पना वाचकांनीच करावी वरील यादीमध्ये आणखी एक मुद्दा ध्यानात ठेवण्याजोगा आहे, तो म्हणजे यादीमध्ये पुरुषप्रकृतीच्या देवतांचा समावेश केलेला नाही तो जर झाला असता, तर काय परिस्थिति ओढवली असती याचा विचार वाचकांनीच करावा! ज्याप्रमाणे या ठिकाणी काही पीठस्थ देवता ग्रामदेवता स्वरूपात वावरत आहेत, तसेच इतर प्रांतांही आढळून येईल कर्नाटकातील यलम्मा, दुर्गाम्मा गंगाम्मा, या पीठदेवतांचे अवतार होत ग्रामस्थांनी आपल्या भाषेत ती सुटसुटीत बनवली आहेत इतकेच

## ग्रामदेवतांचे कार्य

ग्रामदेवतांचे कार्य अनेकविध आहे, हे त्या त्या प्रसंगावरून आपल्याला समजून येते वृक्षवनस्पतिसंवर्धन, गावाचे संरक्षण, संसर्गजन्य रोगांचे निवारण, भूतांपेतांपासून संरक्षण, नैसर्गिक आपत्तीपासून निवारण, संततिवर्धन व त्याच्या आयुरारोग्याची राखण इत्यादी अनेक प्रकारची कार्ये या देवता करीत असतात या देवतांसंबंधी निरनिराळ्या समाजात अनेक तऱ्हेच्या समजुती प्रचलित आहेत व त्या समाजाच्या रूढीप्रमाणे, पूर्वपरंपरेप्रमाणे अगर भक्ताच्या इच्छेप्रमाणे पूजनाचे कार्य चालत असते दीर्घकाळची अवर्षणे ही ग्रामदेवतांची पूजा -

अगर ती यथाविधि न केल्यामुळे होतात, यासाठी अनेक गावकरी नेहमी दक्ष असतात आपण काही उदाहरणे पाहू.

महाराष्ट्र भागात अवर्षण पडले तर अथवा पर्जन्यवृष्टि होण्यास वेळ लागला ( बहुधा असे कोणत्या तरी भागात नित्य घडतेच ) तर शंकर, हनुमान, अथवा अन्य ग्रामदेवतेवर महाराष्ट्रीय लोक अभिषेक चालू करतात. देवाना पाण्यात बुडवून ठेवतात. असे केल्याने देवाला संकटातून स्वत:ची सुटका करून घेण्यासाठी पर्जन्यवृष्टि करावी लागते, असा विश्वास आजच्या वैज्ञानिक व तांत्रिक युगातही प्रत्यहीं येत असतो. यासंबंधीच्या अनेक बातम्या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होत असतात. ज्या ठिकाणी शंकराचे मंदिर नसेल अशा गावी शिवलिंगाची मृत्तिकेची पिंडी बनवितात, तिची मिरवणूक काढतात, म्हणजे पाऊस पडतो अशी समजूत आहे. बुलाना जिल्ह्यामध्ये वरखेडे या गावी एका मोठया पाषाणावर काही प्रतिमा खोदलेल्या आहेत, त्याची ग्रामदेवता म्हणून पूजा होते. अवर्षणाच्या वेळी त्या पाषाणमूर्तीची शास्त्रविधीने पूजा केल्यावर तिला गदगदा हलवितात, म्हणजे जोराची पर्जन्यवृष्टी होते, असा तेथील ग्रामस्थ भक्ताचा अनुभव आहे.

## गाव मंदिरामुक्त झाला

खेड्यातील जनसमूहावर धार्मिक समजुतीचा पगडा आजही किती प्रखर आहे, याची प्रचिती सन १९६४ साली कापडे हवेली ( सातारा ) या गावी घडलेल्या एका घटनेवरून दिसून येते. असे सांगतात की, या गावी हातभट्टया लावून खाजगी दारू गाळण्याचा उद्योग मोठया प्रमाणात चालत असे. अर्थातच ग्रामस्थ या पेयाचा गैरफायदा घेऊन स्वैरपणे वागत असत. एकदा एका माणसाने मनमुराद दारूचे सेवन केल्यावर त्याची शुद्ध हरपली आणि त्या भ्रमिष्ट नशेत, त्याने तेथील ग्रामदेवतेच्या मूर्तीला पादत्राणाने बडवून काढले ही कृति चार-चौघाच्या समोर झाली, पण भीतीमुळे ते अधिक काही करू शकले नाहीत.

कर्मधर्मसंयोगाने एक-दोन दिवसात कॉलऱ्याची साथ सुरू झाली व काही माणसे दगावली कारण परपरा शोधताना त्याना असे दिसून आले की, आपल्या-पैकि एकाने ग्रामदेवतेची जी विटंबना केली त्याचा हा परिणाम आहे, यामुळेच गावावर संकट आले आहे. सर्व गावकरी मंदिरात जमले आणि गावातील मादक पदार्थांच्या रसायनाचे डबे व इतर साहित्य तेथे जमा करून, देवतेसमोर त्या सर्वांना नाश केला. इतकेच नव्हे तर सर्वांनी देवासमोर शपथा घेतल्या की, यापुढे गावात कोणीही दारू चोरून गाळावयाची नाही. कालांतराने कॉलऱ्याची साथही कमी झाली आणि ती देवतेच्या कृपेने कमी झाली, अशीच सर्वांची श्रद्धा झाली.

( केसरी, बन्हाड बातमी, ५-८-६४ )

## चोर सापडला

बवे पाटणे ( रोहे-कुलाबा ) येथे डी. डी. टी. चा फवारा मारण्यास गेलेल्या एका कर्मचाऱ्याने, नागू घाणेकर याचे घड्याळ चोरले. चोरी कोणी कबूल करीना, तेव्हा ग्रामदेवता काळकाई देवीला कौल लावून, चोरीचा तपास करता, 'घड्याळ बाहेरच्या इसमाने चोरले' असा जबाब मिळाला. शेवटी चारही कर्मचाऱ्यांना देवीसमोर उभे केले, 'तेव्हा चार क्रमांकाच्या इसमाने चोरले' असा पुन्हा खुलासा झाला. त्या इसमाचा (नारायणाचा) शेवटी नाइलाज झाला आणि पुढील यातना चुकविण्यासाठी, त्याने रोहे येथील मारुती मंदिरात लपवून ठेवलेले घड्याळ आणून दिले. या घटनेचा अर्थ इतकाच की, श्रद्धेने देवाकडे संकट घातल्यास, आजही त्यापासून मार्गदर्शन मिळते आणि मानश्रद्धा दृढ होते. ( केसरी, रोहे वार्ताहर, १७-८-६४ )

कर्नाटक प्रांती तेथील विख्यात देवता दुर्गव्वा अथवा द्यावम्मा हिचा छळ करण्याची प्रथा प्रचलित आहे. या छळाचा प्रकारही अजबच आहे. अवर्षण-काळी या देवतेच्या मंदिरासभोवार पाच आठवडे बाजार भरवितात. त्यामुळे आसपास भरपूर घाण सांचते. घाण काढून टाकीत नाहीत. तशीच साचेल तेवढी घाण साचू देतात. भक्त या घाणीचे निर्मूलन करीत नाहीत आणि या अशा दुर्गंधीत राहणे देवतेला असह्य होते. तेव्हा या संकटातून स्वतःची सुटका करून घेण्यासाठी देवतेला पर्जन्यवृष्टि घडवून आणावी लागते आणि मगच ह्या घाणीचे निर्मूलन होते.

गिरनार, अबू, पावागड इत्यादि क्षेत्राच्या ठिकाणी तेथील देवतातही पर्जन्यवृष्टि घडवून आणण्याची दैवीशक्ति आहे, अशी त्या भागातील लोकांची श्रद्धा आहे. यासाठी अवर्षणाच्या काळी भाविक लोक या क्षेत्रांना भेट देतात. शुद्ध अंतःकरणाने देवतेची पूजा करून संकटनिवारणासाठी देवतांना सांकडे घालतात. असे केल्याने पर्जन्यवृष्टि होते, असा त्यांचा अनुभव आहे. या प्रांतीची एक सुप्रसिद्ध माता, हर्षदमाता, हिला अवर्षणकाळी अभ्यंगस्नान घालून गव्हाच्या शिऱ्याचा नैवेद्य समर्पण केल्यास पर्जन्यवृष्टि होते, असाही तेथील भक्ताचा अनुभव आहे.

भूदेवतेला संतुष्ट केल्यास पर्जन्यवृष्टि होते, या श्रद्धेमुळे काही ठिकाणी भूदेवतेची मृत्तिकेची मूर्ति बनवून, पानाफुलांनी तिला सजवून मस्तकी धारण करून, गाणी गात गात घरोघरी मिरवितात. घरातील महिला या मूर्तीवर पाण्याचे सिंचन करतात आणि पर्जन्यासाठी वरुणदेवाची प्रार्थना करतात. गुजराथ प्रांती या विधीला 'मेहुलो अगर मेघलो' असे म्हणतात, तर कैकाडी आणि ओड या वन्य जमाती त्याला 'धोंडिल जाम्या' या नावाने संबोधतात.

उत्तर प्रदेशात मिर्झापूर जिल्ह्यातील एका अवर्षणग्रस्त खेड्यातील स्त्रियांनी तर कमालच केलेली दिसून येईल. त्या भागात अनेक शतके अशी प्रथा रूढ आहे की, अवर्षणकाळी विवस्त्र स्थितीत स्त्रियांनी आपापल्या शेतामध्ये सामुदायिक नांगरणी केल्यास पर्जन्यवृष्टी होते. याप्रमाणे त्यांनी ऑगस्ट १९६२ साली नांगरणी केली आणि योगायोग असा की, वरुणराजाला या स्त्रियांची करुणा आली आणि त्वरितच त्याने मुसळधार पर्जन्यवृष्टि केली.[1]

---

१. टीप—अवर्षणकाळी पर्जन्यासाठी वरूणदेवतेची प्रार्थना अनेक प्रकारांनी करण्याच्या रूढि भारतामध्येच आहेत, आणि इतर देशांत त्या नाहीत असे मात्र नव्हे. या श्रद्धेसंबंधीचा विश्वास सर्वत्र सारखाच दिसून येतो. आपण काही उदाहरणे पाहू—

( १ ) बेडूक आणि पाऊस यांचा संबंध बऱ्याच देशांत दिसून येतो. पेरू देशात बेडकांच्या मृण्मय मूर्ति तयार करून, त्या उंच डोंगरमाथ्यावर ठेवतात. हेतु असा की, बेडकाना त्रास होऊ नये. म्हणून पर्जन्य लवकर येईल.

( २ ) नेपाळप्रांती कार्तिक महिन्यात सप्तमीच्या दिवशी ब्राह्मणवर्ग बेडकांच्या वस्तीच्या ठिकाणी जाऊन, त्यांचे पूजन करून प्रार्थना करतात, 'हे भूमीनाथा, आमच्या पूजनाचा स्वीकार कर आणि लवकर पाऊस पडू दे.'

( ३ ) न्यूझीलंडमध्ये माओरी जमात बेडकाला कापून त्याचे रक्त शेतात शिपडतात.

( ४ ) ब्रह्मदेशात बेडकाला पकडून, त्याच्या तोंडात धान्य भरून, ते तोंड शिवून नंतर सामुदायिकरीत्या त्याला शेतात सोडून देतात.

( ५ ) पर्जन्य येण्यासाठी याप्रमाणे बेडकांचा उपयोग करतात, तसा तो थंद व्हावा म्हणून तिबेटियन लोक बेडकाला मंदिराच्या खाली पुरतात, म्हणजे तो पाऊस थांबतो अशी त्यांची धारणा आहे.

इतर देशांतील स्त्रीवर्गाकडेही काही कामगिरी पर्जन्यासाठी आहे—

( १ ) रशियातील कॉकेशस भागात, बैलांऐवजी दोन स्त्रिया जू खांद्यावर घेऊन शेत नांगरतात, आणि नांगरत नांगरत नदीतील गुडघाभर पाण्यापर्यंत आत जातात. जॉर्जिया, आर्मेनिया या देशांतही ही प्रथा पाळतात.

( २ ) ग्रीस देशात एखाद्या कुमारीला नटवून, सजवून गावभर तिची यथास्थित मिरवणूक काढून तळे अथवा विहिरीपर्यंत नेतात. गावातील मंडळी तिच्या मागून जातात आणि मिरवणूक संपल्यावर, सर्वजण तिच्या अंगावर थोडे थोडे पाणी शिंपडतात. ( टीप पुढे १०७ पृष्ठावर पूर्ण. )

सांप्रतच्या युगामध्ये अवर्षणे पडतात आणि वेदकाळामध्ये पडत नव्हती असे नाही. त्या काळीही अवर्षणे पडत आणि पर्जन्य येण्यासाठी यज्ञयाग करीत असत. 'यज्ञात् भवति पर्जन्यः ।' हे गीतेमधील वाक्य प्रसिद्धच आहे. परिस्थित्यनुरूप आता चालीरीतीमध्ये थोडा फरक झाला इतकेच.

सर्वभूती देवाचे वसतिस्थान आहे, मात्र तेथे देव आहे, या श्रद्धेने देवतेची पूजा केल्यास व संकटनिवारणासाठी हाक मारल्यास त्याच्या श्रद्धेचे फळ त्याना मिळते, पर्जन्यवृष्टि होते, असा अनेकांचा अनुभव आहे व प्रत्यही येतही आहे. धार्मिक श्रद्धेपोटी देव भक्ताचे संकटनिवारण करतो, हा अनुभव असल्याने या समजुतीला धर्मद्वेष्टे व इतर नास्तिक काहीही म्हणोत, कितीही नाके मुरडोत, धर्माभिमानी व श्रद्धावान् लोकांनी त्याकडे लक्ष देण्याचे कारण नाही. सत्य हे त्रिकालाबाधित सत्यच राहते, हा अनुभव आहे.

प्रस्तुत ग्रंथाचा लेखक ( म्हणजे मीच ! ) स्वतः लहानसा शेतकरी आहे. वर्षांतून केवळ हौसेखातर चिखल तुडवून, सह्यांत मण भात, गोरेगावी जपानी शेतीपद्धतीने पिकवितो. या वेळचा अनुभव असा की, नांगरणीच्या वेळी शेत नांगरणारे मजूर प्रथम भूमिपूजन केल्याशिवाय, नारळ फोडून सोन्याच्या तुकड्यावर गुलाल घालून, उदबत्ती पेटवून, गुळाचा नैवेद्य भूदेवतेला दाखविल्याशिवाय नांगराचा फाळ जमिनीला लावत नाहीत. कापणीच्या वेळीही हाच अनुभव येतो. अनेक ठिकाणी शेतीच्या रक्षक देवताचे पूजन करावे लागते. एरव्ही शेत चोराकडून लुटले जाईल, जनावराकडून खाल्ले जाईल ही भीती असते. वास्तविक शेताच्या वडणीवर अनेक दैवतांची प्रतिमे आढळतात.

ससगजन्य रोगप्रतिबंधक अनेक ग्रामदेवता आहेत. त्यामध्ये शीतळा,

---

इतरही अनेक प्रकार आहेत—( अ ) रशियात काही भागात मंदिरातील पाद्र्याला जमिनीवर निजवून, भिजवून काढतात. ( आ ) आफ्रिकेत काही रानटी जमाती प्रेतनिदर्शक लाकडाचे खेळणे तयार करून, मांत्रिकाकडून ते जोराने फिरवितात. ( इ ) सहारा वाळवंटाच्या उत्तर भागात, मानवी आकाराचा लाकडी पुतळा करून, त्याची मिरवणूक काढतात, त्या वेळी गावकरी त्यावर पाणी ओततात, वरुण राजाची स्तुतीस्तोत्रे गातात, याला 'बौजा' म्हणतात. ( ई ) ग्रीसच्या काही भागात वरुणाची मूर्ति सामुदायिकरीत्या भूमीवर जोराने आपटतात आणि प्रार्थना करतात, 'हे वरुणा, पावसाच्या अभावी भूमीवर राहणे किती कठीण आहे हे जाणून घे, आणि पर्जन्य पाड.' ( उ ) कोठे बैलाचे बलिदान, कोठे सर्पांचे पूजन, तर कोठे वरुण देवाला भाल्याने भोसकण्याची धमकी दिली जाते, इ० इ०. ( विचित्र विश्व, जुलै १९६८ )

मरीआई, म्हसोबा, सटवाई, सेरमाता, मरिअम्मा, गगम्मा इत्यादि अनेकांचा समावेश प्रांतपरत्वे करावा लागेल. शीतळादेवी ही वास्तविक थंडपणा आवडणारी देवता. परंतु बंगालप्रांती हिला 'बसंतबुराही' म्हणजे वसंत ऋतूची म्हातारी देवता म्हणतात, काही ठिकाणी हिला 'बसंतचंडी' म्हणजे वसंतकालाची क्रूर देवता असे म्हणतात. तिला क्रूर मानण्याचे कारण असे की, वसंत ऋतूमध्ये जे नैसर्गिक रोग उत्पन्न होतात, ते रोग ही देवीच निर्माण करते, असे काही लोक मानतात. या देवीला सहा बहिणी असून कंकरमाता, फुलमाता, पानशाही, बडीमाता, गुलसालियामाता इत्यादि त्यांची नावे होत. यांपैकी कोणी सात वर्षेपर्यंतच्या मुलांवर आपला अमल चालविते, कोणी सात ते पंधरा वर्षांपर्यंतच्या मुलांवर, तर कोणी त्याहून मोठया मुलांवर व पुरुषांवर नाही भगवान् करण्याची पाळी आणते. या देवीचे स्वरूप व त्या स्वरूपाचे वर्णन बहुधा सर्वत्र सारखेच आहे. ते असे, विवस्त्र, रक्तवर्ण, गर्दभवाहन, हातामध्ये झाडू, डाव्या काखेखाली भांडे व मस्तकावर पंखा!

पंजाबप्रांती या देवीला सहा बहिणी आहेत असे मानतात. त्यांची बसती, महामयी, पोलडे, लमकारिया, आगवानी, मसानी ही नावे होत. आगवानी सर्वांच्या पुढे चालते, तर शीतला तिच्या मागोमाग चालते. या देवतांची स्थाने निरनिराळ्या गावी आहेत. पात्री, कात्री, वेहोली, वशिव, निथळून, भाटगाव ही ती स्थाने होत. निरनिराळ्या वयाच्या मुलांना निरनिराळी बहीण छळते. या देवतेला शांत ठेवण्यासाठी चैत्र सप्तमीला तिचे विशेष पूजन करण्याची प्रथा आहे. या देवीचे वाहन गर्दभ आहे आणि वाहनाचा धनी साधारणतः कुंभार हा मानलेला आहे. कारण भांडी करण्यासाठी तो गाढवावरूनच माती वाहातो. तेव्हा सप्तमीच्या दिवशी होणाऱ्या विशेषपूजनप्रसंगी या कुंभाराला म्हणजेच गाढवाच्या धन्याला चण्याचा आहेर करण्यात येतो. कोंबडी, बकरी, डुक्कर इत्यादी पशु बळी देण्याचीही पद्धति रूढ आहे. कर्नल या भागात तर या देवतेचा शाप न बाधावा म्हणून अनेक माता दरसाल एका ठराविक वेळी जोगवा मागतात आणि त्या भिक्षेच्या अन्नाचा नैवेद्य मातेला अर्पण करतात.

(लाहोर जिल्हा गॅझेट, पृष्ठ ९१)

भारतामध्ये अनेक प्रांतामध्ये या देवतेला ग्रामदेवता मानलेले आहे, तेव्हा तिच्यासंबंधी येथे थोडे अधिक विवरण करणे योग्यच ठरेल. असे मानले जाते की, शंकराप्रमाणे ही आर्येतरांची देवता असून नंतर संस्कारांनी ती आर्यधर्मात शिरली असावी. या देवतेचे पूजन आजही उच्चवर्णीय हिंदु करीत नाहीत, तर प्रामुख्याने वन्य जमाती अगर नीच वर्णाच्या जमाती करतात. कोणत्या कारणास्तव ही देवता उत्पन्न झाली, तो प्रसंग, त्याबद्दलची दंतकथा अगर त्या-

बाबतची कसलीही माहिती आढळून येत नाही. परंतु हिचे स्वरूप मात्र वर वर्णन केल्याप्रमाणेच परंतु क्वचितच काही ठिकाणी थोडेसे वेगळे आढळून येते.

तापसरींमधील चित्तविभ्रम, फेफरे, आकडी, उन्मादवायु इत्यादि विकार हे यक्षकिन्नरांच्या प्रभावामुळे उत्पन्न होतात, तर पटकी, हगवण, देवी इत्यादी विकार हे देव अथवा ग्रामदेवताच्या कोपामुळे उत्पन्न होतात, अशी या जमातीतील लोकांची समजूत आहे. देवीसारख्या सांसर्गिक रोगात तापाचे प्रमाण भरपूर चढते आणि ते खाली उतरविण्यासाठी बर्फाची पिशवी अथवा मिठाच्या पाण्याची पट्टी मस्तकावर ठेवावी लागते. तेव्हा या तापाच्या ' उग्र ' स्वरूपाला ' शीतल ' करण्यासाठी ज्या देवतेची पूजा केली जाते, त्या देवतेचे या ' शीतल ' वरून ' शीतला ' ( किंवा सितला, शीतळा, शितळा अर्थात् हा अपभ्रंश. ) असे नामाभिधान प्राप्त झाले असणे असंभवनीय नाही. दक्षिणप्रांती ह्याच स्वरूपाला काही भागात मारीदेवी असे संबोधिले जाते.

या देवीच्या मूर्तीचे स्वरूप म्हणजे बहुधा एक गोल पाषाण असतो. त्यावर काही ठिकाणी शेंदूर लावलेला असतो, तर काही ठिकाणी नसतो. या देवीची मूर्ति मंदिरात बसविलेलीही काही काही ठिकाणी आढळते. परंतु बहुतेक ती उघड्यावरच असते. ज्या ठिकाणी मूर्ति असतात, त्या बहुधा ओबडधोबड स्वरूपांच्याच असतात. त्यात रेखीवपणा नसतो. बंगालमध्ये तर या देवतेचे कोणतेच स्वरूप न मानता एक लहानसा चौक शेणामातीने सारवितात. त्यावर अग्नि पेटवून त्यात तुपाचे हवन करतात आणि या सर्व स्वरूपालाच शीतला-देवीचे स्वरूप मानतात.

देवी या रोगावर आराम पडण्यासाठी काही ठिकाणी या देवीची प्रार्थना करतात आणि खालीलप्रमाणे आचरण ठेवून काही आवश्यक गोष्टी कटाक्षाने पाळतात. ज्या घरात देवीच्या विकाराने मनुष्य आजारी झाला असेल त्या घराच्या दारावर कडूनिंबाचा टाळा बांधतात. येथे हे लक्षात ठेवले पाहिजे की, कडूनिंबाच्या पाल्याचा औषधी गुणच असा आहे की, तो जात्याच थंड असल्याने व त्याच्या सान्निध्याने रोगावर अनुकूल प्रतिक्रिया होत असल्याने, तो बांधण्याची रूढी चालू झाली असावी. उच्चवर्णीय ब्राह्मणाला देवीच्या रोग्या-जवळ जाऊ देत नाहीत. कारण त्याच्या पवित्र वागणुकीमुळे रोग जास्तच उफाळून येईल, अशी त्यांची समजूत असते. तसेच रजस्वला बाईला आजारी माणसाजवळ जाऊ देत नाहीत. कारण तिच्या अशौचपणामुळे आजाऱ्याच्या डोळ्यात फूल पडणे अगर इतर विकृति होण्याचा संभव असतो. गोडतेलाचा दीप सतत त्याच्याजवळ तेवत ठेवतात. आजारी मनुष्य जे जे मागेल ...

मागेल ते ते सर्व त्याला खायला दिले जाते. कारण साक्षात् देवताच ते मागणे मागत असते, अशी समजूत असते. काही ठिकाणी देवीच्या रोग्याला लवकर आराम पडावा म्हणून त्याचे माता पिता, भाऊ वगैरे अथवा पत्नी किंवा निकटवर्ती नातेवाईक देवीचा वसा घेतात की, 'रोगी बरा झाल्यावर दंडवत घालीत देवालयात जाईन, देवीला चांदीचा नेत्र वाहीन, उपास-तापास करीन,' इ० इ०. काही ठिकाणी देवीचे वाहन गर्दभ त्याला पोटभर चणे खायला घातले जातात. रोग्याला लवकर आराम पडावा म्हणून मंदिरातून या देवीचे न्हाणण आणले जाते आणि त्या न्हाणणाने रोग्याला स्नान घातले जाते. अर्थात्, देशपरत्वे तेथील लोकांच्या रूढीप्रमाणे या पूजनात कमीजास्त फरक असतो.

(जेम्स धर्मकोश, ३–११२)

उत्तरप्रदेशी याच देवीला कोणी विषहारी अथवा धरती माता असे म्हणतात. या प्रांती अनेक ठिकाणी या देवतेची मंदिरे आढळून येतात. शीतला-सप्तमी या नावाचे एक व्रत या प्रांती आचरले जाते. श्रावण वद्य सप्तमीच्या दिवशी ते पाळले जाते. मात्र या व्रताच्या दिवशी माध्यान्हकाळी सप्तमी असावयास पाहिजे अशी अट आहे. स्कंदपुराणात या व्रताचा विधि निरूपिलेला आहे. तो असा—एका सुवर्णाच्या अगर तांब्याच्या पत्र्यावर देवीचे स्वरूप कोरून ती प्रतिमा एका कलशामध्ये ठेवावी. षोडशोपचारे तिचे पूजन करून तिला गोडाधोडाचा नैवेद्य अर्पण करावा. शीतलादेवीचे ध्यान करावे. 'शीतले पचपक्वान' म्हणून नैवेद्याच्या वेळी मंत्र म्हणावा. देवीला अर्घ्य देऊन विनती करावी, 'हे देवी, तू पुत्रपौत्र व धनधान्याची आबादीआबाद करणारी असल्यामुळे मी तुला वंदन करीत आहे, यानंतर सात ब्राह्मण आणि सात कुमारिकांना भोजन घालावे. तुपाचे आठ दीप लावावेत. दररोज गाईचे दूध आणि सुवासिक पाणी यांनी जागा शुद्ध राखावी. व्रतसमाप्तीच्या वेळी देवीला प्रिय असणाऱ्या वस्तु ब्राह्मणाना अर्पण कराव्यात. या व्रताचरणेमुळे वैधव्य टळते, दारिद्र्य नाश पावते आणि कर्मांचे फळ उत्तम मिळते. व्रताचरण झाल्यावर मोठ्या भक्तिभावाने त्याची कथा श्रवण करावी. (व्रतराज, पृष्ठ १०४, हेमाद्रि व्रतखंड, पृष्ठ ४२८)

दुसरी एक प्रमुख देवता म्हणून मातंगी या देवीचे पूजन केले जाते. मंत्र-महार्णव या ग्रंथात या देवीच्या स्वरूपाचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

शामांगीं शशिशेखरां त्रिनयनां वेदैः करैः बिभ्रतीम् ।
पाशं खेटमथां कुशं दृढमसि नाशाय भक्तद्विषाम् ॥
रत्नालंकरणप्रभां ज्वलतनुं भास्वत्किरीटां शुभाम् ॥
मातंगीं मनसा स्मरामि सदया सर्वार्थसिद्धिप्रदाम् ॥ १ ॥

माणिक्यां भरणान्वितां स्मितमुखीं निलोत्पलभांबराम् ।
रम्यारक्तकलितपादकमलां नेत्रत्रयाक्षोसिनीम् ॥
वीणावादनतत्परां सुरनतां कीरच्छदाशामलाम् ।
मातंगीं शशिशेखरामनुभजेत्तांबूलपूर्णाननाम् ॥ २ ॥

वरील संस्कृत श्लोकाचा प्राकृत काव्यार्थ पुढीलप्रमाणे आहे.

वियतगंगा

पहा हो देवी मातंगी, स्वरूपि हास्यवदना ही ॥ ध्रु० ॥
शरीरीं शुभ्र श्यामांगी, शशिची कोर ही भाळीं ।
त्रिनेत्री तेज भानूचे, वीणेची तार ही छेडी ॥ १ ॥
अलंकारादि तेजाची, प्रभा लोळे किती अंगा ।
शिरींचा ताज तेजस्वी, मुखाची वाढवी लाली ॥ २ ॥
करीं घे वेद अंकुशा, तसा घे खेटका पाशा ।
तयाने रक्षिले दासा, करोनि नाशही पाशा ॥ ३ ॥
मिळाया रिद्धिसिद्धिला, मनानें ध्यात देवीला ।
दयार्द्र देवी मातंगी, प्रणिपातास घे तुजला ॥ ४ ॥

पुराणातरी अशी कथा आहे की, मातंग या दैत्याचा विनाश करण्यासाठी आदिशक्तींने जे रूप घेतले आणि जे पुढे भूतलावर कायम स्वरूपात राहिले, तीच मातंगी देवी होय. या देवींचे मूळपीठ कोठे आहे याबद्दल काहीच माहिती मिळत नाही. परंतु तुळजापूर येथे भवानी मातेच्या परिसरात या देवींचे एक प्रमुख स्थान आहे. देवीचा पुजारी महार जातीचा आहे. सामान्यतः ही देवता शूद्र वर्णाची मानतात आणि बहुधा उच्च-वर्णीय लोक तिचे भक्त असल्याचे आढळून येत नाहीत. महाराष्ट्रात अनेक गावातून या देवीची मंदिरे ग्रामदेवता म्हणून आढळतात.

गुजराथप्रांती बेचरजी रेल्वे स्थानकापासून अठरा मैलावर मोढेरा नावाचे गाव आहे. त्या गावी मातंगी देवीचे एक प्रमुख स्थान आहे. प्राचीन धर्मारण्य क्षेत्रामध्ये या गावाचे नाव मोढेरक असे आढळते. ब्रह्मदेवाने ब्राह्मणांची जात प्रथम याच क्षेत्री उत्पन्न केली असे मानण्यात येते. गावाच्या नावावरून या देवीला मोढेश्वरी म्हणूनही संबोधिले जाते. मुसलमानी राजवटीत अल्लाउद्दीन खिल्जीने ज्या वेळी गुजराथ प्रांतावर आक्रमण केले, तेव्हा या देवीच्या मूर्तीस धोका उत्पन्न झालेला पाहून तिला सुरक्षिततेसाठी बावडीमध्ये नेऊन ठेवले.

आजही ती मूर्ति त्याच स्थानी, म्हणजेच बावडीतच आहे. सिंहद्वाराकडून विहिरीमध्ये मूर्तीकडे जाण्याचा मार्ग राखलेला आहे मूर्तीचे स्वरूप सिंहारूढ अष्टभुजा असून तिलाच मातगी म्हणतात मूर्ति बावडीमध्ये असल्याने या क्षेत्राला धर्मवापी असेही म्हणतात या प्रमुख मूर्तीव्यतिरिक्त भट्टारिका, नन्दादेवी, शान्तादेवी, विशालाक्षी, चामुडा, तारणा, दुर्गा, निम्बजा, भट्टयोगिनी, ज्ञानजा, चद्रिका, छत्रदा, सुखदा, द्वारवासिनी इत्यादी देवताचे वास्तव्य या क्षेत्री आहे (गोरखपूर कल्याण क्षेत्र अक, ५७।४०६)

आता मरीआई या देवतेसबधी आपण थोडी माहिती मिळवू

मरीआई या देवतेची पूजा अनेक गावातून होते. ही देवता एक प्रमुख ग्रामदेवता म्हणून मानली जाते या देवीची मूर्ति अशी नाहीच स्वयभु तादळा शेंदूरचर्चित अगर तसाच देवीचे प्रतीक म्हणून पूजिला जातो ही मूळची तेलगणातील देवता असून त्या प्रदेशात प्रत्येक गावी असा एक तरी मनुष्य असतो की, जो काही वेळा या देवीचा बधु होता, परतु काही वेळा पति होता आणि सेवकही होता या देवीचा पुजारी क्षुद्र समाजातील असतो त्याला पोतुराजा म्हणतात मरीआई देवीचा देव्हारा डोक्यावर घेऊन गावोगावी तो हिंडत असतो या देवीचा सर्वत्र प्रसार तेलगणातील तिचा भक्तगणच करीत असतो यावरूनच ती मूलत तेथील देवता आहे, असे अनुमान काढावयास हरकत नाही (मद्रास सरकार पुराणवस्तु खाते अहवाल, १९०७, पृ० २३९)

या देवतेच्या उत्पत्तीसबधी पुढील कथा मिळते एकदा एका चाभार जातीच्या इसमाने आपण ब्राह्मण असल्याचा बहाणा करून एका ब्राह्मणकन्येबरोबर विवाह केला पुढे त्याला दोन मुलगे झाले कालातराने ते दोघे वयात आल्यावर, आपला वडिलोपार्जित धदा त्याना शिकवावा आणि त्यांच्या पोटापाण्याची सोय लावून द्यावी, या हेतूने तो चाभार त्या मुलाना रानात घेऊन जाऊ लागला व कातडी कमावणे, ती साफ करणे, वगैरे प्राथमिक कामाचे धडे देऊ लागला रानात असताना चोरून मासाहार करण्यासही त्याने मुलाना शिकविले परतु घरी मात्र आपल्या ब्राह्मण पत्नीपासून आपली ही वागणूक तो लपवून ठेवीत असे आपल्या मुलानाही त्याने तशी सक्त ताकीद देऊन ठेवली होती.

जनावराच्या मांसाप्रमाणे लागले. एक मुलगा पटकन् उद्गारला, 'हा तुकडा म्हशीच्या जिभेसारखा लागतो' या त्याच्या शब्दावरून मातेला आपल्या मुलांच्या आहाराविषयी संशय आला आणि तिने या बाबतीत खात्री करून घेण्याचे ठरविले दुसऱ्या दिवशी पति व मुले बाहेर कामावर गेल्यावर ती लपतछपत त्यांच्या मागोमाग गेली. त्यांचे तेथील काम व खाणे यांचे तिने निरीक्षण केले. स्वभावत तिला आपला पति व मुले यांचा व त्यांच्या वागणुकीचा वीट आला आणि तिने देहान्त प्रायश्चित्त घेण्याचे ठरविले ती आपल्या वडिलांच्या घरी आली आणि तिने विचारले की, 'कुत्रा जर मडक्यास शिवला तर ते शुद्ध कसे करावे?' तिच्या विचारण्याचा हेतु त्यांच्या लक्षात आला नाही आणि योग्य तो उपाय म्हणजे मडके जाळून टाकले पाहिजे, असे त्यांनी सांगितले.

वडिलांचा उपदेश घेऊन ती पुन्हा पतिगृही आली आपला पति व मुले झोपडीत झोपलेली आहेत, असे पाहून तिने झोपडीला आग लावून दिली तिची मुले जळून मेली, परंतु पति मात्र त्याही स्थितीत जागा झाला आणि पळून जाण्याचा प्रयत्न करू लागला, तेव्हा त्या स्त्रीने उग्र स्वरूप धारण करून व हातात तरवार घेऊन त्याला बाहेर पडण्यास आटकाठी घातली. असे सांगतात की, तिच्या पतीने त्या वेळी डुक्कर, कोंबडा, बकरा, रेडा इत्यादि रूपे एका पाठोपाठ एक अशी घेऊन बाहेर पळण्याचा प्रयत्न केला पण त्या स्त्रीने प्रत्येक वेळी त्याची मान तोडून टाकून, जळत्या अग्नीत फेकून दिली शेवटी, त्या अग्निज्वालेमध्ये तिने स्वतःचीही आहुति अर्पण केली येथे तिच्या पतीने जनावराची रूपे घेतली, हे रूपक असावे. कारण झोपडी जळू लागल्यावर आतील पाळीव प्राणी बाहेर पडण्याचा प्रयत्न करीत असताना, तिला ते प्राणी म्हणजे पतीची प्रतिके वाटून तिने त्यांचा शिरच्छेद केला असावा. माणूस सूडाच्या भावनेने एकदा का बेहोष झाला म्हणजे सर्वत्र त्याला आपला शत्रून दिसतो आणि त्याचे निर्दालन हेच तो आपले कर्तव्य मानतो

काही दिवसांनी एका नातेवाईकाच्या स्वप्नात ती ब्राह्मण स्त्री येऊन तिची वार्षिक यात्रा भरविण्याची तिने त्याला आज्ञा दिली त्याप्रमाणे ती वार्षिक यात्रा त्या वेळी भरविण्यात आली आणि आजतागायत ती भरविण्यात येते या यात्रेच्या वेळी त्या स्त्रीच्या आयुष्यातील सर्व घटना जशाच्या तशा घडवून आणतात. म्हणजे त्या दोघांचा विवाह होणे, संसार चालून मुलांची उत्पत्ती होणे, मुलांनी पूर्वापार चालत आलेला धंदा व अभक्ष्य भक्षण करण्यास शिकणे.

झोपडीला आग लागणे आणि त्यात सर्वांची हत्या होणे इत्यादि सर्व प्रसंगाचे नाटक केले जाते. या यात्रेसाठी दूरदूरचे भक्त त्या दिवशी उपस्थित असतात.
(मुंबई प्रांतिक गॅझेट, पृष्ठ १५, ३४४)

शिरसी (कारवार) गावी या मारी देवीचे एक मंदिर आहे. त्या ठिकाणी वर उल्लेखिलेल्या प्रकारे देवीची वार्षिक यात्रा भरविण्याची प्रथा आहे. या देवीच्या भक्तामध्ये बहुधा खालच्या जातीच्याच भक्ताचा भरणा जास्त असतो यात्रेच्या वेळी रेडा, कोंबडी, बकरी बळी देण्यात येतात. देवीची मूर्ति लाकडी असून ती शेंदूरचर्चित असते. येथील देवीचे जुने मंदिर पडिक झाल्यावर सन १८९३ च्या सुमारास भक्तांनी त्याचा जीर्णोद्धार केला. शेंदूर हा रक्ताचे प्रतीक मानीत असल्याने देवीला तो चढवीत असावेत.

दक्षिण भारतामध्ये पोलेरम्मा नावाची आणखी एक ग्रामदेवता आहे. ती मारी देवीचेच स्वरूप होय. पूर्वी एका शहरी या देवीचे मंदिर गावाबाहेर असल्याने तेथील जनता तिला विचारीना अगर तिची पूजाअर्चाही करीना. तेव्हा त्या देशाचा जो राजा होता त्याच्या स्वप्नात ती गेली आणि 'माझी पूजाअर्चा कर' अशी तिने त्याला आज्ञा केली. परंतु राजाने तिला अशी अट घातली की, 'देवीने आपले देवत्व मला दाखवून द्यावे. त्यासाठी तिने रेड्याबरोबर झुंज द्यावी आणि त्या झुंजीत त्याला पराभूत करावे.' त्याप्रमाणे दुसऱ्या दिवशी मोठा मेळावा भरला. राजाने आपला पाळीव रेडा आणून मंदिरासमोर उभा करून 'देवीने प्रकट होऊन त्याच्याशी सामना द्यावा. अशी तिला प्रार्थना केली. इतक्यात काय चमत्कार! देवळाच्या मागील बाजूच्या गर्दीतून एक प्रखर तेजाची स्त्री हाती शस्त्र घेऊन पुढे सरसावली आणि सरळ त्या रेड्यावर तिने चाल केली. बराच वेळपावेतो दोघांचे तुंबळ युद्ध चालले होते. पण दोघेही तुल्यबळ! एकमेकांना कसचे हार जातात? शेवटी देवीने प्रकट स्वरूपात आपल्याला दर्शन दिले आणि आपल्या विनतीला मान दिला म्हणून त्या राजाने तिची पूजाअर्चा करण्याचे मान्य केले. अशा रीतीने प्रत्यक्ष राजानेच देवीचा उत्कर्ष साधण्याचे मान्य केल्यावर तिची पूजाअर्चा दररोज नियमितपणे होऊन ती पोलेरम्मा या नावाने प्रसिद्धीस आली. रोगराईपासून गावाचे संरक्षण करणे हे तिचे प्रमुख कार्य समजले जाते.

महाराष्ट्रामध्ये याच मारी देवीला मरीआई असे संबोधिले जाते. अनेक गावी या देवतेचे मंदिर असते. मूर्ति म्हणून एखाद्या गोल पाषाणावर शेंदूर घालून पूजा करण्यात येते. पोतुराजा या देवीचा प्रसार गावोगावी करीत असतो. बहुधा त्याची स्त्रीही त्याच्याबरोबर असते. देवीचा देव्हारा तिने आपल्या

माथ्यावर घेतलेला असतो. पोतुराजाचा एकंदर अवतार पाहिल्यावर प्रथमदर्शनी भीतीच वाटायला लागते. बहुधा तो वर्णाने काळा, माथ्यावरील लांब केस मोकळे सोडलेले, कपाळावर कुंकवाचा भलामोठा मळवट भरलेला, नेसणीस एक अनेक लुगडी-लुगड्यांनी मिश्रित असा लेहंगा, हातात कोरडा आणि गळ्यात वाद्य म्हणून एक ढोलकी असा त्याचा एकंदर पेहराव असतो. पोतुराजा गुरव अथवा गोंधळी जमातींचेही असू शकतात. देवीच्या देव्हाऱ्यात जी मूर्ति असते, ती त्या त्या जमातीची इष्टदेवता असते. कोठे तुळजाभवानी असेल, तर कोठे कोल्हापूरची महालक्ष्मी असेल. परंतु प्रत्यक्ष मरीआई देवीची मूर्ति मात्र त्यामध्ये नसते. या देवीचे प्रतीक म्हणून लाकडी कुचाची लहान गाडा आणि वर पाच खुंट्या ठोकलेल्या असतात. पैकी तीन मागील बाजूस व दोन पुढील बाजूस असतात. या खुंट्यावर उभ्याआडव्या काही रेघोट्या ओढून काही मानवी आकृति दर्शविण्याचा प्रयत्न केलेला असतो. याचा अर्थ असा असावा की, मरीआई देवी गाड्यावरून गावोगावी प्रवास करीत आहे, तिच्या मैनिणी आणि सेवेकरी तिच्याबरोबर आहेत.

देव्हारा फिरवीत असताना बहुधा प्रत्येक खेड्यात अथवा चव्हाट्याच्या जागी यांचा एक तरी कार्यक्रम होतोच. या कार्यक्रमास गावातील अनेक प्रतिष्ठित उपस्थित असतात. दोन तासपर्यंत हा कार्यक्रम चालतो. ढोलकीचा एक विशिष्ट आवाज येत असतो. कोरड्याचे फटके अंगावर फटाफट आवाज देत असतात. पायातील वाळे व घुंगुर याचा नाद निनादत असतो. देवीला आवाहन चाललेले असते. त्यातच सुपामध्ये धान्य अगर लिंबू ठेवून, ते सूप तिरपे धरून गरगर फिरविले जात असते, तरीही त्यातील जिन्नस खाली पडत नाहीत, याचे प्रेक्षकांना आश्चर्य वाटते. लिंबे कापणे आणि वेळप्रसंगी दंडावर अथवा शरीराच्या इतर भागावर जखमा करून घेणे, इत्यादि अघोरी कृत्ये तो पोतुराजा लोकांना दाखवून शक्तिदेवीच्या वैभवाचे प्रदर्शन करीत असतो. शेवटी देव्हाऱ्यातील देवीचे लोकांना दर्शन दिल्यावर हा कार्यक्रम संपतो.

येणेप्रमाणे लोकांचे मनोरंजन करून, नंतर पैसे, धान्य, कपडे जे काही लोकांकडून मिळेल ते जमा करून पुढच्या गावाचा प्रवास सुरू होतो. याच पोतुराजाच्या स्वरूपाला कोणी जरीमरी अथवा कडकलक्ष्मी असेही म्हणतात. अनार्यांमध्ये शक्तिपूजा होती, आणि ती अगदी खालच्या थरापर्यंत पसरलेली होती, त्याचेच हे प्रतीक मानावयास हवे.

पटकी, देवी इत्यादि संसर्गजन्य रोगाची ही देवता मानतात. असे रोग गावात उत्पन्न झाले म्हणजे त्याचे निर्मूलन करण्यासाठी गावात एक

प्रचारात होती. एका मातीच्या मडक्यात दारू, बांगड्या, कपड्याची लाल रंगाची देवीची बाहुली, रुपयाचे एक नाणे, काही भाकरीचे तुकडे घालून त्याला धुपाने ओवाळून ते मडके गावाबाहेर एका तिठ्यावर नेऊन ठेवीत. असे केल्याने रोग गावाबाहेर जातो अशी लोकांची भावना होती. कदाचित् एखाद्या वाटसरूने पैशाच्या आशेने ते मडके आपल्याबरोबर नेले, तर रोग नक्कीच त्याच्याबरोबर त्याच्या गावी गेला असे समजत. एखादी गाय अगर म्हैस ते मडके ओलांडून गेल्यास तिचे दूध त्वरितच आटते, अशी समजूत होती. तसेच ते मडके गावाबाहेर नेत असताना कोणी आडवा आल्यास त्याला मरण येते, अशी ही समजूत होती दिवसेंदिवस या रूढि मोडत चालल्या आहेत, कारण बहुजनसमाजही दिवसेंदिवस जास्त वास्तववादी बनत चालला आहे.

(जेम्स धार्मिककोश पृष्ठ ८, ३१२.)

वऱ्हाड प्रांती याच देवीला महीसम्मा म्हणून ओळखले जाते. हिला संसर्गजन्य रोगाची देवता मानतात. तसेच ही देवता म्हणजे महादेवाची पत्नी होय, अशीही एक समजूत आहे. गावाबाहेर शेंदूरचर्चित एखादा पाषाण मूर्ति म्हणून पूजिला जातो. पुजारी मराठावर्गापैकी असतो. ज्या वेळी गावात रोगाची साथ येईल, त्या वेळी गावातून वर्गणी गोळा करून जत्रा भरवितात. त्या वेळी १०० नरी, २ रेडे आणि डुक्करे बळी देण्याची चाल होती. गावाच्या चारही दिशांना डुक्करे जिवंतपणी पुरली जात. पुरताना त्या प्राण्याने ओरडू नये, विरोध करू नये, यासाठी त्याच्या तोंडात खैराची पाचर मारली जात असे. कारण पुरताना जर तो प्राणी ओरडला तर सर्व विधि निष्फळ झाला असे समजले जात असे. याच यात्रेच्या वेळी एक तात्पुरता चौथरा उभारला जाई आणि त्यावर रेड्याचा बळी दिला जाई. त्या रेड्याला मारल्यावर त्याचे मुंडके गावाच्या पाटलाच्या घरासमोर पुरून टाकीत आणि त्याचे मांस महारवर्ग वाटून घेई. दुसरा रेडा कापल्यावर जमलेला प्रत्येक भक्त धान्याचे काही दाणे त्याच्या रक्तामध्ये बुडवून घेऊन, ते धान्य मळणीच्या खळ्यावर अगर शेतावर फेकीत असे. याप्रमाणे दाणे फेकल्यास पीकपाणी चांगले येईल, ही त्यामागे भावना होती.

(मंडला जिल्हा गॅझेट, पृष्ठ ५१.)

मंदाक्रांता

मारीनामें भजत जनता दक्षिणप्रांति देवी।<br>
पोलेरम्मा वदति जइं ती झुंज रेड्यास घेई॥<br>
पैजा जिंकी नृपतिकवुनि पूजना घेत त्याचें।<br>
मारीदेवी मिरवित अशी ती प्रतिष्ठा जनातें॥ १॥

शिखरिणी

मरीआई कोणी तिज वदति देशावरि पहा ।
तिला लाभे पूजा मिळत बहुसेवादिक महा ॥
प्रतिष्ठा हो मोठी बहुत दिसते शूद्रजनिं ती ।
यशोदामातेचा प्रसव कुणि मानीं तिजप्रती ॥ २ ॥

शार्दूलविक्रीडित

देव्हारा तव वाहुनी फिरतसे तो पोतुराजा पहा ।
जातीनें बहुधा महार अथवा की मांग राही सदा ॥
भाळीं कुंकुम फांसि, बांधि कमरे स्त्रीवस्त्रीचा लेहंगा ।
घेई ओढोनि कोरडा फटफटा, देवी म्हणे आली गा ॥ ३ ॥

शिखरिणी

मरीआई देवी असासि परि तूं एकटी अशी ।
घरींदारीं जाशी बहुततर ग्रामी फिरतशी ॥
तुझा पोतूराजा रिझवित चमत्कार लहरी ।
कुठे कोणी जाणे तुज कडकलक्ष्मी जरिमरी ॥ ४ ॥

मरीआईची भेट झाली. चला, आता म्हसोबाची काय खबरबात आहे, ती पाहू या.

म्हसोबा ही महाराष्ट्रात एक प्रमुख ग्रामदेवता मानलेली आहे. म्हसोबा हा शब्द महिषासुर या शब्दाचा अपभ्रंश असावा. लिंग अथवा गोल उभट दगड शेताच्या बांधावर अगर गावातील एखाद्या प्रमुख ठिकाणी बसवितात. त्यावर शेंदूर घातला जातो. वार्षिक यात्रेच्या वेळी त्याला कोंबडी, बकरी, नारळ, फुले अर्पण करतात याची नावे ज्याला जशी सुचतात, तशी दिली जातात. पुणे शहरातील 'खोट्या म्हसोबा' हे यापैकीच एक नाव आहे. बहिरोबा ही दुसरी एक ग्रामदेवता आहे शंकराचे एक नाव भैरव किंवा कालभैरव असे आहे. त्या नावाचाच हा अपभ्रंश आहे. बहिरोबाची मूर्ति म्हणजे एक भला मोठा शेंदूरचर्चित पाषाण असतो वार्षिक यात्रेच्या वेळी, त्याला कोंबडी, बकरी अर्पण करतात. सर्प दंश झालेल्या मनुष्यास बहिरोबाच्या गाभाऱ्यात रात्रभर ठेवला असता त्याला विषबाधा होत नाही असा अनेकाचा अनुभव आहे.

प्रत्येक प्रांतीच्या ग्रामदेवता निरनिराळ्या असतात हे आपण पाहिलेच आहे. वऱ्हाड प्रांतातील काही ग्रामदेवतांची माहिती देतो, म्हणजे प्रत्येक गावातील ग्रामदेवता कशा भिन्नभिन्न असतात, ह्याची वाचकांना यथार्थ कल्पना येईल. भंडारा जिल्हा भागात हनुमानमुठिया (गोठणीवरील देवता), खेवारिया (क्षेत्ररक्षक) दुल्हादेव इत्यादि देवतांची पूजा होते. क्षेत्ररक्षक ऊर्फ खेवारिया या देवाला कोंबडी-बकरी बळी देतात, तर एका मडक्यात बारीक दगड अथवा धातूचा तुकडा घालून ते मडके घराच्या आढ्याला वर्षभर टांगून ठेवले, म्हणजे ती दुल्हादेवी झाली.

उमरावती भागात शंकर, गणेश, शितला, मातामई, येसकाई (गावशिवेची पादरी देवता), म्हसोबा, सटवाई, मरीआई, निंदियादेव, आसरा, चांदशहावली इत्यादि देवतांची पूजा होते. तसेच देवीच्या रोगास्तव कोरकूमाता, कॉलऱ्याच्या रोग्याच्या निर्मूलनास्तव हरदोली, पटकीच्या निर्मूलनास्तव मरिआई इत्यादि देवतांचे पूजन होते.

दमोह जिल्हा भागात—

१. खेरमाता या भूदेवतेची पूजा शेतलावणी अथवा नांगरणीच्या वेळी करतात. यामुळे पीकपाणी उत्तम येते, अशी तेथील लोकांची भावना आहे.

२. मीराईदेवी ही गावशीवेची पांढरदेवता मानली जाते. गावाच्या सीमेवर झाडाखाली एखाद्या दगडाचे स्वरूपात ही देवता असते.

३. छोटाईदेव हा नदीमध्ये किंवा नदीकाठी असतो आणि धीवरसमाज याचे पूजन करतो. मसणबाबा हा तेली समाजाचा एक पूर्वज मानला जातो.

४. म्हसोबा या देवतेची माहिती इतरत्र आलीच आहे. तेलाचा घाणा चालू झाला म्हणजे या देवतेची त्याच्यावर स्थापना करतात. त्यामुळे पुष्कळ तेल मिळते असा समज आहे. काही वेळा सव्वा रुपया घेऊन इतर घाणेवाल्यांना हा भाड्यानेही दिला जातो.

५. हरदौल ही देवता म्हणजे कोणीतरी रजपुत स्त्री मृत्यु पावल्यावर झालेली हडळ असे मानतात.

६. मरहाईदेवी यालाच नागबाबा असे दुसरे नाव आहे.

७. गुरय्याबाबा याला गोठणीवरचा देव मानतात.

आता हरयतमाता या देवतेसंबंधी उत्सव समारंभ कसा चालतो ते आपण पाहणार आहोत.

शेतलावणीच्या वेळी नागरटीचे बैल स्वच्छ धुवावयाचे आणि वाजतगाजत त्याना शेतावर न्यावयाचे. सर्व प्रकारची धान्ये घालून एक टोपली भरावयाची आणि शेतात नेऊन ती पुरावयाची. त्यावर शेणमातीचा थर चढवायचा. नतर ब्राह्मण त्या टोपलीची पूजा करतो आणि त्यानतर सर्व उपस्थिताना बत्तासे अगर शिजविलेल्या धान्याच्या घुगऱ्याचा प्रसाद वाटला जातो. ही देवता आषाढ वद्य ११ ला झोपते आणि कार्तिक वद्य ११ ला उठते. याच कालाला पचागकार चातुर्मास्यकाल म्हणतात. भगवान विष्णूची हीच शयनवेळ आहे असे मानले जाते. देव झोपले असल्यामुळे या काळात विवाहासारखी शुभकार्ये करीत नाहीत. भारतातच हा काळ पाळतात असे मात्र नाही. ग्रीक लोकांत देखील त्याची देवता परसोफीन व तिची मुलगी सिरीज या ज्या वेळी भूमिगत होतात, त्या वेळी धर्मकृत्ये करीत नाहीत.

श्रावण अमावास्येला पोळ्याचा सण सर्वत्र साजरा केला जातो, तसा नागपूर शहरातही होतो. या सणाच्या दुसऱ्या दिवशी बुधवारी जागनाथ विभागातून दु:ख, दारिद्र्य,' रोगराई व इडापिडा याचे प्रतीक म्हणून 'मारबत' मिरवणूक काढण्यात येते आणि मिरवत मिरवत पाचपावलीकडे नेण्यात येऊन, त्या ठिकाणी त्या प्रतीकाचे दहन करण्यात येते. या रूढीचा हेतु हाच की, गावातील रोगराई नष्ट व्हावी व ग्रामदेवतेच्या कृपेने सर्वत्र समृद्धि असावी.

परतु साप्रत मात्र या ग्रामदेवतेच्या बुरख्याखाली निरनिराळे राजकीय पक्ष, सरकारविरोधी पक्ष मारबत म्हणून मान्यवर नेत्याचे पुतळे तयार करून मिरवणुकीने नेतात आणि त्यांचे दहन करतात. सन १९६३ साली सुवर्ण निर्बंधाविरुद्ध सर्वत्र असतोष पैलावला असता सुवर्णकारांनी त्या वेळेस केंद्रीय अर्थमत्री मोरारजीभाई देसाई याची मारबत काढून पुतळ्याचे दहन केले. एक सुवर्णकार मारबतीच्या मागे उभा राहून पुतळ्याला फडाफडा मारीत होता, तर मिरवणुकवाले भारतातील वीस लक्ष सुवर्णकाराना बेकार करणाऱ्या नर-राक्षसाला 'घेऊन जागे मारबत' अशा घोषणा देत होते. अशा रीतीने अन्यायाविरुद्ध जनतेची हाक उठविली जाण्यासाठी या रूढीचा फायदा घेतला जात होता. ग्रामदेवतेचे एक परीने हे विडबनच नव्हे काय ?

(महाराष्ट्र टाईम्स, मुबई दि २८–८–१९६३)

होशंगाबाद भागात हरदौललाला ही कॉलरासरक्षक देवता मानली जाते. या देवतेची उत्पत्ति पुढीलप्रमाणे आहे. ओर्छा सस्थानाधिपति झुजहरराजा याचा हरदौल हा भाऊ. परतु त्याचा राणीबरोबर अनैतिक सबंध असल्याचा सशय आल्यावरून राजाने विषप्रयोग करून त्याला यमसदनास पाठविले. परतु प्रजेची

अशी भावना होती की, हरदौल हा निष्पाप होता आणि राजाकडून तो नाहक मारला गेला त्यामुळे प्रजेने त्याला विभूतिपद देऊन पूजनात आणले सन १८१७ साली तेथील ब्रिटिश सैनिकांना कॉलऱ्याची बाधा झाली असता हरदौल देवाच्या पूजनाने या रोगाचा परिहार झाल्याने, त्या वेळच्या जिल्हाप्रमुखाने आज्ञा काढली की, या देवतेच्या मूर्ति चौथरे घालून त्या पक्क्या बसविण्यात आल्या पाहिजेत कारण यामुळे साथीच्या रोगाला प्रतिबंधक वातावरण निर्माण होऊन शेतकरी रोगाच्या भीतीने गाव सोडून पळून जाणार नाहीत, सर्वत्र आबादीआबाद नांदेल, लोक सरकारविरुद्ध उठाव करणार नाहीत ही त्या वेळची एका ब्रिटिश अधिकाऱ्याची देवतासंबधाची श्रद्धा कौतुकास्पद आहे

आता भिलात या ग्रामदेवतेची माहिती आपण पाहू

ही ग्रामदेवता कशी झाली याची कथा चित्ताकर्षक आहे मैदा नावाची एक गौळण मूल होईना म्हणून ती चौरागड महादेवाच्या डोंगरशिखरावर गेली आणि पार्वतीच्या मूर्तीचे पूजन करून तिने तिला प्रार्थिले की, ' बाई ग, एकतरी मुलगा मला होऊ दे ' पार्वतीला तिचा भक्तीभाव पाहून दया आली व तिने तिला अपत्य देण्याचे अभिवचन दिले परंतु तिने त्या मुलाचे नाव भिलात असे ठेवावे असे त्या गौळणीस सांगितले पार्वतीने अभिवचन दिल्याप्रमाणे मैदाला मुलगा झाल्यावर त्याचे नाव भिलात असे ठेवण्यात आले काही दिवसांनी मैदाची परीक्षा घेण्यासाठी शंकर भिकाऱ्याच्या वेषात तिच्या दारी येऊन त्यांनी तिच्याजवळ भिक्षेची याचना केली परंतु त्या दिवशी अष्टमी असल्यामुळे भिक्षा घालणे धर्मबाह्य आहे असे ती शंकरांना म्हणाली शंकरांनी तिला पार्वतीकडून मिळालेल्या वरदानाची व त्यामुळे सुधारलेल्या तिच्या सांपत्तिक स्थितीची तिला जाणीव करून दिली परंतु तरीही तिने भिक्षा घालण्याचे नाकारले शंकरांना भयंकर राग येऊन भिलातला त्यांनी आपल्याबरोबर नेले

झाले ! भिलात बेपत्ता झाला ! मैदा व तिचा पति या दोघांनी त्याचा खूप शोध केला पण जेव्हा सर्व उपाय थकले, तेव्हा नवरानायको पुन्हा चौरागड येथे आले व त्यांनी पार्वतीला मुलाची हकिगत सांगितली शंकरांनी तो मुलगा आपल्याजवळ असल्याचे कबूल केले परंतु तो परत करण्यास मात्र साफ नकार दिला ते पाहून पार्वतीने मैदाला दुसऱ्या मुलाबद्दल वरदान दिले काही दिवसांनी मैदाला मुलगा झाला त्याचे नाव सिलात असे ठेवण्यात आले त्याचे पालनपोषण मैदा व तिच्या पतीने केले

भिलातचे पालनपोषण मात्र चौरागडावर शंकरांनी केले जादुविद्येत तो प्रवीण झाल्यावर बंगालदेशी जाऊन तेथील राजकुमारीबरोबर त्याने विवाह

केला. नंतर श्रीशंभूच्या उपदेशाप्रमाणे तो आईबापांच्या घरी राहावयास गेला. आपल्या तेथील वास्तव्यात त्याने जादुविद्येने अनेक चमत्कार केले आणि अमाप लोकप्रियता संपादन केली. याच त्याच्या लौकिकामुळे त्याला मरणोत्तर ग्रामदेवतापद प्राप्त झाले.

राजवा या नावाची आणखी एक ग्रामदेवता आहे. या देवाच्या नावाचा नुसता पुकारा केला तरी सर्पदंश बरा होतो असा अनेकांचा अनुभव आहे. ब्रिटिश इतिहासकार इलियट हा लिहितो की, विषारी सर्पदंश झाल्यावर त्या माणसाने एखादे वस्त्र अगर दोरी याला पाच गाठी मारून ते गळ्यात घालून उघड्यावर येऊन ओरडायचे, 'दोहाई राजवादेव' (राजवादेवा, कृपा कर.) त्या वेळी त्याने आणखी नवस करावयाचा की, 'या सर्पदंशातून मुक्त झाल्यावर तुझ्या दर्शनाला येईन.' याप्रमाणे देवाची प्रार्थना करून तो घरात गेला म्हणजे विष उतरले की नाही याची खात्री पटवून घेण्यासाठी त्या माणसाला कडुनिंबाची पाने अथवा मिठाचे पाणी प्यावयास द्यावयाचे. कडू अथवा खारट-पणाची त्याला चव आली तर विष उतरले असे समजण्यात येते. परंतु तसे न झाल्यास तो इसम पुन्हा घराबाहेर येऊन ओरडतो, 'दोहाई राजवादेव'. याप्रमाणे विष उतरेपर्यंत ही क्रिया चालते. इलियट म्हणतो की, या क्रियेमुळे कोणीही सर्पदंश झालेला मनुष्य दगावल्याचे उदाहरण त्याच्या पाहण्यात आले नाही. विषमुक्त झाल्यावर त्या माणसाने राजवादेवाची पूजा करावयाची, गळ्यातील गाठीचे वस्त्र अथवा दोरी सोडून टाकावयाची आणि नवस पुरा करावयाचा. लोकांची अशी भावना आहे की, विषमुक्त झाल्यावर नवस पुरा केला नाही तर त्या माणसाला पुन्हा सर्पदंश होतो आणि तो मृत्युमुखी पडतो.

(होशंगाबाद जिल्हा गॅझेट, पृष्ठ ५२ ते ५४)

बिलासपूर भागात ठाकुरदेव ही प्रमुख ग्रामदेवता मानलेली आहे. शेतावर एका झोपडीत अनेक दगड मांडलेले असतात, त्यामध्ये तो राहतो. या देवाची पूजा चारपाच वर्षांनी सवडीनुसार बैलपोळ्याच्या दिवशी केली जाते. त्या समारंभाला गर्भपूजा असे नाव आहे. वर्गणी जमा करून डुक्कर, बकरी इत्यादि पशूंना बळी दिला जातो. या वेळी गावाचा मानकरी बैगा म्हणून जो असतो त्याच्या अंगात देवाचे वारे येते आणि तो देवाला बाहेर काढण्यास सांगतो. भक्त मंडळी झोपडीतील सर्व दगड बाहेर काढतात, त्यांना दुधाने स्नान घालून त्यावर वस्त्राचे पांघरूण घालतात. या वेळी बैगा त्यांना सांगतो की, यातील एक देव कमी झालेला आहे. मग एका अजाण मुलाच्या जवळ येऊन त्याच्या डोळ्यात तो अंजन घालतो व बाहेर जाऊन हरवलेला देव आणावयास त्याला सांगतो. याप्रमाणे तो मुलगा बाहेर जाऊन काही लहान लहान

जमा करून आणतो नतर त्या दगडाना दुधाच्या भाड्यात घालून वैगा ते दूध ढवळीत बसतो काही वेळाने त्याला साक्षात्कार होतो आणि जमलेल्या मडळींना तो सागतो का, आता वस्त्र काढून टाका कारण हरवलेला देव परत आलेला आहे नतर सर्व दगड पूर्वीप्रमाणे झोपडीत ठेवून त्यांचे पूजन केले जाते व प्रसाद वाटला जातो

छिंदवाडा भागात मातामईच्या सात बहिणी या ग्रामदेवता मानल्या जातात खोकली (खोकला बरा करणारी), जरहई (ताप बरा करणारी) इत्यादि त्याची नावे व कार्ये आहत भामसेन हा मातामईचा बधू मानला जातो या शिवाय जासरा, घोरदेव, वाघदेव, वनजारीदेव इत्यादि देवता आहेतच

पावू, हरभू, रामदे मागलिया मेहा ।
पाच पीर पधारज्यो गोगाजी जेहा ॥

राजस्थानातील लोकगीतातील हा एक दोहा आहे तेथील पाच पिराची ही नामावलि आहे या ठिकाणी हे पार म्हणज मुसल्मानी नसून ते पूणपणे हिंदु आहेत 'व' अक्षराबद्दल 'प' म्हणणे हा त्या प्रांताचा उच्चार आहे त्यामुळे हे पाच वीर–पाच पीर म्हटले जातात [1] पितरपूजा करताना म्हणजे श्राद्ध प्रसगा आपण देवाची प्रार्थना करताना मागतो 'वीर मे दत्त पितर ।' हे पितरदेवतानो आम्हाला असा एक वीरपुत्र द्या, की ज्याच्या कर्तृत्वाचा झेंडा तिन्ही लोकात फडकत रहावा' रेणुका देवीच्या पोटी असा एक वीरपुत्र परशुराम जन्मला, वास्तव त्या देवीचे नावच 'एकवीरा' प्रचारात आले

अशा वीराची पूजा अनेक प्रकाराने होत असते, पण हे त्या गावापुरत अगर प्रांतापुरते मर्यादित असते याची स्मारके म्हणून काठे घडीव दगड उभा केलला असतो, एखाद्या वेळी त्या वीराचे नावही त्यावर कोर लेले असते क्वचित् कोठ दगडाची रास त्याच्या नावान रचलेली असते आणि ग्रामीण जनता त्याला नमस्कार करत काही वळा समाधास्वरूपाचा चौथरा असतो, चबुतरा असतो महाराष्ट्रात अशी जी स्मारके उभारलेली आहेत, त्याना वीरगळ अथवा वीर असे सबोधले जाते अनेक ठिकाणी याची गणना ग्राम देवतामध्ये केलेला आढळते असा एक वीरगळ लेखकाने पुणे शहराजवळील येरवडे गावा तेथे रहात असताना पाहिला आह तसेच पेण (कुलाबा) पासून चार मैलावर धापदेव नावाचा, शिलाहार राजाच्या वेळी पराक्रम केलेल्या एका मुसद्दी वीराचा वीरगळ आह रणदिवे मांडाणी घराण्याचे ते कुलदैवत आहे

---

१ टीप —सामाजिक देवता या प्रकरणात 'कमलोनिधी' पहा

अमक्याच अलौकिक कृत्यासाठी त्याला हे पद प्राप्त होते असे नव्हे, अनेक कृत्ये असू शकतात. एखाद्या अनला स्त्रीची अब्रू वाचविली, गावावर आलेले अरिष्ट आपल्या छातीवर झेलले, हिंस्र श्वापदापासून मुलाबाळाचे रक्षण केले, अग्नीच्या ज्वालातून जीव धोक्यात घालून जीविताचे रक्षण केले, पर्जन्याचे प्रलयकाळी एखाद्या बुडत्याचे प्राणरक्षण केले, संभाजीप्रमाणे स्वधर्माचे रक्षण करण्यासाठी परधर्मियाचे उग्र क्रौर्य सोसले इ० अनेक वीरकृत्ये त्यामागे असू शकतात काही वर्षांपूर्वी नाशिकशहरी गायधनी नावाच्या तरुणाने वरील प्रकाराने आपले प्राणार्पण केले त्यासाठी दरवर्षी त्याच्या पुण्यतिथीनिमित्त वीर गायधनी पारितोषिक योग्य माणसाला देण्यात येते भारतीय सुभाषितकारानी याची दखल घेतली असून, ते म्हणतात—

> एकेनापि सुपुत्रेण सिंही स्वपिति निर्भया ।
> स एव दशभि पुत्रैर्भारं वहति गर्दभी ॥

भावार्थ सुलभ आहे सिंहिणीचा एकच बच्चा जवळ असला म्हणजे ती सुखाने झोप घेऊ शकते पण दहा पुत्र असलेली गाढवी त्या दहाही मुलासह पाठीचा कणा मोडेपर्यंत भार वाहात राहाते वृक्षाच्या जातीत हाच नियम आहे. अनेक वृक्षापेक्षा एकच सुगंधित वृक्ष घराजवळ असला म्हणजे उत्तम होय.

राजस्थानातील वरील पाच वीरांपैकी आपण एक कथा पाहू. पाबू हा राठोड कुळातील रजपूत, मानाने मोठा व धनाने खोटा, त्याचा विवाह ठरला वधूगृही पायी कसे जायचे म्हणून त्याने शेजारीण देवलसीजवळून घोडी घेतली याच घोडीवरून देवलसी आपली गुरे राखीत असे पाबूने तिला वचन दिले की, 'तुझी गुरे कोणी दुरात्मा पळविण्यास आलाच तर तू मला हाक मार मी असेन तेथून धावत येऊन तुझ्या गुराचे रक्षण करीन ' घोडीवरून वधूगृही गेल्यावर, त्याचा विवाह झाला होमासाठी तो अग्निकुंडासमोर बसला आणि सप्तपदी सुरू झाली दैवगति आडवी आली आणि ती सप्तपदी पुरी झाली नाही सप्तपदी चालू असता देवलसीचा आक्रोश त्याच्या कानात घुमू लागला— 'मायी जींदराज खींचीनें पळविल्या रे ' पाबू वचनाचा सच्चा होता वचन दिल्यावर त्यातून पळवाट काढणे त्याच्या कुळाला माहीत नव्हते शब्द कानावर येताच, त्याने निश्चय केला आपल्या नववधूचा हात तथेच हिसकावून हाती तरवार धरली देवलसीच्या घोडीवर स्वार होऊन तीरासारखा शत्रूच्या अंगावर धावला परिणामाचा विचार करण्यास वेळच नव्हता अनेक शत्रुसैन्याबरोबर सामना देत असता, तो धारातीर्थी पडला ही अशुभ वार्ता लगोलग विवाहमंडपात पसरली सर्व राजस्थानभर पसरली नवोढा वधू ज्याप्रमाणे हळहळली त्याप्रमाणे

सर्व राजस्थान हळहळले. केवळ वचनपूर्तीसाठी राजा हरिश्चंद्राप्रमाणे प्राणार्पण झाले. पण त्यामुळेच तो अमर झाला. जागोजाग चबुतरे उभारले गेले आणि स्मृति चिरकालिक करून टाकली.

(प. महादेवशास्त्री जोशी, केसरी, १२ ११-६७)

इतर कथा रम्य असल्या तरी विस्तारभयास्तव टाळल्या आहेत.

ग्रामदेवताचा हा आणखी एक प्रकार पहा–कांदळाचे पाषाण. बौद्धपंथीयांची चलती असताना त्यांनी आर्यसंस्कृति नष्ट करण्याच्या हेतूने अनेक शिव मंदिरे भग्न करण्याचा यत्न केला. त्या वेळी शिवभक्तांनी त्यांना प्राणपणाने विरोध केल्यामुळे, त्या देहार्पण करणाराची स्मारके अनेक गावी करण्यात आली. प्रसिद्ध पुरुषांची स्मारके ज्याप्रमाणे शिवलिंगाची स्थापना करून करण्यात येत असत (रामेश्वर, लक्ष्मणेश्वर, नारायणेश्वर इ०), तद्वत् यांची स्मारके घडीव पाषाण उभे करून करण्यात आली. त्यांना कादळाचे पाषाण म्हणण्याचा महाराष्ट्रात प्रघात आहे. या पाषाणावर वरील भागी शिवलिंग व त्याचे उपासक स्त्री पुरुषांची प्रतिमे कोरलेली असून, खालच्या भागी रक्षणकर्ता भालाईत घोडेस्वाराचे चित्र असते. यांना ग्रामरक्षक देवता मानल्या आहेत.

इतिहासकार राजवाडे यासंबंधी लिहितात, 'बौद्धांच्या हल्ल्यापासून लिंग व पूजकऱ्यांचे रक्षण करणारे भालेवाले धर्मरक्षक या कादळावर कोरलेले आहेत. बहुधा बौद्धांचा पराजय आणि लिंगरक्षकांचा जय यामध्ये सूचित केलेला असावा. ज्या अर्थी अनेक गावी असे कादळे सापडतात, त्या अर्थी एकेकाळी बौद्धांची आणि शैवांची मोठीच दंगल महाराष्ट्रात होऊन गेली असावी.'

(राजवाडे लेखसंग्रह पृ २३).

या देवतेचा ग्रामदेवता म्हणून उपयोग करीत असत आणि कॉलऱ्याच्या साथीच्या वेळी तर हटकून करीतच करीत त्या उत्सवाचे स्वरूप असे— सप्तशती पाठाचे वाचन काही दिवस करून नंतर होमहवन होते पूर्णाहुतीच्या दिवशी गावातून वर्गणीरूपाने धान्य व पैसे जमा करण्यात येतात भाताचे हडे उकडले जाऊन त्यापैकी मण-दोन मणाचा भात एका बैलगाडीवर ढीग करून ठेवतात. त्या ढिगावर हळद, कुंकू, केशर सर्वत्र पेरून तो झाकतात बाजूलाच उदबत्ती जळत असते व तिचा सुवास दरवळत असतो या ढिगाऱ्यावर पाच पेटते काकडे पुरतात. गाडीच्या चार कोपऱ्याना चार केळीचे खांब बांधून त्यापैकी एकाला एक शेळी बांधून ठेवतात

ही सर्व पूर्वतयारी झाल्यावर मांग जातीच्या एका बाईच्या अंगात देवीचे वारे येते व ही पटकीची साथ कोणत्या गावाहून आली, किती दिवस राहणार, त्यासाठी गावकऱ्यानी काय उपाय योजले पाहिजेत इत्यादि सर्व माहिती ती बाई ऊर्फ देवी देते, नंतर त्या स्त्रीला अभ्यंगस्नान घालून, हिरवे लुगडे, निळी चोळी नेसविण्यात येते तिच्या कपाळावर कुंकवाचा मळवट भरतात पाच विड्याची पाने, पाच सुपाऱ्या, पेरू, नारळ, केळी यांची प्रत्येकी पाच फळे घेऊन त्यानी तिची ओटी भरून झाल्यावर, गाडीला चार बैल जोडून वाजतगाजत मिरवणूक चालू होते मिरवणुकीच्या वेळी गाडीच्या पुढे ती बाई नाचत असते परंतु तिचे तोंड मात्र पुढील मार्गाकडे नसून, मागे गाडीकडे असते मागच्या पावलानी ती पुढे जात असते मार्गावर लिंबे कापून फेकली जातात जनसमुदाय मिरवणुकीने गाडीमागे जात असतो गावाबाहेर गाडी गेल्यावर एखाद्या चव्हाट्यावर ती उभी राहाते त्याठिकाणी गाडीतील भात खाली ठेवला जातो तो भात व गाडीत असलेली बकरी बळी म्हणून महार व मांग जमाती घेऊन जातात गाडीवान, गाडी व ती देवीचे वारे येणारी बाई त्याच स्थळी रात्रभर राहून सकाळी गावात परत येतात त्या तिघांची स्नाने आटोपल्यावर ब्राह्मणभोजन होते. त्यानंतर सर्वांना प्रसाद वाटला जातो त्यानंतर गावशीवेवर सर्वत्र तुपाची धार सोडली जाते, म्हणजे तो रोग पुन्हा गावात परत येणार नाही, अशी त्यांची भावना असते या समारंभाने कॉलरा रोगाचे उच्चाटन होते अशी त्यांची समजूत आहे (नाशिक जिल्हा गॅझेट, पृष्ठ ५२०)

दुर्गम्मा आणि धारम्मा या कर्नाटकप्रांती फार लोकप्रिय झालेल्या देवता आहेत दुर्गम्मा ही पार्वतीचा अवतार, तर धारम्मा ही लक्ष्मीचा अवतार मानला जातो असे असले तरी ही शैव-वैष्णव रूपे एकत्र नांदतात आणि उत्सव समारंभही एकत्रच होतो कदाचित् 'या दोन पंथांमध्ये भोगताही

भेदभाव नाही' हेच दर्शविण्याचाच हेतु असावा. दुर्गम्मा ही देवता कॉलरा या रोगासाठी, तर थावम्मा ही देवता देवी या रोगासाठी कार्य करते.

थावम्मा देवीच्या उत्पत्तीची कथा साधारणतः मरीआईच्या वर दिलेल्या कथेप्रमाणेच आहे. थावम्मा ही एका सुविद्य ब्राह्मणाची सुशील नि सुशिक्षित मुलगी. परंतु एका महार जातीच्या माणसाने 'आपण ब्राह्मण आहोत' असे सांगून तिला फसवून तिच्याशी विवाह केला. संसार चालू झाल्यानंतर त्यांना मुलेबाळे झाली. एके दिवशी तिच्या सासुबाई तिच्या घरी आल्या, आणि जेवायच्या वेळी जी भाजी केली होती, ती खात असताना आपल्या जाती-धर्मानुसार सहज उद्गारल्या, 'अहाहा! सूनबाई, म्हशीची जीभ काय गोड लागते ग!' हे ऐकताच सारा प्रकार थावम्माच्या ध्यानात आला. प्रायश्चित घेण्याचे ठरवून तिने घराला आग लावून दिली. घरातील मुले त्या आगीत जळून मेली, आतील जनावरे इतस्ततः सैरावैरा पळू लागली, तेव्हा रेड्याच्या आश्रयाने थावम्माच्या पतीने तेथून निसटण्याचा प्रयत्न केला. त्याच वेळी थावम्माने आपल्या जवळील तरवारीने त्या दोघानाही कापून काढले. अखेर शेवटी त्या अग्नीत आपल्या देहाचीही आहुति अर्पून थावम्माने देहान्त प्रायश्चित घेतले. हीच स्त्री मरणोत्तर थावम्मा या नावाने ग्रामदेवता म्हणून पूजनात आली.

या देवीची मूर्ति हिंदु स्त्रीसारखीच बनवितात. फरक इतकाच की, तिला बारा हात असून चक्र, त्रिशूळ, तरवार, भाला, खंजीर, लांब चाकू, शंख, नागपाश, तरवारीचे म्यान व रक्ताचे भांडे इत्यादि आयुधे असतात. कपाळावर कुंकवाचा मळवट भरलेला असतो. या मूर्ति लाकडाच्या बनवितात.[१] पाषाणाची मूर्ति जशी एकसंध असते, तशी मात्र ही असत नाही. प्रथम निरनिराळे अवयव तयार करून नंतर ते एकत्र जोडण्यात येतात, हे या मूर्तीचे वैशिष्ट्यच समजले पाहिजे. कारण इतरत्र असा प्रकार कोठेही पाहण्यात येत नाही. या दोन्ही देवी एकत्रच वावरतात. दुर्गम्माचा वर्ण हिरवा तर थावम्मा रक्तवर्णीय असते. दोन्ही देवींच्या अंगावरील अलंकार साधारणतः एखाद्या मध्यमवर्गीय स्त्रीच्या अंगावरील अलंकारासारखेच असतात. नाकामधील नथ मात्र मराठी पद्धतीची म्हणजे सुवर्णाच्या सळीची असते. लुगडी, चोळी हे स्त्रियांचे कपडे त्यांना लेववतात. परंतु चोळी मात्र अंगाच्या रंगानेच दर्शविली जाते. वाडिग अथवा सुतारवर्ग हा देवीचा पुजारी असतो. परिस्थितीनुसार या ग्रामदेवतांची पूजाअर्चा व

---

१. टीप—राजपुतान्यामध्ये गणगौर उत्सव चैत्र महिन्यात करतात. ती गणगौर लाकडी असते.

नैवेद्य अर्पिला जातो. परंतु काही ठिकाणी या देवतांना यापैकी काहीच मिळत नाही.

या देवतांची वार्षिक यात्रा दरवर्षी न करता चारचार-पाचपाच वर्षांनी करतात. परंतु ती मात्र फार धामधुमीची असते. गावकरी मानकरी सर्व त्यामध्ये सहभागी होतात. बारा बलुतेदार, पाटील, कुलकर्णी, वतनदार, नोकरवर्ग सर्व-जण मोठ्या उत्साहाने कार्य करीत असतात. यात्रा करावयाची ठरली म्हणजे गावप्रमुख व वरील मानकरी प्रथम ग्रामम्माच्या मंदिरात जाऊन आपला मनोदय तेथे देवीजवळ प्रकट करतात. त्यानंतर ते सर्व गावकऱ्यांना सूचना देतात की, या वर्षी यात्रा करावयाची आहे, तेव्हा तुमची वर्गणी तयार ठेवा. उत्सवसमिति निवडली जाते. वर्गणी जमा करण्यासाठी एक मोहोरबंद पेटी तयार करतात. या पेटीला तिकडे ' डब्बी ' असे म्हणतात. ही ' डब्बी ' घरोघर फिरवून वर्गणी जमा केली जाते. वर्गणी देण्याचे सहसा कोणी नाकारीत नाही. कारण वर्गणी न दिल्यास कॉलरा अथवा देवीचा घरात प्रादुर्भाव होईल अशी त्यांना भीती वाटत असते.

वर्गणी जमा झाल्यावर प्राथमिक तयारीला सुरुवात होते. मूर्तींना घासून-पुसून स्वच्छ केले जाते. मिरवणुकीसाठी बारा फूट उंचीचा रथ तयार करून त्यावर तितक्याच उंचीचे आच्छादनासाठी छप्पर तयार होते उत्सवसमिति नुसत्या मंदिराची साफसफाई करते असे नव्हे, तर गावकऱ्यांना देखील एक सूचना देते की, देवीची जत्रा होणार असल्याने सर्वांनी साफसफाई करून आपा पल्या घरांना चुना लावावा, जमिनी सारवाव्यात, रस्ते साफ करावेत. कारण देवीच्या रथाची मिरवणूक जात असताना आसपास थोडीसुद्धा घाण असलेली तिला सहन होणार नाही. यात्रेच्या आधी दहा दिवस अगोदर पुन्हा एकदा गावात दवंडी पिटविली जाते, जत्रेचे दिवस जाहीर केले जातात आणि स्वच्छता राखण्याबद्दल पुन्हा पुन्हा सूचना दिली जाते.[1] या यात्रेसाठी आसपासचे अनेक लोक जमा होतात. जत्रा सुरू होण्यापूर्वी आठ दिवस मंदिरात नंदादीप जळत ठेवला जातो. जत्रेच्या दिवसात जाते फिरविण्यास बंदी असते. त्यासाठी सर्वजण लागणारे धान्य आधीच दळून ठेवतात. जत्रेमध्ये देवीला एका महिषाचा बळी द्यावयाचा असतो. तेव्हा तो खरीदला जातो आणि त्याच्या गळ्यात कडुनिंबाच्या

* १. टीप—देवीच्या उत्सवानिमित्ताने गावची सार्वजनिक साफसफाई करून घेण्याची ही पद्धति आजच्या आधुनिक काळातही खचितच अनु-करणीय आहे.

झाडाची पाने बांधून तो मोकळा सोडला जातो. या महिषाला मुक्तद्वार असते. त्याने कोठेही जावे, कोणाचे काहीही खावे. त्या दिवसात त्याला कोणी प्रतिबंध करीत नाही. कारण तो देवीचा बळी असतो. याव्यतिरिक्त नवसाचे अनेक महिष बळीसाठी तयार असतात. तसेच सुमारे शंभर बोकड बळीसाठी तयार केलेले असतात. (देव अगर देवस्थानासाठी वळू गायी, बैल, रेडे अर्पण करण्याची रूढि महाराष्ट्रात आजही दिसते.) काही गावी या बैलांना पोळ ही संज्ञा आहे. त्यांना कोणी सहसा प्रतिबंध करीत नाही.

नंदादीप लावल्यानंतर आठव्या दिवशीच्या मंगळवारी (आठवा दिवस मंगळवार येईल अशाच प्रकारे या समारंभाची आखणी केलेली असते) सुतार जातीतील दहा सुवासिनी पुजाऱ्याच्या घरी आणि लिंगायत जातीतील दहा सुवासिनी गावातील मोठ्या जमीनदाराच्या घरी जेऊ घालतात. नंतर दुसऱ्या दिवशी म्हणजे बुधवारी सर्व गावकरी स्नान करून, शुचिर्भूत होऊन मंदिरात जमतात. त्यांच्या समक्ष देवीच्या मूर्तीचे नेत्र रंगविण्याचे काम पूर्ण होते. या कामाबद्दल त्या रंगाऱ्याला एक बकरी मजुरी म्हणून मिळते. गावचा प्रमुख जमीनदार देसाई-पाटलाजवळ दोन मंगळसूत्रे देतो आणि ती दुर्गम्मा-द्यामम्माच्या गळ्यात बांधली जातात. देवीच्या नाकात नथी घालायचा मान कुलकर्णी घराण्याचा, तर त्या तयार करून आणणाऱ्याचा मान देशपांडे घराण्याचा असतो. मानाचे विडे देवीसमोर ठेवल्यावर मूर्तींना रथात बसवितात. 'रानिगिया' म्हणजे वाघ्या जातीपैकी एका मनुष्याने देवीच्या नावाची ललकारी पुकारल्यावर मिरवणूक चालू होते. ती चालू झाल्यावर एक बकरी बळी देण्यात येते.

ही रथाची मिरवणूक साधारणपणे दुपारी अकराच्या सुमारास निघून वाजतगाजत गावाबाहेर जाते. शेकडो माणसे देवीचा रथ ओढण्यात सहभागी होतात. मार्गामध्ये कोठे रथ थांबला तर देवता रागावली असली पाहिजे या समजुतीने एक बकरे कापण्यात येते.[1] तसेच मार्गातील प्रत्येक नाक्यावर एकेक बकरे कापतात. गावाबाहेर गेल्यावर एखाद्या वृक्षाच्या छायेखाली ही मिरवणूक थांबते आणि मूर्ति खाली काढून ठेवून ओटीभरणे समारंभ होतो. अशा प्रकारे त्यांची स्थापना झाल्यानंतर असादि (मांग) वर्गातील स्त्रीचे नृत्य देवीसमोर होते. हे नृत्य चालू असतानाच दुसऱ्या एके ठिकाणी दहा चौरस फूट शेणाचा ढिगारा तयार केला जातो व त्यावर रांगोळी काढून तो सुशोभित केला जातो. यानंतर त्या दिवशीचा कार्यक्रम संपतो.

---

१ टीप—त्या त्या क्षेत्रीच्या क्षुद्र देवतांना संतुष्ट राखण्यासाठी हा विधि आवश्यक मानला जातो.

गुरुवारी पहाटे पुन्हा सर्व मंडळी जमून बळीचा महिष (ज्याला ते 'पट्टे-डोकाना' असे म्हणतात.) तेथे आणून जमिनीवर पाडतात. ग्रामम्माचा महारपति हाच होय अशी समजूत असल्यामुळे त्याचा वध करून त्याचे रक्त एका भांड्यात जमा करण्यात येते. इतरही नवसाचे जे महिष असतील त्यांचाही वध याच वेळी केला जातो. बळी दिलेल्या महिषाचा एक पाय तोडून तो त्याच्या तोंडात ठेवण्यात येतो. त्याचे हे तोंड 'गुडसाला' (मातंगीदेवीची झोपडी) मध्ये ठेवून देतात. उजेडासाठी पणत्यांची रोषणाई केली जाते. बळी दिलेल्या महिषाचे काही अवयव मानकऱ्यांना वाटले जातात, परंतु नंतर ते सर्व महारच नेतात. बळी दिलेल्या महिषाजवळ एक शिजविलेल्या भाताचा ढिगारा करून महिषाचे रक्त व त्याच्या पोटातील काही अन्नांश काढून तो या ढिगाऱ्यात मिसळला जातो. नंतर या मिश्रणाच्या दोन टोपल्या भरून त्या गाडीत ठेवून दोन उघड्यानागड्या वाडिगासह गावशीवेवर नेल्या जातात. पुन्हा या ठिकाणी काही बकऱ्या बळी देऊन तो भात सर्व सीमारेषावर फेकला जातो. असे केल्याने गावात रोगराई प्रवेश करणार नाही, अशी त्यांची श्रद्धा असते. हा विधि झाल्यावर गावकरी घरी परत येऊन स्नान करतात.

सायंकाळी गावाचा पाटील व होल्या (गावचा बातमीदार) रंगविलेले मातीचे मडके भाताने भरून, त्याचे तोंड पानाफुलांनी बंद करून, डोक्यावरून गावाबाहेर देवीकडे नेऊन तिच्यापुढे ठेवतात. देवीला साडीचोळीचा अहेर अर्पण करण्यात येतो. नंतर असादी (माग) स्त्रियांचा नाच व पुरुष मल्लांच्या कुस्त्यांच्या कार्यक्रमाने गुरुवारचा दिवस संपतो.

शुक्रवारी देवीचा ओटीभरणसमारंभ सर्व गावकरी करतात आणि त्यानंतर देवीचा रथ स्वस्थानी येतो. पुढे तीनचार दिवस काहीच कार्यक्रम नसतो. पण गुरुवारी पुन्हा देवीच्या रथाची मिरवणूक गावाबाहेर जाते. तेथे रांगोळी घालून दोन चौरस फुटाचे आसन तयार केल्यावर त्यावर एक कोंकरू उभे केले जाते. होल्याजातीचा एक मनुष्य, ज्याला पोतुराजा असे म्हणतात, तो उघडा नागडा होऊन, कमरेला कडुनिंबाचा टाळा बांधून, वाघाप्रमाणे उडी मारून त्या कोंकराचे हरण करतो आणि गावाबाहेर सीमेवर घेऊन जातो. कोंकराला त्याच्या तावडीतून सोडविण्यासाठी इतर लोक पुष्कळ प्रयत्न करतात, परंतु ते व्यर्थच जातात कारण प्रत्यक्ष वाघाच्या तावडीतून कोंकरू कधीच सुटत नाही. ज्या झोपडीत बसण्याची व्यवस्था केलेली असते तेथून देवताना उचलून सीमेवर नेले जाते आणि झोपडीला आग लावून दिली जाते.

सीमा भागात गेल्यावर मूर्तींना उचस्थानी बसवून समोर एक पडदा धरतात देवींचा पुजारी आतील बाजूस देवीजवळ जाऊन लोकांना सांगतो की, पतिनिधनामुळे देवी आता विधवा झालेली आहे. त्यानंतर तिच्या हातातील काकणे तो फोडून टाकतो, तिच्या कपाळावरचा मळवट पुसून टाकतो आणि हात पाय खेचून काढून टोपलीत भरून ती टोपली तिच्या नेहमीच्या वास्तव्याच्या मंदिरात आणून ठेवून देतो देवताच्या या असहाय दु:खद परिस्थितीमुळे शोकाप्रीत्यर्थ मंदिर तीन दिवस बंद ठेवले जाते. पण तेवढ्या अवधीत सुतार पुन्हा देवीचे अवयव ठाकठीक करून जाग्यावर बसवितो शोककालानंतर देवीची पुन्हा प्राणप्रतिष्ठा होऊन तिला सौभाग्यालंकार लेवविल्यावर तिचा ओटीभरण समारंभ होतो त्यानंतर गावकरी आनंदाने तिचे दर्शन घेतात आणि तिची प्रार्थना करतात, 'देवी, आमच्या शक्तीनुसार आम्ही तुझा जसा राखता येईल तसा मान राखला आहे प्रसन्न हो संतुष्ट हो तुला दिलेल्या बळीमुळे आणि यथामति, यथाशक्ति केलेल्या पूजेमुळे आमच्या गावात रोगाची साथ कधीही न पसरो. गावाच्या आरोग्याचे सर्व संरक्षण आता देवी, तुझ्याच हाती आहे.'

देवताच्या रहस्यमय उत्पत्तिकथा आणि देवताबद्दल वाटणारे आकर्षण वाढण्यासाठी भव्य, मनोरंजक कार्यक्रम यांची मांडणी करण्यात आली असावी दुष्ट प्रवृत्तींचा नाश कोणत्या रूपाने करावा याचे ते थोडक्यात दिग्दर्शनच होय

ग्रामदेवतांच्या वार्षिक उत्सवाची कारणमीमांसा वरील कथेत उत्कृष्टपणे पहावयास मिळते उत्सवानिमित्त सर्व गाव साफसूफ केला जाई, घरांना रंग रंगोटी होई, सर्व गावकरी दोन तीन दिवस खेळीमेळीने एकत्र वागत त्यामुळे वैरभाव वाढत नसे, सामाजिक बंधने पाळली जात असत, असे अनेक फायदे दिसून येतात या पूर्वापार रूढी पाळण्यात चालढकल होऊ लागली, नव्हे संपूर्ण दुर्लक्ष झाले आणि त्यामुळेच हेवेदावे वाढले व सामाजिक जीवन अस्थिर झाले, असा निष्कर्ष काढल्यास योग्यच होईल धार्मिक बंधनामुळे समाजात जो ऐक्यभाव होता, स्थिरता होती, ती बंधने तुटल्यामुळे नष्ट झाली, याचेच वाईट वाटते. ग्रामदेवताच्या उत्सवाऐवजी काही ठिकाणी गणेशोत्सव, दुर्गोत्सव सार्वजनिकपणे साजरे होतात, पण पूर्वीचे वैभव त्यामध्ये दिसून येत नाही त्यातील कार्यक्रमावरून समाज कसा विस्कळीत होत चालला आहे याचीच प्रचीती येते. ईसाई अथवा इस्लाम समाजाच्या वर्तणुकीचे, धार्मिक आचाराचे सर्वजण कौतुक करतात, पण त्या कौतुकाचे मूळ धार्मिक बंधने पाळण्यात आहे, हे मात्र सोयीस्करपणे विसरले जाते

# वृक्षदेवता

किं जातोऽसि चतुष्पथे घनतरं छन्नोऽसि किं छायया।
हे सद्वृक्ष सहस्व संप्रति सखे शाखाशिखाकर्षणः ॥

पाने, फुले, फळे यांनी रसरसलेला, उन्हाची तिरीप व थंडीचा कडाका निमूटपणे सहन करून आपला देह जो दुसऱ्याचे सुखी आणि सुखी समर्पित करतो, त्या उदारधी गुरुस्थानी असलेल्या वृक्षराजाला कवि शतशः प्रणाम करीत असतो. वृक्षाने एखाद्याची संगत धरली म्हणजे तो त्याला कधीही अंतर देत नाही, हा त्याचा विशेष गुण होय. पक्षाच्या थव्यांनी चहुबाजूंनी साल कुरतडून काढली, कीटकांनी सर्व ढोली भरून गेली, फांद्यांवर वानराच्या व पक्षाच्या झुंडींनी वस्ती केली, भ्रमरांनी फुलातील सर्व रस शोषून टाकला तरी हा उदारधी सर्व सहन करतो. चंदनाला सहाणेवर घासून घासून मानव त्याचा क्षय करतो, पण त्या घासणारांवरच सुगंध उधळतो. चंपक वृक्षाला मानव कधी पाणी देखील घालीत नाही; पण आपल्या सुगंधी फुलांनी सर्वत्र सुगंध दरवळून तो त्याला लाजवितो. अशा गुणी वृक्षाची मानवांनी कदर न करणे हे जणू त्याचे ललाटीच लिहिलेले आहे. मानवसमाज जरी या वृक्षाची उपेक्षा करीत असला, तरी आपल्या गुणप्रकर्षाने सारी दुनिया ते निनादित करून टाकतात. पूर्वीच्या संस्कृत ऋषींनी मात्र त्याची योग्य ती दखल घेतलेली दिसते, ते वृक्षराजाला सविनय प्रार्थना करतात, 'हे वृक्षश्रेष्ठा, तूं शेकडो वर्षे जगत रहा, एकटाच जगत रहा. फुलाचा सुगंध पसरवीत रहा. पशु-पक्षी, मानव यांना फळाचा आस्वाद देत रहा. त्यांना सावली छाया विनामूल्य देत रहा. पाने, फळे तोडली तरी, व पाषाण मारले तरी, सर्व सहन कर आणि मानवांना दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शन कर की, प्रत्येकाने आपल्या जीवनाचा याप्रमाणे सदुपयोग करून, अमर कीर्ति संपादन करावी.'

वरं भूमिरुहाः पञ्च न तु काष्ठरुहा दश।
पत्रैः पुष्पैः फलैः मूलैः कुर्वन्ति पितृतर्पणम् ॥

(भविष्य उत्तर, १२८।२-५)

श्रीकृष्ण युधिष्ठिराला सांगतात की, 'पर्वताच्या ठिकाणी दहा वृक्षाचे रोपण करण्यापेक्षा भूतलावर पाचच वृक्षाचे रोपण करणे अधिक पुण्यकारक आहे. कारण ते वृक्ष आपली पाने, फुले, फळे व मुळे यांनी पितृतर्पण करीत असतात. वाटेत असलेला एकटा वृक्षही श्रेष्ठ मानला जातो. कारण त्याच्या शीतल छायेत अनेक पांथस्थ आराम करू शकतात, विश्रांति घेऊ शकतात. त्या वृक्षाच्या या

उपकाराने तो पांथस्थही संतुष्ट होतो. आपल्या फळाफुलांनी आणि शाखांनी मानवाला अमोल मदत करणारे हे वृक्ष खरोखरच धन्य होत. त्यांचे मानवावर फार मोठे उपकार आहेत परंतु वृक्षाचे जीवितकार्य कोणाला उमगते, तर कोणाला उमगतही नाही.

अश्वत्थमेकं पिचुमन्दमेकं । न्यग्रोधमेकं दशचिञ्चिणीकाम् ।
कपित्थबिल्वामलकीत्रयं च । पंचाम्ररोपि नरकं न पश्येत् ॥
(भविष्य उत्तर, १२८।२–१०)

या भूतलावर जन्म घेतल्यावर जो मानव एक पिंपळ, एक वड, एक निंब, दहा चिंचेची झाडे, तीन कवठ, तीन बेल, तीन आवळी आणि पाच आम्रवृक्षाचे रोपण करतो, तो सदा तीर्थक्षेत्रात राहातो व नरकाचे दार कधीही पाहात नाही असे मानतात. इतकेच नव्हे तर तो सदैव दान देणारा व यज्ञ करणारा असेही मानतात. फळाफुलांनी बहरलेला वृक्ष जो दान करतो तो विमान समान गृहाची प्राप्ति करून घेतो. ज्याने आयुष्यात वृक्षारोपण केले नाही, अगर एकही विहीर खोदली नाही, त्याने मातेच्या पोटी जन्म घेऊन तिची कूस उजवली नाही असेच म्हणावे लागते. हे महावृक्ष केवळ दुसऱ्यावर उपकार करण्यासाठीच जन्म घेतात. त्यांना फळे–फुले देतात. स्वतः सूर्याचा ताप सहन करीत उभे राहून दुसऱ्यांना अखंड शीतल छाया प्रदान करतात. जो कोणी पुण्यवान आत्मा मार्गावर पांथस्थासाठी वृक्षाची लागवड करतो, त्या वेळी तो परमेशाची प्रार्थना करतो की, 'हे भगवान विष्णो, जितके दिवस हा वृक्ष भूतलावर जिवत राहील, तत्कालापर्यंत मला स्वर्गात राहाण्याची अनुज्ञा असावी. तसेच या वृक्षछायेचा उपभोग अनेक वाटसरू घेवोत आणि त्यांच्या मोनदल्यात माझ्या मृत्यूनंतर पुढील प्रवास करताना माझ्या जीवात्म्याला सूर्यकिरणांचा त्रास न होवो.' वृक्षारोपण करताना भारतीयांचे विचार किती पारमार्थिक आणि उच्च कोटीचे होते, हेच यावरून दिसून येते.

वाटसरूंना शीतल छाया देणाऱ्या व फळांनी युक्त अशा फांद्या फलभारे खाली लोंबू लागल्या म्हणजे पांथस्थ त्या खाली ओढतात, त्या फळांची अभिलाषा धरतात. झाडावरची फळे पाडण्यासाठी दगडदेखील मारायला कमी करीत नाही. हे पाहून एका मराठी कवीचे अंतःकरण द्रवले. तो म्हणतो,

"वृक्षा, सोस निमुट हाल अवघे, आता न अन्या गती ॥"

मोठेपणाने अगर वडिलकीने सुख देणाऱ्या वृक्षाची ही गति होते. त्यांच्या उपकाराचे फळ केव्हा केव्हा त्याला असे अपकारानेही मिळते. तरी देखील त्या वृक्षाचा मूळ स्वभाव काही बदलत नाही.

वृक्षाची महति आधुनिक जगालाच कळत आहे आणि प्राचीन काळी ती कळत नव्हती असे मात्र मुळीच नाही. वृक्षराजींची वर्णने केवळ आजचेच साहित्यिक करतात आणि पूर्वीचे साहित्यिक करीत नव्हते असेही पण नव्हे. श्रीमद्भागवतामध्ये व्यासमहर्षि वर्णन करतात,

अहो अमी देववरामरर्चितं। पादाम्बुजं ते सुमनः फलार्हणम्।
नमन्त्युपादाय शिखाभिरात्मनः। तमोऽपहत्यै. तरुजन्म यत्कृतम्॥
(भागवत, १०–१५–५)

भगवान श्रीकृष्ण आणि बलराम सहासात वर्षांचे झाल्यावर गाईंना चारण्यासाठी ते अरण्यात गेले असता श्रीकृष्णाने वनाचे सौंदर्य पाहिले. मोठया मोठया वृक्षांच्या डहाळ्या फुले व फळांनी भारावल्यामुळे खाली वाकलेल्या आहेत, नव्हे त्या जणू गायींच्या पवित्र चरणाना स्पर्श करण्यासाठीच खाली वाकलेल्या आहेत आणि गायींना नमस्कार करून आपल्या आश्रमात त्या त्यांचे स्वागत करीत आहेत त्या वेळी श्रीकृष्ण बलरामाला म्हणाले की, 'हे महान वृक्ष आपल्या आगमनामुळे नतमस्तक झालेले आहेत आणि आपल्याला वंदन करीत आहेत असे मला वाटते. मानवामधील अहंकाररूपी अज्ञानाचा नाश करण्यासाठीच या वृक्षांनी आपले जीवितकार्य या वनामध्ये चालू ठेवले आहे आणि सज्जनांचे स्वागत कसे करावे याचा आदर्श ते दाखवीत आहेत. या महान वनवासी वृक्षांची येथे मोरपक्षी नाचून करमणूक करतात, हरीण-बालके त्यांच्यामध्ये इतस्तत वागडतात, कोकिळपक्षी आपल्या मधूर कंठरवाने त्यांचे रंजन करतात. शहरवासियांना जे सुख उपभोगावयास मिळत नाही, ते या उपकारकर्त्या महान वृक्षांना उपभोगावयास मिळते. त्यामुळे वनवासी असूनही हे वृक्ष धन्य होते. त्यांच्या या वागणुकीची शिकवण हीच की, माणूस कितीही मोठा झाला तरीदेखील त्याने सदैव विनम्र असावे, सदैव नतमस्तक असावे.'

भू–जळ–तेज–समीर–ख रवि शशि काष्टादिकी असे भरला।
स्थिर चिर व्यापुन अवघा तो जगदात्मा दशांगुळें उरला॥
(कवि मोरोपंत.)

आर्यधर्मात शक्तीचे स्वरूप वर्णन करताना सांगितले आहे की, सर्व जड वस्तूमध्ये तिचे स्वरूप पूर्णत भरलेले आहे. जळी, स्थळी, काष्ठी, पाषाणी सर्व ठिकाणी भक्तिभावाने व श्रद्धेने पाहाणाऱ्यास ते दृग्गोचर होते. पशु, पक्षी आणि मानव यांच्यामध्येच ते आहे आणि इतर स्थूल रूपात नाही असे मात्र मुळीच नाही. याची अनेक उदाहरणे देता येतील. हिरण्यकश्यपूने जेव्हा आपल्या मुलाचा

अविरत छळ करून त्याला ठार मारण्याचा, त्याचा अनेकवारचा प्रयत्न फसला त्या वेळी अतिशय क्रोधावश होऊन आपल्या मुलाला तो म्हणाला, 'तर मग हट्टी पोरा, तुझा तो नारायण कोठे आहे ते सांग. या लाकडाच्या खांबात तो आहे काय?' प्रल्हाद शांत चित्ताने उत्तरला, "होय बाबा, होय! माझा सर्वव्यापी नारायण या लाकडाच्या खांबातही आहेच आहे." हे ऐकताच तो दैत्य आणखीनच भडकला आणि रागाने त्याने त्या खांबावर लत्ताप्रहार केला. तुकाराम महाराज या प्रसंगाचे वर्णन करताना म्हणतात,

"खांबावरी लाथ मारितां दुर्जनें ।
स्तंभीं नारायण प्रकटला ॥"

तत्काळ त्या खांबातून सिंहमुखी नारायण बाहेर आले आणि त्यांनी हिरण्यकश्यपूचा वध केला. दुसरे एक संत श्रीसावतामाळी यासंबंधात म्हणतात,

कांदामुळाभाजी, अवघी विठाबाई माझी ।
लसूण मिरची कोथिंबिरी, अवघा झालासे गोपाळू ॥

संत ज्ञानेश्वर वृक्षासंबंधी लिहितात,

जो खांडावया घावो घाली । कां लावणी जयानें केली ।
दोघां एकचि सावली । वृक्षु दे जैसा ॥
ना तरी इक्षुदंडु । पाळी तया गोडु ।
गाळितया कडु । नोहेचि जेवीं ॥ (१२-२००) ॥

तुकाराम महाराज याच अर्थाने लिहितात,

वृक्षवल्ली आम्हां सोइरें वनचरें । पक्षिही सुस्वरें आळविती ॥

संत एकनाथ महाराजांनी अ. ७ मध्ये, ३९३ व ४०३ ओव्यांमध्ये वृक्षाची महती वर्णन केली आहे. श्रीमत् भागवत दशमस्कंध अ. २२ मध्येही वृक्षाचे महत्त्व वर्णन केले आहे,

एतावज्जन्मसाफल्यं । देहिनामिह देहिषु ।
प्राणैरर्थैर्धिया वाचा । श्रेय एवाचरेत्सदा ॥

वृक्ष ज्याप्रमाणे फळे, पुष्पे, साली, मुळे वगैरे आपली संपत्ति परोपकारार्थ खर्च करतात, त्याप्रमाणे महात्मे लोक आपली प्राणसंपत्ति, बुद्धि व वाणी सर्व जगाच्या हितार्थ अर्पण करतात. (प्रसाद, ऑक्टोबर १९६४)

मानवप्राणी वृक्षदेवताचे पूजन का करतात, यासंबंधी एका ग्रंथात मार्मिक विवेचन केलेले आहे. अतिप्राचीन काळी देव मानवाबरोबर बोलत-चालत असत. पण देव आणि दैत्य यांच्या युद्धप्रसंगी, दैत्यांना दैव अनुकूल असल्याने युद्धामध्ये त्यांचा जय झाला आणि देवांना पळता भुई थोडी झाली. आपल्या प्राणाचा बचाव करण्यासाठी त्यांनी आपले रूपांतर वृक्षामध्ये करून घेतले, ते येणेप्रमाणे—

विष्णु–पिंपळ, ब्रह्मदेव–पळस, सदाशिव–वटवृक्ष, शक्तिदेवी–आवळी; श्रीगुरू–औदुंबर, शंकर–बेलवृक्ष, इंद्र–आंबा, सरमादेवी–शमी, इ० इ०.

मंगलकार्यप्रसंगी मानव आपल्या पितरांचे ज्याप्रमाणे आवाहन करतो, तसे देवांचेही करीत असे. पण त्यांचे रूपांतर वृक्षामध्ये झाल्यावर, मानव त्या वृक्षांनाच आवाहन करू लागला व त्यांचे पूजन सुरू झाले. त्या वेळी सुरू झालेले पूजन सांप्रतही प्रचलित आहे.

(आत्मज्ञान ग्रंथ, ले. वि. ना. पावसकर)

या सर्वांचे तात्पर्य एकच की, सर्वत्र समदृष्टीने पहाणाऱ्याला वृक्षवेलींमध्ये सुद्धा परमात्म्याचे स्वरूप दिसते आणि म्हणूनच काही वृक्षांचे पूजन केले जाते. वृक्षादिकांना आत्मा आहे, जीवात्मा आहे, हे बसूसारख्या अनेक शास्त्रज्ञांनी सिद्ध केलेले आहे. तसेच मनूसारख्या प्राचीन ऋषींनी आपल्या धर्मग्रंथामध्ये प्रतिपादिले आहे ( १–४९ ) की, मानवाला ज्याप्रमाणे राहाण्यास घराची आवश्यकता असते तद्वतच तीर्यग् योनीतील प्राणिमात्रांना त्याची जरूरी असते आणि ते वृक्षाच्या आश्रयाने राहातात. सर्पादि प्राणी वृक्षाच्या मुळाच्या आश्रयाने तर पशुपक्षी फांद्यांवर घरटी बांधून राहातात. खेडेगावी तर भव्य वृक्षाचा उपयोग सभागृह अथवा क्रीडांगणाप्रमाणे होतो. तेव्हा कोणत्याही आत्म्याची आराधना भक्तिभावाने केल्यास, एकनिष्ठपणे त्याची सेवा केल्यास इच्छित फलप्राप्ति होतेच, असाच भक्तांचा अनुभव आहे. पाषाणमूर्तीमधील देव जर भक्तीने वश करता येतो तर मग आत्मा असलेल्या वृक्षादिकांमधून तो वश करून घेणे सुलभ का नसावे बरे! आपण यांची काही उदाहरणेच पाहू.

( अ ) आद्यशंकराचार्यांची माता आर्यंबा पुत्रसंतान नसल्यामुळे अतिशय दुःखी होती तिचे मुले होण्याचे वयही टळून गेले होते अशा वेळी कोणा साधूच्या उपदेशाप्रमाणे तिने अश्वत्थाची सेवा केली आणि त्याचे फल म्हणून आद्यशंकराचार्यांसारखे सुपुत्ररत्न तिला प्राप्त झाले.

( आ ) लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या मातेने अश्वत्थ व सूर्य यांची खडतर उपासना केल्यानंतर असा सुपुत्र तिच्या पोटी जन्माला आला.

(इ) गुरुचरित्र पोथीमध्ये असा एक कथाभाग आहे की, गुरुच्या आज्ञे प्रमाणे एका वंध्येने प्रतिदिनी शुष्क अश्वत्थाला पाणी घालून प्रतिदिनी त्याची सेवा केल्यावर तिला पुत्रलाभ झाला

(ई) आपला परागदा पती परत यावा म्हणून ज्ञानेश्वराची माता अश्व त्याला प्रदक्षिणा घालीत असे आर्य स्त्रिया अनेक देवताची पूजा करतात प्रत्येक देवतेची प्रिय वनस्पति त्या त्या देवतेला अर्पण करण्याचा प्रघात आहे पूजा विधीमध्ये काही वनस्पतींचा समावेश झाल्याबरोबर त्याना महत्त्व प्राप्त झाले आणि क्वचित् त्याचेही पूजनही होऊ लागले उदाहरणार्थ, भगवान शंकर बिल्वपत्र कमळ व धोतरा फूल, विष्णु–तुळस गणपति–दूर्वांकुर व शमी, हनुमान–रुईची फुले व पाने, शक्तिदेवता–लाल फुले शिवाय काही वृक्षामध्ये देवताचे निवासस्थान असते अशी श्रद्धा असल्याने त्यानाही देवत्व प्राप्त झाले जसे औदुंबराच्या ठिकाणी गुरु दत्तात्रयाचा निवास असतो वडाच्या ठिकाणी भगवान विष्णूचा वास असतो अश्वत्थाच्या ठिकाणी ब्रह्मा विष्णु महेश आणि लक्ष्मी व तिची बहीण अलक्ष्मी याचा वास असतो, वगैरे वगैरे अमृतमथनातून निर्माण झाल्या मुळे आणि स्वर्गासारखे निवासस्थान असल्यामुळे पारिजातकासारख्याला देवत्व प्राप्त झाले निंबवृक्ष हा सुद्धा पूर्वीचा स्वर्गीचा वृक्ष शापामुळे भूतलावर आला, म्हणून त्याला महत्त्व प्राप्त झाले

यो देव ओषधीषु, यो वनस्पतिषु, तस्मै देवाय नमो नम ॥

भावार्थ असा की, जो परमात्मा भगवान्, अन्नामध्ये अशरूपाने आहे, सर्व वनस्पतींमध्ये अशरूपाने आहे, त्याला माझा नमस्कार असो

ईश्वरावर पूर्ण श्रद्धा ठेवून रोग बरे करण्याची रीत फक्त भारतात आहे, असेच नाही पाश्चिमात्यही तसे करतात पतजलीने ईश्वरप्रणिधानाचा फायदा कसा सागितला आहे तो पहा—

तत प्रत्यक् चेतनागमोऽप्यतराया भावश्च ॥

त्या ईश्वर प्रणिधानापासून आत्मज्ञान व विघ्नाचा नाश होतो तेव्हा या सूत्रावर जे रोगी विश्वास ठेवतील, त्याच्या रोगाचे परिमार्जन ईश्वरावरील प्रगाढ श्रद्धेनेच होईल पाषाणाची मूर्ति तयार करून जर आपण त्यावर विश्वास ठेवला, तर त्यामध्ये असणारा ईश्वरी अश मानवाचे रोग निवारण करतो, तर वृक्षासारखे चेतन पदार्थातील ईश्वरी अश निश्चयानेच रोगाचे निवारण करील, असा या सूत्राचा भावार्थ आहे वृक्षादिकाच्या ठिकाणी देव व आहे, असे आपला आर्यधर्म सागतो आणि म्हणूनच त्याचे पूजन केले जाते देवावर विश्वास ठेवून रानो

झोपले आणि सकाळी उठल्यावर रोगाचे निवारण झाले नाही असे कोणी म्हणू लागला, तर त्याला उत्तर असे की, परमेश्वर हा काही कुणाचा चाकर नव्हे की, रोग्याच्या मागे स्मरण केल्याबरोबर अमृतकुंभ घेऊन धावेल. ईश्वराचे प्रेमात, सेवेत जितके लीन व्हावे, अहंकाराचा त्याग करावा आणि सर्व भरवंसा त्याजवर टाकावा, त्या प्रमाणात रोगाचे प्रमाण कमी कमी होते आणि शेवटी ते शिल्लक उरतच नाही. केवळ सद्वृत्तीने वागले असताही रोग नाश होतो, असे चरकाचे म्हणणे आहे.

तस्मात्पश्यंति पादपाः। तस्माच्छृण्वंति पादपाः ॥

म्हणजे वृक्ष पाहतात, वृक्ष ऐकतात, तसेच ' अंतः संज्ञा भवत्येते ' म्हणजे त्यांना अंतर्ज्ञान असते, असे महाभारतकार व मनूचेही म्हणणे आहे.

(चातुर्यचंद्रोदय, ले. गुलाबराव महाराज, पृ. २३०)

हे जरी सर्व असले तरी काही वृक्षांना देवपण प्राप्त होण्याचे कारण म्हणजे त्यांतील रासायनिक गुण हे होय. प्रत्येक वनस्पतीमध्ये कोणता ना कोणता तरी रासायनिक गुण असतोच असतो. पूर्वीच्या सुश्रुत, चरक यांसारख्या भारतीय संशोधकांनी आणि पाश्चिमात्य संशोधकांनी यासंबंधीचे आपले अनुभव नमूद करून ठेवले असून ते ग्रंथरूपाने आज उपलब्ध आहेत. वृक्षांना जीवन असते हे एकदा मान्य केल्यावर आणि त्यांना देवपण बहाल केल्यावर त्यांची पाने, मुळ्या तोडताना प्रार्थना सूक्ते अथवा मंत्र अस्तित्वात आले. भूमीतून अगर पर्णांमधून आपले खाद्य घेणे आणि त्याचा शक्तिसंचय खोडातून अगर मुळातून करणे हे वृक्षाचे काम असल्याने त्यांची शक्ति संचित झालेली असते. त्यामुळे त्याचा रस अथवा मुळ्या या जास्त गुणकारी ठरतात. ब्रह्मचारी माणसाची शक्ति जशी संचित झालेली असते आणि आपल्या त्या तेजामुळे जसा तो अनेकांना आकर्षून घेऊ शकतो, तद्वतच वृक्ष आपल्या रासायनिक संचित शक्तीद्वारे मानवांची सेवा करू शकतात. मानवाची शक्ति संचित झालेली असली म्हणजे तो अनेक चमत्कार करू शकतो याचे एक उदाहरण नुकतेच माझ्या कानी आले. नागपूर येथील एक गृहस्थ रावसाहेब अभीन भेटले असता विषय निघाला. तेव्हा त्यांनी सांगितले की, ' एका ब्रह्मपुरी नावाच्या सत्पुरुषाजवळ मी इच्छा प्रकट केली की, गिरनार, माहुर, कैलास या ठिकाणी जाऊन मला त्या क्षेत्राचे दर्शन घ्यावयाचे आहे. तेव्हा त्या सत्पुरुषाने माझ्या शरीराला नुसता स्पर्श केला आणि काही वेळ डोळे मिटून घेण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी डोळे मिटताच वरील तिन्ही क्षेत्रांचे संपूर्ण दर्शन मला घडले. सुमारे अर्ध्या तासाने मी डोळे उघडले. त्या अर्ध्या तासात त्या तिन्ही क्षेत्रांची सर्व स्थळे मी पाहून घेतली. ' काही कालानंतर हे रावसाहेब प्रत्यक्ष गिरनार व माहुरगड या क्षेत्री गेले असता जो

देखावा त्यांनी त्या सत्पुरुषाच्या कृपाप्रसादाने पाहिलेला होता तसाच त्यांना तेथे आढळला त्या एका सत्पुरुषाच्या शक्तिसंचयामुळे आणि त्याच्या त्या लवमात्र स्पर्शामुळे दुसऱ्याला इतकी दिव्यदृष्टि या विसाव्या शतकातही येऊ शकते हे आश्चर्यच नव्हे काय ?

याप्रमाणेच वृक्ष आपली शक्ति संचित करून रासायनिक रूपाने मानवाच्या उपयोगी पडतात म्हणून त्यांना महत्त्व प्राप्त झालेले आहे वृक्षाची ही रासायनिक क्रिया जरी सर्वकाळ जागृत असली तरी काही विवक्षित काळवेळी ती जास्त प्रभावी असते असे अनुभवास येते जसे सर्पदंशावर उपाय म्हणून एखाद्या कण्हेर वृक्षाची मुळी उपयोगी पडत असेल तर ती अमक्या वेळी, अमक्या दिवशी, अमूक एका तिथीनक्षत्रावरच काढलेली असली पाहिजे तरच ती गुणकारी ठरते, एरव्ही नाही. तुळशीच्या रसाची प्रक्रिया पाऱ्यावर केली असता तो गोठून त्याचे पारदलिंग तयार होते पण त्याला पांढरी तुळस अथवा हिरवी तुळस चालत नाही, कृष्णतुळसच हवी पुन्हा ती सावलीत वाढलेली नसावी, अमूक ऋतूमधील नसावी, इत्यादि वचने आहेतच कारण उघडच आहे की, त्या त्या कालमानाची प्रक्रिया त्या त्या वृक्षावर झाल्यामुळे त्याचा रासायनिक उपयोग विवक्षित वस्तु घडविण्याच्या कामी होतो तेव्हा वृक्ष वेलींची रासायनिक प्रक्रिया पाहाताना आर्यौषधीशास्त्राप्रमाणे ती कशी होते व त्याचा जास्तीतजास्त उपयोग कसा करून घेता येईल हे संशोधकाने पाहिले पाहिजे

या वनस्पति शास्त्राचे प्रामुख्याने तीन भाग पडतात ते म्हणजे वर्गीकरण, जीवनक्रियाविज्ञान, व शरीर विज्ञान हे होत शरीरविज्ञानाचे बाह्यशरीरविज्ञान व अंत शरीर विज्ञान असे दोन उपविभाग पडतात जीवनक्रियाविषयक इतिहास संशोधिताना शेण, कुजट माती, विष्ठा, माती, मासळी, राख इत्यादींचा उपयोग वनस्पतींच्या वाढीवर व फुलफळांवर कसा होतो, हे शोधून काढलेले आहे तसेच वनस्पतीची पुनरुत्पत्ति, पोषण, भूमीतून जलाचे व अन्नाचे शोषण, आत शोषलेल्या जलाचे चलनवलन व त्याच्या एकूण इंद्रियांची हालचाल हे विषय येतात तसेच त्याच्या लिंगभेदाचाही विचार केलेला आहे हवेतील कार्बन डायऑक्साइड वायूचे पानांद्वारे शोषण करून सूर्यप्रकाशाखाली त्याचे पृथक्करण करून ऑक्सिजन तेवढा बाहेर सोडणे हे त्यांचे कार्य मानवी जीवनाच्या दृष्टीने उत्कृष्टच समजले जाते वनस्पतीचे फळ व बीज यांचे संबंध प्राचीन ऋषींना ज्ञात होते फुले व फळे यांचे प्रकार एकदल की, द्विदल याची प्राचीन ऋषींना माहिती होती यासाठीच 'वैदल वनस्पति' हा शब्दप्रयोग त्यांना माहिती होता ( बृहद्योग वसिष्ठसार ) अंकुर नष्ट झाला तर पल्लवोत्पत्ति होत नाही पण शाखापल्लव यांचा नाश झाला तरी अंकुरापासून त्यांची पुनरोत्पत्ति होऊ शकते त्याचे ज्ञान त्यांना होते

उदेति पूर्वं कुसुमं फलं ।

हे तत्त्व त्याना माहिती होते.

"वेळूवृक्ष जसे आपले सारे बेटच्या बेट नाश करून टाकणारे बीज धारण करतो त्याप्रमाणे या धृतराष्ट्र दुर्योधनाने महाभयंकर वैर उत्पन्न होणाऱ्या द्यूताचा अंगीकार केलेला आहे."

(सभापर्व– विदुरकृत दुर्योधननिर्भर्त्सना)

म्हणजे बीजातील स्फोटक शक्तीचेही आपल्या पूर्वजाना ज्ञान होते.

काही वनस्पति सपुष्पवर्गातील तर काही वनस्पति अपुष्प वर्गातील असतात. पहिल्या प्रकारात केव्हातरी फुलापासून फळ व बीज निर्माण होते; परंतु दुसऱ्या प्रकारात केव्हाही निर्माण होत नाही. पहिल्या प्रकारात अयोनिज अथवा नग्नबीज आणि योनीज म्हणजे अनग्नबीज होय. पहिल्या प्रकारात आंबा, वड, पिंपळ, बाभूळ यांचा समावेश करता येईल. तर दुसऱ्या प्रकारात देवदार, सुरू, मोरपखी इत्यादींचा समावेश करता येईल. वनस्पतीची मुळे दोन प्रकारची आहेत. खरी मुळे व उपरी मुळे. खरी मुळे ही गर्भाच्या आदिमुळापासून प्रत्यक्षाप्रत्यक्ष रीतीने उत्पन्न झालेली असतात. उपरी मुळे अथवा यांच्या वाढीला आदिमुळाला कोणताही संबंध नसतो. उसाच्या पेरापासून निघणारी मुळे अथवा वटवृक्षाच्या पारब्या या प्रकारात मोडतात. उपरी मुळात पुन्हा दोन पोटभेद आहेत. एक खोडापासून निघालेली अथवा भूगर्भातील इतर भागापासून निघालेली आणि दुसरा प्रकार म्हणजे हवेतील भागापासून उत्पन्न झालेली मुळे. जोंधळ्याच्या अथवा नाचणीच्या दांडाला काही उपरी मुळे बुध्याजवळच येतात आणि मूळवृक्षाला आधार देतात. वास्तव या प्रकारातील मुळांना आश्रयदायी मुळे म्हणतात. अनेक वेलींना फुटणारी मुळे झाडाच्या फांद्यांचा अथवा मांडवाचा आधार घेतात, असे आपण पाहतो. फळाचेही अनेक पोटभेद आहेत. जसे, शंखाकार, शंकूकार गाजराप्रमाणे, मालिकाकार, मध्यभागी गोल, मुळाप्रमाणे भ्रमराकार, सलगमप्रमाणे, बुडाला चेंडूप्रमाणे चाटोळे. याचप्रमाणे, मालाकार, गोपुच्छाकार, करतलाकार इत्यादि अनेक प्रकार आहेत.

वनस्पति-संशोधकांनी वरीलप्रमाणे वृक्षाचे निरनिराळे प्रकार, त्यांची खोडे, फांद्या, स्कंद, कलिका व पाकळ्या, फुलांचे व पानांचे देठ, पानांचे निरनिराळे आकार व त्यावरील रेषांच्या प्रकारांचे विश्लेषण, फुलांचे प्रकार, त्यांचे आकार व त्यातील परागाची वर्णने, स्त्री-केसर व पुं-केसर प्रकाराची वर्णने, वनस्पति आणि त्यांची जीवनकार्ये, त्यांना मानवणारे उष्णतामान, शुष्कदेशीय वनस्पति,

आर्द्रदेशीय वनस्पति, जलतरणक वनस्पति, पूर्णजलाच्छादित वनस्पति, प्रकाशामुळे वनस्पतींवर घडणाऱ्या अनुघटना व हरितकणाचे महत्त्व इत्यादि बाबतींत संशोधन करून त्याने विश्लेषण केलेले आहे आणि तत्संबंधीच्या ग्रंथामध्ये ते नोंदवून ठेवलेले आहे

ॲरिस्टॉटल ( खिस्तपूर्व ३८४ ते ३२२ ) व त्याचा शिष्य थिओफ्रास्टस् याचे याबाबतीतील संशोधन आद्य समजले जाते त्यानंतर पधराव्या शतकात प्लीनीचे ' निसर्गाचा वृत्तांत ', आल्बर्टचे ' आरोग्य विज्ञान ', ब्रुन्फेल, लिओन्हार्ट यांच्यासारखे जर्मन संशोधक फुशाचा सन १५४२ मधील ५०० वनस्पतींची माहिती ग्रंथ, सन १६२३ मधील बौहिनचा ग्रंथ इत्यादींद्वारे बरेच संशोधन झाले बौहिनच्या ग्रंथात ६००० वनस्पतींचा अभ्यास केलेला आहे या शास्त्राचा अभ्यास करण्यास त्याला एक खास उद्यान तयार करावे लागले अशा तऱ्हेचे पहिले उद्यान सन १५४२ साली पादुआ शहरी तयार करण्यात आले होते यथानुक्रमे ग्रंथातून वनस्पतींची चित्र देण्याची प्रथा सुरू झाली बौहिनच्या ' प्रोडोमॉस बोटॅनिक ' या ग्रंथामध्ये तर वृक्षाच्या मुळाचा आकार, बुध्याचा आकार, उंची, पानाच्या आकृति, फुले, फळे, यांची सचित्र वर्णने आलेली आहेत सन १५८३ साली ॲंड्रे सेलजनिपनो याने ' डि प्लान्टिस लिब्री ' या नावाचा ग्रंथ फ्लोरेन्स या शहरी लिहिला व तो १८ भागात प्रसिद्ध केला त्याचप्रमाणे जोकिम जंग ( सन १५८७ ), रॉबर्ट मॉरिसन ( सन १६२० ), ऑगस्टस् रॅाहमन ( सन १६५२ ), जाकेफ गार्डनर ( सन १७३२ ), ऑगस्टिन कौडेल ( सन १७७८ ) इत्यादि अनेक पाश्चिमात्य संशोधकांनी या विषयावर ग्रंथनिर्मिति केलेली आहे

तसे पाहावयास गेले तर भारतात वनस्पतिशास्त्राचा अभ्यास अतिप्राचीन काळापासून चालू आहे कारण आश्विनीकुमार, महादेव यांनी देखील या शास्त्राबद्दल थोडासा अभ्यास केलेला होता असे पुराणातच म्हटलेले आहे

ब्रह्मा स्मृत्वा युऽयोवेद प्रजापतिमाजिग्रहत् ।
सोऽश्विनौ तौ सहस्राक्ष सोऽग्निपुत्रादिकान्मुनीन् ॥

याचा इत्यर्थ असा की, विश्वाची पुनरुत्पत्ति झाल्यावर महादेवाने आयुर्वेदाची आठवण केली आणि तो प्रजापतीला सांगितला त्याने तो आश्विनी कुमारांना दिला त्यांनी तो इंद्राला सांगितला आणि इंद्राने तो अग्निपुत्र, अग्निवेश, काश्यप, गार्ग्य, हारित इत्यादि ऋषींना दिला त्यानंतर पुढे भूतलावर त्याचा प्रसार चालू झाला चरकसंहिता अथवा सुश्रुतसंहिता ही अग्निवेशानेच सनपूर्व सुमारे दोनसहस्र वर्षे तयार केलेली आहे इतके हे शास्त्र भारतामध्ये प्राचीन आहे.

भारताचे एक सुपुत्र संशोधक जगदीशचन्द्र बोस यांनी वनस्पतींनासुद्धा मनुष्यप्राण्याप्रमाणे जीवन आणि भावना असतात, असे फार पूर्वी सांगितलेले आहे. पण त्या वेळी पाश्चात्य संशोधकांनी या शोधाकडे विशेष लक्ष दिले नव्हते.

परंतु कॅनडामधील आधुनिक संशोधक यांनी वरील सूत्र ध्यानात ठेवून पुढील प्रयोग करून असे सिद्ध केले आहे की, वनस्पति ही संगीताने लुब्ध होतात. एवढेच नव्हे तर त्या संगीताचा त्यांच्या वाढीला व फलोत्पादनाला उत्तम परिणाम होतो. या संशोधकाचे नाव आहे श्रीमती पर्ल वेन वगैर. सतत दोन वर्षे त्यांनी हा प्रयोग काही गव्हाच्या बियाण्यांवर करून संगीताच्या सततच्या ध्वनिलहरींमुळे २५० ते ३०० टक्के वाढ झालेली दिसून आली. ज्यावर संगीताच्या ध्वनिलहरी नव्हत्या, त्यांची वाढ कोणत्याही प्रकारे झाली नाही. सारांश, मानवाच्या कार्यवाहीवर जसा संगीताचा परिणाम होतो, तसा वनस्पतींवरही होतो, हेच वरील प्रयोगावरून दिसून येते.

वृक्षाचे महत्त्व इतर देशांनीही मानलेले आहे आणि त्यांची जपणूक करून त्यांना दीर्घायुष्य उपलब्ध करून दिलेले आहे. भारतामध्ये अनेक ठिकाणी प्रचंड वटवृक्ष दृष्टीस पडतात आणि ते सहस्रावधि वर्षांच्या आयुष्याचे आहेत असे सांगितले जाते. गुजराथ प्रांती सिद्धपूर या ठिकाणी असा प्रचंड वृक्ष आहे की, ज्याच्या छायेखाली एखाद्या सैन्याचा तळ पडू शकेल. कलकत्ता शहरातील बोटॅनिकल उद्यानातील वटवृक्षाचा विस्तार ११४० चौरस फूट असून खोडाचा विस्तार ५१ फूट आहे. त्याच्या ७४६ पारंब्या भूगर्भात घुसल्या असून ती प्रत्यक्षतः खोडेच बनलेली आहेत व वृक्षाची आश्रयमुळे झालेली आहेत. तो वटवृक्ष तीनशे वर्षांपूर्वीचा असावा असे म्हणतात. भारतामध्ये देवदार वृक्ष सुमारे १०० फुटापर्यंत उंच आढळतात, परंतु विस्तारामध्ये ते वटवृक्षाची बरोबरी करू शकत नाहीत.

भारतामध्ये ज्याप्रमाणे प्रचंड वृक्ष आहेत, तसे ते इतर देशांतही आढळतात. अमेरिका देशात कॅलिफोर्निया येथे प्रचंड वृक्षराजींचा एक मोठा पट्टा आहे. सेकोय्या या नावाचे प्रचंड वृक्ष तेथे वाढतात. त्याच्या दोन जाती आहेत. नेव्हाडा पर्वतावर चार हजार फूट उंचीवरही हे वृक्ष आढळतात. या वृक्षाचे आयुष्य साडे तीन हजार वर्षांपर्यंत असू शकते. आश्चर्याची गोष्ट अशी की, पहिला पन्नास वर्षांचा काळ लोटल्यावर मग या वृक्षाची वाढ जोरात होते. त्याच वेळी २५० फूट उंच असणाऱ्या वृक्षाची उंची आणखी पन्नास-साठ फुटाने वाढते. त्याच्या एका फांदीची लांबीच सुमारे १५० फुटापर्यंत असते. बुंध्याजवळ

खोडाचा व्यास ४० फूट व परीघ १२० फूट असून वजन अंदाजे १५०० टनापर्यंत भरते, असे आढळून आले आहे. मेक्सिको येथे एका वृक्षाचा परीघ १७४ फूट असून तो सुमारे सहा सहस्र वर्षांपूर्वीचा असावा, असे जाणकारांचे मत आहे. ऑस्ट्रेलियामध्ये एक प्रचंड वृक्ष ४९५ फूट उंचीचा असून त्याच्या खोडाचा व्यास ७० फूट आहे. त्याचे आयुर्मान चार सहस्र वर्षांपूर्वीचे असावे असे म्हणतात. सरकारी खात्यातर्फे त्याच्या खोडातून आरपार भोंक पाडून एक बोगदा तयार केला असून प्रवासी लोक गमत म्हणून डोंगरामधील बोगद्याप्रमाणे त्यातून इकडून तिकडे हिंडतात.

पश्चिम जर्मनीमध्ये आल्फर शॉसेन भागात एक महान पुरातन वृक्ष आहे. त्याचे आयुष्य किमान एक सहस्र वर्षांपूर्वीचे आहे असे मानले जाते. त्याच्या खोडाचा परिघ १२ मीटर (सुमारे ४० फूट) एवढा प्रचंड आहे. या देशात हा वृक्ष म्हणजे बोधी वृक्षाप्रमाणे मानतात. याचे कारण असे की, बुद्धाप्रमाणे याच्या छायेखाली अनेक तत्त्ववेत्ते ध्यान-चिंतन तेथे प्रत्यही करीत असतात. जगातील इतर भागातून ज्ञानी माणसे येथे येऊन चिंतन करतात. त्यामुळे ज्ञानाची वृद्धि होते असे मानले जाते. प्राचीन काळी या ठिकाणी ग्रामपंचायत भरत असे, आणि त्याचे रुपांतर तेथे एका फळीमध्ये झाले असून, त्यावर बसून चिंतन चालते. सरकारी निसर्गसौंदर्य संरक्षण समिति या पुरातन वृक्षाचे संरक्षण करते. त्यामुळे कोणाला पाने फुलेही तोडता येत नाहीत.

(केसरी, पुणे २०-९-१९६४)

वृक्ष हे दैवत मानून त्याची पूजा फक्त भारतातच केली जाते असे नाही. इतर देशातही ती होते. युरोपातील 'होली ओक' हा वृक्ष हेच दर्शवितो. विशेषतः वन्यजमाती या वृक्षपूजकच आहेत. ज्याप्रमाणे पंचमहाभूतात्मक देवताची पूजा या जमाती करतात, तद्वतच निसर्गाचे उपासक म्हणून वृक्षाची पूजा करतात. भारतामध्ये ज्याप्रमाणे वारली, दुबळी, गोंड, जतिया या वन्यजमाति वृक्षपूजक आहेत. त्याचप्रमाणे आफ्रिका खंडातील दाट अरण्यात राहणाऱ्या झुलु वन्यजमातीसारख्या जाती देखील वृक्षाची पूजा करतात. देवताची अगर भूत-खेताची राहणी या वृक्षावर असते, असे मानल्यामुळे कदाचित् ही वृक्षपूजा होत असावी. मिनॉन व मायसेनियन संस्कृतींचे जे अवशेष मिळाले आहेत, त्यावरून त्या काळी वृक्षपूजा होत असावी असे दिसते. कोसोस या ठिकाणी या संस्कृतीचे जे शिक्के मिळाले आहेत, त्यावरून असे दिसते की, वनदेवी 'मातर डोलोरोसा' हिचे स्थान पर्वतावर असावे. तिच्या आजुबाजूला अंजीर, ताड इत्यादि वृक्षांची लागवड केलेली असे. तसेच काही मूर्तीच्या ठिकाणी वन्य पशु, पक्षी, बैल,

मेंढ्या, सिंह इत्यादि प्राणी दाखविलेले आहेत. त्यावरून त्यांचीही पूजा होत असावी असे अनुमान काढले जाते.

( Mother Goddess by E O. James, Page 138 )

वृक्षांतील रासायनिक गुणामुळे त्याचे महत्त्व वाढले असे आपण वर म्हटले आहे, ते कसे सत्य आहे याची मीमांसा आपण वृक्षांची काही उदाहरणे घेऊन पाहू या. सर्वच वनस्पतींचा विचार या ठिकाणी आपल्याला करावयाचा नसून त्यातील काही महत्त्वाच्या घटकाचा विचार येथे वृक्षदेवता दिग्दर्शनार्थ करावयाचा आहे. त्याचा विचार करताना वृक्षाचे रासायनिक गुणधर्म व धार्मिक प्रथांतील दैवत म्हणून त्याला मिळालेले गुणधर्म यांची सांगड घालून वृक्षाचा उपयुक्तपणा येथे दाखवावयाचा आहे.

( १ ) अश्वत्थ

भगवान् श्रीकृष्ण गीतेमध्ये विभूतियोग कथन करताना सांगतात की,

अश्वत्थः सर्ववृक्षाणां देवर्षीणां च नारदः ।

म्हणजे वृक्षामध्ये माझे अस्तित्व अश्वत्थ वृक्षामध्ये असते, यास्तव तो वृक्ष श्रेष्ठ होय.

अश्वत्थ म्हणजे पिंपळाचे झाड होय. 'मुळात पाणी शिंपडल्यावर जे दुसऱ्या दिवसापर्यंत राहात नाही असा वृक्ष म्हणजे अश्वत्थ. अश्वत्थाची दुसरी एक उपपत्ति तैत्तिरिय ब्राह्मणात दिलेली आहे. ती अशी की, एकदा अग्नि देवापासून निघाला आणि अश्वरूप धारण करून एक वर्षपर्यंत एका वृक्षावर राहिला, म्हणून त्या वृक्षाला अश्वत्थ असे नाव मिळाले. या वृक्षाच्या उत्पत्तीची कथा, 'कथाकल्पतरू' या ग्रंथात पुढीलप्रमाणे दिलेली आहे.

रामाने रावणाची दहा मस्तके तोडल्यावर ती ब्रह्महत्या बनून रामाला छळू लागली. रामचंद्रानी मौन व्रत धारण करून ती शिरे जाळून टाकली आणि आपल्या प्रजेलाही मौन धारण करावयाची आज्ञा दिली. त्याचा परिणाम असा झाला की, राज्यातील वेदघोष बंद पडला आणि त्यामुळे सर्व राज्यावर अवकळा पसरली. ब्रह्मदेवाला हे सहन झाले नाही व त्याने श्रीरामचंद्राना त्यांच्या या कृत्याचे दुष्परिणाम दाखविण्याचे ठरविले. त्या कामी त्याने शिवशंकर व विष्णु यांचेही साहाय्य घेतले. ब्रह्मदेव स्वतः अश्वत्थ बनले आणि आपल्या शाखांमधून ते वेदघोष करू लागले. अर्थात् प्रजाजनाची तोंडे बंद असता अश्वत्थ वेदघोष करतो, हे पाहून ते हसू लागले. ते आपल्यालाच हसत आहेत असे समजून रामचंद्राना भयंकर क्रोध आला. हाती बाण घेऊन तो आपल्यावर सोडणार इतक्यात, रामाच्या बाणाने अश्वत्थरूपी ब्रह्मदेवाचे काही बरेवाईट होईल या

भीतीने शिव व विष्णु घाबरले आणि ते रामचंद्रापुढे उभे टाकले अशा वेळी त्या ठिकाणी देवाना पाहून रामचंद्राना आश्चर्य वाटले व प्रकार होण्याचे कारण निवेदन करण्याची विनंती केली मग देवानी सर्व खुलासा केल्यावर नारदमुनींनी लोकाना वर दिला की, 'जो कोणी रामाची कीर्ति वर्णन करील त्याला अश्वथ सर्व पापातून मुक्त करील" तेव्हा अश्वथ हा साक्षात् ब्रह्माच होय असे मानले जाते याच कारणास्तव या वृक्षावर ब्रह्मा विष्णु-महेश यांची वसति असते असे मानतात

अश्वत्थ हा वेदकाळापासूनच पूजनीय वृक्ष आहे ऋग्वेदामध्ये आणि त्यानतरच्या वाङ्मयामध्ये याबद्दल अनेक उल्लेख आढळतात ऋग्वेदकाळी या वृक्षाच्या लाकडाच्या नावा बनवीत होते (१–१३५) यज्ञामध्ये अग्निमथन करण्यासाठी उत्तरारणी याच वृक्षाची करीत असत या वृक्षाला वैबाध असेही एक नाव आहे याचे कारण असे दिले जाते की, हा वृक्ष दुसऱ्या वृक्षावर आपली मुळे रुजवून मूळ वृक्षाची पाळेमुळे नाहीशी करतो (अथर्व०, ३–६) याची फळ मधुर असून पक्षीगण ती खातो अश्वत्थ हे देवसदनही मानलेले आहे

वेदपूर्वकाळी भारतात सिंधुसस्कृति नादत होती त्या सस्कृतीमध्ये अश्वत्थाला निर्मितीचे प्रतीक मानले दिसते त्या ठिकाणी सापडलेल्या एका मुद्रेवर एक देवता अश्वथाच्या दोन पानामध्ये उभी आहे, असे एक चित्र होते दुसऱ्या एका मुद्रेवर पिंपळाचे एक रोप वर येत असून दोन, एकशृग देवता त्याला लपेटून त्या रोपट्याच रक्षण करात आहेत असे दृश्य होते महिषमुड ही सिंधुजनाची एक श्रेष्ठ देवता असून ती अश्वत्थनिवासिनी होती ही महिषमुड देवता त्या सस्कृतीमधील सृष्टिकर्त्री दिसते वैदिक प्रजापतीचे ते पूर्वकालीन स्वरूप असाव अश्वत्थाच्या मुळातून फुटलेल्या दोन शाखासमान–रोमन लिपीतील 'व्ही' प्रमाणे–सिधुसस्कृतीच मुख्य प्रतीक होते ऋग्वेदामध्ये अश्वत्थाला यम व पितर याचे निवासस्थान मानलेले आहे आणि म्हणूनच गयेसारख्या पवित्र तीर्थक्षेत्री अश्वत्थाच्या मुळाजवळ पिंडदान करण्याची रूढी पडली असावी भगवान् बुद्धाला ज्या वृक्षाखाली साक्षात्कार झाला तो वृक्षदेखील एक अश्वथच होता मृतात्म्याला स्वर्गलोकी जाण्यावर सुखसोयी मिळाव्यात म्हणून याच वृक्षावर पाण्याने भरलेले एक भाडे काही दिवस टागून ठेवतात या वृक्षाची पाने हातात घेऊन त्याचा चोळामोळा करीत खोटा आळ आलेला मनुष्य शपथ घेतो की, 'मी जर दोषी असेन तर ही वृक्षदेवता या पानांप्रमाणे माझ्या जीविताचा चोळामोळा करो' सर्व पुराणातून या वृक्षाला अतिशय महत्त्व दिलेले आहे चातुर्मासमाहात्म्य, कार्तिक व श्रावणमाहात्म्य, व्रतराज, व्रतकौमुदी इत्यादी ग्रंथांतून याचे सविस्तर वर्णन मिळते

श्रीमद् भागवतामध्ये उर्वशी पुरूरवा आख्यानात, राजाला सोडून जाताना आपली भेट म्हणून उर्वशीने राजाला एक थाळी दिली आणि स्मरण होऊन मनस्ताप वाटला तर तिचे दर्शन घेतल्यावर शांत होईल असे सांगितले. राजाने ती थाळी वनातच ठेवून दिली आणि राजवाड्यात परत आला. 'स्थालीं न्यस्य वने गत्वा ॥' काही दिवसांनी पुन्हा वनात आल्यावर, स्थालीच्या ठिकाणी त्याला अश्वत्थ व शमी वृक्ष एकमेकांत गुरफटलेले आढळून आले.

स्थालीस्थानं गतोऽश्वत्थं शमीगर्भं विलक्ष्य स ।

पुढे या जोड वृक्षापासून राजाने अरणी तयार करून, अग्निमंथन केल्यावर जो अग्नि निघाला, त्याला 'पुरूरवस अग्नि' असे पारिभाषिक नाव प्राप्त झाले. (श्रीमत् भागवत, ९।१४।४४).

पद्मपुराणात या वृक्षाच्या माहात्म्याबद्दल खालीलप्रमाणे एक कथा आली आहे. धनंजय नावाचा एक विष्णुभक्त ब्राह्मण होता. त्याची सत्त्वपरीक्षा पाहण्याच्या हेतूने भगवान् श्रीविष्णूंनी त्याला अतिशय दरिद्री केले. एका कवीने दारिद्र्याचे वर्णन करताना म्हटलेच आहे की,

निर्द्रव्या पुरुषा न बंधुजनही संबोधिले मानिती ।
त्यांचे जे प्रिय मित्र तेही फिरती आपत्तिही भोगिती ॥

याप्रमाणे त्याला दारिद्र्यावस्था प्राप्त होताच त्याच्या आप्तेष्टांनी त्याचा त्याग केला. भार्यामित्रनही त्याला विचारीनासे झाले. थंडीच्या दिवसात तो लाकडाची शेकोटी पेटवून थंडीपासून आपले संरक्षण करी. कारण बिचाऱ्याच्या अंगावर पांघरायला एक साधे चिरगुटही नव्हते. शेकोटीसाठी लाकडे जमवीत असता त्याने एकदा नकळत अश्वत्थाची फांदी तोडली. त्याचक्षणी भगवान विष्णु ब्राह्मणरूपाने त्या स्थळी प्रकट झाले आणि त्याला म्हणाले, 'तू पिंपळावर कुऱ्हाड मारलीस त्यामुळे माझ्या सर्वांगावर जखमा झाल्या आहेत.' त्या विष्णुरूपी ब्राह्मणाच्या त्या जखमा पाहून धनंजयाला अतिशय दुःख झाले आणि या कृत्याचे प्रायश्चित्त म्हणून स्वतःचे मस्तक कुऱ्हाडीने तोडण्यास तो सिद्ध झाला. ब्रह्महत्येचे पातक न लागावे म्हणून विष्णु आपल्या मूळ स्वरूपात प्रकट होऊन त्याला म्हणाले, 'तू नित्य अश्वत्थाची पूजा करीत जा, म्हणजे तू पावन होशील. त्यातच तुझे हित आहे.' त्या दिवसापासून तो नित्यनेमाने अश्वत्थपूजा करू लागला. त्यामुळे कुबेराने त्याच्यावर कृपादृष्टि केल्याने लक्ष्मी त्याची दासी बनली. ( क्रियायोग, अध्याय सातवा

अश्वत्थः सर्ववृक्षाणां राजा ब्रह्मवर्णकः ।
अश्वत्थः पूजितो येन सर्वं संपूजितं भवेत् ॥

अश्वत्थ हा सर्व वृक्षांचा राजा असून तो ब्राह्मणवर्णाचा आहे. ज्याने अश्वत्थाची पूजा केली, त्याने सर्व काही पूजन केले असे मानले जाते. हा वृक्ष प्रथम सृष्टिकर्त्या प्रजापतीचे प्रतीक होता, पण पुढे तो विष्णुरूप मानला गेला. विवाहानंतर कन्येला वैधव्य प्राप्त होऊ नये म्हणून प्रथम तिचा अश्वत्थाबरोबर विवाह करावा असे संस्कारप्रकाश ग्रंथात सांगितले आहे. या वेळी विष्णुप्रतिमेची पूजा अश्वत्थमुळाजवळ करून प्रतिमा ब्राह्मणाला दान करावी. संततिप्राप्तीसाठी आर्य स्त्रिया या वृक्षाला प्रदक्षिणा घालण्याचा नेम करून त्याला प्रसन्न करून घेतात. पूजन करण्यापूर्वी स्त्रिया अश्वत्थाला सूत गुंडाळतात आणि ही रूढि पुरातन आहे.

सुप्रसिद्ध लेखिका श्रीमती दुर्गा भागवत यांनी या प्रथेचे मूळ शोधताना पुढीलप्रमाणे एक कथा दिली आहे. खोडियाल व पिपळाज या नावाच्या दोन देवकन्या होत्या. तहान-भूक कशी असते हे पाहण्यास त्या भूतलावर आल्या व विंध्य पर्वतावर वड आणि पिपळ यांच्या स्वरूपात स्थिर झाल्या. शेतीच्या कामास प्रारंभ करतेवेळी तेथील देवकन्यानी त्यांना नरमांस व पाणी यांचा नैवेद्य समर्पण केला. तो खाऊनच की काय पुढे पुढे त्याना तहान व भूक लागू लागली. नित्य खावयास मिळावे म्हणून त्या मानवांच्या अंकित झाल्या. खावयास मिळत गेल्याने त्यांची भूकही वाढली. कालांतराने त्यांना खावयास नरमांसच मिळेना. यास्तव माणसांनी त्यांना ऊस व गहू खावयास दिले. खोडियाल त्या खाण्याने तृप्त झाली, परंतु पिंपळाज मात्र नरबळीसाठी अडून बसली. आपल्याला नरमांस खावयास मिळावे म्हणून तिने निरनिराळे रोग उत्पन्न केले आणि त्यायोगे नरमांस मिळविले. आपल्या बहिणीचे हे क्रूर कृत्य खोडियालला अजिबात आवडले नाही. तिला मानवजातीची दया आली. एके रात्री तिने पिंपळाजला दोरीने बांधून ठेवून तिच्या क्रूरतेला बांध घालण्याचा प्रयत्न केला. पिपळाज गयावया करू लागली. खोडियाल तिला म्हणाली की, ‘तू जेवढे नरबळी आजपर्यंत घेतले आहेस तेवढे परत करशील तर तुला सोडते. तू तसे केलेस तरच मानव तुझी परत पूजा करू लागतील.’ पिंपळाजने हे तिचे म्हणणे कबूल केले. तेव्हापासून पिंपळदेवता आपण घेतलेले बळी स्त्रियांनी तिची आराधना केल्यास पुनरूपाने परत देते. ज्याप्रमाणे खोडियालने तिला बांधून ठेवले त्याप्रमाणे पूजनापूर्वी स्त्रियांनीही त्या वृक्षदेवतेला बांधून ठेवण्याची रूढि प्रचारात ठेवली आहे.

अश्वत्थाला ब्राह्मण मानला असल्याने त्याचे उपनयनही करावे लागते. त्याचा विवाह तुळशीबरोबर लावतात संस्कार विधीमध्ये याच वृक्षाच्या समिधा वापरतात. तसेच ग्रहयज्ञात गुरुग्रहासाठी अश्वत्थाच्या समिधा लागतात. शनिवारी सूर्योदयापूर्वी त्याचे पूजन केल्यास संतती आणि संपत्ती या दोहोंचा लाभ होतो. श्रावण मासातील शनिवारी ही पूजा विशेष फलप्रद सांगितली आहे.

या वृक्षाचे साम्य सृष्टिरूपाशी दाखविले जाते. 'ऊर्ध्वमूलमध शाखमश्वत्थ' हे गीतेतील वचन याच वृक्षाला उद्देशून लिहिलेले आहे याच्या नावाची व्युत्पत्ति अशी —अ + श्व + त्थ म्हणजे जो आज आहे तर उद्या नाही असा वृक्ष सतत परिवर्तनशीलता हा या वृक्षाचा गुणधर्म आहे. त्यामुळे सृष्टि सदैव ताजी टवटवीत असते, असे मानतात. याचे छेदन शक्य नाही कारण तो नित्य आहे, वेद्य आहे आणि याच्या ज्ञानानेच मोक्ष मिळतो ऋग्वेदात याला वरुणाच्या लोकातील वृक्ष म्हटला असून त्याच्या किरणाचे मूळ वर आहे व किरण खाली आहेत असे सांगितले आहे (१–२४–७) 'द्वासुपर्णाश्रुति' ज्या पिप्पल वृक्षाचा उल्लेख करते, ते याच वृक्षाचे फल होय (१–१६४–२२) वेदातूनच हे रूपक पुढे उपनिषदामध्ये उतरलेले आहे ज्याचे मूळ वर आहे आणि शाखा खाली आहेत असा हा अश्वत्थ सनातन नित्य आहे तेच शुभ्र, तेच ब्रह्म व तेच अमृत असे म्हटले आहे (कठो० ६–१)

उपनिषदातून हे रूपक पुढे गीतेमध्ये आले (१५–१–४) साराश, परमेश्वराच्या मायेने उत्पन्न झालेले हे विश्व म्हणजेच एक भला मोठा अश्वत्थ वृक्ष होय सांख्यशास्त्र या दृश्य सृष्टीला–म्हणजेच अश्वत्थाला–'प्रकृतीचा विस्तार' असे म्हणते व वेदान्ती त्यालाच 'मायेचा पसारा' असे म्हणतात. अनुगीतेमध्ये यालाच ब्रह्मवृक्ष व ब्रह्मवन असे म्हटलेले आहे एका सूक्ष्म बीजापासून ज्याप्रमाणे गगनचुंबी वृक्ष बनतो तद्वत् एका अव्ययापासून हा सृष्टीरूप वृक्ष फोफावलेला आहे, अशी कल्पना करतात प्राचीन अन्य धर्मातही याला 'विश्ववृक्ष' हीच संज्ञा दिलेली आहे या वृक्षामध्ये अनेक अलौकिक औषधी गुणधर्म असल्याने आर्य लोक याला पवित्र मानतात याचे लाकूड सरपण म्हणून जाळण्यास निषिद्ध मानलेले आहे मार्गावर याची लागवड मुद्दाम करतात हेतु हा की, पांथस्थाला याची शीतल, निरोगी व श्रमपरिहारक छाया मिळावी या वृक्षावर लागणारे जंतु चांगले पोसतात म्हणून त्यासाठीही याचा उपयोग करतात.

"बोधिद्रु पिप्पलोऽश्वत्थश्चलपत्रो गजाशन ।"

याप्रमाणे याची नावे आहेत. याची पाने हत्ती आवडीने खातात

याचे रासायनिक गुणधर्म खालीलप्रमाणे आहेत—

" पिप्पली दुर्जरः शीत. पित्तश्लेष्मव्रणास्रजित्।
गुरुस्तुवरको रूक्षो वर्ण्यो योनिविशोधनः ॥ "

( भावप्रकाश—लेखक भावमिश्र. )

सामान्यतः पिंपळाचा रस कषाय आहे. त्यामुळे त्याचा विपाक कटु होतो. हा घेतल्याने मलमूत्र निःसारणाची क्रिया नीटपणे होत नाही. यातील रूक्ष गुणामुळे स्तंभन अधिक होते. शीतवीर्यामुळे स्तंभन व रक्तपित्तप्रसादन ही कार्ये होतात. कषाय रसाच्या प्राधान्यामुळे कफपित्तशमन होते. पित्ताच्या दाहाबरोबर क्लेद हे लक्षण असल्यास पिंपळाच्या रसाचा उपयोग होतो. रक्तस्तंभनासाठी याच्या काढ्याचा अंतर्बाह्य उपयोग करतात. पूयप्रमेह व उपदंश या विकारात याच्या सालीचा काढा साखर घालून देतात. याच काढ्याने उपदंशाचे व्रण धुतात आणि उत्तरबस्ती देतात. योनीमार्गामध्ये पांढरा अथवा तांबडा स्राव थांबण्यासाठी याची साल १ तोळा दूध घालून व साखर टाकून सकाळ-संध्याकाळ देतात. याने दुर्गंधीचा नाश होतो. योनीमुखातील व्रण काढ्याच्या प्रक्षालनाने लवकर बरे होतात. योनीमार्गाचे शैथिल्य याने कमी होऊन तिचे प्राकृतिक संकोचन चालू राहते. गर्भधारणेचा काळ असूनही गर्भ राहिला तरी स्राव होण्याची खोड कित्येक स्त्रियांना असते. अशा वेळी पिंपळाची कोवळी पाने वाटून १ तोळा कल्काबरोबर जिरे व साखर घालून दुधाबरोबर रोज एक महिनाभर खावयास द्यावीत. यानंतर होणाऱ्या ऋतुकाळात गर्भधारणा होते. योनिशोधनार्थ पिंपळाच्या पानाचा उपयोग करतात. त्यामुळे भूमि शुद्ध होते. पिंपळाची फळे, कोवळी पाने दुधाबरोबर सेवन केल्याने आरोग्य कायम राहते. पिंपळ हे एक साधे व उत्कृष्ट रसायन आहे. बुद्धीची वाढ व वाणीच्या शुद्धीसाठी लहान मुलांना पिंपळाची पाने सकाळी उठल्याबरोबर चाटण्यास द्यावीत. यामुळे बोलण्यातील तोतरेपणा नाश पावतो व वाणी शुद्ध होते. तृतीयक ज्वरामध्ये याची साल ऊन पाण्यात उगाळून त्यात थोडी मिरपूड घालून थंडी वाजून येण्यापूर्वी तीन तास आधी द्यावी. सालीची राख वस्त्रगाळ करून तुपाखह मलम करून लावल्यास व्रणारोपण होते. दुष्ट व्रणाच्या शुद्धीसाठी याच्या काढ्याने व्रणधावन करावे. कुष्ठरोगात व प्रमेहात सालीचा काढा मध घालून देतात. सूजसंधीच्या वेळी याच्या सालीचा दाट लेप घालावा. यामुळे सूज उतरते व गाठ प्रायः आतच जिरते. अफूचा कैफ चढल्यास याच्या सालीचा काढा पिण्यास द्यावा, अफू तावडतोब उतरते.

अश्वत्थाच्या अंगी जे वरीलप्रमाणे अनेक रासायनिक गुणधर्म आहेत,

त्यामुळेही तो एक पूजनीय वृक्ष मानला गेल्याची शक्यता नाकारता येत नाही अलक्ष्मी देवीची कथा वाचताना आपण पाहिलेच आहे की, तिला यजमानाने घरातून घालवून दिल्यानंतर ती अश्वत्थाच्या मूळाजवळ जाऊन बसली आणि रडू लागली त्या वेळी तिची लहान बहीण लक्ष्मी पतीसह तिला याच ठिकाणी भेटली. भगवानांनी तिला सांगितले की, तू याच ठिकाणी वस्ती करून रहावे म्हणून शनिवारी अश्वत्थाची पूजा करणे चांगले, कारण त्या दिवशी लक्ष्मीचा निवास तेथे असतो पण इतर दिवशी वाईट कारण त्या दिवशी या ठिकाणी अलक्ष्मीचा निवास असतो.

वंगदेशीय स्त्रिया वैशाख महिन्यात अश्वत्थाचे व्रत आचरतात. या व्रताचे पालन करून महिनाभर अश्वत्थाची पूजा केल्याने सुख व शांतीचा लाभ होतो. याची कथा अशी की, शामर नावाच्या एका ब्राह्मण पण्डिताची मुलगी एकदा नदीवर स्नानाला गेली असता देवतांच्या संभाषणामधून तिला हे व्रत समजले या महिन्यात प्रात काळी विधीपूर्वक स्नान करून अश्वत्थाच्या मुळाना पाणी घालून त्याच्या सभोवतालचा भागही पाण्याने शिंपून नतर त्याला प्रदक्षिणा घालाव्यात असे केल्याने देव पितर मनुष्याची तृप्ति शमते आणि कुळाचा उद्धार होतो (निर्णय सिंधु) हेच व्रत कोणी कोणी चैत्रापासून चार महिन्यांपर्यंत करतात

सिञ्चाम्यश्वत्थ ते मूलं मम सन्ततिवृद्धये।
अश्वत्थरूपो भगवान् प्रीयतां मे जनार्दन ॥

'हे अश्वत्था, माझ्या संततिवृद्धीस्तव मी तुझे मूळ शिंपीत आहे या माझ्या करण्याने अश्वत्थरूपी भगवान नारायण माझ्यावर प्रसन्न होवो ' शत्रूची स्वारी, कुष्ठादि रोग व साथीचे रोग यांच्या निवारणासाठी विधिपूर्वक अश्वत्थपूजा करतात (व्रतराज) काही ठिकाणी अश्वत्थाचे मूळ गेरूने रंगवितात आणि स्वस्ति वाचन व संकल्प झाल्यावर प्रथम विष्णूचा व नतर अश्वत्थाची पूजा करतात पिंपळाला प्रदक्षिणा घालताना विष्णुसहस्रनामवाचन अथवा इतर प्रिय देवतेचे चिंतन व तिचा नामोच्चार करीत करीत घालतात प्रदक्षिणेची संख्या व्रतहेतूला धरून एक ते बारा लक्षापर्यंत असते या प्रदक्षिणा नित्य एका ठराविक संख्येने घालून पुऱ्या करावयाच्या असतात व्रतकाळात यम नियम व कडक ब्रह्मचर्य पाळावे लागते प्रदक्षिणांची संख्या पुरी झाल्यावर व्रताचे उद्यापन केले जाते

ऋत्विक्वरण, घृतपायस व चरू यांचे हवन, तर्पण, तीळराशीवर सुवर्णाची अश्वत्थप्रतिमा स्थापून तिचे पूजन व दान, गोप्रदान, दक्षिणा आणि ब्राह्मण सुवासिनी भोजन इत्यादि कार्यक्रम व्रतउद्यापनाच्या वेळी करावा लागतो याला

दुसरा एक पर्याय म्हणजे कार्तिक महिन्यात अश्वत्थाखाली राधा दामोदराची पूजा घालून अश्वत्थाला लक्ष प्रदक्षिणा घालावयाच्या. दररोज रात्री जागरण, कथाकीर्तन करून व्रताच्या शेवटी वरीलप्रमाणे उद्यापन करावयाचे. असे केल्याने पुत्रप्राप्ति, गतवैभवाची पुन प्राप्ति, उत्पातशांति, रोगनाश व सौख्यलाभ होतो
(व्रतराज)

अश्वत्थोद्यापन या नावाचा एक धार्मिक विधि आहे. अश्वत्थाचे झाड लावून आठ, अकरा किंवा बारा वर्षे झाल्यावर त्याच्याभोवती पार बांधून त्याचे विधीपूर्वक उद्यापन करतात अश्वत्थाला लागूनच पाच किंवा नऊ कुंडे घातलेला मंडप घालतात सर्वतोभद्र व वास्तुमंडळ अशी दोन मंडळे निर्माण करून त्यावर कर्मांग देवताना आवाहन करून त्याचे पूजन करतात. अश्वत्थ, नारायण, वासुदेव, रुक्मिणी, सत्यभामा, सरस्वती व गणपति या देवतांच्या सुवर्णाच्या प्रतिमा करून मंत्रपूर्वक त्याची स्थापना करतात. अश्वत्थाभोवती अष्ट दिशांना कलश मांडून त्यामध्ये पाणी घालून वरुणाला आवाहन करतात मग निरनिराळ्या कुंडात अग्निस्थापन केल्यानतर प्रधानहोम करतात या वेळी चरुतील आज्य व पलाश समिधा वापरून प्रत्येकी १०८ किंवा २८ आहुति देतात. नतर अश्वत्थाच्या वृक्षाजवळ एक खड्डा खणून त्यामध्ये चार किंवा पाच हात लांबीचा एक यूप पुरून त्यावर ब्रह्मा-विष्णु-महेश याचे आवाहन करून पूजन करतात यालाच युपाधिवास असे म्हणतात. त्या रात्री पुराण-श्रवण करून दुसऱ्या दिवशी खालीलप्रमाणे सस्कारविधि करतात.

पुसवनापासून उपनयनापर्यंत सर्व संस्कार करून, अश्वत्थाचे अभिमंत्रण करून ध्रुवसूक्ताचे पठण करावयाचे यज्ञोपवित, कृष्णाजिन, मेखला, दंड या वस्तु पिंपळाला द्यावयाच्या मग समावर्तन करून त्याच्या विवाहाची तयारी झाल्यावर, तुळस व अश्वत्थ याचा विधीपूर्वक विवाह लावावयाचा. क्षेत्रपाळाला बलीदान अर्पण करून होमाची पूर्णाहुति होते. यजमान व त्याचा परिवार यावर अभिषेक होतो. जेव्हा नऊ अथवा पाच कुंडे घालणे शक्य नसेल, तेव्हा एका कुंडावरही कार्यभाग होतो. या व्रताने श्रीकृष्ण सतुष्ट होऊन मनोवाञ्छित सतति आपल्याला देतात
(ऋग्वेदीय ब्रह्मकर्मसमुच्चय)

अव्यय, अक्षर व क्षर या तीन तत्त्वाची समाप्ति म्हणजेच विश्व होय. तेव्हा ही विश्वविद्या अथवा गूढ सृष्टिरहस्य याचे ज्ञान होणे म्हणजेच अश्वत्थ विद्या होय 'अश्ववत् तिष्ठति इति अश्वत्थ.।' म्हणजे अश्वाप्रमाणे तीन पायांवर स्थिर व चौथा पाय उचलून उभा असतो तो अश्वत्थ, अशी याची फोड आहे. हे प्रजापतीचे पूर्ण स्वरूप होय. त्याचा विश्वरूप पाय प्रत्येक क्षणी परिवर्तनशील

असतो. ' न श्व इति अश्व ' म्हणजे जे आज आहे परंतु उद्या नाही ते. पण आत्मा याच्या विरुद्ध आहे. तो आजही आहे आणि उद्याही आहे. जळते कोलीत फिरविल्याने जसे चक्राकार वर्तुळ दिसते, तसे हे विश्व जलातचक्र आहे. प्रत्येक क्षणी त्याचा समोरचा बिन्दु सरकून त्याच्या जागी दुसरा येत असतो. सारे बिन्दु सतत बदलत असतात जो बदलत नाही तो नामरूपातीत असून जो बदलतो तो नामरूपात्मक होय. या सर्वांचे सम्यक ज्ञान होणे म्हणजेच अश्वत्थविद्या होय (डॉक्टर वासुदेवशरण अगरवाल.)

भारतीय जनता अश्वत्थाला पूजनीय का मानते हे समजण्यास वरील अल्पसे विवेचन पुरे व्हावे.

२. आंबा

चूतमग्र्यं वसंतस्य माकन्दकुसमं तव ।
सचन्दनं पिबाम्यद्य सर्वकामार्थसिद्धये ॥ (धर्मसूत्रे—काणे)

' हे आम्रवृक्षा, वसन्ताचे अग्रपुष्प असलेला तुझा सुवासिक मोहोर मी चन्दनमिश्रित करून सर्व कामनांच्या प्राप्तीस्तव, आज वर्षप्रतिपदेच्या दिवशी प्राशन करीत आहे. '

निर्णयसिन्धु ग्रंथामध्ये मात्र हा मोहोरप्राशनविधि फाल्गुन पौर्णिमेच्या दिवशी सांगितलेला आहे कामदेवाच्या पाच मदनबाणांपैकी आम्रमंजिरी हा एक बाण आहे.

आंबा हे फळ वेदकाळापासूनच अस्तित्वात असावे. निदान उपनिषदकाळापासून तर ते आहेच आहे ' आम्र वा पिप्पल वोदुंबरे ' असा बृहदारण्योपनिषदामध्ये उल्लेख आहे (अध्याय ३-४) मारुतीराय सीतेच्या शोधार्थ लंकेमध्ये गेले असता त्यांना ती आम्रवनात आढळली. ' चुतो रामो तथा भग्न. पचवर्ग पलोपग. । ' महाभारतातील द्रोणपर्वामध्ये आंब्याचा हा उल्लेख आहे " मत्स्योदकेन शीतेन आम्राणा सेक इष्यते । ' अग्निपुराणातील या सूत्राचा अर्थ असा की, आम्रवृक्षांना थंड असे मासळीचे पाणी द्यावे. अमरसिंहाच्या अमरकोषामध्ये या आंब्याला " चूत, रसाल, सहकार, आम्र " इत्यादि अनेक नावे आढळतात महाकवि कालीदासानेही आपल्या कुमारसंभव, शाकुंतल इत्यादि अनेक काव्य नाटकांतून आम्रमंजिरीचा उल्लेख केलेला आहे. अल्फॉंस कॅंडोल यांच्या मते हे फळ भारतात निदान चार सहस्र वर्षांपासून तरी अस्तित्वात आहे, यासाठीच प्राचीन काळापासून त्याला राष्ट्रीयत्व प्राप्त झाले असून ते आजही राष्ट्रीय फळ म्हणून मानले जाते

मुसलमान अमदानीतही या फळाचे राष्ट्रीयत्व टिकून होते. अनेक राजांनी त्याच्या वाढीसाठी प्रयत्न केलेले दिसून येतात. यापूर्वीच्या बौद्धकाळातही त्याला मान मिळत होता. कारण आम्रपालिकेने भगवान बुद्धाला विश्रांतीसाठी आणि तपश्चर्येसाठी आम्रवन दिले असा उल्लेख मिळतो. तुर्की कवि अमीर खुसरो (सन १३१५) म्हणतो,

आम्रनंदनवनींच विभुषणा । श्रेष्ठ हिंद फळातील हे फळ ।
मधुर अन्य फळे जरी पक्व । मधुर आम्र जरी न पक्व ।।

अकबर बादशहाने (सन १५५६–१६०५) दरभंग्याजवळ एक लाख आंब्यांची झाडे लावलेली होती. यामुळे त्या बागेचे नावच 'लाखबाग' असे पडले होते. त्यानंतर तीनशे वर्षांनी जेव्हा इंग्रज भारतात आले आणि येथील राज्यकारभार पाहू लागले, तेव्हा त्यांच्यापैकी काही अधिकाऱ्यांना लाखबागेतील काही झाडे अत्युत्तम स्थितीत आढळली. पंजाब प्रांतातील मकुर येथील आम्रफळे अफगाण बादशहा काबूल येथे नेत असे. माझगाव–मुंबई येथील आंबे शहाजहान बादशहा दिल्ली येथे नेत असे. आजही रशिया, इंग्लंड, अमेरिका येथील बाजारात भारतातील उत्कृष्ट आम्रफळे जातात आणि अशा प्रकारे परकीयांची सवय ठेवणे चांगले पडते. या आम्रफळाला कोणी 'फळाचा राजा' म्हणतो. हॅमिल्टन सारख्या परदेशीयांनी या आंब्याचे "गोव्याचा आंबा जगातील इतर कोणत्याही इतर फळापेक्षा अधिक रुचकर व हितवर्धक आहे" अशा शब्दात वर्णन केले आहे. अमेरिकन फलसंवर्धनशास्त्रज्ञ कडल्सन पोपेनो म्हणतो, 'आम्रफलाचा स्निग्ध व घमघम रुचि, त्याचा मोहक रंग आणि सालीवरील अनेक सुंदर छटा, इत्यादि गुणामुळे या फळाला अमेरिकन बाजारपेठेत मानाचे स्थान आहे.' सर जोसफ हूकर यांच्या मते आंबा हे भारतीय आद्य फळ आहे. अल्फॉन्स कँडॉल व ह. पु. परांजपे यांचेही मत तेच आहे.

आंबा हे फळ जगप्रसिद्ध कसे आहे याची कल्पना निरनिराळ्या भाषांतील त्याला मिळालेल्या नावावरून येईल. ती नावे येणेप्रमाणे—

(१) संस्कृतभाषा—आम्र, चूत, रसाल, सहकार, अतिसौरभ, मधुदूत, माकंद, पिकवल्लभ
(२) मराठी भाषा—आंबा
(३) हिंदी भाषा—आम
(४) गुजराथी भाषा—आंबो
(५) सिंधी भाषा—व्यामु
(६) बंगाली भाषा—आम

(७) उडिया भाषा–आम.
(८) आसामी भाषा–आम, धारियम्.
(९) मागधी भाषा–त्सरत्मांग.
(१०) कानडी भाषा–मावु, मगवेनहन्नु.
(११) तेलगू भाषा–मामाडिचिटट.
(१२) मल्याळी भाषा–माव.
(१३) तामीळ भाषा–माकाय, मोगाय, मम्मारम.
(१४) सिहली भाषा–आंब.
(१५) ब्राह्मी भाषा–म्हट्य.
(१६) लॅटीन भाषा–मॅंगिफेरा, इंडिका.
(१७) इंग्रजी भाषा–मॅंगो.
(१८) फारशी भाषा–अंबा, आंब.
(१९) यवद्वीपी भाषा–पलम.
(२०) अरबी भाषा–माद्यशाक.

मॅंगाय या तामीळ शब्दापासून पोर्तुगीज प्रवासी वास्को-द-गामा याने मॅंगा हा शब्द प्रथम युरोपमध्ये नेला आणि त्यावरून आंब्याला 'मॅंगो' हे नाव तिकडे रूढ झाले, असे संशोधकांचे मत आहे.

आंब्याची वर्गवारी करता येण्यासारखी नाही, यासाठी त्याच्या अनेक जाती निर्माण झाल्या आहेत. एक बीज लावून त्याचीच फळे येतील हे सांगता येत नाही. कारण आम्रफळाच्या स्त्रीकेसराला कोणत्याही जातीच्या आंब्याचा पुंकेसर चालतो आणि फलधारणा होते. त्याच जातीचे पुंकेसर पाहिजेत असे नाही. एका प्रकारच्या फांदीवर दुसऱ्या प्रकारची कलमे बांधता येतात, आणि त्यापासून दुसरी एखादी नवीनच जात तयार होते. यामुळे या फळाच्या जाती खूपच आहेत. प्रांतपरत्वे ही नावे पहा.

पंजाब—फझली, गोपाळभोग, कृष्णावर्ती, वृंदावनी, महाजनपसंत.

मद्रास—पिटर, गोवा, अमीरकोला, दिलपसंत, नलिम, रसपुरी.

गोवा–काळा हापूस, गोल, हापूस, मानुराद, फर्नांदिन, मलगोवा, मोलस,

मुंबई— पायरी, कावसजी पटेल, बनछोड, पायमोथा, बोरशा, रस, वाटली, साखऱ्या, पावऱ्या, काळा इशाड, खुंट.

आंब्याच्या लागवडीस भारतामधील वातावरण जरी सर्वत्र योग्य असले तरी, रत्नागिरी जिल्ह्यातील खाऱ्या हवेचे वातावरण झाडांना जास्त मानवते.

असे जरी असेल, तरी एका हवामानातील आंब्याची जात दुसऱ्या भागात फलप्रद होत नाही. म्हणजे रत्नागिरीकडील उत्तम हापूस, नागपूर प्रांतात तयार होत नाही. तेव्हा त्या हवामानात तयार होणारी झाडेच तेथे लावली पाहिजेत कारण नैसर्गिक फेरफार करून घेण्याची शक्ति त्यांना परमेश्वराने दिलेली नाही. अमृतसर, अलीगड, ग्वाल्हेर, भोपाळ, बंगलोर, सेलम या ठिकाणी उत्तम आंब्याची झाडे आहेत. महाराष्ट्रातील लोकांना रत्नागिरी हापूस अथवा बलसाड हापूस अतिशय प्रिय आहे, परंतु उत्तर भारतीयाला त्याची गोडी कमी. तो आपला सर्वोत्कृष्ट आंबा म्हणून तेथे वाढणारा 'लंगडा' च पसंत करतो. अमेरिकेमध्ये फ्लोरिडा, ब्राझील, क्यूबा, पोर्टोरिका, कॅनरी, मदिरा, फिलिपाईन, ऑस्ट्रेलिया, सिलोन येथील उष्ण हवामानाच्या भागात आंब्याचे वृक्ष वाढतात. हवामानाप्रमाणे लावणीत व खतपाण्यात जातीपरत्वे थोडाफार फरक करावा लागतो. प्रत्येक वर्षी झाडास खतपाणी केव्हा द्यावे व छाटणी केव्हा करावी याला साधारणपणे काही नियम आहेत आणि त्याप्रमाणे झाडांचे संगोपन केल्यास उत्कृष्ट फळे येतात. आम्रमंजिरी उगवल्यावर तीवर 'तुडतुडे' नावाचे रोगजंतु उत्पन्न होतात आणि ते मंजिरीचे रसशोषण करतात. यामुळे उत्तमपैकी आलेला मोहर गळून जातो, काळा पडतो आणि प्रसंगी जळूनही जातो. यावर औषधी रसायनाचा फवारा मारणे हाच एकमेव अत्युत्तम उपाय आहे. काही मंजिरीमध्ये स्त्रीकेसराचे प्रमाण फार कमी असते आणि त्यामुळे फळे फार कमी येतात. जसे कावसजीमध्ये हे प्रमाण ८६ ते ९६ पुंकेसरयुक्त असते तर पायरी-हापूसमध्ये ४५ ते ७९ पुंकेसरयुक्त असते. म्हणून त्यांना फळे फार कमी येतात.

धार्मिक संस्कारांमध्ये आंबा हा एक पवित्र वृक्ष मानलेला आहे. यज्ञ-समारंभ, विवाह, उपनयन अगर मंगल प्रसंगी आंब्याच्या पानांची तोरणे तयार करून ती प्रवेश–दाराला लावली जातात. वरुणाच्या पूजेच्या वेळी त्याला आवाहन करताना कलशाच्या मुखावर आंब्याचा टाळा ठेवून त्यावर श्रीफल किंवा इतर वस्तु ठेवतात. यजमानावर अभिषेक करावयाचा झाल्यास तोही आंब्याच्या पानानेच करतात.

रक्तपित्तकरं बालं आपूर्णं पित्तवर्धनम् ।
पक्वं आम्रं जयेन् वायुं मांसं शुक्रबलप्रदम् ॥

(चरक संहिता, सूत्र २७–१३९)

आम्रमंजिरीचा उपयोग अतिसार, बहुमूत्र, रक्तदृष्टि या रोगांत करतात. हा गुणाने थंड असून कफपित्तनाशक आहे. हिरवी कैरी तुरट आंबट असून रुचिकारक आहे. तिच्या सेवनाने वातपित्ताचा प्रकोप होतो. पक्की कैरी अती

आंबट असून ती अतीप्रमाणात खाण्यात आल्यास कफपित्तनात वाढविते आणि त्यामुळे रक्तदोषी होते. आंबोशी म्हणजे सुकविलेली कैरी रसाने आंबट-तुरट-गोड असून मलभेद करणारी आहे आणि वातकफनाशक आहे. पक आंबा रसाने गोड, पचण्यास जड, स्निग्ध, कामोद्दीपक, बल व सुखसंवेदना वाढविणारा असा असून हृदयाला हितकारक आणि वातहारक आहे. आंब्याचे फळ जर झाडावर पिकलेले असेल, तर ते रसाने आंबट गोड आणि पचावयास अधिक जड असते. असा आंबा वातनाशक आहे. अढीतून निघालेला पक आंबा पित्तनाशक असून वीर्यवर्धक, पचण्यास हलका व सारक आहे. आंब्याचा रस पचावयास जड, सारक, वातनाशक, पुष्टीकारक आणि कफवर्धक आहे आंब्याचा मोरवळा पचावयास जड, परंतु पुष्टीदायक आहे. आंबापोळी ही रुचकर, सारक व पचावयास हलकी असते. ती पित्तनाशक आहे. आंब्याची कोय तुरट व आंबट-गोड असून तिच्या सेवनाने वांति, अतिसार व छातीतील जळजळ थांबते कोवळ्या पानांचा रस तुरट असून अतिसार यांच्या सेवनाने कमी होतो. आंब्याची साल चवीने तुरट असून अतिसार, आमांश, स्त्रियांचे रक्तप्रदर इत्यादि विकारावर ती अतिशय उपयोगी आहे.

आंब्याचे हे असे अनेकविध उपयोग आहेत.

## ( २ ) उंबर

या वृक्षाखाली सद्‌गुरू दत्तात्रयाचा निवास असतो असे म्हटले आहे. हा एक यज्ञीयवृक्ष मानला असल्याने त्याच्या समिधा फक्त होमहवनालाच वापरतात. तो यज्ञीय वृक्ष मानला गेला असल्यामुळे या वृक्षावर कोणीही हत्यार चालवीत नाहीत आणि नेहमीच्या जळणासाठी त्याच्या लाकडाचा उपयोग करीत नाहीत. अनेक देशात, अनेक भागात हा वृक्ष दृष्टोत्पत्तीस येतो. जसे काश्मीर, आसाम, बंगाल, ब्रह्मदेश, दक्षिण व पश्चिम भारत, सिलोन, इत्यादि ठिकाणीही या वृक्षाचे अस्तित्व आढळून येते. यज्ञीय उपकरणे याच वृक्षाची बनवितात.

हा वृक्ष खूप उंच वाढतो आणि तो अतिशय दीर्घायु आहे. इतर झाडाप्रमाणे याला प्रथम फूल आणि नंतर फळ असा प्रकार नाही. एकदम फळच आपल्याला झाडावर दिसते. या वृक्षाला अंजिरासारखी फळे येतात. ती कच्ची अथवा पक्की कशीही असली तरी खावयास गोड लागतात. या वृक्षाची पाने हत्ती आणि गुरेवासरे मोठ्या आवडीने खातात. याचे लाकूड टिकाऊ नसल्याने, खिडक्या, दरवाजे यासाठी उपयोगात आणीत नाहीत. बैलगाड्यांच्या दांडक्यासाठी वगैरे या वृक्षाच्या लाकडाचा उपयोग करतात. श्रद्धावान लोक असे मानतात की, ज्या ठिकाणी उंबराचे झाड असेल त्याच्या खोडाजवळ पाण्याचा झरा सापडतो.

उंबराचे फळ प्रथम हिरव्या रंगाचे असून नंतर पक्व झाल्यावर ते लालसर रंगाचे होते. ही फळे गोड असली, तरी त्याच्या आतमध्ये जंतु सापडतात, म्हणून याला जंतुफळ असेही म्हणतात.

या वनस्पतीमध्ये खालीलप्रमाणे औषधी गुण आहेत—

**उदुंबरो हिमो रुक्षो गुरु पित्तकफास्रजित् ।**
**मधुरस्तुवरो वर्ण्यो व्रणशोधनरोपण. ॥ ( भा० प्र० )**

कषाय व मधुर असे उंबराचे दोन प्रकारचे रस आहेत. कच्च्या उंबरात व सालीत कषाय रस अधिक व पक्व फळात मधुररस अधिक असतो सालीचा विपाक कटु होतो. तो मूत्रसंग्रहणीय व पाचक आहे याचे वीर्य शीत आहे. याच्या रसाने पित्तशमनाचे कार्य उत्कृष्टपणे होते. तसेच कषायरसामुळे कफनाशनाचेही कार्य होते या वनस्पतीची क्रिया प्रामुख्याने रक्तधातूवर घडते रक्तातील पित्ताची क्षीणता कमी करून त्यात मृदुता व शीतता निर्माण करणे हे याचे महत्त्वाचे कार्य आहे. कषाय रसामुळे रक्तातील क्लेद कमी करून रक्तादिकांचे स्राव बंद होतात रक्ताचे प्रसादन झाल्यावर त्यामुळे त्यावर अवलंबून असणाऱ्या त्वचेचा वर्णही सुधारतो

उंबर हा न्यग्रोध गणातील असल्यामुळे ज्या रोगात वडाचा उपयोग करतात, त्या सर्व ठिकाणी उंबराचा उपयोग करतात कारण या दोघांचे गुणधर्म समान असतात. नाकाडी, गुदाशी आणि घशातून रक्त बाहेर पडणे यात उंबराच्या झाडाच्या सालीचा काढा उपयोगी पडतो. अत्यार्तव, योनिगत रक्तपित्त व विशेषत गर्भधारणेनंतर गर्भपात होण्याच्या अवस्थेत या वनस्पतीचा अधिक उपयोग होतो आणि यास्तवच पक्वफळाचा काढा अथवा रस उपयोगी पडतो. ही पक्व फळे गर्भस्थापकही आहेत त्यामुळे गर्भपाताची भीति टळते. उंबराची साल चार तोळे व चाळीस तोळे पाणी घालून अष्टमांश काढा करून त्यात भिजवलेला पिचू योनीत ठेवावा आणि त्यातच भिजविलेली पट्टी वेणीसारखी ठेवावी म्हणजे गर्भस्राव अथवा गर्भपात होत नाही. लहान मुलाच्या अतिसार या विकारात उंबराच्या चिकाचे ५ ते १० थेंब साखरेबरोबर दिल्यास तात्काळ गुण येतो. ही वनस्पति अत्यंत शीत असल्यामुळे सर्व प्रकारच्या दाह होणाऱ्या रोगात याच्या सालीचा काढा थंड करून साखर घालून घ्यावा. ज्वरामुळे होणारा दाहही याने थांबतो. देवी, गोवर यामुळे होणारा दाह अथवा रक्तपित्तामुळे होणारा दाह याने थांबतो.

उंबराच्या मुळाच्या ठिकाणी बहुधा निर्झर वाहात असतो. तेथून निघणारे पाणी अत्यंत शीत असल्याने सर्व प्रकारच्या पित्तप्रधान व रक्तप्रधान विकारात वापरता येते. मधुमेह या रोगात उंबराची फळे खावयास दिल्याने मूत्रातील साखरेचे प्रमाण कमी होते. याच्या मधुरस सेवनाने मेदवृद्धि होत नाही. उंबराच्या पानावर 'एक प्रकारचे लालसर फोड येतात. त्याचा वापर गोवर, देवी आणि 'तोंड येणे' यावर फार चांगल्यापैकी होतो. शरीराच्या भागावर सूज आली असता त्यावर याच्या सालीचा लेप केल्याने ग्रंथी कमी होतात. गालगुंड आणि अंडवृद्धीच्या वेळी उंबराचा चीक घातल्याने गज उतरते. लहान मुलांच्या टाळूवर उंबराचा चीक घातल्याने टाळूला शीतता येते. मुखपाकात व व्रणात गुळण्यासाठी कषायरस वापरावा. तसेच हा काढा व्रणशोधन व रोपण या क्रियाही करतो. नवीन व्रणोष्ठ जवळ जवळ आणून जोडण्याचे कार्य उंबराचा चीक करतो. वरील संक्षिप्त वर्णनावरून आपल्याला असे दिसून येईल की, याच्या अनेक रासायनिक गुणांमुळे आणि हा वृक्ष सद्गुरु दिगंबराचे निवासस्थान मानला गेल्यामुळे त्याला देवपण प्राप्त झाले आहे.

देवपण येण्याचे पौराणिक कारण असे की, नृसिंह अवताराने, श्रीविष्णूने हिरण्यकश्यपू दैत्याचा नाश केल्यावर दैत्याच्या पोटातील विष विष्णूच्या नखात भिनले व दाह असह्य झाला. या वेळी लक्ष्मीने औदुंबराची फळे आणली व त्यामध्ये नखे खुपसल्यावर विषाची बाधा शांत झाली. तेव्हापासून देवानाही हा वृक्ष प्रिय झाला. औदुंबर व उंबर हे एकच होत.

## ४. तुळस

वृन्दा वृन्दावनी विश्वपूजिता विश्वपावनी ।
पुष्पसारा नन्दिनी च तुलसी कृष्णजीवनी ॥

याप्रमाणे तुळशीची अनेक नावे आहेत. भारतामध्ये तुळशीचे झाड हे फार पवित्र आणि पूजनीय मानलेले आहे. घरोघर याची झाडे, एक खास वृन्दावन उभारून त्यामध्ये लावलेली अशी आजही सर्वत्र दिसून येतात. तुळसीमंजिरी विष्णूला प्रिय असल्यामुळे नित्याच्या पूजनात तिचा उपयोग नेहमी केला जातो. याच्या काष्ठाच्या मण्याच्या माळा करून त्या आपल्या गळ्यात काही भक्तजन धारण करतात. मंत्रजपाच्या वेळी हीच माळ पुण्यकारक मानलेली आहे. ज्याला तुळस माहीत नाही असा एकही हिंदु भारतात आढळणार नाही.

हा वृक्ष कसा उत्पन्न झाला यासंबंधी काही पौराणिक कथा आहेत. देवीभागवत ग्रंथामध्ये शंखचूड-तुळशी विवाहाची कथा फार विस्ताराने

दिलेली आहे ती अशी– शंखचूड या नावाचा दैत्य अतिशय मातला होता त्याला ठार मारण्याच्या कामी साक्षात् भगवान शंकरांची योजना झाली अनेक दिवस दारुण संग्राम झाला, परंतु त्या दैत्याला मरण मिळण्याचे काही चिह्न दिसेना शत्रूला सरळ सरळ नामोहरम करता येईनासे झाले म्हणजे मग कपट नीतीचा आश्रय घ्यावा लागतो देवांनीही तेच केले[1] भगवान विष्णु तुळशीला फसवून तिचे पातिव्रत्य हरण करण्यासाठी शंखचूडाच्या वेषाने ते तिच्या घरी आले तुळशीने त्यांना आपले पति समजून त्यांचे स्वागत केले आणि रात्री इतर सर्व सौख्योपभोग दिले याचा परिणाम म्हणून शंखचूडाच्या गळ्यातील अभंग कवच भंग पावले आणि शंकरास शंखचूडाला ठार मारता आले

तुळशी ही पूर्वजन्माचा गोलोकातील राधेच्या शापाने शापभ्रष्ट झालेली स्त्री असल्यामुळे पतिनिधनानंतर भगवान हरीने तिला आपल्याबरोबर गोलोकात नेले, पण सरस्वती इत्यादि स्त्रियांना त्यांची ती कृति आवडली नाही तथ सवती मत्सर सुरू झाला तुळशीला तिचा हा अपमान सहन झाला नाही योग सामर्थ्याने ती अंतर्धान पावली व पुढे वृंदावनामध्ये तुळशीवृक्ष या रूपाने उद्भवली यासाठीच तिला वृंदावनी असे नाव पडले आहे

(देवी भागवत, अ १)

कालांतराने तुळशी गंडकी नदीचे रूप घेऊन भूतलावर वाहू लागली तेव्हा आपल्या स्त्रीचा नित्य सहवास मिळावा म्हणून श्रीहरीने शालिग्राम पर्वताचे स्वरूप घेतले आणि ते तेथेच राहू लागले याची उत्पत्तीही वरील शंखचूड कथेमध्येच सामावलेली आहे कारण श्रीहरींनी तुळशीचे पातिव्रत्य हरण करून कपटाने जेव्हा शंखचूडाचा वध करविला आणि देवाचे हे कपटकृत्य तिला समजले, तेव्हा श्रीहरीला तिने शाप दिला की, 'तू पर्वत होऊन पडशील' तोच हा गंडकी नदीवरील पर्वत होय

एकदा असे झाले, भगवान विष्णूंनी नवग्रहांची निर्मिती करून त्यांना मानवी जीवनावर प्रभुत्व गाजविण्यास सांगितले शनिग्रहाची सत्ता सर्वत्र चालू होण्यापूर्वी, प्रथम त्याने महादेवालाच बारा वर्षांपर्यंत आपला शिष्य होण्याची आज्ञा दिली महादेवांनी त्याला त्याचा हा 'पहिला प्रयोग' विष्णूवर करण्याची विनंती केली विष्णूंना हे वृत्त समजताच शनीचा त्रास चुकविण्याच्या उद्देशाने ते पळून गेले आणि गंडकी तीरावर पर्वतरूपाने पडून राहिले शनि पाठलाग करीतच होता त्याही स्थितीत आपला प्रभाव दाखविण्याचे शनीने

1 टीप—शान्तिदेवीचा इतिहास पहा

ठरविले. भुंग्याचे रूप घेऊन त्याने पर्वतरूपी विष्णूचे शरीर पोखरण्याचे काम चालूच ठेवले आणि त्याला अनेक छिद्रे पाडली. शनीच्या पोखरण्यामुळे जे लहान लहान पाषाणांचे तुकडे गंडकीमध्ये पडतात, तेच शालिग्राम या नावाने प्रसिद्ध आहेत. बारा वर्षांच्या मुदतीनंतर विष्णूंनी आपले पूर्व स्वरूप धारण करून लोकांना सांगितले की, ' गंडकी पर्वत हे माझेच स्वरूप असल्याने तुम्ही माझी अथवा लहान लहान पाषाणांची पूजा करावी. '

## स्त्रियांनी शालिग्राम-पूजन का करू नये ?

वरील कथेप्रमाणे खऱ्या शालिग्रामाला छिद्र असते हे समजून येईल. तसेच आतील बाजूस भुंग्यासारखा प्राणी असून तो पाषाण कोरीत असतो हेही दिसेल. अशाही कथा प्रचलित आहेत की, शालिग्राम मूर्तीतून सुवर्ण अथवा सुवर्णाची तुळशीची पाने निघतात. चौकशी करता एका माहितगाराने सांगितले ते असे की, शालिग्रामाच्या अंतर्भागात जो प्राणी असतो, तो फक्त तुळशीची पाने खातो. म्हणून शालिग्राम मूर्तीला तुळस वाहण्याची रूढी चालू झाली असावी. हाच किडा तुळशीची पाने खाऊन सुवर्ण निर्माण करतो. असे सुवर्ण सतत मिळत रहावे म्हणून त्या किड्यासंबंधी पथ्यपाणी पाळणे आवश्य आहे. या किड्याला जर रजस्वला स्त्रीचा स्पर्श झाला, तर मात्र तो त्वरित मरण पावतो आणि सुवर्णही बंद होते. स्त्रियानी पूजन करीत असताही जर असा प्रसंग उद्‌भवला तरीही तो किडा मरेल. यासाठी सावधगिरी म्हणून समाजधुरीणांनी नियमच करून टाकला की, ' स्त्रियांनी शालिग्राम-पूजन करू नये. '

लेखकाच्या निरीक्षणात असे अनेक ठिकाणी आढळून आले आहे की, या वर्गातील स्त्रियांनी अथवा कुमारिकानी तुळशीच्या झाडाला स्पर्श केला, तर ते झाडही मरणास लागते. तेव्हा शक्य तो स्त्री-वर्गाने ही दक्षता पाळणे इष्ट आहे.

सांप्रत जे शालिग्राम बाजारात मिळतात आणि पूजेला असतात, ते बहुधा बनावट असतात. त्यातील सुवर्ण काढून घेतलेले असते आणि आतील किडा मारलेला असतो. व्यापार सुरू झाला म्हणजे सर्व काही उलटेसुलटे घडते, मूळ तत्त्व विसरले जाते आणि रूढि मात्र चालू राहते. तद्वत् येथे झालेले आहे. तुळशीचे रसापासून सुवर्ण निर्माण करण्याची कला कित्येकांना अवगत होती आणि पुणे शहरी साप्रतही यावर एकजण संशोधन करीत आहे, हे लेखकाला माहीत आहे.

शालिग्रामाची पूजा अतिशय पुण्यकारक मानली जाते. शालिग्रामाचा पोकळपणा, त्याची उत्कृष्ट सुवर्ण काती आणि वेळी पोकळीत दिसणारी शेपटासारखी

भगवान श्रीविष्णूची मूर्ति यावरून त्याचे मोल ठरविले जाते. काही वेळा या शाळिग्रामाचे मूल्य तीन सहस्र रुपयापर्यंतही नेले जाते. हिंदुपूजकाची अशी दृढ श्रद्धा आहे की, शाळिग्रामाची नित्यनेमाने पूजा करणारा कधीही दरिद्री रहात नाही. परंतु त्यासाठी त्याला कडक सोवळ्याचे आचरण करावे लागते. एखादा बारीकसा जरी अपवित्रपणा झाला तरी पंचगव्याने शुद्धता आणावी लागते.

एका इंग्रज संशोधकाने शाळिग्रामाचे पृथक्करण केल्यावर त्याला असे आढळून आले की, इंग्रजीमध्ये ज्याला 'कटल् फिश' असे म्हणतात अशा माशाचे जमिनीत पुरलेले आणि नंतर उकरून काढलेले शिंपले म्हणजेच शाळिग्राम होय. इंग्रजी शब्दकोशामध्ये या माशाचे असे वर्णन आढळते की, हा मासा स्वतः एका जाडजूड शिंपल्यामध्ये वस्ति करून राहतो. एका बारीक छिद्रातून तो आपले तोंड, मुळे व पाय गोगलगायीसारखे बाहेर काढून आपले भक्ष्य पकडतो. त्याच छिद्रातून तो एक प्रकारचा काळ्या रंगाचा उत्सर्ग बाहेर फेकतो. त्याचा परिणाम असा होतो की, पाण्याचा रंग काळा होतो आणि त्यामुळे शत्रूच्या तावडीतून त्याला आपली सोडवणूक करून घेता येते. या माशानेच नागमोडी आकाराने पोखरलेला पाषाण म्हणजेच शाळिग्राम होय. नदीमध्ये जाळे टाकून असे पाषाण वर घेतले जातात, त्याची वर्गवारी केली जाते आणि त्यानंतर ते विकले अथवा वाटले जातात.

अलौकिक शाळिग्राम मूर्तीमध्ये भगवान श्रीविष्णु शेषशायी असून त्यांच्या पायाजवळ भूदेवी व निळादेवी त्यांचे पूजन करीत असलेले दृश्य असते. अशी आकृति आपल्याला हंपी येथील मंदिरात पहावयास सापडते.

शाळिग्रामाच्या प्रसन्नतेचे उत्कृष्ट उदाहरण म्हणून राजा चन्द्रहास याची कथा प्रसिद्ध आहे. या अर्भकाला शाळिग्रामाची मूर्ति सापडल्यावर ती ठेवण्यास इतर कोठे सुरक्षित जागा नसल्याने तो ती आपल्या मुखातच ठेवीत असे. पूजेच्या वेळीच फक्त तिला बाहेर काढीत असे. त्याच्या पूजनाने पुढे त्याच्यावर आलेली अनेक गंडांतरे टळून त्याला राज्यपद प्राप्त झाले. या भक्ताप्रमाणेच दुसऱ्या एका खाटकाची गोष्ट प्रसिद्ध आहे. हा खाटीक मांसविक्रीसाठी शाळिग्रामाचा उपयोग वजन म्हणून करीत असे. इतराच्या दृष्टीने तो शाळिग्रामाचा असा दुरुपयोग करीत असे, असे वाटत असले तरी तो त्या मूर्तीची पूजा अत्यंत मनोभावाने करून मगच ती उपयोगात आणीत असे. यामुळे शाळिग्राम त्याच्यावर प्रसन्न झाला आणि त्याच्या व्यवसायात त्याने त्याला खूप बरकत दिली.

(मार्टिन, पृष्ठ २४१ ).

तुळशी वृक्षाच्या उत्पत्तीची दुसरी कथा अशी—एकदा तुळशी नावाच्या एका स्त्रीने अतिशय धार्मिक वर्तनात आपले आयुष्य व्यतीत केल्यावर विष्णूला तिने आपला पति होण्याची विनंती केली. लक्ष्मीला हे समजताच तिने तुळशीला शाप देऊन तिचे रूपांतर तुळशीवृक्षात केले. परंतु विष्णूला लक्ष्मीचे हे कृत्य आवडले नाही आणि तुळशीची झालेली गाजवणूक पाहवली नाही. तुळशीला त्यांनी आश्वासन दिले की, 'शाळिग्रामरूपाने नित्य माझा निवास तुझ्याजवळ राहील आणि तुझी पाने व मंजिऱ्या भक्तजन त्यावर वाहतील.' यास्तव विष्णु-सहस्रनामाच्या वेळी तुळसीदले वाहण्याची रूढि पडली असावी.

तिसरी कथा अशी—जालंदर दैत्याची स्त्री वृन्दा हिच्या सौंदर्याची विष्णूला अतिशय भुरळ पडली. लक्ष्मी, पार्वती, स्वाहा, स्वधा आदि देव-स्त्रियांना वृन्देने विनंती केली, "विष्णूपासून उत्पन्न होणाऱ्या या त्रासातून माझी मुक्तता करा आणि विष्णूंना वाचवा. त्यांना या मोहापासून परावृत्त करा." त्या स्त्रियांनी वृंदेला एक प्रकारचे बी दिले आणि आपल्या घराजवळ ते पेरण्यास सांगितले. त्या बीपासून तीन वृक्ष तयार झाले. पहिला पांढऱ्या व अतिशय सुवासिक फुलांचा होता, दुसरा लाल रंगाच्या जास्वंदी फुलांचा होता आणि तिसरा तुळशीचा होता. पांढऱ्या फुलांच्या सुगंधाने, जास्वंदीच्या मोहक लाल रंगाने आणि तुळशीच्या सुवासाने विष्णूचे मन तेथेच रमले आणि ते वृन्देला विसरले.

त्यानंतरची चवथी एक कथा अशी—सागरमंथनाच्या वेळी अमृताचे काही थेंब भूतलावर उडाले, त्यामधून जे वृक्ष तयार झाले ते तुळशीवृक्ष होत.

(स्कं. पु. २४८)

पाचवी कथा अशी की, तुळशी एक ब्राह्मण-कन्या होती. बापाने घरातून हाकलून दिल्याकारणाने ती विठोबाच्या आश्रयाला गेली. तेथे दोघांचे प्रेम वाढीस लागलेले पाहताच रुक्मिणीने कपटनीतीचा अवलंब करून विठोबाच्या प्रेमा-विषयी तिच्या मनात शंका निर्माण केली. परिणाम असा झाला की, त्यांच्या-मध्ये दुरावा उत्पन्न झाला. कालांतराने सत्य समजल्यावर त्या शंकेचे निरसन झाले, तरी तिने विठोबाला जवळ केले नाही. ती सीतेप्रमाणे भूमीत गुप्त झाली आणि वनस्पतीचे रूपाने पुन्हा जन्म पावल्यावर, विठोबाबरोबर तिचा विवाह झाला. (भा. सं. को. ४।१५५).

मणिकाञ्चनपुष्पाणि तथा मुक्तामयानि च ।
तुलसीदलपत्रस्य कलां नार्हन्ति षोडशीम् ॥ ( प. पु )

भावार्थ असा की, सुवर्णाची, रत्नाची अगर मोत्याची फुले जरी विष्णूला वाहिली तरी त्याना तुलसीदलाच्या सोळाव्या कलेचीही सर येणार नाही. यासाठी तुलसीदलाविना विष्णूचे पूजन व्यर्थ ठरते.

तुलसीकाननं चैव गृहे यस्यावतिष्ठते ।
तद् गृहं तीर्थभूतं हि नायान्ति यमकिङ्कराः ॥

ज्याच्या दारी तुलसीवन आहे, ते घर तीर्थाप्रमाणे पवित्र होय. त्या घरात यमदूतही येत नाहीत. इतकेच नव्हे तर या वनाच्या परिसरातील कोसभर जमीन गंगेप्रमाणे पवित्र मानलेली आहे. तुलसीचे महात्म्य वर्णन करताना असे सांगितले आहे की, तिचे दर्शन, स्पर्श, ध्यान, नमन, पूजन, रोपण व सेवन या गोष्टींनी मानवाची युगायुगाची पापे नष्ट होतात. तिचे पूजन मोक्षदायक आहे. तुलसी॰ पत्राविना पानाचे प्रोक्षण केल्यास भगवान विष्णु नैवेद्य भक्षण करीत नाहीत. तुलसीपत्र हाती घेऊन जो कोणी खोटी शपथ घेतो तो यावच्चंद्रदिवाकरौ नरकात जातो.

तुलस्यमृतजन्मासि सदा त्वं केशवप्रिये ।
केशवार्थे विचिन्वामि वरदा भव शोभने ॥ ( आन्हिकसार )

हे तुलसीदेवते, तू अमृतापासून जन्म पावली आहेस, तू विष्णूला सर्वकाल प्रिय आहेस आणि म्हणून त्याच्या पूजेस्तव तुझी दले मी खुडीत आहे. हे शोभने, मला तू वर देणारी हो. तुलसी खुडण्याच्या वेळी हा मंत्र म्हणावा. या वनस्पती-च्या ठिकाणी मुळापासून तो अग्रापर्यंत सर्वत्र देवता वास करीत असतात. वरील सर्व कारणासाठी प्रत्येक हिंदुमानाने आपल्या घरापुढे वृंदावन करून तुळस लावणे किती आवश्यक आहे याची सर्वांना उत्तम कल्पना येईल व त्याप्रमाणे वागतील अशी अपेक्षा आहे.

या तुळशीमध्ये कृष्णतुळस, पांढरी तुळस व रानतुळस असे तीन प्रकार आहेत. त्यापैकी कृष्णतुळस ही अतिशय पवित्र मानली जाते आणि तिच्या पानाना जास्त सुवासिक वास येतो. तुळशीव्रत आचरणाऱ्या आर्यस्त्रिया, तुळशीला पाणी घालून-पूजन करून काही निश्चित संख्येने प्रदक्षिणा घातल्याविना पाणी तोंडात घेत नाहीत. आजच्या सुधारलेल्या विसाव्या शतकातही हे व्रत पाळणाऱ्या अनेक स्त्रिया आहेत. या झाडाला मासिक पाळीच्या वेळी स्त्रियानी स्पर्श करू

नये. कारण तसे केल्यास त्या वृक्षाचे मरण ओढवते. इतकीही अपवित्रता या वृक्षदेवतेला चालत नाही. तुळशीमंजिरीचे वर्णन करताना एक कवि म्हणतात,

पुष्पेषु तुलना यस्या नास्ति वेदेषु भाषिताम् ।
तुलसीपुष्पसारां च सतीं पूजां मनोहराम् ॥

तुळशीवृक्ष हा अतिशय पवित्र मानल्याने त्याची पाने केव्हा खुडावीत व कोणी खुडावीत याला काही नियम घालून दिलेले आहेत. पौर्णिमा, आमावास्या, द्वादशी, संक्रांती, मध्यान्हकाळी, रात्री, दोन्ही संध्यासमयी, अशौचसमयी, रात्री झोपी गेल्यावर, सकाळी स्नान केल्याविना जो तुळशीदळे तोडतो तो स्वतः श्रीहरीचे मस्तकच तोडतो, असे शास्त्र सांगते. यामुळे मंगलसमयीसुद्धा तीन दिवसांची शिळी तुळशीदळे शुद्ध मानलेली आहेत.

## तुलसीची नामावली

संस्कृत अगर देववाणी भाषेत कृष्ण तुलसी, मंजिरी, पवित्रा, सुखवल्लरी, पूर्णसा, अजक भारती, भुलाका, दिव्या, कृष्णमूळ ही नावे आढळतात. शिवाय निरनिराळ्या भाषेत खालीलप्रमाणे नावे आढळतात—

(१) हिंदी–तुलसी बरांडा, वृंदा.
(२) बंगाली–काला तुलसी.
(३) कानडी–कृष्ण तुलसी.
(४) तामील–असांगाई, तुलसी गिडा.
(५) तेलगू–कृष्ण तुलसा.
(६) मल्याळम्–निलातितुआ.
(७) ब्राह्मी–न्गन गागोरा चेन्तु.
(८) सिलोनी–मुदुरतुला.
(९) इंग्रजी–होली संक्र बॉसील.
(१०) वनस्पतीशास्त्र–ऑसिमम् सँक्टम्, फॅमिली लॅबिएटी.

मलाया, ऑस्ट्रेलिया, पश्चिम आशिया अरेबिया इ. उष्ण कटिबंधातील देशात तुलसीची लागवड केली जाते.

तुळशीवृक्ष हा रासायनिक दृष्ट्या अतिशय उपयुक्त असल्याचे संशोधकाना आढळून आले आहे. त्याच्या अस्तित्वामुळे वातावरणातील हवा शुद्ध होण्यास अतिशय मदत होते. तुळशीला पर्याय शब्द म्हणून हा श्लोक पहा

तुलसी सुरसा ग्राम्या सुलभा बहुमंजिरी ।
अपेत राक्षसी गौरी शूलघ्नि देवदुंदुभि ॥

## रासायनिक गुणधर्म

तुळशीमधील काळे बी आणि पानाचा स्वरस औषधीत वापरतात ३० ते ६० थेंब स्वरस ( अथवा अर्धा ते एक लहान चमचा ) तो घेऊन त्यात मध घालून जे मिश्रण होते त्यास कल्प असे म्हणतात तुळशीचे गुणधम खालील श्लोकात वर्णिले आहेत

तुलसी कटुका तिक्ता हृद्योष्णा दाहपित्तकृत् ।
दीपनी कुष्ठकृच्छ्रास्रपार्श्वरुक् कफवातजित ॥ ( भा प्र० )

तुळसीमध्ये तिक्त व कटू असे दोन प्रकारचे रस आहेत त्यापैकी कटुरस प्रधान असून विपाक कटूच होतो आणि त्यामुळे वीर्य उष्ण होते कटुरस व उष्णवीर्य यामुळे ती पित्ताची वृद्धि करते त्याचबरोबर कफवात नाशनाचेही कार्य करते शीतता कमी करून उष्णता वाढविणारी ही वनस्पति आहे हिच्या गधाने ठिकठिकाणची दुर्गंधी दूर केली जाते शीतज्वरात, कफज्वरात स्वरसाचा उपयोग होतो सर्दी, पडसे, डोकेदुखी, अगदुखी, पोटदुखी, खोकला इत्यादि विकारात तुळशीचा उपयाग होतो हिच्या रसाने जीभ स्वच्छ होऊन उत्तमपैकी भूक लागते ज्वरामध्ये तुळशीचा काढा घेतल्यास घाम येऊन ताप उतरतो छातीत कफ दाटला असता तुळशीचा रस मधातून दिल्यास कफ सुटू लागतो व भरलेली छाती हलकी होते हा रस मधात घालून चाटला असता उचकी कमी होते तुळशी ही पार्श्वशूलाहार आहे. म्हणून रस पोटात देतात आणि बाहेरूनही लावतात पोटशूलामध्ये रस तुपाबरोबर पोटात देतात डोकेदुखी या विकारात या रसाचे दोन थेंब नाकात घालतात तुळशी ही जतुघ्न कुष्ठघ्न आहे गजकर्ण, नायटे यावर स्वरस चोळल्यास कीड मरून जाते पित्तप्रधान रोगात अथवा दाह होत असल्यास हा रस वापरू नये. तुळशीच्या बियाची दुधात केलेली लापशी शरीराला घडावा आणणारी आहे त्यामुळे मूत्रमार्गाची आग कमी होते शरीराला विषबाधा झाली असता या लापशीचा चागला उपयोग होतो तुळशीतील माती ही औषधी आहे. सुजेवर लेप देण्यात उपयोग केला जातो

तुळशीचा विवाह कार्तिक शुद्ध द्वादशीला करतात त्या वेळी पूजक प्रार्थना करतो—

‘ हे तुळशीदेवते, तुझ्या पाळामुळात पृथ्वीवरील सर्व क्षेत्रे सामावलेली आहेत तुझ्या खोडात सर्व देवताचे निवासस्थान आहे, तुझ्या शाखांच्या

अग्रांवर वेदपुराणे वास करीत आहेत. अशा तुझ्या सर्वव्यापी रूपाला माझा नमस्कार असो '

काही शतकापूर्वी हा विवाह किती भव्य स्वरूपात पार पडत असे, याचे हे एक उदाहरण पहा स्लीमन नावाच्या एका संशोधकाने हा वृत्तात नमूद करून ठेवलेला आहे मध्य भारतातील ओर्चा संस्थानाचा अधिपति या तुळशी विवाह-प्रीत्यर्थ साली ना तीन लक्ष रुपये खर्च करीत असे तेथील राजोपाध्ये यानी त्या संशोधकाला सांगितले की, विवाहाच्या वेळी जी वऱ्हाडी मिरवणूक निघे तीमध्ये आठ हत्ती, बाराशे उट, सहासहस्र घोडेस्वार आणि संपूर्ण पायदळ याचाही समावेश केलेला असे स्वाजम्याच्या अग्रभागी शृंगारलेल्या गजावर शाळिग्राम मूर्ति (ऊर्फ नवरदेव !) ठेवीत आणि मंदिरातील वृंदावनाकडे ही मिरवणूक जाई मंदिरात गेल्यावर शाळिग्राम आणि मंदिरातील वृंदावनामधील तुळशी याचा विवाह समारंभ पार पडत असे रात्री विश्रांतीसाठी नवरदेव तेथेच लग्घोरा येथे राही या विवाहाला सुमारे एक लक्ष प्रजाजन उपस्थित असत दुसऱ्या दिवशी या विवाहानिमित्त राजा सर्व प्रजाजनाना सुग्रास भोजन देत असे

(मार्टिन, पृष्ठ २३२).

परंतु आता काय ? कालाच्या कराल दाढेत या राजाच्या गाद्याचा केव्हाच चुराडा झाला आता उरल्या त्या फक्त त्याच्या आठवणी या अवाढव्य प्रसंगाची तितकीच अवाढव्य वर्णने ! निदान ती वाचून तरी वाचकाच्या डोळ्यासमोर त्याच्या वैभवाचे चित्र तरळावे यास्तवच अशी वर्णने येथे देण्याचे प्रयोजन आहे

या दृष्टा निखिलाघसघ शमनी पृष्टा वपु पावनी ।
रोगाणामभिवन्दिता निरासिनी सिक्तातकत्रासिनी ॥
प्रत्यासत्तिविधायिनी भगवत कृष्णस्य सरोपिता ।
न्यस्ता तत् चरणे विमुक्ति फलदा तस्यै तुलस्यै नम ॥ (पद्मपुराण)

तुळसीचे केवळ दर्शन घडले तरी सर्व पापे नष्ट होतात तिचा स्पर्श शरीराला झाला असता सर्व देह पवित्र करून टाकते तुळशीला नित्य वंदन केले तरी सर्व रोगाचा परिहार होतो, तिला दररोज जलसिंचन केले असता यमराजाचे भय निवारण होते प्रयत्नाने तुळशीचे झाड लावले आणि वाढविले असता भगवान श्रीकृष्णाचे प्रेम, भक्ताचे हृदयसपुटात वृद्धिंगत करते व श्रीकृष्णाच्या चरणावर तुळशीची पाने वाहिली असता ती भक्ताला सायुज्यमुक्ति प्राप्त करून देते अशा तुळशीला माझा नमस्कार असो येणेप्रमाणे सकाळी मुखमार्जन

झाल्यावर ,जरी तुळशीला वरील श्लोक म्हणून वंदन केले, तरी सर्व पुण्य पदरी पडेल यात संशय नसावा.

तुळशीचे पूजन व प्रदक्षिणा हा अनेक भारतीय स्त्रियाचा नित्यक्रम आहे. तिन्हीसाजा तुळशी समोर दिवाबात करणे हा नियमही आचरतात. स्त्रियानी अनेक गाणी तुळशीवर रचलेली आहेत त्यापैकी एक महाराष्ट्रीय गाणे—

तुळशी ग बाई । जन्म अमृत मंथनी ।
बैस अंगणांत । जागा देते वृंदावनी ॥ १ ॥
काशी काशी म्हणून । सर्व भारती धावत ।
काशी माझे अंगणात । तुळसादेवी ॥ २ ॥
तुळशीला पाणी घाली । पुत्र मागत राऊळी ।
बाळ शुशील खेळवी । सुधाताई ॥ ३ ॥
बाळा संगे खेळे । माय ही पाताळी[१] ।
आजी ही न्याहाळी । तुळशी छाये ॥ ४ ॥
लीला तव मावशी । नांदते काशीला ॥
चंदा-राजीव-मधूला । वाढवीत ॥ ५ ॥

विष्णु, कृष्ण अथवा पाडुरंगाचे पूजेच्या वेळी जशी तुळशीची माळ गळ्यात घालतात तद्वत् वैष्णव अथवा वारकरी तुळशीच्या काष्ठमण्याची माळ गळ्यात सदैव ठेवतात. या माळेविषयी एक श्लोक आहे. तो असा—

तुळसीकाष्ठनिर्माणमालां गृह्णन्ति ये नराः ।
पदे पदेऽश्वमेधानां लभन्ते निश्चितं फलम् ॥ (ब्र. वै पु.)

भावार्थ असा की तुळशीच्या काष्ठाची बनवलेली माला जे सदैव गळ्यामध्ये धारण करतात, त्यानी टाकलेल्या प्रत्येक पावला गणिक त्यांना अश्वमेध यज्ञाचे फळ मिळते. वारकरी स्त्रिया तर पितळी तुळशीवृन्दावन मस्तकी धारण करून प्रवास करतात. मृत्यूसमयी मनुष्याच्या मुखात तुळसीपत्रे ठेवतात. वृंदावनातील मृत्तिकाही मस्तकी विभुतीप्रमाणे धारण करतात. प्रवासाला निघताना तुळशीला उजवी घालून मार्गस्थ होणे हितावह मानलेले आहे. केरळातील नायराचे तरवाडात तुळशी वृन्दावन हमखास असलेच पाहिजे. हे लोक तुळशीच्या पानांवर पाणी ओतून तीर्थ म्हणून प्राशन करतात. नायर पुरुष स्नानानंतर तुळशीची मंजिरी

१ अमेरिकेत वॉशिंग्टन शहरी.

आपले उजवे कानावर खोचून ठेवतो. त्याच्या मते तुळशीदल हे शिवालाही प्रिय आहे.

तुळशीचे वर्णन करणारे एक तुळशी उपनिषदही आहे. एका कवीने तुळशीदलाचे महत्त्व वर्णन करताना म्हटले आहे—

रुक्मीणीने एका तुलसी दलाने ।
गिरिधर प्रभु तुळिला ।

घरदार अथवा धनाकर तुळशीपत्र ठेवणे म्हणजे त्याचा त्याग करणे होय.

५ वटवृक्ष

वट रक्तफल शृंगी न्यग्रोध. स्कन्धजो ध्रुव ।
क्षीरी वैश्रवणो वासो बहुपादो वनस्पति ॥ (भा. प्र.)

वरीलप्रमाणे वड अथवा वटवृक्षाला अनेक नावे आहेत. वडाची झाडे भारतामध्ये सर्वत्र वाढतात. याला अनेक पारब्या अथवा उपरीमुळे फुटतात आणि ती भूगर्भात घुसून त्या वृक्षाची आश्रयमुळे बनतात या प्रकरणाच्या प्रस्तावनेत आपण पाहिलेच आहे की, या वृक्षाचा विस्तार कसा अवाढव्य होतो आणि तो अनेक वर्षे कसा जगतो ते. यासाठीच तर त्याला अक्षयवट हे नाव प्राप्त झालेले आहे. या वृक्षाला लाल व बारीक फुले येतात. पानाच्या देठाजवळ एक तावडा मोड असतो. त्याला शृंगी असे नाव आहे वडाचा पाने तोडली, तर त्यातून पांढरा चीक बाहेर येतो भगवान बुद्धांनी गयाक्षेत्री याच वृक्षाखाली तप केले याच वृक्षाखाली त्यांना ज्ञानसाक्षात्कार झाला म्हणून बौद्धधर्मीय आजही त्या स्थानाला आणि त्या वृक्षाला परम पवित्र मानतात भूमंडळाच्या प्रलयकाळी भगवान विष्णु याच वृक्षाच्या डहाळीचा आश्रय घेऊन जगताची पुनरुत्पत्ति करतात, असे श्रुति सांगते प्रयाग तीर्थी यात्रा करणारे यात्रिक तेथील किल्ल्याजवळ असलेल्या अक्षय वटाच्या मंदिरात जाऊन त्याची पूजा केल्याविना राहात नाहीत भारतीय स्त्रिया ज्येष्ठ पौर्णिमेच्या दिवशी या वृक्षाची सामुदायिक रीतीने पूजा करतात व पुरोहिताला दान करतात दरवर्षी वटवृक्षाचे पूजन करण्याचे हे एक व्रतच आहे. प्राचीन काळी घडलेली सत्यवान सावित्रीची कथा भारतीयांना पुनरपि सांगायास पाहिजेच असे नाही सती सावित्रीच्या या कृत्याचे पुण्यस्मरण म्हणून त्या दिवशी वटवृक्षाचे पूजन केले जाते मरणानंतर कुडी सोडून जाणाऱ्या जीवात्म्याला आपला प्रवास वटवृक्षाच्या शीतल छायेतून सुखकर रीतीने करता यावा यास्तव सुज्ञ व श्रद्धावान मनुष्य मार्गामध्ये पथिकासाठी या वृक्षाची लागवड करतो.

या वृक्षाचा उपयोग अनेक प्रकारे करतात. खेडेगावात या वृक्षाच्या शीतल छायेचा उपयोग क्रीडांगण म्हणून अथवा गावाचे सभागृह म्हणूनही केला जातो या झाडाचा विशाल विस्तार आणि लांबलचक फांद्या यामुळे मुलांना 'सूरपारब्या' हा खेळ खेळावयास हा वृक्ष अधिक उपयुक्त वाटतो. 'सूरपारब्या' या वृक्षावरच्या साध्या खेळात भरपूर व्यायाम होतो, वृक्षावर भराभर चढण्याचे कसब अंगी येते, अंगातील साहसीवृत्ति बळावते आणि चपळता अंगी येते मी माझ्या लहानपणी माझ्या वडिलांबरोबर पुणे येथील डेक्कन कॉलेजच्या परिसरात रहात असताना माझ्या समवयस्क मित्रांबरोबर हा खेळ खूप खेळलो आहे. वडाची पाने पशूंना खावयास घालतात. तसेच ती पाने तोडून त्यांच्या पत्रावळी बनवून व त्या बाजारात विकून त्यावर काही लोक उपजीविकाही करतात. पुणे येथे पूर्वी लिमयेमहाराज या नावाचे एक पेहेलवानी पेशाचे गृहस्थ उंबऱ्यागणपतीजवळ रहात असत सकाळी चार तास ते जनसेवा करीत. स्वतः चे काढलेले खर्च करून येणाऱ्या रोग्याचे ते अंग व स्नायु चोळीत असत त्या त्यांच्या चोळण्याने अनेकांचे रोग बरे झालेले आहेत शरीराचा एखादा सांधा दुखत असला अथवा त्याला सूज आली असता ते उपाय सांगत. मनानेही ते खूप प्रेमळ आणि वाणी तर खूपच मिष्टान्न! एखादी आई आपल्या मुलीला अथवा एखादी प्रेमळ सासू आपल्या लाडक्या सुनेला सांगते तशा प्रेमळ शब्दांत ते रोग्याला सांगत, 'वडाची पाने थोडी गरम करावीत, त्याला गोड्यातेलाचा हात लावावा आणि रात्री दुखऱ्या भागावर ती बांधून ठेवावीत. आहे काय नि नाही काय! सकाळी उठलास की तुझं दुखणं आपोआप पळून जाईल बरं! जा आता, जा' या त्यांच्या उपचारांनी अनेक रोगी बरे झालेले मी माझ्या डोळ्यांनी पाहिले आहेत. सारांश, याप्रमाणे या वृक्षाचे अनेक उपयोग सांगता येतील.

सोमवती अमावस्येच्या कहाणीमध्ये असे सांगितले आहे की, वडाला प्रदक्षिणा घातल्याने अपमृत्यु टळतो. सोमा परीट नावाची स्त्री सातासमुद्रापलीकडे वडाला प्रदक्षिणा घालीत असे. एका घरात मृत्यु झाल्यावर तिला बोलाविण्यात आले. घर सोडताना तिने माणसांना सांगितले की, तिच्या पश्चात कोणाचा मृत्यु झाल्यास देह तसाच ठेवून द्यावा. इकडे आल्यावर तिने आपले पुण्य देऊन मृताला जिवंत केले, पण या करण्यात तिचे पुण्य संपले. त्याचा परिणाम असा झाला की, तिकडे घरात माणूस मेले. घरी परत गेल्यावर तिला हे वृत्त समजले. तिने पुन्हा वडाला प्रदक्षिणा घातल्या आणि पुण्यसंचय झाल्यावर तो मृतदेह जागृत झाला याचे तात्पर्य हेच की, वडाला प्रदक्षिणा घालणे पुण्यसंचयकारक आहे. (कहाण्या व वसे, संपादक—वामनराव भावे, बेळगाव)

रासायनिक गुणधर्म

आता वडाच्या रासायनिक गुणाविषयी पहावयाचे झाल्यास आपल्याला असे दिसून येईल की,

वट शीतो गुरुग्राही कफपित्तव्रणापह ।
वर्ण्यो विसर्पदाहघ्न कषायो योनिदोषहृत् ॥ (भा प्र )

वडाचा प्रमुख रस कषाय आहे त्याचा विपाक कटु होतो पण वीर्य शीत आहे हे सर्व गुण पित्तविरोधी असल्याने याच्या सेवनाने पित्तशमन होते याच्या रसाने कफनाश होतो व वातवृद्धीही होते यामुळे रक्ताचे शोधन होऊन प्रसादनही होते हा कषाय आणि त्यात गुरु असल्यामुळे स्तंभनही होते रसाच्या सेवनाने मेदाचे शोषण होते, त्यामुळे मुत्रोत्पत्ति कमी प्रमाणात होते मेदातील मूत्रावाटे बाहेर जाणारा क्लेद कषाय रसामुळे कमी होतो यासाठी चरकाने या वृक्षाचा समावेश मूत्रसंग्रहणीय गणात केलेला आहे

याचा कषायरस शीतवीर्य असल्यामुळे सर्व पित्तप्रधान रक्तगत व आगुन्तरी तीन विकारात त्याचा उपयोग होतो रक्तपित्तामध्ये या रसाचा उपयोग होतो उपयोग करण्याची कृति अशी—वृक्षाचे नवीन मोड आणून ते चेचावेत आणि ते पाण्यात रात्रभर भिजत ठेवून सकाळी ते पाणी व चौथा भाग तुपात एकत्र करून शिजवावे यामुळे तूप सिद्ध होईल हे तूप अधिक ¼ भाग साखर व ¼ भाग मध घालून सर्व प्रकारच्या रक्तपित्तात ते वापरावे, यामुळे रक्तस्राव थांबतो उरःक्षतात वटशृंगानी सिद्ध केलेल्या दुधातून तूप काढावे आणि ते पिण्यास द्यावे याने शुक्रवृद्धि व बलवृद्धि होते पित्तप्रधान सर्दीमध्ये वडाच्या मोखाचा थंड काढा मधातून घ्यावा त्यामुळे आमाशयातील पित्ताचे शमन होते पित्तामुळे तृष्णा वाढत असल्यास सालीचा काढा थंड करून तो मध व साखर यातून द्यावा किंवा वडाच्या पारब्या, जेष्टमध व पिंपळी ही सर्व वाटून गोळा होण्यापुरता त्यात मध घालून तो गोळा तोंडात धरल्यास तृष्णा व मुखशोष थांबतो पित्तातिसार, रक्तातिसार व रक्तप्रवाहिका यामध्ये सालीच्या काढ्याचा उपयोग होतो वडाच्या शृंगाची प्रक्रिया शुक्रधातु आणि गर्भाशय यावर अत्युत्तमरीतीने होते पु अपत्य निर्माण होण्यासाठी जर शुक्रजतूचे भाग कमी पडत असतील तर याच्या सेवनाने ते भरून येतात आणि पुत्रप्राप्ति होते गर्भाशयाचे विकार, रक्तस्राव किंवा श्वेतप्रदरात याच्या सालीच्या काढ्याचा चांगलाच उपयोग होतो

बाह्योपचारामध्ये वडाच्या सालीचा व पानाचा फार उपयोग केला जातो व्रणदारणात याच्या सालीचा उपयोग करतात त्यामुळे दाह निर्माण होत नाही व

व्रण दुष्ट होत नाहीत म्हणजे अधिक खराब होत नाहीत अस्थिभग्न म्हणजे हाड मोडले असता अथवा साधा निसटला असता तो भाग एकसंध होण्यासाठी वडाच्या जाड साली तुंडा ( स्प्लिंटस् ) म्हणून बांधतात याने अस्थिसंधान होते भगंदर रोगात, ज्या वेळी केवळ पिटिका असते त्या वेळी सालीचा लेप करावा गर्भिणी स्त्रीला योनिवाटे अकाली रक्तस्राव सुरू होऊन गर्भपात होण्याची चिन्हे दिसू लागताच तिचे शरीर खाली करून तिला उताणी निजवून वडाच्या सालीच्या काढ्यात भिजविलेला पिचू तिच्या योनीत घालावा आणि वैरीच्या साली त्याच काढ्यात बुडविलेल्या वस्त्राची घडी ठेवावी यामुळे रक्तस्राव थांबतो व गर्भ धारीम लागतो अशा रीतीने या वृक्षाच्या अंगी अनेक औषधी रासायनिक गुण दिलेले आहेत

अवधूती गुलाबराव महाराज एकदा सरदारगृह मुंबई येथे असता शिळ्या भाताला हुळहुळ्या काळ्या मुंग्या आल्या आणि गडी माणसे त्या निवडीत होते महाराज त्याना म्हणाले, तो सर्व भात चुलीवर ठेवा आणि गरम होऊ द्या तसेच त्यावर वडाची पानेही ठेवा परिणाम असा झाला की, भात गरम होताच सर्व मुंग्या वर गारवा असलेल्या पानावर आल्या आणि जमा झाल्या पाने उचलून फेकल्यावर मुंग्या गेल्या असा वडाच्या पानाचा गुण आहे

वरीलप्रमाणे दुर्वा, चंदन, देवदार, शमी, कांचन, आवळी, निर्गुंडी, रुई, आपटा, पुनर्नवा, सोमवेल इत्यादि प्रसिद्ध वृक्ष आणि वेली, ज्यांचे वर्णन पुराणामधून आढळून येते आणि ज्याना देवतासमान मानलेले आहे, अशांचे वर्णन येथे करावयास पाहिजे, परंतु स्थलाभावी तो मोह टाळावा लागत आहे वृक्षाचे देवत्व आणि महत्त्व दर्शविण्यास वर दिलेल्या पाच वृक्षांचे वर्णन आणि त्यांचे रासायनिक गुण हे पुरेसे आहेत

---

टीप—या प्रकरणासाठी पौराणिक माहिती, 'महाराष्ट्रीय ज्ञानकोश,' व 'भारतीय सांस्कृतिक कोश' या दोन ग्रंथांतून प्रामुख्याने घेतलेली असून रासायनिक गुणधर्म 'औषधीशास्त्र' ( द्वितीयखंड ) लेखक श्री० गो० आ० फडके यांच्या ग्रंथांतून घेतलेली आहे

# जलदेवता

भूपृष्ठावरील सर्व व्यवहार पंचमहाभूतांनी आपल्या अधिकारात ठेवलेले आहेत पृथ्वी, आप, तेज, वायु, आकाश या पंचमहाभूतांमध्ये आप म्हणजेच जल याचा क्रम दुसरा लागतो यावरून त्याचे महत्त्व समजून येईल तेजापासून उत्पन्न झालेल्या काही देवता आपण यापूर्वीच पाहिलेल्या आहेत त्याचप्रमाणे जलापासून उत्पन्न झालेल्या काही "जलदेवता"चा या प्रकरणात विचार करण्याचे योजिले आहे पंचमहाभूतात्मक देवता सर्वच वर्गांनी मानलेल्या असल्या मुळे भारतीयही त्यांना मानतात हे अर्थातच उघड आहे तसेच अमेरिकन, आफ्रिकन अथवा चायनीज हे लोक या पंचमहाभूतात्मक देवता मानीत नाहीत असाही याचा अर्थ नव्हे प्रत्येक राष्ट्रात व अनेक वर्गात अशा स्वरूपाच्या देवता आढळून येतात

माणूस संकटात सापडला म्हणजे त्याला देवाची आठवण होते, हे तर खरेच ! एखादी घटना मानवी बुद्धीला उलगडेनाशी झाली की माणूस दैव वादाचा आश्रय घेतो आणि वेळ मारून नेतो याची अनेक उदाहरणे आपण प्रत्यही पाहतो आता हेच पाहा ना !

दिनांक १२ जुलै १९६१ रोजी पुणे शहराजवळील पानशेत धरणाचा मातीचा बंधारा अचानक फुटला त्या पाण्याच्या लोटाने त्याच्याखाली बांधलेल्या खडकवासला धरणाची दगडाची भिंत ढासळली आणि पाण्याचा प्रवाह वादळाच्या वेगाने पुढे सरकला नदीकाठची अनेक पक्की घरे अक्षरशः वाहून गेली गावात खूप आतवर पाणी शिरून 'पाणीच पाणी चहूकडे' झाले अनपेक्षितपणे झालेल्या या हल्ल्यामुळे माणसाची मोठी केविलवाणी परिस्थिति झाली बाडबिछाना, कपडेलत्ते, दागदागिने, भांडीकुंडी सर्व काही जागच्या जागी टाकून आपले प्राण वाचविण्याची पराकाष्ठा जो तो करू लागला अशा या प्रलयकाळी अनेकांना जलदेवता कोपल्याची जाणीव झाली आणि तिला शांत करण्यासाठी तिची पूजा अर्चा, नवससायास इत्यादी अनेक मार्ग लोकांना दिसू लागले ! यामुळे वाहणाऱ्या पाणलोटात घरादारातील वस्तूंबरोबरच अनेक हिरवे खण व नारळही तरंगताना दिसत होते अनेक जीव प्रार्थना करीत होते, 'गंगामाई, आता तूच आमच्या मुलालेकरांचे संरक्षण कर '

प्रलयकाळी ज्याप्रमाणे जलदेवतेचे पूजन होते व संकट निवारणार्थ भक्तमंडळी तिचे पूजन करतात, तद्वतच अवर्षणाच्या वेळीही जलदेवतेची पूजा

करण्याचा प्रघात भारतामध्ये अनेक ठिकाणी आढळून येतो या पूजनाचे मार्गही अनेक असून ते मोठे चमत्कारिक आहेत कोणी आपल्या इष्टदेवतेवर संकट घालतो, कोणी पर्जन्यदेवता वरूण, शंकर अथवा गणेश याना पाण्यात बुडवितो, कोणी देवतांच्या मिरवणुका काढतो, तर कोणी अभिषेक करून देवावर सततधार धरतो

मैत्रायणी संहितेमध्ये अवर्षणकाळी पाऊस चागला पडावा यासाठी एक धार्मिक प्रयोग सागितला आहे त्या प्रयोगाला इष्टि असे म्हणतात एकदा देवाचे अन्न पर्जन्यवृष्टीने पळवून नेले आणि त्यामुळे सर्वत्र दुष्काळ पडला सर्व देव प्रजापतीकडे गेले असता त्याने त्याना 'कारीरीष्टि' प्रयोग करावयास सागितले, म्हणजे पर्जन्यवृष्टि होईल या प्रयोगाचे विधान असे की—

ही इष्टि करताना सर्वांनी कृष्णवस्त्रे परिधान करावी करीरसक्तू ( वेळूचे कोनळे कोंब आणि यव ) एकत्र कालवून, त्याचे तीन पिंड तयार करून, ते एका कृष्णाजिनात बाधावेत अग्निशाळेजवळ उभ्या असलेल्या बैलगाडीच्या वरच्या तड्याला ते कृष्णाजिनाचे गाठोडे बाधावे दुपारपर्यंत पावसाची वाट पाहून तो न आला तर इष्टि करतात नाहीतर त्यातील एक आहुति देऊन, ते गाठोडे गाडीच्या मागच्या दाड्याला बाधावयाचे व पावसाची आणखी एक दिवस वाट पहावयाची दुसऱ्या दिवशीही पर्जन्य आला नाही, तर आणखी एक आहुति द्यावयाची आणि शेवटी तिसरी आहुति तिसऱ्या दिवशी द्यावयाची या इष्टीची देवता मरुत् असल्याने, त्याच्या पूजनाने व हवनाने सर्वसाधारणपणे पर्जन्यवृष्टि होते, असा भक्ताचा अनुभव आहे.

पाऊस येवो वा न येवो, इच्छित इष्टि पुरी करावीच लागते काही सूत्रकारानी ही इष्टि तीन वेळा पावसाची वाट पाहून एकाच दिवसात पुरी करावी, असे सागितले आहे अश्वलायन सूत्रात या यागाला पिंडीयाग म्हटले आहे

( मैत्रायणी संहिता २।४७ )

वैदिक आर्यांची प्रमुख जलदेवता म्हणजे वरुण देवता होय, वैदिक काळी ही देवता आकाशाचे प्रतीक मानले जात होते, पण कालातराने इतर देवतानी ती जागा घेतली आणि सागराच्या ठिकाणी प्रतिक स्थापन झाले हा फरक होण्याचे कारण असे संभवते की, शत्रूबरोबर सामना देण्याची जेव्हा आर्याना पाळी आली, तेव्हा मित्रदेव अथवा इद्रदेव हे पुढे सरसावले आणि या देवताचा प्रभाव तेवढा कमी झाला वेदामध्ये या देवतेचे वर्णन उत्कृष्ट रेखाटले आहे तो सूर्यनेत्री म्हणजेच सहस्र नेत्री आहे ( ऋ ७ ६६ ) देदिप्यमान वस्त्रे धारण करणारा, हातामध्ये पाश धारण करणारा ' हयारूढश्च

पाशभृद्वरुणः '( बृ. संहिता ) हंसवाहन, कोणी मकर अथवा मृगवाहनी असेही म्हणतात. हातामध्ये शंख, रत्नांचे भांडे, कमळ, दोर ही सागरात उपयोगी पडणारी साधने (आयुधे) असणारा. हेमाद्रि त्याचे वर्णन पुढीलप्रमाणे करतो.

मुक्ताहारविभूषितः । पद्मपाशौ करे कार्यो देवदक्षिणहस्तयो. ।
शंखं च रत्नपात्रं च वामहस्तस्य कारयेत् ॥

द्युलोकातील त्याचे निवासस्थान म्हणजे सहस्र खांब व सहस्रद्वारे युक्त आहे ( ऋ. ५-६७ ). वरुणाला राजा मानल्यावर त्याचे गुप्तहेर खाते ओघानेच आले. आकाशातील तारे हे त्याचे हेर मानलेले आहेत. इराणीसंस्कृतीमध्ये मित्र ही वरुणदवता मानलेली असून स्पॅश नावाचे गुप्तचर तिजजवळ आहेत.

पंचमहाभूतांच्या काही निर्दिष्ट शक्तीवरून आर्यांनी देवता निर्माण केल्या. सृष्टीवर जलाचे सिंचन करण्याची असुरी शक्ति या वरुणदेवतेजवळ आहे असे मानले, म्हणून त्याला यक्षिन् ( जादूगार ) असे म्हटले आहे ( ऋ. ७-८८ ). अखिल विश्वाचा प्रचंड जीवनक्रम असूनही, तो अत्यंत नियमबद्ध व व्यवस्थापूर्ण आहे आणि याचे शासन करणारी कोणी शक्ति आहे, यातूनच देवतांची कल्पना दृढमूल झालेली आहे. सूर्याचे नियमित भ्रमण, ऋतूंचे नियमित आगमन, चंद्र तारकांचे नियमित संचलन, इतकेच नव्हे, तर भूतलावरील लता वृक्षांचे जीवन, आणि नदी-नाल्यांचे मार्गक्रमण हे सर्व व्यवस्थित चालविणारी शक्ति म्हणजे देव होय.

अथर्ववेदामध्ये वरुण हा सार्वभौम शासक नसून, जलाचा नियंत्रक म्हणून दाखविलेला आहे ( अ. वे. ३-३ ). वरुणाचे गुणधर्म दाखविणारी ऋग्वेदामध्ये अनेक सूक्ते आहेत. जसे १-२५, २-२८, ५-८५, ७-८७ इ० पश्चिमेकडील प्राचीन सेमेटिकसंस्कृतीचे म्हणणे असे की, वरुण देवता ही मूळत. त्यांची असून वैदिक आर्यांनी ती आत्मसात केली आहे. महाभारतात वरुण हा चवथा लोकपाल मानला असून अदिति पुत्र आणि जलाचा स्वामी तो मानलेला आहे. तो संसारी दाखविला असून ज्येष्ठा व वारुणी या त्याच्या पत्न्या होत तो लेकुरवाळाही आहे. वरुण हा सागराचा अधिपति मानला असल्याने त्याच्या शुभेच्छा व संरक्षण सदैव पाठीशी असावे, यासाठीच भारतीय नौकादलानेही आपले मानचिन्ह ' शंनोवरुणः ' असे ठेवलेले आहे.

अशा प्रमुख जलदेवतेचे स्मरण संकटकाळी व अवर्षणाचे वेळी भारतीय जनतेने न केले तरच नवल. जनहिताय ही देवता सदैव कृपाळु आहे, हाच पदोपदी अनुभव येतो.

पर्जन्य यावा म्हणून श्रीशंकर भगवानाची जेव्हा आळवणी केली जाते, तेव्हा त्याला 'रुद्राभिषेक माहात्म्य' मध्ये आधार आहे म्हणूनच केली जात असावी शंकर आपली पत्नी पार्वतीला रुद्राभिषेकाचे वर्णन करीत असताना सांगतात की, कलियुगात फार मोठ्या प्रमाणावर धार्मिक कृत्ये करण्यास मानवांना वेळ मिळणार नाही, तेव्हा लघु उपाय म्हणून अनेक दु खावर त्यांनी रुद्राभिषेक निरनिराळ्या वस्तूंनी करणे हा उपाय सांगितला आहे जसे—पाणी, दूध, दही, मध, उसाचा रस इ० —

> पप्रच्छ च लघूपाय दु खनाशाय देहिनाम् ।
> सर्वकर्माणि सन्त्यज्य सुशान्तमनसा यदा ।
> रुद्राभिषेकं कुर्वन्ति दु ख नाशो भवेद्ध्रुवम् ॥ ८ ॥
> जलेन वृष्टिमाप्नोति व्याधिशान्त्यै कुशोदकै ॥ ९ ॥

सततधार जलाने रुद्राभिषेक केला असता पर्जन्यवृष्टि होते या ठिकाणी शंकरांनी दु खहरणाचे जे निरनिराळे उपाय सांगितले, ते करीत असताना अत्यंत श्रद्धावान अंत करणाने, शुद्ध भावनेने ते केले तरच फलप्राप्ति होते शंकरावर जलाचा अभिषेक हे वरवरचे कारण झाले, पण खरोखर म्हणजे तेथे अनन्यभावच कार्य करीत असतो आपण नेहमीचे व्यवहारी उदाहरण घेऊ मुंबई-भुगभागात अनंतराम खेर नावाचे शंकराचे वारे अंगावर असणारे एक गृहस्थ आहेत लेखक त्यांच्याकडे अनेक वेळा गेलेला आहे तेथे असे दिसून येते की, एका भांड्यात विभूति ठेवलेली आहे रोगाची व्यथा दूरी होण्यासाठी, कोर्टात चाललेली केस जिंकण्यासाठी परदेशी जाण्यासाठी प्रवास सुखकर होण्यासाठी इ० इ० अनेक कारणासाठी विभुति दिली जाते कोणी पोटात घेतो, कोणी खोलीत नेऊन फुंकतो, कोणी मस्तकाला लावतो आणि नंतर असे दिसून येते की, ती ती मागसे गुण आला म्हणून सांगतात मराठीत एक म्हण आहे की, '७२ रोगावर औषध मात्र एक ' तेव्हा असे म्हणावेसे वाटते की, अनन्यभावाने शरण जाऊन ती विभूति घेतल्याने गुण आला कोणाला विभूतीने येतो तर दुसऱ्या कोणाला तीर्थाने येतो अगर प्रसादाने येतो भाव आहे तेथेच देव आहे हेच खरे भाव नसला म्हणजे अमृत पाजले तरी गुण येणार नाही म्हणून श्रुति तयार झाली— 'यादृशी भावना कुर्यात् तादृशी फल भवेत ।' पूर्वीचे घरंदाज गृहस्थ वंशपरंपरेने घरात अखंड नंदादीप लावीत असत, त्यामागे भावना हीच होती की, आपली वंशवेल अखंड तेवत रहावी, त्याप्रमाणे त्याची इच्छा पूर्ण होई आणि दत्तकाची गरज भासत नसे

असेच एकदा १९६२ सालच्या ऑगस्ट महिन्यात कोल्हापूर भागात अवर्षण घडले असता, कागल येथील एका इसमाने प्रथम नदीवर स्नान करून नंतर महादेवावर पाण्याची सततधार धरली जोपर्यंत पर्जन्यवृष्टि होणार नाही तोपर्यंत ही सततधार थांबवायची नाही असेच त्याने ठरविले त्याच्या दृढ-निश्चयाचे फल म्हणा अथवा कर्मधर्मसंयोग म्हणा, तिसऱ्या दिवशी जोरदार पर्जन्यवृष्टि झाली आणि सर्वत्र आनंदी आनंद पसरला शेतकरीवर्ग आनंदाने इतका बेहोष झाला की, त्यांनी त्या इसमाची वाजतगाजत मिरवणूक काढली व शंकरा धरणीवर डोके आपटून परमेश्वराचे मनोमन आभार मानले आजच्या विसाव्या शतकात आणि धर्मग्लानीच्या काळात कोणीही विश्वासाने व निर्धाराने परमेश्वराचा धावा केला तर तो भक्ताच्या हाकेला धावून येऊन त्याच्या संकटाचे निवारण करतोच करतो हा केवळ माझाच नव्हे, तर अनेक धार्मिक भक्तांचा स्वानुभव आहे ते दैवी चमत्कार म्हणूनच या घटनेकडे पाहातात पण अधार्मिक आणि अश्रद्ध लोकांना मात्र परमेश्वरी शक्तीचे हे गूढ उकलत नाही व हे असे कसे आणि कोणाच्या प्रेरणेने होते याचे स्पष्टीकरण भौतिक दृष्टिकोनातून त्यांना देता येत नाही

वरील उदाहरणावरून वाचकांच्या ध्यानी येईल की, जलदेवता अस्तित्वात आहेत व त्या आपला प्रभाव नेहमी दाखवीत असतात

आता आपण काही जलदेवतांचा इतिहास पाहू

दिवे सासवड ( पुणे ) येथील ग्रामस्थांनी सन १९६४ साली अवर्षणामुळे ग्रामदेवता कानोबा याला मनोभावे सर्वांनी प्रार्थना केली व कौलप्रसाद घेतल्यावर चारदोन दिवसात भरपूर पाऊस पडेल असा आदेश मिळाला आणि खरोखर त्याप्रमाणे भरपूर पर्जन्याचा वर्षाव झाला

देवाच्या कृपाप्रसादाने भारावलेल्या गावकऱ्यांनी यानिमित्त देवाचा उत्सव साजरा करण्याचे योजिले एका रविवारी घरोघर गोडाचा नैवेद्य तयार झाला आणि देवाला समर्पण करण्यासाठी ते मंदिरात आले असता सुमारे तीन फूट लांबीचा जाडजूड नागराज मंदिराच्या उंबरठ्यावर स्वस्थ पडलेला दिसला भक्तगणांनी त्यास नैवेद्य समर्पण केला आणि त्याला न दुखविता घरोघर परतले रात्री देवाचा छबिना काढण्यासाठी मंडळी पुन्हा जमली, तरी तो नागराज त्याच जागी होता चारपाच ढोल वाजू लागले लेझिमी खळखळल्या, तरी काहीच हालचाल नाही तेव्हा देवाला पुन्हा कौलप्रसाद घेता त्यांना समजले की, ‘ स्वत देवच त्या रूपात तेथे आहे ’ मग काय, सर्व ग्रामस्थांना अत्यानंद झाला

त्यांनी त्या नागराजालाच उचलून पालखीत घातले आणि तीन तासपर्यंत वाजत गाजत त्याची मिरवणूक काढली. या प्रसंगाची अनेक छायाचित्रे घेण्यात आली. पालखीतून परत उवरठ्यावर ठेवल्यावर मात्र कोणालाही न चावता सपणे तो निघून गेला आणि काही वेळाने अदृश्य झाला (केसरी, पुणे ५-८-६४)

भारतामधील सिंधीसमाज 'चाली हो' नावाचा पर्जन्योत्सव करतो. तो श्रावणमास धरून आचरला जातो. या उत्सवाचा प्रमुख देव झुलेलाल अथवा लालसाई आहे. याचा जन्म सन ९५० साली झाला त्या वेळी सिंधप्रांतावर मुसलमानी आक्रमकापासून समाजाला खूप त्रास होत असे, तो याने बराच निवारण केला त्याच्या स्मरणार्थ हा उत्सव होत असतो. एक तांब्याचे भांडे आणि त्यावर नारळ मांडून या प्रतिकाचे पूजन ४० दिवस सतत केले जाते जवळ अखंड ज्योत तेवत ठेवतात पूजक आणि इतर परमभक्त एकभुक्त राहून, अभ्यंगस्नान वगैरे न करता एक वस्त्रावर राहतात. विसर्जनाच्या दिवशी झुलेलालचे प्रतीक म्हणून एक पिठाचा गोळा करून त्याचे पूजन होते नतर वरुणाचे तांब्या नारळ प्रतीक आणि झुलेलाचे पिठाच्या गोळ्याचे प्रतीक, याची एकत्र मिरवणूक काढतात आणि ती समुद्र, नदी, तळे अथवा विहिरीच्या ठिकाणी विसर्जन करतात सिंध प्रांत हा कमी पावसाचा प्रदेश, तेव्हा समारंभ साजरा केला म्हणजे भरपूर पर्जन्य मिळेल अशी त्याची श्रद्धा असते.

(भारतीय संस्कृति कोश, ३/३८८)

धोंडिला जग्या या नावाचा महाराष्ट्राचे काही भागात पर्जन्यासाठी एक विधि आहे अवर्षणाच्या वेळी हा विधि केला असता पाऊस पडतो अशी अनेकांची श्रद्धा आहे. विधि हा असा—कैकाडी जातीच्या मुलाला नग्न करून कमरेतील करदोडा कापून एका मातीच्या भूदेवाच्या मूर्तीवर ठेवतात. त्यानतर तो मुलगा नग्न स्थितीत, मूर्ति डोक्यावर घेऊन गावात घरावर हिंडतो आणि घरोघर त्या मूर्तीवर पाणी घालून मुलाला धान्यही दिले जाते. ही मूर्ति घेऊन फिरत असताना तोंडाने मुलगा ओरडत असतो 'धोंडिलजग्या पौसजग्या' यावरूनच या कार्यक्रमाला तेच नाव प्राप्त झाले आहे.

सन १९६३ साली मिर्झापूर (उत्तर प्रदेश) जिल्हा भागात अवर्षण झाले असता ऑगस्ट महिन्यात पर्जन्य येण्यासाठी स्त्रियांनी कमालच केली म्हणायची त्या भागात अशी रूढि प्रचलित आहे की, स्त्रियानी विवस्त्र स्थितीत आपल्या शेतांची नांगरणी केल्यास आणि वरुणराजाला श्रद्धायुक्त भावनेने हाक दिल्यास पर्जन्यवृष्टी होतेच. त्याप्रमाणे त्यांनी नांगरणी करताच जोरदार पर्जन्यवृष्टि

झाली. हे सत्य आहे. भाविक जनता या कृतीलाच जलदेवतेची कृपा असे मानतात. मग इतर अश्रद्ध याला काहीही म्हणोत अथवा अन्य काही नाव देवोत.

( महाराष्ट्र टाईम्स, मुंबई, दि. ३–८–१९६३ )

कुचविहार प्रांती कोच या जमातीत हीच रूढि प्रचलित आहे. अवर्षणाच्या वेळी कोच-स्त्रिया हुडुमदेवाच्या शेणाच्या दोन मूर्ति तयार करून, रात्री शेतात नेऊन ठेवतात आणि नंतर विवस्त्र होऊन त्याच्या भोवती नृत्य करतात. या कृतीने पर्जन्यवृष्टि लवकर होते अशी त्यांची धारणा आहे.

( भा. सं. को., २–५५६ )

पाऊस पडून पीकपाणी उत्तम यावे, या हेतूने हिमालयाच्या तराईत व वरीलप्रमाणे अन्य ठिकाणीही, शेतकरी बायका रात्री नग्न होऊन नृत्य करतात. शेतात नागर धरतात, अगर नदीमध्ये तांदुळाचे पीठ टाकतात. नग्नावस्थेतील आणखीही अनेक प्रयोग आहेत. विवस्त्र स्थितीत गंडा तयार करून बांधणे, अन्न शिजवून खाऊ घालणे म्हणजे ताप उतरतो. पुत्रप्राप्तीसाठी ग्रामीण भागातील स्त्रिया विवस्त्र स्थितीत विहिरीच्या काठावर बसून जप करतात अगर अमावास्येच्या रात्री नग्न स्थितीत चव्हाट्यावर जाऊन तेथे वड, पिंपळ, आंबा इ० पाच झाडांची पाने टाकतात. गुरांचे रोग बरे करण्यासाठी मांत्रिक हातात गवताची पेटलेली चुडी घेऊन, नग्नस्थितीत जनावराभोवती फेऱ्या घालतो. मुलाच्या डोळ्यांतील फुलाचा नाश करण्यासाठी त्याचा मामा नग्नस्थितीत अरणीच्या मण्याची माळ त्याच्या गळ्यात घालतो. मंत्राचा उपयोग करताना काही मांत्रिक नग्न होऊन स्मशानात जाऊन साधना करतात. एरव्ही मंत्रसामर्थ्य प्राप्त होत नाही, अशी त्यांची धारणा आहे. मारुती, भैरव, यक्षिणी यांची कृपा संपादन करण्यासाठी नग्न होऊन पूजन करावे अशी समजूत आहे. इ० इ०.

प्राचीन साहित्यात विवस्त्र स्त्री-देहाची काव्यमय वर्णने आहेत. कलेच्या क्षेत्रात ती विलोभनीय रूपात साकार झालेली आहे. नग्न स्त्री-पुरुषांची असंख्य शिल्पे आणि मूर्ति आपण पाहतो. अनेक जैन तीर्थंकराच्या मूर्ति याच अवस्थेत असाव्यात असा त्यांचा दंडक आहे. श्रवणबेळगोळ येथील भव्य मूर्ति नग्नावस्थेतच आहे. यावरून असे अनुमान निघते की, वेदकाली किंवा नंतर नग्नावस्था ही अदर्शनीय मानली जात नव्हती. शाक्तपंथीय तांत्रिक तर नग्न मूर्तीचे पूजनच उत्कृष्ट समजतात. धर्मशास्त्रात थोडा निषेध असला तरी अनेक साधु व दिगंबर जैन पंथीय साधु नग्नच राहतात.

आपणाला हे माहीत आहे की, प्रारंभीच्या काळात मानव नग्नावस्थेत रहात असे आणि सर्व नित्याचे व्यवहार करीत असे. अद्यापही अनेक आदिवासी जमाती नग्नस्थितीत आढळतात उघड्या शरीराची पवित्रता जास्त असावी आणि त्या स्थितीत आचरलेली कर्मे लवकर फलदायी होतात ही पूर्वीची रूढि आजही प्रचारात आणीत असावेत श्रद्धा आहे तेथे देव आहे नग्नता श्रद्धेच्या पोटी वरील कार्ये आचरणारे आहेत आणि देवही त्याचा हट्ट पुरवतो, असे समजावयास पाहिजे या स्थितीत कर्म आचरणे हे एक प्रकारचे तपच आहे आणि निष्ठेने तप केल्यावर त्याला फलप्राप्ति निश्चितपणे मिळते, हे आधुनिक युगातील सप, सत्याग्रह, घेराओ याच्या प्रयोगावरूनही आपण निश्चितपणे म्हणू शकतो याच दृष्टिकोनातून पर्जन्यवृष्टीसाठी केलेल्या प्रयोगाकडे पाहिले असता, आपणास आश्चर्यकारक व चमत्कारिक वाटण्याचे मुळीच कारण नाही

(भा. स नो ४।६६४)

इंग्लंडमध्ये पूर्वी एका परगण्याच्या राजाने जबरदस्त कर बसविला तो अन्यायी कर कमी करावा म्हणून जनतेने राणीची परोपरीने विनती केली राजाने राणीला पेच टाकला की, ती नग्नावस्थेत घोड्यावरून शहरात फेरफटका करील, तर कर रद्दबादल केला जाईल आपल्या प्रजेच्या हितासाठी राणीने तेही दिव्य केले आणि कर कमी झाला पण जनतारूपी तिच्या पुत्रानी या वेळी स्वयस्फूर्तीने आपली घरे, दरवाजे बंद करून घेतले आणि दिव्य पुरे करण्यास राणीला सहाय्य केले विवस्त्रस्थितीत आचरलेल्या तिच्या तपाला याप्रमाणे फल प्राप्त झाले

१. गगादेवी

वियद्व्यापी तारागणगुणितफेनोद्गमरुचि.।
प्रवाहो वारा य पृषतलघुदृष्ट शिरसि ते ॥
जगद्द्वीपाकार जलधिवलयं तेन कृतमि-
त्यनेनैवोन्नेय वृतमहिमदिव्य तव वपु ॥ १७ ॥

पुष्पदत नावाच्या गधर्व राजाने सकटातून आपली सुटका करून घेण्यासाठी शकराची जी स्तुति केली तिला ‘ महिम्नस्तोत्र ’ असे म्हणतात या महिम्न स्तोत्रात एकुण ४३ श्लोक आहेत त्यामधील गंगेसबंधीचा श्लोक १७ वा आहे वरील श्लोकाचा भावार्थ असा की, सुरलोकीची ही गगादेवी अतराळामध्ये स्वैरपणे वावरत असताना तिला ‘ आकाशगगा ’ असे सबोधिले जाते जल प्रवाहाच्या स्वैर खळखळाटाने उत्पन्न होणाऱ्या शुभ्र फेसाने ती तारागणे झाकून

टाकते त्या फेसाच्या धवलतेत तारागणांनी आपला प्रकाश मिसळविला म्हणजे मूळचा शुभ्रपणा द्विगुणितच होतो अंतराळामध्ये अनिर्बंधपणे संचार करणारी ही गंगा जेव्हा सगरवंशीय राजाच्या विनंतीवरून भूतलावर येण्यास निघाली, त्या वेळी तिच्या प्रवाहाचा जोर भूपृष्ठाला सहन न झाल्याने, देवांच्या विनंतीवरून शंकरांनी तो प्रवाह आपल्या मस्तकावर घेण्याचे मान्य केले अंतराळात भव्य प्रवाहाने वाहाणारी ही गंगा शंकराच्या मस्तकावर येताच बिंदुरूप होऊन त्यांच्या जटेमध्ये लुप्त झाली समुद्रमंथनातून निघालेले हलाहल विष 'बहुजनहिताय बहुजनसुखाय' शंकरांनी प्राशन केलेले असल्यामुळे त्यांच्या अंगाची व शीर्षाची एकसारखी लाहीलाही होत होती, ती गंगेच्या शीतल प्रवाह मस्तकी उतरल्यामुळे बरीचशी कमी झाली

परंतु भगीरथ राजाला ती सुरगंगा आपल्या शापित पितरांना मुक्ति मिळण्यासाठी भूतलावर हवी होती म्हणून त्याने पुन्हा भूतलावर अवतरण्यासाठी अनेक वर्षे तप केल्यावर व गंगा त्याला प्रसन्न झाल्यावर प्रवाहपतीत होण्याची तिला विनंती केली तेव्हा भगीरथाच्या पितरांना मुक्ति देण्यासाठी आणि भूमी भाग समृद्ध करण्याच्या हेतूने जटेमध्ये बिंदुरूपाने वास करणारी गंगा अवाढव्य स्वरूपात भूपृष्ठावर अवतरली व सर्व भूभाग द्वीपाकृतींनी वेढून टाकला म्हणजे ठिकठिकाणी असलेले सागराचे खाडे तिने आपल्या प्रवाहाने भरून टाकले यावरून गंगेचे लिंगमय शरीर किती विस्तृत असले पाहिजे ह्याची कल्पना करता येईल पुराणामध्ये अशी कथा आहे की, अगस्तिमुनींनी सप्तसागराचे पाणी पिऊन टाकले आणि त्यामुळे ते सर्व कोरडे पडलेले ठिकठिकाणचे सागराचे खड्डे गंगेने आपल्या प्रवाहाने भरून काढले यास्तव जंबुद्वीप, शाल्मलीद्वीप इत्यादि नवद्वीपा कार भूभाग तयार झाला या पुराणकथेला उद्देशूनच पुष्पदंताने काव्यरचना केली असली पाहिजे या वर्णनात विशेष लक्षात घेण्यासारखी गोष्ट म्हणजे पूर्वीच्या वाळूच्या घड्याळाप्रमाणे अथवा शंकराच्या डमरूच्या आकाराप्रमाणे सुरलोकात असलेली ही गंगा आणि भूतलावर विशाल होऊन पळणारी ही भागीरथी हिचा प्रवाह शंकराच्या मस्तकावर इतका आकुंचन पावलेला आहे की, बिंदुरूप होऊन तो त्यांच्या जटेत लपून बसला आहे आकाशात हिला मंदाकिनी तर भूभागावर भोगावती असे म्हणतात

गंगानदीच्या उत्पत्तीसंबंधी ब्रह्मवैवर्त पुराणामध्ये पुढीलप्रमाणे कथा आढळते एकदा ब्रह्मदेव गोलोकाकडे जात असता वाटेत त्यांना मोहिनी नावाची एक अप्सरा भेटली ब्रह्मदेवाचे तेजस्वी स्वरूप पाहून तिला मदनाची बाधा झाली परंतु ब्रह्मदेवाने तिला सदुपदेश करून, तिच्या मनांतुन उसळलेल्या

कामज्वालाचा दाह थोडा कमी करून तो पुढे निघून गेला. त्याच वेळी मोहिनीला रंभेचे शब्द आठवले, 'जो पुरुष आपल्याला आवडला त्याच्याकडे जाऊन आपली कामवासना पूर्ण करून घेतल्याशिवाय राहू नका. कारण अप्सरा म्हणजे जवळजवळ वेश्याच होत. पातिव्रत्य वगैरे शब्द त्याच्या कोशात औषधालाही सापडत नाहीत. केवळ स्वार्थबुद्धीने परपुरुषाला आपल्या जाळ्यात पकडणे हेच तिचे एकमेव ध्येय होय.' या उद्गाराची आठवण होताच मोहिनीच्या मनातील कामभावना 'भूया एव अभिवर्धते' या न्यायाने दुप्पट प्रज्वलित झाली आणि कामदेवासह ती गोलोकात ब्रह्मदेवाला भेटली. ब्रह्मदेवाला तिने शरीरसुख देण्याची विनती केली, पण ब्रह्मदेव काही तयार होईना ब्रह्मदेवाचे मन वळविण्याचे सर्व प्रयत्न निष्फळ ठरल्यावर शेवटी रागावून तिने त्याला शाप दिला, 'भूतलावर तुझी पूजा कोणीही करणार नाही'

हे ऐकताच म्लानवदन होत्साता ब्रह्मदेव गोलोकप्रमुख हरीला भेटण्यास गेले. इतर देव त्याची वास्तपुस्त करीत असता दहा मुखाचा दुसरा एक ब्रह्मा तेथे आला थोड्या वेळाने शभर मुखाचा आणि एक हजार मुखाचा असे दोन ब्रह्मा तेथे येऊन आपापल्या जगताचा वृत्तान्त हरीला कथन करून निघून गेले. हे पाहिल्यावर मात्र चारमुखी ब्रह्मदेवाचा गर्वपरिहार झाला. त्याला कळून चुकले की, वैकुंठवासी हरि केवळ एकाच जगताचा पालनकर्ता नसून अनेक विश्वाचा विश्वंभर आहे. त्याच वेळी शकर, विष्णु इत्यादि देव तेथे उपस्थित झाले आणि हरीला प्रिय असलेले रासक्रीडेतील एक गाणे त्यानी साभिनय म्हणून दाखविले. ते गाणे ऐकून सर्व उपस्थित मडळींना अत्यानद झाला. सर्वांच्या नेत्रातून आनदाश्रु वाहू लागले. त्या अश्रूनी सारा वैकुंठलोक जलमय झाला ते पाहताच हरीने त्वरितच गगादेवीची मूर्ति उत्पन्न केली आणि तिला ते सारे पाणी आवरून घेण्याची आज्ञा दिली त्याप्रमाणे तिने इतस्तत पसरलेले पाणी आवरून घेतल्यावर हरीने तिला वैकुंठामोवतीच जागा दिली देवांच्या अश्रुमय पाण्यापासून गगादेवीची उत्पत्ति झाली, म्हणून तिला 'सुर निम्नगा' असे नाव मिळाले. हरीच्या चरणापासून तिचा उगम झाला म्हणून तिला 'विष्णुपदी' असेही एक नाव मिळालेले आहे.

शुभ्र, दुग्धमय आणि प्रचंड लाटांनी युक्त असे आहे. म्हणजेच हे वर्णन आकाशगंगेला लागू होण्यासारखे आहे. भगिरथाने आपल्या पराक्रमाच्या जोरावर गंगेला स्वर्गलोकातून भूलोकी आणली म्हणून तिला ' भागिरथी ' हे नामाभिधान प्राप्त झाले. पूर्व दिशेकडे वाहत असताना मार्गामध्ये यज्ञ करीत असलेल्या जन्हू राजाने, त्याच्या यज्ञाला अडथळा आणला म्हणून, राजाने तिचे जल पिऊन टाकले आणि नंतर गुडघ्यामधून तिला वाट करून दिली, यास्तव तिचे नाव ' जान्हवी ' असे पडले. ( ब्रह्मवैवर्तपुराण, अध्याय ३५, पृष्ठ १ ते ७ )

दशम्यां शुक्ल पक्षे तु ज्येष्टे मासे कुजेऽह्नि ।
अवतीर्णा यतः स्वर्गात् हस्तर्क्षे च सरिद्वया ॥

जेष्ठ मासी, शुक्ल पक्षी, दशमी तिथीच्या दिवशी, मंगळवारी, हस्तनक्षत्र योगावर गंगा स्वर्गातून धरणीवर अवतरली असे पुराणकारांचे मत आहे.

रघुवंशीय सगरराजाने अश्वमेध यज्ञ करण्याचे आरंभले. त्यास्तव त्याने यज्ञीय अश्व सोडल्यावर पुरंदर नावाच्या इंद्राने त्यास अडवून कपिल मुनींच्या आश्रमाजवळ बांधून ठेवले. अश्वाच्या संरक्षकांना असे वाटले की, हा घोडा कपिलमुनींनीच बांधून ठेवलेला आहे. म्हणून त्यांनी त्यांची तपस्या भंग केली. तेव्हा कपिलमुनींनी सगर राजाला शाप दिला की, ' तुझे साठ हजार पुत्र रौरवात पडतील. ' पुढे खरी परिस्थिति मुनींना समजल्यावर आणि त्याच्याजवळ उःशाप मागितल्यावर मुनींनी सांगितले की, ' स्वर्गीच्या गंगा नदीच्या प्रवाहात स्नान केल्यावर ते पुत्र स्वर्गी जातील. ' तेव्हा स्वर्गीची गंगा भूपृष्ठावर आणण्यासाठी सगर राजाने तपश्चर्या चालविली. परंतु त्याच्या हयातीत त्या तपस्येचा काहीच उपयोग झाला नाही. पितरांना उत्तम गति मिळावी म्हणून सगर राजाचे वंशज अंशुमन, दिलीप, भगिरथ इत्यादिकांनी ती तपश्चर्या पुढे चालविली. या प्रयत्नांत अखेर भगिरथाला यश येऊन सुरलोकीची गंगा भूपृष्ठावर आली.

परंतु भूपृष्ठावर येते वेळी गंगादेवीने प्रश्न केला की, ' माझा वेग साहण्यास भूतलावर कोण समर्थ आहे ? '

कोऽपि धारयिता वेगं पतंत्या मे महीतले ।
अन्यथा भूतलं भित्वा नृप यास्ये रसातलम् ॥ ( ९।९-४ )

या प्रश्नाचे भगीरथाने उत्तर दिले. ते असे की, ' तुझा वेग सहन करण्यास श्रीशंकर समर्थ आहेत. '

साधवो न्यासिन शान्ता ब्रह्मिष्ठा लोकपावना ।
हरन्त्यघ तेऽङ्गसङ्गात्तेष्वास्ते ह्यघभिद्धरि ॥
(श्रीमत भागवत ९।९ ६)

हिमालयाच्या पर्वतराजीमध्ये समुद्रपातळीपासून १०३०० फूट उंचीवर गंगोत्री हे क्षेत्र आहे सगर राजानी गंगेचा प्रवाह ज्या हिमालयाच्या बोगद्यामधून दक्षिणेकडे वळविला, त्या क्षेत्राला गंगामुख अथवा गोमुख म्हणतात हे स्थान गंगोत्रीपासून १८ मैलावर आहे गंगोत्रीपासून निघून गोमुखाच्या ठिकाणी स्नान करून परत येण्यास बिकट मार्ग असल्याने साधारणत तीन दिवस लागतात तपस्वी लोकांचे भूजवन याच मार्गावर आहे गोमुखाजवळचा प्रदेश फारच रमणीय आहे आणि अनेक पवित्रस्थानांनी वेढलेला आहे तपोवन मैदान, शिवलिंग शिखर, तीन भगिरथ शिखरे, पूर्व बाजूला स्वर्गारोहण शिखर व सुमेरु, दक्षिणेकडे नारायण पर्वत आणि पश्चिम बाजूला २२ हजार फूट उंचीचा नीलकंठ पर्वत अशी स्थाने आहेत परंतु हा मार्ग बिकट असल्याने व सर्वांनाच तेथपर्यंत जाणे शक्य नसल्याने आद्यशंकराचार्यांनी असा समन्वय घालून दिला आहे की, गंगास्नान, गंगापूजनविधि व इतर धार्मिक आचार गंगोत्री या क्षेत्रीच करावेत

आकाशीची गंगा भूतलावर अवतरल्यावर शंकराच्या जटेमध्ये गुप्त झाली भगिरथाने पुन्हा तपश्चर्या करून प्रार्थना केल्यावर तिला खाली सोडण्यात आले व ती बिंदुसरोवरात प्रथम उतरली या सरोवरातून सात प्रवाह सुरू झाले ह्लादिनी, पावनी व नलिनी हे पूर्व दिशेला गेले सुचक्षु, सीता आणि सिंधु पश्चिमेकडे गेले आणि गंगा प्रवाह खाली आला

विघ्नै पुन पुनरपि प्रतिहन्यमाना ।
प्रारब्धमुत्तमजना न परित्यजन्ति ॥ (भर्तृहरी)

आपल्या अंगीकृत कार्यात जरी शेकडो विघ्ने आली, तरी उत्तम दीर्घोद्योगी पुरुष हाती घेतलेले काम अर्धवट सोडीत नाहीत सगरापासून भगिरथापर्यंत अनेक राजांनी अंगीकृत कार्य तडीस नेण्यास अतिशय परिश्रम केले, त्याचे हे उत्तम उदाहरण आहे

गंगोत्री या क्षेत्री गंगादेवीचे मंदिर असून ती मूर्ति आद्यशंकराचार्यांनी स्थापन केली असे म्हणतात पण साम्प्रतचे मंदिर मात्र १८ व्या शतकातील आहे ज्या शिळेवर बसून राजा भगिरथ याने तपश्चर्या केली, ती शिळा आजही पाहता येते त्याच्या पलिकडे रुद्रशीळा असून, यावर उभे राहून सुमारे ४० फूट

उंचीवरून या ठिकाणी खाली पडणारा गंगेचा जलौघ शंकरानी आपल्या मस्तकी धारण केला असे वर्णन केले जाते पण प्रत्यक्षात हा प्रपात मात्र येथून अर्धा मैल अंतरावर असून, त्याला गौरीकुंड म्हणतात. गौरीकुंडाचे ठिकाणी दृश्य असे की, मध्यभागी शिवलिंग असून त्यावर गंगेचा जलौघ पडत असतो

गोमुख हे श्रीमुख पर्वतामध्ये कोरलेले आहे. जो भक्त या क्षेत्री त्रिरात्र उपवास करील आणि श्रद्धेने गंगेचे पूजन करील, त्याला वाजपेय यज्ञाचे फल मिळून तो ब्रह्मरूप होईल, असे महत्त्व महाभारतामध्ये सांगितले आहे.

गंगोत्री क्षेत्री जी गंगादेवीची मूर्ति बसविली आहे आणि जिची छायाचित्रे अनेक यात्राकंपन्या प्रवासी लोकाना वाटतात, त्यावरून असे दिसते की, देवी चतुर्भुज असून ती आसनस्थ आहे यमुनोत्तरी क्षेत्री यमुनादेवीची मूर्तीही त्याच स्वरूपाची दिसते. देवीची ही स्वरूपे पुराणातील ध्यानवर्णनाप्रमाणे असावीत

गंगा नदीच्या उत्पत्तीविषयी श्रीमत् भागवतातील कथा अशी की, वामन-रूपी विष्णूने बळीराजाकडून दानाने तीन वर घेतले. उजव्या पायाने सर्व ब्रह्मांड व्यापले, तेव्हा पायाच्या अंगठ्याच्या नखाचा धक्का लागून ब्रह्मांड कटाहाची वरील कवची फुटली. तेथे एक छिद्र निर्माण झाले त्यातून एक जलधारा वर उफाळली आणि विष्णूच्या पायाला स्पर्श करून वर ब्रह्मांडात आली पायाला स्पर्श करून आली म्हणून त्या जलधारेला 'भगवत्पदी' असे नाव प्राप्त झाले. भूतलावर ही जलधारा आल्यावर तिला भागिरथी नाव मिळाले.

( भागवत, ५–१७ )

गंगोत्री नाव पडण्याचे कारण असे देतात की, या ठिकाणी प्रवाह उत्तराभिमुख झालेला आहे. अमर कोशामध्ये गंगा नदीची नावे पुढीलप्रमाणे दिली आहेत—विष्णुपदी, जन्हूतनया, सुरनिम्नगा, भागिरथी, त्रिपथगा, त्रिस्रोता, भीष्मसू इ० इ०. तसेच स्कंद पुराणामध्ये गंगा सहस्रनाम स्तोत्रावली आहे त्यामध्ये तिला ओंकाररूपिणी, अमृतस्रवा, आश्चर्यमूर्ति, गंभीरांगी, जगदानंद जननी, जटातटविहारिणी इ० इ० आहेत

'ॐ नमो भगवत्यै दशपापहरायै गंगायै नारायण्यै रेवत्यै शिवायै दक्षायै अमृतायै विश्वरूपिण्यै नंदिन्यै ते नमो नमः ' हा गंगा मंत्र आहे.

( जीवन विकास, नागपूर, जुलै १९६६ )

या ठिकाणी एक अशी शंका उद्भवते की, सगर राजाचे साठ हजार पुत्र म्हणजे कोणते? महाभारतामध्ये त्यांच्या उत्पत्तीची कथा जरी दिलेली असली तरी अश्वमेध यज्ञाच्या अश्वाच्या संरक्षणासाठी जे सैनिक होते, तेच तर या

ठिकाणी अभिप्रेत नाहीत ना? यज्ञाश्वाचे संरक्षण करण्यास जे राजसैनिक होते, ते जर मुनींच्या शापाने जळून गेले असतील, तर तेही सगराचेच पुत्र होत असे म्हटले पाहिजे किंवा याचाच अर्थ असा की, प्रत्यक्ष सगर राजाचे साठ हजार पुत्रही यज्ञाश्व संरक्षक म्हणून असण्याचा संभव आहे. येथें पुत्र याचा अर्थ प्रजा असाही घेता येईल.

केवळ भारतीयच या गंगाप्रवाहाला पवित्र मानतात असे नव्हे, तर अन्यदेशीय आणि अन्यधर्मीयही ती पवित्र मानतात, याची अनेक उदाहरणे दाखविता येतील. गंगेच्या पवित्र प्रवाहात स्नान करून पावन झाल्याने मोक्ष मिळतो, ही भावना भारतीयांच्या मनात वास करून आहेच. परंतु जेथे गंगेचा प्रत्यक्ष प्रवाह उपलब्ध नाही, त्या ठिकाणी स्नान करताना गंगादेवीचे नुसते नाव उच्चारून स्नान केले तरी तेच पुण्य लाभते, इतपत तिला पावित्र्य प्राप्त झालेले आहे.

गंगा गंगेति यो ब्रूयात् योजनानां शतैरपि ।
मुच्यते सर्वपापेभ्यो विष्णुलोकं स गच्छति ॥

भावार्थ असा की, शेकडो योजने दूर राहूनही गंगा गंगा असे जो नाव उच्चारील, तो सर्व पापांपासून मुक्त होऊन अंती विष्णुलोकाप्रत प्राप्त होईल.

दूरदूरचे भाविक लोक गंगेचे स्नान केल्यावर एका छोटयाशा भांड्यात गंगेचे पवित्र जल भरून घेतात आणि ते आपल्याबरोबर घरी आणतात. अशा वेळी इतर बांधवांना गंगेचे पवित्र जल प्राशन करण्यास मिळावे म्हणून 'गंगापूजनाचा' विधी मोठ्या समारंभाने केला जातो. ब्राह्मण-सुवासिनी भोजन होते आणि इतरांना प्रसाद वाटला जातो. अशी या गंगाजलाची महती आहे! यामुळे दूरदूरच्या खेडोपाड्यापर्यंत गंगानदीचे नाव माहीत नाही असे एखादे ठिकाण अथवा असा एखादा मनुष्य सापडणे अशक्यच आहे.

श्रीसमर्थ रामदासस्वामींनी दासबोधामध्ये गंगेचे वर्णन खालीलप्रमाणे केलेले आढळते—

चंचल नदी शुभ्र गंगा । स्मरणें पावन करी जगा ।
प्रचित रोकडी पाहां गा । अन्यथा नव्हे ॥
केवळ अचंचळी निर्माण झाली । अधोमुखे वाहू लागली ।
अखंड वाहे परी देखली । नाहींच कोणी ॥

गंगेवरील भारतीयांच्या श्रद्धेमुळे तिचे मोठेपण सिद्ध होते, असे मात्र नव्हे. गंगाजलाचे महत्त्वच असे आहे की, प्रत्येकाला तिचे श्रेष्ठत्व पटलेच पाहिजे.

भांडारकर इन्स्टिटयूट, पुणे, या संस्थेमध्ये एक हस्तलिखित ग्रंथ आहे त्यामध्ये असे विधान आढळते की,

"गंगाजल हे पथ्यकर, अन्न शिजविण्यास उत्तम, पचनशक्ति वाढविणारे, तहान शमविणारे, भूक वाढविणारे, बुद्धीची ताकद वाढविणारे आणि उत्साहवर्धक आहे"

अनेक पाश्चिमात्य रसायनतज्ज्ञानी गंगेच्या पाण्याची विज्ञानशास्त्राच्या दृष्टीने चिकित्सा करून हे पाणी उत्तम कसे याचे विवेचन केले आहे

भारतामधील एके काळचे सरकारी रसायन परीक्षक श्रीयुत ई एच् हॉकिन्स म्हणतात,

'गंगाप्रवाहाला मिळणाऱ्या एका नाल्यामध्ये मलेरियाचे जंतु असताना तेच पाणी गंगाप्रवाहात मिसळून गेल्यावर थोड्या अंतरावर गंगेचे पाणी तपासले असताना ते जंतु आढळत नाहीत कॉलरा रोगाने मृत झालेला मनुष्य एकदम त्याचे प्रेत गंगाप्रवाहात टाकले असताना आणि काही अंतरावर गंगाजल तपासले असताना तेथे कॉलऱ्याचे जंतु आढळत नाहीत याचाच अर्थ असा की, वरील रोगाचे जंतु जरी गंगाप्रवाहात टाकले अथवा इतर लहान लहान ओघातून मिसळले तरी ते अशुद्ध पाणी गंगारूप झाल्यावर त्या रोगाचे जंतु मरून जातात, त्याची नावनिशाणीही शिल्लक राहात नाही असा त्या पाण्याचा गुण आहे'

प्रसिद्ध फ्रेंच प्रवासी मार्क ट्वेन व टॅव्हर्नियर म्हणतात की,

'मृत्तिकेने अंगाचे मर्दन केले आणि नंतर गंगाजलाच्या पाण्याने स्नान केले तर सर्व रोग बरे होतात'

ज्यांना या गंगाजलाचे महत्त्व पटलेले आहे अशी अनेक माणसे सतत गंगाजलाचा उपयोग करीत असत अथवा अजूनही करतात मोंगलवंशीय बादशहा अकबर याच्या पदरी असलेला अबुल फजल हा इतिहासकार आपल्या 'ऐने अकबरी' या ग्रंथात म्हणतो,

'अकबर बादशहा गंगाजलाला अमृत म्हणत असे आणि घरीदारी प्रवासात कोठेही असला तरी तो गंगाजलाचाच उपयोग करी'

बर्नियर नांवाचा प्रवासी औरंगजेब बादशहाच्या दरबारी सन १६५९ पासून आठ वर्षे वास करून होता. तो एके ठिकाणी लिहितो की,

औरंगजेब बादशहा आपल्या भोजनात व स्वयंपाकाठीही गंगाजल वापरीत असे.'

कॅ० एडवर्ड मूर या नांवाचा एक ब्रिटिश सेनानी टिपू सुलतानाबरोबरच्या एका पत्रात लिहितो की,

'टिपू सुलतान जरी दक्षिण भारतात राहात होता तरी पिण्यासाठी तो सतत गंगाजलाचाच उपयोग करी. राजधानीत असो अथवा लढाईवर असो, तो जेथे असेल तेथे उंटावरून गंगाजल पुरविण्याची व्यवस्था त्याने केलेली होती.'

वाराणसी येथील हिंदू विश्वविद्यालयाचे माजी संचालक पंडित मदनमोहन मालवीय सन १९३२ साली 'राउंड टेबल कॉन्फरन्स' साठी विलायतला गेले असता दररोज त्यांना गंगाजल मिळेल अशी व्यवस्था त्यांनी केलेली होती.

एकदा वाराणसी क्षेत्री गंगाघाटावर मी स्नान करीत असता मला एक विचित्र परंतु चमत्कारिक गोष्ट अनुभवण्यास मिळाली. या ठिकाणी गंगा नदीला भक्तलोक अनेक प्रकारची फुले अर्पण करतात. त्या फुलांत जर बेलाची पाने असतील तर ती तेवढी बुडतात, परंतु इतर फुले पाण्यावर तरंगतात. तसेच अलाहाबाद येथे गंगा, यमुना, सरस्वती संगमाच्या ठिकाणी जर सौभाग्यवती सुवासिनींनी थोडेसे वेणीचे केस पाण्यात टाकले तर ते केस पाण्यात गडप होतात, पाण्यावर तरंगत नाहीत. इतर नद्यांच्या बाबतीत मात्र असा प्रकार आढळून येत नाही, ही मोठी आश्चर्याची गोष्ट आहे. गंगाजलाचे महत्त्व पटण्यास वरील उदाहरणे पुरेशी आहेत.

आधुनिक काळातील विद्यार्थी माणसे जर गंगाजलाचे महत्त्व जाणतात तर पूर्वीच्या ऋषीमुनींनी त्याची महती गायिली असल्यास त्यात नवल ते कोणते! हिमालयाच्या ज्या प्रदेशातून हा प्रवाह वाहतो तेथील अनेक वनस्पतींचे व भूस्तराचे गुणधर्म त्या प्रवाहात मिसळले असल्यामुळे ते पाणी जंतुनाशक झाले आहे आणि म्हणूनच गुणवर्धक आहे. काशीयात्रा करणारा भारतीय तेथील पाणी बंद कलशात आणून ते वर्षानुवर्षे आपल्या घरी ठेवतो. त्याचे नित्य पूजन करतो. अंतकाळी गंगेचे चार थेंब मुखात पडले, की कृतकृत्य होतो. अनेक वर्षे राहूनही ते जल जसेच्या तसे असते, जंतुविरहित असते. इतर नद्यांचे पाणी असे वर्षानुवर्षे टिकत नाही. म्हणूनच आपल्या पूर्वजांनी या पाण्याचे वर्णन 'औषधी जान्हवीतोयं' अशा यथार्थ शब्दात केलेले आहे.

(श्री. मुं. गं देशपांडे, 'प्रसाद' जुलै १९६१ चा अंक)

गंगा आणि गौरी या दोन्ही हिमालयाच्याच कन्या होत. गंगा ज्येष्ठ आणि गौरी कनिष्ठ. दोघींनीही शिवाबरोबर विवाह केला. याविषयीची पुराणातील कथा अशी की, प्रलयाच्या समयीं सर्व पृथ्वी बुडून गेली, तरी गंगा आपली वाहतच राहिली. थोडी गर्विष्ठ असल्याने तिने असे जगावेगळे वर्तन केले. नंतर मोठ्या अभिमानाने आपला ओलाचिंब केशपाश झाडला तेव्हा त्यातील एक केस कैलास पर्वतावर शिव तपश्चर्या करीत होते, त्यांच्या अंगावर पडला. तपश्चर्येचा भंग करणाऱ्या गंगेला त्याने शाप दिला की, 'पृथ्वीवर जाऊन तिने जन्म घ्यावा.' या शापाने घाबरलेल्या गंगाबाईंनी शिवाची प्रार्थना केली आणि उःशाप मागितला. त्या वेळी शिव म्हणाले मी 'पृथ्वीवर तुझे पाणीग्रहण करीन.' यामुळे ती जेव्हा भगीरथ प्रयत्नाने पृथ्वीवर अवतरली, तेव्हा ती भार्या बनून, त्याच्या जटामध्येच वास्तव्य करून राहिली. गौरीला शिवाचे शिरोभागी गंगेचे राहणे आवडले नाही. त्याचे नेहमी वैर चालू राही. एका मराठी कवीने या कल्पनेवर एक स्त्री गीत रचले आहे. त्याचा पहिला चरण असा की—

> दोघी सवती भांडती, पती भागट मुगा।
> आपसात वर्मे बोलती, गौरी आणि गंगा॥

गंगा ही भीष्माचार्यांची माता आहे हे सर्वश्रुत आहे. एकदा सर्व देव ब्रह्मदेवाकडे गेले असता, गंगेचे वस्त्र सहज वाऱ्याने जरा सरकले तेव्हा सर्वांनी माना खाली घालून्या व पहाण्याचे टाळले. इक्ष्वाकुवंशीय राजा महाभिष, त्या तरुण्या सौंदर्याकडे पाहातच राहिला. ब्रह्मदेवाला राजाचा हा उच्छृंखलपणा आवडला नाही आणि त्यांनी शाप दिला की, 'तू मृत्यूलोकी जन्म पावशील आणि गंगा ही तुझी पत्नी होईल, पण तुला अप्रिय अशाच गोष्टी ती करील.' शंतनू राजा हाच महाभिष राजा होय. झालेला प्रत्येक पुत्र गंगा प्रवाहात बुडवून टाकी. शेवटी आठवा मुलगा भीष्म याच्या वेळी राजाने तिला अडवताच, तो तेवढा वाचला, पण गंगामात्र त्याला सोडून गेली.

( महाभारत आदिपर्व, १०२–१०६ )

याचा भावार्थ असा की, गंगा ही सातप्रवाहांनी भूलोकावर वाहत गेली, आणि ते प्रदेश तिने पावन केले. गंगप्रवाहाच्या अनुषंगाने, प्रजापतीने यज्ञ केला, युधिष्ठिराने राजसूय यज्ञ केला, परिक्षितीने गंगेचे काठी प्रायोपवेशन केले. शिवाचे महादेवीजवळील बीज धारण करून स्कंदाला जन्म दिला, गंगा प्रवाहाने हस्तिनापूर बुडवून टाकले, गंगाकिनारी साडेतीन कोटी तीर्थ आहेत, ती महासागराची पत्नी मानली जाते, इत्यादि पुराणात अनेक कथा आलेल्या आहेत

गंगेची निरनिराळी वर्णने अनेक पुराणातून आली आहेतच, पण महाभारतकार म्हणतात,

> न गंगासादृश्यं तीर्थं न देवः केशवात् परः ।
> ब्राह्मणेभ्यः परं नास्ति एवमाह पितामह ॥ ( वनपर्व ८५।९६ )

भावार्थ असा की, गंगेसारखे पवित्र तीर्थ नाही, विष्णूसारखा देव नाही, ब्राह्मणापेक्षा कोणी श्रेष्ठ नाही असे प्रत्यक्ष ब्रह्मदेवानेच सांगितले आहे. ज्या भूमीतून गंगाप्रवाह वाहतो, तो देश व तिच्या तीरावर असलेली तपोवने ही सिद्धिक्षेत्रेच होत. ही गंगा पृथ्वीवर अवतरल्यापासून, पूर्व सागराला मिळेपर्यंत सर्वत्र सुलभ असली तरी गंगाद्वार, प्रयाग व गंगासागर संगम या तीन ठिकाणी ती दुर्लभ आहे. या तीन क्षेत्री जे भक्त स्नान करतात, ते स्वर्गप्राप्ति करून घेतात आणि जे देह ठेवतात त्यांचा पुनर्जन्म टळतो.

**गंगा मूर्ति**—भविष्य पुराणात गंगादेवीचे ध्यानवर्णन केले आहे.

> चतुर्भुजां त्रिनेत्रां च सर्वावयवभूषिताम् ।
> रत्नकुम्भां सिताम्भोजां वरदामभयप्रदाम् ॥
> श्वेतवस्त्रपरीधानां मुक्तामणिविभूषिताम् ।
> ततो ध्यायेत् सुरूपां च चंद्रायुतसमप्रभाम् ॥

याप्रमाणे मूर्ति बनवावी. गुप्तकाली शिल्पकलेत या स्वरूपाच्या मूर्ति रेखाटण्यात आल्या आणि पुढे हीच कल्पना अनेक गुहा खोदणारांनी अथवा शिल्पकारांनी चालू ठेवली. उदयगिरी, बेसनगर, वेरूळ इ० ठिकाणी या देवतेचे शिल्प पहावयास मिळते.

**जगन्नाथ पंडित**—हा एक मोगल बादशहाचा आश्रित होऊन गेला. त्याचा जन्म शके १४७२ साली आंध्रप्रांती मुंगुंडाग्रामी झाला. पित्याचे नाव पेरूभट व मातेचे नाव लक्ष्मी. त्याच्या पत्नीचे नाव कामिनी व मुलाचे नाव विनायक. लहान वयातच पत्नी मृत झाल्यावर तो भ्रमिष्टपणा करू लागला. या वेळी वडिलांनी त्याजकडून बाला त्रिपुरसुंदरीच्या मंत्राचे १००० सहस्रांचे पुरश्चरण करवून घेतले. या वेळी त्याला देवीने स्वप्नात दृष्टांत दिला की, यापुढे उत्तरप्रांती जा म्हणजे भरभराट होईल. इतकेच नव्हे, तर प्रसादाचा विडा देवीने स्वतः त्याच्या मुखात घातला. त्याला अशादी आशीर्वाद दिला की, 'तुझी गतपत्नी, पुन्हा कामिनी रूपाने पूर्ण सुसंस्कृत झालेली मिळेल व तिच्याबरोबर तुझा विवाह होईल.'

वडिलांचा निरोप घेऊन तो उत्तरेला निघाला. प्रथम जयपूर येथे आश्रय मिळाल्यावर, दिल्ली शहरी जाऊन तेथील प्रमुख काजीकडे सर्व मुंडण करून घेऊन फकीर वेषाने राहून, सर्व मुसलमानी धर्मतत्त्वे त्याने आत्मसात केली. आणि शेवटी उघड वादविवादात त्या काजीला जिंकले. त्या वेळेपासून अकबर बादशहा त्याच्यावर खूष झाला व त्याने आपल्याजवळ ठेवून घेतले. त्या ठिकाणी जयपूरचा राजा भगवानदास याची बहीण भानुमती हिचा विवाह बादशहाबरोबर झालेला असून, त्यांना भामिनी नावाची सुसंस्कृत कन्या होती. घरात सर्व हिंदु पद्धति असल्याने, ती जगन्नाथजवळ संस्कृत शिकण्याला येत असे. याच मुलीला लवंगी हे आईचे लाडके नाव होते.

## अकबराचे हिंदु आचरण

हिंदु जनतेचे प्रेम संपादन करण्यासाठी व घरातील हिंदु वातावरणामुळे बादशहा स्वतः कपाळाला गंध लावणे, देवाचे तीर्थ घेणे, हिंदु देवतांची पूजा करणे, देवापुढे नारळ फोडणे इ० वर्तन करीत असे. इतकेच नव्हे, तर त्याने राज्यात गोहत्याबंदी, गोमांस भक्षण, दाढी ठेवणे, चुलत बहिणीबरोबर विवाहबद्ध होणे, नमाज पढणे, मक्केची यात्रा करणे इ० रूढींवरही बंदी घातली होती. अकबर बादशहा हिंदु धर्माबरोबर इतका निगडित का झाला, याची मीमांसा 'साईनाथ कथा करंडक' या ग्रंथात अशी दिली आहे की, पूर्वी मुकुंदबाबा नावाचा एक मोठा तपस्वी होऊन गेला. यज्ञ चालू असता काही अपरिहार्य कारणामुळे, होमकुंडात उडी घेऊन त्याने आपला देह विसर्जन केला, तोच हा अकबर बादशहारूपाने जन्माला आला.

अकबराच्या दरबारी अनेक मुसल्मान पंडित होते, त्यामध्ये दिरगखान नावाच्या पंडिताचे भामिनीवर प्रेम होते, पण विवाहाची समस्या सोडविण्याचा --निमिदरू निमे बरु -- पण जगन्नाथाने जिंकल्यामुळे, बादशहाने हिंदुपद्धतीने देवक ठेवून, त्यांचा विवाह लावून दिला. वाराणशीचे अप्पय्या दीक्षित व इतरांना हा यावनी विवाह मान्य नसल्यामुळे, त्यांनी जगन्नाथाचा खूप छळ केला. अकबरा नंतर जहांगीरच्या कारकीर्दीत जगन्नाथांनी शहर सोडले. पण पुन्हा शहाजानने मानाने त्यांना बोलावून घेतले आणि त्यांची रौप्यतुला करून त्यांना ते धन बक्षीस म्हणून दिले. परंतु जगन्नाथ स्वजनांच्या छळाने पूर्ण विटला होता. तेव्हा त्याने दरबारी राहणे नाकारले व काशीला आपल्या पत्नीसह गेला.

आपलेच जातभाई छळ करू लागले म्हणजे ते कोणत्या पराकोटीला जातात याचे उत्कृष्ट उदाहरण म्हणून मुद्दाम देत आहे. विरोध व छळ करूनही जगन्नाथ आपली यावनी पत्नी त्यागीत नाही म्हणून हरि दीक्षितांनी छिन्नमस्ता

देवीची आराधना करून मंत्रसामर्थ्याने तिला वश करून घेऊन पंडित व भामिनी यांची दान रत्नमाळ गिरधमठे मागून घेतली. तीन महिन्यांच्या अवधीत या साहित्याने दोघांचा पूर्ण नाश करण्याचे त्याने ठरविले. तसेच मोहमायाने दोघांच्या शरीरात प्रवेश करावा असाही वर त्याने मागून घेतला. युक्तिप्रयुक्तीने पंडिताने हीर भामिनीपर्यंत पोहोचविले आणि भामिनीने हीर पंडिताकडे रवाना झाले. भामिनीला वाटले की, ताटातूट झाल्यावर आपला पति निधन पावला असावा. पंडितराय भामिनीच्या शोधात भटकत असता एक वृद्धा काठी टेकीत टेकीत पंडित बेशुद्ध पडले होते तेथे प्रगट झाली आणि त्याला सावध केले. मोहवश झालेला पंडित ढसाढसा रडला आणि त्या वृद्धेच्या पायावर मस्तक ठेवून नेत्राश्रूंनी तिचे चरणकमळ धुवून काढले. पंडिताने असे वर्तन करू नये असे म्हणताच तो निकार उद्‌गारला, 'मी पंडित नाही, मी पंडित नाही, मी पवित्र नाही.' पंडिताचा गर्व नष्ट झाला असे पाहताच वृद्धा म्हणाली, 'तू वाराणशीला जा, तेथे तुझी पत्नी तुला भेटेल व गंगामाई तुझे मनोरथ पूर्ण करील.' इतका आशीर्वाद देऊन ती वृद्धा जवळच्या झुडपात गुप्त झाली. कोण होती ती हितकर्ती, दुसरे कोण असणार? कोण कठीण प्रसंगी धावून येणार? लेकराचा कळवळा मातेशिवाय कोणाला येणार? साक्षात देवी बाला त्रिपुरसुंदरी, त्या वृद्धेच्या रूपात त्याचे सांत्वन करण्यास व मार्गदर्शन करण्यासाठी आली होती. पंडित वाराणशीचे वाटेवर असताना त्याचा नातू रामचंद्र त्याच्याच शोधात असलेला भेटला. आत्मवीरेश्वराच्या घाटावर त्याची पत्नी भामिनी, पाठच्या भावाप्रमाणे सदैव सहाय्य करणारे अकबर बादशहाचे हिंदु धर्मगुरु रामाचार्य व इतर स्नेही यांच्या गाठी होताच सर्वांच्या आनंदाला पारावार राहिला नाही. तीन महिन्यांची मुदत टळून गेल्याने मोहपटल दूर झाले होते. जगन्नाथाच्या आयुष्याची मुदत संपली होती. ९२ वर्षे वयाला झाली होती. ते जगाला पूर्णपणे विटले होते. तेव्हा त्यांनी आपले देह गंगार्पण करण्याचे ठरविले. अप्पया दीक्षित पूर्व वैर विसरून स्वतः उपस्थित होते. त्यांनीच गंगास्तुतीची १००० पारायणे केल्यास, गंगामाई साक्षात पोटात घेईल असा आशीर्वाद दिल्यावरून पंडितांनी ती पुरी केली. इतके झाले तरी विरोधक हरि दीक्षित व दिरंगगान स्वस्थ बसले नाहीत. गंगेच्या पाण्याला विटाळ होईल म्हणून पंडिताला ते आत प्रवेश करू देईनात. शेवटी दाराशुकोह राजपुत्र पुढे झाला आणि त्यांनी विरोधकांना बाजूला सारले.

## गंगामातेकडून पंडिताचा उद्धार

पारायणागणिक गंगेचे पाणी एक एक पायरी वर चढत गेले आणि शेवटी त्या दोघांचा भाग्यकाळ उदयास आला. पाण्यात कोण दिसते ते रूप आधी पहा—साक्षात् गंगामाता अवतरली आहे—

शरच्चंद्रश्वेतां शशिशकलशुभ्रालमुकुटाम् ।
करैः कुम्भामंभोजे वरभयनिरासौ च दधतीम् ॥ ३०

या प्रसंगाचे वर्णन अप्पया दीक्षित स्वतः करतात की, 'मला या वेळी चतुर्भुज, श्वेतवस्त्र परिधान केलेली, आणि कुंभ, कमळ, अभयमुद्रा व वरदमुद्रा असणारी गंगादेवी नक्रावर बसलेली दिसत आहे. गगामाता पंडित आणि भामिनी याना आपल्या स्कंधावर घेऊन जात आहे. त्याना संपूर्ण मुक्ति मिळाली आहे. पंडित हे पूर्वाश्रमी परमहंसवृत्तीने राहणारे महान योगी असून अवशिष्ट भोक्तृत्व संपविण्यास त्यान्चा जन्म झाला होता. लवगी पूर्वजन्मीची अप्सरा होती. तीच त्याची प्रथम पत्नी भामिनीही होती. पंडिताला श्री, धी व स्त्रीचा गर्व झाल्याने हरि दीक्षित व फिरंगखान यांना देवीने तशी गर्वहरण करण्याची प्रेरणा केली, इतकेच नव्हे तर अंतरिक्षातून अकबर बादशहा, राणी भानुमती, परमभट्ट व मातोश्री लक्ष्मीबाई आनंदाने पुष्पवृष्टि करीत आहेत आणि सर्वांना उद्धार झाल्यामुळे ते अत्यंत समाधानी दिसत आहेत.'

(पंडित जगन्नाथ चरित्र—ले. रामराव मार्तंड भांबूरकर, सन १९२८ याचे आधारे विवेचन केले आहे.)*

पंडितराजाच्या यवनकन्येच्या सहवासाबद्दल अनेक प्रवाद ऐकू येतात. पण श्रद्धावान लोक असेच जाणतात की, ती यवनकन्या पंडितजीजवळ शुद्ध-भावाने पत्नी व शिष्या या नात्याने रहात होती. या पवित्र बंधनांनी ते जन्मभर बांधून राहिल्यामुळेच शेवटच्या क्षणी साक्षात गंगादेवी प्रकट झाली आणि तिने त्या दोघाना आपल्या देहात सामावून घेतले. आम जनतेला पावन करणारी गंगा, ती दोघे अपवित्र असती तर खासच त्याना पावन करती ना! कारण जेथे पावित्र्य आहे तेथेच देव आहे.

---

* कै. रामराव भांबूरकर यांचे पुस्तक सन १९२८ सालचे आहे. पण त्यानंतर जे संशोधन भारतामध्ये अनेक विद्वानांनी केले त्याचा आधार घेऊन सन १९५२ साली द. गो. पाध्ये आणि सन १९६२ साली विद्याधर गोखले यानी जे ग्रंथ लिहिले आहेत त्यामध्ये जगन्नाथपंडिताच्या काळाचा फरक आहे. दिल्लीचे बादशहा जहांगीर, शहाजहानचा काळ ते मानतात तसे उल्लेख रसगंगाधर, असफ विलास काव्यात आढळतात श्रीसमर्थ रामदास हे जगन्नाथ पंडिताचे समकालीन असे मानले जात. गंगास्तुतीने प्रायश्चित घेतल्यावर मथुरा शहरी ते अनेक वर्षे होते आणि त्यानी ग्रंथनिष्पत्ति केली, असे काहींचे म्हणणे आहे. आपणाला या सर्व संशोधनाच्या वादविवादात पडणे नाही व देवीची कृपा व अवकृपा हा संबंध भांबूरकर यांच्या मतात उत्कृष्ट असल्याने प्राधान्य त्याला दिले इतकेच.

पंडितराजांनी अनेक दिवस हे एक व्रतच चालविले होते. त्यांची इच्छा गंगादेवीने पूर्ण केली म्हणून त्या दिवसापासून दशहराव्रत आचरण्याची पद्धत चालू झाली. जेष्ठ शुद्ध दशमीला हे व्रत आचरतात. स्कंद, वराह, भविष्य इत्यादि पुराणामध्ये या व्रताची कथा आलेली आहे त्याचप्रमाणे हीच कथा व्रतराज या ग्रंथामध्येही दिलेली आहे. परंतु निश्चित कोणत्या दिवशी हे व्रत आचरावे, या-बद्दल पुराणामध्ये एकमत मात्र मुळीच नाही. स्कंदपुराणाप्रमाणे दशमी मंगळवारी असावी, तर वराहपुराणाप्रमाणे ती बुधवारी 'बुधः हस्तयोः' म्हणजे हस्तनक्षत्राच्या योगावर असावी असे मानले जाते.

गंगानदीचे महत्त्व अनेकांनी अनेक ग्रंथातून वर्णन केलेले आहे. जगन्नाथ पंडिताची गंगादेवीच्या स्तुतीप्रमाणेच यमुनास्तुति (अमृतलहरी), लक्ष्मीस्तुति (४१ श्लोक), विष्णुस्तुति (६० श्लोक, करुणालहरी), सुधाश्लोक इत्यादि १६ काव्ये आहेत. (चित्रावकृत मध्ययुगीन चरित्र कोश, पृष्ठ ३८९)

## राजापूर गंगा

गंगा नदीच्या प्रवाहाव्यतिरिक्त अनेक ठिकाणी गंगा हे नामाभिधान असलेली क्षेत्रे आढळून येतात. अनेक ठिकाणी गंगादेवीची मंदिरेही आढळून येतात. रत्नागिरी जिल्ह्यात राजापूर या गावी असे एक गंगेचे क्षेत्र आहे. येथील प्रवाहाचे महत्त्व म्हणजे हा प्रवाह अनियमित आणि अचानकपणे एका ठिकाणी उत्पन्न होतो. काही एका विशिष्ट काळापर्यंत राहतो व तितक्याच अचानकपणे अंतर्धानही पावतो. यास्तव कोणी याला सृष्टीचमत्कार म्हणतात. याची मूळ कथा अशी आहे—

उन्हाळ्याचे दिवस होते. धान्याची मळणी जोरात चालू होती. शेतात काम करता करता एका शेतकऱ्याला अतिशय तहान लागली, परंतु पाणी मिळण्याची जवळपास कोठेच सोय नव्हती. त्या वेळी त्याने मोठ्या भक्तीपूर्वक अंतःकरणाने गंगादेवीची प्रार्थना केली की, 'आई ग, मला एक घोटभर पाणी प्यावयास मिळू दे.' आर्त भक्ताची हाक देवतेच्या कानावर त्वरितच जाते हा नेहमीचा अनुभव या वेळीही अनुभवास आला. मळणीसाठी रोवलेल्या एका शुष्क लाकडाच्या खुंट्याच्या मुळातून अचानकपणे पाण्याचा प्रवाह वाहू लागला. मळणी जरी वाहून गेली तरी पाणी पिऊन शेतकरी संतुष्ट झाला. जणू या गोष्टीची स्मृति म्हणून की काय या गोष्टीला जरी अनेक शतके लोटली असली तरी आजही प्रथम थोडासा हरकाचा (एक प्रकारचे धान्य) कोंडा येतो आणि मग पाण्याचा प्रवाह अव्याहतपणे वाहू लागतो. 'राजापूरची गंगा' म्हणतात ती हीच.

साप्रत दगडी कुंडे बांधून एकूण चौदा कुंडांमधून पाणी फिरविलेले आहे. पुन्हा चमत्कार असा की, प्रत्येक कुंडातील पाण्याचे तपमान निरनिराळे आढळते. 'वसुदेवज्वाला' अथवा 'वज्रनलिका' या विज्ञानशास्त्रातील वस्तूंच्या तत्त्वावर प्रवाहाची उत्पत्ति होते असे ज्ञाते लोक मानतात. परंतु श्रद्धावान् लोक मात्र हे मानण्यास तयार नाहीत. 'ही सारी गंगामय्याची कृपा!' असेच ते मानतात. इसवी सन १८८३ पासून या स्थानाचा जो इतिहास उपलब्ध आहे, त्यावरून असे दिसते की, आजवर गंगादेवी त्या ठिकाणी २७ वेळा अवतरली आहे. पण प्रत्येक वेळीचा तिचा उगम काल व वास्तव्य केल्याचे दिवस यामध्ये एकसूत्रीपणा मात्र मुळीच नाही.

या प्रवाहाच्या उत्पत्तिकाळासंबंधी एक संशोधक अशी माहिती देतात की, सुमारे १६५० साली जंजिरा संस्थानच्या नबाबाने काही राजकीय हेतूने आपला चिटणीस आवजी याला ठार मारून त्याच्या बायकामुलांना गुलाम म्हणून परदेशात रवाना केले. कर्मधर्मसंयोगाने मार्गात गुलामांना नेणारे जहाज राजापूर बंदरी लागले तेथेच गुलामांची विक्री झाली. ठार मारलेल्या आवजींच्या मेहुण्यानेच त्याच्या बायकापोरांना या वेळी खरेदी केले. आपल्या बहिणीचा मुलगा बाळाजी आवजी याला त्याने वाढविला. मोठा झाल्यावर तेथील ठाणेदाराकडे नोकरी करीत असताना शिवाजी महाराजांना पत्र पाठवून ते ठाणे जिंकून घेण्याची त्यानेच त्यांना विनंती केली समय ओळखून शिवाजी-महाराजांनीही ते राजापूरचे ठाणे जिंकून घेतले. योगायोग असा की, त्याच वेळी राजापूरजवळील सुमारे दोन मैल अंतरावर असलेल्या पन्हाळा गावाच्या डोंगरा-वर हा गंगाप्रवाह पहिल्यानेच प्रकट झालेला होता. शिवबांना ही वार्ता समजताच आपल्या कार्याला शुभशकुन समजून मोठ्या भक्तिभावाने त्यांनी त्या प्रवाहात स्नान केले आणि नंतरच बाळाजी आवजीसह पुण्यास प्रस्थान केले.

(श्री. शंभुराव देवळे, प्रसाद मासिक, सन १९६२)

महाराष्ट्र कविवर्य श्री. मोरोपंत पराडकर या क्षेत्री एकदा स्नानास गेले असता तो देखावा पाहून प्रसन्न झाले आणि त्यांनी 'गंगा प्रतिनिधी तीर्थकीर्तन' या नावाचे काव्य सन १७८९ मध्ये रचले आहे. त्या काव्यातील ही गीती पाहा,

मज एकवेळ घडले सत्संगतिने अलभ्य मज्जन हो।
रचिले सुर्तीर्थ-कीर्तन, हे फल त्याचेचि होय सज्जन हो॥

## नारायणस्वामींना गंगादर्शन

मोरोपंत पराडकराप्रमाणे दुसरे उदाहरण नारायणस्वामींचे आहे. कोल्हापूरहून गंगेच्या दर्शनास जाण्याचे त्यांनी योजिले आणि त्याप्रमाणे मार्गात पुढे बावडा येथे ते आले असता गंगा गुप्त झाल्याचे वृत्त परत येणाऱ्या यात्रिकांनी त्यांना कळविले. पण महाराज आपल्या शिष्यवर्गाला म्हणाले की, मी गंगेच्या दर्शनास महालक्ष्मीच्या आज्ञेने निघालो आहे, तेव्हा प्रत्यक्ष स्थानापर्यंत जाऊन दर्शन घेणे कर्तव्य ठरते. याप्रमाणे महाराज व शिष्यवर्ग गंगास्थापनापर्यंत येऊन रात्री कोरड्या ठणठणीत कुंडाजवळ झोपी गेले असता स्वप्नात गंगादेवीने एका वृद्ध स्त्रीच्या रूपात दृष्टान्त देऊन सांगितले की, 'गंगा आली आहे, लवकर उठून स्नान उरकून घ्या.' त्याप्रमाणे नारायणस्वामी व शिष्य जागे झाले आणि पाहतात तो खरोखरच गंगेची कुंडे वाहून चालली आहेत. सर्वांनी विधीपूर्वक स्नाने केली आणि परमेश्वरी शक्तीचे आभार मानून, सायंकाळी परत गावी परतले. मागाहून येणाऱ्या यात्रेकरूंनी नंतर सांगितले की, महाराजांनी स्थान सोडल्यावर थोड्याच वेळाने पुन्हा गंगा गुप्त झाली. याचा अर्थ असा की, आठवडाभर गुप्त झालेली गंगा नारायणस्वामींना स्नान घालण्यासाठी पुन्हा अवतरली व कार्य झाल्याबरोबर पुन्हा गुप्त झाली. महाराजांनी हा चमत्कार स्वतः चरित्रामध्ये नमूद केलेला आहे. अशा अलौकिक गोष्टींमुळे मूळ गंगेची महती वाढली आहे, आणि

> गंगा गंगेति यो ब्रूयात् । योजनानां शतैरपि ।
> मुच्यते सर्व पापेभ्य । विष्णुलोकं स गच्छति ॥

याप्रमाणे उक्ति जनसमुदायाच्या मुखात बोळत असते.

विसाव्या शतकात अनेकांनी राजापूर येथील प्रवाहाचा उगम शोधण्याचा प्रयत्न केला, पण त्यांना इष्ट फल मिळाले नाही. असे सांगतात की, या प्रवाहाच्या पाण्याचे परीक्षण केले असता त्या पाण्यात गंगानदीच्या पाण्याचे गुणधर्म आढळतात. पण ह्या गोष्टीला लेखी आधार कोठेच मिळत नाही. या ठिकाणी गंगादेवी अवतरली म्हणजे लोकलाखांचे अनेक भक्त श्रद्धेने या क्षेत्री येतात, नवससायास करतात, स्नान करून पावन होतात आणि मुक्तकंठे गंगामैय्याची स्तुति करतात. (श्री० ना. रा. रानडेकृत राजापूरची गंगा)

येथील चमत्काराप्रमाणे अन्य ठिकाणीही असे चमत्कार आहेत. 'ओल्ड फेथफूल' नावाचा गरम पाण्याचा कारंजाप्रमाणे उडणारा प्रवाह अमेरिका देशात अनेकजण पाहतात. दर पधरा मिनिटांनी हा फवारा १२५ फूट उंच उडत असतो.

ही क्रिया शतकानुशतके अखंड चालत आहे. तसेच फ्रान्स देशात फॉन्तेस्तॉर्व या ठिकाणी एक गुहा आहे. त्या गुहेमध्ये एक झरा अव्याहतपणे वाहत आहे. त्याचे वैशिष्ट्य असे की, तो ३६ मिनिटे व ३६ सेकंद वाहतो आणि साडेबत्तीस मिनिटे बंद राहून पुन्हा वाहतो. हा त्याचा क्रम निदान एक सहस्र वर्षे तरी सतत चालू आहे.

राजापूर, वज्रेश्वरी, ज्वाळादेवी इ० क्षेत्राप्रमाणे गरम पाण्याचे झरे अन्य देशातही आढळून येतात. प्राचीन रोम, बाथ (इंग्लंड), न्यूझीलंड, पश्चिम जर्मनी, आइसलंड इ० अनेक देशात असे झरे आढळतात. एकट्या जर्मनीमध्ये सुमारे २३५ पर्यंत झरे आहेत. त्याना ते बाद ( BAD ) म्हणतात. झऱ्याचे काठी अनेक ठिकाणी आरोग्यकेंद्र आहेत आणि लक्षावधी माणसे प्रत्यही संधीवात, दमा, पायाचे व नेत्राचे रोग, तसेच कातडीचे रोग यांवर औषधोपचार करून घेत असतात. काही आरोग्यकेंद्र तर २०० वर्षांची जुनी आहेत. या ठिकाणी पाण्याची उष्णता ७५ सेंटीग्रेडपर्यंत असते.

भारतामध्ये अशा अनेक ठिकाणी स्नान केल्याने वरील प्रकारचे रोग बरे होतात, असा अनेकांचा अनुभव आहे. पण त्याला अद्याप सुसूत्रपणा नसल्याने लोकाना त्याची महती कळून येत नाही इतकेच.

गंगादेवीची मंदिरे व मूर्ति अनेक ठिकाणी पाहावयास सापडतात. अंकोला ( जिल्हा कारवार ) शहराच्या उत्तरेस पाच मैल अंतरावर गंगावळी या नावाचे एक गाव असून त्या ठिकाणी गंगादेवीचे एक मंदिर आहे. हे स्थान अतिशय पवित्र मानले जाते. आश्विन कृष्ण अष्टमीच्या दिवशी सर्व नागरिक एकत्र येऊन दूरदूरच्या गावाहून या सोहळ्यासाठी मुद्दाम आलेल्या लोकांसह नदीवर स्नानाला जातात आणि ' जय गंगे भागीरथी हर गंगे ' असा नामोच्चार करून स्नाने करतात. त्यांची अशी श्रद्धा आहे की, जन्हु ऋषीने ही गंगा या ठिकाणी आणली. त्या ऋषीचे पाप धुऊन टाकण्यासाठी ती प्रथम सह्याद्रि पर्वतावर अवतरली. ऋषींनी तिला पिऊन टाकले. तिच्या जलपानाने तो शुद्ध झाल्यावर त्याने तो गंगेचा प्रवाह अंकोला शहरानजीक सोडून दिला. हे क्षेत्र गोकर्ण महाबळेश्वरानजीक असल्याने वरील उत्सवाच्या दिवशी शंकराची पालखी या क्षेत्री स्नानास येते. गंगादेवीच्या मंदिरानजीक ज्या विश्वकर्म्याने स्थापत्यशास्त्रात निपुणता संपादन केली, त्याच्या स्मरणार्थ एक शंकराचे देवालय आहे.

( मुंबई गॅझेट, भाग १५ वा, पृष्ठ २८२ )

सागर ( मध्यप्रदेश ) या ठिकाणी चक्राघाटावर गोंडाच्या विशाल किल्ल्याचा पाठीमागे गंगादेवीचे एक मंदिर आहे. ते चमत्कारिक व विचित्र

गोष्टीबद्दल त्या भागात अतिशय प्रसिद्ध आहे. गंगादेवीची चतुर्भुज संगमरवरी पाषणाची मूर्ति फार आकर्षक आहे. वार्षिक गंगापूजनाचा सोहळा फार मोठ्या प्रमाणावर साजरा केला जातो. त्या वेळी दूरदूरच्या अंतरावरून अनेक भक्तमंडळी दर्शनास येत असतात.

( श्री० सदानंद चेंदवणकर, नवशक्ति, दि० १५।१०।१९६१ )

दक्षिण हैद्राबाद येथील निजामशहाची अशीच एक दंतकथा प्रचलित आहे. त्या ठिकाणी एकदा नदीला महापूर आला आणि पाणी गावात शिरून मनुष्यहानी व वित्तहानी होण्याचे संकट ओढवले. त्या वेळेचा तत्कालीन निजामसाहेब हा माणिकप्रभूचा उपासक होता. संकट टाळण्याचा उपाय म्हणून कोणीतरी त्याना सुचविले की, ' महाराज, आता या संकटसमयी गंगेशिवाय दुसरी कोणतीही देवता आपल्या सहाय्यार्थ धावून येणार नाही, म्हणून आपण स्वतः गंगादेवीची प्रार्थना करावी. पूर पुढे न वाढल्यास याच ठिकाणी तुझे मंदिर बांधीन अशी प्रतिज्ञा करावी म्हणजे हे पुराचे संकट टळेल. ' प्रजेच्या हितास्तव त्या यावनी राजाने हिंदूच्या देवतेचीही पूजा केली. ज्या सीमेवर पाण्याचा ओघ पुढे वाढण्याचा थांबला तेथे त्याने गंगादेवीचे मंदिर बांधले आणि आपली प्रतिज्ञा खरी केली. ( श्री० मोरेश्वर शेटे, ७५ लो. टिळकनगर, गोरेगाव )

उत्तर भारतात गंगादेवीची मंदिरे अनेक ठिकाणी आढळतात. हरिद्वार या क्षेत्राला मी भेट दिली त्या वेळी गंगानदीची अपूर्व शोभा मी ' याची देही याची डोळा ' अनुभविली आहे. विशेषतः सायंकाळच्या वेळी द्रोणामध्ये फुले व दीपज्योत घालून ती गंगेला अर्पण करतात त्यावेळची शोभा अवर्णनीय असते. अशा अनेक ज्योती धावणाऱ्या प्रवाहात पाहाताना भक्तांना परमानंद होतो. या ठिकाणी किनाऱ्यावर गंगादेवीचे मंदिर आहे. त्याचप्रमाणे " हरीची पायरी " या नांवाचेही एक प्रसिद्ध स्थान आहे. या पायरीचे दर्शन घेतल्याविना भक्तमंडळी पुढे जात नाहीत. मीरत पासून २६ मैलावर गडमुक्तेश्वर या ठिकाणी गंगादेवीची चार प्रमुख मंदिरे आहेत. तसेच मुक्तेश्वर मंदिरासह तेथे निरनिराळ्या नावाची सात शंकराची मंदिरे आहेत. कार्तिक पौर्णिमेला या क्षेत्री गंगास्नानासाठी मोठी यात्रा भरते. सुमारे ८० सती स्तंभही या ठिकाणी उभारलेले दिसतात.

वेरूळ लेण्यामध्ये या देवतेला स्थान दिलेले आहे. एका गुहेच्या प्रवेशद्वारीच एका बाजूला गंगादेवी आणि दुसऱ्या बाजूला यमुनादेवी यांच्या भव्य मूर्ति कोरलेल्या आहेत. या मूर्ति गुहा क्रमांक २० च्या प्रवेशद्वारी आहेत.

रघुवंशीय भगीरथ राजाने गंगा भारतामध्ये आणली, म्हणून तिला ' भागीरथी ' म्हटले जाते, हे आपण वर पाहिलेच आहे. गंगानदीच्या ओघाची

आज आपण बारकाईने पाहाणी केली तर आपल्याला असे आढळून येईल की, हिमालयातील गंगोत्री या ठिकाणी नदीचा उगम झाल्यावर ती पश्चिमवाहिनी होऊन वाहात होती. भारतात तिच्या पवित्र पाण्याची गरज जास्त होती. धान्यसमृद्धीसाठी उत्तर भारतात तिची व तिच्या पाण्याची अत्यंत गरज असल्यामुळे तो पश्चिमवाहिनी प्रवाह भगीरथाने आपल्या कल्पक बुद्धीने आणि आत्यंतिक अविरत परिश्रमाने डोंगरकपाऱ्या फोडून दक्षिणेकडे वळविला. ज्या ठिकाणी हा प्रवाह भारतामध्ये दक्षिणेकडे वळतो, ते स्थान फारच प्रेक्षणीय आहे असे यात्रेकरूंचे मत आहे. सांप्रतच्या विज्ञान युगातही असे नदीचे प्रवाह एका दिशेकडून दुसऱ्या दिशेला वळविल्याचे आपण पाहातो. बोरघाटात लोणावळ्याजवळ दक्षिणेकडे वाहाणारा प्रवाह पश्चिमेकडे खोपाली या ठिकाणी वळवून तेथे टाटा कंपनीने वीजनिर्मिति-केंद्र उघडले आहे. सातारा जिल्ह्यातील प्रसिद्ध कोयना धरणाची देखील अशीच स्थिति आहे. पूर्वेकडे वाहाणारा नदीचा प्रवाह पश्चिमेकडे म्हणजेच पोफळी या गावाकडे वळविला आहे.

एका ग्रंथकाराचे तर म्हणणे असे आहे की, विराट पुरुषाच्या एकवीस शिरांमधून २१ गंगांची उत्पत्ति झालेली आहे, आणि त्यांची नावे निरंजनगंगा, मंडलिका, मंदाकिनी, अजन्मया, मणिपूर, क्षिप्रा, कुंकुमावती, सरस्वती, तुरंगना, उग्रयमुना, गंधावती, भागिरथी इ० इ० असून त्या सर्वांची स्थापना स्वर्गामध्ये निरनिराळ्या ठिकाणी करण्यात आली आहे.

वरील सर्व कारणे लक्षात घेऊन गंगादेवीची प्रार्थना झाली,

तिस्रः कोटयोऽर्धकोटी च तीर्थानां वायुरब्रवीत् ।
दिवि भुव्यन्तरिक्षे च तानि सन्ति हि जाह्नवी ॥
नन्दिनीत्येव ते नाम देवेषु नलिनीति च ।
क्षमा पृथ्वी च विहगा विश्वकाया शिवा स्मृता ॥
विद्याधरा सुप्रसन्ना तथा लोकप्रसादिनी ।
क्षेम्या तथा जाह्नवी च शान्ता शान्ति-प्रदायिनी ॥
एतानि पुण्यनामानि स्नानकाले प्रकीर्तयेत् ।
भवेत् सन्निहिता तत्र गंगा त्रिपथगामिनी ॥
(भविष्यपुराण, १२३ । ६–१०)

याचा भावार्थ असा की, हे जान्हवी देवी, वायुदेवतेने साडेतीन कोटी तीर्थे वर्णन केली आहेत, त्यापैकी काही स्वर्गामध्ये, काही अंतरिक्षामध्ये आणि काही भूतलावर आहेत. परंतु तुझे वसत्न या तिन्ही लोकांत असल्याने, ती सर्व

तीर्थ, तुझ्यामध्ये सामावलेली आहेत देवलोकात तुझे नाव नादनी व नन्दिनी असे आहे क्षमा, पृथ्वी, विहगा, विश्वकाया, शिला, विद्याधरा, सुप्रसन्ना, लोक प्रसादिनी, क्षेम्या, जाह्नवी, शांता आणि शांति प्रदायिनी अशीही तुझी नावे आहेत दररोजच्या स्नानाच्या वेळी या नावांचा उच्चार केला असता, हे गंगामाई, तू तात्काळ तेथे येऊन पोहोचतेस, कारण तू त्रिपथगामिनी आहेस वास्तव तुझे हे स्तोत्र गाण फलप्रद आहे

आद्य शंकराचार्यांना गंगेजवळ जे मागणे मागितले, तेच आपण भक्तांनी मागावे 'हे देवी गंगे तू देवांची स्वामिनी आहेस हे भगवती, तुझे तरंग अत्यंत चंचल आहेत तू शंकराच्या मस्तकावर विहार करणारी आहेस हे गंगामाते, तुझ्या पावन चरणकमळी माझी मति स्थिर राहो '

* * *

## २ नर्मदादेवी

नर्मदायै नम प्रातर्नर्मदायै नमो निशि ।
नमोऽस्तु नर्मदे तुभ्यं त्राहि मा विषसर्पत ॥ (ऋ खिल)

ऋग्वेदकालापासून नर्मदा नदीचे अस्तित्व मानवाना माहीत होते आणि यासाठीच तिचा उल्लेख आलेला आहे नर्मदा नदीला सकाळी नमस्कार असो, रात्री नमस्कार असो विष आणि सर्प यापासून तू आमचे सदैव रक्षण कर, असे मागणे ऋषींनी मागितले आहे

वाल्मिकी रामायणामध्ये या नदीचे वर्णनपर श्लोक आहेत—

चलोपलजलां पुण्यां पश्चिमोदधिगामिनीम् ।
महिषै सुमृगै सिंहै शार्दूलर्क्षगजोत्तमै ॥
सारसैश्च सदा मत्तै कूजद्‌भि सुसमावृताम् ।
फुल्लद्रुमकृतोत्तंसां चक्रवाकयुगस्तनीम् ॥ ३० ३०

भावार्थ असा की, पश्चिम सागराला जाऊन मिळणाऱ्या त्या पवित्र नर्मदा नदीचे उदक पाषाणावर आदळून क्षुब्ध होते अति उष्णतेने तप्त होऊन तृषाक्रांत झालेले महिष, हरिण, सिंह, व्याघ्र, अस्वले व महागज यांनी तिचे जलाशय क्षुब्ध करून टाकलेले असतात चक्रवाक, कारंडव, हंस, जलकुक्कुट आणि सदैव मत्त असलेले सारस पक्षी यांनी तिचा देह व्याप्त होतो प्रफुल्लित वृक्ष ही तिची कर्णभूषणे असून, चक्रवाक पक्षांची युगुले हे स्तन होत किनाऱ्या वरील विस्तीर्ण वाळवंटे हा कटिप्रदेश मानला, तर त्यावर विराजमान होणारी हंसपंक्ति ही जणू मेखलाच शोभत असे तिच्या उदकावर उफाळलेला फेस हे

हे निर्मल वस्त्र परिधान केल्याप्रमाणे भासतो, तर प्रवाहात उगवणारी प्रफुल्लित कमले हे जणू नेत्रच शोभत असत. दोन्ही तीरांवर बहरलेल्या वृक्षाचे पुष्पपराग ही शरीराची उटी होती.

आद्य शंकराचार्यांनी जे नर्मदाष्टक रचले त्यामध्ये ते म्हणतात, ' हे माते नर्मदे, तुझे पाणी अत्यंत पवित्र आहे. खोल आहे. तसेच ते भरपूर आहे. त्या उदंड पाण्याच्या पुराने, संपूर्ण भूतलाचे पापच तू धुऊन टाकले आहेस. तुझ्या जलात भक्तिभावाने स्नान करणारांच्या आणि नमन करणारांच्या सर्व पातकांचा व संकटांचा तू नाश करतेस. महाभयंकर असा भूतलाचा प्रलयकाल ओढवला असताना, मृकंड ऋषींच्या पुत्राला आश्रय देणारी देवता तूच आहेस. हे नर्मदा-देवी, तुझे चरणकमलाला माझा नमस्कार असो. '

या नदीविषयी अशी रूपक कथा आहे की, नर्मदा ही अमरकंटक राजाची एकुलती एक रूपवती कन्या होय. वडिलानी शोण राजाबरोबर तिचा विवाह ठरविला, पण तो पूर्ण होण्यापूर्वीच पित्याचा मृत्यु झाला. मरणापूर्वी राजाने तिला सिंहासनावर बसवून आपले अधिकृत वारस नेमलेले होते. पितृ-विरहाचे दुःख कमी झाल्यावर भावी पतीने तिजकडे विवाहाच्या निश्चितीसाठी अंगठी पाठविली आणि त्यामुळेच आपला दूत पाठवून विवाहतिथि निश्चित केली. विवाहापूर्वी आपले प्रेमचिन्ह देऊन आपली विश्वासू झोला नामक दासी तिने शोण राजाकडे पाठविली. दासी असली तरी तीही सुंदर होती. विवाह ठरला होता, तरी आजवर वधूवरांनी एकमेकांना प्रत्यक्ष पाहिलेले नसल्याने, शोण राजाला ती दासीच आपली नियुक्त वधू वाटली आणि तिचा स्वीकार करून त्याप्रमाणे तो वर्तन करू लागला. राजाची कृति दासीला उपकार व भाग्याची वाटल्याने, तिने आपले सत्य स्वरूप उघड केले नाही.

बरेच दिवस लोटले तरी दासी परत आली नाही व विवाहाची वेळ तर जवळ येत चालली, वास्तव नर्मदा स्वतः शोण राजाकडे गेल्यावर तिला वरील प्रकार समजला. दासी व भावी पति यांनी आपला विश्वासघात केला, यामुळे ती संतप्त झाली आणि नदीचे रूप घेऊन वाहू लागली.

या नदीच्या आसमंतात उत्खननामध्ये ज्या वस्तू आढळल्या आहेत, त्यावरून पुराणतत्त्ववेत्ते असा अंदाज देतात की, नदीचा प्रवाह सुमारे पाच लक्ष वर्षांपूर्वीचा असला पाहिजे.

भारतवर्षातील सात पवित्र नद्यांपैकी नर्मदा नदी एक आहे. ' नर्मदा-सदृशी लोके न गंगापि वरानने । ' हे पार्वती, या जगात नर्मदेसारखी गंगा

नर्मदेइतकी पवित्र नाही. 'कलौ तु नर्मदा देवी कल्पवृक्षो जनार्दिहा' कलियुगात मानवाची दुःखे हरण करणारा जणू काय हा कल्पवृक्ष होय, असे पुराणकारांनी सांगितले आहे. ब्रह्मा विष्णु महेशादि देव, बली रावणादि असुर, सनत्-सनकादि ऋषिमुनि, मनु, हरिश्चंद्र, रतिदेव, नृपश्रेष्ठ या सर्वांनी नर्मदेचा परिसर पुण्यमय करून ठेवलेला आहे. इतके या नदीचे अलौकिक महात्म्य भारतवर्षीयांना आहे.

चंद्रसूर्यपरागेषु गच्छेत् योऽमरकंटकम् ।
अमराणां देवास्ते पर्वतेऽमरकंटके ॥ (पद्मपुराण १५।७४)

अमरकंटक क्षेत्रामध्ये कोट्यवधि देवता वास करीत असल्याने चंद्र सूर्य-ग्रहणकालात त्या ठिकाणी स्नानविधि केल्यास अश्वमेध यज्ञ केल्याचे पुण्य पदरी पडून जन्ममरणाचा फेरा चुकविला जातो.

मध्यप्रदेशात अमरकंटक या नावाचा एक मोठा पर्वत आहे. हा पर्वत साधारणपणे ३५०० फूट उंचीचा असून संगमरवरी दगडासाठी तो प्रसिद्ध आहे. या ठिकाणी एकूण अकरा प्रेक्षणीय स्थळे आहेत. त्यांमध्ये नर्मदा उगम, कपिलधारा धनधना, 'भीमाची पावले,' शोण नदीचा उगम, नर्मदादेवी मंदिर इत्यादिकांचा समावेश होतो. या ठिकाणी एकूण चौदा मंदिरे आहेत. चेदीवंशीय राजा कर्णदेव याने नर्मदादेवीचे फारच आकर्षक असे मंदिर बांधले आहे. म्हणजेच पर्यायाने पूर्वीच्या मंदिराचा जीर्णोद्धारच केलेला आहे. नर्मदानदीचा उगम ज्या सरोवरातून दाखविला जातो, ते खरे उगमस्थान नसून, त्या सरोवराच्या मागे जे दुसरे एक बुजत चाललेले सरोवर आहे, ते खरे उगमस्थान होय. (Imperial Gazette II, Page, 274)

रेवा पुराणात या नदीच्या उत्पत्तीसंबंधी अशी कथा दिली आहे की, नर्मदा ही रुद्र अथवा शंकरापासून निघाली. यास्तव तिला रुद्रेही अथवा शांकरी अशी नावे मिळाली आहेत. या देवीच्या सौंदर्याला भुलून सागराने तिला मागणी घातली होती, परंतु तिने त्याची मागणी धिक्कारली. काहींच्या मते या शांकरीचा विवाह अग्नीचा पुत्र धामधर याच्याबरोबर झालेला होता त्याच्यापासून तिला भरितद्र या नावाचा एक पुत्र झाला होता आणि त्याने दैत्याबरोबर अनेक लढे दिलेले होते. भाविकांची अशी श्रद्धा आहे की, सरस्वती नदीमध्ये स्नानविधि केला असता तीन दिवसात पापाचा विनाश होतो. त्याचप्रमाणे गंगानदीत स्नानविधि केला असता एक दिवसात व यमुना नदीत केला असता सात दिवसांत पापाचा विनाश होतो. परंतु नर्मदानदीचे माहात्म्य एवढे मोठे की, तिच्या पाण्यात केवळ एकदाच स्नान केल्यास सारी पापे धुऊन निघतात. गंगेच्या

पाण्याचा पवित्रपणा मात्र शुद्ध सप्तमीला संवत् १९५१ साली समाप्त झाला असला तरी नर्मदेचे पावित्र्य मात्र अखंड राहीलच राहील.

(कैरा जिल्हा गॅझेट, पृष्ठ ३६८.)

शंकराच्या देहापासून ही नदी निघाली, या गोष्टीला दुसऱ्या एका ठिकाणी पुरावा मिळतो तो असा प्राचीन काळी राजा पुरुरवा आणि उर्वशी यांचा संबंध घडल्यावर राजाचा जो पापसंचय झाला, तो नाश करण्यासाठी राजाने अमरकंटक पर्वतावर तप साधना करण्यास प्रारंभ केला त्याची अनेक वर्षांची खडतर तपश्चर्या पाहून शंकर त्याच्यावर प्रसन्न होऊन राजासमोर प्रकट झाले. राजाने आपल्या सर्व पापाची त्यांच्याजवळ कबुली दिल्यावर पापक्षालनार्थ स्वर्गीच्या नर्मदा नदीला भूतलावर आणण्याची त्यानी विनंती केली शंकरांनी त्याची ती विनती मान्य करून दिव्य धारानी त्या प्रवाहाला अमरकंटक येथे आणले. त्या नतर ती पश्चिमेकडे वाहू लागली

(श्री त्रिविक्रम धर्माधिकारी, आकाशवाणी पुणे, ८।८।१९६२)

नर्मदा नदीचा प्रवाह ३५०० फूट उंचीवर उत्पन्न होऊन काही अंतर वाहात गेल्यावर तो प्रथम ८० फूट खोल खाली पडतो, नंतर रेवा संस्थानातून वाहात जाऊन मध्यप्रदेशात शिरतो पुढे मंडला टेकडयातून मार्ग काढीत काढीत रामनगरपर्यंतचा १५ मैलाचा प्रवास वंडेकपारीतून करीत असतो जबलपूरपासून हा प्रवाह पुढे गेला म्हणजे ९ मैलावर संगमरवरी खडकात तो प्रपाताचे स्वरूप धारण करतो या ठिकाणालाच भेडाघाट असेही म्हणतात हा प्रपात ३० फूट उंचीचा आहे याच ठिकाणाला धुवाधार हे एक प्रसिद्ध नाव आहे हे स्थान प्रेक्षणीय असल्यामुळे प्रवासी ते पाहिल्याशिवाय क्वचित राहत नाहीत धुवाधार या ठिकाणी प्रवाह खाली पडल्यावर तो पुढचे दोन मैलाचे अंतर पांढऱ्या शुभ्र संगमरवरी खडकातून कापून पुढे सातपुडा व विंध्यपर्वत यामधील सपाटीवर शिरतो खडकातून हा प्रवाह जात असता खाली व बाजूला असलेल्या शुभ्र खडकाच्या पार्श्वभूमीवर सुंदर व नयनहारी देखावा दिसतो दोन पर्वतसपाटीमधून सुमारे २०० मैल प्रवास केल्यावर हा प्रवाह होशंगाबाद, हंडिया या शहरांपासून वाहात जाऊन, नंतर पुनरपि ४० फूट खाली पडून पुनास या मार्गी जातो त्यापुढे हा प्रवाह महेश्वर या पुराणप्रसिद्ध शहराजवळून पश्चिमेकडे सुमारे १६० मैल वाहात गेल्यावर सिंधुसागराला मिळतो

(होशंगाबाद जिल्हा, गॅझेट, पृष्ठ ३२९)

नर्मदा नदीला 'रेवा नदी' असेही दुसरे नाव आहे नदीचा प्रवाह खडकातून खेळतवागडत जात असल्याने तिला 'उत्पल कन्यका' असेही एक

नाव आहे अमरकटकाच्या ज्या भागात या नदीचा उगम झालेला आहे, त्या विवक्षित टेकडाला 'मेकलपर्वत' असे म्हणतात. यास्तव काही वेळा तिला 'मेकलसुता' या नावानेही संबोधिले जाते नर्मदानदीच्या उगमस्थानापासून सुमारे दीड मैल अंतरावर वृक्षाच्या दाट राईमध्ये शोणनदाचा उगम होऊन तो प्रवाह पूर्वेकडे वाहात जातो नदाच्या उगमस्थानाजवळ शोणेश्वर या नावाचे शंकराचे एक मंदिर आहे (कल्याण क्षेत्रअंक, सन १९५७, पृष्ठ २३४)

वर म्हटल्याप्रमाणे या नदीचे सौंदर्य अनुभविण्यासाठी भेडाघाटातून हा प्रवाह मार्ग आक्रमीत असताना एकदा तरी यात्रिकाने या प्रवाहातून नौकाविहार करण्यास हवा नदीतटाच्या दोन्ही बाजूचे दुभंगलेले उच्च कडे इतके जवळजवळचे वाटतात की, माकडे या टोकावरून लीलया उडी मारू शकतील प्रपातामुळे तयार झालेल्या धुवाधार धबधब्याखाली लाल गणपति व शिवलिंगे तयार होतात त्या स्थानाला भेट देणारा भक्त ती घरोघर पूजेसाठी नेतो हे ठिकाण नदीच्या उगमापासून सुमारे दोनशे मैल पश्चिमेला आहे

सध्याचे महेश्वर शहर म्हणजेच पुराणकालीन महिष्मती नगरी होय नर्मदा नदीच्या उत्तर तीरावर हे शहर वसलेले आहे कार्तवीर्य या राजाचा पुत्र सहस्रार्जुन त्याची हे शहर राजधानी होती असे सांगतात की, या राजाने ८५ सहस्र वर्षे राज्य केले! वऱ्हाडातील द्रुग जिल्ह्यात सहस्रापूर या नावाचे जमीनदारीचे एक मुख्य ठिकाण आहे ते लाहोरा या शहराला दोन मैल लांबीच्या तलावाने जोडलेले आहे हे गाव द्रुगपासून सुमारे ४७ मैल अंतरावर आहे सहस्रार्जुन ह्या हयहय वंशीय राजाची या ठिकाणी पुतळ्याच्या रूपाने स्मृति उभारलेली असून त्यावर ११८२ हा काल नोंदलेला आहे तसेच राजा यशोराज व राणी लक्ष्मीदेवी यांची त्यावर नावे आहेत (द्रुग जिल्हा गॅझेट, पृष्ठ १७५)

महेश्वर या गावी सहस्रार्जुन राजाची समाधि बांधलेली आहे आद्य शंकराचार्यांनी मंडणमिश्राबरोबर जो वादविवाद केला, तो याच ठिकाणी! या महेश्वरगावी मंगळागौरी, भवानीमाता, स्वाहादेवी यांची स्थाने आहेत अष्टोत्तर देवीपीठ यादीत या क्षेत्राचे नाव आढळते

(कल्याण क्षेत्रअंक १९५७, पृष्ठ २६४)

नर्मदादेवी ही कोणी स्वरूपवान युवती मानून तिच्यावर ऋषींनी उत्तम रूपक केलेले आढळते, ते असे या देवीच्या सौंदर्याची ख्याती ऐकून शोणनद नावाच्या एका राजाने तिची भेट घेऊन तिला विवाहाची मागणी घालण्याचे ठरविले देवीचे वास्तव्य त्याच्या नजीकच असल्यामुळे ही वार्ता तिच्या कानावर येताच ही भेट टाळण्यासाठी तिने पश्चिमेला प्रवासाला जावयाचे ठरविले.

तावडतोब वाऱ्याच्या वेगाने, मोठमोठ्या घनदाट जंगलातून आणि खडकातून उड्या टाकीत व गर्जना करीत ती मागे आक्रमण करू लागली. तिच्या त्या गर्जण्याचा आवाज ऐकून महेश्वर येथील सहस्रार्जुन तिला वाचविण्यासाठी तावडतोब निघाला व मंडला जिल्ह्यातील सहस्रार्जुन तीर्थाजवळ ( ज्या ठिकाणी ती साठ फूट खाली उडी घेते ) खाली उडी घेत असताना तिला वाचविण्याच्या उद्देशाने आपले सहस्र बाहु पसरून उभा राहिला. हेतु असा की, तिची उडी आपल्या हातावर पडल्याने तिचा प्राण वाचावा. परंतु त्या सुंदर चपळ कन्यकेला त्या राक्षसाकडे जावयाचे नव्हते. त्याचे उपकारही तिला नको होते. यासाठी त्याला चकविण्याकरिता देवीने आपल्या शरीराची लहान लहान सहस्रावधि रूपे बनविली आणि सहस्रार्जुनाच्या बोटांच्या फटीतून निसटून जाऊन तिने पोबारा केला. देवीने आपल्या हातावर नाचण्याची अक्षता ठेवल्याने तो राक्षस मात्र केवळ आपली बोटे चोळत बसला! ज्या ठिकाणी हा प्रकार घडला त्या ठिकाणी नदीचे पात्र सुमारे मैलभर तरी रुंद आहे. आजूबाजूला सुंदर वनश्री असून कपिलतीर्थ, चक्रतीर्थ इत्यादि प्रेक्षणीय स्थळे आहेत.

( मंडला जिल्हा गॅझेट, पृष्ठ २५४ )

हैहयवंशीय माहिष्मतीचा प्रतापी राजा कार्तवीर्य सहस्रार्जुन आणि भृगु कुलोत्पन्न परशुराम यांचे युद्ध नर्मदा तीरावरच झाले आणि त्या युद्धात सहस्रार्जुनाचा समूळ नाश झाला. अशी कथा प्रचलित आहे की, सहस्रार्जुन राजा आपल्या राण्यांसह एकदा नर्मदाजलामध्ये जलविहार करीत असताना लंकाधिपति रावण तेथे आला आणि नदीचे पूजन करून आपल्या सहस्रावधी राक्षसगणासह पाण्यात स्नानासाठी उतरला. सहाजिकच त्यामुळे नदीचा सर्व प्रवाह ढवळला गेला आणि सहस्रार्जुनाच्या नौकाविहारात व्यत्यय आला. वरच्या बाजूने सहस्रार्जुनाने आपल्या हजारो बाहूंनी प्रवाह रोखून धरल्याने, रावणही संतप्त झाला व त्याने युद्धाला आव्हान दिले. बराच काळ दोघांचे तुंबळ युद्ध झाले आणि त्यामध्ये रावणाचा पराभव झाल्याने तो माघारा गेला. आपली सरशी झाली, रावण पळून गेला, या आनंदात सहस्रार्जुनाने प्रवाह सोडून दिला आणि ते साठलेले पाणी उचंबळून सहस्रधारांनी वाहू लागले. पुढे या ठिकाणी सहस्रधारा तीर्थ स्थापन झाले.

ज्या तळ्याजवळ या नदीचा उगम झाला त्या ठिकाणी नर्मदानदीचे मंदिर आहे. देवीची मूर्ति अष्टभुजा स्वरूपाची असून तिला नर्मदादेवी असेच म्हणतात. पूर्वी या पर्वतावर यक्षकिन्नरांची वस्ती होती. म्हणूनच महाकवि कालिदासाने मेघदूत या आपल्या प्रसिद्ध काव्यामध्ये या स्थानाचा उल्लेख केलेला असावा. या देवीने प्रकट होऊन आपल्या भक्तांना दर्शन दिल्याची उदाहरणे घडलेली आहेत. त्यापैकी एकदोन सत्यकथा आपण पाहू.

कोळणीचा वेष धरिला। नावेच्या छिद्रा हात धरिला।
कमरेपर्यंत वस्त्राला। भिजविले होतेंचि जलाने॥

पाण्यात राहूनच कोळणीने ही नौका किनाऱ्यापर्यंत आणली. हे दृश्य सर्व जनसमुदायाने पाहिले. ही कोळीण कोण-कोठली याबद्दल विचारपूस करता तिने सांगितले, 'तुम्हांला माहित नाही? ऐका,

मी ओंकार कोळ्याची कन्यका।
माझे नाव नर्मदा ऐका।
आम्हा परिपाठ आहे देखा।
ओले वस्त्र नेसण्याचा॥'

याप्रमाणे नर्मदादेवीने महाराजांना साक्षात दर्शन दिले आणि त्यांची बुडती नाव किनाऱ्याला लावली. (श्रीगजानन विजय ग्रंथ, ले. दासगणू १९६१)

दुसरी ऐका एक इतिहासकालीन गोष्ट!

सन १८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धामध्ये बुंदीकोटच्या राजाकडून खंडणी वसूल केल्यावर, रावसाहेब पेशवे आणि तात्यासाहेब टोपे हे दोघेजण दक्षिणेस यावयास निघाले. नर्मदा नदीजवळ जाले असता त्यांना आढळून आले की, पर्जन्यवृष्टीमुळे नदीचे पात्र तुडुंब भरलेले असून उतार मिळणे शक्य नाही. अशा वेळी रावसाहेब पेशव्यांनी संकटपार होण्यासाठी घोड्यावरून खाली उतरून नर्मदानदीला साष्टांग नमस्कार घातला. तिला हळदीकुंकु वाहिले. भरजरी शालू व खण मोठ्या भक्तिभावाने अर्पण करून त्यांनी तिला साकडे घालून म्हटले, 'गंगाबाई, तूंच आता रस्ता दाखवशील तर उपाय आहे.' तिला पुनरपि नमस्कार करून त्यांनी आपला घोडा भरधाव वेगाने तितक्याच भरधाव धावणाऱ्या प्रवाहात घातला. त्यांच्यामागोमाग तात्या टोपे, जळका रामभाऊ वगैरे सरदारांनीही वेलागकपणे उड्या घेतल्या. नदी पार करून नंतर ते एका मोठ्या संकटातून मुक्त झाले. (वसईकर गोडसे भटजीकृत बखर)

**नर्मदा परिक्रमा**— परिक्रमा म्हणजे प्रदक्षिणा होय. या नदीची परिक्रमा अतिशय पुण्यकारक मानतात. परिक्रमा करणाराने नदीचा प्रवाह कोठेही ओलांडावयाचा नाही, हा नियम पाळावा लागतो. यासाठी परिक्रमेचा क्रम असा की, नदीच्या उगमस्थानापासून सुरवात करून, भडोच येथील मुखापर्यंत एका किनाऱ्याने जावयाचे आणि तसेच परत उगमाकडे येऊन मग दुसऱ्या किनाऱ्याने मुखापर्यंत जाऊन उगमस्थानी समाप्ति करावयाची. प्रतिदिनी नर्मदा जल प्राशन

रामानंद बीडकर महाराज या नावाने एक साधुपुरुष महाराष्ट्रात होऊन गेले. पुणे शहरी नारायण पेठेत त्यांचा एक मठ असून, अजूनही बराचसा त्यांचा शिष्यगण आहे. हे महाराज एकदा नर्मदा नदीच्या दिशेने जात असता वाट चुकून एका घनदाट अरण्यात शिरले आणि तीन दिवसपर्यंत रानावनात अन्नाविना भटकत राहिले. शेवटी श्रमिक्षीण होऊन एका वृक्षाखाली बसले असता गौळणरूपाने नर्मदादेवी तेथे येऊन तिने महाराजाना दूध पिण्यास दिले. त्यानंतर तिने त्याना नर्मदानदीकडे जाण्याचा मार्ग दाखविला. महाराजांची यात्रा पुरी झाल्यावर ॐकारेश्वर येथे यात्रापूर्तीसाठी त्याना सहस्रभोजन घालण्याची इच्छा झाली. परंतु हायरे दुर्दैवा ! शिधासामुग्री विकत घेण्यासाठीही त्यांच्याजवळ तेवढा द्रव्यसंचय नव्हता. अशा वेळी नर्मदादेवीने प्रकट स्वरूपात त्यांना दर्शन देऊन त्याना एक रत्नजडित कंकणही अर्पण केले. ते कंकण विकून महाराजांनी सहस्रभोजन घातले. ही आख्यायिका नव्हे अथवा दंतकथा नव्हे. स्वतः महाराजांनीच आपले हे अनुभव लिहून ठेवलेले आहेत. देवस्वरूप सत्पुरुषाचे हे स्वानुभव आपण तरी खोटे कसे मानावेत !

वऱ्हाड प्रांतातील शेगावचे गजानन महाराज हे तर सुप्रसिद्धच आहेत. एकदा त्यांचे शिष्य मार्तंड पाटील, बंकटलाल मारुति, चंद्रभान, बजरंगलाल इत्यादींनी महाराजांना आग्रह करकरून ओंकारमांधाता या क्षेत्री स्नानास नेले. तत्पूर्वी महाराज त्याना म्हणाले, 'अरे वेड्यानो, शेगावीच विहिरीत नर्मदाजल आहे. त्यात आंघोळ केली तरी पुरे ! त्या क्षेत्री जायलाच पाहिजे असे नव्हे.' परंतु त्या शिष्यांनी हे ऐकले नाही. त्यांनी हट्टच धरला. अखेर महाराजाना ओंकार मांधाता येथे नेलेच. नावेत बसून प्रवाह ओलांडित असता, कसे कोण जाणे, त्यांची नाव एका खडकावर आपटून तत्काळ नावेच्या तळाला भोक पडले. पाणी नावेत शिरू लागताच सर्वांची गाळण उडाली. नावेतील नावाड्यांनी पटापट खाली उड्या मारल्या. परंतु इतरांना पोहता येत नसल्याने ते नावेतच बसून राहिले. महाराज डगमगले नाहीत. ते तसेच शांत चित्ताने नावेत आसन घालून बसले. भयभीत झालेल्या शिष्यांनी महाराजांना विनविले, 'महाराज, आम्ही चुकलो. आम्हाला क्षमा करा. आता या संकटातून फक्त तुम्हीच आम्हाला वाचवू शकाल.' महाराजांनी हात जोडले आणि नर्मदादेवीची आळवणी केली,

नर्मदे मंगळे देवी । रेवे अशुभनाशिनी ।
मंतु क्षमा करीं याची । दयाळू होऊनि मनीं ॥

आणि काय सांगावे ? एवढ्यात नवल घडले. नर्मदादेवी कोळणीच्या रूपाने तेथे आली. नावेच्या खाली जाऊन ते पडलेले छिद्र तिने आपल्या हाताने बंद केले. त्यामुळे नावेत पाणी येण्याचे बंद झाले.

कोळणीचा वेष धरिला । नावेच्या छिद्रा हात धरिला ।
कमरेपर्यंत वस्त्राला । भिजविले होतेचि जलाने ॥

पाण्यात राहूनच कोळणीने ही नौका किनाऱ्यापर्यंत आणली. हे दृश्य सर्व जनसमुदायाने पाहिले. ही कोळीण कोण कोठली याबद्दल विचारपूस करता तिने सांगितले, 'तुम्हाला माहित नाही? ऐका,

मी ओंकार कोळ्याची कन्यका ।
माझे नाव नर्मदा ऐका ।
आम्हा परिपाठ आहे देखा ।
ओले वस्त्र नेसण्याचा ॥'

याप्रमाणे नर्मदादेवीने महाराजांना साक्षात दर्शन दिले आणि त्यांची बुडती नाव किनाऱ्याला लावली. (श्रीगजानन विजय ग्रंथ, ले. दासगणू १९६१)

दुसरी ऐका एक इतिहासकालीन गोष्ट!

सन १८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धामध्ये बुंदीकोटच्या राजाश्रयाने लढणी थंड केल्यावर, रावसाहेब पेशवे आणि तात्यासाहेब टोपे हे दोघेजण दक्षिणेस यावयास निघाले. नर्मदा नदीजवळ आले असता त्यांना आढळून आले की, पर्जन्यवृष्टीमुळे नदीचे पात्र तुडुंब भरलेले असून उतार मिळणे शक्य नाही. अशा वेळी रावसाहेब पेशव्यांनी पैलपार होण्यासाठी घोड्यावरून खाली उतरून नर्मदानदीला साष्टांग नमस्कार घातला. तिला हळदीकुंकू वाहिले. भरजरी शालू व खण ओटीत भक्तिभावाने अर्पण करून त्यांनी तिला हात जोडून म्हटले, 'गंगाबाई, तूच आता रस्ता दाखवशील तर उपाय आहे.' तिला पुनरपि नमस्कार करून त्यांनी आपला घोडा भरधाव वेगाने तितक्याच भरधाव धावणाऱ्या प्रवाहात घातला. त्यांच्यामागोमाग तात्या टोपे, जळका रामभाऊ वगैरे सरदारांनीही बेलाशकपणे उड्या टाकल्या. नदी पार करून नंतर ते एका मोठ्या संकटातून मुक्त झाले. (वरसईकर गोडसे भटजीकृत ग्रंथ)

**नर्मदा परिक्रमा**— परिक्रमा म्हणजे प्रदक्षिणा होय. या नदीची परिक्रमा अतिशय पुण्यकारक मानतात. परिक्रमा करणाराने नदीचा प्रवाह कोठेही ओलांडावयाचा नाही, हा नियम पाळावा लागतो. यासाठी परिक्रमेचा क्रम असा की, नदीच्या उगमस्थानापासून सुरुवात करून भडोच येथील मुखापर्यंत एका किनाऱ्याने जावयाचे आणि तसेच परत उगमाकडे येऊन मग दुसऱ्या किनाऱ्याने मुखापर्यंत जाऊन उगमस्थानी समाप्ति करावयाची. प्रतिदिनी नर्मदा जल प्राशन

करून, परिसरातील एखाद्या देवालयात मुक्काम करावयाचा मार्ग क्रमीत असता नर्मदास्तोत्रे अगर शंकराचार्य विरचित नर्मदाष्टक म्हणत राहावयाचे प्रदक्षिणा करणाराला प्रत्यही डोंगर पहाड उलघावे लागतात दऱ्या काटेकुटे पार करावे लागतात, घनदाट जगलातून वाट शोधावी लागते काही वेळा वन्य जमाती यात्रेकरूना लुबाडतात, त्याना तोंड द्यावे लागते अशा अनत अडचणीतून परिक्रमा हात असल्याने व नर्मदादेवीची सेवा घडत असल्याने ती पुण्यकारक मानलेली आहे

'ॐ ह्रीं श्रां नर्मदायै नम ।' या मत्राने सर्पविष उतरते

* * *

## २ कावेरी देवी

या महानदीची उत्पत्ति-कथा स्कद पुराणात सागितली आहे ती अशी की, श्रीविष्णूने एक कन्या ब्रह्मदेवाला दिली पुढे कवर नावाचा एक ऋषि ब्रह्मगिरी पर्वतावर अपत्यप्राप्तीसाठी तप करू लागला आणि ब्रह्मदेव सतुष्ट झाल्यावर, त्यानी ती मुलगी (लोपामुद्रा) त्या ऋषीला दिली पण पुढे ती कवेर कन्या म्हणजे कावेरी या नावाने ओळखली जाऊ लागली परतु या मुलीला आपला देह परोपकारार्थ खर्च व्हावा असे वाटत असल्याने तिने तपश्चर्या करून, देवाकडून वर मागून घेतला की, 'इच्छा होईल तेव्हा नदीरूप तिला मिळावे'

पुढे एक दिवस अगस्त्य ऋषि त्या पर्वतावर आले असता कावेरीचे अप्रतिम लावण्य पाहून त्यानी तिला विवाहाचा मागणी घातली एका अटीवर विवाह करण्याचे तिने मान्य केले ती अट अशी की, 'एक क्षणही मुनींनी तिला विसरता कामा नये' याप्रमाणे त्याचे वैवाहिक आयुष्य सुखाने चालले असताना एकदा अगस्त्याना प्रवासाला जाणे भाग पडले पत्नीचे रक्षणकार्य शिष्यवर्गावर सोपवून, ते आश्रम सोडून निघून गेले कावेरीने ही सधी साधली व उरलेले आयुष्य परोपकारासाठी व्यतित व्हावे म्हणून तिने नदीरूप धारण करून वाहू लागली

आपले काम आटोपून ऋषि परत आल्यावर व त्याना हा वृत्तात समजल्यावर झालेल्या प्रकाराबद्दल फार विषाद वाटला पुन्हा पूर्वरूप घेऊन ससार करण्यासाठी येण्याबद्दल त्यानी कावेरीची प्रार्थना केली असता, तिलाही त्याची दया आली कावेरीने आपली दोन रूपे बनविली एक रूपाने वाहत राहिली आणि दुसऱ्या रूपाने लोपामुद्रा म्हणून ऋषीजवळ राहू लागली

कुर्ग प्रातातील ब्रह्मगिरी पर्वतावर ब्रह्मकुड तीर्थातून हिचा उगम होतो हे उगमस्थान समुद्रसपाटीपासून ४६७६ फूट उच असून याला कावेरीद्वार म्हटले

जाते. नदी अतिशय खडकाळ भागातून वाहत जात असताना वाटेत कारबीवे, कादानुसुर, कन्ना होले, सुवर्णामुर्डी, चिक्क होले व सुवर्णवती या नद्या मिळतात. तामीळनाड, म्हैसूर, कोइंबतूर, तिरुचिरापल्ली या भागातून ४७५ मैल वाहत जाऊन, ती नागापट्टणजवळ समुद्राला मिळते.

या नदीला भारतामधील दक्षिणगंगा असे पुराणांतरी नाव आहे. याचे कारण गंगेप्रमाणे हिची उत्पत्ति पवित्र क्षेत्रांतून झालेली तर आहेच, पण हिच्या किनाऱ्यावर श्रीरंगपट्टण, श्रीरंगम्, कुंभकोणम्, तंजाऊर, तिरुवैय्यार, कावेरीपट्टनम् अशी पवित्र क्षेत्रे आहेत. भक्तिभावाने यात्रा करणारे या सर्व क्षेत्रांना भेटी देतात.

तूळ राशीत जेव्हा सूर्य येतो, तेव्हा कावेरी नदीच्या मुखाजवळ मोठा मेळा भरतो. यात्रेकरू तेथील ब्रह्मकुंडात स्नान करून कावेरी देवीचे दर्शन घेतात. कोडगू ही आदिवासी जमात मुख्यत्वे येथे स्नानाला येते. तूळ संक्रमणकाळी गंगानदी गुप्त रूपाने या उगमाच्या ठिकाणी वास करते आणि भक्तजनांनी तेथे टाकलेली पापकर्मे स्वतःच्या शिरावर घेऊन कावेरी क्षेत्र पूर्ववत निर्मळ करते, अशी श्रद्धावान लोकांची भावना आहे.

शिलप्पधिकाराम् या महाकाव्यात कोवलनूच्या मुखाने कवि कावेरीला म्हणतो, चंद्रासारखा छत्रधारी आणि माळांनी सुशोभित असा चोळराजा आपला शासनदंड उन्नत करून उत्तरेला गेला. तुला सोडून तो गंगेत विहार करू लागला, तरी तू त्याच्यावर रुसत नाहीस अथवा रागवत नाहीस, याला काय म्हणावे ? पण मला माहीत आहे की, उच्चकुलीन गृहस्वामिनी परस्त्रीविषयी आपल्या मनात कधीही किल्मिष, दुजाभाव निर्माण होऊ देत नाहीत. आपला पति परस्त्रीजवळ बोलला, विहार केला तरी त्यांना पापवासनेची शंकाही येत नाही. वास्तव कावेरी, तुझा विजय असो.

शिवसमुद्रम् येथील कावेरी नदीचा धबधबा, जगातील एक सुंदर प्रपात समजला जातो. जोग प्रपात येथे जसे पाच प्रवाह निरनिराळ्या स्थानांतून खाली पडतात आणि पाहणाराला अपूर्व दृश्य दाखवितात, ( लेखकाने हे प्रत्यक्ष अनुभवले आहे ) तसे या ठिकाणी दोन प्रवाह खाली पडतात. पश्चिमेकडील ओघाला गंगाचुक्की आणि पूर्वेकडील ओघाला भारचुक्की असे म्हणतात. आधुनिक विज्ञानयुगात या प्रपातांचा उपयोग वीजनिर्मितीसाठी करून घेतला आहे, हे योग्यच आहे. ( भा. सं. को. २/३०८ ).

गंगा, यमुना इत्यादि नद्यांच्या उगमस्थानी ज्याप्रमाणे त्या त्या देवतांच्या मूर्ति स्थापन केलेल्या आढळतात, त्याप्रमाणे इतर अनेक नद्यांच्या उगमापाशी

त्या त्या देवताच्या मूर्ति स्थापन केलेल्या आढळतात. दक्षिण भारतामध्ये कावेरी नदी प्रमुख मानली जाते. कावेरीच्या उगमस्थानीच तिची मूर्ति वसविली आहे.

तामीळ भाषेत या नदीला पोन्नी म्हणजे सुवर्णाची नदी असे म्हटले जाते. कावेरी नदीच्या किनाऱ्यावर अनेक ठिकाणी सुवर्णाची माती आढळते. यामुळेच तिच्या आसमंतातील प्रदेशात सोन्याच्या खाणी आहेत. या नदीच्या उत्पत्तीसंबंधी अशी कथा सांगितली जाते, एकदा इंद्रदेवाने शंकराना विनविल्यावरून शंकरांनी ब्रह्मपुत्रा नदीचा स्रोत अगस्तीमुनींच्या कमंडलूमध्ये सोडून नंतर त्यांना सह्याद्रि पर्वताकडे पाठविले. ती गंगा घेऊन अगस्तीऋषि सह्याद्रि पर्वताच्या दक्षिण टोकावरील ब्रह्मकपाल या ठिकाणी आले. तेथे येताच एका कावळ्याच्या धक्क्याने तो कमंडलू खाली लवंडला. त्या वेळी त्या पाण्याने तेथे एक तलाव तयार झाला. त्या तलावातून जो प्रवाह बाहेर वाहू लागला तीच ही कावेरी नदी होय. या प्रवाहालाच पुढे हेमा व कनका या दोन सुवर्णार्था उपनद्या मिळतात. उगमस्थानीच कावेरी देवीचे मंदिर आहे. देवीची मूर्ति अप्रतिम असून श्रावण महिन्यात या ठिकाणी यात्रा भरते. हीच नदी म्हैसूरजवळून वाहात जात असताना त्या ठिकाणी 'कृष्णराज सागर' या नावाचा मोठा तलाव आहे. त्या ठिकाणी एका मंदिरात कावेरी देवीची मूर्ति स्थापन केलेली आहे. या मूर्तीचे वैशिष्ट्य असे की, मूर्तीच्या उजव्या हातातून पाण्याचा स्रोत अखंडपणे वाहात आहे असे दृश्य सजविलेले आहे.

(श्री. शंभुराव देवळे, गोकुळ मासिक, पुणे, जानेवारी ६१)

महाराष्ट्रात त्र्यंबकेश्वर येथे गोदावरी नदीच्या उगमाची अशीच कथा प्रसिद्ध आहे. गौतम ऋषींची गोहत्या पातकापासून सुटका करण्यासाठी ही गोदावरी नदी शंकराच्या कृपेने या ठिकाणी अवतरली. ब्रह्मगिरी पर्वतावर शंकरांनी आपल्या जटा जोराने आपटल्या आणि आपल्या मस्तकावरील गंगा खाली झटकली. तीच पुढे प्रवाहरूपाने एकदोन वेळा गुप्त होऊन पुन्हा प्रकटरूपाने वाहू लागली. मी स्वतः ब्रह्मगिरीवरीला शंकरानी जटा आपटल्याचे ठिकाण पाहिलेले आहे. साधारण वीस फूट लांबीच्या खडकातच जटा कोरलेल्या दिसतात. सुमारे पांचसहा फूट खोल खड्डा आहे, यामध्ये पावसाळ्यात पाणी साचते. कदाचित हेच पाणी डोंगरातील खडकाच्या थरातून झिरपून कुंडाच्या ठिकाणी गायमुखातून पडत असावे. म्हणून त्याचा शंकराबरोबर संबंध लावलेला असावा. गायमुखाजवळ गोदावरी देवीची मूर्ति वसविलेली आहे.

अशा प्रकारे सिंधु, ब्रह्मपुत्रा, गंडकी, चर्मण्वती, शरयु, कृष्णा इत्यादि जलदेवतांची माहिती देता येईल. परंतु स्थलाभावी इच्छा असूनही ती देता येत

नाही जलदेवताचे अस्तित्व दर्शविण्यात आणि त्याचे महत्त्व पटविण्यास एवढी उदाहरणे पुरेशी व्हावीत.

## ४. आसरा

आसरा किंवा अप्सरा या नावाच्या जलदेवताचा एक प्रकार आहे. तरुण मुली अथवा एकदोन मुले झालेल्या स्त्रिया यानी काही कारणाने जर पाण्यात जीव दिला, तर त्याचे आत्मे या स्वरूपात भूतलावर पुन्हा वावरतात. तसेच एखादी स्त्री बाळंतपणाच्या काळामध्ये मृत्यु पावली तर ती पुन्हा या योनीमध्ये वावरते. याचाच अर्थ असा की, ही योनी पिशाच्च स्वरूपाची आहे. याचे वास्तव्य नेहमी पाण्याच्या ठिकाणी म्हणजे विहिरी, तळी इत्यादि ठिकाणी असल्याने त्याना काही ठिकाणी जलदेवता मानलेले आहे.

या अप्सरा नेहमी साताच्या संख्येने वावरतात, आणि सातीच्या सातजणी एकदम एखाद्या मानजावर झडप घालतात, म्हणून याना सातआसरा असे मानले जाते. याचे सावज म्हणजे कमकुवत अथवा मृदुमनाची माणसे ही होत. यामुळेच स्त्रिया अथवा लहान मुले यानाच त्याची जास्त बाधा होते. पुरुषाना याच्यापासून विशेष त्रास होत नाही याची वस्ती जशी जलसंचयाच्या ठिकाणी असते, तशीच ती तीन रस्ते अथवा तीन पायवाटा जेथे एकत्र मिळतात अशा ठिकाणीही असते. या संदर्भात वाचकानी एक गोष्ट ध्यानात घ्यावी की, **इतरत्र सप्तमातृकांचे जे विवरण आले आहे, त्यांच्याशी या सात आसऱ्याचा कोणताही संबंध नाही.** लढाईतील वीराला जे मरण प्राप्त होते, त्याप्रमाणे या आसराचे स्वरूप असते असे मानतात. ही पिशाचे परद्वेष्टी असून त्याना चंद्रदेवते-प्रमाणे वागवायचे असल्याने त्याना त्या देवतेच्या भगिनी समजले जाते. त्या लहान मुलानाही पछाडतात. त्यामुळे अवसे पौर्णिमेच्या त्याच्या फिरण्याच्या दिवशी लहान मुलाना तिन्हीसांजेच्या वेळी अथवा रात्री बाहेर पाठवू नये.

या आसराचे स्वरूप फार विचित्र असते. त्याचे चेहरे पांढरे फटफटीत असून त्याचे हात लांबच लांब व पावडर लावल्याप्रमाणे पांढरेशुभ्र असतात. त्याचे डोळ्याच्या भुवया सोनेरी छटा असलेल्या असतात. त्यांच्या अंगावर राण्यासारखे मौल्यवान वस्त्र असते. त्या कधी अतिशय उंच तर कधी लहान अशा स्वरूपात प्रकट होतात, तर कधीकधी त्या कुत्र्या मांजराच्या स्वरूपातही दृग्गोचर होतात. तात्पर्य, तो जीवात्मा वाटेल ते रूप धारण करू शकतो. त्याची मूळप्रवृत्ति मात्र मानवाला त्रास देण्याची असते.

कित्येकदा त्यांची वस्ती तिठयावर अगर चव्हाटयावर असते. यास्तव त्याचे देणे द्यावयाचे झाल्यास अगर त्यांचे सांत्वनपर उपाय करावयाचा असल्यास तो या ठिकाणी केला जातो. काही वेळा त्यांना पाकोळीच्या आकाराच्या भाकरी अर्पण केल्या जातात. एखाद्या मुलीच्या अंगावर त्यानी झडप घातली म्हणजे ती मुलगी विचित्र वर्तणूक करते, त्यावरूनच तिला भूतबाधा झाली असावी, अथवा आसरानी पछाडले असावे, असे समजले जाते. ही पीडा टाळण्यासाठी मांत्रिका-कडून उपाय करावा लागतो. तो काही मंत्र म्हणून त्यांचा ठावठिकाणा काढून घेतो. त्याचे काय मागणे आहे ते विचारून घेऊन त्याप्रमाणे उपाययोजना करतो. कित्येकदा मनुष्याला पछाडलेल्या या आसरांची पाठवणी करताना हिरवे कपडे, हळद-कुंकू, हिरव्या बांगड्या, शिजविलेले अथवा हिरवे अन्न त्यांना दिले जाते. काही वेळा नारळ अथवा कोंबडे-बकरेही दिले जाते. काही जागा अशा असतात की, या आसरांनी कोणाला त्रास देऊ नये म्हणून त्यांचे वार्षिक देणे ठराविक दिवशी त्या जागी ठेवले जाते.

पाण्यात बुडून मेलेल्या स्त्रीचा जीवात्मा 'हडळ' या नावाने भूतलावर वावरत असतो. ती पिवळे वस्त्र परिधान करते, केशपाश मोकळा सोडते. तिच्या शरीराचा पुढील भाग चांगला जाडजूड तर मागचा भाग खूपच कृश असतो. ती जेव्हा एखाद्या स्त्रीला पछाडते तेव्हा ती स्त्री आपले शरीर एकसारखे घुसळून काढते आणि मोठमोठ्याने ओरडते.

भारताच्या सर्व भागांत या जलदेवता आढळतात व त्या मानल्या जातात. गुजराथ प्रांती यांना 'शंखिणी' असे म्हणतात. या शंखिणी तळ्याच्या काठी आढळतात. म्हैसूर भागात यांना अक्कागारू, मद्रासकडे आसकनिकल, पंजाब भागात जलपरी, पंजाबच्या सपाट प्रदेशांत योगिनी अथवा जोगिनी असे म्हणतात. विहिरी, तळी, अथवा पाणवठे या ठिकाणी त्यांची वस्ती, असल्याने त्यांना जलयोगिनी असेही म्हणतात. (जेम्स धर्मकोश, पृष्ठ ७१८)

दक्षिण भारतामध्ये यांना काही ठिकाणी ग्रामदेवता मानतात. या कुमारिका असून तळ्याचे रक्षण करतात. तळी किंवा जलाशय यांना जेथे भेगा पडण्याचा संभव असतो, तेथे यांच्या मूर्ति बसवितात. जेथे मूर्ति नसतात, त्या ठिकाणी सर्वजणी जमून भांडण करतात व त्यामुळे भेगा पडतात अशी त्यांची समजूत आहे. संकटाच्या वेळी यांतील एखादी देवता दारोदार हिंडून पुराच्या पाण्याची धोक्याची सूचना गावकऱ्यांना देते अथवा अन्य मार्गाने सुचविते. मानवाला त्यांच्या या सहाय्यकारी गुणामुळेही त्यांची पूजा केली जाते.

(डिसेंबर १९६७ मधील कोयनानगर भूकंपाबरोबर याचा संबंध जोडणे इष्ट ठरेल काय? तेथे या मूर्ति बसविणे योग्य होईल काय?)

काही ठिकाणी अशी चाल आहे की, गाय अगर म्हैस व्याली म्हणजे पहिल्या तीन दिवसाचे दूध या देवताना अर्पण करण्यात येते कारण तसे न केल्यास दुभते जनावर लवकर आटून जाइल ही भीती असते

महाराष्ट्र ज्ञानकोशकाराच्या मते आसरा हा अप्सरा या शब्दाचा अपभ्रंश आहे स्वर्गामध्ये निवास करणाऱ्या ज्या स्त्रिया त्या अप्सरा होत उर्वशी, रंभा, मेनका इत्यादि अनेक अप्सरांची नावे वाचकांच्या वाचनात असतीलच उर्वशी ही तर वसिष्ठमुनींची माता होय अथर्ववेदामध्ये यासंबंधी अधिक माहिती मिळू शकेल विशेषतः गंधर्वाबरोबर तिचा संबंध दाखविलेला आहे ऋग्वेदोत्तर काळात भूलोक व विशेषत त्यावरील वृक्ष हे देखील त्यांच्या संचारक्षेत्रामध्ये अंतर्भूत केलेले आहेत न्यग्रोध व अश्वत्थ या वृक्षावर त्यांचा निवास असतो त्याचप्रमाणे औदुंबर व प्लक्ष या वृक्षावर असतो

या देवता जलामध्ये राहतात भूलोकावर येऊन निमिषार्धात त्या परतही जातात त्यांनी मानव वस्तीमध्ये न राहता एखाद्या नदीतटी अथवा जलसंचयाशी जाऊन वास करावा असे वेदामध्ये त्याना प्रार्थना केलेली आहे म्हणूनच त्याना आपला निवास जलसंचयाच्या ठिकाणी अगर सागरामध्ये वरुणराजाच्या महालात करावा अशी त्याना आज्ञा आहे त्यांच्यात मानवांना वेड लावण्याचे सामर्थ्य आहे यास्तव त्यांच्यावर मंत्रप्रयोग, जादुटोणा करता येतो क्वचित कधी त्या माणसावर प्रेमही करतात आणि याबाबतीत मेनका, उर्वशी यांची उदाहरणे प्रसिद्धच आहेत हडळ, खाईन, लाव, नवलाई, चेडकाई, चुडैल ही भूतयोनी म्हणजे या आसरांचाच प्रकार होय

जलदेवता हा शब्द द्व्यर्थी वापरला जातो गंगा यमुनासारख्या नद्यांना जलदेवता म्हणतात आणि पाण्यात सदैव वस्ती करून त्या ठिकाणी येणाऱ्या एकट्यादुकट्या माणसावर हल्ला करून त्याच्यावर संकट परंपरा कोसळली असे वागणाऱ्या, अप्सरा अथवा आसरा याही जलदेवता होत यांची संख्या सात असल्याने याना 'साती आसरा' असेही म्हणतात जलामध्ये विहार करणाऱ्या त्या अप्सरा असा अर्थ आहे अमर कोशामध्ये अप्सरांची संख्या

घृताची मेनका रंभा उर्वशी च तिलोत्तमा।
सुकेशी मंजुघोषाद्या कथ्यन्तेऽप्सरसो बुधैः॥

सात आसराची नावे जी प्रचलित आहेत, ती जलचराच्या नावावरूनच आलेली दिसतात. मत्स्यी, कूर्मी, कर्कटी, दर्दुरी, जतुपी, सोमपा आणि मकरी अशी आहेत. महाराष्ट्रात काही भागात त्याना माऊल्या असेही म्हणतात. दक्षिण भारता-मधील सात आसरांना एक भाऊही असतो. अप्सरा व आसरा याच्या नावात हा मूळ फरक आहे.

गोंड वाङ्मयात याच्या उत्पत्तीविषयी एक रम्य कथा आहे. गोंड त्याना दौगन गुरूच्या कन्या मानतात. त्याचा उगम पित्याच्या हातावरील फोडापासून झाला. पित्याचे या मुलीवर अतिशय प्रेम होते. सूर्यदेवाच्या त्या नजरेस पडू नयेत म्हणून तो त्याना लपवून ठेवी. पण एक दिवस पवनदेवाची नजर या सुंदरिया कन्यावर गेली आणि त्यांच्या सौंदर्याने तो मोहित झाला. कन्याही त्याच्यावर आसक्त झाल्या. दौगन गुरूला हे समजताच त्याने पवनदेवाला हाकलून देऊन आपल्या कन्यारत्नांना कोंडून ठेविले. पण पुढे पवनदेवाने महादेवाला प्रसन्न करून त्यांच्या मध्यस्थीने दौगन गुरूच्या कन्या हस्तगत करून पळवून नेऊन विवाह केला. त्या वेळेपासून वरुण देवाबरोबर त्या समुद्रात राहू लागल्या.

या देवताचे प्रतीक म्हणून सात दगड शेंदुरचर्चित करून त्यांची पूजा केली जाते. ( लौकिक दंतकथा, नवभारत, नोव्हेंबर १९५९, ले. दुर्गा भागवत )

या देवतासंबंधी प्रचलित रूढि अशी की, घरात देवी आल्या, गोवर आला म्हणजे तो देवतेचा कोप समजून, वाजतगाजत, घटाची मिरवणूक पाणवठ्यावर अथवा समुद्रावर नेऊन विसर्जन करावयाची. गुरुवार दिनांक २ मार्च १९६७ रोजी लेखक आपल्या राहत्या घरी तिसऱ्या मजल्यावर उभा राहून उगवत्या सूर्यबिंबाची शोभा पाहात असताना, 'देवी बोळवणाची' एक मिरवणूक रस्त्याने चाललेली पाहिली. ढोलकी वाजत होती. एका सुहासिनीच्या मस्तकावर उदककुंभ-नारळ होता आणि दुसरी एक पीतवस्त्र नेसलेली महिला, अंगात देवीचा संचार झालेल्या स्थितीत नाचत चालली होती. गायक गाणे म्हणत होते, 'सात आसरा रथांत बैसल्या । आम्हां सांगाती घराला चालल्या ॥' लेखक गावच्या पंचायतीचा सभासद असताना घरासमोर, सर्वांच्या उपयोगासाठी एक सार्वजनिक पाण्याचा नळ त्याने मंजूर करून घेतलेला होता व अद्यापही अनेकजण तेथे पाणी घेतात. मिरवणूक चालली असताना, दहा-पाच बायका तेथे उभ्या होत्या. त्यांपैकी एक एकाएकी हातवारे करून नाचू लागली आणि मिरवणुकीच्या रोखाने निघाली. ढोलकीच्या आवाजावर ती नाचत होती. शेवटी मिरवणुकीजवळ आल्यावर, कलशवाल्या बाईने तिला कुंकू लावले, फुले उधळली, त्यांतील थोडेसे पाणी तिच्या अंगावर शिंपडले, तेव्हा ती परत नळाजवळ आली व धाडकन अंग टाकली

खडीवर टाकून दिले. इतर बायकांनी तिच्या तोंडावर पाणी शिंपडले आणि हळूहळू ती सावध झाली व पाणी भरू लागली.

ही घटना सांगण्याचे प्रयोजन असे की, देवीचे वारे अंगावर खरोखरच येते का काही भोंदूगिरी आहे, हे समजून यावे. साधारणपणे कोणतीही कुलीन स्त्री, आपले पाणी भरण्याचे काम सोडून, अंगविक्षेप करीत रस्त्याने नाचणार नाही. देवीला नमस्कार केल्यावर, आदरभाव अर्पण केल्यावर, परतल्यानंतर खाली दगडावर पडणार नाही. ही घटना घडविण्यास तिला कोणीही प्रवृत्त केलेले नव्हते, उत्स्फूर्त होती. तिचा कोणताही त्यापासून लाभ झालेला नाही. श्रद्धावान माणसे यामध्ये देवीचा साक्षात्कार-संचारच पाहतात. मग इतराना काहीही वाटो. अशा लहानसहान प्रत्यही घडणाऱ्या घटनांमध्ये जर अर्थपूर्ण दृष्टीने पाहिले, तर परमेश्वरी शक्तीचे अस्तित्व दिसून येते. फक्त ती दृष्टि असावयास पाहिजे. नव्हे ! प्रत्येकाने ती येण्याचा प्रयत्न केला पाहिजे, हेच तात्पर्य होय.

### ५. डाकीण

जी विधवा अगर एकलकोंडे जीवन कंठणारी स्त्री, पुत्राशिवाय मरते ती डाकीण होते. रस्त्याच्या चौकात बसून येणाऱ्याजाणाऱ्या लहान मुलांना ती पछाडते. याचे कारण असे संभवते की, मनुष्ययोनीत असताना त्या स्त्रीची मुलाबाळांची हौस अपूर्ण राहिलेली असते.

### ६. हडळ

जी स्त्री बाळंतपणाच्या काळी अथवा बाळंतपणात मरण पावते, तिच्या जीवात्म्याला हडळ या नावाने ओळखतात. ती पिवळी साडीचोळी नेसते. केस मोकळे सोडते. तिच्या शरीराचा पुढील भाग चांगला जाडजूड तर मागील भाग अगदीच कृश असतो. ती तळी, झाडी, ओसाड जागा व घरातील ओसाड ठिकाणी वस्ती करून राहते. काही वेळा ही सुंदर स्त्रीचे रूप घेऊन पुरुषसहवास करते. याबाबत अनेक दंतकथाही प्रचलित आहेत.

### ७. लाव

लाव म्हणजे भूतयोनीतील एक स्त्रीस्वरूप. ती स्मशानात वस्ती करून असते, मृत माणसांची आतडी भक्षण करून आपले उदरंभरण करते. अनेक वेळा ती मांजर, कुत्रे, शेळी या स्वरूपात प्रथम दृग्गोचर होऊन नंतर एकदम स्त्रीरूप घेऊन लहान मुलाना भिवविते.

भूतयोनीतील आसरा अथवा वरील प्रकारच्या एकाद्या स्त्रीने अथवा खवीस, ब्रह्मराक्षस, वेताळ, झोटिंग अशा प्रकारच्या पुरुषप्रकृतीच्या पिशाच्चाने

एखाद्या माणसाला पछाडल्यास काही निष्णात मांत्रिक याचा बंदोबस्त करतात त्याचे काही मार्ग पुढीलप्रमाणे

( १ ) कापूर अथवा धूप यांच्या धुरावर लिंबू मंत्रून ते रोग्याच्या उशाखाली ठेवणे

( २ ) एका कागदावर रोग्याचे नाव लिहून त्यावर विभूति वा काही औषधी ठेवून, मंत्र म्हणून तो कागद एका ताईताच्या पेटीत घालून तो दोरा ताईत रोग्याच्या गळ्यात अथवा हातात बांधणे,

( ३ ) विभूती मंत्रून ती रोग्याच्या डोक्यावर चोळणे,

( ४ ) एखादी कोंबडी अथवा बकरी रोग्याच्या अंगावरून ओवाळून ती बाहेर नेऊन ज्या ठिकाणी तो इसम पछाडला गेला त्या ठिकाणी कापणे

( ५ ) भात, मांसाचा तुकडा, दही अंडे, नारळ, फुले व कुंकू एका टोपलीत घालून ती टोपली रोग्यावरून ओवाळून चव्हाट्यावर नेऊन ठेवणे

( ६ ) मांत्रिकाने उडीद मंत्रून ते सतत रोग्यावर फेकत राहणे,

( ७ ) ज्या वेळी आसरा अगर सटवाई यांनी एखाद्या व्यक्तीला पछाडले असेल त्या वेळी लाल पिवळा गंडा कापरावर मंत्रून तो रोग्याच्या हातात बांधणे,

( ८ ) पछाडलेल्या भुताला मंत्रविद्येने बाहेर काढून त्याला बाटलीत भरून ती बाटली जमिनीत पुरून टाकणे,

( ९ ) भूर्जपत्रावर काही मंत्राची अक्षरे लिहून पाण्यात घालून ते पाणी त्या व्यक्तीला प्यावयास देणे,

( १० ) मांत्रिकाने एखाद्या झाडाजवळ नेणे, योग्य मंत्र उच्चारून त्या पिशाच्याला शरीराच्या बाहेर काढणे, झाडात घालणे, आणि झाडात लोखंडी खिळा मारून तेथेच जाम करून टाकणे,

( ११ ) ब्राह्मणजीवात्म्याने एखाद्याला पछाडले असता ब्राह्मणभोजन घालून दक्षिणा देऊन बोळवण करणे,

( १२ ) रोग्याला वेताळाने पछाडले असल्यास भात, दही, चुना, नारळ, पानसुपारी, वेताची काठी, रुईच्या फुलांच्या माळा, कापूर, उदबत्ती, वगैरी बकरी यांचा नैवेद्य गावातील वेताळाला अर्पण करावा गावातील वेताळाला हा नैवेद्य मारकऱ्या एक पायाने असतो नैवेद्याची एक भागेची पुडी या नैवेद्यामध्ये ठेवतात

( पुणे जिल्हा गॅझेट, भाग १, पृष्ठ ५७३ )

माहे ऑगस्ट १९६३ साली मी औरंगाबाद येथे रुद्रस्वाहाकारासाठी गेलो असता एका मृतात्म्याने पछाडलेल्या माणसाचा मांत्रिकाबरोबर झालेला संवाद ऐकलेला आहे. रात्रीचा दहाचा सुमार होता. इदूरचे एक देवीभक्त व मांत्रिक श्रीयुत महादेवशास्त्री कुरुळकर, मी स्वतः आणि काही इतर तेथील मंडळी बोलत बसलो होतो. एकाएकी सुमारे सतरा-अठरा वर्षांची एक मुलगी त्या घरापासून सुमारे अर्धा मैल लांब असलेल्या तिच्या निवासस्थानापासून अंगात संचार झालेल्या स्थितीत आली आणि बंद दारावर तिने जोराने धक्का मारला. इतक्या जोराने की, दाराची कडी तुटून दार उघडले गेले. मांत्रिकाने सर्व प्रकार ओळखला. त्यांनी एक तुपाचा दिवा लावला. उदबत्ती व धूप जळत ठेवला. देवीचे तीर्थ शिंपन केले विभूती मंत्रूनही त्या मुलीच्या अंगावर टाकली. काही क्षणानंतर तो जीवात्मा बोलू लागला. मांत्रिकाने त्या मुलीचा उजवा हात आपल्या हातात घट्ट धरून ठेवला होता. त्या दोघांची प्रश्नोत्तरं चालली होती व आम्ही ती ऐकत होतो. तो जीवात्मा थकला म्हणजे त्याला मधूनमधून पाणी अथवा दूध देण्यात येई कधी कधी तो तक्रारीच्या सुरात बोले, 'मला दिसत नाही, दिवा लावा' अशा वेळी दिव्याच्या वातीवरील काजळी काढून टाकली म्हणजे त्याला दिसू लागे. एखाद्या गोष्टीचे उत्तर देणे त्याला योग्य वाटले नाही अथवा अशक्य असेल तर तो 'गुरू' ला विचारून येई आणि मगच उत्तर देई. तसे तो प्रांजल पणे कबूलही करी. दूध प्यायल्यानंतर अथवा रुद्रस्वाहाकार प्रसादाचा लाडू खाल्ल्यानंतर अशौच्यपणा घालविण्यासाठी, मी पाय धुवून येतो असे म्हणे दूध त्याला प्यावयास देताना फडक्यातून गाळून देण्यात येई, कारण गिळण्यास साईसारख्या घट्ट पदार्थांचा त्रास न व्हावा त्याचबरोबर समापण सुमारे दोन तासापेक्षा जास्त चाललेले होते त्याचा आत्मा काही स्थानिक लोकांना ओळखीत होता व त्यांची नावे घेऊन विचारपूस करीत होता लेखकाचे आयुष्यात हा प्रथमच अनुभव होता

'त्या सर्व प्रश्नोत्तरांचे तात्पर्य त्या मुलीच्या विवाहाविषयक अडचणीचे निवारण कसे होईल एवढेच होते. ज्या घरात हा प्रकार घडला त्या घराच्या मालकिणीला मुलं होत नव्हती ती कोणत्या प्रकारे वागले असता होतील याचे दिग्दर्शन, तेथील रुद्रस्वाहाकार समारंभात झालेल्या चुकांचे दिग्दर्शन व त्या चुका निवारण्याचे उपाय, तसेच सहा महिन्यापूर्वी गोरेगाव (मुंबई) येथील गायत्री यज्ञात झालेल्या चुका व त्या निवारण्याचे उपाय इत्यादि अनेक प्रमुख विषयही होते. हा जीवात्मा ब्रह्मसमंधापैकी असावा कारण 'मी सहा महिने अनुष्ठानास बसणार आहे' असे तो वारवार बोलत होता या योनीमध्ये अशा

तऱ्हेचे जीवात्मे वावरत असतात हे मी स्वतः अनुभवले आहे. म्हणून ही नोंद या प्रकरणी करावीशी वाटली. कारण असे अनुभव क्वचित येतात.

मुसलमान लोकही जलदेवता मानतात त्यापैकी एकीचे नाव इल्यास असे आहे. हिंदु लोकांच्या श्रावण महिन्यातील प्रत्येक शुक्रवारी मुसलमान पुराणातील 'खाजाखिज्र' या नावाचा एक उत्सव मुसलमान जनता जलदेवतेला प्रसन्न करून घेण्यासाठी करते. इलिशा अथवा इल्यास याला जलदेवतेचा अवतार मानतात. इल्यासच्याच तपश्चर्येमुळे जलदेवता प्रसन्न झाली आणि पृथ्वीवर पर्जन्यवृष्टि होऊन सुखसमृद्धि नांदू लागली. उत्सवाच्या दिवशी नावेच्या बांबूचा सांगाडा बनवून त्यावर तलमसुती रेशमी अगर जरीचे कापड ताणून बसवितात त्या नावेला ते किस्ती असे म्हणतात. त्या नावेत अनेक पणत्या लावून नावेची मिरवणूक काढून तिचे नदीमध्ये विसर्जन करतात.

(भारतीय संस्कृति कोश, भाग पहिला, पृष्ठ ५५८)

भारतीय जनता जलदेवता मानते, त्याचप्रमाणे इतर देशात देखील जलदेवतांना आदरणीय स्थान आहे. आपण त्यांपैकी काही उदाहरणे पाहू.

### ७. इसीस

ही एक पाश्चिमात्य देवता म्हणून एका प्रकरणात पाहिली आहे. परंतु मूलतः ती जलदेवताच आहे. लिबियन संस्कृतीची ती मूळची जलदेवता. त्यानंतर जरी ती इजिप्शियन संस्कृतीची देवता बनली असली व होरस याची माता आणि पत्नी या दोन्ही नात्यांनी वावरत असली तरी तिला जलप्रलय करणाऱ्या देवाची पत्नी म्हणूनच ओळखतात. वास्तव ती नाईल नदीचा पूर उत्पन्न करणारी देवता मानली आहे. जलप्रलय करून सर्व शेतांना ती पाणीपुरवठा करते म्हणून तिला सती अथवा सेप्त असेही म्हणत. पाणीपुरवठा करणारी म्हणून तिला ऐंकेत असे नाव आले आहे. जलदेवता म्हणून तिला मानत असले तरी पृथ्वी, आकाशातील तारे यांची देवता म्हणूनही तिला ओळखले जाते.

(जेम्स धर्मकोश, भाग बारावा, पृष्ठ ७११)

### ८. ॲंफिट्रिटे

ही ग्रीक संस्कृतीची एक सागरदेवता व पोसिडन या सागरदेवाची पत्नी होय. ऑर्फिलस येथील देवसमूहात अगर विवाहाच्या वरातीच्या चित्रामध्ये ती सागर देवाची पत्नी म्हणूनच दाखविलेली आहे. पोसिडन हा स्वतः वादळ उत्पन्न करू शकतो व ते शांतही करू शकतो. भूकंपाने पर्वत दुभगवू शकतो, बेटांचे समूह सागरात गाडू शकतो आणि नवीन उत्पन्नही करू शकतो. वास्तव देवींचे महत्त्व

त्यांच्या मानाने कमी लेखतात. या देवतेला शांत करण्यासाठी सागराला घोडे अर्पण करण्याची रूढि होती. ( जेम्स धर्मकोश, भाग बारावा, पृष्ठ ७१३ )

बॅबिलोनियन संस्कृतीमध्ये दमकिना आणि तिचा पति यांना पर्शिअन सामुद्रधुनीमधील प्रमुख जलदेवता मानले जात असे. किर्गुला व निना या तिच्या दोन मुली. निना ही जहाजावर बसून सफरीस जात असे म्हणून तिला सागराजी ( गेस्टीनान ) म्हणत असत. काही वेळा ती मत्स्यरूपाने वावरत असे. नद्यांच्या पुराचे नियंत्रण करणारी देवता म्हणून निन-गिरसू या नावाची होती. वादळ उठविणे, पर्जन्यवृष्टि करणे ही कामे करणारी देवता कु-आना या नावाची होती.

रशियन वंश वेद-अव्हा व वेदअझरव्हा या जलदेवतांची पूजा करीत असे.

असिरीयन संस्कृतीमध्ये ज्याप्रमाणे राक्षसयोनी मानीत असत, तसे जल-देवताही मानीत होते. एका कवीचे हे वर्णन पहा.

Seven are they, Seven are they,
In the Ocean deep, Seven are they,
Not male nor female are they,
They stand in the High way,
to befoul the path,
Evil are they, Evil are they ll

याचा अर्थ सरळ आहे की, या जलदेवता सात आहेत. त्या सागर अथवा पाण्याच्या ठिकाणी राहतात. लोकांचे रस्ते अडवतात, त्या दुष्ट प्रवृत्तीच्या आहेत, त्या सात आहेत. भारतामध्ये जलदेवता आसरा सातच मानलेल्या आहेत आणि त्या मानवावर झडप घालतात, त्रास देतात. म्हणजे सात जलदेवतांचे तत्त्व दोन्ही संस्कृतींमध्ये एकच आहे.

जैनपंथीय ग्रंथकार ब्रह्म गुणदास याने आपल्या 'श्रेणिक चरित्र ग्रंथ' मध्ये आसरा देवींचा उल्लेख केला आहे. तो असा.

या देवता सप्त आसरा । ज्यांच्या दारी बांधिजति सुंदरा ।
त्याचा विघ्न परिहारा । करिती देखा ॥
लोकीं स्थापिल्या सप्त मातरा । या कुळदेवता मनोहरा ।
एक तेज रूप त्या सुंदरा । म्हणति देखा ॥ ( अध्याय ३।३०–३२ )

त्या समाजात या देवतांचे स्थान कोणते आणि परिणाम काय होतो, याचे वर्णन वरील ओव्यात मिळते.

पूर्वेकडे तैवान बेटामध्ये तैपेह या राजधानीच्या शहरी, ड्रगन हिलवर एक सागर देवतेचे स्थान आहे सुमारे दोनशे वर्षांपूर्वी बांधलेले हे देवालय, दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी नेस्तनाबूद करण्यात आलेले होते पण युद्धानंतर, चँग-कै शेक याने त्या बेटाचा ताबा घेतल्यावर, त्याचा जीर्णोद्धार सन १९५९ केला या मंदिराला ड्रगन मंदिर असेही म्हणतात या मंदिरात उच्चासनावर सागर देवते शेजारी त्या देवता देवींची मूर्ति आहे दोन्ही मूर्ति भव्य असून सुवर्णजडित आहेत मंदिराचे संगमरवरी पाषाणावरील शिल्पकला, लाकडावरील कोरीव काम व वरील भागी काचेचे सुंदर नक्षीकाम, यानिकाचे नेत्र सुखावतात चिनी धर्म संस्थापक कन्फ्युशिअस याचे मंदिर याच टेकडीवर आहे तसेच चार एकर चौरस मैदान जागेवर, पर्शियन प्रासादासमान, कलापूर्ण एक मशिदही तेथे आहे

(श्रीकांत टिळक, प्रवासवर्णन, केसरी १०-१२-६७)

परदेशात सुवर्ण मूर्ति आजही दिसतात आणि भारतात मात्र पुणे पर्वती मंदिरातील गणेश पार्वती सुवर्ण मूर्ति, सातारा जलमंदिरातील शिवाजीमहाराजा या पूजनातील सुवर्णाची भवानी देवी, पंजाबमधील सरस्वती देवीची सुवर्ण मूर्ति चोराकडून अगर शत्रूकडून लुटल्या जाव्यात आणि सुवर्ण मूर्ति दर्शनालाही शिल्लक नसाव्या, हे केवढे दुर्भाग्य होय

ग्रीस या पूर्वेकडील देशात दरवर्षी जलदेवतेचा उत्सव फार मोठ्या प्रमाणावर साजरा केला जातो त्या दिवशी नेहमीचे शिष्टाचार मोडण्यास समाजाची परवानगी असते कोणत्याही व्यक्तीने कोणाचाही कसाही अपमान केला, तरी या दिवशी तो क्षम्य असतो साधारणतः स्त्रीवर्ग प्रातःकाळी प्रथम घरातील पुरुष वर्गाचा अपमान करून आपल्या दिवसाच्या कार्यक्रमास सुरुवात करतो आणि पुरुषवर्ग याचा मोबदला स्त्रियांना सायंकाळी देतो सांगण्याचा मुद्दा इतकाच की, या देशातही जलदेवता मानतात (विवेक, विजयादशमी अंक, शके १८८४)

चिनी संस्कृतीमध्ये ड्रॅगन (Dragon) ही एक जलदेवता आहे हिच्या स्वरूपात क्षणाक्षणी अद्भुत फरक घडून येतात अद्भुत कृति करण्याकडे या देवतेचा कल दिसून येतो हिची सत्ता पर्जन्यावर चालते तळी, पाणवठ्यावर राहाणारी ही देवता मानवांना साहाय्यक ठरते या देवतेचे स्वरूप वर्णन करताना तिला घोड्याचे मस्तक व सर्पाची शेपटी लावतात हिच्या दोन्ही बाजूला पंख असून आणि चार पाय व प्रत्येक पायाला पाच पाच नखे असतात या देवतेचे इतर नऊ प्राण्यांबरोबर साम्य असल्याचे वर्णन केले जाते सागरातील ही सर्पाकृति देवता तळाला उत्तम राजवाड्यात राहाते तिचे खाणे म्हणजे माती व नीलमणि हे होय तिची लांबी दीड कोसापेक्षा जास्त असून शरीरभाग फार जाड

असतो इतका की, एका आगारून दुसरीकडे वळताना पाण्याची जी हालचाल होते, त्यामुळे भूपृष्ठावरील पर्वत एकमेकावर आदळतात त्या वेळी ही देवता भूपृष्ठावर येण्यास निघते, तेव्हा भूकंप होतात समुद्राला भरपूर येते येता आणि जलवादळ होते ही जलदेवता ब्रह्मदेवाला वर्षातून एकदा भेटून आपल्या जगाचा वृत्तांत त्याला सादर करते

कोपनहेगन ( डेन्मार्क ) येथे सागरतीरावर ' जलवतीचा पुतळा ' पाहावयास सापडतो याची पूर्वपीठिका अशी देतात, ' एकदा एका सरदाराचे एका सुंदर तरुणीवर प्रेम जडले, म्हणून त्याने एका शिल्पकाराला तिचा पुतळा तयार करण्यास सांगितले पुतळा तयार झाल्यावर तो त्या सरदाराकडे नेण्यात आला परंतु दरम्यानच्या काळात त्या सरदाराचे मन त्या तरुणीवरून उडाले होते त्यामुळे त्याने तो पुतळा स्वीकारण्याचे नाकारले पुतळा त्या शिल्पकाराला उपयोगी नव्हताच यास्तव तो शहरसमितीला अर्पण केल्यावर त्याची स्थापना प्रेक्षणीय वस्तु म्हणून सागरतीरी एका खडकावर करण्यात आली हा पुतळा संपूर्ण नग्न आहे त्याचे शिल्प अप्रतीम आहे तो सागरतीरावर असल्याने त्याला आता देवीचे महत्त्व प्राप्त झाले आहे पुतळा बसलेल्या पोझमध्ये असून तिने आपला डावा पाय उजव्या पायावर टाकलेला आहे याला कोणी ' लिटल मरमेड ' अथवा जलवती देवी असे म्हणतात

(श्री राजा कुलकर्णी, केसरी, १६–९–६२ )

## जलचिकित्सा

कोणत्याही पदार्थाची पूर्ण चिकित्सा करून त्याचे गुणदोष ठरविणे हे सांप्रतच्या विज्ञानयुगात आचरतात असे नसून भारतीय प्राचीन ऋषींनीही तसे केलेले आढळते चरकमहर्षींनी अन्नाच्या पचनाची, अश्वरीष ऋषींनी उपवासाची, तसेच अंबरीषपुत्र सिंधुद्वीप याने जलचिकित्सा करून आचमन, मार्जन इ० स्वरूपाने त्याची दैनंदिन धार्मिक विधींमध्ये योजना केली ' आपोहिष्ठा ' या मंत्राने त्याने जलदेवतेची प्रार्थना केली

" हे जलदेवतानो, तुम्ही खरोखर पूर्णसुख निर्माण करणाऱ्या आहात. तेजस्वीपणा, महत्त्व, सौंदर्य व दूरदृष्टी निर्माण होण्यासाठी तुम्ही आमच्या शरीरात सतत वास करा, तुमचा अत्यंत कल्याणकारी जो रस असेल, तो आम्हाला द्या, रोगादिकांचा नाश करणे तुम्हाला अत्यंत प्रिय असल्याने, आमच्या शरीरात वास करून रोगाचे निर्मूलन करा आणि उत्तमोत्तम गोष्टी आमच्यामध्ये निर्माण करा " इ० इ०

प्रत्येक वेळी मित आहार घेतल्याने, जसे पचन सुलभ होते, तद्वत् दिवसानून अनेक वेळा आचमन केल्याने आरोग्य सुधारते, असे जलचिकित्सा करुन त्या ऋषींने निश्चित केले आहे. तेव्हा आचमन विधीचा मूळ हेतु लक्षात घेऊन साम्प्रतच्या सुशिक्षितांनी त्याजकडे पहावे, म्हणजे त्यांना या आचारांत पोरकटपणा दिसणार नाही, तर सद्हेतूच दिसेल.

घनाक्षरी

नभोवलयिची गंगा । फेनयुक्त धवलांगा ।
स्वर्गिची आकाशगंगा । जनीं सर्व जाणती ॥
फेन, फवारे धवलें । उडुगणाहि झांकले ।
त्याने फेन तेजाळलें । पार्श्वपंक्ति सुकांती ॥
- ही विपुल विस्तरता । धूर्जटी शिरसी येतां ।
बिंदुसार तत्त्वतां । जटेमाजिं देखती ॥
क्रमें भूमी उतरतां । जलप्रवाह वाढतां ।
भूद्वीपाकृति वेष्टितां । वदती भागिरथी ॥ १ ॥

शिखरिणी

जगन्मांगल्याचे शुभ प्रतिक गंगे तव असे ।
तवोत्पत्ती भाग्यें सुरनगरिं विष्णूपदिं असे ॥
पराकष्टें कष्टें सगरसुत ओढी महिवरी ।
अगा येतां येतां लपसि शिवमूर्ध्नी जटदरी ॥ २ ॥
पतीताला मुक्ती त्वरित तव कीर्ती जगीं अशी ।
अती भक्तीभावें अवगहन होतां तव कुशी ॥
हराया तापातें दशविध अघाही दशपरा ।
जगन्नाथें केली दशदिन स्तुती ही दशहरा ॥ ३ ॥
तया उद्धाराया भकटपर तूं रूप धरिसी ।
चतुर्हस्ता नक्रान्वहनिं वसनीं शुभ्र वरिसी ॥
सदा भाळीं शोभे किरिट नवरत्नांकित महा ॥
स्वभक्तां उद्धारी यवनसखिही पावन पहा ॥ ४ ॥

तवोत्पत्ती राजापुरि कचित येई अवभृता ।
मुळारंभी आली कृपिवल तृषा ही शमविता ॥
महादाश्चर्यातें अजि हरिकर्कोंडा प्रथम ये ।
वृथा शोधा घेती उगम न गमे सूज्ञ वळये ॥ ५ ॥
अनेकांनी केला स्तव अजवरी जाणत असे ।
अती श्रद्धेपोटीं स्तवन तव माते करीतसे ॥
तुला देवी रूपे सतत भजती भारतिजन ।
म्हणोनी गे अर्पी चरण कमळीं वदाने मन ॥ ६ ॥

मदिरा

एकुण वीस दहा सनामधिं येई पुरेपूर पूर नदीला ।
पाणि चढे बहुं, तीर डुबे चहु, वेढित जाय निजामपुरीला ॥
माणिक भक्ताचि म्लेच्छ स्वयें नृप, प्रार्थितसे जलदैवत गंगा ।
माई पुरे कर, ओटुनि घे जळ, बांधिन मंदिर सुंदर गंगा ॥ ७ ॥

वियोगिनी

जळ सत्वर पाहिं आटले । मग सीमेवरी देवी स्थापिले ।
यवने वचनास राखिलें । जळदेवीस स्वरूपिं आणले ॥ ८ ॥

# नाणक-मुद्रा देवता

## नाणी व मुद्रांवरील देवता

रामनामांकितं चेयं पश्य देव्यङ्गुलीयकम् ।
प्रत्यार्थं तवानीतं तेन दत्तं महात्मना ॥ ( रामायण )

नाणी व मुद्राशास्त्राचा उपयोग, जगाचा इतिहास, त्यामध्ये प्रचलित असलेल्या धर्मसमजुती, निरनिराळ्या लोकांचे आचारविचार, त्यांनी उत्कर्षास नेलेल्या विविध कला यांचे ज्ञान मिळविण्यासाठी होतो. यामुळेच ह्या शास्त्राला "नाणकशास्त्र" हे नाव प्राप्त झाले आहे. नाणी आणि मुद्रा यांची निश्चित उत्पत्ति केव्हा झाली ह्याबद्दल आधारभूत पुरावा उपलब्ध नसला तरी सुरुवातीच्या श्लोकावरून असे दिसून येते की, रामायणकाळापासून या मुद्रा प्रचारात होत्या. वनवासात असता रामचंद्रांनी हनुमंताला सीतेच्या शोधार्थ लंकेत पाठविले. त्या वेळी आपली मुद्रा त्याजवळ ओळखपत्र म्हणून दिली होती. ती मुद्रिका पाहिल्यावरच सीतेला हनुमंताविषयी खात्री पटली, हा रामायणातील भाग प्रसिद्धच आहे. पूर्व आशियामधील बॅबिलोन संस्कृतीमध्ये शिक्के वापरले जात होते, ही गोष्ट आज उपलब्ध असलेल्या त्याच प्रकारच्या शिक्क्यामुळे सिद्ध करता येते. हा शिक्का इसवीसन पूर्व ४५००-३५०० वर्षांचा असावा असा जाणकारांचा अंदाज आहे. त्या शिक्क्यावर त्या लोकांच्या नॅबो या स्त्रीदेवतेची आणि दुसऱ्या बाजूला तास्मीत ह्या पुरुषदेवाची आकृति आहे. या दोन आकृत्या पाहताक्षणीच नॅबोचे मुख पसरट व तास्मीतचे कान भयंकर मोठे आहेत, हे ध्यानांत येते. दोघांनी रानटी जनावरे धरलेली दाखविलेली आहेत.

सहज लक्षात येण्यासारखा आहे एका बाजूस ' हिर्मारिस ' या नदीदेवतेचे मस्तक असून मागील बाजूस त्या हत्तीवर एक तडागदेवता चालली आहे असे दाखविलेले असेल, तर दोहोंचा परस्परसंबधच दिसून येतो कधीकधी पुढील बाजूस मस्तक तर मागील बाजूस त्या त्या देशाची प्रिय वस्तु दाखविलेली असते

नाण्याची उत्पत्ति का व कशी करावी लागली ? अति प्राचीन काळी वस्तूची देवघेव वस्तूमध्येच केली जात असली पाहिजे परंतु काही काळाने या वस्तूंच्या देवघेवींचे प्रमाण वाढले स्थानिक स्वरूपाहून या देवाणघेवाणी परदेशातही होऊ लागल्या आता या वेळी व्यापारी देवाणघेवाणीसाठी काही एका माध्यमाची गरज भासू लागली हे माध्यम म्हणजेच नाणे उपलब्ध झाले ॲरिस्टॉटल म्हणतो, ' व्यापारी देवघेवींचे प्रमाण अतिशयच वाढल्याने नाणकशास्त्र अस्तित्वात येणे अपरिहार्यच झाले धातूच्या पत्र्यावर ठसे उमटवून त्याचा दर्जा निश्चित करण्यात आल्याने सर्वच त्याविषयींचा विश्वास वाढला असे मानले जाते की, ग्रीसमध्ये प्रथमतः नाणी पाडण्यात आली आणि त्यानंतर ही कला इतरत्र पसरली ग्रीसचा व्यापार कार्थेज, टायर, सीडन वगैरे भागाशी चालत असल्याने त्या त्या देशांनीही हे शास्त्र उचलले चौरस किंवा त्रिकोणी अगर वाटोळ्या आकाराचे निरनिराळ्या धातूचे तुकडे, त्यांना निरनिराळी किंमत देऊन प्रथम व्यापाऱ्यांनीच निर्माण केले. त्यानंतर ही कला काही श्रीमंत मंदिरांनीही उचलली असे सांगितले जाते की, सिसिली ह्या लहानशा प्रांतात एके काळी दीड ते दोन हजार खाजगी टांकसाळी होत्या अनेक शहरांत व्यापारी लोक हा धंदा करीत असत श्री छत्रपति शिवाजी महाराज ह्यांच्या कारकीर्दीमध्ये जे सोन्याचे होनाचे नाणे होते, ते सुमारे पंचवीस ठिकाणी पाडण्यात येई, आणि त्या त्या ठिकाणांना पातशाही, शिवराई, सणगिरी, देवगिरी इत्यादि निरनिराळी नावे होती

नाणे ज्या वेळी प्राथमिक अवस्थेत होते, त्यावेळी त्या काळचा समाज अतिशयच धार्मिक प्रवृत्तीचा असल्याने नाण्यावर काही देवता, त्यांची वाहने किंवा सामाजिक स्थिति दर्शविणारे देखावे मुद्रित केले जात असत कारण एखाद्या मानवाबद्दलची माहिती नाण्यावर देणे अधार्मिक समजत असत परंतु कालांतराने सर्व टांकसाळी जेव्हा राज्यसत्तेच्या ताब्यात गेल्या, तेव्हा सत्तादर्शक व मालकीवाचक म्हणून त्यांनी राजमुखवटे नाण्यावर घालण्यास सुरवात केली राजा म्हणजे साक्षात् विष्णूचाच अवतार ही समजूत त्या काळी दृढ झाल्याने या रूढीस भरघोस पाठिंबाच मिळाला काही वेळा काही काही राजे आपल्या मुखवट्याबरोबरच आपल्या प्रियतम देवतेचे चित्रही दुसऱ्या बाजूस मुद्रित करीत असत अलेक्झांडर राजाच्या काळी असा एक ठसा प्रचलित होता की, त्यावर एका बाजूला अलेक्झांडर

राजाचे चित्र आणि दुसऱ्या बाजूस त्याची प्रिय देवता अथेनी ही सनई वाजवीत असलेले दृश्य होते इसवी सनपूर्व तिसऱ्या शतकात नाण्याच्या ठशावर शिल्पकलेचा सर्वांत जास्त प्रभाव पडू लागला प्रथमत ओबडधोबड आणि साधीसुधी असलेली नाणी जाऊन त्या जागी आता जास्त उठावदार व अतिसुबक अशी नाणी दिसू लागली सांप्रत उपलब्ध असलेल्या प्राचीन नाण्याचा इतिहास फार तर इसवि सन पूर्व सातव्या शतकापर्यंत नेता येतो ती नाणी ग्रीक लोकांची होती त्यानंतर ती इतर देशाची आली त्याचे वर्गीकरण जाणकार लोक करतात ते असे—( १ ) प्राचीन ग्रीक व रोमन नाणी, ( २ ) मध्ययुगीन व अर्वाचीन नाणी, ( ३ ) पौर्वात्य नाणी पहिल्या वर्गातील नाणी ही सुवर्ण, रूपे या धातूची असत ती पातळ, सपाट व प्राय राजमुकुटाचा असत या नाण्यावर खालीलप्रमाणे विविध प्रकारच्या आकृतीहि असत

( १ ) एखाद्या विशिष्ट नगरातील किंवा विशिष्ट जमातीच्या लोकांच्या उपास्यदेवतेचे मस्तक अगर तिची संपूर्ण आकृति

( २ ) एखाद्या विशिष्ट देवतेस प्रिय असलेले घुबड, कासव, बैल यासारखे प्राणी, काही झाडाच्या फांद्या अगर देवताची हत्यारे यांच्या आकृति

( ३ ) स्थानिक नदी अगर पर्वताची आकृति

( ४ ) एखाद्या कल्पित दैत्याचे मस्तक अगर त्याची संपूर्ण आकृति

( ५ ) काही कल्पित ड्रॅगून प्राण्याच्या आकृति

( ६ ) नामवंत योद्धयाची अगर वंशस्थापकाची मस्तके, त्याच्या आकृति

( ७ ) योद्धयाशी संबंध येत असलेल्या वस्तु उदाहरणार्थ, घोडा ढाल, भाला तलवार इत्यादींच्या आकृति

( ८ ) टेकडीवरील देवताची खरी वा कल्पित निवासस्थाने

( ९ ) सार्वजनिक अथवा धार्मिक उत्सवाचे देखावे इ० इ०

प्राचीन भारतीय नाण्याचे अभ्यासक म्हणून मेजर जनरल कनिंगहॅम, व्हाइटहेड, इलियट, केप्स्टिन, मॅन इत्यादि नामवंत संशोधकाकडे अंगुलीनिर्देश करता येईल या सव संशोधकाच्या अचाट बुद्धिमत्तेमुळे आणि अविरत परिश्रमांमुळे ब्रिटिश संग्रहालयातील नाण्याची साद्यंत हकीकत प्रसिद्ध झालेली आहे त्या संग्रहाला "Catalogue of the Indian Coins in British Museum" असे नाव आहे अलेक्झांडरने इसवी सनपूर्व ३२६ साली भारतावर स्वारी केली तेव्हा तक्षशिला तेथील ऑम्फिस नावाच्या राजाने वर्तुळाकार चांदीची नाणी त्याला नजराणा म्हणून दिली संशोधनकार्यात हीच नाणी आज

म्हणून समजली जातात. वीस वर्षांनी अलेक्झांडर परत गेल्यावर ग्रीकाच्या नाण्यावर एका बाजूस मुकुट व दुसऱ्या बाजूस पोरसराजा हत्तीवरून पळ काढीत असून घोडा त्याचा पाठलाग करीत असल्याची विजयस्मृति मुद्रित केली होती. रुद्रवर्मा, कुनिंदचा अमोघभूति आणि अशोक हे राजे समकालीन मानले जातात. मथुरा, कनोज, कौसंबी, कुनिंद, मालव, पाचाळ, कुशान, शिबी, तक्षशीला, त्रिगर्त, उज्जयिनी इत्यादि देशाची नाणी उपलब्ध असून त्यांचे बरेच प्रकार वर्णिलेले आहेत. या भारतीय नाण्यांवर अनेक पशुपक्षी मुद्रित केलेले दिसतात. मांजर, कुत्रा, उंदीर, सर्प, विंचू, मासे, बेडूक, कासव, मोर, नंदी, हत्ती, गेंडा, सश्याची शिकार करणारा कुत्रा, कुंपणाआडून पक्व फळांकडे पाहणारा कोल्हा, चंद्राकृतीमधील उंदीर, जलात पोहणारे मासे, तसेच सूर्य, चंद्र, स्वस्तिक, ध्वजमंदिर, अग्निज्योत, झाडाच्या फांद्या यांच्या आकृत्यांचाही समावेश आहे. ही प्राचीन नाणी तक्षशीला, मथुरा, करीमनगर, सुलतानपूर, फरूकाबाद, बेसनगर, मणिपूर, मिर्झापूर, त्रिचनापल्ली, कांमा इत्यादि ठिकाणच्या उत्खननातून सापडलेली आहेत.

शतपथ ब्राह्मण, बृहदारण्यकोपनिषद, पाणिनीकृत अष्टाध्यायी इ० ब्राह्मण-ग्रंथामध्ये, निष्क, शतमान, कृष्णल या नाण्याच्या नावाचा उल्लेख येतो. कृष्णल म्हणजे गुंज असावी. मनुस्मृतीमध्ये या नाण्याचा व कर्ष आणि कार्षापण याचा उल्लेख मिळतो.

सर्षपा षट् यवो मध्यस्त्रियवं त्वेककृष्णलम् ।
पञ्चकृष्णलको माषस्ते सुवर्णस्तु षोडश ॥
पलं सुवर्णाश्चत्वारः पलानि धरणं दश ।
द्वे कृष्णले समधृते विज्ञेयो रूप्यमाषकः ॥

सहा सर्षप म्हणजे यव, तीन यव म्हणजे कृष्णल, पाच कृष्णल म्हणजे माष, सोळा माष म्हणजे सुवर्ण इ० इ०. पल, धरण नावे प्रमाण दिली आहेत. अग्नि, मत्स्य पुराणात ही संख्या वाढून त्यामध्ये द्रम, पण या नावाची भर पडली आहे.

भास्कराचार्यांनी लीलावतीमध्ये गद्याणक या परिमाणाची माहिती दिली ती अशी—

तुल्या यवाभ्यां कथितात्र गुञ्जा । वल्लस्त्रिगुंञ्जो धरणञ्च तेऽष्टौ ॥
गद्याणकस्तद्द्वयतुल्यमिन्द्र । तुल्यैर्वल्लैस्तथैको धटकः प्रदिष्टः ॥

तीन गुंजा = एक वल्ल, आठ वल्ल = एक धरण, दोन धरण = एक गद्याणक, चौदा वल्ल = धटक इ० इ०

प्राचीन भारतामधील नाणी बनविण्याच्या पद्धतीत चिन्हाहत (पंचमार्क) हा प्रकार असून, दुसरा टप्पा प्रकार आहे धातूचे तुकडे तापवून त्यावर जरूर ते अक्षराचे आणि चिन्हाचे ठसे उठविणे याला टप्पापद्धत म्हणतात नंदिवृक्ष, स्वस्तिक, सिंह, हत्ती अशी चिन्हे असत यानंतर धातूचा रस साच्यात ओतून नाणी बनविण्याचा आणखी एक प्रकार सुरू झाला पुढे क्रमाक्रमाने या पद्धतीमध्ये सुधारणा होत गेल्या (भा स का ४।७८४)

नाण्यांची काही नावे वर आलीच आहेत याशिवाय विजयनगर साम्राज्यातील नाणी गद्याण, प्रताप, काटी, पण, काग हाग या नावाने आळखली जात मुसलमान काळात टक, दानार, अदली, मुहर, पल्स, निस्फी, दामर, दमरा, निसार ही नाणी अमलात होती

भारतीय नाण्यात सर्वांत जुने नाणे वरीलप्रमाणे मनुस्मृतीमध्ये वर्णिलेल्या भारतीय पद्धतीस अनुसरून आहे त्या पद्धतीचे प्रमाण गुंज हे होय एक गुंज सुवर्णाचे वजन १ ८३ ग्रेन आहे ८० रति सुवर्णाचे नाणे अगर ३२ रति चांदीचे नाणे व ८० रति ताम्याचे कार्षापण हे नाणे, एवढी नाणी उपलब्ध झालेली आहेत असे मानले जाते की, मनुस्मृति सनपूर्व सातव्या शतकामध्ये लिहिली गेली आणि त्यात वर्णन केलेली नाणी, त्यापूर्वीच्या काळातील किंवा निदान त्याच्या काळातील असली पाहिजेत त्यानंतर वायव्य दिशेकडून भारतामध्ये अनेक संस्कृति आल्या शक आले, हूण आले, मोगल आले आणि नाण्यामध्ये फरक पडत गेला शेवटी ब्रिटिश आले त्यांनी आपल्या सार्वभौम समजल्या जाणाऱ्या राजाच्या मुखवट्याची नाणी पाडली आणि आता सन १९४७ साली भारत स्वतंत्र झाल्यानंतर पुन्हा स्वतंत्र भारताची नाणी प्रचारात आली आहेत त्यावर अशोकस्तंभ नेहरूंचे चित्र, भाताच्या लोंब्या, धान्याची कणसे हा प्रकार आहे

आता भारतीय नाण्याचा क्रमिक इतिहास क्रमवार पाहू बौद्धकाळात ताम्याचे कार्षापण व निष्क हे सुवर्णाचे नाणे होते असे जरी असले तरी त्यापूर्वी भारतामध्ये सुवर्णाची नाणी जनकराजाच्या काळीही होती, हे त्यांनी याज्ञवल्क्य ऋषीला सहस्र गायी, त्याच्या शिंगाना पाच पाच कनिष्क नाणी बांधून दान केल्या, ह्यावरून सिद्ध होते परंतु आज ती नाणी उपलब्ध नसल्यामुळे ती दाखविता येत नाहीत पण यावरून निश्चितपणे म्हणता येते की, वैदिक काळातही नाणकशास्त्र आर्यांना माहीत होते प्राचीन भारतीय नाणी इसवी

सनपूर्व पाचव्या शतकात इराणमधून पंजाबप्रांती आली. सुवर्णाची परंतु दोन्ही बाजूंनी मुद्रित अशी नाणी चवथ्या शतकात पाडण्यात आली. डॉ. यू. कोल्हेर ह्यांच्या मताप्रमाणे सुवर्णाचे नाणे प्रथमतः इसवी सनपूर्व ४०७ साली अथेन्स शहरी पाडण्यात आले. अथेन्स शहरी जे सुवर्णाचे नाणे पाडण्यात आले, ते "औन्स" नाणे भारतामध्ये आले, आणि त्याचाच आदर्श समोर ठेवून नंतर इकडील राजांनी नाणी पाडली असावीत. त्यामध्ये फरक इतकाच दिसतो की, पूर्वीच्या नाण्यावरील घुबडाची आकृति बदलून भारतीय राजांनी आपल्या नाण्यांवर गरुडाची आकृति मुद्रित केली. कुशान राजवंशावर रोमन नाण्याचा मलताच परिणाम होऊन त्या राजवंशाने आपल्या नाण्यांवर रोमन बादशहाचे चित्र मुद्रित केले. पाचव्या शतकात हूणांनी स्वारी केली तेव्हा सस्सथिन खजिन्यातील लूट त्यांनी आपणांबरोबर भारतामध्ये आणली असावी आणि त्या लुटीत मिळालेल्या नाण्यांबरहुकूम नाणी पाडताना एका बाजूला राजाचा मुखवटा तर दुसऱ्या बाजूला अग्निकुंड दाखविले आहे. त्याचप्रमाणे कनिष्क राजाने आपल्या नाण्यांवर नानिआदेवी, सलेनीदेवी, शिव व सूर्य यांच्या आकृति मुद्रित केल्या होत्या.

शक राजवटीने तक्षशीला येथे तांब्याचे नाणे इसवी सनपूर्व १२० व्या वर्षी पाडले असावे. त्यावर भोज असे नाव आढळते. तसेच मथुरेचे क्षत्रप राजे, कुनिंद म्हणजे सतलज नदीच्या दोन्ही बाजूंवरील प्रदेश येथील नाणी व पंजाब भागातील इतर भागातील नाणी यांवर ब्राह्मी-खरोष्टी लिपीमधील अक्षरे आढळून येतात. कनिष्क राजवंशाची नाणी महत्त्वाची समजली जातात. त्याच्या नाण्यावर एका बाजूला ग्रीक व सिथिकदेवता तर दुसऱ्या बाजूला बुद्धाची प्रतिमा आढळतात. कुशान राजवंशाची नाणी सन १८० पासून सन ४२५ पर्यंत अस्तित्वात असावीत असे दिसते. त्यावर शिवनंदी ऊर्फ राजा वासुदेव ह्याचा मुखवटा आहे. काश्मीरप्राती गेलेल्या कुशान राजांनी एका बाजूला देवता असलेली नाणी पाडलेली आहेत.

गुप्तवंशाने इसवी सन २६० च्या सुमारास चंद्रगुप्त गादीवर असताना जी नाणी पाडली त्या नाण्यांवर एका बाजूला कुमारदेवी व दुसऱ्या बाजूला "लिच्छवय:" ही अक्षरे घातली आहेत. काही नाण्यांवर मोराचे तर काही नाण्यावर त्रिशूळाचे चित्र आहे. चवथ्या शतकातील कदंब घराण्याने धनुष्यबाण, दर्शी अगर मंदिरांची चित्रे नाण्यावर वापरली आहेत, तर चालुक्य घराण्याने डुकराची आकृति घेतली आहे. अकराव्या शतकात कलचुरी घराण्यातील नाण्यांवर एका बाजूस राजमुकुट तर उलट बाजूस देवता असत. काही वेळा

चित्रही त्यांनी वापरले आहे. विजयनगरचे साम्राज्य चौदाव्या शतकातील होय त्यांनी आपल्या नाण्यावर एका बाजूला शिवपार्वती व दुसऱ्या बाजूला श्रीप्रतापहरिहर असलेले नाणे पाडले आहे. एका नाण्यावर एक दोन डोक्याचा गडभेरुड ह्या नावाचा पक्षी दाखविला असून तो आपल्या चोचीतून व पायाच्या नखामधून हत्ती उचलून घेऊन उडत जात असलेला दाखविला आहे. पार्शिअन, ग्रीक, अरब यानीही ह्या पक्षाची नाणी पाडलेली आहेत. त्यांच्या नाण्यावर हनुमान, राम सीता, कृष्ण, विष्णु इत्यादि देवतांच्या आकृति मुद्रित केलेल्या आहेत पांड्यवंश आणि चोलवंश यांनी पाडलेल्या नाण्यावर गरुड, शंख व मत्स्य आकृति अथवा सूर्य-चंद्र व वृषभाच्या आकृति आहेत. अर्काटच्या मुसलमान नबाबाने विष्णु व त्याच्या बायका यांच्या आकृत्या असलेली नाणी पाडली होती

आपण वर एका ठिकाणी पाहिलेच आहे की, मराठेशाहीमध्ये होन ह्या नावाचे सुवर्णाचे नाणे अस्तित्वात होते आणि ते सुमारे पंचवीस ठिकाणी पाडले जाई शिवरायांची मुख्य टांकसाळ रायगडावर होती. नंतर शाहूशिक्का अगर शंभूशिक्का या नावाचे रुपये पन्हाळा येथील टांकसाळीत पाडले जात. मराठी साम्राज्य वाढत गेल्यावर उज्जयिनी, इंदोर, भोपाळ, प्रतापगड, भिल्सा, कोटा, नागपूर, बाघगाव या ठिकाणीही मराठे सरदारांनी नाणी पाडली परंतु त्या नाण्यावर देवतांच्या मूर्ति मात्र आढळत नाहीत. पेशव्यांची एक टांकसाळ बागलकोट येथे श्री मल्हार भिकाजी रास्ते या नावाचे गृहस्थ चालवीत असत, म्हणून त्या नाण्यांना मल्हारशाही रुपये असे नाव होते. कंपनी सरकारने राजसत्ता आपल्या हाती घेतल्यावर सन १८३४ च्या सुमारास तिने या सर्व खाजगी टांकसाळी रद्द करून टाकल्या शिवाजीराजे आपल्या नाण्यावरील अक्षरे देवनागरी लिपीत लिहीत, तर पेशवे फारसी लिपी वापरीत. कंपनी सरकारच्या रुपयांवर इंग्लंडच्या राजाचा मुखवटा असे आणि सन १९४७ साली भारत स्वतंत्र झाल्यावर त्याच्या नाण्यांवर आता तिमुखी सिंहांच्या अशोकस्तंभाची आकृति असते.

काही देवताची चित्रे आढळून आली आहेत. या परदेशी राजानी ज्याप्रमाणे आपल्या नाण्यावर देवताची चित्रे मुद्रित केली होती त्याच प्रमाणे मुसलमान राजानीही आपल्या नाण्यावर देवदेवताना प्राधान्य दिले. गझनीच्या महमदाने चद्रदेवाचा पाडाव करून कनोज जिंकून घेतल्यावर आपली नाणी पाडली, परतु नाणी पाडताना त्याने एक शहाणपणा वापरला की आपल्या नाण्याच्या एका बाजूवर पार्वतीची मुद्रा होती ती कायमची ठेवली, आणि दुसऱ्या बाजूस मात्र आपल्या नावाची 'महमुद बेने साम' ही अक्षरे कोरली. लोकाच्या जुन्या धार्मिक भावना नवीन विदेशी राजा आल्याने भडकू नयेत यासाठी त्याने ही युक्ति योजली होती, महमूद गझनीनतर अनेक विजेत्या राजानी ही रीत अमलात आणलेली होती. असे बोलले जाते

भारतीय नाण्याचा वरीलप्रमाणे त्रोटक इतिहास पाहिल्यावर पश्चिमेकडील देशातील त्रोटक इतिहास पाहणे तुलनेच्या दृष्टीने उपयुक्तच ठरेल. यासाठी त्याचा धावता परामर्श मी घेत आहे. येथे फक्त देवताचाच विचार केला असून इतर आकृतींचा केलेला नाही, हे मुद्दाम ध्यानात असू द्यावे.

इफेसस

स्मर्ना शहरी चवथ्या शतकात अपोलो देवीच्या हातात वीणा घेतलेला सुनवटा कोरलेले नाणे होते. तसेच एका ठशावर अलेक्झाडर स्वप्नामध्ये दोन नेमिसिस देवताना पाहात असल्याचे दृश्य आहे. ऐतिहासिक दृष्ट्या ही नाणी फार महत्त्वाची समजली जातात.

क्रीट—इसवीसनपूर्व पाचव्या शतकातील नाणी उपलब्ध आहेत. नाण्यांवर प्रामुख्याने जरी स्थानिक देखावे असले तरी मुख्य देवता झ्यूस, हिरा, पेसीडीन याच्या छायाकृति त्यावर आहेत.

चीन—या नाण्याचा उगम सनपूर्व सातव्या शतकापर्यंत मिळतो. त्या काळी या नाण्याचे चलन म्हणजे निनठस्याचे धातूचे तुकडे, रेशमी कापडाचे तुकडे, कूर्मकवच, कवड्या अशा ओबड-धोबड स्वरूपात होते. परतु सनपूर्व ३३५ च्या सुमारास या प्रकारचे चलन बद करण्यात येऊन कास्याच्या तुकड्यावर कुदळी, फावडी, सुऱ्या याच्या आकृति व मध्यभागी छिद्र असलेले नाणे काढण्यात आले. या छिद्राचा लोकाना बराच फायदा झाला. छिद्रातून दोरी ओवून नाण्यांची माळा करून ती गळ्यात घालून त्याना बाहेर जाता येई.[१] चिनी चल-

१ टीपः—सन १९५० च्या सुमारास भारताने एक पैशाचे तांब्याचे नाणे छिद्रासहित काढलेले होते.

नांचा इतिहास पाहिला तर तो संशयात्मक, अर्थशास्त्रीय अनेक युक्त्यानी भरलेला व हिणकस धातूंच्या भेसळीने परिपूर्ण असाच आहे. नाण्याची किंमत वजनावर अवलंबून असली तरी लिहिलेले वजन नेहमीच खरे नसे. नवव्या शतकात कागदी नाणी प्रचारात आली. सर्वांत महत्त्वाची नाणी प्रतिस्पर्धी राजांची व बंडवाल्यांची असून त्यामुळे चीनमधील काही अज्ञात गोष्टींवर बराच प्रकाश पडतो. सन १८६६ साली हाँगकाँग येथे डॉलर हे नाणे पाडण्यात आले. त्यावर पुढील बाजूस त्रिशूळ व ढाल घेतलेली ब्रिटानियादेवी असून मागील बाजूस चिनीमलाई भाषेत अक्षरे घालण्यात आली आहेत.

**जपान**—या देशालही चीन देशाप्रमाणे छिद्राची नाणी प्रचारात होती. सातव्या शतकात धातूंची नाणी तयार करण्यात आली. यांच्या नाण्यावर एका बाजूला ड्रॅगॉनचे चित्र व उलट बाजूला पुष्पमाला असे.

**जर्मनी**—सन १२५२ पासून या देशातील नाण्याचे पुनर्मुद्रण होऊन दुसरा फ्रेड्रिक राजा ह्याने नवी नाणी पाडली. त्याना फ्लॉरेन्स म्हणत. ती सुवर्णाची होती. चांदीचे मोठे दिनारही पाडण्यात आले. पण या वेळेपासूनच धार्मिक वृत्ति लोप पावून या शिल्पांची इतिश्री झाल्याचे आढळून येते.

**थेसली**—येथील नाणी प्रायः सिसली व इटली या प्रदेशांतून आयात केलेली असून ती साधी असत. त्या नाण्यांवर ओक वृक्षाचे शिरोभूषण घातलेल्या झ्यूस देवीचे मस्तक किंवा युद्ध करीत असलेल्या अथेनी, इटोनिया देवींच्या छायाकृति असत.

**पॅलेस्टाईन**—जेरूसलेम येथील नाण्यांवर कमळाची आकृति आणि बादशाही मुखवट्याबरोबर मनी, मिओस व इओ या देवतांची चित्रे होती.

**फोनेशिया**—येथील नाणी अत्यंत चित्ताकर्षक समजली जात. येथील बहुतेक लोक व्यापारी असल्याने त्यांच्या सांपत्तिक परिस्थितीची ह्यावरून चांगलीच कल्पना येऊ शकते. सनपूर्व पाचव्या शतकातील ही नाणी आहेत. परंतु या नाण्यांपैकी कुठल्याही नाण्यावर कोणत्याही देवतेचे चित्र नाही.

**बॉस्फरस**—आशियामायनरमधील हा प्राचीन देश होय. येथील कास्याच्या नाण्यावर मेडुसा, परसिउस इत्यादि लोकांना आवडणाऱ्या देवतांची चित्रे होती.

**बायझंटाईन साम्राज्य**—चवथ्या पाचव्या शतकातील ह्या राजवंशाचे ठसे

प्राय: धार्मिक स्वरूपाचेच असत. या नाण्यावर एका बाजूला हातात क्रॉस धरलेली विजयदेवता, तर उलट बाजूस कुमारी मेरीचे चित्र असे.

मायसिया—सर्वोत्कृष्ट ग्रीक पद्धतीचे नाणे ह्या देशात आढळून येते. इलेट्रम मिश्रिकेन ह्या धातूचे नाणे सहाव्या शतकातील असून त्यावर युद्धप्रसंग व युद्ध-देवताचे चित्र आहे.

रोमन—सनपूर्व पाचव्या शतकापासूनची नाणी उपलब्ध आहेत. या वेळी येथे दिनारी नाणक पद्धति अंमलात होती दिनारी, किनारी व सेस्टरेटी या नाण्यावर शिरस्त्राण घातलेल्या रोमोदेवीचा मुखवटा होता, तर दुसऱ्या एका नाण्यावर रथामध्ये बसलेल्या डायनादेवींचे चित्र होते. ह्याचप्रमाणे देवताच्या कथातील अनेक देखावेही खोदलेले होते.

लिसिया— येथील नाण्यावरून आशियामायनरमधील देवता, कला यांची कल्पना येऊ शकते. सनपूर्व सहाव्या शतकातील नाणी अथेनिअन धर्तीची होती आणि त्यावर स्वस्तिक व देवताची चित्रे होती.

स्पेन— येथील नाण्यावर एकाद्या पुरुषाचा मुखवटा व उलट बाजूला बैलानी चालविलेला नागर अगर मंदिराची आकृति असे.

पार्थिआ—हा देश कास्पियन समुद्राच्या आग्नेय दिशेला व इराणच्या उत्त-रेला होता. सनपूर्व २५० वर्षांपूर्वी हे राष्ट्र अस्तित्वात होते. ह्या राज्याचा संस्थापक मिथ्राडट ह्याने सोने, चांदी व ताब्याची नाणी पाडली. त्यावर एका बाजूला राजाचा मुखवटा तर उलट बाजूस अपोलो, झ्यौस, दिमितर या देवताची चित्रे आहेत हातामध्ये धनुष्यबाण अथवा गरुडावर बसलेल्या देवताचींहि छायाचित्रे आहेत.

इराण—इसवी सनाच्या सुरुवातीला येथील नाण्यावर रोमन लिपी होती. परंतु पुढे लवकरच ती नाहीशी झाली. येथील नाण्यावर मित्र (सूर्य), माव (चंद्र), अपान-नपात (अग्नि), वात (वायू), वेरेध्न (वृत्र) व नयति उपरान्त म्हणजे गरुडाची माता विनीता इत्यादि देवता होत्या. तसेच अनहिता देवीचेहि चित्र होते.

संशोधक पर्सी गार्डनर ह्याने 'A History of Ancient Coinage' ह्या ग्रंथात सनपूर्व सातशे ते ३०० पर्यंतच्या नाण्याचा वरील देशाचा इतिहास व प्रचलित नाण्याचे अनेक ठसे आपल्या ग्रंथात दिलेले आहेत. त्या ग्रंथातील देवताविषयी काही ठसे उद्बोधक आहेत म्हणून ते खाली उद्धृत केलेले आहेत.

| एक बाजू | दुसरी बाजू | एक बाजू | दुसरी बाजू |
|---|---|---|---|
| देवी डायोनिसस | : हर्क्युलिस | देवी अपोलो | : मशाल |
| देवी अथेना | : उडता घोडा | देवी अपोलो | : पंखवाला डुक्कर |
| देवी अपोलो | : सागरातील पहाड | देवी परसोफोन | : सिंहाचे मस्तक |
| देवी डिमिटिर | : तंतुवाद्य वाजविणारी देवी | देवी अथेना | : घुबड |
| | | देवी आर्टिमिस | : घोडेस्वार |
| देवी अपोलो | : सर्पावरोवर झगडणारा हर्क्युलिस. | देवी अथेना | : मागे वळून पाहात असलेला वृषभ |
| देवी हिरा | : घोडेस्वार | देवी अपोलो | : आर्टिमिस |
| देवी परसोफोन | : विजयी रथ | देवी डिमिटिर | : सर्पवेष्टित ऑम्फलस |
| देवी परसोफोन | : ताडाचे झाड | | |
| परीचे मस्तक | : टेकून बसलेली गाय | परीचे मस्तक | : उभी गाय |
| | | देवी अपोलो | : पाच चंद्रकोरी |

ह्याशिवाय काही नाण्यांवर वन्यपशु सिंह, डुक्करे, बैल, कोंबडे, बोकड इत्यादि आकृति काढलेल्या असत.

आदिशक्तीच्या रूपाची छायाचित्रे किती व कोणत्या नाण्यावर उपलब्ध आहेत, याची जेवढी माहिती मिळविता आली ती नोटकपणे येथे दिलेली आहे. भारत व इतर देश याची तुलना केली असता एक गोष्ट मनाला खटकते की, धर्मप्रवृत्त अशा भारतामध्ये ह्या शक्तिरूपाचा नाण्यावर फारच कमी प्रमाणात वापर केला गेला असून आशिया मायनर व आसपासचे प्राचीन संस्कृतीचे देश यामध्ये तो फारच मुबलक प्रमाणात केला गेलेला आहे, हेच वरील माहिती दर्शविते. अर्वाचीन काळात हिंदु राजानी या शक्तिस्वरूपाचा उपयोग केल्याचे एकही उदाहरण पाहण्यात नाही, असो.

### ठसे अथवा शिक्के

रामायणकाळी ठसा वापरात होता हे सुरुवातीच्या श्लोकावरून दिसून येईल. दुष्यन्त राजाने आपली ठसा असलेली सुवर्णाची अंगठी शकुंतलेला दिली होती, असे इतिहास सांगतो. अनेक प्राचीन राजेरजवाड्यानी खुणेसाठी आपली ठशाची मोहर उपयोगात आणलेली दिसून येते. याज्ञवल्क्य-स्मृतीमध्ये राजधर्म प्रकरण ३१८ मध्ये मुद्रेचा उल्लेख आहे,

**पटे वा ताम्रपटे वा स्वमुद्रो परिचिन्हीतम् ।**

राजाने दानपत्र कापडावर अथवा ताम्रपटावर करावे आणि त्याखाली आपली मुद्रा करावी. दान देणाऱ्याची सत्यता पटावी ह्यासाठीच ही योजना असावी.

(४) "राजा शाहूचरणीं तत्पर तुकासुत कान्होजीराव आंगरे सरखेल निरंतर" कान्होजीराव आंग्रे ह्यांची मुद्रा, शके १६५४.

सन १८१८ मध्ये इंग्रजानी पेशवाई बुडविली. तरी देखील वरीच वर्षे पेशव्याच्या मराठी मुद्रा त्यानी चालूच ठेवल्या होत्या. कंपनी सरकारच्या दोन मुद्रा अशा होत्या,

(अ) हुकूम कुंपणि बहादर कल्कटर, पुणे दिनांक २२–११–१८१९.

(आ) श्री कपतान हुजरी पाटजर साहब बहादूर कल्कटर, अहमदनगर, दिनांक २४–८–१८१८.

सन १९४७ साली भारत देश स्वतंत्र झाला आणि दिल्लीच्या केंद्र सरकारने स्वतंत्र भारताची "सत्यमेव जयते" ही मुद्रा स्वीकारली. महाराष्ट्र राज्य स्वतंत्र झाल्यावर त्यानेही आपली मुद्रा बनविली, ती श्रीशिवरायांच्याच मुद्रेचा स्वीकार करून,

"प्रतिपच्चंद्रलेखेव वर्धिष्णुः विश्ववंदिता ।
महाराष्ट्रस्य राज्यस्य मुद्रा भद्राय राजते ।"

---

हे प्रकरण लिहिण्यासाठी आधारभूत ठरलेले ग्रंथ—

(१) History of Ancient Coinage 700-300 by Percy, Gardner.
(२) British Museum Guides to Greek and Roman Coins.
(३) Parthian Coins by Percy Gardner.
(४) Zorastrian Deities on Indo-Sythian Coins by Stein London.
(५) Coins of Southern India by Sir Walter Elliot.
(६) Madras Govt. Museum Coins Catalogue: Indo-Portuguese and Ceylon Coins.
(७) Coins of Arakan, Pegu & Burma by A. P. Phayre.
(८) Catalogue of Indian Coins in Brtish Museum by James Allen.
(९) Ancient History of India by Ramshankar Tripathi.
(१०) महाराष्ट्रीय ज्ञानकोश : लेखक डॉ. श्री. व्यं. केतकर.
(११) महाराष्ट्राच्या ऐतिहासिक मुद्रा : लेखक श्री. वि. स. कामत.

# शिल्पदेवता

कलयति स्वस्वरूपावेशेन तत्तद् वस्तु ।
परिच्छिनत्ति इति कलाव्यापारः । ( क्षेमराज-शिवसूत्र विमर्शिनी )

भावार्थ असा की, कलावंत एखाद्या वस्तूच्या ठिकाणी आपल्या आत्मरूपाचा जो अविष्कार करतो, त्याला कला असे म्हणावे परंतु भोजराज आपल्या तत्वप्रकाश ग्रंथांत यापेक्षा सुंदर आणि यथार्थ व्याख्या करतात की,

व्यञ्जयति कर्तृशक्तिं कलेति तेनेह कथिता सा ।

म्हणजे ज्या स्थळी आपणाला ईश्वराच्या अगम्य कर्तृत्वशक्तीचा आविष्कार पहावयास मिळतो, ती कला होय. ऋग्वेदामध्ये जरी कला हा शब्दप्रयोग आला असला तरी ( ८-४७-१७ ) कला म्हणजे शिल्प या अर्थी प्रथम तो भारताच्या नाट्य शास्त्रांत आला आहे असे मानतात. शुक्रनीति, तंत्रग्रंथ, कामसूत्र यांमध्ये ६४ कलांची नामावली आहे. पण त्यात एकवाक्यता नाही. प्रबंधकोश, ललित विस्तार इत्यादि ग्रंथांत तर कलाची संख्या ७२, ८६ अगर १०० चे वर सांगितलेली आहे. यामध्ये सोनाराने सुवर्णाची चोरी कशी करावी याच्या ६४ कला व वेश्यांना मोहित करून त्यांचे धन कसे लुबाडावे याच्या ६४ कलांचे ही वर्णन आढळते.

प्लेटो, ॲरिस्टॉटलादि पाश्चात्य दार्शनिकांनीही कलेची व्याख्या आपापल्या परीने केलेली आहे. पण त्यातील रस्किन यांची व्याख्या शिल्पकलेला पोषक अशी आहे. तो म्हणतो ' प्रत्येक महान कलाकृति ही ईश्वराच्या कृतीविषयी मानवाला जो आनंद होतो, त्याची अभिव्यक्ती कलाकाराचे मनात प्रथम उत्पन्न होते, आणि नंतर तिचा बाह्य आविष्कार होत असतो. '

कलेचे प्रयोजन काय असाही प्रश्न काहीजणांना संशयात टाकतो, पण प्राचीन काळी मम्मभटाने खालीलप्रमाणे उत्तर देऊन ठेविले आहे—

काव्यं यशसेऽर्थकृते व्यवहारविदे शिवेतरक्षतये ।
सद्यः परिनिर्वृतये कान्तासंमिततयोपदेशयुजे ॥

भावार्थ असा की– यश, धन, व्यवहार, ज्ञान, याचप्रमाणे अत्यंत श्रेष्ठ प्रतीचा आनंद, मानवाला कलेपासून मिळतो.

प्राचीन काळापासून भारतामध्ये कला ही परतत्त्वाच्या साक्षात्काराचा एक मार्ग मानलेला आहे ही केवळ इंद्रियसुखासाठी अथवा श्रीमंतानी ऐष आराम करण्यासाठी नसून, मानवाच्या प्रगतीसाठी, जशी भक्ति, ज्ञान व प्रेम याची आवश्यकता असते, तशीच कलेचीही आहे ईश्वर हा जसा ज्ञानाचे अधिष्ठान आहे, तसा तो कलेचाही उगमस्थान आहे जसा तो सर्वसाक्षी आणि सर्व व्यापक आहे, तसा तो सर्वांगसुदरही आहे सायकाळी उच्च डोंगरावर उभे राहून, मावळत्या सूर्याचा लाल गोळा सागरात बुडत असताना पाहिला, की क्षणभरच का होईना, आपले मन हर्षाने उचंबळून येते याचे कारण ईश्वराच्या सौंदर्याचा तो साक्षात् आविष्कार असतो श्रीकृष्णाला भुवनसुदर असे नाव आहे, तर तुकाराम महाराज विठ्ठलमूर्तीला 'सुदर ते ध्यान उभे विटेवरी' असे संबोधितात. कलावत ईश्वराच्या याच सौंदर्य विषयक बाजूवर भर देऊन आपली निर्मिति करीत असतो आणि त्याद्वारे ईश्वराला मानवाचे समीप आणीत असतो

भारतात निरनिराळ्या देवतांची मदिरे म्हणजे कलेच्या खाणीच होत अनेक मदिरांची शिल्पे डोळे दिपविणारी असून त्यातील सुदर मूर्ति सौंदर्याने थक्क करून सोडणाऱ्या आहेत याचे कारण कलावताने भारलेल्या अंतःकरणाने देवाच्या चरणी रुजू केलेली ती भक्तिसेवा आहे आणि याच तत्त्वासाठी त्या कलेच्या माडणीत आपले नावही कोरून ठेवावे याचे भान त्याना उरलेले नव्हते ते ईश्वररूपाशी तद्रूप झालेले होते हेच भारतीय शिल्पकलेचे वैशिष्ट्य मानावे लागेल मदिरातील मूर्ति काही विशिष्ट तत्त्वे मनात ठेवूनच कलावतानी घडविलेल्या आहेत त्याना जे सुदर वाटले, त्याचा उपयोग त्यानी केला आणि त्यामुळेच काही मूर्ति अर्ध मानव, अर्ध पशु, त्रिमुखी, चतुर्मुखी तयार झाल्या अनेक वेळा त्या मूर्ति प्रतीकात्मक असतात, हे वाचकाच्या ध्यानात आले असेलच गुडघ्यापर्यंत हाताचे चित्रण करून आजानुबाहू मूर्ति, म्हणजे महान् शक्तिचे प्रतीक मानावयास हवे काही चतुर्भुज, अष्टभुज अथवा एकाहून अधिक शिरे, अथवा रावणाची दहा शिरे, हे चित्रित करण्यामध्ये मानवापेक्षा कितीतरी पटीनी त्या मूर्ति अधिक सामर्थ्यसपन्न आहेत, हेच कलाकाराला सूचित करावयाचे असते अशा अनेक अगानी नटलेली भारतीय शिल्पकला आहे

(भा म को २।१९५)

शिल्पासबधी प्रत्यक्ष विवरण करण्यापूर्वी, ते शिल्प ज्या घटनामुळे, कार्य वाहीमुळे उजेडात आले, त्याची पिठिका पाहणे अयोग्य ठरणार नाही इग्रज सरकारच्या आमदानीत सन १८६२ साली पुराणवस्तु सशोधन खात्याची उभारणी करण्यात आली असे जरी असले तरी ही इमारत तयार होण्यास त्याचा पाया

सन १७८३ मध्ये घातला गेला. या साली विलियम जोन्स नावाचे गृहस्थ कलकत्ता येथे हायकोर्ट न्यायाधीश म्हणून आले. त्यांनी संस्कृतचा अभ्यास केला आणि त्याच वर्षी भारतीय भाषा, कला व शिल्प यांचे संशोधन करण्यासाठी 'आशियाटिक सोसायटी' स्थापन केली. त्यामुळे या विषयाला चालना मिळाली.

सन १८४८ मध्ये कनिंगहॅम नावाचे लष्करी इंजिनियर भारतामध्ये आले आणि त्यांनी पुराणवस्तु संशोधन खाते स्वतंत्रपणे उघडावे असा प्रयत्न केला. त्याचे फळ लॉर्ड कॅनिंग व्हाईसरॉय म्हणून आल्यावर सन १८६२ मध्ये मिळाले. योगायोग असा की, कनिंगहॅम हाच त्या खात्याचा सर्वाधिकारी नेमला गेला. या खात्याचे प्रमुख काम म्हणजे 'पुराण वस्तूंचे संशोधन, जतन व इतिहाससंकलन करणे' असे होते. लॉर्ड मेयोच्या वेळी या खात्यात सुधारणा होऊन त्याचे संशोधनक्षेत्र वाढविण्यात आले. याच सुमारास चिनी प्रवासी ह्युएन-संग याच्या प्रवासी वृत्ताचे इंग्रजी भाषांतर प्रसिद्ध झाले होते आणि त्या त्या स्थळांची माहिती जमा करण्याचे कामही चालू झाले. सुमारे दहा वर्षांच्या आपल्या कारकीर्दीमध्ये कनिंगहॅम साहेबांनी २१ ग्रंथ लिहून तयार केले. आजही त्यांचा उपयोग केला जात आहे. सन १८७४ मध्ये जेम्स बर्जेस हे अधिकारी झाले आणि खाते-विस्तार पश्चिम भारत, गुजराथ येथवर वाढविला. सन १८८१ मध्ये लॉर्ड लिटन याच्या कारकीर्दीत या खात्याचा दर्जा वाढविण्यात आला व 'Curator of Ancient Monuments' असा उल्लेख करण्यात आला. डॉ. बर्जेस यांनी आपल्या तीस वर्षांच्या कारकीर्दीत अतिशय मेहनत घेऊन सुमारे ३२ ग्रंथ तयार केले. Imperial Series नावाने ते प्रसिद्ध आहेत.

सन १८९९ मध्ये लॉर्ड कर्झन व्हाईसरॉय झाल्यावर त्याने या खात्याकडे खूपच लक्ष घातले व सन १९०१ मध्ये Director General of Archaeology अशी नेमणूक केली. हा अधिकार सर जॉन मार्शल यांनी अनेक वर्षे चालविला. सन १९०४ मध्ये Ancient Monument Preservation Act मंजूर झाला. सन १९१४ साली लढाईच्या वेळी या खात्यावर आर्थिक परिस्थितीमुळे गंडांतर आले होते. पण पुढे सर्व काही व्यवस्थित होऊन या खात्याचा कारभार चालू असून पुराण शिल्प व वास्तु यांचे जतन होत आहे.

भारतामध्ये सिंधुतीरे संस्कृति फार प्राचीन मानली जाते. आतापर्यंत झालेल्या उत्खननांवरून शिल्पकला फार पूर्वीपासूनच अस्तित्वात असल्याचे पुरावे उपलब्ध झालेले आहेत. ग्रीक, कुशान, हूण, शक यांनी भारतावर स्वाऱ्या केल्यावर त्यांची छाप या पूर्वकलेवर पडून पुढे मिश्रकला सुरू झाली. त्याचा

प्रारंभ इसवी सनपूर्व दोन शतके तरी झालेला होताच होता, असे इतिहासकाराचे म्हणणे आहे.

अश्मयुगात राहणारा मानव वसतीसाठी मदरवान गुहा खोदून राहात असे, हे सर्वविश्रुत व सर्वमान्य आहे. सीरिया, बॅबीलोनकडील प्राचीन पूर्व प्रदेशात अशा शिल्पकलेचे अनेक नमुने उपलब्ध झालेले असून त्यावरून पुराणकथा व तत्कालीन इतर प्रचलित गोष्टी याच्याबद्दल माहिती मिळण्यास मदत होते. कोरीव शिल्प असलेल्या मोठमोठया गुहा आजही उपलब्ध आहेत. काही गुहामधून पचवीस हजार वर्षांपूर्वीचे पशूचे अस्थिपजर दिसून येतात. त्यावरून जाणकार असे अनुमान बांधतात की, त्या काळी मानव फक्त वन्य पशूवरच आपली उपजीविका करीत असला पाहिजे. निऑक्स (Niaux), लॅस्कॉस (Lascaux), या फ्रान्समधील ठिकाणी अर्धा अर्धा मैल खोल असलेल्या गुहामधून, प्राचीन संस्कृतीची निदर्शक अशी अनेक चित्रणे केलेली आहेत. सुमारे वीस हजार वर्षांपूर्वीचे हे एखादे धर्मपीठ असावे असे मानले जाते. काही गुहा तर पर्वताच्या अवघड उतारावर सुमारे ७०० मीटर्सवर आढळून आल्या आहेत.

"At Monte Cireco in Italy a skull found in 1939, afforded evidence of cannibalistic and ritual treatment from 7,000 years ago" अशा गुहामधून जी धर्मकृत्ये चालत, त्याचे अवशेष आजही उपलब्ध आहेत.

(Myths & Rituals by E O. James, P 32)

भारतामध्ये वेदकाळात यज्ञकुंड बांधणे यापलीकडे शिल्पशास्त्राची अधिक प्रगति झाली नाही. त्यामुळे त्या काळाच्या शिल्पाचा उल्लेख मिळत नाही. असे जरी असले तरी पांडवाच्या वेळीच्या मयसभेची मांडणी हा शिल्पकलेचा एक उत्तम नमुना होता, हे निश्चित आहे. भगवान बुद्धाच्या निर्वाणानतर अशोक राजाने बौद्ध धर्माचा प्रसार चालू केल्यावर बौद्ध भिक्षूच्या तप साधनेसाठी शांत निवासस्थान म्हणून स्तूप व विहार बांधण्याचे कार्य सुरू केले. खाली दक्षिणेत सातवाहन राजवटीच्या वेळी तेथील व्यापार चौल, सोपारा इत्यादि बंदरामार्गे परदेशाशी चालत असे. या व्यापारात व्यापारी विपुल धन मिळवू लागल्यामुळे या वर्गानेही गुहा व विहार बांधण्याच्या कामी साहाय्य केले, म्हणूनच अनेक ठिकाणी त्या आजही दिसत आहेत

या काळी जी शिल्पकला वाढीस लागली तिचे साधारणपणे चार वर्ग पाडण्यास हरकत नसावी. ते चार वर्ग खालीलप्रमाणे ·

स्तूपाचे अवशेष शहाजीकी ढेरी येथे आढळले आहेत स्तूपाच्या चौथऱ्याचे काम विटांचे होते व तो पाच टप्प्यात बांधलेला असून त्याची एकूण उंची सुमारे १५० फूट होती. या चौथऱ्यावर तेरा मजल्याची लाकडी बांधणी होती. तळाला तिचा व्यास २८६ फूट तर उंची सुमारे चारशे फूट होती. शेवटी त्या बांधणीवर ८८ फूट उंचीचा लोखंडी खांब, ज्याच्यावर २५ तांब्याचा मुलामा दिलेल्या छत्र्या शोभा देत होत्या म्हणजेच ह्या स्तूपाची एकूण उंची सुमारे ६३८ फूट होती प्रसिद्ध चिनी प्रवासी ह्यूएन त्सँगने हा स्तूप पाहिला तेव्हाच तो मोडकळीस आलेला होता. कालांतराने तो जमीनदोस्तही झाला. भिल्सा येथील एक स्तूप पायथ्याला १०० फूट व्यासाचा तर उंचीला ५० फूट असा आहे. तेथील वैशिष्ट्य असे की, या ठिकाणी असलेले अनेक स्तूप समूहासमूहाने एकत्र बांधलेले असून ह्याचे प्रत्यंतर आपल्याला भोजपूर, सोनारी विभाग या ठिकाणी येते. सम्राट अशोकाने असे लहानमोठे एकूण ८४,००० स्तूप बांधलेले होते असे सांगितले जाते. पिप्रवा (बस्ती) येथील स्तूपामध्ये सुवर्णाची मातृशक्तीची मूर्ति आढळली आहे. तशीच ती नंदगड (चंपारण्य) येथे मिळाली आहे.

सांची येथील स्तूप प्रेक्षणीय असल्याने अद्यापीही प्रवाशांची त्या ठिकाणी रीघ लागत असते ह्या स्तूपाची बांधणी केव्हा झाली, हे तेथील शिलालेखावरून कळून येते. चारही प्रवेशद्वारे निरनिराळ्या वेळी बांधली गेली असल्याने, त्यावरील शिल्प प्रवाही आहे. साधारणपणे हे काम एकाच पिढीत पुरे झाले नसावे असा अंदाज बांधावयास हरकत नाही भारहुत येथील शिल्पापेक्षा येथील शिल्प सुधारणावादी आणि समकालीन परिस्थितीचे दर्शन घडविणारे आहे. प्रवेशद्वारासमोरील चार वर्तुळाकार मार्ग, वर्तुळाकार गजाचा कठडा आणि तोरणे ही भारहुत येथील पद्धतीची भासतात शिल्प फक्त प्रवेशद्वारावरच आहे. कठड्याचे गज मात्र साधेसुधेच आहेत. शहरातील धकाधकीचे जीवन, खेडेगावातील शांततामय जीवन, जंगलातील तपस्वीचे जीवन इत्यादि प्रकारचे त्या त्या काळाला अनुसरून असलेले जीवन येथील शिल्पामध्ये पाहावयास मिळते.

दक्षिण भारतात देखील ही स्तूपाची बांधणी अमरावती, घंटशिल, नागार्जुनकोंडा, पेड्डागंजम इत्यादि ठिकाणी पाहावयास मिळते. या ठिकाणच्या काही स्तूपांचा पायथ्याचा व्यास १४८ फूट तर उंची सुमारे १३२ फूट आहे. अमरावती (जि. गुंटूर) येथील स्तूप संगमरवरी विटांनी बांधलेला असून, त्याच्याभोवती दोन प्राकार आहेत. बाहेरचा १४ फूट व आतील ६ फूट

उंचीचे. संगमरवरी विटा व दोन्ही प्राकाराचे सर्व पाषाण नक्षीने भरलेले आहेत. स्तूपाचा व्यास १३८ फूट, बाहेरील कठड्याचा परीघ ८०३ फूट असून यांच्यावर सुमारे १४००० आकृत्या कोरलेल्या आहेत. आतील कठड्यावरील आकृत्या तर याहूनही जास्त असाव्यात; हे कठडे म्हणजे शिल्पकलेतील महदाश्चर्यच मानले जाते. मुख्य स्तूप खिस्ताब्द २०० वर्षे व बाहेरील कठडे दुसऱ्या-तिसऱ्या शतकातील असावेत.

१९ व्या शतकाच्या प्रारंभी गावातील जमीनदारांचे नोकर टेकडीवर खोदकाम करीत असताना, ही अलौकिक कलाकृति उघडकीस आली. पण आश्चर्य असे की, इतके असूनही अनेक शिल्पांप्रमाणे, येथीलही काही मूर्ति भग्नावस्थेत व त्रुटित आढळतात. (भा. सं. को. १।१९६)

दिवंगत झालेल्या प्रसिद्ध व्यक्तींच्या स्मृतीसाठी असे स्तूप बांधण्यात येत असत. बौद्धपूर्वकाली ही प्रथा रूढ होती. परंतु बौद्धांनी त्यात अधिक प्रगति केली आणि बुद्धाचे अवशेष त्यामध्ये ठेवण्याची प्रथा रूढ झाली. आपण जेव्हा या पार्श्वभूमीवरून या स्मृतीचिन्हांकडे पाहतो तेव्हा परकीय संस्कृतीचा त्रोटक उल्लेख करणे आवश्यक वाटते.

प्रॉ. पेट्री यांच्या मते सुमारे दहा सहस्र खिस्ताब्द वर्षे इजिप्तमध्ये कला-कुसरीची कामे हाताने बनविलेल्या मातीच्या भांड्यावर होत असत. सनपूर्व ३४०० वर्षांपूर्वी मेनेस ह्या राजाने उत्तर व दक्षिण इजिप्त एकछत्री अंमलाखाली आणला आणि त्यामुळे तेथे शिल्पकलेची वाढ होण्यास मदत झाली. तेथील पिरॅमिडसूची रचना मृताच्या स्मृतीस्तवच अस्तित्वात आली. स्तूपाच्या बांधणीस ज्याप्रमाणे अनेक वर्षांचा काळ लागत असे, तद्वतच या पिरॅमिडसूनाही लागत असे. त्यांमध्ये मृत राजाची शरीरे, त्यांच्या आवडत्या वस्तु व संपत्तीही ठेवण्यात येई. गीझ ( Gizeh ) येथील खोपुराजाच्या कारकीर्दीमध्ये एक पिरॅमिड बांधावयास वीस वर्षे लागली. दरदिवशी वीस सहस्र मजूर काम करीत असत. चुनखडीच्या दगडाचे, अडीच टन वजनाचा एक, याप्रमाणे २३००,००० दगड लागले. गणितीच्या अंदाजानुसार त्या सर्व दगडांचे वजन ५७·५० सहस्र टन भरेल. या पिरॅमिडचा सर्व पसारा सात एकर जमिनीवर होता. तसेच तळाची रुंदी ७५५ फूट तर उंची ४८१ फूट आहे. ह्याची उभारणी खिस्ताब्द तीन सहस्र वर्षांपूर्वी झालेली आहे. पिरॅमिडच्या आतील बाजूस दगडी भिंतीवर रंगीत चित्रे काढीत. त्यावरून सद्य परिस्थितीचे ज्ञान होते. नांगरणी, कापणी,

झोडणी ही शेतीविषयक कामे, लोहार, सोनार, विणकर, काच-सामानवाले, लाकडी साहित्य तयार करणारे इत्यादि कारागिरांचे त्यामध्ये दर्शन घडते

दगडावरील खोदकामही या काळातील लोकांना ठाऊक होते (Great Sphinx) म्हणजे शीर नसलेली सिंहाकृति याची साक्ष पटविते पिरॅमिडजवळ ही आकृति आहे. ही आकृति १९० फूट लांब ७० फूट उंच असून सिंहाकृतीचे डोके तेहतीस फूट व त्याची रुंदी १३॥ फूट आहे. या ठिकाणी एक ओळीत अनेक पिरॅमिडस् आपल्याला दिसतात.

या पिरॅमिडस्च्या बाहेर जी मंदिरे आहेत, त्यातील राजाचे पुतळे उत्कृष्ट शिल्पाचे नमुने आहेत थेब ह्या राजधानीच्या शहराच्या बाहेर कार्नाक सूर्य मंदिरातील शिल्प असेच उत्कृष्ट आहे. भिंतीच्या आतील बाजूस युद्धाचे देखावे खोदलेले आहेत. अनेक राजांनी या ठिकाणी कलाकृतीत भर घालून ते अत्यंत प्रेक्षणीय क्षेत्र बनविले आहे. सुमारे दोन हजार वर्षे येथील बांधणीचे काम चालले होते येथील एक सभागृह राम्सेस (दुसरा) ह्याने बांधले. त्याची लांबी ३३८ फूट व रुंदी १७० फूट असून त्याला १३६ खांब आहेत. सभागृहाच्या मध्यभागी असलेले १२ खांब तर ७९ फूट उंच असून त्यांच्या माथ्यावर अनेक माणसे उभी राहू शकतील इतके ते रुंद आहेत.

या मंदिराच्या पुढे एका मैलावर लुक्झोरचे मंदिर आहे. त्याचे बांधकाम खिस्ताब्द १५०० वर्षांपूर्वी सुरू झाले. हे मंदिरही अतिशय भव्य असून अतिसुंदर व प्रेक्षणीय आहे. येथून नदीपलीकडे राजा अमेनहोटेप (तिसरा) ह्याचे ८० ते ९० फूट उंचीचे खडकात खोदलेले पुतळे आहेत आणि त्याच्यामागेच अनेक प्रसिद्ध सरदारांचे पुतळे खोदलेले आहेत अबू सिंबेल येथील खडकातील मंदिरात ६५ फूट उंचीचे पुतळे आढळतात. मंदिराची लांबी १८५ फूट तर रुंदी ९० फूट आहे. सभागृहातील चौरस आकाराच्या दगडी खांबांवर १७ फूट उंचीचे ओसिरस देवाचे पुतळे खोदलेले आहेत

या अबू सिंबेलच्या देवालयाला सांप्रतच्या काळात एका निराळ्याच रीतीने महत्त्व प्राप्त झालेले आहे आणि स्थापत्यशास्त्राची कसोटीच पणाला लागत आहे. अखिल विश्वात प्रदीर्घ लांबीसाठी विख्यात असलेली नाईल नदी (४०३७ मैल) या मंदिराच्या कक्षेतून वाहते या नदीवर आस्वान या ठिकाणी सन १८९८ साली प्रथम बंधारा बांधण्यात आला आणि कालव्यांचे पाण्याखाली वाळवंटाचा बराच प्रदेश आणला गेला. हा प्रदेश जसा सुपीक झाला तसा अधिक प्रदेश पाण्याखाली आणून देशाची भरभराट करावी या उद्देशाने सन १९१२ साली, या बंधाऱ्याची उंची १५ फुटांनी वाढविण्यात आली राष्ट्र

धुरिणाची भूक वाढतच गेली आणि सन १९६० मध्ये त्या धरणाची अधिक उंची वाढवून ती एकूण २६० फूट करण्याचे निश्चित झाले. पण हा उद्देश पार पाडावयाचा तर त्यामध्ये वरील अबू सिंबेलचे प्राचीन मंदिर धोक्यात येत होते. धरणाची उंची वाढल्यावर पाण्याच्या वाढीव पातळीखाली हे मंदिर साफ बुड-णार होते प्राचीन कलाकृतीचा हा खजिना नष्ट होऊ देण्यास सरकार तयार नव्हते, तेव्हा पेंच प्रसंगातून सुटका करून घेण्यासाठी सरकारने युनेस्को या जागतिक संस्थेकडे आर्थिक, तांत्रिक व शास्त्रीय सहाय्याची मागणी केली आणि शिल्पाची प्राचीनता जाणून त्या संस्थेनेही मदत देण्याचे आश्वासन दिले हे सहाय्य ते कसे देणार आहेत ते पहा—

( १ ) या सर्व प्राचीन शिल्पाचे लहान लहान भाग तोडून काढून दुसरी-कडे नेऊन ते पुन्हा पूर्ववत जोडावयाचे ( २ ) अशा लहान तुकड्यांना क्रमांक देऊन हलविण्यापूर्वी त्यांची छायाचित्रे घेऊन ठेवावयाची म्हणजे पुढे जोडणीस त्रास पडणार नाही ( ३ ) लहान तुकडे झाल्यावर त्याला गर्डरच्या सहाय्याने भोके पाडून त्यातून पोलादी सळ्या घालून वाहण्याचे काम सोपे करावयाचे. ( ४ ) ज्या ठिकाणी पुन्हा ही कलाकृति उभारावयाची ती नवीन जागा पूर्वी-प्रमाणेच निसर्गसुंदर स्थळी निवडावयाची

या मंदिराची उंची ११६ फूट असून गाभाऱ्यातील पुतळ्याची उंची वर लिहिल्याप्रमाणे ६५ फूट आहे गाभाऱ्यातील खांबामध्ये ओसिरस देवाच्या भव्य मूर्ति कोरलेल्या आहेत. आतील बाजूस तीन शक्तिपीठांची स्थापना केलेली आहे भारतामधील कोल्हापूर येथील अंबाबाई शिल्पाप्रमाणे येथेही मार्च व सप्टेंबर महिन्यात सूर्यकिरण रोमसिस मूर्तीच्या चरणाला स्पर्श करतात प्राचीन स्थापत्य शास्त्रज्ञांनी तीन सहस्र वर्षांपूर्वी शिल्पकलेमध्ये घडविलेला हा चमत्कार या मंदिराची उदात्तता व भव्यता याचा साक्षात्कार घडविल्याशिवाय रहात नाही याचसाठी साम्प्रतचे इजिप्शियन सरकार व युनेस्कोसारखी जागतिक संस्था, प्राणपणाने त्याचे रक्षण करण्यासाठी कंबर कसून आहेत यावरून इतर देशातील सरकारांनी–विशेषत गुहा व कोरीव लेण्यासाठी समृद्ध असलेल्या भारत सरकारने–यापासून योग्य तो बोध घेतला पाहिजे आणि जागतिक महत्त्वाचे शिल्प व वारसे जतन करून ठेवले पाहिजेत, हाच बोध या महत्त्वाकांक्षी योजने-तून घ्यावयास पाहिजे

अबू सिंबेलच्या शिल्पाप्रमाणे, डेडेरा येथेही प्राचीन देवालये असून ती उत्तम स्थितीत राखण्यात आली आहेत या मंदिराच्या प्रवेशद्वारी सुबक कोरीव शिल्पाचे २४ पाषाण खांब असून, त्यांची बांधणी राणी क्लिओपात्राच्या वेळी

चालू झाली होती. एडफ येथील देवालयात, भारतामधील रामायण महाभारत कालीन देखाव्याप्रमाणे, टॉलेमीच्या काळातील अनेक राजे लोकांच्या शिकारीचे प्रसंग चित्रित केलेले आहेत. थीब्ज व कार्नाक येथे दोन मैल लांबीच्या अरुंद रस्त्यावर दुतर्फा " स्फिंक्स "च्या मूर्ति पसरलेल्या आहेत.

(सृष्टिज्ञान मासिक, फेब्रुवारी १९६७)

वर म्हटल्याप्रमाणे सूर्यकिरण वर्षातून एक-दोन वेळा देवतावर पडणे हा एक शिल्पशास्त्राचा उत्कृष्ट नमुना सर्वत्र गणला जातो. माझे याबाबतचे विचार थोडेसे वेगळे आहेत आणि अनुभवाचे आहेत पूर्वी साधारणतः घराची अथवा मंदिराची बांधणी पूर्व अथवा पश्चिमाभिमुख केली जात असे. घरे विरळ असल्याने सूर्यकिरणांना साधारणत अडथळा होत नसे. उत्तरायणाच्या टोकावरून सूर्य भ्रमती करीत दक्षिणेकडे निघाला, म्हणजे मार्गात त्याच्या किरणझोतांना निरनिराळ्या अंशाने घरात वा मंदिरात प्रवेश करतात आणि कोणत्या तरी दिवशी सकाळी वा सध्याकाळी बहुधा घरातील काही भागाला स्पर्श करतात. तसेच सूर्य दक्षिण टोकापासून उत्तरेकडे निघाला म्हणजे घडते लेखकाने गोरेगावी सन १९५९ साली घर बांधले, पहिल्या माळ्यावर एका खोलीत लहानशी घुमटी बांधून त्यामध्ये देवताच्या मूर्तीची मांडणी केली. हे सर्व करताना त्याला केव्हाही कल्पना नव्हती की, अमुक दिवशी सायंकाळी सूर्याचे किरण गोपाळकृष्णाच्या चरणाला स्पर्श करतील तसा कोणताच आराखडा पूर्वी तयार केलेला नव्हता. पण वर्षातून दोन वेळा सूर्याच्या भ्रमतीमुळे असे घडते आहे खरे! हा अनुभव आल्यावर जर लेखकाने या निसर्गाच्या घटनेची कल्पकता आपल्याकडे घेतली, तर हे श्रेय त्याला कोणीही देऊ नये. तद्वतच प्रकार अनेक शिल्पामध्ये असावा, असे लेखकाचे प्रामाणिक मत आहे. सूर्यकिरण मूर्तीवर पडण्याचा काळ-वेळ अमूकच असा ठरलेला अनुभवाला येत नाही. किंबहुना शिल्पकाराने पूर्वानुभवाने ही वेळ निश्चित करून, आराखडा तयार करणेही शक्य आहे.

या देशाजवळील आर्मेनिया देशात कार्मिर ब्लुर या गावी उत्खनन झाले असता, सनपूर्व सातव्या शतकातील एक भव्य किल्ला आढळून आला आहे. त्यामध्ये एकूण १४८ खोल्या असून त्याला " तैशेबा " म्हणजे युद्धदेव असे नाव दिलेले आढळले. उरार्तुनामक राजाच्या वेळी तो बांधला गेला, असे एका शिलालेखावरून दिसून येते. तो लेख पुढे असेही म्हणतो, ' तायशेबायनी ' शहरात उरार्तु राजघराण्यातील रुसा राजाने पाच मंदिरे बांधली. या किल्ल्यात त्या वेळी प्रचलित असलेल्या ब्राँझच्या वस्तु, मातीची भांडी, शस्त्रे, अवजारे, कोरीव शिल्प असलेले पाषाण, सोन्याच्या कलाकुसरीचे दागिने इ० अनेक वस्तु आढळून आल्या आहेत.

ही थडगी असून त्याच्या आतील मानुस रथ, घोडेस्वार, युद्ध, शिकार, मच्छीमारी, राजस्वागत, हत्ती, उट, माकडे इत्यादीची शिल्पे कोरलेली आहेत.

पेरू ह्या देशातही पिरॅमिडस् बांधले जात. परंतु त्याची बांधणी पर्वताच्या उच माथ्यावर होत असे पोपल व्यूह हे मय संस्कृतीच्या माहितीपर पुराण असून त्यामध्ये पुष्कळशी पूर्वकालीन माहिती समाविष्ट केलेली आहे टिओकली अथवा देवघर ह्याची बांधणी पर्वताच्या उच माथ्यावर पिरॅमिडच्याच आकाराचीच केली जात असे. सर्व बांधकाम काळ्या दगडाचे असे. बाहेरील बाजूस असलेल्या गोल जिन्याने सुमारे तीन चारशे पायऱ्या चढून गेल्यावर अनेक फूट उचीवर देवताचे मंदिर असे अशाच एका युद्धदेवतेच्या मंदिराचा परिघ तळाला ४८०० फूट असल्याचे आढळून आले आहे मंदिराच्या चारी बाजूना दरवाजे असत. देवाल्याचे सभागृह चौकोनी असून त्याची लांबी रुंदी ३७५'×३००' इतकी होती स्तूपाप्रमाणे मंदिराचा पाया सहा टप्प्यांनी बांधलेला होता मंदिराच्या माथ्यावर ५६ फूट उचीचे दोन बुरुज असून एकामध्ये इष्टदेवतेची मूर्ति आणि दुसऱ्यामध्ये नरबळीचा दगड ठेवलेला असे. सोळाव्या शतकात स्पॅनिश लोक तेथे गेल्यावर अशा एका पिरॅमिडच्या तळघरात त्याना एक लक्ष छत्तीस हजार मानवी सागाडे आढळून आल्याचे इतिहासात नमूद केलेले आहे

( Myths of Mexico by Lewis Spence, P. 30 )

वरील नोटक माहितीवरून असे दिसून येईल की, इतर देशातही त्या काळी शिल्पकला प्रगत अवस्थेत होती भारतामध्ये ती स्तूपरूपाने आढळते, मिसर देशात पिरॅमिड्सच्या रूपाने आढळते, तर पाताळातील पेरू देशात भव्य मंदिराच्या स्वरूपात आढळून येते इतकेच मिसर देशातील उभारणी ही अतिशय प्राचीन असल्याने ग्रीक, हूण, कुशान राजवंशानी ती भारतामध्ये आणली असे अनुमान काढल्यास ते वावगे ठरणार नाही

इसवी सनाच्या पहिल्या शतकात कुशाण वंश भारतामध्ये आला आणि त्यानी आणलेल्या पाश्चात्य कलाप्रकाराने त्यापूर्वीच्या ब्राह्मणी व जैन कलेला नवीन वळण लागले. पूर्वी होत नसलेल्या बौद्धाच्या मूर्ति आता बनू लागल्या.

## गुहा

आपण वर पाहिलेच आहे की, अश्मयुगीन मानवही राहण्यासाठी गुहाचा उपयोग करीत असत. तीच कल्पना मौर्य सम्राट अशोक राजाने आणि त्याच्यानंतरच्या राजवंशानी उचलून गुहा खोदण्याचे कार्य चालू केले. या गुहा खोदण्याचा हेतु मात्र असा होता की, बौद्ध अगर जैन भिक्षु याना त्या

गुहात बसून शांतपणाने आपले आयुष्य व्यतीत करता यावे तसेच जे विद्यार्थी भिक्षु आहेत त्यांना आपले शिक्षण एकांतवासात करता यावे या गुहांना विहार अथवा संघाराम या नावाने संबोधिले जाई गया शहराजवळील बाराबर व नागार्जुन टेकड्यामधील गुहा या अशोककालीन असून त्या आद्य समजल्या जातात हाथीगुंफाच्या शिल्पावरून व लेखावरून त्या वेळचा इतिहास उलगडून पाहाता येतो कलिंगाधिपतीने पुष्यमित्राचा पराभव केला होता, हे तेथील लेखा वरून समजते कालिंगाधिपति खारवेला राजा झाला राजपुत्र बनविण्याचे शिक्षण त्याच्या लहानपणीच कोणत्या रीतीने दिले गेले होते, हे देखील तेथील शिल्पा वरूनच दिसून येते खिस्ताब्द १२३ वर्षापूर्वी सुंग घराणे राज्यकर्ते बनले आणि त्याने ११२ वर्षे विदिशाच्या गादीवर बसून राज्य केले भारहुतच्या स्तूपामधील कलाकौशल्यामध्ये ह्या घराण्याने आणखी भरच घातली. उदयगिरी व खंडगिरी येथील गुहा याच सुमारास तयार झाल्या सुंग व कण्व ही घराणी ब्राह्मणधर्मी होती तसेच वाकाटक ह्या घराण्याचा तिसऱ्या शतकातील संस्थापक विंध्यशक्ति हा देखील ब्राह्मणच होता सातवाहन राजाच्या वेळी भारतीयाचा व्यापार बऱ्याच परदेशाबरोबर चाले आणि ह्या व्यापारातून होणाऱ्या विपुल नफ्यामुळे व्यापाऱ्यानी बौद्धसाधकासाठी अनेक गुहा पितळखोरे, नाशिक, गोळी, घंटशिला, भाजे, भट्टिप्रोळू इत्यादि अनेक ठिकाणी बांधल्या

या वेळी बौद्ध धर्मात उपपंथ निर्माण झाले आणि भाद्रयानी या नावाच्या पंथियानी नाशिक कान्हेरी येथे, धर्मोत्तरीयानी सोपारा येथे व महासांघिकानी कार्ले येथे आपली वसतिस्थाने वसविली बौद्धधर्मात उपपंथ जरी निर्माण झाले, तरी त्या उपपंथात स्पर्धा अशी दिसून येत नाही सातवाहनाच्या वेळी महायान पंथ पुढे सरकावला आणि त्यामुळे बुद्धमूर्तींची पूजाअर्चा फार मोठ्या प्रमाणात अस्तित्वात आली याच कारणास्तव अनेक विहारामधून बुद्धाच्या मूर्ति आढळून येतात बौद्धभिक्षु आशिया, सिलोन, चीन, ब्रह्मदेश इत्यादि भागात धर्मप्रसारार्थ पुढे सरकले ते ह्याच सुमारास

उदयगिरी व खंडगिरी (ओरिसा) येथील गुहा जैन पद्धतीच्या आहेत फारच थोड्या गुहांच्या दर्शनी भागावर शिल्प पहावयास मिळते कलिंग राजा खारवेला ह्याने खिस्ताब्द ५० शतकापूर्वी हे कार्य चालू केले आणि ते पुढे १०० वर्षे तरी चालू होते, असे हाथीगुंफा येथील लेखावरून समजते गुहांचे स्वरूप साधारणपणे भारहुतप्रमाणेच आहे, परंतु क्वचित काही ठिकाणी त्या त्या स्थानिक व तत्कालीन परिस्थितीची छाया पडलेली आढळते येथील शिल्पकृतीत जास्त खोलपणा व अवयवांचे उठावदार आणि भडक चित्रण आढळते परंतु तरीही हे

चित्रण करताना मूळ कलेत जास्त सफाई आणि लवचिकपणा आलेला दिसतो. मच्छीपुरी, अनतगुफा, राणीगुफा, गणेशगुफा या उत्तम सुधारणावादी शिल्पाची साक्ष पटवितात. विहाराचा प्रमुख उद्देश वसतिस्थान हा असल्याने मध्यभागी ऐसपैस मोकळा चौक आणि चारी बाजूना राहाण्यासाठी लहान लहान ओवऱ्या व मागील बाजूस बुद्धाचा पुतळा हे दृश्य प्रत्येक विहारात दिसतेच. काही ठिकाणी हे विहार दोन माळ्याचेही खोदलेले आहेत. पिप्रवाह, सारनाथ, कसिया, बसराइ, तक्षशिला, अजिंठा, वेरूळ येथील विहार प्रेक्षणीय आहेत.

गुहा खोदकामातील आणखी एक उल्लेखनीय प्रकार म्हणजे चैत्यगृहे ही होत याचा उपयोग प्रार्थनेसाठी केला जात असल्याने ती एकप्रकारची बुद्धाची मंदिरेच होत. रामायणात[1] चैत्यगृहाचा उल्लेख आहे आणि त्यात चैत्यगृहाला बुद्ध-आयतन असे म्हटलेले आहे. सांची, सारनाथ, सोनारी, काल येथील चैत्यगृहे अशोककालीन असावीत, असे जाणकाराचे मत आहे. याच्या बांधणीचा विशेष म्हणजे याचा दर्शनी भाग घोड्याच्या नालाच्या आकाराचा असतो. मध्यभागी दगडी खांबाच्या दोन लांबच्या लांब रांगा असून त्यामुळे तीन दालने तयार होत. तसेच मागील बाजू गोलसर असून त्या ठिकाणी बुद्धाची प्रार्थनामूर्ति बसविलेली असते. गया शहरजवळील बाराबरलेणी व लोमशगुफा ही या शिल्पाची सुरवात मानली जाते. यानतर या शिल्पाचा महाराष्ट्र व दक्षिण भारतात प्रचार झाला. याना लोकभाषेत पांडवलेण्या असे संबोधतात. पण त्याचा पांडवाबरोबर मात्र काडीमात्रही संबंध नाही! कोंडाणे (कुलाबा) येथील चैत्य ५५ फूट लांब, २६ फूट रुंद आणि २० फूट उंच आहे, तर अजिंठा आणि कार्ले येथील चैत्य अनुक्रमे १००' × ४०' × ३३' व १२४' × २६' × ४५' या आकाराची आहेत.

वेरूळ येथे बौद्ध, ब्राह्मण व जैन पंथियांच्या गुहा आढळतात. या तीनही पंथियांच्या शिल्पाच्या बनावटीत जरी फारसा फरक नसला तरी शिल्पाकृतींच्या सजाईत मात्र भरपूर फरक जाणवतो. बौद्ध गुहांतून बुद्धाच्या मूर्ति, तर ब्राह्मणांच्या गुहांमधून शंकरासंबंधी शिल्प आढळते. वेरूळ येथील गुहा पहात असताना हा फरक आपल्याला प्रकर्षाने जाणवतो. पहिल्या दहा-बारा गुहा बौद्धकालीन असून त्यांतील शिल्प जरा ओबडधोबडच वाटते. परंतु त्यानंतरच्या सुमारे सोळा गुहा ब्राह्मणकाळातील असून प्रत्येक गुहा पाहताना निरुपात

१ टीप—यावरून सांप्रतचा रामायण ग्रंथ बौद्धकालानंतर लिहिलेला असावा, या विधानाला दुजोरा मिळतो. किंबहुना मूळ वाल्मिकी रामायणात याचा उल्लेख येणे अशक्यच आहे.

पहिलींपेक्षा जास्त सुबकपणा व सुधारणा झालेली दिसून येते. पुढील चार गुहा जैनांच्या असून त्यांतील इंद्रसभा, जगन्नाथसभा, पारसनाथ, महावीरमूर्ति इत्यादि देखावे फारच प्रेक्षणीय आहेत. अजिंठा येथील ३२ गुहा एकापुढे एक खोदलेल्या असून बौद्धकालीन असल्या पाहिजेत, कारण त्या गुहांत सर्वत्र बुद्धाच्याच मूर्ति विखुरलेल्या आहेत. लेखकाने ह्या क्षेत्रास भेट दिली, तेव्हा यावनी संस्कृतीने अनेक मूर्तींचा विध्वंस केलेला पाहण्यात आला.

शिल्पकलेच्या उत्पत्तीचा आणि विकासाचा हा त्रोटक आढावा घेतल्यानंतर आता आपण आपल्या विषयाकडे—म्हणजे शिल्पदेवता, या विषयाकडे—वळू. आदिशक्तीच्या स्वरूपाचा आविष्कार शिल्पकारांनी कोणत्या स्वरूपात केला हे आपल्याला साररूपाने पाहावयाचे आहे.

वैदिक देवता, इंद्र, प्रजापति, यम, वरुण, मित्र, अग्नि या मागे पडून त्याऐवजी मानवरूप देवता वसुदेव, कृष्ण, बलराम, शाक्यमुनि, नरनारायण या वैष्णव संप्रदायाच्या देवता प्रचारात आल्या. यामुळेच वैष्णव आणि शैव संप्रदायाची उत्पत्ति झाली. वैदिकांच्या यज्ञांतील हिंसेला कंटाळून महावीर आदि तीर्थंकारांनी नवा पंथ सुरू केला, तर बौद्ध पंथाच्या उगमानंतर त्या पंथाला भाव आला. अंबिका, दुर्गा, पार्वती, विंध्यवासिनी या शक्तिदेवतांची पूजा प्रचारात आली. हा काल साधारणतः खिस्ताब्द तीनशे वर्षांपूर्वीचा असावा. या वेळी पंचोपासक म्हणजे वैष्णव, शैव, शाक्त, सौर्य व गाणपत्य हे पंथ अस्तित्वात आले. दक्षिण भारतात सुब्रह्मण्यम् हा कालीदेवाचा पुत्र मानला गेल्यामुळे आणि त्याने अनेक दैत्यांचा नाश केला ह्या श्रद्धेने त्याला सुर अथवा सुरेश्वर असे नाव मिळाले. त्याला कोणी मुरुगन असेही म्हणतात.

वेरूळ हे स्थान औरंगाबादपासून सुमारे वीस मैल अंतरावर आहे. ही लेणी पाहण्यासाठी डोंगरकडा चढावा लागत नाही. इतकेच नव्हे तर सोळा क्रमांकाच्या कैलास लेण्याशी मोटारीसारखे वाहन देखील सहज जाऊ शकते. ह्या लेण्यांचे काम सहाव्या शतकात चालू झाले, ते तेराव्या शतकात जैन पंथियांनी पुरे केले. इतक्या दीर्घ कालावधीपर्यंत हे काम सतत चालू होते, ही एक महदाश्चर्याची बाब मानली पाहिजे. पहिली बारा लेणी बौद्धांची, त्यापुढील १७ लेणी ब्राह्मणांची आणि शेवटची पाच जैन पंथियांची आहेत. या सर्व लेण्यांतील नुसते क्रमांक १६ चे कैलासलेणे पाहिले तरीदेखील जीवनातील सर्वोच्च आनंदाच्या क्षणाचा उपभोग घेतल्याची अनुभूति जाणवते. येथील शिल्पकाम कांही दशकांतील नसून, अनेक शतके ते चालू असले पाहिजे. आराखडा तयार झाल्यावर ' आधी कळस मग पाया रे ' या उक्तीप्रमाणे याचे काम झाले असले पाहिजे.

अनेक वर्षे अनेक कारागिराचा त्या त्या कृतीवर हात फिरलेला असला तरी तेथील शिल्प कसे एकजीव आणि न थबकता केले गेले आहे असे वाटते! जणू काय एकच दीर्घायुषी शिल्पकार अनेक वर्षे हे शिल्प घडवीत बसला होता! सर्वांत आश्चर्य असे की, ही अद्‌भुत किमया घडवून आणणाऱ्याचे नावही मिळत नाही. कोणा एका लेखकाने म्हटल्याप्रमाणे 'या ठिकाणी आकाशपाताळ एक आहे, बाल्य-तारुण्य एक आहे, जन्म-मृत्यु एक आहे, राजारंक एक आहे. तसेच शांत, रौद्र व वीररसोत्पादक कृतीही आहेत. चंद्रशेखर शिवाची आदिमायेसह अनेक रूपे येथील शिल्पांमध्ये प्रकाशली आहेत.'

संत एकनाथ महाराज एके ठिकाणी म्हणतात,

**चिंचेच्या पानावर देऊळ बांधिले ।**
**आधी कळस मग पाया रे ॥**

त्याची तंतोतंत सत्यता हे शिल्प पाहाताना आपल्याला पटते. कारण १०७ फूट उंचीवरून कळस, शिखर, छतावरील सिंह, नक्षीकाम वगैरे कोरीत कोरीत मग सभामंडप कोरावयाचा, नंतर बाजूच्या दोन्ही भिंतीवर रामायण, महाभारत या धर्मग्रंथातील अनेक प्रसंग चित्रित करावयाचे आणि वरून खाली खाली येत येत सरतेशेवटी पायाचे प्रचंड आणि अतिमहत्त्वाचे अधिष्ठान कोरावयाचे हे काही येरा गबाळाचे काम नोहे!

अशा रीतीने भल्यामोठ्या साक्षात् गजकर्तीच्या आकाराचे गगनचुंबी ध्वजस्तंभ दोन माळ्यांची भव्य इमारत बांधीत खाली यावयाचे, ही करणी कलावताच्या दृष्टीने अनुपमच म्हणायला हवी. अखिल विश्वात ह्याला दुसरी तोड नाही. मिसर देशातील पिरॅमिडस् अगर पेरूदेशातील भव्य देवालये यांची बांधणी पायापासून कळसापर्यंत अशी झाली. कळसापासून पायापर्यंत नव्हे आणि यासाठीच या शिल्पाला अखिल विश्वात तोड नाही असे म्हणावे लागते. हेच एकमेव सौंदर्य पाहाण्यासाठी देशोदेशींचे अनेक हौशी प्रवासी या ठिकाणाला भेट देत असतात.

कृष्णराजाची कारकीर्द फक्त २५ वर्षे झाली. खुदाईची कलशस्थापना त्याच्या समक्ष झाली, असा ताम्रपटात उल्लेख मिळतो. हे काम पूर्ण होण्यास १५० वर्षांचा कालावधि लागला असल्याकारणाने बरेचसे काम कृष्णराजाच्या पश्चात झाले असले पाहिजे हे उघड आहे. मात्र आराखडा आहे तोच ठेवला गेला असला पाहिजे. ह्या अलौकिक शिल्पाची कल्पना ज्या शिल्पकाराला प्रथम सुचली, त्याने प्रथमतः कांची येथील कैलासनाथ मंदिर, पट्टदकल (विजापूर)

अवतरले अशी कथा प्रचलित आहे. कालमानाप्रमाणे मूर्तीमध्येही आरणपरत्वे कसा फरक होतो, याचे हे उत्कृष्ट उदाहरण आहे.

रावणाने कैलास पर्वत आपल्या वीस भुजांनी एकदा गदगदा हलविला होता, अशी एक आख्यायिका आहे. त्याचे साक्षात् चित्रण येथे दोनचार ठिकाणी केलेले आढळते. गर्भागृहाच्या पायथ्यावरील हे शिल्प अतिशय भव्य नि म्हणूनच नेत्रदीपक आहे. पर्वताच्या हलण्यामुळे भयभीत झालेली व शिवाला बिलगलेली पार्वती शिल्पकाराने इतकी उत्कृष्ट चितारली आहे व तिच्या चेहऱ्यावरील भाव इतके कमालीचे वास्तव वठविले आहेत की, शिवाला बिलगलेली पार्वती, ही पार्वती नसून त्या शिल्पकाराची अभिजात प्रतिभाच पार्वती बनून त्या पार्वतीत उतरली आहे की काय असा कोणत्याही चोखंदळ नि रसिक प्रेक्षकाला भ्रम पडावा! खरेच, माणसाच्या हातांची जादू काही औरच असते. गुहा क्रमांक वीसमध्येही असाच देखावा पाहावयास सापडतो.

राष्ट्रकूट घराण्यातील राजा दंतिदुर्ग याला दोन राण्या होत्या. एकीचे नाव घृष्णावती व दुसरीचे नाव माणकावती. वेरूळ लेण्याजवळील घृष्णेश्वराचे मंदिर बारा जोतिर्लिंगापैकी असल्याने ते प्रसिद्धच आहे. घृणावती ही शिवभक्त असल्याने तिच्यासाठी म्हणून शंकर त्या स्थानी राहिले, अशी सुरस कथा प्रचलित आहे. हे स्थानही अतिशय प्रेक्षणीय असून ते पाहण्यासाठी यात्रिकांची नुसती रीघ लागून राहिलेली असते. मंदिराचा जीर्णोद्धार राणी अहिल्याबाईने केला असून कळसाचे शिल्प अतिशय सुंदर आहे.

वेरूळ येथील लेण्याचे मुख्यतः तीन भाग पडतात. पहिला बौद्धपंथीय अनुयायांचा, ज्यामध्ये बुद्धाच्या मूर्ति स्थापन केलेल्या आहेत. दुसरा हिंदुधर्मीय शिवोपासकांचा, ज्यामध्ये शंकराच्या शाळुंका स्थापन केलेल्या आहेत व तिसरा जैनधर्मियांचा. आपल्या विषयाच्या दृष्टीने दुसऱ्या गुहेतील शिल्पाचाच प्रामुख्याने विचार करावयाचा आहे, कारण त्यामध्येच आदिशक्तीचा आविष्कार पहावयास सापडतो.

येथील लेण्याची प्रचलित मराठी नावे उद्‌बोधक आहे. ती येणेप्रमाणे—

महारवाडा, धेडवाडा, दुसरा महारवाडा, विश्वकर्मा अथवा सुतार झोपडी, दोन ताल अथवा दुखया घर, तीन ताल म्हणजे पाताळ, मृत्यु व स्वर्गलोक, रावणाची खाई, दशावतार, कैलास, रामेश्वर, नीळकंठ, तेळका घाणा, कुंभारवाडा, जानोसा, दुमाळलेणे, आदिनाथ, आदिनाथसभागृह, पारसनाथ, जगरनाथसभा, इंद्रसभा इत्यादि इत्यादि.

येथील विरूपाक्ष मंदिर पाहिलेले असावे, असे अनुमान काढण्यास हरकत नसावी. कारण येथील शिल्पात साधारणतः वर उल्लेखिलेल्या शिल्पाचे प्रतिबिंब पडलेले दिसते. तसेच डोंगर पोखरून मंदिर बनविण्याची कल्पना महाबलीपुरम् येथील धर्मरथ, अर्जुनरथ इत्यादि डोंगर पोखरून तयार केलेली मंदिरे पाहून सुचली असण्याचीही दाट शक्यता आहे.

गुहाक्रमांक २० जवळील गंगा, यमुना, सरस्वती यांच्या मूर्ति फारच सुबक कोरलेल्या आहेत. तसेच शिल्पस्तंभावरील मकर तोरणाच्या सुंदर कमानींमध्ये अनेक सुंदर देवता कोरलेल्या आहेत. मस्तकावर उभट आकाराचा करंडक मुकुट व सिंहस्टी रत्नमेखला असलेल्या या मूर्ति खास सौंदर्याच्या मुशीतूनच बाहेर काढल्या आहेत, असेच पाहाणाऱ्याला वाटते.

गुहा क्रमांक १७ मध्ये या विषयाला चालना देणारा आणखी एक देखावा आपल्या दृष्टोत्पत्तीस येतो. या ठिकाणी महिषासुरमर्दिनीची एक मूर्ति आहे. देवीला चार हात असून तिच्या पायाखाली असलेला महिष संपूर्ण आहे, म्हणजे त्याचे मस्तक तुटलेले नाही. महिषाच्या पाठीवर देवीचा उजवा पाय असून डावा पाय जमिनीवर आहे. देवीच्या हातामध्ये तरवार, त्रिशूळ, कमळ ही आयुधे असून डावीकडील खालचा चौथा हात, महिषाने करुणादृष्टीने वर केलेल्या मुखावर आहे. या प्रकारचे देवीचे स्वरूप अन्यत्र क्वचितच पाहावयास सापडते. या स्वरूपावरून असे अनुमान काढावेसे वाटते की, आठव्या शतकापर्यंत महिषासुरमर्दिनीचे चार हाताचे स्वरूप प्रचलित होते व या स्वरूपात तिच्या पायाखाली असलेल्या महिषाचे मुंडके तुटलेले नसे. पुणे शहरापासून चार मैलावर उरूळी गावी मार्च १९६५ मध्ये जमिनीत एक याच प्रकारची महिषासुरमर्दिनी देवी मूर्ति आढळून आली आहे. उजवे हाती तरवार व त्रिशूळ आणि डावीकडे पद्म व गदा याप्रमाणे आयुधे असून महिष करुणापूर्ण दृष्टीने डावेबाजूने वरती देवीचे नेत्राकडे पाहात आहे. हातात बाजुबंद, पायात साखळ्या आणि कमरेला मेखला कोरलेल्या दिसतात. कौंडणपूरची देवताही याच स्वरूपाची आहे. उत्तर प्रांती व इतर अनेक ठिकाणी याप्रमाणे चतुर्भुज मूर्ति आढळून येतात यावरून असा क्रमप्राप्त निष्कर्ष निघतो की, दैत्यांच्या विनाशाचे पवित्र कार्य करणाऱ्या या देवतेविषयी पाहाताक्षणीच भक्ताना जबर व दरारा वाटावा ह्या हेतूने तिच्या स्वरूपात पुढील काळात सुधारणा केली गेली. ह्या सुधारणेचे दृश्यफल देवीला आठ हात होण्यात व तिच्या चरणयुगुलाखाली असलेला महिष मस्तक तोडून त्यातून दैत्यस्वरूप बाहेर येत आहे, अशा स्वरूपात झालेले दिसून येते. काही ठिकाणी ह्या देवीला दहा हात दाखवितात. वणी येथील अठरा हाताचे स्वरूपही महिषदैत्याच्या वधासाठीच

अवतरले अशी कथा प्रचलित आहे. कालमानाप्रमाणे मूर्तींमध्येही कारणपरत्वे कसा फरक होतो, याचे हे उत्कृष्ट उदाहरण आहे.

रावणाने कैलास पर्वत आपल्या वीस भुजांनी एकदा गदगदा हलविला होता, अशी एक आख्यायिका आहे. त्याचे साक्षात् चित्रण येथे दोनचार ठिकाणी केलेले आढळते. गर्भागृहाच्या पायऱ्यावरील हे शिल्प अतिशय भव्य नि म्हणूनच नेत्रदीपक आहे. पर्वताच्या हलण्यामुळे भयभीत झालेली व शिवाला बिलगलेली पार्वती शिल्पकाराने इतकी उत्कृष्ट चितारली आहे व तिच्या चेहऱ्यावरील भाव इतके कमालीचे वास्तव बठविले आहेत की, शिवाला बिलगलेली पार्वती, ही पार्वती नसून त्या शिल्पकाराची अभिजात प्रतिभाच पार्वती बनून त्या पार्वतीत उतरली आहे की काय असा कोणत्याही चोखंदळ नि रसिक प्रेक्षकाला भ्रम पडावा! खरेच, माणसाच्या हाताची जादू काही औरच असते. गुहा क्रमांक वीसमध्येही असाच देखावा पाहावयास सापडतो.

राष्ट्रकूट घराण्यातील राजा दंतिदुर्ग याला दोन राण्या होत्या. एकीचे नाव घृष्णावती व दुसरीचे नाव माणकावती. वेरूळ लेण्याजवळील घृष्णेश्वराचे मंदिर बारा जोतिर्लिंगापैकी असल्याने ते प्रसिद्धच आहे. घृष्णावती ही शिवभक्त असल्याने तिच्यासाठी म्हणून शंकर त्या स्थानी राहिले, अशी सुरस कथा प्रचलित आहे. हे स्थानही अतिशय प्रेक्षणीय असून ते पाहण्यासाठी यात्रिकांची नुसती रीघ लागून राहिलेली असते. मंदिराचा जीर्णोद्धार राणी अहिल्याबाईने केला असून कळसाचे शिल्प अतिशय सुंदर आहे.

वेरूळ येथील लेण्याचे मुख्यतः तीन भाग पडतात. पहिला बौद्धपंथीय अनुयायांचा, ज्यामध्ये बुद्धाच्या मूर्ति स्थापन केलेल्या आहेत. दुसरा हिंदुधर्मीय शिवोपासकांचा, ज्यामध्ये शंकराच्या शाळुंका स्थापन केलेल्या आहेत व तिसरा जैनधर्मियांचा. आपल्या विषयाच्या दृष्टीने दुसऱ्या गुहेतील शिल्पाचाच प्राधान्याने विचार करावयाचा आहे. कारण त्यामध्येच आदिशक्तीचा आविष्कार पहावयास सापडतो.

येथील लेण्याची प्रचलित मराठी नावे उद्‌बोधक आहे. ती येणेप्रमाणे—

महारवाडा, धेडवाडा, दुसरा महारवाडा, विश्वकर्मा अथवा सुतार झोपडी, दोन ताल अथवा दुमजली घर, तीन ताल म्हणजे पाताळ, मृत्यु व स्वर्गलोक, रावणाची खाई, दशावतार, कैलास, रामेश्वर, नीळकंठ, तेळ्याचा घाणा, कुंभारवाडा, जानोसा, दुमाळलेणे, आदिनाथ, आदिनाथसभागृह, पारसनाथ, जगन्नाथसभा, इंद्रसभा इत्यादि इत्यादि.

यातील काही लेणी पूर्वी मातीने बुजवून टाकलेली होती ती आता उकरून साफसूफ करून पुन्हा पूर्ववत् करून ठेवलेली आहेत अफगाणिस्ताना मध्ये काही लेणी यावनी संस्कृतीने बुजवून टाकल्याचे संशोधकांना आढळले आहे तसेच ह्या ठिकाणीही घडले असण्याचा संभव आहे लेणी तयार झाल्यावर अनेक मूर्तींवर चुन्याचा गिलावा करून त्या रंगविल्या होत्या, हे मूर्तींच्या काही पडीक गिलाव्यावरून स्पष्टपणे दिसते हे रंग देण्याचे काम विजयनगरच्या यादववंशीय राजांनी केले असे मानले जाते येथील शिवालयाचे वैशिष्ट्य म्हणजे मंदिरातील गाभारे व शिवलिंगे इतर भागाच्या सपाटीबरोबरच आहेत खोल जागी ती नाहीत बुद्धाच्या मूर्ति व इतर लेण्यातील लक्ष्मी, शेषशायी भगवान आदि मूर्तांमध्ये काही अंशी साम्य आहे हिंदूच्या मूर्तींचे अनुकरण करून बौद्धांनी त्यांचा साज आपल्या इष्टदेवतांच्या मूर्तींवर चढविलेला आहे, ही गोष्ट त्यांच्या मूर्ति पाहताच आपल्याला प्रकर्षाने जाणवते आपण काही उदाहरणेच पाहू. कमलोद्भव लक्ष्मी ही खरी म्हणजे हिंदूची मूर्ति पण बौद्धांनी ही कल्पना घेऊन कमळावर बुद्धदेवाला बसविले आहे. तसेच सर्प शंकराच्या मानेभोवती वेढलेला अथवा नाग विष्णूची मंचकशय्या, परंतु या सर्पाला एके ठिकाणी बुद्धाच्या मूर्तीवर फणा धरावयास लावलेले आढळते

एका गणिती तज्ज्ञाने वेरूळची लेणी पाहून असा हिशेब बसविला आहे की, ही लेणी कोरण्यास अठ्ठेचाळीस लक्ष माणसांना एकवीस वर्षे लागली असावीत यावरून वाचकांनी या कामी खर्ची पडलेल्या श्रमाची आणि द्रव्याची फक्त कल्पनाच करावी हे बरे!

ही लेणी केव्हा कोरली गेली असावीत, यासंबंधी अनेक विद्वानांनी संशोधन करून, तसेच ताम्रपट, शिलालेख यांचा अभ्यास करून असे अनुमान काढले आहे की, बौद्धलेणी खिस्ताब्द शतकाच्या सुमारास किंवा त्यानंतरच्या त्या धर्माच्या चलतीच्या काळी खोदलेली असावीत. कारण मल्हारी म्हाळसा महात्म्यात, जेजुरीच्या खंडोबाने मणिमल्ल दैत्याचा नाश करून सात कोटी लोकांवर आपले वर्चस्व प्रस्थापित केले आहे, असे म्हटले आहे हा मणिमल्ल म्हणजे महाराष्ट्रातील कोणीतरी बौद्धधर्मीय राजा असावा आणि त्याचाच पाडाव हिंदुधर्मीय खंडेरायाने केला. हा खंडेराय सन ६२० च्या सुमारास होऊन गेला असे इतिहास सांगतो इंडियन अँन्टिक्वेरी व रॉयल एशियाटिक सोसायटी यांच्या अंकातून या गोष्टीचा बराच ऊहापोह पूर्वीच झालेला आहे. बौद्धलेणी सुमारे दोन हजार वर्षांपूर्वीची असावीत हाच त्यांचा निष्कर्ष आहे.

ताम्रपटांच्या आधारे संशोधन करून डॉ. श्री. रा. गो. भांडारकर ह्यांनी कैलास व इतर शिवलेण्यासंबंधी संशोधलेली माहिती खालीलप्रमाणे आहे,

धर्मात्मनस्तस्य नृपस्य जज्ञे सुतः सुधर्मा खलु कृष्णराजः ।
एलापुराचलगताद्भुतसंनिवेशयद्वीक्षाविस्मितविमानचरामरेन्द्राः॥ इत्यादि

भावार्थ असा की, 'राष्ट्रकूट घराण्यातील गोविंदराजाचा नातू व कर्कराजाचा मुलगा कृष्णराज ह्याने एलापूर पर्वतावर अद्भुत लेणे बांधविले. ते इतके अद्भुत आहे की, विमानातून जात असताना ते पाहून देव विस्मय पावतात आणि ते शिवालय स्वयंभू आहे की कृत्रिम आहे यावर चर्चा करतात. आणखी हे शिवालय असे आहे की, ज्याने ते बांधले, तो शिल्पकारच ते पाहून आश्चर्याने स्तिमित होतो आणि आता मात्र पुन्हा आपल्याला असे बांधता येणे अशक्य आहे याची जाणीव होताच स्वतःच स्वतःला विचारतो, 'अहो, मी हे देवालय बांधले तरी कसे ?'

हा उतारा गुजराथ शाखेतील कर्कराजाने शिद्धाशी गावी भानुभट्ट ब्राह्मणाला गाव इनाम दिल्याबद्दलचा आहे. फक्त ह्या उताऱ्यात शकाचा उल्लेख केलेला नाही. दुसऱ्या एका ताम्रपटात याच घराण्यातील अकालवर्ष राजाने एका ब्राह्मणाला सनद दिली, त्यामध्ये कृष्णराजाच्या नावाचा आणि शिवालय बांधल्याचा उल्लेख आहे. हा ताम्रपट शके ८६२ चा आहे व कृष्णराज (तिसरा) याच्या वेळचा आहे. पहिला व तिसरा कृष्णराज यामध्ये ९ राजे होऊन गेले. म्हणजे सुमारे दोनशे वर्षांचा कालखंड लोटलेला आहे. तेव्हा या सर्व गोष्टींचा साकल्याने विचार केला म्हणजे कैलासलेणी सन ७०० च्या सुमाराची असावीत असे अनुमान निघते.

येथील लेणी पाहिल्यावर त्यांची भव्यता पाहून आपले मन आश्चर्यचकित होते. बौद्धांच्या गुहांची लांबी-रुंदी व शिवालयाची लांबी-रुंदी भरपूर आहे. येथील दुसरा महारवाडा सुमारे १३० फूट खोल आहे. तसेच सुतारझोपडी १३० फूट, तीन ताल १४२ फूट, दशावतार १०० फूट, दुमाळलेणे १८५ × १५० फूट याप्रमाणे चढत्या क्रमाने लेण्यांची भव्यता अनुभवता येते. ग्डक पोखरून शिल्पासह इतकी पोकळी निर्माण करणे हेच कारागिरीचे कसब आपण पाहावयाचे असते.

येथील सर्वच लेणी पाहाण्यासारखी आहेत, हे जरी खरे असले तरी शिल्पाच्या दृष्टीने, सुतारझोपडी, दशावतार, कैलास, दुमाळलेणे, इंद्रसभा, आदिनाथसभा इत्यादि लेणी प्रामुख्याने उल्लेखनीय आहेत.

आता क्रमाक्रमाने आदिशक्तीचा आविष्कार कोठे व कशाप्रकारे झालेला आहे ते आपणांस पहावयाचे आहे. रावणाची खाई या लेण्यामध्ये महिषासुर-मर्दिनी व्याघ्रारूढ असून तिच्या हातात त्रिशूळ आहे व तिच्या वाहनाने म्हणजे वाघाने महिषासुरावर झडप घातलेली आहे असा देखावा आहे दुसऱ्या एका देवळीत शंकर पार्वती बसलेली व श्रीगणेश त्यांच्या मागील बाजूस उभा आहे. नंदी त्यांच्या समोर बसलेला असून शिवगण त्याचे शेपूट ओढून त्याची चेष्टा करीत आहेत एके ठिकाणी रावण कैलासपर्वत आपल्या हातांनी हलवून उचलण्याचा प्रयत्न करीत असून या कामी त्याला सर्व शक्ति पणाला लावावी लागली आहे हे त्याच्या मुद्रेवरून स्पष्ट दिसत आहे.

शिवमहिम्न या स्तोत्रामध्ये या प्रसंगाचे वर्णन पहा,

अमुष्य त्वत्सेवा समधिगतसारं भुजवनम् ।
बलात्कैलासेऽपि त्वदधिवसतौ विक्रमयत. ॥
अलभ्या पातालेऽप्यलसचलितांगुष्ठशिरसि ।
प्रतिष्ठा त्वय्यासीद्ध्रुवमुपचितो मुह्यति खल ॥ १२ ॥

याचा भावार्थ असा की, दशशीर रावणाने आपल्या वीस भुजांच्या बलाने कैलासपर्वत शंकरासह हलविण्याचा प्रयत्न केला असताना, सहज आळस देत देत पर्वत हलण्याचा भास झाल्याबरोबर शंकरानी आपल्या अंगुष्ठाने रावणाला पाताळात दाबून टाकले, आणि त्यामुळेच त्याला स्थिर जागा भूलोकी मिळाली नाही आसुरी संपत्तीने युक्त असा रावण, जेव्हा आपल्या उपकार कर्त्यांवरच अधिकार गाजवू लागला, तेव्हा त्याला यापेक्षा कोणती गति प्राप्त होणार ?

या शिल्पाची ग्रीक शिल्पाबरोबर तुलना करण्यासारखी आहे ज्युपिटरही ग्रीक लोकांची महान देवता आहे ब्रिआरिस हा तिचा मोठा भक्त होता रावणाप्रमाणे त्याला अनेक तोंडे व हात होते. रावणाप्रमाणेच ब्रिआरिसही तेथील इतर देवांना त्राहि भगवन् करून सोडत असे त्याच्या त्रासाला कंटाळून ते देव इजिप्तदेशात पळून गेले शेवटी एटना पर्वताखाली दकलून देऊन ब्रिआरिसचे पारिपत्य करण्यात आले, अशी ग्रीक लोकांची पुराणांतरी एक कथा आहे

पुढे एका देवळीत शंकर गंगा व गौरी यासह बसले आहेत, तर एके ठिकाणी गजलक्ष्मीची मूर्ति आहे

दशावतार हे लेणे दुमजली असून विष्णूचे दशावतार या ठिकाणी चित्रित केलेले आहेत वरील माळ्यावरील दालनात पार्वतीच्या अनेक मूर्ति आहेत एके

टिकाणी शिव-पार्वतीच्या मूर्तींसमोर पांचमूर्ती त्यांना नमस्कार करीत आहेत असे दाखविले असून, त्या पाच मूर्ति पाच पांडवांच्याच होत असे मानले जाते. विशेष लक्षात घेण्यासारखी गोष्ट म्हणजे जेव्हा जेव्हा शंकर व पार्वती एकेठायी दाखवितात, तेव्हा शंकरांना दोनच हात असतात रामेश्वर लेण्यामध्ये दक्षयज्ञाच्या मंडपात पार्वतीचे येणे, पार्वतीचा अनादर, दक्षाचा शिरच्छेद आणि वीरभद्राने त्याला मेंढ्याचे मुख लावणे, इत्यादि प्रसंगांचे देखावे आहेत एका देवळीत जगदंबेने महिषासुराचा वध केल्याचे चित्र आहे येथील एका देवळात रावण मूर्खासारखा कैलास पर्वत हलवीत बसल्यामुळे त्याचे हे कृत्य किती गाढवपणाचे आहे हे दर्शविण्यासाठी त्याच्या दहा तोंडांपैकी एक तोंड गाढवाचे दाखविले आहे दुसऱ्या एका देवळीत शंकर-पार्वती सारीपाट खेळत आहेत व शिवगण आजूबाजूला असलेले दाखविले आहेत हा खेळ चालू असता खेळावरून दोघांचे भांडण होऊन, शंकर रानात निघून गेल्यावर मग पार्वती भिल्लिणीच्या वेषात जाऊन त्यांना भेटते व परत आणते, या पुराणातील कथेचे, हे चित्र पाहताना आपल्याला स्मरण झाल्याशिवाय राहात नाही मूळ चित्रात डाव देण्याबाबत ह्या दोघांच्यात काहीतरी पेचप्रसंग निर्माण झाला असून पार्वती एक हात पुढे करून ‘ खेळू देणार नाही ’ असा आविर्भाव करीत असल्याचे दाखविले आहे शिल्प आत्यंतिक वास्तव व्हावे यासाठी शिल्पकाराने त्यात तनमनधन अर्पिले आहे हे कोणाच्याही तेव्हाच लक्षात येते

या लेण्याच्या पुढे आदिनाथ, आदिनाथसभा, पारसनाथ, जगरनाथसभा, व इंद्रसभा या नावाची पाच लेणी आहेत पारसनाथ गुहेमध्ये बुद्धाच्या मूर्तीजवळ भेंड्या, उंदिर, सर्प, विंचू दाखविले आहेत उपद्रवी अथवा निरुपद्रवी प्राणी त्याला इजा करू शकत नाहीत, हे दाखविण्याचाच शिल्पकाराचा प्रयत्न असावा या ठिकाणी एका पडवीत इंद्र व इंद्राणी यांच्या मूर्ति अनुक्रमे हत्ती व वाघावर बसलेल्या आहेत त्यांच्या मस्तकावर वृक्षछाया असून यावर पक्षी बसलेला दाखविला आहे जगरनाथसभा गुहेमध्ये भवानीची म्हणजे भागश्री भवानीची मूर्ति दोन ठिकाणी आहे एके ठिकाणी तिच्या हातात आरसा व फुले आहेत तर दुसऱ्या ठिकाणी तिच्या बाजूस वाद्य आहे इंद्रसभा लेणे ६१'×४८' फूट असून एका पडवीत इंद्राची मूर्ती आहे म्हणूनच त्याला इंद्रसभालेणे हे नाव मिळाले आहे नावावरून वाटतो तसा सभेचा देखावा ह्या ठिकाणी मुळीच नाही सर्व लेण्यातील खांबावरील शिल्पापेक्षा येथील खांबावरील शिल्प अतिशय प्रेक्षणीय आहे कैलास लेण्यातील शिल्पाच्या खालोखाल येथील शिल्पाचा क्रम लागतो, इतके ते सुंदर आहे कैलास लेण्याशी याचे बरेचसे साम्य आहे या लेण्यासमोर कैलासासारखेच एक चिमुकले लेणे खोदण्याचा प्रयत्न केलेला आढळतो परंतु या लेण्याला पायऱ्या नाहीत हे लेणे इतके चिमुकले आहे की, ह्याच्यापेक्षा मूळ कैलास लेणे बाराशे पटीने मोठे आहे

इतर लेण्यांचा थोडक्यात परामर्ष घेतल्यावर आता कैलास लेण्याकडे आपण आपला मोर्चा वळवू वेरूळ येथील लेण्याची अखिल विश्वात जी ख्याति पसरलेली आहे, ती केवळ या कैलास लेण्यामुळेच होय या लेण्याशिवाय इतर लेणी डोंगराच्या पोटात कोरलेली आहेत तर कैलास लेणे डोंगराच्या पोटातून खोदून तयार केले आहे या लेण्याचा दगड पक्का काळा गुळगुळीत असल्यामुळे शिल्पाला आपोआपच सौंदर्य प्राप्त झाले आहे या लेण्याचे इत्थंभूत वर्णन करणे सर्वथा अशक्यच तरी देखील माझ्या कुवतीप्रमाणे खालील संक्षिप्त वर्णन मी करीत आहे

दक्षिण भारतामधील पट्टाडकल येथील विरूपाक्ष मंदिराच्या बांधणीचा छाप येथील कैलास लेण्यावर पडलेली आढळून येते राष्ट्रकूट वंशाने ३००×१७५ ×१०० फुटाचा खड्डा खोदून त्यामध्ये हे लेणे उभारले आहे यामध्ये मुख्य मंदिर, नंदीगृह, प्रवेशद्वार आणि बाजूला मूर्तींचे ओपे या सर्वांचा समावेश होतो

मुख्य कैलासमंदिर १६५ फूट लांब, १०९ फूट रुंद आणि १०० फूट उंच आहे भोवतालच्या खुल्या जागेमुळे तर त्याच्या विशालतेत भरच पडलेली आहे ही मोकळी जागा २५० फूट लांब आणि १५० फूट रुंद आहे मध्यभागी

असलेल्या देवाल्याभोंवती त्याच्याच आकाराची आणखी पाच देवालये आहेत. समोर नंदीची घुमटी २० × २० × ५० फुटाची असून प्रवेशमार्गी नगारखान्याची जागा आहे. देवालयाची रेखांकित द्वारें, खिडक्या, जिने हे सर्व प्रमाणबद्ध आहेत. आतील अंगास विशाल दालने कोरलेली असून त्यातील जमीन गुळगुळीत बनविलेली आहे. दालनात जागी मलेमोठे खांब असून त्यावर सुंदर नक्षीकाम आहे. मोकळ्या जागेच्या पलीकडे खडकांत तीन बाजूस भल्यामोठ्या ओवऱ्या खोदलेल्या आहेत. पुराणातील निरनिराळ्या कथा घेऊन त्यांचे काही देखावे व मूर्ति येथे चित्रित केलेल्या आहेत. ओवऱ्याची तीन बाजूंची लांबी ४२० फूट आहे, रुंदी १२ फूट आहे व उंची सुमारे २० फूट आहे. असे हे भव्य नि चितकेत्र प्रेक्षणीय खोदकाम आहे.

प्रवेशद्वारातून आत गेल्यावर आपल्याला प्रथमतः दिसते ती गजलक्ष्मीची मूर्ति. ही मूर्ति कमलासनावर अधिष्ठित असून बाजूला उभे असलेले हत्ती सोंडेतून तिच्यावर पाण्याचा अभिषेक करीत आहेत, असा देखावा आहे. मूर्ति मांडी घालून बसलेली व नग्न असल्याने बौद्धमूर्तांशी तिचे साधर्म्य दाखविण्याचा प्रयत्न शिल्पकाराने केलेला आहे किंवा काय अशी आपल्याला शंका येते बहुधा तोच हेतु असावा. विश्वजननी असल्याने या प्रकारच्या देवता बॅबिलोनियन, इजिप्शियन, ग्रीक, रोमन संस्कृतींतही प्राचीन काळी होत्या असा इतिहास दाखला देतो. पुढे महाद्वारी दोन प्रचंड मोठे हत्ति आहेत. कैलासमंदिराचा गाभारा ७० × ६२ × १७ फूट असून त्याला १६ खांब आहेत. सभामंडपात शिरण्यासाठी पाच द्वारे आहेत. गाभाऱ्याच्या द्वारपाळ स्त्रिया आहेत. सभामंडपाच्या छतावर लक्ष्मीनारायण खोदलेले आहेत.

उत्तम आणि बोलत्या चित्राचे साधारणतः एक वैशिष्ट्य असते की, पाहाणाराने ते कोणत्याही बाजूने पाहिले, तरी त्या शिल्पातील मूर्तीची नजर पाहाणाराकडे असते. छतावरील शिल्पात हे विशिष्ट्य आढळून येते. बाजूलाच असलेल्या ओवऱ्यातील शिल्पामध्ये महाभारत व रामायण यातील प्रसंग चित्रित केलेले आहेत. कैलास हे देऊळ २५ फूट उंच पायावर आधारित असून हत्ती, वाघ, शरभ यांच्या पाठीवर कोरलेले आहे. म्हणजे त्यांची मुखे फक्त बाहेर दिसतात आणि इतर भाग मंदिराखाली गेलेला आहे. ओळीने ही जनावरे व त्यांची मुखे पाहिली, की अतिशयच आनंद होतो. मंदिर कळसाची सुमारे ९६ फूट उंची आहे

भोलानाथ शंकराना प्रसन्न करून घेण्यासाठी एका ठिकाणी रावणाने

आपली ९ शिरकमळे उतरून शिवलिंगाभोवती त्याची प्रभावळ रचिली आहे, तेव्हा पुढच्या चित्रात पार्वती शिवाला विचारते, 'प्रसन्न होणार काय नाथ? काय देणार आहात?' त्याच्या पुढील चित्रात शंकर सांगतात की, 'रावण आत्मलिंग मागत आहे आणि मी ते त्याला देणार आहे.' हे वचन ऐकून पार्वती म्लानवदन उभी आहे. एका ठिकाणी शंकरानी आपला त्रिशूळ रक्तबिंदू दैत्याच्या पोटात खोचला असून त्याच्या शरीरातून गळणाऱ्या रक्तबिंदूपासून अधिक दैत्यांची उत्पत्ति होऊ नये म्हणून गळणारे ते बिंदु कपालामध्ये धरलेले आहेत आणि इतकेही करून त्यातील काही खाली वाहिल्यास कालिकादेवी ते वरच्यावर चाटून टाकीत आहे.

शंकरानी रावणाची तपश्चर्या पाहून आपली पत्नी पार्वती त्याला दान केली पुढे विष्णूने तिला सोडविले. ती कैलासाला गेली आणि शिवप्राप्तीसाठी तिने लिंगार्चन सुरू केले. तरी शंकर तिचा स्वीकार करीनात. ते तिच्याकडे पाठ फिरवून बसले. कारण रावणासारख्या परपुरुषाचा स्पर्श तिच्या देहाला होऊन ती विटाळली गेली आहे, हे शिवाना ठाऊक होते पार्वती शिवाजवळ जाण्याचा प्रयत्न करीत असता शंकर कैलासावरून खाली उडी टाकण्याच्या बेतात आहेत व त्या कामी पार्वती त्याना प्रतिबंध करीत आहे, तर खालील बाजूस नंदी ते दृश्य जणू एखादे प्रणयदृश्यच आहे, या दृष्टीने त्या दोघाकडे मिस्कील नजरेने पाहात आहे, या व अशा अनेक प्रसंगाची चित्रणे तेथे आहेत. पुढे एका देवळीत शरीर व मन शुद्ध होण्यासाठी पार्वती वेदपठण ऐकत असून नतर वेदश्रुतिमुळे ती पवित्र व शुद्ध झाली आहे, या भावनेने शंकरानी तिचा स्वीकार करून तिला आपल्या बाहुपाशात घेऊन कुरवाळीत आहेत, असे दृश्य आहे. पूर्वेकडील एका देवळीत शिव पार्वतीच्या हातावर टाळी देत आहेत आणि खाली उभे राहून ब्रह्मदेव ते दृश्य पाहात आहेत असा देखावा आहे. ह्याचा गर्भितार्थ असा की, इत पर कोणीही कितीही घोर तपश्चर्या केली तरी तुला मी त्याला दान करणार नाही असे शंकर पार्वतीला वचन देत आहेत, नि या त्याच्या कराराला जणू ब्रह्मदेव साक्षीच आहेत. पुढील देवळीत शिवशंकर रथारूढ असून ब्रह्मदेव त्यांचे सारथ्य करीत आहेत व ही जोडी त्रिपुरवधास्तव निघाली आहे, असा देखावा आहे. शिवाच्या हातात त्रिशूळ व डमरू आहे. त्याच्याबरोबर त्यांची अर्धांगी पार्वती ही सुद्धा असून श्रीशंभूने आपला डावा हात तिच्या खांद्यावर ठेवला आहे, असे दृश्य आहे. रावणाने सर्व देव बंदीवासात टाकले हे दाखविण्यासाठी काही चित्रात ब्रह्मदेव शृंखलाबद्ध, शिवाची दुर्दशा उडालेली व विष्णु कारावासाचे दु ख भोगीत आहेत, इत्यादि अनेक देखावे चित्रित केले आहेत शिवाचे अष्टभैरव अवतार अनेक चित्रात आहेत व त्यांची नावे कालभैरव, क्रोधभैरव,

चडभैरव, प्रचडभैरव, रूरूभैरव, उन्मत्तभैरव, असहारभैरव व सहारभैरव अशी आहेत दक्षिणेकडील देवळीत अर्धनारीनटेश्वर मूर्ति, दशावतारापैकी हिरण्यकश्यपू-अवतार, शेषशायी भगवान, कृष्णावतार, वामनावतार, कालियामर्दन, इद्रजित-वध, अन्नपूर्णेची मूर्ति इत्यादींचे चित्रण आढळते पुढे एके ठिकाणी सप्त-मातृका असून त्याच्यापैकी प्रत्येकीजवळ एकएक मूल आहे त्याच्या शिरोभागी गणपति आहे. मूर्तीखाली प्रत्येकीचे वाहनही खोदलेले आहे.

कैलास लेण्यात शिरण्याचा जो मार्ग आहे तेथे पूर्वी टोलेजग महाद्वार होते त्याच्यापुढे एक मुसल्मानी बाधणीची इमारत आहे. ती चौकोनी असून तिला डोम आहे या इमारतीच्या दक्षिणेस एक चबुतरा आहे. याचा इतिहास काही लोक असा देतात की, औरगजेब बादशहाने या लेण्याची नासधूस केली, अनेक मूर्ति छिन्नविच्छिन्न केल्या. त्यामुळे त्याच्यावर ईश्वरी प्रकोपाचे सकट ओढ-वले. त्यामुळेच त्याची प्रिय पत्नी मृत्युमुखी पडली. तेव्हा शकराचा राग शात व्हावा यासाठी त्याने डोमाची खोली बाधली. पुढे काही दिवसानी लगेच त्याचा मुलगा वारला त्या वेळी त्याने चबुतरा बनविला आणि त्यानतर लगेच त्याचा आवडता घोडा वारल्यावर त्याने दरवाजा बनविला परतु तरीही शिवशभो शात झाले नाहीत आणि त्याचा परिणाम म्हणूनच की काय काही दिवसानी औरगजेब स्वत च पैगबरवासी झाला

पृथ्वीच्या पाठीवर जे काही अनेक चमत्कार आणि आश्चर्ये आहेत त्यापैकी कैलासलेणे हे एक आहे. येथे दिसून येणारी विशाल व भव्य शिल्पे, आश्चर्यकारक कल्पकता, विलक्षण हस्तलाघव हे सर्व पाहून हे शिल्प बनविणाऱ्याना शतश , नव्हे कोटी कोटी धन्यवाद दिले तरी ते अपुरेच पडतील ज्यानी हे भव्य शिल्प खोदले त्याच्या बुद्धिसामर्थ्याची व कार्यक्षमतेची कमाल दिसून येते. हे स्वरूपसुदर लेणे पाहिल्यानतर आपल्याही तोंडातून शब्द बाहेर पडतात, 'खरोखर, एकदाच जन्मा यावे नि एकदाच हे शिल्प पाहून परलोका जावे !' सच्चिदानद परब्रह्माप्रमाणे—

हा कलेचा हळूवार शिल्पाचा खजिना वाणीला अगोचर आहे, अवर्णनीय आहे हा शब्दाचा विषय नसून प्रत्यक्षाचा आहे. ब्रह्मसुखाची गोडी वर्णन करताना नेहमी उदाहरण दिले जाते की, मुक्या माणसाने, किंबहुना बोलक्या माणसाने साखर खावी, पण त्याला तिची गोडी मात्र वर्णन करून सागता येऊ नये. अशी अवस्था येथील शिल्प पाहणाऱ्या यात्रिकाची होते, " गीत गाया पत्थरोंने " या उक्तीप्रमाणे येथील दगडाची भाषा व सुदरता समजावयाला सजयाप्रमाणे दिव्य दृष्टीच पाहिजे, अथवा कलाकाराचेच अत करण तेथे घेऊन

जावयास पाहिजे. तास-दोन तासांत घळींच्यामध्ये फिरण्याइतके ते सहजसोपे खात्रीने नव्हे.

कॅप्टन सिली, चार्लस मेलिट, कर्नल फिट्झ क्लॅरेन्स, कर्नल काल इत्यादि भर्मेश परदेशीय संशोधकांनी या लेण्यांसंबंधी धन्योद्गार काढून पुस्तके प्रसिद्ध केली आहेत. शेवटी नेपाळातील एका कवीने म्हटल्याप्रमाणे—

यावच्चंद्रदिवाकरावुदयतो यावन्महीमंडलम् ।
यावत्पर्वतनन्दिनी पशुपतेरुत्संगमालिंगति ॥
यावज्जन्हुकलिन्दयोरपि सुते तावद्धरीवर्तताम् ।
....................एषा यशोवल्लरी ॥

अशी स्थिति जोपर्यंत राहील तोपर्यंत या अप्रतिम शिल्पाच्या किर्तीचा चौघडा दशदिशांत दुमदुमत राहील, यात अजिबात संदेह नाही.

या कैलास-लेण्यासंबंधी आणखी एक लोककथा पाहण्यात आली व ती उद्बोधक वाटल्यावरून तिचा निर्देश करीत आहे.

सोमवंशामध्ये पूर्वी येलू नावाचा राजा झाला. त्याच्या पत्नीचे नाव होते माणकावती. या राजामध्ये असा दोष होता की, रात्रौ पलंगावर झोपला म्हणजे सारे शरीर कृमी-कीटकांनी भरून जाई, पण पहाट झाली म्हणजे पूर्ववत होई. एके दिवशी राजा शिकारीला फिरत असता, तहानेने व्याकूळ झाला, कोठे पाणी दिसेना. शेवटी जमिनीवर उठलेल्या गाईच्या खुरांत थोडेसे पाणी दिसताच, कसेबसे थोडे पाणी हात-पाय-तोंड धुण्यास लावले, पण तेवढ्यात ते संपल्याने पिण्यास मिळाले नाही. पण तेवढ्या पाण्याने काय चमत्कार केला, त्या रात्री कृमी-कीटक हात-पाय-तोंड यांवर आले नाहीत, इतर भागांवर आले. माणकावतीच्या तीक्ष्ण नजरेतून हा फरक सुटला नाही. शिकारीच्या स्थळाची सूक्ष्म माहिती घेत घेत गाईच्या खुरांतील पाण्याचे स्थळ तिने निश्चित केले.

राजा व राणी त्या विवक्षित स्थळी पोहोचल्यावर, त्या पावलाच्या क्षेत्रांत विपुल पाणी मिळण्याचा संभव असल्याने, जागा खोदावयास सुरवात झाली. आठव्या दिवशी कातळ फुटताच पाण्याचा प्रचंड स्रोत वर फेकला गेला व राजा-राणीला सचैल स्नान झाले. त्या पाण्याचा परिणाम असा झाला की, त्या रात्री राजाच्या अंगावर कृमी-कीटक आले नाहीत. राणीला मनोमन खात्री झाली की, ही सर्व महादेव शंकराचीच कृपा होय. यामुळे ती आपल्या पतीला म्हणाली, ‘महादेवांनी आपल्याला व्याधीतून मुक्त केले आहे, तेव्हा

त्यांचे दर्शन प्रजेला घडावे म्हणून पाणी लागलेल्या ठिकाणी एक शिवालय बांधले जावे. त्या कळसाचे दर्शन झाले म्हणजेच मी अन्नपाणी ग्रहण करीन, तोपावेतो व्रतस्थ राहीन.'

अनेक कुशल कारागिरांना बोलावून, अनेक माणसांना कामावर लावून, जातीने स्वतः देखरेख करून शक्य तेवढ्या लवकर मंदिर बांधण्याचा राजाने आटोकाट प्रयत्न चालविला. माणकावतीची निष्ठा पाहून शंकरांनीच सहाय्यास जाण्याचे ठरवून एका दक्षिणेकडील शिलावटाच्या वेषात राजाची भेट घेतली आणि सात दिवसात कळस बांधून पूर्ण करण्याचे आश्वासन दिले. सुमारे ५० सहकारी त्याजबरोबर होतेच. राजाला त्या शिलावटाच्या (कोकू त्याचे नाव) कार्याबद्दल संशय होता, तरी त्याने मान्यता दिली. त्या शिलावटाने राजाला अट एवढीच घातली की, जवळच डोंगरावर तो हे मंदिर तयार करील, पण सात दिवस त्या बाजूला कोणीही फिरकता कामा नये. त्यांना पुरेसा शिधा मात्र पाठवून द्यावा. राजाने त्याची अट मान्य केली, कारण कारागीर माणसे स्वभावाने काही वेळा निश्चितपणे वागतात याची त्याला जाणीव होती.

कोकूची युक्ति अगदी साधी होती. जवळ एका टेकडीचा पूर्वाभिमुख कडा त्याने निश्चित केला आणि वरपासून कळस खोदण्यास आपल्या पन्नास सहकाऱ्यांसह सुरवात केली. याप्रमाणे आठ दिवसांत कळस तयार झाला आणि इतर मंदिरशिल्पाची रूपरेषा खोदून तयार करून दिली. मुदतीच्या आत मंदिर कळस तयार झाल्याचे पाहून राजाला परम कौतुक वाटले. राजाला तो म्हणाला, 'महाराज, आपल्याला मंदिर आवडले ना? आम्ही खोदून मुख्य भाग तयार केलेला आहे, इतर काम सवडीनुसार करून घ्या आणि लिंग स्थापना करा.'

मंदिर तयार झाल्याचे वर्तमान राणी व इतर नगरवासियाना समजताच सर्वांची तिकडे रीघ लागली. पण शिल्पकार त्यापूर्वीच तेथून निघून गेलेला होता. राणीने सर्वत्र शोध घेतला पण व्यर्थ. शेवटी एका अनुचराने राणीला सांगितले, 'थोड्या वेळापूर्वी कोकू मला टेकडीच्या खाली भेटला होता. तो म्हणाला मंदिराचे काम झाले. आता शिवरात्रीच्या आधी काशिविश्वेश्वराच्या ठिकाणी मला पोहोचलेच पाहिजे, माझी माणसे पुढे गेली आहेत. असे म्हणून उत्तर दिशेकडे झपाझप पावले टाकीत तो निघून गेला.' राणीच्या नेत्रांतून अश्रुधारा वाहू लागल्या. तिची दृढ भावना झाली की, तिच्या व्रताची पूर्तता करण्यासाठी साक्षात् शंकर महादेव कोकूच्या रूपाने येथे आले आणि मंदिराचे काम पुरे करून दिले. येळू राजानेही मोठ्या आनंदाने सर्व श्रेय राणीला दिले आणि म्हणाला, 'माणकावती, ही सारी तुझी पुण्याई चिरस्थायी झाली.'

कोकूने बांधलेले मंदिर तेच कैलासलेणे होय, असे वेरूळचे लेणी दाखविणारे मार्गदर्शकही सांगतात. येळू नावावरून पुढे येळूर-वेरूळ असे नाव रूढ झाले. ज्या ठिकाणी खडकातून पाणी वर आले तेथे घृष्णेश्वर मंदिर आहे. यातील दंतकथेच्या भागावरून एवढे निश्चितपणे म्हणता येईल की, कुशल कारागिराने सात दिवसात मंदिर कळस आणि स्थूलदर्शन घडविणे अशक्य नाही.

( सद्धर्म त्रैमासिक, जुलै १९६७ कर्नाटक हाऊस, मुंबई २ )

## वेरूळ येथेच अनेक देवमूर्ती का ?

यासंबंधी अशी कथा प्रचलित आहे की, स्वर्गातील देवांना एकदा असे वाटले की, भूतलावर जाऊन भरपूर क्रीडा करावी, म्हणून ब्रह्मदेवाजवळ त्यांनी अनुज्ञा मागितली. ब्रह्मदेवाने त्यांना फक्त एक रात्र राहण्याची परवानगी दिली आणि मुदतीत परत येण्यास सांगितले. पण देव क्रीडेमध्ये रममाण झाले व त्यांना वेळेचे भान राहिले नाही. सूर्योदय झाल्याबरोबर देवांनी आज्ञेचा भंग केला म्हणून ते त्वरितच पाषाणरूप झाले आणि वेरूळ येथे स्थायिक झाले.

दुसरी एक लोककथा अशी की, शुभतुंग कृष्णराज याने नेपाळच्या राजकन्ये बरोबर विवाह केल्यावर ती दक्षिणेत पतीगृही राहण्यास आली. एके दिवशी कैलासदर्शनाचा हट्ट तिने आपल्या पतिराजाजवळ धरला. राजाचा नाईलाज झाला आणि एका रात्रीमध्ये त्याने भव्य कैलासलेणे कैलास शिल्पासह तयार केले व राणीला दर्शन घडविले.

अजिंठा येथील एकूण २९ गुहा एक ते सातव्या शतकापर्यंत तयार झाल्या आणि या सर्व गुहात बौद्धधर्मीय शिल्प असल्याने वर्णन करणे विषयास अनुसरून होणार नाही. गुहा क्रमांक १६ मध्ये छतावर जे रंगीत शिल्पकाम केलेले आहे, त्यासाठी या गुहा जास्त प्रसिद्ध आहेत. यावनी संस्कृतीकडून केले गेलेले विध्वंसनाचे कार्य येथेही केले गेल्यामुळे अनेक मूर्तींचे निरनिराळे अवयव तोडले गेलेले आढळतात.

महाराष्ट्रामध्ये कल्याणजवळ अंबरनाथ येथील शंकराचे मंदिर शिल्पाबद्दल अतिशय प्रसिद्ध आहे. हेमाडपंती बांधणीचे हे मंदिर अकराव्या शतकातील असावे. अनेक देवतांचे चित्रण मंदिराच्या शिखरावर असून त्रिमूर्ती, ( ब्रह्मा, विष्णु, महेश ) यांच्या मांडीवर आदिमाया पार्वती बसलेली आहे. यांच्या वरील भागी श्रीमर्दिनीदेवीची मूर्ति आहे. देवीचा शरीरयष्टि बारीक असून तिचे स्तन खाली लोंबणारे आहेत. तिने गळ्यात नररुंडाची माळ घातलेली असून तिच्या गळ्या

भोवती व कमरेभोवती सर्प गुंडाळलेले आहेत. भिंतीवर एकूण साठ चित्रे असून त्यांपैकी अनेक शिल्पे शिवपार्वतीस्वरूप आहेत. शिलाहार राजवटीतील हा बांध-कामाचा नमुना उत्कृष्ट म्हणून गणला जातो.

पुणे शहरापासून २६ मैलांवर भुलेश्वराच्या डोंगरांच्या रांगेत ७०० फूट उंचीवर यवतेश्वर नावाचे ठिकाण आहे. मंदिराची आकृति आयताकृति अथवा तारकासदृश्य आहे. मूळ शिल्पकाम १३ व्या शतकातील असावे, तर बाहेरील बाजूची सजावट १८ व्या शतकातील असावी. मूळ मंदिराच्या सभोवार ओवऱ्या बांधलेल्या असून त्यांमध्ये देवताकृति बसविलेल्या आहेत. मुख्य सभागृहाभोवती, उंच कट्टा असून त्यावर अनेक युद्धप्रसंग, सिंह, हत्ती इ० वन्य पशूंच्या आकृत्या आणि रामायण–महाभारतकालीन दृश्ये खोदलेली आहेत. दक्षिण दरवाज्या-जवळील रामायणकालीन प्रसंगात भरत-शत्रुघ्न यांच्या मूर्तींच्या बाजूला दोन चौवशिंडाले उंट दाखविले आहेत. भारतीय शिल्पामध्ये उंटाकृति विशेष कोठे आढळत नाहीत, त्यामुळे या ठिकाणचे हे वैशिष्ट्य मनन करण्यासारखे आहे. म्हैसूर प्रांती सोमनाथच्या केशव मंदिरात, तसेच गुजराथ प्रांती व राजस्थान-मधील १३–१४ व्या शतकातील काही कलाकृतींमध्ये उंटाकृति आढळतात. अर्थात राजस्थानात वालुकामय प्रदेशात उंटाचा उपयोग होत असेल, पण दक्षिण प्रांती उंटाकृति असे सुचवितात की, अरब व्यापाऱ्यांबरोबर त्या येथे आल्या असाव्यात.

उत्तर दरवाज्याच्या डाव्या बाजूस द्रौपदी-स्वयंवराचा महाभारतकालीन देखावा आहे. त्यामध्ये मध्यभागी सुवर्ण मत्स्य खाली जलपात्रात पाहून भेद करणारा अर्जुन, भग्न झालेले धनुष्य, वरमाला घेऊन उभी असलेली द्रौपदी आणि जवळच तिचा बंधू, धृष्टद्युम्न, ब्राह्मणवेशात दोन पांडवपुत्र दाखविले आहेत. तसेच श्रीकृष्ण, बळराम, सांब हे यादव वीर उभे असून, द्रौपदीच्या सख्या तिच्या मस्तकावर पवित्र सुगंधी जलाचे सिंचन करीत आहेत. नर्तकींचे नृत्यही अशा मंगल प्रसंगी चालू आहे, असे सुंदर शिल्प या ठिकाणी पहावयास मिळते. पण इतर लेण्याप्रमाणे येथे इतर संस्कृति धर्मांधांनी काही मूर्ति विद्रूप केलेल्या आहेत. (प्र. ल. सासवडकर, केसरी, दि. ११–२–१९६४)

तिसऱ्या–चवथ्या शतकामध्ये शैव लोकांनी तयार केलेल्या मुंबईजवळील घारापुरी येथील लेणी प्रसिद्ध आहेत. परंतु पोर्तुगीज लोकांनी त्यांची अतिशय मोडतोड केली आणि अश्वशाला म्हणूनही तिचा उपयोग केला. त्या ठिकाणी शिवपार्वती विवाहाचे शिल्प अतिशय प्रेक्षणीय आहे. वेरूळ लेण्यातील शिल्पा-प्रमाणे साधारणतः ते कोरलेले आहे. शंकराचा डावा हात व उजवा पाय मोडलेला

आहे. दोन्ही मूर्ति अदाजे ८ ते ९ फूट उचीच्या आहेत. पार्वतीची आकृति शिवापेक्षा लहान आहे शकराच्या गळ्यात जानवे आहे. त्याच्या मस्तकावर जटाभार असून उजव्या हातावर उपरणे आहे. कमरेला पट्टा व त्याची गाठ उजव्या बाजूस मारलेली आहे. पार्वतीच्या कानात मोठीमोठी कर्णकुंडले आहेत. मस्तकावरील केशकलाप गाठ मारून घट्ट बाधला असला तरी त्यातून सुटून काही बटा भुरभुर उडत आहेत. गळ्यात गोंडेदार हार असून उरोभाग अलकारानी झाकलेला तर कमरेखालील भाग शेल्याने झाकलेला आहे. नवरी मुलगी विवाहप्रसंगी ज्याप्रमाणे लाजत लाजत वरापुढे बोहल्यावर उभी राहते, तशीच लज्जायुक्त मुद्रा पार्वतीची दाखविली आहे. पार्वतीच्या पाठीमागे तिचा पिता हिमालय, आपली विशाल छाती पुढे काढून उभा राहिला आहे. त्याने उजव्या हातात पुष्पमाला धरली असून डावा हात पार्वतीला धीर देण्यासाठी तिच्या खाद्यावर ठेवलेला आहे. शिवाच्या बाजूला ब्रह्मदेव पौरोहित्य करण्यासाठी उभे आहेत. त्याच्यामागे महाविष्णु उभे असून त्याच्या डोक्यावर मुकुट आहे, त्याच्या एका हातात सुदर्शनचक्र दिसते, तर इतर हात तुटलेले असल्यामुळे त्या हातातील आयुधे कळून येत नाहीत. त्याच्या बाजूला पार्वतीची माता मैनावती उभी आहे.

पार्वतीच्या मागे डाव्या बाजूस एक दासी तिच्या शेल्याची टोके धरून तो सावरीत उभी आहे. तिच्यामागे मस्तकावर टोप ठेवलेले चद्रदेव हातात गोल कलश घेऊन उभे आहेत. जणू या विवाह प्रसगी पाहुण्याना देण्यासाठी म्हणून कलशात अमृत घेऊनच ते उभे आहेत! शिवाच्या पार्श्वभागी देखील अशाच पाचसहा मूर्ति असून बहुधा त्या ऋषीमुनि अथवा शिवदूत वा भृगी असावेत. या देखाव्याच्या वर (उतभागी) पऱ्याच्या आकृति असून जणु त्या पुष्पवृष्टि करण्यासाठीच तेथे असाव्यात असे वाटते. या विवाह शिल्पाकृतीला 'कल्याण सुदर मूर्ति' असेही नाव देतात. कारण शकरानी मदनाचे दहन केल्यानतर हा विवाह केला, म्हणून शिल्पकारानी हे नामाभिधान दिले.

या शिल्पाचे खुलासेवार वर्णन करण्याचे इतकेच कारण की, कोणताही शिल्पकार एखादे शिल्प खोदताना किती बारीकसारीक तपशीलाचा सूक्ष्म विचार करीत असेल ते वाचकाच्या ध्यानी यावे.

मुबईजवळ जोगेश्वरी या गावी एक मोठी गुहा आहे आणि या गुहेच्या नावावरूनच त्या गावाला जोगेश्वरी हे नाव पडले आहे. ही गुहा घारापुरीप्रमाणेच आठव्या शतकात तयार झालेली असावी. याचाच अर्थ शिवशिल्प असलेली ही गुहा वेरुळ येथील कैलास लेण्याच्या समकालीन आहे. या ठिकाणी ९० चौरस फुटाचा सभामंडप असून बाजूच्या भिंतीवर शिवपार्वतीच्या आकृति आहेत. या

आकृत्यामध्ये शिवपार्वती विवाहाची मुद्रा एक आकृति आहे. हे गुहेचे ठिकाण काही प्रसंगी राजधानीचे ठिकाण म्हणूनही वापरण्यात आले आहे.

मद्रास प्रांतामध्ये पक्षीतीर्थ या नावाचे एक प्रसिद्ध तीर्थ आहे. त्या क्षेत्रापासून नऊ मैल अंतरावर महाबलीपुरम् येथे गुहांचा समूह आहे पल्लव राजाच्या वेळी याचे खोदकाम झाले असे मानले जाते. वेरूळप्रमाणेच येथील गुहांचा पसारा चार मैलापर्यंत पसरलेला आहे. येथील खाऱ्या हवामानामुळे गुहांची थोडी खराबी झालेली असली तरी कोरीव शिल्प अद्याप प्रेक्षणीयच आहे. येथील शिल्पाचे वैशिष्ट्य असे की, येथे द्रौपदी, अर्जुन, भीम, धर्मराज यांच्या मूर्ति व गुहा[1] आहेत. त्याचप्रमाणे अनेक गुहांमध्ये द्राक्षाच्या घडाप्रमाणे ठिकठिकाणी वानरसमूह कोरलेले आहेत. एका गुहेत दुर्गादेवी आणि सप्त-मातृकांच्या मूर्ति आहेत. या गुहेपासून एक मैल अंतरावर एका गुहेमध्ये शिव-पार्वतीमूर्ति, अष्टभुजा महिषासुरमर्दिनी आणि ११ फूट उंचीची विष्णूची मूर्ति आहे.

## कोणार्क

ओरिसा प्रदेशात भुवनेश्वरपासून ५० मैल आणि जगन्नाथपुरीपासून २० मैलावर हे स्थान आहे गंग वंशातील राजा नृसिंहदेव याने या मंदिराची उभारणी इ. स. १२७८ साली केली १२०० कारागीर सतत १६ वर्षे याची निर्मिति करण्यात गुंतलेले होते. सुमारे ३६ कोट रुपये एकुण खर्च आला असे ऐने अकबरीत म्हटले आहे. कोणी म्हणतात हे मंदिर ९ व्या शतकातील असून नृसिंहदेव यांनी नवीन रचना केली. आज या भव्य कलाकृतीचे भग्नावशेष पहावयास मिळतात त्यावर वीज पडली दुसरे मत त्याचा पाया कच्चा म्हणून कोलमडले तिसरे मत काळापहाड नावाने सुल्तानाने त्याचा विध्वंस केला.

आज जो सभामंडप उभा आहे त्याची लांबीरुंदी १०० फूट असून उंची १३० फूट आहे. याची रचना शिखरपद्धतीची नसून एकावर एक ठेवलेल्या पायऱ्याप्रमाणे असून क्रमाक्रमाने आकार वर निमुळता होत गेलेला

---

१ टीप—या क्षेत्राप्रमाणे दक्षिणेत अनेक पांडवांची शिल्पे पाहाण्यात येतात बंगलोरमध्ये द्रौपदी आदिशक्तीचा मोठा सोहळा होता पण महाभारत काळात पांडव प्रत्यक्ष या भागात आल्याचे वर्णन मिळत नाही तेव्हा पांडव शिल्पाचे या भागात इतके प्राबल्य कसे झाले, याचा सयुक्तिक विचार झाला पाहिजे राजसूय यज्ञाच्या वेळी सहदेवाने दक्षिणेत दिग्विजय मिळाल्याचा उल्लेख मात्र मिळतो

आहे. त्यावरील रचना तीन उच्च उंच टप्प्याची असून प्रत्येकावर मानवी मूर्तीचे सुंदर चित्रण आहे. तसेच काही अप्सरा वाद्य वाजवीत असलेल्या दाखविलेल्या आहेत. प्रांगणात सूर्यपत्नी संज्ञा हिचे मंदिर होते. पण आजमितीला ते नाही.

या मंदिराची रचना अशी कल्पिलेली आहे की, सभामंडप व गाभारा मिळून एक भव्य रथाची मांडणी आहे. उत्तर आणि दक्षिणेला बारा बारा मोठी चाके असून पूर्वेकडे सात अश्व आकृति आहेत. याचा आशय असा की, सात घोडे म्हणजे सूर्याचे सात वार होत. रथाची २४ चाके म्हणजे वर्षातील २४ पक्ष अथवा १२ महिने आणि १२ राशी होते. चाकाचे ८ आरे हे दिवसातील आठ प्रहराचे प्रतीक होय. या चक्रावर अत्यंत कुसरीचे काम असून, त्यामध्ये मानवांच्या आणि पशूच्या आकृतीचे चित्रण आहे. या सूर्यमंदिराचे शिखर २२७ फूट उंच असून, त्याच्या कळसाच्या पाषाणाचे वजन ५६ मण आहे. प्रांगणाभोवती विस्तीर्ण तट असून पूर्व महाद्वारावर दोन विक्राळ सिंह हत्तीवर झेप घेत असल्याचे चित्रण आहे. उत्तरेकडील द्वारी दोन प्रचंड गजराज उभे आहेत. या सर्वांवरील कलाकुसर अत्यंत नाजुक अशी आहे. मंदिराचे सभामंडपावर व इतर उध्वस्त अवशेषावर असंख्य प्रकारची भिन्न भिन्न चित्रे कोरलेली आहेत. राजदरबाराचे दृश्य, चतुरंग सैन्य, युद्धप्रसंग, ऋषीमुनींची योगसाधना, भक्ताकडून देवताचे पूजन, प्रेम-युगुलाचे मीलन, मृगयेचा देखावा इ० इ० अनेक प्रसंग आहेत. रामायण, महाभारत व पुराणे यातील प्रसंगही चित्रित केलेले विखुरलेले आहेत. ओरिसा प्रांतीय मूर्तिकला व स्थापत्यकला यांचा परमोच्च विकास येथील शिल्पात झालेला दिसतो. यात्रिकाचे हे फार आवडते ठिकाण असून शिल्पकला पाहण्यासाठीच ते येत असतात आणि भग्नशिल्पाबरोबर उभे असलेले शिल्प पाहूनही ते क्षणभर देहभान विसरतात, असा अनेकांना अनुभव आहे.

(भा. सा. को. २।५६३)

## भारतामधील मुसलमानी शिल्प

दिल्ली येथील कुवत-उल्-इस्लाम या मशिदीने या शिल्पाची सुरुवात प्रथम भारतात झाली असे मानण्यात येते व तो काळ सन ११९९ चा असावा. याच्या शिल्पातील प्रमुख भाग म्हणजे भव्य घुमट व कमानी असे साधारणतः म्हणता येईल. या संस्कृतीचे शिल्प म्हणजे राजाची थडगी व मशिदी या स्वरूपात जास्त आढळते. भव्य राजप्रासादही क्वचित् भर घालतात. यांचे प्राथमिक मशिद शिल्प म्हणजे हिंदु मंदिरे नष्ट केल्यावर त्याच सामानानून उभारलेले शिल्प होय.

Temples were dismantled and their stones were rearranged with some skill to form elements of mosques ( John Terry )

यातील काही शिल्प इराणी शिल्पाची नक्कल असल्याने प्रथमतः ती हिंदु कारागिरांना पूर्णपणे जमेना, कारण वंशपरपरागत शिल्पशास्त्राप्रमाणे काम करण्यात ते सराईत होते. भारतीय मंदिराचे कळस लहानसर असत. पण मशिदीमध्ये अनेक भक्तांचा समावेश म्हणून त्यांचे घुमट भव्य बांधण्यात येत असत. दिल्ली, मुलतान, लखनौ या गावी या प्रकारचे शिल्प दिसून येते. इराणी शिल्पाची प्रतिकृति याचे उदाहरणे म्हणून ताजमहालाचेच देता येईल. सन १४०४ मध्ये समरकंद येथे तैमूरलंगाचे थडगे बांधण्यात आले आणि तीच नक्कल म्हणजे राणीचे खरे थडगे खालील भागात आणि दुसरे दर्शनीय थडगे त्याचे वरील भागात दिसून येते. हुमायून बादशहाने दीड लक्ष रुपये या तैमूरच्या थडग्यासाठी पाठविले होते. यावरून या गोष्टीस पुष्टीच मिळते. तसेच जहांगिरचा सासरा इतमुद्दौला हा इराणी असल्याने याचे थडगे बांधताना इराणी पद्धतीप्रमाणे दर्शनी भाग संगमरवरी पाषाणाचा व आतील बाजूस रंगीत पाषाण वापरला आहे. इतर देशावेही इराणी पद्धतीचेच आहेत. अकबर-शहाजहानचा काळ म्हणजे या शिल्पाचा अत्यंत भरभराटीचा मानला जातो.

पण या कलापूर्ण भव्य शिल्पाचा परिणाम राजखजिन्यावर झाला आणि औरंगजेबाच्या कारकीर्दीत याचे प्रमाण खूपच कमी झाले. याशिवाय औरंगजेबच्या दक्षिणेकडील सततच्या स्वाऱ्याची भर पडली, म्हणून या शिल्पाची प्रगति थंडावली. औरंगाबाद येथील 'बिबिका मकबरा, लाहोर मशिद' एवढयाच त्याच्या कलाकृति दिसतात.

दिल्ली येथील अष्टकोनी मशिद, लाल किल्ला आणि आग्रा येथील अनेक कलाकृति या प्रेक्षणीय आहेत आणि विदेशी प्रवासी त्या पाहाण्यासाठी सतत भेट देत असतात. The charm of Indo-Islamic Architecture by Sir John Terry, Published in London 1935, या ग्रंथात इस्लामी शिल्पासंबंधी बराच उहापोह चित्रासह केलेला आहे. वाचकांनी तो मूळ ग्रंथातून पहावा.

शिल्पामधील देवता हे प्रकरण संपविण्यापूर्वी दक्षिण भारतामधील काही मंदिर-शिल्पाचा उल्लेख व्हावयास पाहिजे. या मंदिराचे वैशिष्ट्य म्हणजे उंच कलापूर्ण गोपुरे होत. 'पुरद्वारं तु गोपुरम्'. नगरद्वाराला गोपूर म्हणावे, परंतु द्रविड शिल्पाचा हा विशेष होय की, मंदिरासभोवार संरक्षणात्मक भव्य तट उभारून प्रवेशद्वारावर गोपुरे उभारावयाची त्याला अनेक मजले असून अनेक देव-देवतांच्या शिल्पाने बाह्यभाग भरपूर भरलेला असतो. खालील पायाचे दोन

मजले दगडी पण सरळ बांधणीचे आणि वरचे मजले विटांचे पण क्रमाने लहान लहान होत गेलेले असतात. अगदी वरच्या माळ्याची रुंदी, तळाच्या अर्ध्याने असते. यातील बांधकाम चौरस नसून प्रवेशद्वाराला समांतर बाजू जास्त लांब आणि उजव्या-डाव्या बाजू अरुंद असतात. यामुळे शेवटचे छप्पर गोल न होता लंबायमान होते, समांतरभुज चौकोनाप्रमाणे होते. शिरोभागाला नंदीच्या शिंगा प्रमाणे शिंगाकृति असणे हे शैव मंदिराचे वैशिष्ट्य होय. मानसार ग्रंथामध्ये गोपुराचे निरनिराळे प्रकार वर्णन केलेले आहेत. त्यामध्ये सातपासून सोळा मजल्यापर्यंत गोपुरे असावीत असे वर्णन आहे. शिल्पाचा आकार, घुमटांचा आकार, पडव्या, मनोरे यांच्या भिन्नतेमुळे या गोपुराचे श्रीभोग, श्रीविशाल, विष्णुकान्त, चंद्रकान्त इ० इ० दहा प्रकार वर्णन केलेले आढळतात. प्रत्येक मजल्यावर कंगोरे कसे असावेत आणि कोणकोणत्या देव देवतांचे शिल्प असावे यांचेही वर्णन लिहून ठेवलेले आहे.

दक्षिण भारतामध्ये मंदिर शिखरापेक्षा गोपुरेच जास्त उंच असतात मदुरा येथील मीनाक्षी मंदिराला नऊ गोपुरे आहेत. चिदंबरम् येथील गोपूर इ. स. १२५० च्या सुमारास तयार झाले. त्याची तळाची लांबी रुंदी ९०×६० फूट असून दोन माळ्यांची उंची ३५ फूट आहे, तर वरील पाच माळ्यांची १०० फूट, मिळून १३५ आहे. तंजावर येथील बृहदीश्वर मंदिर चोलवंशीय राजा राजराज याने स. १०१० मध्ये बांधले. द्रविडीयन शिल्पाचा उत्कृष्ट नमुना म्हणून या मंदिराकडे बोट दाखविले जाते. भारतामधील भव्यतम मंदिरा मध्ये याची गणना होते. याला दोन प्रांगणे आहेत. आतील प्रांगणात गर्भागृह, अर्धमंडप, महामंडप, स्यानमंडप, नृत्यमंडप, वाद्यमंडप असे अनेक मंडप आहेत. गर्भागृह सुमारे ५० फूट उंच असून, त्यावर विमान १९० फूट उंचीचे आहे, आणि त्याला १३ मजले आहेत. या स्थानाचे अधिक वैशिष्ट्य असे की, विमानगृहावर जो कळस बसविला आहे, तो एका प्रचंड पाषाणापासून बनवून बसविला आहे. त्याचे वजन अनेक टन भरेल. असा भव्य पाषाण गोल विमान-शिखरावर कसा नेला असेल, याचे पाहणाराला आश्चर्य वाटते. याचा इतिहास असा सांगतात, की मंदिरापासून चार मैल लांबवर भरणी घालून चढाव तयार करण्यात आला आणि त्यावरून तो भव्य गोल वर चढविण्यात आला. सांप्रतच्या भौतिक तज्ज्ञांना जी कल्पना करता येणार नाही, ती अद्भुतकृति त्या काळी करण्यात आली विमानगृहावर आणि शिखरावर अनेक देव देवतांच्या सुंदर आकृति कोरण्यात आलेल्या आहेत. गर्भागृहात प्रचंड शिवलिंग असून, मुख्य मंदिराच्या बाजूला गणपति, सुब्रह्मण्यम्, बृहन्नायकी, नटराज, चंडिकेश्वर यांची मंदिरे आहेत. मंदिरासमोरील नंदी भव्य असून १२ फूट उंच, २० फूट

लांब आणि ८ फूट रुंद असा आहे. प्रदक्षिणामार्गावर निरनिराळी ३५ उपमंदिरे शिल्पयुक्त अशी आहेत. मंदिरासाठी लागणारे पाषाण अनेक मैलांच्या लांबीवरून आणावे लागले होते. त्या तंजावर शहरात या मंदिराशिवाय आणखी ७४ मंदिरे आहेत. शिल्पशास्त्रदृष्ट्या अनेक उत्कृष्ट मंदिरांचा उल्लेख याप्रमाणे करता येईल. उंच गोपुरांचा उपयोग टेहळणी बुरुजाप्रमाणे होत असावा.

कर्नाटक प्रांतीं अहिहोळ येथे काही शिल्पयुक्त गुहा आहेत आणि त्यामध्ये अनेक देवताच्या मूर्ति खोदलेल्या आहेत. या ठिकाणचे वैशिष्ट्य असे की, सप्तमातृकांच्या मूर्तीमध्ये आठ मूर्ति आहेत. पाठभेदामध्ये सप्तमातृका आहेत, हे आपण मातृका प्रकरणात पाहिलेच आहे.

मध्य प्रदेशातील खजुरहो, अबूच्या पहाडावरील दिलवारा मंदिरे इ० इ० ठिकाणच्या शिल्पाचे व देवताचे वर्णन या ग्रंथात अन्यत्र येऊन गेले असल्याने त्याची द्विरुक्ति येथे टाळली आहे. आदिशक्तीचा शिल्पकलेतील संचार दर्शविणे हा हेतु साधण्यासाठी या प्रकरणाची मांडणी करण्यात आली आहे.

वृत्त-रसना

घारापुरीस जातां, ती भव्य लेणीं पाही।
शिव-पार्वती-विवाह दावित त्याच ठायीं॥
मूर्ती अमाप उंच खडकांत खोदिलेल्या।
अत्यंत तज्ञ शिल्प-कारांनी खोदिलेल्या॥
दक्षिण बाजू नवरी बसवीत ते वराच्या।
सौभाग्यलेणीं देह, मिरवीत ती विधीच्या॥
देवो गुरुहि ब्रह्मा, स्थानी पुरोहिताच्या।
हिमवान पिता वधूचा कर दे करां शिवाच्या॥
वधु पार्श्वभागीं चंद्र आणि सख्या उभ्याहि।
वधुचा अमोल शेला, उचलीत त्या त्वरेही॥
साम्राज्ञीरूप भासे वधुपार्वती सलीला।
फिरवुनी स्वैर चवरी, दावीत वैभवाला॥
शिवपार्वती विवाह दावीत अन्य ठायीं।
वेरूळक्षेत्रीं आहे, जोगेश्वरी तसाही॥

आधारभूत ग्रंथ


( १ ) Thana District Gazetteer.
( २ ) Aurangabad District Gazetteer
( ३ ) The Khandesh District Gazetteer.
( ४ ) Comprehensive History of India by K. A. Nilkantha Shastri
( ५ ) A Short History of the Ancient World by Charles E. Smith & Paul Moorehead.
( ६ ) An Outline History of the World by H. A. Davis
( ७ ) Myths & Rituals in Ancient Near East by E O. James
( ८ ) The Myths of Mexico & Peru by Lewis Spence
( ९ ) वेरूळची लेणी—लेखक श्री. त्र्यंबक गंगाधर धनेश्वर.
(१०) गोरखपूर कल्याण क्षेत्र अंक १९५७.
(११) केसरी–पुणे-मुंबई, दिनाक ६।५।१९६२, गोरक्ष देगलूरकर लेख.
(१२) भारतीय सस्कृति कोश–प. महादेवशास्त्री जोशी.
इत्यादि इत्यादि.

# व्रतदेवता

अथातो व्रतमीमांसाः प्रजापतिः ह कर्माणि ससृजे
......तस्मात् एकमेव व्रतं चरेत्। प्राण्यात् चैव अपान्याश्च
......तेनो एतस्यै देवतायै सायुज्यं सालोकता जयति॥

( बृहदारण्यक उपनिषद्, पंचमब्राह्मण )

प्रजापतीने मानवाला पच कर्मेंद्रिये उत्पन्न केल्यावर, ती एकमेकाबरोबर स्पर्धा करू लागली. वाणी म्हणाली, 'मी सतत बोलतच राहीन', डोळे म्हणाले, 'मी सतत पाहतच राहीन', कान म्हणाले, 'आम्ही सतत ऐकतच राहू', याप्रमाणे प्रत्येकाने व्रत घेतले. शेवटी त्याना समजून आले की, मानवी जीवनातील प्राण हाच सर्वश्रेष्ठ आहे आणि इंद्रियाचे अस्तित्व त्याजवर अवलबून आहे. हे समजल्यावर प्रत्येकाने आपले नियमन केले आणि शेवटी सर्वजण प्राणरूप झाली म्हणून त्यानाही प्राण अशी सज्ञा प्राप्त झाली. पण वायु हा प्राणापासून उदय पावून, प्राणातच अस्त पावतो, यास्तव माणसाने एकच व्रत घ्यावे. प्रत्येक श्वास घेताना व बाहेर सोडताना 'मृत्युरूपी पाशापासून माझी सुटका व्हावी' अशी इच्छा करावी. या व्रताला आरभ करून ते पूर्ण करावे. या योगाने माणूस देवतेशी एकरूप होतो व सदैव देवतेजवळच राहतो.

वरील मत्राचा भावार्थ असा की, इंद्रियाला बंधन घालून उपासना केली असता मनुष्य आत्मज्ञानी बनतो, असे ऋषींचे सागणे आहे. आपली कर्मेंद्रियेही प्राणशक्तीच्या बळावर चालतात. मनाचे व्यापार हे प्राणशक्तीचेच एकरूप आहे. यास्तव इंद्रियाना आवर घातला म्हणजे प्राणशक्तीची साठवण होते आणि ती तशी झाली की, मनावर ताबा आणणे सहजसुलभ होते. शिवाय प्रत्येक इद्रियाची भोगशक्ति मर्यादित असते आणि ती मर्यादा गाठल्यावर, इद्रिय आपोआप थकून जाते. अशा वेळी आपल्या प्राणशक्तीवर बंधन घालून पुन्हा त्याला योगक्षेम करावे लागते. इद्रियावरील बधने ही विवेकयुक्त व व्यवहार्य असावीत म्हणजे विनाकारण विरोध उत्पन्न होत नाही. उदाहरणार्थ, डोळ्याचे काम पाहणे हे आहे. व्यवहारात अनेक गोष्टी पाहाव्या लागतात आणि त्या पाहत असताना मनावर सहाजिकच परिणाम होतो म्हणून साधकाने आवश्यक तेवढ्याच गोष्टी पाहाव्या व इतर टाळाव्या म्हणजे तेवढी नेत्रशक्ति कमी खर्च होईल. असे केल्याने अध्यात्माची प्रगति होईल. यासाठीच मानवाला व्रतनियम आवश्यक आहेत, असे ऋषींनी प्रतिपादिले आहे.

वेदोक्तेन प्रकारेण कृच्छ्रचान्द्रायणादिभि ।
शरीरशोषणा यत् तत् तप इत्युच्यते बुधै ॥ ( देवलस्मृति )

देवल स्मृतिकाराचे म्हणणे आहे की, वेदोक्त मार्गांनी शरीरशोषण करणे आणि उपवास व व्रत याच्या नियमाचे योग्य पालन करणे म्हणजेच तप करणे होय असे ज्ञाते लोक म्हणतात

देवताची माहिती गोळा करून तिचे सकलन करावयाचे ठरले आणि मग विषयाला निरनिराळे फाटे फुटू लागले वृक्ष लावताना त्याच्या मोठेपणाची कल्पना लावणा याला प्रारभी येतेच असे नाही परतु तो एकदा का वाढीस लागला म्हणजे मग त्याच्या खाद्याचा विस्तार होतो मूळ गाभा जरी सरळ वाढत असला तरी आजूबाजूला शाखा वाढत जातात आणि मूळ वृक्षाची शोभा त्या अधिकच वाढवितात ह्या ग्रथरूपी वृक्षाची व्रतदेवता हे प्रकरण ही अशीच एक शाखा आहे ह्या शाखेची माहिती गोळा करताना एक प्रधान हेतु मनामध्ये होता, तो हा की, व्रताचे मूळ वाचकाना द्यावे पण बव्हशी तो हेतु पूर्ण झालेला नाही असे मोठ्या खेदाने म्हणावे लागते हेमाद्रीचा चतुर्वर्गचिंतामणी, रणधीरव्रतसग्रह, महामहोपाध्याय पा वा काणे ह्याची धर्मसूत्रे, आर्यांच्या सणाचा इतिहास, व्रत और त्योहार, व्रतपरिचय, धर्मसिधु आणि पुराणग्रथ इत्यादि अनेक ग्रथातून माहिती मिळविण्याचा प्रयत्न करूनही मूळ हेतु सफल झालला नाही आणि शास्त्रीपडिताबद्दल तर काहीहि न बोललेच बरे ! हे प्रकरण लिहिण्यात वर म्हटल्याप्रमाणे मूलत हेतु असा होता की, सावित्रीव्रताची उत्पत्ति ज्याप्रमाणे सत्यवानसावित्री कथेवरून उपलब्ध आहे, त्याप्रमाणे काही प्रमुख व्रताची माहिती देता आली तर वाचकाना काही उपयुक्त माहिती दिल्याचा आनद उपभोगता आला असता परतु, ह्याबाबतीत कोणीही समाधानकारक माहिती न देऊ शकल्याने ‘ दुधाची तहान ताकावर भागवावी ’ या न्यायाने जेवढी माहिती हाती आली तेवढीच देण्याचा प्रामाणिक प्रयत्न केलेला आहे आज ज्या व्रतकथा उपलब्ध आहेत त्यामध्ये बहुश व्रते कोणत्या तिथीस करावीत, कोणत्या प्रकार करावीत आणि त्याचा कथाभाग एवढीच माहिती दिलेली असते

देवी भागवत ग्रथामध्ये ( अध्याय सातवा पृष्ठ अठ्ठोतिसावे ) देवीची व्रते कोणती व ती कशी करावीत, याबद्दल ऊहापोह केलेला आहे देवी स्वमुखाने सागते, ‘ व्रते स्त्री पुरुष या दोघानीही करावीत मगळवार शुक्रवार, प्रदोष व चतुर्दशी या दिवशी देवींची व्रते करावीत तसेच सोमवार, चैत्र आणि आश्विन नवरात्र हाही देवीची व्रते आचरण्याचा काल होय निरुक्तामध्ये व्रतक्रमाची माहिती दिलेली आहे श्रीदत्तात्रयानी अभिष्ट कर्मफळ प्राप्तीसाठी काही व्रतसंकल्प

सांगितले आहेत. त्याशिवाय पुण्यप्राप्तीसाठी आणि इच्छित फलप्राप्तीसाठीही अनेक ऋषिवर्यांनी व्रते आणि उपवास सांगितले आहेत.

या व्रताचे अनेक प्रकार सांगितले आहेत. कायिक, वाचिक, मानसिक, नित्यनैमित्तिक, काम्य, एकभुक्त, अयाचित, मितभुक्, चान्द्रायण, प्रजापत्य इत्यादि. व्रते आणि उपवास यामध्ये किंचितसा फरक आहे. तो असा की, व्रताचरणामध्ये भोजन करण्यास अनुज्ञा असते, तर उपवास हा निराहार करावा लागतो नक्त व्रतप्रकारात भोजन रात्रीच्या वेळी करावयाचे असते, तर अयाचितामध्ये मागितल्याशिवाय जे मिळेल, ते एकदाच खाऊन रहावयाचे असते. मितभुक व्रत आचरताना प्रत्यही दहा घास अगर आगऊ ठरवून घेतलेले प्रमाणशीर अन्न ग्रहण करावयाचे असते. चंद्रलोकप्राप्तीसाठी अगर पापक्षालनास्तव चांद्रायणव्रत आचरतात. ह्या व्रताचे पालन करताना चंद्राच्या कला ज्याप्रमाणे प्रतिपदेपासून पौर्णिमेपर्यंत वाढत जातात त्याप्रमाणे अन्नाचा एक एक घास वाढवीत जायचे आणि आमावस्येपर्यंत तो उतरत्या श्रेणीने कमी करत यायचे व शेवटी पूर्ण निराहार करावयाचा, याला यवमध्य चांद्रायणव्रत असे म्हणतात. हेच व्रत परंतु ते आचरताना प्रतिपदेला चौदा घास आणि क्रमाने उतरत गेल्यास त्या व्रताला पिपिलीकातनु चांद्रायणव्रत असे म्हणतात.

व्रताधिकारी कोण असतो हे सांगणारा स्कंदपुराणातील हा श्लोक पहा—

> निजवर्णाश्रमाचार निरतः शुद्धमानस ।
> अलुब्ध सत्यवादी च सर्वभूतहिते रत ॥

जो आपल्या विहित वर्णाश्रमधर्मानुसार आपले आचार विचार आचरीत असतो, जो निष्कपटी निर्लोभी, सत्यवादी, सर्व प्राणिमात्राचे हित चिंतणारा, वेदानुयायी आणि एखाद्या गोष्टीचा प्रथमत मनात निश्चय पक्का करून नंतर त्याप्रमाणेच आचरण करणारा असतो, असाच मनुष्य व्रताधिकारी होऊ शकतो. मग तो ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य किंवा क्षुद्र कोणत्याही वर्णाचा असो असे जरी असले तरी सौभाग्यवती सुहासिनींना मात्र 'पतिसेवा' हेच व्रत विहित आहे. हे व्रत भक्तिभावाने व मन पूर्वक आचरल्यानंतर त्यांनी यज्ञ, उपोषण अगर दुसऱ्या कोणत्याही व्रताचा वसा घेतला नाही तरी काहीही बिघडत नाही !

> नास्ति स्त्रीणां पृथग् यज्ञो न व्रतं नाप्युपोषणम् ।
> भर्तृशुश्रुषयैवैता लोकानिष्टान् व्रजन्ति हि ॥ (स्कंदपुराण)

पतिरूपी परमेश्वराची सेवा केल्यानेच स्त्रियाना त्याचे इच्छित फळ मिळत असल्याने व स्वर्गप्राप्ति होत असल्याने इतर व्रताची त्याना मुळीच आवश्यकता नाही. इतके असूनही जर त्याना व्रते आचरावयाचीच असतील तर त्यासाठी पतीची पूर्ण पूर्वसमति आवश्यक आहे, अशी धर्माज्ञा आहे.

कोणत्याही व्रताला सुरवात करताना ते व्रत आचरणाऱ्याने प्रथम शौचस्नानादि नित्यकर्म आटोपल्यावर मुडन केले पाहिजे. दुपारी एक वेळ आहार करून एकभुक्त रहावे दुसऱ्या दिवशी प्रात समयी उठून नित्यकर्म आटोपून आपली मनीषा व्रतदेवतेला निवेदन करून मग व्रतारभ करावा गणपति, मातृका याचे पूजन करून नादीश्राद्ध करावे व्रतदेवतेची सुवर्णमयी मूर्ति बनवून पचोपचार, दशोपचार अथवा षोडशोपचार या द्वारे तिचे पूजन करावे. व्रताची पूर्णता झाल्यावर उद्यापन करणे आवश्यक आहे नाही तर एरव्ही ते व्रत निष्फळ ठरते

कुर्यादुद्यापन चैव समाप्तौ यदुदीरितम् ।
उद्यापन विना यत्तु तद्व्रतं निष्फल भवेत् ॥ ( नदीपुराण )

व्रताचरण करणाऱ्याला अनेक बधने पाळावी लागतात. काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर या षड्रिपूवर विजय मिळवावा लागतो वारवार जलपान करणे, दिवसा झोप घेणे, विडाताबूल खाणे, स्त्रीसहवास करणे, चोरी करणे इत्यादि धर्मनिषिद्ध गोष्टी त्याने कटाक्षाने टाळल्या पाहिजेत तसेच आपली वर्तणूक सदैव क्षमा, दया शाति, प्रेम, इद्रियनिग्रह व देवतापूजन यात रममाण ठेवली पाहिजे पाणी, फळे, दूध, हविरान्न भक्षण करण्याने व्रताचा भग होत नाही तसेच होमवशिष्ट खीर, सातु, यव, भाजीपाला, गाईचे दूध, दही व तूप हे पदार्थ भक्षण करण्यास योग्य होत वर्णाश्रम धर्माप्रमाणे प्रत्येक वर्णाने कोणते कपडे वापरावेत यालाही काही नियम सागितले आहेत ज्याप्रमाणे ब्राह्मणाने पाढऱ्या रगाचे व क्षत्रियाने लाल वर्णाचेच कपडे वापरले पाहिजेत असा नियम आहे ब्राह्मणाने त्रिकच्छ धोतरच नेसले पाहिजे, असे धर्म म्हणतो

त्रिकच्छेन समायुक्तो द्विजोऽसौ मुनिरुच्यते । ( याज्ञवल्क्यस्मृति )

याशिवाय महिना, पक्ष, तिथि, वार, नक्षत्र इत्यादि अनेक गोष्टींचा विचार व्रताचरण करताना करावा लागतो.

वरील त्रोटक विवेचनावरून असे दिसून येईल की, प्राचीन भारतीय धर्ममार्तंडानी आर्यधर्मात व्रताचरण हे अतिशय श्रेष्ठ मानलेले आहे. उदाहरणार्थ, आठव्या वर्षी मुलाचे मौजीबधन होते आणि तो गुरुगृही विद्यार्जनासाठी गेल्यावर तेथे त्याचे व्रताचरण सुरू होते सूर्योदय होताच त्याला त्या सूर्याला अर्घ्यदान

करावे लागते. याचाच अर्थ असा की, ब्राह्ममुहूर्तावर उठून, प्रातर्विधि आटोपून त्याला सूर्योदयाची वाट पाहात बसावे लागते. हे एकच व्रत पाळावयाचे म्हटले, तर त्यामागे प्रत्येक विद्यार्थ्याने पहाटे उठलेच पाहिजे नि आपली नित्यकर्मे झटपट आटोपलीच पाहिजेत असा दंडक आला. ब्रह्मचारी राहून त्याने वयाच्या बारा ते सोळा वर्षांपर्यंत विद्यार्जन केलेच पाहिजे. म्हणजे तेवढ्या काळात त्याचे विद्यार्जन हे एकच ध्येय ठरते. आजच्या काळातील विद्यार्थ्याला हे कितपत शक्य आहे, याबद्दल बराच दाट संशय आहे म्हणा! कारण आजच्या विद्यार्थ्याला सिनेमा-नाटके, छानछोकीपणा, मुग्ध यौवना याच्यापेक्षा इतर काही विशेष प्रिय असेल असे निदान मला तरी वाटत नाही. इतकेच नव्हे तर उत्तरेकडील एका विख्यात विद्यापीठामध्ये तर विद्यार्थी इतके बेफाम वर्तन करीत आहेत की, क्षुल्लक कारणासाठी संप घडविणे, कुलगुरूंच्या गृहाला घेराव घालणे, परीक्षांच्या वेळी पुस्तकाचा सर्रास वापर करणे आणि कोणी पर्यवेक्षकाने याबद्दल तक्रार केली, तर त्याच्यावर हल्ला करणे, परीक्षकाना दमदाटी करून आपल्याला अमूक टक्के गुण मिळालेच पाहिजे, असा सुरीचा धाक दाखवून गुण मिळविणे. इतके निंद्य आणि अश्लाघ्य वर्तन प्रत्यही ते करीत आहेत. विद्यार्थीवर्गाला कलंक लावीत आहेत. असो. पूर्वीच्या विद्यार्थ्यासमोर आजच्या काळातील शहरी जीवनातील प्रत्येक क्षणोक्षणी बुद्धिभेद करणारी चित्रे येत नसल्यामुळे तो एकाग्रमनाने विद्यार्जन करीत असे. मनावर संपूर्ण ताबा मिळवू शकत असे आणि संयमी जीवन कंठू शकत असे. बालपणापासूनच अंगवळणी पडलेल्या या संयमाचा त्याच्या भावी काळात त्याला अतिशय उपयोग होत असे. नित्यनैमित्तिक एकादशी व्रतामध्ये शरीराला आणि पचनेंद्रियाना पूर्ण विसावा मिळून ती अधिक कार्यक्षम होत असतात. सोळा सोमवारचे व्रत अनेक स्त्रिया सायंकाळी खडीसाखरेचा एक चारीकसा खडा ग्रहण करून आचरीत असतात. त्यामुळे त्याना शरीरस्वास्थ्य लाभते. आजकाल ही व्रते पूर्वीइतक्या निग्रहीपणाने आचरली जात नाहीत आणि काहीशा हेटाळणीच्या वृत्तीनेच त्यांच्याकडे पाहिले जाते, ही गोष्ट वेगळी. व्रताच्या आचरणाने, त्याच्या लहानमोठे समारंभाने, जे मानसिक समाधान प्राप्त होत असे, घरामध्ये शांती लाभत असे, त्याचा सांप्रत कोठे मागमूसही लागत नाही. कारण देवाला देणे बंद झाल्याने त्याच्याकडून समाधान-शांतीचे येणेही बंद झाले. नेहमी एकमार्गी व्यवहार सफल होणार नाही. परंतु वर सांगितल्याप्रमाणे व्रतांचे असंख्य फायदे दाखविता येतील. व्रताचे उद्यापन कसे करावे, हे बहुधा प्रत्येक व्रतकथेच्या शेवटी सांगितलेले असते. तसेच अमुक एक व्रत आचरल्यास फलप्राप्ति काय होईल, याचाही त्या त्या कथेच्या शेवटी निर्देश केलेला असतो. व्रताचरणासंबंधी संपूर्ण नियम त्या त्या ग्रंथामध्ये पाहाणे श्रेयस्कर ठरेल.

उद्यापन केल्याविना व्रत सफल होत नाही, हे आपण वर पाहिलेच आहे. उद्यापनाचा सर्वसाधारण विधि असा. जलप्रवाहात अगर जलाशयात यथाविधि स्नान करून लतापल्लवानी सुशोभित केलेल्या मंडपात प्रवेश करावयाचा. त्या ठिकाणी गणपतीपूजन, आचार्यवरण, प्रतिमास्थापना, धान्यराशीवर कलशस्थापना, इत्यादि करून ग्रहवेदीकुंड तयार करावयाचे. रात्रौ दंतकथा, गोष्टी, आख्यायिका इत्यादींचे श्रवण करून जागरण करून दुसऱ्या दिवशी प्रातःकाळी आज्यादि हविर्द्रव्यानी होम व पूर्णाहुति करावयाची. त्यानंतर यजमानावर अभिषेक करून पीठदेवताची उत्तरपूजा करावयाची मग आचार्यपूजा व वायनदान करून ब्राह्मणसुहासिनी आणि दांपत्य यांना भोजन घालून शेवटी अन्नदान करून आप्तेष्टासह भोजन करावयाचे.

ज्या व्रतामध्ये उद्यापन सांगितलेले नाही, त्या ठिकाणी गोप्रदान अथवा सुवर्णदान यांच्या योगे उद्यापन पूर्ण होते, अशी समजूत प्रचलित आहे. ज्या तिथीला व्रताचरण सुरू झाले, त्याच तिथीला उद्यापन करणे, हा उत्तम पक्ष होय. परंतु, अनेक कारणांनी तसे घडू शकत नसल्याने अनेक पर्याय सांगितलेले आहेत, त्यापैकी सोयीचा असेल तो घ्यावा. निदानपक्षी ब्राह्मणाला दक्षिणा देऊन " तुझ्या व्रताची पूर्तता झाली आहे. " असा त्याच्याकडून आशीर्वाद तरी घ्यावा. काही झाले तरी व्रताचे उद्यापन राहू नये एवढे मात्र पक्के ध्यानात असू द्यावे.

देवादिकांची व तिथींची व्रते ज्याप्रमाणे आहेत त्याप्रमाणे व्रताचे दुसरेही अनेक प्रकार आहेत. उदाहरणार्थ, अधिक मास व्रते. सर्वसाधारणपणे वर्षाचे बारा महिने गणले जातात. पण त्यामध्ये भारतीय पंचांगाप्रमाणे काही वेळा वर्धन तर काही वेळा क्षयही होत असतो. बारा राशींच्या बारा संक्रांति आहेत. पण एकादे वेळी असे होते की, संबंध महिन्यात संक्रांतीची तिथि येतच नाही. तेव्हा त्या महिन्यात सूर्य संक्रांत नसल्याने त्याला अधिकमास असे म्हणतात, ' असंक्रांति-मासोऽधिकमासः ' असे ज्योतिषशास्त्राचे वचनच आहे, यालाच ' मलमास ' अथवा " पुरुषोत्तममास " असेही संबोधिले जाते. साधारणतः हा महिना ३२ महिने १६ दिवसांनी येतो.

काही वेळा संक्रांत येत नाही तर काही वेळा एका महिन्यात दोन संक्रांतीही येतात. या महिन्याला क्षयमास असे म्हटले जाते. सुमारे १४१ वर्षांनी हा महिना येतो. ' द्विसंक्रांतिमासः क्षयाख्यः ' असे वचन आहे. अधिक अथवा क्षय मासांमध्ये काही व्रते सांगितली आहेत. त्याविषयी अधिक माहिती भविष्योत्तर पुराण, हेमाद्रि, देवीभागवत, पूजापंकजभास्कर इत्यादि ग्रंथांमध्ये पाहावयास मिळेल. याशिवाय अयनव्रते, पक्षव्रते, वारव्रते, तिथिव्रते वगैरे अनेक प्रकार

आहेतच. मानवाच्या हातून झालेल्या पापांचे क्षालन होण्यासाठी काही प्रायश्चित-व्रतेही सांगितलेली आहेतच.

पुनर्जन्माचे तत्त्व हिंदुधर्मीय मानीत असल्याने पूर्वजन्मी केलेली पापे मानवयोनीतही भोगावी लागतात असे समजले जाते. काही वेळा ही पापे अनेक दुर्घटनांनी भोगावी लागतात, तर काही वेळा एखाद्या दुर्धर रोगाच्या रूपाने भोगावी लागतात. यावरून असे म्हणता येईल की, अनेक वेळा रोगाचे मूळ पूर्वजन्मीच्या अगर चालू काळात घडलेल्या पापात आहे. याचाच अर्थ असा की, पापाचे संपूर्णतः क्षालन झाले म्हणजे असाध्य रोगही पूर्ण बरा होईल. ज्वर, शूळ, सर्दी हे रोग झाले असता विधिपूर्वक प्रायश्चित घेतल्यास बरे होतात.

रोगास्तु दोषवैषम्यं दोषसाम्यमरोगता ।
रोगा दुःखस्य दातारो ज्वरप्रभृतयो हि ते ॥ (वाग्भट, सू. १–२०)

*शरीरात वात, पित्त व कफ हे तीन महादोष आहेत. जोपर्यंत ते समान* असतात, तोपावेतो त्रास होत नाही. परंतु त्यांच्या प्रमाणात विषमता उत्पन्न झाली, की रोगाची उत्पत्ति व्हावयास लागते. ताप वगैरे येणे हा त्यापैकीच एक प्रकार आहे. विष्णुमंत्राने त्याचा परिहार होतो, यासाठी दुसरेही अनेक मंत्र आहेत. याप्रमाणे अतिसार, संग्रहणी, प्लीहा, उदर, कुष्ट, नेत्ररोग, कर्णरोग, गर्भस्राव, उन्माद इत्यादि अनेक रोगांवर व्रताचा उपाय सांगितला आहे. तो त्या मूळ ग्रंथांतच पाहावा (व्रतपरिचय, गीता प्रेस, गोरखपूर). व्रते केल्याने काय फायदे होतात याचे फक्त दिग्दर्शन व्हावे या हेतूने हे त्रोटक विवेचन केलेले आहे.

कोणतेही व्रत घेतले आणि सातत्याने ते पाळले तर ते कसे फलदायी होते याचे एक उदाहरण प्रवचनकारांकडून ऐकण्यात आले, त्याची माहिती देऊन हा विषय आटोपता घेऊ.

पूर्वी पैठण शहरी एक भक्त होऊन गेला. त्याने एवढेच व्रत आचरणात आणले होते की, जो प्राणिमात्र भेटेल त्याला साष्टांग प्रणिपात घालावयाचा. या त्याच्या कृतीमुळे जनसमुदाय चेष्टेने त्याला ‘ दंडवत स्वामी ’ नावाने हाक मारू लागला. एके वेळी रस्त्यावर एक गाढव मरून पडले असता ही स्वारी त्या रस्त्याने जात होती. कुचाळखोरांना ही आयतीच संधी चालून आली. त्याचा फायदा न घेते तरच नवल. त्यांनी स्वामींना गाढव दाखविले आणि दंडवत घालण्यास सांगितले. ‘ निर्वैरः सर्वभूतेषु ’ झालेल्या स्वामींनी पळाचाही विलंब न करता दंडवत घातला. व्रतपालनाने त्यांची आध्यात्मिक श्रेष्ठता किती उच्च कोटीला पोहोचली होती, याचे स्वामीजींनाही ज्ञान नव्हते. तसा योगच

आलेला नव्हता, पण या ठिकाणी तो आला. दंडवत घातल्यावर, काही क्षणातच तो प्राणी सजीव झाला आणि उठून चालू झाला. मग मात्र कुचाळखोरांची तोंडे पाहण्यासारखी झाली.

हे वर्तमान थोड्याच काळात संत एकनाथ महाराजांना समजले. त्यांनी स्वामींना बोलावून घेतले आणि जिवंत समाधी घेण्यास सांगितले. त्यांनी जर तसे केले नाही तर मानवाची प्रेते उठविण्याची जनसमर्द त्यांचेकडे मागणी करील व त्यायोगे यमराजाच्या कारभारात हस्तक्षेप होईल. नाथांचा हा उपदेश स्वामींना पटला आणि त्यांनी समाधी घेतली.

याचा सारांश इतकाच की, कोणतेही व्रत नियमाने व श्रद्धेने आचरणात आणले तर मानव कोणत्या पदवीला पोहचू शकतो, त्याचे हे उत्कृष्ट उदाहरण आहे.

उदाहरणादाखल आपण आता काही प्रमुख व्रतांचा इतिहास पाहू.

विशाल नामे एका नगरीत आल्यावर तेथे विवेक नावाच्या एका ब्राह्मणाच्या आश्रयार्थ राहिले. तेथेच त्यांनी विद्यार्जन केले. एकदा एका आश्विन महिन्यात त्यांनी व्रताची पूजा श्रवण केली. विवेक ब्राह्मणाने आपली गुणवती नावाची सुकन्या श्रीपतीला दिली. काही कालाने ते दोघे भाऊ जन्मगावी आले. चुलत्याने मोठ्या हर्षाने त्यांचे स्वागत केले. काही दिवसांनी त्याने गोपतीचेही लग्न लावून दिले. परंतु गोपति विषयलंपट निघाला आणि त्याने उपांगललिताव्रताचा त्याग केल्याने त्याची अन्नान्नदशा होऊन एक वेळदेखील हातातोंडाची गाठ पडण्याची मारामार होऊ लागली. नित्य नियमपूर्वक व्रत आचरीत असल्यामुळे श्रीपति आनंदात राहात होता व ब्राह्मणभोजने घालीत होता. एके दिवशी गोपति भावाच्या घरी जेवण्यासाठी म्हणून गेला असता तेथे त्याचा अपमान केला गेला. अपमानाने दुःखित झालेला गोपति रानावनात गेला आणि देवीची कृपा संपादन केल्यावरच घरी परतायचे असा त्याने निर्धार केला.

त्यानंतर तो उपांग नगरीत उपांग राजाकडे जाऊन ललितेच्या मंदिरात वस्ती करून राहिला. देवीने दिलेल्या दृष्टांताप्रमाणे राजाकडून त्याने देवीचे प्रतीक म्हणून करंडक ( झाकण ) घेतले. त्यानंतर तो घरी येऊन ललितादेवीचे यथासांग पूजन करू लागला. कालांतराने त्याचे पूर्ववैभव त्याला प्राप्त झाले हे निराळे सांगणे नलगे. याप्रमाणे आपला पूर्वकृत निर्धार त्याने खरा करून दाखविला.

असा हा कथाभाग थोडक्यात सांगितला जातो.

गुजराथ प्रांती हेच व्रत आश्विन शुद्ध षष्ठी म्हणजे एक दिवस उशीरा आचरतात.

ललितापंचमीचे व्रत आश्विन नवरात्राच्या पंचमीलाच आचरतात, त्याचा इतिहास आपल्याला पाहावयास मिळेलच. म्हणजे ही दोन्ही व्रते एकाच तिथीला होतात. फक्त त्यांची नावे मात्र भिन्नभिन्न आहेत. याचे एक कारण असे संभवते की, मुख्य व्रत ज्याला करणे झेपत नसेल त्याने त्याचेच प्रतीक असलेले ' उपांग ' ललिताव्रत, आचरावे. कसेही असले तरी या दोहोंमध्ये सूक्ष्म भेद आहे हे मात्र निश्चित.

पृथ्वी

उपांग ललिता व्रता करि पुरुष स्त्री संगती ।
कथा सुरस वर्णिली वघ पुराणीं स्कंदादिकी ॥
व्रताचरण शुक्ल आश्विनहि पंचमीच्या दिनीं ।
करोनि जन ते सदा वनत लक्ष्मीचा धनी ॥ १ ॥

साकी

गोपति ब्राह्मण लक्ष्मीसाठीं घोर काननीं जाई ।
फिरतां फिरतां गोपाकवुनी, शोध देवीचा घेई ॥
उपांग नगरीं उपांग राजा उपांग–ललिता पूजी ।
गोपति ब्राह्मण तप आचरितां देवी झाली राजी ॥ २ ॥

दिंडी

देवी बोले मग तया ब्राह्मणाला । भेट सत्वरिं तूं उपांगा नृपाला ॥
लाल करंड्याचें माग उपांगाला । घरीं नेवोनि पूजि मग तयाला ॥
उपांगाला घेवोनि घरीं आला । मनोभावाने नित्य पूजी त्याला ॥
नित्यपूजेनें देवी तृप्त झाली । विपुल संपत्ति तया घरीं झाली ॥ ३ ॥

वसंततिलका

देवी कृपाच घडतां जरि हो कुणाला ।
भक्तांस अर्पित उपांग सुखें तयाला ॥
येणेंपरी पुरवि जी धनकाजि सिद्धी ।
वंदी उपांगललिते तुजलाच आधीं ॥

( २ ) एकादशी

भारतीय युद्धानंतर पांडवांच्या हातून गोत्रवधाचे महान पातक घडले. धर्मराजाच्या मनाला मात्र या गोष्टीची सतत टोचणी लागून राहिली होती. त्याचे निराकरण करण्याचा उपाय विचारता, श्रीकृष्णाने पांडवांना एकादशीव्रत करण्यास सांगितले या व्रताची माहिती देताना श्रीकृष्ण म्हणाले, ' प्राचीन काळी कुंभ-दैत्याचा पुत्र मृदुमान्य या नांवाचा होऊन गेला. तपसाधना आचरून त्याने श्रीशंकरांना प्रसन्न करून घेतले आणि त्याच्याकडून अमर होण्याचा वर मागून घेतला. वरप्राप्ति झाल्यावर त्याने पृथ्वीवर अक्षरशः धुमाकूळ मांडला. अमरत्वाचा वर देताना शंकरांनी त्याला एकच अट घातली होती ती अशी, ' मायबापवीण जी उपजेल नारी । ती मृदुमान्या तूंते संहारी । ' मदोन्मत्त झालेल्या ह्या दैत्याने पृथ्वी, कैलास आणि स्वर्ग जिंकून घेतल्याने ब्रह्मा, विष्णु, महेश यांना आपल्या स्त्रिया व इतर देव यांसह त्या जागा खाली कराव्या लागल्या. लपतछपत दिनक्रमणा करीत असतांना एका दाट अरण्यात धात्री ( आवळा ) वृक्षाच्या पोखरीत ते वसून राहिले.

सहाजणे एकांतीं राहिली तेथे । आम्हीं पळावे कवण पंथे ?
आतां भलते हो का येथे । म्हणोनी श्वास घेतला ॥
तव त्या पोसरींमाझारीं । श्वासासरशी जन्मली कुमारी ।
ते निघाली बाहेरी । देवी दृष्टि देखियली ॥

अशारीतीने मायबापाशिवाय जन्म झालेल्या कुमारीला सर्व देवानी विनती केल्यावरून तिने मृदुमान्य दैत्याचा संहार करून देवावरील या अरिष्टाचे निवारण केले या कुमारिकेचा जन्म ज्या दिवशी झाला, ती तिथि एकादशी असल्यामुळे तिचे नाव एकादशीदेवी असे ठेवण्यात येऊन त्याच तिथीला व्रत आचरण्याची प्रथा रूढ झाली हे व्रत आचरणाऱ्यानी दशमीला एकभुक्त रहावे, रात्रौ हरिकथा ऐकावी, एकादशीला निराहार उपवास करावा, गळ्यात तुळशीमाळा घालाव्यात, हरिकीर्तन करून जागरण करणे व द्वादशीस एकभुक्त राहून पारणे करावे असे व्रताचरण आचरल्यास गोत्रवधाचे पातक क्षालन होईल.

( एकादशी महात्म्य, वा. ल. पाठक कंपनी, मुंबई ४ )

या देवीची आणखी एक उत्पत्ति आढळते मूरदैत्य हा तालजंघ दैत्याचा मुलगा होय. तो तपसामर्थ्याने प्रबळ झाल्यावर त्याने देव-मानवाना त्रास देण्याचा सपाटा चालविला विष्णूलाही त्याने सोडले नाही विष्णूच्या पाठीस तो दैत्य लागला असता हिमालय पर्वतावरील सिंहवती नामक गुहेमध्ये श्रीविष्णु जाऊन लपून बसले. त्या ठिकाणी व्यंकटेशानी योगमायेची प्रार्थना करून रक्षण करण्यासाठी तिचे आवाहन केले. योगमायेने एकादशीदेवी उत्पन्न केली व तिच्या हस्ते मूरदैत्याचा नाश करविला. विष्णूना ही हकीकत विदित होताच त्यानी त्या देवीला वरदान दिले की, ' जो कोणी तुझी मनोभावे पूजा करील, त्याच्या सर्व पापाचा समूळ नायनाट होईल.' ( पद्मपुराण, उत्तरखंड ३८ )

व्रतराज या ग्रंथामध्ये या देवीसंबंधी एकूण २८ कथा दिलेल्या आहेत. बहुधा प्रत्येक एकादशीची कथा निरनिराळी आहे. यामुळेच भारतीय पंचांगामध्ये या एकादशींची नावे कामदा, वरुथिनी, मोहिनी, अपरा, निर्जला, योगिनी, शयनी, कामिका, पुत्रदा, अजा, परिवर्तिनी, इंदिरा, विजया, रमा, प्रबोधिनी, उत्पत्ति, मोक्षदा, सफला, षट्‌तिला, जया, आमलकी, पापमोचिनी इत्यादि इत्यादि अशी आढळत असावीत या सर्व कथाना संग्रह ' एकादशी माहात्म्य ' या नावाने श्रीयुत रावजी श्रीधर गोंधळेकर, पुणे ह्यानी सन १८८० साली प्रसिद्ध केलेला आहे. तो जिज्ञासूनी अवश्य पाहावा व्रतासंबंधी ग्रंथ लिहिणाऱ्यानी याच मूळ ग्रंथातून कथा घेतलेल्या असतात आषाढ मासातील पहिल्या एकादशीच्या दिवशी महाविष्णु योगनिद्रेत शिरतात आणि कार्तिक मासातील दुसऱ्या

एकादशीला त्या अवस्थेतून ते बाहेर येतात, यास्तव या दोन तरी एकादशा कराव्यात असे शास्त्रात सांगितले आहे. ( ब्रह्मवैवर्त, अध्याय ४६/१८-३९ )

व्योमगंगा

दैत्यकुंभ पुत्र पाही मृदूमान्य नाम त्याही।
शंकरासी प्रार्थूनिया इष्टप्राप्ती घे वराही ॥
मेरू मोठी शमु राखी, दैत्य ध्यानी आली नाहीं।
बाप-आईवीण जन्म, मृत्यु दे तुला कुमारी ॥

साकी

भारतयुद्धी गोत्रवधाने धर्म दु खिता झाला।
एकादशीव्रत शमविल दु.ख कृष्ण तयाला वदला ॥

ओवी

मृदूमान्य हराच्या वरे। मदोन्मत्त धांवे सैरावैरें ॥
विष्णु-ब्रह्मादिक सुरवरें। झोडपोनी काढिलें ॥
सुरवर पळाले कैलासी। शरण रिघाले नंदीवरासी ॥
परी त्यांना केले अरण्यवासी। मृदुमान्य राक्षसे ॥
सहाजणे एकांतीं राहिलीं तेथे। धात्री वृक्षाच्या पोखरीतें ॥
आतां तरी भलते न हो येथें। म्हणोनी श्वास घेतला ॥
तव त्या पोखरीमाझारीं। श्वासासरशीं जन्मली कुमारी।
शिव–ब्रह्म–मुरारी। पत्नीसहित हर्षले ॥

विद्युन्माला

जन्मा आली वीरा बाला। ब्रह्मानंदी डोले भोळा।
निर्दाळिले मृदुमान्या। भक्तांलागी आजी मान्या ॥

वसंततिलका

एकादशी दिनिंहि जन्म कुमारिकेला।
एकादशी म्हणुनि नामहि देवतेला ॥
एकादशी करी विमुक्तहि साधकाला।
एकादशी हरितसे आद्य पाप माला ॥

## ( ३ ) कोजागरव्रत

आश्विनी नक्षत्रात रवि आला असता, पौर्णिमेच्या शुभ्र चांदण्यात लक्ष्मी भूतलावर उतरते ही कल्पना आर्यांना सुचली असावी. कारण त्या वेळी धान्याची सर्वत्र आबादानी असते. चित्रा नक्षत्रामध्ये सूर्यनारायणाबरोबर विवाह करणारी लक्ष्मी, खाली उतरत उतरत अश्विनींमध्ये येऊन विहार करू लागली म्हणजे ती पृथ्वीवर अवतरली असे मानीत असत. वेदकाळी उत्तरायणाचे आरंभीचे दिनाला पृथ्वी आणि दक्षिणायनाचे दिनाला द्यौ अशी संज्ञा दिलेली आढळते. त्यानंतर ही क्रिया सतत आठ-नऊ शतके घडत गेल्याने, पौर्णिमेला लक्ष्मी भूतलावर अवतरते ही कल्पना समाजात रूढ झाली असावी आणि त्याला व्रताचे स्वरूप आले. ( अ. ज. करंदीकर, कौस्तुभ १९६४ ).

आश्विन पौर्णिमेच्या दिवशी हे व्रत आचरावयाचे असते. लक्ष्मी आणि इंद्र ह्या व्रताच्या देवता होत. तांदुळाच्या राशीवर पद्मासनस्थ लक्ष्मीची आकृति काढून तिचे आवाहन करावयाचे. 'इंद्राय नमः ।' या मंत्राने षोडशोपचारे पूजन करून पुष्पांजली वाहून, श्रीफळ फोडून त्यातील उदक देवतेवर संमार्जन करावयाचे आणि तेच तीर्थ समजून प्राशन करावयाचे

नमस्ते सर्व देवानां वरदाऽसि हरिप्रिये ।
या गतिस्त्वत्प्रपन्नानां सा मे भूयात् त्वदर्चनात् ॥
विचित्रैरवतस्थाय भास्वात्कुलिशपाणये ।
पौलोम्यालिङ्गिताङ्गाय सहस्राक्षाय ते नमः ॥

सर्व देवाना वर देणाऱ्या हरिप्रिये लक्ष्मी, तुला नमस्कार असो. तुझे पूजनाने मला चांगली गति प्राप्त होवो. चित्रविचित्र ऐरावतावर बसलेल्या आणि तेजस्वी वज्र धारण करणाऱ्या इंद्रदेवा, व पौलोमीने आलिंगन दिलेल्या सहस्राक्ष इंद्रदेवा, तुला नमस्कार असो.

रात्रभर जागरण करून द्यूत खेळून, अक्षक्रीडादी करावी. या दिवशी मध्यरात्रीनंतर लक्ष्मीदेवी आपल्या सखींसह भूतलावर हिंडावयास निघून 'को जागर्ति इति' म्हणजे कोण कोण जागरण करीत आहे असा प्रश्न विचारते. जागरण करणाऱ्या भक्ताला ती द्रव्यसंपत्ति देते. या दिवशी पोहे, नारळ, साखर इत्यादि वस्तु एकत्रित करून देवीचा प्रसाद तयार केला जातो. प्रथम देव आणि पितर याना नैवेद्य समर्पण करून मग तो इतराना वाटावयाचा असतो. सांप्रत मात्र या प्रसादाऐवजी दूध, चहा, कॉफी हेच पदार्थ देण्याचा प्रघात रूढ झालेला आहे. उत्तर प्रदेशात या दिवशी असंख्य दीप पाजळले जातात. ( धर्मसिंधु, पृष्ठ १०१ ).

या व्रताची प्रचलित कथा अशी. फार पूर्वी धर्माचरणाने वागणारा मगध देशात वलित या नावाचाच एक विप्र होता. त्याच्या पत्नीचे नाव महाचंडी असे होते. नावाप्रमाणेच ती खरोखरच सदाकलहप्रिय अशीच होती. एकदा ती आपल्या पतीला म्हणाली, 'माझी वडील बहीण सुवर्णालंकारांनी सुशोभित असते. पण मी म्हणजे जणू लंकेची पार्वतीच! अंगावर धड फुटका मणी देखील नाही माझ्या. कसे मी घराबाहेर पडावे आणि चारचौघांत मिसळावे?' याप्रमाणे आपली तक्रार पतीजवळ मांडून आणि त्याची अतिशय निर्भर्त्सना व धिक्कार करून, जोपावेतो आपल्याला सुवर्णालंकार मिळत नाहीत तोपावेतो आपल्या पतीच्या इच्छेविरुद्ध वागण्याचा आपला निश्चय तिने त्याला बोलून दाखविला. अशा परिस्थितीत त्या ब्राह्मणाच्या वडिलांचा श्राद्धदिन आला. तेव्हा आता कसे काय करायचे हा त्याच्यापुढे मोठाच पेच पडला. शेवटी गणपति नावाच्या आपल्या सोनाराकडे जाऊन त्याने त्याचा सल्ला घेतला. त्याला सल्ला देताना गणपति म्हणाला, 'तुझ्या बायकोला नेहमी तुला जे सांगावेसे वाटते त्याच्या उलटे सांग. म्हणजे ती तुझ्या सांगण्याच्या विरुद्ध वर्तन करील आणि पर्यायाने ते तुझ्या पथ्यावर पडेल.'

घरी आल्यावर तो आपल्या बायकोला म्हणाला, 'यदा माझ्याजवळ काहीच पैसे शिल्लक नसल्यामुळे श्राद्ध करावयाचे नाही आणि केलेच तर जुगारी आणि आचारभ्रष्ट ब्राह्मणांना निमंत्रण द्यावयाचे मी ठरविले आहे.' अर्थात् महाचंडीने नेमके त्याच्याविरुद्ध वर्तन करून उत्तम शीलवान ब्राह्मणाच्या हस्ते श्राद्धविधि पार पाडला. वलित ब्राह्मण संतुष्ट झाला आणि अतिशयानंदाच्या भरात मित्राच्या सल्ल्याची त्याला विस्मृति होऊन तो बायकोला म्हणाला, 'ब्राह्मणाची उष्टी पाने समुद्रात टाकणेच बरे' आपल्या निश्चयाप्रमाणे महाचंडी याच्या उलट वागली आणि तिने ती पाने शौचकूपात नेऊन टाकली. या व तिच्या इतर वागणुकीने ब्राह्मण कंटाळून अरण्यात निघून गेला

वल्कले परिधान करून आणि केवळ फलाहार करून तीस दिवस त्याने तपश्चर्या घेऊन लक्ष्मीला प्रसन्न करून घेण्याचा प्रयत्न केला. आश्विन पौर्णिमेचा दिवस उजाडला. त्या रात्री कालिय नागाची कन्या सुलोचना त्या अरण्यात येऊन तिने व्रत करण्यास आरंभ केला पूजाविधि आटोपल्यावर या विप्राला तप करताना तिने पाहिले आणि त्याला द्यूत खेळण्यास पाचारण केले. कौपीन धारण करून ब्राह्मण द्यूत खेळण्यास बसला मध्यरात्र उलटल्यावर लक्ष्मीनारायण त्या स्थळी प्राप्त होऊन लक्ष्मीसाठी कोजागरव्रत आचरणाऱ्या ब्राह्मणाला त्यांनी विपुल द्रव्य दिले. द्यूतामध्ये त्याने ती नागकन्याही जिंकली आणि तिच्यासह तो

आनंदाने घरी आला. त्या दिवसापासून तो नित्यनेमाने कोजागरव्रत आचरू लागला.

ब्रह्मपुराणात या व्रताची कृत्ये थोडी वेगळी सांगितली आहेत. रस्ते झाडावेत, घरे सुशोभित करावीत, दिवसा उपवास करावा, सायंकाळी गृहद्वाराजवळ अग्नि प्रदिप्त करून त्याचे पूजन करावे, चंद्राचे पूजन करावे आणि त्याला दूध व खीर यांचा नैवेद्य समर्पण करावा. ज्याच्या घरी गायी असतील त्यांनी सुरभी, धनगरांनी वरुण, माहुतांनी विनायक व घोडे पाळणारांनी रेवंत-निकुंभ यांचे पूजन करावे ( व्रतराज ).

या व्रताचे पालन करणाराला लक्ष्मी प्रत्यक्ष दर्शन देते, याचे उदाहरण स्वामी रामकृष्ण परमहंस यांचा शिष्य क्षुदिराम व त्याची पत्नी चंद्रादेवी यांचेही देता येईल. त्यांचा पंधरा वर्षांचा मुलगा रामकुमार, भुरसुबो या शेजारच्या गावी कोजागिरीच्या दिवशी लक्ष्मीपूजनासाठी गेला असता, परत येण्याची वेळ टळून गेली. अर्धी रात्र झाली तरी तो आला नाही. साहजिकच माता-पित्यांची चिंता वाढू लागली आणि माता तर वाटेकडे डोळे लावून बसली. इतक्यात भुरसुबो गावाच्या दिशेने त्याच्या घराकडे, नाना अलंकारांनी भूषित झालेली एक रूपसुंदर यौवना येताना मातेला दिसली. ती एकटीच होती, बरोबर पुरुषमाणूस कोणी नसल्याने, तिचे कुतुहल जाग्रत झाले. क्षुदिराम हा कामारपूर गावी रहात होता. ती स्त्री जवळ येताच मातेने अधिरतेनेच विचारले, ‘ तुम्ही भुरसुबोहून आला का ? ’ त्या स्त्रीने उत्तर दिले, ‘ होय, मी भुरसुबोहूनच आले. ज्या घरी तुमचा मुलगा पूजा सांगायला गेला होता त्याच घरातून मी आले आहे. काळजी करू नका, तुमचा मुलगा थोड्या वेळाने सुखरूप परत येईल. ’ ही स्त्री कोण याची माताजींना कल्पना न झाल्याने ती पुन्हा म्हणाली, ‘ बेटा, तुझे वय अगदी लहान दिसते, एवढ्या रात्री अंगावर दागदागिने घालून एकटी कोठे जात आहेस ? रात्रभर माझ्या घरी मुक्काम कर आणि सकाळी पुढील मार्ग धर. ’ ती स्त्री उत्तर देती झाली, ‘ माताजी, तुमचे म्हणणे सयुक्तिकच आहे, पण मला अजून बराच प्रवास करावयाचा आहे आणि तो आजच पूर्ण झाला पाहिजे, तेव्हा मला राहता येत नाही. पण पुन्हा केव्हातरी तुमच्या घरी राहण्यास येईन. ’ इतके बोलून ती स्त्री पुढे मार्ग चालू लागली. माता चंद्रावती तिजकडे पाहातच राहिली. काही अंतर गेल्यावर शेजारी लाहाबाबूचे पुष्कळसे धान्याचे कणगे भरलेले होते, ती त्या रोखाने गेली आणि एकदम अदृश्य झाली.

नंतर आपले पति क्षुदिरामना तिने जागे केले आणि घडलेली सर्व हकिकत सांगताच ते उद्गारले, ‘ तू फार भाग्यवान आहेस, आज कोजागिरीच्या

रात्रौ तुला साक्षात् लक्ष्मीदेवीचे दर्शन झाले.' काही वेळाने मुलगाही परत आला आणि सर्वांना समाधान लाभले. साधारणपणे सन १८३० च्या सुमारास ही हकीकत घडलेली आहे. (जीवनविकास, फेब्रुवारी १९६७)

वसंततिलका

आश्वीन पौर्णिम-दिनिं व्रत आचरावें ।
कोजागिरी प्रथित नाम जनांस ठावें ॥
लक्ष्मी शची पतिस पूजन तें करावें ।
खेळोनि द्यूत मग जागरणा करावें ॥ १ ॥

पद्मासनस्थ यवराशि प्रणीत लक्ष्मी ।
पूजोनि मंत्रविधिनें रमवावि लक्ष्मी ॥
प्राशूनि तें उदक श्री-फळ आधिं थोडें ।
प्रारंभ द्यूत करिजें मग अक्षक्रीडे ॥ २ ॥

हिंडोनि पाहि वरलक्ष्मी सु-मध्य रात्रीं ।
"को जागर्ति" इति विचारित प्रश्न धात्री ॥
अर्पीत द्रव्य जनकीर्ति अशा नराला ।
येणें परी पुरवि कोड व्रताचराला ॥ ३ ॥

शिखरिणी

प्रसादाला पोहे मधुर फळ-श्री आवड तिला ।
म्हणोनी अर्पावें पितर-सुरदेवासह तिला ॥
स्वयें भक्षावेंही हृदयजन बंधूसह सुखें ।
चहा कॉफी दुग्धा मधुर आजि देई कुणि सुखें ॥ ४ ॥

(४) कात्यायनी व्रत

श्रीमत् भागवताच्या दशम स्कंधावर कृष्णदयार्णव ह्यांनी टीकापर श्लोकरचना केलेली आहे. त्यामध्ये ते म्हणतात की, वृंदावनामध्ये गोपींनी या व्रताचे आचरण केलेले होते. कात्यायनी देवीची वालुकामय मूर्ति बनवून मार्गशीर्ष महिना त्यांनी तिचे पूजन केले. या व्रताचा हेतु असा होता की, श्रीकृष्ण त्या सर्वांना पति म्हणून लाभावा. व्रताच्या उद्यापनाच्या वेळी श्रीकृष्ण त्यांना प्रसन्न झाले आणि गोपींची विनंती ऐकल्यावर त्यानुसार त्यांना आपले पत्नीपद देण्याऐवजी त्यांच्याबरोबर रासक्रीडा खेळण्याचे वचन श्रीकृष्णांनी त्या गोपींना दिले.

यामुळेच श्रीकृष्णाची रासक्रीडा हे गोपींचे ऋणविमोचन आहे. त्यामुळे ते दोषार्ह मानता येत नाही. कृष्णदयार्णव म्हणतात,

> कात्यायनी व्रतापूर्वी । जार लांछन कोणी न लावी ।
> देशभाषा वदले कवी । भक्तिभावीं गौरविलो ॥
> कात्यायनी व्रताचरणीं । तोषावला तो चक्रपाणी ।
> रासक्रीडा तद्वरदानीं । उत्तीर्ण ऋणी जाहला ॥

(अध्याय ८, पृष्ठ ३६४–३६५)

याच अध्यायातील श्लोक ३१ वरील टीकेमध्ये ते पुढे लिहितात की, आज ज्याप्रकारे श्रीकृष्ण-गोपींचा कथाभाग रंगविला जातो, त्याप्रमाणे त्याला प्राचीन ग्रंथाधार मिळत नाही.

> जार कर्माची गाऱ्हाणीं । कित्येक वर्णिती गोरस हरिणी ।
> परी हें नाहीं व्यासवाणी । कोणे पुराणीं बोलली ॥ ३६१ ॥
> शुक नारद पराशर । वैखानसादी पंचरात्र ।
> विष्णूरहस्य सनत्कुमार । हा प्रकार न वदले ॥ ३६२ ॥
> अथवा गोपाळ–तापिनी । उपनिषदभागी अथर्वणी ।
> नाहीं दीपिका व्याख्यानीं । केली कथनी भाष्यकारी ॥ ३६३ ॥

याबाबतीत कृष्णोपनिषद् म्हणते.

> वने वृंदावने क्रीडन् गोप-गोपीसुरैः सह ।
> गोप्योभव ऋचस्तस्य, यष्टिका कमलासन ॥ ९ ॥

याचा भावार्थ असा की, गोपी व गायी या वैदिक ऋचा होत. ऋग्वेदातील ऋचासंख्या १०५८०, अधिक उपनिषदमंत्र ११८०, अधिक यजुर्वेदमन्त्रऋचा ४३४८ मिळून एकूण संख्या १६१०८ होते. तेव्हा श्रीकृष्णाच्या सोळा सहस्र नारी त्या, याच संख्येच्या रूपक समजावयास पाहिजे.

सांप्रतच्या काही विद्वानांमध्ये हा विषय नेहमी चर्चिला जातो आणि श्रीकृष्णचरित्रावर अश्लीलतेचा शिक्का मारला जातो, म्हणून याचे थोडेसे अधिक विवेचन करावयाचे योजिले आहे. हेतु असा की, गैरसमजुती दूर व्हाव्यात आणि रूपकातील गूढार्थ प्रकाशात येऊन जनसमुदायाची संशयनिवृत्ति व्हावी.

कृष्णदयार्णव काय म्हणतात, ते आपण वर पाहिलेच आहे. आता याच विषयावर मरहूम डॉ. ॲनी बेझंट काय लिहितात ते पहा. डॉ. ॲनी बेझंट या

जन्माने जरी आंग्लभाषीय विदुषी असल्या तरी भारतीय तत्त्वज्ञानाबद्दल वाटणाऱ्या आत्यंतिक ओढीमुळे त्यांनी अनेक संस्कृत ग्रंथांचे परिशीलन केले असल्याने त्या याबाबतीत अधिकारवाणीने बोलू शकतात, असाच त्यांचा लौकिक आहे त्या म्हणतात

> ' त्या वेळी श्रीकृष्ण म्हणजे सात वर्षांचे बाळ होते ते पोरींबरोबर नाचले काय, बागडले काय अगर आशुक माशुक खेळ खेळले तरी त्यामध्ये काही निंद्य आहे, असे पापी माणसाशिवाय कोणाला भासणार ? तरी बरे, की त्या दूरदर्शी प्रभूला बालपणातच कळून चुकले असावे की, पुढील युगात जन्माला येणारे शहाणे आपणास नावे ठेवतील म्हणूनच की काय, कोण जाणे, ज्ञानहीन व पापी मानवांना इष्ट उपदेश करण्यासाठी रासक्रीडेच्या वेळी तो कुक्कुळे बाळच राहिला, सोळा वर्षांचा बळू झालेला नव्हता '

आजच्या निसाव्या शतकात पाश्चिमात्य शिक्षणपद्धतीमुळे रजोगुणाची छाप विद्वान समजल्या जाणाऱ्या पिढीवर पडण्यापूर्वी व त्यांनी श्रीकृष्णाच्या रासक्रीडेला ' वैषयिक ' म्हणून गटारगंगेत बुचकळून अपवित्र करण्यापूर्वीच भागवतपुराणातील रासलीलेचे वर्णन ऐकून, कोणाही सहृदय मानवाच्या अंतःकरणात कामवासना उभी न राहता भक्तिभाव मात्र वाढीस लागत असे श्रीरामानुजाचार्य व श्रीचैतन्य यांच्यासारख्या ब्रह्मचाऱ्यांना देखील त्या लीलांचे वर्णन मोठ्या भक्तिभावाने ऐकावेसे वाटे आणि ते ऐकल्यावर त्यांच्या आध्यात्मिकप्रेमसागराला भरती येत असे

रासक्रीडेवरील ही वाष्फळ टीका ऐकून डॉ ॲनी बेझंट मोठ्या वैतागाने म्हणतात,

> ' ऋषीजनहो, आपण आजकालच्या असल्या या अपात्रांच्या हाती आपले श्रीमद्भागवत लागू दिलेत, त्यापेक्षा ते लपविलेत का नाही ? एरव्ही तरी तुम्ही बरेचसे वेद व पुराणग्रंथ लपविले आहेतच ना ? श्रीकृष्णप्रभूच्या प्रेमलीला, निंदेवाचून व काम्यदृष्टीवाचून वाचण्याइतपत सांप्रतचे विद्वान पवित्र व निर्मळ मनाचे होईपर्यंत इतर ग्रंथाप्रमाणेच भागवत ग्रंथही दृष्टिआड का केला नाही ? '

सर्वसाधारणपणे असे अनुमान निघते की, सहाव्या शतकापर्यंत गोपी कृष्ण विषयक गीते जरी प्रचारात होती, तरी त्यामध्ये कामीकभावनांचा आभास होता पुराणकारांनी या गीतांचा उपयोग आपल्या लेखनात करून घेऊन भक्तिमार्ग वाढविण्याची वाटचाल केली ' गोप्यस्तु श्रुतयो ज्ञेया । ' असे वाङ्

प्रयोग करून गोपींना श्रुतीसमान मानले आहे. निंबार्काच्या हंससंप्रदायामध्ये रमा अथवा लक्ष्मी ही श्रीकृष्णाची ऐश्वर्यशक्ति, तर गोपीजन ही माधुर्यशक्ति मानलेली आहे. चैतन्य संप्रदायामध्ये गोपी या श्रीकृष्णाच्या ल्हादिनीशक्ति मानल्या आहेत. श्रीकृष्णाप्रमाणे त्यानाही प्रकट आणि अप्रकट शरीर आहे असे ते मानतात. इतर काही संप्रदायानी गोपींना श्रीकृष्णाच्या नित्यप्रिया मानलेल्या असून त्याच्या एकात्मभक्तीचे ते जीवात्मेच होत अशी त्यांची भावना आहे. इतकेच नव्हे तर श्रीकृष्णाच्या परमभक्तानी, श्रीकृष्णाचा चिर-सहवास मिळावा यासाठी अत्यंत दीर्घ साधना करून गोपी देह मिळविला आणि त्याच्या उज्ज्वल रतोपासाठीच त्यांनी जन्म घेतला. वल्लभसांप्रदायी तर असे मानतात की, श्रीकृष्णाच्या आनंदरूप देहातूनच त्याची उत्पत्ति झालेली आहे. सर्वश्रेष्ठ राधा त्या पूर्णानन्दाची सिद्धशक्तीच होय नारद-भक्तिसूत्रामध्ये तर यहारीची कल्पना केलेली आहे. भक्ताची परमेश्वरप्राप्तीची अत्यंत श्रेष्ठ अवस्था म्हणजेच गोपीभाव होय. गोपींचा आदर्श भक्तापुढे ठेविलेला आहे. त्याची लक्षणे सांगितली ती अशी की, श्रीकृष्णाच्या चरणी सर्व संपत्तीचे आणि स्वत चे संपूर्ण समर्पण करणे, क्षणभराच्या वियोगाने व्याकूळ होणे, श्रीकृष्णाच्या सुख दु खात आपले सुख दु ख पाहणे इ०. यासाठीच निस्सीम भक्त श्रीकृष्णप्राप्ती-साठी आपणाला गोपींचा सखीभाव प्राप्त व्हावा म्हणून झटत असतो.

बाराव्या शतकात जयदेवकृत गीतगोविंदमध्ये, 'कामबाणानी जर्जर झालेल्या त्या गोपींनी कशीबशी रात्र घालविली' (गी गो. ८–१) अगर विद्यापतीने वर्णन केल्याप्रमाणे 'रात्री प्रियतम आला, आम्ही दोघे एका शय्येवर झोपलो, पण तो केव्हा गेला कोण जाणे. त्यामुळे चक्रवाक मिथुन वियुक्त झाले.' अशी कामिक वर्णने सुरू झाली.

काही भारतीयाना असे वाटते की, हा कामुक विषय आपल्याच ग्रंथकारानी वर्णन केलेला आहे त्याच्या या समजुतीला काही अज्ञानी ग्रंथकार खतपाणी घालतात हेही विचार सत्य आहे. उदाहरणार्थ, जयदेव, विद्यापतीचे वरील उतारे आणि श्री. राजेंद्रनाथ सेन यानी ब्रह्मवैवर्त पुराणाचे इंग्रजीत भाषांतर करून ते प्रसिद्ध केले आहे, त्यातील हे दोन उतारे पहा—

(1) Narad said, "O Saint, after three months had lapsed, Hari indulged for the first time in the sexual inter cour e with the milk-maids

(Chapter 28/1-11)

(2) Hari, the great spiritual guide of ascetics and thieves of the hearts of the milk-maids wealded several forms again and committed sexual intercourse with the girls. (Chapter 28/100-116)

आजचा चोखदळ म्हणविणारा वाचक वरील वाक्याचा वाच्यार्थ तेवढाच पाहतो आणि श्रीकृष्णचरित्रावर शिंतोडे उडविण्यास धजावतो. लेखकाने ज्याप्रमाणे गुढार्थ शोधण्याचा प्रयत्न केला नाही अगर रूपकात्मक रचना भाषांतर करताना ध्यानी आणली नाही, तद्वतच वाचकही तो शोधण्याच्या फंदात पडत नाही आणि केवळ सवंग प्रसिद्ध मिळविणारा टीकाकार बनतो. पण ही सत्य परिस्थिति नव्हे. ग्रंथाचे सत्यान्वेषणही नव्हे.

देव-भक्ताच्या संबंधाचे वाङ्मय जर आपण त्या दृष्टिकोनातून वाचले तर असे दिसून येईल की, सर्व देशात, सर्वकाळी, सर्व लेखकांनी जीवाची परमात्मगत अत्युत्कंठा दाखविण्यास हीच समस्या जोडलेली आहे. भज्य आणि भजक या दोघातील ऐक्य दाखविण्यासाठी दांपत्यप्रेमाचाच दाखला घेतलेला आहे. कारण बहुजनसमाजाला तो तावडतोब समजतो. याबाबत हिरेंद्रनाथ दत्त आपल्या 'श्रीकृष्ण नामक' ग्रंथाच्या प्रस्तावनेत म्हणतात,

> " गुढज्ञानी सुफी पंथामध्ये स्त्री आणि मदिरा याचे वर्णन आहे. इसाई धर्मातील 'सॉंग ऑफ सॉलोमन' यातील इष्कबाजी व अश्लीलता ही रासक्रीडा वर्णनाच्या पासंगालाही पुरणार नाही. "

पण धर्माविषयी आस्था नसलेले भारतीय टीकाकार या असल्या ग्रंथाचे परिशीलन करणार नाहीत आणि व्यर्थ टीका मात्र करीत राहतील.

कात्यायनी व्रताच्या अनुरोधाने विषयाला सोडून हा थोडासा भाग येथे घेतला याचे कारण इतकेच की, प्राचीन वाङ्मय मूलतः वाचण्याऐवजी कोणा अन्यधर्मीय टीकाकाराच्या टीकाग्रंथाचे मनन करून आपल्या भारतीय ग्रंथावर यथामति टीका करणाऱ्या महाभागाच्या ध्यानात त्या ग्रंथाचे सत्य स्वरूप यावे. मधुराद्वैताचार्य गुलाबराव महाराज हे कात्यायनी व्रत ३३ दिवसाचे करीत असत. स्वतः पुरुषदेही असूनही ते आपणाला ज्ञानेश्वर-कन्या मानीत असल्याने अनेक दिवस स्त्री-वेषातही रहात असत. या व्रतामध्ये गोप-गोपीभावाचे निर्मळ दर्शन भक्तांना घडावे म्हणून श्रद्धेने व्रताचे पालन करून प्रसंगानुसार काव्य निर्मितीही करीत असत आणि रासक्रीडेचे प्रत्यक्ष चित्र उभे करीत. भक्तजन वेडावून जात असत. एकदा त्याचा मुक्काम हरदा येथे असताना सौ. गंगूबाईना दोनतीन दिवसाचा ताप आला. तीन दिवसांनी ताप उतरून

ग्लानीमध्ये असतानाच मधून मधून ती हसू लागली आणि रासक्रीडा जणू पाहातच आहे असे वाटून वर्णन करू लागली. "या महाराज, काय प्रभा आहे! निळी निळी प्रभा दिसते. देवमूर्ति किती साजरी आहे! त्या ठिकाणी महाराज स्त्री-वेषात मला दिसत आहेत. अरे पाहना रे! डोळे असून तुम्ही का पाहात नाही! वेडे सर्व लोक संसारातच गढून राहतात! ही मजा कोणी पाहत नाही. वा, काय छान रासक्रीडा चालली आहे! महाराज त्या समारंभात मिसळून गेले. गोपी उघड्याच आहेत. केशकलाप पाठीवर लोळत आहे. गोपी वस्त्रे मागत आहेत. देव कदंबाच्या झाडावर वस्त्रे घेऊन गेले आहेत. त्या गाणे म्हणत आहेत. 'नदजी ने लाल देवो मेरे कपडे' प्रकाशाचा झगझगाट आहे! देवाची मूर्ति साजरी गोजरी आहे. यावलीत[1] तुम्ही देवाना बांधीत होता. आता पहा बरे देवाचा कसा थाट आहे! देवाकडे पाहण्याची कोणाची छाती नाही. देवाचे पदकमल किती सुंदर आहेत! कोमल आहेत, पायात वाकी घुगरूही आहेत. व्यंकटेशस्तोत्रात सांगितल्याप्रमाणे देवाचे नाभीकमल वक्षःस्थल चमकत आहे. कानात कुंडले लखलख करीत आहेत. देव सावळे हसतमुख असून गोडगोड बासरी वाजवीत आहेत. या महाराज या!" (गुलाबराव महाराज चरित्र, ले. मिलिंद, पृ. ३२३-२४)

## (५) गजगौरी

या व्रताला हस्तागौरी असेही एक नाव आहे. रणवीरव्रतरत्नाकरमधील हा भाग पहा,

कैलासशिखरे देवीं हस्तर्क्षे च दिवाकरौ ।
दिवा प्रसुप्ता गौरी तु हरसान्निधियागता ।।
सा सप्तदेवदेवेशं स्वप्ने शंभुं ददर्श ह ।
अश्वदेहवृषार्द्धस्थमर्धं चन्द्रकलाधरं ।।
किमिदं तन्मम चक्ष्व तप्यते मानसं मम ।
ईश्वर उवाच— देवि पूर्वे च सुप्ताऽसि हस्तऋक्षगते रवौ ।। इ० इ०

ईश्वर म्हणाले, हस्त नक्षत्रामध्ये सूर्य ज्या दिवशी शिरतो त्या दिवशी या व्रतास आरंभ करावा. तसेच गौरी, हेरंब व शंकर यांच्या सुवर्णाच्या प्रतिमा तयार करून कांचनाच्या फुलानी त्यांचे पूजन करावे. याप्रमाणे तेरा दिवस पूजन झाल्यावर चौदाव्या दिवशी सुस्नात होऊन शुभ्रवस्त्र परिधान करून पंच-पक्वान्नाचा नैवेद्य दाखवून त्या प्रतिमा ब्राह्मणाना दान कराव्यात आणि असा

१. टीप— यावली एका गावाचे नाव आहे.

(2) Hari, the great spiritual guide of ascetics and thieves of the hearts of the milk maids welded several forms again and committed sexual intercourse with the girls
(Chapter 28/100 116)

आजचा चोखदळ म्हणविणारा वाचक वरील वाक्याचा वाच्यार्थ तेवढाच पाहतो आणि श्रीकृष्णचरित्रावर शितोडे उडविण्यास धजावतो लेखकाने ज्याप्रमाणे गुढार्थ शोधण्याचा प्रयत्न केला नाही अगर रूपकात्मक रचना भाषांतर करताना ध्यानी आणली नाही, तद्वतच वाचकही तो शोधण्याच्या फंदात पडत नाही आणि केवळ स्वस्त प्रसिद्ध मिळविणारा टीकाकार बनतो पण ही सत्य परिस्थिति नव्हे ग्रथाच सत्यान्वेषणही नव्हे

देव भक्ताच्या संबधाचे वाङ्मय जर आपण त्या दृष्टिकोनातून वाचले तर असे दिसून येईल की, सर्व देशात, सर्वकाळी, सर्व लेखकानी जीवाची परमात्मगत अत्युत्कठा दाखविण्यास हीच समस्या जोडलेली आहे भज्य आणि भजक या दोघातील ऐक्य दाखविण्यासाठी दापत्यप्रेमाचाच दाखला घेतलेला आहे कारण बहुजनसमाजाला तो तारडतोब समजतो याबाबत हिरेंद्रनाथ दत्त आपल्या 'श्रीकृष्ण नामक' ग्रथाच्या प्रस्तावनेत म्हणतात,

"गुढज्ञानी सुफी पथामध्ये स्त्री आणि मदिरा याचे वर्णन आहे इसाई धर्मातील 'सॉंग ऑफ सॉलोमन' यातील इष्कबाजी व अश्लीलता ही रासक्रीडा वर्णनाच्या पासगालाही पुरणार नाही"

पण धर्माविषयी आस्था नसलेले भारतीय टीकाकार या असल्या ग्रथाचे परिशीलन करणार नाहीत आणि व्यर्थ टीका मात्र करीत राहतील

कात्यायनी व्रताच्या अनुरोधाने विषयाला सोडून हा थोडासा भाग येथे घेतला याचे कारण इतकेच की, प्राचीन वाङ्मय मूलत वाचण्याऐवजी कोणा अन्यधर्मीय टीकाकारांच्या टीकाग्रथाच मनन करून आपल्या भारतीय ग्रथावर यथामति टीका करणाऱ्या महाभागाच्या ध्यानात त्या ग्रथाचे सत्य स्वरूप यावे मधुराद्वैताचार्य गुलाबराव महाराज हे कात्यायनी व्रत ३ ३ दिवसाचे करीत असत स्वत पुरुषदेही असूनही ते आपणाला ज्ञानेश्वर कन्या मानीत असल्याने अनेक दिवस स्त्री वेषातही रहात असत या व्रतामध्ये गोप गोपीभावाचे मिल द भक्ताना घडावे म्हणून श्रद्धेने व्रताचे पालन करून प्रसगानुसार व निर्मितीही करीत असत आणि रासक्रीडेचे प्रत्यक्ष चित्र उभे करीत भक्त वेडावून जात असत एकदा त्याचा मुक्काम हरदा येथे असताना गगूताईना दोनतीन दिवसाचा ताप आला तीन दिवसानी ताप उतर

व्रतपूर्तीसाठी भीमाबरोबर त्वरित पाठवून द्यावे ' अशा आशयाचा मजकूर एका पर्णावर लिहून व ते पान एका बाणाच्या टोकाला लावून तो बाण स्वर्गाच्या दिशेने सोडला[1] 'ऐरावत नेण्याची व्यवस्था करावी' असे उत्तर येताच, त्याने एकापाठोपाठ एक बाण सोडून स्वर्गापासून पृथ्वीपर्यंत बाणाचा एक सेतु तयार केला भीमाने त्यावरून चालत जाऊन ऐरावताच्या मुसक्या बांधून त्याला आपल्या खांद्यावरून आणले. कुंतीने व्रत केले आणि इहलोकीच साक्षात् ऐरावतावर बसून सुवासिनींना वायने दिली गांधारीलाही तिने आता न विसरता वायन दिले! आपल्या शंभर पुत्रांपेक्षा कुंतीचे पाच पुत्र वरिष्ठ आहेत याबद्दल गांधारीला पुरेपूर खात्री पटली. हा कथाभाग या ठिकाणी पुष्कळच त्रोटक दिला आहे. कारण बहुधा तो अनेकांना ज्ञात असावा.

(भविष्योत्तर पुराण)

शुद्धसाकी

व्यासमुनीजी समर्थी सांगती गांधारी-कुंतीला।
गजगौरीचे व्रत आचरिता स्वर्ग मिळे हो अबला॥
ऐरावतही मिळे। साध्वी। मृत्युअंती वरा॥ १॥
हस्तार्कादिनीं उठुनि पहाटे स्नानादि उरकावे।
पुत्राकरवीं माती आणुनी गजराजा बनवावें।
शृंगार्नि त्याला। विप्रें। षोडस पूजावे॥ २॥

वसततिलका

शय्येस भूमितल राहुनि एकभुक्त।
विष्णूकथा करुनि गायन एकचित्त॥
जास्वद पुष्पही कण्हेर गजास माळा।
घालोनि आचर व्रतास दिनास सोळा॥ ३॥
येणेपरी व्रत करुनि दुजे दिनाला।
देवोनि दान फलभारही ब्राह्मणाला॥
हत्तीवरी बसुनिया मग वाटी वाणा।
उद्यापना करुनिया गज शांतवाना॥ ४॥

१ टीप—सांप्रतच्या स्पुटनिक व आकाशयान सोडण्याशी याचा संबंध जुळतो काय?

प्रकारे व्रताचे उद्यापन करावे सुवर्णाच्या प्रतिमा करणे शक्य नसेल तर शास्त्राज्ञा अशी की,

अशक्तो मृद्गज कार्ये प्रतिमा चापि मृण्मयी । ( व्रतराज )

म्हणजे त्या हत्तीच्या प्रतिमा मातीच्या कराव्यात

या व्रताचा दुसरा एक विधि असा प्रातःकाळी उठावे आणि ज्या दिवशी सूर्य हस्त नक्षत्रामध्ये प्रवेश करतो त्या दिवशी पुत्राकडून माती आणवावी आणि ऐरावताप्रमाणे त्या मातीचा हत्तीचा पुतळा तयार करावा त्याला पताका बांधून, शृंगारून ब्राह्मणाकडून षोडशपूजन झाल्यानंतर त्याला नैवेद्य अर्पण करावा त्या दिवशी यजमानाने एकभुक्त राहावे भूमीशयन करावे, कथा कीर्तन श्रवण करावे, विष्णूचे स्तोत्रगायन करावे, कण्हेर जास्वंदी इत्यादि लाल फुलांच्या माळा ऐरावताला घालाव्यात यांप्रमाणे सोळा दिवस पूजन करून सतराव्या दिवशी ब्राह्मणांना फळांच्या सोळवटी ( सोळा प्रकारची फळे ) द्याव्यात व हत्तीवर बसून गाजत वाजत वाटांनीत मिरवणूक घरी आल्यावर लक्ष्मीची पूजा करून गंगानदीच्या पाण्यात अगर अन्य जलाशयात पुतळ्याचे विसर्जन करावे व्रताचे विधिपूर्वक उद्यापन करावे

कथाकल्पतरु स्तबक २१ प्रमाणे हेच व्रत व्यासमहर्षींनी गांधारी आणि कुंती या दोघींना एकदमच सांगितले या व्रताची फलश्रुति त्यांनी अशी सांगितली की, हे व्रत आचरल्याने गजातलक्ष्मी प्रसन्न होऊन आपले सर्व मनोरथ पूर्ण करते विशेष महत्त्वाचे म्हणजे मृत्यूनंतर स्वर्गप्राप्ति होऊन इंद्राचा ऐरावत बसावयास मिळतो

त्या वेळी दुर्योधन गादीवर असल्याने कौरव सर्वसंपन्न होते यास्तव गांधारीने आपल्या जाऊबाईंना विजविण्याच्या इराद्याने व्रताचरण करावयाचे ठरविले तिने आपल्या शंभर पुत्रांकडून माती जमविली ऐरावताची प्रतिमा तयार केली सोळा दिवस तिचे पूजन करून ती प्रतिमा एका लाकडी चाकावर बसविली असल्यामुळे तिची मोठी मिरवणूक काढून नगरातील स्त्रियांना तिने वायने दिली अर्थात् कुंतीमातेच्या घरी जाऊनही वायन देण्यास ती विसरली नाही कुंतीला अतिशय वाईट वाटले आणि मानहानी सहन न झाल्याने ती अतिशय दुःखी झाली पंडुपुत्र भीम ह्याला मातेची इच्छा समजताच तो यमुना नदीत उतरला आणि तेथूनच चिखलाचे गोळे फेकू लागला सर्वजण त्याच्या त्या पराक्रमाने दिपून गेले अर्जुनाला जेव्हा हे वर्तमान समजले तेव्हा त्याने भीमाला मातीचे गोळे फेकण्यापासून परावृत्त करून प्रत्यक्ष मातेच्या इच्छापूर्ती साठी साक्षात् इंद्राचा ऐरावतच आणण्याचे ठरविले. तात्काळ ' ऐरावताला

व्रतपूर्तीसाठी भीमाबरोबर त्वरित पाठवून द्यावे.' अशा आशयाचा मजकूर एका पर्णावर लिहून व ते पान एका बाणाच्या टोकाला लावून तो बाण स्वर्गाच्या दिशेने सोडला[1] 'ऐरावत नेण्याची व्यवस्था करावी' असे उत्तर येताच, त्याने एकापाठोपाठ एक बाण सोडून स्वर्गापासून पृथ्वीपर्यंत बाणाचा एक सेतु तयार केला. भीमाने त्यावरून चालत जाऊन ऐरावताच्या मुसक्या बांधून त्याला आपल्या खांद्यावरून आणले. कुंतीने व्रत केले आणि इहलोकीच साक्षात् ऐरावतावर बसून सुवासिनींना वायने दिली. गांधारीलाही तिने आता न विसरता वायन दिले! आपल्या शंभर पुत्रांपेक्षा कुंतीचे पाच पुत्र बलिष्ठ आहेत याबद्दल गांधारीला पुरेपूर खात्री पटली. हा कथाभाग या ठिकाणी पुष्कळच त्रोटक दिला आहे. कारण बहुधा तो अनेकांना ज्ञात असावा.

(भविष्योत्तर पुराण)

शुद्धसाकी

व्यासमुनींजी समर्था सांगती गांधारी कुंतीला।
गजगौरीचे व्रत आचरितां स्वर्ग मिळे हो अबला॥
ऐरावतही मिळे। साध्वी। मृत्युअंतीं वरा॥ १॥

हस्तार्कादिनीं उठुनि पहांटे स्नानादि उरकावें।
पुत्राकरवीं माती आणुनी गजराजा बनवावें।
शृंगारुनि त्याला। विप्रे। षोडस पूजावें॥ २॥

वसंततिलका

शय्येस भूमितल राहुनि एकभुक्त।
विष्णूकथा करुनि गायन एकचित्त॥
जास्वद पुष्पही कण्हेर गजांस माळा।
घालोनि आचर व्रतास दिनास सोळा॥ ३॥

येणेपरी व्रत करुनि दुजे दिनाला।
देवोनि दान फलभारही ब्राह्मणाला॥
हस्तींवरी बसुनियां मग वांटी वाणां।
उद्यापना करुनिया गज शातवाना॥ ४॥

---

१ टीप—सांप्रतच्या स्कुटरिंग व आकाशयान सोडण्याशी याचा संबंध जुळतो काय?

शुद्धसाकी

कौरवांनि मग मृत्तिकेचा प्रचंड हत्ती केला।
गाड्यावरती माडुनि त्याला गावारोला दिधला।
त्यावरी बैसोनी। वाटी। वाणें कुंतीला ॥ ५ ॥
काचनहिन कुंतीला गर्वें स्वकृतीने लाजविले।
भीम खवळला गजकृतीसाठी फेकी मृत्तिके गोळे।
व्यर्थ श्रमा घेसी। वधो। धनंजय बोले ॥ ६ ॥
अर्जुन धाडी बाणाग्राने पत्र स्वर्गी इंद्राला।
मातृव्रताच्या पूर्तीसाठी ऐरावत दे मजला।
बाणपथे धाडी। भीमा। ऐरावत आला ॥ ७ ॥

वसततिलका

ऐरावती बसविती इहलोकिं मातें।
जावेस वंदन करी वदती तियेतें ॥
गांधारि दु खितहि लज्जित अंतरंगी।
कर्तृत्वहीन शतपुत्र वदे वृथाही ॥ ८ ॥

( ६ ) चंपागौरी

भाद्रमासे सिते षष्ठी, सा चंपेति निगद्यते।
मार्गमासे शुक्लपक्षे षष्ठी वैधृतिसंयुता। ( व्रतराज )
रविवारेण संयुता सा चंपा इति कीर्तिता। ( मल्लारीमाहात्म्य )

मार्गशीर्ष महिन्यात शुक्ल षष्ठीला या देवीचे व्रत आचरतात. यालाच चंपाषष्ठीचे व्रत असेही म्हणतात जेव्हा वैधृति योगावर मंगळवार आणि विशाखा नक्षत्राचा संयोग असतो, तेव्हा त्याला चंपायोग असे म्हणतात ( व्रतराज, पृष्ठ २३३ ) 'स्मृति कौस्तुभ' हा ग्रंथ भाद्रपद शु. ६ ही आणखी एक चंपाषष्ठीची तिथि देतो. परंतु 'मदनरत्न' या ग्रंथाच्या मते ही तिथि मार्गशीर्ष महिन्यातच येते. महामहोपाध्याय श्री. पा. वा काणे म्हणतात,

'सुमारे तीस वर्षांनी चंद्र जेव्हा शततारक ( शततारका ) नक्षत्राच्या कक्षेत येतो, तेव्हा तो वैधृति योग साधतो. या वैधृति योगावर विश्वेश्वर अगर अन्य शिवलिंग पहावे, असे शास्त्रवचन आहे.' ( धर्मसूत्रे भाग ५, पृष्ठ २९१ )

याच ग्रंथात पृष्ठे २५५ ते ४५६ इतक्या पृष्ठसंख्येत लेखकाने व्रताची विस्तृत यादी दिलेली आहे. पण त्यामध्ये फक्त तिथींचाच विचार केलेला आढळून येतो. व्रताची उत्पत्ति अगर तिचा कथाभाग दिलेला नाही. महाराष्ट्रात सर्वसाधारणपणे हे व्रत मार्गशीर्ष महिन्यातच करतात.

या व्रताचा अपूर्व भाग असा की, हे जरी चंपागौरीचे व्रत असले तरी पूजा मात्र खंडोबा किंवा मल्हारी मार्तंडाची होते आणि याचसाठी महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध जेजुरी या स्थानाला त्या दिवशी विशेष महत्त्व प्राप्त होते. या देवाचे नाव खंडोबा असे पडण्याचे कारण संशोधक असे देतात की, खंडपरशु हे श्री शिवशंकराचे एक नाव आहे. त्यापैकी परशुपदाचा लोप होऊन खंड तेवढे उरले. त्या खंडाचेच रूढ नाव पुढे खंडोबा असे पडले. दुसरी एक उत्पत्ति अशी दिली जाते की, फार पूर्वी मणि व मल्ल या दोन दैत्यांनी भूतलावर अक्षरशः थैमान घातले. शंकरानी खंडोबाचे रूप घेऊन त्या दैत्याचा नाश केला, म्हणून शंकरांचे मल्हारी हे नाव प्रचारात आले. ब्रह्मदेवाच्या वराने उन्मत्त झालेले हे दैत्य मणिचूर पर्वतावर जेथे सप्तऋषि आपल्या परिवारासह यज्ञकर्म आचरीत होते, तेथे जाऊन त्यानी तेथील यज्ञाचा विध्वंस केला. देवांच्या विनंति-वरून मार्गशीर्ष शु० ६ ला शंकरानी आपल्या रुद्रगणासह स्वारी करून त्याना ठार केले. शंकराच्या या सत्कृत्याबद्दल त्या पर्वतमाथ्यावर शिवलिंग स्थापन करून त्या स्थळाला प्रेमपुरी असे नाव ठेवले. या नावाचे रूपांतर पुढे जयाद्रि असे नाव होऊन साम्प्रत ते जेजुरी असे आहे. (ब्रह्मपुराण, क्षेत्रखंड)

या देवाची नावे खंडोबा, मल्लारी, खंडनाथ, मैलार, मैल्लाळ, भैराळ, मार्तंड, मल्लारी-मार्तंड, मार्तंड-भैरव, म्हाळसाकांत, खळनाथ, खळदेव, भैरोबा, एककोटी महादेव, मल्लुखान आणि अजमतखान अशी आहेत. पैकी शेवटचे अजमतखान हे नाव औरंगजेब बादशहाने दिले, असे मोल्स-वर्थ मराठी-इंग्रजी कोशामध्ये म्हटले आहे. (सन १८५७ सालची आवृत्ति). अजामत याचा फारसी अर्थ महत्त्व असा आहे. देवाने खरोखरच आपले महत्त्व पटविले म्हणून त्याला अजामतखान हे नाव दिले गेले आहे. या देवाच्या स्त्रीचे नाव म्हाळसा असून काहीजण ह्या म्हाळसेबद्दलची एक कथा सांगतात, ती अशी. पूर्वी नेवासे येथे तिम्माशेटी या नावाचा एक व्यापारी रहात होता. त्याच्या मुलीचे नाव म्हाळसा. या मुलीचा जन्म माघी पौर्णिमेला झालेला असून ह्याच मुलीचा विवाह पौष महिन्यात खंडोबाबरोबर झाला. जयाद्रि महात्म्य, मार्तंड-विजय अथवा मल्लारी-महात्म्य या ग्रंथांमध्ये खंडोबाचा अवतार याच ठिकाणी का झाला त्याचे वर्णन आहे. या स्थळासंबंधी ऐतिहासिक पुरावे तेराव्या शतकापूर्वीचे

मिळत नाहीत असा काही संशोधकाचा दावा आहे. तिम्माशेटीची मुलगी म्हाळसा हिचे लग्न खंडोबाबरोबर झाले हे मात्र पटण्यासारखे नाही. हे म्हाळसा-देवीवर रूपक असावे. म्हाळसादेवीचे मूळस्थान नेवासे हेच असल्याने कोणी तेथील खंडोबाशी या म्हाळसेचा संबंध जुळवून आणला असावा व कथा प्रचारात आणली असावी.

खंडोबाचे हे जागृत देवस्थान जेजुरी ( जिल्हा पुणे ) येथे आहे. सुमारे आठशे फूट डोंगरपठारावर ते वसलेले असून अंदाजे ३८५ पायऱ्या चढल्यानंतर मंदिराप्रत जाता येते. ( काव्यवर्णनात मात्र या ठिकाणी 'नवलाख' पायऱ्या असल्याचा उल्लेख आहे. ) अहमदनगरच्या निजामशहाच्या पदरी नारो राघव या नावाचा तीन हजार स्वाराचा एक मनसबी अधिकारी होता. साधारणपणे शहाजहान बादशहा दिल्लीच्या तख्तावर असतानाचा हा काळ असावा. त्याच्या पूर्वजांनी हे मंदिर उभारले असे बोलले जाते. म्हणजेच चौदाव्या अगर पंधराव्या शतकात ते उभारले गेले असावे. या ठिकाणी दोन निरनिराळ्या मूर्ति आहेत. एक कऱ्हेपठारावर आणि दुसरी गड-कोटामध्ये. त्यांपैकी कऱ्हेपठारावरची मूर्ति जास्त जुनी समजली जाते.

दक्षिण रेल्वेच्या जेजुरी रेल्वेस्थानकापासून सुमारे चार मैल लांब गडकोट हे स्थान आहे. गडकोट हे नाव पडण्याचे कारण म्हणजे मंदिराचा परिसर दगडी कोट बांधून सुरक्षित ठेवलेला आहे. त्यामध्ये ६३ ओवऱ्या आहेत. मंदिर पूर्वाभिमुख असून खंडोबा व इतर देवांची लहान मंदिरेही पूर्वाभिमुखच आहेत. गाभाऱ्यामध्ये खंडोबा-म्हाळसा या जोडीच्या तीन मूर्ति आहे. म्हाळसादेवीच्या हाती उत्पल, कमलकलिका, गजहस्तमुद्रा असून कानात कर्णफुले, बुगड्या इत्यादि अलंकार आहेत. म्हाळसा या बायकोच्या नावावरूनच खंडोबाला म्हाळसाकांत हे नाव पडले असावे. या देवाला आणखी बायका होत्या. त्यांची नावे बनाबाई, द्वारकाबाई, गौतमाबाई असून त्यांच्याही मूर्ति मंदिरात आढळतात. खंडोबाच्या हातात चार फूट लांब व चार इंच रुंद पाते असलेली तरवार आहे. तसेच त्रिशूळ, डमरु व भांडे या वस्तु इतर हातात आहेत. सभागृहात दोन पाषाणाचे अश्व असून एकावर खंडोबाची स्वारी आहे. एका लहानशा गाभाऱ्यात खंडोबा आणि म्हाळसा यांच्या नांवे शिवलिंगे दाखविली जातात. पण बहुधा ती चांदीच्या मुखवट्यांनी झाकलेली असतात. गाभाऱ्याबाहेरील सभामंडपात अठावीस फूट रुंदीची कासवाची पाठ कोरलेली आहे. कथाकीर्तनासाठी हीच पाठ रंगवीला म्हणून वापरली जाते.

गडकोटच्या मंदिराच्या पायऱ्या चढताना मार्गावर अनेक ठिकाणी कमानी उभारलेल्या दिसतात तसेच ठिकठिकाणी प्रकाशयोजनेसाठी दीपमाळा उभारलेल्या आहेत. या दीपमाळा सुमारे ३५० असाव्यात. नवस केलेल्या लोकांनीच बहुधा त्या उभारलेल्या आहेत. मार्ग शोभिवत दिसण्यासाठीच की काय, मार्गामध्ये अनेक लहान लहान मूर्ति कोरलेल्या आढळतात. त्या नेहमी शेंदूरचर्चित असतात व त्यांना 'वीर' या नावाने संबोधिले जाते. प्रवेश-द्वारावरील शिवलिंग 'सव्वा लाखाचा भुगा' या नावाने ओळखले जाते. येथे कोणी काय काय दान दिले, यासंबंधी अनेक शिलालेख पहावयास सापडतात.

## घृतमारी

जेजुरी येथील गडकोट मंदिरातील प्रदक्षिणामार्गात तुळजाभवानी व गणपति यांच्या मंदिरापुढे एक भव्य शिळा पाहण्यात येते, तिलाच घृतमारी अथवा महामारी म्हणतात. जवळच उमाजी नाईकाची तालीम आहे या देवीच्या उत्पत्ती संबंधी असे सांगण्यात येते की, मणिमल्ल दैत्याचा नाश करण्यासाठी शंकरांनी अवतार घेतेवेळी आपल्या जटा प्रथम भूमीवर जोराने आपटल्या, तेव्हा ही देवी त्यांच्या साह्यार्थ उत्पन्न झाली. शत्रूबरोबर सामना देण्यासाठी व तिला बलवान बनविण्यासाठी खूप तूप पाजण्यात आले, यास्तव ती घृतमारी नाव पावली. युद्धात भैरवाला मदत केल्यावर या ठिकाणी चिरशांतीसाठी भूमीवर पडून राहिलेली आहे.

गडकोट मंदिराच्या पश्चिम बाजूने बाहेर पडल्यावर कऱ्हेपठार मंदिराकडे जाता येते. हा मार्ग अतिशय उंचसखल आहे. सात वेशी आणि अनेक पायऱ्या चढून गेल्यानंतर मंदिराप्रत जाता येते या मंदिरामध्ये खंडोबाची तीन फूट उंचीची मूर्ति असून दोन्ही बाजूंना बाळाई व जोगाई या सेवेकरी आहेत. चबुतऱ्याच्या उजवीकडे मणी आणि डावीकडे मल्ल दैत्याची मुंडकी कोरलेली आहेत. या ठिकाणीही म्हाळसेची एक पितळेची मूर्ति आहे.

"सव्वा लाख भुग्या"चा इतिहास फार उद्बोधक आहे सन १६८३ साली औरंगजेब बादशहा महाराष्ट्रातील किल्ले काबीज करीत असताना जेजुरी-पासून १५ मैल अंतरावर आला तेथील शिवस्थानाची त्याने नासधूस करून नंतर गडकोट जेजुरीच्या तीर्थाकडे आपला मोर्चा वळविला सैनिकांनी गडावर हल्ला केला गडाचा रखवालदार यशवंतराव पहिल्याच फेरीत ठार झाला. तेव्हा मूर्तीच्या रक्षणार्थ लोकांनी महाद्वार बंद करून घेऊन शत्रुसैन्य थोपवून धरण्याचा प्रयत्न केला. सुरुंग लावून दिंडीदरवाजा उखडून लावण्यासाठी शत्रूने प्रहार लावून छिद्र पाडण्यास सुरुवात केली. मूर्तीचे रक्षण करण्याचे भक्तांचे प्रयत्न

निष्फळ झाले असे पाहून प्रत्यक्ष देवाने स्वत च कंबर कसली व आपले दिव्य स्वरूप प्रकट करण्याचे ठरविले शत्रुफळीची दाणादाण उडविण्याचे ठरविताच पहारीने पाडलेल्या छिद्रातून लाखो काळे भुंगे एखाद्या प्रवाहाच्या लोंढयाप्रमाणे बाहेर पडले एकेका सैनिकाला कडाडून चावे घेऊन त्याना सळो की पळो करून सोडले यवनाना पळता भुई थोडी झाली आणि कसाबसा त्यानी आपला तळ गाठला देवाने आपले सत्व राखले

देवस्थान जागृत आहे हे पाहून औरंगजेब नहोत स्तूप हो गया तो कडवा धार्मिक असल्याने देवतेच्या जागृतावस्थेचा ठसा ताबडतोब त्याच्या मनावर उमटला बादशाही फर्मानाने ताबडतोब सव्वालाख रुपये किंमतीचा रत्नजडित, नक्षीदार असा सुवर्णाचा भुंगा तयार करण्यात येऊन मोठया समारंभाने खंडोबाला अर्पण केला गेला मुख्य दरवाजावर हाच भुंगा बसविलेला होता जाणकाराचे असे मत आहे की, रघुजीराव आंग्रे याच्या वेळी हा भुंगा चोरीस गेला असावा

"खंडोबाचा येळकोट" "मल्हारीचा येळकोट" अशी गर्जना ह्या ठिकाणी केली जाते याचा अर्थ असा—येळ म्हणजे इळा म्हणजेच पृथ्वी आणि कोट[1] म्हणजे पूर्ण भरलेले भांडे. तेव्हा सांगण्याचा आशय असा की, "पृथ्वीवर पूर्ण सुबत्ता नांदू दे धान्यसमृद्धि होऊ दे" हाच अर्थ होय

या देवाचे भक्त वाघ्या आणि मुरळी या नावाने प्रसिद्ध आहेत नवसाने झालेला पहिला मुलगा अगर मुलगी या देवाला अर्पण करण्याची रूढि होती त्यानाच वाघ्या-मुरळी म्हणत असत नाचून अगर देवापुढे गाणे म्हणून हा वर्ग आपली उपजीविका करी तसेच खंडोबाची लहानशी मूर्ति गळ्यात घालून वाघाच्या चामड्याच्या पिशवीत हळद ( भंडारा ) भरून गावोगाव फिरत, पोवाडे गात व खंडोबाच्या नावाने भीक मागत असत काही मुरळ्या वेश्या-व्यवसायही करीत महाराष्ट्र सरकारने ही रूढि आता कायद्याने बंद केली आहे

देवदासीच्या या भारतीय चालीबद्दल बरेच सामाजिक गैरसमज असून त्याबद्दल ती रूढि चालू करणाऱ्याला दोष दिला जातो. याबाबत इतर देशातील पुराणग्रंथ चाळले तर तेथेही अशा प्रकारचा देवाची सेवा करणारा वर्ग होता असे आढळून येते

बॅबिलोनियन संस्कृति ही फार प्राचीन समजली जाते सनपूर्व सुमारे पाच सहस्र वर्षांची ! टायग्रीस व युफ्रेटीस नद्याच्या परिसीमानी ते साम्राज्य वेढलेले

१ टीप—अन्नकोट म्हणजे सर्व पक्वान्नानी पूर्ण भरलेली भांडी असाच शब्दप्रयोग आहे

होते. याच्या प्रमुख देवाचे नाव बेल असे होते. त्याच्या पत्नीचे नाव मिलिता. पिरॅमिडच्या आकाराचे आणि सुमारे सहाशे फूट उंचीचे, भिंतींनी वेढिलेले असे त्याचे भव्य मंदिर होते. गोल जिन्याने सहाशे पायऱ्या चढून गेल्यावर माथ्यावर या देवाचा गाभारा आणि शेजघर होते. पिरॅमिडच्या पायथ्याशी दुसरे एक मंदिर असून त्यामध्ये सुवर्णाच्या प्रचंड सिंहासनावर मिलितादेवींची आठशे पौंड वजनाची सुवर्णाची तेजस्वी मूर्ति विराजमान झालेली होती. या संस्कृतींचा असा कडक नियम होता की, प्रत्येक स्त्रीने तिच्या आयुष्यात एक वेळ तरी पर-पुरुषसंबंध ठेवलाच पाहिजे. यास्तव अनेक सौभाग्यवती व कुलीन, शालीन स्त्रियासुद्धा या देवीच्या मंदिरात येऊन बसत आणि जो पुरुष तिच्या पदरात नाणे टाकील तो पुरुष देवीच्याच इच्छेने पाठविलेला आहे, असे समजून त्या पुरुषाबरोबर संबंध ठेवीत असत. ती स्त्री प्रसंगी कुमारी असल्यास त्या पुरुषाबरोबर तिचा विवाहही घडून येत असे. ( लोकसत्ता, मुंबई १४।११।१९६२ )

सुमेरिअन संस्कृति ही सुद्धा तितकीच प्राचीन आहे, हे तर येथील उत्खननावरून सिद्ध झालेले आहे. त्यासंबंधी इतिहासकार लिहितात,

'One female child usually was dedicated to the calling of the Temple prostitution, secrificing her virginity to the God, whose concubine she figuratively became.'
( A Short History of Ancient World by C. E. Smith, Page 48 ).

म्हणजे प्रत्येक घरटी एक मुलगी देवाला वाहिलेली असली पाहिजे आणि आपल्या शीलाचा भंग करून देवदासी म्हणून तिने राहिले पाहिजे असा दंडक होता.

हा दुसरा एक पुरावा पाहा.

'It is hardly necessaary to state that religious prostitution ( देवदासी ) is not an institution of yesterday, nor peculiar to India. It was very common in ancient times amongst Lydia, Syria, Armenia, Chaldea, Egypt, a similar or even more shameles culture of unchasting was known. It was confined to Temple of Astarte, Baal, Amos and in worship of Yahwe.' ( The Brahamins Theists of India by John Campbell Oman Page 201 ).

( ६ ) पोटरीतून पहार मारणे अगर लाकडाची खुंटी मारून घेणे.

( ७ ) एका लाकडाच्या पट्टीला एका बाजूला ओळीने पाच लोखंडी खिळे आणि दुसऱ्या बाजूने मध्यंतरी एक खिळा ठोकावयाचा व तो डाव्या हाताच्या मनगटातून आरपार जाईल असा ठोकून पट्टी मनगटावर ठेवायची. पाच खिळ्याना पाच पेटल्या पणत्या लावून अगर वाती बांधून देवाची आरती करावयाची.

याशिवाय बारीकसारीक अनेक प्रकार आहेत. बगड अथवा पगाड नवस घेणारा हा मनुष्य, इतके अघोर प्रकार झाले, शरीराला इजा झाली तरी देवाच्या नावाने फक्त भंडारा हेच औषध लावतात. भक्ताचा असा विश्वास आहे की, इतक्या जखमा झाल्या तरी अशा वेळी कोणीही दगावत नाही आणि फार काळ त्याला दुःखही भोगावे लागत नाही. त्याच्यावर देवाची पूर्ण कृपा असल्यानेच तो असले चमत्कार करू शकतो.

जेजुरी या स्थानाव्यतिरिक्त दक्षिणेस या देवाची आणखी प्रमुख मंदिरे आहेत, ती येणेप्रमाणे. निमगाव ( पुणे ), शेगुंड ( अहमदनगर ), सातारे ( औरंगाबाद ), नळदुर्ग ( धाराशिव ), पाली-पेंबर ( सातारा ), मंगसूळी ( बेळगाव ), मैलारलिंग ( धारवाड ), मैला-देवरगुड्ड ( धारवाड ), मैलार (बेल्लारी), मैलारपूर-पेंबर ( बिदर ) इत्यादि इत्यादि. महाराष्ट्रात या देवाला खंडोबा तर कर्नाटकात मैलार या नावाने संबोधितात. खंडोबाची पत्नी म्हाळसादेवी आणि गोवेप्रांतीय महालसा या दोन निरनिराळ्या मूर्ति समजावयास पाहिजेत.

( महाराष्ट्रातील चार दैवते—लेखक श्री. ग. ह. खरे )

बगड नवसाची चाल महाराष्ट्राप्रमाणे उत्तर प्रदेशात ओरिसा-बंगालकडे चालू होती असे दिसते. ओरिसामध्ये चरक पूजा म्हणून एक पूजाविधि प्रचलित आहे. ही शिवगौरीची पूजा मानतात. उत्सवाच्या दिवशी सर्व भक्त एखाद्या तळ्याकाठी जमून, त्यामध्ये अगोदरच रोवून ठेवलेल्या एका लाकडी खांबाला 'जय तारकेश्वरी' या नावाचा गजर करून वर उपटतात. नंतर जवळच मैदानावर त्याला पुरतात. या ठिकाणी भक्तगण त्याच्या पूजनानंतर अनेकविध दिव्ये करतात. अंगात सुया खुपसून घेणे, काट्यावरून अगर अग्नीवरून चालत जाणे, तापलेले लोखंडी गोळे उचलणे असे प्रकार होतात. शेवटी कोणाला तरी बळेच जखमी करून, त्याच्या पोटाला दोरी बांधून, तारकेश्वरीदेवीचे नाव घेऊन खांबाच्या टोकावर चढवितात. वेदना असह्य होत असल्या तरी देवीचे वारंवार नामघोषामुळे, तो शांतच रहातो. या देवीरूपाला अनेक भक्त प्रदक्षिणा घालीत

असतात. शिव-पार्वती या कृत्याने प्रसन्न होते आणि त्यांची संकटे नाहीशी करते, अशी त्यांची यामागील भावना असते. (भा. सा. को. २–२५२)

अग्निदिव्य करणे ही चाल फक्त भारतातच होती आणि अन्य ठिकाणी नव्हती असे नव्हे. अमेरिकेमध्ये रेड इंडियन लोकांच्या जमातींत अग्निदिव्य करणारे नर्तक सांप्रतच्या विसाव्या शतकातही आहेत. जळत्या निखाऱ्यावरून एक एक तास अनवाणी नाचत राहणारे नर्तक तेथे आहेत आणि त्याचा हा चमत्कार पाहण्यास अनेक सुधारक उपस्थित असतात. भारतीयांनी मेक्सिको, पेरू देशांत प्रथम वसाहती केल्या, हे भिक्षु चमनलालचे विधान सत्य मानले, तर काही भारतीय रूढि तिकडे जाण्याची शक्यता आहे. चरक पूजा मॅक्सिको-पेरूमध्ये होती.

## (७) ज्येष्ठागौरी

द्विभुजाञ्जनसंकाशा लंबोष्ठा भृंगनासिका ।
लंबमानस्तना कुक्षौ नीलं वा रक्तवाससी ॥ १ ॥
उत्पलं दक्षिणे हस्ते पीठे वामकरः स्थितः ।
भद्रपीठस्थिता वापि द्विपादं चैव लंबिनी ॥ २ ॥ (अंशुभेदागम)

भाद्रपद महिन्याच्या शुक्ल चतुर्थीला श्रीगणेशाची स्थापना करण्याची पद्धत आहे. त्यानंतर एकदोन दिवसातच चंद्र जेव्हा वृश्चिक राशीत ज्येष्ठा नक्षत्राच्या कक्षेत येतो त्या दिवशी या गौरीचे आवाहन होते. दुसऱ्या दिवशी देवीचे पूजन आणि गोडाधोडाचे जेवण होते आणि तिसऱ्या दिवशी विसर्जन केले जाते. ज्याच्या घरी गणपति व गौरी या उभयतांचे पूजन असते, त्यांच्या गणपतीचे विसर्जनही गौरीबरोबरच केले जाते. सर्वांच्याच घरी गौरी बसविण्याची पद्धत असते असे मात्र नाही. काही घरी गौरी येतात, काही घरी येत नाहीत. यांची कारणे मात्र निरनिराळी आहेत.

या देवीचे आवाहन का करावयाचे यासंबंधी एक कथा उपलब्ध आहे. ती अशी—प्राचीन काळी एका ब्राह्मणाच्या घरी अतिशय दारिद्र्य असल्याने जीविताला तो कंटाळून गेला होता. गणपतीची मूर्ति त्याच्याकडे आणली जात असे. एकदा कुलाचाराप्रमाणे व रीतीरिवाजाप्रमाणे गणपतीची मूर्ति आणल्यावर गौरी आणण्याचा हट्ट त्याच्या मुलांनी धरला. हा हट्ट पुरविणे अशक्य असल्यामुळे सुटकेचा मार्ग म्हणून तो एका जलाशयावर गेला आणि त्याने प्राणत्याग करावयाचे ठरविले. तो उडी मारणार इतक्यात एक सुहासिनी वृद्ध बाई तेथे प्रकट होऊन त्याला उद्देशून म्हणाली, 'बेटा, आपल्या सोन्यासारख्या प्राणाचा असा त्याग करू नकोस.' त्या वृद्धेने चार उपदेशपर गोष्टी सांगून प्राणत्यागापासून

त्याला पराभूत केले. नंतर त्या वृद्धेसह तो घरी आला. पण चमत्कार काय झाला पहा ! ती बाई घरात येताच ज्या घरात पूर्वी अठरापिश्वे दारिद्र्य नांदत होते, त्या घरातील रिकामी गाडगीमडकी आपोआप धान्यांनी भरून गेली. दुसरे दिवशी त्या ब्राह्मणाला भिक्षाही उत्तम मिळाली. वृद्धेने सांगितल्याप्रमाणे ब्राह्मणाने तिला चांगले न्हाऊमाखू घालून दुपारी गोड खिरीचे भोजन दिले. खिरीला दूध नव्हते. परंतु तेवढ्यात एक गाय आपण होऊन घरात चालत आली व तिने खिरीसाठी दूध पुरविले. मुलांना फार फार आनंद झाला. तिसऱ्या दिवशी त्या बाईच्याच इच्छेनुसार त्या ब्राह्मणाने तिला जलाशयाच्या काठी पोहोचविले. म्हातारी ब्राह्मणाला म्हणाली, ' मी आता माझ्या घरी या जलाशयात जाते. दरवर्षी नदी अगर जलाशयाच्या ठिकाणावरून दोन दगडाचे खडे घरी घेऊन जा आणि ते माझेच स्वरूप आहेत असे समजून त्यांची पूजा कर व नंतर त्यांचे विसर्जन कर.'

यामुळेच सांप्रत तळी, विहीर, नदी अगर अन्य जलाशयांवरून दगडाचे खडे, गौर म्हणून आणण्याची प्रथा रूढ झाली असावी. काही ठिकाणी या देवीचा मुखवटा तयार करून कपडे, दागिने इत्यादिकांनी तो सजवून त्याचे पूजन करण्याचा प्रघात आहे. विशेषतः या गौरीचे पूजन महाराष्ट्रात अनेक घरांतून होते.

(पाठककृत कहाणीसंग्रह)

पुराणांतरी अशी कथा आहे की, पूर्वी दैत्यांनी सर्व देवतांना त्राहि भगवन् करून सोडल्यानंतर, आपले सौभाग्य कायम राहावे या हेतूने सर्व देव स्त्रिया महालक्ष्मीकडे जाऊन तिला त्यांनी आपले सौभाग्य कायम राखण्याची प्रार्थना केली. महालक्ष्मीने त्वरित दैत्यांचा नाश करून त्यांचे संकट दूर केले. महालक्ष्मीच्या उपकाराची फेड म्हणून हे व्रताचरण सुरू झाले. काही ठिकाणी पुरुष व स्त्रिया दोघेही मिळून हे व्रत आचरतात.

देशपरत्वे या देवीच्या पूजनाचे प्रकार भिन्न भिन्न आहेत. कोणी धातूची मूर्ति बनवितात तर कोणी मृत्तिकेची बनवितात. कोणी कुंभाराकडून पांच नवीन मडकी आणवून, त्यांमध्ये धान्य, पिवळ्या रंगाचा दोरा, खोबऱ्याच्या पांच वाट्या, पांच खारका घालून सर्व मडकी एकावर एक रचतात. शिरोभागी गौरीचा मुखवटा बसवितात. या मृताशेजारी असाच एक दुसरी गौर बसवितात. तीन दिवस पूजनाचा समारंभ झाल्यावर मडक्यांची हंडी उतरवून धरून, खारीक-खोबऱ्याचे तुकडे पिवळ्या दोऱ्यात बांधून माळेसारखे गळ्यात घालतात. काही दिवसांनी एखाद्या शुभदिनी ती माळ दहीदुधात भिजवून शेतामध्ये पुरण्याचा प्रघात आहे. काहीजण तिसऱ्या दिवशीच हिचे विसर्जन करतात. हा एक शक्ति-पूजेचाच प्रकार आहे. (आर्यांच्या सणांचा इतिहास, पृष्ठ २८०)

रक्तजेष्ठा च नीला च भूतलार्पितपादका ।
भूतलं स्पृशते दोर्भ्यां द्विभुजा वीरवन्दिता ॥ (विष्णुधर्मोत्तरपुराण)

या देवीची दोन प्रकारची रूपे आहेत. रक्तजेष्ठा आणि नीलजेष्ठा. सुप्रभेदागम व पूर्वकारणागम तन्त्रांमध्येही या देवीचे वर्णन आहे.

कोणी या देवीला गणेशाची माता असेही मानतात. यासाठी ती गणपति आल्यावर घरी येते व गणपतीबरोबर जाते असेही मानतात. कोकणप्रांती (कुडाळ) या देवीचे आवाहन गणेशस्थापनेच्या आदल्या दिवशी करतात. कारण ती माता मानल्यावर पुत्र येण्याच्या आधी घरी यावी असे मानतात.

या देवीचे पितळी, लाकडी, रांध्याचे व मातीचे मुखवटे फार सुबक बनविलेले असतात. ते आतून पोकळ असतात. कुंभार मातीचे मुखवटे बनवितात, जिनगर कागदी अगर लाकडी मुखवटे बनवितात, तर ओतारी पितळी धातूचे बनवितात. खेड्यापाड्यांतून या कुशल कारागिरांनी ही कला अद्यापीही जिवंत ठेवली आहे.

(महाराष्ट्र टाईम्स, मुंबई, दि. २–९–१९६२)

संस्कृत ग्रंथांतील या देवीचे वर्णन सुरुवातीच्या श्लोकामध्ये दिलेले आहे. दोन भुजा, दोन नेत्र, फुगीर गाल, लोंबणारे वक्षःस्थळ, दीर्घ नासिका, विशाल उदर, पुष्ट मांड्या, काळा कुळकुळीत वर्ण, ओठाचा खालचा भाग लोंबणारा, भद्रासनावर बसलेली, वद्ध वेणी बांधलेली, भाळी भव्य कुंकुमतिलक असलेली, मस्तकी किरीट धारण केलेली, एका हाती नीलोत्पल आणि दुसरा हात अभयाकृति असलेली, असे या देवीच्या स्वरूपाचे वर्णन आहे. देवीच्या उजव्या बाजूस वृषभमुखी मानव एका हातात दंड आणि दुसऱ्या हातात दोरखंड घेऊन बसलेला असून, डाव्या बाजूला एक सुंदर नवयौवनेची अग्निमथ नावाची, श्यामल वर्णाची व पाय मोकळे सोडून बसलेल्या एका स्त्रीची मूर्ति असा देखावा सजवितात.

समुद्रमंथनाच्या समयी या देवीची उत्पत्ति झाली असून कपिल मुनींने तिच्याबरोबर विवाह केला. यास्तव तिला कपिल-पत्नी असेही म्हणतात. तामीळ भाषेतील निघंटूमध्ये या देवीची नावे मुगडी, तौवाई, कळडी, मुदेवी अशी असून काकध्वजी, गर्दभवाहना व हातात झाडू घेतलेली असे तिच्या स्वरूपाचे वर्णन असते. काही वेळा हातातील या आयुधांवरून ती धूमावतीदेखील मानली जाते. लक्ष्मीची वडील बहीण अलक्ष्मी हिचे वर्णनही वरीलप्रमाणेच करतात आणि तिला जेष्ठागौरीसमान मानतात.

व्रतराज ग्रंथाप्रमाणे या देवतेचे स्वरूप म्हणजे त्रिनेत्र, विरक्त, सुंदर, श्वेतसिंहारूढ, श्वेतवस्त्र परिधान केलेली, हातामध्ये पुस्तक व पाश धारण करणारी असे दिले आहे. [ व्रतराज, (गुजराथी प्रत), पृष्ठे १२६ ते १२८ ]

लिंगपुराणात या देवीची कथा आणखी एका निराळ्या प्रकारची दिलेली आहे. क्षीरसागराचे मंथन झाल्यानंतर ही वर आली. परंतु अतिशय विद्रूप चेहरा असलेल्या या बाईचा कोणीही अंगिकार करीना. यासाठी दुःसह नावाच्या ब्राह्मणाबरोबर या बाईचा विवाह करून देण्यात आला. चांगल्या गोष्टींचा या बाईला मनस्वी तिटकारा असल्याने ती सदा दुर्मुखलेली राहू लागली. काही काळाने मार्कंडेय ऋषि त्या ब्राह्मणाच्या घरी आले. त्या वेळी त्याना सर्व वृत्तांत कथन केला असता ते म्हणाले, 'सर्व निषिद्ध गोष्टी जेथे घडतात त्या ठिकाणी तिला घेऊन जा. ज्या ठिकाणी नवरा-बायकोचे भांडण चालले असेल, कुकर्मे चालली असतील, जुगार चालला असेल, शिवीगाळ होत असेल इ० इ० ठिकाणी या बाईची करमणूक होईल.' या बायकोच्या जाचातून सुटण्यासाठी दुःसह ब्राह्मणाने एक युक्ती योजली. एके दिवशी त्याने तिला सांगितले की, 'मी चागला रोजगारी उद्योग पाहण्यासाठी रसातळाला जाणार आहे. त्या वेळी तू आपले घर आणि पाण्याचे तळे या दरम्यान रहा, म्हणजे इतर बायका तुला जो बळी देतील त्यावर तुझी उपजीविका चालेल. परंतु अट अशी की, त्या अन्न देणाऱ्या स्त्रीच्या घरी मात्र तू जावयाचे नाही.' याप्रमाणे तिला सांगून रसातळाला जाण्यासाठी तो ब्राह्मण जवळच्याच तळ्यात जो बुडाला तो पुन्हा वर आलाच नाही. ही पत्नी मात्र आपला पति चागला उद्योग करून परत येणार आहे या भरंवशावर तळ्याशर बसून असते. यासाठीच देवीचे आवाहन जलाशयातील खडे आणून करण्याची प्रथा रूढ झालेली आहे.

एकदा श्रीविष्णूची स्वारी त्या मार्गाने जात असता त्यांची आणि या बाईची गाठ पडली. तिने वेळ घालविण्यास काही साधन विचारल्यावरून ते म्हणाले, 'ज्या घरी तुझी पूजाअर्चा होईल, त्या घरी जाण्यास तुला कुठलीच हरकत नाही. तसे केल्याने पतीआज्ञेचा भंग होणार नाही.' इतके सागून विष्णु मात्र मंत्राचा जप करीत त्वरितच तेथून तिची वक्रदृष्टि होण्यापूर्वीच सटकले! यासाठीच विष्णु-भक्त सुद्धा या देवीला नैवेद्य अर्पण करतात.

शिवागम तंत्रामध्ये देवतेच्या पूजनाचे समग्र वर्णन दिलेले आहे. ज्येष्ठा ही एक जलमयी असल्याने स्थितीची द्योतक मानली जाते. दक्षिण भारतामध्ये या देवीच्या पूजनाचा प्रसार जास्त होता. कित्येक प्रसंगी लोक मुख्य देवाला विसरत

परतु या देवीची वक्रदृष्टि व्हायला नको म्हणून या देवीचे पूजन करीत असत. सांप्रत मात्र या देवतेचे महत्त्व थोडे कमी झालेले आहे, असे दिसते. उत्तर भारतामध्ये ह्याच देवीला सीतला असे म्हणतात. मलयापूर (मद्रास) वस्तु-संग्रहालय, कुंभकोणम् येथील गुहा इत्यादि ठिकाणी या देवीचे पुतळे आढळतात.

वाझपणा जाणे, जन्मतःच संतती न मरणे आणि दीर्घायुष्यप्राप्ति होणे इत्यादि फलप्राप्ति हे व्रत आचरल्यामुळे होते.

(Elements of Hindu Iconography by T A. Gopinath Rao)

तांत्रिकही या देवतेचे पूजन करतात. त्या वेळी तिचे स्वरूप, कमलासना, रक्तवस्त्र, चतुर्भुजा आणि कलश, सुवर्णपात्र, अंकुश, पाश धारण करणारी असते. दक्षिण भारतामध्ये या देवीला एक शक्तिदेवता मानलेली आहे. या देवीची दुसरी नावे कुंभी, जाया, हस्तिमुखा, विघ्नपार्षदा, नृऋती व अलक्ष्मी अशी आहेत. (विद्यार्णव तंत्र).

शार्दूलविक्रीडित

ज्येष्ठागौरि म्हणोनि भाद्रपदिच्या पूजीत षष्ठी-दिनीं ।
जावोनि जलसंचयी नदितटीं आणी खडे पूजनीं ॥
त्याचे षोडश पूजनास करुनी मिष्टान्न हो अर्पिती ।
नेती स्व-गृहिं देविना तृतीय त्या दीनांस देती गती ॥

भराडी गौर

भराडी गौर हा विदर्भातील मुली व महिला यांचा अत्यंत कलात्मक आणि सामाजिक उत्सव आहे. श्रावण महिन्याच्या सुरवातीपासून तीन आठवडे अगर पौर्णिमेच्या दुसऱ्या दिवशीपर्यंत तो साजरा केला जातो. या वेळी शंकर-पार्वती अथवा महादेव-गौरी यांची मांडणी कलात्मक पद्धतीने करून पूजन करण्यात येते. गावच्या लोकसंख्येच्या मानाने एक अथवा अनेक ठिकाणी हा उत्सव होतो. आदल्या दिवशी मुलींना निमंत्रण दिले जाते आणि जी निमंत्रण करते तिला 'मुसरीण' म्हणतात.

ही गौर स्थापनेच्या दिवशी मुली आणि महिला वस्त्रालंकृत होऊन गाणी गात मिरवणुकीने नदी अथवा जलाशयावर जातात. तेथील वाळू अथवा खडे घेते वेळी प्रार्थना करतात,

गरडक फोडू, माती काढू । निघा निघा गवराबाई ॥

ही प्रार्थना पाच वेळा म्हटल्यावर, वाळू घेऊन घरी परत येतात. त्या वेळी गाणे म्हणण्यात येते,

खण खण कुदळी, मण मण माती ।
देऊळ खचलं, चांदण्या राती ।
चांदण्या रातीचे, माणिक मोती ।
घाल घाल गवराई, आपुल्या नाकी ।। इ० इ०

घरोघर मुली परतल्यावर, एखाद्या पाटावर अथवा परडीवर शंकर-पार्वतीच्या वाळूच्या मूर्ति बनवून, पूजेच्या ठिकाणी मिरवत आणतात. त्या ठिकाणी इतर मुली आपल्या परड्या त्यावरच रचतात तत्पूर्वी या परड्या जाईजुईच्या अगर इतर सुगंधित पुष्पानी शृंगारून, रांगोळयात झेला, कासव, रामलक्ष्मण याच्या आकृति काढून सुशोभित करतात त्या वेळी लोकगीत गातात,

ताडावरी ताड गवराई चढू लागल्या ।
तिकडून आले शंकर, त्यांनी पदर धरिला ।
बाई पदर धरिला ।। इ० इ०

हा उत्सव चालू असताना दररोज दुपारी फुगड्या, झिम्मा, पिंगा इ० खेळ मुली व महिला खेळत असतात. त्या प्रसंगीचे लोकगीत असे,

अंगणी दूध तापे, त्यावरी पिवळी साय ।
गवराई लेकी, आज राहुनिया जाय ।
कशी राहू माये, शंकर वाट पाहे ।
शंकर घोड्यावरी, गवराई पायी राहे ।। इ० इ०

साधारणपणे दर चवथ्या दिवशी जुन्या शृंगारलेल्या परड्याचे विसर्जन करून नवीन रोषणाईच्या परड्याची मांडणी केली जाते. पण पाचव्या वेळी सजावट झाल्यावर मात्र पूर्ण विसर्जन समारंभ होतो. ह्या वेळी पुन्हा मोठ्या मिरवणुकीने या गौरीचे विसर्जन जलाशयाचे ठिकाणी केले जाते. त्या वेळचे लोकगीत तितकेच आकर्षक असते,

जा जा गवराबाई, जा जा गवराबाई ।
बाळ तुमचे भुकेलं, भुकेलं असेल माई ।
सागराचे शिंपेवरी, पाजील दूध आई ।। इ० इ०

मिरवणूक परत आल्यावर सुवासिणीला आहेर केले जातात अगर निरनिराळ्या वस्तूंची भेट देण्यात येते. या समारंभासाठी तिने जो पुढारीपणा घेतलेला असतो अगर तोशीस सोसलेली असते, त्याचाच हा अल्पसा मोबदला दिला जातो. कालमानाप्रमाणे जीवनात उत्साह निर्माण करणारी ही रूढि लोप पावत आहे. पण काही शहरी जुने रीतीरिवाज पाळणाऱ्या घरांतून ती आचरली जाते. आदिशक्तीची गौरी स्वरूपांतील ही पूजा होय.

जलाशयातून वाळू आणणे, पूजन करणे व पुन्हा जलाशयाच्या ठिकाणी विसर्जन करणे म्हणजे ज्येष्ठा गौरीचाच हा एक प्रकार आहे. पण या प्रांती तो श्रावण महिन्यात आचरतात इतकेच.

( के. अ. पोतदार, महाराष्ट्र टाईम्स १०–८–१९६७ ).

( ८ ) तुळादेवी

नमस्ते सर्वदेवांना शक्तिस्त्वं सत्यमाश्रिता ।
साक्षीभूता जगद्धात्री निर्मिता विश्वयोनिनां ॥
एकतः सर्वसत्यानि तथा भूतशतानि च ।
धर्माधर्मकृतां मध्ये स्थापितासि जगद्धिते ॥
त्वं तुळे सर्व भूतानां प्रमाणमिह कीर्तिता ।
मां तोलयन्ती संसाराद्‌धुद्धरस्व नमोऽस्तु ते ॥

दानचंद्रिका या ग्रंथामध्ये महादाने कोणती ती सांगितली आहेत. कूर्मपुराणामध्ये तीच दाने दिलेली आहेत. सोने, घोडे, तीळ, हत्ती, दासी, रथ, जमीन, घर, कन्या आणि कपिला अशी ही महादाने होत. यामध्येच तांबे, कासे, लोह, शिसे, तूप, तेल, मध इ० आणखी काहींची भर घालून ती संख्या सोळा केलेली आहे. या दानांचा संपूर्ण विधि ‘ दानचंद्रिका ’ ग्रंथामध्ये ( मराठी भाषांतर, भि. वा. ऐनापुरे, १९०८, पृष्ठे ५४ ते ६७ ) पहावयास मिळेल.

तुळादेवीची मंदिरे क्वचितच दृष्टोत्पत्तीस पडतात. हावरा रेल्वे जंक्शनपासून ६६ मैलांवर नवद्वीपधाम नावाचा रेल्वेस्थानक असून त्या ठिकाणी अनेक मंदिरे आहेत. त्यांमध्ये तुळादेवीचे एक मंदिर आहे. बंगालमधील संत श्रीगौरांगप्रभु यांच्या निमित्ताने हे स्थान प्रसिद्ध आहे.

( कल्याण मासिक, क्षेत्र अंक, १९५७, पृष्ठ १८३ ).

तुळा विधि करण्याचा विधि येणेप्रमाणे. तुळेच्या मध्यभागाच्या काट्यावर सुवर्णमय गोविंद प्रतिमा बांधावी. तुळेचा तराजू चार हात लांब व आठ साखळ्यांनी युक्त असावा आणि त्यावर उत्तम रेशमी वस्त्र व रत्नजडित

सुवर्णमाला घालून तो सुशोभित केलेला असावा. षोडशोपचार पूजेने देवतेला आवाहन करावे. तराजूला त्रिवार प्रदक्षिणा घालून तुळादेवीची प्रार्थना करावी, ' हे तुळादेवी, तू सर्व देवांची मूळशक्ति आहेस. ईश्वराने तुला उत्पन्न केले आहे. कारण जगातील सर्व सत्ये एकीकडे व सर्व असत्ये दुसरीकडे आहेत. धर्म आणि अधर्म यांचे आचरण करणाऱ्यांच्या मध्यभागी तुला स्थापन केले आहे. 'तस्मात् मला तोलून या असार संसारातून मुक्त कर. मी तुला नमस्कार करतो.'

यमराज आणि सूर्य यांच्या प्रतिमा यजमानाने दोन्ही हातात घेऊन पारड्यात बसावे. दुसऱ्या पारड्यात आचार्योनी व श्रेष्ठ तथा जेष्ठ ब्राह्मणांनी सुवर्ण अगर चांदी घालावी. ते पारडे जमिनीवर बसेल इतकी धातू त्यात घालावी. याप्रमाणे तुला झाल्यावर त्यातील अर्धे द्रव्य मुख्य आचार्यांना देऊन अर्धे इतरांना वाटून द्यावे. या विधीचा हेतु अगदी सुस्पष्ट आहे की, मानवाने आपल्या आयुष्यात जमविलेली संपत्ति विपुल असेल, तर आपल्या मृत्यूपूर्वी ती गोरगरिबांना वाटून टाकावी आणि अशा प्रकारे समाजवाद आचरणात आणावा.

भारतातील अनेक प्राचीन राजांनी अशा तुला करून आपल्या जवळचे द्रव्य गोरगरीब प्रजेला वाटून टाकल्याची अनेक उदाहरणे आहेत. राष्ट्रकूट घराण्यातील दंतिदुर्ग नावाच्या राजाने हिरण्यगर्भ व तुलादान हे दोन्ही विधि उज्जैन येथे करून त्या द्रव्यामधून अनेक मंदिरे बांधली. ही गोष्ट साधारणतः आठव्या शतकात झाली आहे.

( त्रिपाठीकृत प्राचीन भारताचा इतिहास, पृष्ठ ४१६ )

दि. १४ जून १६७४ साली शिवाजी राजांनी गागाभट्टाच्या मार्गदर्शनाखाली, रायगडावर आपणाला राज्याभिषेक करून घेतला. तत्पूर्वी प्रतापगडी देवीचे दर्शन घेऊन सव्वामण सुवर्णाची छत्री, देवीला अर्पण केलेली होती. महाराजांनी प्रथम सुवर्णतुला केली. त्याला सतरा हजार होन लागले, कारण महाराजाचे वजन सुमारे १६० पौंड होते. याच वेळी चांदी, तांबे, कापूर, साखर, लोणी, फळे, मसाले इ० अनेक पदार्थांच्या तुला करण्यात आल्या आणि सर्व पदार्थ ब्राह्मण व इतर प्रजाजन यांना वाटून टाकण्यात आले. ज्येष्ठ शु॥ १३ शके १५९६ साली पहाटे ५ वाजता ब्रह्ममुहूर्तावर महाराज सिंहासनारूढ झाले. सिंहासनाचे वजन ३२ मण सुवर्णाचे व रत्नाचे होते. समारंभाचा खर्च पन्नास लक्ष रुपये झाला. गागाभट्ट गुरुजींना एक लक्ष होन दक्षिणा दिली.

याहीपूर्वी महाराजांनी दि. ६-१-१६६५ साली महाबळेश्वरी, आपली मातोश्री जिजाबाई आणि प्रमुख मुत्सद्दी सोनो विश्वनाथ डबीर, यांच्या सुवर्णतुला करून, लोकांना संपत्तीचे दान केलेले होते.

( ब. मो. पुरंदरे, राजा शिवछत्रपति )

इतिहासकालात मोठमोठे राजेरजवाडे आपली तुला करून धनसंचयाची वाटणी करीत असत. कित्येक संस्थानच्या राजवाड्यापुढे या दानासाठी उभारलेल्या दगडी कमानी अजूनही दिसतात. इष्ट कामनासिद्धि, व्यवसायात मिळविलेल्या धनाची कृतार्थतादर्शक वाटणी होण्यासाठी शास्त्राने हा सर्वोत्तम मार्ग दाखविलेला आहे.

इंद्रायणी भीमा नदींच्या काठी एका गावी एका मराठा सरदाराने आपली सुवर्णतुला करून त्यातील द्रव्य गोरगरिबांना वाटले. वास्तव त्या गावाचे नावच 'तुळापूर' असे पडले. ही तुला १६ सप्टेंबर १६२३ या दिवशी झाली असे समजते. सन १६८९ साली ह्याच गावी गोब्राह्मणप्रतिपालक हिंदुपदपादशहा श्रीमंत छत्रपति संभाजीमहाराज ह्यांचा औरंगजेबाने क्रूरपणाने वध केला.

प्राचीन काळीच या तुला केल्या जात असे नव्हे. त्या अद्यापीही केल्या जातात. नुकतेच घडलेले एक ताजे उदाहरण डोळ्यांसमोर आहे. १९६१ साली चीनने भारतावर आक्रमण केल्यावर भारत सरकारने लष्कराच्या खर्चासाठी संरक्षण निधी उभारला. त्या वेळी अनेक शहरांनी व प्रांतांनी भारताच्या नामवंत नेत्यांच्या तुला सोने, चांदी अथवा रुपयांच्या चलनी नोटांनी केल्या आणि ते सर्व द्रव्य संरक्षण निधीला अर्पण करण्यात आले

भुजंगप्रयात

महापुण्य दाने जगीं जाण सोळा ।
परी श्रेष्ठ हे दान तोलोनि तूळा ॥
तराजूवरी मूर्ति गोविंद ठेवा ।
करा पूजने षोडशें शुद्ध भावा ॥ १ ॥
स्वये बैसुनी पिंटकामाजिं एका ।
दुजे रौप्यसौवर्ण झांकोनि टाका ॥
लुटा द्रव्य ते वांटुनि दीन लोकां ।
असे द्रव्य दे देवि तूळा अनेका ॥ २ ॥

( ९ ) पिठोरीदेवी

श्रावण महिन्याच्या अमावास्येला हे व्रत आचरतात. या व्रताच्या उत्पत्तीसंबधाने असा उल्लेख मिळतो की, इंद्रपत्नीने हे व्रत पार्वतीला सांगितले ती म्हणाली, 'फार पूर्वी श्रीधर नावाच्या एका ब्राह्मणाची सुमित्रा नावाची पत्नी होती. त्याच्या मोठ्या मुलाचे नाव शंकर असून स्नुषेचे नाव विदेहा असे होते.

ही स्नुषा दरवर्षी भाद्रपद अमावास्येच्या सुमारास प्रसूत होत असल्याने तिच्या सासऱ्याला आपल्या वडिलांची श्राद्धतिथि साजरी करणे अशक्य होई. शिवाय ते मूल जन्मत मरण पावत असे. असे सुमारे चारपाच वेळा घडल्याने वडिलांच्या आज्ञेने शंकराने आपल्या पत्नीला घराबाहेर घालवून दिले व नुकत्याच जन्मलेल्या अर्भकासह तिला वनवासाला पाठवणे भाग पडले. पण म्हणतात ना, 'देव तारी त्याला कोण मारी?' त्या जंगलात तिला एक देवता भेटली. देवतेने तिला जवळच्या एका मंदिरात रात्रभर राहण्यास सांगून 'तू जर माझे ऐकलेस तर तुझाच फायदा होणार आहे' असेही निक्षून सांगितले. देवतेच्या शब्दावर विश्वास ठेवून विदेहेने मंदिरात मुक्काम ठोकला. तो दिवस अमावस्येचा होता. नेहमी-प्रमाणे रात्रीच्या वेळी चौसष्ट योगिनी त्या मंदिरात आल्या आणि तेथील देवतेची त्यांनी षोडशोपचारे पूजा केली. प्रसाद वाटण्याच्या वेळी त्यांनी विचारले, 'आमच्याशिवाय आणखी कोणी अतिथि येथे आहे काय?' ते ऐकताच विदेहा चटकन् पुढे झाली व तिने आपली सर्व हकिकत योगिनींना निवेदन केली. ती हकिकत ऐकून योगिनींना तिची दया आली. तिची मेलेली मुले तिला परत आणून देऊन सदैव कृपेचा वरदहस्त तिच्या मस्तकावर ठेवला. इतके झाल्यावर विदेहा आपल्या मुलासह घरी परत आल्यावर घरच्या मंडळींनी मोठ्या आनंदाने तिचे स्वागत केले व या वेळेपासून ते सर्वजण सुखाने राहू लागले. त्या दिवसापासून चौसष्टयोगिनीपूजा दरवर्षी चालू झाली.

हे व्रत आचरताना योगिनींचे प्रतीक म्हणून ६४ सुपाऱ्या मांडून त्यांचे पूजन करतात अनेक पीठांच्या योगिनी या समयी एकत्र येत असल्याने या व्रताला पीठोरी अगर पीठोरी हे नाव प्राप्त झाले. या पूजनाच्या वेळी या योगिनींचे आवाहन केले जाते, त्यांची नावे येणेप्रमाणे—

दिव्ययोगी, महायोगी, सिद्धयोगी, गणेश्वरी, प्रेताक्षी, डाकिनी, काली, कालरात्री, निशाचरी, झंकारी, रौद्रवेताळी, भूतळी, भूतडामरी, ऊर्ध्वकेशी, विरूपाक्षी, शुष्कांगी, नरभोजनी, फट्कारी, वीरभद्रा, धूम्राक्षी, कलहप्रिया, राक्षसी, घोररक्ताक्षी, विश्वरूपा, भयंकरी, चंडिका, वीरकौमारी, वाराही, मुंडधारिणी, भासुरी, रौद्रझंकारी, भीषणा, त्रिपुरांतका, भैरवीध्वंसिनी, क्रोधी, दुर्मुखी, प्रेत-वाहिनी, खट्वांगी, दीर्घलंबोष्ठी, मालिनी, मंत्रयोगिनी, चक्री, कालाग्नी, ग्रहणी, कंकाली, भुवनेश्वरी, कटकी, कोटीर्नी, रौद्री, यमदूती, करालिनी, घोराक्षी, कार्मुकी, काकदृष्टी, अधोमुखी, मुंडाग्रधारिणी, व्याघ्री, किंकिणी, प्रेतभाषिणी, काल्भाषिणी, कामाख्या, उड्डाणी, योगपीठीका, महालक्ष्मी, एकवीरा, कालरात्री व पीठिका अशी ती ६४ नावे आहेत. (व्रतराज)

ज्याप्रमाणे खजुराहो अथवा अमरकंटक येथे योगिनींची मंदिरे आहेत, त्याचप्रमाणे प्रभासतीर्थाच्या ठिकाणी जी बलातिबला दैत्यघ्नी देवी आहे, तिच्या आसपास चौसष्ट योगिनी आहेत. त्यांची नावे येणेप्रमाणे—

महालक्ष्मी, क्षेमकरी, शिवदूती, महाभद्रा, भ्रामरी, चंद्रमंडला, रेवती, हरसिद्धी, दुर्गा, विषमलोचना, सहजा, कुलजा, कुब्जा, मायावी, शांभवी, क्रिया, आद्या, सर्वगता, शुद्धा, भावगम्या, मनोतिगा, विद्या, अविद्या, महामाया, सुषुम्ना, सर्वमंगला, ओंकाराख्या, महादेवी, वेदार्थजननी, शिवा, पुराणा, अन्विक्षिकी, दीक्षा, चामुंडा, शंकरप्रिया, ब्राह्मी, शांतीकारी, गौरी, ब्राह्मणा, मालिनी, त्वरिता, नित्या, साख्या, कुंडलिनी, ध्रुवा, कल्याणी, शोभना, निष्कळा, परमा, कला, योगिनी, योगसद्भावा, योगगम्या, गुह्याशया, कात्यायनी, उमा, शर्वा, अपर्णा व अनित्या. ( स्कंदपुराण, प्रभास, अध्याय ११९ )

शिखरिणी

पिठोरी देवीचे व्रत-गृह्-कुळीं पूजित सदा ।
अमावास्यादीनीं शुचित महिना श्रावण तदा ॥
क्रमानें योगिनी वसवितही चौसष्ट सदनीं ।
अशी भक्तीभावे तन-मन-धने पूजि जननीं ॥ १ ॥
अनेक पीठांच्या समयिं सदनीं देवि जमती ।
पिठोरी नामाते म्हणुनि जन त्यांनाच वदती ॥
वरप्राप्तीनेंही सुत-धनहि सौभाग्य मिळतें ।
म्हणोनी मातांनो शुचित मनिं पूजा तुम्हि व्रतें ॥ २ ॥

( १० ) बृहद्गौरी

चतुर्भुजां सुवर्णाभां नानालंकारभूषितां ।
हिमेंदुतुहिनाभासां मुक्तामणिविभूषितां ॥
पाशांकुशधरां देवीं ध्यायेत् सर्वार्थसिद्धिदां ।
कमंडलुधरासूक्ष्मां पानपात्रं च बिभ्रतीं ॥ १ ॥

भाद्रपद महिन्याच्या कृष्ण तृतीयेपासून दशमीपर्यंत हे व्रत आचरतात. यालाच कोणी डोलीव्रत असेही म्हणतात. तृतीयेच्या रात्री चंद्रोदय पाहिल्यावर स्नान करून व्रतास सुरुवात करावी. शक्य झाल्यास पाच सुवासिनींसह देवीची पूजा करावी. मूर्ति सुवर्णाची, चार भुजा असलेली, नानालंकारविभूषित, हातामध्ये पाश,

अंकुश इत्यादि आयुधे असलेली अशी वरील वर्णनाची बनवावी. त्यानंतर पाद्य, अर्घ्य, पंचामृतस्नान, वस्त्र, अक्षता, चंपकपुष्पे, धूपदीप, विडा, दक्षिणा, प्रार्थना इत्यादि षोडशोपचारे पूजा करून ज्या वाळूमंडलावर देवतेला आसन दिले असेल त्याला प्रदक्षिणा घालून सौभाग्यवर्धनासाठी प्रार्थना करावी. हातामध्ये दोरक बांधावा आणि चंद्राला अर्घ्यदान करावे. देवीसमोर बसून एकाग्रचित्ताने तिची कथा ऐकावी. नंतर गोधूम-चूर्ण व पक्वान्ने यांचे भोजन गुरुजींना देऊन स्वतः थोडा प्रसाद ग्रहण करावा. काही ठिकाणी दोरक गळ्यात बांधण्याची चाल आहे.

याप्रमाणे पाच वर्षपर्यंत हे व्रत आचरून उद्यापनाच्या वेळी सुवर्णाचा अगर चांदीचा दोरक बनवून तो ब्राह्मणाला दान करावा. सुवासिनींची पूजा करावी व त्यांना भोजन घालावे. पूर्वी हे व्रत कोणी केले यासंबंधाने एक कथा श्रीशिवशंकरांनी आपली पत्नी पार्वती हिला सांगितली आहे, ती अशी. द्वापार युगाच्या अंती माता कुंती हिच्या पतीला कोणीतरी विचारले की, 'तुला मुले का होत नाहीत?' त्यावर त्याने सांगितले की, 'कोणा एका ऋषींच्या शापामुळे ती होत नाहीत.' त्यानंतर कुंती आपल्या वडिलांच्या घरी गेली असता तिने त्याना उपाय विचारला. त्या वेळी व्यासऋषींनी तिला हे बृहद्गौरीचे व्रत संततिदायक व अक्षय्य सौभाग्यवर्धन करणारे असल्याने ते आचरण्यास सांगितले. उद्यापन करताना बृहतीची ( रिंगणीची ) ६४ सुवर्णफळे करून ती देवीला अर्पण करावीत. पाच सुवासिनींना वस्त्रालंकार देऊन वायने द्यावीत. असे केल्याने मनोवांछित संततिप्राप्त होते. ( रणवीरव्रतरत्नाकर ).

शिखरिणी

बृहद्गौरी कृष्णा तृतिय तिथिला भाद्रपदिंहो।
व्रता पूर्वी कोणी जननि जमुनि पुण्यप्रदहो ॥
चतुर्भुजा मूर्ति बनवी सिकता-मंडळ शिरीं।
विधीने पूजोनी मनगटिं धरी दोरक करीं ॥ १ ॥

वसंततिलका

येणेपरी सु-व्रत आचर पांच वर्षे।
उद्यापनीं फळ मिळे सुत पुत्र हर्षे ॥
सौवर्ण दोरकरिचा गुरुजींस द्यावा।
गोधूम-चूर्ण-कडवैः रसपाक खावा ॥ २ ॥

(११) महालक्ष्मी व्रत

भाद्रपद महिन्याच्या शुक्ल अष्टमीच्या दिवशी सूर्य कन्याराशीत प्रवेश करण्यापूर्वी हे व्रत चालू करावे. शक्य तर त्या दिवशी ज्येष्ठा नक्षत्र असावे. हा साधारणपणे गौरीगणपति विसर्जनाचा दिवस येतो. पंचांगामध्ये त्या दिवशी 'स्त्रीणां दोरकग्रहणं' असे नोंदलेले असते. सामान्यतः हे व्रत सोळा दिवस करतात. स्त्रिया व पुरुष या दोघानाही हे व्रत आचरिता येते.

( पुरुषार्थ चिन्तामणि ).

हे व्रत आचरणाऱ्याने चंदनाने लक्ष्मीची प्रतिमा काढावी. त्याच्या शेजारी सोळा दोरे एकत्र केलेला आणि सोळा गाठी मारलेला दोरक तयार करून ठेवावा. 'लक्ष्मै नमः ।' या मंत्राने प्रत्येक गाठीचे पूजन करून लक्ष्मीचेही पूजन करावे.

धनं धान्यं धरां हर्म्यं कीर्तिमायुर्यशः श्रियम् ।
तुरगान् दन्तिनः पुत्रान् महालक्ष्मि प्रयच्छ मे ॥

या मंत्राचे पठण करून तो दोरक उजव्या हाताच्या मनगटी बांधावा. हातामध्ये सोळा दुर्वा आणि सोळा अक्षताचे दाणे घेऊन कथा ऐकावी.

या व्रताचरणाचे फळ म्हणून हेमाद्रि असे सांगतात की, या व्रताचे आचरण करणाऱ्याला लक्ष्मी तीन पिढ्यापर्यंत लाभते, दीर्घायुष्य आणि उत्तम प्रकृतिमान राहते. महालक्ष्मीमाय कोल्हापूरला जागती होते आणि आशीर्वाद देते. कन्याराशीत सूर्य असताना येणाऱ्या अष्टमीला हे व्रत समाप्त करावे. पाच वर्षे याप्रमाणे व्रताचरण केल्यावर उद्यापन करावे.

( हेमाद्रि, भाग पहिला, पृष्ठे ४९५ ते ४९९ ).

याशिवाय महालक्ष्मीपूजनाचा दुसरा एक विधि महाराष्ट्रात प्रचलित आहे. आश्विन नवरात्रामध्ये शु० सप्तमी अथवा अष्टमीच्या दिवशी हा कार्यक्रम होतो. हा त्रिरात्रोत्सव असतो. सरस्वती आवाहन, सरस्वती पूजन आणि सरस्वती विसर्जन. या दिवशी कोकणस्थ ब्राह्मण समाजात 'घागरी फुंकण्याचा' समारंभ करतात. ही महालक्ष्मी म्हणजे अष्टादशभुजा महिषासुरमर्दिनीचेच स्वरूप होय. या देवीच्या स्वरूपाचे जे ध्यान दिले आहे, त्यावरून वरील अनुमान काढता येते. ( महाराष्ट्रातील चार दैवते, ले. ग. ह. खरे, पृष्ठ ५१ ).

या पूजनासाठी देवीची तांदळाच्या उकडीची अथवा सोन्याची मूर्ति बनवितात. काही ठिकाणी ती चिकणमातीचीही बनविली जाते. सायंकाळी या

देवतेचे पूजन-अर्चन झाल्यावर देवीचा अंगात संचार होणारे स्त्री-पुरुष तिच्यासमोर खेळतात, म्हणजेच अंगात संचार झालेल्या स्थितीमध्ये नाचत असतात. त्यांच्या हातामध्ये घागर असून तिच्या मुखातून फुंकर घालून आवाज काढला जातो. देवीच्या समोर धूप जळत असलेली शेगडी असते. त्यावर त्या घागरी वेळोवेळी धूपवाव्या लागतात व एकसारख्या बदलाव्या लागतात. अनेक स्त्रिया व पुरुष याप्रसंगी दर्शनासाठी उपस्थित असतात. देवीला वस्त्र म्हणून रेशमाचा तंतू वाहण्याचा प्रघात आहे. या समारंभाचे वेळी अनेकजन संचार झालेल्या स्त्रीपुरुषांना—नव्हे त्यांच्यातील 'आई'ला—प्रश्न विचारून आपल्या संकटमुक्तीचा मार्ग जाणून घेतात. साधारणतः मध्यरात्रीपर्यंत हा कार्यक्रम चालतो. देवीसाठी 'बोडण' करण्याचा प्रघात याच समाजात आहे. या समारंभाच्या वेळी मी (प्रस्तुत ग्रंथाचा लेखक) अनेक वेळा पाहिले आहे की, या ठिकाणी निरनिराळ्या पीठदेवतांचा संचार भक्तांमध्ये झालेला असून अमूक एक वारे कोणत्या देवीचे आहे, याबद्दल एकमेकांत चौकशी चाललेली असते. समाधानकारक उत्तर जर मिळाले नाही, अगर अंगात वारे आलेले नसताना कोणी खोटाच आविर्भाव करीत असेल, तर त्या व्यक्तीला त्या बाहेर घालवितात. इतकेच काय, त्यांची एकमेकांत भांडणे देखील होतात! घागरीवर घागरी आपटून मोठे आवाज करतात, फुगड्या घालण्यासाठी बोलावतात आणि खऱ्याखोट्याचा निर्णय लावून घेतात.

देवीचे वारे पुरुषाच्या अंगातही येते, हे वर आपण पाहिलेच आहे. अशा एका गृहस्थाला यासंबंधी जास्त माहिती विचारली असता तो म्हणाला की, सुमारे दहा वर्षांपूर्वी एकाएकी त्याच्या अंगात देवीचा संचार झाला व वारे येऊ लागले, ते अगदी आजतागायत (सन १९६८). अष्टमीच्या दिवशी सायंकाळपासून तो बेचैन होऊ लागतो आणि दिवस मावळताच त्याच्या अंगात देवीचा संचार होतो. ज्या ठिकाणी महालक्ष्मीचा मुखवटा मांडून तिचा समारंभ साजरा होत असेल अशा ठिकाणी त्या स्थितीतच तो आपोआप ओढला जातो. त्या ठिकाणी जाऊन खेळल्याशिवाय त्याच्या मनाला स्वस्थताच लाभत नाही. घरीच बसून राहिल्यास किंवा बाहेर पडण्यास कोणी प्रतिबंध केल्यास दोनतीन दिवस त्याचे अंग दुखत राहाते, पण तेच समारंभाच्या ठिकाणी जाऊन खेळल्यास दुखत नाही. त्याने पुढे असेही सांगितले की, एकाच वेळी एखाद्याच्या शरीरात आठ आठ देवतांचा संचार होतो, कोणी त्यांची स्थाने विचारल्यास त्या त्याप्रमाणे उत्तरे मिळतात. त्याच्या स्वतःच्या अंगात महालक्ष्मी, सप्तशृंगी, तुळजाभवानी इत्यादि देवींचे वारे येत असते.

दि १३-१०-६४ रोजी लेखकाने याचा प्रत्यय घेतला आहे त्या दिवशी गोरेगाव येथील जगदाई देवस्थानामध्ये १०-१२ महिलांचे अंगात देवता संचार झालेला असताना, प्रत्येकीजवळ विचारणा केली असता, कोणी सांगितले मी कोल्हापूरची लक्ष्मी आहे, दुसरी म्हणाली मी आवे जोगेश्वरीची आहे, तिसरी म्हणाली मी वणीची सप्तशृंगी आहे, इ० इ० उत्तरे लेखकाला मिळाली तात्पर्य त्या दिवशी हा देवतांचा मेळावाच समजावा।

हे वारे विधवा स्त्रियांच्या अंगातही येते परंतु शक्यता त्या खेळण्यास बाहेर पडत नाहीत याचे मुख्य कारण म्हणजे समारंभात अनेक सुहासिनी अशा देवतासंचार झालेल्या स्त्रियांना कुंकू लावतात देवीचा संचार होणाऱ्या व्यक्तीला अतिशय पवित्र रहावे लागते, विटाळ, शिवाशिव टाळावी लागते. जर असे काही पाळले नाही, तर अंगात देवीचा संचार होण्याचे बंद होते. त्याचप्रमाणे अशीही काही उदाहरणे आहेत की, अष्टमीव्यतिरिक्त एरव्हीच्या दिवशी अंगात संचारणार असेल तर पहाटे स्वप्नात एकादी बाई येऊन ‘ सायकाळी मी येणार आहे ’ असे सांगते आणि त्याप्रमाणे देवीचा संचार होतो अंगात वारे येणाऱ्या अनेक स्त्रिया हातामधून कुंकू अगर अन्य वस्तु काढून दाखविण्याचीही किमया करतात, हे मी प्रत्यक्ष पाहिले आहे (देवीकोश, खंड १, तुळजाभवानी पहा )

या महालक्ष्मीसंबंधी अशी कथा सांगतात की, प्राचीन काळी शंभर वर्षे देवदानवांचे युद्ध चालू होते. त्या वेळी कोलासूर नावाचा एक प्रबळ दैत्य गोमांत पर्वताच्या आश्रयाला राहून अनेक सुंदर सुंदर राजकन्यांचे अपहरण करी आणि त्यांचा उपभोग घेई दैत्यांचा सेनानी वृत्रासूर हा तर देवांचा पुरंदर होता अशा वेळी अगस्ती मुनि त्या ठिकाणी आले असता त्यांनी सर्व वृत्तांत ऐकला देवांनी त्यांना या दैत्याचा विनाश करण्याची विनंती केल्यावरून मुनींनी मैत्रा वरूणी देवीचे स्मरण केले तसेच ब्रह्मा, विष्णु, महेश यांचेही स्मरण करून ते ध्यानस्थ बसले याप्रमाणे देवतांचे आवाहन चालले असता महालक्ष्मीने प्रकट होऊन अगस्ती ऋषींच्या आदेशानुसार त्या कोलासूर दैत्याचा नाश केला त्याच्या बंदीखान्यात असलेल्या अनेक राजकन्यांची त्यामुळे सुटका झाली आणि त्या आनंदाने घरोघर परतल्या (व्रतराज, पृष्ठ १८०)

शिखरिणी

महालक्ष्मीचे व्रत जन बहू पाळित असे।
शुभा आश्विनाच्या प्रथम पदिं अष्टादिनिं कसे॥
तदाकारें रूपे रमत नर नारी तरि किती।
निवाराया दुःखे समर्थि कुणि हो प्रश्न करिती॥ १॥

वसंततिलका

मूर्ती करूनि तिजला सजवी सुरेख।
देवी समोर मग खेळति त्या अनेक॥
त्या फुंकिती सतत घागरि हो कितीक।
येणेंपरी व्रतहि आचरिती अनेक॥ २॥

(१२) मंगळागौरी

विवाह झाल्यानंतर पाच वर्षपर्यंत स्त्रीने हे व्रत आचरावयाचे असते. श्रावण महिन्यातील प्रत्येक मंगळवारी देवीची पूजा केली जाते. बहुधा हे व्रत सासरीच आचरण्याची पद्धत आहे. तर काही ठिकाणी पहिल्या वर्षी मात्र हा समारंभ माहेरीच उरकतात. हे व्रत म्हणजे उमा-महेशाचीच पूजा होय. पूजेसाठी सोळा सुवासिनी, सोळा प्रकारची फुले व पत्री असे साहित्य जमा केले जाते.

"पीठोपरी गौरीं स्थापयित्वा तदग्रे लोकव्यवहारानुरोधेन् पिष्टमयान् दृषदुपलादींविधाय।" (इति व्रतराज)

भावार्थ असा की, पीठदेवतेप्रमाणे गौरीची स्थापना करून त्याच्या समोर पिठाची देवीची मूर्ति करून ती पूजेसाठी बसवावी. तसेच एक पिठाची सोळा पाळ्याची समई बनवावी आणि त्यामध्ये तूप घालून सोळा वाती जाळाव्यात. सर्व सुवासिनींनी देवीची षोडशोपचारे यथाविधि पूजा करावी आणि नंतर आरती करावी. त्यानंतर एका पितळेच्या भांड्यात हळद, कुंकू, काजळ फणी, करंडा, कंचुकी, तांबूल, दक्षिणा, फुलाची वेणी, नारळ इत्यादि वस्तु घालून तें वायन मातेला अथवा मातृवंशीय सुहासिनीला द्यावे. तसेच ब्राह्मणालाही हे वायन द्यावे. त्याचा मंत्र असा.

सौभाग्यारोग्यकामानां सर्वसमस्तसंमृद्धये।
गौरीगिरीशतुष्ट्यर्थं वायनं ते ददाम्यहम्।

दोन प्रहरीचा हा कार्यक्रम आटोपल्यावर सायंकाळी पुन्हा देवीची आरती करावी. रात्रभर खेळून जागरण करून देवीलाही जागवावे. दुसरे दिवशी प्रातःकाळी सुस्नात होऊन गौरीचे विसर्जन करून प्रतिमा ब्राह्मणाला द्यावी. हे व्रत प्रायः महाराष्ट्रात सर्वत्र आचरले जाते.

या व्रताची कथा अशी. प्राचीनकाळी कुंडिणपूर नगरामध्ये धर्मपाल या नावाचा एक ब्राह्मण राहात होता. त्याने एका जटाधारी भिक्षेकऱ्यास बळेच

एक सुवर्णाचा तुकडा दान दिला. त्यामुळे त्याने त्या ब्राह्मणाला शाप दिला की, एक तर तुझा निर्वंश होईल आणि जर समजा पुत्र झालाच तर त्याला अल्पवयातच मृत्यु येईल.' कसेही असो, त्या धर्मपालाला काही दिवसांनी पुत्ररत्न झाले. काशी क्षेत्री नित्य वास्तव्य केल्यास कदाचित अकाली मरण टळेल या विश्वासाने तो वाराणशी येथे जाऊन राहिला. धर्मपालने एके दिवशी रस्त्यामध्ये मुला मुलींचा संवाद ऐकला 'तुम्ही कितीही शाप मला दिलेत तरी मी अखंड सौभाग्यवतीच राहीन. कारण माझी आई मंगळागौरीचे व्रत करीत असते.' आपल्या मुलाचे अपघाती मरण टाळण्यासाठी त्याने ती मुलगी व आपला मुलगा यांचा विवाह घडवून आणला. मुलगा सोळा वर्षांचा झाला असता भिक्षेकऱ्याच्या शापाने त्याला सर्पदंश होण्याचा काळ समीप आला. या सुमारास स्वप्नात देवी येऊन त्या मुलीला दृष्टांत दिला की, 'तुझ्या पतीला दंश करण्यासाठी एक सर्प येईल. त्याला निर्भय वृत्तीने पकडून एका 'मडक्यात कोंडून कंचुकीने त्याचे तोंड घट्ट बांधून टाकून मातेला ते वायन म्हणून दे.' दुसरे दिवशी खरोखरच एक सर्प आला. देवीने सांगितल्याप्रमाणे त्या मुलीने सर्व काही केले. आईने ते मडके उघडून पाहिल्यावर तिला त्यामध्ये एक मोत्याचा हार मिळाला. पतीचा संभाव्य मृत्यु टळला. या प्रमाणे हे व्रत अशा रीतीने पतीचे आयुष्य वाढविणारे सौभाग्यदायी आहे. व्रतराज या ग्रंथातील ७८७ व्या पृष्ठावरही अशीच कथा दिलेली आहे.

(आर्यांच्या सणांचा इतिहास, पृष्ठ १८४).

मंगळागौरीची मंदिरे अनेक ठिकाणी आढळतात.

(१) गया येथे ब्रह्मसरोवराजवळ मंगळागौरीचे एक मंदिर आहे. सुमारे १२५ पायऱ्या चढून गेल्यावर देवीचे दर्शन होते. याच ठिकाणी एक अविमुक्तेश्वराचे प्राचीन मंदिर आहे. (कल्याण क्षेत्रअंक, सन १९५७, पृष्ठ १६३)

(२) जगन्नाथपुरीपासून ३९ मैल अंतरावर काकटपूर नावाचे गाव आहे. येथे प्राची नदीच्या तीरावर मंगलादेवीचे मंदिर असून त्या ठिकाणी वीणायंत्राची पूजा होते. (कल्याण क्षेत्रअंक, सन १९५७, पृष्ठ २०३).

कलकत्ता बनगाव रेल्वे मार्गावर लियालदह या स्थानकापासून छत्तीस मैल अंतरावर चंडीतला नावाचे गाव आहे. त्या गावी काकडा ओढ्याच्या काठी एका वृक्षाखाली मंगलादेवीचे मंदिर असून त्या ठिकाणीही वीणायंत्राचीच पूजा होते. सतीची कांकणे या ठिकाणी पडली असल्यामुळे हे एक शक्तिपीठ मानले जाते. परंतु ५१ शक्तिपीठांच्या यादीत त्याचे नाव आढळत नाही.

(कल्याण क्षेत्रअंक, पृष्ठ १८२).

(४) वायव्य रेल्वेमार्गावर बेगुसराय रेल्वेस्थानकापासून बारा मैल अंतरावर जयमंगलादेवीचे स्थान आहे. प्रति मंगळवारी या देवीवर अनेक भक्त जलाभिषेक करीत असतात. या स्थानाजवळून कावर नावाचा ओढा वाहत आहे. (कल्याण शक्तिअंक, सन १९५७, पृष्ठ १५०)

दिंडी

श्रावणातिल सर्व भौमवारीं ।
नवपरिणित वधू जमुनि एकदारीं ॥
देवी मंगळागौरीस पूजितीही ।
व्रता आचरिती पंचवर्ष पाही ॥ १ ॥

शिखरिणी

व्रतासाठीं सोळा नववधू वशाळ्या जमविती ।
फुलें पत्री सोळा विविध तरु–वेली जमविती ॥
दिवावाती सोळा परजुनि तुझी आरति करी ।
सुपक्वान्नें सोळा सखिजनसवें भोजन करी ॥ २ ॥

वसंततिलका

रात्रीस जागरण खेळुनि घालताती ।
उद्यापना व्रत करीत दुज्या प्रभातीं ॥
सौभाग्य खंडित न हो सुखप्राप्ति लाभे ।
देवी सुपुत्र मज दे कुलवर्धना गे ॥ ३ ॥

(१३) ललितागौरी

शरद नवरात्रीच्या पंचमीला हे व्रत आचरतात. या व्रताची उत्पत्ति कशी झाली, त्यासंबंधाने ही कथा पहा. श्रीरामचंद्रांनी रावणाचा वध करून व बिभीषणाला गादीवर बसवून ते अयोध्येला परतले. त्यानंतर अंतस्थ शत्रूंनी उठाव करण्यास सुरुवात केली. कुंभकर्णाचा पुत्र कौ[illegible]क ह्याची भार्या आपल्या पतीला म्हणाली, 'रावणाच्या नाशाला बिभिषणच कारणीभूत असून त्यानेच राज्य बळकावले आहे. त्याचा सूड आपण घ्यावा आणि राज्यपदाचीही प्राप्ति करून घ्यावी.' भार्येचा हा उपदेश मनाला पूर्णपणे पटल्यावर मदतीसाठी तो पाताळात शतमुख रावणाकडे गेला व त्याच्याजवळ मदत मागितली. त्याने ती मदत आनंदाने दिली. आपल्या सैन्यासह शतमुख रावण लंकेवर स्वारी करून आल्यावर बिभीषण अतिशय घाबरला आणि साहाय्यार्थ तो रामप्रभूकडे

पळाला. आपल्या भक्ताच्या रक्षणार्थ सैन्यासह रामप्रभूही लंकेमध्ये आले. रामरावणाचे युद्ध जुंपले. परंतु रामरायांना जयाची खात्री वाटेना.

अशा भीतिदायक प्रसंगी नारदमहर्षी त्या ठिकाणी प्राप्त झाले. ते रामाना म्हणाले, 'शतमुख रावणाचा मृत्यु सीतादेवींच्या हातून घडणार असल्याने त्यांना तावडतोब बोलावून घे.' सीतादेवीला आणण्याची कामगिरी अर्थातच मारुतीरायावर आली कारण इतक्या त्वरेने हे काम करण्यास दुसरा कोणीच समर्थ नव्हता. वायुवेगाने मारुतीराय अयोध्येला पोहोचले. परंतु त्या वेळी सीतादेवी मंचकावर पडून निद्रासुख अनुभवीत असताना आढळली. झोप मोडण्याचे पातक आपल्या माथी न यावे यास्तव पलंगासहित तिला उचलून मारुतीरायांनी लंकेत आणली. नारदाच्या उपदेशाप्रमाणे रामरायांनी तिची पूजा करून शतमुख रावणाचा वध करण्याची तिला विनंती केली. सीतादेवीने अति उग्र असे ललितादेवींचे रूप धारण केले. चारी हातात शस्त्रे घेऊन शतमुख रावणाचा वध केला. सीतादेवीने हे अद्‌भुत व उपकारक कृत्य आश्विन शु. पंचमीला केले. त्याची स्मृति म्हणून हे व्रत त्या दिवशी आचरले जाते.

अद्‌भुत रामायणातील कथेप्रमाणे (अध्याय तेविसावा) या ठिकाणी सीतामाईने सहस्रमुख रावणाचा वध केला असे निवेदिले आहे. त्याच वेळी सीतेच्या शरीरातून हजारो मातृका उत्पन्न झाल्या आणि त्यांनी रावणाची शमर शिरे तोडून त्याबरोबर त्या चेंडूसारख्या खेळू लागल्या. या व्रतपूजनाच्या वेळी व्रताची पूजा झाल्यावर ललितागौरीची कथा ऐकावी.

याच दिवशी ललिता-दशरथ व्रत आचरण्याचीही रूढि कित्येक ठिकाणी आहे. त्याची कथा अशी. पांच पांडव वनवासात असताना श्रीकृष्णांनी त्यांना दुःखविमोचनास्तव हे व्रत आचरण्यास सांगितले. राजा दशरथाला पुत्रसंतान नव्हते. तेव्हा ऋष्यशृंग मुनींना बोलावून घेऊन त्यांना आपले दुःख निवेदन केले असता, त्यांनी कौसल्येला हे व्रत करण्यास सांगितले. चंद्राची स्त्री रोहिणी हीच ललिता म्हणून समजावी. आश्विन कृ. चतुर्थीच्या दिवशी ह्या व्रतास प्रारंभ करून दहा दिवस त्याचे आचरण करावे. दररोज सायंकाळी स्नान करून शुचिर्भूत होऊन जेव्हा चंद्रोदय होईल, तेव्हा पुष्पे, चंदन, पंचरत्न इत्यादि पदार्थांनी त्याला अर्घ्य द्यावे आणि त्याची प्रार्थना करावी,

> "हे ललितादेवी, दहा पुष्पांसहित तुला अर्घ्य समर्पण केले आहे. त्याचा तू स्वीकार कर. मी तुला नमस्कार करते. हे ललितादेवी, दशरथ राजापासून (अर्थातच माझ्या पतीपासून) मला पुत्रसंतान व्हावे, यास्तव मी हे व्रत आचरीत आहे. त्यासाठी माझी इच्छा तू पूर्ण कर."

हे व्रत दहा वर्षांपर्यंत आचरावे आणि प्रत्येक वर्षी पाण्याने भरलेली दहा मटकी ब्राह्मणाला दान द्यावीत. स्त्री-पुरुषांनी हे व्रत आचरावयास काहीच हरकत नाही. या व्रताचे फल म्हणून पुत्र, पौत्र, धनधान्य इत्यादि सर्व काही विपुल मिळते. व्रताच्या उद्यापनाच्या वेळी चांदीचा चंद्र व सुवर्णाची रोहिणी बनवून त्याची यथाभाग पूजा करून ब्राह्मणाला दान करावी. होमहवन करताना तीळ व दुधाची आहुति द्यावी. (व्रतराज, गुजराथी प्रत, पृष्ठ ७५)

सूर्यकांत

ललितागौरी देवी पूजितो नवरात्री-पंचमी ।
कवी जनाला उगम सांगतो घडे व्रतापूजनीं ॥
रावण वधुनि बिभीषणाला रामाने निज करीं ।
राज्यपदावरी स्थापुनि त्याला जाइ अयोध्यापुरी ॥
कुंभकर्ण-सुत-कौशिक भार्या दावि कपटाप्रति ।
शतमुख रावण स्वारी करितो, कौशिक विनतीप्रती ॥

मालिनी

शतमुख शतसेना शोध घेता पवाला ।
त्वरित कथित रामा शत्रूचा घोर घाला ॥
रथहयशिबिकाने रामसेना निघाली ।
बिभीषण तनु-कापे मानितो राम वाली ॥ २ ॥

दोधक

सज्जन पालक तो रघुराम । दुस्तर संगरिं सोडित बाण ॥
दारुण भासत शत्रू रणांत । तो विजयाप्रति शंकित जाण ॥ ३ ॥

चंद्रकांत

नारद प्रकटे पाहि दैना बोले रामाला ।
शतमुख रावण वधण्यासाठी आणी सीतेला ॥
वायुसुताला आज्ञा होतां सीता हो आली ।
नारद विनवी, रामा पूजी सीतादेवी ही ॥
मनीं चरकला, जरा दचकला पत्नी पूजेला ।
हांसे नारद बोले नाहीं अन्य उपायाला ॥ ४ ॥

भूपतिवैभव

मग पूजन केले रामाने सीतेचे ।
सतोष पावला ललितागौरी बनते ॥
ती चार भुजाते शस्त्रअस्त्र घेते ।
शतमूख रावणा मारुनि विजयी होते ॥ ५ ॥

वसततिलका

तो वध्य दीन जगती बहुमान्य झाला ।
आश्वीनमासिं नवरात्रीहि पचमीला ॥
सीतेसि पूजन घडे ललिता स्वरूपे ।
घेता व्रतास नमिती जन हो तियेते ॥ ६ ॥

ललितादेवी पीठदेवताही आहे त्याचा इतिहास पीठदेवता प्रकरणात पाहावा.

(१४) वरलक्ष्मी

यदा रवौ कुलीरस्थे मासे च श्रावणे तथा ।
तस्मिन् वै श्रावणे मासे शुक्लपक्षे भृगोर्दिने ।
प्रारब्धव्य व्रत तत्र महालक्ष्म्या यतात्मभि ॥

श्रावण महिन्यातील शुक्रवारी ज्या दिवशी पौर्णिमा येईल त्या वेळी या व्रताचा वसा घ्यावयाचा आणि पुढे चालू ठेवायचे चतुर्भुजा लक्ष्मीची सुवर्णाची प्रतिमा करून व तिची षोडशोपचारे पूजा करून तिला नैवेद्य समर्पण करावा नैवेद्याला २१ मोदक, घारगे अगर अनारसे करून नतर ते ब्राह्मणाला दान करावेत 'मत्पूजा तत्र कर्तव्या, वर दास्यामि काक्षितम् ।' असे देवीचे वचन आहे (सागगणी सर्वपूजाकथासग्रह) हे व्रत प्राय दाक्षिणात्य लोकच विशेषेकरून आचरतात त्याबद्दल ते असा खुलासा करतात की, पाऊसपाणी उत्तम झाल्यामुळे या दिवसापर्यंत धान्याची पेरणी अथवा लावणी झालेली असते आणि जलदेवता प्रसन्न झाल्यामुळेच ही सर्व आबादीआबाद झालेली असते तो आनद साजरा करण्यासाठीच हे व्रत आचरून इष्टमित्राना प्रसाद वाटला जातो

या व्रताच्या उत्पत्तीची कथा अशी सागतात की, एकदा पार्वतीसह शकर सभाषण करीत बसले असता चित्रनेमी तेथे गेला आणि त्याने काही खोडसाळ व अश्लील भाषण केले त्यामुळे पार्वतीला राग येऊन तिने त्याला शाप दिला की, 'तू कुष्ठी होशील आणि सरोवराच्या तीरी व्रत केल्यावरच तुझी काया पूर्ववत्

होईल.' शापाचा परिणाम तात्काळ होऊन चित्रनेमी कुष्टी झाला. रात्रंदिवस भटकत असता एके दिवशी अरण्यामध्येच एका तळ्याच्या काठी तो येऊन बसला. त्याच ठिकाणी त्याच्या सुदैवाने काही स्त्रिया हे व्रत आचरीत होत्या. चित्रनेमीने त्यांच्याकडून हे व्रत समजावून घेऊन त्याच ठिकाणी त्याचे आचरणही केले. पार्वतीने दिलेल्या उःशापानुसार तो पुनश्च पूर्ववत झाला. हे व्रत वरलक्ष्मीचे होते.

(व्रतराज)

आर्या

श्रावण पौर्णिमेच्या भृगुवासरी ते व्रतांस हो घेती।
वरलक्ष्मीचे आधी करुनी पूजन सदैव आचरिती॥
चार भुजांची कांचन धातूची लक्ष्मीच घडवीती।
षोडशपूजा करुनि नैवेद्या मिष्ट-अन्ने अर्पिती॥ २॥
संतुष्ट होत लक्ष्मी इच्छित वर दे व्रती सु-भक्ताला।
म्हणुनी वरलक्ष्मी हे नाम दिले विष्णुस्याच लक्ष्मीला॥ ३॥

## (१५) षष्ठीदेवी

या देवीच्या उत्पत्तीची कथा अशी देतात की, प्राचीन काळी प्रियव्रत नावाचा एक राजा होता. त्याच्या पत्नीचे नाव मालिनी असे होते. त्याला पुत्रसंतान नव्हते. म्हणून त्याने पुत्रकामेष्टी यज्ञ केल्यावर त्याला पुत्रप्राप्ति झाली. पण जन्मतःच तो मुलगा मृतावस्थेत बाहेर निघाला. त्याचे डोळेही उलटेच होते. उत्तरक्रियेसाठी त्याला स्मशानात नेले असता अवचितपणे त्या ठिकाणी एक विमान आले आणि त्यातून एक दिव्य स्त्री खाली उतरली. तिने स्वतःच आपली ओळख करून दिली. ती म्हणाली, 'मी स्कंदपत्नी असून, ब्रह्मदेवाची कन्या देवसेना होय.' मूळ प्रकृतीच्या सहा अंशानी तिचे स्वरूप बनले असल्याने तिला षष्ठी असे नाव मिळाले. त्या देवतेने मृत बालकाला वर उचलून घेताच ते जिवंत झाले. देवी त्या मुलाच्या मातापित्यांना म्हणाली, 'ह्याच्या भाळी मी ललाटलेख लिहिलेला आहे. त्याप्रमाणे हा पुत्र त्रैलोक्यात पराक्रमी राजा होईल.' ही गोष्ट ज्या दिवशी घडली तो दिवसही कर्मधर्मसंयोगाने षष्ठीचा होता आणि म्हणूनच हे व्रत आचरण्याची रूढि चालू झाली.

(देवी भागवत, अध्याय नववा, पृष्ठ ४६).

या देवतेची दुसरी एक उत्पत्ति अशी देण्यात आली आहे की, एकदा भगवान शंकरांनी प्राणिमात्राच्या सुखस्वास्थ्यासाठी मोठा यज्ञ केला. २१ दिवस पर्यंत तो चालत असून मार्गशीर्ष कृ. १ ला पूर्ण झाला. पूर्णाहुतीच्या

वेळी त्या यज्ञकुंडातून एक देवता उत्पन्न झाली, तीच सटवी अथवा षष्ठी देवता होय नवीन जन्माला आलेल्या बालकाचे हानी, लाभ, मृत्यु इ० भविष्य पाहण्याचे काम तिच्याकडे सोपविण्यात आले या देवीला कोणी जिवती असेही म्हणतात
(आत्मज्ञान ग्रंथ, ले वि ना पावस्कर पृ ९६)

या देवीची प्रतिमा तयार करावी अथवा शाळिग्राम अगर कलश याची षोडशोपचारे पूजा करावी या प्रतिमापूजनाचे फल म्हणून दीर्घजीवी पुत्ररत्न प्राप्त होते, वंध्येला पुत्रप्राप्ति होते, काकवंध्या अथवा मृतवत्सा स्त्रीला या देवीच्या कृपेने दीर्घजीवी पुत्राचा लाभ होतो लहान बालकाची व्याधी अगर पीडा नष्ट होते या देवीबद्दलचे संपूर्ण विवरण हवे असल्यास जिज्ञासूंनी देवीभागवत स्कंद ९ हे प्रकरण मूळातूनच वाचावे

ब्रह्मवैवर्त पुराण (४३ ३ ७२) या देवीचे नाव 'देवसेना' असे सांगून ती स्कंदाची पत्नी असल्याचे सांगते 'तपस्विनी विष्णुभक्ता कार्तिकेयस्य कामिनी' असे ह्या पुराणात एक वचन आहे

'मंत्रशास्त्र' या नावाचा एक ग्रंथ रा न खरे ह्यांनी लिहिलेला आहे त्यामध्ये ह्या देवीचे स्वरूप वर्णन करताना असे म्हटले आहे की, 'भित्या पुत्तलिका कृत्वा, शुक्लषष्ठीदिने सपूज्य' म्हणजे भिंतीवर या देवीची प्रतिमा काढून षष्ठीच्या दिवशी तिचे पूजन करावे ज्या स्त्रियांची मुले जगत नाहीत त्यांनी हे व्रत आचरावे आणि त्यासंबंधीच्या मंत्राचा जप करावा म्हणजे निश्चितच कामना पूर्ण होईल

भारतामध्ये काही समाजात मुलाची दोन नावे ठेवण्याची प्रथा आहे याचे कारण असे दिले जाते की, दुष्ट देवता अगर व्यक्ती माणसांना, विशेषत लहान मुलांना, त्रास देण्याच्या हेतून त्यांच्या नावावर प्रयोग करतात हा दुष्ट हेतु साध्य होऊ नये म्हणून पाळण्यात खरे नाव ठेवतात आणि त्याचा उच्चार सहसा करीत नाहीत पण दुसरे एक टोपण नाव सर्वसाधारण व्यवहारात हाक मारण्यासाठी ठेवतात खऱ्या नावावर प्रयोग न झाल्यास त्रास होत नाही अशी कथा प्रचलित आहे की, श्रीकृष्णाचे पाळण्यातील नाव विठ्ठल असे होते पण लोकांसाठी कृष्ण नाव प्रचारात आले कंस अगर अन्य शत्रु त्याच्या नावावर करणी करून त्याचा नाश होऊ नये, यासाठी ही काळजी घेतली गेली होती प्राचीन काळी अशा दोन नावे ठेवण्याची पद्धति इजिप्तमध्येही रूढ होती
(इजिप्त पुराण, पृष्ठ १३८)

देशपरत्वे या देवीची पूजा करण्याच्या अनेक रूढि आहेत सोलापूरकडील तिरगूळ ब्राह्मणसमाजाची ही रूढि पहा बाळंतिणीच्या खोलीत सहाव्या दिवशी

दळण दळण्याचे एक जाते मांडून त्यावर जात्याचा खुंटा, एक काळा कागद आणि शाई, ज्याने नाळ कापले असेल तो चाकू, बत्तीस प्रकारची औषधे, काठी, कुदळ अथवा खुरपे, पितळेचे पाण्याचे भांडे, सुपारी, एक करवंटी, हळदीचा द्रोण, ताब्याची काही नाणी, इ० इ० वस्तु मांडतात. इतकी सर्व तयारी झाली म्हणजे सुईण त्या जात्यापुढे बसते आणि त्याची पूजा करते. सर्व दिशांना हळद-कुंकू उधळते व जात्याच्या रूपात बसलेल्या देवीला मिठाईचा नैवेद्य दाखविते. त्यानंतर पसाभर गहू व काही सुपारी या देवीसमोर ती ठेवते आणि सर्वांना मिठाईचा प्रसाद वाटल्यावर हा समारंभ संपतो. हा पूजाविधि संपल्यावर निमंत्रितांना रात्री भोजन दिले जाते. (सोलापूर जिल्हा गॅझेट, पृष्ठ ४२)

वऱ्हाड प्रांतातील वर्धा शहरी पांचव्या रात्री सटवाई मुलाच्या कपाळी ललाटलेख लिहिण्यास येते अशी भावना आहे. त्या रात्री कोणीतरी मुलाजवळ रात्रभर जागे राहण्याची रूढि आहे. याचे कारण ते असे देतात की, कोणीतरी पहाऱ्यावर नसल्यास सटवाई मुलाचा प्राण हरण करील, म्हणजे मुलाला आकडी, फेंफरे येऊन त्याचा मृत्यु होईल. या देवीच्या नावाचा एक दगड गावाबाहेर राईमध्ये असतो. बाळंतपण सुखरूपपणे पार पडल्यावर जेव्हा मुलाला प्रथमतःच घराबाहेर नेले जाते, त्या वेळी त्या राईमध्ये जाऊन देवतेची पूजा केली जाते. नैवेद्य होतो. वेळप्रसंगी भोजनही होते. हे सर्व करण्याचा हेतु असा की, सटवाई देवीचा आपल्या मुलावर कोप होऊ नये. अद्यापीही नवीन मूल प्रथम घराबाहेर काढतांना निदान गावातील एखाद्या प्रमुख मंदिरात तरी ते नेतात. देवतेची खणानारळाने ओटी भरतात आणि नंतरच ते इतरत्र नेतात.

(वर्धा जिल्हा गॅझेट, पृष्ठ ४२.)

वंग देशात या तिथीला जमाई-षष्ठी असे म्हणतात किंवा घेटेरा-षष्ठी असेही म्हणतात. सोळा मातृकाशक्तींपैकी षष्ठी ही मातृकाशक्ति प्रथम स्थानी मानलेली आहे. षष्ठीपूजनानंतर मंगलचंडीची पूजा करण्याचा प्रघात आहे. सहा प्रकारच्या फळांचा नैवेद्य देवीला अर्पण करून नंतर तो मुले आणि जावई यांना वाटला जातो. तसेच याप्रसंगी जावयाला शुभाशीर्वाद दिला जातो !

एक पाश्चिमात्य ग्रंथकार या देवीचे वर्णन करतांना म्हणतात,

'ही देवी घराची रक्षणकर्ती, मुलाच्या जन्मावर लक्ष ठेवणारी, मूल देणारी आणि सौभाग्यवती स्त्रियांची परमसखी व सहाय्यकर्ती आहे.'

या देवीची पूजा वर्षांतून सहा वेळा करावी. पण ज्या स्त्रीचे मूल जगत नसेल, तिने या देवीचे प्रत्येक महिन्याला पूजन करावे. या देवीच्या मूर्तीचे प्रतीक

म्हणून एक पाषाण वडाच्या झाडाखाली ठेवलेला असतो. अनेक स्त्रियाना निमंत्रण दिले जाते आणि उत्तम सौभाग्यालंकार घालून त्या एकत्र जमतात. सर्वजणी पूजेमध्ये श्रद्धेने सहभागी होतात. षोडशोपचारे व मंत्रानी देवतेची पूजा झाल्यावर स्त्रियानी आणलेली वायने, ज्यानी आजपर्यंत कधीच पूजन केलेले नाही, अशा स्त्रियाना देतात. त्याही त्या वायनाचा आनंदाने स्वीकार करतात. नवविवाहित स्त्रीने असे वायन स्वीकारल्यावर ती म्हणते, 'जर षष्ठीदेवतेने मजवर त्वरित कृपादृष्टि केली व मला 'प्रसाद' दिला, तर पुढील वर्षी मी षष्ठीदेवीचे पूजन करीन. माझे वचन मी जरूर पाळीन' कालांतराने अशा नव्या वधूंना मुले झाली म्हणजे सहाव्या दिवशी मोठ्या थाटामाटाने त्या षष्ठीदेवीची पूजा करतात व प्रसाद वाटतात. काही ठिकाणी भोजनही घातले जाते.

पूर्वी बाळंतपणाची शुद्ध व शास्त्रीय साधने उपलब्ध नसल्याने अशुद्ध व अशास्त्रीय आयुधामुळे लहान मुलाला धनुर्वात, आकडी, फेंफरे इत्यादि रोग उत्पन्न होत. यामुळे लहान मुलाना त्रास होई व वेळप्रसंगी ती दगावतसुद्धा! हे रोग देवीच उत्पन्न करते या समजुतीमुळेही षष्ठीदेवीचे पूजन केल्यावर त्या रोगांचे निवारण होते, अशी या देवतेबद्दलची श्रद्धा होती. मुलाचे भविष्य त्याच दिवशी त्याच्या ललाट फलकावर लिहिले जाई बाळंतपणाचे प्राथमिक दिवस निर्विघ्नपणे पार पडल्यावर एकविसाव्या दिवशी गावाबाहेर वडाच्या झाडाखाली पूजन करून समारंभ साजरा केला जाई. (मार्टिन, पृष्ठ २५१)

वंग प्रांतीय लोक या तिथीला सीतलाषष्ठी असे संबोधतात आणि व्रताचरण करतात. या दिवशी घरामध्ये अन्न न शिजविता आदल्या दिवशी तयार करून ठेवलेलेच अन्न खाल्ले जाते. एका वडाच्या वृक्षाखाली मानवाच्या मस्तकाच्या आकाराचा गोल पाषाण मांडून त्याचे देवी म्हणून पूजन केले जाते. चैत्र द्वादशी ही तिथी देवीच्या नावे पाळली जाते. तेथे असे शास्त्रवचन आहे की, 'या देवीची पूजा अरण्यात करावी.' आणि यासाठीच तिला 'अरण्यदेवी' असेही संबोधिले जाते. काही ठिकाणी ज्येष्ठ महिन्याच्या पौर्णिमेला अरण्यदेवी हे नाव सार्थ करण्यासाठीच की काय त्या दिवशी तिचे पूजक कंदमुळावर निर्वाह करतात पूर्वी ही व्रते फार मोठ्या प्रमाणावर व्हावयाची. पण आजच्या यंत्रयुगात व्रताच्या आचरणात पडलेली व्यक्ति सहसा दिसत नाही. शहरातून वटवृक्षही मिळण्याची पंचाईत तर मग पाषाण दूरच राहिला! देवावरचा विश्वास कमी कमी होत असल्याने धर्माचा आणि पर्यायाने व्रतांचाही लोप होत चालला आहे. पण भारतीयाच्या दृष्टीने ही गोष्ट चांगली नव्हे. (आर्यांच्या सणाचा इतिहास, पृष्ठ १८६)

जरा नामास्मि भद्रं ते राक्षसी कामरूपिणी ।
तव वेश्मनि राजेंद्र पूजितान्यवसं सुखम् ॥ १ ॥
गृहे गृहे मनुष्याणां नित्यं तिष्ठामि राक्षसी ।
गृहदेवीति नाम्ना वै पुरा सृष्टा स्वयंभुवा ॥ २ ॥
दानवानां विनाशाय स्थापिता दिव्यरूपिणी ।
यो मां भक्त्या लिखेत्कुड्ये सुपुत्रा यौवनान्विताम् ॥ ४ ॥
गृहे तस्य भवेत् वृद्धिरन्यथा क्षयमाप्नुयात् ।
त्वद्गृहे तिष्ठमानाहं पूजिताहं सदा विभो ॥ ५ ॥
लिखिता चैव कुड्येषु पुत्रैर्बहुभिरावृता ।
गन्धपुष्पैस्तथा धूपैर्भक्ष्यभोज्यै· सुपूजिता ॥ ६ ॥

( महाभारत, सभापर्व, अ १८ )

जरा नावाची देवी सागते की, स्वयभु ब्रह्मदेवाने माझी उत्पत्ति करून प्रत्येक घराघरातून दानवाचा नाश करण्यासाठी माझी योजना केलेली आहे. भिंतीवर जो कोणी माझे चित्र काढून गध, फुले, धूप, भक्ष्य, भोज्य यानी अनन्य भावाने माझे पूजन करतो, त्याच्या घरी मी वृद्धि करते आणि कुलाचा क्षय कधीही होऊ देत नाही

या जरादेवीची प्राचीन प्रसिद्ध कथा म्हणजे जरासध राजाच्या जन्मवेळेची सागितली जाते. जरासधाच्या वडिलाचे नाव बृहद्रथ होते. या राजाला दोन राण्या होत्या, पण पुत्रसतान नव्हते एका ऋषीला प्रसन्न करून घेतल्यावर त्याने आम्रफळ प्रसाद म्हणून दिले आणि राणीला भक्षण करण्यास सागितले व तसे केल्याने पुत्रप्राप्ति होईल असा वर दिला. राजाने फळ घरी आणून मनात असा विचार केला की, आपले दोन्ही राण्यावर सारखेच प्रेम आहे, तेव्हा दोघींना अर्धे अर्धे फळ दिले असता दोघीनाही पुत्र होतील. यास्तव राजाने प्रत्येकीला अर्धा आबा खाण्यास दिला. परिणाम व्हावयाचा तोच झाला नवमास पूर्ण झाल्यावर प्रत्येकीला अर्धे अर्धे मूल झाले. ती वेडीविद्री स्वरूपे पाहून दोघींनाही वाईट वाटले, पण कोणताही उपाय नसल्याने ते दोन्ही जीव उकिरड्यावर फेकून देण्यात आले.

थोड्या वेळाने जरादेवीचे आगमन तेथे झाल्यावर हे मासखड खाण्यास योग्य आहेत, असे समजून तिने ते उचलले आणि खाद्यावर टाकले, तोच आश्चर्य झाले की, दोन्ही भाग जवळ आल्याने ते साधले गेले आणि एक सुदर बालक तयार झाले. एकदर बालकाच्या गोंडस स्वरूपावरून जरेने ओळखले

की, हा राजबालक आहे, तेव्हा राजाला परत करावा या घरात पूर्वी देवीचे पूजन होत असल्याने, दुष्ट विचार तिच्या मनातही आला नाही एका सुंदर तरुण स्त्रीमध्ये आपले रूपांतर करून त्याच वेशात मूल तिने राजाला परत दिले जरादेवीच्या कृपने दोन तुकडे साधले गेले, म्हणून त्याचे नाव जरासंध असे ठेवण्यात आले हेच देवीचे स्वरूप पुढे प्रचारात आले आणि पूजन होऊ लागले लहान मुलांना अपघाती मरण येऊ नये, दुष्ट देवतांची दृष्टि त्यांवर पडून अपघात होऊ नये व कमीत कमी पाच वर्षपर्यंत तरी यांचे रक्षण व्हावे म्हणून ही देवता रक्षण करीत असते अशी भावना आहे

या स्वरूपालाच कोणी जिवती अथवा जिवतीकादेवी म्हणतात श्रावण महिन्यात प्रत्येक शुक्रवारी भिंतीवर चित्र काढून अथवा बाजारात कागदावर मिळणारी तयार मूर्ति आणून पूजन केले जाते त्या वेळी स्त्रीवर्ग अथवा बाळंतीण खालीलप्रमाणे प्रार्थना करते,

> जरे जिवतिके देवि बालयुक्ते प्रमोदिनि ।
> रक्षाव्रते महाशक्ति पूर्णकामे नमोऽस्तु ते ॥

'हे जिवतिकेदेवी, तू बालांसह युक्त आहेस, आनंद देणारी आहेस, बालांचे रक्षण करणारी असून महाशक्तिरूपिणी आहेस, सर्वांची मनीषा पूर्ण करणाऱ्या देवीला माझा नमस्कार असो हे करुणासागर देवते, मी ज्या दिशेला अक्षता टाकीत आहे, त्या त्या सर्व दिशांना तू माझ्या बाळाचे अक्षय्य रक्षण कर ' पुरणा वरणाचा नैवद्य समर्पण करून नंतर कहाणी ऐकली जाते

या देवतेची मूर्ति कशी असावी यासंबंधीचे एक छायाचित्र लेखकाच्या पाहण्यात आले त्यामध्ये ती द्विभुज, मस्तकावर मुकुट, उजव्या हाती अमृताची कुपी आणि डाव्या हाती लहान बालकासह छोटासा पाळणा, मस्तकाच्या दोन्ही बाजूस सूर्य व चंद्र आणि पायाजवळ पाच सहा लहान मुलांचा समुदाय असे होते चित्रकाराने ही कल्पना कशावरून घेतली हे जरी समजले नाही, तरी अमृतरूपी रसायन देऊन लहान बालकांची वृद्धि करण्याची कल्पना त्यामध्ये निश्चितपणे असावी, कारण या देवीचे प्रमुख काम तेच आहे

सारांश, जरादेवी आणि जिवतिका अथवा जिवती ही एकच होत लहान मुलांच्या गळ्यात या देवीची मूर्तही बांधत असत पण आता श्रद्धा कमी झाल्याने या सर्व उत्तम प्रथा लयाला जात आहेत

उत्तर प्रदेशी जातमातृ देवता नावाची बाळसंरक्षक देवता आहे स्त्री प्रसूत झाल्यानंतर सहाव्या दिवशी, वस्त्रावर अथवा काष्ट फलकावर या देवीचे

चित्र रेखाटून पूजन केले जाते चित्र रेखाटताना ही मार्जारमुखी दाखवून आजूबाजूला बालकांचा समूह काढतात. हर्षचरित्, कादंबरी इत्यादि ग्रंथांतून या देवीचा उल्लेख मिळतो या देवीची दुसरी नांवे चर्चिका, छाष्ठी देवी अशी आहेत काही ठिकाणी सूतिका गृहावर देवींची चित्रे रेखाटतात.

( प्राचीन मिसर संस्कृतीमध्ये बास्ट ही देवता मार्जार मुखीच होती तेव्हा संस्कृति संक्रमण काळी या देवीची देवघेव झाली असावी. )

काही ठिकाणी पूजनाबरोबर कुमारी, धनदा, नन्दा, विपुला, मंगला, अचला व पद्मा या द्वारमातृकांचे पूजन केले जाते. या सर्व माता त्याचे पूजन केल्यामुळे नवबालकांना दीर्घायुष्य, आरोग्य, पुष्टि, तुष्टि व संपत्ति यांचा शुभाशिर्वाद देतात अशी पूजकांची श्रद्धा असते ( कल्याण, नारीअंक, पृष्ठ, ६० )

महापराक्रमी रावणाने सर्व देवाना बंदिवासात टाकले. त्याच्याबरोबर या देवतेलाही बंदीवास भोगावा लागला. या देवीकडे रावणमहाराजाचे पाय चुरण्याचे काम असे. पाय चुरत असता झोप लागली म्हणजे तेवढ्या वेळात ती बाहेर फेरफटका मारून येई आणि नवजात अर्भकाची भविष्ये लिहून येई. षष्ठी याच नावाचा अपभ्रंश सटवाई असा झालेला आहे. एकेसमयी रावण झोपेतून अवचित जागा झाला. षष्ठी आपल्या कामावर नसल्याने तो गोंधळून त्याने शिपायांना बोलावून त्यांना तिचा शोध करण्यास सांगितले. काही काळाने ती परत आल्यावर रावणाने तिला विचारले ' तू कोठे गेली होतीस ? ' त्यावर तिने आपण करीत असलेली कामगिरी त्याला कथन केली ते ऐकताच रावणाने आपल्या भाळीचे भविष्य वाचण्यास तिला फर्मावले. तेव्हा ती घोटाळ्यात पडली. उघडपणे त्याचे विधिलिखित वाचण्याचे धाडस तिला झाले नाही कारण आहे की, रामाच्या हातून त्याला मरण येणार होते. ती त्याला स्पष्टपणे कशी सांगणार ? यासाठी तिने आपले हात लाल कुंकवाने माखून रावणाच्या भालप्रदेशावर उमटविले. नंतर तिनेच त्याला ते विधीलिखित वाचावयास सांगितले. रावणाने अक्षरे वाचली, ' प्रभु रामचंद्राचे हातून मरण येईल.' ( कथाकल्पतरु, ६।१६ )

सटवाई ही अनेक जमातींची कुलदेवता आहे गुरव, भोई, वाघ्या, साळी, होलार इत्यादि जमातीची ती कुलदेवता आहे. ग्रामदेवता म्हणूनही देशावर अनेक ठिकाणी या देवींचे पूजन केले जाते. अशा मंदिरापैकी पुणे जिल्ह्यात भोसरी अथवा भावसरी या गावी सटवाईच्या नावाने बारा गोल पाषाण प्रसिद्धच आहेत तसेच तेथे मरीआई बनाई, म्हाळसा आणि घोडासटवाई यांच्याही मूर्ति आहेत

हे स्थान कोणी व केव्हा निर्माण केले याचा पुरावा उपलब्ध नाही पण असा अदाज बाधला जातो की, यादव शिलाहर राजवशाच्या पूर्वीचे हे स्थान असून त्या काळी लेख अथवा नावे कोरण्याची पद्धति नसावी वास्तव येथे तसा कसलाच उल्लेख मिळत नाही निरनिराळ्या दवताची मदिरे आणि स्तभ याच्या सयोगामुळे हे गूढ स्थान झालेले आहे आश्चर्य असे की, सनपूर्व दोनशे वर्षांचा स्तभ सोपारा व राजूर ( जुन्नरपासून दहा मैलावर ) येथे आढळला असून या तिन्ही ठिकाणच्या शिल्पात बरेच साम्य आहे

भोसरी हे गाव पुण्यापासून आठ मैल अतरावर आहे लहानशा उचवटया वर चार फूट उचीचा लाबरुद दगडी कोट आहे व त्यामध्ये ही मदिरे आहेत त्या समूहामध्ये एक काळका देवीचेही मदिर आहे या मदिराची लाबीरुदी २५×२५ फूट आहे परतु उची मात्र फारच कमी आहे येथे एक दगडाचा प्राचीन स्तभ असून त्यावर खालील दृश्ये कोरलेली आहेत

( १ ) एका मानवाच्या शरीरावर तीन गायी उभ्या आहेत याचा अर्थ असा घेतात की, गायीचे रक्षण करताना त्या वीराला मरण आले असले पाहिजे

( २ ) एक वीर दोन शत्रूबरोबर झुज खेळत आहे

( ३ ) कैलास पर्वतावर अप्सराचे नृत्य चालू आहे

( ४ ) एक वीर शिवलिंगाची पूजा करीत आहेत

अशा रीतीने अनेक प्रकार दाखविणारे एकूण आठ स्तभ आहेत

( पुणे जिल्हा गॅझेट, भाग ३, पृष्ठ ११५ ते ११८ )

विसाव्या शतकाच्या सुरवातीला महाराष्ट्रात पाचवी व सटवाईचे पूजन होत असे विशेषत त्या दिवशी द्विदल धान्य म्हणजे हरभरे, वाटाणे, मूग इत्यादि भिजवून त्याची उसळ केली जाई त्याला कोकणप्रांती घुगऱ्या म्हणत मुलाच्या जन्माप्रीत्यर्थ आप्तेष्टाना अगर गावकन्याना हा प्रसाद म्हणून वाटला जाई प्रत्येक सधन घराणी या प्रसगी भोजनही घालत असत. मी स्वत माझ्या लहान पणी हा सोहळा पाहिला आहे यावरून मराठीत एक वाक्प्रचार रूढ आहे 'बारशाच्या घुगऱ्या खाणे' म्हणजे इत्थभूत माहिती असणे असा होतो

पृथ्वी

नसेचि कुसवा कुणा चिरजिवी मुले हो कुठे ।
हवी जर स्त्रियास ती मिळति षष्ठीदेवीव्रतें ॥
चितारि प्रतिमेस भित्तिवरि शुद्ध षष्ठी दिनीं ।
पहा पुरवि आस इष्ट घडतें व्रता-पूजनीं ॥ १ ॥

व्रताचरण आजही सतत षष्ठिला चालते ।
घरोघर जई नवागतहि बाळ ते जन्मते ॥
टळो जर इडापिडा वय सु-दीर्घ इच्छि कुणी ।
मिळे सचित सर्वही वदति षष्ठिच्या पूजनीं ॥ २ ॥

शिखरिणी

इळा कोणी मानी अशुभ सटवी देवि पतिता ।
भविष्याला षष्ठी दिनीं लिहीत भाळी नवगता ॥
जइ बंदिवासी सतत चुरिते रावण पदे ।
तयाच्या भाळीचे मरण सुचवि राम-सु-पदे ॥ ३ ॥

(१६) संक्रांतीदेवी

रवेः संक्रमणराशौ संक्रान्तिरिति कथ्यते । (नागर खंड)

या प्रकरणाच्या सुरुवातीच्या प्रस्तावनेत आपण पाहिलेच आहे की, सूर्य बारा राशींतून प्रवास करीत असतो. अंतरिक्ष हे बारा राशी आणि सत्तावीस नक्षत्रे यानी विभागले आहे. तेव्हा सूर्याने एका राशीतून दुसऱ्या राशीत जाणे याचेच नाव संक्रमण किंवा संक्रांत होय. उत्तरेकडून दक्षिणेकडे जाणे आणि परत फिरून पुन्हा उत्तरेकडे येणे या सहा महिन्याच्या क्रमाला अयन असे म्हणतात. परत फिरतीच्या क्रमाला अयन संक्रांत हे नाव दिले आहे. अंतरिक्षामध्ये पृथ्वीची गति, सूर्याची गति आणि इतर गतींचे परिभ्रमण किती वेगाने होते याचे एका कवीने वर्णन केले आहे, ते पाहा म्हणजे या अत्यंत जलद गतिमान विश्वाची कल्पना येऊन असल्या या अवाढव्य गतिमान विश्वामध्ये यःकश्चित मानवाची जागा कोणती व आहे तीही किती क्षुद्र याचीही अंधुकशी कल्पना येईल.

लोकमान्य टिळकानी 'वैदिक आर्यांचा उत्तर ध्रुवावरील निवास' या नावाचा एक ग्रंथ लिहिलेला आहे. त्यामध्ये असे प्रतिपादन केले आहे की, आर्य हे मूळ उत्तर ध्रुवावर राहात असून कालांतराने तेथील वातावरणात काही क्रांतिकारक परिवर्तन झाल्यामुळे त्याना तो प्रदेश सोडून खाली उतरावे लागले. यासंबंधी वेकफिल्ड जोन्स या नावाचे गृहस्थ लिहितात,

'The Arctic waterland is a burial ground for hundreds of thousands of mammoths that Occen to have

dried about ten thousand years ago, and been quickly deep frozen some in mid-summer.'

याचा अर्थ असा की, दहा सहस्र वर्षांपूर्वी लक्षावधी प्रलयपूर्वकालीन हत्ती चिखलात रूतून पुरले गेले आहेत आणि भर उन्हाळ्याच्या दिवसात अकस्मात गोठून गेलेले आहेत. तसेच दक्षिण ध्रुवाजवळ संशोधन करणाऱ्या बर्ड नावाच्या संशोधकास त्या ठिकाणी दहा हजार वर्षांपूर्वी नद्या वाहात होत्या असे आढळून आले आहे. संशोधनाने या गोष्टी सिद्ध झाल्या असल्याने पूर्वीचे आर्यस्थान कोणते या संबंधी संशय राहू नये.

त्यानंतर आर्यांनी कुरुप्रांतामध्ये वस्ती केली. सीतेच्या शोधार्थ चाललेल्या वानरांना सुग्रीवाने उपदेश केला आहे की,

न कथंचन गंतव्यं कुरूणामुत्तरेण वः
अभास्करममर्यादं न जानीमस्तत:परम् ॥

म्हणजे या कुरू प्रांताच्या उत्तरेला जाऊ नका. कारण त्या ठिकाणी सूर्यप्रकाश नसतो. त्याचे निवासस्थान रशियातील व्होल्गा नदीपासून पूर्वेकडे बैकल सरोवरापर्यंत पसरलेले होते. वैदिक काळातील रसा या नदीचा अपभ्रंश र्‍हा असा होऊन तीच पुढे व्होल्गा या नावाने प्रसिद्धीस आली. त्याच प्रांती राहाणारे, अगार नदीतीरी वस्ती करणारे, अंगिरसकुलोत्पन्न झाले. त्यातील काही भारतात आले तर काही पश्चिमेकडे मिडिआपर्यंत सरकले. बैकल सरोवराच्या पश्चिमेला आणि बाल्कश सरोवराच्या दक्षिणेला व काशगरच्या उत्तरेला सेमेरचिन्स्क म्हणजेच वेदातील सप्तसिंधूचा प्रांत मानतात. (महाराष्ट्र टाईम्स, मुंबई दिनांक १।८।९३.)

आता पुन्हा थोडे मागे येऊ. मघाशी ज्या कवितेचा उल्लेख केला होता, ती कविता आपण पाहू.

साकी

पृथ्वि फिरते अपल्या भंवती ताशीं सहस्र मैल।
सूर्याभंवतीं फिरते ताशीं सात सहस्र मैल ॥
सूर्य धांवतो नवग्रहांसह तारा मंडळी कक्षा।
चार सहस्र सहा शतकें वेगा धरूनि लक्षा ॥
तेही जाई सप्तसहस्रां आकाशींच्या गंगा।
तोचि वेग तो घेऊनि गंगा आत गॅलक्सी पुंजा ॥

कुठे थांबते पळापळी ही, पुढे कुणा नच कळते ।
सूक्ष्म शेवटीं निर्णयीं येई, एक नियता यातें ॥

आधुनिक संशोधक मरहूम आइन्स्टीन ह्याच्या गणिताने लागलेला हा शोध आहे, तुणा प्राचीन भारतीय विद्वानांचा नव्हे फरक इतकाच की, या सर्वांना कोणातरी नियता आहे असे आइन्स्टीन म्हणतो, तर भारतीय प्राचीन ऋषींनी त्याच नियत्याला जगर शक्तीला ब्रह्म अथवा माया या नावाने संबोधिले आणि ईश्वर असे मानले

मकर संक्रांत ही राशिसंक्रांत नसून अयन संक्रांत आहे आजवर झालेल्या अनेक विद्वानांच्या संशोधनावरून हे निश्चित झाले आहे की, अती प्राचीन काळी आर्यांची वस्ती उत्तर ध्रुवाजवळील प्रदेशात होती त्या प्रदेशातील भौगोलिक परिस्थिति फारच विचित्र पण रमणीय अशी आजही आहे. प्राचीन ऋषिवर्यांनी अथवा अगदी अलीकडे तेथे जाऊन समक्ष अनुभव घेतलेल्या रा लालजी पेंडसे सारख्या लेखकांनी तथील उष:कालाचे केलेले वर्णन अत्यंत आकर्षक आणि वाचनीय असेच आहे. त्या ठिकाणी सहा महिने सूर्यदर्शन होत नाही अशा वेळी सहा महिन्याच्या दीर्घ कालखंडानंतर मकर वृत्तावरून सूर्य जेव्हा पुन्हा उत्तर दिशेकडे वळतो व प्रकाश दिसू लागतो, ही घटनाच तेथील रहिवाश्यांना अत्यंत आनंददायक वाटत असल्यास आश्चर्य ते कोणते? मनातील हा आनंद त्यांनी उत्सव समारंभाने साजरा करण्याचे ठरविले आणि मानवी स्वभावाला ते सुसंगतही आहे हाच संक्रांतीचा संग झाला उत्सव म्हटला म्हणजे तेथे कोणती तरी अदृश्य शक्ति आलीच तीच संक्रांतीदेवी म्हणून मानली गेली विश्वचक्रात क्रांति घडवून आणणाऱ्या या शक्तीचे शरीरही अवाढव्य असणार आणि तेच तिचे स्वरूप आज वर्णिले जाते, असा हा थोडक्यात इतिहास आहे

आधुनिक शोधाप्रमाणे हे मकर संक्रमण दि २१ डिसेंबर रोजी होते. पण भारतामध्ये ही संक्रांत त्यापुढे साधारणत तीन आठवड्यांनी साजरी केली जाते. याचे कारण असे संभवते की, प्रत्यक्ष संक्रमण जरा २१ डिसेंबर रोजी होत असले, तरी तो सूर्य पूर्णपणे उत्तरध्रुववासियांना दिसण्यास तीन आठवड्यांचा काल मध्यंतरी जात असावा ज्या दिवशी पूर्ण सूर्यबिंब दिसण्यास प्रारंभ होतो, तोच संक्रांतीचा दिवस म्हणून ठरविला गेला असावा दुसरे एक कारण असे संभवते की, पृथ्वीचा संपातबिंदूचा काल बदलत आहे हे सर्वांना मान्य आहे आणि ज्या काळी हा उत्सव प्रथम साजरा करण्यात आला, त्याला सहस्रावधी वर्षांचा काल लोटला असावा त्यामुळेही कदाचित २१ डिसेंबरची १४ जानेवारी

ही तारीख निश्चित केली गेली असावी. म्हणजे माझ्या म्हणण्याचा आशय असा की, अनेक वर्षांनी हीच संक्रात फेब्रुवारी महिन्यातही येणे शक्य आहे.

अनेक पुराणकारांनी निरनिराळी सङ्क्रान्तिव्रते सांगितली आहेत. उदा० महाजयासंक्रात म्हणजे कोणतीही मासिक संक्रात. जेव्हा शुक्लपक्षातील सप्तमी रविवारी होते, तोच दिवस. तसेच धनसंक्रात, धान्यसंक्रात, तेजसंक्रात, भोगसंक्रात, रूपसंक्रात, आयुसंक्रात इ० प्रकार वर्णिलेले आहेत.

या संक्रातिव्रताच्या निमित्ताने अनेक दाने देण्यास ऋषींनी सांगितलेली असून ती पर्वकाळी द्यावीत असेही सांगून ठेवले आहे. जशी दाने द्यावीत असे सांगितले आहे, तसेच जपजाप्यादी कर्म करावे असेही लिहून ठेवले आहे. हेमाद्रि, बृहस्पति, देवलस्मृति, वसिष्ठस्मृति, शतातप इत्यादिकांच्या मते हा पर्वकाल प्रत्यक्ष संक्रातिकालाच्या काही घटिका आधी किंवा नंतर असा दिला आहे. संक्रात दिवसा, सायंकाळी अगर रात्री झाली, तर त्या कालामध्ये कमीजास्त घटिकांचा फरक पडतो. जसे हेमाद्रीच्या मते हा काळ वीस घटिका आधी आणि वीस घटिका नंतर धरावा, तर देवल म्हणतात तो तीस घटिकांचा धरावा.

संक्रातिदेवीचा पूजाविधि सर्वसाधारणपणे करण्याचा विधि असा. लहानशा वेदीवर एक लाल रंगाचा कपडा पसरावा. त्यावर तांदुळाने अष्टदल कमळ काढावे. मध्यभागी सुवर्णमय सूर्यनारायणाची मूर्ति स्थापन करून पंचोपचार अथवा षोडशोपचारे तिचे पूजन करावे. व्रतकर्त्याने निराहार, अयाचित अथवा एकभुक्त रहावे. हे व्रत आचरल्याने सर्व प्रकारची पापे क्षय पावतात, आधि-व्याधींचेही निराकरण होते आणि सुखसंपत्ति व सुपुत्राचा लाभ होतो.

या संक्रातिव्रताच्या निमित्ताने अनेक पदार्थ 'लुटण्याची' प्रथा आज आचरली जाते. कोणी सौभाग्यद्रव्य, तर कोणी काकणे, तर कोणी अन्य पदार्थ लुटतो. याचे मूळ आर्यांच्या प्राचीन परिस्थितीमध्ये आढळते. त्या वेळी साधारणतः आषाढ महिन्यात लोक धान्याची पेरणी करीत असल्यामुळे मकर संक्रांतीच्या वेळी शेतात धान्य तयार होई. सूर्योदय झाल्यावर लोक अन्नाच्या शोधार्थ बाहेर पडत व जेथे दिसेल तेथून धान्य लुटण्यास प्रारंभ करीत. काही वेळा हे लुटारू घोड्यावर अथवा वाघावरही बसून येत आणि लुटालूट करीत असत. यामुळेच आजच्या संक्रातिदेवीचे वर्णन करताना संक्रातीचे वाहन दिले जाते; कधी सिंह, तर कधी अश्व. काही वेळा ही लूट प्रत्येक वर्षी व्हायचीच म्हणून आपले स्वतःपुरते धान्य आधी कापून घेऊन लुटारूंसाठी काही भाग शेतातच ठेवून दिला जात असे. सर्वांना सारखे अन्न खाण्यास मिळावे ही सुद्धा भावना त्यामागे असण्याची शक्यता आहे. या लुटालुटीचे प्रतीक म्हणून संक्रातिसणाच्या वेळी

काही पदार्थ लुटण्याची रूढि प्रचलित झाली असावी. आता देशकालवर्तमाने कोणी स्त्रिया फणी, कंगवे, डबे, वाटया, बरण्या इत्यादि गरजेच्या वस्तु लुटतात ही गोष्ट निराळी !

मकरसंक्रांतव्रत ज्याप्रमाणे पाळले जाते, त्याचप्रमाणे आषाढ महिन्यात येणाऱ्या कर्कसंक्रांतीचे व्रतही काही ठिकाणी आचरण्याची प्रथा होती. काही ठिकाणी आहेही. कोकणप्रांती अशी एक उक्ति प्रचलित आहे की, ' आषाढ महिन्यात तळावयाचे आणि पौष महिन्यात उकडावयाचे ' आणि या प्रकारे सण करावयाचा.

निरनिराळ्या प्रांती हे व्रत साजरे करण्याचेही प्रकार निरनिराळे आहेत. आपण त्यांपैकी थोडे प्रकार पाहू. महाराष्ट्रीयांच्या पंचांगामध्ये सुरुवातीस या देवीच्या व्रताची भरपूर माहिती व इष्ट-अनिष्ट फले दिलेली असतात. या दिवशी प्रातःकाळी स्त्रीवर्ग शुचिर्भूत होऊन देवीची विधियुक्त पूजा करून आप्तेष्टांना व मित्रमंडळींना " तिळगूळ " वाटतो. तिळगुळाच्या ऐवजी तिळाच्या अगर इतर पदार्थांवर साखरेचा पाक चढवून तयार केलेला ' हलवा ' वाटला जातो. सुवासिनींना हळदी-कुंकू व वायने दिली जातात.

दक्षिण भारतात या सणाला " पोंगल " या नावाने संबोधिले जाते. सूर्यप्रकाशात, अग्नीवर दुधाने भरलेले भांडे ठेवून त्याच्याभोवती सर्व मंडळी उभी राहतात. दूध तापल्यावर ज्या दिशेला उतू जाईल, त्यावरून इष्ट-अनिष्ट भविष्य वर्तविले जाते. (ज्ञानकोश, ६।६८)

पंजाबप्रांती शीख समाजातही हे व्रत आचारिले जाते. अमृतसर शहरी या जमातीचे सुप्रसिद्ध सुवर्णमंदिर आहे. त्याच्या परिसरात हा उत्सव साजरा केला जातो. आसपासच्या अनेक गावचे लोक या उत्सवामध्ये सामील होतात.. हा उत्सव त्या ठिकाणी एकूण तीन दिवस साजरा होतो. दुसऱ्या दिवशी सर्व उपस्थित यात्रेकरू मुक्तेसर तलावात स्नान करतात. तिसऱ्या दिवशी ' टिब्बीसाहेब ' या क्षेत्री जाऊन सादर प्रणाम करतात. हे क्षेत्र फार पवित्र मानले जाते. त्याचे कारण असे देतात की, मोंगलांनी या सुवर्णमंदिराला वेढा दिल्यावर याच ठिकाणावरून गुरुगोविंदसिंगांनी प्रथम त्या फौजांवर बाण सोडले होते. दरबारसाहेब आणि शाहिदगंज या ठिकाणांनाही ते भेट देतात.

(फिरोजपूर जिल्हा गॅझेट, पृष्ठ ४६)

मुक्तेसराचा तलाव बांधण्यास रणजितसिंहाने सुरुवात केली व पतियाळा नरेशाने हे काम पूर्ण केले. सुवर्ण मंदिर हे एका भव्य तलावाच्या मधोमध बांधलेले

असून त्याचा घेर अदाजे ५१० चौ. फूट आहे. मदिराचा पाया ४० चौ. फूट असून तो तलावाच्या काठाला एका ऐसपैस २०३ फूट लांबीच्या सेतूप्रमाणे असणाऱ्या मार्गाने जोडलेला आहे या तलावाच्या व्यतिरिक्त या मदिराच्या परिसरात आणखी चार तलाव निरनिराळ्या गुरूनी बाधलेले आहेत. त्याची नावे व मापे पुढीलप्रमाणे आहेत. सतोक तलाव ४९९'×३६८', रामसर तलाव ८०'×६९', कौलसर तलाव ४२१'×१७८' व बवेश्वर तलाव २४७'×१९६'.

(अमृतसर गॅझेट, पृष्ठ ६८.)

बगालमधील रहिवासी या व्रताच्या दिवशी इतर धार्मिक कार्याबरोबर गगासागरात स्नान करणे अतिशय पुण्यकारक समजतात. याच वेळी शरदऋतु सपून हेमताचे आगमन होत असल्यामुळे हवामान उत्तम असल्याने जनसमुदायाच्या आनदोर्मी उफाळून येत असाव्यात.

हिमालय प्रदेशातील वन्य जमाती एका गमतीदार पद्धतीने हा सण साजरा करतात. त्या दिवशी गव्हाच्या पिठाची कावळा-चिमणीची चित्रे करून ती तळून काढून सर्व दिवसभर लहान मुलाच्या गळ्यात घालून मिरवीत असतात. दुसऱ्या दिवशी ती चित्रे कावळ्याना खावयास देतात. असे केल्याने मुलाची इडापिडा टळते अशी त्या जमातीची समजूत आहे.

(आकाशवाणी मुबई केन्द्र, गावकरी फड, १४-१-६२)

कुमाऊ प्रांती सक्रात हा मुलाचा सण मानतात आणि सक्रातीच्या दुसऱ्या दिवशी तो साजरा करतात. त्यासाठी आदल्या रात्री घरोघर वडे व पक्वान्ने तयार करून त्याच्या माळा तयार करतात. सणाच्या दिवशी मुलाचे मगलस्नान झाले म्हणजे, त्या माळा त्याच्या गळ्यात घालतात. मुले घराबाहेर येऊन आनदाने नाचत बागडत असताना मोठ्याने मात्र का ले-का-ले म्हणजे 'कावळ्या ये आणि घे' असे म्हणतात. कावळे आले, म्हणजे माळेतील खाद्य पदार्थ तोडून ते त्याना खावयाला घालतात. काही माळा नातेवाईकाच्या घरी पाठविण्याची चालही आहे. (भा. स. को. २।३०६).

वसंततिलका

प्रत्येक राशि फिरतां नभिं भास्कराला।<br>
होतेच संक्रमण ते प्रतिमासि त्याला ॥<br>
जेव्हा प्रवेश रविचा मकरेंत जाणा।<br>
पावे तदा मकर-संक्रमणास नामा ॥ १ ॥

तें दक्षिणायनही सपत त्याच वेळीं ।
मागे फिरेचि रवि उत्तरेच्या दिशेही ॥
आर्यजनास बहु कौतुक त्या दिनाचे ।
सक्रान्त देवी समया तरि मानि साचें ॥ २ ॥
दक्षीण यानि फिरता रवि सूर्य लोकें ।
अधार दीर्घ रजनी शिशिर ध्रुव लोकें ॥
जेव्हा उपा नयनरम्य दिसे जनाला ।
आनद मग्न जन आचरि उत्सवाला ॥ ३ ॥

स्रग्विणी

ध्वात विद्राविणी देवी सन्क्रान्तही ।
जी शरत्काळ त्यागी वसता वरी ॥
एकमेकासि भेटुनि सागा जनीं ।
तिळगुळासि घ्या गोड बोला तुम्ही ॥ ४ ॥

## ( १७ ) हरतालिका

भाद्रपद महिन्याच्या शुद्ध तृतीयेला या व्रताचे आचरण करतात या व्रताच्या उत्पत्तीची कथा अशी हिमवानाची कन्या पार्वती ही विवाहयोग्य झाली नारदानी पर्वतराजाला सुचविले की, या मुलीला विष्णु हाच वर योग्य आहे वडिलानाही जावई पसत पडला परतु पार्वतीला ही निवड आवडली नाही अत करणाच्या खोल कप्प्यात दडलेले आपले दु ख तिने आपल्या सखीला सागितले आणि काहीतरी उपाय योजण्यास तिला विनविले सखीच्या सल्ल्याप्रमाणे त्या दोघी गुपचुपपण अरण्यात निघून गेल्या एका गुहेमध्ये जाऊन एक वाळुलिंग तयार करून त्याचे त्यानी पूजन चालू केले कालातराने त्याना शकर प्रसन्न होऊन प्रत्यक्ष दर्शन देऊन वर मागण्यास सागितले 'आपल्याला शिवशकर हेच पति म्हणून लाभावेत' असा वर पार्वतीने मागताच शकरांनी 'तथास्तु' म्हणून तिला आश्वासन दिले येणेप्रमाणे पार्वतीने इच्छित वर मिळविला ज्या दिवशी तिला हा वर प्राप्त झाला तो दिवस भाद्रपद शु० तृतीयेचा असल्याने हे व्रत त्याच दिवशी आचरण्याचा रिवाज पडला 'आलिभि हरिता यस्मात् तस्मात् सा हरतालिका' असे सस्कृत वचन आहे याचा अर्थ असा की, सखीने पार्वतीचे युक्तीने हरण करून तिला अरण्यात नेऊन इच्छित वर मिळवून दिला यास्तव

हरितालिका हे नाव या व्रताला मिळाले आहे या व्रताच्या पूजनाच्या वेळी पार्वतीच्या मूर्तीबरोबर सखीची मूर्ति याच कारणास्तव असते सौभाग्यवर्धन व इच्छित हेतुप्राप्ति हा या व्रताचा हेतु आहे (भविष्यपुराण)

या व्रताच्या पूजनाचा सर्वसाधारणपणे विधि असा की, या दिवशी घर सारवून, रंगवून, सुशोभित करून कलशस्थापना करावी त्यामध्ये सुवर्णनिर्मित शिव गौरी मूर्ताची स्थापना करावी नतर यथाविधि अनेक विहित मत्रानी तिचे पूजन झाल्यावर सर्व दिवस निराहार उपवास करावा दुसऱ्या दिवशी सकाळी व्रताचे उद्यापन करून पारणे करून उपवास सोडावा या पूजनाच्या दिवशी हस्तनक्षत्र असून सोमवार असेल तर मात्र मध्यरात्री उमा महेश्वराची मूर्ति स्थापन करून तिचे पूजन करावे तीळ तुपाची आहुति दिल्यावर दुसऱ्या दिवशी आपल्या शक्तीनुसार आठ अथवा सोळा मेहुणे भोजन घालावे

याच दिवशी काही ठिकाणी हरिकाळी अथवा हस्तगौरी अगर कोटीश्वरी देवीचे व्रत आचरले जाते शकराची प्रथम पत्नी सती हिचा वर्ण काळा होता शकरानी तिला 'काळी काळी' म्हणून चिडविले असता आपला देह शुद्ध करावा या हेतूने ती घराबाहेर पडली आपली काळीभोर काति तिने गवताला अर्पण करून अवशिष्ट शरीर प्रज्वलित करून अग्नामध्ये टाकले यानतर तिचा पुनर्जन्म हिमालयाच्या घरी झाला आहे (भविष्य पुराण) दक्ष यज्ञाच्या सदर्भात आपण हीच कथा थोडयाफार फरकाने पाहिलेली आहे

राजस्थानमध्ये हे व्रत मोठया समारभाने साजरे करतात म्हणून तो प्रसग येथे मुद्दाम उद्धृत करीत आहे बीजेच्या दिवशी या ठिकाणी महिलाच्या 'सिंघारा' ('शृगार' या शब्दाचा अपभ्रश) असतो त्या दिवशी त्या हाताला लाल मेंदी लावून त्यावर कलाकुसर काढतात हातात नवीन काकणे भरतात तिजेच्या पहाटे उठून अभ्यगस्नान करतात व निराहार उपवास करतात विवाहित स्त्रिया आपल्या पतीला दीर्घायुष्य लाभावे यासाठी, तर कुमारी उत्तम पति मिळावा म्हणून हे व्रत आचरतात सबध दिवस खेळणे, गाणी म्हणणे, हिंदोळ्यावर बसणे असे कार्यक्रम आटोपून रात्री चद्रदर्शन झाल्यावर त्या दिवशी बनविलेला सातूचा अगर गव्हाचा अर्धगोलाकार पिंड चाकूसुरीने कापून व खाऊन पतिपत्नी उपवास सोडतात काही ठिकाणी हा तरवारीने कापला जातो

नवविवाहित स्त्रिया या सणाला अतिशय महत्त्व देतात जशी पहिली मगळागौर माहेरी आपल्या आइच्या घरी करतात तशीच पहिली तीज ही मुलाच्या घरीच साजरी झाली पाहिजे असा या ठिकाणी दडक आहे त्या दिवशी

समजा एखाद्या अनपेक्षित आणि अपरिहार्य कारणाने जर पति या समारंभाला उपस्थित राहू शकला नाही, तर पत्नी कुरजा पक्षाबरोबर निरोप धाडते.

‘ कागद हो तो बॉच ल्यूँ, करम न बॉचो जाय ।
बालक हो तो दॉट ल्यूँ, जोबन छॉटयो न जाय ॥ ’
इतकी निरोप पाठवून पति आला नाही तर ती म्हणते—
‘ जो ढोलां ना आवियो, काजळी थारी तीज ।
चमक मरेली मारवण, देख चिंवता बीज ॥ ’

वरील चरणांचा अर्थ असा की, ‘ हे नाथा, काजळी तीजपर्यंत जर तू आला नाहीस तर तुझी ही प्यारी विद्युल्लतेच्या लखलखटाने दचकून मरून जाईल. कारण तिचे संरक्षण ( तुझ्याशिवाय ) दुसरा कोणीच करू शकणार नाही. ’ तीजेच्या दिवशी रंडोपाडी स्त्री-पुरुष समूहासमूहाने ढोलकीवर याच प्रकारची लोकगीते गात-नाचत फिरत असतात.

( सौ. शांता राठी, महाराष्ट्र टाइम्स, दि. १९।८।६२ )

फटका

पार्वतीकन्या हिमवानाची पाहुनी नारद विनवितो ।
वैकुंठपती विष्णु सुंदर अनुरूप वर आहे तो ॥
हिमवानाला मान्य जाहला नारद आनंदे परते ।
वृत्त समजतां परी पार्वती दुःख सांगते सखीस तें ॥
आलीने मग हरण करोनि पार्वती काननी नेली हो ।
विवरीं एका शिरूनि पूजन वाळूलिंगी केले हो ॥
हर-तालिका नाम व्रता । सांबसदाशिव वरदाता ॥
पार्वती मेळवी तो भर्ता । सौभाग्या ये वर्धनता ।
भाद्रपदाच्या शुक्ल तृतिये महिलांनी व्रत आचरितो ॥

(१८) स्वर्णगौरी

क्षीरार्णवे सलक्ष्मिकः सदा स्वपिति केशवः ।
तं संपूज्य गोविंदं सर्वान्कामानवाप्नुयात् ॥
भो भूहिरण्यदानानि शतकल्प शतायुष ।
अशून्यशयनी नाम द्वितीया संप्रकीर्तिता ॥

हे व्रत श्रावण महिन्याच्या कृष्ण तृतीयेला करतात हे व्रत कसे आचरावे यासंबंधी विवरण वरील श्लोकात केलेले आहे कज्जली नावाच्या श्याम पुष्पांनी दिवोदासाची पूजा करून सौभाग्यालंकारांनी सुहासिनींची ओटी भरावी वास्तविक ही विष्णूचीच पूजा होते कारण श्लोकात सांगितल्याप्रमाणे गोविंदाचे पूजन करून, तैलवर्जित पदार्थांचे सेवन करून शक्य तर चार महिन्यापर्यंत क्षार लवणही वर्ज्य करावे ब्राह्मणाला भोजन घालून दक्षिणा म्हणून दिवा द्यावा

काही ठिकाणी या व्रतपूजनासाठी गौरीची मृत्तिकेची प्रतिमा करून, सोळा तंतूचा एक दोरक तयार करून तो सोळा गाठींनी युक्त करतात त्याचे सोळा वर्षे यथाविधि पूजन करून नंतर उद्यापन करतात उद्यापन प्रसंगी सोळा मेहुणांना भोजन देऊन सोळा प्रकारची मिठाई प्रसाद म्हणून वाटतात (स्कंदपुराण)

या व्रताची कथा अशी प्राचीन काळी सिद्धगंधर्व कैलास पर्वतावर शंकराची सेवा करीत असताना शंकर स्वतः सांगतात की, सरस्वती नदीच्या तीरी विमलारण्य नावाची नगरी होती त्या नगरीत चंद्रप्रभा नावाच्या राजाची पत्नी महादेवी विशालाक्षा या नावाची होती तो राजा एकदा एका अरण्यात शिकार करीत असताना पाणी पिण्यासाठी पद्मांनी प्रफुल्लित अशा एका सरोवराजवळ आला त्या ठिकाणी अनेक अप्सरा या व्रताचे पूजन करीत होत्या संपत्ति मिळवून देणाऱ्या या व्रताचा विधि त्यांनी राजाला कथन करून त्याच्या मनगटा दोरक बांधला राजा घरी परतल्यावर विशालाक्षा राणी तो दोरक पाहून रागाने अतिशय संतप्त झाली त्या भरातच राजाच्या हातातील तो दोरक तोडून टाकला तत्क्षणीच राणीला वेड लागले आणि तिच्या आयुष्याचे मातेरे झाले रानावनात भटकत असताना ती ऋषि अगर जलाशय यांना विचारी, 'गौरी! गौरी कुठे आहेस?' शेवटी राजाने या व्रताचे पूजन करून गौरीची क्षमायाचना केल्यावर त्याची राणी शहाणी झाली (व्रतराज)

भुजंगप्रयात

सदा स्वर्णगौरी व्रता पूजी आधी ।
पहा श्यामवर्णा फुला पुष्प राजी ॥
अलंकारि सौभाग्य ओटी भरावी ।
क्षीरार्णवीं लक्ष्मी होई राजी ॥

(१९) वटसावित्री

कुलस्त्रीणा व्रत ब्रूहि महाभाग्य तथैव च ।
अवैधव्यकरं स्त्रीणां पुत्रपौत्रप्रदायकम् ॥

सनत्कुमार ऋषींनी विचारल्यावरून शंकरांनी हे व्रत सागण्यास सुरुवात केली. ज्येष्ठ महिन्याच्या पौर्णिमेला हे व्रत आचरतात. सत्यवान सावित्रीचा कथाभाग सर्वविश्रुत असल्याने येथे त्याची द्विरुक्ति करण्याचे काही प्रयोजन नाही. आपल्या कडक तपाचरणाने आणि नितांत श्रद्धेने यमराजापासून सावित्रीने आपल्या पतीचे प्राण परत मिळविले. त्याच्या स्मरणार्थ व आपल्या पतीच्या आयुर्वर्धनार्थ हे व्रत सुवासिनी स्त्रिया आचरीत असतात. या व्रतामध्ये प्रामुख्याने वटवृक्षाची पूजा केली जाते. काही ठिकाणी गावातील वटवृक्षाखाली ही पूजा सामुदायिक पद्धतीने केली जाते. ज्या ठिकाणी हे शक्य नसेल तेथे वडाची एक लहानशी फांदी मध्ये ठेवून त्याची पूजा केली जाते. वडाच्या झाडाची फांदीसुद्धा जेथे उपलब्ध नसेल तेथे कागदावर वडाच्या झाडाचे चित्र काढून त्याची पूजा केली जाते. आजच्या सुधारलेल्या 'स्पुटनिक' युगात जी काही व्रते तग धरून आहेत त्यामध्ये प्रामुख्याने याची गणना करावी लागते.

शार्दूलविक्रीडित

सावित्रीव्रत ज्येष्ठ पौर्णिमदिनीं पूजीत आर्य स्त्रिया।
त्याची पुण्यकथा फलोक्त विधी हा सु-ज्ञात आहे तया॥
अंगुष्ठाप्रति प्राण नेत पतिचा, आणी यमापासुनी
सौभाग्यासि अखंड वर्धन मिळे, श्रद्धा धरी पूजनीं॥

व्रतपरिचय या ग्रंथामध्ये प्रतिमासिक व्रतसंख्या ३४० दिलेली असून शिवाय अधिकमास ३०, वार-तिथींसाठी ४१, प्रायश्चित्तविधीसाठी ५० आणि रोगपरिहारक यादीमध्ये १०८ व्रते दिलेली आहेत. त्या सर्वांची माहिती देणे हा या प्रकरणाचा मुळीच हेतु नाही. व्रताचरणावर शक्तिदेवीचा अधिकार चालतो हे दाखविण्यासाठी काही प्रमुख व्रताचा इतिहास दिलेला आहे. वरील व्रताव्यतिरिक्त त्या त्या प्रांताची काही खास व्रते आहेत. त्यांपैकी दोनतीन उद्बोधक व्रते पाहून या प्रकरणाला पूर्णविराम देऊ.

## (२०) शीतलासप्तमी

श्रावण कृष्ण सप्तमीला हे व्रत आचरतात. या व्रताची पूर्वकथा अशी. पूर्वी हस्तिनापूर नगरामध्ये इंद्रद्युम्न नावाचा राजा होऊन गेला. त्याच्या पत्नीचे नाव धर्मशीला, मुलाचे नाव महाधर्म आणि मुलीचे नाव गुणोत्तमा असे होते. कौंडिण्य नगरीचा राजपुत्र सुमित्र याजबरोबर गुणोत्तमेचा विवाह झाला. माता-पित्याचा निरोप घेऊन ती सासरी जात असताना तिच्या पित्याने तिला शीतला-सप्तमीचे व्रताचरण करण्यास सांगितले. हे व्रत अरण्यामध्ये तळ्याच्या काठी

करावयाचे असल्याने व्रताची सर्व सामुग्री घेऊन व पति आणि ब्राह्मण यासह ती रथातून निघाली. अनुकूल स्थळ धुंडाळीत असता ती सर्व दमून गेली. एवढ्यामध्ये एक वृद्धा तेथे उपस्थित होऊन गुणोत्तमेला म्हणाली, ' तुझा पति दमून गेल्यामुळे झोपला आहे. त्याला तसाच झोपू दे. तू माझ्याबरोबर चल. मी तुला जलाशय दाखविते. ' त्याप्रमाणे गुणोत्तमा जलाशयावर गेली व तिने यथाशाग व्रतपूजन केले. शीतला संतुष्ट होऊन तिने तिला इष्ट वर दिला.

व्रतपूजन आटोपून परत आल्यावर तिने पाहिले तो तिचा पति सर्पदंशाने ग्लानी येऊन पडलेला होता. तावडतोब तिने शीतलादेवीची प्रार्थना केली आणि दिलेल्या वराच्या बदल्यात पतीचे प्राण परत मागितले. त्याप्रमाणे नंतर आनंदाने ती आपल्या पतिगृही गेली. ( हेमाद्रि-भविष्यपुराण व्रतराज ).

अंबेर ( जयपूर ) येथील संग्रहालयात या देवीची जी मूर्ति आहे, ती १५ इंच उंच व १५ इंच रुंद अशी हिरव्या पाषाणाची आहे. गर्दभ वाहन व सहा हात आहेत. डावीकडे ढाल, झाडू, कमंडलू आणि उजवीकडे सूप, खड्ग आणि वरदमुद्रा असे स्वरूप आहे. ही मूर्ति प्राचीन असल्याने शीतळादेवीचे खरे स्वरूप मानले जाते. ( मरुभारती मासिक, जुलै १९६४ ).

## (२१) अहोईओठव्रत

उत्तरप्रदेशी कार्तिक वद्य अष्टमीला हे व्रत आचरतात. सर्व दिवसभर उपवास करून सायंकाळी सुस्नात होऊन भिंतीवर आठ कोठे असलेला एक देवीचा फणा रेखाटतात. त्याच्या खाली एक साळ व तिचे एक पिल्लू रेखाटतात. भिंतीजवळ कलशस्थापना करून सर्वांची यथाविधि पूजने होतात आणि त्यांना दूधभाताचा नैवेद्य दाखविला जातो. निपुत्रिकाला संतान व्हावे यास्तव हे व्रत आचरले जाते. ( भारतीय सांस्कृतिक कोश, भाग १/३५२ ).

## (२२) इतुपूजाव्रत

बंगालमधील नवसाला पावणारी ही एक देवता होय. कार्तिक महिन्यात दर रविवारी या देवीची पूजा केली जाते. या देवीचा संबंध सूर्याशी आहे, अशा समजुतीमुळे रविवार हा दिवस निवडला असावा. एका मातीच्या परळामध्ये चार बोळकी ठेवून त्यामध्ये भात, जव, गहू किंवा अन्य एखादे धान्य पेरून दर रविवारी त्यांना पाणी घालतात. ही चार बोळकी म्हणजे वर्षातील चार ऋतूंची प्रतीके मानतात. तांदुळाच्या खिरीचा अथवा मिठाईचा नैवेद्य दाखविल्यानंतर या देवीची कहाणी ऐकतात. ती कहाणी अशी.

एक दरिद्री ब्राह्मण होता. तो अतिशय आधाशी व खादाड वृत्तीचा होता. एकदा त्याला धिरडे खावयाची इच्छा झाली. त्याच्या सांगण्यावरून बायकोने घरात धिरडी बनविली. त्याला दोन दिली आणि त्याच्या मुली जुम्नो व उम्नो या दोघींना प्रत्येकी एक एक दिले. पण त्याला ती दोन धिरडी कशी पुरणार? त्याची इच्छा अपुरी राहिल्यामुळे तो मुलींवर रागावून त्यांना त्याने अरण्यात नेऊन सोडले. त्या ठिकाणी आकाशातील काही पऱ्या इतुदेवीची पूजा करीत होत्या, त्यांच्याबरोबर त्या मुलींनीही पूजा केली. देवी प्रसन्न झाल्याने तिने त्यांना इच्छित वर दिला. त्या घरी परतल्यावर त्याच्या बापाचे दारिद्र्य नष्ट झाले होते.

एकदा त्या शहराचा राजा गावातून फिरत असता तहान लागली म्हणून त्याने त्या मुलींजवळ पाणी पिण्यास मागितले. मुलींनी पाणी दिले. राजा ते भरपूर प्याला. पण तेवढे पाणी पिऊनही भांड्यातील पाणी काही कमी झाले नाही. ही किमया पाहाताच राजा निहायत खूष होऊन असली दैवी शक्ति अंगात असलेल्या या मुली आपल्या कायमच्याच सहवासात असाव्यात या हेतूने राजाने उम्नोबरोबर आणि प्रधानाने जुम्नोबरोबर विवाह केला. राजाची पत्नी झाल्यामुळे वैभव प्राप्त होताच उम्नो इतुपूजा विसरल्यामुळे तिला पुन्हा दारिद्र्य प्राप्त झाले. जुम्नोला हे कळल्यावर तिने आपल्या बहिणीला पुनश्च इतुपूजा करण्यास सांगितले. बहिणीच्या सांगण्यावरून तिने पूजा चालू केल्यावर तिचे पूर्व वैभव तिला प्राप्त झाले आणि ती सुखी झाली.

(Hindu Holidays & Ceremonials by B. A. Gupta).

## (२३) अमावास्याव्रत

अमावास्या विधातन्या द्विर्दोर्मरकतप्रभा ।
दर्भासनस्थिता चेयं दर्भपिंडाधरा कृशा ॥

या देवतेचे स्वरूप द्विभुज, मरकतमणीकांतियुक्त, दर्भासनाधिष्ठित, दर्भमुष्टी धारण करणारे व कृश असे असावे. बंगालमध्ये या दिवशी सूर्यपूजा आणि उपवास करण्याची प्रथा आहे. व्रताची कथा अशी.

एका सूर्यभक्त ब्राह्मणाच्या मुलाचा विवाह चालू असता एकाएकी त्याच वेळी त्या मुलाला मांडवात मरण प्राप्त झाले. दुर्दैवाने त्याच वेळी तो ब्राह्मणही मृत्यु पावला. त्याच्यामागे सासू-सुना कसेबसे दिवस कंठीत असताना एकदा सूर्यदेव तरुण ब्राह्मणाच्या रूपाने त्याच्या घरी येऊन त्यांच्याकडून नेसावयास मृत पुत्राचे वस्त्र व भोजनास थाळी मागून घेतली. तो सासूला म्हणाला, 'तुझा

पुत्र हा माझाच अवतार होता. तेव्हा आज रात्री तुझ्या सूनबाईला माझ्या सेवेसाठी पाठव.' सासूने त्याप्रमाणे केले. त्यानंतर सूर्यरूपी ब्राह्मण नेहमी त्याच घरात राहू लागला. दिवसा आपल्या कामगिरीवरही जात असे.

सासूने एक दिवस त्याला आपली दरिद्रावस्था निवेदन केल्यावर सूर्याने तिला ओंजळभर मोती दिले. सुनेने ते सर्व मोती इतस्ततः फेकून दिले. आश्चर्य असे की, त्याबरोबर सर्वत्र मोत्याचे वृक्ष उगवले. सासूने त्यातील काही मोती खुडून, ते बाजारात विकून द्रव्य मिळवून आपला संसाराशकट उत्तम रीतीने चालू केला. मिळणाऱ्या त्या विपुल द्रव्यातून तिने एक सूर्यमंदिरही बांधले. एके दिवशी सासूने त्या मंदिरात सूर्याला कोंडून टाकले. त्यामुळे दुसरा दिवस उजाडला तरी सूर्याला आपल्या कामगिरीवर जाता आले नाही. सर्व देव, मानव भयग्रस्त झाले. त्यांचे दैनंदिन व्यवहार बंद पडले. चौकशीअंती त्यांना खरी हकिकत समजल्यावर ते त्या सासूकडे आले. सत्य परिस्थितीची तिला जाणीव करून देऊन तिची मनधरणी केल्यावर तिने दरवाजा उघडला.

बाहेर आल्यावर सूर्यदेव देवांना म्हणाले, 'मला कोंडून ठेवण्यात या बाईचा मुळीच दोष नाही. कारण मला तसा शापच मिळालेला होता.' नंतर सूर्यदेवांनी सासू व सून यांना आपल्या रथावर घेतले. तो दिवस अमावस्येचा होता. त्या दिवसापासून संपत्ति मिळावी म्हणून अमावस्येचे व्रत आचरण्याची रूढि प्रचालित झाली.

(Hindu Holidays & Ceremonials by B. A. Gupta)

## तुपुलक्ष्मी

हे एक स्त्रीव्रत आहे. मार्गशीर्ष अमावस्यादिनी या व्रताला प्रारंभ होऊन पौष अमावस्येपर्यंत आचरतात. विशेषतः बंगाल प्रांती कुमारी आणि नवविवाहित, हे व्रत आचरतात. सामुदायिक रीत्या याचे पूजन होते.

व्रताचरण करणाऱ्या मुली एकत्र जमल्यावर, मातीचे परातीत एक अळूचे पान मांडून, त्यावर बारा लहान लहान शेणाचे गोळे, अथवा पाण्याने भरलेली बोळकी ठेवतात. ती परात चौरंगावर मांडून पूजन करतात. पण हे पूजन करण्याआधी एका मोडक्या सुपात अलक्ष्मीची पूजाही करतात. दररोज सायंकाळी याप्रमाणे एकत्र जमून पूजन झाल्यावर तुपुलक्ष्मीच वर्णनपर गाणी गातात. तसेच व्रतकालात मुली सकाळी उठून भाताचे शेतात जाऊन बांधावर नाचतबागडत गाणी म्हणत फिरतात. कारण या वेळी भाताची शेते भरास आलेली असतात. त्या गाण्याचा भावार्थ असा की, 'हे तुपुलक्ष्मी देवी, आम्हांला पावड्याने

दबल्ता येईल इतके धान्य दे, गोठा सुशोभित करणारी गाय दे, राजदरबारी चमकणारा मुलगा दे, सभेमध्ये पंडित शोभेल 'अशा जावई दे, सौभाग्यचिन्ह सिंदुर याच्या राशी दे. आमचे घर शहरभागात असावे आणि आम्हाला गंगासागर-संगमावर मरण यावे, एवढेच आमचे नम्रतेचे मागणे तुझ्याकडे आहे.'

यावरून असे दिसेल की, ही एक समृद्धीची देवता आहे. तिचे स्वरूप वर्णन करताना ती अत्यंत सुंदर, सुदृढ, उची वस्त्रे नेसलेली, उन्नत वक्षःस्थल असणारी, डोक्यावर छत्र आणि हातामध्ये शस्त्र, पद्म धारण करणारी, द्विभुजा लक्ष्मी आहे. तेथील स्त्रियांची अशी श्रद्धा आहे की, वरीलप्रमाणे देवीचे व्रताचरण केल्यावर देवता संतुष्ट होते आणि घरात तांदळाचे पीक काढण्यात, स्वच्छ साफसूफ करण्यात, हळद दळण्यात व हरएक प्रकारे घरामध्ये सुबत्ता नांदण्यास ही देवता सहाय्य करते.

व्रतकाळी मासे आणि तांदळाची कांजी हे पदार्थ भक्षण करतात.

(भा. सं. को., ४ / १६५).

# उत्खनित देवता

भारतातील उत्खनित सस्कृतीचा इतिहास पाहिला तर तो फारसा जुना नाही ब्रिटिश लोकानी भारतात प्रवेश केल्यावर त्यातील काही नामवत आणि अभ्यासू अधिकाऱ्यानी भारतातील प्राचीनतम सस्कृतीची ओळख करून घेण्याच्या दृष्टीने या विषयाकडे आपले लक्ष वळविले त्याच्या परिश्रमाचा परिपाक क्रमाक्रमाने होऊन भारतीय शिल्प व कला याचा ठसा तत्कालीन राज्यकर्त्यांच्या सस्कृतीवर उमटून सन १७८४ साली सर विल्यम जोन्स यानी कलकत्ता येथे 'आशियाटिक सोसायटी'ची स्थापना केली आशिया खडातील इतिहास, कला, शिल्प, शास्त्र व वाङ्मय याचे परिशीलन करून त्याच्या आधारे प्राचीनतम सस्कृतीचे सुस्पष्ट दर्शन भारतीयाना करून द्यावयाचे, हाच प्रमुख उद्देश ती सोसायटी स्थापन करण्यामागे होता या सोसायटीच्याच धर्तीवर पुढे मुबई, मद्रास व कलकत्ता या ठिकाणी सस्था स्थापन होऊन त्याचे कार्य अल्पपणे सुरू झाले

सस्था चालविणारे हे उच्चवर्गीय अधिकारी प्रथमत आपले कर्तव्य चोख बजावून उरलेल्या वेळात आपले सशोधनाचे कार्य चालू ठेवीत. परतु यामध्ये एक तोटा होता तो असा की, ब्रिटिशाना आपली सत्ता दृढ करावयाची असल्याने त्या अधिकाऱ्याना सशोधनासाठी सपूर्ण वेळ देता येत नसल्याने या विषयाची पूर्ण वाढ होऊ शकली नाही इतकेच नव्हे, तर असे सागतात की, ताजमहालसारखी एकमेव सुदर कलाकृति, सगमरवरी पाषाणाला चागली किंमत येईल या भ्रामक समजुतीने, ती फोडण्याची कल्पना लॉर्ड बेंटिंगच्या अमदानीत पुढे आली होती

कपनी सरकारचा कारभार सपुष्टात आल्यावर सन १८६० साली त्या वेळच्या अधिकाऱ्यानी 'आर्किऑलॉजिकल सर्व्हे ऑफ इडिया' म्हणजेच 'भारतीय पुरातत्त्व कार्यालयाची' स्थापना केली या कार्यालयायोगे अनभिज्ञ व्यक्तीस सरकारी परवानगीशिवाय उत्खनन करण्यास बदी करण्यात येऊन शिल्प व इतर प्राचीन कलाकुसरींच्या कृतींचे सरक्षण करण्याची व्यवस्था करण्यात आली या मार्गे होणाऱ्या सशोधनास प्रसिद्धी देण्याकरिता 'इडियन ॲंटिक्वेरी' या नावाचे एक नियतकालिकही सुरू करण्यात आले या दोन्हींचे कार्य आजतागायत अव्याहत चालूच असून त्यामुळे भारतीयांच्या ज्ञानात प्रत्यही भरच पडत आहे. प्राचीन सस्कृतीबद्दल वाटणारा अभिमान दिवसेंदिवस वाढीस लागत आहे व इतर

पेशातील संस्कृतीपेक्षा आपण मागासलेले नाही, आपण त्यांच्या मागे नाही हेच क्षणोक्षणिक सिद्ध होत आहे.

काही वर्षांपूर्वीच्या कालखंडात संशोधन होऊन जी उत्खनने झाली, त्यांमध्ये मुसूत्रता, शास्त्रीय दृष्टि व साधने यांचा अभाव असल्यामुळे त्या कालखंडातील पुराणवस्तु संशोधनाचे कार्य वव्हशी बौद्धकालीन संस्कृतीचा इतिहास शोधणे यापुरतेच मर्यादित होते. संस्कृतीचा निदर्शक म्हणून मिळालेल्या या वस्तूंचा साठा एखाद्या संग्रहालयात करणे हे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवूनच संशोधन होत असे. यामध्ये प्राचीन कल्पकतेबद्दल वाटणारा आदर आणि कौतुक याचाच भाग जास्त होता. या अवशेषाचे भाग पाहून त्यावरून प्राचीन संस्कृतीचा तौलनिक अभ्यास करून क्रमशः होत गेलेल्या वाढीचा विचार करण्याची दृष्टि नव्हती. परंतु विसाव्या शतकाच्या सुरवातीला सर जॉन मार्शल या अनुभवी तज्ज्ञाची या खात्यावर नेमणूक झाल्यावर त्याला अधिक चालना मिळून संशोधनाचा दृष्टिकोनच पार बदलून गेला. ग्रीस, बोगाझ–केवू, ऊर, एलिभा इत्यादि पाश्चिमात्य ठिकाणी पूर्वी झालेल्या उत्खननाचा या रहस्याला अनुभव असल्याने त्याने पूर्व-पाश्चिमात्य संस्कृतीचा आणि मानवी जीवनात क्रमशः झालेल्या वाढीचा अथवा उत्क्रांतीचा अभ्यास चालू केला. अश्मयुग, ताम्रयुग, लोहयुग असे निरनिराळे विभाग पाहून उत्क्रांतीचे एक एक टप्पे उलगडण्यास या वेळीच सुरवात होऊन पुरातत्त्वखात्याचे महत्त्व एकदम वाढीस लागले.

तज्ज्ञांनी या युगाचे अनेक विभाग व उपविभाग पाडलेले आहेत. अश्मयुगाचा इतिहास पाहताना त्यामध्ये प्राचीनतम अश्मयुग, प्राचीनतर अश्मयुग, प्राचीन अश्मयुग, मध्यअश्मयुग, नवअश्मयुग असे उपविभाग आढळतात. त्यानंतरचा काल म्हणजे ताम्रयुग आणि शेवटी लोहयुग असा अनुक्रम आढळतो. वरील युगकाळात ज्या ज्या ठिकाणी काही संस्कृतीचे अवशेष सापडले आहेत, त्यावरून ती ती नावे त्या त्या संस्कृतीला दिली गेली आहेत.

प्राचीनतम युगात दगडी हत्यारांच्या विश्लेषणावरून त्या संस्कृतीचे तीन विभाग पाडलेले आहेत. सोहनपूर्वसंस्कृति, सोहनसंस्कृति आणि हातकुऱ्हाडसंस्कृति. सोहन हे नाव देण्याचे कारण असे की, रावळपिंडीजवळ सोहन ( संस्कृत–शोभना ) नावाची नदी वाहते आणि तिच्या खोऱ्यात जे संशोधन झाले आणि दगडी हत्यारे मिळाली, त्यावरून सोहन येथील उत्खननाचे तीन विभाग कल्पिण्यात आले आहेत. ही हत्यारे दगडगोट्यांच्या अगदी खालच्या थरात सापडली असल्याने भारतात ही संस्कृति अत्यंत प्राचीन समजली जाते. प्रथमतः सापडलेली हत्यारे अतिशय ओबडधोबड होती व त्यानंतर सापडलेली हत्यारे क्रमशः सुधारत

गेलेली आढळून येतात या संस्कृतीची हत्यारे आता गुजराथ, बिहार, ओरिसा, महाराष्ट्र, मध्यप्रदेश व मद्रास भागात सापडली असल्याने त्या संस्कृतीतील मानवप्राणी याही प्रदेशात वस्ती करून होते अगर संचार करीत होते असे अनुमान साहजिकच निघते या संस्कृतीचा कालखंड सनपूर्व साडेतीन हजार वर्षांपर्यंत मानला जातो आणि त्यानंतर ताम्रयुगास प्रारंभ होतो

अश्मयुग कालखंडात सोहन नदीजवळ ज्याप्रमाणे ओबडधोबड दगडी हत्यारे मिळाली, तद्वत् इतर ठिकाणी हातकुऱ्हाड, फरशी अकीक, जास्पर ही भोके पाडण्याची टोकदार हत्यारे सापडली आहेत तसेच भाला अथवा बाण, गोदावरी नदीच्या काठी सापडलेला रानटी बैलाचा सांगाडा, गारगोटीपासून बनविलेली हत्यारे, मृताचे अवशेष, अन्नधान्य साठवणीसाठी उपयोगात आणलेली मडकी व अन्न शिजविण्यासाठी उपयोगात आणलेला अग्नि इत्यादि मानवी प्राण्याच्या अस्तित्वाला पुष्टि देणारे पुरावे सापडले आहेत

अश्मयुगापर्यंत मानवाला कोणत्याही धातूचा उपयोग माहीत नव्हता. तो ताम्रयुग सुरू झाल्यानंतर मानवाला ठाऊक झाला तांबे आणि ब्रॉंझ या धातूचा उपयोग हत्यारात व दैनंदिन वस्तूंच्या वापरात होऊ लागला, म्हणूनच त्याला ताम्रयुग हे नाव प्राप्त झाले या युगातील सिंधुसंस्कृति ही तर प्रसिद्धच आहे या संस्कृतीचा काल सनपूर्व तीन सहस्र वर्षांचा मानला गेला आहे या संस्कृतीची व्याप्ति मोहेंजोदरो, हरप्पाप्रमाणेच अंबाला, भाटिंडा, जालंदर, गुजराथ, सौराष्ट्र या प्रदेशातही होती या संस्कृतीचे वैशिष्ट्य असे सांगता येईल की, खापरांची विविध बनावट, त्यावरील रंगीत नक्षीकाम, तांब्याची हत्यारं, रंगीत दगड, मणी, मुद्रा, योजनाबद्ध स्नानगृहे, बहुविध मृण्मय मूर्ति, मुद्रा इत्यादि वस्तु हे होय

याच कालखंडात मातृशक्तिदर्शक काही मूर्ति उपलब्ध झाल्या असल्याने त्याचा थोडासा विस्तारपूर्वक इतिहास पहाणे उचित होईल डॉ सांकलीया यांनी नेवासे येथील उत्खननाबद्दल एक 'हिस्टरी ऑफ नेवासे' या नावाचा ग्रंथ प्रसिद्ध केला आहे त्यावरून असे दिसते की, सनपूर्व दोन लक्ष वर्षे येथे मानवांची वस्ती होती ताम्रयुगातील सनपूर्व १५०० वर्षांचे असे अनेक जुने अवशेष, उदा० खापरे, पेले, धान्य ठेवण्याचे रांजण इत्यादि प्रकारचे सापडले आहेत मानवाची राहण्याची ठिकाणे ४५ × २० फूट इतक्या मोठ्या आकाराची आढळली आहेत घराच्या भिंती मातीच्या बांधलेल्या असत, तर घराची जमीन चुनामिश्रित असे काही भिंतीसाठी विटांचा वापर केलेला आढळतो आणि त्याचा आकार २१ × १३ × ३ असा आहे. ही बहुधा सातवाहनकालीन

संस्कृति असावी असे मानले जाते. येथील उत्खननात मातीच्या मातृकेच्या मूर्ति आढळल्या आहेत यावरून असे अनुमान काढण्यास हरकत नाही की, ताम्रयुगात मातृदेवताचा प्रसार झालेला होता लोकांच्या त्या पूजनात असून त्याच अनुरोधाने चित्रकार मातीच्या चित्रात त्याचे रूपांतर करीत असले पाहिजेत तसेच काही भाजलेल्या खापरावर स्त्री-मूर्तीच्या आकृति आढळून आल्या आहेत महाराष्ट्रात प्रकाशे, बहाल, नालासोपारा, जोर्वे, नाशिक, कऱ्हाड, कोल्हापूर, दायमाबाद, पैठण इत्यादि अनेक ठिकाणी उत्खनन झाले पण तेथे मातृकेच्या मूर्ति मिळाल्याचा उल्लेख आढळत नाही पंढरपूरजवळील तेर या गावी मात्र काही विशेष बनावटीच्या मातीच्या मातृकेच्या मूर्ति आढळून आल्या आहेत

## सिंधुसंस्कृति

भारतामधील उत्खनन कार्याचा इतिहास पाहताना पंजाब प्रांतातील मॉंटगोमेरी जिल्ह्यातील हरप्पा व सिंधप्रांतातील मोहेंजोदरो यांचा प्रामुख्याने उल्लेख केला जातो तेथील उत्खननाची माहिती देणारे अनेक ग्रंथ निर्माण झालेले आहेत इसवी सन १९२२ ते १९२७ पर्यंत येथे सतत उत्खनन सुरू होते, त्याचे वर्णन पुरातत्त्वखात्याचे त्या वेळचे अधिकारी सर जॉन मार्शल यांनी व इतरांनी ग्रंथातून करून ठेवलेले आहे सन १९३१ मध्ये त्यांनी हा ग्रंथ इंग्लंडमध्ये प्रसिद्ध केलेला आहे या दोन्ही ठिकाणच्या उत्खननामध्ये भरपूर साम्य आहे तेथे आढळलेल्या अवशेषावरून जाणकारांचे असे मत बनले आहे की, सनपूर्व सुमारे चारशे वर्षे तरी ही संस्कृति त्या ठिकाणी स्थापन झालेली असून तिचा काळ सुमारे तीन सहस्र वर्षांपर्यंत तरी चांगला होता

या दोन्ही शहरातील लोक चांगले सुधारलेले होते हे खालील वर्णनावरून आपल्या तेव्हाच लक्षात येईल

(१) या शहरातून सुमारे तीस फूट रुंदीचे पक्के रस्ते बांधलेले होते

(२) मोठमोठी घरे रस्त्याबरोबर काटकोनात बांधलेली होती.

(३) घराच्या रांगेमध्ये ३ ते ७ फूट अंतराचे लहान बोळ अगर वाटा होत्या

(४) रस्त्याच्या दोन्ही बाजूस सांडपाणी जाण्यासाठी पक्की गटारे बांधलेली होती

(५) १०८'×१८०' या आकाराची सार्वजनिक स्नानगृहे बांधलेली होती

(६) ३९'×२३' या आकाराचे पोहण्यासाठी तलाव असून त्याच्या चारी बाजूस विश्रांतीसाठी ओवऱ्या बांधलेल्या होत्या. या ओवऱ्यांचे बांधकाम भाजलेल्या विटांचे केलेले होते व त्यांना चुन्याचा गिलावा केलेला होता. एका पाण्याच्या साठ्यातून दुसऱ्या साठ्यात पाणी जाण्यासाठी जमिनीत आठ फूट खोलीवर नळ टाकले होते. तसेच अशुद्ध पाण्याचा निचरा होण्यासाठी नळ टाकून मार्ग केलेला होता.

(७) १६८'×१३४ या आकाराची भाजलेल्या विटांची एक भव्य इमारत बांधलेली होती. या इमारतीत अनेक गाळे असून ही इमारत म्हणजे त्या काळचे मार्केट होते, असा कयास बांधला जातो.

(८) २४२'×११२' या आकाराची आणखी एक भव्य इमारत होती. तिचा पाया नऊ फूट रुंद होता व दोन्ही बाजूंना पादचारी लोकांना जाण्यायेण्यासाठी मार्ग केलेला होता.

(९) दोन रस्त्यांच्या कोपऱ्यावर एखादे तरी भव्य उपाहारगृह बांधलेले होतेच.

(१०) काही ठिकाणी सार्वजनिक बागांच्या जागा होत्या.

यावरून असे दिसून येईल की, या संस्कृतीमधील लोक पूर्ण सुधारलेले होते. आरोग्यदृष्ट्या शहराची मांडणी कशी करावी याची त्यांना पूर्ण कल्पना होती. घरे टुमदार व रस्ते सुशोभित ठेवण्याची आवश्यकता त्यांना पटलेली होती. यामुळेच आर्यांच्या आगमनापूर्वीच भारतामध्ये मानवी संस्कृति वृद्धिंगत झालेली होती, असे मानले जाते, ते उपरिनिर्दिष्ट पुराव्यामुळेच होय.

सिंधुसंस्कृतीचा विस्तार भारतामध्ये इतर ठिकाणीही झालेला होता. त्या संस्कृतीचे क्षेत्र उपरिनिर्दिष्ट हरप्पा व मोहेंजोदडो या दोन ठिकाणापुरतेच मर्यादित नसून त्या संस्कृतीचे अवशेष पंजाबात अंबाला, भाटिंडा, जालंदर हे जिल्हे, गुजरातमध्ये लोथल व इतर अनेक स्थळ, सौराष्ट्रात रोजडी, सोमनाथ आणि उत्तर प्रदेशात मीरतच्या पश्चिमेस सतरा मैलांवर असलेल्या अल्मगीरपूर या ठिकाणीही आढळले आहेत. काही ठिकाणी इतर संस्कृतीशी या संस्कृतीचा संपर्क साधल्यासारखा वाटतो.

काठेवाडात लोथल या गावी एक मोठी गोदी उघडकीस आली आहे. ७१०'×२१०' या आकाराचा तिचा विस्तार असून पूर्वेकडील बाजूला तेवीस फूट रुंदीचे मोकळे दार आहे. तसेच ७१०'×५२५' या आकाराचा धक्काही

आहे. हल्ली मुंबई अथवा इतर मोठ्या बंदरात ज्याप्रमाणे बोटी बंदरात घेण्यासाठी लॉकगेटची ( Lock-Gate ) व्यवस्था असते आणि त्यामुळे भरती अगर ओहोटीच्या वेळी बंदरात बोटी घेणे सुलभ जाते, त्याप्रमाणेच या तेवीस फूट रुंदीच्या दरवाजाचा उपयोग होत असावा. यावरून एक निष्कर्ष काढता येतो की, सध्या जरी लोथल हे गाव समुद्रापासून फार दूर भासत असले तरी त्या वेळी तशी परिस्थिति नसून समुद्राचे पाणी जवळ असल्यामुळे जहाजाची वाहतूक सुलभपणे होत असावी. या गोदीचा उपयोग परदेशाबरोबर चालणाऱ्या व्यापारासाठी होत होता. कारण सिंधुसंस्कृतीचे अनेक अवशेष इजिप्त, मेसापोटेमिया, इराण, बॅबिलॉन इत्यादि ठिकाणी आढळून आलेले आहेत. येथील उत्खननात अरत्र खलाशांची स्वरूपे दाखविणारी अनेक चित्रे मिळाली आहेत. या ठिकाणाहून जाणाऱ्या-येणाऱ्या जहाजांचा प्रवास सुखावह व्हावा म्हणून तेथेच बंदर भागात ‘ वरुणावती ’ या देवीची पूजा केली जात असे. ही देवता आजही त्या ठिकाणी आहे असे समजते. या बंदरातून सुमारे सनपूर्व तीन सहस्र वर्षे तरी व्यापार चालत असे.

(भाषण— श्री. एस. आर. राव, अधिकारी, पुरातत्व संशोधनखाते)

सौराष्ट्रात रंगपूर, रोजडी आणि सोमनाथ येथील उत्खननात सिंधुसंस्कृतीचे काही अवशेष म्हणजे खापरे, विटांची घरे, गटारे, दागदागिने इत्यादि वस्तु मिळाल्या. परंतु त्या ठिकाणी मातीच्या देवतांच्या मूर्ति मात्र मिळालेल्या नाहीत. पंजाबप्रांतात रूपड, उत्तर प्रदेशात आलमगीरपूर या ठिकाणी सिंधुसंस्कृतीदर्शक काही खापरे अगर मृतांना पुरण्याचे खाडे मिळाले आहेत. तसेच काही दागिने व विटांची घरे मिळाली आहेत. पण यातील काही अवशेष इतर संस्कृतींशी मिश्रित असल्याने संशोधकांना पूर्णतः उपयोगी वाटत नाहीत. या संस्कृतीचा विनाश कसा झाला याचा उलगडा संशोधकांना होत नाही. कोणी म्हणतात की, नद्यांच्या पुरामुळे ती नष्ट झाली, तर काहींच्या मते आर्यांनी आपली सत्ता भारतात दृढमूल करीत असताना या पूर्व संस्कृतींचा नाश करूनच आपले बस्तान बसविले असावे.

भारतात राजस्थान भागात आहाड (उदेपूर) गिलुंड, नर्मदाकाठी नावडतोडी, चंबळा नदीच्या किनारी नागदा या ठिकाणी उत्खनन होऊन ताम्रयुगीन संस्कृतीचे काही अवशेष ( उदाहरणार्थ) मद्य-चषक, तोटीची मडकी इत्यादि सापडली आहेत. तसेच उत्तर प्रदेशातील आलमगीरपूर, मथुरा, अहिच्छत्रा हस्तिनापूर या ठिकाणच्या उत्खननांत उत्तम भाजणीची व काळ्या रंगाने नक्षीकाम केलेली मडकी आढळली आहेत. दक्षिण भारतामध्ये अरिकमेडु,

गाभाऱ्यात पुरुषदेवता नसते. शंकर-पार्वती, लक्ष्मीनारायण ही प्रमुख उदाहरणे सोडली तर रेणुका, जोगाई, माता, बोलाई, मरिअम्मा, जोखाई यांची पूजा फक्त स्त्रीस्वरूपानीच केली जाते. काही ठिकाणी जरी देवीची रक्षक म्हणून एखादी पुरुष-देवता असली तरी श्री. रिचर्डसन ह्यांच्या म्हणण्यानुसार दक्षिणेकडील देवळांमधून हा प्रकार आढळत नाही. आता दक्षिणेकडील लोक म्हणजे द्रविडियन वंश आणि हाच वंश पूर्वी हरप्पा, मोहेंजोदरो या ठिकाणी होता असे जाणकार सांगतात. तेव्हा आर्य भारतामध्ये आल्यावर आणि त्यांनी या ठिकाणच्या संस्कृतीवर आघात केल्यावर, द्रविडियन क्रमशः दक्षिणेत येऊन स्थायिक झाल्यावर आपली संस्कृति त्यांनी आपल्याबरोबर आणली. तेव्हा तात्पर्य असे की, हरप्पा येथे मातृदेवतेला पुरुष जोडिदार नव्हता, तसा तो आजही दक्षिणेत देवींच्या मंदिरातून आढळत नाही.

या ठिकाणी अनेक शिक्के सापडलेले आहेत व त्यापैकी अनेकांवर मातृ-शक्तिनिदर्शक आकृति आहेत. एका शिक्क्यावर पांचमुखी शंकराची आकृति आहे. शंकराची नावे अनेक आहेत, वास्तव त्या संस्कृतीमध्ये नेमके कोणत्या नावाने त्याला संबोधीत असत हे माहीत नाही. परंतु एवढे मात्र खरे की, या संस्कृतीमध्ये शंकराची व मातृकांची पूजा होत असे. केवळ याचसाठी शंकर ही आर्यांनी पूर्व संस्कृतीमधील आत्मसात केलेली देवता आहे, असे मानले जाते. ही मूळ आर्यांची देवता नव्हे असेच अनुमान निघते. या ठिकाणी शंकराच्या लिंगाचे अवशेष विपुल प्रमाणात सापडलेले आहेत. याच आकाराचे लिंग जैनधर्मीय अथवा लिंगायतधर्मीय आपल्या गळ्यात वापरीत असतात. उमा, काली, पार्वती, दुर्गा इत्यादि शंकराच्या अनेक बायका मानलेल्या आहेत. त्यां-पैकी काही रूपे सौम्य स्वरूपाची तर काही उग्र स्वरूपाची आहेत. येथील उत्खननात मातृकेच्या ज्या बाहुल्या सापडलेल्या आहेत, त्या सौम्य स्वरूपाच्या भासतात, म्हणजे यावरूनच दुसरे अनुमान निघते की, आदिशक्तीची उग्र रूपे काली, दुर्गा ही या संस्कृतीनंतर अस्तित्वात आली. अनार्यांचा पाडाव करीत असताना आर्यांनी या शक्तिस्वरूपाची उपासना केली आणि त्यानंतर ती प्रचारात आली.

दुसऱ्या एका मूर्तीचे निरीक्षण केले तर असे दिसून येते की, मूर्तीच्या वक्षः-स्थळांची वाढ मुळातच दाखविलेली नाही. यावरून असा निष्कर्ष काढता येतो की, ही आकृति कुमारी मातृदेवतेची असली पाहिजे, पूर्ण वाढ झालेल्या स्त्रीदेवतेची नव्हे.

एका शिक्क्यावरील स्वरूप तर फारच आकर्षक आहे. ही देवता मस्तका-वर दोन शिंगे असलेली व दोन पिंपळाच्या वृक्षांच्या मध्ये उभी असलेली

ब्रह्मगिरी, चंद्रवल्ली, अमरावती, नागार्जुनकोण्डा इत्यादि ठिकाणी उत्खनन झाले व अनेक अवशेष सापडले. परंतु प्रस्तुत ग्रंथाच्या विषयाच्या दृष्टीने त्यामध्ये विशेष नोंद करण्यासारखी माहिती उपलब्ध नाही.

सिंधुसंस्कृतीमध्ये हरप्पा व मोहेंजोदरो येथील मातृदेवताचा ऊहापोह जरा विस्ताराने करावयास पाहिजे. हरप्पा हे स्थान पंजाबात रावी नदीच्या काठी तर मोहेंजोदरो हे ठिकाण खाली दक्षिणेस चारशे मैल अंतरावर सिंधुनदीच्या किनारी आहे. एके काळी जरी ही शहरे नदीच्या काठावर वसलेली होती, तरी आता नदीच्या पात्रापासून सुमारे शंभर मैल लांब गेलेली आहेत. यावरून असे अनुमान काढले जाते की, ही संस्कृतीदर्शक शहरे नद्यांच्या पुराच्या पाणलोटाखाली गाडून गेलेली असावीत. कारण सुमारे ४० ते ५० फूट भूपृष्ठाखाली गेल्यावरच त्या शहराचे अवशेष सापडतात. येथील उत्खननामध्ये ज्याप्रमाणे भव्य इमारती, गटारे, नागा इत्यादि आढळल्या त्याप्रमाणे खापरे, काचेचे मणी, तरवार व इतर अस्त्रेदेखील सापडली आहेत. परंतु आपल्याला मात्र फक्त तेथे मिळालेल्या पुतळ्याचा विचार करावयाचा आहे.

येथे मातीच्या अनेक लहान लहान मूर्ति सापडल्या आहेत त्यांचे आकार व त्यांची सजावट निरनिराळ्या प्रकारची आहे. एका मातृकेच्या अंगावर भरपूर अलंकार व मस्तकावर पंखाच्या आकाराचा मुकुट असून दोन्ही बाजूना धुपाटण्यासारखे दोन गोल पेले आहेत. या मूर्तीचे नाव मात्र समजून येत नाही. पेल्यावर पडलेले धुराचे डाग आजही दृष्टोत्पत्तीस पडतात. त्यावरून असे अनुमान काढले जाते की, देवीपूजक त्या पेल्यात धूप जाळीत असावेत. मूर्तीचे स्वरूप कालमानाप्रमाणे जरी बरेचसे खराब झालेले असले तरी या बाहुल्या मातृशक्तीच्याच निदर्शक आहेत, असे खात्रीपूर्वक म्हणता येते. या मूर्ति घराच्या भिंतीना अडकून ठेवीत असावेत. कारण मूर्तीच्या पाठीमागील भाग ओबडधोबड बनावटीचा दिसून येतो. या मूर्तीच्या अंगावर अतिशय तोकड्या झग्याशिवाय कोणतेही वस्त्र नाही. गळ्यामध्ये छातीपर्यंत लोंबणारा पुष्पहार आहे. सिंहकटीप्रमाणे कंबर बारीक, सरळ लांब हात आणि नागरूपी कमरपट्टा आहे. कमरेभोवती नागाची तीन वेटोळी असून पुढील भागी फणा पसरलेला आहे. तोंड रुंद, डोळे बटबटीत आणि कानात कुंडले घातलेली दिसतात.

येथे लक्षात घेण्यासारखी गोष्ट म्हणजे स्त्रीमूर्तीच्याबरोबर पुरुषदेवताची मूर्ति आढळली नाही. आजही अनेक गावामधून देवी ही ग्रामरक्षक असून भक्तांची इच्छा पूर्ण करणारी म्हणून मानली जाते, तद्वतच त्या संस्कृतीमध्ये तिची योग्यता असावी. भारतामधील अनेक गावी फक्त देवीची पूजा होते.

गाभाऱ्यात पुरुषदेवता नसते. शंकर-पार्वती, लक्ष्मीनारायण ही प्रमुख उदाहरणे सोडली तर रेणुका, जोगाई, माता, बोलाई, मरिअम्मा, जोखाई यांची पूजा फक्त स्त्रीस्वरूपाचीच केली जाते. काही ठिकाणी जरी देवीची रक्षक म्हणून एखादी पुरुष-देवता असली तरी श्री. रिचर्डसन ह्यांच्या म्हणण्यानुसार दक्षिणेकडील देवळांमधून हा प्रकार आढळत नाही. आता दक्षिणेकडील लोक म्हणजे द्रविडियन वंश आणि हाच वंश पूर्वी हरप्पा, मोहेंजोदरो या ठिकाणी होता असे जाणकार सांगतात. तेव्हा आर्य भारतामध्ये आल्यावर आणि त्यांनी या ठिकाणच्या संस्कृतीवर आघात केल्यावर, द्रविडियन क्रमशः दक्षिणेत येऊन स्थायिक झाल्यावर आपली संस्कृति त्यांनी आपल्याबरोबर आणली. तेव्हा तात्पर्य असे की, हरप्पा येथे मातृदेवतेला पुरुष जोडिदार नव्हता, तसा तो आजही दक्षिणेत देवींच्या मंदिरातून आढळत नाही.

या ठिकाणी अनेक शिक्के सापडलेले आहेत व त्यापैकी अनेकावर मातृ-शक्तिनिदर्शक आकृति आहेत. एका शिक्क्यावर पांचमुखी शंकराची आकृति आहे. शंकराची नावे अनेक आहेत, याउलट त्या संस्कृतीमध्ये नेमके कोणत्या नावाने त्याला संबोधीत असत हे माहीत नाही. परंतु एवढे मात्र खरे की, या संस्कृतीमध्ये शंकराची व मातृकाची पूजा होत असे. केवळ यावसाठी शंकर ही आर्यांनी पूर्व संस्कृतीमधील आत्मसात केलेली देवता आहे, असे मानले जाते. ही मूळ आर्यांची देवता नव्हे असेच अनुमान निघते. या ठिकाणी शंकराच्या लिंगाचे अवशेष विपुल प्रमाणात सापडलेले आहेत. याच आकाराचे लिंग जैनधर्मीय अथवा लिंगायतधर्मीय आपल्या गळ्यात वापरीत असतात. उमा, काली, पार्वती, दुर्गा इत्यादि शंकराच्या अनेक बायका मानलेल्या आहेत. त्यां-पैकी काही रूपे सौम्य स्वरूपाची तर काही उग्र स्वरूपाची आहेत. येथील उत्खननात मातृकेच्या ज्या बाहुल्या सापडलेल्या आहेत, त्या सौम्य स्वरूपाच्या भासतात, म्हणजे यावरूनच दुसरे अनुमान निघते की, आदिशक्तीची उग्र रूपे काली, दुर्गा ही या संस्कृतीनंतर अस्तित्वात आली. अनार्यांचा पाडाव करीत असताना आर्यांनी या शक्तिस्वरूपाची उपासना केली आणि त्यानंतर ती प्रचारात आली.

दुसऱ्या एका मूर्तीचे निरीक्षण केले तर असे दिसून येते की, मूर्तींच्या वक्षः-स्थळांची वाढ मुळातच दाखविलेली नाही. यावरून असा निष्कर्ष काढता येतो की, ही आकृति कुमारी मातृदेवतेची असली पाहिजे, पूर्ण वाढ झालेल्या स्त्रीदेवतेची नव्हे.

एका शिक्क्यावरील स्वरूप तर फारच आकर्षक आहे. ही देवता मस्तका-वर दोन शिंगे असलेली व दोन पिंपळाच्या वृक्षांच्या मध्ये उभी असलेली

दाखविली आहे. देवीपूजकाच्या मस्तकावर लांब केशकलाप असून तसाच मूर्तीच्या ठायींही दाखविलेला आहे. मूर्तीच्या हातात पुष्कळशी काकणे असून काही ठिकाणी वृक्षाच्या डहाळीच्या मागे शिंगामधून पुष्पहार सोडलेला आहे. पूजकाच्या मागे मानवमुख असलेला एक बकरा देवीकडे लक्ष लावून पाहात आहे. खालील बाजूस सात स्त्रीआकृति देवीकडे तोंड करून उभ्या असून त्याच्या केसाच्या वेण्या पाठीमागे लांब सुटलेल्या असून त्यावर वृक्षाची डहाळी असल्याचा देखावा आहे. या आकृतीचा अर्थच समजावून घ्यावयाचा तर असे म्हणता येईल की, पिंपळ वृक्षावर लक्ष्मीचा निवास असतो. तसेच पिंपळवृक्षाची पूजा म्हणजेच वनस्पतीची पूजा आणि बकरा म्हणजे पशूची पूजा याचे प्रतीक मानावे लागेल.

एका आकृतीमध्ये देवता दोन वृक्षाच्या मध्ये उभी असून आपल्या दोन्ही हातानी तिने ते वृक्ष धरलेले आहेत. या आकृतीबाबत जाणकाराचे असे मत आहे की, ही वृक्षदेवता असून एकतर ती वृक्षाची लागवड करीत आहे असे निर्दर्शित केले असावे, अथवा सांप्रत आपण ज्याप्रमाणे तुलसी-वृक्ष विवाह करतो, त्याप्रमाणे ती देवता दोन वृक्षाचा संयोग घडवून आणीत असावी

कडुलिंबाच्या वृक्षाची पूजा, बकरा, रेडा, हत्ती, वाघ, बैल, सुसर या सर्वांची चित्रे निरनिराळ्या शिक्क्यावर आढळतात. यापैकी कित्येक देवताची वाहने आहेत. पण ती देवताबरोबर एकत्र काढलेली आढळत नाहीत. तरी ती एकत्र न दाखविण्याचा उद्देश काय होता, हे कोडे उलगडत नाही. कदाचित देवताचे प्रतीक म्हणून त्याचे वाहन दाखविले असेल तर गोष्ट निराळी

सूर्यदेवता व स्वस्तिक याचेही शिक्के मिळालेले आहेत. काही मातृकाच्या मूर्ति नृत्यामध्ये मग्न असलेल्या आढळल्या आहेत त्याचे ओठ व शरीरभाग रंगविलेला दिसतो. गुप्तलिंगे झाकण्याचा प्रयत्न नेहमीच केलेला नाही. एका त्रिमूर्तीच्या आकृतीत पाय जोडलेले, तर हात पसरलेले आणि तेही काकणयुक्त आहेत. गळ्यात त्रिकोणी कंठा, उजव्या बाजूला हत्ती-वाघ तर डाव्या बाजूला गेंडा म्हैस आणि पायाखाली दोन हरणे दाखविलेली आहेत.

या संस्कृतीचे संशोधन करणारे श्री. अर्नेस्ट मॅकेसाहेब म्हणतात, 'येथील काही अवशेषाचा पुरावा उपलब्ध आहे. त्याचे निरीक्षण केल्यावर असे दिसते की, सिंधुसोन्यातील लोकांचा धर्म काय होता, हे निश्चितपणे सांगणे कठीण आहे. शिव आणि त्याचा परिवार याची चित्रे जरी विपुल प्रमाणात मिळाली असली तरी ती हेच दर्शवितात की, हराप्पा आणि मोहेंजोदरो येथील संस्कृति ही त्या वेळच्या तेथील लोकानी फार पूर्वी तेथे राहात असलेल्या लोकापासून घेतली असली पाहिजे. उदाहरणार्थ, मातृदेवताची पूजा ही भारतामधील अति-

प्राचीन पूजेपैकी एक आहे व ती सिंधुखोऱ्यातील लोकांनी उचलली असली पाहिजे प्राणी व वनस्पति यांच्या बाबतीतही हेच खरे असले पाहिजे शिंगे असलेली देवता या ठिकाणी दिसते, ती बहुधा इजिप्त (हॅर्योरप्रमाणे) सुमेरिया येथे व्यापार करीत असताना येथे आली असली पाहिजे [1] परंतु या शिंगवाल्या देवतेचा प्रसार पुढे भारतामध्ये झालेला नसून सिंधुसंस्कृतीबरोबरच ती विलयाला गेली ' हे मत जर खरे असेल तर सिंधुसंस्कृतीचे लोक वायव्य दिशेकडून भारता मध्ये आले, तेव्हा या भागात मानववस्ती होती आणि तीही चांगल्या संस्कृतीची निदर्शक होती मातीची पक्की भांडी तयार करणे, ती रंगविणे, मूर्ति बनविणे, त्या रंगविणे इत्यादि कला त्यांना अवगत होत्या इतकेच असेल की, त्यांची संस्कृति सिंधुसंस्कृतीपेक्षा हलक्या प्रतीची होती, तितकीशी उन्नत नव्हती, प्रगत नव्हती परंतु हे पूर्वकालीन लोक भारतामध्ये केव्हा आले, कोठून आले याचा समाधानकारक उलगडा होत नाही सारांश इतकाच की, आर्य भारतामध्ये येण्यापूर्वी दुसऱ्या दोन टोळ्या काही कालाच्या अंतराने येऊन स्थाईक झालेल्या होत्या व त्यांचीच काही संस्कृति उचलून आर्यांनी त्यात पुढे सुधारणा केली

मध्य भारतामध्ये जयपूर ह्या शहरापासून सुमारे पंधरा मैल अंतरावर रायर हे गाव आहे हे गाव धील नदीच्या खोऱ्यात वसलेले आहे सनपूर्व दोनशे वर्षांपूर्वी, या ठिकाणी सुंग घराणे राज्य करीत होते त्या वेळचे शहर जमीनदोस्त झाले असून आता पंचवीस तीस झोपड्यांचे ते एक खेडेगाव आहे या ठिकाणी जे उत्खनन झाले त्याचे वृत्त डॉ के एन् पुरी ह्यांनी ' रायर येथील उत्खनन ' या नावाने प्रसिद्ध केले आहे मातीची भांडी, दगडाची व धातूची भांडी, धातूची हत्यारे, यक्षिणीचे पुतळे, वस्त्रे व सौंदर्यप्रसाधने इत्यादि अनेक वस्तु येथे मिळाल्या आहेत त्याचप्रमाणे मातृकांच्या मूर्तीही मिळाल्या आहेत त्या मूर्तींचे स्वरूप आपण संक्षिप्तरीतीने पाहू

या ठिकाणी सुमारे तीस मातीच्या मूर्ती मिळालेल्या आहेत त्यांची उंची साधारणत आठ इंचाहून जास्त नाही कांहींचे अवयव तुटलेले, काही वस्त्र-विरहित, तर काही वस्त्रांनी आच्छादलेल्या आहेत कांहींच्या अंगाला गेरू लावलेला, कांहींच्या अंगावर अलंकार व हातात कांकणे असून कांहींच्या मस्तका वर मुकुट आहेत कांहींचा आकार बेढब आहे तर इतर काही शिल्पदृष्ट्या अतिशय रेखीव आहेत तेथील शिल्पावर बौद्ध संस्कृतीचा ठसा मात्र उमटलेला दिसून येत नाही

---

१ टीप—भिक्षु चमनलाल यांच्या संशोधनाप्रमाणे भारतीय सूर्यवंशाने ईजिप्त, ग्रीस, सिरिया येथे आपले वर्चस्व स्थापून, संस्कृतीचा प्रसार केला.

एक मूर्ति समोर चेहरा करून उभी आहे तिच्या मस्तकावर केसाची मोठी गाठ व त्याच्या खालील केस चापूनचोपून बसविलेले असून त्यावर पुष्पमाळा माळलेल्या आहेत मस्तकाच्या दोन्ही बाजूंना खजुराची तीन तीन झाडे असून त्याला आलेली फळे लाल रंगाने रंगविलेली आहेत कानाच्या पाळ्यात दोऱ्याच्या रिळाच्या आकाराची कर्णफुले असून कानाच्या वरील बाजूस ती दोऱ्यांनी अडकविलेली आहेत उजव्या खांद्यावरून पुष्पमाला खाली सुटलेली असून झग्यावरून कमरपट्टा आहे झगा बराच खाली लोंबत असून त्याच्या घड्या क्षितिजाला समांतर अशा घातलेल्या आहेत या घड्या उच्च संस्कृतीच्या निदर्शक मानल्या गेलेल्या आहेत मूर्तीच्या कमरेवर तिचे दोन हात असून त्या हातात तिने काहीतरी वस्तु घेतलेली आहे, असे दिसते बहुधा ही सिनीवाली या देवतेची मूर्ति असावी

एका मातीच्या भांड्यावरील चित्रामध्ये देवता समोर तोंड करून उभी आहे व तिच्या मस्तकाभोवती तेजाचे वलय आहे असे दाखविले आहे बक्सरा येथील उत्खननामध्ये असे वलय असलेली एक मूर्ति आढळलेली आहे त्या मूर्तीच्या गळ्यात छातीवरून खाली लोंबणारा पुष्पहार आहे त्याची टोके मण्यांनी युक्त असून खाली सुटलेली अशी जाडजूड कर्णभूषणे आहेत डाव्या हाताने झग्याच्या घड्या धरलेल्या असून उजव्या हातात तरवारीसारखे एक हत्यार आहे शरीराची रचना अतिशय रेखीव असून तिने नसलेल्या झग्यावर अनेक चुण्या पाडलेल्या आहेत अंगावर बारीक कलाकुसर केलेले अलंकार आहेत यावरून येथील शिल्पकला उत्कृष्ट दर्जाची असली पाहिजे, असे दिसते झग्याच्या खालील कापडाचा पारदर्शकपणा त्या वेळी वस्त्रावस्था किती उन्नतावस्थेस गेली होती, हेच दर्शवितो मूर्ति लाल रंगाने रंगविलेली आहे मूर्तीची उंची मात्र सहा इंचापेक्षा जास्त नाही

वरीलप्रमाणेच इतर मूर्तींचेही वर्णन देता येईल परंतु विषय समजण्याच्या दृष्टीने वरील नमुने पुरेसे आहेत सिंधुसंस्कृति पूर्वेकडे सरकत जाऊन ती कशी उन्नत झाली हेच या वर्णनावरून ध्यानी येईल. कौसंबी, हस्तिनी, पैठण इत्यादि ठिकाणी उत्खनन झालेले आहे पण त्या ठिकाणचे अवशेष वा त्याची माहिती या ग्रंथाच्या विषयाच्या दृष्टीने अनुरूप नाही

भारतामधील उत्खनन पाहिल्यावर पाश्चिमात्य देशातील काही नमुने पाहणे तौलनिक दृष्ट्या इष्टच होय इजिप्त, मेसापोटेमिया, सीरिया या भागात अनेक ठिकाणी उत्खनन झालेले असून त्यामध्ये भारतीय संस्कृतीमधील अनेक वस्तु आढळल्या आहेत उदाहरणार्थ, बोघास–केवू या ठिकाणी जे उत्खनन

झाले त्यामध्ये सनपूर्व १४०० वर्षांपूर्वीच्या संस्कृतीची चिन्हे आढळली आहेत त्यावरून स्पष्टपणे दिसते की, मेसापोटेमिया या भागात पूर्वी आर्य लोकांची वस्ती होती त्यांचे देव, मित्र, वरुण, इंद्र, नासत्य यांची पूजा त्या ठिकाणी होत असे. पण सनपूर्व नवव्या शतकात तो वंश "इराणी" या नावाने ओळखला जाऊ लागला कोणी त्याना "मिडीयन" असेही म्हणत

सन १९०७ साली जर्मन पंडित ह्यूगो विंक्लेर ह्याने तेथे जे संशोधन केले त्यावरून त्याने असे निश्चित केले आहे की, युरोपियन मानववंश आणि भारतीय वंश यांचे मूल गृह एकच असले पाहिजे या विधानाला पुष्टी स्लॉव्ह भाषेतील काही शब्दांची देता येईल श्रीमती गुसेवा या रशियन बाईने असे प्रगट केले आहे की, भारतीय वरुण या अर्थी वेरुण अथवा मोक्ष या अर्थी मोकोश हे संस्कृत शब्द त्या भाषेत आढळतात भाजलेल्या विटांवर मिळालेली मित्र, वरुण, नासत्य यांची चिन्हे याच त्यांच्या निदर्शक होत

येथे सापडलेल्या एका मातीच्या मूर्तीचे हे वर्णन पहा या मूर्तीची उंची साधारण एक फुटाची असून मस्तकावर मुकुट आहे केसांचा लांब वेणी पाठीवर लोळत आहे डाव्या हातात एक मूर्तिचिन्ह असून उजव्या हातात काठी आहे हा मूर्ति सिंहाधिष्ठित असून तिने लांब झगा परिधान केलेला आहे त्याच आकृतीत तिचा मुलगाही दाखविलेला आहे त्याचा पुरुषवेश असून दाढी वाढविलेली, हातात काठी व कुऱ्हाड, कमरेला खंजीर व सिंह वाहन अशी त्याची आकृति आहे या मूर्तीचे नाव अँटीस असे आहे

पूर्व युरोप भागात अनेक संस्कृति आल्या आणि गेल्या सुमेरियन, अक्केडियन, बॅबीलॉन, असेरियन, हिटाईट, खाल्डियन, ग्रीक, फोनेशियन, मायो इ० त्यापैकी या प्रमुख होत या संस्कृतींची माहिती घेण्यासाठी अनेक ठिकाणी उत्खनने झालेली आहेत सुमेरियाची पूर्वीची राजधानी निपूर शहर हें होय तेथे झालेल्या उत्खननामध्ये पाच ते सहा सहस्र वर्षांपूर्वीचे अवशेष मिळालेले आहेत दुसरे एक प्रसिद्ध शहर ऊर हे उकरले असता तेथे तीन सहस्र वर्षांपूर्वीचे अवशेष सापडले आहेत त्यामध्ये देवतांच्या मूर्ति, नाव, स्तंभ, सुवर्ण व चांदीचे अलंकार, हस्तिदंताचे अलंकार, रथ, शिरस्त्राणे, गळ्यातील मौल्यवान कंठे इत्यादि वस्तु मिळालेल्या आहेत सुमेरियन वंश सुमारे सनपूर्व २७५० साली संपुष्टात आला एनलिल ही त्याची प्रमुख देवता असून तिचे अंश उत्खननामध्ये मिळालेले आहेत हमूरबी याने सनपूर्व २१०० वर्षे बॅबिलोन येथे साम्राज्य स्थापिले त्या संस्कृतीचेही अवशेष मिळालेले आहेत

पूर्व युरोपातील वरील संस्कृति आणि भारतामधील सिंधुखोरे संस्कृति या समकालीन मानल्या जातात. या दोन्ही देशात त्या वेळी व्यापार चालत असे आणि त्यामुळे वस्तूंच्या देवघेवींत गेलेल्या भारतामधील काही वस्तु त्या ठिकाणी आढळतात. सिंधुसंस्कृतीमधील मुद्रा ऊर येथे आढळल्या आहेत. संशोधक श्री. अर्नेस्ट मॅकेसाहेब या वस्तूंची यादी आपल्या पुस्तकात देतात. ती येणेप्रमाणे.

१. पॅलेस्टाईन—तरवार. २. कॉकेशस—ब्रॉंझचे कुऱ्हाडीचे पाते.

३. इजिप्त-सुमेर—ब्रॉंझची चित्रे. ४. एलम—दगडाची वजने व चकाकीचे द्रव्य.

५. मेसापोटेमिया—दशांश वजने. ६. सुमेर-बॅबीलोन—मातीच्या वस्तु.

७. इजिप्त—चुना, दगड, अलबेस्टर. ८. सुमेरिया—शिंपाचे मूर्तीचे डोळे.

वरील विवरण देण्याचे कारण असे की, भारतामधील सिंधुखोऱ्यामध्ये ज्या वेळी प्रगत संस्कृति नांदत होती असे विधान आपण करतो, त्या वेळी अथवा त्याच्या किंचित् अगोदर पूर्व युरोपमध्ये तितकीच सुधारलेली संस्कृति नांदत होती. जर्मन पंडिताने म्हटल्याप्रमाणे असेही म्हणता येईल की, या दोन्ही संस्कृतींतील लोकांचे मूलस्थान एकच असून गर्दीच्या रेट्याच्या प्रभावाने ते दोन ठिकाणी विभागले गेले असावे. याचाच अर्थ असा की, सिंधुखोऱ्यात आलेली ही आर्य लोकांची पहिली टोळी व ज्यांना आपण साम्प्रत आर्य म्हणून संबोधतो ती दुसरी टोळी असावी. सिंधुखोऱ्यातील लोक भारताच्या अनेक भागातून कच्चा माल मिळवत असत. म्हैसूर भागातून सोने, काश्मीरमधून काळवीटाची शिंगे, नीलगिरीमधून ॲमेझॉन जातीचा दगड, मध्य आशियामधून जडाइट नावाचा पदार्थ, अफगाणिस्तानमधून जस्त-शिसे, इत्यादि इत्यादि. या वस्तूंपासून बनविलेल्या तयार वस्तु पूर्व युरोपातील उत्खननात सापडलेल्या आहेत. दोन्ही देशांतील व्यापार व देवघेव दाखविण्यास हा पुरावा पुरेसा वाटतो.

वरील त्रोटक विवेचनावरून उत्खनन अवशेषातही आदिशक्तीचा प्रसार कसा झालेला होता, याची कल्पना वाचकांना येईल.

---

# ब्राह्मण व अन्य जमातींच्या देवता

आदिशक्तीची अनेक रूपे आहेत हे आपण आतापर्यंत पाहिलेच आहे. त्या रूपांचे पूजन जरी सर्वत्र होत असले तरी एका विशिष्ट देवतेचे पूजन अथवा काही देवतांचे पूजन हे प्रत्येक समाजविभागाचे वैशिष्टय असल्याचे दिसून येते. वर्णाश्रम-धर्मव्यवस्थेमध्ये ज्याप्रमाणे प्रत्येक समाजाच्या चालीरीतींत अगर धार्मिक विधींमध्ये फरक आढळून येतो त्याप्रमाणे ह्या देवतांच्या पूजनामध्येही आढळून येतो. ह्याचा परिणाम असा झाला आहे की, ज्याप्रमाणे वर्णाश्रम धर्मामध्ये सामाजिक उच्चनीचपणा रूढ झाला त्याप्रमाणेच तो देवतांच्या स्वरूपातही झालेला आढळून येईल, म्हणजेच जातीपरत्वे देवतांचीही विभागणी झालेली आढळून येईल.

दुसरी विभागणी देशपरत्वे झालेली आढळून येईल. कोल्हापूरच्या परिसरांतील स्थानिक जमाती व कारणपरत्वे कोल्हापूर सोडून बाहेरगांवी स्थायिक झालेल्या जमाती ह्या कोल्हापूरची महालक्ष्मी हीच आपली वंदनीय देवता मानतील, तर अरासुरी अंबा हीच स्थायिक व परदेशस्थ गुर्जर बंधूंची इष्ट देवता मानलेली असेल. तामीळनाडकडील रहिवासी मीनाक्षी, कामाक्षी ह्या देवतांचे पूजक असतील तर बंगदेशीय कालीमातेचे भक्त असतील.

समाजामध्ये ज्या जातीचे अधिष्ठान उच्चनीच त्याप्रमाणे ते देवतांनाही मिळालेले आढळून येईल. जोगेश्वरी, रेणुका, योगमाया, मीनाक्षी, कन्याकुमारी ह्या देवतांचे भक्त उच्च वर्णीतील असल्याने त्यांचे पूजनअर्चन षोडशोपचारे वैदिक पद्धतीनुसार केले जाते, पशु-बळी दिला जात नाही. पण मरीआई, एकवीरा, कालीदेवी अथवा अन्य ग्रामदेवता ह्यांचे पूजन मांसाहारी लोकांकडून होत असल्याने पूजनाचे वेळी पशुबळी दिलाच पाहिजे अशी त्यांची समजूत आहे. साम्राज्याच्या प्रतिष्ठेत ज्याप्रमाणे चढ-उतार झालेला आढळून येतो तद्वत देवतामध्येही चढउतार झालेला आढळून येतो. मी माझ्या गावातीलच ह्याबाबत लहानसे उदाहरण देतो. गोरेगाव ( मुंबई ) येथील अंबाबाई ( देवस्थान ) शक्तिस्थानाची निर्मिती इ. स. १८८८ मध्ये एका कृष्णाबाई नावाच्या मांसाहारी महिलेने केली. त्यानंतर अनेक वर्षे त्या देवी-प्रतिष्ठादिनी ( वाढदिवस ) तिला शांतविण्यासाठी कोंबडे बळी देण्याचा प्रघात होता. तसा बळी न दिल्यास देवीचा कोप होऊन आपल्या गावावर काही अरिष्ट येईल अशी त्यांची समजूत होती. पण कालांतराने ह्या देवस्थानाची व्यवस्था मांसाहार न करणाऱ्या व्यक्तीच्या हाती आल्यावर त्याने पशु-बळी देण्याची चाल बंद केली, कारण ते त्याच्या सामाजिक

आचरणाच्या विरुद्ध होते आज त्या गोष्टीला जवळजवळ १५ वर्षांचा काळ लोटून गेला असून आनंदाची गोष्ट अशी की, पहिल्यापेक्षा आज देवस्थान अधिक भरभराटीत आहे. ह्यावरून असे दिसून येईल की, त्या जखमातेची सामाजिक प्रतिष्ठा क्रमशः उच्च श्रेणीत आहे. मांसाहार आवश्यक समजणारी देवता आज अहिंसामय झाली, तरीही तिचा कोप न होता उलट भरभराट दृग्गोचर होत आहे. मात्र काही वेळा याच्या विरुद्धही परिस्थिति आढळून येण्याचा संभव आहे.

धर्मग्लानीच्या काळात प्रत्येक समाजाला आपल्या इष्टदेवता कोणत्या, आपल्या पूर्वजांनी कोणत्या देवताचे पूजन केले ह्याचे ज्ञान व्हावे म्हणून हे प्रकरण दिलेले आहे. तसेच प्रत्येक समाजाला त्याच्या इष्ट देवताचे ज्ञान मिळून अन्य देवताचेही ज्ञान होऊ शकेल. परस्परासंबंधीचे असे ज्ञान एकमेकांना झाल्याने साहजिकच त्याची वाढ प्रेमभाव वाढण्यात व्हावी, आपलेपणा वाढावा अशी लेखकाची इच्छा आहे. ह्यामुळे सामाजिक संघर्ष कमी होऊन समाज एकरूप होण्यास मदत होईल.

भारतामध्ये अनेक समाज व जाती आहेत. त्या सर्वांचीच बिनचूक माहिती येथे नाही. पण जेवढी माहिती हाती आली तेवढी देऊन ह्या दृष्टीने कोणास अधिक कार्य करण्यास चालना मिळावी, असाच ह्या प्रकरणी हेतु आहे. ज्या समाजाची येथे नोंद आढळणार नाही त्या समाजाने उदार बुद्धीने मला क्षमा करावी अशी नम्र प्रार्थना आहे.

कुलदेवतेच्या नावावरून त्या घराण्याचे मूळ ठिकाण आणि स्थलांतर कसे कळते, हे पाहावयाचे असेल तर माझे वाचनात आलेल्या 'कऱ्हाडे ब्राह्मणाचा इतिहास' लेखक विष्णु वासुदेव आठल्ये या ग्रंथाचा देईन. कऱ्हाडे नाव का आले, तर ऋग्वेदी अश्वलायन शाखेचे देशस्थ ब्राह्मण कऱ्हाड प्रांती राहणारे, निरनिराळ्या कामाच्या सनदा घेऊन कोकणात गेले व सरकारी काम पाहू लागले. कऱ्हाड प्रांतातून ही देशस्थ घराणी तिकडे गेली म्हणून कऱ्हाडे झाले. सरदेसाई घराण्याचा मूळ पुरुष नृसिंह भट सत्यवादी, हा मूळ पैठण गावचा रहिवासी. नृसिंहाचे सेवेने त्याला पुत्ररत्न झाले आणि सन ११८५ साली खोती हक्काची सनद मिळून तो मावळंगे गावी आला. तेव्हा सरदेसाई घराणे नृसिंहोपासक झाले. त्याच्यामध्ये महालक्ष्मी कुलदेवता नाही. तसेच कानें, पिने, सप्रे घराण्यातही नाही. याचे उलट खरे घराण्याची स्थिति आहे. ते मूळगाव अंबेजोगाईकडून कोकणात आले, म्हणून तेथील देवता जोगेश्वरी-काळभैरव ही कुलदेवता आहे. बेळगाव जवळ पलाशीका हल्ली नावाचे गाव आहे. ही कदंब राजवंशाची

राजधानी सन १०९१ साली सूर्यग्रहणानिमित्त शिवचित्त राजाची राणी कमलादेवी हिने ६० ब्राह्मण कुटुंबाना अग्रहार ( इनाम ) देऊन गोमांतकात वस्तीसाठी नेले. तेथील देवता आर्यादुर्गा ( अंकोला ), विजयदुर्गा ( केरी ), शांतादुर्गा ( कवळे ), नवदुर्गा ( बोरी ), महाळसा ( म्हारदोळ ) या कुलदेवता त्यांनी स्थापन केल्या अगर आत्मसात केल्या पुढे १४ वे शतकात पोर्तुगीजांचे धर्म छळामुळे काही घराणी मालवण, देवगड, राजापूरकडे गेली आणि स्थाईक झाली. पण कुलदेवता त्याच राहिल्या. नंतर पुन्हा देशावर स्थलांतर झाले, तरी कुलदेवता त्याच आहेत

## काही ब्राह्मण पोटजाती व त्यांच्या देवता

इ. स १९२१ च्या शिरगणतीप्रमाणे भारतात एकूण २३७८ जाती आढळून आल्या आहेत. त्यापैकी बृहन् महाराष्ट्रातील ब्राह्मण जाती खालीलप्रमाणे आहेत ह्या दशविध, पंचद्रविड, ब्राह्मणापैकी आहेत देशस्थ, चित्तपावन, क-हाडे, सहवासी ( सवाशे ), पध्ये, भट्ट, प्रभू, खोत. प्रभवत, तिरगूळ, गोवर्धन, मैत्रायणी, चरक, कण्व, जबुकण्व, माध्यंदिन, वाज माध्यंदिन ( उत्तर कोंकण ), किस्ती, कात्यायन, पल्लेवाल, सामवेदी, सारस्वत, शेणवी, आद्यगौड, झारोळिया, बारदेशकर, लोटलीकर इ० इ० अनेक पोटजाती आहेत. पंचद्रविड व गौड ह्या दोहोमधील भेद केवळ आहारमूलक असून बाकी इतर काही भेद नाही. पूर्वी ब्राह्मणांना आडनावे नव्हती, ती बाराव्या शतकानंतर चालू झाली. विंध्यपर्वताच्या उत्तरेकडील ब्राह्मणांना पंचगौड, तर दक्षिणेकडील ब्राह्मणांना पंचद्रविड म्हणतात पंचगौडामध्ये १५, पंचद्रविडामध्ये ३५, तर उत्तर गुजराथमधील ब्राह्मणात ९० पोटजाती आढळून येतात यावरून ब्राह्मण घराण्याचा मूळ वृक्ष कसा फोफावत गेला हेच दिसून येते

( १ ) अथर्ववेदी—साताऱ्याजवळ चिंचनेर व संगम माहुली येथे ह्यांची वस्ती आढळते, पण आता हा समाज ऋग्वेदीय शाखेत मिसळून गेला आहे. हा समाज सातारा भागात ग्रामाधिकारी म्हणून वावरत असे देशस्थ ब्राह्मणवर्गातील देवताप्रमाणेच ह्यांच्या कुलदेवता आहेत

( २ ) आपस्तंब— ह्या शाखेचे देशस्थ ब्राह्मण कर्नाटक, बेळगाव, धारवाड, विजापूर, म्हैसूरपर्यंत आढळून येतात ते मूळ गोदावरीकाठचे रहिवासी, असून कर्नाटकामध्ये वस्ती करून राहिले मातृभाषा कानडी असली तरी त्यांना मराठी भाषेची आवड आहे ऋग्वेदी लोकांच्या देवताचीच ते पूजा करतात त्यांच्या अशा विशिष्ट देवता नाहीत श्रौतकर्मामध्ये हे लोक निष्णात असून ' चयन ', ' वाजपेय ' वगैरे यज्ञयाग करण्यात ह्यांची प्रसिद्धी आहे.

(३) कण्व ब्राह्मण — प्राचीन काळी एक मोठा यज्ञ झाला. त्याला चतुःशाखीय ब्राह्मण उपस्थित होते. याज्ञवल्क्य व त्याचा शिष्य कण्व ह्यांचा यज्ञकर्मातील मानाच्या जागेवरून तटा झाला. कण्व यज्ञमंडप सोडून सूर्याकडे गेले व त्यांनी वेद शुद्ध करून आणले. पण अनुस्वाराऐवजी चुकून ॐकार ठेवला गेला. ह्या शाखेच्या ब्राह्मणांना पुढे कण्व असे नाव पडले. महाराष्ट्रात सर्वत्र ह्यांची वस्ती आहे. सप्तशृंगी, मातापूर, रेणुका, मल्हारी मार्तंड, ह्या देवतांचे हे उपासक. चै. शु. १४ ला जोगतीण व मागीण ह्यांना आदले दिवशी बोलावून आणतात. ती आल्यावर म्हणते, 'उदो बोला उदो। नवचंडी, नवदुर्गा, सटी, सारका। उदो बाई रेणुका। रेणुकेच्या भक्तीने। उदो करिती राजाराणी। चौसष्ट योगिनी पाने भरती।' ह्या तिच्या वाचनानंतर तिला पैसा, हळद, कुंकू व भोजनाचे वाढलेले पान देऊन तिची बोळवण करतात. सटीच्या नवरात्रात ह्या जमातीला मागीण सवाष्ण लागते.

(४) जंबू-कण्व — दुसऱ्या पुलकेशी राजापासून तो सोळंकी राजा भीमदेवापर्यंत म्हणजे सुमारे इ. स. ११०० पर्यंत गुजराथ (लाट) देशावर हिंदु राजे होते. त्या वेळी उत्तरेकडून व दक्षिणेकडून पुष्कळ ब्राह्मण त्या राज्यात आले व जंबुसर येथे स्थायिक झाले. त्यांपैकी खेडावा व मोतला ह्या जाती दक्षिण कण्व असून ते कोल्हापूरची महालक्ष्मी आपली कुलदेवता मानतात. यांतील काही घराणी नेमाड, मध्यप्रदेश ह्या भागात अद्याप आहेत.

(५) जंबू-कण्व (नेमाड प्रांत) — गुजराथमध्ये महमद बेगडा ह्याने स्वारी केल्यावर तेथील पुष्कळ मुलूख उजाड केला, चंपानेरचा किल्ला त्याने घेतला व हिंदूंचा पुष्कळ छळ केला. त्याला कंटाळून काही कण्व घराणी ह्या प्रांतात आली व स्थायिक झाली. गणेशांबिका ही त्यांची कुलस्वामिनी होय.

(६) कऱ्हाडे

वेदवत्याश्चोत्तरे तु कोयनासंगमदक्षिणे।
कराष्ट्रे नाम देशश्च दुष्टदेशः प्रकीर्तितः॥
पापसंकर्मतो नष्टा व्यभिचारसमुद्भवाः
खरस्य ह्यस्थियोगेन रेत:क्षिप्तं विभावकम्॥
(सह्याद्रि खंड, पृ. ३०६)

वेदवतीच्या उत्तरेला आणि कोयनासंगमाच्या दक्षिणेला कऱ्हाड प्रांत आहे. काही संशोधक 'खरस्य ह्यस्थियोगेन' ह्याचा अर्थ 'गाढवाच्या अस्थींच्या संयोगाने' असा करतात; पण तो अर्थ चूक आहे. ह्या ठिकाणी हे लक्षात घ्यावयास

पाहिजे की, पूर्वीच्या शास्त्रकारांनी गर्दभ, हत्ती, कोल्हा ह्यांच्या हाडामध्ये इतरापेक्षा रेत उत्पन्न करण्याची शक्ति जास्त असते व ते सूर्यासारखे प्रभावी असते असे मानले आहे. म्हणून ज्यांच्यामध्ये अशा तऱ्हेचे रेत आढळते, ते कऱ्हाडे असा अर्थ घ्यावयास हवा.

कोंकण, देश, वऱ्हाड, झाशी, इंदूर इ० प्रांतांत कऱ्हाडे ब्राह्मणांची वस्ती आहे. इतिहासकार राजवाडे म्हणतात, 'नरसिंहभट्टाचे घराणे हेच कोकणातील पहिले व महत्त्वाचे घराणे होय.' शके १२०० नंतर शिलाहार राजवटीत ही जात उदयास आली. शिलाहार राजे ऋग्वेदी व कोल्हापूरच्या महालक्ष्मीचे भक्त होते. पधराव्या शतकात ते राजापूर प्रांती गेले असावेत. कऱ्हाडे ब्राह्मणाची कुलदेवता मुख्यतः देवी होय. कोल्हापूरची महालक्ष्मी, शांतादुर्गा, महालसा, महालक्ष्मी, आर्यादुर्गा, विजयादुर्गा ह्या देवतांचे ते उपासक आहेत. अनंत व्रत फक्त ह्याच समाजात पूजितात. इतर जातीत सांप्रत ह्या व्रताचे पूजन दिसत असले तरी ते नंतरचे होय.

कऱ्हाडे जावयाला विष घालतात. त्याबद्दलचा उल्लेख असा—

तद्देशे मातृकादेवी महादुष्टा कुरूपिणी ।
तस्याः ......ब्राह्मणो दीयते बलिः ॥
......जामाता ह्यथवा भगिनीसुतः ।
एतन्मध्ये त्रयो विप्राः पद्योर्नामधारकाः ॥ १६ :

(सह्याद्रिखंड, पृ. ३०७)

म्हणजे महादुष्ट मातृकादेवीला वार्षिक पूजेच्या वेळी ब्राह्मण, जावई अगर भाचा बळी देतात असे सांगितले आहे.

(सह्याद्रिखंड, ले. डिकुन्हा इ. स. १८७७).

मातृका म्हणून त्यांची एक देवता आहे. त्या कुलदेवतेला नरबळी देण्याची चाल होती. पण नानासाहेब पेशवे यांनी कडक शासन करून बीप घालण्याची चाल बंद केली. बाळाजी बाजीराव ह्यांच्या कारकीर्दीत एका कऱ्हाडे ब्राह्मणाने आपल्या तेलंगी जावयास विष घालून ठार मारले असा प्रवाद पसरला होता, त्यामुळे सर तो समाज फार भीत असे. (ज्ञा. को. २/३४३)

(७) क्रमवंत—कोकणात अष्टागारात ही जमात आढळते. त्यांचे मूळ स्थान जोगाईचे अंबे होय. पण 'दुर्गादेवीच्या दुष्काळात दुल्ढु घराणे ह्या भागात रहावयास आले. 'क्रमांत' वेदाध्ययन केले असल्याने त्याच्या वंशजांना 'क्रमवंत'

असे नाव मिळाले ह्यांची कुलदैवते इतर ब्राह्मणाप्रमाणेच होत गोमातकाकडील किरवत ब्राह्मणांचा व ह्यांचा मुळीच संबंध नाही ते भिन्न होत

(८) कात्यायन—अल्लाउद्दीन राजाने देवगिरी घेतल्यावर तेथील ही जमात नगर जिल्ह्यात अकोला, कान्हूर, संगमनेर ह्या ठिकाणी वस्तीस आली हे 'यजुर्वेद कात्यायन शाखे'चे असल्याने त्यांना 'कात्यायन' असे नाव पडले. हे शेतकी करून आपला निर्वाह करीत, म्हणून ह्या व्यवसायावरून त्यांना 'कास्त' असे म्हणू लागले यजुर्वेदीय ब्राह्मणाच्या देवतांचीच हे पूजा करतात

(९) गोवर्धन—ह्यांचे मूळ स्थान उत्तरेकडील हे क्षत्रिय राजांबरोबर दक्षिणेत आले नाशिक भागाला पूर्वी गोवर्धन म्हणत तेथे त्यांची वसाहत झाली म्हणून त्यांना गोवर्धन म्हणतात ह्या जमातीचा इतिहास श्रीरामचंद्र पंचवटीमध्ये आले तेव्हापासून उपलब्ध आहे वाल्मिकी रामायण, मार्कंडेय पुराण, मत्स्य पुराण व खिस्ताब्दी पूर्वीचे ताम्रपट ह्यामध्ये ह्यांचा उल्लेख मिळतो कालांतराने सात शाखांच्या संयुक्त राज्याला 'महाराष्ट्रीक' असे नाव पडले आणि त्याचेच रूपांतर 'महाराष्ट्र' ह्या नावामध्ये झाले, असे संशोधकाच्या मताचे सार आहे गोवर्धन प्रांतातून त्यांना ज्योतिषी, पुरोहितपण न मिळाल्यामुळे ते अपरांतामध्ये शिरले आणि तेव्हापासून आजतागायत २३०० वर्षे खेड्यातील अधिकाराच्या जागांवर काम करीत आहेत त्यांना 'गोळक' म्हणून संबोधिले जाते, पण ते बरोबर नाही हे ब्राह्मण ऋक्, यजु व सामवेद शाखांचे असून अश्वलायन, बौधायन व कात्यायन सूत्राप्रमाणे ह्यांचे धार्मिक विधि होतात देशस्थ, कोकणस्थ, कऱ्हाडे ब्राह्मणाप्रमाणेच ह्यांच्या कुलदेवता असून त्यांची ते पूजा करतात

(१०) गोसावी परिव्राजक ब्राह्मण—चारही वेदांचे अनुयायी ह्या समाजात आहेत, पण या अथर्ववेदीयांचा भरणा अधिक आहे गोत्रापेक्षा मठ, आखाडे ह्यांची परंपरा अधिक पूर्णागिरी, भद्रकाळी, शारदा व विमला या शक्तिदेवतांचे ते उपासक होत

(११) श्री गौरमाळवीय—हे मूळ गुजराथमधील पंचद्रवीड यजुर्वेदी माध्यंदिनशाखीय ब्राह्मण देवीच्या शापामुळे ते माळव्यात गेले व तेथेही मुसलमानांचा त्रास झाल्यावर ते नेमाडात गेले तरीही गुजराथमध्ये त्यांची अद्याप बरीच वस्ती आहे नर्मदीय ब्राह्मणाप्रमाणेच हेही त्याच देवीचे उपासक आहेत

(१२) चरक यजुर्वेदी ब्राह्मण—यजुर्वेदाचे ८६ भाग आहेत त्यापैकी एका शाखेचे हे होत ह्या शाखेचे मूळ स्थान मयूर पर्वतापासून दक्षिण गुर्जर देशापर्यंत होते कारणपरत्वे भोसल्यांच्या स्वारीबरोबर वऱ्हाड प्रांतात ही जमात पसरली ह्या जमातीची देवी, बालाजी, राम, कृष्ण इ० कुलदैवते होत

(१३) चित्तपावन—डॉ. भांडारकर, श्री. गुंजीकर, श्री. न. चिं. केळकर, श्री. राजवाडे, श्री. ना. गो. चापेकर इ० संशोधकांचे ह्या जातीच्या उत्पत्तीबद्दल एकमत नाही. ह्या जातीविषयी खालील उत्पत्ति संभवते—

( १ ) यज्ञयाग करून पवित्र असणारे म्हणजे चित्तीपावन.

( २ ) सह्याद्रि खंडात लिहिल्याप्रमाणे, परशुरामाने निःक्षत्रीय पृथ्वी केल्यावर प्रायश्चित्त घेण्यासाठी यज्ञयाग योजिला. पण यज्ञाकरिता ब्राह्मण मिळेनात इतक्यात एक जहाज फुटून समुद्रकिनारी आलेले त्याने पाहिले. त्यातील १४ प्रेते त्याने जिवंत केली. त्याना ब्राह्मणधर्म शिकवून चिपळूण येथे त्याची वस्ती केली. ह्यावरून ह्या ब्राह्मणाना चिपळोणे ब्राह्मण म्हणतात. हेच पुढे कोंकणस्थ झाले.

( ३ ) यज्ञासाठी परशुराम ब्राह्मण शोधीत असता समुद्रकिनारी काही कोळी लोक त्याच्या दृष्टीस पडले, त्यांच्याजवळ असलेल्या जाळ्याची त्याने जानवी बनविली व ती कोळी लोकांच्या गळ्यात घालून, ब्राह्मणांची साठ कुळे तयार केली. त्या सर्वांना चितास्थानी पावन केल्यामुळे ते चित्तपावन झाले. इ. स. १७१५ पर्यंत कोंकणस्थ हा शब्द प्रचारात नव्हता. बाळाजी विश्वनाथाने तो प्रचारात आणला. पूर्वी हे अपंक्त असत, पण औंधच्या पंतप्रतिनिधींनी त्याना पंक्तिपावन केले.

ह्या ब्राह्मणांच्या परशुराम व जोगेश्वरी ह्या कुलदेवता. शिवाय भुवनेश्वरी, महालक्ष्मी, जोगाई, वनशंकरी, वेळणेश्वर, वाडेश्वर इ० कुलदेवता आहेत. आश्विन शु. ८ चे महालक्ष्मीचे व्रत व घागरी फुंकणे हा विधि फक्त ह्याच जातीत आहे.

(१४) जवळ अथवा खोत ब्राह्मण—ह्यांचे मूळ स्थान दक्षिणेकडील गोकर्णाच्या वाजूस असावे. दुष्काळ, उत्पात, तत्कालीन, सरकारी जुलूम ह्याना कंटाळून जहाजातून स्थलांतर करीत असताना दापोली तालुक्यातील बुरोंडी-नजीक वादळ होऊन जहाज फुटले. परंतु सुदैवाने मुले-माणसे किनाऱ्यास लागली. ज्या भागात ती आली त्याला 'जवळखोरा' असे म्हणत. म्हणून हे 'जवळ ब्राह्मण' झाले. कोणी म्हणतात, जळवात ( वादळात ) सापडून वचावले म्हणून त्यांना 'जवळ' असे नाव मिळाले. ह्यांच्या कुलदेवता, तसेच आचारविचार कोंकणातील इतर ब्राह्मणांप्रमाणेच होत.

(१५) तिरगूळ ब्राह्मण—आंध्रप्रदेशातील सप्तगोदा म्हणजेच राजमहेंद्री, मछलीपट्टण, वेझवाडा भागातील ह्या लोकांची मूळ वसाहत. परंतु दुष्काळामुळे प्रथम बेलारी व नंतर नाशिक, नगर, सोलापूर, सातारा, बेळगाव भागात हे

पसरले हे आपस्तंब यजुर्वेदी तैत्तिरीय शाखीय ब्राह्मण होत ह्यांना तिरगूळ, तिगडस, तिगळस असेही म्हणतात 'जोगे अनाई' येथील हंपी विरूपाक्ष मठाचा ठराव क्रमांक १८३१ म्हणतो की, "मगू नामक, शुकर जातीतील पुरुषापासून कुंभकार स्त्रीच्या ठिकाणी उत्पन्न झालेला बालक तो 'तिगूळ' त्याची पानमळे लावण्याची वृत्ति ही वृत्ति ज्याने स्वीकारली तो 'तिगूळ' होय" कोल्हापूरची महालक्ष्मी, तुळजाभवानी, मैलार मगसूली बनशंकरी, बदामी, चिंतापूर येथील नागम्मा, हैसूर व कारिकल येथील नागम्मा देवी ह्या त्यांच्या कुलस्वामिनी होत

(१६) देशस्थ ऋग्वेदी स्मार्त ब्राह्मण—महाराष्ट्रात ह्या ब्राह्मणांची वस्ती सर्वत्र आढळते म्हाळसा, अंबाबाई, व्यंकोबा, खंडोबा ही त्यांची कुल दैवते होत

(१७) देशस्थ वैष्णव—देशस्थ ब्राह्मणांत स्मार्त व वैष्णव हे दोन प्रमुख भेद होत मध्वमतानुयायी ब्राह्मणांना वैष्णव म्हणतात महाभारतकाळी हा पंथ होता असे आढळते कर्नाटक, बल्लारी, राजमहेंद्री, बंगलोर, म्हैसूर, हैद्राबाद, मद्रास भागात ह्यांची वस्ती आढळते ऋग्वेदी व कृष्ण यजुर्वेदी दोन्ही एक पंथाचेच होत ह्या समाजात आम्नाये नाहीत जी आहेत ती गाव व घरावरून पडलेली दिसतात, महालक्ष्मी, तुळजाभवानी, बनशंकरी, रेणुका ह्यांचे प्रामुख्याने ते उपासक आहेत परंतु हनुमानाची उपासनाही ते करतात शिवाचे नाव घेत नसले तरी हनुमान हाच रुद्राचा अवतार मानून त्याची ते उपासना करतात

(१८) देशस्थ सह्वासी—ऋग्वेदी देशस्थ वैष्णव ब्राह्मणांमधील एक पोटभेद श्रीरामचंद्राच्या अगर आचार्यांच्या सहवासात किंवा सह्याद्रि पर्वताचे जवळ राहणारे म्हणून त्यांना सहवासी उर्फ 'सव्वासे' ब्राह्मण म्हणतात कोल्हापूर, सांगली, हवेरी, म्हैसूर, अडोनी इ० भागात त्यांची वस्ती आहे कोल्हापूरची महालक्ष्मी, उडुपीचा श्रीकृष्ण, पालीचा खंडोबा ही त्यांची कुलदैवते होत

(१९) देवरुखे अथवा देवर्षी— ह्यांचा मूळ प्रांत कोल्हापूर, विशाल गड, संगमेश्वर असावा कारण ह्याच भागात त्यांच्या कुलदेवतांची क्षेत्रे आहेत सांप्रत या समाजाची वस्ती मुंबईशहर, रत्नागिरी, चिपळूण, ठाणे, उबरगाव, अलिबाग, महाड इ० ठिकाणी आढळून येते ऋग्वेद शाकलशाखा व हिरण्यकेशी शाखा अशा ह्यांच्या वेदशाखा होत कुलदेवता व व्रतवैकल्य देशस्थ व क-हाडे ब्राह्मणांप्रमाणे आहेत

(२०) नर्मदीय ब्राह्मण—परीक्षित राजाच्या स्वर्गारोहणानंतर काही ऋषि नर्मदेच्या काठी राहावयास आले नदीच्या कृपेने त्यांची वाढ झाली म्हणून त्यास नर्मदीय हे नाव मिळाले नर्मदा तीरावरून आले म्हणून नार्मद हे नाव

त्याना मिळाले, जसे माळव्यातून आलेले माळवी, कोंकणातून आलेले कोकणस्थ, वऱ्हाड प्रांतातून आलेले ते कऱ्हाडे इ० इ०. नर्मदातीरवासी नर्मदीय ब्राह्मण व जाबाल ब्राह्मण हे एक नव्हेत, भिन्न आहेत. दोघांच्या आचार-विचारात, पोषाखात व आडनावातही फरक आढळेल. सांप्रत ह्यांचे वास्तव्य अकोला, अमरावती, बुलढाणा, चांदा इ० वऱ्हाड भागात आहे. ह्यांची उपास्यदैवते इतर यजुर्वेदी ब्राह्मणाप्रमाणेच होत.

(२१) जाबाल–नार्मद–ब्राह्मण—सुमारे एक हजार वर्षांपूर्वी नर्मदा नदीच्या काठाने गुजराथमधून विदर्भांत आले आणि पयोष्णी व वैन नद्यांच्या संगमावर जेथे जाबालेश्वराचे मंदिर आहे तेथे स्थायीक झाले.

(२२) पल्लेवाल—हुशंगाबाद, कर्जोद, बहादूरपूर ह्या भागात ह्यांची वस्ती असून यांच्या देवता वाज माध्यंदिन ब्राह्मणाप्रमाणेच होत. कारण ही त्यांचीच एक उपशाखा आहे.

(२३) पुराड ब्राह्मण—वऱ्हाड, नागपूरकडे हा समाज आहे. ह्यांचे गोत्र, प्रवर, आचार विचार ब्राह्मणी असल्याने. इ. स. १९४० च्या सर्वपक्षीय ब्राह्मण सभेत त्यांनी ‘ पुराड ब्राह्मण ’ असे नाव लावण्याचे ठरविले. हे पूर्वी गुजराथ मधून मुसलमानांच्या त्रासामुळे वऱ्हाडात गेले. हे शुक्ल यजुर्वेदी माध्यंदिन शाखीय ब्राह्मण होत. मातापूरची रेणुका व गिरीचा त्र्यंबक ह्या कुलदेवता होत.

(२४) भट्टप्रभू—हे ऋग्वेदी शाकलशाखीय ब्राह्मण पद्ये ब्राह्मणामधून हे फुटून अलग झाले आहेत. ह्यांच्या कुलदेवता व उपास्य देवता ह्या सर्व पद्ये ब्राह्मणांच्या देवताप्रमाणेच होत कऱ्हाडे ब्राह्मणांची एक पोटशाखा समजली जाते.

(२५) मैत्रायणी ब्राह्मण—कृष्ण यजुर्वेदी तैत्तिरीय शाखेबरोबर ह्या शाखेचे साम्य आहे. नाशिक, मालेगाव, खानदेश, नगरदेवळे, भंडारा, नागपूर ह्या भागात ह्यांची वस्ती असून हे पंचद्रविड शाकाहारी आहेत. सप्तशृंगी, कोल्हापूरची महालक्ष्मी, म्हाळसा, लक्ष्मीव्यंकटेश ह्या त्यांच्या कुलदेवता होत.

(२६) यजुर्वेदी ब्राह्मण—हे शुक्ल यजुर्वेदी माध्यंदिन शाखेचे ब्राह्मण. नाशिक, सातारा, वऱ्हाड, नगर, मध्यप्रांत इ० भागात ह्यांची वस्ती असून मातापूरची रेणुका, तुळजाभवानी, सप्तशृंगी, कोल्हापूरची महालक्ष्मी इ० देवतांचे ते उपासक आहेत

(२७) शुक्ल यजुर्वेदी किरती अगर रानवट ब्राह्मण—ह्यांची प्रमुख वस्ती शहादे, तळोदे, एरंडोल, नंदूरबार, रावेर इ० भागात असून सप्तशृंगी,

मातापूरची रेणुका, तुळजाभवानी इ० देवींचे ते उपासक आहेत किस्त म्हणजे हप्ता. व्याजाने पैसे देऊन हप्त्याने पैसे वसूल करणारा म्हणून 'किस्ती' हे नाव आले. हा समाज व्यापारी असून एलिचपूर, अकोला, भाडारा, गोंदिया, नागपूर इ० ठिकाणीही त्याची वस्ती आहे.

(२८) शुक्ल यजुर्वेदी माध्यंदिन— या ब्राह्मणाची दुसरी शाखा उत्तर कोकणात राहते यमाई, महालक्ष्मी, एकवीरा, कामाक्षी, सप्तशृंगी, चंडिका, म्हाळसा, जोगेश्वरी, अंबिका, तुळजाभवानी इ० देवतांची ही शाखा उपासक आहे. यांचा मूळपुरुष पुरुषोत्तम कावळे नावाचा गृहस्थ. बिंदुराजाबरोबर या भागात आला आणि त्याने जोशीवृत्ति घेतली

त्या वेळी पोर्तुगीजांनी केलेल्या बाटवाबाटवीत याने अनेक जणांना शुद्ध करून घेतले व जातीत समाविष्ट केले. इतरांचेही त्याने रक्षण केले. असा हा कर्तबगार व धर्मनिष्ठ होऊन गेला

(२९) शुक्ल यजुर्वेदी वाज माध्यंदिन—या शाखीय ब्राह्मणाची वस्ती नाशिक, खानदेश, बऱ्हाणपूर, खामगाव, जालना, देऊळगावराजा इ० ठिकाणी आढळते. मातापूर, शहादे, प्रकाशे व लोहारे येथील रेणुकादेवीची ही जात उपासक आहे.

(३०) सामवेदी ब्राह्मण—ह्या जातीचा जेमिनी हा मूळ पुरुष होय नाशिक येथे ब्रह्मा, विष्णु, महेश व सूर्य ह्यांना प्रसन्न करून घेण्यासाठी त्याने १२ हजार वर्षे तपश्चर्या केली देव प्रसन्न होऊन त्याला वरदान दिले त्याप्रमाणे त्याने जटेतून १२ पुत्र उत्पन्न केले. राक्षसाच्या भयास्तव जेमिनी आपल्या मुलांबाळांसह अरनाळा (वसई) येथे बेटात जाऊन राहिले. काही काळाने परशुरामाला आपल्या आईच्या उत्तरक्रियेसाठी ब्राह्मणाची गरज पडली त्या वेळी नारदांनी त्याला हे ब्राह्मण सुचविले. त्याप्रमाणे परशुरामाने त्यांच्याकरवी आपल्या आईची उत्तरक्रिया करवून घेतली. पुढे देवाश्रया नावाच्या तेरा ऋषि-कन्यांबरोबर त्यांची लग्ने होऊन तेथेच ते स्थायीक झाले. तेच हे सामवेदी ब्राह्मण होत. डहाणू तालुक्यातील महालक्ष्मी ही त्यांची कुलस्वामिनी होय. डहाणूपासून १८ मैलांवर हे देवीचे स्थान आहे.

(३१) सारस्वत

दिग्भ्यस्तान् प्रदस्तान् दृष्ट्वा मुनि सारस्वतस्तदा ।
गमनाय मतिचक्रे तं प्रोवाच सरस्वती ॥

न गन्तव्यमितः पुत्र. तवाहारमहं सदा।
दास्यामि मत्स्यप्रवरानुष्यतामिह भारत ॥
आहारमकरोन्नित्यं प्राणान्वेदांश्च धारयन् ॥
(महाभारत, शल्य ५१।३८)

श्री. रा. भि गुंजीकर हे 'सरस्वती मंडळ' ह्या पुस्तकात खालीलप्रमाणे माहिती देतात. सारस्वत हे मूळचे पंजाबातील सरस्वती नदीकाठी राहणारे ब्राह्मण. पूर्वी एकदा १२ वर्षांचे अवर्षण पडले होते. त्या वेळी वेदविद्या जगविणारे सहा हजार ऋषि निवर्तले व वेदविद्या विसरले. परंतु तशाही बिकट परिस्थितीत दधिचीपुत्र सारस्वतमुनी प्रतिदिनी नदीतील एक मासा खाऊन कसातरी आपला काळ कंठीत होता. दुष्काळानंतर त्याने इतर ऋषींमध्ये वेदविद्येचा प्रसार केला व वेदविद्या जगविली. ह्या कारणास्तव त्याच्या वंशजास पुढे 'सारस्वत' हे नाव पडले.[1] आजही पंजाब, बंगाल, गुजराथ प्रांतात या ब्राह्मणांची वस्ती आहे. परशुरामाने गोवा प्रांतात यज्ञ केला होता. त्या यज्ञासाठी त्याने बंगाल प्रांतीय सारस्वत ब्राह्मण आणले होते. त्यांनी गोव्यात येतेवेळी आपल्याबरोबर आपल्या देवता शांतादुर्गा, महालक्ष्मी, मंगेश, नागेश, कामाक्षी, मीनाक्षी ह्यांना आणले होते. गोवा प्रांतात आल्यावर त्यांनी आपल्या देवतांची गोव्यातच स्थापना केली. ह्याच त्यांच्या कुलदेवता होत.

(प. दिवेकरकृत 'ब्राह्मणातील भिन्नशाखीय विवाह')

## काही जमाती व त्यांच्या देवता

(१) अतारी—भवानी, धनाई, जनाई, खंडोबा, बहिरोबा यांचे पूजक

(२) आगरी— या जमातींमध्ये दास आगरी, शुद्ध आगरी, वरप आगरी, ढोल आगरी याप्रमाणे अनेक उपजाती आहेत. आगर म्हणजे ताड, माड, पोफळी यामध्ये काम करणारे ते आगरी हे लोक आपली उत्पत्ति-कथा अशी सांगतात की, त्यांचे पूर्वज प्राचीन काळी दशाननाजवळ गायक—वादक म्हणून रहात होते. राजा त्यांच्या सेवेवर प्रसन्न झाल्यावर, त्यांचे उत्तम गुणाचे बीज म्हणून पश्चिम किनाऱ्यावरील जमीन त्यांना बक्षीस दिली. ढोल आगरी हे नाव याबाबतीत बरेच सूचक आहे. सांप्रतही काही आगरी गायक—वादक म्हणून काम करताना आढळतात.

---

१ टीप—देवीकोश भाग २, पृ. ३२४ यांचे स्पष्टीकरणार्थ पहा.

बहिरी, भवानी, सडोना, म्हसोबा व पीरसाहेब या त्यांच्या उपास्य देवता होत. सुधारणावादी मात्र विष्णु, गणेश, राम यांची पूजा करतात.

( ३ ) ओरायन— रांची, पालमाऊ, ओरिसा ह्या भागात राहणाऱ्या ह्या वन्य जमातींची देवता ' धर्मी ' ही होय. काही ठिकाणी हिला पुरुषदेवता मानतात. हा समाज असे मानतो की, त्या देवतेमुळे त्याना प्रकाश व सजीवपणा प्राप्त होतो. पृथ्वीचे अस्तित्व तिजमुळे कायम राहते, झाडाझुडपांची वाढ व मानवाना संतति तिच्या कृपेनेच मिळते. ' काला पात्रो ' देवी ही तिची जोडीदारीण असून तिला झग्रा बुन्ही, सरना बुन्ही ( वृद्ध स्त्री ) अशीही नावे आहेत. धर्मी ही बंगाल प्रांती एक ग्रामदेवता मानलेली आहे

प्रतिवर्षी सह्री यात्रेच्या वेळी ह्या देवीला कोंबडे, भात व तांदुळापासून बनविलेली दारू इ० पदार्थांचा नैवेद्य दाखवितात. देवीपुढे टाकलेले तांदूळ त्या कोंबड्याने त्वरित टिपले, तर देवीला नैवेद्य पोहोचला असे मानतात याचा ते असाही अर्थ करतात की, ' त्या वर्षी पाऊसपाणी चांगले होऊन पीकपाणी उत्तम येईल '. 'देशवाली नाद' ह्या नावाच्या एका ग्रामदेवतेची हे पूजा करतात. दर तीन अगर दहा वर्षांनी धर्मीदेवीला रेडा बळी देतात. कारण तसा न दिल्यास ती पशु व मानवावर अरिष्ट आणते.

( ४ ) इरूर—*निलगिरी पर्वतावर राहणारी एक वन्य जमात.* मुख्य धंदा शेती, पण गुरे-मेंढ्या पाळणे, जंगलात मध, मेण, शिकेकाई जमविणे व विकणे ही कामेही करतात. कन्निअम्मा व मारी देवतांचे पूजन करतात. पण उत्तर अर्काटमध्ये ही जमात, सप्तकन्यकादेवींचे ( म्हणजे *सप्तमातृका* ) पूजन करते. या जमातीमधील काही स्त्री-पुरुष भविष्य सांगण्यासाठी दारोदार फिरतात आणि त्या वेळी टोपलीत काही कवड्या ठेवून देतात. वेळप्रसंगी देहामध्ये देवता-सञ्चारही होतो.

( ५ ) इलिगेर—कर्नाटक प्रांताची ताडी काढणारी एक जमात. पण स्वत: मात्र पीत नाहीत, कारण ते तिला बहिणीप्रमाणे मानतात. तुळजाभवानी, यल्लम्मा व हनुमान या त्यांच्या पूजनीय देवता होत.

( ६ ) उल्लादन—दक्षिण भारतामधील एक वन्य जमात. मोठ्या लाकडी ओंडक्याच्या पोखरून होड्या तयार करणे हा प्रमुख धंदा, पण जंगलातून मध व अन्य उपयुक्त वस्तूही जमा करतात कप्पिरी, थिरुट्टी, छायन या देवतांची पाषाण स्वरूपात पूजन करते. या जमातीमध्ये वराची निवड एका विशिष्ट रूढीप्रमाणे होते. वधूला सर्व बाजूला बंद असणाऱ्या झाडपाल्याच्या

झोपडीत कोंडतात आणि तरुण मंडळी बाहेरून आतमध्ये लांब काठ्या खुपसतात. वधू ज्याची काठी धरील, तो नवरदेव होतो आणि विवाह होतो.

(७) उप्पर—म्हैसूर, त्रावणकोर भागातील मिठागर कामगार. ही वन्य जमात पारसगडची यल्लाम्मा, दुर्गम्मा, सुंकुळम्मा, जमूळम्मा या देवतांचे पूजन करिते. त्याचप्रमाणे तिरुपती, व्यंकोबा, विठोबा ह्यांना मानते.

(८) कमार—आसाम, बंगाल व मध्यप्रदेशातील ही जमात. दुल्हादेवी अगर दुल्हादेव ह्यांचा पूजा करते. तसेच बडीमाता, माई व देवी यांचे रोगराई निवारणार्थ पूजन करतात

(९) कलाल—भारतातील दारू गाळणारी एक जमात. भारतात सर्वत्र आढळते देवी, भैरोबा, खंडोबा ही यांची दैवते होत

(१०) कदर—कोचीन, कोइंबतूर भागातील एक वन्य आदिवासी जमात. कंदमुळे हे त्यांचे मुख्य अन्न होय. भद्रकाळी, भगवती, शास्ता हनुमान यांची पूजा करतात पण कुळस्वामिनी म्हणून अथुवचेरि अम्मल या देवीचे पूजन घडते. ज्या भागात त्यांची वस्ती आहे, त्या ठिकाणी पाषाणावर या देवतेच्या अनेक मूर्ति कोरलेल्या असतात आणि प्रत्यक्ष देवीनेच त्या तयार केल्या आहेत, अशी त्यांची धारणा आहे या देवतेच्या पूजनाचा दिवस नक्की नसतो आणि पुजारीही नसतो

(११) कन्नालिगर—कर्नाटकातील नावाडी जात. गौरीचे वंशज ते गौरी मक्कळ आणि गंगेचे वंशज ते गंगी मक्कळ असे दोन पोटभेद आहेत. वैष्णवपूजक असले तरी मैलारलिंग, धावम्मा, दुर्गव्वा यांचीही ते पूजा करतात. हुल्गम्मा या देवीला काहीजण आपल्या मुली अर्पण करतात व त्यांना बसवी म्हणतात भाद्रपदात पर्जन्यासाठी जो उत्सव करतात, त्या वेळी जोकुमर नावाच्या देवीची मूर्ति करून पूजन करतात.

(१२) कन्वार—बिहार, ओरिसा, उत्तर प्रदेशातील ही जमात दुर्गा, फुल्मती, भवानी ( पृथ्वी देवी ) व रतमा ( लग्न देवी ) ह्यांची पूजक आहे. ह्या जातीचा दारू गाळणे व विकणे हा धंदा आहे. काळी देवी, गोरिया, माता देवी यांनाही भजतात.

(१३) कामलिया—पश्चिम किनाऱ्यावरील एक मुसलमान जमात. हे मूळचे ब्राह्मण आणि बाटविल्यावर त्यांच्या प्रमुखाला कमाल ( पूर्ण ) सज्ञा दिली गेली. त्यावरून हे नाव मिळाले. बहुचरा देवीचे हे पूजक. देवीचे दर्शनाला जाताना तिचे नावाने भिक्षा मागून मग जातात. ही जमात सुंता करीत नाही.

(१४) कथोडिया—राजस्थानामधील कात बनविणारी जमात विशेषत अरवली पर्वताच्या आश्रयाने रहाते दिवाळी, शिमगा हे याच मुख्य सण पण कालिका देवीचे उपासक एखादा माणूस आजारी पडला, तर देवी प्रसन्न होऊन त्याला गुण यावा म्हणून जगलाला आग लावून देतात कारण औषध म्हणजे मत्र तत्रच होय

(१५) कम्मालर—तामीळनाडमधील एक जमात याच्या पाच प्रमुख उपजाती आहेत सोनार, कासार, सुतार, गवडी व शिपाडी यावरून याना पाचाळ ही सज्ञा आहे हे स्वत ला विश्व ब्राह्मण म्हणवितात व यांनी ब्राह्मण गोत्रेही धारण केली आहेत विश्वकर्म्यापासून त्याची उत्पत्ती झाली असे मानतात कामाक्षा अम्मा ही त्याची कुलदेवता, पण वृद्धिदेवम् असा उल्लेख करतात

(१६) काची—मध्य व उत्तरप्रदेशातील ही जमात शीतला देवी, विषहारी, धरतीमाता ह्याची ही उपासक होय विषहारीचे मदिर फरुखाबादजवळ 'सिनकिसा' गावी आहे शेतीवाडी व भाजीपाला पिकवून त्यावर ही जमात उदरपोषण करत

(१७) कालन—(दारू गाळणारे) हे बहिरी देवी, खडोबा याचे उपासक

(१८) कामद—नेमाड, हुशगाबादकडे राहणारे हे लोक हिंग्लज देवीचे उपासक होत जादूगारीचा घदा करून ही जमात आपला उदरनिर्वाह करते हिला अतिशय हल्का जात समजतात

(१९) कासार (महाराष्ट्र)—याच्या एकवीरा, बहिरी भवानी, हामनाई, निमजाई, जमनाबाई इ० देवता होत

(२०) किशोरी भजन समाज—आसाम प्राती श्री बालाचद विद्यालकार ह्याने फक्त कृष्णभक्तीने मोक्ष मिळतो ह्या तत्त्वावर हा समाज स्थापन केला हा शाक्तपथाप्रमाणे गुरुपत्नीची पूजा करणारा आहे रात्री एकत्र जमून गुरुपत्नीची पूजा करावयाची, तिला जेवू घालावयाचे आणि उरलेले अन्न प्रसाद म्हणून इतरानी घ्यावयाचे गुरुपत्नी ह्याच्यात राधास्वरूप मानली जात हिंदु समाजाप्रमाणे हा जमात सरस्वती पूजा, सूर्यपूजा, शिवरात्र, डोल्यात्रा, जगन्नाथाचा रथ ओढणे, बोट पूजा हे समारभ करते पण दुर्गापूजा आणि विषहारी म्हणजे मानसादेवीचीही पूजा करतात हे समारभ फार लोकप्रिय असून ह्या वेळी कोंबडी, बकरी बळी देतात

(२१) कुभार—मातीची भाडी घडविणारी एक जात भारतामध्ये सर्वत्र आढळते बगालमध्ये याच्या उत्पत्तीसबधी कथा अशी की, महादेवाचा विवाह

दुर्गेवरोवर ठरला तेव्हा त्याने चार कळशांची मागणी केली. पण कळशी बनविणारा कोणीच नसल्याने, त्याने आपल्या दाढीचा एक केस उपटून त्यापासून यांची उत्पत्ति केली यामध्ये देशपरत्वे अथवा मटकी घडविण्याच्या भिन्न रूढीमुळे अनेक पोटभेद निर्माण झाले आहेत. जसे लहान चाकावर काम करणारे—लहान चाके, गळ्यात लिंग धारण करणारे—लिंगायत, लाट ( गुजराथ ) देशातून आले—लाट इ० इ०. प्रांतपरत्वे ते अनेक देवतांची उपासना करतात, पण भवानी, शीतळामाता, हर्दिया, लक्ष्मी, यल्लम्मा, शिव, रावळनाथ या प्रमुख होत.

(२२) कुडवक्कल—महाराष्ट्र व म्हैसूर राज्यातील एक शेतकरी जात. बेळगाव, धारवाड, विजापूर, सोलापूर भागात यांची वस्ती जास्त आहे. कुदळ वापरणारा शेतकरी तो कुडवक्कल होय. यल्लव्वा, दुर्गव्वा, दयामाव्वा, गुळकव्वा, चगळव्वा, दसवण्णा, वीरभद्र इ० देवतांचे हे उपासक होत.

(२३) कुरुविक्कारन—दक्षिणेतील पारधी जमात. तामीळमध्ये या शब्दाचा अर्थ पक्षी पकडणारे असा आहे. यांच्या उत्पत्तीची कथा अशी की, तीन भाऊ जंगलात भटकत असता त्यांना रामपत्नी सीता दिसताच ते कुचेष्टेने हसले. तेव्हा सीतेने शाप दिला की, ' जर तुम्हाला पक्षी मिळाले तर शिकारी व्हाल, अन्यथा भिकारी व्हाल. ' यामुळेच की काय, यांतील काही भीक मागावयाचा धंदा करतात. या दंतकथेवरून असे अनुमान निघते की, ही वन्य जमात इतकी जुनी, रामकाळापासूनची आहे. हे लोक काली आणि दुर्गा देवीचे उपासक आहेत. उत्सवाचे वेळी ९ बकरे आणि एक रेडा बळी देतात.

(२४) केवट—बिहार, ओरिसा, मध्यप्रदेश यामध्ये राहणारी ही जमात स्वतःला प्राचीन कैवर्तांचे वंशज मानते. यामध्ये अनेक पोटभेद आहेत. भगवती, काली आणि होड्याचे संरक्षण करणाऱ्या चौरसी देवीचे पूजक हे आहेत.

(२५) कोंडार—समुद्राशिवाय इतर जलाशयात मासे पकडणारी जमात. गंगादेवी, चामुंडा, कालिका यांचे हे पूजन करतात.

(२६) कोल्टा—ओरिसा, संबळपूर भागातील एक शेतकरी जमात. बौद संस्थानात सरसर गावीच्या रामचंडी देवीचे हे उपासक. या मूळच्या ठिकाणाहून थोडी माती नेऊन देवीचे प्रतीक बनवितात व त्याचे पूजन केले जाते. रामचंडी हे एक भूमातेचे स्वरूप समजले जाते.

(२७) कैकाडी—तुळजाभवानी, खंडोबा, विठोबा, सोनारी बहिरोबा यांचे उपासक. महाराष्ट्रात राहणाऱ्या कुरवा जातीला कैकाडी असे म्हणतात.

(२८) कोंकणी—(ठाणे जिल्ह्यातील जमात) देवी, चेडा, हिरवा, खंडोबा यांची ही जमात उपासक

(२९) कुरवा—म्हैसूर, हैद्राबादकडे राहणारी ही जमात मरिअम्मा, कोल्हापुरी अम्मा, पोलेरम्मा इ० देवतांची ते उपासना करतात.

(३०) कोमटी—कन्यकादेवी, नागरेश्वर, नरसोबा, वीरभद्र या देवताचे उपासक. कन्यका परमेश्वरी ही सती गेल्याचे प्रसिद्ध आहे कन्यकापुराण नावाचे तिमय्याकृत काव्य आहे. याच देवीला कण्णिदापरमेश्वरी असेही म्हणतात.

(३१) कोयी—मद्रास, हैदराबादकडे राहणारी ही जमात कोमलम्मा, मामलेपेली, पिडा, कोराराशा इ० देवताची उपासक. ह्यापैकी काही देवताना नरबळी देण्याची प्रथा होती. आता कोंबडे, बकरे देतात.

(३२) कोल—द्रविड प्रांतीय एक वन्य जमात, विरमह देवीची उपासक आहे. या देवीचे मंदिर चुनार (मध्यप्रदेश) जवळ पिंप्रिया गावी आहे. तसेच हे खेरमाई, शीतला व शक्तिदेवी पूजतात

(३३) कोष्टी—अबाबाई, जाखाई, कौंवाई, शिवराई पूजतात

(३४) कोळी—ह्यांच्यामध्ये महारकोळी, राजकोळी, सोल्सी कोळी असे पोटभेद आहेत. त्यांच्या देवता—भवानी, खंडोबा, बहिरोबा, मिठोबा, अबाबाई ह्या होत.

(३५) कोल्हाटी—महाराष्ट्रात ही जमात जानाई, जोखाई, मरिआई ह्यांची पूजा करते डुकर कोल्हाटी व पाल कोल्हाटी असे दोन भेद आहेत.

(३६) कोरवा—मध्यप्रदेशातील हा वंश त्याची उत्पत्ति 'खुरिया राणी' ह्या देवतेपासून झाली असे मानतो. तिचे मंदिर जशपूर संस्थानच्या पठाराच्या अवघड मुलुखावर बांधलेले आहे.

(३७) कंसारा—गुजराथ-सौराष्ट्रामध्ये यांची वस्ती आहे. यांच्या उत्पत्तीची कथा अशी की, पावागढ येथे पाच बंधू कालीदेवीचे भजन काशाचे टाळ वाजवून करीत. त्यावर देवी प्रसन्न झाली आणि सांगितले की, 'तुम्ही धातूची भांडी बनवून उपजीविका करावी' ती ही जमात तयार झाली काळी ही यांची कुलदेवता.

(३८) कंजार—उत्तरप्रदेश, पंजाब भागातील ही जमात, विंध्यवासिनी प्रभा (प्रकाशदेवी), भवानी (पृथ्वीदेवी), मारी (मरणदेवी) अगर महाराणी ह्या देवतांची उपासक आहे.

(३९) खत्री—महाराष्ट्रातील ही जमात रेणुका, तुळजाभवानी व जयपूर भागाकडील जमात हिंग्लज देवींची उपासक आहे.

(४०) खाखा—गुजराथ, ठाणे-मुंबईकडे आढळणारी ही जमात अंबाजी, बहुचरा व हरखाद देवींची उपासक होय. छोटा नागपूरकडे ही जमात दर तीन वर्षांनी भू-मातेचे लग्न लावते. त्या वेळी तिला मुचकराणी म्हणतात. गावकरी गाणी म्हणत वाद्यासह मिरवणूक गावाबाहेर एखाद्या गुहेजवळ नेतात. येथील शेंदूर लावलेला दगड घेऊन त्याला नवरीचा पोषाख घालतात व शेजारी रहात असलेल्या आगरिया (लोखंडी भट्टीवर काम करणारा वर्ग) तेथे दोघांची भेट झाली म्हणजे एका उंच टेकडावरून भूमातेला खाली खोल दरीत फेकून देतात. तेथून ती भुयारी मार्गाने परत येईल असा त्यांचा विश्वास असतो.

उत्तर प्रांतात मुसाहर जमात, वनस्पति-देवीचे गणेशाबरोबर लग्न लावते. बिहारमध्ये हर व गौरी ह्यांना एकत्र स्थापून लग्नाच्या वेळी हर-गौरीची पूजा करतात. खानदेशात कणकेची मूर्ति करून राणूबाईचे लग्न लावतात. हा कार्यक्रम सात दिवस चालतो. लग्नाच्या वेळी मातीची अगर शेणाची देवीची मूर्ति तयार करतात. अंगावर दागदागिने घालतात आणि लग्नसमारंभ झाल्यावर विहिरीत विसर्जन करतात. 'गोंड' असे मानतात की, 'पूर्वी पृथ्वी व आकाश एकमेकास भिडलेले असे. पण एक म्हातारी घरासमोर झाडत असता तिचे डोके वरती आकाशाला लागले. तिने वर पाहिले, तो तिला असे दिसले की, आकाश तिच्या डोक्याला चिकटू पहात होते. म्हणून तिने त्वरित हातातील झाडूने ते वर लोटले. त्यानंतर ते आकाश पुन्हा खाली आलेच नाही. ही देवता इतर देवतांसह दगडाच्या राशीमध्ये रहाते अगर एखाद्या पवित्र झाडावर वस्ती करून असते.

(४१) खासीया— आसाम टेकड्यामधील ही जमात 'का-अवानी' ही आपली मूळमाता मानतात आणि त्यांची उत्पत्ति तिच्यापासून झाली असेही ते मानतात. या समाजात मातृसत्ता आजही प्रभावी आहे. याचे कारण ते असे देतात की, 'त्यांची माता का-मे-खा एका अंड्यातून उत्पन्न झाली आणि नंतर तिने मानव जमात उत्पन्न केली.' वास्तव कामाख्या देवीचेही पूजन करतात. तसेच जतिया व गोरा या वन्य जमाती कामाख्या देवीच्या पूजक आहेत.

(४२) खंडेलवाल— राजपुतान्यामधील खंडेलवाल गौड जमात बाबुरी बावन, नागिन, काळपाणी, मुक्ता, समाईमाता, सांची, झलाई इ० देवतांची पूजा करते.

(४३) गदब— दक्षिण हिंदुस्थानातील आदिवासी जमात. मुख्य वस्ती विजगापट्टण भागात आहे. हे स्वतःला गुधो म्हणजे ओझे वाहणारा असे

म्हणवितात. याच्या अनेक पोटजाती आहेत. ठाकुराणी माता, बुटीमाता, ईश्वर, भैरव याचे पूजन करतात. ईश्वर ही पर्जन्य आणि धान्यदेवता होय भाडारीण ही कृषी देवता, दड देवी ही जगली पशूपासून रक्षण करणारी देवता, भाती देव हा शिकारीचा देव होय ठाकुराणी ही रोगनिवारक देवता असून एखादी साथ आली म्हणजे फुले वाहून पूजा बाधतात. पण इतकेही करून साथ जर थाबली नाही, तर मात्र पूजा बद करून तिला शिवीगाळ करतात

(४४) गवळी— जमाबाई, खडोबा, कृष्ण, तुळजाभवानी, जनाई, कोंडाई याचे पूजक

(४५) गवंडी— सोलापूरकडील ह्या जातीमध्ये दोन पोटभेद आहेत. एक जिरे गवडी व दुसरा सागर गवडी होय. त्याच्या कुलदेवतामध्ये फरक आहे.

(अ) जिरे गवंडी— तुळजाभवानी, जाखाई, जोखाई, खडोबा याची पूजक.

(ब) सागर गवंडी— तुळजाभवानी, तिरुपति, बाळाजी, कर्नाटकातील यल्लम्मा, रत्नागिरीचा ज्योतिबा व खडोबा याची पूजक.

(४६) गदारिया—उत्तर व मध्यप्रदेशातील ही धनगर जमात चामर व जोखाई ह्या देवीची उपासक होय. यात्रेच्या वेळी डुक्कर जगर बकरे बळी देतात. काली ही प्रमुख देवता. तसेच दिशाई देवीचे (मेढे रक्षण्याचे ठाणे) पूजन करतात

(४७) ग्रासिया—गुजराथ, राजस्थानकडील एक जमात. पूर्वी वसाहतीसाठी राजाकडून जमिनी (ग्रास) मिळाल्या म्हणून हे नाव पडले. चामुडा, शीतलामाता, कालिका, गणपति, शेषनाग याची ते पूजा करतात.

(४८) गाबीत—कामाक्षी, तुळजाभवानी, पार्वती, रामनाथ व वेताळ पूजक.

(४९) गुडीगार—गुडी म्हणजे मदिर, त्याच्यावर चित्रकाम करणारा वर्ग मूळत हा गोवे प्राती अस्तित्वात आला. परतु कालातराने दक्षिणेकडे कानडा, उडुपी भागात जाऊन स्थाईक झाला. हस्तिदत आणि लाकूड यावर शिल्पकाम करून हत्ती, बैल, रेडे व मानवाकृति निर्माण करून निर्वाह करणे. हे शैवपथी असून कामाक्षी, शाताद्रुर्गा, कावेरी, नागेश, रावळनाथ याचे उपासक होत.

(५०) गुजर—पजाब प्रातीय गुजर जमात शीतळा भवानी व चामर ह्या देवीची उपासक होत. शीतळा भवानीचे मदिर, मसाणी (गुरगाव) येथे आहे.

(५१) गुरुंग—नेपाळातील ही जमात भैरवी, चंडेश्वरी देवीची उपासक आहे. म्हैस नगर नवरी देवीला बळी देतात व त्याचे ताजे रक्तही पितात. देवीघाटावर भैरवीचे मंदिर आहे. ही दशमहाविद्येपैकी देवी होय.

(५२) गुरव—अंबाबाई, महादेव, मारुती, सोलापूरकडील उमराई, जनाई, जोखाई, सटवाई, बहिरोबा, खंडोबा इत्यादिकांची पूजक.

(५३) गोल्लम—तामीळनाड, आंध्र प्रदेशातील एक जमात. गोपाळ शब्दाचा हा शब्द अपभ्रंश आहे असे ते मानतात आणि त्यामुळे स्वत ला श्रीकृष्णाचे वंशज मानतात. गायी, म्हशी, मेंढ्या पाळणे व विक्री करणे, हा यांचा प्रमुख धंदा. इतकेच नव्हे तर यांचे वैशिष्ट्य असे की, शनि, रवि, सोम या दिवशी दूध, तूप विक्री करावयाची नाही आणि मीठ, निस्तव व पाणी कोणाला द्यावयाचे नाही माडगोले प्रदेशाच्या आसपास पूर्वी यांचे राज्य होते असे म्हणतात. होळरिया ही यांची कुलदेवता. ती गुराढोरांचे रक्षण करते. रोगराई होऊ देत नाही अशी त्यांची भावना असते. दर पाचसहा वर्षांनी या देवीला नोकड बळी देतात.

(५४) गोंधळी—अंबाभवानी, तुळजाभवानी, रेणुका इ० पूजक.

(५५) गौड्डा—म्हैसूर प्रांती राहणाऱ्या ह्या वंशाची जजिया ही कुलदेवता होय.

(५६) घिसाडी—महाराष्ट्र, कर्नाटक प्रांती आढळतात. यांच्या देवता-वरून असे वाटते की, हे मूळचे गुजराथ प्रांतीचे असावेत. त्यांच्या भाषेतही बरेच गुजराथी शब्द आहेत. हे नांगराचे फाळ, कुदळी, फावडी, खुरपी, गाडीच्या धावा इ० वस्तु बनवितात. अंबाजी, बहिरी, यल्लम्मा, बालाजी या देवतांचे उपासक होत.

(५७) चाम—इंडोचीनमधील ही जमात आणि प्राचीन चंपा नगरीचे रहिवासी हे पो-इनो नोगार, पायाजूव्यान, पोयानदारी इ० देवतांचे उपासक.

(५८) चावडा—रजपूत वंशाच्या ह्या एका जमातीची चापन-माता ही कुलस्वामिनी व रक्षणकर्ती देवता.

(५९) चारण—भवानी माता, खोडियार माता व आशापुरी माता पूजक.

(६०) चित्रकथी—महाराष्ट्रातील एक प्रमुख जात. पौराणिक प्रसंगावर चित्रे स्वतः तयार करून ढोलकी, एकतारी यांच्या ठेक्यावर गात गात ती चित्रे दाखवितात. धंद्यावरून जातीला नाव आले. तुळजा भवानी, कोल्हापूरची महालक्ष्मी, जेजुरी-पाली येथील खंडोबा यांची उपासना करतात.

(६१) चेंचू—आंध्र प्रदेशातील एक आदिवासी जमात. हे निसर्गशक्तीचे पूजक असून, आकाशम्मा, भूमिअम्मा व अम्मतळी या देवतांची उपासना करतात. शिवाय सूर्यनारायण, नरसिंह, अंकलम्मा यानाही भजतात.

(६२) चांभार— नाशिक, खानदेशकडे ही जमात भवानी देवीची, तर छत्तीसगडकडे मरी देवीची पूजा करते.

(६३) चंडमुंड—चडो ओमल ही चडाची, चडोरोगा ही संथालाची देवता होय कोंबडी, बकरी बळी देतात

(६४) छामता ( काठेवाड )—खोडियार माता, ही छामता जमातीची देवता होय.

(६५) चुतिया— ही वन्य जमात आसाममधील लखमीपूर जिल्ह्यात आढळते. ह्या जमातीच्या देवीचे नाव गोसाईन देवी. ह्या देवीच्या मंदिराचे वर्णन ले. डॉल्टन असे करतात की, त्या देवळाला ' तामरघर ' असे म्हणतात. साधारणत हे ८×८ फूट आकाराचे असून वर ताब्याचा पत्रा छप्पर म्हणून घालतात. साध्या ओबडधोबड दगड, विटांनी ते बांधलेले असते. पण ह्या मंदिरासभोवार १३०×२०० असे दगडी कुंपण असते

देवीचे प्रतीक म्हणून दगडाची तिवई असते आणि त्यासमोर खोल खड्डा असतो पूर्वी ह्या देवीसमोर नरबळी देत. आजही क्वचित चोरूनमारून देतात. बळी जाणारा मनुष्य शुद्ध वंशीय व विशुद्ध आचरणाचा असावा लागतो. जर त्याच्या शरीरावर जखमा असतील, इतकेच नव्हे तर त्याचे कानही जर टोचलेले असतील, अगर तो दुबळा असेल तर बळी देण्यास तो अपात्र ठरविला जातो बळी देण्यापूर्वी त्या माणसाला मंदिरात बंद करण्यात येते आणि उत्तम पौष्टिक अन्न खाऊ घालण्यात येते बळी देण्याच्या दिवशी त्याला उत्तम स्नान घालून सुवर्ण व फुलांच्या माळांनी शृंगारण्यात येते. नंतर त्याची वाजतगाजत मिरवणूक काढतात मंदिरात नेल्यावर देवीसमोर मान वाकवून ती तोडण्यात येते. बाकीचे शरीर खाली खड्ड्यात पडते आणि मुंडके देवीसमोरील पूर्वीच्या मुंडक्यांच्या ओळीत ठेवण्यात येते

ह्या देवीला तामशेरी माई, नील गोसाईन, पंचायतन, गोसाईन वायथोथी, गोसाईन अशीही आणखी नावे आहेत.

( आसाम गॅझेट, लखमीपूर, पृ. ११२ ते १३० )

(६६) जाट— राजपुताना, मारवाड भागात ह्या जमातीची प्रामुख्याने वस्ती होती. माता, महादेव व तेजाजी ह्या त्यांच्या देवता. त्याचप्रमाणे

'भूमियान' देवतेला हे मानतात आणि लग्न झाल्यावर तिला भेट देतात. देवींच्या साथीच्या रोगात, 'माट' देवीला पूजितात (दिल्ली गॅझेट, पृ. ६६). तेजाजी-संबंधी अशी कथा प्रचलित आहे. तेजाजी हा एक सामान्य गुराखी होता. एकदा रानात गाई चारावयास नेत असताना त्याला असे दिसले की, एका ब्राह्मणाची गाय एका विशिष्ट स्थळी वारुळावर दूध सोडते काही दिवस हा तिचा क्रम पाहिल्यावर, ब्राह्मणाचे नुकसान टळावे ह्या हेतूने त्याने आतील नागराजाला विनती केली की, त्याला लागणारे दूध नित्य पुरविले जाईल. नागराजानेही नंतर गाईला दूध सोडण्यापासून परावृत्त केले.

एके दिवशी नागराजाने तेजाजीला दंश करण्याची इच्छा प्रदर्शित केली आणि त्यानेही त्याला त्वरित संमती दिली. त्या दिवशी तो सर्व जनावरे किसनगडला घेऊन गेला आणि त्याने जनावरे ज्याची त्याला परत केली. परत येत असताना अंधार पडला आणि वाटेत लुटारू लोकांनी त्याला लुबाडले आणि जखमी केले. तशाही स्थितीत तो वचनपूर्तीसाठी वारुळाजवळ आला. नागराजाने पाहिले तो त्याच्या अंगावर दंश करण्यास जागाच नव्हती. कारण इतक्या जखमा दरोडेखोरांनी त्याच्या अंगावर केल्या होत्या. अशा वेळी तेजाजीने आपली जीभ बाहेर काढली व नागाने तिला दंश केला. साहजिकच थोड्याच वेळाने त्याला मृत्यु आला. ह्या त्याच्या अलौकिक कृत्यामुळे तो जाट जमातीमध्ये अमर झाला आणि त्याचे पूजन होऊ लागले.

(अजमीर, मारवाड गॅझेट, पृ. ३०)

(६७) जालरिया—गंजम व विजयापट्टण भागातील जालारिया ह्या कोळी जातीच्या यांच्या देवता. पालखी वाहणे व शेतीकाम करणे हा यांचा धंदा.

सामलम्मा—अंगात हिरवे कपडे व तापसरीपासून रक्षण करणारी देवता.

राजम्मा—काळा हत्ती हे वाहन, उजव्या हाती तलवार. ह्या देवीच्या कृपेने वांझ स्त्रियांनाही मुले होतात.

येरनम्मा—अश्वारूढ, डाव्या हाती तलवार. पाण्यात बुडणे, अगर अपघाती मृत्यूपासून रक्षण करणारी देवता.

भागिरथ्यम्मा—गजारूढ, बारा भुजा. पटकी, हगवण इ० रोगांचे निवारण करणारी.

मुकुलम्मा—देवीच्या आजारापासून रक्षण करणारी देवता.

भागदेवी—व्याघारूढ. पटकी रोगापासून रक्षण करणारी.

ओरोसोडी—होड्याचे रक्षण करणारी देवता.

(६८) जोगी—तामीळनाडमधील ही जमात मलालम्मा, गगम्मा, रुद्रम्मा, अक्कार, पेडवेड्ड ( रेणुका ) ह्या देवतांची उपासक आहे.

(६९) जोशी ( कुडबुडे )—अंबाभवानी, शिदोबा, बहिरोबा पूजक.

(७०) जाग—कटक प्रांतात धनेश्वाळ जाग ह्या अनार्य जमातीच्या बसुमती ( पृथ्वी ), बसुला व मालिंजुली ह्या देवता होत.

(७१) टकारी—या जमातीच्या अंबाभवानी, मरिआई या देवता होत

(७२) ठाकूर ( मुंबई प्रांत )—ही जमात बहिरी भवानी, चेडा, हिरवा, वाघीआ, सुपली, खंडेराव व वेताळ ह्या देवतांची उपासक

(७३) डोम—गंगाकिनारी वस्ती करून असलेली ही प्राचीन जमात दुर्गा, गडकी, समैय्या, रनिया इ० देवतांची पूजा करते कालीडोम म्हणून एक पोटजात कालीदेवीची पूजा करते

(७४) डोबारी—कुर्नुल, नेलोरकडील ही जमात सकडम्मा, येल्म्मा देवींची उपासक चंद्रगिरी ( म्हैसूर ) येथे पूजा करताना घरात नग्न होऊन नंतर हाताला चंदन चोपडून, दोन्ही हात जोडून रेणुकेच्या प्रार्थनेला हे मंदिरात जातात.

(७५) डांगी—मध्यप्रदेश व राजस्थानामधील एक वन्य जमात. दुर्गा-देवीचे उपासक असून गायीला लक्ष्मीस्वरूप मानतात

(७६) ढोर—बेळगाव, विजापूरकडील ही जमात आकाशी, शिकोत्री ह्यांची पूजक. महाराष्ट्रातील ढोर जनाई, भवानी, खंडोबा यांचे पूजन करतात.

(७७) तोडा—अंबाबाई, ज्योतिबा, खंडोबा पूजक. ही वन्य जमात दक्षिणेस निलगिरी पर्वतावर वस्ती करून आहे ही फार प्राचीन मानली जाते. ही महिषी पूजकही आहे. सरकारने नुकताच ह्या जमातीचा चित्रपट काढून दाखविला तेई किर्झी ही त्यांची प्रमुख देवता

प्रेत जिवंत करण्याचा आपला इरादा बदलला. योग्य प्रकारे प्रेताची विल्हेवाट कशी लावावी ह्याची दिशा दाखवून देवी अंतर्धान पावली.

स्कॅंडेनेव्हियन पौराणिक कथात अशी मान्य दर्शविणारी एक कथा आहे. त्या समाजाची मरणदेवता हेल ही जेव्हा बल्डोर ( Balduar ) मारला गेला, तेव्हा त्यास प्राणदान देण्यासाठी तयार होती. पण तत्पूर्वी 'सर्वांनी बल्डोरसाठी भरपूर रडले पाहिजे' अशी तिने अट घातली. परंतु आश्चर्य असे की, त्याच्या आवडत्या माणसासाठी कोणीही रडण्यास तयार होईना. अर्थात तिने आपला बेत बदलला आणि ती निघून गेली.

(७८) तेली—अंबाबाई, जोतिबा, खंडोबा पूजक

(७९) तांबट—बहिरी, भवानी, चंडकाई, एकवीरा, कुमारिका, महालक्ष्मी, अनगाई, निमगाई ( कोकणात ), सटवाई यांची पूजक.

(८०) तुवळी -- ठाणे, सुरतकडील ही जमात आकाशी, निकोशी ह्यांची पूजा करते.

(८१) देवार—रस्तोरस्ती गाणी गाऊन भिक्षा मागणाऱ्या द्रविडियन समाजाची शेळेरम्मा, भवानी, या देवता. साम्प्रत हा समाज मध्यप्रदेशात आढळतो.

(८२) देवांग—तेलंगणातील नायगी जातीची ही पोटजात. चांदेश्वरी ही त्यांची देवता.

(८३) धनगर—पितर, पूर्वज व मातादेवी ह्यांना कुलदेवता मानतात. वाघजाय, म्हेडजाय, काळकाय, खंडोबा, बिठोबा, तुकाई, मार्गी, यमाई, जेजुरीचा खंडोबा, मुल्होबा ह्या ग्रामदेवता होत. बेळगावकडे ह्यांना 'हनवार' म्हणतात. त्यांच्या देवता यल्लमा व मारुति होत. मध्य प्रांतातील ही जमात मल्या अधिकारी ह्या देवतेची पूजा करते. ती शिकार देवता आहे.

(८४) धोडिया—जागाई, जोसाई पूजक जमात.

(८५) धोरी—राजपुतान्यातील ही जमात बखेरा देवीची उपासक आहे. दसऱ्याला रेडा अगर बकरी बळी देऊन त्याचे मांस प्रसाद म्हणून वाटून तुपाचा दिवा लावतात.

(८६) धेड—कांगा, जालंदर, होशियारपूर—ज्याला पूर्वी त्रिगर्त म्हणत—त्या भागात राहणाऱ्या जमातीला 'मारुती' असे नाव आहे. त्यांची मातादेवी ही कुलस्वामीनी होय. तिचे जालंदर येथे मंदिर आहे. ह्या देवीला कोणी कोणी चक्रेश्वरी म्हणतात.

ओरोसाडी—हाडयाचं रक्षण करणारी देवता

(६८) जोगी—तामाळनाडमधील ही जमात मलालम्मा गगम्मा, रुद्रम्मा, अक्काल पन्वड्ड (रेणुका) ह्या देवतांची उपासक आहे

(६९) जोशी (कुडबुडे)—अंबाभवानी, शिदोबा, बहिरोबा पूजक

(७०) जाग—कटक प्रांतात धनेरवाळ जाग ह्या अनार्य जमातीच्या वसुमती (पृथ्वी), वसुला व माणिकुला ह्या देवता होत

(७१) टकारी—या जमातीच्या अंबाभवानी, मरिआई या देवता होत

(७२) ठाकूर (मुंबई प्रांत)—ही जमात गोहिरी भवानी, चेडा हिरवा, वाघोबा, सुपली, खंडेराय व वताळ ह्या देवतांची उपासक

(७३) डोम—गंगाकिनारी वस्ती करून असलेली ही प्राचीन जमात कुरमी, गडकी, सामैया, रुनिया इ० देवतांची पूजा करते कलिंदीडोम म्हणून एक पोटजात कालीदेवीची पूजा करते

(७४) डोंबारी—कुनुल, नेलोरमधील ही जमात सरडम्मा, येलम्मा देवीची उपासक चंद्रगिरी (म्हैसूर) येथे पूजा करताना घरात नग्न होऊन नंतर हाताला चंदन चोपडून, दोन्ही हात जोडून रेणुकेच्या प्रार्थनेला हे मंदिरात जातात

(७५) डागी—मध्यप्रदेश व राजस्थानामधील एक वन्य जमात दुर्गा देवीचे उपासक असून गायीला लक्ष्मीस्वरूप मानतात

(७६) ढोर—बेळगाव, विजापूरकडील ही जमात आकाशी, शिकोत्री ह्यांची पूजक महाराष्ट्रातील ढोर जनाई, भवानी, खंडोबा यांचे पूजन करतात

(७७) तोडा—अंबाबाई, ज्योतिबा, खंडोबा पूजक ही वन्य जमात दक्षिणेस निलगिरी पर्वतावर वस्ती करून आहे ही फार प्राचीन मानली जाते ही महिषा पूजकही आहे सरकारने नुकताच ह्या जमातीचा चित्रपट काढून दाखविला तेई किर्झी ही त्यांची प्रमुख देवता

अशी दंतकथा प्रचलित आहे की, प्राचीन काळी ह्या जमातीमध्ये कोणी मरण पावत नसे एकदा एक वृद्ध अकल्पित अपघाती मरण पावला अंत्यसंस्कारा साठी जातभाईंनी त्याचे प्रेत गावाबाहेर नेले तेई किर्झीला ह्या प्रकरणी दया आली ती प्रेताला जिवंत करण्यासाठी स्मशानात आली परंतु तेथे तिला उलटाच प्रकार दिसला बहुसंख्य वर्ग आनंदी होता व अगदीच थोडे दु:खित दिसले हे दृश्य पाहिल्यावर देवीने मानवी स्वभावधर्माचा योग्य तो बोध घेतला आणि

प्रेत जिवंत करण्याचा आपला इरादा बदलला. योग्य प्रकारे प्रेताची विल्हेवाट कशी लावावी ह्याची दिशा दाखवून देवी अंतर्धान पावली.

स्कॅंडेनेव्हिअन पौराणिक कथात अशी साम्य दर्शविणारी एक कथा आहे. त्या समाजाची मरणदेवता हेल ही जेव्हा बल्डोर ( Balduar ) मारला गेला, तेव्हा त्यास प्राणदान देण्यासाठी तयार होती. पण तत्पूर्वी ' सर्वांनी बल्डोरसाठी भरपूर रडले पाहिजे ' अशी तिने अट घातली. परंतु आश्चर्य असे की, त्याच्या आवडत्या माणसासाठी कोणीही रडण्यास तयार होईना. अर्थात तिने आपला बेत बदलला आणि ती निघून गेली.

(७८) तेली—अंबाबाई, जोतिबा, खंडोबा पूजक

(७९) तांबट—बहिरी, भवानी, चडमाई, एखीरा, कुमारिका, महालक्ष्मी, अमजाई, निमजाई ( कोकणात ), सटवाई यांची पूजक.

(८०) तुवळी - ठाणे, सुरतकडील ही जमात आकाशी, भिकोजी ह्यांची पूजा करते.

(८१) देवार—रस्तोरस्ती गाणी गाऊन भिक्षा मागणाऱ्या द्रविडिअन समाजाची कोळेरम्मा, भवानी, या देवता. साम्प्रत हा समाज मध्यप्रदेशात आढळतो.

(८२) देवांग—तेलंगणातील नायगी जातीची ही पोटजात. चादेश्वरी ही त्यांची देवता.

(८७) नात—मेलडीमाता पूजक.

(८८) निराळी (रंगारी)—तुळजाभवानी, खंडोबा पूजक.

(८९) निहाल—वऱ्हाड, मध्यप्रदेशात राहणाऱ्या ह्या जमातीची झारखंडी ही देवता. चैत्र महिन्यात उत्सव व जत्रा भरते.

(९०) पटवेगार—महालक्ष्मी, यल्लम्मा, खंडोबा पूजक.

(९१) परीट—लक्ष्मी, यल्लमा, शिव, विष्णु पूजक.

(९२) पद्मसाळी—धारवाड जिल्ह्यातील गुलटगुडा येथील यल्लमा, सोलापूरचा ओंकार व तिरुपतीचा व्यंकटरामण्णा ही कुलदैवते.

(९३) पांचाळ—तुळजाभवानी, कर्नाटकची कमलादेवी (कलम्मा), गिरीचा व्यंकोबा, खंडोबा, गौरी, ईश्वर पार्वती व इतर ब्राह्मणदेवता पूजक. 'पांचाळ समाज' म्हणून हा सर्वांना विदित आहे. गुजराथी समाजात ह्या आडनावाची अनेक घराणी आहेत. तेव्हा ह्या शब्दाची व्युत्पत्ति पाहणे मजेशीर होईल. मोल्स्वर्थ व कँडी ह्यांच्या इंग्रजी-मराठी शब्दकोशाप्रमाणे (सन १८५७) ह्या शब्दाचा अर्थ असा की, सोनार, सुतार, लोहार, कासार व पाथरवट ह्या पाच जातींना 'पाचाळ' ही संज्ञा आहे. पंच = पांच आणि तळ = वितळणे. सोने, रूपे, तांबे, पितळ, कथील हे धातू वितळविणाऱ्या जाती म्हणून त्यांना 'पांचाळ' असे संबोधिले आहे. ह्याशिवाय मुंबई व मद्रासकडे हे धंदे न करणारी परंतु 'पांचाळ' म्हणूनच वावरणारी जमात आहे.

(९४) पाथरवट—तुळजापूर व कोंडणपूर देवी व खंडोबा पूजक.

(९५) पिंगळा—मरगाई पूजक.

(९६) फांसेपारधी—उपजाती—(अ) लगाटी, (ब) चिता, (क) शीलाजीत, (ड) वाघी व पचळवाला पारधी असे प्रकार आहेत. ह्यांची देवता अंबाभवानी, जरीमरी व खंडोबा पूजक.

(९७) बार्भी (काठेवाड)—खोडियारमाता, चामुंडमाता, भूतभवानी, छत्रारमाता पूजक.

(९८) बुरुड—अंबाभवानी, सटवाई, खंडोबा, महादेव, मारुती, राम पूजक.

(९९) बेरड—बेळगाव, धारवाडकडील ही जमात यल्लम्मा, दुर्गा, मल्लिकार्जुन, खंडोबा, मारुती ह्यांचे उपासक होय. सोलापूरकडे अंबाभवानी व ज्योतिबा पूजक.

(१००) भडभुजा— भवानी, खंडोबा, बहिरोबा पूजक

(१०१) भावसार— हिंग्लज माता, बालाजी पूजक.

(१०२) भिल्ल— असीरगड, चोपडे भागात सातपुड्याच्या पायथ्याजवळ तडवी मुसलमान म्हणून भिल्लांची एक जमात आहे मानाबाई ही त्यांची कुलस्वामिनी. तिचे मंदिर आडवादजवळ आहे

(१०३) भूमिया — वऱ्हाडमधील ही जमात वाघेश्वरी, दुल्हादेवी, बुरादेव ह्यांची उपासक

(१०४) भोई— अंबाभवानी, तुळजाभवानी, सटवाई, खंडोबा, बहिरोबा पूजक.

(१०५) (अ) भंडारी वाजंत्री—महालक्ष्मी (कवळे) दुर्गा, दामोदर पूजक

(ब) हलर वाजंत्री—मामायी अगर महामयी, ही देवी म्हणजे डोंगराचा एक सुळका, चिताकुले (सदाशिवगडजवळ) ह्या ठिकाणी आहे.

(१०६) महार— तुळजाभवानी, मरीआई, वोलाई, चोखोबा, ज्ञानोबा, बहिरोबा, छेडोबा, खंडोबा पूजक

(१०७) मादिग (कॅनरा)— मरिअम्मा (Mother Death) व्यंकटरामना पूजक.

(१०८) माळी— सोलापूरकडे अंबाई, भवानी, जनाई, तुकाई, खंडोबा, विठोबा, कर्नाटकात चंद्रगुत्तीदेवी, म्हैसूरकडे सोम्रादेवी पूजक

(१०९) मुसाहर— मुस = उंदीर + आहर = खाणारे = उंदीर खाणारे ते मुसाहर. ही उत्तर भारतातील एक जमात काली, दुल्हादेवी, अनखारी, वनराजपत्नी, वनस्पति ह्या देवींचे उपासक. त्यांची अशी श्रद्धा आहे की, वनस्पतिदेवीच्या कृपेमुळे झाडे वाढतात, मनुष्यप्राण्याना धान्य मिळते, प्राणिमात्राना जीवन मिळते. मानवाना संतति प्राप्त होते, वांझ स्त्रियाना मुले होतात, इ० इ०. ह्या देवीच्या प्रार्थनेसाठी एक कुंड तयार करतात आणि अग्नीमध्ये फळे, फुले, मुळ्या अर्पण करतात. पण एखाद्याला खास मागणी करावयाची असेल, तर तो आपल्या हाताची अंगुळी कापून घेतो आणि रक्ताचे काही थेंब ह्या कुंडस्वरूप देवीला अर्पण करतो. असे असूनही ह्या देवीची मूर्ति आढळून येत नाही. (कलकत्ता रिव्ह्यू ३६/१८८८/१–५२)

(११९) लोहार— यल्लम्मा, वल्लम्मा, खंडोबा. वल्लम्मादेवीचे मंदिर कारवार, अंकोला येथे आहे. गुजराथमधील लोहार भवानीमाता तर मध्यप्रदेशांतील लोहार लोमलाईमाता कुलस्वामिनी मानतात.

(१२०) लोहाणा— काठेवाड, कच्छकडील ह्या जमातीची रंडेलमाता ही कुलस्वामिनी, सिंधुनदीला ' दर्यापीर ' म्हणून देवता मानतात.

(१२१) वडर— सोलापूर–मरिअम्मा, यल्लम्मा, पद्मव्वा. इतर भाग–तुळजाभवानी, मरिआई. मध्यप्रदेश–यल्लम्मा, मुर्गव्वा पूजक.

( १२२ ) वाघरी—खोडियारमाता, बहुचरा व मेलडीमाता पूजक.

( १२३ ) वाघ्या—भवानी, सटवाई, खंडोबा, ज्योतिबा पूजक.

(१२४) वांझा ( विणकर )—काठेवाडमधील जमात हिंग्लजमाता पूजक.

(१२५) वाणी—ह्यामध्ये बऱ्याच उपजाती आहेत.

( अ ) लिंगायत—अंबाबाई, तुळजाभवानी, बनाली, यल्लम्मा, ( सौंदत्ती ), शाकंभरी ( बदामी ), नवई, मल्लिकार्जुन, खंडोबा, व्यंकोबा पूजक.

( आ ) काठेवाडी—भांगग्रामधील सुदरी गावची सातुर्डादेवी उपासक.

( इ ) वैश्य—महालक्ष्मी ( नागेशाची ), शांतेरी ( म्हाडदोळ ), गणपति ( कंदवाळ ) पूजक.

( ई ) वैश्य ( सोलापूर )—तुळजाभवानी, पनमाई ( अतची ), धनाई ( कोकण ), एसाई, जनाई, शाकंभरी ( बदामी ), ज्योतिबा ( कोल्हापूर ), यल्लमा ( सौंदत्ती ) पूजक.

( उ ) नार्वेकर—कनकादेवी, भगवती, यल्लम्मा, म्हाळसा, तुकाई, रामलिंग, वैकापती पूजक.

(१२६) वारली—ह्यांच्यात देवता नाहीत, पण डहाणूची महालक्ष्मी, नगरचा बहिरोबा हे मानतात. हे स्थान धरमपूर संस्थानात फत्तेपूरजवळ आहे.

(१२७) वासुदेव—भवानी, ज्योतिबा, खंडोबा, महाकाली, बहिरोबा पूजक.

(१२८) वेद—म्हैसूरकडील ही जमात गगम्मा, मरम्मा, कावेलम्मा ह्याची पूजक होय

(१२९) वजार—(१) दक्षिणेकडील ही जमात मरिआई, महाकाली ह्याची पूजक

(२) वजारा—काळकामाता पूजक

(३) वजारी (पुणे)—भवानी, खंडोबा व बहिरोबा पूजक

(१३०) सनगर—भवानी, जनाई, ज्योतिबा, खंडोबा पूजक

(१३१) सरानिआ (काठेवाड)—काळकामाता, हनुमान पूजक

(१३२) सुतार (काठेवाडी तळवडी)—भावनगरजवळील रानपुरीमाता पूजक

(१३३) सथाल—जाहर इरा ही मोरोको देवाची बहीण व जाईरस्थानची देवता सथाल परगण्यात ह्या देवतेचे स्थान बहुधा प्रत्येक गावी असते मंदिर बहुधा नाहीच, पण दाट राईमध्ये दगडाच्या राशीत देवींचे स्थान आहे, असे मानतात गोसाईन इरा ही जाहरची लहान बहीण भागलपूर परगण्यातील सस्थाल जमातीच्या ह्या स्त्रीदेवता होत

(१३४) हाटकर—सोलापूरकडे ही जमात कुमारकाम, धनगर अगर घरकाम करते तुळजाभवानी, दुर्गा ह्या देवता होत

(१३५) होलार—सोलापूरकडील ही जमात भागाचे काम करते. डमराई, जनाई, जोगाई, सटवाई, खंडोबा, बहिरोबा ह्या देवता

# देवतांची नामोत्पत्ति

आदिशक्तींची स्वरूपे ही शिवशक्ति व विष्णुशक्ति स्वरूपात सर्वत्र आढळतात. असे असूनही ती अनेक नामरूपात संबोधिली व वर्णिली जातात. याचे अनेकांना कोडे पडते आणि त्यामुळे मन किंचित् गोंधळून जाते. तेव्हा देवतांच्या नामोत्पत्तीची काही उदाहरणे माझ्या अल्पमतीनुसार येथे देत आहे. त्यावरून सर्वसाधारण वाचकांना कल्पना येईल की, एकच स्वरूप अनेक स्वरूपात कसे संबोधिले जाते व जाणले जाते ! हा काही संपूर्ण नामकोश नव्हे. काही ठळक ठळक उदाहरणे आहेत ही नावांची माहिती वाचली असता इतर नावासंबंधी वाचकाला कल्पना येईल. वास्तविक ही नावासंबंधीची माहिती देवतांच्या त्या त्या भागात, ग्रंथात विस्ताराने आली आहे. परंतु येथे ती त्रोटकपणे एकाच दृष्टिक्षेपात आढळून येईल इतकेच.

( १ ) श्रीकरणीदेवी— देवीच्या वराने मानवदेही उत्पन्न झालेल्या मुलीने अनेक अद्भुत चमत्कार केल्याने—करणी केल्याने—नामरूपात आलेली देवता.

( २ ) अन्नपूर्णा— भगवान शंकरांना आणि सर्व मानवप्राण्यांना अन्न पुरविणाऱ्या पार्वतीचे स्वरूप

( ३ ) अष्टभुजा— दानवापासून होणाऱ्या त्रासाचे निर्मूलन करण्यासाठी सर्व देवतांनी एकत्रितपणे आपल्या तेजापासून निर्माण केलेले शक्तिस्वरूप

( ४ ) अभयवा— सतीने मयुराला अभय देऊन प्राण रक्षण केले म्हणून हे नाव प्राप्त झाले.

( ५ ) अंबिका— ' अंब ' या शब्दाचा अर्थ माता किंवा बहीण असा होतो. तेव्हा रुद्राची माता अथवा बहीण म्हणजे अंबिका. परंतु काही वेळा ती रुद्रपत्नीही समजली जाते.

( ६ ) अलक्ष्मी—लक्ष्मीची ज्येष्ठ भगिनी. परंतु तिच्या बरोबर विरुद्ध गुणाची.

( ७ ) आनंदनायकी—आनंद पर्वतावर असलेले पार्वतीचे स्वरूप.

( ८ ) आरासुरीअंबा—आरासूर पर्वतावर वास करणारी देवता.

( ९ ) ओसाममाता—" ओजस् " शब्दाचा अपभ्रंश. बल देणारी देवता. भीमाने याच देवीच्या आशीर्वादाने हिडिंब राक्षसाचा वध केला.

(१०) ऊनईमाता—ऊन अथवा गरम पाण्याच्या कुंडाजवळ स्थापन केलेली देवता.

(११) उमा—पार्वतीने शुष्क पर्णे अथवा दररोज एक पान खाऊन शिवाराधना चालविली असता उ = मुली आणि मा = नको, अशी उग्र तपश्चर्या मातेच्या उपदेशाविरुद्ध करणारी म्हणून हे नाव प्राप्त झाले.

(१२) उग्रतारा—सूर्य हा एक तारा मानलेला आहे. आज्याहुति अथवा अर्घ्यदानाचा विधि अस्तित्वात येईपावेतो त्याची जी अतिशय उग्रशक्ति होती तीच उग्रतारा होय

(१३) एकवीरा—परशुरामाची माता रेणुका हिने विश्वविख्यात वीर सुपुत्र प्रसवला म्हणून पडलेले नाव.

(१४) एकादशी—मृदुमान्य दैत्याच्या वधासाठी एकादशीच्या दिवशी प्रसवलेली शक्ति.

(१५) कनकसुंदरी—व्यापारवृद्धीच्या वेळी अमाप कनक म्हणजे पैसा मिळाला असता झालेल्या नवसातून स्थापन केलेली अष्टभुजा देवीची मूर्ति.

(१६) कमळा—कमलासनावर आसनस्थ लक्ष्मी.

(१७) कन्याकुमारी—दैत्यवधासाठी निर्माण केलेली आणि नियोजित वर भगवान शंकर याची अनंत कालपर्यंत मार्गप्रतिक्षा करणारी कुमारी.

(१८) कामाक्षी—कामासुर दैत्याचा वध करणारे दुर्गादेवीचे स्वरूप

(१९) कामाख्या—भगवान शंकरानी पार्वतीसह वास्तव्य करून आपल्या कामाची शांति ज्या प्रदेशात केली तो देश कामरूप नावाने ओळखिला जाऊ लागला. ह्या देशातील शक्तिपीठाला कामाख्या असे नाव प्राप्त झाले.

(२०) कात्यायनी—कात्यायन ऋषीने आपल्या तेजातून दैत्यवधासाठी निर्माण केलेली शक्ति.

(२१) काळी—काळाला गिळकृत करणारी. पार्वती जन्मतःच सावळ्या वर्णाची होती. परंतु तपश्चर्येने आपला गौरवर्ण करून घेतला. काली हे एक सृष्टी-संहाराचे रूपक आहे.

(२२) कुलकुल्या—कुलकुल्या नदीच्या तीरावर असलेली दुर्गादेवीची मूर्ति.

(२३) कौमारी—कार्तिकेयाला कुमार या नावानेही ओळखिले जाते, त्याची माता अगर शक्ति.

(२४) कौशिकी—पार्वतीने आपल्या तपश्चर्येने आणि ब्रह्मदेवाच्या वरामुळे शरीराच्या सावळ्या वर्णाच्या त्वचेचा त्याग केल्यावर जे रूप निघाले, तेच हे होय.

(२५) कंकाळी—देवकीची सात मुले कंसाने ज्या शिळेवर आपटून ठार केली त्या शिळेला पुढे कंस-काळी आणि अपभ्रंशाने कंकाळी नाव प्राप्त झाले.

(२६) खोडियारमाता—खोडियार ( काठेवाड ) गावी भूमीतून वर आलेले देवीचे स्वरूप.

(२७) गजांतलक्ष्मी—क्षीरसागरातून लक्ष्मी प्रकट झाल्यावर तिला स्नान घालण्यासाठी दोन्ही बाजूंना दोन हत्तींनी आपल्या सोंडेतून तिच्यावर पाण्याची धार धरली. त्या स्वरूपाला गजांतलक्ष्मी हे नाव रूढ झाले.

(२८) गावदेवी—गावाच्या सीमेवर असलेले देवीचे स्थान अथवा गावामध्ये असलेले ग्रामदेवतेचे स्थान.

(२९) गिरनारअंबा—गिरनार पर्वताच्या माथ्यावर असलेली अंबेची मूर्ति.

(३०) गुह्येश्वरी—भगवान शंकर पशुपति क्षेत्री राहावयास गेल्यावर गुप्तरूपाने पार्वतीने त्याची सेवा केली म्हणून त्याच्या स्मरणार्थ स्थापन झालेली अष्टभुजा देवता.

(३१) गोत्रदेवी—नैमिषारण्यात ब्राह्मणांनी वसाहत केल्यावर त्यांच्या संरक्षणार्थ ब्रह्मदेवाने प्रत्येक गोत्राची निर्माण करून तेथे ठेवली देवता.

(३२) गौरी—पार्वतीने आपल्या सावळ्या वर्णाच्या त्वचेचा त्याग केल्यावर उरलेल्या गौरवर्णाला गौरी हे नाव प्राप्त झाले.

(३३) चामुंडा—चामुंड दैत्याला मारणाऱ्या अष्टभुजा देवीचे स्वरूप.

(३४) चतुःशृंगी—वणी ( नाशिक ) येथील सप्तशृंगीला पूर्वी चतुःशृंगी संबोधिले जात असे आणि दृष्टान्ताने तेच रूप पुण्याला असल्याने तेथील तांदुळा-स्वरूप देवतेला चतुःशृंगी हे नाव प्राप्त झाले.

(३५) छिन्नमस्ता—यज्ञदेवतेचे शीर कापलेले असल्याने प्रत्येक यज्ञाच्या अंती शिरोयज्ञ म्हणजे कोणत्यातरी पशूचे शीर अर्पण करण्याची रूढि आहे. हे हवन बंद झाले म्हणजे छिन्नमस्ताशक्ति सर्वांचा संहार करते.

(३६) जननी—अष्टभुजा पार्वतीचेच स्वरूप. परंतु देवता जननीप्रमाणे आपल्या भक्तांचे पालनपोषण करते, म्हणून हे नाव प्रचारात आले असावे.

(३७) ज्येष्ठागौरी—ज्येष्ठानक्षत्रावर गौरीचे आगमन होते, पूजन होते, म्हणून हे नाव आले असावे. अथवा लक्ष्मीची ज्येष्ठ बहीण अलक्ष्मी आहे, तिचे हे नाव असावे.

(३८) ज्वालादेवी—हे देवतेचे स्वरूप नाही. पण भूगर्भातून अविरतपणे निघणाऱ्या ज्वालाच्या समूहाला, हे नामाभिधान प्राप्त झाले आहे.

(३९) जोगेश्वरी—योगमाया, योगेश्वरी या शब्दाचा हा अपभ्रंश आहे.

(४०) तुकाई—राम वनातून सीतेच्या शोधार्थ वणवण हिंडत असता पार्वतीने सीतास्वरूप बनून त्यांच्या मनाची उद्विग्नता कमी करण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी मार्गात ती एका भव्य शीळेवर उभी राहिली रामचंद्रांनी आदिशक्तीचे ते स्वरूप ओळखिले आणि प्रश्न केला. 'तू का इथे ?' त्याचाच अपभ्रंश तुकाई झाला.

(४१) तुळजाभवानी—हिलाच त्वरिताभवानी असेही म्हणतात कर्दम ऋषींची पत्नी अनुभूति हिची दैत्याच्या त्रासातून सोडवणूक करण्यासाठी भवानीने त्वरित ते रूप धारण केले, म्हणून त्वरिता = तुरजा = तुळजाभवानी हे नाव रूढ झाले,

(४२) तूळादेवी— आयुष्यभर कष्ट करून संचित केलेली संपत्ति मृत्यूपूर्वी गोरगरिबांना अथवा गरिबांना वाटून टाकण्यासाठी जो विधि करतात आणि त्या वेळी तुळेवर ( तराजूवर ) जी देवता स्थापन करतात ती तूळादेवी.

(४३) त्रिपुरा— ही एक आदिशक्ति मानलेली आहे. दैत्यांच्या तीन पुरांना ( शहरांना ) जिंकणारी, शंकराची शक्ति ती त्रिपुरा. मानवी देहात स्थूल, सूक्ष्म व कारणदेहाने त्रिगुणात्मक रूपाने वावरणारी शक्ति असाही उगम सांगितला जातो.

(४४) दशाशुभहरी— सर्व प्रकारच्या पापांचे निर्मूलन करणारी देवता.

(४५) दाक्षायणी— दक्षप्रजापतीची कन्या सती व शंकराची पत्नी.

(४६) दुर्गा— ही एक आदिशक्ति होय. विंध्यपर्वतावर दुर्गमस्थळी जाऊन तप करणारी पार्वती, म्हणून दुर्गा अथवा दुर्गम दैत्याचा वध करणारी म्हणूनही दुर्गा.

(४७) दंतेश्वरी— दात उठावदारपणे बाहेर असलेले अष्टभुजादेवीचे स्वरूप.

(४८) नागनकी— नागन ( मारवाड ) येथे स्थापन झालेले राष्ट्रसेना-देवीचे स्वरूप.

(४९) पटेश्वरी— पाटण येथे स्थापन झालेली अष्टभुजा दुर्गामूर्ति.

(५०) पद्मावती— पद्मासनस्थ लक्ष्मीची मूर्ति. सागरमंथनातून वर आलेले लक्ष्मीचे स्वरूप.

(५१) पिठोरी— पिठोरी अमावास्येच्या दिवशी ६४ शक्तिपीठांच्या देवता एकत्र स्थापन करून पूजासमारंभ होतो म्हणून पिठोरी हा अपभ्रंश होय.

(५२) प्रत्यंगिरा— अंगिरा ऋषींच्या शापाने निर्माण झालेले देवतेचे स्वरूप.

(५३) प्रभादेवी— प्रभू समाजातील एका भक्ताने दृष्टांताने विहिरीतून वर काढलेली व स्थापन केलेली चतुर्भुज देवीची मूर्ति.

(५४) पंपावती— ब्रह्मदेवाची कन्या देवीरूपाने पूजेत आली. देवीच्या नावाने पंपावती नगर आणि पंपासरोवर ही नावे रूढ झाली.

(५५) पर्वती—टेकाडमाथ्यावर असलेले शिव-पार्वती मंदिर.

(५६) बगळामुखी— सर्व प्राणिमात्रांच्या शरीरात, अथर्ववेदात सांगितल्याप्रमाणे एक अथर्वा नावाची सुतसंवेदनात्मक जी शक्ति आहे तिला अथर्वांगिरा अथवा बगळामुखी असे नाव आहे. बगळामुखीचा अपभ्रंश वाल्गामुखी असा झालेला आहे.

(५७) वनशंकरी—दुर्गादेवीचे एक नाव कांतारवासिनी असे आहे. तेव्हा वनामध्ये ( बनामध्ये ) असणारे दुर्गेचे जे स्वरूप तेच ही वनशंकरी होय.

(५८) बहुचरा— बहुतेर दैत्याचा वध करणारी शक्ति ती बहुचरा होय. पण दुसरा पाठ असा की, बहुचरा, बाला आणि ब्रमृत या तिघी बहिणी होत. आपल्या अलौकिक त्यागामुळे त्या देवपदाला पोहोचल्या.

(५९) ब्राह्मी— ब्रह्मदेवाच्या तेजापासून निर्माण झालेली शक्तिदेवता.

(६०) भगवती— भग म्हणजे संपत्ति देणारी देवता.

(६१) भवानी—भव म्हणजे शंकर, त्याची पत्नी.

(६२) भ्रमरंबा—भक्तांच्या रक्षणार्थ शरीरामधून असंख्य भ्रमर निर्माण करून त्याच्या शत्रूंची दाणादाण उडविणारी देवता. अथवा श्री शैलपर्वतावर अमावास्यापौर्णिमेला शंकरासह भ्रमण करणारी पार्वती म्हणून भ्रमरंबा.

(६३) भारतमाता—प्रत्येक मानवाला जन्मदात्री, कर्मदात्री आणि स्फूर्तिदात्री अशा तीन माता आहेत. त्यापैकी स्फूर्तिदात्री म्हणजेच देशमाता—

भारतमाता होय. कोठे चतुर्भुजा देवीचे स्वरूप तर कोठे देशाचा आलेखच रेखाटण्यात आला असून त्याला भारतमाता संबोधिले जाते.

**(६४) भुवनेश्वरी**—यज्ञसंस्थेमध्ये आहुति देण्याची प्रथा रूढ झाल्यावर जी तीन भुवने उत्पन्न झाली, त्यांची व्यवस्था पाहून त्यावर सत्ता गाजविणारी शक्तिदेवता ती भुवनेश्वरी.

**(६५) भैरवी**—भैरव म्हणजे शंकर याची शक्ति ती भैरवी. दक्षिणाधिकारी यमाला म्हणजेच रुद्राला कालभैरव ही संज्ञा आहे. त्याचीच ही विनाशक शक्ति

**(६६) महाकाली**—परात्पर महाकालाची संहारक शक्ति.

**(६७) महिकावती**—महि म्हणजे पृथ्वीसारख्या अवाढव्य आकाराची म्हणून महिकावती नाव आले असावे. दुसरे कारण असे की, महिरावणाच्या राजधानीच्या गावाला त्याच्याच नावाचा अपभ्रंश झाला असावा आणि तेथील देवता म्हणून महिकावती नाव आले असावे. साम्प्रत फक्त भव्य मुखकमल तेवढे दृश्यमान आहे.

**(६८) महामयी**—महा म्हणजे मोठी आणि मयी म्हणजे मही, म्हणजेच पृथ्वी भूमातेचे भव्य स्वरूप असा अर्थ.

**(६९) महालक्ष्मी**—विष्णूची पत्नी लक्ष्मी हिला दोन भुजा दाखवितात. पण महाविष्णूची शक्ति म्हणून महालक्ष्मी ओळखली जाते आणि तिला अठरा भुजा दाखवितात.

**(७०) म्हाळसा**—मोहिनीराज = महालया = महाळसा. देवदानवांच्या वेळी अमृताची वाटणी करताना विष्णूने घेतलेले मोहिनीरूप, अथवा राहु दैत्याला मारणारे स्वरूप.

**(७१) महिषासुरमर्दिनी**—महिषासुर दैत्याच्या वधासाठी सर्व देवांनी आपली दिव्य तेजे एकत्रित करून अष्टभुजा देवी शक्ति भूतलावर पाठविली आणि तिने त्याचा वध केला, ते स्वरूप.

**(७२) माहेश्वरी**—महाईश्वर = शंकर, त्याची अधिष्ठान शक्ति

**(७३) मीनाक्षी**—मीनासूर दैत्याचा वध करणारी शक्ति, अथवा जिचे नेत्र मीनासारखे तरल आहेत अशी देवता.

**(७४) मंगळागौरी**—भक्ताचे सदासर्वदा मंगल करणारी आणि विवाहानंतर श्रावण महिन्यातील प्रत्येक मंगळवारी नववधूकडून सौभाग्यसंवर्धनार्थ पूजिली जाणारी गौरीची मूर्ति.

(७५) मुंबादेवी—या देवीच्या तीन व्युत्पत्ति आढळतात.

(अ) मुगा नावाच्या कोळणीच्या नावाचा अपभ्रंश.

(ब) महाम्यी–ममई–मुंबई = मुंबादेवी.

(क) मुबारक दैत्याचा नाश करणारी शक्तिदेवता. मुबा या शब्दाचा अपभ्रंश मुंबा झाला असावा.

(७६) मनसा— कश्यप ऋषींनी त्यांच्या तेजाने मनात आणल्याबरोबर निर्माण झालेली देवता, अथवा मीन म्हणजे मत्स्यकुलोत्पन्न देवता.

(७७) यल्लमा—मूळ नाव रेणुका, कर्नाटक प्रांती सप्तमातृकांना योळुमाता म्हटले जाते. तेव्हा योळुअम्मा = यल्लम्मा असा अपभ्रंश झालेला असावा, असे काहींचे म्हणणे आहे. परंतु उत्पत्तीची कथा रेणुकेचीच आहे.

(७८) यमाई— प्रभुरामचंद्र वनवासात असताना सीतारूपी पार्वती शिळेवर उभी राहिली. तेव्हा रामचंद्र तिला म्हणाले, 'ये माई' म्हणून हे नाव रूढ झाले.

(७९) रामवरदायिनी— प्रभूरामचंद्र लंकेच्या मार्गावर असताना विजयाचा वर देणारी तुळजा भवानी.

(८०) रुद्राणी— रुद्र (शंकर) यांची पत्नी पार्वती.

(८१) राजराजेश्वरी— दशमहाविद्यांपैकी चौथी शक्ति जी भुवनेश्वरी तीच राजराजेश्वरी संबोधली जाते. मूळ अंबिकेच्या मूर्तीला जी आसनाची बैठक आहे त्याला ब्रह्मा, विष्णु, महेश, ईश्वर यांचा उपयोग केला आहे. तेव्हा अशा राजराजेश्वर्यात राहणारी ती राजराजेश्वरी होय.

(८२) राष्ट्रसेना— सप्तगणरूपी देवता. पण एका राजवंशाने तिला राष्ट्र-देवता मानल्यामुळे तिला हे नाव प्राप्त झाले.

(८३) रेणुका— रेणु राजाची मुलगी व परशुरामाची माता.

(८४) लुंबिना— भगवान बुद्धाची माता. पुढे त्या पंथीयांनी तिला देवता मानली.

(८५) वत्सला—भगवान शंकर पशुपति क्षेत्रात राहत असताना वत्सल भावाने त्यांची सेवा करणारी पार्वती.

(८६) वरदायिनी—दुर्दम दैत्याचा वध करणारी व देवांना इच्छित वर देणारी देवता. तसेच रावणवधाच्या वेळी प्रभुरामचंद्रांना आणि अज्ञातवासाच्या वेळी पांडवांना इच्छित वर देणारी देवता.

(८७) वरलक्ष्मी—इच्छित वर देणारी चतुर्भुजा लक्ष्मी देवी.

(८८) वज्रेश्वरी—वसिष्ठ ऋषींवर इंद्राने फेकलेले वज्र गिळणारी पार्वती.

(८९) वामा—शंकर पार्वतीला म्हणाले, 'तू वामा (सुंदर) आहेस.' त्यावरून हे नाव रूढ झाले.

(९०) विषहारी—सर्पाने दंश केला असता त्याच्या विषाचे हरण करणारी मनसादेवी.

(९१) विदर्भचंडिका—महाराष्ट्र राज्यनिर्मितीच्या वेळी आपले राजकीय हेतु साध्य करून घेण्यासाठी विदर्भीयांनी नागपूर येथे स्थापन केलेली चंडिका देवी.

(९२) विंध्यवासिनी—विंध्य पर्वतावर नित्य वास करणारी पार्वती.

(९३) वैष्णवी—विष्णूच्या शरीरापासून निर्माण झालेली शक्ति.

(९४) वैकुंठमाता—वैकुंठाप्रमाणे उच्च पर्वतमाथ्यावर वास करणारी चतुर्भुजा देवी.

(९५) शांतादुर्गा—हरि-हराच्या दीर्घकालीन युद्धाच्या वेळी शांतता प्रस्थापित करणारी दुर्गा देवी.

(९६) शाकंभरी—भयंकर दुष्काळ पडला असता लोकांना शाकभाजी पुरवून त्यांची क्षुधा शांत करणारी देवता.

(९७) शताक्षी—शंभर नेत्ररूपाने प्रकट होणारी भुवनेश्वरी देवता.

(९८) शिवदूती—रुरू दैत्याच्या वधासाठी शंकराच्या जटेतून प्रकट झालेली आणि दूताचे काम करणारी शक्ति.

(९९) सप्तशृंगी—पर्वताला सात शृंगे-शिखरे असलेल्या ठिकाणावरील देवता. वास्तविक प्रत्यक्ष तपासणीत चारच शृंगे आढळून आल्यानंतर त्याच देवीचे चतुःशृंगी हेही नाव रूढ झाले.

(१००) सामुद्रीमाता—समुद्रमंथनाच्या वेळी प्रकट झालेले लक्ष्मीचे स्वरूप म्हणून सामुद्रीमाता.

(१०१) सारसगडवासिनी—सारसगड डोंगरमाथ्यावर स्थापन झालेले यमाई देवीचे स्वरूप.

(१०२) षष्ठी—ब्रह्मदेवाची कन्या देवसेना. मूळ प्रकृतीच्या सहा अंशांनी तिचे रूप बनले ती षष्ठी. नवबालक जन्मल्यावर सहाव्या दिवशी या देवतेचे पूजन करतात.

(१०३) षोडषी—उग्रतारा उत्पत्तीमध्ये सूर्याला आहुति देतात, आहुति मिळाल्यावर तो शिव-सूर्य बनला आणि त्याची ही पत्नी.

(१०४) हरितालिका—आलि = सखीकडून जिचे हरण झालेले आहे, अशी नववधू पार्वती.

(१०५) हरसिद्धी—हराच्या सिद्धीमुळे निर्माण झालेली आणि चंड व प्रचंड दैत्याचा वध करणारी देवता.

(१०६) हर्षदमाता—महाकालीच्या अनन्य कृपेमुळे भक्तांना अतिशय हर्ष झाला, त्यावरून रूढ झालेले तिचे नाव.

(१०७) हुंकारेश्वरी—भूगर्भातून हुंकार मिळाल्यामुळे तेथे असलेल्या देवतेला मिळालेले नाव.

(१०८) हिंगुळा—गुप्तरूपाने राहात असलेले शंकर, पार्वतीने हिंगुळा नदीच्या ठिकाणी शोधून काढले. यामुळे हिंगुळा क्षेत्रीच्या स्वरूपाला मिळालेले नाव.

(१०९) क्षीरभवानी—क्षीरसागरातून प्रकट झालेले लक्ष्मीचे स्वरूप.

# बौद्धपंथीय देवता

आर्यसनातनधर्मात ज्याप्रमाणे विश्वाची उत्पत्ति ब्रह्म आणि माया या जोडीपासून झाली, तद्वत् बौद्ध धर्मामध्ये ही उत्पत्ति आदिबुद्ध आणि आदिप्रज्ञा या जोडीपासून झाली, असे मानतात आदिप्रजेला कधी कधी प्रज्ञा पारमिता असेही म्हणतात पुरुष आणि प्रकृति अथवा शिव आणि शक्ति याप्रमाणेच ही जोडी होय

या जोडीपासून पाच ध्यानी बुद्धाची उत्पत्ति झाली असून, जगाच्या दैनंदिन व्यवस्थेमध्ये ते कोणताही भाग घेत नाहीत त्याचे वर्णन असे

| ध्यानी बुद्धाचे नाव | दिशाधिपति | कोणते तत्त्व | इंद्रिय | वर्ण | शक्ति |
|---|---|---|---|---|---|
| १ वैरोचन | मध्य | आकाश | शब्द | शुभ्र | वज्रधात्वीश्वरी |
| २ अक्षोभ्य | पूर्व | वायु | स्पर्श | निळा | लोचना |
| ३ रत्नसंभव | दक्षिण | अग्नि | रूप | पिवळा | मामकी |
| ४ अमिताभ | पश्चिम | जल | रस | तांबडा | पांडरा |
| ५ अमोघसिद्धि | उत्तर | पृथ्वी | गंध | हिरवा | तारा |

हे ध्यानी बुद्ध नेहमी वज्रासनाधिष्ठित असून पाय एकमेकांत गोवलेले आणि तळवे दिसत असलेले असतात याच्या मूर्ति स्वतंत्रपणे तयार करीत असूनही, त्यांच्या वंशावळीतील मूर्तींचे मस्तकावर कोरतात. त्यामुळे त्या देवता कोणत्या कुळातील आहे, हे समजते त्यांच्या शक्तिस्वरूपासह दर्शन नेपाळमधील काटमांडू येथील यमगुन्नी येथील मठात घडते

ध्यानी बुद्ध सदैव चिंतनात मग्न असल्याने, त्यांनी आपले दुसरे स्वरूप मानुषीस्वरूपात, विश्वाचे नियमन करण्यासाठी निर्मिलेले आहे. त्यांना बोधिसत्त्व असे म्हणतात त्या त्या युगामध्ये या बोधीसत्वाची निर्मिति होऊन, युगाचे अंती, तेही आत्मस्वरूपात विलीन होतात.

| ध्यानी बुद्ध | ध्यानी बोधीसत्व | मानुषी बुद्धाचे स्वरूप |
|---|---|---|
| १ वैरोचन | सामताभद्र | क्रकुचंद्र |
| २ अक्षोभ्य | वज्रपाणी | कनकमुनी |
| ३ रत्नसंभव | रत्नपाणी | काश्यप |
| ४ अमिताभ | अवलोकितेश्वर | गौतम |
| ५ अमोघसिद्धि | विश्वपाणी | मैत्रेय |

वरीलप्रमाणे तीन युगे संपली आहेत आणि गौतमाचे चवथे युग सुरू आहे. शाक्यमुनीच्या निर्वाणाच्या पाच हजार वर्षांनतर मैत्रेयाचे युग चालू होईल.

प्राथमिक पाच बोधीसत्वाच्या यादीतून काही वेळा रत्नपाणी आणि विश्वपाणी याना वगळून, त्यामध्ये १. आकाश–गर्भ, २. क्षिती–गर्भ, ३. सर्व-निर्वाण विशकंभिन, ४. मंजुश्री व ५. मैत्रेय यांची नावे घालून, ती यादी आठ-पर्यंत वाढवितात. यामध्ये मंजुश्री हा प्रमुख आहे आणि म्हणून त्या पंथामध्ये त्याला जास्त महत्त्व आहे.

बौद्ध पंथामध्ये अनेक स्त्री-देवता असून त्यांचे स्थान ठरविणे फार कठीण आहे. ध्यानी बुद्धापासून, जशी बोधीसत्वाची निर्मिति झाली तशीच त्यांच्या स्त्रियांची झाली असल्याने, दोघांचे महत्त्व समानच आहे. परंतु काही वेळा एकापासून अनेक स्त्री-देवतांची उत्पत्ति झालेली असल्याने त्यांचा संबंध जोडणे फार कठीण पडते. हा घोटाळा टाळण्यासाठी त्यांची वर्गवारी खालीलप्रमाणे साधारणतः करतात.

१. वैरोचन ( शुभ्र ) = शुभ्रतारा, उष्णीशविजया, जांगुलीतारा, मारिची.

२. अक्षोभ्य ( नील ) = नीलतारा अथवा एकजटा.

३. रत्नसंभव ( पीत ) = पीत-तारा, वसुधारा, वज्रतारा.

४. अमिताभ ( रक्त ) = रक्ततारा अथवा कुरुकुल्ला, सितातपत्रा, भृकुटी.

५. अमोघसिद्धि ( हिरवा ) = हरितवर्ण तारा, पर्णशबरी.

या पंथामध्ये तारादेवीला प्रामुख्याने महत्त्व आहे. ती जेव्हा अमोघसिद्धि ध्यानी बुद्धाची शक्ति असेल, तेव्हा ती आसनावर ललितासन घालून बसते, उजवा हात वरद-मुद्रा आणि डावा हात वितर्क-मुद्रामध्ये असतो. दोन्ही बाजूंना

दोन दोन कमळे असून त्यावर वज्र ठेवलेले असते. ध्यानी बुद्धाची आकृति मस्तकावरील मुकुट अगर प्रभावळीमध्ये असल्याने तिचे कूळ शोधणे कठीण जात नाही. परंतु मूर्तीचे लेखन करणाऱ्या अनेकांनी हा नियम पाळला नसल्याने काही वेळा घोटाळा होतो.

सरस्वती ही ब्राह्मण धर्मातील घेतलेली देवता असून, ती मंजुश्रीची पत्नी मानतात. शुभ्र तारेचे स्वरूप आर्या जांगुली हे आहे आणि ते सरस्वतीप्रमाणे मानतात. या पंथामध्ये तीन वर्ग केलेले आहेत.

(१) यमातक, जंभाल, हेवज्र, हेरुख, महामाया, पंचरक्षक इ० भक्ताच्या रक्षक देवता.

(२) कुबेर, यम, हयग्रीव, महाकाल इ० धर्मरक्षक देवता.

(३) सोळा महास्थवीर, नागार्जुन, पद्मसंभव इ० देवतास्वरूप पावलेले महात्मे. कुबेरपत्नी हारिती याच वर्गात मोडते.

याव्यतिरिक्त डाकिणी, शंखिणी, पिशाच, भैरव इ० अनेक देवता या पंथामध्ये आहेत.

बौद्ध पंथामध्ये अनेक देवता आहेत आणि त्यांची कार्ये वेगवेगळी आहेत., अणिमा, महिमा, लघिमा, दूरश्रवण, परकाया प्रवेश, जलस्तंभन, वायुस्तंभन, वान्हिस्तंभन, वाकसिद्ध, प्राणदान, इंद्रियस्तंभन इ० एकूण २४ प्रकारच्या सिद्धि आहेत. या सर्व सिद्धि प्राप्त असणारालाच सिद्ध पुरुष म्हणतात. बौद्धकाळी या प्रकारचे ८४ सिद्ध पुरुष होते आणि नेपाळ, तिबेट प्रांती त्याचे आजही पूजन घडत आहे.

या सिद्धि प्राप्त करून घेण्याचा जो मार्ग त्याला साधना असे म्हणतात. एकूण उपलब्ध सामुग्रीवरून या प्रकारच्या ३१२ साधनांचा शोध लागला आहे. काहीं साधनांचे कर्ते माहीत आहेत तर काहीचे नाहीत. या साधनांचा उहापोह ज्या ग्रंथात केलेला आहे त्याला ' साधनमाला ' हे नाव असून याचे दोन खंड विनयतोष भट्टाचार्य यानी गायकवाड सरकारच्या वतीने प्रसिद्ध केलेले आहेत.

त्या साधनमार्गातील खालील दोन श्लोक उदाहरणार्थ पहा.

उत्तराभिमुखो भूत्वा मन्त्री शान्तिकमारभेत् ।
पौष्टिकं तु सदा पूर्वे अभिचारं तु दक्षिणे ॥
पश्चिमे तु सदा प्रोक्तं आकर्षोच्चाटनादिकम् ॥।
शान्तिकं शरत्काले तु हेमन्ते पौष्टिकं तथा ।
ग्रीष्मेऽभिचारकर्माणि कुर्यात् सर्वाणि साधकः ॥

(साधनमाला, २/३६९)

याचा भावार्थ असा की, पूजकाने शांतिकर्माचे वेळी उत्तराभिमुख असावे. पौष्टिककर्माचे वेळी पूर्वाभिमुख, अभिचारकर्माचे वेळी दक्षिणाभिमुख आणि उच्चाटन अगर आकर्षणकर्माचे वेळी पश्चिमाभिमुख असावे. शांतिकर्मे ही शरद ऋतूमध्ये, पौष्टिककर्मे हेमंत ऋतूमध्ये आणि अभिचारकर्मे ग्रीष्म ऋतूमध्ये करावीत. तसेच शान्तिकर्म सायंकाळी, पौष्टिक सूर्योदयाबरोबर सकाळी आणि अभिचार दुपारी अथवा मध्यरात्री करावीत. याप्रमाणे इतर देवतांचे साधनमार्ग दिलेले आहेत. वरील आचारात मूर्ति जरी एकच असली तरी कालमानाप्रमाणे तिचा वर्ण बदलतो, आयुधे बदलतात व स्वरूपेही बदलतात आणि यानुळेच एकच देवतेची अनेक नावे आली आहेत. जसे तारा, उग्रतारा, श्यामतारा, रक्त-तारा इ० इ० त्या त्या प्रसन्न करून घ्यावयाच्या असतील, तर त्यांचे विहित साधनमार्ग माहीत करून घेऊन त्यांचे आचरण केले तरच फलप्राप्ति होईल, एरव्ही नाही. यासाठी साधकाने पूर्ण ज्ञात्याकडून या आचरणाचे धडे घेतले पाहिजेत. तांत्रिक वाङ्मय इतके अगाढव्य आहे की, पी. कॉर्डिअर या संशोधकाने फ्रेंच भाषेत त्याची नुसती ग्रंथसूची दोन मोठ्या भागात छापलेली असून त्याचे नाव ' Bibliotheque Nationale ' असे आहे.

## आयुधांची उपयुक्तता

भारतीय, बौद्ध, जैन अथवा इतर पंथीयांच्या देवतांच्या हातात निरनिराळी आयुधे दिलेली आपण पाहतो. त्या त्या मूर्तीचे उग्र अथवा शांत स्वभावानुसार हातात आयुधेही असतात. पण एकच आयुध सतत एकाच विवक्षित हाती असते असे नाही. त्याचा क्रम काही वेगळा दिसतो. अग्निपुराणात मूर्तिविधान नावाच्या प्रकरणात याचा थोडासा ऊहापोह केल्याचे आढळते. भगवान विष्णूची संध्याकर्म करताना २४ नावे स्मरण करावी लागतात. ही चोवीस नावे म्हणजे चोवीस मूर्ति आल्या व विशेष म्हणजे ही फक्त विष्णूचीच नावे आहेत. विष्णूची आयुधे शंख, चक्र, गदा, पद्म, ही चार ठरलेली आहेत आणि तत्स्वरूप इतर मूर्तीचे ठिकाणी हीच असावयास पाहिजेत. तेव्हा मूर्तिविज्ञान शास्त्रज्ञांनी ही चार आयुधे देऊनच चोवीस मूर्ति सजविल्या, फक्त त्यांचा क्रम मात्र बदलला.

उजवेकडील खालचे हाती, एकदा शंख, तर दुसऱ्यात चक्र, तिसऱ्यात गदा व चवथ्यामध्ये पद्म व बाकीची तीन आयुधे इतर तीन हातात दिली. याप्रमाणे केशवाचे हाती शंख-चक्र-गदा-पद्म आयुधे आली. वाराणशी येथील आदि-केशव मंदिरात ही मूर्ति पाहावयास सापडते. दुसरे नाव नारायण, याचे हाती चक्र-गदा-पद्म-शंख आयुधे दिली. माधवाचे हाती गदा-पद्म-शंख-चक्र आयुधे दिली. प्रयाग येथील वेणीमाधव मंदिरातील मूर्ति याप्रमाणे आहे. याप्रमाणे

चार आयुधाच्या अदलाबदलीच्या एकीकरणाने गणित शास्त्राप्रमाणे ४ × ३ × २ × १ = २४ प्रकार शास्त्रज्ञ ठरवू शकले आयुधांचा क्रम निश्चित केल्यामुळे, उजवे खालचे हाती शस्त्र म्हणजे केशव, तर उजवे खालच हाती पद्म म्हणजे गोविंद याप्रमाणे आयुधावरून मूर्तीचे नाव निश्चित करता आल लोकाना त्याचा आपोआप बोध होऊ लागला

या विवरणावरून मूर्तिविज्ञान शास्त्राची महती समजून येईल शिल्पकार अथवा चित्रकाराला या शास्त्राचे संपूर्ण ज्ञान पाहिजे आणि शास्त्राप्रमाणेच त्याने मूर्ति घडविल्या असतील, तर भक्ताला ती मूर्ति ओळखणे सुलभ होते असे दिसून येईल भारतीय शिल्पकलेत या शास्त्राची उपयुक्तता कशी आहे, हे यावरून ध्यानी येईल

## हिंदुदेवताची बौद्धपथायाकडून विटंबना

वज्रयानीपथाच्या धर्मप्रचारकानी हिंदुदेवताबाबत आपला दृष्टिकोन फारच विकृत स्वरूपाचा ठेवलेला होता असे दिसून येते वज्रयानी ग्रंथकारानी जे ग्रंथ लिहिले व मूर्तींना आकार दिले त्यावरून हे स्पष्ट होते गौतमबुद्धाच्या वेळी मात्र ही स्थिति नसावी

( १ ) काही बौद्ध शिल्पात हातात ब्रह्मशीर्ष घेतलेले असते याचा अर्थ असा की, बौद्धपथीय देव इतके सामर्थ्यवान आहेत की, ते हिंदुदेवाचा नाश करून, त्यांची मस्तके आपले हाती घेऊन मिरवतात

( २ ) हरिहरीहरीवाहनोद्भव हा एक अवलोकितेश्वर बुद्धाचा अवतार आहे याच वाहन म्हणून विष्णुमूर्ति दाखविली आहे हरि = सिंह, हरिवाहन = गरुड, त्यावर विष्णु आणि त्याच्या माथ्यावर अवलोकितेश्वर सिंह व गरुड, याचे शिल्प त्यावर विष्णु, म्हणजे हिंदूच्या विष्णुदेवाशिवाय इतर कोणतेही शिल्प नव्हे ' सिंहगरुडविष्णुस्कंधस्थितमामान ध्यात्वा । ' इ० इ०

( ३ ) चक्रोशन—अक्षोभ्य ध्यानी बुद्धापासून याची निर्मिति असून तो भयकर क्रूर आहे त्याच जे छायाचित्र उपलब्ध आहे, त्यामध्ये डावे हाती छाती जवळ त्याने पाश धरिलेला आहे विष्णु, ब्रह्मा, शिव यासारखे जे कोणी मानवजातीला त्रास देत असतील, त्यांना बाधण्यासाठी त्या पाशाचा उपयोग आहे इतकेच नव्हे तर या बुद्धाने आपली तर्जनी वर केलेली असल्याने हे देव भीतीने घाबरून गेलेले आहेत

' तर्जनीतर्जितव्याकुलानेन्द्र हरिहरहिरण्यगर्भादि
देशत्रुन्दारिवधनाय इ० इ० '

विष्णु शिव ब्रह्मा-कंदर्प या दुर्देवतांच्या कालचक्रामध्ये जे जीव दुःखी होतात, त्याकडे चंद्ररोशन कृपेने पाहात आहे.

'हरिहरहिरण्यगर्भकन्दर्पादिभि'
भवचक्रे भ्राम्यतस्तान् पश्येत्।'

(४) मृत्युवचना तारा देवीची उपासना केल्यास उपासक मृत्यूवर जय मिळवू शकतो आणि हिंदुदेवता ब्रह्मा विष्णु महेश, इंद्र, चंद्र, सूर्य त्या उपासकाच्या केसांची टोकेही नाश करू शकत नाहीत.

(५) मारिची देवीचे ध्यानवर्णन करताना 'पुरन्दर वन्दित . अधो हरिहर ब्रह्मादयो मर्दिता . वसुलोकपाला वन्दनामाज्ञा च कुर्वन्त स्थिता' म्हणजे इंद्र ब्रह्मा वसु लोकपाल इ० देवता तिला वंदन करीत आहेत काही तिच्या पायाखाली चिरडले जात आहेत, काही तिच्या आज्ञा सेवकाप्रमाणे पाळीत आहेत याप्रमाणे ध्यान दिलेले आहे.

(६) कुरुकुल्ला देवीचे उपासकाला ब्रह्मा, रुद्र, इंद्र, नारायण इ० हे आपण होऊन भेटतात आणि सेवकाप्रमाणे त्यांची कामे पूर्ण करतात.

(७) वज्रज्वालानलार्का—या देवीचे ध्यानामध्ये विष्णु व लक्ष्मीला ती पायाखाली तुडवीत आहे. 'सपत्नीक विष्णु आलीढपदेनाक्रम्यावस्थितम्।' इ० इ०

(८) बोधीसत्वाचा अवतार भूतडामर याचे वर्णन करताना इंद्र, ब्रह्मा, कुबेर इ० देवताचा गर्व हरण करणारा असे आहे.

(९) उच्छुस्मजंभल—या धनदौलत देणाऱ्या देवाचे वर्णन करताना कुबेराचे पाठीवर पाय देऊन त्याला रत्ने ओकावयाला लावणारा देव असे वर्णन आहे

(१०) हयग्रीवाची पूजा करताना भक्तासमोर फारच रम्य चित्र ठेवलेले आहे. हयग्रीव पूजनानंतर प्रसन्न झाला तर तो पूजक विद्याधराचे लोकात जातो आणि तेथे सर्व सुख अनुभवतो, देवेंद्र त्याचा रक्षक–चोपदार बनतो, ब्रह्मदेव प्रधान होतो, कार्तिकस्वामी त्याचा सेनापती होतो, विष्णु द्वाररक्षक होतो, शंकर सद्‌गुणावर प्रवचने करतो, इतर सर्व देव त्याच्याभोवती जमा होतात.

याप्रमाणे मारिची देवी ब्रह्माचे मस्तक हाती मिरविते. त्रैलोक्यविजयदेव शंकर आणि गौरी यांचे छातीवर नाचतो. प्रसन्नतारा देवी इंद्र-उपेंद्राचे

चार आयुधाच्या अदलाबदलीच्या एकीकरणाने गणित शास्त्राप्रमाणे ४ × ३ × २ × १ = २४ प्रकार शास्त्रज्ञ ठरवू शकले. आयुधाचा क्रम निश्चित केल्यामुळे, उजवे खालचे हाती शंख म्हणजे केशव, तर उजवे खालचे हाती पद्म म्हणजे गोविंद याप्रमाणे आयुधावरून मूर्तीचे नाव निश्चित करता आले. लोकांना त्याचा आपोआप बोध होऊ लागला.

या विवरणावरून मूर्तिविज्ञान शास्त्राची महती समजून येईल. शिल्पकार अथवा चित्रकाराला या शास्त्राचे संपूर्ण ज्ञान पाहिजे आणि शास्त्राप्रमाणेच त्याने मूर्ति घडविल्या असतील, तर भक्ताला ती मूर्ति ओळखणे सुलभ होते असे दिसून येईल. भारतीय शिल्पकलेत या शास्त्राची उपयुक्तता कशी आहे, हे यावरून ध्यानी येईल.

## हिंदुदेवतांची बौद्धपंथीयांकडून विटंबना

वज्रयानीपंथाच्या धर्मप्रचारकानी हिंदुदेवताबाबत आपला दृष्टिकोन फारच विकृत स्वरूपाचा ठेवलेला होता असे दिसून येते. वज्रयानी ग्रंथकारांनी जे ग्रंथ लिहिले व मूर्तींना आकार दिले त्यावरून हे स्पष्ट होते. गौतमबुद्धाच्या वेळी मात्र ही स्थिति नसावी.

( १ ) काही बौद्ध शिल्पात हातात ब्रह्मशीर्ष घेतलेले असते. याचा अर्थ असा की, बौद्धपंथीय देव इतके सामर्थ्यवान आहेत की, ते हिंदुदेवाचा नाश करून, त्यांची मस्तके आपले हाती घेऊन मिरवतात.

( २ ) हरिहरीहरीवाहनोद्भव हा एक अवलोकितेश्वर बुद्धाचा अवतार आहे. त्याचे वाहन म्हणून विष्णुमूर्ति दाखविली आहे. हरि = सिंह; हरिवाहन = गरुड, त्यावर विष्णु आणि त्याच्या माथ्यावर अवलोकितेश्वर. सिंह व गरुड, याचे शिल्प त्यावर विष्णु, म्हणजे हिंदूंच्या विष्णुदेवाशिवाय इतर कोणतेही शिल्प नव्हे. ' सिंहगरुडविष्णुस्कंधस्थितमात्मानं ध्यात्वा । ' इ० इ०

( ३ ) चंद्ररोशन—अक्षोभ्य ध्यानी बुद्धापासून याची निर्मिति असून तो भयंकर क्रूर आहे. त्याचे जे छायाचित्र उपलब्ध आहे, त्यामध्ये डावे हाती छाती जवळ त्याने पाश धरिलेला आहे. विष्णु, ब्रह्मा, शिव यासारखे जे कोणी मानवजातीला त्रास देत असतील, त्यांना बांधण्यासाठी त्या पाशाचा उपयोग आहे. इतकेच नव्हे तर या बुद्धाने आपली तर्जनी वर केलेली असल्याने हे देव भीतीने घाबरून गेलेले आहेत.

' तर्जनीतर्जितव्याकुलानेह हरिहरहिरण्यगर्भादि
देवशृन्दारिबंधनाय इ० इ० '

विष्णु-शिव-ब्रह्मा-कंदर्प या दुष्टदेवतांच्या कालचक्रामध्ये जे जीव दुःखी होतात, त्याकडे चंद्ररोशन कृपेने पाहात आहे.

‘ हरिहरहिरण्यगर्भकन्दर्पादिभिः
भवचक्रे भ्राम्यतस्तान् पश्येत् । ’

( ४ ) मृत्युवंचना तारा देवीची उपासना केल्यास उपासक मृत्यूवर जय मिळवू शकतो आणि हिंदुदेवता ब्रह्मा-विष्णु-महेश, इंद्र, चंद्र, सूर्य त्या उपासकाच्या केसांची टोकेही नाश करू शकत नाहीत.

( ५ ) मारिची देवीचे ध्यानवर्णन करताना ‘ पुरन्दरं वन्दितं... अधो हरिहर-ब्रह्मादयो मर्दिता...वसुलोकपालाः वन्दनामाज्ञां च कुर्वन्तः स्थिताः’ म्हणजे इंद्र-ब्रह्मा-वसु-लोकपाल इ० देवता तिला वंदन करीत आहेत. काही तिच्या पायाखाली चिरडले जात आहेत, काही तिच्या आज्ञा सेवकाप्रमाणे पाळीत आहेत. याप्रमाणे ध्यान दिलेले आहे.

( ६ ) कुरुकुल्ला देवीचे उपासकाला ब्रह्मा, रुद्र, इंद्र, नारायण इ० हे आपण होऊन भेटतात आणि सेवकाप्रमाणे त्याची कामे पूर्ण करतात.

( ७ ) वज्रज्वालानलार्का—या देवीचे ध्यानामध्ये विष्णु व लक्ष्मीला तो पायाखाली तुडवीत आहे. ‘ सपत्नीकं विष्णुं आलीढपदेनाक्रम्यावस्थितम् ।’ इ० इ०

( ८ ) बोधीसत्वाचा अवतार भूतडामर याचे वर्णन करताना इंद्र, ब्रह्मा, कुबेर इ० देवतांचा गर्व हरण करणारा असे आहे.

( ९ ) उच्छुस्मजंभल—या धनदौलत देणाऱ्या देवाचे वर्णन करताना कुबेराचे पाठीवर पाय देऊन त्याला रत्ने ओकावयाला लावणारा देव असे वर्णन आहे.

(१०) हयग्रीवाची पूजा करताना भक्तासमोर फारच रम्य चित्र ठेवलेले आहे. हयग्रीव पूजनानंतर प्रसन्न झाला तर तो पूजक विद्याधराचे लोकात जातो आणि तेथे सर्व सुख अनुभवतो, देवेंद्र त्याचा रक्षक—चोपदार बनतो, ब्रह्मदेव प्रधान होतो, कार्तिकस्वामी त्याचा सेनापती होतो, विष्णु द्वाररक्षक होतो, शंकर सद्गुणावर प्रवचने करतो, इतर सर्व देव त्याच्यामोवती जमा होतात.

याप्रमाणे मारिची देवी ब्रह्माचे मस्तक हाती मिरविते. त्रैलोक्यविजयदेव शंकर आणि गौरी याचे छातीवर नाचतो. प्रसन्नतारा देवी इंद्र-उपेंद्राचे

शरीरावर नाचून रुद्र व ब्रह्मा यांना मध्ये दाबून टाकते परमाश्वदेव आपले चार पायाखाली इंद्राणी, लक्ष्मी, रति, प्रीति, मधुकर, वसंत इ० चिरडून टाकतो

वज्रयानीपंथीयांचा हा दुष्टपणाचा वारसा पुढे अनेक प्रचारकांनी व लेखकांनी चालविला आर्यदेवाने चित्तशोधन प्रकरणात जे उद्गार काढले, ते हा वारसा सिद्ध करण्यास पुरेसे आहेत

प्रतरन्नपि गंगायां नैव श्वा शुद्धिमर्हति ।
तस्माद्धर्मधियां पुंसां तीर्थस्नानं तु निष्फलम् ॥ इ० इ०

' एखाद्या कुत्र्याने गंगास्नान केले, तरी तो शुद्ध होत नाही, म्हणून तीर्थस्नान व्यर्थ आहे स्नान हाच जर गुण असेल तर पाण्यात सदैव वावरणारा कोळी जास्त पवित्र मानला पाहिजे तीर्थामध्ये स्नान केल्याने माणसाची पापे नाहीशी होत नाहीत कारण तसे जर असते तर तीर्थयात्रा व स्नान करणारी माणसे रागीट, दुष्ट स्वभावाची आणि दुर्गुणी आढळणार नाहीत '
( साधनमाला—भट्टाचार्य २/CXXX to CXXXIV )

बौद्धपंथीयांवर सनातनधर्मप्रचारक आद्य शंकराचार्य यांचा एवढा राग का होता हे वरील विवरणाने ध्यानी येईल तसेच हिंदुदेवतांचे द्वेषावर उभारणी झालेला हा पंथ पुढे ब्राह्मणकालात आपोआप मरणोन्मुख का झाला याचे अधिक विवरण करण्याची गरज नाही करावे तसे भरावे

सनातनवैदिकधर्म हा सहिष्णु व वर्धिष्णु आहे, याचे प्रत्यंतर या ठिकाणीही येते वज्रयानीपंथीयांनी जरी ब्राह्मणदेवतांची एवढी विटंबना मूर्तिकलेत केली, तरी वेदप्रामाण्य न मानणारा हा पंथ शेवटी चव्हाटी भारतामधून लयास गेला आणि त्या पंथातील काही देवता तारा, छिन्नमस्ता, मातंगी, डाकिनी इ० आत्मसात करून, बुद्ध हा विष्णूचा नववा अवतार मानून चैत्र व श्रावण महिन्यात बुद्धाचे पूजन करून त्याची सुवर्णप्रतिमा ब्राह्मणाला दान करावी असा धर्मनियम करून, इतकेच नव्हे तर कामाक्षी मंदिराप्रमाणे बुद्धाच्या मठाचे रूपांतर करून आणि सर्वावर कडी म्हणजे कामाक्षी मंदिरातील लोकनाथ मूर्ति, हीच आद्य शंकराचार्यांची मूर्ति होय असे मानून, या पंथाचे ब्राह्मणधर्माने पूर्ण उच्चाटन केले तसेच तेराव्या शतकाच्या शेवटी महायानपंथाची तत्त्वे आत्मसात करून शक्तिपंथाने आघाडी मारली व सर्व तांत्रिक मार्ग आत्मसात केला वराह, गरुड, मत्स्य, लिंग पुराणांनी बुद्ध हा विष्णूचा अवतार होय असे प्रतिपादन सुरू केले आणि त्या पंथाचे जीवन भारत देशातून संपुष्टात आणले

ब्राह्मणदेवतांमधील भगवान शंकर हे एक प्रमुख देव असून दक्षिणेश्वर

काली मूर्तीचे शिल्पात, ते काली देवीचे पायाखाली पहुडलेले दाखविले आहेत. पण या गूढशिल्पाचे जाणकारांनी विवरण केले असल्याने, त्यामध्ये सर्वसाधारणपणे काही वावगे भासत नाही. तसेच अद्‌भुत रामायणातील सीतादेवी ( ललिता पंचमी, व्रतदेवता पहा ) जेव्हा सहस्रमुख रावणाच्या वधाने धुंद होऊन बेफाम नृत्याने पृथ्वी दोलायमान होते व ज्या वेळी सर्व देवांच्या इच्छेनुसार, भगवान शंकर शव-रूपाने तिच्या पदतळी पडतात, त्या वेळी सीतादेवीचे तांडव शांत झाले आणि भूदेवीचे आंदोलनही थंड झाले असे वर्णन आढळते. तद्वतच बौद्ध शिल्पकारांनी अथवा आचार्यांनी, याप्रमाणे मूर्ति घडविताना समाधानकारक कारणे व उद्दिष्ट देणे उचित झाले असते. मूळ उद्दिष्टाच्या स्पष्टीकरणाचे अभावी इतरांना शंका घेण्यास जागा राहून गेली आहे. असा खुलासा कोठे आला नाही आणि अनेकांना विनंती केली असता तो कोणी करू शकलेच नाही. असो.

एका धर्मातून फुटून निघालेले पंथ स्वतत्त्वाभिनिवेशाने मूळ पंथावर तुटून पडतात, त्याची निंदा-नालस्ती करतात आणि आपलाच पंथ श्रेष्ठ दाखविण्याचा प्रयत्न करतात हे सर्वश्रुत आहे. इंग्लंडमध्ये रोमन कॅथोलिक प्रथम आले. त्यांतून प्रॉटेस्टंट पंथ निघाला. त्यातून क्रमाने प्रेझबिटेरियन-प्युरिटन, इंग्लिश चर्च हे पंथ निघून त्यांनी आपसात भरपूर लाथाळी केलेली आढळते. तसेच इस्लामधर्मात सुनी, शिया, सुफी इ० अनेक उपपंथ उत्पन्न झाले असून, त्यांच्यामध्ये अंतर्गत वैमनस्य आढळते. तेव्हा बौद्धपंथीयांनी ब्राह्मणदेवतांची मूर्तिकलेत याप्रमाणे विटंबना केली यात वैषम्य वाटण्यासारखे काही नाही.

वर म्हटल्याप्रमाणे भारतीय धार्मिकसांप्रदाय, संस्कृति व तत्त्वज्ञान या सर्वांतच समन्वयात्मक वृत्तीचे अद्‌भुत दर्शन घडत असल्याने प्रथमतः विशिष्ट तत्त्वज्ञानाचे पायावर उभारलेले वेगवेगळे संप्रदाय एकमेकांशी वादविवाद करून थकले, म्हणजे कालांतराने त्यांच्यातील कटुता कमी होऊन ते ऐकमकां-जवळ येऊ लागतात. एकमेकांच्या कल्पना व तत्त्वे आत्मसात करतात आणि एकजीव होतात आणि सनातनी धर्माचे अखंड निशाण फडकते ठेवून, सनातन-धर्माचे श्रेष्ठत्व कायम ठेवतात.

अपराजिता—अष्टभुजा कुरुकुल्ला देवीच्या वर्णनात या देवतेचे नाव आलेले असून तेथे ती रत्नसंभव कुळातील दाखविलेली आहे. परंतु येथील वर्णन अधिक स्पष्ट करणारे आहे. बौद्धपंथियांतील ही फार महत्त्वाची देवता आहे. साधनेमधील वर्णनाप्रमाणे ती पीतवर्णा, एकमुखी, द्विभुजा, सुवर्णालंकारधारिणी आणि हिंदुदेवता गणेश याला पायाखाली तुडविणारी, उजवा हात एखाद्याला चापट मारण्याच्या अवस्थेत, तर डावा हात छातीजवळ पाश घेतलेला पण तर्जनी

मुद्रेत, चेहरा उग्र व भयंकर आणि माराचा[1] ( ब्रह्मा विष्णु शंकर ) नाश करणारी व ब्रह्मदेव मागील बाजूस चोपदाराप्रमाणे हाती दंड घेऊन उभा असलेला, असे शिल्प आहे. ' अशेषमारनिर्दलिनी ' इ० इ०.

साधनेमध्ये ' गणपतिसमाक्रान्ता ' हे शब्द असल्याने, ती गणपतीला पायाखाली तुडविते यात संशय रहात नाही. तसेच नालंदा आणि इंडियन म्युझियममध्ये ( कलकत्ता ) ज्या मूर्ति आहेत, त्यांचे शिल्प याबरहुकूमच आहे. नालंदा येथील मूर्ति वरील भागी भंगलेली असल्याने वरील भागी ब्रह्मा अगर इतर शिल्प दिसत नाही. पण नेपाळमधील चित्रकाराकडून जे चित्र उपलब्ध आहे, त्यामध्ये साधनेतील वर्णनाप्रमाणे सर्व काही मिळते. साराश, हिंदु देवतांची विटंबना येथे पूर्ण दिसून येते.

भारतीय हिंदु दसऱ्याच्या दिवशी शमीवृक्षाच्या पूजनाच्या वेळी शमी देवतेचे पूजन करीत असतात.

उष्णीषविजया— इंडियन म्युझियममध्ये जी देवीची मूर्ति आहे, तिचे वर्णन असे की, वज्रपर्यंकावर बसलेली, त्रिमुखी, अष्टभुजा, मधला मुकुट इतर दोनापेक्षा उंच व नक्षीदार आहे. उजवीकडे हातात बाण, वज्र, वरद, कमळ आणि त्यावर बुद्धमूर्ति, डावीकडे धनुष्य, पाश, अभयमुद्रा व पानपात्र अशी आयुधे आहेत उजवे मुख शुभ्रवर्णी, डावीकडे पीतवर्णी आणि समोर नीलवर्णी आहे मस्तकावरील प्रभावळीत ध्यानी बुद्ध अक्षोभ्य मूर्ति आहे.

कमळावर बुद्धाची मूर्ति असणे हे या देवीचे वैशिष्ट्य असल्याने ओळखण्यास त्रास पडत नाही. या देवीच्या ध्यानसाधनेत वरील भाग वैरोचन असावयास पाहिजे, पण येथे ध्यानी बुद्ध अक्षोभ्य आहे.

( साधनमाला, २।१३८ )

एकजटा— वज्रयानी बौद्धपंथीयांची एक सामर्थ्यशाली देवता आहे. ही एकमुखी, नीलवर्णी, द्विभुज अथवा अष्टभुजा, परंतु काही वेळा बारा मुखे आणि २४ भुजाही असतात. शवावर बसलेली, नागांनी अलंकृत, पिंगल जटा, डावे हाती कमळ व भोजनपात्र, उजवे हाती उत्पल, खड्ग, वज्र इ० आयुधे

---

१ टीप—या पंथामध्ये मार याचा अर्थ हिंदुदेवता ब्रह्मा विष्णु महेश-इंद्र असा केला जातो. पण जैन पंथामध्ये याचा अर्थ एका तिर्थीचा देव असा अथवा मदन या अर्थी वापरला जातो त्याचा विग्रह शोधविताना मा = लक्ष्मी आणि र = देणारा, म्हणजे लक्ष्मीप्रदान करणारा असा केला जातो

धारण करणारी, नवयौवना, मस्तकावर अक्षोभ्य, मुकुट धारण करणारी, उग्र व भयानक स्वरूपाची आहे. वाघाचे कातडे पांघरणारी, त्रिनेत्री, गळ्यात रुंडमाळा असते.

या देवतेचा मंत्र 'ॐ नमो भगवति एकजटे मम वज्रपुष्पं प्रतीच्छ स्वाहा' असा असून, तो अतिशय तेजस्वी, सुश्राव्य आणि सामर्थ्यशाली आहे. या मंत्राच्या नुसत्या श्रवणानेही माणसाची सर्व पापे आणि विघ्ने दूर होतात अशी भक्ताची श्रद्धा आणि त्यांचा प्रत्यक्ष अनुभव आहे. तसेच शत्रूचा नाश होऊन धार्मिकवृत्ति बळावते. इंडिअन म्युझिअममध्येही अशी मूर्ति आहे.

जेव्हा द्विभुजा असते, तेव्हा कात्री व कपाल हाती असतात. जेव्हा चतुर्भुजा असते, तेव्हा धनुष्य, तरवार, बाण व कपाल धारण करते. जेव्हा अष्टभुजा असते तेव्हा तरवार, बाण, वज्र, कात्री, धनुष्य, उत्पल, परशु व कपाल हीं आयुधे असतात. (साधनमाला १।२५४)

कल्याण-सुंदर— शिव-पार्वती वैवाहिक संबंधातील हे शिल्प असून सप्तपदीच्या वेळी पाणीग्रहण करत्या वेळचे आहे. दक्षिणप्रांती या मूर्ति जास्त प्रचारात असून याचे शिल्प कसे असावे, याची माहिती टी. ए. गोपीनाथराव यांच्या 'हिंदु-मूर्तिकला' या ग्रंथात आढळते. डाका येथील साहित्य परिषदेच्या संग्रही जी मूर्ति आहे, त्यामध्ये पार्वती शंकराच्या डाव्या बाजूला उभी असून आपला हात पाणीग्रहणासाठी शिवाच्या हाती दिलेला आहे. या मूर्तींची अनेक प्रकारची शिल्पे आहेत व प्रांतप्रमाणे त्यामध्ये भेदही आढळतो. परंतु मूळ कल्पना एका शिल्पाच्या आधारे मांडलेली आहे.

उमा-आलिंगन मूर्तीच्या शिल्पात शंकर आसनावर बसलेले असून, त्याचा उजवा पाय खाली लोंबता, पण काही वेळा कमळ अगर नंदीच्या पाठीवर आधारित असतो. त्याची पत्नी उमा डाव्या मांडीवर बसलेली, डावा पाय खाली लोंबता, कमळ अगर तिचे वाहन सिंह यांच्या पाठीवर असतो. दोघे एकमेकाना आलिंगन देत असल्याने शिल्पाला उमा-आलिंगन अथवा आलिंगन-मूर्ति म्हणतात. अर्धनारीनटेश्वर हे याच प्रकरणातील तिसरे शिल्प होय.

कुरुकुल्ला—तांत्रिक मार्गातील ही एक प्रमुख देवता आहे. या देवतेची उत्पत्ति ध्यानी बुद्ध अमिताभ यापासून झालेली आहे. साधनमाला (भाग २) या ग्रंथात देवतेसंबंधी १४ साधना दिलेल्या असून पृ. ३४४ ते ३९४ म्हणजे ५० पाने खर्ची पडलेली आहेत. तेव्हा ही सर्व साधना येथे स्थळाभावी देणे अशक्य आहे.

ही देवता एकमुखी असून द्विभुजा, चतुर्भुजा, षड्भुजा अथवा अष्टभुजा असते. ज्या वेळी तिला दोन भुजा असतात, तेव्हा तिला शुक्ल कुरुकुल्ला, शुभ्रवर्णा वज्रपर्यंकआसना, हातात माळा, अमृत भरलेला कमळाचा प्याला, त्रिनेत्रा, मस्तकावर अमितभ बुद्धाची मूर्ति असलेला मुकुट, प्राण्यावर बसलेली, अंगावर उत्तम वस्त्रालंकार असलेली, केशकलाप अनत नागाने गुंफलेला, गळ्यामध्ये पाढऱ्या रंगाचा वासुकी नागाचा हार, कानातील कुंडले रक्तवर्णी तक्षक सर्पाची, गळ्यातील जानवे हिरव्या रंगाच्या कर्कोटक नागाचे, कमरेभोवती मदन नागाचा कमरपट्टा, पायातील नुपुरे म्हणजे महापद्म नागाचे वेटोळे, दंडावरील दागिना म्हणजे शंखपाल नाग, चेहरा हसतमुख आणि हृदय दयेने भरलेलें असे असते व शृंगारभाव व्यक्त करते.

तारोद्भवकुरुकुल्ला—रक्तवर्णा, चतुर्भुजा, अभयमुद्रा, बाण, धनुष्य व कमळ ही आयुधे, वज्रपर्यंकासना, मुकुटामध्ये अमितभ बुद्धाची मूर्ति, सदा हसतमुख असते. कुरुकुल्ला पर्वतावर वस्ती करून असते. राहु आणि कामदेव यांच्या मस्तकावर आरूढ असते.

ओरियान कुरुकुल्ला—उग्र चेहरा, रक्तवर्णा, अर्धपर्यंकासना, प्रेतवाहना, गळ्यात नरमुंडाची माळ, मस्तकावर पांच मुंडकी, जीभ व दात बाहेर आलेले वाघाचे कातडे पांघरलेली, मस्तकावरील केस ज्वाळाप्रमाणे उभे असलेले, त्रिनेत्रा, चतुर्भुजा, दोन हात फुलाचे धनुष्य ओढण्यात गुंतलेले, तर दुसरे दोन फुलाचा गुच्छ व रक्तकमळ धरण्यात गुंतलेले आहेत.

अष्टभुजा कुरुकुल्ला—रक्तवर्णा, अष्टभुजा, वज्रपर्यंकासना, त्रैलोक्यविजयमुद्रा धारण करणारी, अंकुश, बाण, वरदमुद्रा, पाश, धनुष्य व उत्पल ही आयुधे. उजवे बाजूला प्रसन्नतारा, डावीकडे जयतारा, खाली निष्पन्नतारा आणि वरती कर्णतारा असून चार उपदिशाना चुंदा, अपराजिता, प्रदीपतारा व गौरीतारा या देवता आहेत. माथ्यावर पाचही ध्यानी बुद्धाच्या आकृति आहेत.

पूर्वेकडील दरवाजारक्षक म्हणून वज्रवेताली देवी, दक्षिणेकडे अपराजिता, पश्चिमेकडे एकजटा व उत्तरेकडे वज्रगांधारी देवता आहेत. साधनमाला ग्रंथात या देवतेचे ध्यान व इतर मंत्र पहावयास सापडतील.

( भारतीय बौद्ध मूर्तिकला, भट्टाचार्य, पृष्ठ ५८ ).

कुरुकुल्ला भट्टारिका, स्वाधिष्ठान कुरुकुल्ला असे प्रकार आहेत. या देवीचे हातातील आयुधे, अनेक सेवेकरी, वाहन इ० पाहिले म्हणजे हे दुर्गादेवीचेच एक स्वरूप असावे, असे वाटते. वशीकरणासाठी या देवीचा मंत्र ' ॐ कुरुल्ले हुं न्हीं स्वाहा ' याचे पठण करतात.

**खादिरवनी तारा**—कमलासनावर वज्रपर्यंक आसनाने बसलेली असून सर्वांगावर अलंकार असून, मस्तकीचा मुकुट खास कलाकुसरीचा आहे. सुंदरतेची लक्षणे म्हणजे बारिक कंबर, खोल नाभी आणि उन्नत वक्षःस्थल या ठिकाणी दिसते. उजवा हात वरदमुद्रा, पण हातात रत्न घेतलेले असल्याने या मुद्रेला 'रत्नसंयुक्तवरदमुद्रा' असे नाव आहे. डाव्या हाती उत्पल म्हणजे कमळ असून, उजवीकडे कमळाचे शिल्प, बाजू सारख्या दिसण्यासाठी दाखविलेले आहे. मुख्य मूर्तीच्या उजव्या बाजूस एका स्त्रीचे शिल्प, असून तिच्या हाती वज्र व अशोकपर्ण आहे. डावेकडील स्त्रीमूर्तीच्या हाती कात्री आणि कपाल असून, स्वरूप फारच भीतिदायक आहे. माथ्यावर पाच ध्यानी बुद्धाचे शिल्प असून, अमोघसिद्धि, वंशावळीचा देव मध्यभागी आहे. देवतेचा वर्ण हरित, साधनमालेतील वर्णनाप्रमाणे असावयास पाहिजे. दोन्ही बाजूंनी स्त्रीस्वरूपे त्यांच्या आयुधाच्या वर्णनाप्रमाणे अशोककांता, मारिची आणि एकजटा असावयास पाहिजेत. इंडियन म्युझिअम–कलकत्ता आणि डाका म्युझिअम येथे या देवतेच्या मूर्ति आहेत.

(साधनमाला, २।१४४).

**चुंदादेवी**—एक बौद्ध संप्रदायी देवता. हिला चंडा, चंद्रा असेही म्हणतात. ही वैरोचनाची कन्या होय. साधनमालेतील या देवीचे वर्णन असे की, चतुर्भुजा, एक हात वरदमुद्रा, दुसरा पुस्तकयुक्त कमळ धारण करणारा, दुसऱ्या दोन हातीं पात्रे, शरदकालीन चंद्राप्रमाणे कांति, सर्वालंकारी युक्त स्वरूप असते. काही ठिकाणी ही सोळा भुजांची असते, तर एके ठिकाणी ती २६ भुजांची दाखविलेली आहे. (भा. सं. कों., ३।४३३)

**जांगुली**— सर्पाचे विष हरण करणारी म्हणून ही देवता प्रसिद्ध आहे. तसेच सर्पदंश झाला असता, या देवतेच्या पूजनाने विषाचे निर्मूलन होते. या देवीच्या चार साधना दिलेल्या आहेत.

शुभ्रवर्णा, चतुर्भुजा, दोन हाती वीणा, सर्प, अभय व चक्र ही आयुधे. एकमुखी, मुकुट धारण करणारी, गळ्याभोवती शुभ्रवर्णा गळपट्टा असलेली अशी मूर्ति असते. काही वेळा या देवीला आर्य जांगुली असेही म्हणतात.

दुसऱ्या साधनेप्रमाणे ती त्रिमुखी, पीतवर्णा, सहा भुजामध्ये तरवार, वज्र, बाण, पाश, नील कमल ही आयुधे, सर्पाच्या फण्यावर विश्रांती घेत असलेली असे स्वरूप असावे.

मनसा अथवा विषहारी या देवीबरोबर, या देवीचे बरेचसे साम्य आहे आणि त्या दोघींना उपयोगही एकच आहे.

या देवतेचा मन्त्रोच्चार केला असता सर्पांचे विष उतरते

तारा

शवासीना कण्ठाकलितनृकरोटीपरिलसत् ।
कपालासिश्यामोत्पलरुचिरकर्त्रीं त्रिनयनाम् ॥
नवाम्भोदश्यामा प्रकटरदभीमा पृथुकुचा ।
सदैव त्वा ध्यायन् जननि च जडो वाग्पतिसम ॥

महाकालकृत कर्पूरतारिणीस्तोत्रात तारादेवीचे ध्यान वरीलप्रमाणे वर्णन केलेले आहे ही देवता प्रेतावर बसलेली, गळ्यात नररुंडाची माला घातलेली, चार भुजामध्ये कपाल, खड्ग, नील कमल आणि सुंदर कात्री धारण केलेली, तीन नेत्राची, नवीन मेघाप्रमाणे श्यामवर्ण असलेली, मोठे स्तन असणारी आणि बाहेर आलेल्या दातामुळे भयंकर दिसणाऱ्या तारादेवीचे ध्यान करणारा मनुष्य अतिशय मतिमंद असला तरी बृहस्पतीप्रमाणे वक्ता होईल केव्हा केव्हा या देवीचे मस्तकावर मुकुटाच्या जागी पाच मुंडाची माला असते आणि ती मुंडे पंचब्रह्म, पंचप्रेत व पंचरुद्र यांची प्रतीके मानलेली आहेत

अमिताभ या ध्यानी बुद्धाच्या नेत्रातून जो निळा किरण निघाला त्यातून या देवतेची उत्पत्ति झाली असे मानतात इतरही अनेक उत्पत्तीच्या कथा आहेत पाच रंगाच्या पाच तारा देवता, या पाच ध्यानी बुद्धाच्या शक्ति मानलेल्या आहेत यांची संख्या एकूण १०८ मानतात तिबेट प्रदेशात या देवतेचे माहात्म्य विशेष मानतात इतकेच नव्हे तर या देवतेची मूळ कल्पनाही तिबेटीच आहे तेथून ती बौद्ध व हिंदु तन्त्रात समाविष्ट झाली त्या प्रदेशी या सर्व देवतांचा समूह झालेला आहे साधारणत ही देवता बसलेल्या स्थितीत चितारतात पण जेव्हा ती अवलोकितेश्वराबरोबर असते, तेव्हा मात्र ती उभी असते

पाच रंगाच्या तारेचे अनेक प्रकार आहेत खदिरवनी, वश्यतारा, आर्य तारा, महत्तरी, वरद, दुर्गोत्तारिणी, धनद, जागुली, व पर्णेश्वरी हे हरित तारेचे प्रकार आहेत अष्टमहाभया, मृत्युवंचना चतुर्भुजा, षड्भुजा, विश्वमाता, कुरुकुल्ला व जागुली हे गौर तारेचे प्रकार होत वज्र, जागुली, पर्णशबरी भृकुटी व प्रसन्नतारा हे पीत तारेचे प्रकार होत एकजटा व महाचीन हे नील तारेचे प्रकार होत कुरुकुल्ला ही रक्तताराही आहे तारा हाताची मुद्रा वरद दाखविते आणि डावे हाती कमल धारण करते रक्तवर्णा तारा प्रकारात कुरुकुल्ला ही एकटीच देवता आहे

महाप्रत्यगिराधारिणी या ग्रंथात तारेचा प्रथम उल्लेख येतो या ठिकाणी तिचे वर्णन श्वेतवर्णा, उदात्तमुखी, वज्रमालाधरा व वज्रहस्ता असे दिलेले आहे तन्त्रसाहित्यात तारा ही पूजेतील अग्रदेवता मानली आहे मंजुश्रीमूलकल्प ग्रंथात व्याधिग्रस्त लोकांनी आपल्या व्याधींचा परिहार व्हावा, म्हणून प्रामुख्याने या देवीचे पूजन सांगितले आहे भृकुटी, लोचना, मामिका, श्वेता, पादरवासिनी व सुतारा अशी निरनिराळी नावे त्यामध्ये दिलेली असून महामुद्रा म्हणून त्याचे वर्णन केलेले आहे ती करुणामयी असून सर्व प्राण्यांच्या दुःखाचा परिहार करणारी आहे ती संसारसागर तरून जाण्याला मदत करणारी आहे प्रज्ञा किंवा प्रज्ञापारमिता या नावाने संबोधून तिला सर्व बुद्धांच्या मातृपदी बसविण्यात आले आहे अवलोकितेश्वराची ती सहचरी मानली गेली आहे

साधारणतः सहाव्या शतकात या देवतेचा बौद्ध धर्मात प्रवेश झाला असून बाराव्या शतकापर्यंत तिची लोकप्रियता सारखी वाढत गेली अनेक मंदिरे निर्माण झाली किंबहुना उत्तर भारतात त्या काळी तारेची मूर्ति नाही असे घरही नसावे इतका बौद्धांचा प्रभाव त्या वेळी जनसमुदायावर होता

या देवतेचे काही मंत्र आहेत— (१) ॐ तारे तुतारे तुरे स्वाहा, (२) ह्रीं स्त्रीं हुँ फट्, (३) श्रीं ह्रीं स्त्रीं हुँ फट् इ० इ० विशेषतः संपत्ती, पांडित्य, कीर्ति व पुत्रपौत्र यांच्या प्राप्तीसाठी साधक या मंत्रांची साधना करतात

स्मशान, ओसाड घर या ठिकाणी प्रेतावर बसून मंत्राचा जप करून दशांश संख्येने दुधा तुपात भिजविलेल्या रक्त कमलांचे हवन करतात नंतर स्त्रीचे पूजन करून, चन्द्रग्रहणावर बलिदान केल्यावर मंत्रसिद्ध होतो साधकांची अशी भावना आहे की, मूल जन्मल्यावर दोन दिवसांत, सुवर्णाचे शलाकेने त्याच्या जिभेवर हा सिद्ध मंत्र लिहिला असता, आठव्या वर्षाच ते मूल गाढा पण्डित होतो तारायंत्रही तयार करून शरीरावर धारण केले जाते

(भा स को, ४–८९)

तारायोगिनी नावाचा एक तांत्रिक देवतांचा समूह असून त्यामध्ये पुढील देवता येतात— महानंदी, रुद्राणी, भया, भीमा, घोरा, भ्रमरी, महारात्री, सप्तमी, अष्टमी आणि भैरवी

प्रा फौचर याने संशोधन करून अनेक तारा देवतांचे वर्गीकरण केलेले आहे वास्तविक ज्या तारा देवतेला ‘ ॐ तारे तुतारे तुरे स्वाहा ’ हा मंत्र सांगितला आहे, तीच खरी देवता होय एका हाती उत्पल कमल आणि दुसरी वरद मुद्रा दर्शविणारी एकूण सात स्वरूपे आहेत, पण यापैकी फक्त दोन देवतांच्या

मस्तकी वद्दाकुळ दाखविणाऱ्या अमोघसिद्धि ध्यानी बुद्धाच्या मूर्ति आहेत. त्यामुळे इतराचे वर्गीकरण करणे कठीण जाते. जरे, त्याच्या रगावरून ते करावे, तर पाषाणमूर्तामध्ये रग समजणेही कठीणच. तेव्हा मूर्ति ओळखण्यासाठी मूर्ताचे शिल्प आणि आजूबाजूच्या मूर्ति याचे सहाय्य घेऊन, विचाराती निर्णय ठरवावा लागतो. ' साधनमाला ' ग्रथामध्ये अनेक ध्याने व साधना वर्णन केलेल्या आहेत.

( स्वामीबाग, दयागज, डाक्का शहरी अशी सुदर मूर्ति आहे. )

चीनमध्ये तारा आणि कुवान-यीन या देवता समसमान मानतात, त्यामध्ये फरक इतकाच करतात की, तारा ही अवलोकितेश्वर बुद्धाच्या सान्निध्यात असते, तर कुवान यीन ही अवलोकितेश्वराचाच शक्तीचा अवतार होय. कारण अवलोकितेश्वर हा देव वाटेल ती स्वरूपे घेण्यास समर्थ आहे. जपानमध्येही ही देवता फार प्रसिद्ध आहे याचे कारण असे दिले जाते की, अवलोकितेश्वराचा मत्र ' ॐ मणि पद्मे हूम् ' असा असून, या मत्राने त्याच्या शक्तीला आवाहन केल्यावर, त्याला स्त्रीरूप प्राप्त झालेले असावे. कुवान यीन ही चीनमध्ये स्त्रीदेवता असली तरी त्याच्या शेजारच्या कोरिया देशात प्रथम ते पुरुष मानतात, आणि कालांतराने त्याला स्त्रीरूप प्राप्त झालेले असावे.

( Hinduism and Buddhism by Elliot, Vol II, P 17 ).

*तीक्ष्णकांता*—या देवीला उग्रतारा असेही म्हणतात. गौहाटी शहरी या देवतेचे मदिर असून, उग्रतारा या नावानेच उपासना होते. पूर्वी आसामप्राती या देवतेचे प्राबल्य फार होते. ही देवी चतुर्भुज असून उजव्या दोन्ही हाती खड्ग व चामर आणि डाव्या दोन्ही हाती कात्री आणि खापर ही आयुधे असतात. जटा लाब असून वक्ष स्थलावर नागाचा हार रुळत आहे. ताम्र नेत्र असून तिने कृष्णवस्त्र व व्याघ्राजिन परिधान केलेले आहे. डावा पाय प्रेताच्या छातीवर असून, उजवा सिंहाच्या पाठीवर आहे. हे वर्णन कालिकापुराणात आढळते.

एके काळी ही सौम्य वर्गातील देवता होती, परतु वसिष्ठ ऋषींच्या शापाने ती उग्र बनली. यासाठीच नवरात्र उत्सवात तिला रेडे, बकरी बळी देण्याची रूढि प्रचारात आली.

काही वेळा या देवीला मगलचंडीचेही रूप मानतात.

( पी. के. गोडे स्मृतिग्रथ )

*त्वरिता*—एक तात्रिक देवता. या देवतेचे स्वरूप वर्णन करताना, मस्तकावर मोराची पिसे व मोरपिसांचेच छत्र असते. तिच्या गळ्यात गुजांची माळ असून, एक हात अभयमुद्रा दाखवितो.

ब्रह्मांडपुराणामध्ये 'अक्षरादेवी' म्हणून तिचा उल्लेख आहे. भंड-राक्षसाचा सेनापती पुंड्रकेतू याला या देवीने ठार केले अशी कथा आहे.

(४–१९–५८) (श्रीविद्यार्णवतंत्र)

त्वरिता हे तुळजाभवानी देवीचेही एक नाव आहे.

त्रैलोक्यमोहना—तान्त्रिकांची एक शक्तिदेवता. श्रीविद्यार्णव तंत्राप्रमाणे या देवीचे वर्णन असे—अष्टदल कमलावर विराजमान असून, षड्भुजा आहे. डावीकडील वरच्या हातापासून क्रमाने पाश, अंकुश, कल्पवल्ली, कपाल आणि वीणा ही आयुधे असतात. नृसिंहाने निर्माण केलेली त्रैलोक्यमोहिनी या नावाची एक देवता मत्स्यपुराणात सांगितली आहे.

त्रैलोक्यस्तंभिनी—या नावाचीही एक शक्तिदेवता आहे. ती सुवर्ण सिंहासनावर बसलेली, पीत वस्त्र परिधान करणारी असून चतुर्भुजा आहे. तिच्या हाती मुद्गर, पाश, वज्र आणि जिव्हा ही आयुधे आहेत.

या शक्तिदेवतेव्यतिरिक्त, त्रैलोक्यशंकर, त्रैलोक्यविजय, त्रैलोक्यसंमोहन, त्रैलोक्यगणेश असेही तांत्रिकांचे देव आहेत.

त्रिपुरसुंदरी—एक तांत्रिक देवता. या देवीचे नावावर एक पंथ आहे, त्याची दीक्षा घेतल्यानंतरच देवतेची उपासना करता येते. ही उपासना तीन प्रकारांनी करता येते. पहिला प्रकार असा की, ही देवता महापद्मवनात शिवाच्या मांडीवर बसलेली असे कल्पून ध्यान, पूजन करणे. दुसऱ्या प्रकारात श्रीचक्राचे रूपाने पूजन करणे. तिसरा प्रकार म्हणजे पंथाच्या तत्त्वज्ञानाचा अभ्यास करून भाव याग साधणे. या देवीची तीन वेगवेगळी रूपे आहेत.

(१) चतुर्भुज, त्रिनेत्र, शेंदराप्रमाणे लालवर्ण, वरचे डावे हाती पुष्प-धनुष्य आणि खालचे हाती पुस्तक, उजवे वरचे हाती पंचबाण व खालचे हाती अक्षमाला, जटाजूट धारण केला असून त्यामध्ये अर्धचंद्र आहे, चार प्रेतावर ठेवलेल्या एका प्रेतावर दोन्ही पाय सोडून ती बसलेली असून, त्रिवस्त्र आणि उदर भागावर तीन वळ्या पडलेल्या आहेत. सर्वालंकार युक्त असल्याने सुंदर दिसते आहे.

(२) आद्यशंकराचार्य हे या देवीचे भक्त असून त्यांनी केलेले त्रिपुरा-सुंदरी स्तोत्रात खालील वर्णन आढळते.

'कदंबपुष्प प्रिय असल्याने कदंबवनात वास करणारी, सुवर्णाच्या श्रीचक्रा-रूप मंडलावर विराजमान झालेल्या, षट्कमलामध्ये (देहातील मूलाधारासह

सहा चक्रे) वास्तव्य करणाऱ्या, सिद्धांच्या अंतःकरणांत सतत विद्युल्लतेप्रमाणे प्रकाश देणाऱ्या, जास्वंदीचे फुलाप्रमाणे अंगकांति असलेल्या, उज्ज्वल चंद्र मस्तकी धारण करणाऱ्या, अशा या शिवपत्नी त्रिपुरसुंदरीच्या चरणाचा मी आश्रय करतो.'

'इंद्रपत्नी शची ही दासीप्रमाणे वेणी घालीत आहे, ब्राह्मणी अंगाला चंदनाची उटी लावीत आहे, लक्ष्मी अंगावर तेजस्वी अलंकार घालीत आहे, आणि इतर देवस्त्रिया जिचे दास्य करीत आहेत, अशा देवतेचे मी पूजन करतो.'

(३) अल्मोडा शहरांत या देवीचे मंदिर आहे. या देवीने अर्जुनाला धनुर्विद्या शिकविली अशी कथा आहे. (सुबोध स्तोत्रसंग्रह, भाग २, गोस्वामीकृत)

राजपुतान्यामध्ये वासवडा या पूर्वीच्या संस्थानच्या शहरी या देवतेचे मंदिर असून मूर्ति काळ्या पाषाणाची चतुर्भुज आहे, असे थोरात नावाच्या प्रवाश्याने सांगितले.

त्रिपुरभैरवी— एक तांत्रिक देवता. धर्म, अर्थ व काम या तीन पुरुषार्थांची प्राप्ति करून देणारी अशी हिची ख्याती आहे. ही देवता शिवलिंगाचा भेद करून उत्पन्न झाली. कालिका पुराणांत या देवीचे ध्यान वर्णन—

चतुर्भुजां रक्तवर्णां रक्तवस्त्रविभूषिताम् ।
दक्षिणोर्ध्वे स्रजं चाधो बिभ्रतीं पुस्तकोत्तमम् ॥
अभयं वामहस्ताभ्यां वरं च दधतीं तथा ।
सहस्रसूर्यसंकाशां त्रिनेत्रां गजगामिनीम् ॥ इ० इ०

भावार्थ असा की, ही देवता चतुर्भुज, तांबड्या वर्णाची, तांबडे वस्त्र परिधान केलेली, उजवे वरचे हाती माला आणि खालचे हाती पुस्तक असणारी, डाव्या दोन हातांनी अभय व वरद असणारी, सहस्रसूर्यांप्रमाणे तेजस्वी, त्रिनेत्रा, गजगामिनी, पुष्ट व उत्तुंग स्तन असणारी, शुभ्र प्रेतासनावर आरूढ झालेली, हसण्यासाठी मुख उघडलेली, सर्वालंकारांनी नटलेली, शिर, वक्षःस्थळ आणि कटिभाग यांवर मुंडाच्या तीन माळा धारण करणारी, नेत्र मदिरापानाने धुंद व ओठ लाल झालेली अशा या भक्तवरदायिनीची स्तुती करावी.

श्रीविद्यार्णवतंत्रांत या देवीचे वर्णन अर्धचंद्र व ब्रह्मा-विष्णु महेशाच्या मुंडाची माला धारण करणारी असे आहे.

दिक्पालिका— दिशांचे रक्षण करणाऱ्या बौद्ध देवता असून यांची संख्या सहा आहे. साधनमाला ग्रंथांत यांचे वर्णन मिळते.

वज्रांकुशी—शुभ्र वर्णाची, एकमुखी, द्विभुजा व डाव्या हातात शुभ्र वर्णाचा अंकुश धारण करणारी, पूर्व दिशेची देवता.

वज्रपाशी—पिवळ्या वर्णाची, एकमुखी, द्विभुजा, डावे हाती पाश धारण करणारी, दक्षिण दिशेची देवता.

वज्रस्फोटा—तांबड्या वर्णाची, एकमुखी, द्विभुजा, उजवे हाती वज्रांकित साखळी धरणारी, पश्चिम दिशेची देवता.

वज्रघंटा—हरित वर्णाची, एकमुखी, द्विभुजा, उजवे हाती वज्रघंटा धरणारी, उत्तर दिशेची देवता.

उष्णीष-विजया—शुभ्र वर्णाची, एकमुखी, द्विभुजा, उजवे हाती चक्र धारण करणारी, ऊर्ध्व दिशेची देवता.

सुंभा—नील वर्णाची, एकमुखी, द्विभुजा, उजवे हाती नाग-पाश धारण करणारी, अधर दिशेची देवता.

या सर्व देवतांची डाव्या हाताची तर्जनी उंच केलेली असते. पुष्पा, धूपा, दीपा आणि गंधा या चार उपदिशांच्या देवता होत. (भारतीय बुद्धमूर्तिशास्त्र)

द्वार देवता—श्रीविद्यार्णव तंत्रात या देवतांचे वर्णन दिलेले असून, द्वारावर राहून वास्तूचे रक्षण करणे हे काम त्यांजवर सोपविलेले आहे.

पद्मा—कमलासना, चतुर्भुज, दोन हाती पद्म आणि दुसरे दोन हात अभय व वरदमुद्रेत असतात.

भारती—द्विभुज, एका हाती अक्षमाला व दुसऱ्यात पुस्तक असते.

दुर्गा—द्विभुज आणि सिंहारूढ असते.

द्वारश्री—पद्मासना, द्विभुज, अभय वरदमुद्रा असते.

विश्वसंकल्प आणि कल्पक—मोती व माणिक वर्णाचे असून, हाती शंख, पद्म अथवा दोन कमळे असतात.

काम—इक्षुचाप (उसाच्या कांड्याचे धनुष्य) व पुष्पबाण धारण करतो.

तालिका—गौरवर्ण आणि कुलुप हे चिन्ह असते.

कुंची—पीतवर्ण आणि किल्ली हे तिचे चिन्ह असते.

कपाटा—रक्तवर्ण आणि फळी हे तिचे चिन्ह असते.

पटधारिणी--नीलवर्ण आणि हाती पडदा असतो.

( भा. सं. को., ४।५३२ )

धनद-तारा--एक बौद्ध देवता. तारादेवीचे एक तान्त्रिक स्वरूप होय. एकमुख, चतुर्भुज, हरित वर्णाची, उजवा खालचा हात वरदमुद्रा, वरचा माला धारण करणारा. डावीकडे खालच्या हाती पुस्तक व वरती कमल असते. या देवीचा मंत्र 'ॐ तारे तुतारे तुरे स्वाहा' असून मत्राक्षराच्या वर्णापासून उत्पन्न झालेल्या आठ देवता, हिच्याच सभोवार मांडतात. कोणताही प्राणी या देवीचे वाहन होऊ शकतो. काही ठिकाणी ती कमलासना असते. मस्तकावर अमोघ-सिद्धीची मूर्ति असते. तिबेट व चीनमध्ये या देवतेच्या मूर्ति अधिक प्रमाणात आढळतात. ( भारतीय बुद्धमूर्तिशास्त्र ).

धनमाणिक--ही ओरिसा प्रातातील धनदेवता असून, त्या प्रदेशी प्रत्येक गुरुवारी घरोघरी हिचे पूजन केले जाते.

धारणी

धारणीं देवीं कृष्णवर्णां चतुर्भुजां पद्मासनां ।
मातुलिंगोत्पलान्वितदक्षिणभुजां पाशाक्षसूत्रान्वितवामकराम् ॥

निर्वाणकलिका या जैन ग्रंथात देवीचे वरीलप्रमाणे रूप वर्णन केलेले आहे. ही देवी कृष्णवर्णा, चतुर्भुजा, कमलासनावर बसलेली, उजवे दोन हाती मातुलिंग व नीलकमल आणि डावे दोन हाती पाश व माला धारण करणारी आहे. परंतु या ग्रंथातील दिगंबरपंथमते हातातील आयुधे सर्प, वज्र आणि मृग व वादमुद्रा धारण करणारी असते. जैन समूहातील ही एक यक्षिणी असून ती अमरनाथाची सेविका आहे. ( भा. सं. को., ४/६१३ )

याव्यतिरिक्त बौद्धाच्या महायान पंथाच्या वाङ्मयामध्ये धारिणी नावाचा एक मंत्रसमूह व एक देवतासमूह आहे. नेपाळात पंचरक्षक नावाचा एक धारिणी संग्रह आहे व तिकडे तो अत्यंत लोकप्रिय आहे.

( १ ) महाप्रतिसरा— रोग, पाप व इतर अनिष्ट गोष्टींपासून संरक्षण करते.

( २ ) महासहस्रप्रमर्दिनी— भूत-पिशाच्चाची बाधा दूर करते.

( ३ ) महामयूरी— सर्पविष उतरविते.

( ४ ) महाशीतवती— शत्रु, दुष्ट ग्रह, हिंस्र पशूपासून संरक्षण करते.

(५) महामंत्रानुसारिणी— समस्त रोगांचे निवारण करते.

एका त्रिपिटकात स्वतः गौतम बुद्ध सांगतात— "धारिणीचा उपयोग केल्याने सर्वांची दुःखे दूर होतील. सर्वांना निर्वाण प्राप्त होईल, यथाकाली पर्जन्य-वृष्टि होईल आणि त्यामुळे वृक्ष-वनस्पती वाढून बियाणी रुजतील आणि रस वाहवतील." यासाठीच अवर्षणाच्या निवारणासाठी किंवा पाऊस पडण्यासाठी या समूहांचा उपयोग करतात. त्यांची अशी श्रद्धा आहे की, पंचमहाभूतावर यांची सत्ता चालते. तसेच या समूहात ग्रहपीडा निवारण, विषबाधा निवारण, रोगनाशक, आयुष्यवर्धन, युद्ध विजय, पातक निवृत्ति इ० संबंधी मंत्र असतात. बौद्ध-तंत्रकारांनी त्यांची अधिक नामे दिली आहेत. ती येणेप्रमाणे— सुमती, रत्नोल्का, उष्णीषविजया, मारी, पर्णशबरी, जागुली, अनंतमुखी, चुंदा, प्रज्ञा-वर्धिनी इ० इ०. यांचे वर्ण जरी वेगवेगळे असले, तरी या एकमुखी, द्विभुज, प्रत्येकींच्या हाती विश्व, वज्र व अभिज्ञान चिन्ह असते. (भा. सं. को. ४/४१६)

* धूमावती— एक तांत्रिक देवता. शाक्तसिद्धान्ताप्रमाणे महाशक्तीचे हे वृद्धरूप होय. तिने हे रूप धारण का केले यासंबंधीची कथा अशी.

एकदा कैलास पर्वतावर पार्वतीने शंकराना म्हटले, 'मला भूक लागली आहे, काही तरी खावयाला द्या.' पण शिवाने त्या मागणीकडे दुर्लक्ष केले. यामुळे पार्वती आदिशक्ति रागावली आणि तिने शंकरांनाच गिळून टाकले. पण त्याचा परिणाम असा झाला की, तिच्या शरीरातून धुराचे लोट निघू लागले. त्या वेळी शंकरानी तिला तिच्या उदरातूनच म्हटले,

एषा मूर्तिस्तव परा विख्याता बगलामुखी ।
धूमव्याप्तशरीरात्तु ततो धूमावती स्मृता ॥

भावार्थ असा की, तुझी पराशक्तिमूर्ति बगलामुखी नावाने प्रख्यात होती, पण आता सर्व शरीर धुराने झाकून गेल्यामुळे यापुढे ती धूमावती नावाने प्रसिद्ध होईल. या रूपाचे ध्यान-वर्णन आहे—

विवर्णा चंचला कृष्णा दीर्घा च मलिम्बरा ।
विमुक्तकुन्तला रुक्षा विधवा विरलद्विजा ॥
काकध्वजरथारूढा विलम्बितपयोधरा ।
शूर्पहस्तातिरूक्षाक्षी धूतहस्ता वरान्विता ॥

---

* टीप— दशमहा विद्या प्रकरणांत या देवीचा उल्लेख आलेला आहे.

भावार्थ असा की, धूमावती देवी ही वर्णहीन, चंचल, काळी, उंच बांध्याची, मलीन वस्त्रे नेसलेली, पिंजारलेल्या केसांची, रुक्ष, विधवा, विरळ दातांची, काकध्वज असलेल्या रथावर आरूढ झालेली, लोंबल्या स्तनांची, हातात सूप धरणारी, रुक्ष नेत्रांची, हात हालविणारी, मोठ्या नाकाची, तिरळ्या डोळ्याची, सदैव तहानभुकेने व्याकूळ झालेली, भयानक व कलहकारिणी अशी आहे. ती रूपाने विशाळ असली तरी स्वत नर्तकी आहे. 'धूँ धूँ धूमावति स्वाहा' या मंत्राचा विवस्त्र होऊन स्मशानात एक लक्ष जप केला व मीठ मोहरीने हवन केले, म्हणजे तो सिद्ध होतो आणि शत्रुनाशासाठी त्याचा उपयोग केला जातो (भारतीय प्रतीक विद्या, जनार्दन मिश्र, १९५९)

ध्वजाग्रकेयुरा— एक बौद्ध देवता. भारतीय बौद्ध मूर्तिशिल्पामध्ये या देवतेचे वर्णन मिळते. ते असे की, नील अथवा पीतवर्णा, त्रिमुखा किंवा चतुर्मुखा, चतुर्भुजांत खड्ग, पाश, चक्र व खट्वांग धारण करणारी, गळ्यात रुंडमाळा परिधान करणारी, मस्तकी अक्षोभ्याची मूर्ति धारण करणारी, व्याघ्रचर्म नेसलेली असते. मात्र जेव्हा ती चतुर्मुखा असते, त्या वेळी मस्तकी अक्षोभ्य नसतो आणि आयुधेही निराळी असतात. प्रत्यालीढ आसनामध्ये ही उभी असते. या देवतेची काही रूपे अत्यंत भयानक असतात.

नरदत्ता—जैनसमूहातील एक यक्षिणी. हिला बहुरूपिणी असेही म्हणतात. निर्वाणकलिकेमध्ये या देवीचे वर्णन असे—

गौरवर्णाची, कमलावर आरूढ झालेली, चतुर्भुज, उजवीकडे एक हात वरदमुद्रा व दुसऱ्यात अक्षमाला आणि डावीकडे मातुलिंग व कुंभ धारण करणारी देवता आहे. मुनी सुव्रताची ही सेविका होय. दिगंबरपंथियांचे मते ही कृष्ण सर्पावर आरूढ असून हातामध्ये ढोल, फल, खड्ग आणि वरदमुद्रा धारण करणारी आहे. या देवीचे पौराणिक शक्तीबरोबर साम्य आहे. (जैन मूर्तिशास्त्र)

नैरात्मा—इंडियन म्युझियममध्ये जी मूर्ति आहे, तिचे वर्णन असे की, ती नृत्य करीत असलेली, आणि पायाखाली कमलदलावर दोन प्रेतासह असलेली, भीतिदायक स्वरूपाची, रक्तवर्णाळ त्रिनेत्र, जीभ बाहेर आलेली व कुत्र्याप्रमाणे दात असलेली आहे. गळ्यात रुंडमाला व अंगातून निघणाऱ्या अग्निज्वालांवर शोभून दिसते. माथ्यावरील केस ताठ उभे असून अग्निज्वालाप्रमाणे भासतात. या पार्श्वभूमीवर ध्यानी बुद्धाची मूर्ति फारच किरकोळ दिसते. उजव्या हातीचा चाकू कोणाला मारण्याच्या पवित्र्यात धरलेला असून डाव्या हाताने भांडे छातीजवळ धरलेले असावे. डाव्या खांद्यावर एक सोटा घेतलेला दिसतो, कदाचित् ते जादूने भरलेले खट्वांग असावे.

साधनमालेत या देवीचे जे ध्यानवर्णन केले आहे, त्याबरहुकूम हे शिल्प आहे. ध्यान, मनन व मंत्र हे साधनमाला ( भाग २।४५१ ) यांत दिलेले आहे.

पर्णशबरी—विक्रमपूर ( डाका ) येथे काळ्या पाषाणाची ही मूर्ति ३½ फूट उंचीची आहे. ती त्रिमुखी असून सहा भुजांची आहे. शिरकमल किंचित डावीकडे कलते असून उजवा पाय सरळ व डावा पाय किंचित वाकलेला आहे. चेहरा रागीट असला तरी मोहक आहे. हातामध्ये वज्र, बाण, कुऱ्हाड, दोन हातांत पानांसह वृक्षाची डहाळी व शेवटी तर्जनीमुद्रा याप्रमाणे आयुधे आहेत. देवीचे पोट थोडे मोठे आहे.

या मूर्तीचे वैशिष्ट्य असे की, दोन माणसे खाली पडलेली असून त्याना तुडवीत ती पुढे सरकत आहे. ही दोन माणसे कमलासनावर, मस्तके विरुद्ध दिशेला ठेवून, निजलेली असून त्यावर देवता आहे. या मानवाचे अंगावर देवीचे वणासारखी लहान लहान वर्तुळे आहेत. याचा अर्थ असा की, देवीचा रोग ही देवता पायाखाली चिरडीत आहे. तसेच गणेशाची मूर्ति हाती तरवार असलेली, आसनाच्या पाषाणावर दाखविलेली आहे. उजवे बाजूला ब्राह्मणदेवता, हयग्रीव, शीतला यांच्या मूर्ति आहेत. या शिल्पाचा असा आशय घेतात की, ब्राह्मणदेवता गणेश, हयग्रीव व शीतला यांचा पराभव या पर्णशबरी देवतेने केलेला असून, त्यांचे पूजन मागे पडून, रोगराईसाठी या देवतेचे पूजन चालू झालेले आहे.

ही देवता तारादेवींची सहचरी असून प्राचीन काळी वन्य शबर जमाती हिचे पूजन करीत असाव्यात. तिच्या गळ्यात काही वेळा पानाच्या माळा घालतात अगर झगा घालतात. तिचे नाव काही वेळा **सर्व–सर्वनाम भगवती** म्हणजे साबर जमातींची देवता असे आहे. सांप्रतही ही वन्यजमात भारताच्या **पूर्व भागी आढळते.** नन्यदा ( डाका ) गावी या देवीची पूजा **जिअस ठाकूराणी** या नावाने होते. रोगराई नष्ट करण्यासाठी खालील मंत्राचा जप करतात.

'ॐ पर्णशबरी, चेटकिणी, सर्व रोगराई नष्ट कर हुं फट् स्वः'

( बौद्ध मूर्तिकला–भट्टसाली )

काही शिल्पात ही देवता एकमुखी, द्विभुजा, शुभ्रवर्णा, कमलासना, हाती पाश व परशु धारण करणारी व अर्धचंद्राप्रमाणे नयनमनोहर केशरचना करणारी, पिशाची देवतास्वरूप असते. प्रभावळीचे वर पाचही ध्यानी बुद्धाच्या मूर्ति असून अमोघसिद्धि हा मध्यभागी आहे, कारण ही देवता त्याचे वंशातील आहे. या देवीच्या दोन साधना आहेत. ( साधनमाला, २।१४२ )

प्रज्ञापारमिता— डाक्का येथील संग्रहालयातील मूर्ति चतुर्भुज असून वरील दोन्ही हात धर्मचक्रप्रवर्तन मुद्रा दर्शवितात खालील एका हाती कमल, फुलाचा दाडा व त्यावरती पुस्तक आणि चवथा हात अभयमुद्रा दर्शवितो रघुरामपूर येथील उत्खननामध्ये या प्रकारची $४\frac{१}{२}' \times ३'$ मूर्ति मिळाली असून मुखापासूनचा वरील भाग तोडलेला आहे ती कमलासनावर अधिष्ठित असून दोन्ही पाय मांडी आसनात अडकलेले आहेत कोणी एक पुरुषव्यक्ति सेवक म्हणून जवळ उभी आहे. हे स्वरूप पीत प्रज्ञापारमिता देवीचे होय. साधनमाला ग्रंथात या देवतेसंबंधी ९ साधना सांगितल्या आहेत. दुसरे स्वरूप सीत प्रज्ञापारमिता स्वरूपाचे आहे. तेथे ती एकमुखी, द्विभुजा, शुभ्रवर्णा, शुभ्रकमलावर बसलेली, उजवे हाती रक्तकमल व डावे हाती प्रज्ञापारमिता पुस्तक, मस्तकी अक्षोभ्य धारण करते बौद्ध पंथाचे ज्ञान असणारे हे पुस्तक आदिबुद्धाने नागार्जुनातीजवळ ठेवलेले होते. ते नागार्जुनाने हस्तगत करून ज्ञानाचा प्रसार दुसऱ्या शतकात केला. आर्यप्रज्ञा, शुक्लप्रज्ञा, कनकवर्णा, सितप्रज्ञा असेही प्रकार या देवीचे आहेत

भृकुटी तारा—या देवतेची जी मूर्ति आढळली आहे ती $४\frac{१}{२}'$ उंच $२\frac{१}{२}'$ रुंद असून हिरवट पाषाणाची आहे. ती पद्मासनस्थ त्रिमुखी व अष्टभुजा स्वरूपात आहे. आसनाचे खाली दोन सिंहाकृति गर्जना करीत आहेत. काही भुजा जरी भगलेल्या असल्या तरी हातात तलवार, त्रिशूळ, वज्र, सोटा, कुऱ्हाड, इ० प्रकारची आयुधे दिसतात समोरील मुख सौम्य असून डाव्या बाजूकडील मुखात दात बाहेर आलेले, तर उजवीकडील अती हास्यामुळे दंतपंक्ति उठावदारपणे दिसत आहे. चेहरा आठ्या पडल्याने तिरस्कारयुक्त दिसत आहे. या शिल्पातील वैशिष्ट्य असे की, गणेशाची मूर्ति लहान मुलाप्रमाणे हात व ढोपरे यावर रांगत असलेली आसनाखाली आहे. यावरून ती धर्मपाल म्हणजे धर्माचे रक्षण करणारी होय. तसेच आणिक एक वैशिष्ट्य म्हणजे आसनाच्या उजवे बाजूस एक भाता बाणांनी भरून तयार ठेवलेला आहे. माथ्यावरील किरीटावर ध्यानी बुद्धाची आकृति आहे. सारांश, ध्यानी बुद्ध आणि चेहऱ्यावरील सुरकुत्या यावरून ती भृकुटी तारा होय. डाका जिल्ह्यातील भवानीपूर येथे १० व्या शतकातील या प्रकारची मूर्ति मिळालेली असून सांप्रत ती डाका साहित्य परिषदेच्या संग्रही आहे.

मनसादेवी—मनसादेवीच्या एका ध्यानामध्ये भक्त म्हणतो, हे आस्तिक ऋषीचे माते, मी तुझे चरणी आश्रय घेतो. तिचे मांडीवर एक लहान मूल आहे ती सुवर्ण कमळाप्रमाणे प्रकाशत आहे, मोठमोठे भुजंग इतस्तत फिरून तिची सेवा करीत असतात. ती आपल्या दोन्ही हातात नाग धरते. तिचे वक्ष स्थल उन्नत असून, स्तनयुग्म आणि अलंकारांनी सुशोभित असते. हाती मूल आणि

सर्प, यावरून ती चतुर्भुजा आहे. (बौद्धपंथीय देवता हरितीप्रमाणेच हे वर्णन आहे.)

बंगाल प्रांती या देवतेच्या अनेक मूर्ति उपलब्ध आहेत आणि त्या भागातील ती एक प्रमुख देवताही आहे. इंडियन म्युझिअममध्ये जी मूर्ति आहे, ती कमलासनावर बसलेली असून, उजवा पाय खाली लोंबत असतो. सात अगर आठ नाग तिच्या मस्तकावर फणे उभारून असतात. उजवे वरद-मुद्रा हातात एखादे फळ असते. उजवीकडे एक थकलाभागलेला दाढीवाला मनुष्य असून तो जरत्कारू असावा. डावे बाजूस अस्तिक मुनींचे शिल्प असते. ज्या वेळी त्यांचे मस्तकावर मुकुट असतो त्या वेळी बहुधा नागराजा वासुकी तिचा भाऊ असतो. काही शिल्पात कमलासनावर एक कुंभ मांडलेला असून, त्यामधून दोन नाग विरुद्ध दिशेकडे सरकत असलेले दाखवितात. डाका येथील संग्रहालयात सुमारे २० इंच उंचीची जी मूर्ति आहे, ती वरील वर्णनाची आहे.

साधारणत: १० ते १२ व्या शतकात या देवतेचा ऊर्जितकाल होता. त्या वेळची शिल्पे अनेक ठिकाणी आढळतात. इतकेच नव्हे तर पूजासमयी लागणारी भांडी व इतर साहित्य, याजवरही नागाकृति कोरलेल्या असत. दक्षिणेतील ब्राह्मण आजही संध्यार्चनासाठी लागणारी पळी नागाचे शिल्पाची वापरतात. या रीतीची उपकरणी उत्खननांमध्ये मिळालेली आहेत व राजशाही संग्रहालयात ठेवलेली आहेत.

या देवतेच्या उत्पत्तीसंबंधी कथा अशी की, कश्यपऋषीला कद्रु आणि विनता नावाच्या दोन स्त्रिया होत्या. विनतेपासून अरुण व गरुड यांची उत्पत्ति झाली, तर कद्रूपासून सर्प अगर नागाची उत्पत्ति झाली. पुत्रांनी आपली अवज्ञा केली म्हणून कद्रूने शाप दिला की, पुढे जनमेजय राजा त्याचा कुलक्षय करील. पुढे नागराजा एलापत्र असे सांगता झाला की, वासुकी व इतर नाग यांची बहीण जरत्कारू, जर एखाद्या त्याच नावाच्या ब्राह्मण मुलाबरोबर विवाह करील तर तिचा पुत्र हे संकट दूर करील.

जरत्कारू नावाचा ब्राह्मण मुलगा सदा फिरतीवर असे, कारण त्याचा वंशच यायावर–सदा फिरत असणारे–होता. घरदार करून संसार थाटावा हे त्यांना माहीत नव्हते व आवडतही नव्हते. पण एके वेळी पूर्वजांचे आत्मे लोंबकळत राहिलेले त्याने पाहिले आणि पुत्राविना त्यांना सद्गति मिळणार नाही, म्हणून विवाह करण्याचे योजिले. वासुकी नागाने वरशोधनार्थ अनेक हेर पाठविलेले होते, त्यांपैकी एकाला हा ब्राह्मण सापडला आणि मुलगी त्याचेच

प्रसिद्ध आहे. चांदसदगर हा पक्का शिवभक्त असल्याने तो मनसादेवीचे पूजन करण्यास राजी नव्हता. त्याच्या स्त्रीचे नाव सोनेका. हिने एके दिवशी त्याच्या नकळत मनसादेवीचे पूजन आरंभिले असता, चांद रागावला व त्याने सर्व पूजा-साहित्य उधळून दिले. मनसादेवीची अवकृपा होताच त्या व्यापाऱ्याचे सहा मुलगे मृत्यु पावले, तरी तो बधला नाही. वैर चालूच ठेवले. सातवा मुलगा लखींधर नामाचा जन्माला आला आणि वयात आल्यावर बेहुलानामक मुलीबरोबर त्याचा विवाह ठरला. त्याचे भविष्य असे होते की, विवाहाच्या रात्री त्याला सर्पदंश होईल, त्याप्रमाणे घडले व त्यास मृत्यु आला. बहुलाने त्याचे प्रेत एका तराफ्यावर घालून ती नदी प्रवाहातून वाट फुटेल तिकडे निघाली. अनेक संकटांना तोंड देत ती जात असताना तो तराफा एके ठिकाणी किनाऱ्याला लागला. तेथे देवा-दिकांचा धोबी नेता तिला भेटला. सर्व हकिगत समजल्यावर नेत्याने तिला भगवान शंकराकडे नेले आणि उत्तम नृत्य करून शंकरांना प्रसन्न करून घेतल्यावर, शंकरांनी तिच्या पतीला प्राणदान दिले. तसेच पूर्वीचे सहा दीरही परत केले. सर्वांसह घरी परत आल्यावर चांदसदगरला आनंद झाला, त्याला आपली चूक उमगली, अहंकार गळला आणि त्याने देवीचे पूजन केले, पण ते सुद्धा डाव्या हाताने. अशा रीतीने मनसादेवीचे महत्त्व तेथे वाढीस लागले.

कामाख्या देवीच्या मंदिरात देवधानी नावाचा उत्सवसमारंभ होतो व प्रामुख्याने मनसादेवीचे पूजन होऊन, त्यामध्ये वरील प्रसंगाचे वर्णन करणारी गीते गायिली जातात.

(Temples of Assam by B. K. Barua, P. 41-42)

गोलपारा शहरापासून ७ मैलावर श्री सूर्यपहाड नावाचे क्षेत्र आहे. तेथे सूर्यमंदिरात एक सूर्यमूर्ति आणि बारा आदित्यांचे दर्शन घडते. तसेच येथे टेकडीच्या पायथ्याशी कुरुंदी पाषाणाची हजार शिवलिंगे आढळतात. याचे कारण असे देतात की, येथे प्रती काशी बनविण्यासाठी प्राचीन काळी ९९,९९९ शिवलिंगे स्थापन करण्यात आलेली होती. येथे एका खडकात कोरलेले मनसा-देवीचे स्वरूप असून, त्याला १२ भुजा दाखविलेल्या आहेत व निरनिराळी आयुधे असून मस्तकावर सात नागफण्यांचे छत्र आहे. ती एका कमळावर उभी आहे. (आसाममधील देवळे—बारुआ, पृ. ८९)

**मारिची**—तिबेटप्राती लामा धर्मगुरु प्रातःकाळी सूर्याप्रमाणे या देवतेचे पूजन करतात, म्हणजे ती सूर्यस्वरूप समजतात. विरोचनाच्या शरीरापासून या देवीची निर्मिति झालेली आहे. वैदिक देवता उषाप्रमाणे या देवीचे बौद्ध-धर्मातील स्थान आहे. येथील वैशिष्ट्य असे की, या देवीचा रथ सात डुकरांनी

ओढलेला आहे उषा देवीच्या रथाला सात घोडे दाखवितात ही त्रिमुखी असून त्रिनेत्र व आठ भुजा आहेत तिच्या उजव्या बाजूचे मुख रक्तवर्ण असून, डावी कडील डुकराप्रमाणे निळसर रंगाचे आहे हातातील आयुधे उजवीकडील क्रमाने वज्र, अंकुश, बाण, सुई, अशोकपर्ण, धनुष्य, पाश व तर्जनीमुद्रा याप्रमाणे आहेत रथामध्ये बसल्यावर उजवा पाय गुढघ्यात दुमटलेला व डावा समोर ताणलेला असतो राहु तिचे सारथ्य करतो चार बाजूला देवता आहेत पूर्वेला रक्तवर्णी, चतुर्भुजा, डुकरमुखी वत्ताली, दक्षिणेला, पीतवर्णा, चतुर्भुजा वदाली, पश्चिमेला शुभ्रवर्णा चतुर्भुजा वराली, आणि उत्तरेला रक्तवर्णी चतुर्भुजा वराहमुखी होत फरीदाबाद जिल्हा भेदरगंज तालुक्यात पद्मानदीमध्ये या प्रकारची मूर्ति आढळून आलेली असून ती डाक्का येथे संग्रहालयात आहे काही वेळा मुकुटावर विरोचनाची आकृति दाखवितात उजानी, टिपेरा, आटपारा, दुवाली या ठिकाणी आढळलेल्या मूर्ति राजशाही संग्रहालयात ठेवलेल्या आहेत

काही शिल्पात ही देवता सप्त पर्यंकावर बसलेली असून, हृदयाच्या ठिकाणी ॐ कार धारण करते, भक्ताची संकटे हरण करते (साधनमाला, १।२६६)

साधनमालाग्रंथात या देवीसंबंधी सोळा साधना दिलेल्या असून तिच्या स्वरूपाचे सहा प्रकार वर्णन केलेले आहेत ती एकमुखी, त्रिमुखी, पंचमुखी अथवा सहा मुखाची असून तिला दोन, आठ, दहा, बारा भुजा असतात हातातील सुई व दोरा या आयुधांनी ती दुष्ट वृत्तीच्या लोकांची तोंडे व नेत्र शिवून बंद करते, अशी भक्ताची भावना आहे वज्रवाराही देवीस्वरूपाला काही वेळा मारिची मानतात, पण ते बरोबर नाही

ज्या वेळी या देवीला एक मुख, दोन हात असतील व एका हाती अशोक वृक्षाचे पर्ण असेल, तेव्हा तिला **अशोककांता** म्हणतात, पण याच स्वरूपात हातात सुई दोरा असेल तर मात्र तिला **आर्य मारिची** म्हणतात

याशिवाय मारिचीपिचुव, उभयवराहानना मारिची, दशभुजा मारिची, *वज्र धात्विश्वरी मारिची इ० स्वरूपे आहेत, त्यांची साधनेही आहेत ती साधनमाला* ग्रंथात पहावीत (भारतीय बौद्ध मूर्तिकला, ९६–१००)

**महत्तरी तारा**—बडोदा सरकारच्या संग्रहालयात या देवतेची मूर्ति आहे कमळावर ती मत्स्यकासनी (एकावर एक पाय) असून उजवा हात वरद आणि डाव्या हाती कमलपुष्प आहे कदाचित ही श्यामातारेची मूर्ति असावी

**महासरस्वती**— भारतामध्ये आल्यावर आर्यांनी सरस्वती नदीचे काठी वेदरचना केली आणि ज्ञान देणारी म्हणून सरस्वती देवीची मूर्ति अस्तित्वात

आली. बौद्धपंथीयानी पुढे ही देवता आत्मसात करून, तिची अनेक स्वरूपे बनविली. ती एकमुखी, द्विभुज असेल अथवा त्रिमुखी असून षड्भुजा असेल. बौद्धदेवता मुजुश्री आणि प्रज्ञापारमिता याप्रमाणे ती शहाणपण, निद्रा, बुद्धि व स्मरणशक्ति देणारी मानलेली असल्याने बहुजन बौद्धपंथीय तिच्या भजनी लागलेले होते.

या देवतेचे स्वरूप वर्णन करताना जेव्हा ती एकमुखी असेल, तेव्हा द्विभुज, हाती शुभ्र कमळ व वरदमुद्रा, हसतमुख, अंगावरील वस्त्रालंकार चंदनाचे पुष्पांनी युक्त असतात. गळ्यात शुभ्र मौक्तिक माळा, बारा वर्षांची कुमारी स्वरूप, सुंदर कांति आणि कमलासनावरील चंद्रावर बसलेली, सर्व जगाला आपल्या प्रकाशाने दैदिप्यमान करणारी असते. या देवीचे वैशिष्ट्य म्हणजे नालन्दा येथील मूर्तीप्रमाणे दोन बाजूला दोन दोन तिच्या समान लहान मूर्ति असतात. त्यांची नावे प्रज्ञा, मेधा, स्मृति आणि मति अशी आहेत. डाका म्युझिअममध्ये या प्रकारची मूर्ति आहे.

साधनमाला ग्रंथात, या देवीसंबंधी अनेक साधना वर्णन केलेल्या आहेत. या देवतेचे वज्रवीणा सरस्वती, वज्रशारदा, आर्यशारदा, वज्रसरस्वती इ० मूर्तिभेद आहेत. त्यांची वर्णने मूळ ग्रंथात पहावीत.

महाश्री-तारा— इंडियन म्युझियम, कलकत्ता यामध्ये जे देवीचे स्वरूप आहे, त्याचे वर्णन असे की, कमलासनावर ती ललितासन घालून बसलेली आहे, म्हणजे उजवा पाय खाली लोंबत असून डावा पाय कमलासनावर आहे. या मूर्तीचे वैशिष्ट्य असे की, धर्मचक्रमुद्रा छातीवर असून दोन्ही कांखेतून दोन कमळे बाहेर आलेली व दंडाजवळ शोभत आहेत. सर्व शरीरावर अलंकार आहेत. अंगात पातळ कापडाचे वस्त्र दाखविले आहे. मुख्य मूर्तीच्या डावी-उजवीकडे आणि खाली आसनावर चार देवतांचे शिल्प असल्याने त्या सहचरी असाव्यात. वरील बाजूस पाच ध्यानी बुद्धांच्या मूर्ति असून, अमोघसिद्धि मध्यभागी आहे. हे सर्वच शिल्प रेखीव व सुंदर, आकर्षक आहे. ती शामवर्णा असून द्विभुजा आहे.

उजवीकडील देवता अशोककान्ता व डावीकडील एकजटा असून खालील बाजूच्या दोन महामयुरी आणि आर्यजांगुली आहेत. साधनमालेतील ध्यानात हेच वर्णन मिळते. (साधनमाला, २–१४६)

महाचीन तारा— ध्यानी बुद्ध अक्षोभ्याचे वंशातील ही देवता होय. जांगुली, एकजटा, पर्णशबरी, प्रज्ञापारमिता, वज्रचर्मिका, महामंत्रानुसारिणी, महाप्रत्यंगिरा, ध्वजाग्रकेयुरा, वसुधारा, नैरात्मा या देवता याच वंशातील होत.

याशिवाय दशभुजा महाप्रतिसरा देवीचे स्वरूप आहे. इतर वर्णन साधारणपणे वरीलप्रमाणे आहे. (भारतीय बौद्ध मूर्तिकला, पृ. ११६)

महाप्रतिसरा, महासहस्त्रप्रमर्दिनी, महामन्त्रानुसारिणी, महामयुरी व महाशीतावती या पञ्चरक्षा देवता मंडलातील होत. यांची मंडलपूजा होते. पूर्वी प्रत्येक विहारामध्ये हे पूजन केले जात असे. या देवतांच्या पूजनाने राज्य, गाव, व जनतेचे रक्षण होत असे. तसेच रोगराई, दुष्काळ व संकटाचा नाश होत असे. साधनमालेत या पूजेचे विधान दिले आहे.

महाप्रत्यंगिरा—देवीचा वर्ण नील असून, एकमुखी, सहा भुजात तरवार, अंकुश, वरद, तर्जनीमुद्रा, रक्तकमळ व त्रिशूल ही आयुधे ती धारण करते. हुं या बीजाक्षरामधून देवतेची निर्मिति झालेली असून, मस्तकी अक्षोभ्य धारण करते, अनेक अलंकार धारण करते, दिसण्यात तरुण व सुंदर मूर्ति दिसते. नेपाळमधली या देवीचे जे शिल्प उपलब्ध आहे त्यामध्ये ती अनेकमुखी व असंख्य हातांची दाखविली आहे. साधनमाला ग्रंथात या देवतेसंबंधी एकच साधना दिलेली आहे, पण या अनेकमुखी देवतेसंबंधी साधना कोठे आढळून येत नाही. हिंदु देवतामध्ये प्रत्यंगिरा म्हणजे अंगिरा ऋषींच्या शापाने तयार झालेली देवता आहे, म्हणून या पंथामध्ये देवीचा वरचढपणा दाखविण्यासाठी महाप्रत्यंगिरा नाव दिलेले असावे. नेपाळमध्येच ही मूर्तिकला जास्त आहे.

(भारतीय बौद्ध मूर्तिकला, पृ. ८८)

यामरी—ही यमांतका नावानेही ओळखली जाते. ध्यानी बुद्ध अक्षोभ्याचे वंशातील ही देवता आहे. या देवतेच्या साधनमाला ग्रंथामध्ये १४ साधना दिलेल्या आहेत. त्यापैकी नमुन्यादाखल एक साधना अशी की, साधकाने पूर्व दिशेला मुख करून शांतिकर्म केले, तर त्याचा चेहरा शुभ्रवर्णी होतो, उत्तरेकडे मुख करून पौष्टिकविधि केल्या, तर मुख पीतवर्णी होते, पश्चिमाभिमुख होऊन वश्यविधि केला तर मुख रक्तवर्णी होते. दक्षिणाभिमुख होऊन आकर्षणकर्म केले तर मुख नीलवर्णी होते सारांश, असे विधि व आचरण केल्यास भक्तमंडळी साधकाकडे जास्त आकर्षित होतात. या देवीची पूजा एकटीच अथवा प्रज्ञादेवीसह करतात या वेळी रेड्याचे मस्तक जवळ असावे. यमराजाचे वाहन रेडाच असते.

या देवतेच्या उत्पत्तीची दंतकथा बोधकारक आहे. एके काळी एक साधु तपश्चर्येसाठी एका गुहेत बसला असता, पन्नासाव्या वर्षाचा शेवटचा दिवस उगवला. त्या वेळी दोन चोर त्याच्या गुहेत एका चोरलेल्या बैलासह शिरून, त्यांनी बैलाचे मस्तक तोडले. पण आपले हे दुष्कृत्य या तपस्व्याने पाहिले आणि

तो बोभाटा करील, यास्तव त्यांनी त्या साधूचा शिरच्छेद केला. परिणाम असा झाला की, तपश्चर्येच्या सामर्थ्याने त्याच्या मृत शरीराने अतिशय उग्र स्वरूप धारण केले आणि जवळच पडलेले बैलाचे मस्तक आपल्या शिरस्थानी ठेवून, त्या चोराना ठार केले त्याचे रक्त, त्याच्याच कपाळाच्या कवटीतून घटाघटा प्याला याचा सूड म्हणून सर्व तिबेट देश उध्वस्त करण्याची त्याने प्रतिज्ञा केली. तेव्हा सर्व प्रजानन मंजुश्री बुद्धाच्या चरणी नतमस्तक झाल्यावर, त्याने यमातकाचे स्वरूप घेतले व बैल मस्तक धारण करणाऱ्या यमाचे निर्मूलन केले. मंजुश्रीचा वरचष्मा दाखविण्यासाठी ही दंतकथा प्रचलित असावी. रक्तयामारी व कृष्णयामारी असे दोन भेद आहेत, त्यांची वर्णने निराळी आहेत

लक्ष्मी-नारायण—शिव-शक्तींची मूर्ति जशी असते, तद्वत या देवतेंची मूर्ति एकत्र अधिष्ठित असते. बंगाल प्रांती एक मूर्ति प्राचीन शिल्पाची आढळेली असून तिची उंची सुमारे २० इंच आहे. डाका शहरापासून सुमारें २० मैलावर बास्ता गावी ती आहे.

भगवान नारायण कमलासनावर अधिष्ठित असून उजवा पाय खाली लोंबकळत आहे. शंख, पद्म, गदा, आणि चक्र याप्रमाणे चार भुजात आयुधे असून चक्र असणारा हात लक्ष्मीचे अगावर आहे.

नारायणाचे डावे मांडीवर लक्ष्मी बसलेली असून तिचा उजवा हात आपले पतीचे मानेभोंवती आहे डावे हाती कमळ आहे. उजवा पाय नारायणाचे मांडीवर दुमटलेला असून डावा पाय खाली लोंबत आहे. त्याचे वाहन गरुड खाली असून तो चतुर्भुज आहे. जोटप्याचे लोंबते पाय जणु काय त्याने आपले दोन हातावर घेतलेले आहेत. पुढील दोन नेहमीच्या नमस्कार पद्धतीत आहेत. एकदर शिल्प आकर्षक आहे.

शतकातील हे शिल्प असावे असे मानले जाते कमळाच्या पाकळ्यांची उघड-झाप व मूर्तीचे दर्शन असे उत्कृष्ट शिल्प इंडिअन म्युझिअममध्ये पहावयास मिळते मुख्य देवता तारा आणि इतर आठ योगिनी असाव्यात

वज्रतारा देवता ही चतुर्मुख, प्रत्येक मुखाला त्रिनेत्र व अष्टभुजा स्वरूपाची आहे ही चार मुखे पीत, कृष्ण, शुभ्र व रक्तवर्णाची आहेत रक्तवस्त्र धारण करणारी पायावर पाय टाकून आसनस्थ आहे. तिचे हाती आयुधे वज्र, बाण, शख, वरदमुद्रा, नील कमल, धनुष्य, अकुश व तर्जनीमुद्रा याप्रमाणे आहेत काही शिल्पात आयुधामध्ये फरक आढळतो साधारणत कलकत्ता संग्रहालयातही या प्रकारची अष्ट पाकळ्यातील एक मूर्ति असून धनतारा, कुरुकुला यांच्याही मूर्ति अशा शिल्पात आढळतात काही ठिकाणी कमळाच्या पाकळ्यावर डाकिनी अगर नागकन्याच्या आकृति दाखवितात

वज्रवाराही—वज्रवाराही तत्र आणि चक्रसंहारतत्रातील ही एक प्रमुख देवता असून हेरुख बौद्धाबरोबर तिचा घनिष्ट सबध आहे एका साधनेमध्ये तिची उपाधी 'श्रीहेरुखदेवअग्रमहिषी' अशी आहे ती हेरुखदेवाची प्रथम पत्नी असून, वज्रयोगिनी ही दुसरी असावी या देवीचे शिल्प बहुधा नग्न असून तीव्र कामेच्छा असणारी आहे या देवीचे मुख डुकरिणीप्रमाणे (वराही) असल्याने हे नाव प्राप्त झाले आहे काही वेळा हिला डाकिनी असेही म्हणतात व तिच्या चार डाकिनी सहचरी असतात मारिची व ही देवी एकरूप मानत नव्हत

या देवतेसाठी अनेक साधना आहेत पण त्यापैकी बुद्धडाकिनी आणि वज्रवैरोचनी या जास्त प्रसिद्ध आहेत जेव्हा ती एकमुखी असते तेव्हा तिला दोन भुजा, त्रिनेत्र, रक्तवर्णा, नग्न, कामेच्छा दर्शविणारी, उजवे हाती वज्र, तर्जनीमुद्रा, डावीकडे कपाल आणि खट्वांग धारण करते कालरात्री देवीला पायाखाली तुडविते, गळ्यात रुंडमाळा धारण करून, त्यातून ठिबकत असलेले रक्त पीत असते ती ज्या चार कमलपत्रावर उभी असते, त्या प्रत्येकावर डाकिनी, लामा, खन्रोहा आणि रूपिणी या देवता असतात ज्याना जादूटोणा अगर मोहिनी मित्रा जमलात आणावयाची असेल, ते या देवतेची आराधना करतात

वरील प्रकारच्या एका स्वरूपाला आर्यवज्रवाराही असेही म्हणतात फक्त आयुधामध्ये फरक असतो या वेळी ती वज्र आणि अकुश, कपाल आणि तर्जनीमुद्रा असते व त्यामध्ये पाश असतो ती एकमुखी त्रिनेत्री व भयंकर स्वरूपाची असते

तो नोभाग्य करील, यास्तव त्यांनी त्या सापूचा शिरच्छेद केला परिणाम असा झाला की, तपश्चर्येच्या सामर्थ्याने त्याच्या मृत शरीराने अतिशय उग्र स्वरूप धारण केले आणि जवळच पडलेले बैलाचे मस्तक आपल्या शिरस्थानी ठेवून, त्या चोरांना ठार केले त्यांचे रक्त, त्याच्याच कपाळाच्या कवटीतून घगाघटा प्याला याचा मृड म्हणून सर्व तिबेट देश उध्वस्त करण्याची त्याने प्रतिज्ञा केली तेव्हा सर्व प्रजानन मजुश्री बुद्धाच्या चरणी नतमस्तक झाल्यावर, त्याने यमातकाचे स्वरूप घेतले व बैल मस्तक धारण करणाऱ्या यमाचे निर्मूलन केले मजुश्रीचा वरचष्मा दाखविण्यासाठी ही दतकथा प्रचलित असावी रक्तयमारी व कृष्णयमारी असे दोन भेद आहेत, त्याचा वर्णाने निराळी आहेत

**लक्ष्मी नारायण**—शिव शक्तींची मूर्ति जशी असते, तद्वत या देवतेची मूर्ति एकत्र अधिष्ठित असते बगाल प्रांती एक मूर्ति प्राचीन शिल्पाची आढळेली असून तिची उची सुमारे २० इच आहे डाका शहरापासून सुमारे २० मैलावर बारता गावी ती आह

भगवान नारायण कमलासनावर अधिष्ठित असून उजवा पाय खाली लोंबकळत आहे शख, पद्म, गदा, आणि चक्र याप्रमाणे चार भुजात आयुधे असून चक्र असणारा हात लक्ष्मीचे अगावर आहे

नारायणाचे डावे माडीवर लक्ष्मी बसलेली असून तिचा उजवा हात आपले पतीचे मानेभोवती आहे डावे हाती कमळ आहे उजवा पाय नारायणाचे माडीवर दुमटलेला असून डावा पाय खाली लोंबत आहे त्याचे वाहन गरुड खाली असून तो चतुर्भुज आहे जोडप्याचे लोंबते पाय जणु काय त्याने आपले दोन हातावर घेतलेले आहेत पुढील दोन नेहमीच्या नमस्कार पद्धतीत आहेत एकदर शिल्प आकर्षक आहे

**वज्रतारा**— रत्नसभवापासून या देवतेची निर्मिति झाली आह भागलपूर जिल्ह्यातील पथ्थर घाटाजवळ चादीपूर नावाचे देवस्थानचे एका क्षेत्री उत्खनना मध्ये एका मडक्यात कमळाच्या कळ्याच्या आकाराची आकृति मिळाली, आणखी काही इतर वस्तूही त्यामध्ये होत्या हा कमळाचा कळा सुमारे आठ इच उचीचा असून त्याखालील बैठक फारच नक्षीकुसरीची आहे कमल कळा बद ठेवण्यासाठी वरच्या बाजूस टोपीवजा झाकण आहे या कळ्याला आठ पाकळ्या असून त्या उघडल्या म्हणजे आतील बाजूला कोरलेली प्रत्येकी एक देवीची मूर्ति दिसते त्यापैकी काही उभ्या तर काही बसलेल्या आहेत पाकळ्या खाली पाडल्या म्हणजे मुख्य देवता तारा दिसून येते ती अष्टभुजा असून बसलेल्या स्थितीत आहे मूर्ति ब्रॉझ धातूची असून मस्तकावर स्तूपाचे आकाराचे शिरस्त्राण आहे साधारणत दहाव्या

शतकातील हे शिल्प असावे असे मानले जाते. कमळाच्या पाकळ्यांची उघड-झाप व मूर्तीचे दर्शन असे उत्कृष्ट शिल्प इंडिअन म्युझिअममध्ये पहावयास मिळते. मुख्य देवता तारा आणि इतर आठ योगिनी असाव्यात.

वज्रतारा देवता ही चतुर्मुख, प्रत्येक मुखाला त्रिनेत्र व अष्टभुजा स्वरूपाची आहे. ही चार मुखे पीत, कृष्ण, शुभ्र व रक्तवर्णाची आहेत. रक्तवस्त्र धारण करणारी पायावर पाय टाकून आसनस्थ आहे. तिचे हाती आयुधे वज्र, बाण, शंख, वरदमुद्रा, नील कमल, धनुष्य, अंकुश व तर्जनीमुद्रा याप्रमाणे आहेत. काही शिल्पात आयुधांमध्ये फरक आढळतो. साधारणतः कलकत्ता संग्रहालयातही या प्रकारची अष्ट पाकळ्यांतील एक मूर्ति असून धनतारा, कुरुकुला यांच्याही मूर्ति अशा शिल्पात आढळतात. काही ठिकाणी कमळाच्या पाकळ्यावर डाकिनी अगर नागकन्यांच्या आकृति दाखवितात.

वज्रवाराही—वज्रवाराही तंत्र आणि चक्रसंहारतंत्रातील ही एक प्रमुख देवता असून हेरुख बौद्धाबरोबर तिचा घनिष्ट संबंध आहे. एका साधनेमध्ये तिची उपाधी 'श्रीहेरुखदेवसंग्रामहिंशी' अशी आहे. ती हेरुखदेवाची प्रथम पत्नी असून, वज्रयोगिनी ही दुसरी असावी. या देवीचे शिल्प बहुधा नग्न असून तीव्र कामेच्छा असणारी आहे. या देवीचे मुख डुकरिणीप्रमाणे (वराही) असल्याने हे नाव प्राप्त झाले आहे. काही वेळा हिला डाकिनी असेही म्हणतात व तिच्या चार डाकिनी सहचरी असतात. मारिची व ही देवी एकरूप मात्र नव्हत.

या देवतेसाठी अनेक साधना आहेत. पण त्यापैकी बुद्धडाकिनी आणि वज्रवैरोचनी या जास्त प्रसिद्ध आहेत. जेव्हा ती एकमुखी असते तेव्हा तिला दोन भुजा, त्रिनेत्र, रक्तवर्णा, नग्न, कामेच्छा दर्शविणारी, उजवे हाती वज्र, तर्जनीमुद्रा, डावीकडे कपाल आणि खट्वांग धारण करते. कालरात्री देवीला पायाखाली तुडविते, गळ्यात रुंडमाळा धारण करून, त्यातून ठिबकत असलेले रक्त पीत असते. ती ज्या चार कमलपत्रावर उभी असते, त्या प्रत्येकावर डाकिनी, लामा, खंडरोहा आणि रूपिणी या देवता असतात. ज्याना जादूटोणा अगर मोहिनी विद्या अंमलात आणावयाची असेल, ते या देवतेची आराधना करतात.

वरील प्रकारच्या एका स्वरूपाला आर्यवज्रवाराही असेही म्हणतात. फक्त आयुधामध्ये फरक असतो. या वेळी ती वज्र आणि अंकुश, कपाल आणि तर्जनीमुद्रा असते व त्यामध्ये पाश असतो. ती एकमुखी त्रिनेत्री व भयंकर स्वरूपाची असते.

याशिवाय वज्रडाकिनी, रक्तडाकिनी, पद्मडाकिनी, विश्वडाकिनी या देवता वज्रवाराही वर्गात मोडतात.

वज्रयोगिनी— या प्रांतातील ही एक प्रमुखदेवता असली तरी हिचे वैशिष्ट्य म्हणजे मस्तकी वंशावळ दाखविण्यासाठी ध्यानी बुद्धाची आकृति नसते. या देवीसाठी चार साधना सांगितलेल्या आहेत. पण यामध्येही दोन प्रकार आहेत. एकामध्ये देवीचे मस्तक छाटलेले असून ते हातात धरलेले आहे, तर दुसऱ्यामध्ये ते छाटलेले नाही. या देवीचे मंत्रावरून असे दिसते की, पहिलीचे नाव सर्वबुद्धडाकिनी असून दुसरीचे नाव वज्रयोगिनी असे आहे. पहिले स्वरूप दशमहाविद्यांपैकी छिन्नमस्ता स्वरूपाचे दिसते. यावरूनही बुद्धदेवता हिंदु देवतांमध्ये मागाहून समाविष्ट करण्यात आली असावी. वज्रवैरोचनी आणि वज्रवर्णी या दोन देवता दोन्ही बाजूला रक्षणकर्त्या म्हणून असतात.

या देवीचे ध्यान वर्णन करताना साधनमाला सांगते की, ही भट्टारिका योगिनी समजावी. पीतवर्णा, नग्न, उजवा पाय सरळ तर डावा पाय वाकलेला. उजवे हाती कात्रीने कापलेले स्वतःचे मस्तक, तर डावे हाती तर्जनीमुद्रा असते. साधकाने असे चिंतन करावे की, मस्तकातून जे रक्त खाली ओघळत आहे ते स्वतःचे मुखात प्रसाद म्हणून पडत असून तसेच एक धारा बाजूचे योगिनीचे मुखात पडत आहे. योगिनीचे हाती कात्री असून दुसरे कपाल आहे.

दुसऱ्या एका स्वरूपात ती फारच भयंकर आहे. कारण तिचे बाजूला जळते स्मशान आहे. ती रक्तवर्णा असून सूर्यदेवावर उभी आहे. ती प्रेतवाहना असून, नग्न, त्रिनेत्री, ढेरपोटी व जिव्हा बाहेर आलेली असून हातात कपाल, वज्र, खट्वांग आयुधे आहेत. नैरात्मा देवीचे जरी किंचित साम्य असले तरी ते स्वरूप मात्र नव्हे. पुढील एका साधनेत तिचे हाती असलेल्या कपालात देवांचे आणि दुसऱ्यात दैत्यांचे रक्त भरलेले असते. ती हेरुक बुद्धाची एक पत्नी आहे. हे आपण मागे पाहिलेच आहे.

वर्गभीमा—तामलुक ( बंगाल ) येथे ही देवी बुद्ध विहारामध्ये आहे. ही तारा वर्गातील आहे. या मंदिराचे तीन प्रमुख भाग पडतात. पहिला बडादेऊळ, ज्यामध्ये मूर्ति आहे, दुसरा जगमोहन म्हणजे सभामंडप आणि तिसरा नटमंदिर. जेथे भक्तांना देवापुढे ठेवण्याच्या वस्तु ठेवता येतात. बडादेऊळ व जगमोहन हे भाग जोडणाऱ्या जागेला ज्ञानमंडप म्हणतात व तेथे धर्मचर्चा चालते. या मंदिराप्रत जाण्यास २२ पायऱ्या चढून वर जावे लागते आणि विशेष म्हणजे येथे नौबतखाना आहे. तसेच संरक्षणासाठी बाहेरच्या प्राकाराला तटबंदी आहे. मूर्ति चतुर्भुज असून, भगवान शंकराच्या शरीरावर उभी आहे. हातात त्रिशूळ, तरवार,

माणसाचे मुंडके व राक्षसाचे मुंडके ही आयुधे आहेत. वैशिष्ट्य म्हणजे या देवीच्या आसनावर दोन सिंहाच्या पिंड्या आणि दशभुजा महिषामर्दिनीची मूर्ति आहे.

या मंदिराची बांधणी ओरिसा रीतीची आहे, हे बडादेऊळ, जगमोहन व नटमंदिर या निरनिराळ्या भागावरून म्हणता येते. पुरी येथील जगन्नाथ मंदिर आणि मिदनापूर येथील मंदिराची बांधणी याच प्रकारची आहे. या देवतेच्या उत्पत्तीसंबंधी कथा अशी की, पूर्वी गरुडध्वज राजाच्या वेळी, एक कोळी दररोजप्रमाणे राजाला ताजे मासे न देऊ शकल्याने, राजाने त्याला फाशीची शिक्षा सुनावली. कैदखान्यातून त्याने पळून जाऊन जगलात फिरत असता, देवीवर संकट घातले की, अशा संकटातून याची मुक्तता व्हावी, कारण रोज मासे मिळणे हे दैवावर अवलंबून होते. त्यावर देवीची कृपा होऊन तिने त्याला दर्शन देऊन सांगितले की, माशाचा साठा जमा करून तो वाळवून ठेव व लागेल त्याप्रमाणे, त्यावर एका विवक्षित विहिरीतील जलसिंचन केल्यास ते मासे जिवंत होतील व त्याचा कार्यभाग होईल. त्या विहिरीतील पाण्याचा असा अलौकिक गुण आहे की, मर्त्यजिवावर जलसिंचन केल्यास त्याला पुन्हा प्राण परत मिळतील. याप्रमाणे दररोज ताजे मासे कसे मिळतात, याचे गुपित राजाने त्या कोळ्यापासून काढून घेऊन, तेथे जाण्याचे ठरविताच, आजपावेतो जी देवता त्या कोळ्याच्या घरी होती, तिने कोळ्याने विश्वासघात केला म्हणून त्या विहिरी-च्या मुखावर जाऊन बसली, कारण राजाला जर ते दिव्य जल मिळेल तर त्याचा दुरुपयोग होऊन सर्वत्र हाहाःकार माजला असता. कोळ्याने विहिरीची जागा दाखविली, पण तेथे देवीचे आसन झाल्यामुळे राजाला विहीर दिसली नाही. सत्य परिस्थिति समजल्यावर आणि देवतेचे अलौकिक कर्तृत्व समजल्यावर, त्याने त्या मूर्तीवर मंदिर उभारले.

दुसरी एक कथा अशी की, धनपति व्यापारी आपली जहाजे माल भरून रूपनारायण नदीच्या प्रवाहातून चालला असता तामुलख बंदरात थांबला होता. रस्त्याने एक मनुष्य सुवर्णाचा तांब्या घेऊन जाताना त्याने पाहताच, त्याने त्याला विचारले. तेव्हा तो मनुष्य म्हणाला की, या क्षेत्री जंगलात एका ओढ्याच्या प्रवाहात वस्तु घातली तर त्वरितच ती सुवर्णाची होते. परीक्षा घेण्यासाठी म्हणून त्या व्यापाऱ्याने जवळची सर्व तांब्या-पितळेची भांडी त्या ओढ्यात घालताच सर्व सुवर्णाची झाली. ती सर्व भांडी त्याने सिलोनला पोहोचल्यावर विकली आणि जो नफा झाला, त्यातून मंदिर उभारले.

तेथील बांधणीचे वैशिष्ट्य असे की, पायामध्ये मोठमोठे लाकडाचे ओंडके

वापरले असून त्यावर पाया ३० फूट उंचीचा बांधला आहे. तसेच संरक्षण भिंत तळाला ९ फूट जाड असून उंची ६० फुटांची आहे. जाड जाड दगड वापरले असून एवढे भव्य पाषाण या ठिकाणी कसे जमविले यांचे पाहणाराला आश्चर्य वाटते. तळ्याच्या काठी पुन्नाग वृक्ष असून, त्याची सेवा केल्यास स्त्रियांना संतति मिळते, पण तसे करताना आपली सर्व संपत्ती एका टोपलीत भरून, डोक्यावर घेऊन, पाण्यातून त्या वृक्षाला अर्पण करावी लागते. नदीचे पाणी किती वाढले तरी आजवर मंदिराप्रत येऊन परत जाते, अशी अलौकिक कृति अनुभवास येते.

( मिदनापूर जिल्हा गॅझेट, L. S. S. O'Malley, P. 222-223 )

विद्युज्वाला कराली— एकजटा देवीचे १२ मुखांचे हे स्वरूप होय. बुद्ध देवाच्या घामापासून या देवतेची निर्मिति झाली. नीलवर्णी, २४ भुजांत तरवार, वज्र, चक्र, रत्न, अंकुश, बाण, भाला, हातोडा, मुसळ, करवत, डुंडुभी, माळा; डाव्या बाजूला धनुष्य, पाश, तर्जनीमुद्रा, निशाण, गदा, त्रिशूळ, भांडे, नील कमळ, घंटा, कुऱ्हाड, ब्रह्मदेवाचे तुटलेले मस्तक आणि कपाल यांप्रमाणे आयुधे असतात. ब्रह्मा-विष्णु-शिव-इंद्र यांच्या शरीरावर नाचणारी, प्रत्यालीढ आसनात उभी असणारी, अग्नीप्रमाणे भयंकर संहारक भासणारी, 'आ' पसरून मुख असणारी व हाँ हाँ शब्द बाहेर पडत असणारी, जीभ बाहेर निघालेली, कपाळावर भयंकर आठ्या घालणारी, मस्तकी रूंडमाळा धारण करणारी, सर्पालंकार घालणारी, नीलवर्णी मुख, नंतर शुभ्र, पीत, हरित, रक्त, धुरकट या रंगांची मुखे असणारी; प्रत्येक मुखावर त्रिनेत्र असणारी, मस्तकी अग्नीज्वाळा-प्रमाणे जटा ठेवणारी, ढेरपोटी, उन्नत वक्षःस्थल, उसासा टाकीत असलेली, वाघाचे कातडे पांघरणारी, मस्तकावरील मुकुटावरील ध्यानी बुद्ध अक्षोभ्याची आकृति धारण करणारे स्वरूप भयंकर उग्र व हेकट असे आहे.

या देवीचे वैशिष्ट्य म्हणजे हिंदु देव इंद्र-ब्रह्मा-शिव-विष्णु यांचे वाहन या देवीने बनविलेले आहे. या देवतेचे शिल्प वरील वर्णनाप्रमाणे मिळणे फारच दुर्मिळ आहे. साधनमाला ग्रंथात या देवीची साधना व मंत्र दिलेले आहेत.

( भारतीय बौद्ध मूर्तिकला, पृ. ८१ )

*श्यामतारा*—*या देवीची मूर्ति ४ फूट उंच आणि २ फूट रुंद, पद्मासना*-वर आरूढ असलेली, डावा पाय दुमडलेला व उजवा खाली सोडलेला, कृष्ण पाषाण वर्णाची, उजवा हात वरद-मुद्रा आणि डावे हाती पद्मासनातून वर येत असलेले कमळ वितर्कमुद्रा स्वरूपात धरलेले अशी आहे. आसनावरील शिल्पात वज्रसत्वाचे स्वरूप दिसत असून, त्याने उजवे हाती वज्र व डावे हाती घंटा घेतलेली आहे. मूर्तीचे उजवे बाजूला लहान आकाराची अशोककांता देवीची

मूर्ति असून, डावे हाती तिने अशोकाचे पान घेतलेले आहे व उजवा हात अभय मुद्रेमध्ये आहे. हातातील अशोकाचे पान, एखाद्या पिसाप्रमाणे भासत आहे. हे स्वरूप महामयुरी देवीचे असावे असेही म्हणतात. कारण हातातील पीस मयुराचे आहे. डावे बाजूची मूर्ति गलेलट्ट, एकजटा देवीची असून एका हाती चाकू आणि दुसऱ्यात कपाल आहे. सभोवारच्या प्रभावळीमध्ये लहानसर आठ तारादेवींच्या मूर्ति आहेत. त्यांचे डावे हाती कमळ आणि उजवे हात अभयमुद्रामध्ये आहेत. उजवेकडील दोन देवतांना सिंह व हत्तीचे वाहन आहे. प्रभावळीचे मध्यभागी कृत्तिमुखाचे शिल्प आहे. बाराव्या शतकातील हे शिल्प असून 'कायस्थ गंगेश गुप्त' अशी अक्षरे कोरलेली आहेत.

सोमणारा, तहसील-मुनशीगंज, डाका या गावी ही मूर्ति सापडली असून सांप्रत ती डाका येथील संग्रहालयात आहे.

दुसऱ्या एका या देवीचे शिल्पात प्रभावळीमध्ये उजवीकडे रत्नसंभव आणि डावीकडे अक्षोभ्य बुद्ध यांचे शिल्प आहे. वरील शिल्पापेक्षा हे शिल्प प्राचीन असावे. ही मूर्ति ढाका जिल्ह्यामध्ये खैलकैर या गावी आढळलेली आहे.

सीतातपत्रा—तारादेवीचाच हा एक प्रकार असून, मूर्ति शुभ्रवर्णा व हातामध्ये छत्र धरलेले असल्याने हे नाव प्राप्त झालेले आहे. गेटी संशोधकाने या देवीचे वर्णन करताना तिला त्रिशिरा म्हटले आहे. ती अष्टभुजा असून, दोन हातांनी माथ्यावर छत्र धरलेले असून, इतर हाती चक्र, धनुष्य, बाण, पुस्तक इ० आयुधे आहेत. तिचे स्वरूप मोहक आहे. तिच्या छत्राछायेखाली ती आपल्या भक्तांचे रक्षण करते असे मानतात. साधारणतः ती पद्मासनस्थ असून, डावा पाय मोडून व उजवा पाय खाली सोडून बसलेली असते. बौद्धदेवतांना साधारणतः ब्राह्मणदेवताप्रमाणे वाहन नसते, तसे या ठिकाणी देवीलाही नाही. तसेच ब्राह्मणदेवतांना साधारणतः माथ्यावर छत्र असते. परंतु बौद्धदेवतांना ते क्वचितच आढळते. ही वैरोचनाचे कुळातील देवता होय.

बंगालमधील टिपेरा येथे अशी मूर्ति आढळली असून, सांप्रत ती डाका संग्रहालयात ठेवण्यात आलेली आहे. मूर्ति जीर्ण झालेली असली व हातातील आयुधे पुसट झालेली असली, तरी इतर वर्णनावरून ती सीतातपत्रा असावी असेच संशोधकाचे मत आहे.

सर्वाणी—दुर्गादेवीच्या सोळा नावांपैकी एक नाव होय. बंगालमध्ये टिप्पेरा जिल्ह्यात देऊळवाडी गावी या देवीची मूर्ति उपलब्ध आहे. हे गाव कोमिल्लापासून सुमारे २० मैल दूर आहे. मूर्तीखालील शिलालेखावरून दिसून

येते की, सातव्या शतकातील देव-खद राजाची राणी प्रभावतीने त्यावर सुवर्णाचे पाणी चढविले होते. राजा जरी बौद्धधर्मीय होता, तरी राणीने ब्राह्मणदेवतेचे ठिकाणी श्रद्धा ठेवावी, यावरून दोन्ही पंथातील मत-भेद इतके विकोपास गेलेले नव्हते असे म्हणता येईल.

ही अष्ट धातूची मूर्ति सुमारे २० इंच उंचीची प्रभावळीसहित आहे. प्रभावळीचा वरचा भाग तुटलेला आहे. देवतेला आठ भुजा असून त्यामध्ये अनुक्रमे बाण, तरवार, चक्र, शस्त्र, त्रिशूळ, घटा, ढाल आणि धनुष्य अशी आयुधे आहेत. हातात मद्याचा पेला घेऊन दोन्ही बाजूला दासी उभ्या, वाहन सिंह जवळच उभा आहे. ती कमळावर उभी असून एकूण शिल्प कल्पक असले, तरी सुबक नाही. देवीचे वरीलप्रमाणे ध्यान, शारदातिलकतंत्रामध्ये (अ. १०) दिलेले आहे. ते मूळातून वाचणे योग्य होईल. राजशाही येथील संग्रहालयात ही मूर्ति आहे. (बौद्ध मूर्तिकला, पृ. २०४)

हारिती—हृ = हरण करणे, यापासून हे नाव प्राप्त झाले आहे. महावस्तु या बौद्ध धर्मग्रंथामध्ये या देवतेच्या उत्पत्तीची कथा अशी दिलेली आहे की, हिमालय प्रदेशात कुंडला नावाची यक्षिणी रहात असे. दरवर्षी ती १०० मुलांना जन्म देई. येणेप्रमाणे १००० मुलांना जन्म दिल्यावर ती मरण पावली.

जीवनशक्तीचे हरण करणारे काही महारोग अथवा देवीच्या साथीचे रोग वैशाली शहरात पसरले आणि शहरात मरणांतिक कहर उडाला. त्याना असे वाटले की, तपस्वी, साधुपुरुष याचे निवारण करू शकतील. याकरिता त्यांनी क्रमाक्रमाने कश्यप, मस्करी गोशालीपुत्र, ककुद कात्यायन, अजित केसकंबली, संजयी वरतीपुत्र, निग्रंथ ज्ञातीपुत्र इ० त्या वेळच्या तपोनिष्ठाना बोलाविले, पण त्यांच्या कर्मठपणाने ही साथ थांबली नाही.

त्यानंतर सालोहिता नावाच्या गृहस्थाला देवतांचा दृष्टांत झाला की, भगवान गौतमबुद्ध या शहरी आला तर साथीचे निर्मूलन होईल. त्याप्रमाणे नगरवासियाना त्याने दृष्टांत सांगितला आणि गौतमाना आणण्यासाठी तो गेला. तेथील लिच्छवी जमातीने आपला प्रतिनिधी म्हणून तोमर नावाचा गृहस्थ बरोबर दिला. या वेळी गौतमबुद्ध बिंबसार राजाच्या घरी होता. राजाने त्याची विनंती मान्य केली आणि मोठ्या भव्य स्वागतसमारंभात गौतमबुद्ध वैशाली नगरात शिरला असताना रोगराई संपूर्णपणे नष्ट झाली.

विनयपिटक ग्रंथाप्रमाणे मगध देशाची संरक्षक देवता राजगृह येथील नंदिनी नावाची होती. पूर्वजन्मातील मरणकालीच्या दुष्ट वासनेमुळे, तिने येथील

आतारामध्ये मगधवासियांची मुले खाण्याचा सपाटा चालविला रोगराईने मुलांचे मरण घडवून आणावयाचे आणि भक्षण करावयाचे याप्रमाणे मुले चोरणारी म्हणून हारिती नाव प्राप्त झाले तिची खोड जिरविण्यासाठी बुद्धाने एका वेळी तिचा आवडता मुलगा पिंगल याला लपवून ठेवले आणि नरमांस खाणार नाही या अटीवर तिला परत केला तिला नित्य खावयास मिळावे, म्हणून प्रत्येक बौद्ध मठात सकाळी काही वाढून खाणे ठेवावे, असा नियम त्याने घालून दिला

या मूर्तीचे जे स्वरूप उपलब्ध आहे, त्यावरून ती कृष्णपाषाणवर्णा, कमलावर बसलेली, चतुर्भुज असून वरील एका हातात मासा व दुसऱ्यात पानपात्र घेतलेले असून, खालील दोन हातांनी मुलाला खेळवीत असते पैकपाद गारी ( ढाका ) १'–७ × १० आकाराची मूर्ति आढळली असून सांप्रत ती ढाका संग्रहालयात आहे ती महायानपंथियांची देवता होय.

तामलुक ( मिदनापूर ) येथे या देवीचे एक मंदिर आहे श्री बील या संशोधकाच्या मते, दक्षिणेतील चालुक्य व इतर राजघराणी ही या देवीचे वंशज आहेत अगर भक्त होते कारण त्यांना हरितीपुत्र म्हणत असत येथील मूर्ति वराह मंदिरात आहे आणि वराह हे त्या राजघराण्याचे प्रमुख सन्मानचिन्ह होते ( बंगाल मंदिरे–राय चौधरी, पृ ८८ )

ती मुले देणारी, रक्षण करणारी, तसेच धनसंपदा देणारी देवता आहे भारतीय बौद्धमठात या देवतेची मूर्ति देवडीवर अगर भोजनगृहाच्या एका कोपऱ्यात स्थापन केलेली आढळते आणि या वेळी आपल्या हाती ती मूल घेतलेली असून काही मुले तिच्याजवळ खेळत आहेत, असे शिल्प असते

वरील प्रमुख देवताव्यतिरिक्त महाशीतवती, महामयुरी, ग्रहमातृका, ज्वालामुखी, धूपतारा, वश्यतारा, पद्मतारा, पुष्पतारा, प्रदीपतारा, प्रसन्नतारा, राजश्रीतारा, षड्भुजतारा, धान्यमंजिरी, पद्मजालिनी, पद्मडाकिनी, भीष्मभगिनी, भूचरी, मासकी, महाप्रज्ञाधारी, रौद्री, वज्रचर्चिका, वज्रशृंखला, वज्रांगधारी, वज्रविदारिणी, वराल्किा, वसुधारिणी, वाराही, विन्धाटवी, विश्वडाकिनी, शामादेवी, लोकेश्वरी, सर्वडाकिनी, सुमालिनी, स्तम्भदेवी, संक्षिप्तप्रज्ञा, हेमाही इत्यादि अनेक देवता आहेत, पण स्थलाभावी या सर्वांची स्वरूपे व इतर माहिती देणे टाळले आहे. बौद्ध पंथियांच्या शक्तिदेवतेसंबंधी सर्वसाधारण माहिती व्हावी एवढा हेतु वरील विवरणाने साध्य होईल

संदर्भग्रंथ :

१. साधनमाला, भाग १–२. विनयतोष भट्टाचार्य, ओरिएन्टल इन्स्टिट्यूट, बडोदा, १९२८.

२. Indian Buddhist Iconography by Vinoytosh Bhattacharya, 1924. (भारतीय बौद्धमूर्तिकला)

३. Buddhist and Brahmanical Sculptures in Dacca Museum, by N. K. Bhattasali, 1929.

४. Buddhism & Hinduism by Sir Charles Elliot.

५. The culture of South-East Asia, by Reginald Le May, Govt. of India Publication, 1952.

६. भारतीय संस्कृतिक कोश, पं महादेवशास्त्री जोशी व काही इतर ग्रंथ.

७. Studies in Jainism & Buddhism in Mithila, by Upendra Thakur (1964).

८. Popular Dictionary of Buddhism, by Christmus Humphrey.

# जैनपंथीय देवता

या पंथातील देवता समजून घेण्यापूर्वी त्या धर्माची प्रमुख धर्मतत्त्वे दिगंबर आणि श्वेतांबर उपपंथ, तीर्थंकर, यक्ष व यक्षिणी, दिक्पाल, नवग्रह यांचीही त्रोटक माहिती असणे अवश्य आहे. विषय समजण्यास त्यामुळे सुलभता येईल.

जैनपंथ हा आर्य धर्मांचाच एक उपपंथ आहे, असे त्यातील आचार-विचार, तत्त्वे, मूर्ति यांवरून म्हणता येते. दसरा-दिवाळीसारखे आर्य लोकाचे सणही हा पंथ पाळतो. हा पंथ वेदप्रामाण्य मानीत नसून त्याऐवजी अंग व सूत्रे याना प्राधान्य देतो. याची मुख्य गमके म्हणजे—

( अ ) सर्व प्राणिमात्रावर अतिशय दया करणे म्हणजेच अहिंसा पाळणे.

( आ ) साधु-पुरुषांचे पूजन म्हणजे तीर्थंकरांना काही वेळा देवादिकापेक्षाही श्रेष्ठ मानणे.

( इ ) या पंथातील यती संस्था हे एक वैशिष्ट्य आहे. त्याने द्रव्यसंचय करावयाचा नसून, फक्त भिक्षेसाठी आपला मठ सोडावयाचा असतो. मिताहार, मितोपभोग, मौन, संयम, ब्रह्मचर्य इ० कडकपणे पालन करावे लागते. प्रवासासाठी वाहन वापरावयाचे नाही. यामुळे त्याने धार्मिक पूजन केले नाही तरी चालते ही त्याला खास सवलत आहे.

( ई ) या धर्मातील पूजक आर्यांप्रमाणेच जलपूजा, चंदनपूजा, अक्षतपूजा आणि नैवेद्य यानी पूजन पुरे करतो. त्यानंतर आरती होते.

( उ ) दिपवाळी धनत्रयोदशी, शारदापूजन, लक्ष्मीपूजन, शीतलापूजन, दसरा, मकरसंक्रांत यासारखेही सण पाळतात. इ० इ०

श्वेतांबर-दिगंबर—हा भेद पडण्याचे कारण असे दिले जाते की, सनपूर्व ३१५ च्या सुमारास मगध देशात भयंकर दुष्काळ पडल्याने, अनेक जैन कुटुंबे, उदरनिर्वाहासाठी, भद्रबाहूचे मार्गदर्शनाखाली दक्षिणेकडे सरकली. जी कोणी मागे राहिली त्यांचा स्थूलभद्र हा पुढारी बनल्यावर, पाटलीपुत्र येथे जैन ग्रंथांचे रक्षण करण्यासाठी त्याने एक धार्मिक सभा भरविली. एकूण १२ अंग ग्रंथ त्याने जमविले आणि राहणीमानही सुधारले. दुष्काळ संपल्यावर भद्रबाहू आणि इतर परत आले. पण त्यांनी धर्मसभेचे निर्णय मानण्याचे आणि अंगात कपडे घालण्याचे तेथील स्थानिक लोकाचे आचार, अंगीकारण्याचे नाकारले.

वास्तव श्वेतांबर म्हणजे शुभ्रवस्त्र धारण करणारे व दिगंबर म्हणजे आकाशवस्त्र (वस्त्रे नाहीत) वापरणारे जैन होत या दोन पंथात आढळणारा फरक खालील प्रमाणे आहे—

(१) श्वेतांबर आपली दैवते व तीर्थंकर यांच्या मूर्ति सोन्यामोत्यांनी आणि वस्त्रालंकारांनी सजवितात, दिगंबर नग्न स्थितीतच ठेवतात.

(२) श्वेतांबराचे मते १२ स्वर्ग व ६४ इंद्र आहेत, तर दिगंबरपंथी १६ स्वर्ग आणि १०० इंद्र मानतात

(३) श्वेतांबराचे गुरु पात्रातून भोजन करतात, तर दिगंबर पंथी जर आपले दोन्ही हाताने करपानात घेऊन भक्षण करतात.

(४) श्वेतांबर अन्न, दान, भिक्षा घेण्यासाठी काष्ठपात्र घेतात, तर दिगंबरपंथीय तसे घेणे पसंत करीत नाहीत

(५) श्वेतांबर आपले धर्मग्रंथ अंगे ही तीर्थंकरांचे शिष्यांनी लिहिलेली आहेत असे मानतात, तर दिगंबरपंथीय ती पुढील आचार्यांनी रचलेली आहेत असे मानतात कारण मूळ अंगग्रंथ हे हरवलेले आहेत इ० इ० कालांतराने लुंकग, स्थानक वासी, धुंडिया असे अधिक पोटभेद मूर्तिपूजेच्या आचारावरून उत्पन्न झालेले आहेत.

तीर्थंकर—भविष्यकाळ जाणून धर्मतत्त्वे सांगणारा, प्रचार करणारा गुरु. या ठिकाणी तीर्थ याचा अर्थ धर्म असा केला जातो तेव्हा धर्मतत्त्वे सांगणारा व संसारसागरातून पैलथडीला नेणारा तो तीर्थंकर होय. हे सर्व तीर्थंकर उपजत मानव होते पण आपल्या अलौकिक कर्तृत्वाने, त्यागाने व जनतेच्या उन्नतीसाठी झटल्याने त्यांना देवपणा प्राप्त झालेला आहे तीर्थंकराचे दुसरे नाव जिन असे आहे राग, लोभ, द्वेष, काम इ० ज्याने जिंकले तो जिन होय यांची संख्या एकूण २४ आहे धर्मधमसंयोगाने विष्णूची जी २४ नावे संध्यासमयी ब्राह्मण उच्चारतात, ती संख्याही तितकीच आहे सर्वच तीर्थंकरांना सारखे महत्त्व नाही पहिला आणि शेवटचे दोनतीन जास्त महत्त्वाचे मानले जातात त्यांची नावे क्रमाने अशी —(१) आदिनाथ अथवा ऋषभनाथ, (२) अजीतनाथ, (३) संभवनाथ, (४) अभिनंदन, (५) सुमतीनाथ, (६) पद्मप्रभा, (७) सुपार्श्वनाथ, (८) चंद्रप्रभा, (९) सुविधीनाथ, (१०) शीतलनाथ, (११) श्रेयांसनाथ, (१२) वासूपूज्य, (१३) विमलनाथ, (१४) अनंतनाथ, (१५) धर्मनाथ, (१६) शांतीनाथ, (१७) कुंथनाथ, (१८) अरनाथ, (१९) मल्लीनाथ, (२०) मुनिसुव्रत, (२१) नेमीनाथ, (२२) नामिनाथ,

( २३ ) पार्श्वनाथ, ( २४ ) महावीर. प्रत्येकाच्या उत्पत्तीच्या व कर्तृत्वाच्या कथा उपलब्ध आहेत. श्वेतांबराच्या कल्पसूत्र ग्रंथाप्रमाणे शेवटचा तीर्थंकर महावीर इसपूर्व ५२७ या वर्षी निर्वाणपदाला गेला. पण दिगंबरपंथियांना हे मत मान्य नाही. प्रत्येकाला एक यक्ष आणि एक यक्षिण सेवेकरी असतात.

दिक्पाल— ब्राह्मणधर्मात ज्याप्रमाणे अष्ट दिक्पाल-संस्था आहे, तद्वत् जैनपंथियांनी तीच संस्था आत्मसात करून, त्यांना तीर्थंकराच्या खाली स्थान दिलेले आहे. या पंथातील श्वेतांबर आणि दिगंबर हे दोन्हीही पंथ दिक्पाल मानतात. काही वेळा त्याच्या धर्मग्रंथामध्ये यांना लोकपाल म्हणूनही संबोधिले आहे—

( १ ) पूर्वदिशा रक्षण करणारा इंद्र व त्याची पत्नी शची. ऐरावतावर बसून हाती वज्र धारण करतो. तो सहस्राक्ष आहे.

( २ ) आग्नेय दिशेचा स्वामी अग्नि व पत्नी स्वाहा. मेंढा वाहन, हाती शक्ति घेतो.

( ३ ) दक्षिण दिशेचा स्वामी यम व पत्नी छाया. महिष वाहन असते. वास्तविक छाया ही सूर्यपत्नी आहे.

( ४ ) नैर्ऋत्य दिशेचा स्वामी नैऋत. प्रेतवाहना, हातात तरवार व गदा धारण करतो. वाघाचे कातडे पांघरतो.

( ५ ) पश्चिम दिशाधिपति वरुण, मकर वाहन, हाती पाश धारण करतो. काही वेळा हाती मत्स्य घेतो.

( ६ ) वायव्य दिशेचा स्वामी वायु, मृगवाहना असून हाती वज्र अगर निशाण धारण करतो. दिगंबरपंथीय हाती लाकडी हत्यार घेतो. या ठिकाणी हातातील आयुधे ही ब्राह्मणधर्मातील दिक्पालापेक्षा वेगळी आहेत.

( ७ ) उत्तरदिशाधिपति कुबेर, यक्ष वर्गाचा राजा होय. पुष्पक विमानातून जातो व कैलास प्रांतावर सत्ता गाजवितो. परंतु जैन पंथात तो मानव वाहन वापरतो आणि हाती रत्ने व गदा घेतो.

( ८ ) ईशान्य दिशेचा स्वामी ईशान, हा वृषभवाहना, हाती धनुष्य व त्रिशूल घेतो. मस्तकावर जटा धारण करून सर्पालंकार घालतो. सारांश, हा शंकरच होय. ईशान हे शंकराचे एक नावही आहे.

( ९ ) ब्रह्मदेव उत्तर प्रांतावरील सर्वाधिकारी.

(१०) नागराज वासुकीला दक्षिण प्रांतावरील सर्वाधिकारी नेमलेले आहे. सर्व मिळून दहा दिक्पाल होतात.

वरीलप्रमाणेच नवग्रहांची संस्था या धर्माने आत्मसात केलेली आहे. सूर्य आणि त्याची प्रभावळ चंद्र, मंगळ, बुध, बृहस्पति, शुक्र, शनी, राहु, केतु हे सर्व उपग्रह तसेच घेतलेले आहेत.

यज्ञ-समारंभाच्या वेळी अष्ट देवतांना आवाहन करतात, त्यांची नावे येणेप्रमाणे—

**जया**— कर्मांच्या पांच प्रकृतींवर ज्याने जय मिळविला आणि आपल्या भक्तांनाही जय मिळविण्यास सहाय्य करते तो अशा जिनेश्वराचे पूजन करणारी देवता.

**विजया**— सुंदर व विलोभनीय इष्ट पदार्थांवर ज्याने जय मिळविला, अशा जिनेश्वराचे पूजन करणारी विजया देवता.

**अजिता**— अठ्ठावीस मोह प्रकृतींचा पराजय करून ज्याने मोह जिंकला आणि भक्तजनांना जिंकावयास सहाय्य करतो, अशा जिनेश्वराची सेवा करणारी देवता

**अपराजिता**— दिव्य दृष्टि असल्याशिवाय सर्वसाधारण मानव शरीरांतर्गत कर्मांचा जे नाश करू शकत नाहीत, तो नाश करणाऱ्या जिनेश्वराची सेवा करणारी देवता.

**जंभादेवी**— ज्याने वेदनीय कर्मांपासून उत्पन्न होणाऱ्या क्षुधादिकांची मात्रा चालू दिली नाही आणि जंभारि अर्थात इंद्र यांच्याकडून पूजनीय झाला, अशा जिनेश्वराची सेवा करणारी देवता

**मायादेवी**— नानाप्रकारच्या विलोभनीय वस्तु संसाराची शृंखला वाढवितात व मोह उत्पन्न करतात, पण असल्या शृंखलांचा नाश करणाऱ्या जिनेश्वराची सेवा करणारी देवता

**स्तंभादेवी**— जिनेश्वराच्या चरणी मनरूपी भुंगा जिने स्तंभित करून, सर्व विघ्नांचे स्तंभन करणारी देवता.

**स्तंभिनी**— ज्याने गोत्र कर्मांची रूढि स्तंभित केली आहे, अशा जिनेश्वराची पूजन करणारी देवता

संकट निवारणार्थ या अष्ट देवतांचे पूजन करून मगच पुढील यज्ञकर्म चालू होते

**सप्तमाता**— श्री, ह्री, धृति, कीर्ति, बुद्धि, लक्ष्मी, शांति, पुष्टि या देवतांना सप्तमाता म्हणतात. कधी कधी यामध्ये जिनमातांचाही समावेश करतात

(प्रतिष्ठातिलक, अ. ५)

यज्ञ समारंभाचे वेळी विद्यादेवताना आवाहन केले जाते. या देवता चतुर्भुज असून जिनधर्माची प्रभावना या करीत असतात. एकातांच्या मार्गाचा या नाश करतात. या देवतांचे वर्ण, सुवर्ण, पीत, शुभ्र, नील, रक्त इ० १६ प्रकारचे वर्णन केलेले असून, त्यांची वहाने म्हणूनही अश्व, हत्ती, मयूर, हरिण, शरभ, कासव, सर्प, हंस इ० सोळा प्रकारची दिलेली आहेत. त्यांची नावे येणेप्रमाणे— रोहिणी, प्रज्ञप्ति, वज्रशृंखला, वज्रांकुशा, जांबुनदा, पुरुषदत्ता, काली, महाकाली, गौरी, गांधारी, ज्वालामालिनी, मानवी, वैरोटी, अच्युता, महामानसी, मानसी या होत. प्रतिष्ठातिलक ग्रंथाप्रमाणे यांची आयुधे दिलेली आहेत, पण खालील वर्णनात असल्यापेक्षा थोडी निराळी आहेत. (प्रतिष्ठातिलक, अध्याय ७)

या पंथामध्ये चोवीस तीर्थंकर झाले. त्यांच्या मातानाही देवता मानलेल्या असून शुभ कार्यप्रसंगी त्यांचे स्मरण केले जाते. त्यांची नावे येणेप्रमाणे— मरुदेवी, विजया, सुषेणा, सिद्धार्था, मंगलामति, सुषीमा, पृथ्वीषेणा, लक्ष्मणा, जयरामा, सुनंदा, विष्णुश्री, जयावती, जयश्यामा, सुव्रता, सुप्रभा, ऐरा, सुमित्रा, प्रभावती, पद्मावती, वप्रा, विनुता, शिवा, देवदत्ता, प्रियकारिणी या होत. या स्त्रिया कोणत्या तीर्थंकराच्या माता व कोणत्या राजाच्या राण्या होत्या यांचीही वर्णने प्रतिष्ठातिलक ग्रंथात दिलेली आहेत. याना जिनमाता असे संबोधिले जाते.

यक्ष अथवा यक्षिणींच्या नावातही एकवाक्यता आढळत नाही. वज्रशृंखला, महाकाली, अच्युता, शांता, सुतारा, चंडा, निर्वाणी, नरदत्ता, अनंतमति इ० नावे प्रतिष्ठातिलक देत नाही; तर त्याऐवजी नम्रेश्वी, संसारी, मनोवेगा, चामुंडी, विज्रंभिणी, परभृता, तारावती, मुंगविनी, कुसुममालिनी इ० नावे देतो. तसेच हातातील आयुधांचे बाबतीतही एकवाक्यता नाही. साराश, जैनपंथ जरी एक असला, तरी उपपंथियांची देवताकडे पाहण्याची दृष्टि वेगवेगळी असल्याने हा फरक आलेला असावा.

ब्राह्मणधर्मातील अष्टमातृका इंद्राणी, वैष्णवी, कौमारी, वाराही, ब्रह्माणी, लक्ष्मी, चामुंडा व रुद्राणी या मानलेल्या असून, यज्ञवेदीच्या आठ दिशाना संरक्षणासाठी त्यांची स्थापना करून पूजन करतात. त्यांची वाहने व वर्णही दिलेली आहेत.

यक्ष-यक्षिणी—या पंथामध्ये या दोघानाही फार महत्त्व आहे. यक्षिणी ही शासनदेवता या नात्याने ओळखली जाते. प्रत्येक तीर्थंकराबरोबर ही जोडी असते. यांचा समावेश या पंथामध्ये केव्हा झाला हे निश्चयात्मक सांगता येत नाही. पण यक्ष ही संस्था आर्यधर्मामध्ये असून देवतांचा खजिनदार म्हणून कुबेर यक्षाची योजना केलेली आहे. तसेच त्याची अलकानगरी होती असे उल्लेख

बौद्ध व जैनपंथाचे उदयाचे पूर्वी सापडतात. पूर्णभद्र, मणिभद्र, शालिभद्र, सुमनभद्र, सर्वेण, सर्वकाम, समृद्ध, अमोघ, असमत इ० यक्षांची नावे आढळतात. या वर्गाचा समावेश जैनपंथात होण्याचे असे एक कारण समजते की, भारतीयाचा यक्षगणाचा वर्ग म्हणजेच संपत्तीचे रक्षण करणारा होता आणि जैनपंथी हे बरेचसे संपत्तिमान असल्याने संपत्तीचे रक्षण करण्यासाठी हा आर्यांचा वर्ग त्यांनी आत्मसात केलेला असावा जैनपंथात यांचाच समावेश करताना त्यांनी सूत्र बनविले की, 'तीर्थंकराची सेवाभक्ति करणारा म्हणजे यक्ष होय' त्यांची अशी समजूत आहे की, प्रत्यक्ष इंद्रदेव, यक्ष यक्षिणींची प्रत्येक तीर्थंकरासाठी नेमणूक करतो उजव्या बाजूला यक्ष तर डावीकडे यक्षिणी उभी असते या वर्गाचे महत्त्व कालांतराने वाढल्यावर, यक्ष आणि यक्षिणी यांच्या मूर्तीही निराळ्या घडू लागल्या.

तीर्थंकराबरोबरील २४ यक्षांची नावे क्रमाने पुढीलप्रमाणे आहेत—

(१) गोमुख, (२) महायक्ष, (३) त्रिमुख, (४) यक्षेश्वर, (५) तुंबर, (६) कुसुम, (७) मातंग, (८) विजय, (९) अजित, (१०) ब्रह्मयक्ष, (११) ईश्वरयक्ष, (१२) कुमार, (१३) चतुर्मुख, (१४) पाताळयक्ष, (१५) किन्नर, (१६) गरुडयक्ष, (१७) गंधर्व, (१८) यक्षेंद्र, (१९) कुबेर, (२०) वरुण, (२१) भृकुटि, (२२) गोमेध, (२३) पार्श्व, (२४) मातंगयक्ष.

यांच्या मूर्ति चितारताना भुजा, आयुधे, आसन, वाहन इ० वर्णन आहे, पण प्रस्तुत प्रकरणाशी ते सुसंबद्ध नसल्याने दिलेले नाही.

यक्षिणींचा वर्गही जैन पंथाने ब्राह्मणधर्मातून घेतलेला दिसतो चक्रेश्वरी, निर्वाणी, अंबिका ही नावे तर ब्राह्मणधर्मातील आहेत तसेच काही यक्षिणींना विद्यादेवी असेही म्हणतात यक्षिणी या स्त्रीदेवता[1] या पंथाने मानलेल्या असल्याने त्यांचे वर्णन पहाणे, हे ग्रंथाचे मूळ उद्देशाला धरूनच होईल.

(१) चक्रेश्वरी — गरुडवाहना, श्वेतांबरपंथात ती अष्टभुजा, वरदमुद्रा, बाण, चक्र, पाश, धनुष्य, वज्र, अंकुश याप्रमाणे आयुधे, दिगंबरपंथात ती चतुर्भुजा अगर बारांभुजांची दाखवितात. या देवतेच्या एकटीच्या मूर्तीही आढळतात. या देवीचे वाहने आणि आयुधे यावरून ती विष्णूची शक्ति वैष्णवी असावी

१ टीप—या पाति शासन जैन सद्य प्रत्यूहनाशिनी।
साभिप्रेतसमृद्ध्यर्थं भूयाच्छासनदेवता ॥
(आदिश्वर चरित, पर्व १–३)

असे वाटते शिवाय चक्र धारण करणारा म्हणून विष्णूचे चक्रेश्वर असेही नाव होते, त्याची पत्नी ती चक्रेश्वरी होय.

(२) अजिता—या यक्षिणीचे दुसरे नाव रोहिणी असेही आहे. 'आचार्य दिनकर' ग्रंथाप्रमाणे बैल हे वाहन असून, वरदमुद्रा, पाश, महाळुंग व अंकुश ही आयुधे आहेत. ही अजितनाथाची सेवेकरीण होय.

(३) दुरितारी-- मेंढा वाहन असून हातात वरदमुद्रा, अक्षमाला, फळ व अभय याप्रमाणे आयुधे होत. प्रत्येक देवीच्या वर्णनाचा श्लोक आहे नमुना पहा

दुरितारिदेवीं गौरवर्णां मेषवाहनां चतुर्भुजां वरदां ।
अक्षसूत्रयुक्तदक्षिणकरां फलभयान्वितवामकरां चेति ॥
(निर्वाणकलिका)

या देवीचे दुसरे नाव प्रज्ञाप्ति असे आहे. देवीचे वाहन मेंढा, आणि हातात वरद व माला यावरून तिचा संबंध अग्नीच्या पत्नीबरोबर जोडता येतो.

(४) वज्रशृंखला—अभिनंदन तीर्थंकराची शासनदेवता. दिगंबरपंथी या देवीचे वर्णन हंसवाहना, चतुर्भुजा, हातात सर्प, पाश, माला व फल धारण करणारी असे करतात. श्वेतांबर तिला काली म्हणतात आणि कमलासनावर आरूढ असे वर्णन करतात. ही यक्षिणी असून, विद्यादेवीही आहे.

(५) महाकाली— सुमतिनाथाची ही शासनदेवता. श्वेतांबरपंथी ही देवी कमलासनावर आरूढ आणि हातात वरद, पाश, अंकुश ही आयुधे घेते. दिगंबरपंथीय या देवतेला पुरुषदत्ता म्हणतात. गजवाहना आणि हाती चक्र, वज्र, फळ, वरदमुद्रा दाखवितात, ही विद्यादेवीही आहे

(६) अच्युता—पद्मप्रभा तीर्थंकराची शासनदेवता हिचे शामा असे दुसरे नाव आहे. श्वेतांबरपंथीय देवीचे वाहन मनुष्य आणि शरद, वीणा, धनुष्य आणि अभय आयुधे दाखवितात. दिगंबरपंथीय हिला मनोवेगा असे म्हणून अश्ववाहना व हातात तरवार, भाला, फळ व वरदमुद्रा दाखवितात. अच्युत अथवा श्याम ही भगवान विष्णूची नावे आहेत, त्यावरून या देवीचे स्वरूप विष्णूचे असावे.

(७) शांता—सुपार्श्वनाथाची शासनदेवता श्वेतांबर हिला गजवाहना व हातात वरद, माला, भाला आणि अभय दाखवितात. ती सुवर्णवर्णा असते दिगंबर हिला काली म्हणून वृषभवाहना व हातात त्रिशूळ, फल, वरद आणि घंटा देतात.

मातग यक्षाची पत्नी म्हणून हिला मातग म्हणजे गजवाहन दिले असावे. ती विद्यादेवीही आहे.

(८) भृकुटी— चद्रप्रभा तीर्थंकराची शासनदेवता श्वेतांबर हिला माजर अथवा हस वाहन देतात हाती तरवार, गदा, माला व कुऱ्हाड आयुधे असतात. दिगबर हिला ज्वालामालिनी म्हणतात रेडावाहन, हाती चक्र, बाण, पाश, ढाल, त्रिशूळ, तरवार, धनुष्य आयुधे देतात म्हणजे तेथे ती अष्टभुजा आहे.

नाच्छेरा सस्थानपासून ५ मैल अतरावर पटानी मदिरात यक्षिणींच्या सहस्र मूर्ति आहेत तसेच ग्वाल्हेर किल्ल्यात यक्षिणी ज्वालामालिनी आहे.

(९) सुतारा—श्वेतांबर हिला वृषभवाहना, हाती वरद, माला, भांडे व अंकुश देतात, तर दिगबर कासव वाहन, हाती वज्र, गदा, फळ, वरदमुद्रा देतात तिला ते महाकाली म्हणतात

(१०) अशोका—शीतलनाथाची शासनदेवता श्वेतांबर हिला कमलासना, व हाती वरद, पाश, फळ आणि अंकुश देतात दिगबर हिला मानवी म्हणतात आणि डुक्कर वाहन देऊन हाती फळ, वरद, धनुष्य इ० आयुधे देतात ही एक विद्यादेवी आहे

(११) गौरी— दिगबर–हरिणवाहना. हाती गदा, कमळ, भांडे व वरदमुद्रा, श्वेतांबर–मानवी म्हणतात. सिंहवाहना, वरद, गदा, भांडे व अंकुश. ही ब्राह्मणवर्गातील देवता असून, ईश्वराची पत्नी होय येथे यक्षाचे नावही ईश्वर असेच आहे ही एक विद्यादेवी आहे.

(१२) चडा—हिला प्रचडा असेही म्हणतात श्वेतांबर–अश्ववाहना, हाती वरद, माला, फुले आणि गदा देऊन शामवर्णा मानतात. दिगबर–नक्रवाहना, हाती गदा, दोन हाती कमळे व वरदमुद्रा. हिला गधर्वी असेही म्हणतात. ही एक विद्यादेवी आहे

(१३) विदिता/विजया/वैरोटी— श्वेतांबर–कमलासना, हाती बाण, पाश, धनुष्य व सर्प धारण करते. दिगबर-वैरोटी म्हणतात. सर्पवाहना व हाती दोन सर्प, धनुष्य व बाण धारण करते. ही विद्यादेवी आहे हा एक दुर्गादेवीचा अवतार असावा

(१४) अंकुशा/अनंतमती—श्वेतांबर–कमलासना, हाती तरवार, पाश, माला व अंकुश धारण करते. दिगबर–या अनतमतीला हसवाहन देतात. हाती

धनुष्य, बाण, फळ, वरद ही आयुधे असतात. ही विद्यादेवी आहे. तसेच अनंतनाथ तीर्थंकराची शासनदेवता म्हणून अनंतमती नाव आलेले असावे.

(१५) कंदर्पा/पन्नगदेवी/मानसी—श्वेतांबर-अश्ववाहना अथवा मत्स्य-वाहना. हाती कमळ, अंकुश, कमळ व अभय आयुधे असतात. दिगंबर व्याघ्र-वाहना, हाती कमळ, धनुष्य, वरद, अंकुश, बाण व कमळ याप्रमाणे आयुधे असतात. ब्राह्मणदेवता कंदर्प-काम याचा संबंध काय आहे ते समजत नाही. पन्नगदेवी नाव येण्याचे कारण असे दिसते की, ब्राह्मणदेवता मनसा ही सर्पदेवता मानलेली आहे, तिच्या नावावरून हे नाव आले असावे. ती एक विद्यादेवी आहे.

(१६) निर्वाणी—श्वेतांबर—कमलासना, हाती पुस्तक, कमळ, कमंडलु व कमळकळी देतात. दिगंबर—हिला महामानसी म्हणतात आणि मोरवाहना, हाती चक्र, फळ, तरवार व वरदमुद्रा दाखवितात. हातातील आयुधांवरून ही ब्रह्मदेवाची पत्नी सरस्वती. साधर्म्य दिसते म्हणून ही विद्यादेवी आहे.

(१७) बाला/विजया—श्वेतांबर—मोरवाहना, हाती भाला, खेटक-मुसंडी, कमळ आयुधे. दिगंबर—हिला विजया म्हणतात. हाती शंख, तरवार, चक्र, वरद मुद्रा दाखवून काळ्या अस्वलावर आरूढ दाखवितात.

(१८) धारणी/तारा—श्वेतांबर—कमलासना, हाती माला, वज्र, दोन हातात कमळे दिगंबर—हंसवाहना, हाती सर्प, वज्र, हरण व वरदमुद्रा दाखविते.

(१९) वैरोटी/अपराजिता—श्वेतांबर—कमलासना, हाती माला, वरद खेटक शक्ति धारण करते. दिगंबर—हिला अपराजिता म्हणतात. सिंहवाहना. हाती तरवार, ढाल, वरदमुद्रा आणि खेटक असते. ही विद्यादेवी आहे. अपराजिता नावावरून हे दुर्गादेवीचे स्वरूप असते.

(२०) नरदत्ता/बहुरूपिणी—श्वेतांबर—भद्रासना, हाती वरद, माला, खेटक व त्रिशूळ ही आयुधे. दिगंबर—कृष्णसर्पवाहना. हाती ढाल, फळ, तरवार, वरदमुद्रा असते.

(२१) गांधारी/चामुंडा—श्वेतांबर—हंसवाहना, हाती वरद, तरवार, खेटक आणि भाला धारण करते. दिगंबर—चामुंडा, सागर (मकर) मत्स्यवाहना, हाती माला, दंडा, ढाल, तरवार धारण करणारी; हरित वर्णाची.

(२२) अंबिका/अम्रा—नेमिनाथाची शासनदेवता. श्वेतांबर—सिंहवाहना, हाती अंकुश, पाश, मूल आणि आम्रफळे धारण करणारी.

दिगंबर—सिंहवाहना. हाती मूल, पाश आणि दोन हाती आम्रफळे घेणारी. अंबा, अंबालिका अंबिका ही दुर्गादेवीचीच नावे आहेत.

(२३) पद्मावती--पार्श्वनाथाची शासनदेवता. वर्णन असे--

> तथा पद्मावती देवी कुर्कुटोरगवाहना ।
> स्वर्णवर्णा पद्मपाशभृद्दक्षिणकरद्वया ॥
> फलांकुशधाराभ्यां च वामदोर्भ्यां विराजिता ॥
>
> ( पारसनाथ चरित्र–हेमचंद्र )

श्वेतांबर--ती सर्प कोंबडा वाहना असून हाती कमळ, पाश, फळ व अंकुश धारण करते. दिगंबर--हातांच्या संख्येनुसार तिची चार स्वरूपे मानतात. कोणी सर्प, कोणी कोंबडा तर कोणी कमळ वाहन देतो. निरनिराळी आयुधे देतात. देवीच्या कथा सर्पांबरोबर संबंध दाखविणाऱ्या आहेत. हाती सर्प धरणारी ही पद्मावती बंगालमध्ये मनसा नावाने पूजिली जाते.

(२४) सिद्धायिका--महावीर तीर्थंकराची ही शासनदेवता. श्वेतांबर--सिंहवाहना, हाती पुस्तक, अभय, खेटक व वीणा असतात. दिगंबर--सिंहवाहना, वरदमुद्रा व पुस्तक धारण करते.

## श्रुतिदेवी आणि विद्यादेवता

विद्यादेवता या पंथामध्ये महत्त्वपूर्ण जागा धरून आहेत. त्यांची संख्या सोळा असून इतर कोणत्याही पंथात इतकी संख्या नाही. या सर्वांवर श्रेष्ठत्व गाजविणारी श्रुतिदेवी अथवा सरस्वती देवी होय. ब्राह्मण देवतामधील सरस्वती देवता जैनपंथियांनी आत्मसात केलेली आहे. श्रुति याचा अर्थ वेद असाच घेतला जातो आणि ज्या वेदाची जपणूक फक्त ऐकून व पठण करून केली गेली ती श्रुति झाली. श्रुतीचे सामर्थ्य देणारी म्हणून श्रुति देवी हे नाव प्राप्त झाले. कार्तिक शुद्ध पंचमीच्या दिवशी 'ज्ञान पंचमी' म्हणून या देवतेचे पूजन या समाजात होते.

> ॐ नमो भगवति ब्रह्माणि विणापुस्तकपद्माक्षसूत्रहंसवाहने श्वेतवर्णे इह षष्ठीपूजने आगच्छ । ( आचार दिनकर प्रतिष्ठाविधि )

या समारंभाच्या दिवशी भक्त उपवास करतो, पुस्तकाचे पूजन करतो आणि नीट मांडणी करून ठेवतो. इतर विद्यादेवतांचे नीट निरीक्षण केले तर असे दिसून येईल की, त्या यक्षिणीच्या वर्गात मोडतात. यक्ष-यक्षिणी ही संस्था आर्यधर्मात आणि जैनधर्मात प्राचीन असल्याने यक्षिणींच्या कार्यांवरून यांना विद्यादेवता मानलेल्या असल्या पाहिजेत. या देवतांच्या पूजनाने भक्ताला ज्ञान, धर्म, प्रयत्न,

(६) अप्रतिचक्रा--श्वेतांबर-गरुडवाहना, हाती चारी चक्रे धारण करते. दिगंबर तिला जांबूनदा म्हणतात. त्या वेळी मयूरवाहना, हाती तलवार व भाला धरते. ती श्रेयांसनाथाची शासनदेवता होय.

(७) पुरुषदत्ता—श्वेतांबरपथात हिची स्वरूपे निरनिराळी आहेत. एका स्वरूपात ती द्विभुजा असून हाती तरवार व ढाल घेते. दुसऱ्या स्वरूपात ती महिषवाहना असून, चार हाती ढाल, तरवार, खेटक व वरद ही आयुधे घेते दिगंबरपंथीय मयूरवाहना, हाती वज्र व कमळ असे स्वरूप मानतात ही तुंबर यक्षाची पत्नी असून महिषवाहन म्हणजे यमधर्माबरोबर काही संबंध असावा. कारण त्याचेही वाहन महिषच आहे.

(८) काली—श्वेतांबर दोन स्वरूपे मानतात. एकात ती कमलासना असून हाती गदा व वरदमुद्रा असते, तर दुसऱ्यात चार हाती माळा, गदा, वज्र आणि अभय असतो. दिगंबर-ती मृगवाहन असून हाती तरवार व दंडा असतो. अभिनंदन तीर्थंकराच्या शासनदेवतेबरोबर साम्य आहे.

(९) महाकाली—श्वेतांबर दोन स्वरूपे मानतात एकात ती मानव-वाहना असून चार हातात माला, फळ, घंटा व वरदमुद्रा असते. दुसऱ्यातही ती मानववाहना असून चार हातात माळा, वज्र, घंटा व अभयमुद्रा असते. दिगंबर-प्रेतवाहना व चार हातात तरवार, धनुष्य, फळ व शस्त्र धारण करते. ही जरी तीर्थंकराची शासनदेवता असली, तरी हातातील आयुधावरून ती ब्राह्मणदेवता कालीस्वरूप मानतात.

(१०) गौरी—श्वेतांबर-गोधावाहना असून चार हातात गदा, माला, कमळ व वरदमुद्रा धरते. दिगंबर-गोधावाहना असून हाती कमळपुष्पे घेते. ही एक शासनदेवता असून, आयुधावरून ती गंगादेवीस्वरूप असावी.

(११) गांधारी—श्वेतांबर-कमलासना असून, द्विभुज असेल तेव्हा हाती दंडा व वज्र असते चतुर्भुज असेल तेव्हा दंडा, वज्र, अभय व वरदमुद्रा असते. ही एक शासनदेवता असून आयुधावरून ती जलदेवता यमुना असावी.

(१२) महाज्वाला-ज्वालामालिनी—श्वेतांबराचा मग आचार्य दिनकराप्रमाणे ती मार्जारवाहना आहे. पण हाती आयुधे दिलेली नाहीत. निर्वाणकलिका मताप्रमाणे ती वराहवाहना व अनेक आयुधे धारण करणारी म्हटले आहे, पण ती दिलेली नाहीत. दिगंबर-महिषवाहना असून हाती ढाल, तरवार, धनुष्य व चक्र धारण करते. ही एक शासनदेवताही आहे.

(१३) मानवी— श्वेतांबर—एका स्वरूपात ती नीलवर्णी असून कमल आसन पुष्पाने डहाळीवर आरूढ असते. दुसऱ्या स्वरूपात ती कमलासना असून

चार हाती वरद, माला, खेटक व तृष्णइाहळी धारण करते. दिगंबर—नीलवर्णा अश्वलवाहना व हाती त्रिशूल धारण करते. दोन्ही पंथातील तीर्थंकराची ही शासनदेवताही आहे. आयुधांवरून ती वाराही अथवा नील सरस्वतीचे स्वरूप असावे.

(१४) वैरोटी— श्वेतांबर—सर्पवाहना असून चार हाती तलवार, ढाल व दोन हाती सर्प धारण करते. दिगंबर-सिंहवाहना असून हाती सर्प धारण करते. ही एक शासनदेवताही आहे.

(१५) अच्युता—श्वेतांबर—अश्ववाहना व चार हातात धनुष्य, तलवार, ढाल व बाण धारण करते. दिगंबरपंथीय हेच स्वरूप मानतात.

(१६) मानसी—श्वेतांबर—एकास्वरूपांत ती हंसवाहना असून हाती वज्र व वरदमुद्रा धारण करते. दुसऱ्या स्वरूपांत ती सिंहवाहना असून हाती वज्र, माला, वरदमुद्रा धारण करते. दिगंबरपंथीय हेच स्वरूप मानतात. फक्त वाहन सर्प असते. ती सर्ववाहना आहे, म्हणजे मनसादेवीबरोबर साम्य दिसते. बुद्धाची विद्यादेवी म्हणून वागीश्वरी प्रसिद्ध असून तिचे मंदिर वाराणसी येथे आहे.

(१७) महामानसी—श्वेतांबर—सिंहवाहना असून चार हातात तलवार, कमंडलु, माला आणि वरदमुद्रा धारण करते. दिगंबर—हंसवाहना असून चार हातात माला, अंकुश, अक्षमाला आणि वरदमुद्रा धारण करते हातातील आयुधे कमंडलू, पुस्तक इ० यावरून बौद्धांची विद्यादेवता वागेश्वरीचे स्वरूप असावे.

याप्रमाणे विद्यादेवता १६ आणि श्रुतिदेवता मिळून या सर्व जैनधर्मातील विद्यादेवता आहेत.

वरील देवताव्यतिरिक्त लक्ष्मी, शांति देवी आणि चौसष्ट योगिनी हा पंथ मानतो. योगिनींपैकी काही नावे ब्राह्मणधर्मातील योगिनीप्रमाणे आहेत, तर बरीचशी जैनपंथातील आहेत. विस्तारभयास्तव नावे दिलेली नाहीत.

---

संदर्भग्रंथ

( १ ) जैन देवता संबंधीची माहिती अधिकांशाने बी. सी. भट्टाचार्य यांच्या सौजन्याने त्यांचा ग्रंथ जैनमूर्तिविज्ञान ( Jain Iconography ) या ग्रंथांतून घेतलेली आहे.

( २ ) Studies in Jainism and Buddhism in Mithila by Upendra Thakur.

( ३ ) प्रतिष्ठतिलक, लेखक—श्रीनेमिचंद्र आचार्य, धर्मवीर जैनग्रंथमाला, सोलापूर.

# संकीर्ण देवता

देवतांचा इतिहास वाचीत असताना लहानमोठ्या, श्रेष्ठ-कनिष्ठ अशा अनेक देवतांची नावे माझ्या पाहण्यात आली. ज्या ज्या देवतांना महत्त्व व बोधप्रद आणि रम्य पूर्वेतिहास होता, त्या त्या देवता वर्गवारीनुसार पाडलेल्या निरनिराळ्या प्रकरणांतून आपल्या दर्शनास आल्या नि त्यांनी आपल्याला त्यांचे वसल्यावसल्या हुबेहूब दर्शन घडविले. ज्या देवता अगदी किरकोळ आहेत नि ज्यांचा समावेश इतर कोणत्याही प्रकरणात करता येण्याजोगा नव्हता, अगर ज्यांची माहिती सर्व प्रकरणे लिहून, छापून झाल्यावर हाती आली त्यांचा निर्देश या प्रकरणात करण्याचे योजिले आहे. केवळ हाती आलेली नावे व माहिती वाया जाऊ नये, हाच हे प्रकरण निर्मिण्यामागील शुद्ध हेतु आहे. किरकोळ अशा देवतांची नावेही आपल्याला ठाऊक असावी, अशी ज्या देवीभक्तांची आत्यंतिक इच्छा आहे, त्या निस्सीम उपासकांची ही इच्छा पूर्ण व्हावी म्हणूनही हे प्रकरण लिहिण्याचा खटाटोप केला आहे. हे प्रकरण म्हणजे कोठल्याही एकाच प्रकारच्या देवतांची यादी नव्हे, तर थोडक्यात घेतलेला त्यांच्या ऐतिहासिक महत्त्वाचा धावता आढावा आहे, हे मी मुद्दामच येथे नमूद करीत आहे.

टीप—या प्रकरणात अंतर्भूत करण्यासाठी वृत्तपत्रद्वारे विनंती करून भक्तांकडून स्थानिक देवीविषयक माहिती मागविली असता त्याला प्रतिसाद मिळालेला नाही, हे नमूद करणे आवश्यक वाटते.

—लेखक

(१) श्रीदेवी—महिदपूर (माळवा) येथून एक मैल अंतरावर किल्ल्याच्या पायथ्याजवळ एका उंच टेकाडावर या देवीचे मंदिर आहे. मंदिरातील देवीची मूर्ति चतुर्भुज असून त्या चार हातात देवीने शंख, चक्र, गदा आणि ढाल ही आयुधे घेतलेली आहेत.

(२) श्रीछायाभगवती—नारायणपूर (गुलबर्गा) या गावापासून दोन मैल अंतरावर कृष्णावेणी नदीच्या तीरावर या देवतेचे स्थान आहे. हे स्थान अतिशय प्राचीन असून ते या भागात फारच सुप्रसिद्ध आहे.

(३) अजादेवी—प्रभासतीर्थाच्या ठिकाणी सोमेश्वराच्या ईशान्येस या देवीचे मंदिर आहे. एकदा बोलता बोलता कैलासपति श्रीशिवशंकर पार्वती-माईस म्हणाले, 'मला पूर्वी सद्योजात, वामदेव, अघोर, तत्पुरुष, इशान, अज आणि पिचू या नावांची सात मुखे होती.' शंकराच्या या सात मुखांवरून अशा

इतिहास उपलब्ध आहे की, त्या सात सुरांपैकी 'अज' हे त्यांनी ब्रह्मदेवाला दिले. त्या पासून अजाशक्ति निर्माण झाली. दैत्य जेव्हा देवांना पीडा देऊ लागले, तेव्हा ही अजाशक्ति सिंहावर आरूढ झाली आणि दैत्यांचा पाठलाग करीत करीत प्रभासतीर्थाच्या ठिकाणी तिने दैत्यांना गाठून, त्यांचा पराजय केला. त्यानंतर ती त्याच क्षेत्री कायमची वस्ती करून राहू लागली.

(स्कंद पुराण)

(४) अनकाईदेवी— मनमाड-कोपरगाव रेल्वेरस्त्यावर अनकाईच्या टेकड्या असून, तेथे या देवीचे स्थान आहे. या देवीव्यतिरिक्त तेथे कोणीही नाही, यास्तव अनकाई नाव आले आहे.

(५) अतलादेवी— अतल या शब्दाचा अर्थ स्थिर, कायम, अचल, पक्की रोवलेली असा होतो. या देवीचे मंदिर पूर्वी जोनपूर नावाच्या शहरी होते. सन १४४८ च्या सुमारास इब्राहिमशहाने ते तोडून त्या ठिकाणी मशीद उभारली. ती मशीद आजही त्या ठिकाणी उभी असून ती अतल मशीद या नावाने ओळखिली जाते.

(६) अदिष्टी— शिरगाव (रत्नागिरी) येथे या देवीचे मंदिर आहे. मंदिरातील मूर्ति काळ्या पाषाणाची व चतुर्भुज आहे. तिच्या चार हातांमध्ये तरवार, ढाल, त्रिशूळ व कमळ ही आयुधे आहेत. आदिष्टी, आकाशी या देवतांचा उल्लेख देवीभागवत या ग्रंथात आलेलाच आहे. अदिष्टी हा शब्द अदिती या देवतेच्या नावाचा अपभ्रंश असावा.

(७) अनुसूया— बडोदा प्रांताच्या सिनोर ह्या नावाच्या पेटा-भागात आवेली नावाचे एक खेडे आहे, त्या ठिकाणी या देवीचे मंदिर आहे. रक्त-पीतीची व्याधी असणाऱ्या रोग्यानी या देवीचे तीर्थ अंगाला चोळल्यास त्याची ती व्याधि हमखास समूळ नाहीशी होते, असा भाविक भक्तांचा श्रद्धायुक्त लोक-समज आहे.

(८) अनसिंग— वाशीम (वऱ्हाड) पासून सुमारे पंधरा मैलांवर असलेल्या एका खेडेगावी या देवीचे स्थान आहे. ऋष्यशृंग नावाच्या ऋषींचे एक जुनाट मोडके पडके मंदिर तेथील गावठाण या भागात आहे. त्या मंदिराशेजारीच एक पाण्याची विहीर असून जवळच एका दगडावर सतीचा एक हात कोरलेला आहे. तो हस्त सौभाग्यदर्शक काकणांनी विभूषित केलेला असून, त्याबद्दलची कथा अशी आहे. दक्षयज्ञाच्या वेळी सतीच्या शरीराचे तुकडे करण्यात आले,

त्या तुकड्यापैकी तिचा हात या ठिकाणी येऊन पडला. दगडावर येऊन पडलेल्या त्या हाताचा नंतर केवळ ठसाच त्या दगडावर राहिला. तोच हा ठसा होय. सांप्रत ही कथा जरी प्रचलित असली तरी देवीभागवत या ग्रंथामध्ये सतीचे अवयव पडल्याची जी स्थाने दिलेली आहेत, त्यांत ह्या स्थानाचा समावेश केलेला नाही. असाच एक हातरूपी देवीचा तांदळा अहमदनगर जिल्ह्यातील आमगावी आहे.

(९) अहिछत्रा— वैदिक साहित्यामध्ये परिचक्रा नावाच्या एका नगरीचा उल्लेख केलेला आहे. ही परिचक्रा नगरी उत्तर पांचाल देशाची राजधानी होती. बरेली जिल्ह्यातील रामनगर या गावाजवळ त्या नगरीचे भग्न अवशेष आजही दृष्टीस पडतात. जैन ग्रंथामध्ये अहिछत्रा या नगरीचे वर्णन आहे. त्या स्थळी पूर्वी बुद्धाचे दहा संघरामही होते. येथे ज्या वेळी उत्खनन करण्यात आले, त्या वेळी त्या उत्खननामध्ये शिवपार्वतीच्या अनेक सुंदर मूर्ति सांपडलेल्या आहेत. त्या सांपडलेल्या मूर्तीमध्येच एक चतुर्भुज मृण्मय मूर्ति मिळालेली असून तिचेच नाव अहिछत्रा होय. तिच्या एकूण स्वरूपावरून ती बौद्धशिल्पदेवता असावी असे वाटते. तिच्या परमपवित्र चरणाजवळ दोन साधक हात जोडून प्रार्थना करीत उभे असलेले दाखविलेले आहेत. अहिछत्रेच्या मस्तकावर किरीट असून हा किरीट बौद्धशिल्पपद्धतीचा दिसतो.

(१०) अश्वारूढा—ही एक शाक्त देवता आहे. या देवीला तीन नेत्र असून रक्तवर्षाव करणारी अशी तिची ख्याति आहे. तिला चार हात असून ती लाल अश्वावर आरूढ झालेली आहे. तिच्या उजव्या हातात काठी आहे. तिच्या पायाजवळ तिनेच सुवर्णदंडाने मारलेला एक भक्त तिची क्षमा मागत आहे, असे दृश्य आहे.

(११) अहेरियादेवी—द्रविडवंशाची अहेरिया ही एक पोटजात आहे. विशेषतः पंजाबमध्ये आणि उत्तर प्रदेशामध्ये वन्य जमात म्हणून ती आढळते. जे हिंदु आहेत ते अहेरिया देवीची पूजा करतात. वगईचमार आणि जाखिया हे त्यांचे ग्रामदेव आहेत. रामायणकर्त्या वाल्मिकीला ते आद्यगुरू मानतात. उत्सवप्रसंगी किंवा नवससायास केल्यावर कोणाला देवी पावली तर मोठ्या समारंभपूर्वक ते देवीला बकऱ्याचा बळी देतात.

(१२) आईजी—खारडिया शीख जमातीची ही कुलदेवता होय. मारवाडप्रांती बिलडा गावी ह्या देवीचे स्थान आहे. शीख समाज ह्याला दरगह असेही म्हणतो. या देवतेच्या मंदिरातील नंदादीप अखंड तेवत असून आश्चर्याची गोष्ट म्हणजे ह्या नंदादीपाची काजळी पिवळसर असते. म्हणून भक्तगण त्याला

केशर असेही म्हणतात. येथील एकाच घराण्यात वंशपरंपरा देवीची पूजा-अर्चा चालत आलेली आहे. ह्या पुजाऱ्यास येथे दिवाण असे म्हणतात. भाद्रपद शु० २ ला देवी अंतर्धान पावली, या समजुतीने त्या दिवशी देवीचा वार्षिक उत्सव करतात.

या समाजाची अजूनही इतर सर्व समाजांनी अनुकरण करण्यासारखी धार्मिक प्रथा आहे. या देवीच्या पूजकाच्या घरी स्त्री दळायला बसण्यापूर्वी ती या देवीच्या नावाने एक मूठभर धान्य बाजूला काढून ठेवते. हे बाजूला काढून ठेवलेले धान्य ती प्रत्येक वेळी एका हंड्यात साठवून ठेवते. हे बाजूला काढून ठेवलेले धान्य जमविण्यासाठी भगव्या वस्त्रांनी सजविलेल्या अनेक बैलगाड्या मारवाड, मेवाड व माळवा इत्यादि प्रांतांतून सतत फिरत असतात आणि शेकडो मण धान्य गोळा करतात. या साठविलेल्या धान्यामधूनच देवीचे उत्सवसमारंभ व लंगर पूर्ण होत असतात. (भा. सं. कोश, १/३७८).

(१३) अगरतारा—तिरहूत (बंगाल) जिल्ह्यात बाणगाव नावाचे एक खेडे असून त्या ठिकाणी देवीचे हे स्थान आहे. देवीपुराणात या देवीबद्दलची माहिती आणि नामोल्लेख आहे. या देवीची वार्षिक यात्रा नवरात्रामध्ये भरते. त्या यात्रेस फार मोठ्या प्रमाणावर भक्तगणांची उपस्थिति असते.

(१४) आनंदीभवानी—चोपडे (खानदेश) येथे ह्या देवीचे स्थान आहे. सन १९५७ मध्ये काही गुंडांनी देवीची ही मूर्ति फोडली होती. या अमानुष प्रकारामुळे देवीचे भक्तगण पुष्कळच क्रुद्ध झाले आणि त्यांनी कोर्टकचेऱ्यापर्यंत जाऊन ह्या प्रकरणाची दाद मागितली. शेवटी आता मंदिरात देवीच्या दुसऱ्या मूर्तीची स्थापना करण्यात आली आहे.

(१५) आराही—तंत्रमार्गातील ही एक देवता आहे. ही देवता डुक्करमुखी व कृष्णवर्णी असून ती चतुर्भुज आहे. तिच्या एका हातात नांगर व दुसऱ्या हातात मुसळ ही दोन आयुधे असून तिसरा हात अभय व चौथा वरद आहे. ही देवता कमलासनावर अधिष्ठीत आहे.

(१६) औसानबिबी—ह्या देवतेचे मूळ नाव औसानबिबी असेलच असे वाटत नाही. माझ्या मते औसानबिबी हा शब्द मूळ अवसानविधि ह्या एका विधीच्या नावावर बसला असावा. हा अवसानविधि असा: प्रथम चौक सारवून त्यावर मातीच्या सात पिठाच्या चक्राकार मांडावयाच्या आणि मधोमध कोऱ्या मातीच्या घड्यात पाणी भरून तो मांडावयाचा. नंतर सुवासिनींनी स्नान करावयाचे व स्नान झाल्यावर प्रथम या कलशाची पूजा करावयाची. नंतर भाजके

चणे आणि गूळ याचा त्या घटाला नैवेद्य दाखवावयाचा. मग कथा श्रवण करून दिवसाच्या इतर दिनचर्येला सुरवात करावयाची. विशेषतः उत्तर प्रदेशात विवाह-समारंभ झाल्यावर पाच अथवा सात सुवासिनींना बोलावून हा विधि करतात. याबाबतची कथा अशी :

एका गृहस्थाला चिमण्या पाळण्याचा अतिशय नाद होता. एकदा त्याला बाहेरगावी एका विवाहसमारंभास जावयाचे होते. तेव्हा जाताना त्याने आपल्या बहिणीला त्या गरीब जीवाची देखभाल करण्यास सांगितले व तिनेही ते कबूल केले. परंतु अंतरीच्या उमाळ्याशिवाय का कोठे माया जन्मत असते ? ज्याची कड त्यालाच येणार. मुलाला दुखलखुपलं तर प्रत्यक्ष मातेच्याच डोळ्यात टिपे जमा होणार. त्या बहिणीने केवळ कबूल केले, परंतु प्रत्यक्षात मात्र तिने आस्थापूर्वक त्या चिमण्यांची मुळीच देखभाल केली नाही. त्यामुळे त्यांपैकी बऱ्याचशा चिमण्या मृत्युमुखी पडल्या. काही चिमण्या स्वर्गी निघून गेल्यावर मग मात्र तिचे डोळे उघडले. आपल्या हातून ही अक्षम्य चूक झाल्याबद्दल तिला अतिशय पश्चात्ताप झाला आणि दारातच बसून ती धाय मोकलून रडू लागली. तिने तातडतोब औसानदेवीला नवस केला की, ' मेलेल्या चिमण्या पुन्हा जिवंत केल्यास, तुझी पूजा मी बांधीन. ' तिचा हा नवस ऐकताच त्याप्रमाणे देवीने त्या चिमण्या जिवंत केल्या.

चिमण्या तर जिवंत झाल्या. त्यांना खावयास घालण्यासाठी तिला भाजके चणे हवे होते. एकदा एक लग्नाची वरात चालली असता तिने त्या वरातीतील लोकांना ते चणे भाजून देण्याबद्दल विनंती केली, परंतु त्यांच्यापैकी कोणीही तिच्याकडे लक्षच दिले नाही. त्यामुळे एक मोठाच चमत्कार घडला आणि वरातीमधील नवरा मुलगाच एकाएकी थंडगार पडला. काही वेळाने त्याच मार्गाने एक प्रेतयात्रा चालली असता त्या बाईने त्या लोकांनाही तीच विनंती केली. त्या लोकांनी तिची विनंती तातडतोब मान्य केली. त्याबरोबर त्या प्रेतयात्रे मधील ते ताठलेले प्रेत ताडकन् उठून बसले आणि नुकत्याच झोपून उठलेल्या माणसाप्रमाणे डोळे चोळू लागले. नंतर लोकांनी तिला विचारले, ' बाई, वरातीतील नवरामुलगा का मरण पावला ? ' त्यावर ती त्यांना एवढेच म्हणाली, ' बाबांनो, ही सारी अवसानदेवीची कृपा अवकृपा आहे ! ' नंतर त्या वरात-वाल्यांनी औसानदेवीची विधियुक्त पूजा करताच मृत नवरामुलगा पुनश्च जिवंत झाला आणि आपल्या सहचारिणीसह मोठ्या आनंदाने आपल्या घरी गेला. ह्या कथेवरून उत्तर प्रदेशात विवाहसमारंभ झाल्यावरच या देवतेची पूजा का करतात, हे वाचकांच्या सहज ध्यानी येईल. (भा. सं. कोश, १/२७१).

(१७) आशापुरी—गुजरात प्रांतामधील ही एक देवता आहे. ही अनेक घराण्यांची कुलस्वामिनी आहे, कुलदेवतेचे स्थान फार लांब असू नये ह्या एकाच भावनेमुळे अनेक ठिकाणी ह्या देवतेची स्थाने स्थापन केली गेली आहेत. या सर्व देवस्थानी माघ महिन्यात मोठाच उत्सव चालतो. त्या वेळी अनेक भक्त या स्थानी येतात नि देवीचे दर्शन घेऊन पुनीत होतात. उत्सवप्रसंगी या देवस्थानातून 'भवाई नृत्य' होते. या देवीला कोणी आशापुरी असेही म्हणतात. मनोवांच्छित संततीप्राप्तीसाठी अनेक भक्त या देवीची आराधना करतात.

(भा. सं. कोश, १/४९८).

आनंदपासून सोळा मैलांवर पिंपळगाव या नावाचे एक खेडे आहे, त्याठिकाणी या देवीचे प्रमुख स्थान आहे. लहान मुलाचा मुंडणसंस्कार करण्यासाठी अनेक भक्तमंडळी दूरदूरच्या ठिकाणाहून येथे येतात. माणवड (नवानगर) जवळ उंच टेकडावरही या देवीचे एक स्थान आहे.

गंगेची कावड खांद्यावर टाकून, भगवी वस्त्रे धारण करणारे कावडी यात्रेकरू, या देवीचे उपासक आहेत.

(१८) अखिलंदेश्वरी—या देवीला अखिलंदनायकी असेही म्हणतात. श्रीरंगपट्टणपासून एक मैलावर तिरुवनकावल नावाचे शिवाचे क्षेत्र असून तेथील शिवलिंग हे 'आपुलिंगम्' नावाने प्रसिद्ध आहे. तेथील लिंगामधून पाण्याचा प्रवाह अखंड वाहत असल्याने याला हे नाव प्राप्त झाले आहे. या क्षेत्रीची शक्तिदेवी अखिलदेश्वरी नावाने प्रसिद्ध आहे. प्रथमतः या देवीचे स्वरूप फारच उग्र होते. पण आद्यशंकराचार्यांनी सुवर्णालंकारांनी पूजन करून तो उग्रपणा कमी केला आहे, असे सांगितले जाते. तसेच देवीसमोर तिचा पुत्र गणेश याची स्थापना केल्याने मातेने मुलाकडे पाहून आपले उग्र स्वरूप सौम्य करावे, अशीही युक्ति योजण्यात आली. अखिल विश्वावर सत्ता चालते म्हणून हे नाव धारण केले आहे. या क्षेत्रीचे वैशिष्ट्य असे की, देवीचा पूजक दुपारचे पूजनाचे वेळी स्त्रीवेष धारण करून पूजन करतो. याचे कारण असे दिले जाते की, कोणे एके वेळी पार्वतीने स्वतः आपल्या स्त्री वेषात शंकराचे पूजन दुपारी केलेले होते. म्हणून ही रूढि चालत आलेली आहे. (तामीळनाड मंदिरे—दास, पृ. १०६)

(१९) अनंतलक्ष्मी—सत्यवती—अन्नावरम् (आंध्र) गोदावरी जिल्हा येथे श्री वीर व्यंकट सत्यनारायणस्वामींचे मंदिर असून ही शक्तिदेवता त्या क्षेत्रीची आहे. येथील वैशिष्ट्य असे की एकाच शिवलिंगावर शंकर व देवी यांच्या मूर्ति बसवितात. तसेच मंदिराचे प्राकारात वनदुर्गा व कनकदुर्गा यांच्याही मूर्ति

आहेत. वनदुर्गादेवता रानी बाहेर फिरून मंदिराचे रक्षण करते अशी भक्तांची भावना आहे.

आंध्र प्रदेशातील मंदिराचे बारकाईने निरीक्षण केले तर असे दिसून येते की, येथील मंदिरात शिव–विष्णुच्या मूर्ति एकत्रित आढळतात. अहोबलम्, मंगलगिरी, अकिरिपल्ली, सिंहाचलम् श्रीकुराम, यादगिरी, धर्मपुरी इ० क्षेत्री नरसिंहरूपी विष्णूच्या मूर्ति आढळतात. तसेच विष्णु व रामचंद्र यांचीही मंदिरे आढळतात. तामीळनाडमध्ये शैवमंदिरे ज्या प्रमाणात आढळतात, त्यापेक्षा येथील प्रमाण खूपच कमी आहे. नरसिंहाची मंदिरे याच प्रांती अधिक का, याचे संशोधन करण्यासारखे आहे

(२०) अचलागौरी—आई वडील व सासूसासरे ज्या स्त्रीचे हयात आहेत, आणि जिच्या एकाही अपत्याचा मृत्यु झालेला नाही, अशा सुवासिनीला अचलागौरी संबोधतात काही घराण्यात अशा स्त्रीला नवरात्रामध्ये भोजन व दक्षिणापात्र देण्याची रूढि आहे

(२१) आसमाई—मनोवाञ्छित इच्छा पूर्ण करणारी एक देवता. उत्तर भारतात वैशाख, आषाढ व माघमासी रविवारी या देवतेचे पूजन होते या देवतेबरोबर बारादित्य ( बारा आदित्य ) यांचीही पूजा होते मुख्यत. पुत्रवती स्त्रिया हे व्रत करतात आणि या दिवशी त्यांनी लवणविरहित भोजन घ्यावयाचे असते. एका पानावर आसमाईचे चंदनाचे चित्र रेखाटून, त्यावर चार कवड्या मांडून, शेजारी एक कलश स्थापन करून, सर्वांची पूजा करावयाची असते पूजा समाप्त झाल्यावर, पुरोहित बारा गाठी मारलेला एक दोरा, व्रत आचरण करणाऱ्या स्त्रीच्या हातामध्ये बांधतो आणि उत्तरपूजा समाप्त झाल्यावर, सर्व पूजासामुग्री व गडा पाण्यात सोडून देतात. त्यातील फक्त कवड्या तेवढ्या दाराच्या उंबरठ्यावर ठेवतात

यानंतर देवीच्या उत्पत्तीची कहाणी सांगितली जाते, त्यामध्ये एका खोडकर मुलाला राजाने नगराबाहेर घालविल्यानंतर त्याला आसमाई कशी भेटली, सामर्थ्यवान चार कवड्या कशा दिल्या, त्यामुळे त्याने घोड्याला जुगारात कसे जिंकले, नंतर राजाचा जावई कसा झाला व शेवटी पुत्रशोकाने मातेचे अंध झालेले नेत्र तिला कसे परत मिळाले, इ० भाग रसभरीत वर्णन करून सांगितला जातो (भा. सं. को., १/५१०)

(२२) एकानंशा— हे दुर्गादेवीचेच एक स्वरूप मानतात 'देवकय-जनयत् विष्णु, यशोदायास्तु कन्यकाम् ।' असे हरिवंशात एक सूत्र आहे. प्रजापतीच्या अंशाने कृष्णाच्या साहाय्यार्थ यशोदेच्या पोटी या देवाने जन्म

घेतला आणि तो योगमायेचाच अंश होता, म्हणून तिचे नाव एकानंशा असे पडले. बृहत्संहितेमध्ये या देवीचे वर्णन करताना ती द्विभुजा, चतुर्भुजा किंवा अष्टभुजा असावी असे म्हटले आहे. ही मूर्ति द्विभुज असेल तर ती बलराम आणि कृष्ण यांच्या मूर्तींच्या मधोमध उभी करतात तिच्या डाव्या हातात कमळ असते आणि उजवा हात कमरेवर असतो भुवनेश्वर भागात अशा स्वरूपाची मूर्ति आढळून आली आहे. त्यावरून असे अनुमान काढता येते की, पूर्व भागामध्ये, मध्ययुगीन काळात या देवतेची पूजा केली जात असावी. वासुदेवाच्या मंदिरात या देवीच्या मूर्ति आहेत ह्या देवीला एकानंगा असेही एक नाव आहे

(भा स कोश, १/७४४)

(२३) इन्द्रायणी देवी—जिल्हा परभणी (मराठवाडा) येथे माडासळीचे इंद्रायणी नामे माळावर या देवीचे स्थान आहे. याच ठिकाणी पापदंडी रामपुरी नावाची देवता असून, तिने हातपाय नसलेल्या गोल्हासुराला ठार मारले अशी कथा प्रचलित आहे

(२४) एकाक्षी—कारंजा (वऱ्हाड) येथे एकाक्षी, कमलाक्षी या देवतांची मंदिरे आहेत दंडकारण्याच्या मार्गावर असताना साक्षात् प्रभुरामचंद्रांनी या देवतांची स्थापना करून त्यांची मंदिरे बांधलेली आहेत, अशी ह्या ठिकाणी या देवतांबद्दलची दंतकथा प्रचलित आहे.

असत. ह्या स्थानापासून जवळच कनकदुर्गा अथवा कनकगोंडा ह्या नावाची एक लहानशी टेकडी असून त्याच्या माथ्यावर हे देवीचे मंदिर आहे. त्या ठिकाणी एका भव्य पाषाणावर ह्या देवीची अनेक स्वरूपे कोरलेली आढळतात. ही सर्व स्वरूपे 'मद्रास एपीग्राफिकल अहवाल, सन १९१७–१८' यामध्ये समाविष्ट केलेली आहेत. काही वेळा या देवतेची काष्ठाची मूर्ति बनवून रोगराईचे निर्मूलन करण्यासाठी गावाबाहेर मिरवणूक काढतात आणि तेथे देवीचे विसर्जन करतात.

या देवीचे दुसरे एक ठिकाण बंगालप्रांती, दलुग नदीचे किनारी चिलकी-गड येथे घनदाट अरण्यात आहे. मूर्ति म्हणजे शेंदूरचर्चित पाषाण असून, आजूबाजूला मातीचे हत्ती घोड्याची चित्रे जवळ मांडलेली असतात. तसेच या ठिकाणी रंकिणी देवीचेही पूजन होते. या देवता अरण्यात असल्याने, निर्जन-स्थळी मूर्ति भेसूर वाटतात. बहुधा येथील वन्यजमाती यांचे पूजन करतात.
(बंगालमंदिरे, रॉय चौधरी, पृ. ७७).

या देवीचे आणखी एक मंदिर विजयवाडा येथे असून, मूर्ति स्वयंभू असल्याचे सांगतात. येथील मंदिर कोणी व केव्हा उभारले याचा ठावठिकाणा मिळत नाही. दक्षिणापथामध्ये दुर्गम दैत्याचा नाश करण्यासाठी या देवतेची निर्मिति झाली, अशी दंतकथा प्रचलित आहे.

(२८) **कल्पकवलीदेवी**—दक्षिणेत मलयापूर येथे शंकराचे स्थान असून, त्याचे नाव कपालीश्वर असे आहे. तेथील शक्तिदेवीचे नाव कल्पकवली असे आहे.

(२९) **कमळजादेवी**— भीमाशंकरक्षेत्री (पुणे जिल्हा) मोटार-स्थानकाजवळ या देवीचे मंदिर आहे. मूर्ति तांदळास्वरूप असून, वाघ व नंदी यांच्याही मूर्ति आहेत. उत्पत्तिकथा अशी सांगतात की, शंकरांनी जेव्हा या ठिकाणी दैत्याचा नाश केला तेव्हा गौरी त्यांना मदत करण्यासाठी सिंहावर बसून आपल्या-सख्यासह आली. दुर्गासुर दैत्याची हत्या करण्यात तिची मदत झाली, म्हणून शंकराबरोबर तिची स्थापना या ठिकाणी करण्यात आली. या विजयानिमित्त ब्रह्मदेवाने स्वतः तिची पूजा कमलपुष्पांनी केली, यास्तव कमळजा असे नाव प्राप्त झाले.

(३०) *कर्ण पिशाची*—एक देवता. या देवीची मूर्ति चितेवर बसणारी, नरमुंडमाळा धारण करणारी, हातात अस्थीमण्यांच्या माळा माणसांच्या आतड्यांत ओवून धारण करणारी, मलीन वस्त्र नेसलेली या स्वरूपाची असते. या देवीचा ध्यान करण्याचा मंत्र असा—

चितासनस्थां नरमुण्डमालां । विभूपिताभस्थिमणीन्करान्जैः ॥
प्रोतां नरान्यैर्दधतीं कुवक्त्रां । भजामहे कर्णपिशाचिनीं त्वाम् ॥

यंत्रावर दिक्पाल व त्यांची आयुधे यांची पूजा करून मग या देवीचे पूजन करावयाचे असते. पूजा झाल्यावर तिच्या मंत्राचा जप एक लक्ष आणि दशांश हवन, बेहड्याच्या समिधानी करावे, तरच मंत्र सिद्ध होतो.

ॐ ऱ्हीं कर्णपिशाचिनी कर्णे मम कथय स्वाहा ।

या मंत्राचा जप, हवन झाल्यावर, नंतर बोरीचे झाडाखाली अशुचि अवस्थेत वसून पुन्हा एक लक्ष जप करावयाचा, म्हणजे देवी संतुष्ट होते आणि दुसऱ्याचे मनातील विचार तसेच भूत-भविष्याच्या गोष्टी कानात येऊन सांगते, व त्याच पृच्छकाला निवेदन केल्यावर तो आश्चर्यचकित होतो. पण या मांत्रिकाचा शेवट मात्र चागला होत नाही असा लोकांचा अनुभव आहे.

(३१) कल्याणदेवी— या देवीची मूर्ति महाकोसल प्रांतो आढळते. ही चतुर्भुज असून हिच्या हाती धनुष्याची प्रत्यंचा असून ती सिंहाच्या पाठीवर बसलेली असते. स्त्री-सौंदर्याच्या सर्व कळा या मूर्तीमध्ये दाखविलेल्या असतात.

(३२) कांचनकुंडली— एक तांत्रिक देवता आणि सिद्धिप्राप्ति करून देणारी देवता. शेणाची देवीची मूर्ति करून कांचनकुंडली नावाने तिचे वर्षभर पूजन करावयाचे. देवीचा मंत्र असा—

ॐ लोलजिव्हे अट्टाट्टहासिनि सुमुखि कांचनकुंडलिनि खे चक्षे हुं ।

या मंत्राचा जपविधि तिवाठ्यावरील वडाचे बुंध्याजवळ बसून कोणाच्या न कळत करावयाचा असतो. वर्षभर नित्य आराधना केल्यावर देवी साधकाला वश होते आणि इच्छित पुरे करते.

(३३) काकतीदेवी—काकतीय राजवंशाने ( सन ११५०-१३२५ ) दुर्गा देवीची उपासना या नावाने चालू केली. आंध्र प्रांती हिची मंदिरे अनेक ठिकाणी आहेत.

(३४) कल्याणेश्वरी— बारकर ( बंगाल ) गावाजवळ या देवीचे मंदिर आहे. याची अशी कथा सागतात की, एकदा रोहणी देवघर नावाच्या ब्राह्मणाला नदीमध्ये सुवर्ण रत्नांकित हात रात्रीच्या वेळी दिसला. त्याने ती गोष्ट काशीपूर येथील कल्याणसिंह महाराजांना सांगितली. राजाने स्वतः खात्री केल्यावर त्याच रात्री त्याला दृष्टान्त झाला, की ताढळास्वरूपी देवीची मूर्ति एका विवक्षित

ठिकाणी आहे, ती काढून मंदिर उभारावे याप्रमाणे राजाने मंदिर उभारले कल्याणसिंहाने स्थापना केली म्हणून देवीचे नाव कल्याणेश्वरी असे पडले

दामोदर व्हॅली कार्पोरेशनने मैथान गावी पाण्याचे धरण बांधल्यापासून या देवस्थानाची ऊर्जितावस्था आली जवळच नीळकंठेश्वरी अथवा विंध्यवासिनीचे लहानसर मंदिर आहे पूर्वी या क्षेत्री नरबळी अर्पण करीत असत

मंदिराशेजारचे कलना गावी शंकराचे उत्कृष्ट शिल्प आहे सन १८०९ मध्ये राजा तेजचंद्र बहादूर याने १०८ शिव मंदिरे बांधली असून हे शिल्प एकमेव आहे जपाच्या माळेची मणीसंख्या १०८ असल्याने तेवढी मंदिरे उभारली आहेत सत्र मणी मध्यभागी छिद्रातून एका दोऱ्यात ओवलेले असतात त्याप्रमाणे एकातून दुसऱ्यात जाण्यास मार्ग आहे मंदिराचे कळस रुद्राक्ष मण्याच्या घुमटा प्रमाणेच आहेत पहिल्या ६६ मंदिरात काळी पांढरी शिवलिंगे एक टाकून एक याप्रमाणे असून बाकीची ४२ फक्त शुभ्रवर्णाची आहेत. माळेच्या मेरुमण्याप्रमाणे एक मंदिर समोरील बाजूस आहे.

हा १०८ आकडा कसा तयार झाला, याचा खुलासा देताना असे दाखविले आहे की, अक्षरांची वर्णसंख्या ५०, ती उलट सुलट केल्यास १०० होते, अधिक अ क च ट त प य स हे सुरवातीचे वर्ण मिळविल्यास ती संख्या १०८ होते

१०८ शिवलिंगाचे पूजन केल्यास मनकामना सफल होतात आणि तंत्र शास्त्राप्रमाणे तेच उत्तम पूजन समजण्यात येते

(बंगाल मंदिरे, रॉय चौधरी, पृ ३७–३८)

(३५) कमलाक्षी— एक तांत्रिक देवता मूर्ति त्रिलोचना, शशीकला धारिणी, उजव्या हाती कमळ, डावे हाती रुद्राक्षमाला धारण करणारी असते आकर्षक प्रयोगासाठी या देवीचे पूजन केले जाते.

(३६) काकिनी— एक तांत्रिक देवता या देवीचे स्वरूप असे की, पद्दळावर बसलेली, चतुर्मुखी, चतुर्भुजा, पीतवर्णा, त्रिशिरा, पीतवर्ण वस्त्रांनी घेरलेली आणि दही भात खाणारी आहे या देवीलाच अनाहत चक्राची शक्ति असे मानलेले आहे

(३७) कामेश्वरी—कामाख्या देवीच्या पाच मूर्तींपैकी एक देवता तांत्रिक या देवीची उपासना करतात या देवीचे स्वरूप त्रिनेत्र, अर्धचंद्रधारिणी, रक्तवस्त्रा, दशभुजा, प्रेतावर बसलेली, गळ्यात मुंडमाळा धारण करणारी आणि

हातात अक्षमाला घेतलेली असते विशेष म्हणजे या देवतेचे पूजन डाव्या हाताने करावयाचे असते

(३८) कालिजाई—ओडिशामधील चिल्का सरोवराची रक्षकदेवता ही एक जलदेवता मानली जाते बालूगाव खेड्यापासून आठ मैलावर हे तळे असून, त्यातील बेटावर देवीचे मंदिर आहे देवीची मूर्ति म्हणून एक ओबड धोबड पाषाणावर तेल शेंदूर थापून काचेच्या बांगड्या, कवड्या इ० त्याला चिकटविलेल्या असतात या देवीलाच कालीचा अवतार मानतात तेलगू व उरीया कोळी या देवीचे भक्त आहेत वादळ उठवून होड्यांचा नाश करू नये, पुनसतान द्याव याखाठी कोंबडी, बकरी बळी देतात, म्हणजे तिच्या बेटावर सोडून देतात

(३९) कुलगोळम्मा— आंध्र प्रदेशातील एक देवता या देवतेची जन्मकथा विशेष आहे एके गावी एक रेड्डी नावाचा शेतकरी नाचणी पिकवीत असे व्यापारी त्याजकडे खरेदीसाठी आला असता, तो कणगी उपसू लागला दाणे कितीही उपसले तरी ते संपेनात शेतकरी आश्चर्यचकित झाला व त्याने सर्व कणगीच पालथी केली त्या वेळी त्यातून एक गोल दगड खाली पडला, तीच कुलगोळम्मा होय मग रेड्डीने भगताला बोलावून आणून या सर्वांचे रहस्य विचारता तो म्हणाला, ' देवीचे असे सांगणे आहे की, धान्य कांडण्याचा आवाज माझे कानी पडणार नाही, अशा ठिकाणी गावाबाहेर मंदिर बांधून माझी स्थापना कर त्या ठिकाणी राहून रेड्डीचे आणि गावाचे मी भले करीन ' रेड्डीने देवीची आज्ञा शिरसावंद्य मानून मंदिर बांधले

(४०) कोटवी—दक्षिण देशातील एक नग्न मातृदेवता कोटवै नावाची असून तीच उत्तर प्रांती या नावाने प्रचलीत झाली असावी. बाणासुराची कोटवी नावाची माता होती तिचे कमरेच्या वरील भाग कवचाने अच्छादित असून खालील विवस्त्र असे, अशी समजुत आहे तिच्या विषयी कथा प्रचलीत आहे की, बळीपुत्र बाणासुर याचे एकदा विष्णूबरोबर युद्ध झाले त्या युद्धात जितके असुर मारले जात त्यापेक्षा अधिक पुन्हा उत्पन्न होत मग देवीची प्रार्थना केल्यावर महाकाली प्रकट झाली आणि तिने असुरांचा पराभव केला आणि त्यांना प्रेरणा देणाऱ्या या कोटवीचाही नाश केला काही वेळी हिला कोटरा असे म्हणतात या देवीची पूजा उत्तर भरतात प्रचलीत आहे वाराणसी जवळ कोम्याईचे एक मंदिर आहे तर अलमोडा भागात लोहघाट जवळ कोटलगढ नावाचे याचे देवतेचे एक दुर्गस्वरूप ठिकाण आहे चाणक्याच्या काळी ही देवी दुर्भाग्यसूचक ठरली असल्याने, संकटनिवारणार्थ देवीचा उत्सव करीत बाणासुर कन्या उषा याचे

विवाहसमयी अनिरुद्धाने सुटकेसाठी कोटवती देवीची प्रार्थना केली आहे. ती देवता हीच असावी.

(४१) कांतीमती देवी—तिरुनेलवेली हे तामीळनाडचे जिल्ह्याचे ठिकाण असून तेथील शक्तिदेवीचे हे नाव आहे. तिरु = सुंदर, नेल=भात, वेली = कुंपण.. भातशेताला सुंदर कुंपण असलेली जागा. यावरून गावाचे नाव पडले आहे. येथील शंकराचे नाव नेल्लयापर असून येथील मंदिर पांड्य राजाने सातवे शतकात बांधले असा उल्लेख मिळतो. येथील वैशिष्ट्य म्हणजे मंदिरातील ४८ पाषाणाचे खांब हे स्वरस्तंभ म्हणून प्रसिद्ध आहेत. निरनिराळे खांब गायनाचे निरनिराळे स्वर देतात. (तामीळनाड मंदिरे–दास, पृ. ४२)

(४२) किरीटेश्वरी— मुर्शिदाबाद (बंगाल) शहरापासून भागिरथी नदीचे पैलतीरावर दहापारा नावाचे गावी या देवीचे मंदिर आहे. सतीचे शरीर भागापैकी किरिट या क्षेत्री पडला म्हणून हे नाव प्राप्त होऊन पीठस्थान बनले. पीठनिर्णय ग्रंथाप्रमाणे किरिट कोणा गावी पडला हे जरी खरे असले तरी देवतेचे नाव मात्र निराळे आहे. इतिहासात या क्षेत्रीचा उल्लेख किरिटकोणा असाही मिळतो. मुर्शिदाबाद ही पूर्वी बंगाल प्रांताची राजधानी होती. त्या वेळी तेथील राजवंश या देवीला मान देत असे, परंतु राजवंश लयाला गेल्यावर देवीवरही संकट ओढवले आणि तिचे महात्म्य लयाला गेले.

(४४) कोलेरम्मा—कोलार ( म्हैसूर ) ह्या ठिकाणी या देवीचे प्रमुख मंदिर आहे. अकराव्या शतकापासून आजतागायत ते अस्तित्वात आहे असे मानतात. या मंदिराच्या प्रवेशद्वाराखाली एक मोठे भुयार आहे, परंतु सध्या ते वापरात नसल्यामुळे त्या भुयारात विंचवांनी आपली भली मोठी वसाहत थाटून ते भुयार म्हणजे जणू काही 'विंचू-नगर'च बनविले आहे! यावरून या देवीला विंचू फार प्रिय असावेत असा तमाम भक्तगणाचा समज झालेला आहे. ह्याच कारणास्तव पुष्कळसे भक्त देवी नवसास पावल्यावर तिला पूजा नैवेद्याबरोबरच चांदीचा विंचू अर्पण करतात. कोलार ह्या गावावरूनच बहुधा देवीचे नाव कोलेरम्मा असे पडले असावे.

(४५) कोल्हांबिका—त्र्यंबकेश्वर (नाशिक) येथे गंगाद्वाराजवळ गंगा नदीचा (गोदावरी) उगम झाल्यावर, जो प्रवाह सुरू झाला तो प्रवाह मदोन्मत्त कोल्हासूर राक्षस पिऊ लागल्याकारणाने पुढे सरकेनासा झाला. गौतम ऋषींच्या तपःसामर्थ्यामुळे हा प्रवाह सुरू झाला असल्याकारणाने त्यांना अर्थातच हा प्रकार रुचला नाही आणि त्यामुळे राक्षसाच्या नाशार्थ देवीची प्रार्थना केली. गौतम ऋषींच्या हाकेला ओ देऊन देवी प्रगट झाली आणि कोल्हासुराचा नाश केल्यावर, प्रवाह पुढे खाली कुशावर्त तीर्थामध्ये प्रकट झाला. प्राण सोडताना राक्षसाने 'शिव, शिव' असे शब्द उच्चारल्यामुळे पार्वतीला कळून चुकले की, हा कोल्हासूर आपल्या पतिदेवाचा निस्सीम उपासक होता. आपली स्मृति ह्या भूतलावर कायम रहावी ह्यासाठी राक्षसाने प्रार्थना केल्यावर पार्वती त्या ठिकाणी त्याच्या इच्छेनुसार कोल्हांबिका या नावाने वास करू लागली.

(४६) कन्यका-परमेश्वरी—दक्षिणेतील कोमटी समाजाची ही कुलदेवता होय. या देवतेसंबंधी आख्यायिका अशी की, एके वेळी म्लेंच्छ आणि कोमटी यांच्या युद्धात कोमटी समाजाचा पराभव झाल्यावर त्यांनी आदिशक्तीची प्रार्थना करून सहाय्य देण्याची विनंती केली. पार्वती त्यांच्या समाजात जन्माला आल्यावर तिचे अप्रतिम लावण्य पाहून म्लेंच्छांनी तिलाच मागणी घातली. अर्थात् मागणी अमान्य झाल्यावर पुन्हा दोघांचे युद्ध जुंपले आणि त्या दैविशक्तीच्या पाठबळामुळे कोमटी समाजाने युद्ध जिंकले. पण त्या मुलीच्या कौमार्याची शंका समाजाला आल्याने तिला अग्निकाष्ठ भक्षण करावयास भाग पाडले. चमत्कार असा झाला की, अग्निकुंडात उडी मारल्याबरोबर ती कुमारी गुप्तच झाली व प्रत्यक्ष पार्वतीच्या स्वरूपाने कुंडातून वर आली. सर्व जातीने आपल्या शंकेबद्दल देवीची करुणा भाकली आणि सदैव तिचे पूजन करण्यास मिळावे म्हणून देवीरूपाने राहण्याची विनंती केली. भक्ताच्या विनंतीला मान देऊन पार्वती, कन्यका-परमेश्वरी नावाने स्थाईक झाली.

(४७) कटि अंकम्म — दक्षिण भारतातील एक शक्ति-देवता. ती स्मशानात रहाते व गावामध्ये अनेक प्रकारचे उत्पात घडविते. संकटे टळावीत म्हणून वार्षिक तिला एक बकरा बळी देतात. या समयी गावकऱ्यांची मिरवणूक स्मशानात जाते. कथा सांगणारा माडिगा हा स्मशानातील माती, कापूस, चिंध्या एकत्र करून कटि अंकम्माची मूर्ति तयार करतो. तिच्या पुढे शिजविलेल्या भाताचा ढीग घालतात आणि बकरा बळी देऊन त्याचे रक्त तिच्या तोंडाला लावतात. हे सर्व घडत असता, माडिगा देवीच्या कथा लोकांना सांगत असतो.

(४८) कोटमची शक्तिदेवी — येवले–औरंगाबाद मार्गावर येवल्यापासून १३ मैल कोटमगावी त्रिमूर्ति महालक्ष्मी, महाकाली, महासरस्वतीचे स्थान आहे. नारदी नदी गावाजवळून वाहते. येवले शहर शके १५४५, म्हणजे सुमारे ३५० वर्षांपूर्वी स्थापन झाले, पण तत्पूर्वी सुमारे तीनशे वर्षे तरी देवीची स्थापना झालेली असावी, अशा लोकवार्ता आहेत.

या देवीची प्रतिष्ठापना कशी झाली याबाबत अनेक दंतकथा आहेत.

( १ ) एक शेत शेतकरी नांगरीत असता, फाळ एके ठिकाणी अडकून बसला. शेतकऱ्याने हाताने थोडेसे उकरून पाहिले आणि मूर्ति आढळून आली.

( २ ) कोणी एक देविभक्त देवीची मूर्ति घेऊन जात असता, त्याने मागे न वळून पाहण्याची अट मोडली म्हणून देवीने पुढे जाण्याचे नाकारले. इ० इ०

सांप्रत देवीचे मंदिर नवीन पद्धतीचे बांधलेले असून, परिसरात लहानसर महादेवाचे देवालय, गाडीखानाचा मंडप, नगारखाना, दीपमाळ व सात-आठ धर्मशाळा आहेत. आजवर दोनतीन वेळा या मंदिराचा जीर्णोद्धार झालेला आहे. आश्विन नवरात्रामध्ये उत्सव होतो. त्या वेळी या क्षेत्रीचे वैशिष्ट्य म्हणून असे सांगता येईल की, किमान ५०० पुरुष-स्त्री वर्ग घटी बसतात. वेळप्रसंगी केलेले नवस या उत्सवसमयी फेडले जातात. काही भक्त ९ दिवस मंदिरात उलटे टांगून घेऊन, अगर, उभे राहून खडा पहारा देण्याचे व्रताचरण करतात. काही भाविक तर येवल्यापासूनचे तेरा मैलांचे अंतर साष्टांग दंडवत घालून तोडतात आणि तेथे गेल्यावर उपवासही करतात. या व्रताचरणी लोकांना उदार बुद्धीचे लोक, फराळाचे पदार्थही खाऊ घालतात आणि त्यामध्ये पुण्य मानतात.

इतर क्षेत्राप्रमाणे तीन देवतांच्या मूर्ति भिन्न नसून, दत्तात्रयाचे मुखाप्रमाणे मुखे संलग्न आहेत, मधले मोठे व बाजूची त्या मानाने लहान आहेत. मूर्तीचा चेहरा ठाणेजवळील महालक्ष्मीप्रमाणे उभट रुंद जबड्याचा दिसतो. आसपासचे शेकडो गावातील लोक या उत्सवासाठी येत असतात.

( लोकसत्ता, दि. ८–१०–१९६७ )

(४९) कोटी माहेश्वरी—केदारनाथाच्या मार्गावर कालीमठपासून दोन मैलावर क्षेत्र आहे. या ठिकाणी पितराना पिंड व तर्पण करण्याचा प्रघात आहे.

(५०) कृष्णाबाई—वाई ( सातारा ) येथे या देवीचे एक मंदिर आहे. तसेच दुसरे एक मंदिर कृष्णा-कोयना या नद्यांच्या संगमावर आहे. ह्या ठिकाणी एकूण ६२ मंदिरे आहेत. ह्या सर्वांमध्ये हे स्थान प्रमुख मानले जाते. सन १७३५ च्या सुमारास सातारा येथे राहणारे श्री. परशुराम नारायण अनगळ ह्यानी महाबळेश्वर येथे, ज्या ठिकाणी कृष्णानदीचा उगम होतो, त्या ठिकाणी एक मंदिर बांधले आहे. त्या मंदिराचा जीर्णोद्धार सन १८७५ साली जमखिंडी संस्थानाधिपतींनी पंधरा हजार रुपये खर्च करून केला या कृष्णाबाईच्या मंदिरात उत्सव मात्र आश्विन नवरात्रामध्ये साजरा होतो.

( सातारा जिल्हा गॅझेट, पृष्ठ ५११ )

(५१) गणदेवी—गणदेवी ( बडोदा ) हे एक तालुक्याचे ठिकाण असून, त्याच शहरी श्रीगणदेवीचे मंदिर आहे. गावाचे नाव देवीच्याच नावावरून आले असे म्हणतात

(५२) गीश —आर्य अफगाणिस्थानमार्गे भारतामध्ये आले. त्यापैकी काही तेथेच स्थाईक झाले होते. त्या वेळी त्यानी स्थापन केलेल्या देवतापैकी ही एक देवता होय सध्या तेथे रहात असलेले नागरिक या देवतेला 'काफीर लोकांची देवता ' किंवा ' युद्धात साहाय्य करणारी देवता ' असे मानतात

(५३) गंगम्मा—तिरुपाती ( मद्रास ) या गावी या देवतेचे प्रमुख मंदिर आहे. कैकेल्न ( कोष्टी ) ही जमात उत्सवप्रसंगी निरनिराळे वेष धारण करून व पोशाख बदलून तेथे नाचतात. नाचणारे नर्तक मातंगीच्या वेषात असताना जिभेत लोखंडी सळई टोचून घेण्याचा अद्भुत व लोकविलक्षण धाडसी प्रयोग करून दाखवितात

दक्षिणेतील धनगर समाजाची एक प्रमुख देवता या देवीचे उत्पत्तीविषयक प्रचलीत कथा अशी की, या देवीने आकाशातून भूतलावर मदुरा येथे आगमन केले तेथील राजा काही कारणाने तिला मारू लागला. तेव्हा गावाबाहेर उडत जाऊन तिने जमीनीजी गुहेचा आश्रय घेतला काही काळाने वनात पशु चारणाऱ्या धनगराना ती आढळली. एक दिवस शिवपूजक धनगराचे पूजेत तिने व्यत्यय आणला, म्हणून धनगरानी तिला दोरखंडाने बांधून ठेवले, पण त्वरितच तिचे रूपांतर पाषाणमूर्तीत झाले. ह्या वेळेपासून धनगर समाज तिचे पूजन करू लागला आणि पशुबळी अर्पण करू लागला

(५४) गार्शी--हे एक अलक्ष्मीचे स्वरूप आहे. देवीचा कोप झाल्यास दारिद्र्य, रोगराई व आपत्ती येतात अशी समजूत आहे. यास्तव जेसोर भागातील स्त्रिया आश्विन अमावस्या दिनी या देवीची पूजा करतात. त्या दिवशी घर व गोठा सकाळीच साफसूफ करतात. अंगणात शेकोटी पेटवून त्याला गार्शी देवीचा अग्नि म्हणून नमस्कार करतात. देवीचे प्रतीक म्हणून एक कलश गवताचे चुंबळी वर ठेवून त्याचे पूजन करतात. नैवेद्य म्हणून धुतलेले तांदूळ उन्हात वाळवून परळात मध्यभागी ठेवून सभोवार फळफळावळ व मिठाई रचतात. हा नैवेद्य झाल्यावर घरातील वृद्ध स्त्री गार्शी देवीची कथा सांगते. पूर्व बंगालमध्ये याच स्वरूपाला गाडसी असे नाव आहे.

(५५) गांधर्वी माया--स्कंद पुराणात या देवतेचे वर्णन आहे. शंकर आणि जालंधर दैत्य युद्ध चालू झाल्यावर, शंकराना मोह घालून पकडण्यासाठी जालंधराने या देवीचा उपयोग करून घेतला तिच्या प्रभावाने शेकडो गंधर्व-अप्सरा युद्धक्षेत्रात उतरून गाऊ नाचू लागल्या. शंकरही किंचित काळ स्तंभित होऊन तिजकडे पाहात राहिला. पण शेवटी शिवाकडून तो पराभूत झाला.

(५६) गिरजामाता--वेरुळची लेणी ज्या डोंगरामध्ये कोरलेली आहेत, त्याच्या डोंगरमाथ्यावर हे देवीचे स्थान आहे. या देवळाच्या आजूबाजूच्या मुलखाला म्हैसमाळ असे म्हणतात. त्यामुळे देवीला म्हैसमाळची देवी असेही म्हटले जाते हे स्थान जागृत असून नवस करणाऱ्याला ती पावते, अशी तिची प्रसिद्धी आहे या ठिकाणी प्रतीवर्षी माघी पौर्णिमेला यात्रा भरते.

( पुरुषार्थ, डिसेंबर १९६३ )

(५७) गुढी देवता— एका कहाणी-संग्रहात या देवतेची माहिती दिली आहे. ती अशी की, लक्ष्मी, दुर्गामाई, आपली कहाणी ऐका. प्राचीन काळी पैठण राजधानी शालिवाहन राजाने केली. शकानी, हुणानी त्याला वेढा घातला. शालिवाहन राजाने त्याचा पराभव केला. सर्वत्र आनंद झाला. त्या आनंदात सर्वांनी दुर्गादेवीच्या विजयाप्रीत्यर्थ गुढ्या उभारल्या. लक्ष्मीचा उत्सव साजरा केला. गुढीवर रेशमी खण, जरीचे शालू डोलू लागले. त्याच्या माथ्यावर सुवर्णाची, रुप्याची पात्रे झळकू लागली. पुष्पांच्या माळा त्याच्या अंगावर शोभू लागल्या. सर्वांनी या गुढी देवतेची पूजा केली, गोडाचा नैवेद्य समर्पण केला आणि वरदान मागितले, ' गुढी देवते, श्रीदुर्गा महालक्ष्मी नमोऽस्तु ते, तू सर्वांना सुख व संपत्ती दे.'

असे सांगतात की, या दिवसापासून गुढीची पूजा प्रचलित झाली आणि आजही ती सर्वत्र सुरू आहे. ( कहाण्यासंग्रह, ले. वामनराव भावे, बेळगाव )

(५८) गुप्ताबाई—( ताम्हाने-राजापूर ) रत्नागिरी.

गुप्तदुर्गे महाभागे गुप्तपापप्रणाशिनि ।
नमस्ते गुप्तकामाख्ये तुभ्यं त्रैलोक्यपूजिते ॥ ( कामाख्या दर्शन )

धरणीधर देवकांत शर्मा, बडा पुजारी, कामाख्या देवी, आसाम यांनी 'कामाख्या दर्शन' नावाचे लहानसे चोपडे प्रसिद्ध केले असून त्यामध्ये वरील श्लोक आलेला आहे. त्याने असेही म्हटले आहे की, छिन्नमस्ता देवी गुप्तरूपाने या ठिकाणी वास करीत आहे, असे जरी असले तरी या ठिकाणी गुप्तदुर्गा हा शब्दप्रयोग छिन्नमस्ता देवीला अनुलक्षून नसून कामाख्या देवीलाच लागू पडत असावा, कारण उघड आहे. वसिष्ठांनी शाप दिल्यानंतर हे पीठ अनेक शतके भूमीमध्ये गुप्त झाले होते, ते पधराव्या शतकात पुन्हा वर आले. दुसऱ्या ओळीतील 'गुप्तकामाख्ये' या शब्दप्रयोगावरून वरील विधानाला पुष्टीच मिळते.

मार्कंडेय पुराणामध्ये या देवीचे वर्णन करताना असे प्रतिपादिले आहे की, या गुप्तरूपाचे अव्यक्त स्वरूप लक्ष्मी, महाकाली, महासरस्वती या तीन रूपांत प्रगट होते. ही तीन स्वरूपे म्हणजे राजस, सात्त्विक व तामस गुणांची प्रतीके होत. हेच गुप्तरूप आणखी अनेक रूपांत प्रगट होते, जसे सृष्टिनिर्मितीच्या कालसमयी ती महाकाली बनून ब्रह्मदेव प्रजापतींवरही अमल गाजवीत असते, तसेच प्रलयकाली हे रूप महामारी बनून संपत्ति आणि उत्कर्ष यांचा नाश करीत असते.

या देवीच्या नावाची मूर्ति आणि मंदिर मु. ताम्हाने, ता. राजापूर, जि. रत्नागिरी, या लेखकाच्या जन्मगावी आहे. तेथील मूर्तीचे स्वरूप असे. उंची सुमारे अडीच फूट, चार भुजा, उजव्या वरच्या हाती डमरू, उजव्या खालच्या हाती तलवार, डाव्या वरच्या हाती त्रिशूळ आणि खालील हाती पानपात्र, मागील बाजूस पाषाणाच्या प्रभावळीमध्ये शंकराची मूर्ति, मस्तकी अगचा किरिट व गळ्यामध्ये जानूपर्यंत लोळणारी पुष्पमाला याप्रमाणे आहे. या देवीच्या मंदिराच्या थोड्या अंतरावर बावची नावाच्या देवतेचे मंदिर आहे. या ठिकाणी देवीचे स्वरूप वरीलप्रमाणेच आहे, पण खाली दोन्ही बाजूस सिंह व गजाच्या मूर्ति आहेत. चार मैल अंतरावर सौंदळ गावी देवीची मूर्ति पाहिली, तेथे स्वरूप तेच असून नामाभिधान मात्र वेगळे आहे. या सर्वांची बनावटही एकाच काळची वाटली. बहुधा ती जैन काळातील असावी. वरीलप्रमाणे जरी माहिती मिळत असली, तरी नामाभिधान का आले याचा खुलासा समाधानकारक-

पणे मिळालेला नाही, हे नमूद करणे आवश्यक आहे. रामदासांनी एके ठिकाणी म्हटले आहे—

चंचल नदी गुप्तगंगा । स्मरणे पावन करी जगा ॥

अर्थात त्यांनी हे गंगानदीला उद्देशून लिहिलेले असले, तरी या गुप्त देवीरूपासही ते लागू होण्यासारखे आहे. देवीच्या गुप्तरूपाचे म्हणजेच मूळ निर्गुणाचे स्मरण केल्याने भक्त पावन होतात. तेव्हा गुप्तदेवी म्हणजे निर्गुण-स्वरूपाची देवी असा अर्थ संभवतो.

पंडित भिकाजीशास्त्री अमृत्ये यांनी असे स्पष्टीकरण दिले की, मूळ निर्गुणनिराकार देवीचे स्वरूप हे सर्वांना दिसत नाही, म्हणून ते गुप्तच मानावे लागते. सगुण मूर्ति ही भक्ताची कल्पना आहे. म्हणून गुप्ताबाई म्हणजे मूळ निर्गुणनिराकार स्वरूप असे मानले पाहिजे.

(५९) गोमती— तिरुनेलवेली (तामीळनाड) जिल्ह्यात श्रीशंकर-नारायण स्वामींचे प्रख्यात मंदिर असून तेथे ही शक्तिदेवता आहे. शंकरनारायण म्हणजे साक्षात् हरीहराचे रूप होय. या देवीसमोर आठ इंच व्यासाचे एक छिद्र असून त्यामध्ये श्रीचक्राची आकृति आहे. येथील अनुभव असा सांगतात की, एकादी स्त्री फेफरे रोगाने पछाडलेली असेल तर अथवा भूतखेतांनी पछाडलेली असेल तर, तिने या छिद्रावर ४८ तास बसून देवीची आराधना केली म्हणजे ती रोगमुक्त होते. अशा व्यक्ति रोगमुक्त झाल्यावर काष्ट अथवा धातूचे अवयव करून देवीला वाहतात. रोगमुक्त होण्याचे कारण असे देतात की, देवीच्या अभिषेकाच्या वेळी देवीच्या तेजाच्या ज्या सूक्ष्म व गूढ कंपलहरी बाहेर निघत असतात, त्याचा परिणाम घन अगर स्थूल स्वरूपावर होऊन मानवी देहांतील दुष्टजीवशक्ति निघून जाते. या पराशक्तीच्या सात्विक तेजाने तामसवृत्तीचे भूतसृष्टीतील प्राणी नष्ट होतात, निघून जातात. रोगनिर्मूलन शक्तीमुळे देवता जास्त प्रसिद्ध आहे.

(तामीळनाड मंदिरे, दास, पृ. ४७)

(६०) गोटीदेवी— दक्षिण भारतातील माळी समाजाची देवता. ज्या वेळी अवर्षण पडते, तेव्हा देवीचे खास पूजन करतात. मूर्ति साधारणपणे गावसीमेवर असते. पावसाळ्यापूर्वी या देवीचा वार्षिक उत्सव करतात. त्या वेळी देवीची मृण्मय मूर्ति करून, एका टोपलीत वाळलेल्या गवताखाली लपवून ठेवतात, हेतु हा की, माडिगा जातीयांनी ती पाहू नये. पावसाला सुरुवात झाली म्हणजे देवता मूर्तीमध्ये अवतरली असे समजून उत्सवाला सुरुवात होते. नंतर ते गवत पेटवून त्यावर दुधाचे भांडे ठेवून, त्या सभोवार फिरून नाच-गाणे होते.

दूध उतू गेले म्हणजे सर्वजण मोठ्याने हाकाटी करतात. मूर्ति असलेली टोपली याच्या हातातून त्यांच्या हाती, याप्रमाणे फिरवून गवताच्या गजीत लपवून ठेवतात आणि समारंभ संपतो

वरील समारंभाचे कारण असे की, पूर्वी गोंटी ही क्षुद्र जमातीची मुलगी होती माडिग तरुणाबरोबर तिचा संबंध आला, म्हणून तिचा भाऊ तिला ठार मारण्यास निघाला तेव्हा प्राणरक्षणासाठी ती जाराच्या घरी गेली, तेथून शेतात गेली आणि मालवशीयाना खरी हकिगत सांगितल्यावर, त्यांना दया येऊन त्यांनी तिला गवताच्या गजीत लपविली तेथूनच ती पुढे गुप्त झाली आणि देवता झाली

(६१) चर्चिकादेवी— उत्तर प्रदेशात ही छाठीदेवी या नावाने प्रसिद्ध आहे लखनौ शहरी हिचे मंदिर आहे बलुचिस्तानामध्ये समुद्रकिनाऱ्यापासून २० मैल आतील भागात अघोरा अथवा हिंगुळा नावाची नदी वाहात असून जवळच हिंगुळा पर्वत आहे या पर्वताची अधिष्ठात्री म्हणून चर्चिकादेवीला मान आहे वाराणसी शहरी या देवतेचे मंदिर आहे भिलसा येथील शिलालेखात, परमार वंशातील नरवर्मदेव राजा या देवीची स्तुति-स्तोत्रे गातो, असे वर्णन आहे. यावरून ती त्या राजवंशाची कुलदेवता असावी असे वाटते इतकेच नव्हे तर त्या राजाने या देवीचे एक मंदिर बांधल्याचाही उल्लेख मिळतो

(भा स. को, ३/२४४).

(६२) चावदबाई—जुन्नर (पुणे) जवळ चावद ह्या नावाचा एक किल्ला असून त्यामध्ये या देवीचे मंदिर आहे मंदिरातील मूर्तीचे स्वरूप बहुधा रेणुकादेवीचे आहे किल्ल्याच्या चावद ह्या नावावरून देवीचे नाव चावदबाई असे पडले असावे प्राचीन काळी नालासोपारा बंदरातून पैठणपर्यंत परदेशाशी लोकांचा व्यापार चाले. त्या वेळी मार्गामध्ये हा किल्ला असल्याने संरक्षणाच्या दृष्टीने तो अतिशय उपयुक्त होता. उनिजा (उज्जैन) येथे हेमाडपंती शिल्पाचे ह्या देवीचे आणखी एक मंदिर आहे (ग्वाल्हियार जिल्हा गॅझेट, पृष्ठ २७६)

(६३) चितरही—मिर्झापूर (उत्तर प्रदेश) प्रांतामध्ये या देवीला लोक फाटक्या चिंध्या अर्पण करतात आणि स्वत मात्र नवीननवीन वस्त्रे तिच्या जवळ मागतात अशी लोकविलक्षण भक्ति करणारे तिचे भक्त आहेत. या देवीला ठिरया असे नाव आहे सात रहिणी या नावाची एक देवताही या ठिकाणी आहे इजिप्तमधील सात हॅथोर अगर भारतातील सप्त मातृका यापैकीच तिचे रूप असावे लहान मुलाना दृष्ट लागू नये म्हणून या देवीच्या प्रतिमा गळ्यात बांधतात

(६४) चायना मंदिरे—इच्छिपूर (हुगळी) हे क्षेत्र कलकत्ता अलीपूरपासून १५ मैलांवर असून, त्या ठिकाणी ही मंदिरे आहेत तसेच भोटगाव हा हौरा शहराचा एक भाग असून तेथेही तिबेटी लोकांचे मंदिर आहे. ही मंदिरे वॉरन हेस्टिंग्सच्या वेळी बांधलेली आहेत असा उल्लेख मिळतो. या मंदिरातून आर्यतारा, वज्रभृकुटी, महाकालभैरव, पद्मपाणी यांच्या मूर्ति आहेत.

(बंगाल मंदिरे, रॉय चौधरी, पृ. १५४)

(६५) चोकानायकी—मलयापूर (मद्रास) जवळ तिरुवनमियुर नावाच्या गावी त्यागराज शंकराचे स्थान आहे. तेथील शक्तिदेवीचे नाव चोकानायकी असे आहे.

(६६) चौंडेश्वरी—महाराष्ट्र, कर्नाटक, तामीळनाड भागात वस्ती करून असलेल्या देवांग या नावाच्या विणकर समाजाची ही कुलस्वामिनी होय या देवतेच्या उत्पत्तीची कथा अशी की, शंकरांनी देवलान नावाचा मनुष्य, देव आणि मानव यांची वस्त्रे निर्माण करण्यास उत्पन्न केला वस्त्रासाठी धागा विष्णूच्या नाभीकमलातून घेतल्यानंतर, तो येत असताना, वज्रदंतनामक असुराने त्यावर हल्ला केला त्या वेळी चौंडेश्वरी देवीने देवलाना सहाय्य करून असुराचा नाश केला. त्या दिवसापासून त्यांच्या जमातीला देवांग असे नाव पडले आणि चौंडेश्वरी कुलदेवता झाली

दर वर्षी या देवीचा उत्सव साजरा केला जातो, त्या वेळी परमभक्त व्रतस्थ राहून देवीच्या मंदिरात जातात मंदिरात त्या वेळी पुजारी एका भांड्याच्या कडेवर एक तरवार उभी करून ठेवतो. व्रतस्थ देवांग मंदिरात आल्यावर त्या तरवारीचे टोक आपल्या छातीला टोचून घेतो. यात्रेच्या वेळी देवीला कोंबडा, बकरा बळी देतात. चोलराजांची ही कुलदेवता असल्याची वदता आहे.

(भा. सं. कों., ४/६६)

(६७) चंडा—दुर्गादेवीच्या अष्टशक्तींपैकी एक देवता. गौरवर्णी व षोडशभुजा असतात तसेच जैनसमूहातील एक यक्षिणी व वासुपूज्याची सहचारिणी. ही श्यामवर्ण, अश्वारूढ, उजवे दोन्ही हात वरदमुद्रा व माला आणि डावे हाती पुष्प व मुद्गल धारण करणारी. दिगंबर जैन मताप्रमाणे हिचे वाहन मकर आणि आयुधामध्ये थोडा फरक आहे या देवीला प्रचंडा असेही म्हणतात

(६८) चंडिका—दुर्गादेवीच्या अष्टशक्तींपैकी एक देवता, हिला चंडी असेही म्हणतात. या देवीचे पीठ अमरकंटक क्षेत्रात आहे. रावणाचे राज्य सीमेची ही राखणदार होती जटभरताला अन्य जमातीने पडकले आणि

देवीपुढे बळी देण्यासाठी नेले अशी कथा आहे, त्याला त्याच देवीसमोर आणलेला होता, पण हिने त्या बळींचा स्वीकार केलेला नाही. ( भागवत, ५–१२–१३ )

ही एक मातृदेवताही आहे. शोणनद आणि गंगानदी यामध्ये चंडिकानन नावाचे देवीचे एक स्थान आहे.

(६९) चंडनायिका— दुर्गादेवीच्या अष्टशक्तींपैकी एक देवता. ही नीलवर्ण आणि षोडशभुजा असून विविध आयुधे धारण करणारी आहे.

(७०) चंडमातंगिनी—एक तांत्रिक देवता, कृष्णवस्त्र नेसणारी, मौक्तिक माला आणि कुंडले धारण करणारी व वीणाधारिणी असे या देवीचे वर्णन श्रीविद्यार्णवतंत्रामध्ये आढळते.

(७१) जयदुर्गा— एक तांत्रिक देवता. ही सिंहवाहिनी असून डावीकडील दोन हातांत चक्र आणि त्रिशूळ व उजवीकडील दोन्ही हातांत दंड आणि खड्ग असते.

(७२) जया विजया— जैन संप्रदायी देवता जया, विजया, अजिता व अपराजिता अशा चार देवता, द्वाररक्षक देवता म्हणून या संप्रदायामध्ये मानलेल्या आहेत. या चतुर्भुज असून त्यांच्या हाती पाश, अंकुश, मुद्गल आणि वरदमुद्रा अथवा अभय मुद्रा असतो. या देवता शांति आणि समृद्धि देतात. या सर्वांची आयुधे तीच असली तरी वर्णांमध्ये फरक आहे.

जया— पूर्वद्वार रक्षक–गौर वर्ण
विजया— दक्षिणद्वार रक्षक–आरक्त वर्ण
अजिता— पश्चिमद्वार रक्षक–सौवर्ण वर्ण
अपराजिता— उत्तरद्वार रक्षक–काळा वर्ण

(७३) जरादेवी— मूलत. एका राक्षसिणीचे नाव, पण मगध प्रदेशी हिला देवताही मानतात. महाभारतकालीन मगधपति बृहद्रथाचा पुत्र जरासंध हा दोन शकलांनी जन्मास आल्यामुळे, त्याला नगराबाहेर फेकून देण्यात आले. या राक्षसिणीने ती दोन्ही शकले सांधिली आणि मुलाला जिवंत करून राजाला परत केला, यास्तव त्याचे नाव जरासंध असे पडले. महाभारतातील वर्णनाप्रमाणे ती कामरूपिणी, नरमांसभक्षक होती, लोक तिची भक्ति करीत. राजवाड्यातही तिचे पूजन होत असे. या देवीचे स्वरूप म्हणजे भिंतीवर एक तरुण स्त्रीचे चित्र रंगवून तिच्या भोवती मुलांना घोळका दाखवितात. जो तिचे चित्र काढतो, तो श्रीमंत होतो आणि जो तसे करीत नाही, तो दरिद्री होतो.

महाराष्ट्रातील जिवती देवी पूजनाचा याच्याशी संबंध दिसतो बौद्ध धर्मात या देवीला हरिती म्हटले आहे ती मुले भक्षण करणारी म्हटले असून, बुद्धाने तिचा मातृभाव जागृत केल्यावर ती बालकाची रक्षणकर्ती झालेली आहे

(७४) छानिपिट्टा—छत्तिसगड परगण्यातील अहिर व रावत जमातींची एक देवता ही एक साथींची देवता आहे गावात देवीची साथ आली अथवा ही देवता एखाद्याच्या मानगुटीवर बसली अशी गावकऱ्यांची धारणा झाली म्हणजे गावकरी एकत्र जमून काठ्यांनी घराची छपरे पिटतात नंतर प्रत्येक छपरातील थोडे थोडे गवत घेऊन ते एका काठीला बांधून त्यालाच देवीचे प्रतीक मानून छानिपट्टा देवीचा नामघोष करीत रस्त्याने मिरवीत मिरवीत गावाबाहेर टाकतात या कृतीचा उगम पाहता असे दिसते की, गुजरीनामक गौळणीमुळे या टोळ्याचा एकदा मोंगलांबरोबर सामना झाला आणि या देवीने गुजरीची बाजू घेतल्याने मोंगलांचा पराभव झाला या समराचे प्रतीक म्हणून हा विजयदिन साजरा केला जातो काठ्यांनी छपरे पिटतात. म्हणून देवतेला हे नाव प्राप्त झालेले असावे.

(भा स को, ३/५००)

(७५) जगन्मातर्ळी— चिनी लोकांची ही प्रमुख देवता आहे. चिनी लोकांची उत्पत्ती एका अंड्यापासून झाली होती आणि ते अंडे या देवतेने निर्माण केलेले होते, असा धार्मिक लोकप्रवाद अजूनही चिन्यामध्ये रूढ आहे व त्यांमुळे त्यांची या देवतेवर विशेष श्रद्धा आहे

(७६) जनाबाई— दरेडीजान नाशनी (काठेवाड) या गावी गायकवाड सरकारने जनाबाईचे मंदिर बांधलेले आहे नामदेवाची शिष्या जनाबाई ती हीच असावी असे वाटते

(७७) जयवागेश्वरी— नेपाळ प्रांतातील ही ग्रामदेवता आहे या देवीची मूर्ति जेव्हा रंगवायाची असेल तेव्हा देवीचे देवत्व काढून घेऊन ते एका भांड्यामध्ये काढून ठेवतात रंगकाम पूर्ण झाल्यावर पुनश्च पूजाविधीने ते देवीला अर्पण करतात हे या ठिकाणचे एक वैशिष्ट्यच म्हणावे लागल

(७८) जमवाय माता—कछवहा रजपुतांची ही कुलदेवता रामगड (जयपूर) शहरी या देवीचे मंदिर असून, जयपूर महाराजांची ही कुलदेवता होय. जयपूर शहरापूर्वी येथील कछवहा वंशाची राजधानी अंबेर गावी होती आणि या देवतेच्या कृपाप्रसादाने आपणाला राज्य मिळाले, अशी त्यांची श्रद्धा होती. आता जरी जयपूर राजधानीचे शहर झाले असले तरी राजवंशीय मंडळी, जन्म, विवाह, लहान मुलांचे जावळ इ० प्रमुख प्रसंगी जमवाय मातेच्या दर्शनाला जातात आणि धार्मिक विधि करतात.

(७९) जातवेदसी--एक तांत्रिक देवता. हिचे स्वरूप एकमुखी, त्रिनेत्री, अष्टभुजा आणि आयुधे म्हणून शंख, चर्म, बाण, अभयमुद्रा, धनुष्य, चक्र, चषक, वरदमुद्रा असे असते. क्वचित ठिकाणी ही दशभुजाही असते.

( विद्यार्णवतंत्र )

(८०) जीणमाता-- राजस्थानी लोकांची एक देवता. या देवीचे स्थान जयपूर भागातील सीकर जिल्ह्यातील सोशा गावी आहे. मंदिराभोवती घनदाट वनश्री असल्याने, वर्षातून फक्त दोन वेळा यात्रा भरते. देवीची मूर्ति अष्टभुजा असून तिला जयंती असेही म्हणतात. यात्रेसमयी भक्तगण जे गायन करतो, त्यांतून उत्पत्ति मिळते.

हर्षनाथ आणि जीणकुमारी ही दोन भावंडे होती. भावाचे लग्न झाले, पण बहिणीचे काही केल्या जमेना. पुढे वहिनी तिला त्रास देऊ लागल्यावर, ती जवळच्या पर्वतमाथ्यावर जाऊन पार्वती मातेची सेवा करू लागली. तिला परत स्वगृही आणण्याचे भावाचे प्रयत्न निष्फळ झाल्यावर, तोही त्या ठिकाणी भैरवनाथाची उपासना करीत राहिला. कालांतराने शिव-पार्वतीला यांची करुणा आली आणि त्यांना आपल्या स्वरूपात सामावून घेतले. या अद्‌भुत चमत्कारामुळे जीणकुमारीचे रूपांतर जीणमाता स्वरूपात झाले आणि तिचे पूजन चालू झाले.

( भा. सं. को. ३।६१८ )

(८१) जगुली— ओरिसा प्रांतातील एक लोकदेवता. ही त्रिनेत्री असून मस्तकावर नागफणा असतो. श्रावण शु. ५ चे दिवशी गावातील न्हावी या देवीची मृण्मय मूर्ति तयार करतो. तिला एका टोपलीत बसवून घरोघर फिरवितो आणि प्रत्येक ठिकाणी तिचे पूजन होते, नैवेद्य दाखविला जातो. या देवतेचे पूजन केल्यामुळे सर्पविषबाधा होत नाही अशी त्यांची श्रद्धा आहे. महाराष्ट्रात याच दिवशी प्रत्यक्ष नाग घरोघर फिरविला जातो आणि त्याचे पूजन होते.

( ८२ ) जानकी मंदिर—नेपाळप्रांती साप्रतचे जनकपूर आणि प्राचीन मिथिला या शहरी आहे. हे दरभंगापासून जयनगर आणि तेथून या क्षेत्री जाता येते. रामाचे युग संपल्यावर या ठिकाणी घनदाट अरण्य निर्माण झाले. त्यामुळे तपस्वी लोकांना ते एक उत्तम क्षेत्र प्राप्त झाले. एकदा सूरकिशोर नावाचा संन्यासी या क्षेत्री जानकी मातेची वात्सल्यभावाने उपासना करीत असताना, त्याला दृष्टांत झाला की, 'या अरण्यात तुला माझी मूर्ति आढळेल, त्या ठिकाणी माझे वास्तव्य आहे असे समजून, मंदिर उभारावे.' त्याप्रमाणे शोध करून संन्यासाने सीतामाईची मूर्ति शोधून काढली आणि त्या ठिकाणी आदेशाप्रमाणे लहानसे मंदिर उभारले. कालांतराने बुंदेलखंडाच्या राणीने, सांप्रत दिसणारे भव्य मंदिर

मराठ्यांच्या ढिगाऱ्यावर ते रोवलेले असते. चोर लोकांच्या टोळीची रूढि अशी की, डाका घालण्यास जाण्यापूर्वी या देवतेचे पूजन करून कामगिरीवर निघावयाचे. यावरून एक गोष्ट सिद्ध होते की, व्यवसाय कोणताही भलाबुरा असो, प्रथम देवाचे ठायी निष्ठा अर्पण करूनच मग आपल्या कामगिरीवर गेल्याने कार्यसिद्धी होते, हीच श्रद्धा दिसून येते. ( बंगाल मंदिरे, रॉयचौधरी, पृष्ठ १२८ ).

(८६) तय्यल नायकी—तंजोर जिल्ह्यात वायथीश्वरम नावाच्या क्षेत्री या देवीचे स्थान आहे. तेथील शंकराचे नाव वैद्यनाथ आहे. क्षेत्रीचा स्थलवृक्ष निंबार्क असून, परिवार दुर्गा, सप्तमातृका आहेत. अनेक कुंडेही असून, त्यामध्ये जटायु कुंड प्रसिद्ध आहे. विशेष म्हणजे या कुंडाचे सभोवार राम, लक्ष्मण, वसिष्ठ, विश्वामित्र व जटायु यांच्या मूर्ति आहेत. रामायणात जटायूची कामगिरी प्रसिद्ध असून, त्याच्या इच्छेवरूनच जटायूच्या अस्थी श्रीरामांनी या क्षेत्री विसर्जन केल्या. यास्तव या कुंडाला महत्त्व प्राप्त झालेले आहे. या कुंडातील स्नानाने अनेक शारीरिक व्याधी नष्ट होतात, अशा कथा प्रसिद्ध आहेत.

( तामिळनाड मंदिरे, दास, पृष्ठ १८४ )

(८७) तरंग—गोमांतकातील ग्रामदेवतांचे एक प्रतीक. हे तयार करण्यासाठी चार पाच हात लांबीचा वाटोळा खांब घेतात आणि त्याला धोतरे अगर लुगडी गुंडाळून मानवाचा आकार आणतात. त्याच्या माथ्यावर देवीचा पितळेचा मुखवटा, पंजा अगर कळस ठेवून सजवितात. या आकृतीलाच तरंग म्हणतात. दसऱ्याच्या दिवशी अनेक ग्रामदेवतांचे तरंग याप्रमाणे सजवून मिरवणुकीने नाचवीत, कळंबाच्या झाडाखाली नेल्यावर तेथे तरंग आणि कळंब यांचे पूजन केले जाते. सुतार व धोबी भक्त हातात खंजीर घेऊन, ' भले रे भले ' गाणे गात ओणव्याने प्रदक्षिणा घालतात. हे तरंग वाहणारा गुरव, न्हावी, परीट, भंडारी अगर सुतार या जातींपैकीच असावा लागतो व त्या वाहकाला ' मोड ' म्हणतात. मूर्ति डोक्यावर असली म्हणजे वाहकाच्या अंगी संचार होतो आणि लोकांच्या प्रश्नांची उत्तरे देऊन उपाययोजनाही सांगतो.

भूतनाथ व पावणाई यांच तरंगामध्ये अंतरपाट धरून काही इसम त्यांचा विवाह लावतात आणि तो शिव पार्वती विवाह समजतात. गावात अगर शेजारील गावात हा तरंग मिरविला जातो, तेव्हा लोक त्याजकडून कौल घेतात व मिरवणुकीत भाग घेणारांना पाहुणचारही करतात.

( रावळनाथ व कोंकणातील देवस्की, श्री वेर्णेकर )

(८८) ताम्रगौरी— नेहमी गौरी शब्द उच्चारल्याबरोबर ती शंकराची पत्नी पार्वती असा अर्थबोध होतो आणि वर्णनाने तो सत्यही

बांधून काढले. आज ते जानकी मंदिर या नावाने प्रसिद्ध आहे. उत्कृष्ट शिल्पाचा नमुना म्हणून या मंदिराचा निर्देश केला जातो. परिसरात राम, लक्ष्मण, जनक, हनुमान यांची मंदिरे आहेत. या ठिकाणी प्रभुरामचंद्रांनी शिवधनुष्याचा भंग केलेली जागा दाखवितात. तसेच जवळ असणाऱ्या गंगासागर तलावाजवळ, निमी राजाच्या शरीराचे मंथन केलेली जागा दाखविण्यात येते. रामनवमीला या क्षेत्री मोठा उत्सवसमारंभ होतो. ( कल्याण, तीर्थांक )

(८३) डाकिनी—तांत्रिक संप्रदायामधील एक देवता. विद्यार्णवतंत्रामध्ये या देवतेचे ध्यान खालीलप्रमाणे दिलेले आहे.

सोळा पाकळ्यांच्या विशुद्ध चक्रावर बसलेली, रक्तवर्णा, त्रिनेत्रा, चतुर्भुजा, त्रिशूळ, पाश, खट्वांग आणि चर्म आयुधे धारण करणारी आणि पायसान्न भक्षण करणारी असते. साधनमाला ग्रंथामध्ये जवळजवळ वरीलप्रमाणे स्वरूप आहे, पण आयुधांमध्ये फरक आहे. काहींच्या मते ती पायाखाली दोन माणसे तुडवीत आहे, कपालातून रक्त प्राशन करीत आहे आणि नरमुंडाचा हार व मुकुट धारण करणारी आहे.

तिबेट प्रांती डाकिनी ही योगिनींचा एक वर्ग समजला जातो. डाक् = ज्ञान असा रूढार्थ आहे. तेव्हा तांत्रिक-साधनेने जिने ज्ञानप्राप्ति करून घेतली ती स्त्री म्हणजे डाकिनी होय. या डाकिनी स्त्रिया तंत्र साधनेत महामुद्रांच्या रूपाने वावरू लागल्या, स्मशानात साधना करू लागल्या, गुह्याचार करू लागल्या, यास्तव डाकिनी म्हणजे एक चेटकीण असा अर्थ रूढ झाला. शेवरीचे कृपाकर बनून, सहा वर्षे मंत्रपठण केल्यास डाकिनी प्रसन्न होते, असे सांगितले आहे.

(८४) डोंगा—दक्षिण भारतातील एक देवता. डोंगा म्हणजे चोर, तेव्हा गुप्तरूपाने वावरणारी देवता. ही देवता गुप्तरूपाने गावात प्रवेश करते आणि गुरे ढोरे पळवून नेते अशी ग्रामस्थांची भावना असते. या देवतेचे स्थान गावशिवेवर असते. या देवतेने गुरांचे रक्षण करावे म्हणून तिची वार्षिक जत्रा करतात. त्या दिवशी मूर्ति गावशिवेवरून मिरवीत गावात आणून गावाच्या मध्यभागी बसवून पूजन केले जाते. एखादा कोंबडा बळीही दिला जातो. नंतर एखादा वृद्ध ग्रामस्थ या देवीची कथा सांगतो आणि नंतर गावाच्या उलट दिशेकडे तिचे तोंड करून, मिरवीत पुन्हा रात्री गावशिवेवर नेऊन ठेवतात. या पूजनाचे वैशिष्ट्य असे की, स्त्रीवर्ग या देवतेच्या पूजनाला उपस्थित रहात नाही.

(भा. सं. को., ३/७७६)

(८५) डाकेतर काली—डाका घालणाऱ्या चोर लोकांची देवता म्हणून हे नाव आले. या देवीचे स्वरूप म्हणजे फक्त त्रिशूळ असून, अनेक मानवप्राण्यांच्या

मस्तकाच्या ढिगाऱ्यावर ते रोवलेले असते. चोर लोकांच्या टोळीची रूढि अशी की, डाका घालण्यास जाण्यापूर्वी या देवतेचे पूजन करून कामगिरीवर निघावयाचे. यावरून एक गोष्ट सिद्ध होते की, व्यवसाय कोणताही भलाबुरा असो, प्रथम देवाचे ठायी निष्ठा अर्पण करूनच मग आपल्या कामगिरीवर गेल्याने कार्यसिद्धी होते, हीच श्रद्धा दिसून येते. ( बंगाल मंदिरे, रॉयचौधरी, पृष्ठ १२८ ).

(८६) तय्यल नायकी—तंजोर जिल्ह्यात वायथीश्वरम नावाच्या क्षेत्री या देवीचे स्थान आहे. तेथील शंकराचे नाव वैद्यनाथ आहे. क्षेत्रीचा स्थलवृक्ष निंबार्क असून, परिवार दुर्गा, सप्तमातृका आहेत. अनेक कुंडेही असून, त्यामध्ये जटायु कुंड प्रसिद्ध आहे. विशेष म्हणजे या कुंडाचे सभोवार राम, लक्ष्मण, वसिष्ठ, विश्वामित्र व जटायु यांच्या मूर्ति आहेत. रामायणात जटायूची कामगिरी प्रसिद्ध असून, त्याच्या इच्छेवरूनच जटायूच्या अस्थी श्रीरामानी या क्षेत्री विसर्जन केल्या. यास्तव या कुंडाला महत्त्व प्राप्त झालेले आहे. या कुंडातील स्नानाने अनेक शारीरिक व्याधी नष्ट होतात, अशा कथा प्रसिद्ध आहेत.

( तामिळनाड मंदिरे, दास, पृष्ठ १८४ )

(८७) तरंग—गोमानकातील ग्रामदेवतांचे एक प्रतीक. हे तयार करण्यासाठी चार-पाच हात लांबीचा वाटोळा खांब घेतात आणि त्याला धोतरे अगर लुगडी गुंडाळून मानवाचा आकार आणतात. त्याच्या माथ्यावर देवीचा पितळेचा मुखवटा, पंजा अगर कळस ठेवून सजवितात. या आकृतीलाच तरंग म्हणतात. दसऱ्याच्या दिवशी अनेक ग्रामदेवतांचे तरंग याप्रमाणे सजवून मिरवणुकीने नाचवीत, कळंबवृक्षाच्या झाडाखाली नेल्यावर तेथे तरंग आणि कळंब यांचे पूजन केले जाते. सुतार व धोबी भक्त हातात खंजीर घेऊन, ' भले रे भले ' गाणे गात ओणव्याने प्रदक्षिणा घालतात. हे तरंग वाहणारा गुरव, न्हावी, परीट, भंडारी अगर सुतार या जातीपैकीच असावा लागतो व त्या वाहकाला ' मोड ' म्हणतात. मूर्ति डोक्यावर असली म्हणजे वाहकाच्या अंगी संचार होतो आणि लोकांच्या प्रश्नांची उत्तरे देऊन उपाययोजनाही सांगतो.

भूतनाथ व पावणाई यांचे तरंगामध्ये अंतरपाट धरून काही इसम त्यांचा विवाह लावतात आणि तो शिव-पार्वती विवाह समजतात. गावात अगर शेजारील गावात हा तरंग मिरविला जातो, तेव्हा लोक त्याजकडून कौल घेतात व मिरवणुकीत भाग घेणारांना पाहुणचारही करतात.

( रावळनाथ व कोकणातील देवकी, श्री. बेहरे ).

(८८) ताम्रगौरी— नेहमी गौरी शब्द उच्चारल्याबरोबर ती शंकराची पत्नी पार्वती असा अर्थबोध होतो आणि बहुंशाने ती सन्यही

आहे. पण नियमाला अपवाद असावा त्याप्रमाणे या ठिकाणी आहे आणि म्हणूनच हिचा निराळा उल्लेख करावा लागत आहे. कथा अशी की, एके वेळी ब्रह्मदेव ध्यानस्थ नसले असताना करतल सहज एकमेकावर घर्षण झाल्यावर त्यापासून एक कन्या निर्माण झाली. नंतर ते तिला म्हणाले, तुझा जन्म आता झालाच आहे, तेव्हा भूतलावर जाऊन शंकराबरोबर विवाहबद्ध हो. पित्याची आज्ञा प्रमाण मानून ती गगनमार्गे जी निघाली अवतरली, ती गोकर्ण महाबळेश्वर येथील ताम्रपर्वतावर आली. तेथे स्वयंभूलिंगाची सेवा करीत असताना भोलानाथ प्रसन्न झाले आणि तिच्या विनतीवरून त्यांनी विवाह केला. हा विवाह आश्विन वद्य १४ तिथीला झाला. ताम्रपर्वतावर उतरली म्हणून शंकर तिला ताम्रगौरी म्हणू लागले. या देवीचे वैशिष्ट्य म्हणजे हिचे हातात तराजू आहे आणि भक्ताची भावना अशी आहे की, ती काशीक्षेत्र व गोकर्ण क्षेत्र यांना तोलून दाखवीत असून गोकर्णाचे पारडे किंचित जड झालेले आहे. याला कारण असे की, काशी क्षेत्रातील सर्व तीर्थे तर तेथे आहेतच पण अखिल तीर्थांचा आधार जो पश्चिम सागर, तोही या क्षेत्री आहे आणि काशीक्षेत्री नाही

(८९) तेलफळादेवी— या देवतेचे स्थान पुणे शहरी भवानी पेठ घर क्रमांक १२५१ येथे आहे. पेशवे काळी आई-आदि-पुरुषाचा उत्सव होत असे, आणि त्याप्रीत्यर्थ '२५००० श्री आई आदि पुरुष, वास्तव्य पेठ भवानी पौषी पौर्णिमेचे' असा खर्चाबद्दल उल्लेख तुळशीबागवाले दप्तरात आढळतो. देवीप्रीत्यर्थ होणाऱ्या कार्यक्रमाचे वेळी प्रसाद म्हणून बाजरीची फळे व तेल हे वैशिष्ट्य असल्याने देवीलाही हे नामाभिधान प्राप्त झालेले आहे. मूळात हे स्थान आई-आदि पुरुषाचेच आहे. याची पूजा पुराणिक घराण्याकडे आहे.

या देवतेच्या उत्पत्तीची कथा अशी देतात की, औरंगाबाद–जालना मार्गावर, गोलट गावी पूर्वी निठारेणुकानंदन नावाचा संत होऊन गेला. त्याचा काळ सोळाव्या शतकातील आहे विवाह झाल्यावर त्याने सहस्रचंडी याग केला असता होमकुंडातून अर्धनारी नटेश्वराची मूर्ति प्रगट होऊन देवीने आदेश दिला की, 'बाहेर डोंगरावर जाऊन रेणुका देवीची पूजा करण्याची तुला गरज नाही. हीच मूर्ति घरामध्ये स्थापन कर म्हणजे मन.शांति मिळेल.' त्याप्रमाणे पौष शुद्ध पौर्णिमेच्या दिवशी मूर्तीची स्थापना झाली त्या मूर्तीला तो आई-आदि-पुरुष म्हणत असे आई=जगन्माता भवानी आणि आदि पुरुष=जगत्पिता शिवशंकर होय. जगताचे पितर शंकर पार्वती हीच होत कालिदास म्हणतोच की, जगत. पितरौ वन्दे पार्वतीपरमेश्वरौ। (रघुवंश)

असे सांगतात की, पंतप्रतिनिधि घराण्याचा आदि-पुरुष हा रेणुकानंदनाच्या वंशातील असल्याने ती देवता त्याने कुलदेवता मानली आणि सांप्रतही त्याच्या

देवामध्ये दोन मुखवटे आई आदि-पुरुषाचे मूर्तींचे आहेत. या देवतेचा शिक्काही प्रचारात होता. तात्पर्य, पंतप्रतिनिधीबरोबरच ही देवता पुणे शहरी आली असावी. ( रा. चिं. ढेरे, प्रसाद, जानेवारी १९६५ ).

(९०) त्रिपुरसुंदरी—काठेवाडात मोरवी गावी या देवीचे एक मंदिर आहे. हे गाव उपमच्छु नदीचे किनारी असून महाभारत काळातील मयूरध्वज राजाची एक राजधानी होती. या प्रमुख देवीव्यतिरिक्त येथे अनेक लहान मंदिरे आहेत.

(९१) त्रिपुरेश्वरी—उदेपूर ( टिपेरा संस्थान ) येथे या देवतेचे स्थान आहे. मंदिराच्या आजूबाजूला घनदाट जंगल असले तरीही सहस्रावधी लोक यात्रेसाठी या ठिकाणी जमतात.

(९२) तुक्रेश्वरी—गोलपारा ( आसाम ) या भागात एका उच्च टेकडीवर बिजनी संस्थानच्या राजाने फार वर्षापूर्वी एक दुर्गादेवीचे देवालय बाधलेले आहे. शिल्पशास्त्रदृष्ट्या हे एक अप्रतिम स्थान आहे. त्यालाच तुक्रेश्वरी असे नाव आहे.

(९३) तेलजु—या देवीचे मंदिर खाटमांडू शहरी आहे. गोरखनाथ पंथाची ही एक रक्षक देवता आहे. या देवीला तुळशीभवानी असेही म्हणतात.

(९४) दशभुज ( लक्ष्मी-गणेश )—असे सांगतात की, टिटवाला हे गणेशाचे प्रसिद्ध स्वयंभू स्थान आहे. अशी दंतकथा आहे की, कण्वमुनींचा आश्रम या क्षेत्री असून त्यानी मूर्ति प्रथम स्थापन केली होती. मध्यंतरी येथील स्थानमहात्म्य नष्ट झाले. पेशवाईच्या काळात श्रीमंत माधवराव पेशवे या ठिकाणी प्रकृतीस्वास्थ्यासाठी येत असत. त्या वेळी त्याना दृष्टांत झाला की, जवळच तलावात मूर्ति आहे, ती काढून स्थापना करावी. त्याप्रमाणे श्रीमंतानी मूर्ति बसविली आणि पुजारीपण जोशी उपनावाच्या घराण्याकडे दिले. वरददायक गणपति म्हणून या क्षेत्राची साप्रत खूप चलती आहे.

उत्खननातील मूर्तीसाठी मंदिर पूर्ण झाल्यावर दुसरी सुदर मूर्ति बसवावी या हेतूने पेशव्यानी सुंदर कलाकृति तयार करून घेण्याची खटपट केली, पण काश्मीर प्रांताहून मूर्ति वेळेवर आली नाही. काही दिवसानी मूर्ति आल्यावर ती त्यानी केळकर स्वामींना दिली आणि स्वामींनी ती आपल्या जन्मगावी हेदवी (दापोली) येथे स्थापन केली. साप्रतचे मंदिराचा जीर्णोद्धार काका जोगळेकर, प्रकाश दुग्धमंदिराचे चालक (मुंबई), यानी दृष्टांताप्रमाणे नुकताच केलेला आहे. ( दीपलक्ष्मी मासिक, सप्टेंबर १९६२ )

**(९५) दधिमथी माता** राजस्थानात नागौर गावी या देवीचे मंदिर आहे तेथील दाहिमा ब्राह्मणांची ही कुलदेवता होय या देवतेच्या उत्पत्तीसंबंधी अशी कथा प्रचलित आहे की, ही अथर्वण मुनींची कन्या असून दधीची ऋषींची बहीण होय दधीची ऋषींने आपल्या अस्थि, वृत्रवधासाठी इंद्राला दिल्यानंतर, त्यांचा मुलगा पिप्पलाद याने तिचा सांभाळ केला आश्विन शुद्ध अष्टमीला या देवीची मोठी यात्रा भरते (मरु भारती, ऑक्टोबर १९७७)

याच भांती दायमा ब्राह्मणांची एक जात आहे आपली उत्पत्ति दधिची ऋषींपासून झाल्याचे ते सांगतात यांची कुलस्वामिनी म्हणून ते '**दधिमथी**' देवीची उपासना करतात या देवीची वार्षिक यात्रा आश्विन महिन्यातच होते यावरून असे समजावयास हरकत नाही की, 'दधिमथी' आणि 'दधिमथी' या देवता एकच होत, निराळ्या नव्हेत (राजस्थान जातियां, १९५४)

**(९६) ददरिया देवी**—छत्तिसगड भागातील सर्व महिला वर्ग या देवतेचे पूजन करतो दादर या शब्दाचा अर्थ उच्चस्थान असा असल्याने उच्च भागी डोंगरावरील एक देवता असा नावाचा उगम मिळतो (प्रत्यक्ष स्वरूपाचे वर्णन मिळालेले नाही )

तेथील आदिवासी जमात उंच जागी चढून कामे करताना, झाडावर चढून पाने-फळे तोडताना, माचावर उभे राहून पाखरं हाकताना अगर डोंगरमाथ्यावर जाऊन लाकूडफाटा तोडताना श्रमपरिहारार्थ या देवीचे नावाने गीत म्हणतात म्हणून त्यांना 'ददरिया गीते' नाव पडले आहे विवाहप्रसंगी नृत्ये करताना ही गीते गायली जातात गीतामध्ये पठारी व कछारी असे दोन प्रकार आहेत प्रेमी युवक युवती आपली प्रणयभावना व्यक्त करण्यासाठी या गीतांचा उपयोग करतात एक उदाहरण असे 'आमके डाही बेंदरा झूली जाय ।।' इ इ भावार्थ असा की, आंब्याच्या वृक्षावर वानर झोके घेत आहेत आपल्या प्रीतीला साथ असलेले हे शुभ वानर येथेच आहेत (भा सं को, ४।२८३)

**(९७) दुरूपतिअम्मा**—दक्षिण भारतातील तामिळमधील एक ग्राम देवता द्रौपदी नावाचाच हा अपभ्रंश आहे ही पूर्वजन्मी एका ऋषीची पत्नी होती आणि त्या पुण्याईवर दुसऱ्या जन्मी ती द्रुपद राजाची कन्या झाली (द्रुपदचा अपभ्रंश) आणि नंतर पांडवांची पत्नी झाली याप्रमाणे तेथील भाविकांची श्रद्धा आहे ती एक प्रेमळ देवता म्हणून सर्वत्र ओळखली जाते (भा सं को, ४।४०५)

**(९८) दुल्हादेवी**—फार प्राचीन काळची ही गोष्ट आहे एक नवरदेव नटूनथटून घोड्यावर बसून विवाहास चालले होते परंतु काय आश्चर्य पहा !

एकाएकी ते घोड्यावरून खाली आले आणि जागच्या जागी मरण पावले. पण यापेक्षा आणखी आश्चर्य म्हणजे मरण पावल्यावर त्याचा देह पाषाणरूप झाला आणि तो जमिनीलाच सिळून बसला. त्या दिवसापासून उत्तर भारतातील वन्य जमातींची ही देवता ठरली. कोणी त्याला स्त्रीरूपही मानतात. ओरिसा-मध्य-प्रदेशात राहाणारी गंडा-वन्यजमात तसेच कोष्टीजमात या देवतेची निस्सीम उपासक आहे.

(९९) **देवनायकी मंदिर**—– तंजावर येथे बृहदीश्वर मंदिर स. १०१० चे सुमारास चोळ राजवंशाने पुरे केले. द्रविड शिल्पाचा प्रारंभ ७ व्या शतकात जरी झाला असला तरी त्याला ऊर्जितावस्था १० व्या शतकात चोलाच्या कार-कीर्दीमध्ये आली. या वेळच्या बांधणीत भव्य विमान, शिखर, मुखमंडल, नंदीमंडप, परिवार देवताची मंदिरे, ध्वजस्तंभ, प्राकार, गोपूर इ० इ० विविध प्रकार आले. तसेच या विविध प्राकारावर उत्तम कोरीव शिल्प अस्तित्वात आले. या सर्व गोष्टींचा उत्तम मिलाफ बृहदीश्वर मंदिरामध्ये पाहण्यास मिळतो. या मंदिराचे विमान १३ मजली असून, शिखरावर गोलघुमट आहे. या ठिकाणी शिल्पाचा सुबकपणा, भव्यपणा, सावेपणा आणि डौलदारपणा याचा सुंदर मिलाफ आहे. शिल्पकलेतील हे मंदिर चक्रवर्ती समजले तरी हरक्त नाही. या मंदिराच्या प्राकारात ३५ उपमंदिरे आहेत. येथील ऐरावतेश्वराच्या प्राकारात पार्वतीची दोन मंदिरे आहेत. त्याना देवनायकी मंदिरे म्हणतात. आतील मूर्ति मात्र पार्वती-च्याच आहेत.

त्याच्या स्मरणार्थच ह्या ठिकाणी ह्याच्या मूर्ति नसविलेल्या आहेत (इतिहास संशोधकांनी ह्या गोष्टीकडे विशेष लक्ष देण्यासारखे आहे.) कच देवयानी आणि ययाति राजा याच्या कथा तर सर्वश्रुत आणि सुप्रसिद्धच आहेत.

(१०१) देशदेवी— हिमालय पर्वतावर गौरीशंकर हे पृथ्वीवरील सर्वात अत्युच्च गिरीशिखर आहे ह्या शिखराच्या चीनकडील भागाला चोमो-लुगमा म्हणजे देशदेवी असे संबोधतात आणि भारताकडील भागाला नदादेवी (देवेश) अशी संज्ञा आहे. ह्याचा अर्थ देवाचा भाग भारताच्या हद्दीमध्ये आणि देवीचा भाग चीनच्या हद्दीमध्ये अशी ह्या शिखराची वाटणी झालेली दिसते.

तिबेटी लोक ह्या शिखराला चोमो लुगमा ह्या चिनी नावानेच संबोधितात त्याच्या भाषेत ह्या शब्दाचा अर्थ विश्वमाता किंवा वायुमाता असा केला जातो या प्रदेशात शेर्पा ह्या नावाची वन्य जमात असून दुर्गम शिखर चढून जाण्यास त्याचा वाटाड्या म्हणून पुष्कळच उपयोग होतो. गौरीशंकर शिखराच्या नावाचा अर्थ 'ज्यावरून पक्षी देखील उडू शकणार नाही, इतके उच्च पर्वतशिखर' असा, शेर्पा जमातीतील माता आपल्या मुलांना सांगतात तिबेटातील काही जमाती यालाच 'जोमोग्ल्मा' म्हणजे गोमाता असे म्हणतात. ह्या पर्वताच्या आसमंतात राहाणारे दुसरे लोक म्हणजे याकपाळ. त्यानी ह्या शिखराला 'चो मो उरी' म्हणजे शिखर देवता असे साधेसुधेच नाव दिलेले आहे.

*(Man of Everest, by Sherpa Tensing, Page 38)*

(१०२) देविकुमारी— नेपाळ प्रांतामधील ही एक प्रसिद्ध देवता आहे. या देवीच्या वार्षिक उत्सव समारंभामध्ये रथयात्रेचा कार्यक्रम अतिशय प्रेक्षणीय असतो. त्याच वेळी इंद्रजत्राही भरविली जाते. परंतु हा इंद्रजत्रेचा कार्यक्रम मात्र साधाच असतो.

सोसणारी हो. तू क्षमाशील आणि विश्वगर्भा आहेस. तू आमचे मनोभाव शुद्ध करणारी आहेस.' ( अथर्व., १२-१ )

मातृभूमि म्हणजे केवळ माती, दगड, झाडे, नद्या यांनी भूषित अशी जड वस्तु नव्हे, तर ती एक सजीव स्त्री आहे. सर्वांना अन्नपाणी देऊन पालनपोषण करणारी असून, तिच्या आधारामुळे सर्व लोक जीवन जगतात. आनंद-सुखाचा उपभोग घेतात आणि मृत्यूनंतरही तिच्याच आश्रयाने जीवन संपवितात. यासाठीच वैदिक आर्यांनी तिला देवतास्वरूप मानले आहे. भूमीची उत्पादक-शक्ति आणि स्त्रीची जननशक्ति यातील साधर्म्य पाहून ऋषींनी भू-मातेच्या सुफलतेशी त्यांच्या मीलनाची सांगड घालण्याचा प्रयत्न केला आहे. स्त्रीला संतति व्हावी, म्हणून कृषिकर्मांचा तोडगा करतात. तसेच जमिनीतून भरपूर पीक यावे म्हणून धरती मातेच्या उत्सवप्रसंगी स्त्री-पुरुष नैतिक निर्बंध शिथील करून लैंगिक क्रियांचा प्रयोग करतात. विशेषतः आदिवासी जमातींत हे जास्त घडते. पेरणी, लावणी, कापणी, मळणी या प्रसंगी हे उत्सव साजरे केले जातात.

भारतीय लोकगीतांमधून धरती मातेचे वर्णन भरपूर आढळते. महाराष्ट्रातील महिलानी रचलेल्या ओव्या याची साक्ष देतात.

पाऊस पडतो । पडतो काळाकुट्ट ।
धरणी माता हिरवा कोट । पांघुरली ॥
पाऊस पडतो । थांबेना पागोळी ॥
धरणीमाय हिरवी चोळी । घालीतसे ॥
झाडे झडाडती । विजा कडाडती ।
धरणी माये तुझा पती । येत आहे ॥

उत्पादक व पोषक रूपाप्रमाणे तिचे विनाशक रूपही दिसून येते. तिच्या संहारक शक्तीमुळेच अनेक रोग उत्पन्न करून जीव-मात्राना आपल्या पोटात कायमचे स्थान देते. गोंडाच्या कथातून हिची अनेक रूपे वर्णिली आहेत.

( भा. सं. को., ४/५५६ )

(१०४) धर्मराज—ही बंगाल प्रांताची ग्रामदेवता असून जयदुर्गा, कळकाई, कालिबुरी, राजबुरी, रायभगिनी या त्याच्या सहचरी आहेत, चंद्रकोण भागात या देवता आहेत. पांडवकाली चंद्रकेतु नावाच्या राजाचा उल्लेख मिळतो. तो तेथील असून, चंद्रकोण हा त्याचेच नावाचा अपभ्रंश आहे असे मानतात. ज्याप्रमाणे भगवान शंकराला शक्तिदेवीची जोड असते, तद्वत् येथेही ती पाहावयास मिळते. या देवतांना तिकडे कामिन्या ( Kaminyas ) म्हणतात.

( बंगालमंदिरे, पृष्ठ, ८२ ).

(१०५) धर्मसंवर्धिनीदेवी--तिरुवादी हे क्षेत्र तंजाऊरपासून ७ मैलांवर कावेरी नदीच्या काठी आहे. या ठिकाणी पाच नद्यांचा संगम असल्याने येथील शंकराचे नाव पंचनदीश्वर असे आहे. येथील शक्तिदेवीचे नाव धर्मसंवर्धिनीदेवी असे आहे. स्थानिक लोक मात्र या शंकराला अप्परास्पर म्हणजे पति पितास्वरूप देव मानतात.

ही देवता म्हणजे येथील लोकांच्या मानसिक स्थित्यंतराचे प्रतिक आहे. केवळ मंदिरे उभारून धर्मसंवर्धन होत नाही, मनाची मशागत केली तरच त्यातून उत्तम पीकपाणी निघू शकते. पण त्यासाठी माणसाने सदैव प्रयत्नवादी असलेच पाहिजे. निर्गुणाची उपासना सर्वसाधारण मानवांना कठीणतम असल्याने सगुणाकाराला भजणे हाच राजमार्ग होय. या भावनेचे प्रतिक म्हणून ही देवता सर्वांनाच अभयाचे आभिवचन देऊन धर्मसंवर्धनाचा पाया घालून बसलेली आहे. शैव-वैष्णव ऐक्य व्हावे हाच यातील प्रमुख उद्देश आहे.

(रा. श. नगरकर, केसरी, २५-८-६८).

(१०६) नकुलेश्वरी—या देवीचे चरित्र देवीमाहात्म्य ग्रंथात वर्णिलेले आहे. ललितादेवीची ही मानसजात कन्या होय. ही गरुडारूढ असते. सर्पिणीचा पराभव करण्यासाठी ती निघाली असता भंडासुराच्या पाच सेनापतींबरोबर हिचे युद्ध झाले आणि त्या सर्व सेनापतींचा या देवीने पराभव केला.

(भा. सं. को., ४/६५७).

(१०७) नग्नकबंधा—अलमपूर (जि० रायचूर) या गावी ही मूर्ति आहे. शीर नसलेल्या धडाची या ठिकाणी पूजा होते. इतर ठिकाणी बहुधा केवळ शिरोभागाची पूजा होते, पण केवळ धडाची पूजा होत असलेले हे एकमेव ठिकाण दिसते. अर्थात हे स्वरूप रेणुकादेवीचे तुटलेले शरीराचे असावे. हे स्थान फार पुरातन असावे, कारण तेर ढोक (गोरा कुंभाराचे गाव) आणि नागार्जुन कोंडा या ठिकाणी जे उत्खनन झाले, त्यामध्ये या मूर्तिसमान चित्रमूर्ति आढळून आलेल्या आहेत. या क्षेत्रीचा विशेष म्हणजे स्त्रियांनी नवस केल्यावर तिचे वांझपण नष्ट होते. (जाधव, छायाचित्रकार, पुरातत्त्व खाते, औरंगाबाद)

(१०८) नगरकोट बारी—उत्तर प्रदेशात या देवीची सात स्थाने असून, त्या प्रत्येक ठिकाणी ती वास्तव्य करून आहे असे भक्त मानतात. काही सात बहिणी समजतात (पण सात अप्सरा नव्हत). त्यांची नावे व स्थाने खालीलप्रमाणे—

(१) नगरकोट बारी, (२) ज्वाला—या देवीचे मंदिर नगरकोटच्या पूर्व दिशेला आहे; (३) चिन्तनपूरनी—ज्वाला देवीचे पूर्वेला असून तिथे

पाषाणावर पादुका उमटलेल्या आहेत; ( ४ ) देलौनभमानी; ( ५ ) धौला गढवारी धौलागड पर्वताच्या माथ्यावर; ( ६ ) केलाभमानी—हिला कैलामय्या असेही म्हणतात; ( ७ ) हिंगुळाजबारी—हिला आदिभमानी असेही म्हणतात.

( अग्रवाल, व्रजभाषा शब्दावलि, १९६० )

वरील देवता या मूळ नावाचा अपभ्रंश आहे. ज्वाला, चितपूर्णी आणि नगरकोटकी हा पंजाब प्रांतीय देवतांचा शक्तित्रिकोण आहे. भमानी हा मूळ शब्द भवानी याचा व्रजभाषी अपभ्रंश आहे. म्हणून कालीचे नाव केलाभमानी असे झाले. अरासूर येथील अंबेला धौलागडवाली असेही नाव असून त्याचाच अपभ्रंश असावा. हिंगुळा ही आदिभवानी बलुचिस्तानामध्ये आहे. त्या त्या देवतांच्या भक्तांनी त्यांना आपल्या प्रांतीय देवतामध्ये स्थान देऊन एक समूह तयार केलेला दिसतो.

(१०९) नडिवियिढी—दक्षिण भारतातील एक शक्तिदेवता. शब्दाचा अर्थ मधला रस्ता असा आहे. ही देवता गावाचे मध्यभागी येऊन बसते, या समजुतीमुळे उत्सवाचे वेळी गावाच्या मधोमध मंडप घालतात. या मंडपाचे दोन भाग करतात. आतल्या भागी कुंभार मूर्ति तयार करतो आणि बाहेरील भागात पूजक मातीमध्ये रेघा ओढून एक आकृति तयार करतो. कुंभाराने मूर्ति तयार केली म्हणजे बाहेरील बाजूला तयार केलेल्या आकृतीवर आणून ठेवतात. या ठिकाणी पूजक तिची प्राणप्रतिष्ठा करतो. या वेळी ढोल व इतर वाद्ये वाजत असतात आणि जनसमुदाय देवीच्या नावाचा घोष करीत राहतो. पूजाप्रसाद झाल्यावर दिवसभर इतर कार्यक्रम होतात. ही एक सौम्य प्रकृतीची देवता असल्याने बळी देत नाहीत. ( द्रविडियन देव, एल्मोर )

(११०) नलतेश्वरी—वीरभूम ( बंगाल ) भागामध्ये रामपूर ह्या गावी ह्या देवीचे मंदिर आहे. पूर्वी ही नलराजाची राजधानी होती असे सांगतात. दक्ष-यज्ञानंतर सतीचा शीरोभाग ह्या ठिकाणी पडला असेही मानतात पण या दोन्हीही गोष्टी खऱ्या नव्हेत.

(१११) नवलाई—हेदवी, नरवण ( रत्नागिरी ) येथे ह्या ग्रामदेवतेचे मंदिर आहे. ते एक जागृत स्थान मानले जाते. आपली मनःकामना पूर्ण होण्यासाठी पुष्कळसे भक्त ह्या देवीला नवस करतात. देवी नवसास पावल्यावर बगाड करण्याची पद्धत आहे. हा बगाड करणे म्हणजे देवीपुढील एक लोखंडी हूक मानेला टोचून घ्यावयाचा आणि तशा अवस्थेत एका खांबाभोवती गरगर

फिरावयाचे, असा हा वगड प्रकार असतो. त्याचप्रमाणे भक्ताची जशी भावना आहे की, कोण्या एखाद्याचा नवस फेडावयाचा राहिला असेल आणि देवीच्या पालखीची मिरवणूक त्याच गृहस्थाच्या घरावरून जात असल तर त्याच्या घराजवळ येताच पालखी अतिशय जड होते. इतकी की, पन्नासपन्नास जणाना देखील ती उचलता येत नाही. अशा वेळी पालखी खाली ठेवण्यात येते. त्या इसमाने अखेर नवस फेडण्याचे कबूल केले की, मगच पालखी उचलण्याजोगी झाल्यावर पुढे नेतात.

नवदुर्गाचा अपभ्रंश नवलाई असावा. या देवतेबरोबर पावणाई देवी असते, पावण खलाशी ती यांची बायको दोघांचा नैवेद्य एकाच पानावर वाढतात. यांचा पुजारी सुतार वर्गातील असतो.

(११२) नारायणीदेवी—ग्रंथ प्रचारासाठी फिरत असता, श्री. मोरेश्वर शामराव रावते, शामसदन, गावदेवी, मुंबई यांच्या घरी जाणे झाले. संभाषणाच्या ओघात त्यांनी आपल्या घरातील कुलस्वामिनी 'नारायणादेवी'चे छायाचित्र दाखविले. त्या चित्रावरून स्वरूपाची कल्पना होणे अशक्य वाटले, कारण अंगावर भरपूर वस्त्रालंकार असल्याने फक्त मुखाचा समोरील भाग अस्पष्टपणे दिसू शकतो साधारण चौकोना बसका चेहरा व मस्तकी टोपीवजा आच्छादन दिसले. श्री. रावते म्हणाले की, या देवतेचे निश्चित ठिकाण त्यानाही माहीत नाही. त्यानी मूळ मूर्ति आजवर पाहिलेली नाही, पण ठावठिकाणा मिळाला तर पाहण्याची तीव्र इच्छा आहे. त्यांच्या ऐकीव माहितीप्रमाणे ती दिल्ली शहरी असावी

अधिक विचार करता असे दिसून येते की, देवीचा जो नेहमीचा श्लोक-मंत्र प्रचारात आहे, त्यामध्ये 'शरण्ये त्र्यम्बके गौरि नारायणि नमोऽस्तु ते' असा उल्लेख आहे. तसेच एका आरतीमध्ये म्हटले आहे,

अष्टमीच्या दिवशी अष्टभुजा नारायणी हो ।
सह्याद्रीगिरी उभी देखिली जगज्जननी हो ॥

महाभारतामध्ये नारायणाची दुर्गा, ती नारायणी असा उल्लेख असून, ती एक उमादेवीच्या सख्यांपैकी मानलेली आहे देवीची जी १०८ पीठस्थाने दिलेली आहेत, त्यामध्ये या देवीचे स्थान सुपार्श्व पर्वतावर आहे असे म्हटलेले आहे. हरिवंश विष्णुपर्व अध्याय ३ मध्ये विष्णूने नारायणीदेवीचे स्तवन केलेले असून, ते ३५ श्लोकांत वर्णन केलेले आहे. या ग्रंथामध्ये नवरात्राच्या वर्णनात पेशवे सरकार नवरात्र उत्सव कोणत्या प्रकारे साजरा करीत याचे जे वर्णन

आलेले आहे, त्यात 'अष्टभुजा नारायणीदेवी शेषाद्रि पर्वतावर उभी दोखिली असा देखावा पेशवे सरकार पहात असत' असे आहे.

संस्कृतमध्ये नार शब्दाचा अर्थ ज्ञान, जीव, पाणी अगर अज्ञान असे आहेत. तेव्हा सर्व जीवमात्रांचे अज्ञान नाहीसे करणारी अगर विपुल ज्ञान-प्राप्तीसाठी सर्व जीवांच्या आश्रयस्थानी असणारी, ती नारायणी असा अर्थ संभवतो. सारांश, दुर्गादेवीलाच हे नामाभिधान लावतात. भगवान श्रीकृष्ण आणि अर्जुन यांना लौकिकात नर-नारायण म्हणतात. नर याचा अर्थ परमात्मा आणि त्याविषयीच्या ज्ञानाला नार म्हणतात, आणि यान्वित रूप पुढे नारायणी असे झाले असावे, असे एका शास्त्रींनी व्युत्पत्तिशास्त्रदृष्ट्या विवरण लेखकाजवळ केले आहे.

नारायणाची पत्नी ती नारायणी असे सर्वसाधारणपणे वाटणे अगदी साहजिक आहे आणि ते सत्यही पण आहे. नारायणाचे दुसरे नाव विष्णु असेही आहे आणि त्याची स्त्रीशक्ति ती वैष्णवी होय. तेव्हा वैष्णवी आणि नारायणी यामध्ये मूलतः काही फरक दिसत नाही. या देवीचे एक प्रमुख स्थान हिमालय पर्वतामध्ये असल्याचा उल्लेख या ग्रंथात इतरत्र आलेला आहे.

अहिर्बुध्न्यसंहितेमध्ये या वैष्णवी देवीला अनेक नावानी संबोधिले आहे, जसे—आनंदा, स्वतंत्रा, नित्या, नारायणी, पूर्णा, व्यापिनी, लक्ष्मी, श्री, पद्मा, कमला, विष्णुशक्ति, कुंडलिनी, अनाहता, गायत्री, माता इ० इ०.

वरील सर्व संदर्भांचा साकल्याने विचार करता असे निश्चितपणे म्हणता येते की, दुर्गादेवीच्या अनेक नावांपैकी नारायणी हे एक नाव असून, दुसरे वैष्णवी-देवीचे होय. नारायणाने दुर्गादेवीचे स्तवन केले आणि तिने प्रसन्न होऊन इच्छित पुरे केले, म्हणून नारायणी नाव आले असावे. भक्त जरी हरि-हरांमध्ये लवमात्र भेद मानीत असले तरी विश्वाचे, शक्तीचे तत्त्व जाणणारे हा भेद मानीत नाहीत.

उपरनिर्दिष्ट श्री. रावते यांची पुन्हा भेट घेतली असता ते म्हणाले, त्यांची कुलस्वामिनी नारायणीदेवीचे मंदिर दिल्ली शहरातच आहे. तेथे भेट दिल्यावर त्याना सांगण्यात आले की, मूळ मूर्तीची मोडतोड झाल्याने ते सर्व भाग खाली एका कुंडात ठेवलेले असून, त्यावर दुसऱ्या दुर्गामूर्तीची प्राणप्रतिष्ठा केलेली आहे. सांप्रत त्या मंदिराची व्यवस्था श्रीमान बिर्लाशेटजींच्या घराण्याकडे आहे. दिल्ली येथील जुन्या पुराण्या किल्ल्यात या देवीचे स्थान आहे.

(११३) नागम्मा—आंध्रप्रदेशातील एक ग्रामदेवता. वस्तुतः ही एक व्यभिचारिणी स्त्री होती. ती एका माणसाची रखेली म्हणून राहिल्यावर त्या

माणसाची शेतवाडी भरभराटीला येऊन भरपूर समृद्धि मिळाली. त्या माणसाची अशी श्रद्धा वाढली की, जी काही सुस्थिति त्याला प्राप्त झाली त्याला ती स्त्रीच कारणीभूत होती. या भावनेमुळे ती स्त्री मरण पावल्यावर, तिने त्या स्त्रीचे मंदिर उभारले आणि गाभाऱ्यात तिची मूर्ति बसविली. कालांतराने आजुबाजूचे लोक तिचे पूजन करू लागले आणि तिची कीर्ति वाढली. शेवटी ती ग्रामदेवता बनली.

( द्रविडियन देवता, एल्मोर )

( ११४ ) नीलायताक्षी—नागापट्टण ( तामीळनाड ) येथे कायारोहण-स्वामी नावाचे भगवान विष्णूचे मंदिर असून तेथील ही शक्तिदेवता आहे. येथे अशी दंतकथा प्रचलित आहे की, या देवीची मूर्ति अरबस्तानातील नाईल नदीमधून आणलेली असून त्या वेळी नदीचे काठावर अनेक हिंदु मंदिरे होती. काही वेळा स्थानिक मंडळी या देवीला सुंदरवल्ली या नावाने संबोधतात.

( तामीळनाड मंदिरे, दास, पृ. १६६ )

(११५) नंदादेवी— गढवाल जिल्ह्यातील हिमाचलाच्या रांगेत बाधण नामक विभागात, डोंगरशिखरावर या देवीचे स्थान आहे. दर बारा वर्षांनी भाद्रपद शु. ७ ला येथे उत्सव साजरा केला जातो. उत्सवाची सर्व व्यवस्था गढवालच्या राजघराण्याकडून केली जाते. या प्रसंगी चार शिंगाचा मेंढा मिरवितात. असुराचा विनाश केल्यावर नंदादेवीने एका कुंडात स्नान केले, पण ते रूप-कुंड सांप्रत येथे आढळत नाही. ( कल्याण, तीर्थांक )

कुमाऊं प्रांती भाद्रपद शु. ८ ला या देवीचे नावाने सण साजरा करतात. या दिवशी नंदादेवी आणि तिची बहिण यांच्या केळीच्या सोपटाच्या प्रतिमा तयार करून त्यांचे पूजन करतात. पूजेनंतर पालखीतून त्यांची मिरवणूक काढतात. पूर्वी पशु बळी दिला जात असे. पण सांप्रत ही प्रथा लुप्त झाली आहे. उत्सवाच्या वेळी नृत्याचा कार्यक्रम होतो. ( भा. सं. को., ४।६४१ )

श्रीविद्यार्णवतंत्रानुसार ही एक तांत्रिकपंथीयांची देवताही आहे. तेथे ती कृष्णवर्णा, चतुर्भुजा, एका हाती पानपात्र व उरलेले तीन हात अनुक्रमे वर, अभय व बंधमोचन या मुद्रांमध्ये असतात.

देवीपुराणात दुर्गादेवीचेच हे एक स्वरूप म्हणून नंदादेवी मानलेली आहे.

( शब्दकल्पद्रुम )

(११६) नौरंडी – महाबळेश्वराजवळ ( पुणे ) तळाराजवळ नवलाखउंबरे या गावी या देवीचे मंदिर आहे. याबद्दल अशी कथा सांगतात की, या गावी पूर्वी

कोणा एका मोंगल सरदारकन्येस-जनतेने तिला भाऊबीज केली असता-ओवाळणी-मध्ये नऊ लाख टांक ( टांक या नांवाचे एक नाणे आहे ) मिळाले. त्या कथेची स्मृति म्हणून गांवाला हे नांव पडले आहे.

(११७) पटेर्नीदेवी—नागोद ( मध्य प्रदेश ) ह्या गांवी सन ५०० च्या सुमारास उभारलेले हे एक प्राचीन मंदिर आहे.

(११८) पत्तिनीदेवी— तामीळनाड प्रांतीची ही एक अतिशय प्राचीन देवता आहे. ह्या मंदिराच्या शुद्धिसमारभाच्या वेळी म्हणजे सुमारे सन ११३ च्या दरम्यान शिलोनमधील राजा गजबाहु ( पहिला ) हा उपस्थित राहिला होता असा पुराणातरी उल्लेख मिळतो. एक महान सती म्हणून हिची पूजा केली जाते. हिला कण्णकी असेही नांव आहे.

(११९) पिंगळाई— मोर्शी ( अमरावती ) जवळ नेरेपिंगळाई नावाच्या गावी एका टेकडीवर या देवीचे मंदिर आहे. हे मंदिर हेमाडपंती बांधणीचे असून चैत्र व आश्विन नवरात्रामध्ये या ठिकाणी यात्रा भरते.

(१२०) पिठोरादेवी—अक्री ( थरपारकर-सिंध ) गांवाजवळ ह्या देवीचे मंदिर आहे. ह्या ठिकाणी सप्टेंबर महिन्यांत यात्रा भरते.

(१२१) पाटणादेवी

कालिका श्रीमहादेवी पाटणापूर्वासिनी ।
सिद्धक्षेत्रं महादिव्यं याज्ञवल्केन दर्शितम् ॥ (च. चि. तीर्थखंड)

चाळीसगाव ( खानदेश ) पासून दक्षिणेस १२ मैलावर सह्याद्रि पर्वत-राजीवर हे क्षेत्र आहे. शके ११२८ मधील एक शिलालेख आढळून आला आहे. तत्पूर्वी हे क्षेत्र अनेक विद्वानांचे निवासस्थान होते. शके १२१६ चे सुमारास देवगिरीस जाताना अल्लाउद्दीन खिलजी मंदिराचा दर्शनी भाग उध्वस्त करून गेला. चैत्र पौर्णिमेच्या दिवशी या ठिकाणी यात्रा भरते. वरील श्लोकावरून असे दिसते की, मूर्ति कालिका देवीची असावी.

(१२२) पेरियानयगी— कुंभकोणमूपासून तीन मैलावर शक्तिमुकुटम् नावाचे क्षेत्र असून त्या ठिकाणी ही देवता आहे. या देवीची अशी कथा सागतात की, पेरियानयगी नावाच्या एका स्त्रीने शंकराच्या साक्षात् मीलनासाठी तप आरंभिले. काही दिवसांनी शंकर प्रसन्न झाले आणि दर्शन देताच, तपश्चर्येच्या उद्देशाला धरून ती त्यांना आलिंगन देण्यास गेली. पण शंकरांना भक्ताची कसोटी पाहण्याची इच्छा होऊन, त्वरितच ते गुप्त झाले. बाईने पुन्हा तपश्चर्या केल्यावर

भगवान शंकर अग्निज्वाळाचे रूपाने तिजपुढे प्रकट झाले असता, तिने ते शंकराचे स्वरूप त्वरितच ओळखून मनात कोणताही संशय उत्पन्न होऊ न देता, त्या अग्निज्वालानाच तिने मिठी मारली. परिणाम असा झाला की, भक्त कसोटीला उतरल्यामुळे शंकर साक्षात् प्रकट झाले आणि तिला भेट दिली. या मीलन-प्रसंगामुळे येथील शंकराचे स्वरूप पेरियाला आलिंगन व चुंबन घेत असलेले स्वरूपात आहे.

ज्या ठिकाणी ही प्रथम भेट झाली, त्या क्षेत्राला तिरुशक्ति मुटम् ( तिरु= पवित्र, शक्ति=आदिशक्ति, मुटम्=चुंबन ) असे म्हणतात. तसेच शंकरानी या वनाला भेट दिली म्हणून वनाचे नाव शक्तिवनेश्वर असे पडलेले आहे.

( तामीळ मंदिरे, दास, पृ. १३१ )

(१२३) पंचगंगा मंदिर—धोम महाबळेश्वर ( सातारा ) येथे हे क्षेत्र आहे. कृष्णा, वेण्णा, कोयना, सावित्री आणि गायित्री या पाच नद्यांचे उगम स्थानी एका कोनाड्यावर हे मंदिर आहे. त्यासमोरील कुंडावर सभामंडप उभारलेले आहे. पहिल्या तीन नद्यांचे प्रवाह देशावर पूर्वेकडे वाहतात, तर सावित्रीचा प्रवाह खाली कोंकणभागात उतरतो. गायित्री नदी मात्र गुप्त स्वरूपात आहे. पाच कोनाड्यातून वाहणारे हे प्रवाह एकत्र येऊन, गायमुखातून तीर्थकुंडात पडतात व त्यामधून दुसऱ्या कुंडात जातात.

या मंदिराचे बांधकाम दोनशे वर्षांपूर्वी झालेले असून, एका शिळेवर त्या-प्रमाणे नोंद आहे. ' या पाच नद्यांच्या चरणी तत्पर परशुराम नारायण अनगळ ' या लेखावरून मंदिर उभारणाऱ्या गृहस्थाचा ठावठिकाणा मिळतो. सभामंडप सन १८७२ साली संस्थानाधिपती जमाखिंडीकर यांनी उभारला

या देवालयाजवळच महाबळेश्वर व अतिबळेश्वर आणि इतर लहानसर हेमाड-पंती बांधणीची मंदिरे दिसतात महाबळेश्वराचे स्वयंभू खड्कातील लिंगातून पाणी वाहत असते. सन १६३४ साली समर्थ रामदास या क्षेत्री चार महिने तपश्चर्ये-साठी राहिलेले होते. त्या वेळी त्यांनी स्थापन केलेला पहिला मारुती आजही पाहता येतो महाबळेश्वर नाव येण्याचे कारण असे दिले जाते की, पूर्वी या प्रदे-शाला ' मामलाहार ' म्हणजे मामळ्याचा प्रदेश असे म्हणत, आणि त्याचा देव म्हणून अपभ्रंशाने महाबळेश्वर हे नाव आले असावे.

यादववंशीय राजा सिंघणदेव सन १२५१ च्या सुमारास या क्षेत्री आलेला असून त्यांनी महाबळेश्वराचे मंदिर बांधून, देवाच्या पूजेची व्यवस्था बाबाजी घोल्याकडे सोपविलेली होती, अशी वंशपरंपरेने माहिती मिळते. जवळपास सिंगणवाडी, शिंगणापूर ही नावे सिंघणराजाच्या नामखुणाच दर्शवितात.

या ग्रंथाच्या संपादकाने, क्षेत्राला भेट दिली, तेव्हा निरीक्षण करताना असे दिसून आले की, पाच कोनाड्यातून वाहणारे पाच प्रवाहाचे आतमध्ये डोकावून पाहिले तर, एका खडकातील मूळ प्रवाहाचे, पाच मानवाकृति प्रवाह तयार केलेले दिसतात. पाच कोनाड्यातून प्रवाह येतात, म्हणून त्याना पचगगा हे नामाभिधान मिळाले चद्रराव मोऱ्यानी येथील मदिराचा जीर्णोद्धार केला असे सागितले जाते, कारण तो या जलदेवता आणि शकराचा भक्त होता.

(रा. चि. ढेरे, केसरी, ९-६ ६८).

(१२४) अचलादेवी—नेपाळ राज्यातील गुरखा समाजाची एक प्रमुख देवता ही फोड्याची देवता म्हणून प्रसिद्ध आहे. या देवीची कथा अशी सागतात की, सन १८०० साली राजा रणबहादूर याच्या प्रेयसीला देवी आल्या आणि सर्वांगावर फोड उठले. प्रेयसीला आराम पडून ती सकटमुक्त व्हावी म्हणून या देवीला नवस करण्यात आला याप्रमाणे तिला जीवदान मिळाले. पण सहाजिकच तोंडावर देवीचे वण शिल्लक राहिले आणि मुख विद्रूप दिसू लागले. या गोष्टीचे तिला परम दु ख होऊन तिने आत्महत्या केली देवीला नवस केला असताही आपली प्रेयसी आपणाला सोडून गेली यामुळे राजा उद्विग्न झाला व रागाच्या भरात त्याने देवीच्या मदिराचा विध्वस करून टाकला इतकेच करूनही तो थाबला नाही तर तिला औषधोपचार करणाऱ्या वैद्यराजाला ठार केले.

नेपाळची राजधानी खाटमाडू या शहराजवळ या देवीचे मदिर आहे. पशुपति मदिरात पूजा झाल्यावर कापडाचे एक टोक या देवीच्या मदिराला तर दुसरे टोक राजवाड्याला बाधतात. यामुळे देवी आणि भैरव याचा सबध जोडला जातो अशी समजूत आहे.

(१२५) वल्हाबाई—राहुरी (अहमदनगर) तालुक्यात ब्राह्मणी गावी या देवीचे प्राचीन मदिर होते, परतु मुसल्मानी अमदानीत ते पाडून त्यावर आता कबर बाधण्यात आली आहे. देवीचा तादळा अद्यापीही त्या कबरेखाली अस्तित्वात आहे अशी भक्ताची श्रद्धा आहे.

(१२६) बहिरीदेवी—गडहिंग्लज (कोल्हापूर) येथे या देवीचे मदिर आहे हे हिंगुलजा देवीचेच स्वरूप असावे असे मानतात. त्यावरूनच गावाला गडहिंग्लज हे नाव आले असावे. या ठिकाणी मार्च महिन्यात यात्रा भरते.

(१२७) बाब्याताई—उत्तर प्रदेश व वऱ्हाड प्रातातील कोरी (कोळी) या जमातीची ही देवता होय. या ठिकाणी गृहप्रवेशाची एक मजेशीर चाल आहे. नववधू ज्या वेळी नव्या घरात प्रवेश करते, तेव्हा तिने प्रवेश करावयाच्या अगोदर त्या घरातील सर्वात वृद्ध पुरुष गव्हाच्या चपात्या तयार करतो. दुसरा-

सह त्या चपात्यांचा नैवेद्य तो या देवीला दाखवितो. नंतर त्या चपात्या उबऱ्यात ठेवतो. उबऱ्यात ठेवलेल्या त्या चपात्या आपल्या पायाखाली तुडवून नववधू आपल्या नव्या नवलाईच्या जगात शिरते.

(१२८) बाळादेवी—बाळापूर (वऱ्हाड) शहरी एक किल्ला आहे, त्या किल्ल्याच्या तटाजवळून माण या नावाची नदी वाहते. किल्ल्याच्या दक्षिण बाजूला नदीच्या काठी या देवीचे मंदिर आहे. सन १९०० च्या सुमारास रुक्मिणीबाई नावाच्या रंगारी जमातीच्या एका निपुत्रिक स्त्रीने मंदिरापासून नदीपर्यंत उत्तम घाट बांधून काढलेला आहे. येथील किल्ला अतिशय प्रेक्षणीय आहे देवीच्या नावावरूनच या शहराचे नाव बाळापूर असे पडलेले असावे.

(१२९) बासरदेवी—औरंगाबाद-काचीगुडा रेल्वेमार्गावर बासर नावाचे स्टेशन आहे. स्थानकापासून बासर गाव तीन मैल दूर असून त्या ठिकाणी या देवीचे स्थान आहे. गावाचे दुसऱ्या बाजूने गोदावरी नदीचा प्रवाह आहे. देवीची मूर्ति सरस्वतीची, वालुकामय असून सुमारे दोन फूट उंच आहे. ती व्यासप्रतिष्ठित आहे, अशी दंतकथा आहे. मंदिराचे शिल्प हेमाडपंती असून गाभारा, सभागृह, बाजूला ओवऱ्या वगैरे आहेत.

या क्षेत्रीचे वैशिष्ट्य म्हणजे एक मोठा काळा पाषाण होय. त्याचा व्यास सुमारे २० फूट असून उंची ८ फूट तरी असावी. रेल्वेस्थानकाकडून देवी मंदिराकडे येताना, हा पाषाण पाहता येतो या पाषाणावर कोणीही खडा मारला तर पितळी भांड्यावर खडा मारावा त्याप्रमाणे आवाज निघतो. मंदिरापासून सुमारे तीन फर्लांग तो दूर आहे, तरी त्याचा अन्योन्य संबंध आहे असे जाणकाराचे मत आहे. यासंबंधीची दंतकथा अशी की, पूर्वी देवीचे गाभाऱ्यात पूजन झाले, संकल्प सोडला म्हणजे त्याला भांडारातून स्वयपाक रांधण्यास भांडी मिळत असत. परंतु संसारी जगात ज्याप्रमाणे अनेक माणसे अप्रामाणिक व्यवहार करतात, तद्वत् देवाविषयी निष्ठा व आदर असावयास पाहिजे अशा ठिकाणीही करतात. (ओघाने आलेच आहे. तेव्हा या बाबतीत इस्लामी संस्कृति व इसाई संस्कृतीमधील लोक आपल्या निष्ठास्थानी—मसजिद—चर्च—सहसा कोणीही अप्रामाणिकपणा करणार नाही आणि धर्मस्थानाची प्रतिष्ठा कमी होऊ देणार नाहीत, असा बऱ्याच वेळा अनुभव येतो हिंदुधर्मीयांना मात्र त्याची मुळीच खंत वाटत नाही ) परंतु एखाद्याच्या गैरवर्तणुकीचा परिणाम इतर भक्तांना भोगावा लागतो आपले काम झाले म्हणजे भांडी परत ठेवीत असत. पण कोणी एकाने त्यातील काही भांडी घरीबरोबर नेली आणि अप्रामाणिपणा केला. त्या वेळेपासून स्वयपाक करण्यास भांडी येण्याचा क्रम बंद झाला. भक्तांची अशी भावना आहे की,

त्या भाड्याचा आणि पाषाणाचा काही अन्योन्य संबंध असावा. कदाचित् भाड्याचे कोठार त्याच्या खाली असावे आणि म्हणूनच त्यावर दगड मारला असता आवाज येत आहे. आवाजाची ही प्रचिती घेण्यासाठी अनेक भक्तमंडळी त्यावर जाता-येता लहान लहान पाषाण मारीत असल्याने त्यावर त्यांच्या आघाताच्या खुणा उमटलेल्या दिसतात. किंबहुना दक्षिणेतील स्वरस्तंभ पाषाणाचा हा प्रकार असावा.

निजाम सरकारची राजवट चालू असता, एका यावनी अधिकाऱ्याने या चमत्काराचा शोध घेण्याचे इराद्याने तो भव्य पाषाण फोडण्यासाठी त्यावर घणाचे घाव घालण्यास सुरवात करताच, त्याला रक्ताच्या गुळण्या सुरू झाल्या आणि प्राण वेचण्याची वेळ येऊन ठेपली. देवाच्या क्षेत्रात आपण हस्तक्षेप करण्याचा मूर्खपणा केला आणि त्याचेच हे प्रायश्चित्त होय असे ध्यानी येताच आणि अनेक भक्तांच्या मार्गदर्शनामुळे त्याने तावडतोब देवीसमोर नाकदुऱ्या काढून क्षमायाचना केली. पापकर्म केल्यावर पश्चात्तापाने शुद्धि येते आणि त्याला अपराधाची क्षमा होते, असा दैवी क्षेत्रात जो दंडक आहे, त्याप्रमाणे त्या यावनाचा अपराध देवीने पोटांत घातला आणि त्याचे प्राण वाचविले. देवीचे जागृतपणाबद्दल ही आख्या-यिका सांगितली जाते. पण काळ-वेळ कोणाला माहीत नाही.

याच वाघर गावी नरहरी मालूने 'नवनाथ कथासार' याची ग्रंथरचना केली. गुरुचरित्रामध्ये पोटशूळाचे व्यथेने जर्जर झालेला ब्राह्मण गाणगापुरी सेवा करण्यास गेला. तो याच गावचा होता. या गावी सरस्वतीची मूर्ति आहे, म्हणून तिचे नाव सागरदेवी असे झाले.

(भीमाशंकर देशपांडे वकील, आळंद, पत्र २०-१-६६)

धर्मक्षेत्री गेल्यावर स्वयंपाक राधण्यास भांडी अनेक ठिकाणी आजही मिळतात. दानशूर गृहस्थांनी ज्याप्रमाणे यात्रेकरूंसाठी धर्मशाळा बांधलेल्या असतात, तद्वत भाड्याचीही सोय केलेली असते. वज्रेश्वरी येथे पूर्वी नित्यानंद महाराज असता, लेखक त्यांचे दर्शनास अनेक वेळा गेला असता, कोठारांतून भांडी, स्टोव्ह, घासलेट मिळण्याची सोय होती. आपण स्वतःच आत जाऊन पाहिजे ती भांडी घ्यावयाची आणि काम झाल्यावर परत जागेवर ठेवावयाची असत. देखरेख करण्यास कोणी नसे. पण वाघर क्षेत्राप्रमाणेच भक्तांची वर्दळ वाढली, अप्रामाणिक-पणा वाढला, कोठारातील भांडी कमी कमी झाली आणि शेवटी सोय बंद झाली. समाजात आजही हीच प्रवृत्ति अनेक ठिकाणी बोकाळलेली दिसून येते. देवाचे ठिकाणी देणारे असतात, त्यापेक्षा देवाचे क्षेत्रातून लुबाडणारी माणसेच फार दिसतात. त्यांची अशी भावना असते की, देवाजवळ जे आहे ते आमचेच

आहे देवच ते आम्हाला देत असतो धर्मक्षेत्राचा जागृतपणा कमी होण्यास मानवाची अशा प्रकारची वर्तणूकच कारणीभूत आहे दर्शनाला आल्यावर जोडे छत्र्या चोरणे हा अनेकांचा व्यवसायच होऊन बसलेला आहे सारांश इतकाच की, या धर्मक्षेत्राबद्दल संपूर्ण आदर आणि निष्ठा ज्या वेळी समाजात जागृत होईल तोच सुदिन समजावयास पाहिजे

(१३०) बावची—क्षुद्र जमातीची ही एक देवता आहे या देवतेचा पुजारीहि त्याच जातीचा असतो ब्राह्मण, मराठा थोडक्यात शूद्रेतर लोक या मंदिरात सहसा प्रवेश करीत नाहीत कोकणप्रांती अनेक गावी या देवीची मंदिरे आढळतात रोगराईपासून रक्षण करणारी देवता म्हणून हिला विशेष मान आहे लेखकाचे स्वतःचे जन्मगाव तालुक्याचे राजापूर हे असून त्या गावीदेखील या देवीचे एक मंदिर आहे असे सांगतात की, ही देवता ग्रामफेरीस जात असे म्हणून तिचे पायात दोन लोखंडाचे खिळे मारून जखडून टाकलेली आहे

(१३१) बाळासुंदरी—कानपूर व गोरखपूर (उत्तर प्रदेश) या गावी या देवीची मंदिरे आहेत कानफाटे साधु आणि हातामध्ये डमरू घेऊन हिंडणारे डौरीगोसावी हे या देवीचे उपासक आहेत

(१३२) बिरोहादेवी—जयपूर (राजस्थान) या शहरी या देवीचे मंदिर आहे मंदिर आणि त्याच्यासमोर असलेला सूर्यस्तंभ हे दोन्हीही प्रेक्षणीय आहेत सप्तमातृकांच्या मूर्तीही या मंदिराच्या परिसरात आढळतात

(१३३) बेलाभवानी—प्रतापगड (उत्तर प्रदेश) ह्या जिल्ह्याचे ठाणे बेला प्रतापगड या ठिकाणी आहे त्या ठिकाणी नदीतीरावर या देवीचे मंदिर आहे

(१३४) बोमलाई—खैरगड (मध्यप्रदेश) संस्थानच्या परिसीमेमध्ये डोंगरगड नावाच्या ठिकाणी या देवीचे मंदिर आहे राजा कामसेन (उज्जयिनीचा राजा विक्रम ह्याचा समकालीन) ह्याने हे मंदिर बांधले कामकुंडला ह्या नावाचे एक अतिसुंदर सरोवरही या ठिकाणी आहे

(१३५) बोलाई—या देवीची पूजा अखिल महाराष्ट्रामध्ये केली जाते ही एक ग्रामदेवता असावी असे वाटते जेजुरी येथील खंडोबाच्या मंदिराच्या परिसरात बोलाई देवीची एक मूर्ति आहे या देवतेची उत्पत्ति का व कोठून कशी झाली याबाबत काहीच माहिती मिळत नाही बाला या नावाची एक शाक्तपर्यायी देवता आहे तिच्याच नावाचा हा अपभ्रंश असावा याचाच अर्थ 'बाला'चा 'बालाई' आणि 'बालाई'चा 'बोलाई' असा अपभ्रंश झाला आहे

बडोदे येथील देवीच्या मंदिरात नैवेद्याला मास लागते आणि जुन्या पिढीतील लोक असे सांगतात की, या मंदिरात पूर्वी देवी नवसास पावल्यावर तिच्यापुढे 'बगड' आचरण्याची पद्धत होती. ह्यावरून असे अनुमान काढण्यास हरकत नाही की, पूर्वी राज्यविस्ताराच्या हेतूस्तव मराठे सरदाराना जे जे स्थानांतर करावे लागले, त्या वेळी बडोदे येथे आल्यावर त्यानी आपली ही कुलदेवता ह्या ठिकाणी आणली असावी.

बडोदे येथे या देवीचे हे अतिशय भव्य मंदिर एका तळ्याकाठी होते. परंतु शहरसुधारणा समितीच्या द्वारे ती मूर्ति तेथून हलविली गेली. आता सरकारवाड्याजवळ एका लहानशा वास्तूमध्ये ही देवता वास्तव्य करून आहे. बडोदे येथील खंडेराव मार्केटजवळच हे स्थान आहे. सरदार कदम ह्यांच्या घराण्याने या देवीच्या मंदिराची स्थापना केली होती, कारण ती त्यांची कुल-स्वामिनी होती. सध्याच्या मंदिराचा गाभारा १० × १२ फुटाचा असून सभा-मंडप २० × २० फुटाचा आहे. या देवीची वार्षिक यात्रा नवरात्रामध्ये भरते. त्या वेळी ब्राह्मणभोजनाचा कार्यक्रम होतो. याच वेळी शाकाहारी भोजनाबरोबरच मांसाहारी पदार्थांचाही नैवेद्य दाखविला जातो. देवस्थानचा सर्व खर्च सरकारी तिजोरीतूनच भागविला जातो. (श्री. गजानन पराजपे, बडोदे)

पुणे शहरी ससून इस्पितळाच्या चौकात या देवीचे एक तांदळास्वरूप मंदिर आहे. रविवारच्या दिवशी या देवीला कोंबडी, बकरी बळी दिली जातात.

(१३६) बृहन्नायिकी--तंजाऊर येथे बृहदेश्वर शंकराचे विख्यात क्षेत्र असून तेथील ही शक्तीदेवता होय. या मंदिराला कोणी राजराजेश्वर मंदिर असेही म्हणतात. सन ९८५ ते १०१३ या कालात राजराजा (पहिला) या चोल वंशीय राजाला महारोगाने पछाडले आणि त्याचे निवारणार्थ त्याने नर्मदानदी-मधून हे शिवलिंग आणून हे मंदिर उभारले. मंदिराचे बांधकाम एकूण बारा वर्षे चाललेले होते. तेथील सर्वच शिल्प भव्य आणि उदात्त आहे. प्रत्यक्ष पाहिल्याविना त्याचे आकलन होणार नाही. तेथील विमानाची उंची २१६ फूट असून चौदा माळे आहेत लिंगाची स्थापना सन १०११ साली झाल्याचा उल्लेख मिळतो. हे लिंग इतके अजस्र आहे की, तळाला त्याचा घेर ५४ फूट व टोकाला २३ फूट असून एकूण उंची १५ फूट आहे. कळसावरील एकसंध पाषाण ८० टन वजनाचा असून त्यावरील कळसाची उंची १२॥ फूट आहे. ९२०० तोळे तांब्याचे पत्रे असून, त्यावर पुन्हा ८०० तोळे वजनाचे सुवर्णाचे पत्रे आहेत, अगर सुवर्णाचा मुलामा दिलेला आहे. मंदिरासमोरील नंदीची उंची १२ फूट असून, १९॥ फूट लांब व ८½ फूट रुंद आहे. दक्षिणेत नंदीच्या भव्य मूर्ति बनविण्याची जणू स्पर्धाच

लागलेली दिसते कारण याहीपेक्षा भव्य नदी अनंतपूर जिल्ह्यात लेपाक्षी क्षेत्री आहे

अशा या वैभवशाली शंकराची शक्ति बृहनायकी नावाने सार्थ आहे
(तामीळनाड मंदिरे, दास, पृष्ठ १२२).

(१३७) भराडी--चिपळूण (रत्नागिरी) तालुक्यामध्ये आगणेवाडी या गावी या देवीचे मंदिर आहे ही ग्रामदेवता असून तिचे स्थान म्हणजे एक जागृत स्थान मानले जाते ही देवता भद्रकाली भवानी, भगवती, भराडीण इत्यादि नावांनीही ओळखली जाते ही एक विष्णुशक्ति आहे असे मानतात हिचे स्वरूप पद्मासनस्थ असून तिच्या मस्तकावर किरीट, कानात कुंडले, गळ्यामध्ये माळा व दोन्ही हातात कमळे आहेत तिच्या दोन्ही बाजूंना स्त्रीसेविकांच्या लहान मूर्ति असून त्यांच्या हातात या देवीला वारा घालण्यासाठी चवऱ्या आहेत त्याचप्रमाणे तिच्या दोन्ही बाजूंना माहुतासहित असलेले आणि शुंडेमध्ये पाणी घेऊन देवीला स्नान घालीत असणारे हत्तीही आहेत मंदिरात शिरल्याबरोबर असा चित्तलोभनीय देखावा आपल्या दृष्टीस पडतो या देवीचे स्वरूप पाहून ती लक्ष्मीचीच मूर्ति असावी, त्याबद्दल मुळीं शंकाच वाटत नाही कोकणातील अनेक मराठे घराण्यांची ही कुलदेवता आहे

(१३८) भवानीमंदिर—भवानी पेठ (पुणे) या ठिकाणी या देवीची स्थापना सन १७६० साली झाली हे मंदिर बांधण्यासाठी वर्गणी जमविण्यात आली परंतु ती अवघी पंचाहत्तर रुपये जमली तरीदेखील चालकांनी न डगमगता तेवढ्या पैशात मंदिरबांधणीचे कार्य विनाविघ्न पार पाडले या देवीची मूर्ति तादळास्वरूप असून नवरात्रामध्ये देवीची यात्रा भरते त्या वेळी देवीला कोंबडी बकरी बळी दिली जातात देवीच्या नावावरून ह्या पेठेला भवानीपेठ हे नाव आलेले आहे

(१३९) मच्छोदरी— अंबड (औरंगाबाद) येथे या देवीचे स्थान एका लहानशा टेकडीवर असल्याने सुमारे ७० पायऱ्या चढून मंदिराप्रत जाता येते ही देवता ज्या टेकाडावर आहे, त्याचा आकार मच्छाप्रमाणे असल्याने देवीला हे नाव प्राप्त झाले आहे

मंदिराचे बांधकाम घडीव पाषाणाचे असून, मुख्य गाभारा डोंगर पोखरून तयार केल्यासारखा दिसतो व पुढे सभामंडप आहे मुख्य गाभाऱ्यात महालक्ष्मी, महाकाली आणि महासरस्वती अशा तीन वेगवेगळ्या मूर्ति असून शिवाय महादेव व गणपति यांच्याही मूर्ति आहेत मंदिराप्रत जाण्यासाठी पायऱ्या सखाराम मुरहार

यांनी बांधलेल्या असून सभागृह शके १६०० च्या सुमारास राणी अहिल्याबाई होळकरीण यांच्या आज्ञेवरून तेथील मामलेदार अप्पाजी सदाशिव याने उभारले. सभागृहासमोर नगारखानाही आहे. याचा अर्थ गाभारा त्यापूर्वीच खडकात कोरलेला असला पाहिजे.

अठराव्या शतकाच्या प्रारंभी या क्षेत्री अच्युतानंद स्वामी नावाचे देवीचे सेवेकरी होऊन गेले. त्यांनी प्रश्नोत्तररूपाने देवीसंबंधी माहिती देणारा लेख तयार केला असून त्याची प्रत शके १८५७ साली वे. शा. स. बाळाभाऊ सामग यांनी केली असून ती उपलब्ध आहे. रामानंद स्वामी हे या अच्युतानंदाचे गुरु होत. त्यांनी काही पदे केली असून त्यामध्ये या मूर्तीचा उल्लेख आहे.

प्रश्नोत्तररूपाने जे वर्णन मिळते, त्याचा सारांश इतकाच की, महिषासुर वधाच्या करिता देवी प्रकट झाली, ती कृतयुगाच्या आरंभी. अंबऋषीने या ठिकाणी तपश्चर्या केल्यावर त्याला देवीचे साक्षात दर्शन झाले. यास्तवच की काय या गावाला अंबिकापूर- अंबड हे नाव प्राप्त झाले आहे. या गावी कंचुकी व नारायण तीर्थे आहेत. या क्षेत्री पूर्वी तानाजी देशमुख नावाचा भक्त होऊन गेला असल्याने त्याची स्मृति म्हणून एक तांदळा उभा केलेला आहे.

देवीची यात्रा नवरात्रात होते, होम-हवनही होते. पण येथील वैशिष्ट्य म्हणजे या उत्सवाच्या वेळी नगारखान्याच्या गच्चीवरून खाली मंदिरातील चौकात, एक सतरंजीसारखी जाड-चिवट चौपदरी धरतात आणि त्यावर ६ महिन्यापासून १२–१४ वर्षांपर्यंत नवसाची मुले उड्या मारतात. प्रत्येक जण एकेक श्रीफळही टाकतो. त्या प्रांती हे फार प्रसिद्ध क्षेत्र मानतात.

( निवेदक— सुधाकर रामचंद्र गोसावी, बालाजी मंदिर, अंबड )

(१४०) मरिअम्मन—तंजाऊरपासून ६ मैलावर पुन्नाइनल्लूर या गावी देवीचे स्थान आहे. सन १६८० साली व्यंकोजीराजे राज्यफिरतीवर असता, समयापुरम येथील कालीदेवीचे दर्शनाला गेले असता, ही देवता त्यांचे स्वप्नात येऊन, पुन्ना गावी ती वृक्षाखाली असल्याने, तिला मंदिर बांधून मिळावे अशी आज्ञा झाली. राजांनी दर्शित ठिकाणी देवीचा शोध करून मूर्ति सापडल्यावर, त्या ठिकाणी मंदिर उभारले. नावावरून ही एक ग्रामदेवता आहे, हे समजून येईल.

( तामीळनाड मंदिरे, दाढ, पृ. १२४ )

(१४१) महाबलीपुरम दुर्गा—महाबलीपुरम या क्षेत्री अनेक लेण्या असून त्यापैकी एका ३३ × ११ × १७ आकाराचे लेण्यात, महिषासुरमर्दिनी देवीची भव्य मूर्ति आहे. येथील देवीचे हातातील आयुधाचे वैशिष्ट्य म्हणून असे सांगता

येईल की, दोन हातात शंख व चक्र ही भगवान विष्णूची आयुधे असून, एका बाजूस विष्णु तर दुसऱ्या बाजूस ब्रह्माच्या मूर्ति आहेत. पायाजवळ नदी आहे. देवीची मूर्ति १२ × ८ फूट आहे. शेषशायी विष्णूची मूर्ति त्याच आकाराची असून, त्याचा विशेष म्हणजे मूर्ति द्विभुजा असल्याने हाती गदा व पद्म ही आयुधे आहेत. यामुळेच की काय शंख व चक्र ही आयुधे देवीचे हातात गेलेली असावीत. देवीचे स्वरूप उग्र तर विष्णूचे शांत, या ठिकाणी एकत्र पहावयास मिळते

शैव वैष्णव वादाचे भेद मिटवण्यासाठी मूर्तिकाराने हे शिल्प तयार केलेले असावे. यावरून असे अनुमान काढता येते की, त्या काळी हा भेद पराकोटीस गेला असला पाहिजे.

येथील गुहाशिल्प राजा महेंद्रवर्मा ( ६००-६३० ) याने सुरू केले असे म्हणतात येथील शिल्पविशेष म्हणजे धर्मराजरथ ( २९ × २७ × १५ ), भीमरथ ( ४८ × २५ × २६ ), अर्जुनरथ, ( १६ × ११ × १४ ) द्रौपदीरथ, ( १४ × ११ × १४ ) आणि सहदेवरथ, ( १८ × ११ × १६ ) या आकाराचे सडगात कोरलेले आहेत हे एकमेव शिल्प पाहण्यासारखे आहे.

( तामीळनाड मंदिरे, दास, पृ. २३२ ).

(१४७) महालक्ष्मी ( केळशी रत्नागिरी )— कोकणप्रांती हे एक जागृत स्थान मानले जाते. केळशी गाव तीन बाजूंनी सागराचे पाण्याने वेढलेला असल्याने निसर्गत रम्यस्थान झालेले आहे या देवतेच्या उत्पत्तीसंबंधी अशी एक दंतकथा आहे की, त्या गावातील लागूवंशीय घराण्यात कोणा एकाला मुसलमान आक्रमकाचे धामधुमीचे काळात दृष्टान्त झाला की, कोल्हापूरहून भक्ताचे रक्षणा साठी मी त्या गावी येत आहे. दृष्टान्तामध्ये दर्शविलेल्या ठिकाणी मंदिर बांधावे. त्या जागेची पाहणी करीत असता तेथे गडग्यात देवीचा स्वयंभू लहानसा तांदळा आढळून आला आणि गावकऱ्यांनी मंदिर उभारले. या गोष्टीला अनेक शतके लोटली आहेत देवीचे मंदिर लहानसेच गाभाऱ्यावजा आहे. उत्सवाचे वेळी निराळी उत्सव मूर्ति तयार करतात

या क्षेत्राचे वैशिष्ट्य चैत्र शुद्ध ११ ते १५ पर्यंत होणाऱ्या वार्षिक उत्सवात आहे उत्सवसमयी मंदिराबाहेर मोठा सभामंडप उभारतात. दररोज रात्रौ गोंधळ व कीर्तन होते. एक दिवस सर्व गावकऱ्यांसाठी, सुमारे दोन हजार लोकांना भोजन देण्यात येते पौर्णिमेला सकाळपासून मध्यान्हकाळपर्यंत देवीचा रथ घरोघर फिरवला जातो व उत्सव संपतो

या उत्सवसमयी सर्व गावकऱ्यांचा एकोपा दिसून येतो मांडव उभारण्याचे काम काही मराठे व माळी घराणी करतात. जागा तयार करणे व सारवणे, दुसरी

काही घरांणी करतात, तर तो मोडून सामानसुमान रचून ठेवणे हे काम आणखी काही घराण्याचे आहे. मंडपाची चारी दिशाची सजावट मानाप्रमाणे काही ब्राह्मण घराणी करतात. उत्सव व भोजनाची वर्दी गावकऱ्यांना देण्याचा मान काही घराण्याचा आहे, तर भोजन तयार करणे, वाढणे हा मान आणखी काही घराण्याकडे आहे. गावचा कुंभार उत्सवासाठी लागणारी गाडगी-मडकी पुरवितो, धोबी कपडे पाहतो, वाजंत्री व इतर वाद्ये गुरव पाहतात, तर रथाचे वेळी देवीला आरसा दाखविणेचे काम न्हावी करतो. दररोज गोंधळ घालून सर्व देवताना समारंभाला पाचारण करण्याचे काम वर्तक घराण्याकडे आहे. भोजनप्रसंगी उष्टी काढण्याचे कामही वाटून दिलेले आहे. मंडप मोडल्यावर वर्षभर सामान कोणी सांभाळावयाचे हेही ठरलेले आहे. सारांश इतकेच की, दैनंदिन व्यवस्था व उत्सव समारंभाच्या लहानसहान बारीक कामाची वाटणी करून ठेवलेली आहे. कामधंद्यानिमित्त सांप्रत अनेक घराणी बाहेर आहेत पण नेमाने ती या उत्सवाला उपस्थित राहतात आणि आपल्या मानाचे काम पूर्ण करतात. उत्सवाचा खर्च देवीचे *स्थानिक उत्पन्नातून आणि वर्गणीतून* भागविला जातो. म. म. दत्तो वामन पोतदार यांनी एकेवेळी या उत्सवात उपस्थित राहून, पूर्वपरंपरागत कामाची वाटणी पाहून समाधान व्यक्त केले आहे. उत्सवसमाप्तीचे वेळी प्रत्येकाला मानाचा नारळ देऊन बोळवण केली जाते.

( निवेदक— वसंतराव केळकर, गोरेगाव )

(१४३) महेश्वरी—नवीवाडी ( मुंबई ) येथे या देवीचे लहानसे मंदिर आहे. बाहेरगावाहून मुंबईमध्ये येऊन वस्ती करून राहणाऱ्या काही जमाती आहेत. त्यापैकी पाठारेप्रभु या जमातीची ही देवता होय. अर्थातच या देवीची व तिच्या मंदिराची सर्व व्यवस्था त्याच समाजाकडे आहे. या देवीची यात्रा माघ महिन्यात भरते. त्या समयी रस्त्यावर बराच मोठा बाजारही भरत असतो. कै. शंकरराव मणेरीकर या नावाचे एक सद्‌गृहस्थ या देवतेची सेवा करून तिच्या पूजेअर्चेची सर्व जबाबदारी पहात असत.

(१४४) मामादेवी—मामादेवी म्हणजे सर्व देवताची माता होय. या देवतेच्या सभोवार इतर देवताच्या मूर्ति आढळतात. गंगौर ( उदयपूर ) येथे यात्रेच्या वेळी येथील देवीला उदयपूरमधील तलावावर नेतात आणि तेथे तिला स्नान घालून वर्षभरात आलेले मालिन्य अन अपावित्र्य नाहीसे करतात. 'माताजननी' म्हणजे जनमकाळची आणि 'आसपूर्णा' म्हणजे सर्वांच्या इच्छा परिपूर्ण करणारी असे तिचे भक्त वर्णन करतात. आसपूर्णा या देवीचे एक मंदिर बुंदी येथेही आहे. गंगौर येथे हे एक अतिशय पवित्र असे स्थान आहे. पूर्वी

रजपूत स्त्रियांनी याच ठिकाणी जोहार केला असल्याने त्या स्थळी फुले वाहून त्यांना आदरांजली अर्पण करणे हे तेथे गेलेले भाविक आपले आद्य कर्तव्य समजतात ही देवता दुर्गादेवीचेच एक स्वरूप आहे असे मानतात.

(१४५) मायादेवी—मायापूर या नावाचे एक प्राचीन शहर हरिद्वारजवळ असून त्या ठिकाणी या देवीचे स्थान आहे देवीचे मंदिर दहाव्या शतकापूर्वी बांधलेले असावे असे म्हणतात हे देखील चार मुखांच्या दुर्गादेवीचेच एक स्वरूप आहे असे मानतात

(१४६) माहुली— कुणकुंबी (बेळगाव) येथे या देवीचे स्थान आहे. मलप्रभा नदीचा उगम येथूनच झालेला आहे. देवीच्या नावाचा आणि नदीच्या नावाचा काही संबंध असावा असे वाटते

(१४७) मुंडेश्वरी— शहाबाद (बंगाल) जिल्ह्यात एका भागात माऊरा नावाचे गावाजवळ एका उंच टेकडीवर या देवीचे स्थान आहे.

(१४८) मुक्तांबिका— तिलीविक्कम (चिंगलपेट) गावी देवीचे स्थान आहे येथील शंकराचे नाव कीर्तिमार्जारेश्वर असे आहे. येथील स्थानाचा इतिहास असा की, नवव्या शतकात या देवीचा एक भक्त कुमारस्वामी मुदलीयार देवीचे पूजन करीत असताना, त्याच्या हातून देवीचा एक हात मोडला. भगलेल्या मूर्तीची पूजा करणे हे शास्त्रशुद्ध नसल्याने, त्याने उत्तम शिल्पकाराकडून दुसरी मूर्ति तयार करून घेतली आणि स्थापनेचा दिवस निश्चित केला कर्मधर्मसंयोगाने त्याच रात्री भगवान शंकर त्याचे स्वप्नात येऊन त्यांनी विचारणा केली की 'समज की तुझ्या पत्नीचा एखादा हात मोडला, तर तू तो नीट करण्याचा प्रयत्न करशील किंवा दुसरी पत्नी आणशील?' कुमारस्वामी या स्वप्नाचा अर्थ उमगला आणि त्याने नवीन मूर्ति बसविण्याचे काम स्थगित केले. इतकेच नव्हे तर पहिल्या मूर्तीचा हात सुवर्णाची तार बांधून नीट केला आणि मूर्तीचे पूजन पुढे चालू केले कुमारस्वामींचे वंशज सांप्रत असून, नीट केलेल्या हाताचीच मूर्ति पाहण्यात येते संसारफेऱ्यातून भक्तांना मुक्त करणारी म्हणून मुक्तांबिका नाव प्राप्त झाले असावे (तामिळनाड मंदिरे, दास, पृ. १०९)

(१४९) मंगळनायकी— कुंभकोणम् येथे आदि कुंभेश्वराचे जे शिव मंदिर आहे, तेथील शक्तिदेवीला हे नाव प्राप्त झालेले आहे.

(१५०) मंगळगिरी— विजयवाड्यापासून ८ मैलावर हे क्षेत्र आहे. या ठिकाणी 'पनकल नृसिंहस्वामींची' मूर्ति असून, ही शक्तिदेवता आहे. येथील क्षेत्रीचे वैशिष्ट्य असे की, मूळ मूर्तीला गुळाच्या पाण्याचा नैवेद्य दाखविला जातो

व ते पाणी नंतर नृसिंहाचे मुखात ओततात. पाणी ओतल्यावर तोंडातून पाणी खुळखुळत असल्याचा आवाज ऐकू येतो पाणी पिऊन समाधान झाल्यावर त्यातील अर्धे पाणी प्रसाद म्हणून मुखावाटे बाहेर येते दिवसातून हे एकदाच घडते असे नव्हे, तर प्रत्येक नैवेद्याचे वेळी घडते या क्षेत्री गुळाचा इतका सढळ वापर होत असतानाही, येथे एकही मुंगी पाहावयास मिळत नाही

कोणी याला 'वसुदेव प्याल्या 'प्रमाणे वर्णन करतील, पण काही झाले तरी शिल्पकाराचे कौशल्य कमी लेखता येत नाही.

( आंध्र मंदिरे, रमेशन, पृ ९५ )

(१५१) मेंगाई—शिवाजीचा एक किल्ला तोरणागड मावळात आहे. तेथे या देवीचे स्थान आहे. अधिक माहिती उपलब्ध नाही. जानेवारी १९६७ मध्ये या क्षेत्राचा जीर्णोद्धार करण्यात आला आहे.

(१५२) यमाईदेवी—राशीन ( अहमदनगर ) या गावी मंदिर आहे. नावाची व्युत्पत्ति अशी की, युद्धामध्ये दैत्यांना यमलोकास पाठविणारी देवता ती यमादेवी आणि ज्या गावी दैत्यांच्या प्रेताच्या राशी पडल्या ते राशीन गाव होय. मंदिराचे बांधकाम व शिल्प पाषाणात असून या ठिकाणी लाकडाचा भागभूसही सापडत नाही. देवता स्वयंभू असल्याने तांदळास्वरूपातच आहे नवरात्रात अष्टमीच्या दिवशी प्रमुख यात्रा भरते त्या वेळी या देवीचे ' भंदे ' निघते एका मातीचे कलशात देवीचे ओटीचे सामान म्हणजे ग्रण, नारळ, बांगड्या, हळद, कुंकू इ० साहित्य घालून त्यावर सरकी पसरून ते पेटविण्यात येते यालाच ' भंदे ' हे नाव आहे देवीचा पुजारी तो पेटलेला कलश हाती धरून मंदिर प्रदक्षिणा पूर्ण करतो या क्षेत्राची ही फार प्राचीन रूढि आहे येथील वैशिष्ट्य असे की, या गावी सुमारे ६० घरे इस्लाम धर्मियांची असून, तेही घटस्थापना करतात, रेणुकामातेला भजतात आणि यात्रेच्या कार्यक्रमातही उत्साहाने भाग घेतात ( केसरी, पुणे ११–१०–१९६७ )

(१५३) राणादेवी— धनगरसमाजाच्या वाघीस कुळाची ही कुलस्वामिनी आहे विवाहसमयी या देवतेच्या नावाने प्रारंभी सर्व दिशांना पुरोहित तांदूळ फेकतात आणि दिशाबंधन करतात चैत्र महिन्यात या देवीची यात्रा भरते त्या समयी कोंबडा-बकरी बळी देतात बळी दिलेल्या प्राण्याचे शीर देवीच्या आसनाखाली पुरतात या देवतेचे मंदिर कोठे आहे, त्याचा मात्र उल्लेख कोठेच मिळत नाही.

(१५४) रांगणाई— कोल्हापूरजवळ रांगणा ह्या नावाचा एक मजबूत किल्ला आहे. त्या किल्ल्यात या देवीची एक सुंदर मूर्ति आहे. शिवनेरी किल्ल्यातील देवीला जसे किल्ल्याच्या नावावरुन 'शिवाई' हे नाव पडले, त्याचप्रमाणे रांगणा किल्ल्यातील या देवीला 'रांगणाई' असे नाव पडले आहे.

(१५५) राजवल्लभी ठाकुराणी—राजबल्हट (हुगळी) गावी या देवीचे स्थान आहे. या देवीसंबंधी अशी कथा सांगतात की, ही देवता एका ब्राह्मणकुलात जन्म पावली आणि इतरांची घरकामे करून ती पोट भरीत असे. वयात आल्यावर दैवी तेजामुळे उठावदार स्वरूप होते. एकदा अशी गोष्ट घडली की, एका व्यापाऱ्याने आपली सात जहाजे भरून तो परदेशी जाण्यास सिद्ध झालेला असता, ही मुलगी त्याच्या दृष्टीस पडली व त्याची कामेच्छा बळावली. त्याने मोठ्या अहंकाराने त्या मुलीची विचारपूस केली आणि गरिबीची सत्य परिस्थिति समजल्यावर तिला जहाजावर येण्याविषयी गळ घातली. मुलीला व्यापाऱ्याचा कुटिल हेतु ध्यानी न आल्याने शुद्ध सात्त्विक भावनेने ती जहाजाकडे निघाली. पण तिजवर देवीकृपा असल्याने, देवीनेच तिचे रक्षण करावयाचे ठरविले. ती सात जहाजे एकाला लागून एक याप्रमाणे किनाऱ्यावर नांगरलेली होती.

या मुलीने पहिल्या जहाजातून दुसऱ्यामध्ये प्रवेश करताच, पहिले जहाज आपोआप पेटले आणि भस्मसात झाले. याप्रमाणे दोन, तीन चार, पाच, सहा जहाजे अग्निमुखी पडली. व्यापारी सातव्या जहाजावर होता, तो हा अलौकिक चमत्कार पाहताच स्तंभित झाला आणि आपल्या दुष्ट वासनेचेच हे फळ होय असे समजून चुकला. त्याला पूर्ण पश्चात्ताप झाला आणि देवता समजून त्या मुलीचे पायावर त्याने मस्तक ठेवले, त्यामुळे सातवे जहाज मात्र बुडाले नाही. या अलौकिक चारित्र्यवान मुलीचे त्या व्यापाऱ्याने नंतर मंदिर उभारले. सांप्रत मंदिरात चंडीस्वरूप देवता असून, नवरात्रात तेथे उत्सव होतो. त्यासमयी सात ल्हान ल्हान नावा मूळ स्मृतीचे प्रतीक म्हणून बनवून, त्यांपैकी सहा तळ्यात बुडवितात.

(बंगाल मंदिरे, रॉय चौधरी, पृ. ६४)

(१५६) राज्यलक्ष्मी— अंकिरिपल्ली (जि. कृष्णा) हे आंध्रप्रांती एक गाव असून त्या ठिकाणी या देवीचे ठिकाण आहे. क्षेत्राची प्रमुख देवता व्याघ्र-नरसिंह असून ही त्याची शक्तिदेवता आहे.

(१५७) लक्षणादेवी— हिमालयाच्या निसर्गरम्य रावी-चंबा नद्यांच्या खोऱ्याला चंबा प्रदेश म्हणतात. चंबा शहरापासून सुमारे २५ मैल अंतरावर ब्रह्मौर म्हणजेच प्राचीन ब्रह्मपूर नावाचे गाव आहे. वर्मनवंशाचे या प्रांती अनेक शतके राज्य होते. आठव्या शतकात राजा मरुवर्मा याने ब्रह्मौर येथे

लक्षणादेवींचे मंदिर बांधले. दर्शनी भागावर आणि गाभाऱ्यावर सुरेख कोरीव शिल्प आहे. गाभाऱ्यातील मूर्ति मात्र अष्टभुजा महिषासुरमर्दिनी आहे. ती अष्टधातूची बनवलेली आहे असे सांगितले जाते या ठिकाणी देवीचे स्वरूप चतुर्भुजा असून उजवे वरचे हातीचा त्रिशूळ, महिषाचे मस्तकी रोवलेला आहे. डावीकडील वरच्या हाताने महिषाची शेपटी धरलेली आहे. देवी महिषावर स्वार झालेली असून महिषाने पुढील दोन पाय जमिनीवर टेकून वाकलेला आहे. मुख भूमीला टेकलेले आहे. देवीचा उजवा पाय महिषाचे मुखावर ठेवलेला आहे. बाकी इतर शिल्प काश्मिरी स्त्रियाप्रमाणे आहे.

(या स्वरूपावरून हे उघड आहे की, महिषासुरमर्दिनीचे हे जुने शिल्प आहे, सध्या प्रचारात असलेले नव्हे. वेरूळ लेण्यातही हेच शिल्प आहे. शक्तिपूजेची वाढ झाल्यावर या स्वरूपाचे हे संक्रमण आहे.)

मंदौरजवळ उदेपूर नावाचे गाव आहे. त्या ठिकाणी मर्कुळा देवीचे मंदिर आहे या मंदिरात शिव पार्वती, विष्णु, लोकपाल यांच्याही मूर्ति आहेत. रामायण, महाभारत यातील काही प्रसंगाची चित्रे कोरलेली आहेत. मंदिराचे छप्पर त्रिकोणी उच बांधणीचे असून त्यामध्ये गुप्तशैलीचे दर्शन घडते. मात्र दर्शनी भागावर जे शिल्प आहे, ते काश्मिरीशैलीचे आहे.

(धर्मयुग २१–११–५४ / १८–१–५९)

(१५८) लज्जागौरी— नंदिकेश्वर (विजापूर) ह्या ठिकाणी या देवीचे देवालय आहे. या देवीबद्दल एक मजेशीर कथा सांगतात. ती अशी एकदा शंकर नि पार्वती ह्या ठिकाणी एका जलाशयामध्ये क्रीडा करीत असताना एक भक्त तेथे शंकराच्या दर्शनासाठी आला त्याला पाहताच दोघांनाही अतिशय लज्जा वाटू लागली शिवशंकर मंदिरात पळाले नि शिवलिंगात विलीन झाले, तर पार्वती त्या जलाशयातच गुप्त झाली अतिशय लज्जित झालेल्या पार्वतीला त्यामुळे लज्जागौरी हे नाव मिळाले वांझ स्त्रिया संततीप्राप्तीसाठी या देवीला नवस करतात. कृतयुगामध्ये एका साधूने बांधलेले एक सरोवर अजूनही त्या ठिकाणी अस्तित्वात आहे. कोणी कोणी ते सरोवर शिवाच्या घामापासून उत्पन्न झालेले आहे, असे देखील मानतात. त्या ठिकाणी लज्जागौरीच्या मंदिराशिवाय महाकूट, महादेव व इतरही अनेक देवालये आहेत.

(१५९) लक्ष्मीनरसिंह— इंदापूरपासून १० मैलावर नरसिंगपूर (पुणे) या गावी शके १६७८ साली सरदार विंचूरकर ह्यांनी हे मंदिर बांधले. वैशाख शु १४ रोजी ह्या ठिकाणी यात्रा भरते. येथील मूर्ति स्वयंभू असून, ती भूगर्भातून

वर आली असे मानतात भागवत, गोळवलकर, गोपे, उपळीकर जोशी ही घराणी मुलाचे जावळ काढण्यास या क्षेत्री येतात हे एक जागृत स्थान आहे

(१६०) लक्ष्मीनारायण-- राणीगंज (काटमांडू) येथे पेशवे सरकारची जहागिरी होती आणि सन १८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धानंतर त्यांनी त्या ठिकाणी गादीही स्थापिली होती शेवटच्या पेशवे रावराजे, त्यांच्या स्त्रिया मैनाबाई व सईबाई आणि नानासाहेब पेशव्यांची स्त्री कृष्णाबाई या सर्वांनी मिळून हे मंदिर बांधले त्याचप्रमाणे त्यांनी श्रीरामचंद्राचेही एक मंदिर उभविले होते त्या मंदिराच्या कळसावर पेशव्यांचा भगवा ध्वज मोठ्या डौलाने फडकत असे

ही एक बौद्ध देवताही आहे

ब्रिटिश अमदानीमध्ये अंदमान बेटे ही काळ्या पाण्याच्या शिक्षेसाठी कैदखान्याची जागा म्हणून वापरली जात असे शिक्षा भोगणारे कैदी म्हणून जरी सरकार तिकडे त्यांची पाठवणी करीत असले, तरी धार्मिक बाबतीत त्यांची कुठल्याही प्रकारे गैरसोय होऊ नये त्यासाठी सरकार तितकेच दक्ष राहात असे ब्रिटिशांनीच त्या काळी तेथील पोर्टब्लेअर ह्या प्रसिद्ध मोक्याच्या शहरी मुसलमान कैद्यासाठी मशीद व हिंदु कैद्यासाठी लक्ष्मीनारायणाचे मंदिर उभारले होते तेच हे मंदिर होय भारत स्वतंत्र झाल्यानंतर त्या ठिकाणी आता एक विठ्ठलमंदिरही बांधण्यात आले आहे

(१६१) लांजकी— बालाघाट (मध्यप्रांत) येथे या देवतेचे देवालय आहे या शहराचे प्राचीन नाव लांजी असे असावे अठराव्या शतकात या प्रांतीच्या गोंड राजांनी हे मंदिर बांधले ह्या मंदिराबरोबरच त्यांनी कोटेश्वर महादेवाचेही एक मंदिर बांधले हे गाव शोण नदीच्या तीरावर आहे देवीची मूर्ति महामायेची आहे तिलाच लांजकी असे म्हणतात

(१६२) लोहासुरी— लोखंडाच्या भट्टीवरील ही देवता होय भारतामध्ये प्राचीन काळी, लोखंड शुद्ध करून ते पक्के करण्याच्या काही लहान लहान भट्ट्या होत्या मिर्झापूरकडील आगरी या नावाची एक जमात प्रथमत भट्टी पेटविताना या देवीची पूजा करी बैगा (पोलीसपाटील) करड न झालेली बकरी देवीला त्या वेळी बळी देऊन भाकरी जाळीत असे हा विधि केल्याने लोहापुरी प्रसन्न राहून कोणा कामकऱ्याला ती दुखापत होऊ देणार नाही, अशी सर्व कामकऱ्यांची श्रद्धा असे

(१६३) वानरमुखी—पंजाबप्रांती कांगरा या शक्तीपीठाचे भैरवी हे स्थान आहे ही देवी चतुर्भुजा असून, खड्ग, सुरापात्र, नरमुंड, त्रिशूळ, ही आयुधे

असून वानर वाहनावर एक पाय ठेवलेला आहे. बाजूला विद्याधराच्या मूर्ति हाती माला धारण करून उभ्या आहेत.

(१६४) वनदुर्गा— मैमनसिंग (पंजाब) येथे या देवतेचे देवालय आहे लहान लहान मुले या देवतेची काळजी वाहातात, तिचे पूजन करतात. कबुतरे, बकरी इत्यादि प्राणी तिला अर्पण करून त्यांचे मांस प्रसाद म्हणून मोठ्या आवडीने भक्षण करतात.

(१६५) वयी कन्नलु आम्मावरू— या देवीला सहस्र नयन आहेत, अशी भक्तांची भावना आहे. एखाद्या मातीच्या कुंभाला सहस्र छिद्रे पाडली म्हणजे या देवतेचे स्वरुप निर्माण झाले. लोकांच्या स्वास्थ्यासाठी आणि कल्याणासाठी अहर्निश झटणारी देवता असे तिचे वर्णन करतात.

(१६६) विठलाई—देवळे (रत्नागिरी) येथील ही एक ग्रामदेवता आहे. ही देवता जागृत असून ती नवसास पावणारी म्हणून प्रसिद्ध आहे. एखादा भक्त नवस फेडावयास चुकला तर वार्षिक पालखीमिरवणुकीच्या दिवशी या देवीची पालखी त्या भक्ताच्या घराजवळ आल्यावर एकदम जड होते त्या वेळी त्या भक्ताकडून नवस पुरा करून घेण्याचे अभिवचन घेतल्यावर मगच ती पालखी मार्गस्थ होते.

(१६७) वेदनायकी— दक्षिण रेल्वेवर वेदारण्य नावाचे स्टेशन असून त्या क्षेत्री वेदनायक हे शंकराचे नाव असून, शक्तिदेवीचे नाव वेदनायकी असे आहे. काही वेळा या देवीला वीणा-वादन-विभूषिणी असेही म्हणतात पार्वती देवीचे हे नाव येण्याचे कारण असे सांगितले जाते की, वीणावादनामध्ये सरस्वती-देवी श्रेष्ठ असताही, पार्वतीने तिचा पराजय केला. यास्तव तिला हे नाव प्राप्त झाले. मंदिर-प्राकारात सप्तमातृकांच्याही मूर्ति आहेत.

(तामीळनाड मंदिरे, दास, पृ. १५१)

(१६८) शाओदमाता— पंजाब प्रांतीची धान्य पिकविणारी देवता अशी तिची ख्याती आहे.

(१६९) शीलादेवी— जयपूर संस्थानची प्राचीन राजधानी तेथून ८ मैलावर असलेल्या अंबेर या गावी अनेक शतके होती. तेथील राजप्रासाद पहाडाच्या मध्यभागी बांधलेला असून सर्व काम कुरुंदी व संगमरवरी पाषाणाचे अप्रतीम कलाकौशल्याचे असल्याने, ते एक प्रेक्षणीय स्थळ आहे. असे सांगतात की, प्राचीन काळी या क्षेत्री अंबरीष राजाने अंबिकेश्वरी देवीची स्थापना केल्यावर, गावाला ते नाव प्राप्त झाले.

अशी दंतकथा आहे की, पूर्वी जैठोर या गावी जोगा एका ऋषीने एका शीलेवर बसून गायत्री मंत्राची २४ पुरश्चरणे केल्याने ती शीला सिद्धशीला झाली होती. राजा मानसिंहाला ही गोष्ट कळल्यावर त्याने ती शीला आणून, त्याची सुंदर देवीची मूर्ति बनवून घेतली आणि तिची या क्षेत्री स्थापना केली. त्याने एक मोठा सहस्रचंडी याग करून देवीला प्रसन्नही करून घेतले होते. सिद्धशीले-पासून मूर्ति बनविली म्हणून शीलादेवी हे नाव आले.

(१७०) शामवर्णादेवी— महीदपूर (होळकरराज्य) किल्ल्याचे समोर, क्षिप्रा नदीच्या जवळ आहे. ही चतुर्भुजा असून हाती शंख, गदा, ढाल, बाण ही आयुधे असून, मस्तकी शेषशायी नागाचा फणा आहे. यावरून हे लक्ष्मीचे स्वरूप आहे, हे उघड दिसते.

(१७१) शिन्मोक्ति— तवाय (ब्रह्मदेश) जवळ या देवीचे स्थान आहे. भारतामधून एक पाषाण आणि एक वटवृक्ष नेऊन या मंदिराजवळ लावलेले आहेत. ह्या जिल्ह्यात आणखी ३० मंदिरे आहेत.

(१७२) समादेवी— संबळपूर प्रांतामध्ये उडियासांजीया नावाची एक जमात राहाते. या देवीबद्दल अशी कथा प्रसिद्ध आहे की, एकदा दुग येथील एका तरुण राजाची दृष्टि सांजिया जमातीच्या एका विवाहित स्त्रीवर गेली आणि ती आपल्याला मिळावी म्हणून त्याने खूप प्रयत्न केले. राजाच्या ह्या वृत्तीचा सांजिया जमातीने प्रखर प्रतिकार केला, परंतु तरीही जमातीचा त्रास कमी होईना. अखेरीस कंटाळून त्यांनी बरार ह्या ठिकाणी स्थलान्तर केले. राजाने तरीदेखील तिचा पिच्छा पुरविला. सर्व प्रयत्न निष्फळ झाल्यानंतर त्या स्त्रीने शेवटी अग्निप्रवेश केला आणि ती समाजात मानाचे स्थान पावली. उडिया गीतांमध्ये ह्या कथेचे वर्णन मिळते.

या देवीचे एक मंदिर बेळगांव येथे आहे. नार्वेकर वैश्य समाजाची ती प्रमुख देवता मानली जाते. ज्ञातीमधून निधि गोळा करून ह्या ठिकाणचे विश्वस्त त्या पैशाचा विनियोग ज्ञातिबांधवांच्या सामाजिक उद्धारासाठी करतात.

(१७३) सत्ययतक्षी— सिक्कल (तंजाऊर) या क्षेत्री ही देवता आहे. शंकराचे नाव नवनीतेश्वर आहे. क्षीरसागराच्या फेसातून हे लिंग उत्पन्न झाले, म्हणून हे नांव मिळाले, अशी दंतकथा आहे. (पद्मासुर दैत्याचा वध करण्यासाठी सुब्रह्मण्य देवाने तपश्चर्या करून देवीला प्रसन्न करून घेतले. देवीने सुब्रह्मण्याला एक त्रिशूळ दिला आणि त्यायोगे दैत्य ठार झाला, परंतु ब्रह्महत्येच्या पातकामुळे

त्याचे शरीर काळे पडले असता येथील क्षीरतलावात स्नान करताच त्याला पूर्वरूप प्राप्त झाले. सुब्रह्मण्य देवाला स्थानिक नांव सिंगवेलवर असे आहे.

( तामीळनाड मंदिरे, दास, पृ.१६४ )

(१७४) सावित्री— दंतन ( मिर्झापूर ) गावी देवीचे स्थान आहे. झारग्राम येथील राजवंशाची ही कुलदेवता. शिव-विष्णूचा वास या ठिकाणी एकत्र पाहावयास मिळतो. शिवलिंग चतुर्मुख असून, त्याचे शेजारी शेषशायी लोकेश्वर विष्णु १२ भुजाचा, शेषफणा मस्तकावर असा आहे. येथील शक्तिदेवीचे नाव सावित्री आहे. ( बंगाल मंदिरे, चौधरी, पृष्ठ ७७ )

(१७५) सौंदर्यनायकी— पुलवनेश्वरम् ( तंजाऊर ) या गावी देवीचे स्थान आहे. स्थानिक मंडळी तिला घोषांबिका असेही म्हणतात. याचे कारण असे सागतात की, एके वेळी येथील सुब्रह्मण्याची मूर्ति इंद्रदेव नेत असताना रथाचे चाकाचा आवाज ( घोष ) झाल्याने देवी जागृत झाली आणि तिने सुब्रह्मण्याची मूर्ति परत करणे इंद्राला भाग पडले. यास्तव हे नाव आले.

( तामीळनाड मंदिरे, दास, पृष्ठ. १८६ )

(१७६) सर्वमंगलादेवी— गारपेटा ( मिदनापूर ) येथे मदिर आहे. मंदिराचा प्रवेश-दरवाजा उत्तराभिमुख असून, याचे कारण असे दिले जाते की, उज्जयिनीचा राजा विक्रमादित्य या क्षेत्री जंगलात फिरत असताना या देवीने त्याचे मन आकर्षून घेतले. राजाने मंदिर उभारले आणि त्या ठिकाणी प्रेतावर बसून, तांत्रिक मार्गाने साधना केल्यावर देवता प्रसन्न झाली आणि ताल व बेताल हे दोन सेवक त्याच्या दिमतीला दिले. देवीची खरोखरच कृपा झाली आहे काय, याची प्रचिती पाहण्याचे त्याने ठरवून, ताल-वेतालाना आज्ञा केली की, ‘मदिराचा प्रवेश दरवाजा उलट दिशेला फिरवून टाका.’ आज्ञेप्रमाणे त्यानी दरवाजा फिरवला, तो आजही त्याच स्थितीत आहे.

मंदिराची बांधणी साधारणतः सोळाव्या शतकातील दिसते. यावरून विक्रमादित्याचा यामध्ये संबंध असावा असे वाटत नाही, पण कदाचित् या वेळी जीर्णोद्धारही झालेला असेल. मंदिरातील मांडणी ओरिसातील रेखामंदिराप्रमाणे आहे. गाभाऱ्याकडे जाताना ३० फूट गोल बोगद्यातून जावे लागत असल्याने, साधारणतः पुजारी वाटाड्या म्हणून बरोबर जातो. गाभाऱ्यात देवीच्या दोन मूर्ति तादळा-स्वरूपात पण उग्र अशा दिसतात. या क्षेत्री पूर्वी नरबळी अर्पण करीत असल्याचे अवशेष सापडतात. नावाची व्युत्पत्ति मात्र मिळत नाही.

( बंगाल मंदिरे, चौधरी, पृष्ठ ७८ )

(१७७) सातेरी— मालवण (रत्नागिरी) जवळ या देवीचे देवालय आहे देवीची मूर्ति चतुर्भुज असून तिच्या गळ्यात माला, मस्तकावर किरीट व हातात त्रिशूळ, तलवार, ढाल व पाश, ही आयुधे आहेत आपल्या पायाखाली ती महिषदैत्याला तुडवीत आहे इतरत्रही ह्या स्वरूपाची मंदिरे आढळतात माउळी, सर्प, फोणशे ही विषारी जनावरे एखाद्याला चावली असता देवीचे न्हाणण (तीर्थ) दिल्यावर त्याला उतार पडतो, अशी भक्ताची श्रद्धा आहे तसेच या गावी वस्ती करून राहिल्यास व देवीची सेवा केल्यास कुष्ठरोगही बरा होतो, असा अनेकांचा स्वानुभव आहे शिवळे येथील शातादुर्गा देवीला सातेरी असेही म्हणतात याची उपपत्ती अशी की, शाता = शातेरी = सातेरी अशी असावी.

या देवीच्या जागृतपणाबद्दल प्र म भेने रा वाडा (रत्नागिरी) यांनी आपला अनुभव निवेदन केला तो असा की, त्यांचे घरी तीन मृत्यु, फुरसे या विषारी जनावरामुळे झाले शेवटी त्यानाही दंश झाला पण त्यानी या देवीवर निष्ठा ठेवून नवस केला की, 'जगलोवाचलो तर दर्शनाला येईन' त्यानी कोणतेही औषध घेतले नाही पण दोन इतर वैदिकासमवेत तीन नवचंडीचे पाठ पुरे करताच वेदना बंद झाल्या आणि सूजही उतरली

देवीचे दर्शनाला गेल्यावर त्याना मुख्यदेवी अष्टभुजा महिषासुरमर्दिनी मधोमध असून एका बाजूला शातादुर्गा व दुसरीकडे द्विभुजा पार्वती दिसली देवीचे न्हाणण मराठा पुजाऱ्याने दिले तरच हटकून गुण येतो विहिरीचे पाणी स्नानाला उपयोगी आहे ते दर्शनाला गेले त्या वेळी इतर सात इसम फुरस्याचे दंशामुळे तेथे उपचारासाठी आले होते रोगमुक्त होण्यास या विकारासाठी २१ दिवस रहावे लागते सर्पदंशाचा एक रोगी आला, त्याने न्हाणण तीर्थ घेतले, विहिरीवर स्नान केले आणि बरा होऊन गेला सर्पदंशाचे उपचारासाठी आलेल्यापैकी आजवर कोणी दगावल्याचे त्यांच्या ऐकिवात नाही, याचसाठी देवीचे स्थान जागृत मानले जाते

(१७८) सामुद्रीमाता— मुंबई शहरी भुलेश्वर भागात या देवीचे स्थान आहे कच्छी ओस्वाल व कपोल जमातींची ही कुलदेवता या देवतेचे मूळ स्थान काठेवाडात, भावनगरसमीपच एका सरोवराकाठी आहे मूर्ति चतुर्भुज असून उजव्या खालच्या हाती राक्षसाचे मुंडके, वरच्या हाती तरवार, डावीकडे वरच्या हाती त्रिशूळ आणि खाली अमृतकुंभ अशी आयुधे आहेत देवीचे मुख व हात शेंदूरचर्चित दिसले या शब्दाची व्युत्पत्ति पुजकाने अशी सांगितली की, सागरमंथनाचे वेळी वर आली म्हणून सामुद्रीमाता हे नाव देण्यात आले. याचाच

अर्थ मूळ स्वरूप लक्ष्मीचे असावयास पाहिजे. पण राक्षसाचे मुडके, तरवार, त्रिशूळ ही आयुधे लक्ष्मीची नव्हत, म्हणजेच मूळ पार्वतीचे सिंहवाहिनी स्वरूप, महिषासुर अगर अन्य दैत्याचे वधाचे वेळीचे असावे.

(१७९) सासबाहू— ग्वाल्हेर येथील किल्ल्यामध्ये या देवतेचे स्थान आहे. 'सासबाहू' ह्याचा अर्थ 'सहस्र बाहू असलेली' असा होय या देवीचे मदिर षट्कोनी आकाराचे असून चौदा पायऱ्या चढून गेल्यावर मदिराप्रत पोहोचता येते. मदिराची उची चार माळ्याची असून मदिराचा कळस वरवर निमुळता होत गेलेला आहे. ह्या मदिराशेजारीच आणखी एक सासबाहूचे मदिर आहे. हे स्थान म्हणजे शिल्पकलेचा अगदी अत्युत्तम नमुना असल्यामुळे अनेक भाविक, तसेच हौशी प्रवासी ह्या स्थानाला भेट देत असतात.

राजस्थानातील नागदा या शहरी सासबाहूचे उत्तम मदिर आहे व ते नागरशैलीचे आहे. चार गोल स्तभावर आधारित सगमरवरी विशाल मडप आहे. मडपाचे बाहेर अकरा दुसरी मदिरे आहेत. मदिराचे बाहेरील बाजूस आणि छतावर उत्तम शिल्पमूर्ति असून, त्या सजीव वाटतात.

(१८०) हटसादेवी— जुन्नर (पुणे) जवळ नारायणगड या नावाचे एक स्थान आहे. येथील मदिराचा जीर्णोद्धार बाळाजी विश्वनाथ पेशवे ह्यानी केला. या ठिकाणी पाण्याची टाकी व अनेक पाण्याचे हौद आहेत.

(१८१) हरिकाली— उत्तर प्रदेशात भाद्रपद व. ३ दिवशी या देवीचे पूजन व्रताप्रमाणे करतात. एकदा देवसभेत विष्णु समोर महाकाली देवी काळी आहे, असा उल्लेख शकरानी केला. तेव्हा साहजिकच तिला राग आला आणि आपला श्यामवर्ण धान्यात टाकून दिला. त्या वेळेपासून हिरव्या धान्यरोपात असलेल्या या देवतेच्या स्वरूपाचे पूजन करण्याची प्रथा पडली. पापमुक्ति, अपत्य-प्राप्ति आणि सुख-सौभाग्यवृद्धि हे या पूजनाचे फळ आहे. सायकाळी वृक्षाला झुले टागून शृगाररसयुक्त कजरी लोक गीताचे गायन करतात. गहू, चणे अगर तादूळ याचे पिठात तूपसाखर घालून गोडाचा नैवेद्य तयार करतात.

(१८२) हंसेश्वरी— हुगळी येथील त्रिवेणी सगमावर ही देवता आहे. या क्षेत्री गगा नदीला तीन फाटे फुटतात, सरस्वती पश्चिमवाहिनी, जमुना पूर्व वाहिनी व भागिरथी दक्षिणवाहिनी असे आहेत. राजा नरसिंहदेव याने सन १८०२ साली हे मदिर उभारण्यास सुरवात केली, पण मध्यतरी तो कैलासवासी झाल्याने त्याची राणी शकरीदेवी हिने ते पाच लक्ष रुपये खर्चून पूर्ण केले. बांधकाम एकूण १५ वर्षे चालले होते.

गाभाऱ्यातील मूर्ति निंबार्क वृक्षाची आहे. खाली शिवशंकर झोपले असून त्याच्या नाभीकमलातून कमलपुष्पाचा दांडा वर निघाला असून त्यावर देवी आसनस्थ आहे देवीला निळा रंग दिलेला आहे. मंदिराला एकूण १३ घुमट असून प्रथम खाली आठ, त्यावर चार आणि शेवटी एक अशी मांडणी आहे. एकूण उंची सुमारे ७० फूट आहे. गर्भगृह ४४ चौ फुटाचे असले, तरी अनेक घुमटांमुळे बाह्यदेखावा सुंदर दिसतो या क्षेत्री गंगानदीला तीन फाटे फुटतात म्हणून क्षेत्राला 'मुक्तवेणी' म्हणतात आणि प्रयाग क्षेत्री तीन नद्या एकत्र मिळतात म्हणून त्या क्षेत्राला 'युक्तवेणी' असे म्हणतात.

(बंगालमंदिरे, रॉयचौधरी, पृ ४८)

(१८३) हेमाब्जनायकी— मानारगुडी (तंजाऊर) क्षेत्री ही शक्ति देवता आहे. तेथील विष्णूचे नाव परा वासुदेवर आहे. काही वेळा हिला रत्नाब्जनायकी असेही म्हणतात. चेनबगवृक्षसमूहात हे क्षेत्र असल्याने काही वेळा देवीला सेनाबागवल्ली असेही म्हटले जाते प्रमुख देवतेच्या दोन्ही बाजूंना राजनायकी आणि डावे बाजूस द्वारनायकी यांच्या मूर्ति आहेत ही देवता चतुर्भुज आहे (तामीळनाडु मंदिरे, पृ, १४६)

(१८४) हाकामारी—— काही वेळा रात्रीचे वेळी ही देवता गावात फिरत असताना माणसाचे नावाने हाका मारते पण अशा वेळी सहसा कोणी दरवाजा उघडून बाहेर येत नाही आणि आलाच तर तो मरण पावतो, अशी भाविकांची श्रद्धा आहे याचे प्रत्यंतर दि. ११–१२–६७ रोजी कोयना येथे झालेल्या भूकंपाचे वेळी लोकांना आले. ढोसेघर (सातारा) येथील मंडळींना पूर्वसूचना म्हणून लोकांनी हाका मारल्या पण हाकामारी देवी असेल म्हणून त्याची दाद कोणी घेतली नाही पण शेवटी शेलार नावाचे शाळामास्तर स्वत घरोघर आपली ओळख देत फिरले आणि त्यांनी लोकांना पूर्व सूचनेने बाहेर काढले, किंबहुना अनेक माणसे मृत्युमुखी पडली असती.

संकटाचे वेळी ही देवता हाका मारते, असे अनेक वृद्ध सांगतात.

(१८५) ज्ञानप्रसन्नांबा— कल्हस्ती (आंध्र) येथे ही देवता आहे. आद्य शंकराचार्यांनी जी पाच तत्त्वांची लिंगे स्थापन केली, त्यापैकी तेथे वायुलिंगाची स्थापना केली ही देवता तिरुपती येथील व्यंकटेश्वराची बहीण मानतात. भक्तांना ती ज्ञान देते, या समजुतीने हे नाव आलेले आहे. इंद्रदेवाला परमब्रह्मतत्त्व प्रथम या देवतेने या क्षेत्री सांगितले अशी भक्तांची भावना आहे.

(आंध्रप्रांतीय मंदिरे, रमेशन, पृ. ७६)

## (१८६) आर्यादुर्गा

तप्तस्वर्णोज्ज्वलाङ्गीं धृतमहिषशिरां धारयंतीं त्रिशूलं।
खड्गं चर्मोऽपि दोर्भिः प्रबलरिपुगणां त्रासयंतीं कटाक्षैः।
सिंहस्कंधाधिरूढां त्रिनयनलसितां सेवितां सिद्धिकामैः।
आर्यादुर्गां भजेऽहं भजनपरजनानंददात्रीं प्रसन्नाम ॥

मौजे देवीहसोळ (राजापूर–रत्नागिरी) या गावी डोंगरावर या देवीचे स्थान आहे. ते स्वयंभू असून जागृत आहे, असा भक्ताचा अनुभव आहे. गावापासून सुमारे तीन मैल दूर असल्याने पायवाटेनेच मंदिराप्रत जावे लागते.

देवीची मूर्ति संगमरवरी शुभ्र पाषाणाची सुमारे अडीच फूट उंचीची चतुर्भुज असून हातात त्रिशूल, खड्ग, ढाल आणि चवथ्या हाताने महिषाची शिरा धरलेली आहे. ती सिंहवाहना असून त्रिनयनाही आहे. हे दुर्गादेवीचे स्वरूप असले तरी आर्यादुर्गा, नाव का आले, याची माहिती मिळालेली नाही. या देवतेची स्थापना केव्हा झाली व मंदिर कोणी उभारले याचीही माहिती मिळाली नाही. मंदिर डोंगरावर असले तरी पाण्याची विहीर सतत भरलेली असते.

देवीचा मुख्य वार्षिक उत्सव आश्विन नवरात्रात असतो तसेच मार्गशीर्ष वद्य अष्टमीचे दिवशी यात्रा भरते, त्या वेळी शेजारचा गाव भालवली येथून नवदुर्गा देवीची पालखी भेटीस येते.

या देवतेच्या उत्पत्तीसंबंधी अशी दंतकथा प्रसिद्ध आहे की, पळसुले उपनाव असणाऱ्या घरातील एक पूर्वज हसोळहून कर्नाटकातील अंकोळ या गावी दर्शनासाठी जात असे. पुढे वृद्धापकाळामुळे त्याला जाणे अशक्य झाले तेव्हा शेवटचे खेपेस देवीची प्रार्थना केली, ' यापुढे अशक्तपणामुळे भेटीस येणे होणार नाही आणि दर्शनाचा नेम चुकणार आहे. तरी कृपावंत होऊन मातेने अंतर देऊ नये.' मोठ्या कष्टाने तो परत येत असता, हसोळ गावी त्याला पायातील नूपुराचा आवाज ऐकू येताच त्याने मागे पाहिले. पहाताच देवीचे साक्षात दर्शन झाले, पण त्वरितच ती अंतर्धान पावली व त्या ठिकाणी स्वयंभू पादुका दिसून आल्या. यामुळे पादुका हेच स्वयंभू स्थान आणि मूर्तीची स्थापना नंतर झालेली आहे,

साडू, गुर्जर, पळसुले–देसाई इ० अनेकांची ही कुलस्वामिनी आहे.

(निवेदक— केशव अनंत करबेळकर, चेंबूर, मुंबई)

(१८७) अदलदेवी— मदुरा शहराचे दक्षिणेस सुमारे ५० मैलावर श्रीविलीपुथुर नावाचे श्री अदलदेवी आणि वटपत्रशायी विष्णूचे मंदिर

आहे या देवींची कथा मोठी मनोरंजक आहे या मंदिराचे बाजूला एक तुळशी बाग आहे प्राचीन काळी येथे विष्णुचित्त नावाचा ब्राह्मण रहात असून, तो नियमितपणे तुळशीमाळा विष्णूला अर्पण करीत असे त्याची मुलगी अदल असून ती तुळशीमळ्यात त्याला सापडली होती दिव्यसुरीचरित्राप्रमाण तिचा जन्म कली ९७ साली झाला. तिला गोड असेही म्हणत दिवसामासी ती वाढत असताना मीराबाईप्रमाणे तिला कृष्णभक्तीची आवड उत्पन्न होऊन, गोपीभाव जागृत होऊन श्रीकृष्ण पति मिळावा म्हणून ती त्याची भक्ति करू लागली. विष्णु मंदिरात भूदेवी व श्रीदेवी असत देवाला वाहण्याच्या तुळशीच्या माळा, बापाचे नकळत ती आपण घाली, सुंदर दिसण्याचा प्रयत्न करी आणि आपले रूप पुन्हा पुन्हा जवळच्या विहिरीचे पाण्यात पाहत असे अद्यापही ती विहीर दाखविली जाते. एके दिवशी बापाने हा प्रकार पाहिला व देवाच्या माळा गळ्यात घातल्या म्हणून रागे भरला पण त्याच रात्री स्वप्नात विष्णुमूर्ति येऊन बापाला म्हणाली, मला त्या मुलीने वापरलेल्या माळा आवडतात आणि त्याच दररोज आणीत जा. याप्रमाणे नंतर त्या विष्णूला घातल्या जाऊ लागल्या मुलगी मोठी झाल्यावर पिताजीने वरशोधन चालविले असता, एके रात्री श्रीरंगपट्टण येथील रंगनाथ मूर्ति त्याचे स्वप्नात आली व मुलीचा विवाह त्याजबरोबर करण्याचा आदेश दिला. तसेच मंदिराचे पुजाऱ्याला अदलला घेऊन येण्यास सांगितले, बातमी हां हां म्हणता सर्वत्र पसरली. पाण्ड्यराजे स्वत मुलीला घेऊन रंगनाथ मंदिरात गेले. विवाहासाठी मुलगी वय १४ वर्षे गर्भगृहात शिरली आणि रंगनाथाला आलिंगन देताच मूर्तीमध्ये एकजीव झाली तिला सायुज्यमुक्ति मिळाली मूर्तीमधून आवाज आला, ‘ विष्णुचित्त तुम्ही आमचे श्वशूर झालात ’ तेथील सर्व भक्तांनी विष्णुचिताचा यथोचित गौरव करून गावी परत पाठविले.

मंदिराचे गोपूर १९२ फूट उंच असून बारा माळे आहेत. उत्सवाचे वेळी ९ चाकाचा लाकडी रथ वापरला जातो. अदलदेवी स्मरणार्थ मंदिर श्रीविलीपुथुर गावी उभारले गेले. ( दास, तामिळ मंदिरे, पृ ५५, ५६ )

(१८८) अभिरामसुंदरी— मद्रासपासून सुमारे २०० मैल दक्षिणेला आणि करिकलजवळ तिरुक्कवैयूर नावाचे क्षेत्र आहे, तेथे ही देवता आहे. या शक्तिदेवीचा अशी कथा प्रचलित आहे की, देवीचा अर्चक अभिरामभक्त देवीचे पूजन करून ध्यानमग्न असता, सर्फोजीराजे दर्शनाला आले. ध्यानमग्न असल्याने त्याने राजाची विचारपूस न केल्याने त्याला राग आला. पण लगेच विचार बदलून त्याना असे वाटले की, या वेळी एखादा प्रश्न विचारला, तर सत्य तेच बाहेर पडेल. तावडतोब राजानी प्रश्न विचारला, ‘ आजची कोणती तिथि किती घटका आहे ? ’ अर्चक पूर्ण ध्यानमग्न असल्याने त्याने उत्तर दिले, ‘ आज पौर्णिमा

आहे.' या उत्तराने राजे चमकले. कारण अमावास्या असून त्याच स्नानविधी-साठी ते नदीवर आलेले होते. राजा जाण्यास निघाल्यावर बरोबरच्या सैनिकांची गडबड ऐकून अर्चकाचे ध्यान उतरले. राजाने झालेली हकिगत अर्चकाला निवेदन केल्यावर ताकीद दिली, की शब्द खरे झाले नाहीत तर शासन केले जाईल.

राजाची आज्ञा ऐकून अर्चक पुन्हा ध्यानमग्न झाला आणि देवीचे स्तुतीपर स्तोत्र तिला प्रसन्न करून घेण्यासाठी पठण करू लागला. सुमारे ७५ श्लोक झाल्यावर, ७९ श्लोकांचे वेळी देवी प्रसन्न झाली आणि आपल्या अर्चकाचा शब्द खरा करण्यासाठी, कानातील कर्णफुले काढून ती आकाशात फेकली. व्हावयाचा तोच परिणाम झाला. देवीच्या त्या दिव्य कर्णालंकारानी तेजस्वी प्रकाश पडला आणि चंद्राच्या तेजाप्रमाणे सर्वत्र चांदणे पसरले. भक्तांच्या निष्ठेला देवता धावून आलेली होती.

राजाने हा सर्व अद्भुत प्रकार पाहिल्यावर मंदिरात येऊन अर्चकाची क्षमा मागून त्याला काही देणगी देऊ केली. पण त्याने त्याचा स्वीकार केला नाही. तेव्हा राजे अधिकच खूष होऊन, राज्यवसुलाचा शंभरावा हिस्सा या अर्चकास वंशपरंपरेने मिळावा असा ताम्रपट लिहून दिला असून वंशजाजवळ तो अद्याप पाहाण्यास मिळतो. (दास, तामिळ मंदिरे, पृ. १७६.)

(१८९) अरण्यदेवी — पाटणा शहरापासून ४० मैलांवर आराह नावाचे गावी ही देवी आहे. या देवतेच्या निर्मितीसंबधाने अनेक कथा आहेत. त्यापैकी एक कथा अशी की, पूर्वी येथे मयुरध्वज नावाचा राजा राज्य करीत असता दुर्गा-देवीचे कृपाप्रसादाने त्याला एक पुत्र झाला. मुलगा थोडा मोठा झाल्यावर राजाला स्वप्न पडून, दुर्गादेवीने तो पुत्र करवतीने उभा चिरून बळी मागितला. देवीची इच्छा पूर्ण करण्यासाठी त्याच्या राणीनेही सम्मती दिली. मुलाला उभा करून डोक्यावर करवत ठेवून, आता चिरण्याची क्रिया घडणार, एवढ्यात देवता स्वत: प्रगट झाली आणि त्यांची भक्ति पाहून आशीर्वाद देऊन पुन्हा गुप्त झाली, (करवत = आरा) ज्या ठिकाणी हा प्रकार घडला तेथे दुर्गा देवीची स्थापना करून तिला अरण्येश्वरी नाव देण्यात आले आहे.

हे मंदिर पूर्वाभिमुख असून, दहा फूट उंचीच्या सिंहासनावर दोन काळ्या पाषाणाच्या मूर्ति आहेत. एक मूर्ति तीन फूट तर दुसरी दोन फूट उंचीची आहे. या दोन्ही बहिणी बहिणी मानतात. साधारणत: नहमी या देवताना पीतवस्त्र नेसविले जाते व कागदाचे मुकुट घालतात.

पतीच्या या कृतीमुळे तिच्यातील दैवीशक्ति जागृत झाली आणि तिने शंकरांना प्रार्थना केली, 'भगवान माझे उत्तम स्वरूप हिरावून घे, अंगावरील मांसाचे हरण करून भूतगणात माझा समावेश कर, म्हणजे मला तुझे नित्य दर्शन घडेल.' परमेश्वराने तिची इच्छा त्वरित पूर्ण केली आणि तिला मुक्ति दिली. तंजोरपासून ४० मैलांवर अलंगदु नावाचे ठिकाणी शंकराचे आज्ञेप्रमाणे आली असता, शंकराचे नृत्य पाहत असता त्यांचे चरणी ती विलीन झाली. या अलौकिक भक्तीमुळे तिला देवपणा प्राप्त झाला आहे. (दास, तामीळ मंदिरे, पृ. १७२)

(१९१) गिरिजा मंदिर—दरभंगा शहराच्या ईशान्येस सुमारे ४० मैलांवर फुल्हेर गावी हे मंदिर आहे. मंदिर पूर्वाभिमुख असून गाभारा ८ × १० फूट व सभागृह १० × १२ फूट या आकाराचे व उंची ७५ फूट आहे. गिरिजादेवीची काळ्या पाषाणाची दोन फूट उंचीची मूर्ति असून, उजव्या बाजूस जानकी व डाव्या बाजूस गणेश, काली, दुर्गा, विष्णु व शिव यांच्या मूर्ति मागाहून स्थापन केलेल्या आहेत. मंदिराचा पुजारी वैष्णवधर्मीय आहे. फाल्गुन महिन्यात या क्षेत्री पंचक्रोशी यात्रा भरते, त्या वेळी यात्रिक जनकपूर, अहिल्यास्थान, दुर्गास्थान, कपीलेश्वरस्थान, बेसौल, फुल्हेर या क्षेत्रांची यात्रा करतात. हे क्षेत्र नेपाळच्या सरहद्दीजवळ असल्याने, नेपाळी यात्रिक जास्त प्रमाणावर असतात.

या क्षेत्राचे महत्त्व एका निराळ्याच दृष्टिकोनातून उद्भवले आहे. राम व सीता यांची प्रथम भेट या गावी झाली व पुढे त्यांचा विवाह ठरला असा प्रवाद आहे. फुल्हेरपासून चार मैलांवर विश्वामित्रांचा आश्रम बेसौल गावी होता. तसेच जनकपूरच्या मार्गावर अहिअरी या गावी रामचंद्रानी अहिल्याशिळेचा उद्धार केला. या क्षेत्रापासून जनकपूर हे ४० मैलांवर आहे. या भौगोलिक परिस्थितीचा फायदा घेऊन अशी कथा सांगितली जाते की, जनकपुराहून सीता फुल्हेर गावी सखीसह सहल करण्यास येत असे, सुवासिक फुलांचे हार तयार करी आणि गिरिजादेवीला वाहत असे. देवीमंदिराजवळ जे सरोवर आहे, तेथे बसून ती हार तयार करीत असे. विश्वामित्राचा आश्रम जवळच असल्याने एके दिवशी राम, लक्ष्मण या देवीच्या गावी आले आणि फुलबाग पाहून आनंदित झाले. फुलाची शोभा पहात फिरत असताना अचानक श्रीरामांची दृष्टि सीतादेवीवर पडली, आणि दोघेही आकर्षित झाली. तुलसीकृत रामायणातील बालकांडात हा प्रसंग वर्णन केलेला आहे.

पुढे श्रीरामचंद्र जनकपूरला गेले, त्यांनी शिवधनुष्य मोडले, जनकाने सीतेचे कान्यदान केले, दशरथ आल्यावर इतर भावांची लग्ने ठरली; हा सर्व इतिहास आजही 'सौरथमेला' रूपाने ताजातवाना ठेवला आहे. भारत अगर

अरण्यदेवतेचे डावे बाजूला राधा कृष्णाच्या मूर्ति असून उजवे बाजूला रामपचायतन आहे या शुभ्रसगमरवरी मूर्ता सन १९५३ साली एका व्यापाऱ्याने बसविल्या आहेत हे मंदिर पुजाऱ्याकडे वंशपरत्वे चालत आलेले असून तोच याचा मालक आहे ही देवता नवसाला पावते अशी प्रसिद्धि असल्याने, भाविक भक्ताची रीघ लागलेली असते (बिहार मंदिरे, रायचौधरी, पृ० १०६–१०८)

सांप्रत हे क्षेत्र अनेक जैनमंदिरासाठी प्रसिद्ध आहे श्रीश्यामवेदविहार-मंदिर, बाहुबलीमंदिर, जलमंदिर, नंदेश्वरमंदिर, सहस्रकूट चैतन्य, आदिनाथ-मंदिर, चौरासीमंदिर इ० प्रमाणे एकूण ४४ मंदिरे आहेत प्राचीन काळी हे प्रसिद्ध जैनक्षेत्र होते, तसेच सांप्रतही आहे

(१९८) कैरकलदेवी— पूर्व किनाऱ्यावर कुंभकोणमजवळ हे क्षेत्र आहे. येथील देवतेची कथा अशी की, तेथील एक व्यापारी परमदत्त याची ही पत्नी असून तिला दैवीशक्ति अनुकूल होती तिचे नाव पुनितावती असे होते. जो कोणी शिवभक्त तिचे दारी येईल, त्याचे प्रेमाने ती आदरातिथ्य करीत असे. एके वेळी अशी गोष्ट घडली की, त्या व्यापाऱ्याला कोणी दोन उत्कृष्ट आम्रफळाची भेट दिली आणि त्याने ते आंबे घरी पाठविले. इतक्यात एक योगी दारी आला असता त्याला थोडा भात आणि एक आम्रफळ तिने देऊन टाकले

दोन प्रहरी परमदत्त घरी आल्यावर भोजन करताना त्याने एका आंब्याची माधुरी चाखताच, दुसराही खावा अशी इच्छा झाली असता, पत्नीकडे त्याची मागणी केली आपले सत्य राखण्यासाठी तिने शंकराचा धावा करताच तिचे हाती पहिल्यापेक्षा उत्कृष्ट फळ पडले ते फळ भक्षण करताच ते फळ कोठून आणले म्हणून पतीने विचारताच तिने खरा प्रकार निवेदन केला पतीचा या कथेवर भरवसा बसेना आणि तिची परीक्षा घेण्याचे उद्देशाने, अधिक फळाची मागणी केली सतीची ती मागणीही परमेश्वराने पुरविताच, पतीला कळून चुकले की आपली पत्नी दैवीशक्ति असल्याने, तिजबरोबर शरीरसंबंध ठेवणे युक्त नव्हे वास्तव व्यापाराचे निमित्ताने, जहाज भरून तो परदेशी गेला व्यापारात संपत्ति मिळताच परत आल्यावर आपले गावी न जाता तो पाड्यम येथे राहिला

त्या ठिकाणी त्याने दुसऱ्या एका स्त्रीबरोबर विवाह करून राहिला असता कैरकल येथे ही वार्ता समजली तेव्हा मित्रमंडळी पहिल्या स्त्रीला घेऊन तेथे गेले असता, पाहता क्षणी पतीने तिला साष्टांग नमस्कार घालून म्हटले, 'तुझा दास या ठिकाणी सुखी आहे माझे मुलीचे नाव तुझेच ठेवून नित्य स्मरण करीत असतो, तू माझी देवता आहेस'

पतीच्या या कृतीमुळे तिच्यातील दैवीशक्ति जागृत झाली आणि तिने शंकरांना प्रार्थना केली, 'भगवान माझे उत्तम स्वरूप हिरावून घे, अंगावरील मांसाचे हरण करून भूतगणात माझा समावेश कर, म्हणजे मला तुझे नित्य दर्शन घडेल.' परमेश्वराने तिची इच्छा त्वरित पूर्ण केली आणि तिला मुक्ति दिली. तंजोरपासून ४० मैलांवर अलंगदु नावाचे ठिकाणी शंकराचे आज्ञेप्रमाणे आली असता, शंकराचे नृत्य पाहत असता त्यांचे चरणी ती विलीन झाली. या अलौकिक भक्तीमुळे तिला देवपणा प्राप्त झाला आहे. (दास, तामीळ मंदिरे, पृ. १७२)

(१९१) गिरिजा मंदिर—दरभंगा शहराच्या ईशान्येस सुमारे ४० मैलावर फुल्हेर गावी हे मंदिर आहे. मंदिर पूर्वाभिमुख असून गाभारा ८ × १० फूट व सभागृह १० × १२ फूट या आकाराचे व उंची ७५ फूट आहे. गिरिजादेवीची काळ्या पाषाणाची दोन फूट उंचीची मूर्ति असून, उजव्या बाजूस जानकी व डाव्या बाजूस गणेश, काली, दुर्गा, विष्णु व शिव यांच्या मूर्ति मागाहून स्थापन केलेल्या आहेत. मंदिराचा पुजारी वैष्णवधर्मीय आहे. फाल्गुन महिन्यात या क्षेत्री पंचक्रोशी यात्रा भरते, त्या वेळी यात्रिक जनकपूर, अहिल्यास्थान, दुर्गास्थान, कपीलेश्वरस्थान, बेसौल, फुल्हेर या क्षेत्रांची यात्रा करतात. हे क्षेत्र नेपाळच्या सरहद्दीजवळ असल्याने, नेपाळी यात्रिक जास्त प्रमाणावर असतात.

या क्षेत्राचे महत्त्व एका निराळ्याच दृष्टिकोनातून उद्भवले आहे. राम व सीता यांची प्रथम भेट या गावी झाली व पुढे त्यांचा विवाह ठरला असा प्रवाद आहे. फुल्हेरपासून चार मैलावर विश्वामित्रांचा आश्रम बेसौल गावी होता. तसेच जनकपूरच्या मार्गावर अहिअरी या गावी रामचंद्रांनी अहिल्याशिळेचा उद्धार केला. या क्षेत्रापासून जनकपूर हे ४० मैलावर आहे. या भौगोलिक परिस्थितीचा फायदा घेऊन अशी कथा सांगितली जाते की, जनकपुराहून सीता फुल्हेर गावी सखीसह सहल करण्यास येत असे, सुवासिक फुलांचे हार तयार करी आणि गिरिजादेवीला वाहत असे. देवीमंदिराजवळ जे सरोवर आहे, तेथे बसून ती हार तयार करीत असे. विश्वामित्राचा आश्रम जवळच असल्याने एके दिवशी राम, लक्ष्मण या देवीच्या गावी आले आणि फुलबाग पाहून आनंदित झाले. फुलांची शोभा पहात फिरत असताना अचानक श्रीरामांची दृष्टि सीतादेवीवर पडली, आणि दोघेही आकर्षित झाली. तुलसीकृत रामायणातील बालकांडात हा प्रसंग वर्णन केलेला आहे.

पुढे श्रीरामचंद्र जनकपूरला गेले, त्यांनी शिवधनुष्य मोडले, जनकाने सीतेचे कन्यादान केले, दशरथ आल्यावर इतर भावांची लग्ने ठरली; हा सर्व इतिहास आम्ही 'सौरथमेला' रूपाने ताजातवाना ठेवला आहे. भारत अगर

इतर देशात या रीतीचा कार्यक्रम फक्त येथेच घडतो असे म्हटले पाहिजे. सौरथ हे गाव दरभंगा जिल्ह्यात असून तेथे हा वार्षिक मेळा भरतो या मेळ्यामध्ये मुलांचे व मुलींचे आई-बाप, कुडल्यासह एकत्र जमतात आणि पंडितानी कुडल्यांची छाननी केल्यावर, मुलामुलींसबंधाने मतप्रदर्शन करतात. मुलीची पसती झाली म्हणजे वरपिता त्या गावी जातो, मुलीची मागणी घालतो आणि विवाह घडवून आणला जातो विवाह जमवून आणण्याचा कार्यक्रम या मेळ्यात घडतो, म्हणून तो महत्त्वाचा मानला आहे. सीतादेवीचा विवाह अग्रहायन महिन्यात झाला आणि पुढे तिला फार सकटात आयुष्य घालवावे लागले, यास्तव त्या महिन्यात मात्र विवाह शक्यतोवर टाळतात.

( बिहार मदिरे, रॉय चौधरी, पृ. ६-९ )

(१९२) ताम्रेश्वरी—असामप्राती लखमीपूरजवळ सादिया नावाचे शहर आहे, त्या ठिकाणी पूर्वी या देवतेचे भग्न मदिर होते. तेराव्या शतकात हा भाग चुतिया जमातीचे वर्चस्वाखाली होता. ही जमात काली देवीची भक्त असून केसईखाती (न शिजविलेले मास भक्षण करणारी) म्हणत. या देवीचे एक मदिर सादिया येथे असून तिला ताम्रेश्वरी म्हणत. कारण ताब्याचा पत्रा बाधणी-साठी वापरला होता. डॉ. कान्तीचे मते कालिकापुराणात वर्णन केलेली दिक्कर-वासिनी देवी ती हीच होय. या देवतेची दोन रूपे आहेत. ललितकाता व तीक्ष्णकाता. या देवीचे सेवेकरी म्हणून भगा, सुभगा, चामुडा, कराला, भीषणा, विकला असे भयकर स्वरूपाचे आहे.

या देवीला नरबळी फार प्रिय असे. वार्षिक उत्सवाचे वेळी, अगर सकटाचे निवारण करण्यासाठी नरबळी अर्पण करीत, साधारणतः फाशीची शिक्षा झालेले अथवा युद्धकैदी याचा बळी अर्पण करीत. काही वेळा नरबळी जाण्यास उत्स्फूर्त तयार होत, अशा इसमाला वर्षभर भरपूर खावयास घालून, धष्टपुष्ट करीत व नतर बळी देत. बळी देण्याचे दिवशी त्याचे क्षौर करून, स्नान घालून, हळद व पीठाने अग मारून झाल्यावर सुवर्ण व चादीचे अलकार घालीत. नतर देवीसमोर निजल्यावर, त्या जमातीचा भिक्षुक वारदेवरी त्याचे मस्तक उडवीत असे. अशा नरबळीची शिरकमळे, मदिरात एका माळेत टांगून ठेवलेली असत. याने देवता प्रसन्न होते अशी त्यांची श्रद्धा होती. मणीपूर येथील ग्रथालयात ‘ तिरा कल्प ’ नावाचे हस्तलिखित असून त्यामध्ये हा विधि सपूर्णपणे वर्णन केलेला आहे. बी. बी. ब्राऊन नावाचे गृहस्थाने याचे थोडेसे भाषातर प्रसिद्ध केलेले आहे. काही भाग असा—

राजाचे परवानगीने युद्धात जय मिळावा, अगर हाथीचे रोगाचे निर्मूलन व्हावे म्हणून नरबळी देत. ब्राह्मण, स्त्री, स्वतःचे शरीर, भाऊबंध, मुलगा, मेहुणा, भाचा, मामा, वेदपरायण, संन्यासी, विद्यार्थी अथवा राजघराण्यातील मनुष्य बळी देऊ नये. तसेच शत्रु, आजारी, नपुसक, व्यंग अथवा अंगावर चट्टे असलेला बळी देऊ नये. बळी देणाराने उत्तराभिमुख असावे, तर बळीचे मुख पूर्वेकडे असावे. त्याचे अंगावर पाणी शिंपडून प्रार्थना करावी, ' सुवर्ण पहाडावर राहणाऱ्या देवते, हा नरबळी तुला अर्पण करीत आहे. तो तरुण, पुष्ट व अव्यंग आहे. आमचे संकटाचे निर्मूलन व्हावे, म्हणून अर्पण केला आहे. त्याचा स्वीकार कर. तुजपुढे मी त्याला मुक्ति देत आहे. ' नरबळी अर्पण करण्यात भक्ताची उच्चभावना येथे दिसून येते. ( आसाम मंदिरे, पृ. ८५ )

(१९३) पाटणदेवी— बिहार प्रांताची राजधानी पाटणा येथे या देवींचे स्थान आहे. बडी पाटणदेवीचे मंदिर महाराजगंज येथे असून छोटया पाटण-देवीचे स्थान पाटणाशहरातील चौक भागात आहे. या देवताच्या उत्पत्तींच्या कथा अशा की, दक्षयज्ञामध्ये सतीने आपला देह जाळून घेतल्यावर सुदर्शन चक्राने तिच्या शरीर अवयवाचे जे तुकडे पडले त्यातील मांडीचा काही भाग व पट (वस्त्र) महाराजगंज ठिकाणी पडले आणि तेथे शक्तिपीठ तयार झाले. या ठिकाणी महाकाली, महालक्ष्मी व महासरस्वती याच्या धातुच्या मूर्ति सुमारे १ फूट उंचीच्या असून लहानशी भैरवाची एक मूर्ती आहे. कथासरित्सागर ग्रंथा-प्रमाणे पाटणाशहर हे पुत्रकराजाने वसविले आणि या देवता संरक्षक म्हणून मानल्या. मंदिर उत्तराभिमुख असून पुढील भाग १५ × १५ चौरस फूट, तर गाभारा ८ × ८ चौ. फुटाचा आहे. चार चौरस फूट रुंद आणि ७ फूट उंच सिंहासनावर या मूर्ति विराजमान आहेत

छोटी पाटणदेवीचे क्षेत्रीही पटाचा तुकडा पडला आणि पीठस्थान निर्माण झाले. तंत्र चूडामणी ग्रंथात लिहिले आहे की, सतीच्या मांडीचा भाग मगध देशात पडला आणि ती क्षेत्रे हीच असावीत.[1] हे मंदिर शीख जमातीच्या हरमंदिराजवळ आहे ( गुरुगोविंदसिंहाचे जन्मस्थान ). या मंदिरात प्रमुख देवता म्हणून महाकाली महालक्ष्मी व महासरस्वतीच्या मूर्ति असून उजवीकडे पार्वती आहे. सूर्य व विष्णु यांच्याही मूर्ती आहेत. या मंदिराची प्रथम उभारणी केव्हा

---

१. टीप — या ग्रंथातील पीठस्थानांची यादी पाहिली तर हे विधान बरोबर नाही.

झाली याचा पुरावा उपलब्ध नाही, पण वेळोवेळी जीर्णोद्धार होत आहेत. कांही वेळा रोग-निवारणार्थ या देवीची शीतळा म्हणून पूजन होते. देवीचे साथीमुळे एखादा आजारी पडला, तर त्याच्या बिछान्याचे शेजारी थोडासा भाग गाईचे शेणाने सारवून तुपाच्या धारा सोडून तेथे अग्नि पेटवितात, धूप जाळतात, व दीप तेवत ठेवतात. नंतर माळ्याला बोलावून सितळा देवीची काही गाणी तो म्हणतो, रोग्याला निंबाच्या डहाळीने वारा घालतो व मिठाई खावयास देतो; याने त्याचा रोग परिहार होतो अशी भक्ताची श्रद्धा आहे. अजूनही ही रूढि चालू आहे. ( बिहारमदिरे, पृ. १००–१०२ ) ( पाटणा जिल्हा गॅझेट १९२४ ).

(१९४) मापौंडी—भारतामध्ये ही एकच देवता अशी आहे की, जिचे दर्शन सर्वसाधारण जनता घेऊ शकत नाही, फक्त राजघराण्यातील काही व्यक्तीच घेऊ शकतात. बिहारमधील सिंगभूम भागात पोरहट आणि सेरैकेला या दोन गावी या देवीच्या मूर्ति आहेत. ही दोन्ही गावे संस्थानिकाच्या राजधान्या होत्या. या देवतेचा इतिहास फार जुना आहे.

वदाप्रवलेखन नावाचा भूर्जपत्रावर लिहिलेला आणि सन १६४३ साली *मगुर्नी राऊत डोम्रा याने मूळ ग्रंथावरून उतरून घेतलेला ग्रंथ ओरिया भाषेत* आहे. या ग्रथावरून असे दिसते की, श्रीरामचंद्र श्रीरामेश्वराची आराधना करीत असताना स्वप्नात ही मापौंडी देवता आली आणि म्हणाली की, या शिवलिंगाच्या रक्षणार्थ तिने अवतार धारण केलेला आहे. देवीचे स्वरूप अग्रधानूंचे असून, डंबरूवर बसलेली, त्रिनयना, हाती तरवार, गदा, मुंड, खापर घेतलेली, चतुर्भुजा, सिंहवाहना होते.

समुति डम्बुरासनं कद्याचिल् वाघाम्बरी ।
श्री करॉचा गदाखड्गा खर्परम् वामाय् ॥

या ग्रंथाप्रमाणे या देवीची इतर नावे मंखलेश्वरी, हिंगुलाक्षी आली असून पौंडी हा पार्वतीचा अपभ्रंश असावा. या देवीने सिंगभूम भागात येण्याचे ठरवून, मुलीच्या वेषात, केवोंझर, बोनाय, जमडा, कौंयतला या मार्गाने येत असता, खिरा आणि निरा या बंधूंच्या स्वप्नात तिने दर्शन देऊन आपले ठिकाण दाखवून, मूर्ति राजाच्या घरी पोहोचवावी अशी आज्ञा केली. त्याप्रमाणे खिराने ती मूर्ति झाडाखालील टोपलीतून शोधून काढली आणि पोरहटच्या राजाकडे पोहोचती केली. ज्येष्ठ शुक्ल चतुर्थीला मूर्तीची तेथे स्थापना झाली. त्या वेळी अच्युतसिंग राजा गादीवर होता. याप्रमाणे ती राजाची कुलदेवता बनली. आजपावेतो भाद्रपद महिन्यात सोळा दिवस या देवीचा वार्षिक उत्सव साजरा होतो.

पुरी येथे निमलादेवी आणि जयपूर येथे विरजादेवी मंदिरातही हा उत्सव याच वेळी होतो. या नंतर राज्यात अनेक गावी या देवतेच्या मूर्ति स्थापन करण्यात आल्या आहेत. वार्षिक जत्रेच्या वेळी मेळे भरतात, कोंबडी, बकरी बळी दिली जातात व उत्सव साजरे करतात. नवीन भातपिकाचा नैवेद्य दाखविल्याविना कोणी नवा तांदूळ खात नाहीत.

कालांतराने या देवीची स्थापना खैरागढ शहरी झाली. सन १५८१ च्या सुमारास भूमया, कोल व इतर वन्य जमातींनी बंड करून पोरहटच्या राजाची धुळदाण उडविली आणि त्यामध्ये मूळ पौडी देवीची मूर्ति गहाळ झाली. पण पुढे राज्याची स्थिरस्थावर झाल्यावर, नदीतून मूर्ति वर काढून पुन्हा स्थापना करण्यात आली. अठराव्या शतकाच्या सुरुवातीला तेथील राजाने बुद्धपंथाला आश्रय दिला आणि या देवतेकडे दुर्लक्ष झाल्याने, ती स्थानभ्रष्ट झाली. कर्मधर्म-संयोगाने ती मूर्ति एका वृद्धा स्त्रीला मिळून, विकण्यासाठी तिने खैरागढ येथे नेली. मुलाला खेळणे म्हणून तेथील प्रधानाने ती विकत घेतली. त्याच रात्री तेथील राजा अभिरामसिंग व प्रधान नरहरी यांना स्वप्नात दृष्टांत झाला की, ती मूर्ति राजघराण्यात स्थापन करण्यात यावी. त्याप्रमाणे ज्येष्ठ शुद्ध ४ ला तिची स्थापना करण्यात येऊन तो स्थापनादिवस आजही पाळला जातो.

खैरागढ येथे मूर्ति आल्यापासून त्या राज्याची भरभराट झाली, तर पोरहटची धूळदाण उडाली. यामुळे दोन राज्यांत वैर उत्पन्न होऊन मूळ मूर्ति परत मिळविण्याचा प्रयत्न पोरहटच्या राजाने चालविला. पोरहटच्या राजाला औरस संतति नसल्याने त्याने खैरागढ येथील अभिरामसिंगचा पुत्र दत्तक घेतलेला होता. आपल्या बापाचे घरातून ती मूर्ति आणण्याची कामगिरी त्याजवर सोपविली. पण त्याचा प्रयत्न फसला. आणखी काही प्रयत्न झाले, तेही फसले. तेव्हा अभिरामसिंगाने राजाज्ञा काढली की, यापुढे देवीचे दर्शन सर्वांना होणार नाही. फक्त खैरागढ राजघराण्यातील राजा-राणी, राजपुत्र व पुजारी यांनाच घडेल, असे फर्मान दरबार भरवून काढले. यासाठीच या देवीचे दर्शन सर्वांना घडत नाही.

पुढे कंपनी सरकारचे वेळी दोन्ही राज्यात समझोता करताना पोरहटच्या राजाने अट घातली की, मापौडी देवता परत मिळावी. खैरागढ राजाने इंग्रजाचे मैत्रीस्तव अट कबूल केली आणि सन १८२३ साली कर्नल गिलबर्टच्या समक्ष मूर्ति दिली, पण ती बनावट होती. आपली युक्ति फसली तर स्वतः राणी, मूर्ति गळ्याभोवती बांधून, विहिरीत जलार्पण करण्यास सज्ज होती, पण तो प्रसंग ओढवला नाही. कालांतराने पोरहटच्या राजाला ती मूळ मूर्ति नव्हे, हे समजल्यावर, त्याने सजयनदीचे काठी ती फेकून दिली. कर्म-धर्म संयोगाने ती मूर्ति एका जमिन-

दाराला आढळली आणि त्याने आपल्या इच्छा गावी ती स्थापन केली. त्या गावी मापोडी देवीचे दर्शन सर्वांना घेता येते. सिंगभूम भागात यामुळेच मापोडी देवीला फार मान आहे. ( बिहार मंदिरे, रॉयचौधरी, पृ. १२–२० )

(१९५) मुंडेश्वरी— रामगड ( बिहार ) येथे सुमारे ६०० फूट उंच टेकाडावर या देवीचे फार पुरातन मंदिर आहे नागरशैली बांधणीचे एकच मंदिर सांप्रत आहे असे म्हणतात हे मंदिर अष्टकोनी आहे हे याचे वैशिष्ट्य होय. मूर्ति जरी महिषासुरमर्दिनीची असली तरी नेहमी पाहण्यात येते त्याप्रमाणे ही नाही. साधारणतः इतर मूर्तीमध्ये महिषासुराला मारण्याची क्रिया होत असते पण या ठिकाणी देवी दशभुजा असली आणि नेहमीची आयुधे असली, तरी ती महिषावर बसलेली आहे हेच येथील वैशिष्ट्य होय. ही देवीची मूर्ति या क्षेत्रातील प्रमुख नसून दुय्यम आहे प्रमुख स्थानी चतुर्भुज शंकराचे लिंग असून ते विनितेश्वर महादेव नावाने प्रसिद्ध आहे. दंडनायक गोमीभट्ट ( सन ३४८–४९ ) याने या शिवलिंगाची स्थापना केली डॉ. के. सी. पाणिग्रही यानी मुंडेश्वरी देवीच्या मंदिराची जी माहिती प्रसिद्ध केली आहे, त्यात त्याचे म्हणणे असे की, प्रथम हे नारायणाचे मंदिर असले पाहिजे, पण त्याऐवजी शंकराची मूर्ति स्थापन करण्यात आली.

या देवीचा वार्षिक उत्सव आश्विन नवरात्रामध्ये होतो. बिहार सार्वजनिक बांधकाम खात्याने सांप्रत थोडीशी दुरुस्ती करून मंदिर ठाकठीक केलेले आहे.

( बिहार मंदिरे, रॉय चौधरी, पृ. ६०–६४ )

# अधिकारी विद्वानांचे व वृत्तपत्रांचे अभिप्राय

★

## वैदिककाळापासून अणुशक्तियुगापर्यंत शक्तिसंप्रदायाचा विकास

भारतात आदिशक्ति देवीची उपासना या नाही त्या स्वरूपात सर्वत्र दिसते. श्री क्षेत्र माहूर, तुळजापूर, कोल्हापूर, अमरावती, प्रतापगड इत्यादि ठिकाणच्या देवीस्थानाना पौराणिक व ऐतिहासिक महत्त्व प्राप्त झालेले असून, अनेक कुटुंबातून देवीची उपासना आजही चालू आहे. शक्ति, संपत्ति व विद्या या तिन्ही क्षेत्रात यश देणाऱ्या या देवीने, प्रसंगानुसार अनेक अवतार धारण करून दुर्जनांचा संहार केला व आपल्या निःसीम भक्ताचे रक्षण केले आहे. या तिच्या कर्तृत्वाची स्मृति आजही तिच्या उपासनेच्या स्वरूपात घरोघरी दिसून येते. देवीभागवत, सप्तशतीचे पाठ व नवरात्रासारखे कुळाचार सर्वत्र रूढ आहेत.

भारतात देवीचे अवतार वा अंशावतार कुठेकुठे व कोणकोणत्या निमित्तानी झाले, यासंबंधीचा भौगोलिक व ऐतिहासिक आढावा घेणे, देवी शक्तीचे तात्विक स्वरूप स्पष्ट करणे, देवीसंबंधीच्या संस्कृत, प्राकृत व अन्य भाषीय वाङ्मयाचा शोध घेऊन त्याचे परिशीलन करणे, अशा अनेक विषयाचा शोध चिकित्सक दृष्टीने व्हावयास हवा. देवीची बहुतेक स्वरूपे अक्राळ-विक्राळ आहेत. भयानक स्वरूपाच्या या देवीस्वरूपाच्या पोटी भक्तांना सांभाळ-णारे वात्सल्य उफाळलेले असल्यानेच ती जगज्जननी, विश्वमाता, अंबा म्हणून नावारूपास आली आहे. हिच्याभोवती रक्तमांसाचा सडा, प्राण्यांचे बळी, जारण-मारण यांची रचना कशी, केव्हा व कोणत्या ठिकाणी निर्माण झाली? याचा शोध घेण्यासारखा आहे. सर्व विश्वाला व्यापून राहिलेल्या व मानवी कर्तृत्वास प्रेरक ठरलेल्या या देवीस्वरूपाची पौराणिक, ऐतिहासिक व भौगोलिक माहिती देवी-कोशाचे दोन ग्रंथ सोडल्यास फारशी एकत्र मिळत नाही.

मराठीभाषेपुरती संतोषाची बाब अशी की, लेखन वा वाङ्मय याच्याशी फारसा संबंध नसतानाही, जिज्ञासा, आवड व देवीस्थानाचा निकटचा संबंध यानी प्रेरित होऊन, उतार वयात, आठ-दहा वर्षे अविश्रांत परिश्रम घेऊन, गोरेगाव ( मुंबई ) येथील श्री. प्र. कृ. प्रभुदेसाई यानी या महत्त्वाच्या कामी हात घातला. मिळेल तेथून सामग्री मिळविली, अनेक स्थानाची दर्शने घेतली. असंख्य ग्रथाचे, लेखाचे आलोडन केले, विद्वानाबरोबर चर्चा केल्या आणि आपला प्रचड ग्रथ देवीकोश अथवा आदिशक्तीचे विश्वस्वरूप या नावाने प्रसिद्ध करण्यास प्रारंभ केला आहे. एखाद्या कार्याचा ध्यास कसा असतो आणि त्यासाठी चिकाटी केवढी जबरदस्त असते याचे उत्तम उदाहरण म्हणजेच हा ग्रंथ होय. अखिल देवीभक्तानी श्री. प्रभुदेसाई याचे या कामासाठी ऋणी राहिले पाहिजे.

वास्तविक पाहता या ग्रंथाचे नाव देवीकोशापेक्षा 'आदिशक्तीचे विश्वस्वरूप' हेच अधिक सार्थ व शोभण्यासारखे आहे. कारण कोशाची मांडणी, रचना, माहितीचा क्रम या ग्रंथात आढळत नाही. देवीचे स्वरूप विश्वव्यापी कसे आहे, हे मात्र या ग्रंथावरून ध्यानात येण्यासारखे आहे. या ग्रंथात अनेक विषयाचे जे सूक्ष्म व अभ्यासपूर्ण विवेचन आले आहे, ते जिज्ञासू साधकाना उपयुक्त होईल. वैदिक कालापासून अणुशक्तीपर्यंत शक्तीच्या उपासनेचा विकास कसा झाला याचे मोठे विलोभनीय दर्शन या ग्रंथात होण्यासारखे आहे. निरनिराळ्या स्थानांवर विराजमान झालेल्या देवताची माहिती मोठ्या प्रयासाने मिळविलेली असून शक्ति संप्रदायात मंत्र, तंत्र, यंत्र याचे काय स्थान आहे, याविषयीही विस्ताराने चर्चा केलेली आहे.

श्री. प्रभुदेसाई यानी या ग्रंथाच्या सिद्धीसाठी केलेल्या प्रयत्नाच्या खुणा पानोपानी दिसतील. शक्तीची उपासना देवीभक्तीचा प्रसार, देवीची सामाजिक व ऐतिहासिक प्रतिष्ठा व शक्ति-तत्त्व-ज्ञान याचे शास्त्रशुद्ध अध्यापन करणारास, हा ग्रंथ संदर्भासारखा नित्य उपयोगी पडणारा आहे. कित्येक ठिकाणी माहिती विस्कळित आहे, अपुरी आहे, ऐकीव आहे, पडताळा पाहिलेला नाही, वर्गीकरणात मतभेदास जागा आहे. असे असले तरी खूप प्रयत्न करून ही सर्व माहिती एकत्र केलेली आहे; हेही कमी महत्त्वाचे नाही. यातील अनेक चमत्कारांचा अर्थ लावणे

हे एक अवघड पण महत्त्वाचे काम आहे. माहुरची रेणुकादेवी निराकार असताना विष्णुदासांना तिच्या हातातील व पायातील अलंकार कसे दिसले? याचे कोडे लेखकाला पडलेसे दिसते. परंतु विष्णुदासांना झालेल्या साक्षात्काराचे महत्त्व आणि रहस्य समजावून घेतल्याशिवाय या प्रश्नाची उत्तरे मिळण्यासारखी नाहीत. संत नामदेव-तुकारामांनी वर्णन केलेले विठ्ठलाचे सगुणसुंदर रूप याच दृष्टिकोनातून पाहावयाचे असते.

शेवटी इतकेच सांगावयाचे की, श्री प्रभुदेसाई यांनी अपार कष्ट घेऊन एकट्याच्या प्रयत्नाने, देवीउपासकांना उपयुक्त होईल अशा प्रकारचा ग्रंथ निर्माण केला म्हणून त्यांना धन्यवाद देणेच योग्य होईल. उरलेले दोन खंड लवकर प्रसिद्ध होवोत हीच इच्छा.

(केसरी, पुणे, दिनांक १६ जुलै १९६८)

◆ ◆ ◆

## शक्तिदेवीच्या आचारकांडात देवीकोशकारांचा यशस्वी पदन्यास

आजपर्यंत जे कोशनिर्मितीचे प्रयत्न झाले, त्यापेक्षा वेगळ्या तऱ्हेने, ग्रथकाराने या क्षेत्रात यशस्वी पदन्यास केलेला आहे. आजवरच्या निर्मितीत लौकिक माहितीचा भाग विशेष होता, पण या कोशात हिंदुधर्मांच्या आचारकाडाची उभारणी मुख्यत एका ईश्वरी शक्तीच्या वेगवेगळ्या आविष्कारावर झालेली आहे, त्यातील एका विशिष्ट अविष्कारावर लेखकाने आपले लक्ष सपूर्ण केंद्रीत केले आहे. हे काम दिसते तितके सोपे नाही, याचे कारण देवताचे स्वरूप वैदिक, तात्रिक, पौराणिक व लौकिक असे चतुर्विध असून, त्याच्या उपासनापद्धतींचेही स्वरूप असे चतुर्विध व शिवाय मिश्र आहे. यामुळे ही सर्व माहिती समजावून घेऊन, सकलित करणे हे कार्य प्रचड आणि दिवसचे दिवस घालविणारे आहे.

श्री. प्रभुदेसाई यानी शक्तिदेवतेला आपल्या विवेचनाचा विषय निवडला आहे. हिंदूच्या देवताकाडात या देवतेइतका व्यापक विविध उपासनाप्रकार असलेला व सान्या भारतभर सिद्धपीठे म्हणून विखुरलेला दुसरा विषय नाही शक्तिसामर्थ्याविना कोणत्याही देवाला कसल्याही प्रकारचे निग्रहानुग्रहाचे सामर्थ्य व्यक्तच करता येणार नाही केवळ निष्फळ परब्रह्माला कोणताही जगद्व्यापार करताच येत नाही त्याला चित्‌शक्तीचा अगिकार करावाच लागतो याशाठी कोणतेही कार्य करण्यास सज्ज असलेल्या शक्तिपीठाला सशक्तीकच उपासना असते प्रत्येक पीठात शिव व शक्तीची द्वद्वमय उपासना असते.

या देवताची वैदिक उपासनापद्धति सुलभ असली, तरी तात्रिक उपासना पद्धति, मत्रादि अनेक गोष्टींशी सबधित असल्याने अत्यत क्लिष्ट आहे या पद्धतीत शुद्धाचार व वामाचार असे दोन प्रमुख सप्रदाय असून पहिल्यापेक्षा दुसरा अधिक सामर्थ्यवान्, अतोनात वाढ झालेला, उपासनेच्या मूर्ति आणि पद्धति अगावर शहारे आणणाऱ्या आणि नीट अधिकार व सयम नसेल तर मनुष्याचा अध पात करणारा असा आहे. त्यातील कित्येक पथाची माहिती गुप्तस्वरूपाची असल्यामुळे व साधक ती सहसा प्रकट करणे अनिष्ट समजत असल्याने ती मिळणे दुरापास्त होत आहे. उपासनापद्धतीचे भिन्न भिन्न स्वरूप समजून घेण्यासाठी हिंदुस्थान व इतर देशात विखुरलेल्या शक्तिपीठाची परिपूर्ण

माहिती संकलित करणे आवश्यक ठरते. सांगण्यास आनंद वाटतो की, हेच काम देवीकोशकाराचे हिरून येत आहे

आम्ही दाखविलेल्या विषयाच्या व्याप्तीचा विचार केला तर या विषयासाठी घ्यावयास लागणाऱ्या कामाची कल्पना येते कोशकार श्री प्रभुदेसाई, आपल्या उतार वयात, सेवानिवृत्ताचे सुखासीन आयुष्य दूर सारून, या कार्यास वाहून घ्यावयास पुढे आले, याबद्दल आम्ही त्यांचे मन पूर्वक अभिनंदन करतो

ही माहिती संकलित करताना, प्राचीन पाश्चिमात्य देवतासंबंधी आणि आर्यांच्या विजिगीषु वीरवृत्तींचा व संस्कृतिवर्धनाच्या कार्यांचा आढावा घेण्यासाठी माहिती पुरवून, त्यांनी भारतीय व भारतीयेतर देवताविषयक तौलनिक विचारही मांडलेला आहे, हे एक आगळेच वैशिष्ट्य मानावे लागेल या कोशाने हिंदुधर्माच्या अभ्यासकांची व इतर संशोधकांचीही मोठी सोय झालेली आहे टिळक महाराष्ट्र विद्यापीठाने या ग्रंथाच्या प्रकाशनाचे दायित्व घेऊन आपल्या परंपरेला योग्य तेच केले आहे. आम्ही या ग्रंथाचे स्वागत करतो व ग्रंथालयांनी आणि देवीभक्तांनी त्याला आश्रय देऊन लेखकाच्या श्रमाचे चीज करावे, असे आम्हाने सुचवितो

('हिंदू हृदय' त्रैमासिक, फाल्गुन शके १८८९, नागपूर)

◆ ◆ ◆

## वेदकालापासून देवीशक्तिचे स्वरूप आणि उपासना विवरण

जगातील इतर कोणत्याही देशापेक्षा भारतात आदिशक्तीची उपासना करणारे लोक जास्त आहेत, परंतु देवीच्या मूळ स्वरूपाची माहिती फार थोड्यांना असते आदिशक्ति ही तर सर्व देवांची जननी आहे 'कलौ चंडीविनायकौ' हे वचन प्रसिद्ध आहे आदिशक्तीचे प्रमाण व सोपपत्तिक विवेचन करणारा ग्रंथ आजपर्यंत मराठी भाषेत नव्हता ती उणीव प्रस्तुत देवीकोशाने भरून काढलेली आहे निरनिराळ्या कथा, पुराणे, संस्कृत प्राकृत, वाङ्मय, इतिहास, भूगोल यांचा धांडोळा घेऊन हा व्यापक ग्रंथ परिश्रमपूर्वक तयार करण्यात आलेला आहे विश्वातील शक्तिउपासनेची माहिती यात येणार असल्यामुळे, विश्वस्वरूप हे नांव सार्थ आहे पुराणांचे मंथन करून तौलनिक विचाराने भरलेले हे आदिशक्तीच्या वर्णनाचे नवनीतच होय वैदिक, पौराणिक व ऐतिहासिक देवतांची माहिती गोळा करून, त्यांचे पृथक्करण करून वर्गवारी करण्याचे हे मोठे जिकीरीचे काम होते, पण श्री प्रभुदेसाई यांनी ते साक्षेपाने केलेले आहे

उपासकाचे कार्यार्थासाठी एकाच देवीने ही अनेक स्वरूप धारण केलेली आहेत आणि त्या सर्वांबद्दलची माहिती एकत्र असणे हे अत्यावश्यक होते श्री प्रभुदेसाई यांनी हा विषय निवडून एक फार मोठे व कष्टाचे कार्य चालविले आहे कौतुकाची गोष्ट ही की, उतार वयात एकट्यानेच ते चालविले आहे त्यासाठी वेद, पुराणे, मंत्र तंत्र यंत्रविद्या, उपासनाविधि यांचे सूक्ष्म परिशीलन केलेले आहे गावात देवीचे मंदिर नाही, असा एकही गाव सापडणार नाही ज्या देवतेची आपण उपासना करतो तिचे खरे विश्वस्वरूप, इतिहास व स्थाने यांचे ज्ञान असल्याने उपासना वीर्यवती होते यासाठीच उपासनेला ज्ञानाची बैठक देण्याचे कार्य या ग्रंथाने होणार आहे जनबुद्धीला अगोचर परंतु सत्य अशा अनेक गोष्टी देवतांचे वलयात ऐकण्यात येतात, त्यांचा कार्यकारण भाव लावण्याचा प्रयत्न झाला पाहिजे

देवतांच्या बरोबर तत्कालिन समाज, आचारविचार कसे होते यांचेही दर्शन या ग्रंथात होते राष्ट्रीय उत्कर्षांचा देवतांशी संबंध आहे आणि त्यामुळेच देवतांचा इतिहास स्फूर्तिदायक राहून, पुढील पिढीला मार्गदर्शक होतो गुरु गोविंदसिंहाचे अनुभव, आकाशातून घेदारमिश्रित होणारा चंदनाचा सडा,

मगरीने आकर्षित झालेला मानव, मंत्राने प्रदिप्त केलेला अग्नि, इ० इ० नमूद केलेल्या घटना आश्चर्यकारक असून, विज्ञान पंडितानी त्याचा खोलवर विचार केला पाहिजे. ऋषींना जी मंत्रविद्या अवगत होती, ती आता लुप्तप्राय आहे. मंत्र सिद्ध होण्यास साधकाला अतिशय कडक आचार-विचार पाळावयाला लागतात, नियमबद्ध आचरण ठेवावे लागते, अनेक संकटांना तोंड द्यावे लागते आणि मगच पापाची जळमटे धुवून जातात. ग्रंथकाराने या कार्याकडे जनतेचे लक्ष वेधले असून, सर्व हालअपेष्टा सोसूनही मंत्रविद्या जगविणे भारतीयांना भूषणभूत आहे, असे आवाहन केले आहे.

भारतीय संस्कृतीचा अभिमान वाढून, नवीन पिढीच्या मनावर आदि-शक्तिमातेचे संस्कार निर्माण करण्यास, या ग्रंथाने चांगली मदत होणार आहे. नवीन पिढी विज्ञानयुगात वाढत आहे. त्याच्यात निष्ठा, भक्ति उत्पन्न होण्यास अशा विवेचनात्मक ग्रंथाची जरूरी आहे. नुसत्या पौराणिक भाकडकथा सांगून काम भागणारे नाही. शक्तिबरोबर भक्ति वाढली पाहिजे. त्यांच्यातील पौरुषाची जाणीव झाली पाहिजे. ती ग्रंथाचे वाचनाने होईल. हे राष्ट्रीय उन्नतीचे कार्य आहे. पोलीसखात्यासारख्या क्षेत्रात अगदी वेगळ्या वातावरणात नोकरी केल्यावर, धार्मिक व सांस्कृतिक संस्कार श्री. प्रभुदेसाई याचे ठिकाणी राहिले असून, सेवानिवृत्तीनंतर सतत परिश्रम घेऊन चिकाटीनी त्याने हे महान कार्य पुरे केले, याबद्दल त्याचे अभिनंदनच केले पाहिजे.

" सेविसी हा रस, वाटतो आणिका " ही संताची उक्ति त्यांनी कृतीत उतरविली आहे.

('सकाळ', पुणे, दि. १९ मे १९६८)

◆ ◆ ◆

भारतीय जनतेमध्ये जिज्ञासा बुद्धीच नसते हे खरे आहे पूर्व परपरेने चालत आलेल्या गोष्टी पुढे तशाच चालविणे एवढेच ते आपले कर्तव्य समजतात

आपला देश, धर्म, सस्कृति, रीतिरिवाज, सणसोहाळे अशासारख्या ढोबळ गोष्टीत देखील आजच्या पिढीत प्रगाढ अज्ञान दिसून येते आर्थिक जीवनाच्या बदलत्या परिस्थितीत या सर्व गोष्टींना फाटा मिळत गेल्याने स्वदेश, स्वभाषा, स्वधर्म यासबधीच्या प्राथमिक गोष्टींचेही सुसकार नव्या पिढीवर होण्यास साधन राहिलेले नाही या व्यापक दृष्टिकोनातून पाहिले तर मुबईच्या उपनगरातील गोरेगावच एक सेवानिवृत्त पोलिस अधिकारी श्री प्रल्हाद कृष्ण प्रभुदेसाई यानी सपादून प्रकाशित केलेल्या ‘ आदिशक्तीचे विश्वस्वरूप ’ या ग्रथाचे कौतुक करावे तेवढे थोडेच होईल

आदिशक्ति ही मातृशक्ति असून तिचा उगम कसा झाला आणि तिचा विकास होतहोत आज जगभर तिचे स्वरूप कसे पसरले आहे, याची साधार आणि सोपपत्तिक माहिती या देवीकोशामध्ये सपूर्णपणे वाचावयास मिळते ही माहिती अनत ठिकाणाहून अतिशय परिश्रमपूर्वक एकत्रित केलेली असून वाचकाच्या सोयीसाठी विभागवार सकलित केलेली आहे, यामुळे हवी ती माहिती पटकन शोधून काढण्याची उत्तम सोय झालेली आहे आदिशक्तीचे स्वरूप आणि त्या कल्पनेतून निघालेल्या देवता वेगवेगळ्या नावाने जरी जगभर पसरलेल्या असल्या, तरी त्या सर्वांमागील मूळ कल्पना कशी एकरूप आहे, हे या कोशात, अनत ग्रथांच्या आधारे दाखवून दिलेले आहे

जगभर पसरलेल्या मदिराची जी माहिती या खडातून वाचावयास मिळते, तीबद्दल लेखकास द्यावे तेवढे धन्यवाद थोडेच होतील

कुलदेवतासबधी सगळी माहिती कोणाही भक्ताला एकत्र मिळण्याची फक्कड सोय झालेली आहे साराश इतकाच सागता येईल की, देवताविषयक ऐतिहासिक माहिती, चित्ताकर्षक कथा, मनोरम काव्ये याचा एवढा मोठा सग्रह एकाच विषयावर आजवर मराठीत अगर अन्य भाषेत कुणी पाहिला नसेल या दृष्टीने हे वाङ्मयीन कार्य अपूर्वच म्हटले पाहिजे

(आचार्य प्र. के अत्रे, मराठा, दि २६-१०-६८)

◆ ◆ ◆

The valuable book entitled 'Adishaktiche Vishwaswarup' (Devikosh) came to my hands some days ago It is an Encyclopaedic work on Sakti culture in its different aspects in this country and is the product of great labour continued through a long time in different fields of reaserch on the subject It is a valuable publication of the Tilak Maharastra Vidyapeeth, Poona

It reminds me of a similar encyclopaedic work on the same subject, published recently by the Vishwa Bharati Shanti Niketan (West Bengal), the work referred to by me is named 'Sakti sadhana' (in Bengali) and is in two big volumes running through 1066 pages

I shall be glad to revive the valuable work at some length in future, if my ailing health permit It seems to me that there should have been a separate section more thorough than it has been possible at present, on the philosophical back ground of Sakti culture

Mahamahopadhyaya, Gopi Nath Kaviraj
M A, D Litt, Varanasi (15-7-1968)

I have gone through Adi Shakti che Vishwaswarup a Devikosh compiled by Shri Pralhad Krishna Prabhudesai of Goregoan, Bombay.

The book is the outcome of vast reading The author has selected his material from the Vedas, Puranas, History, Iconography, Mythology etc. and has given in many volumes, information about *various aspects of Devi, which one can gather only in a life-time of* study. The author deserves the heartiest congratulations of all those who are interested inthe spiritual culture of our country.

I hope the philosophical aspect of Shakti will be dealt with in the volumes yet to be published

*The volumes contain a main of information on a subject of* which it has received very little attention of Scholars so far. It is heavily documented and is written in a simple but graceful style It deserves to be treasured in every home and library.

**Shri Thakur Jaideva Singh,**

Principal, Y. D. College, Lakhamipur, Jheri, (U. P.)

Varanasi, 2-5-1968

◆ ◆ ◆

# आदिशक्तीचे विश्वस्वरूप

## खंड ४ था

या खंडात येणारे विषय पुढीलप्रमाणे—

( १ ) पूर्व व पश्चिम गोलार्धातील देवतांचे दर्शन.

( २ ) देवतांना अनुसरून सांस्कृतिक परंपरा आणि संस्कृति विवेचन.

( ३ ) देवी-कैकावली.

( ४ ) देवीची मूळ स्वरूपातील छायाचित्रे.

( ५ ) चारही खंडांची संदर्भानुसारी सूची ( Index ).

# दे वी को श

खंड १ ला

मूल्य रु. १२·५०

खंड २ रा

मूल्य रु. १२·५०

खंड ३ रा

मूल्य रु. १२·५०

खंड ४ था

लवकरच प्रसिद्ध होईल.

सर्व पुस्तक-विक्रेत्यांकडे मिळतात.